# माझी जन्मठेप

## पूर्वार्ध

© **श्रीमती हिमानी सावरकर**

**सावरकर भवन, राजा ठाकूर पथ, शनिवार पेठ, पुणे.**

**दूरध्वनी :+९१२०२५५४४७५१**

**इंटरनेट अधिकार :- स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वा. सावरकर मार्ग, दादर, मुंबई ४०००२८.**

**प्रकल्प संचालक : रणजित विक्रम सावरकर**

**प्रकल्प समन्वयक : अशोक रामचंद्र शिंदे**

**हे पुस्तक आसामी, बंगाली, इंग्रजी, गुजराथी, हिंदी, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, पंजाबी, तमिळ, तेलुगु या भाषांमध्ये उपलब्ध आहे.**

# माझी जन्मठेप

## पूर्वार्ध

प्रास्ताविक

**स्वजनस्य ही दुःखमग्रतो।**
**विवृत्तद्वारमिवोपजायते।।**

- **कालिदास**

आमचा अंदमानाचा वृत्तान्त नि तेथे बंदीवास कंठित असताना भोगाव्या लागलेल्या यातना यांची कहाणी ऐकण्यासाठी महाराष्ट्रातच नव्हे, परंतु उभ्या हिंदुस्थानात आमच्या सहस्रावधी देशबांधवांनी सहानुभूतिपूर्ण औत्सुक्य आजपर्यंत अनेक समयी व्यक्त केलेले आहे. त्यातही सुहृदांस आपण भोगिलेली उत्कट सुखदुःखे सांगताना समवेदनांच्या अश्रूंनी स्निग्ध होणारा तो मधुर आनंद उपभोगण्यासही आमचे हृदय आमच्या सुटकेपासून साहजिकतःच कासावीस होत आले आहे. परंतु तरीही आजपर्यंत काही केल्या अंदमानाची कथा ओठावर येत असताही ओठाबाहेर येईना. अंधकारात वाढणाऱ्या कोण्या काटेरी फुलवेलीप्रमाणे त्या अंधेऱ्या दिवसांची स्मृती उजेड दिसताच सुकून जाऊ पाही, दिपून जाई. कधी वाटे सांगण्यासाठी का हे सगळे भोगिले! तर मग तो सगळा अभिनयच म्हणावयाचा. कधी वाटे आपणास भोगाव्या लागल्या त्या यातना भोगीत असतानाच जे त्या यातनांस बळी पडले त्यांना घरी परत येऊन प्रियकरांस ती सुखदुःखे सांगण्याचे समाधानही मिळाले नाही. ते सहतपी आज आपणाबरोबर नाहीत. ज्यांच्यासह तपाचा उत्ताप सहन केला त्यांस सोडून ह्या पारण्याच्या पंक्तीतील ही मिष्टान्ने एकट्यानेच कशी खावी? ही त्यांच्याशी प्रतारणा तर होणार नाहीना?

आणि आपणासारख्या कित्येक मनुष्यांवर आजपर्यंत हे खडतर संकटांचा सामना करण्याचे प्रसंग कोसळले आहेत नि अजून असले किंवा याहून भयंकर प्रसंग कोसळावयाचे आहेत. ह्या जीवनकलहाच्या नगा-यांच्या खाईत आपण काय ही आपली एवढीशी टिमकी वाजवीत बसावे! परंतु दुःखाच्या गळ्यात किंकाळीचा ढोल हा निसर्गानेच बांधिलेला आहे की, तो वाजवून त्याने आपली शक्य ती करमणूक करून घ्यावी. ससाण्याने झेप घालताच विवश होऊन त्याचे चोचीतच पडलेला पक्षी साहाय्याची लेशमात्र आशा नसता जो स्वाभाविक चित्कार करतो, त्या चित्कारापासून तो नेपोलियनचे प्रेत सेंट हेलिनामधून पॅरिसला ज्या दिवशी परत आणले त्या दिवशी एक राष्ट्रचे राष्ट्र आपले ध्वज नमवून आपल्या सहस्र वाद्यांतून सहस्र शोकस्वर नि विरहगीते गात जो दुःखाचा हंबरडा फोडते झाले त्या हंबरड्यापर्यंत, त्या राष्ट्रीय उद्गीतापर्यंत, जितका प्राणिमात्राचा आक्रोश आहे तितका आपापल्या दुःखांची प्रसिद्धी करण्यात चूर झालेला असतो. आक्रोश हा दुःखाचा स्वभावच आहे, तेव्हा या अनंत आकाशात जे अनेक चित्कार उसासे टाकून आपापल्या दुःखाचा भार कमी करीत हिंडत आहेत त्यात माझ्या दुःखाने प्रसिद्धीचा उसासा का टाकू नये? या अनंत आकाशात माझ्याही आक्रोशाला अवकाश असेल! असे वाटून

प्रवृत्ती, केव्हा केव्हा दुःख एकदाचे ओकून टाकण्यास, अगदी सज्ज होई. पण तीच परिस्थिती तिचा पाय हिसडून तिला मागे खेची.

कारण आमच्या सध्याच्या परिस्थितीत आमच्या अंदमानच्या अनुभवांत जे सांगण्यासारखे आहे तेच विशेषकरून सांगता येणार नाही. परिस्थितीत जे सांगता येईल ते अगदी वरवरचे, उथळ वा सापेक्षतः क्षुल्लकसे वाटत असल्याने सांगण्यास उत्साह येत नाही आणि जे सांगण्यासारखे वाटत आहे ते परिस्थिती सांगू देत नाही. अशा स्थितीत काही तरी सांगून त्या कथानकाचे चित्र रंगहीन नि सत्वहीन करून टाकण्यापेक्षा प्रस्तुत काही सांगूच नये. कधी तसा दिवस उगवेल की ज्या दिवशी सर्व गूढ आकांक्षा व्यक्त होऊ शकतील; सर्व मूक भावना मोकळेपणाने बोलू शकतील त्या दिवशी सांगावयाचे ते यथाप्रमाण सांगू. तसा दिवस या आयुष्यात न उगवला तर नाही सांगणार, ते वृत्त जगाने ऐकले नाही म्हणून काही त्याचे महत्व उणावत नाही वा त्याची तीव्रता बोथट होत नाही किंवा ह्या जगताच्या प्रचंड राहाटीत ते सर्व अश्रुत राहिले म्हणून काही मोठा खंड पडणार आहे असेही नाही, असे वाटे!

मनाच्या अशा शोकायमान स्थितीत आजपर्यंत अंदमानच्या आमच्या आठवणी आमच्या प्रिय बांधवांस सांगण्याचे काम तसेच राहून गेले. आमच्या मागून अंदमानास आलेल्या आमच्या पूर्वी सुटलेल्या कित्येक राजकीय बंदींनी आपापले अनुभव प्रसिद्ध केलेले आम्ही पाहिले. इतरत्रही वर्ष सहा महिन्यांसाठी जे कारागृहात पडले त्यांनीही पण त्यांचे अनुभव नि त्यांच्या यातनांची कहाणीही वेळोवेळी प्रसिद्ध केलेली आमच्या वाचनात येतच गेली. परंतु अशा आत्मस्मृतिकथनास आत्मश्लाघेचा अनिवार्यपणे लागणारा जो गंध तो आमचे मनास पुनः पुनः संकोचित करी आणि प्रियजनांपाशी आपली सुखदुःखे मन मोकळे करून सांगण्याची स्वाभाविक प्रवृत्ती गत नि जित संकटांच्या पराभवाची कथा सांगण्याचा आनंद उपभोगण्यासाठी अत्त्युत्सुक झालेली असताही परिस्थिती वाटेत पुनः पुनः आडवी येई.

तथापि जे काय अर्धेमुर्धे वा अल्पस्वल्प सध्याच्या परिस्थितीत सांगता येण्यासारखे आहे ते तरी आपण सांगितलेच पाहिजे. तेही आम्हांस अत्यंत श्रवणीय वाटणारे आहे असा अगदी उत्सुक, निष्कपट नि प्रेमळ आग्रह प्रसिद्ध प्रकाशन मंडळ्यांपासून तो शाळेतील मुलांपर्यंत आम्हांस अजूनही एकसारखा होत असल्याने त्या आग्रहास आता मान न देणे म्हणजे विनयाचा अतिरेक करून एक प्रकारचा सार्वजनिक मनोभंग केल्यासारखे होईल असे आम्हांस वाटू लागले आहे. एतदर्थ परिस्थितीत जो काय सांगता येईल तो आमचा अंदमानामधील वृत्तान्त सांगून टाकण्याचा आम्ही निश्चय केला आहे. सुसंगत वृत्तान्तकथन अशक्य आहे हे उघड असल्याने ज्या काही त्रोटक, तुटक नि संबंधविहीन आठवणी आम्हांस सांगता येतील त्यांवरच वाचकांनी प्रस्तुत प्रसंगापुरते समाधान मानून त्यांतील विसंगतपणाविषयी वा अस्पष्ट उद्‌गारांविषयी तो परिस्थितीचा दोष समजून काही दिवस क्षमा केली पाहिजे.

अशा वृत्तान्ताचा सार्वजनिक उपयोग फार मोठा आहे हे आम्ही जाणून आहो. परंतु केवळ वृत्तान्तापेक्षाही असा दुर्घट परिस्थितीतील विचारांचा, विकारांचा नि भावनांचा इतिहास हा अधिक मनोरंजकच नव्हे तर बोधप्रदही होणार असल्याने आम्ही ह्या आठवणींत त्यास अधिक महत्व देणार आहो. परंतु ह्या आठवणी तुटक असल्याने नि भावनांचा तो इतिहास पुसट, सूचक नि अस्पष्ट असाच सांगणे अपरिहार्य झाल्याने संपूर्ण नि सुसंगत कथन

प्रसिद्ध होईतो आमच्या अंदमानामधील जीवनाविषयी वाचकांनी कोणताही सामान्य सिद्धान्त असा करून बसू नये. ह्या आठवणींत सर्व वृत्त जरी सांगता आले नाही तरी जे सांगितले जाईल ते अक्षरशः नि भावार्थशःही यथातथ्य सांगितले जावे ह्याविषयी शक्य ती दक्षता राखण्याचा यत्न केला जाईलच.

या ग्रंथात जे विचार, भावना नि घटना यांचे वर्णन येईल ते त्या त्या प्रसंगी उद्भवलेल्या विचारभावनादिकांचे निदर्शक असून आज ते केवळ ऐतिहासिक दृष्टीनेच वाचले जावे, अशी लेखकाची अपेक्षा आहे.

**- वि. दा. सावरकर**

प्रकरण पहिले

# मुंबईतील डोंगरीचे कारागृह

“पन्नास वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा तुम्हास लागू झाली आहे. हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाने इंग्रजांनी तुम्हास फ्रान्सच्या हातात दिलेच पाहिजे अशी सक्ती करता येत नाही, असा निकाल दिला आहे.” मला + + + नी सांगितले.

“ठीक आहे, मी हेगच्या आशेवर अवलंबून राहिलोच नव्हतो; पण मला हेगचा निकाल पाहावयास मिळेल का?”

“ती गोष्ट माझ्या  हातात नाही. मला तुमच्यासाठी जे शक्य ते मी करीन. तथापि, ही आम्हां तिऱ्हाअतांसही ऐकताच विव्हल करणारी बातमी आपण ज्या धैर्याने आता ऐकून घेतलीत ते धैर्य माझ्या साहाय्यासाठी अडून बसेल असे मला वाटत नाही!” ते गृहस्थ मनापासून कळकळून म्हणाले.

“ही किंवा असल्या बातम्या मलाही भयंकर वाटत नाहीत असे थोडेच आहे; परंतु प्रथमच समजून उमजून या संकटास तोंड देण्याचा आम्ही निर्धार केला असल्याने मन एका प्रकारे निर्ढावून गेल्यासारखे झाले आहे. आपणही माझे स्थितीत असता तर हेच धैर्य याच विवेकाच्या बळाने आपणही धरू शकता. आपल्या साहाय्याविषयी मी आभारी आहे.”

इतक्यात कोणी आल्याचा आवाज आला. हे गृहस्थ चटकन माझ्या खोलीपुढून निघून दुसऱ्या दिशेने आपल्या कामास निघून गेले. मी आपल्या कोठडीत मागे सरकून उभा राहिलो. मनात ‘पन्नास वर्षे’ हा शब्द गुंजत होता.

लगेच ज्यांच्या येण्याचा आवाज झाला होता ते लोक आले. अधिकाऱ्याने माझे दार उघडून मला जेवण वाढविले. हेगच्या निकालापर्यंत मला बंदीवानाचे जेवण वा वेष देण्यात आला नव्हता; त्याप्रमाणे आजही बंदीवानाचे जेवण नव्हते. कारण कदाचित अजून सरकारी हुकूम आला नसेल! मी जेवण जेवताना हेतूपूर्वकच चांगले पदार्थ खाल्ले नाहीत. अधिकारी म्हणाला, “का रावसाहेब, आज जेवत का नाही?”

“जेवतो तर; पण असेच पदार्थ जेवतो की जे सगळ्या बंदीवानांस मिळतात. कोणी सांगावे उद्या बंदीवानांतच काम करण्यासाठी आम्हास जावे लागणार नाही म्हणून? सदन्न कधी मिळेल कधी नाही; पण कदन्न मात्र नेहमीचे खरे. म्हणून त्याची मैत्री करून ठेविली असता ती चिरकाल उपयोगी पडेल.” मी हसून म्हणालो.

अधिकारी उतावळेपणाने म्हणाला, “छे! छे! असे कधी होणारच नाही. तुम्ही फ्रान्समध्ये परत जाणार असा हुकूम देखील आला आहे, असे मी ऐकतो. तुम्ही बंदीवानांत काम करणार? रावसाहेब! ईश्वर असे कधी करणार नाही!”

तोच एक शिपाई धावत येऊन म्हणाला “हवलदारजी साहेब आता है.”

दार खाड्कन बंद झाले. जेवण वाढीत लोक पुढे गेले. सुपरिन्टेंडंट आला व मला रीतसर पण सहानुभूतीच्या शब्दांत सांगण्यात आले की, यापुढे तुम्हाला बंदीचे कपडे व अन्न मिळेल. तुमची पन्नास वर्षांची शिक्षा आजपासून लागू झाली आहे.

मी उठलो, माझे घरचे कपडे उतरले. बंद्याचे कपडे घेतले व अंगात घालू लागलो. मनात चर्र झाले. हे कपडे, बंदीवानाचे कपडे, जे आज चढत आहेत ते आता पुनः कधीही उतरणारे नाहीत! या कपड्यांतच आपले प्रेत बाहेर काढले जाणार! पुसट विचार - पण मन उदाससे झाले. तोच सुपरिन्टेंडंट काही इकडचे तिकडचे बोलत होता; त्याशी संवादात मनास बळेच निमग्न केले.

इतक्यात एक लोखंडी बिल्ला आणून शिपायाने हातात दिला. हा तो बंदीवानाचा छातीवर रुळणारा क्रमांक! त्या बिल्ल्यावर बंदीवानाची सुटकेची मिती दिलेली असते. माझी मिती! मला सुटका तरी आहे का? मला मरण हीच माझी सुटकेची मिती? काही औत्सुक्य, काही निराशा, काही विनोद अशा मिश्र भावनेने मी बिल्ल्याकडे पाहिले. सुटकेचे वर्ष १९६० इसवी! क्षणभर त्याचा अर्थ काहीच प्रकाशला नाही. क्षणा दो क्षणांत त्यातील भयंकर अर्थ प्रकाशला! शिक्षा १९१० व्या वर्षी व सुटका १९६० व्या वर्षी!

+ + निष्ठुर विनोदाने म्हणाला, “काही चिंता नाही, दयाळू सरकार तुम्हाला १९६० साली सोडीलच सोडील.”

मी उपहासतच म्हणालो, “पण मृत्यू अधिक दयाळू आहे. त्याने मला त्यापूर्वीच सोडून दिले तर!”

दोघेही हसलो. तो सहज हसला. मी प्रयत्नपूर्वक हसलो. सुपरिन्टेंडंट आणखी काही चर्चा करून गेला. मी खाली बसलो. सर्वजण निघून गेले. मी व माझी शिक्षा असे दोघेच एकटे उरलो व त्या उदास कोठडीत एकमेकांच्या तोंडास तोंड देऊन निरखू लागलो.

ह्यापुढील त्या दिवसाची कहाणी व अंतःकरणातील खळबळ आम्ही ‘सप्तर्षि’ ह्या कवितेच्या पूर्वार्धात वर्णिलेली त्या पुस्तकात प्रसिद्ध झालेली आहे.

**दुसरा दिवस**

“आताच उजाडले” जमादार येऊन म्हणाला, “जरी तुमची शिक्षा सुरू झाली आहे तरी तुम्हास पूर्वीप्रमाणेच सकाळी व्यायामासाठी खाली फिरावयास न्यावयाचे म्हणून साहेबाने सांगितले आहे.”

मी व्यायामास खाली उतरलो. इकडे माझ्या खोलीची कसून झडती घेण्यात आली. माझी आजपर्यंतची सर्व पुस्तके व सामान खाली नेण्यात आले! शिपायांच्या पहाऱ्यात डोंगरीच्या तुरुंगाच्या मधल्या चौकात मी हळूहळू फेऱ्या घालीत होतो. माझी ती ‘बॅरिस्टरी’ वस्त्रे जाऊन आज अगदी बंदीवानासारखीच खरबरीत बंदीवासाची वस्त्रे माझे अंगावर होती. त्या वस्त्रांत बॅरिस्टर दिसतो तरी कसा या कुतूहलाने बहुतेक व खऱ्याखऱ्याच समवेदनेनेही थोडेसे असे बरेच लोक रुग्णालयातून, वाटेतून, खिडक्यांतून, नाही तेच काम काढून तेथून जाताना मला पाहत होते. डोंगरीचा तुरुंग मध्यवस्तीत आहेसे वाटते; कारण आजूबाजूस किंचित दूरवर उंच उंच चाळी व घरे दिसतात. तेथे व्यायाम घेत असता प्रत्यही त्या चाळींतून व खिडक्यांतून बायकापुरुषांचे थवे थबकत उभे राहत व मी व्यायाम

संपवून परत जाईतो आपसात कुजबुजत असत. पोलिसांची दृष्टी चुकवून केव्हा केव्हा मीही त्यांचे नमस्कार स्वीकारून प्रतिप्रणाम करीत असे. मनात त्यांची ती पूज्यबुद्धी पाहून कधी बरे वाटे, पण कधी... असे विचार येत. एकदा पोलिसांनी समोरच्या एका घरवाल्यास धमकाविल्याची बातमी मला कळली; तेव्हा आपणासाठी इतरांस पीडा होऊ नये म्हणून मी शक्यतो खाली पाहून येरझारा घालीत असे. या व्यायामाचे वेळी योगसूत्रांचा पाठ तोंडाने म्हणावा व नंतर त्यांतील एकेका सूत्रावर विचार करून त्याची छाननी करीत असावे. आजही त्या दिनक्रमाप्रमाणे तशा विचारांत गुंतून मी व्यायाम करीत असता 'वखत पुरा हुवा, चलिये!' म्हणून माझ्यासाठी नेमलेल्या एका हवालदारांनी सांगितले. मी जिना चढून वरच्या त्या माझ्या कोठडीत गेलो; पण जो विचार करीत होतो त्यातच गुंतून गेल्याने तसाच बसून राहिलो. बराच वेळ त्या निमग्नतेत गेला; तोच पुनः दार खडबडले आणि एका बंदीवानाच्या डोक्यावर वळलेल्या चऱ्हाटाचे एक गुंडाळे देऊन एक हवालदार आत आला. माझे चित्त विचार करता करता निवांत झाले असल्याने मी क्षणभर तसाच डोळे उघडून निश्चिंत होतो, ते पाहून तो हवालदार म्हणाला -

"रावसाहेब, चिंता करू नका, ईश्वर तुमचे दिवस पार पाडील. तुमच्यावरील संकटाला परमेश्वर साक्षी आहे; माझ्या कुटुंबातील मंडळींचे डोळ्यांसही पाणी आले. पण आपण तरी कधीही डगमगणार नाही अशी हमी सगळ्यांस मोठ्या गर्वाने दिली. मग हे काय? चिंता करू नका."

या त्याच्या, सद्हेतुपूर्वक समजविण्याचा परिणाम मात्र अगदी उलट झाला. चिंता करण्यासारखे काही तरी घडले आहे हे स्पष्ट आठवले. मनास किंचित बोचल्यासारखे झाले, मी म्हटले, "हे चऱ्हाट कसले?" हवालदार बळेच हसू आणून "ते काही नाही, उगीच आपला कायदा म्हणून काही काम आणून ठेवावयाचे, होईल ते करा, त्याची चिंता मुळीच नाही."

त्याने ते चऱ्हाट खाली काढले. त्याचे तुकडे तुकडे केले व ते उचलून ठोकून, पिंजून त्याचा परत काथ्या कसा करावयाचा हे मला त्या बंदीवानाकडून दाखविले.

तर मग ही 'सक्तमजुरी'!

**जगातील काथ्याकूट**

हूं, चल दे तोंड तिला. काथ्या कुटावयाचा इतकेच ना! हा रे वेड्या मना! त्यात हलकेपण ते काय आहे! आयुष्य व्यर्थ जाते? अरे हे आयुष्यही स्वतःच एक काथ्याकूट आहे! पंचमहाभूतांस पिळून वळून हे आयुष्याचे चऱ्हाट वळावयाचे, तेच ते तंतू जोडून लांबवीत बसावयाचे व शेवटी सडत आले की, मृत्यूच्या 'मोगरी'ने कुटून पुनः काथ्या करून पंचमहाभूतांच्या ढिगात मिसळून द्यावयाचे!

सकाळ झाली की संध्याकाळ, संध्याकाळ झाली की सकाळ, सगळी काथ्याकूट. आपण वनस्पती खात खात जगावयाचे, जगत जगत मरावयाचे, मरताच त्या हाडा-मासांस वनस्पतींनी खावयाचे, सगळी काथ्याकूट. तेजोमेघांची सूर्यमाला, सूर्यमालेची पृथ्वी, पृथ्वीची एखाद्या धूमकेतूशी टक्कर उडाली की पुन्हा तेजोमेघ, सगळी काथ्याकूट! तशीच, व त्याचाच अवश्य व अपरिहार्य भाग म्हणून, हे वळलेले चऱ्हाट उकलून कुटण्याची आमची

काथ्याकूट. जर ती महान काथ्याकूट महत्वाची असेल, तर तीत आयुष्य व्यर्थ जात नसेल, तर हीही एक छोटीशी काथ्याकूट कर्तव्यच आहे. कारण त्या महान काथ्याकुटीचा हाही एक अपरिहार्य घटक आहे. कारण तो घडत आहे.

मी काथ्या कुटू लागलो. तो हवालदार व बंदीवान मला काम येते की नाही ते पाहण्याच्या निमित्ताने तेथेच उभे राहिले आणि मला करमणूक करण्यासाठी इकडच्यातिकडच्या गोष्टी बोलू लागले.

“महाराज, तुम्हाला माहीत नसेल की, याच खोलीत टिळक व आगरकर यांना शिक्षा झाली तेव्हा ठेवण्यात आले होते. ते आपसात वाद करीत तेव्हा मोठमोठ्याने बोलत. केव्हा केव्हा त्यांना हळू बोला म्हणून बजवावे लागे.”

“पण ते ऐकत की परत तुमच्यावरच रागावत?”

“वादाच्या भरात खंड पडल्याने ते थोडेसे त्रासत. पण पुन्हा हळू बोलू लागत, किंवा चूप बसत. आणखी कोणी वाईचे वर्तमानपत्रकार - हो, हो, तुम्ही म्हणता तेच लेले म्हातारे कुबडेसे होते नाही, तेही येथेच साध्या बंदीत असत. त्यांची बुद्धी मोठी कल्पक. इकडे ढेकूण फार झाले होते. लेले अगदी त्रासून जात. एके दिवशी बामणाने केले काय की, साधी बंदी असल्यामुळे त्यांना जी घरची वस्त्रे मिळत त्यांतील एक अगदी पातळ पण घट्टशी चादर घेतली व तिची उशी करतो तशी एक आच्छादनाची पिशवी शिवू लागले. आम्ही सहजच विचारले, “शास्त्रीबुवा, हे काय शिवता? साहेब रागावेल.” ते म्हणाले, “थांबा तर खरे तुम्हांस ढेकणांचे एक मी रामबाण औषध शोधून काढले आहे ते देतो.” थोड्याशा तासांनी ती पिशवी पुरी झाली आणि पाहता पाहता बामण तीत घुसून गेला. केवळ डोळ्यांची व नाकाची तेवढी भोके उघडी. बाकी डोक्यापर्यंत त्या पिशवीत एखाद्या गादीसारखा घुसून, व आतून तिचे तोंडाचे कसे ओढून बामण संध्याकाळी जो निजला तो सकाळी ठोठावले तेव्हा जागा! तेव्हापासून त्यास ढेकूण रात्री डसला असेल तर शपथ! दिवसा ती पिशवी उरफाटी करून उन्हात टाकीत व रात्री तीत घुसून घोरत पडत!”

“टिळक आगरकरांबरोबर येथे होते त्यानंतर पुनः कधी होते का?”

“होते तर! पण त्या वेळेस त्यांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. याच खोलीत ते असत... एक दिवस ढेकणांनी डसून डसून रात्रभर झोप येऊ दिली नाही. मी सकाळी दार उघडले तेव्हा पाहतो तो टिळक ढेकूण मारीत बसले आहेत. मी म्हटले “काय रावसाहेब, बरे आहे ना?” ते शांतपणे हसत म्हणाले “बरं आहे तर! केवळ, जमादार! काल साऱ्या रात्रभर झोप नाही. थोडे आत तर या! बघा ही तुमची पाळलेली जनावरे!” मी पाहतो तो ढेकणांच्या रांगा भितीशी चाललेल्या आहेत ...पण “काय हो तात्यासाहेब! हे जे राजकीय काम तुम्ही हाती घेतले आहे हे सिद्धीस जाईल का हो?” ...

हवालदार इत्यादी सर्व मंडळी गेली. पुनः मी व माझी शिक्षा दोघे एकमेकांची ओळख करून घेत समोरासमोर उभे राहिलो.

ती ओळख पुरी होत चालली. आता काहीएक संशय उरला नाही. आशा नव्हती तरी हेगच्या निकालात क्वचित सुटू हा संभव होता; ते संपले. आता हे निश्चित की, हा सारा जन्म अशाच कोणत्या तरी कोठडीत सडत जाणार. तर मग? त्यासही तोंड दिले पाहिजे, दुसरे काय!

**प्रतिकूल तेच बहुधा घडेल**

माझ्या या कष्टमय हेतुपूर्वक स्वतःवर कोसळून घेतलेल्या संकटांचे पर्वताखाली चिरडलेल्या आयुष्यात जर कोणता एखादा नियम अतिशय कडू पण अतिशय हितपरिणामी झाला असेल तर तो सदोदित प्रतिकूल तेच घडेल हे गृहीत धरून त्यास तोंड देण्याची मनाची सज्जता करून ठेवणे हाच होय.

ज्यांचा ज्यांचा सर्वतोपरी असहाय अशा कालात, देशात वा परिस्थितीत जन्म झाला असेल, आणि तरीही त्या परिस्थितीशी भयंकर झुंज खेळून तिला चीत करून, तिच्या छातीवर उभे राहून कोण्या नवयुगाची, कोण्या महान ध्येयाची उषा ज्यांना पाहावयाची असेल त्यांना 'प्रतिकूल तेच बहुधा घडेल, हे गृहीत धरून त्यास तोंड देऊ' या नियमाचे हे हलाहल प्यायलेच पाहिजे. प्रतिकूल तेच घडणार आणि मी त्यास तोंडही देणार, असा निर्धार केला असता क्वचित अनुकूल तेच घडले तर अर्थातच काही एक हानी न होता उलट तो अनुकुलाचा आनंद द्विगुणित होतो; पण अनुकूल तेच घडेल अशी आशा, लालसा करीत बसले असता जर प्रतिकूल घडले - आणि असहाय पिढीत जन्मलेल्यांच्या जीवनात तोच संभव अधिक - तर मात्र एकाएकी निराशेच्या कोसळणाऱ्या पहाडाखाली धैर्याचा चक्काचूर होऊन गेल्याविना सहसा राहत नाही. सिद्धीच्या मानस सरोवरावर क्रीडा करण्याचे ज्या पिढीचे भाग्य असेल ते राजहंस सुखेनैव मुक्ताफळभोजन करून, बिसतंतूंचा फराळ करोत! परंतु प्रयत्नांच्या मृतसरोवराच्या विषारी प्रदेशांतून ज्या पिढीस मार्ग कंठावयाचा आहे तिने प्रतिकुलाचे, लोखंडाचे चणेच खावयाची व पचवावयाची सवय ठेवली पाहिजे.

**भयंकर आघात**

परंतु 'प्रतिकूल तेच घडेल' हे गृहीत धरण्याची थोडी सवय व शक्ती असलेल्या माझ्या मनास मूर्च्छना यावी इतका भयंकर आघात एकाएकी झाला. लंडनला धरले तेव्हाच मी गृहीत धरले की, अंदमानाला पंचवीस वर्षे काढावी लागणार. मार्सेलीसला पुनः धरला गेलो तेव्हाच की जेव्हा सर्व शिक्षित जगत् मी फ्रान्सला परत दिला जाणार म्हणून निश्चितपणे म्हणत होते - पुनः मी गृहीत धरले की, बहुधा फाशी जावे लागणार. पण अंती त्या दोनही गृहीत निराशा खोट्या ठरून त्या दोहोंपेक्षाही एका अर्थी भयंकर अशी तिसरीच निराशा दत्त म्हणून पुढे ठाकली. पन्नास वर्षे शिक्षा! अशा एकान्त व उदास कोठडीत एकटा, एक तास तो वाजे तो मोजीत जन्म काढावयाचा!... ठीक तर मग, काढू या!

'हेग' चा निकाल होण्याचे आधीच्या पंचवीस वर्षे कशी काढावयाची याचे एक मनोमय चित्र (नकाशा) मनात खेचलेच होते. त्यात जे माप (स्केल) धरले होते तेच आता द्विगुणित करावयाचे. ह्या पंचवीस वर्षांत ज्याच्या योगाने जन्मसार्थक व्हावे आणि ज्याचे अर्पणाने मातृभूमीचे ऋण अल्पस्वल्प तरी हलके होऊन मनुष्यजातीची काही तरी विशिष्ट सेवा घडावी असे या निःसहाय, निःसाधन व निरुत्साह एकान्त बंदीवासात कोणते कृत्य करता येणार? रालेपासून क्युरोपॉटकिनपर्यंत अनेक थोर थोर बंदीवानांची चरित्रे आठवून पाहिली. 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' ज्याने लिहिले त्याला लेखनसामग्री तरी मिळत होती; मला तर पेन्सिलीचा अर्धा अंच बारीक तुकडाही ठेवण्याची चोरी. मग स्टेडसारख्या बंदीवानाप्रमाणे वर्तमानपत्रात निरुपद्रवी म्हणून समजल्या जाणाऱ्या विषयांवरही लेख

लिहिण्याचे नावच नको! जवळ चिटपाखरू फिरकणे नाही म्हणून प्रचार अशक्य, कागदाचा तुकडाही ठेवणे अपराध, तेथे लेखनही असंभवच! स्वतः नुसते वाचन व ज्ञानप्राप्ती करीत राहावे तरी एक पुस्तक कधी तरी मिळाले तर मिळणार; आणि नुसते वाचून जे साचतच जाते ते ज्ञान, फळहीन वृक्षाप्रमाणे, किंवा ज्याच्या पाण्याने हजारो नसो पण एका अर्ध्या तृषिताचीही तृष्णा भागत नाही वा अन्नोत्पादनाने भूक शमविली जात नाही त्या जलाशयाच्या संग्रहाप्रमाणे केवळ वांझच नव्हे काय? मग ज्यांनी बंदीवासातही काहीतरी उपयुक्त व थोर कार्ये केली त्यांच्यापैकी कोणासही जो भोगावा लागला नाही अशा या कठोर साधनहीन बंदीवासात मी कोणते कार्य करू शकणार?

**महाकाव्य**

अगदी लहानपणी एक इच्छा असे की, आपण मराठीत एक महाकाव्य लिहावे. कोणते, काय, कसे इतकेच नव्हे तर महाकाव्य म्हणजे नक्की काय हेही निश्चितपणे कळत नव्हते; पण लिहावयाचे हा निश्चय. त्या लहान वयापासून आतापर्यंत ती इच्छा तशीच मनातल्या मनात डाचत होती. कर्मक्षेत्राच्या रणधुमाळीत जरी ती इच्छा जवळजवळ दिसेनाशी झाली होती तरी कारागृहाच्या एकान्त कोठडीतील या शांततेच्या धुळीवर अंग टाकताच ती पुनः दृग्गोचर होऊ लागली. या कोठडीत, सक्त कष्ट करतानाही निदान रात्री एकटे पडले असता दिवा न दिला किंवा कागदाचा वा पेन्सिलीचा तुकडा न बाळगू दिला तरीही एखादे काव्य रचता येईल. मनातल्या मनात कविता रचून पाठ करून जर त्या स्मृतिपत्रावरच लिहून ठेवीत गेलो तर त्यास तरी कोणी प्रतिबंध करू शकणार नाही. सध्याच्या अत्यंत निर्दय साधनहीनतेतही हे कार्य करणे शक्य आहे. आणि जर असे एखादे काव्य मला रचता आले तर बंदीवासातून कधी काळी सुटल्यास व जर सुटलो तर मातृभूमीच्या चरणी या पंचवीस वर्षांची प्राप्ती म्हणून हाही एक नवोपहार अर्पण करता येईल. तितके कार्यही काही लहानसहान नाही.

मग जोवर त्याहून महत्वाचे कोणते कार्य शक्यतेच्या कक्षेत येऊ शकत नाही तोवर हे तरी एक करू या. ठरले तर! पंचवीस वर्षांत एक महाकाव्य रचावयाचे. जर हेगचा निकाल विरुद्ध गेला तर बंदीवासात हातांनी सक्त श्रमाची कामे करतानाच इतर कोणत्याही साधनांच्या अभावी हे एक कार्य तरी करता येणार हे पाहून स्वभावाची कार्यपिपासा शांत झाल्यासारखी वाटली. तळमळ क्षणभर थांबली. हेगचा निकाल विरुद्ध गेला. पंचवीस वर्षांच्या स्थळी अकल्पित भयंकर अशी पन्नास वर्षांची शिक्षा झाली. तरी तोच कार्यक्रम निश्चित केला. इतकेच नव्हे पण अंगीकृत महान ध्येयाच्या सिद्धीस्तव अशा निःसहाय व निराश स्थितीतही अद्यापि इतके तरी करता येणारच. जीवनाचे सार्थक्य करण्यासारखे काही कार्य करणे अजूनही शक्य आहेच हे पाहून औदासीन्य कमी झाले. निष्क्रिय वैफल्याच्या भयाचा भार हलका झाल्यासारखा वाटला. उतावळ्या मनाने गणनाही करून टाकली की प्रत्यही कमीत कमी दहा ते वीस कविता नव्या रचून आणि जुन्यावर आवृत्ती देऊन पाठ करण्याचा जर प्रघात ठेवला तर एक वा अर्ध लक्ष महाकाव्य रचणे संभवनीय आहे; तर मग आजच आरंभ. प्रथम श्रीगुरुगोविंदसिंहांचे चरित्र गावयाचे.

**गोविदसिंहांचे चरित्र**

कारण गोविदसिंह हुतात्म्यांचा मुकुटमणी होता. थोर यशाने मंडित झालेले थोर पुरुष राजप्रासादाच्या सुवर्णकलशाप्रमाणे तेजःपुंज दिसतातच. पण आज मला त्यांच्या चरित्रवर्णनाने, त्यांची ती यशोगीते गाइल्याने, तितकी शांती न मिळता उलट माझ्या कपाळी आलेल्या अपयशाची तीव्रता मात्र अधिक जाचू शकण्याचा संभव आहे. आज मला त्या यशाच्या राजप्रासादाच्या पायाखाली खोल दडपून गेलेल्या अपयशाच्या पायाचे चिंतन हे ध्येय आहे. म्हणून 'चमकोर' दुर्गातून निसटताना ज्याचा संपूर्ण पराभव झालेला आहे, ज्याचे मातापत्नीपुत्र वाताहात होऊन संसाराची राखरांगोळी उडाली आहे, ज्याच्या शिष्यांनीही त्याच्यावर शपथपूर्वक ठेवलेल्या निष्ठेचे त्यागपत्र देऊन आयत्या वेळेस त्यास सोडून त्या पराभवाचे व अपयशाचे खापर त्याच्याच डोक्यावर फोडलेले आहे आणि तरीही जो सिंह ते अपयशाचे व दुःखाचे हलाहल एखाद्या रुद्रासारखा अवतार धारण करून पचविता झाला, त्या गोविदसिंहांचे ते अपयशच आज मला गेय आहे! या माझ्या भयंकर दुःखास व अपजयास ते मेरुदंडाप्रमाणे आधार होईल. माझ्या पिढीच्या अपयशाच्या, दुःखाच्या पराजयाच्या खोल पायावर भावी पिढ्यांचे यशःप्रासाद ते उभवील!

भावनांच्या मनो-यांवर चढून माझे मन दूरवरची दृश्ये पाहण्यात रंगून गेले असता इकडे माझे हात ते काथ्याचे कठीण नाडे व चऱ्हाटे तोडण्यात, कुटण्यात, उकलण्यात गुंतलेले होते. प्रत्यहीच्या म्हणून ठरलेल्या दहापंधरा आर्या रचून झाल्या, काथ्या उलगडणेही संपले! पण हातही सोलून निघाले, फोड उठले, रक्त गळू लागले.

डोंगरीच्या बंदीगृहात हेगच्या निकालानंतर किती दिवस होतो आठवत नाही. प्रातःकाळी उठावे, व्यायामासाठी फिरताना योगसूत्रे मुखोद्गत म्हणावीत. त्यांवरील एकेकावर अनुक्रमे विचार करावा; मग सक्त श्रमाचे म्हणून कठीण काम (Hard Labour) दिलेले असेल ते करावे आणि ते करतानाच मनात दहाबारा नवीन कविता रचून व जुन्या पाठ झालेल्या आवृत्ती देऊन संध्याकाळी जेवण झाल्यावर, तुरुंग बंद करून सर्व सामसूम झाली असता ध्यानधारणेचा काही अभ्यास साधावा व रात्री नऊ वाजण्याचे आतच निजावे. झोप मात्र गाढ लागे. एकलकोंडीतील हा असा कार्यक्रम चालला असता कधी कधी "प्रवृत्तिचिये राजबिदीं। पुढां बोधाचिये प्रतिपदीं। विवेकदृश्याची मांदी' सारीत राहण्याची आटोकाट खटपट करीत असतानाही चिंतेची व उद्वेगाची धाड एकाएकी कोसळून जसा गळा चेपला जावा, जीव कासावीस होऊ पाहावा. वाटे, आपल्यामागे कार्याचे काय होईल... जर... मग हेही कष्ट... पण क्षणभरातच मनाचा तोल पुनः संभाळला जावा.

## सर हेन्री कॉटन

एक दिवस तुरुंगात बोलवा झाला की कोण्या मोठ्या साहेबाचे पेन्शन माझ्यासाठी बंद करण्यात आले आहे. हे काय प्रकरण आहे? थोडक्याच दिवसांत 'केसरी'चा एक तुकडा एकलकोंडीत अकस्मात माझे हाती पडला. त्या योगे त्या बातमीतले तथ्य थोडेबहुत उमगले. लंडनमध्ये नूतन वर्षाच्या निमित्ताने तिकडच्या हिंदी लोकांची एक सभा भरली होती. त्या प्रसंगी सभामंदिरात भिंतीवर माझा एक मोठा फोटो लावलेला. होता. सभेतील मुख्य पाहुणे

सर हेन्री कॉटन ह्या प्रख्यात इंग्लिश गृहस्थाने त्या माझ्या फोटोस उद्देशून साहस, देशभक्तीची अत्युत्कटता इत्यादी काही गुणांविषयी प्रशंसापर उद्गार काढले होते आणि अशा तरुणाच्या आयुष्याची अवघ्या पंचविशीतच अशी राखरांगोळी व्हावी याविषयी खेद व्यक्त करून, हेगचे उच्चतम न्यायालय तरी मतस्वातंत्र्याच्या अधिकाराची पायमल्ली न करता मला फ्रान्स देशात परत धाडण्यात यावे म्हणून निकाल देवो अशी आशाही प्रदर्शित केली होती. सरसाहेबांच्या या भाषणाने अर्थातच सर्व इंग्रजी समाज खवळून गेला. सावरकरांस सहानुभूती! मग ती निंदागर्भ का असेना, पण ती सहानुभूती! कोणी म्हणाले ह्या हेन्री कॉटनची सरकी काढून टाका! कोणी म्हणाले त्याचे पेन्शन बंद करा! शेवटी या चहाच्या पेल्यातील वादळाच्या फूत्कारासरशी राष्ट्रीय सभेचा मंडपही हलतोसा भासू लागला. त्या वेळेचे अध्यक्ष सर विल्यम वेडर्बर्ग व पुढारी सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी राष्ट्रीय सभेहून परत येताना कलकत्त्यास एका सार्वजनिक सभेत त्या विषयाचा विशेष उल्लेख करून सर हेन्री कॉटन ह्यांच्या उद्गारांवर सफाईचा हात फिरवला आणि राष्ट्रीय सभेचा, सावरकर व त्यांचे अनुयायी यांच्या पंथाशी संबंध तर राहोच पण लवलेश सहानुभूतीही नाही असे प्रसिद्धपणे घोषित केले! ज्या केसरीच्या तुकड्यात हे वृत्त मी वाचले, त्यातच केसरीकारांनी एक-दोन स्फुटे लिहून सर हेन्रीसाहेबांचा बचाव करण्याचा प्रयत्न केला होता. केसरीच्या लेखात माझा नामनिर्देश अगदी एकेरी संबोधनांनी केलेला पाहून मनास कौतुक वाटले. "सरसाहेबांस हा सावरकर कोण काळा की गोरा हे देखील माहीत नव्हते!" असे वाक्य सर हेन्री कॉटनांच्या समर्थनार्थ लिहिलेले होते. केसरीसारख्या पत्रास देखील असे लिहिणे त्या परिस्थितीत भाग पडले! परंतु त्या काळी स्वतःचे निरपराधित्व आणि शिष्टपणा प्रस्थापित करण्यास कोणत्याही राजकीय संस्थेस वा व्यक्तीस सावरकरांस महान अपराधी म्हणून संबोधणे आणि त्या सावरकर नावाचा अशिष्टपणे एकेरी उपपदांनी उल्लेख करणे हे एक अमोघ साधन सापडलेले होते. इंग्लंडमध्ये एका इंग्रजी अधिकाऱ्याने आमचा गौरवपूर्वक उल्लेख करावा आणि हिंदुस्थानात आम्हास अरेतुरेवाचून धाडसी वृत्तपत्रांनाही संबोधिता येऊ नये यात त्या वृत्तपत्रांकडे वा व्यक्तिविशेषांकडे दोष येत नसून, त्यायोगे परतंत्र देशाची कोण दैना झालेली असते, तेथे माणुसकी देखील किती महाग होते, हेच काय ते निदर्शनास येते असे मला वाटले.

## Martyr की Rascal

कोणीसे कोठडीच्या दाराच्या गजांतून डोकावून बघते आहे, "काय बॅरिस्टर कसे काय, बरे आहे ना?" "आपल्या आशीर्वादाने बरे आहे" मी म्हणालो. "छे छे! महाराज, तुमची योग्यता कुठे आणि माझी कुठे! कालच एका युरोपमधून आलेल्या स्नेह्यांशी माझे भाषण झाले. तो म्हणाला, युरोपभर सावरकरांस आज एखाद्या हुतात्म्याचा मान मिळत आहे. तुमची तुलना फ्रान्स, जर्मनी इत्यादी देशांतील पत्रे वुल्फटोनशी-एमेटशी-मॅझिनीशी करीत आहेत. पुर्तुगालमध्ये देखील वर्तमानपत्रे तुमचे चरित्र मिळेल तसे छापीत आहेत... ते गृहस्थ तुम्हास भेटू इच्छित होते पण मी त्यांस कळवले की, हे केवळ अशक्य आहे. पण निदान तुम्हास पाहण्यास तरी मिळावे म्हणून त्यांची अत्युत्कट इच्छा असल्याने ते त्या समोरच्या चाळीत उद्या तुमच्या हिंडण्याचे वेळेस उभे राहणार आहेत. आपण एकदा तिकडे बघावे... पण कालच्या मुंबईच्या... ह्या अँग्लो-इंडियन पत्राने हेगच्या निकालाविषयी लिहिताना आपल्याविषयी अगदी विषारी उद्गार काढले आहेत." "ते काय, अहो सांगा. स्तुती ऐकण्याइतकेच निंदा

ऐकून घेणे हे कार्यकर्त्यांस प्रिय नसले तरी अवश्य असते.” “त्या पत्रात तुम्हास शिक्षा झाली ह्याविषयी लिहिताना मुद्दाम आनंद व्यक्त करून म्हटले आहे की, “The rascal has at last met with his fate!” मी म्हणालो, “एवढेचना? मग ठीकच झाले. युरोपमध्ये ते Martyr हुतात्मा म्हणाले हे Rascal अधम म्हणाले. त्या दोनही आत्यंतिक निंदास्तुतीचा अनायासेच परस्पर छेद जाऊन माझे मूळचे मूल्य जसेच्या तसेच अबाधित उरले!”

सकाळी जे खोलीचे दार बंद व्हावयाचे ते पुनः दहा वाजता उघडणार. ही सवय इतकी पक्की झाली की, मध्यंतरी दार उघडण्याची प्रतीक्षाच नाहीशी झाली. प्रतीक्षाच नष्ट झाल्याने बंद दाराला पाहून जी अस्वस्थता प्रथम वाटे तीही कमी होत चालली. त्यातही अलीकडे काम करीत असताना वाटणाऱ्या कंटाळवाणेपणास घालविण्यास एक अचानक साधन मिळाले होते. कोठडीच्या आढ्याला एक फट असे. तीतून एक कबुतराचे कुटुंब येऊन कौलाराचे खाली राहू लागले होते. त्याचेकडे पाहत कसाबसा वेळ कंठीत होतो, तो दार खडबडले. भलत्याच वेळी दार खडबडले! अर्थात आपल्या बंदीवान भाग्यात काही तरी नवीन गोष्ट लिहिली जाणार हे उघड आहे. औत्सुक्यवश होऊन वर पाहिले तो हवालदार म्हणाला, “चलो, साहेब बुलाता है!” चला कोणत्याही का निमित्ताने होईना पण एकलकोंडीतून बाहेर पडण्यासाठी बंदीवानाचे मन इतके उद्युक्त असते की, ‘चलो’ हा शब्द कानावर पडताच, ताडकन तुटणाऱ्या दाव्याचा आवाज बांधलेल्या गुरांचे मनास जसा क्षणभर तरी तरारी आणतो, तसाच हाही बंदीवानाचे मनास उत्साह आणतो. मी उठलो, कशास साहेब बोलवीत आहे हे विचारावेसे वाटले; पण कोणीही काही सांगितल्याविना कोणाही अधिकाऱ्यास आपण होऊन काही बातमी विचारावयाची नाही हा प्रघात असल्याने मी काही बोललो नाही. पण तो सुशील हवालदारच हळूच म्हणाला, “आपली भेट आली आहेसे वाटते.”

## पत्नीची भेट

कार्यालयात येतो तो गजाच्या खिडकीपाशी माझ्या पत्नीस घेऊन आलेला माझा वडील मेहुणा उभा असलेला मला दिसला. तुरुंगाच्या वेषात, बंदीवानाच्या दुःखद स्वरूपात, पायात जखडून ठोकलेल्या जड बेड्यांस शक्य तितके सहज तोलीत आज मी प्रथम त्यांच्यापुढे उभा राहिलो! माझ्या मनातही चर्र झाले. चार वर्षांपूर्वी जेव्हा याच मुंबईतून मी त्यांचा निरोप घेऊन विलायतेस गेलो तेव्हा परत येताना बॅरिस्टरीच्या डौलदार झग्यात आणि आशेच्या व संपत्तीच्या झळकणाऱ्या प्रभावळीत मी दिसेन ही त्यांची आकांक्षा होती! तेथे आज मला या निःसहाय निराशेच्या बेड्यांनी जखडून टाकलेला पाहून त्या वीस-एकोणीस वर्षांच्या तरुण मुलीच्या मनास केवढा धक्का बसेल? ती दोघे गजामागे उभी होती. माझ्या हातास हात लावण्याची देखील त्यांना चोरी होती. जवळ परक्यांचा निर्दय पहारा उभा. ज्या विचारांस शब्दांचे सान्निध्यही संकोचास्पद होते ते विचार मनात भरून आले आहेत! पन्नास वर्षांच्या म्हणजेच जन्माच्या ताटातुटीच्या आधीचा निरोप घ्यावयाचा, आणि तो ह्या विदेशी दर्पोद्दाम काराधिपाच्या स्नेहशून्य दृष्टिपाताच्या कक्षेत! या जन्मात तुमची आमची पुनः भेट होणे जवळ जवळ दुर्घट असे सांगणारी ती भेट!

आकाश वळवांनी भरून यावे तसे हे विचार एका क्षणात दाटून हृदयात भरून आले. पण हृदयातच; दुसऱ्याच क्षणी विवेकाच्या चौकीवर त्यास अटकाव होऊन त्यांचे थवे छिन्नविच्छिन्न करून टाकण्यात आले आणि दृष्टादृष्ट होऊन मी खाली बसताच त्यांस हसून विचारले की, “काय मला पाहिल्याबरोबर ओळखलेत का? हे

केवळ कपडे बदलले आहेत. मी तोच आहे. थंडीचे निवारण करणे हा जो कपड्यांचा मुख्य हेतू आहे तो ह्या कपड्यांनीही बहुतेक पूर्ण होतो." थोड्याच वेळात विनोदात रंगून आपण घरीच बोलतो आहोत असे ती दोघे सहज बोलू लागली. ती संधी साधून मी मध्येच म्हटले, "बरे ईश्वराची दया असेल तर पुनः भेट होईलच. तोवर जर कधी ह्या सामान्य संसाराचा मोह होऊ लागला तर असा विचार करा की, मुलामुलींची वीण वाढविणे व चार काटक्या एकत्र करून घरटी बांधणे ह्यालाच जर संसार म्हणावयाचे असेल तर असले संसार कावळे-चिमण्याही करीतच आहेत. पण संसाराचा ह्याहून भव्यतर अर्थ जर घेणे असेल तर मनुष्यासारखा संसार थाटण्यात आपणही कृतकार्य झालो आहोत. आपली चार चूल-बोळकी आपण फोडून टाकली, पण त्यायोगे पुढेमागे हजारो जणांच्या घरी क्वचित सोन्याचा धूर निघेल; आणि घर घर म्हणून करीत असतानाही प्लेगने नाही का शेकडो जणांची घरे ओसाड पाडली! लग्नाचे मंडपातून नवरानवरीस विलग हिसडून मृत्यूचे दाढेत ढकलून दैवाने जोडपी विजोड करून टाकली! असा विवेक करून संकटास तोंड द्या. अंदमानास काही वर्षांनी कुटुंबास नेऊ देतात असे मी ऐकतो. तसे झाले तर ठीकच; परंतु ते न झाले तरीही ह्या दिवसांत सहन करू अशा धैर्याने राहण्याचा प्रयत्न करावा." "तसा यत्न करतोच आहोत. आम्ही एकमेकांस एकमेक आहोत. आमची चिंता कशाला वहावी? स्वतःस जपले म्हणजे आम्हांस सर्व मिळाले." ही आमची प्रश्नोत्तरे होत आहेत, तोच सुपरिन्टेंडंटने वेळ संपला म्हणून म्हणताच ओठावरची अर्धी वाक्ये तशीच सोडून मी भेट संपविली. परंतु जाता जाता माझा मेहुणा मजकडे वळून घाईने म्हणतो, "बरे. पण एक नियम आपण अवश्य पाळावा. प्रत्यही सकाळी, "कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने! प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमोस्तु ते।।" हा मंत्र आपण म्हणत जावा बरं का नियमाने! मी कौतुकाने पाहत उत्तरलो "म्हणेन!"

ते परतले. मागे वळून न पाहता, बेडी उचलून मला तिचा काहीच भार होत नाही हे माझ्या त्या परतणाऱ्या मंडळींस दाखविण्यासाठी चालताना हेतुपूर्वक तीस सहज खळखळवीत मी तुरुंगाचे आत गेलो. पण मन? मी आताच त्यास जे शब्द उपदेशिले तेच मनात मोठमोठ्याने उच्चारीत व दटावीत; गुरू जसे ओढून आणून बांधून टाकावे तसे विवेकाने बांधून टाकले. शक्ती क्षीण झाल्यासारखी वाटली. कोठडीत कोंडून हवालदार परत जाताच भुईवर पडलो. तो वरच्या त्या कबुतरांची पिल्ले केविलवाण्या स्वराने आक्रोश व तडफड करू लागलेली दिसली. त्यांची आई सकाळी साहेबांच्या बंदुकीस बळी पडली होती आणि ती नेहमी- प्रमाणे चोचीत दाणे घेऊन आता येईल, मग येईल अशी वाट पाहता पाहता निराश व भयभीत झाल्याने ती पिल्ले वियोगाच्या वेदनांनी तडफडत, आक्रोशत होती! हाय हाय! माझ्या वियोगाच्या वेदनांचे चित्र शक्य तितके करुणभयंकर खेचण्यासाठीच का ही या कपोतांच्या पिलांच्या शोकाची पृष्ठभूमी कोण्या दुष्ट चित्रकाराने हेतुपूर्वक निवडली आहे! मनाला ताण सोसवेना. भुईवर पडल्यापडल्याच झोप लागली. तोच-

"उठा! अहो निजलेत काय! साहेब कामाच्या वेळात आपणास निजलेले पाहील तर आम्हांस काय म्हणेल?" म्हणून दाराच्या गजात आपला दांडा जोराने खडबडवीत शिपाई म्हणाला.

उठलो. पुनः तीच चऱ्हाटे, ते कुटणे, ते उलगडणे - चालली काथ्याकूट!

बहुधा शिक्षा लागू होऊन एक महिना झाला असावा. कच्च्या बंदीवानाचे जे जेवण मला पूर्वी मिळे तेच शिक्षा झाल्यावरही अजून मिळत असल्याने दूधही मिळत होते. मी आताच जेऊन उठलो होतो, इतक्यात हवालदाराने बाहेर बोलावले. तोच सुपरिन्टेंडंटही आला. "अंथरूण बरोबर घ्या!" मी अंथरूण उचलून घेतले. मनात

म्हटले हे काय, अखेर अंदमानामध्ये चाललो की काय? दाराशी आलो तो तुरुंगाची गाडी उभी होती. आत बसलो. गाडी बंद झाली. इतकी की बाहेरचे काहीएक दिसेना. ना दिशा, ना मार्ग. केवळ खडखडणे मात्र ऐकू येत होते. गाडी थांबली. उतरतो तो आणखी कोणल्याशा तुरुंगात मी उभा आहे असे दिसले. आत नवीन बंदीवान येताच जे सोळा संस्कार होतात ते होऊन एकदाचा कोठडीत बंद झाल्यावर पाहतो तो डोंगरीच्या तुरुंगापेक्षाही कडक एकान्तात व निर्जन स्थितीत मी बंद आहे. एक बंदी वॉर्डर मात्र दूर दिसत आहे. थोड्याच वेळाने जेवण आले. दार उघडता उघडता मजसाठी हिदी हवालदार न धाडता हेतुपूर्वक धाडलेल्या इंग्रजी सार्जंटाने जरा इकडेतिकडे पाहून `Good Day' म्हणून रामराम केला. मी हळूच विचारले, "हा कोणता तुरुंग?" त्याने बरोबरच्या हिदी बंदीवानास कळू नये म्हणून स्पेल करून सांगितले - BYCULLA (भायखळा).

प्रकरण दुसरे

# भायखळ्याचे कारागृह

डोंगरीच्या एकलकोंडीपेक्षा भायखळ्याची एकलकोंडी चढताना एकान्ताच्या व औदासीन्याच्या तीव्रतेची पुढची पायरी चढावी लागली. डोंगरीत शेजारी मनुष्य कोणी नसे; पण दूरचा गलबला तरी ऐकू येई. जवळ एखाददुसरे पुस्तक व किरकोळ सामान तरी असे. पण आज ते सर्व गेले. दुरून गलबला देखील ऐकू येत नाही. जवळ मनुष्ये तर काय पण सवयीच्या वस्तू देखील उरल्या नाहीत. सामानाची देखील एक प्रकारची सोबत असते. ओळखीची मनुष्ये नसल्याप्रमाणेच ओळखीच्या वस्तू नाहीशा झाल्यासही चुकलेसे ओसाड वाटू लागते. खोलीची पाहणी केली. पाहण्यास काही सापडेना. येरझाऱ्या घालू लागलो. मनात वाटू लागले. आपण धरलो गेल्याने आपल्या क्रांतिकारक संस्थेची काय स्थिती होईल..... पुढे काय घाट रचला पाहिजे.

संध्याकाळचे जेवण आले. राजकारणाच्या विचारांच्या काहुराने खळबळलेले चित्त विचारास काहीतरी दुसरा विषय मिळाल्याने थोडे शांत झाले. जेवण होऊन भांडी घासून पुनः त्या सदोदित बंद केलेल्या गजांच्या दाराशी उभा राहिलो. संध्याकाळ झाली. तीच संध्याकाळ, तीच रात्र, तीच तात्त्विक विचाराने लाभलेली तात्कालिक शांती 'सप्तर्षि' या कवितेच्या उत्तरार्धाचा विषय झाली आहे.

आज दोन अर्ज केले होते. डोंगरीतून निघताच तेथे जे थोडेसे दूध मिळे तेही बंद केले गेल्याने व भायखळ्यात नुसती भाकर खाल्ल्याने पोट बिघडे, म्हणून दूध पुनः देण्यात यावे ही एक मागणी केली होती. आणि दुसरी ही होती की, मजपासून घरची व सरकारी सर्वच पुस्तके जी काढून नेली होती त्यांपैकी कोणते तरी वाचावयास मिळावे. अगदी काही नाही तरी निदान बायबल तरी वाचावयास देण्यात यावे. त्या अर्जास उत्तर मिळाले - दुधाची आवश्यकता दिसत नाही! बायबलविषयी बघू.

अखेर काही दिवसांनी बायबल मिळाले. बरेच दिवस पुस्तक नसल्याने ते मिळताच वाचावेसे वाटून बायबल उघडले तोच पहारेकऱ्याने सांगितले की, पुस्तक कोठडीत ठेवायचे नसून संध्याकाळी काम संपले तर एकदोन तासच देण्यात यावयाचे आहे. तेव्हा ते परत दिले आणि पुनः सक्त कष्ट म्हणून जे काम दिले ते करीत व मनात नेहमीच्या कार्यक्रमाप्रमाणे कविता रचीत बसलो. शेवटी संध्याकाळी एकदाचे बायबल मिळाले.

येशू ख्रिस्ताचे चरित्राविषयी आणि उपदेशाविषयी मला नेहमीच आदर वाटत असे. फ्रान्समध्ये मी नव्या कराराचे चितन व अभ्यास करीत असे. आता गोविंदसिंहांच्या आर्या संपत आल्या होत्या आणि 'सप्तर्षि' ही होत आला होता. पुढच्या कविता रचावयासाठी अवश्य ती ऐतिहासिक वाङ्मयात्मक साधने मिळाली नसल्याने व काव्य कोणत्या विषयावर करावयाचे हेही स्पष्ट निश्चित न झाल्याने प्रथम येशूचे चरित्रच मराठीत कविताबद्ध करावे असे ठरविले. जुन्या कराराचा ऐतिहासिक आणि धार्मिक दृष्टीने विवेचनात्मक अभ्यास करीत असताना ज्यू लोकांच्या राष्ट्रीय बंदीवासातील दुर्दैवी व निःसहाय स्थिती आणि त्यातून सुटण्यास्तव त्यांचे चाललेले प्रयत्न ह्यांची वर्णने वाचीत असता...

पण हे मला अंदमानामध्ये एकदाचे नेऊन का टाकीत नाहीत? शिक्षा लागल्यापासून सहा महिन्यांचे आत जर बंदीवानास काळेपाण्यास धाडण्यात आले नाही तर ते सहा महिने मोजण्यात येत नाहीत असे काहीसे मी ऐकले

होते. त्याविरहित अंदमान रेग्युलेशनमध्ये हेही वाचले होते की, सहा महिने तुरुंगात ठेवल्यानंतर काळेपाण्यावर बंदीवानास बाहेर बेटावर सोडण्यात येऊन थोडे लिहिणे-वाचणे येणाऱ्यास तर शंभर शंभर लोकांवर देखरेख करण्याची व इतर महत्वाची व पैदासीची कामेही मिळतात. तसेच असेल तर ते जीवन ह्या तुरुंगातील कोठडीतील जीवनापेक्षा पुष्कळ सुसह्य होण्याचा संभव आहे. निदान समुद्राच्या तटावर क्षणभर थांबून मुक्त वायू श्वसिता येईल, लोकांत मिसळण्याची संधी मिळेल. त्यायोगे पुनःप्रचार आणि लोकोपयोगी कार्येही करता येतील. दहा वर्षांनी कुटुंबासह घर करून राहता येईल. अशा स्थितीत माझे जीवन क्वचित बरेच सुसह्य होईल. पण लगेच मनाला अतिशय वाईट वाटू लागावे की, ज्यांना माझ्याबरोबर पाच-दहा-पंधरा वर्षांच्या शिक्षा झाल्या आहेत आणि त्या ज्यांना कोठडीतल्या ह्या बंदीगृहातील भुयारातच काढाव्या लागणार, त्यांचे कसे होईल? त्यांतील कोणी माझे बालमित्र होते; कोणी विश्वस्त सहकारी होते; कोणी अभिन्नहृदय सहचारी होते. बहुतेकजण मजवर निस्सीम भक्ती आणि प्रीती करीत आले होते. त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबांवर गुदरलेल्या या संकटात त्यांस मला काहीही साह्य देता येणे शक्य नाही. माझ्यामुळे त्यांच्यावर ही संकटे आली म्हणून भ्रांतीने का होईना, पण मजवर ते रुष्ट तर झाले नसतील? त्यातही ते... ज्यांच्या वृद्ध माता ज्यांनी त्यांस लहानांचे मोठे केले आणि आता ज्यांच्या वार्धक्याच्या हातातून ही ममतेची यष्टी दैवाने एकाएकी हिसडून नेली, या दोघांची आणि त्या वृद्ध मातांची मला फारच दया यावी आणि तो वज्रनिश्चयी वीर... की ज्याने ऐकावयासही दुस्सह अशा यातना सहन केल्या; पण मजविरुद्ध एक ब्रही नाही तर नाहीच उच्चारला, आणि ती तरुण मुले - या सर्वांच्या यातनांची आठवण होऊन त्यांचे मला इतके वाईट वाटावे की, माझ्या यातनांस मी खरोखरच काही वेळ अगदी विसरून जावे. पुनः विचार करावा की, निदान मी काही मागे तर रेंगाळलो नाही ना? आघाडीसच आघाडीच्याच कठोरातील कठोर आघातास आपली छाती पुढे केली नाही का? मग आता जे अपरिहार्य, जे सर्वांचेच कार्य त्याचे सर्वच भागीदार असावयाचेच! आणि झाले हे, भोगिले हे काहीच नाही; अजून तर...

मी मागेच एक अर्ज केला होता आणि त्यात मला झालेल्या दोन जन्मठेपींच्या शिक्षा एककालिक करण्यात याव्या असे विनविले होते. त्या विनंतीचे समर्थनार्थ जी कारणे दिली होती त्यांत हे एक होते की, दंडविज्ञानात जन्मठेप शिक्षेचा अर्थ मनुष्याच्या आयुष्याच्या कर्तृत्वाचा सामान्य काळ असा करण्यात येतो. इंग्लंड इत्यादी देशांत तो १४ वर्षे धरतात, हिंदुस्थानात तो अपराधपरत्वे २० किंवा २५ वर्षे मानण्यात येतो. ही अवधी म्हणजेच दंडविज्ञानातील आयुष्यकाळ होय. अधिकात अधिक शिक्षेचा हा अवधी होय. तेव्हा मला दोन जन्मठेपी ज्या मिळाल्या त्या एककालिक जर न केल्या आणि एक जन्मठेप भरल्यावर दुसरी जन्मठेप भरणे असा त्याचा अर्थ घेतला तर दंडविज्ञानाच्या भाषेत हा जन्म संपल्यावर ही शिक्षा भरण्यास दुसरा जन्म घेतला पाहिजे असे झाल्यासारखे हास्यास्पद होणारे आहे; आणि वास्तविक ही ५० वर्षे काळेपाण्याचे भयंकर पद्धतीने मरणे म्हणजे हा जन्म संपून दुसऱ्या जन्मीही शिक्षा भोगणेच भाग आहे. तेव्हा हा हास्यास्पद अर्थ टाळण्यासाठी माझे सुटकेचे वर्ष १९६० हे न ठेवता जन्मठेप म्हणजे २५ वर्षे जी अधिकात अधिक शिक्षा समजली जाते ती असे निश्चित करावे. ह्या अर्जाचे आज उत्तर आले की "तुमच्या जन्मठेपी एककालिक न करता अनुक्रमानेच भोगल्या पाहिजेत असा निकाल देण्यात आला तोच बरोबर असून आपली शिक्षा ५० वर्षे आणि सुटकेचे वर्ष १९६० हेच होय." हे उत्तर सांगण्यासाठी जे इंग्रज गृहस्थ आले होते ते माझी अर्जातील परिभाषा सहेतुक उचलून मला संमिश्र विनोदाने

म्हणाले, “अहो सावरकर, अखेर सरकारने असेच ठरविले की, तुमची एक ह्या जन्माची जन्मठेप भरल्यानंतरच पुढच्या जन्माची दुसरी जन्मठेप भरावयाची!” मीही हसत म्हणालो “तर मग त्यातल्या त्यात ही समाधानाची एक गोष्ट आहेच की, हिदू लोकांचा पुनर्जन्माचा सिद्धान्त तरी सरकारने एकदाचा मानला आणि ख्रिस्ती धर्माची पुनरुत्थानाची कल्पना सोडून दिली!”

आज जेवण इतक्या लवकर? हे काय? तुरुंगात म्हणजे म्हटले जीव जावयाचा तरी त्याने ठरल्या वेळेस कार्यक्रमाप्रमाणेच गेले पाहिजे, इतके सगळे समयशील असावयाचे. अन्नाकरिता, जेवणाकरिता मरण येत असले तरी जेवण लवकर येणार नाही, पाहिजे असल्यास मरणाने जेवण येईतो थांबावे. मग आज हे जेवण भलत्याच वेळेस कसे? अर्थात काही तरी नवीन घडणार. जो गोरा अधिकारी पहाऱ्यावर होता त्याच्याकडे जिज्ञासू दृष्टीने पाहिले. त्याने टोपीला मागे सारण्याचे निमित्ताने हात दूरवर मागे नेऊन दोनदा हलविला. अर्थात कोठे तरी आमची पाठवण होणार. जेवण झाले. भितीवर एका अणकोचीदार खड्याने काही कविता खरडून ठेवल्या होत्या त्या घाईघाईने पाठ करून पुनः कोणास उमगू नयेत म्हणून घासून टाकल्या, तोच ‘चलो!’ म्हणत शिपायाने दार उघडले. गोऱ्या सार्जंटाच्या अधिकारात आम्हास एखादी निर्जीव वस्तू सोपवून द्यावी तसे काराधिपाने दिले. मोटार, स्टेशन-आगगाडी, पुनः स्टेशन! येथे पत्ता लागला की, हे ठाणे आहे आणि आम्हास तेथील तुरुंगातच जाणे आहे.

प्रकरण तिसरे

# ठाण्याचे कारागृह

कारागृहात जिकडे तिकडे गडबड. पन्नास वर्षे शिक्षेचा, काळेपाण्याचा एक बॅरिस्टर बंदीवान! अधिका-यांची सक्त आज्ञा की कोणी मजकडे पाहूसुद्धा नये. एक भाग अगदी झाडून सारे वॉर्डर आणि बंदीवान बाहेर काढून, रिकामा करून ठेवलेला. पण त्या सक्त आज्ञेस देखील बंदीगृहाची जिज्ञासा दाबता येईना. ज्या खोलीत मला ठेवले होते त्या खोलीवर अगदी दुष्टातले दुष्ट म्हणून जे नावाजलेले होते असे मुसलमान वॉर्डर ठेवलेले. अगदी कडकडीत एकान्त. जेवण आले. घासही जाईना. बाजरीची अगदी भिकारडी भाकर व कशाची काय की, अगदी आंबट भाजी. ती तोंडात धरवेना. भाकरीचा तुकडा तोडावा, थोडा चावावा, वर घोटभर पाणी प्यावे आणि त्याबरोबर गिळावा, अशी भाकर काही खाल्ली. संध्याकाळ लवकरच झाली. खोलीचे दार बंद होऊन लोक जाताच अंथरूण टाकून पडलो. अंधार पडू लागला. तोच मनुष्याचा आवाज, जो आपल्या स्वतःलाच ऐकू जाण्यास भितो असा, कुठून तरी आला. हळूच पाहिले तो दुष्टातील दुष्ट म्हणून जे वॉर्डर मजवर ठेवले होते त्यांतीलच एक मला दारापाशी हळूच बोलावीत आहे. आलो. इकडे तिकडे पाहून तो बंदीवान वॉर्डर मला म्हणाला, “महाराज, तुमच्या शूरपणाची ख्याती आम्ही ऐकली आहे. अशा शूर पुरुषाच्या चरणाचा मी दास आहे. आपल्याविषयी मला काय करता येईल ते मी करीत जाईन. आता मी एक बातमी सांगतो. पण ती तुमच्यापासून फुटता कामा नये. नाही तर मी मेलोच म्हणून समजा. तुम्ही वीर आहात, तुम्ही चुगलीचे हे भ्याड कर्म करणार नाही, ही माझी निश्चिती आहे. पण आपले सावध केले.” असे एकसारखे पण अति दबत बोलत आणखी पुढे घुसून त्याने सांगितले “तुमचा भाऊ पण येथेच आहे.” “कोणता भाऊ?” ‘धाकटा!’ कोणी पाहते की काय म्हणून शंकत तो झटकन मागे झाला. मीही पण आत सरकलो.

## धाकटा भाऊ

धाकटा भाऊ! विशीच्या आतील ही मुले लॉर्ड मिटोवर अहमदाबादेत फेकल्या गेलेल्या बाँबचे प्रकरणात अटकाव होऊन त्या हालअपेष्टांस अलोट धैर्याने अठराव्या वर्षीच तोंड देण्याचा त्यास प्रसंग आला. तेथून सुटून येऊन घरी रात्री अंथरुणावर अंग टाकून विसावा घेतो न घेतो तोच ज्यास राज्यक्रांतीच्या आणि राजकीय वधाच्या भयंकर आरोपाखाली पकडून पुनः तुरुंगात खेचण्यात आले आणि वर्षभर यातनांचे, धाकांचे, निर्दयतेचे आघात एकामागून एक पडत असताही त्या कोवळ्या वयातही ज्याचा कठोर निश्चय अंगीकृत व्रतापासून लेशमात्रही चळला नाही तो माझा लहान-धाकटा भाऊ! आईबाप लहानपणीच वारल्याने त्यास त्या दोघांचे ठिकाणी मीच होतो. क्षणभर मजपासून दूर होताच जो परवापरवापर्यंत रडू लागे, तो माझा धाकटा भाऊ अथेच, असाच बेड्या पडलेला, चक्कीसारखे कठीण काम करीत आहे. आणि जणू काय त्याचे हे हाल कमीच होते म्हणून आता त्यास आज मी माझ्या जन्मठेपीच्या शिक्षेची बातमी कळविणार! जन्मठेप शिक्षा झाल्याचे जरी त्यांना ठाऊक होते तरी त्या सर्वांना जवळजवळ असे निश्चित वाटे की, हेगमध्ये मी सुटणार आणि फ्रान्सला परत पाठविला जाणार. या आनंदात ते माझे सहकारी स्वतःची दुःखेही विसरत असत. पण आता त्यांचा तो शेवटचा आशातंतू तुटून मी

खरोखरच काळेपाण्यास जाणार ही बातमी मी देणार! एक वडील भाऊ जन्मठेपीवर काळेपाण्यास गेलाच होता. आज मीही जन्माचा अंतरणार. आज ते पोर खरोखरच पोरके होणार. मी अंदमानाला जवळजवळ पुनः न दिसण्याकरिता जाणार हे जेव्हा त्याच्या मनात येईल तेव्हा त्याच्या त्या कोमल मनाची काय स्थिती होईल? आणि तो सुटून आता कोणीकडे जाईल? कोण त्यास पाठिबा देईल? कोण त्याचे शिक्षण पुरे करील? ते कोवळे पोर ज्या दिवशी जाईल ती ती दारे कपाळास आठ्या घालून धडाधड बंद केली जातीलना!

दुःखाच्या उमाळ्यावर हे सर्व विचार एकदम तरंगून पुनः बुडून गेले. काही पुनः उसळत हृदयास कासावीस करीत राहिले.

## दादा! हे घ्या.

तोच वॉर्डर पुनः जवळ आला. चांगलाच अंधार पडला होता. ‘दादा!’ ‘ओ’ ‘हे घ्या’ असे म्हणून एक पाटी माझ्या हाती त्याने दिली आणि बजाविले की, आपल्यास आपल्या भावाची बातमी जर कोणी दिली तर त्यास दहा वर्षे काळेपाणी दिल्याविना सोडणार नाही अशी सुपरिन्टेंडंटने सर्व वॉर्डरांस आज्ञा फर्माविली आहे. आपण अवाक्षर बोलाल तर मी मरेन! इतके विनवून तो मागे फिरला आणि दूर जाताच मोठमोठ्याने जोडा वाजवीत व तालबद्ध पावले टाकीत पहारा करू लागला.

ती पाटी म्हणजे बाळाचे - धाकट्या भावाचे पत्र होते. दूर कंदील जळत होता. किंचित दिसत होते. त्यात मी ते अत्यंत प्रेमाने वाचले. त्यात दुःखाचा किंवा तेजभंगाचा एक शब्दही नव्हता. उलट अंगीकृत व्रताच्या पूर्तीस्तव ह्याहूनही कठोर तपश्चर्या करावी लागली तरी त्यात काय आहे? चिंता नाही!... असा धैर्य संदेश धाडलेला होता. मी या पत्रास उत्तर देण्याचे ठरविले. अंदमानमध्ये एक वर्षाने एक पत्र टाकता येते; परंतु कधी कधी तीही सवलत मिळत नाही असे मी ऐकले होते. तेव्हा न जाणो बाळास पत्र टाकण्याची ही आपल्या आयुष्यातील शेवटलीच संधी असू शकेल! मी त्या वॉर्डरास परत खुणावले. तो दबत आला. पण आता रात्री काय ते पुढे बघू म्हणून निघून गेला.

अर्धीअधिक झोप झाली असेल. दाराचे गजांत हळूहळू खडबड ऐकू आली. चमकून उठलो. पाहतो तो वॉर्डर दांड्याने खडबडवीत होता. हाताने ‘लिहा’ असे त्याने खुणविले व कंदील जवळ आणला. माझ्याशी एक शब्द बोलताना धरला गेला तरीही ज्यास शिक्षा झाल्याविना राहिली नसती त्या ह्या दुष्टांतील दुष्ट म्हणून समजल्या जाणाऱ्या घातकी दरोडेखोराचे मनातही मजविषयी इतकी सहानुभूती उत्पन्न झालेली पाहून माझे मलाच आश्चर्य वाटे. हा अनुभव मला पुढे वारंवार येत गेला. मी त्याचे आभार मानू लागलो; परंतु तो घाईने म्हणाला, “दादा, पहिल्यांदा ते झटकन लिहून काढा.”

## सुटेन वा मरेन

तरीदेखील शंका आली “न जाणो लिहून घेऊन हा ही पाटी बाळाचे हाती न देता अधिका-यांसच देऊन आपल्यास तोंडघशी पाडणार नाही कशावरून?” माझा जन्म डिटेक्टिव्हांशी पेचपाच खेळण्यात गेलेला होता. म्हणून मी कोणाचीही नावेगावे वा विशिष्ट स्फुट कार्यक्रम न लिहिता अंदमानाच्या अंधकाराच्या फलकावर दोनतीन आशेच्या

कुंचल्या मारून लिहिले की, “जर तेथील नियमाप्रमाणे मला कुटुंबास तिकडे दहापाच वर्षांनी नेऊ दिले तर जीवित तिकडे ज्ञानाच्या व्यासंगात घालवीन; आणि मला जरी परत हिंदुस्थानच्या पुण्यभूमीच्या तटावर पाय ठेवता आला नाही तरी मी रचित असलेले महाकाव्य जसे ‘ततः प्राचेतसः शिष्यौ रामायणमितस्ततः मैथिलेयौ कुशलवौ जगतुर्गुरुचोदितौ’ तसे, ईश्वराने दिले तर, त्या अभिनव कुमारांचे कंठांनी देशभर प्रख्यात करवीन. एका आयुष्याचे साफल्य संपादण्यास हे एक कार्यही समर्थ आहे! या कार्यक्रमास धरून मी पंचवीस वर्षे अंदमानास काढीन. परंतु जर ही एक जन्मठेप भरल्यावरही मला सोडण्यात आले नाही तर मात्र... सुटेन वा... असा मरेन, हा माझा निर्धार आहे. तू चिंता करू नकोस किंवा जीवित विफल झाले म्हणून खिन्न होऊ नकोस. बाष्पयंत्रात प्रेरणा उत्पन्न होण्यासाठी आपल्या देहास अन्धन करून जर कोणी जळत राहिलेच पाहिजे तर मग ते आपणच का राहू नये? असले नुसते जळत राहणे हे कर्मच आहे. इतकेच नव्हे पण महत्कर्म आहे’ .... वॉर्डरने खाकरून आटपा म्हणून सूचना केली. मी पाटी दाराशी ठेवून मागे सरलो. जाता जाता त्यास म्हटले, “तुम्हास माझ्यासाठी लवलेशही त्रास पोचू नये अशी माझी इच्छा आहे. तुम्ही पाहिजे तर तुम्हाला कर्तव्य वाटत असेल तरच हे साहस करा.” तो हसला, “छी हे कसले साहस? दादा मी काही चोर नाही. आम्ही भरगावात शिरून उघड दरोडा मारला आहे. आणि लढत निसटूनही गेलो. दादा, मी शूर पुरुष आहे आणि म्हणूनच तुमच्यासारख्या शूराचा बंदा आहे. माझे साहस काय! मला दोन महिने सुटण्यास उरले आहेत. तुमचे साहस की अशा प्रसंगात असे हसतमुख.”

## पत्र पोचविले

तो गेला; त्याने बाळास पत्र प्रामाणिकपणे पोचविले. परंतु त्याने केलेली शौर्याची व्याख्या मात्र माझ्या ध्यानातून गेली नाही. दरोडेखोर चोरीला पाप आणि तुच्छ कर्मे समजतात! मांग डोंबांस शिवत नाहीत. त्यातलाच हा प्रकार! दुसरे दिवशी मी त्यास अन्योक्तीने असे सुचविण्याचा प्रयत्न केला की, स्वार्थसाधू लूटमार ही एका अर्थी शौर्य आहे असे मानले तरी ती श्रेयस्कर किंवा स्तुत्य नाही. तोही मनात समजला आणि पुन्हा दरोड्याचा उल्लेख बढाईखोरपणे करीनासा झाला.

माझ्या येण्यानंतर एक-दोन दिवसांच्या आतच बाळाला ठाण्याहून बदलून दुसरीकडे नेण्यात आले. जरी मला तो पुनः कधी भेटू शकेल की नाही याची वानवा होती हे अधिका-यांस माहीत होते तरीदेखील इतक्या जवळ, एका भितीचे आड येऊनही, त्याची माझी भेट त्यांनी घडू दिली नाही. त्यानंतर तो कोठे गेला, केव्हा सुटला, काय करू लागला - ते मला वर्षानुवर्षे काही एक कळले नाही! कळू दिले नाही!!!

## देखो हमारा शेर

ठाण्याच्या कारागृहातील शिपायांच्या अधिका-यांवरील एक मुख्य अधिकारी त्या हेतुपूर्वक ओसाड ठेवलेल्या माझ्या भागावर नेमलेला असे. तो शरीराने स्थूल, थट्टेबाज, हसतमुख पण बंदीवान म्हणून मोठ्या आतल्या गाठीचा असे. गोरे अधिकारी त्यावर फार विश्वासत. तो प्रत्यही माझ्याशी शक्य त्या त्या वेळी बोलण्याचा प्रयत्न करी. खरी असो वा खोटी असो, मला वाटते बहुधा ती संमिश्र भावना असावी - तो माझ्याविषयी भारी दया

दाखवी. जेवण शक्य तितके बरे द्यावयास पाही. कोणतीही तसदी पडू देत नसे. मी कोणाशी बोलताना पाहिले तर कानाडोळा करी. पण नेहमी राजकीय चर्चा करून माझ्या मनावर असा परिणाम करण्यास पाही की, मी अत्यंत निष्फळ आणि वेडगळ नादाला लागून आयुष्याची भयंकर हानी करून घेतली आहे. येता जाता बंदीवानांस हेतुपूर्वक बोलावून मला दाखवी, आणि म्हणे "देखो हमारा शेर (वाघ!) पुरुष असावा तर असा असावा. पण काय राव अजब तेरी करणी अजब तेरा खेल।। मकडीके जालमें फसाया शेर!!" ही चरणे गात त्याने सोंग आणून नाचू लागावे. केव्हा केव्हा त्याने अगदी बळे बळे आपणच पूर्वपक्ष उत्तरपक्ष करीत वाद काढावा की, "केवढे प्रबळ सरकार, किती यःकश्चित् ही चार पोरे! आणि इंग्रज सरकारचे राज्य घेणार! पाहा तर खरे." असे म्हणत त्याने आपल्या हातातील काठी तरवारीसारखी फिरवीत दोन पवित्रे टाकीत नाचावे आणि त्याने आणलेल्या दोनतीन बंदीवानांपैकी कोणास तरी विचारावे, "का रे राम्या, माझ्या या वारांनी वारा मेला का?" सर्वांनी खो खो हसावे; कारण हवालदाराचा तो विनोद. न हसले तर शिक्षाबिक्षा कुठेतरी देववावयाचा, मग आणखी शेफारून त्याने म्हणावे, "अरे, हसता काय? वारा मारण्याचे हे साहस आठ दहा पोरे घेऊन इंग्रज सरकारास मारणाऱ्या या आमच्या महाराजांच्या साहसापेक्षा अधिक हास्यास्पद आहे काय रे?"

## विलायती छानछबेली

केव्हा आम्ही स्नान करीत उभे राहिलो की त्याने एकसारखे न्याहाळीत राहावे आणि हाताखालच्या शिपायांस म्हणावे, "गोंद्या पाहिलास का दादांचा देह! जसा सोन्याचा तुकडा. ते दंडाचे वळण, ती छाती, दादा कुस्ती खेळत होते नक्की." आणि पटकन आवाज बदलून अगदी कळकळीच्या स्वरात म्हणावे, "महाराज, काय हे तारुण्य तुमचं नि काय अवदसा तुम्हांस आठवली? अहो, विलायतेतच कोणा छानछबेलीच्या रंगात रंगून ही पंचविशी काढावयाची तो तीतच, मिसुर देखील फुटते न फुटते तो, ह्या लोखंडी बेड्या कवटाळण्याची तुम्हाला का हौस आली?" एखादे वेळेस तो म्हणे "छे, ही कृत्ये दादांची नाहीत. कोणी तरी त्या मोठमोठ्या नावाच्या लोकांनी या भोळ्या वीराला पुढे करून आपली तुंबडी भरण्याकरता थापा मारून वेळ येताच त्यास तोंडघशी पाडलेसे दिसते. दादा, तुमच्यापेक्षा मी कितीतरी सुखी आहे. महिन्याच्या महिन्याला पगार घेतो. दुसरे जुने पेन्शन आहेच. पन्नाससाठ रुपये खळखळवीत गमतीत आहे नि तुम्ही काय? सोन्यासारखे हे रूप, तारुण्य, बालिस्टरी, दिवाणाची मुलगी दिलेली; नाश केलात बघा आयुष्याचा, स्वर्गासारख्या सुखाचा! काय म्हणे देशाकरता, वेड आहे वेड राव!" मी हे सर्व शांतपणे ऐकून घेई. पण कधी तो शांत राहणे देखील अशक्य करून टाकी. हात जोडून म्हणे, "राव बोला, खरंच सांगा, राज्य कसे घेणार होतेत ते. तुम्हाला काय वाटतं, किती दिवसांनी तुम्ही सुटाल? या डिसेंबरात दरबार (जॉर्ज पंचम गादीवर बसणार होते तेव्हाची गोष्ट) आहे. सुटाल?" मी म्हणावे, "छे, आम्हांस ज्युबिली कसली? तथापिकधी दहाबारा वर्षांनी काळ फिरला तर फिरेल." तेव्हा त्याने अगदी कडू करून सांगावे. "छे, हे तुम्हाला कसले सोडणार, हाल हाल करून असे सडत टाकतील. मेल्यानंतर सोडतील!"

या मनुष्याच्या या भयंकर सहानुभूतीपासून मला माझा बचाव करणे अगदी अशक्य होई. जेव्हा तो दहापाच बंदीवान जमवून वर सांगितल्याप्रमाणे, "देखो हमारा वीर!" म्हणून हसे आणि काठी फिरवीत नाचे आणि

ती गंमत पाहावयास नियमाविरुद्ध बंदीवानांना एकत्र जमू देई तेव्हा खरोखरच वाईट वाटावे. एखाद्या वाघाला गाडीत बांधून जसे मिरवितात तसा हा आपला तमाशा ह्या चोरापोरांच्या करमणुकीस्तव अथे चालावा यापेक्षा फाशी का झाली नाही, म्हणून केव्हा केव्हा मनात चडफड व्हावी. आधीच विव्हळ झालेल्या मनावर खरोखरच डागण्या दिल्यासारखे व्हावे.

## काटेरी मुकुट

पुनः पुनः ते 'प्रतिप्रसवहेयाःसूक्ष्माः' हे योगसूत्र मनातल्या मनात म्हणत विवेक करावा की, शारीरिक यातना जशा भोगाव्या लागतात तशाच मानसिक यातनाही कारागृहवासात तुला भोगल्याच पाहिजेत. त्याने जर तुझा तेजोभंग होत असेल तर ते तेज क्षणिक उत्तेजितच होते असे होईल. त्यांना त्या तमाशाची गम्मत वाटते तशी तुला का वाटू नये? तो तुझा तमाशा असे तुला वाटत आहे म्हणून? ती तदाकारवृत्ती तेवढी मार. तू कोण, काय केलेस? का केलेस... तुझे तुला ठाऊक आहे ना? चोरांच्या तमाशाने तुझे काय बिघडते? तुझ्या आधी हा काटेरी मुकुट `This crown of thorn' प्रेषित म्हणविणा-यांनाही घालावा लागला होता. कारागारातील चोरांनी तुझ्यापूर्वीच त्यांची देखील हुर्यो केली आहे की, आज द्वीपद्वीपांतरे ज्यांच्या चरणांवर आपले मस्तक ठेवीत आहेत. असा विवेक करीत मी त्या मनुष्यांचे वर्तन सोशीत असावे. आज सोळा वर्षे झाली, पण अजून मला नक्की निश्चय करता येत नाही, तो मनुष्य, काही बंदीवान म्हणत त्याप्रमाणे, मजवर माझ्या मनास यातना देऊन तेजोभंग करण्यासाठी सहेतुक नेमला गेला होता, का ते त्याचे वर्तन केवळ मूर्ख सहानुभूतीचा बाष्फळपणा होता. काही असले तरी त्याचे ते गाणे मात्र कानांत गुणगुणत आहे "अजब तेरी कुदरत अजब तेरा खेल। मकडीके जालमें फसाया शेर।।"

एक दिवस मी त्यास म्हटले, "बातमी तरी काही सांगा!" तो म्हणाला, "कसली बातमी? दादा, ह्या लोकांपायी तुम्ही व्यर्थ मेलात आणि अजून तुम्हास त्यांचा लोभ सुटत नाही. अहो, कसले लोक? कसले लोकहित? हे पाहा, तुम्हाला धरले. झाले! सगळे बुरखा घेऊन बसले. कोणी हूं का चूं करील तर शपथ! कसली बातमी! अहो, 'आप मरे, दुनिया डुबी!"

## अर्क आहे अर्क

नुकतेच इंग्लंडामधले राज्यारोहण होऊन गेले होते. बंदीवानात सूट मिळेल म्हणून गप्पा उठत होत्या. तो हवालदार माझ्याशी हे बोलून जातो तो कोणी एक अधिकारी, जो मला कधी काही बातमी सांगे तो, आला. त्याला पत्रे वाचावयाचा नाद नसे. पण मला बातम्या सांगाव्या लागतात म्हणून तो पत्रे थोडी चाळू लागला होता. तो आला आणि घाईघाईने म्हणाला, "मद्रासला अशे नावाच्या एका कलेक्टरला एका शाक्त ब्राह्मणाने गोळी घालून ठार मारले. चिदंबर पिल्ल्याच्या खटल्याशी त्या अधिकाऱ्याचा काही संबंध होता असे म्हणतात. तुम्हाला याविषयी कसं वाटतं?...!" तो हवालदार पण दुपारी जेव्हा पुनः आला तेव्हा खोचून पाहत मला म्हणाला, "का महाराज मद्रासकडे आपले कोणी स्नेही आहेत वाटते!" मी म्हटले "कोण कुठे आहे हे ते बंदीगृहात मला कसे कळणार, आणि आपणच मघा म्हणालेत की जे कोणी आहेत ते बुरखा घेऊन बसले आहेत. कोणी हूं का चूं करील तर शपथ!" यावर

उपरोधिक मुद्रेने माना डोलावीत तो आपल्या शिपायास माझ्याकडे खुणवून म्हणला "अर्क आहे अर्क!" पण त्या अर्काचा निश्चित अर्थ मला अजूनही कळला नाही. क्वचित त्याने जी मद्रासची बातमी ऐकली ती मलाही कळली असावी असा संशय आला असावा आणि माझ्या उत्तरातील खोच त्यास कळली असावी.

## उपनेत्रांचे लिलाव

त्या वेळेस ह्या उभ्या जगात माझी मत्ता म्हणजे एक, माझे उपनेत्र आणि दुसरे, एक आण्याचे अंगुलाकार गीतेचे लहान पुस्तक, ह्या दोन वस्तूच काय त्या होत्या. पण आज सकाळी हवालदाराने त्या दोनही वस्तू मागितल्या. "साहेब मंगता है." उपनेत्र कशास मागतात हे कळेना. थोड्या वेळाने सुपरिन्टेंडंट आला. मी विचारले, "उपनेत्र का नेले?" त्याने सांगितले की, तुम्हास राज्यक्रांतीच्या अपराधासाठी सर्व मत्ता जप्त केली जाण्याची शिक्षा झालेली असल्याने, त्या वस्तूही जप्त करण्यात आल्या आहेत. विलायतेत तुम्हास धरले तेव्हाच्या तुमच्याबरोबर सापडलेल्या ट्रंक, कपडे, पुस्तके इत्यादी सर्व सामानाचा आज उघड लिलाव होणार आहे. जे पैसे येतील ते सरकारात जमा होतील. खाजगी मत्ता म्हणून एक आण्याची गीता आणि उपनेत्रही जप्त व्हावेत ह्याविषयी बंदीवानदेखील हळहळले आणि काही शिपायांनी त्या लिलावातले सामान घ्यावयाचे नाही म्हणूनही ठरविले. पण मला हे कळताच मी त्यास कळविले की, त्या सामानात अनेक मूल्यवान कपडे आहेत. ते मातीच्या मोलाने कोणी तरी घेऊन जावेत यापेक्षा तुम्हीच नेल्याने मला अधिक आनंद होईल. कारण तुमच्यासारखे सहृदय लोक लिलावात बोलणार नाहीत; तर हृदयशून्य लोक बोलतील. तुम्ही माझे देशबांधव दूर राहाल, तर कोणी गोरा निमगोरा सार्जंट ती लूट मारील. त्यापेक्षा तुम्हीच लिलावात बोलून, तुमच्या पोरांबाळास ते कपडे व सामान उपयोगी पडेल तर ते सत्कारणी लागेल असे मी समजेन, असे सांगून त्या सज्जन शिपायांस समजाविण्याचा मी प्रयत्न केला. दुसरे दिवशी उपनेत्र व गीताही मला परत देण्यात आली; पण, ती माझी म्हणून नव्हे; सरकारी सामान बंदीवानास वापरण्यास दिले म्हणून.

## अंदमानाचे चलान

आज तुरुंगात जिकडे तिकडे गडबड उडाली आहे. आज अंदमानचे चलान यावयाचे आहे. चलान हा आमच्या काराशास्त्रातील एक परिभाषिक शब्द आहे. सर्व इलाख्यात मिळून ज्या ज्या अपराध्यांस इतर सर्व अपराध्यांत अधिक भयंकर समजले जाते त्यांस काळेपाण्याची शिक्षा होते. त्या काळेपाण्याच्या शिक्षेतल्या भयंकरातही जे भयंकरतम ठरतील त्यांस जन्मठेपेची शिक्षा होऊन ते प्रथम ठिकठिकाणच्या स्थानिक तुरुंगात ठेवण्यात येतात. त्यानंतर काही दिवसांनी त्यांच्या परीक्षा होऊन जे स्वदेशात व स्वसमाजात ठेवण्यास अगदी अपात्र ठरतात त्यांस त्या त्या ठिकाणांहून ठाण्यास धाडण्यात येते. आणि तेथे हे देशदेशीचे भयंकरातील अस्सल बदमाश म्हणून ठरलेले अपराधी एकत्र करून अंदमानास धाडण्यासाठी काही दिवस ठेवण्यात येतात. या त्यांच्या पुढे जाण्याकरिता म्हणूनच येण्यास 'चलान' अशी आमची बंदीवानांची पारिभाषिक संज्ञा आहे. अट्टल चोर, निर्दय दरोडेखोर, नृशंस

हत्यारी, खूनी, विषद, आगलावे अशा अनेक उग्र अपराध्यांतही भयंकर अपराधी म्हणून ठरलेल्या या सद्गृहस्थांचा मेळा आज ठाण्याच्या तुरुंगात येणार आहे.

तुरुंगात हा मेळा येण्याचा दिवस म्हणजे बहुतेकांना एक उत्सवाचा दिवस वाटे; कारण कंटाळवाणेपणाच्या पेचातून कशाही निमित्ताने का होईना पण सुटण्यासाठी ज्या त्या बंद्याचा जीव झुरणीस लागलेला असतो.काही का होईना, एखाद्या कावळ्याचा उडता उडता एखादा पंख का खाली पडेना, एका चिमणीला दुसरी मारू लागली इतके का निमित्त घडेना, पण काही नवीन घडले की तेवढीच करमणूक एकसारख्या कंटाळ्यास थोडी तरी रंजवू शके. मग आज तर 'चलान' यावयाचे! जमादारापासून बंदीवानापर्यंत जो तो घाईत. काळेपाण्याच्या ह्या चलानाकरिता पूर्वीच्या तटबंदीच्या एका भिंतीचे आड एक स्वतंत्र कोठड्यांचा गाळा केलेला असे. तो झाडून झुडून साफ करण्यात, शिधासामग्रीची मोजमाप जमविण्यात, कपडे मोजण्यात, आणि इतर अनेक व्यवस्था करण्यात अर्धे बंदीवान आणि त्यांच्या त्या धांदलीकडे आणि लगबगीकडे पाहण्यातच आपली लगबग करून घेत असलेले बाकी अर्धे बंदीवान गुंग झाले आहेत.

## चलान आले

तीन वाजण्याचा सुमार झाला. जो तो बंदीस अधीरपणे विचारी, "अरे चलान अजून का बरे येत नाही?" इतक्यात 'फाटका'कडून म्हणजे तुरुंगाच्या दाराकाडून बंदीवानातील काही लोक एकाएकी इकडे तिकडे वळताना दिसू लागले. 'चलान आले!' 'काय आले?' 'हो हो अगदी दरवाजात!' 'किती रे?' 'कसे आहेत रे?' - प्रश्नांची आणि उत्तरांची आणि धावपळीची धांदल - बंद्यांतच नव्हे, तर शिपायांतही! कारण बंद्यांइतकेच एकसारखेपणास तेही कंटाळलेले असणार. इतक्यात खळ्ळ खळ्ळ असा अगदी दाट आवाज तालाने उठत अगदी जवळ जवळ येत चालला. जो तो बंदीवान एकटा वा थव्याने त्या वाटेच्या आजूबाजूस शिस्तीस क्षणभर लाथाडून दडून बसत आहे. आले, चलान आले. कोणी अत्यंत उग्र, कोणी कठोर, कोणी भंयकर, कोणी बळकट, कोणी काळेकुट्ट आणि मधून मधून दर्शनीयही असणाऱ्या स्वरूपाची आणि मुद्रेची ती मनुष्ये, कोणी छाती काढून ताठ, कोणी एखादा पराक्रम करून यावे तसे दणदण पाय आपटीत, कोणी "नमयतीव गतिर्धरित्रीम्" अशा ऐटीत, तर कोणी दुःखाने मान खाली घालून लज्जेने भीत वरखाली पाहत, दोन व्यवस्थित रांगांनी शिपायांच्या हडेलहप्पीत चालताना आणि त्यांच्या बेड्यांचा तो खळ्ळ खळ्ळ आवाज त्यांच्या त्या ताल धरताना मनास खरोखरच एक प्रकारची भयंकर गंमत वाटल्याविना राहत नसे.

## पटाईत दरोडेखोर

तो पाहा एक उग्र मुद्रेचा, मिशा, दाढी आणि वाढविलेले लांब केस यांच्या राठ आणि रानटी प्रभावळीत बटबटीत आणि क्रूर असे ज्याचे नेत्र गरगर घुमताहेत तो सिंधी मुसलमानांतील एक पटाईत दरोडेखोर! बंदीची वस्त्रेदेखील मोठ्या डौलाने बांधून, पायांतील बेड्या कमरेस सहज खिळवून, आपले अंथरूण काखोटीस मारून, मारे हसत आणि कोणास तरी हाक मारीत मोठ्याने बोलत एखाद्या विजयी वीराप्रमाणे चालला आहे! शिपायी सांगतात

की, दोन वेळा काळेपाण्यावर जाऊन आला आणि आता जन्मठेपीवर काळेपाण्यास जात आहे. तो स्वतः सांगतो की, त्याने काळेपाण्यावर मागे जमादारी केली आहे आणि असा दरारा बसविला आहे की, एका ठेवलेल्या बंदीवान मुलास त्याच्या एका शत्रूशी त्याच्या परवानगीविना लडिवाळपणे बोलण्याच्या अपराधासाठी त्याने काठीच्या एका घावासरशी डोके फोडून जो खाली पाडला तों तो दुसऱ्या दिवशी मरून गेला. पण दरडीवरून काम करताना तो मुलगा पडला म्हणून 'रिपोर्ट' देऊन हा दुष्ट जशाचा तसा मोकळा झाला! काळेपाण्यास माझी जमादारी ठेवलेली आहे, गेलो की जमादार झालोच असे सांगून आणि अमके साहेब, तमके साहेब अशी मोठमोठी नावे घेऊन तो बंदीवानांतील नवागतांस थक्क करून टाकी. इतके की त्यांच्यातील पोरसवदा बंदीवान आणि ज्यांस अजून हृदय म्हणून काही तरी उरलेले असल्याने काळेपाण्याच्या शिक्षेची लज्जा, पुढे कसे दिवस जातील ही चिंता वाटत होती असे इतर बंदी, तो पुढे खरोखरच जमादार होऊन आपणास काही तरी आधार देईल म्हणून त्याची येथपासून सेवा आणि हांजी हांजी करीत. वाटेतून ही बंदीवानांची टोळी येत असता कोणी केळी, नारळ, खाऊ, पैसे स्टेशनावरून दान देत, त्यांपैकी पैसेबिसे मिळाले असता हे बंदीवान त्या 'जमादारास' देऊन टाकीत आणि गुपचुप त्याचे पाय रगडीत! तोही तुम्हांस डिगीनसाहेबास नाही तर त्या मॉंटफर्डसाहेबास सांगून आत्ताच मुकादमीचे काम देववीन इत्यादी वाटेल ती नावे घेऊन, वाटेल त्या बाता झोकीत आपल्या उपभोगेच्छेस त्यांच्या साधेपणाचा बळी घेत असे.

## बहिणीस भोसकले

ते पाहा मिसरूडही न फुटलेले अठराएकोणविशीचे एक पोर. भांग पिणा-यांच्या संगतीत पडून एक दिवस भांगेच्या नशेत आपल्या बहिणीने शिवी दिली म्हणून चाकूने त्याने तिला भोसकली तो ती ठारच झाली. आणि आता भीत भीत अंथरुणाच्या भाराखाली अर्धे वाकत, बेडी उचलता उचलत नाही म्हणून लंगडत लंगडत रडत ते चालले आहे. भीती ही की, आता एकदा काळेपाण्यावर गेले म्हणजे माझे गाव आणि स्वजन पुनः कोठले दिसणार? या दोन टोकांमध्ये उग्रतेच्या, लज्जेच्या, निर्लज्जतेच्या आणि क्रौर्याच्या विविध प्रती क्रमांकवार लावलेल्या त्या हिडीस मिरवणुकीत खळखळ करीत चालत आहेत त्या पाहा!

पाहता पाहता मिरवणूक त्या तटबंदीच्या दारात घुसली. त्यांची पाहणी करण्यास काराप यावयास निघाला. बातमी कळताच जो तो बंदीवान जीव घेऊन धावपळ करीत आपापल्या जागी जाऊन साळसूदपणे काम करीत बसला. शिपाई पण कोणी हूं केले की, "ए क्या बात करता है, कायदेसे चलना!" म्हणून ओरडू लागले. जसे काही एका क्षणापूर्वी झालेला गोंधळ त्यांस माहीतच नव्हता! जसे काही आतापर्यंत बंदीवानांपेक्षाही शिपायांची जी 'चलान' पाहण्याची दाटी आणि घाई उडाली होती ती सर्व 'कायदेसे'च चालली होती!

## परोपकारी अधिकारी

दुसऱ्या दिवशी काळेपाण्यावर धाडण्यास आमची शरीरप्रकृती, वय इत्यादी योग्य आहे की नाही याची परीक्षा व्हावयाचे ठरले. एक परोपकारी अधिकारी मला म्हणाले, "आपणास जर काळेपाण्यावर जावयाचे मनात नसेल तर आपणास येथेच ठेवण्याचा प्रयत्न मी माझे हातात आहे तितका तरी केल्याविना राहणार नाही." मी

म्हटले, “आपल्या सदिच्छेविषयी मी आपला आभारी आहे. पण मला हिंदुस्थानात ठेवणे हे मुंबईच्या गव्हर्नरांच्याही हाती बहुधा नसेल; तेव्हा आपण व्यर्थ त्रास घेऊ नये.” त्या दिवशी माझी परीक्षा पंचांपुढे झाली. ते परोपकारी अधिकारीही तेथे होतेच. मला ताप आला होता. पण रीतीप्रमाणे वजन होऊन माझी काळेपाण्यावर धाडले जाण्याची पात्रता ठरली. अंथरूण माझे बगलेत देऊन, भांडी हातात देऊन, बेडी तशीच खळ्ळ खळ्ळ करवीत माझीही मिरवणूक काढण्यात आली. मीही त्या तटबंदीच्या दारात घुसलो. त्या दाराचा उंबरा म्हणजे काळेपाण्याच्या वेशीचा उंबरा होता; तो मी ओलांडला. हिंदुस्थानाचा संबंध सुटला. माझे अंदमानचे प्रस्थान ठेवण्यात आले.

प्रकरण चौथे

# अंदमानचे प्रस्थान

ठाण्याच्या तुरुंगात केवळ अंदमानचे चलान बंद करण्यासाठीच जो स्वतंत्र तटबंदीचा भाग होता त्यात, म्हणजेच त्या अंदमानाच्या वेशीच्या आत पाय टाकल्यावर ज्या कोठडीत मला कोंडण्यात आले ती कोठडी जरी सडी होती तथापि तेथून एकसारख्या लागूनच असलेल्या कोठड्यांतून अंदमानास जाणाऱ्या सर्व बंद्यांस भरलेले असल्याने आणि जेवताना फिरताना त्यांची भाषणे, उसासे, रडणे आणि हसणे हे सर्व ऐकावयास आणि पाहावयास मिळू लागल्याने फार दिवस अगदी एकान्तात कोंडलेल्या माझ्या मनास तशा दुःखातही थोडी गंमत वाटल्याविना राहिली नाही! त्या बंद्यांचे हसणे म्हणून मी म्हटले ते खरे आहे. खरोखरच त्या दुःखाच्या आणि यातनांच्या भयप्रद भुयारातही मनुष्य हसल्यावाचून राहात नसे, किंबहुना भयप्रद भुयारातले दुःखाचे हसूच सर्व हसण्यांत विकट असते. दुःखाचा भार असह्य झाला किंवा निगरगट्टपणाच्या खांद्यावर तो अलगत फेकून देता येऊ लागला म्हणजे दुःख देखील हसू लागते. आनंद अमर्याद झाला म्हणजे जसा रडतो तसाच शोकही हसत असतो. असे सांगतात की, फ्रान्सच्या राज्यक्रांतीत अमानुष रक्तपात, वध, हत्या, फाशी, कत्तली यांचा पारिसला कळस झालेला होता आणि पंतप्रधानपद की उद्या फाशी अशी भीषण स्थिती झालेली होती; तेव्हा नाटकगृहे प्रेक्षकांनी एरवी कधीच भरलेली नसत इतकी गच्च भरत आणि मद्यालये, क्रीडालये एकसारखी नाचत-हसत-खिदळत असत.

## उन्मत्त हास्य

गेल्या महायुद्धातही हाच अनुभव आला. जर्मन पाणबुड्यांवरच्या अधिका-यांस आणि नाविकांस लढाईतील सर्व सैनिकांहून अत्यंत भयंकर आणि मारक सेवा करावी लागली. त्यांना खरोखरच हातात शीर घेऊन समुद्रात बुडी घ्यावी लागे आणि समुद्राच्या गर्भात क्षणोक्षणी मरणाची अपेक्षा करीत मारण्याचे काम करावे लागे. त्या भयप्रद अनिश्चिततेच्या धामधुमीत केव्हा केव्हा त्या बोटी एखाद्या सामुद्रपुरीस वर येऊन विसावा घेत तेव्हा तेवढ्या काळात भोग भोगून घेण्याकरिता त्यांच्यासाठी जी विहारलये उभारली गेली त्यांतून कित्येकांचे असे ब्रीदवाक्य असे की, “एन्जॉय् टिल् दाऊ गोएस्ट् मॅड्! एन्जॉय्! फॉर टुमारो वुई डाय्!” “हास, उन्माद होईतो हास, नि हो उद्या मृत्यूचा घास!” अशा त्या विहारालयांत उन्मत्त हास्याची दंगल सभ्यतेची नियमित बंधने पार तुडवून टाकीत रात्रंदिवस उच्छृंखल तांडव करीत असे. कारण आज जे आपले नाव ह्या तांडवपटावरआहे ते त्या पटावरील कालच्या नावाप्रमाणे उद्या मृत्यूच्या त्या सरकारी पटावर नोंदले जाणार हे तो जाणून असे. खरोखरच दुःखाचे हसू सर्व हसण्यांत विकट असते.

आयुष्यात रम्यत्व देणाऱ्या सर्व वस्तूंस पारखे होऊन पशूही ज्या स्थितीत राहण्यास थरथर कापतात त्या बंदीवासात, बेड्यांत, हातकड्यांत जखडलेले, पापे करता करता निर्ढावलेले, पापाची पुरती ओळख न झाल्याने मनास पश्चात्तापाने तोडूनतोडून खात असलेले, रागाने जळजळणारे, दुःखाने स्फुंदफुंदून रडणारे असे शंभरावर जीव विवळता विवळताच मोठमोठ्याने मध्ये मध्ये हसत होते. तीव्र संकटाच्या मनोरंजनास अळणी विनोद पुरा न

पडून बीभत्स विनोदाच्या दारूच्या बाटल्या झोकझोकीत ते झिंगत चालले होते. कोणी सिंधचे, कोणी धारवाडचे, कोणी कोकणचे, कोणी गुजराथचे त्यांच्या भिन्न भाषा, त्यांचे मनोविचार आणि मनोविकार निवेदित करण्यास समर्थ होत नसल्या, तथापि बीभत्स विनोदाची भाषा सहजगत्याच त्यांची राष्ट्रीय भाषा होऊन तो मनोविकार सर्वांस समजावू शके. फार दिवसांनी इतक्या माणसांत त्या प्रत्येकास राहण्याची संधी आल्याने ते सामाजिक आनंदात क्षणभर मग्न झाले होते. संध्याकाळची वेळ म्हणजे ह्या बंड करून उठलेल्या बीभत्स भावनांच्या आणि विनोदांच्या नंग्या नाचाची वेळ. खोलीखोलीतून आरोळ्या, किंकाळ्या, शिव्या, हशा, अनुच्चारणीय शब्दांचा यथेच्छ उच्चार यांचा धुमाकूळ याच वेळी सुरू होत असे. आणि त्यांतही पण कर्तव्यनिष्ठेचा थोडासा गंध होता! मनुष्यस्वभाव काय चमत्कारिक आहे पाहा! त्या अधमांतील अधमांस असा बीभत्स धुमाकूळ घालणे हे आपले कर्तव्य आहे असे वाटे. अधमपणा हे देखील एक कर्तव्य आहे म्हणून मनास पटविल्याविना उजळ माथ्याने अधमांना अधमपणा करता येत नाही! त्या बंदीवानांतील जन्मठेपीचे निर्ढावलेले बेरड ज्यांना त्या नंग्यानाचात उघड पडण्याइतके निर्लज्ज धैर्य अजून आले नव्हते त्यांस ओरडून सांगत, "ए भाई गाओ! ए साला चिल्लाव! अरे आपले चलानाचे नाव तर गाजले पाहिजे ना! आम्ही मागे येथे आलो तेव्हा दाराचे गज पकडून असे जोराने सगळे हलवीत राहिलो आणि भांडी भिंतीवर मारीत राहिलो की शिपाई पाया पडू लागले आणि त्यांनी प्रत्येकास गुपचिप तंबाखू दिली. ओरडा, चलानाचे नाव बुडवू नका.

## चलानका नाम राखो भाई!

कारण चलान ही काराजगतांतील एक महनीय संस्थाच बनलेली होती. चलानाचे नाव म्हणजे काही साधारण गोष्ट नव्हती. त्या चलानाच्या सभासदत्वाचे उच्च स्थान काही सहजासहजी आम्हांस मिळाले नव्हते. पोलिस-चौकी, मॅजिस्ट्रेटी कोर्ट, सेशन, ज्यूरी, हायकोर्ट अशा अनेक परीक्षांतून उतरत किंवा खरे म्हटले तर चढत मनुष्य जन्मठेपीच्या काळ्यापाण्याची प्रतिष्ठा पावणार, त्यांतही निवडून निवडून जे प्रांताप्रांताचे प्रतिनिधिस्वरूप बदमाष तेथे आलेले, अशा बदमाषांच्या शिरोमणींची ही संस्था. तिचा पूर्वापार लौकिक असा की, ठाण्यास चलान आले की शिपाई, हवालदार, जेलर, सुपरिंटेंडेंट सर्व चिंताक्रान्त झाले पाहिजेत, भिंती तुटल्या पाहिजेत, गज उपटले पाहिजेत, डोकी फुटली पाहिजेत, एक-दोन शिपायांस तरी मार बसला पाहिजे, पाच-पंचवीसजणांच्या पाठी फटक्यांनी सोलून निघाल्या पाहिजेत! शिपायांनी उलटी त्यांची हांजी हांजी करून आपला जीव कसाबसा वाचवून घेतला पाहिजे. तर ते चलान! "नाही तर" - ते बदमाषांचे आचार्य नूतन सभासदांस उत्तेजीत - "बदमाषी करावी कशास? ही चलानांची पूर्वपरंपरा आहे. आज त्या प्रख्यात संस्थेचे चालकत्व आपल्या हाती आलेले असल्याने आपण ती परंपरा राखलीच पाहिजे. ओरडा, ओरडा, नाचा, शिव्या द्या! चलानचे नाव राखले पाहिजेना भाई!!"

आणि खरोखरच बंदीवानांतील लोक तो जो बीभत्स विनोदाचा आणि निर्लज्ज वर्तनाचा नंगा नाच करीत होते तो काही अंशी त्या कर्तव्याच्या भावनेने उत्तेजित झालेला असे. मधून कोणी तरी निर्लज्ज शिरोमणी ओरडे, "चलानका नाम राखो भाई!" की पुनः शिट्या, टाळ्या, बेड्यांचे खळखळाट यांची दंगल सुरू! पूर्वापार चालत आलेल्या ह्या चलनाचे "एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः। अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति।।" अशा

उदात्त बुद्धीने ते नीच कर्तव्य रात्री दहाबारा वाजेतो सर्वजण झटून करीत होते. चलानाच्या या सांस्थिक अभिमानापुढे शिपाई काय, सुपरिंटेंडेंट काय, आपला बडेजाव गुंडाळून ठेवीत. गुपचुप तंबाखू घ्या, ओरडत, बोलू नये पण आपसात बोला, परंतु कसे तरी ह्या ठाण्याच्या तुरुंगातून पळून न जाता मोजून घेतले तितके पोलिस अधिका-यांस मोजून परत घेऊ द्या म्हणजे झाले, अशा मेटाकुटीस आलेले असावयाचे.

ज्या समाजात आपण असू त्याच्यातील बहुजन जे वाखाणतात तेच कर्तव्यकर्म होय म्हणून साधारणतः सहज वाटते. या विधानास पुष्टिदायक उदाहरण ह्या चलनाच्या सांस्थिक अभिमानाहून दुसरे धुंडणे नको. आणि जेथे बीभत्स विनोद हे कर्तव्य ठरते त्या समाजात तसा विनोद न करणारा पापी वा समाजनिंदित ठरणारच. शिमग्यात जो शेणमार करणार नाही तो असभ्य होतो आणि त्याच्याकडे उपहास आणि तिरस्कारबुद्धीने समाज पाहतो.

## बालिस्टरची प्रतिष्ठा

त्या रात्री माझीही स्थिती जवळजवळ तशीच झाली असती; पण सुदैवाने मी ‘बॅरिस्टर’ आणि ‘मोठा साहेब’ असा बोलवा ज्याच्या त्याच्या तोंडी झालेला. बंदीवानांत आणि त्यांतही निर्ढावलेल्या बदमाष अपराध्यांत जर कोणा वर्गाविषयी सहजच आदर आणि भय उत्पन्न होत असेल तर ते ‘बॅरिस्टर’ वर्गाविषयी होय. कवी, विद्वान, सात्त्विक, कारस्थानी-इंग्रजांचा मुख्य प्रधान जरी असला तरी यांचे त्यांना काही विशेष वाटत नाही. पण ‘बॅरिस्टर’ म्हटला की, आदराश्चर्याने भिवया उभारून ‘अच्छा’ असा उद्‌गार त्यांच्या तोंडून निघालाच! त्याचे कारणही उघड आहे. त्यांचा जन्म चोऱ्यामाऱ्या आणि न्यायालये व तुरुंग यांत गेलेला. तिथे त्यांच्या मतांनी अत्यंत कौशल्याने रचलेली त्यांची पापांची जाळी आपल्या बुद्धीच्या कुशाग्राने छिन्नविच्छिन्न करणारा किंवा उलटपक्षी त्यांच्या धडधडीत अपराधांस बुद्धीच्या ढालीखाली लपवून त्यांस निर्दोषी म्हणून सोडविणारा ‘बालिस्टर’ हा त्यांस सहजच कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् समर्थ असा एक अद्‌वितीय प्राणी वाटणारच. ते त्यांस सहजच भितात. त्यांची मैत्री जोडण्यास ते सहजच झटतात. पूर्वी बादशहा आणि बिरबल यांच्या कथा जशा प्रचलित असत, तशा काराजगतांत बालिस्टर आणि साक्षीदार यांच्या दंतकथा सर्वत्र पसरलेल्या असतात. एवंच माझ्या ‘बालिष्टरी’चा मला दुसरा काहीही उपयोग जरी झाला नाही तरी एवढा अपुयोग तेथे झाला खरा! कसलाही अट्टल बदमाष का असेना, तो पटकन नमे.

त्या रात्री तो बीभत्सपणाचा नंगा नाच ऐकत आणि पाहत मी गजाच्या बंद दाराशी उभा राहिलो. फार दिवसांनी एवढ्या मंडळींचा एवढा आवाज आणि कोलाहल ऐकला. एकान्ताने चिरडीस आलेले मन त्या बीभत्सतेची किळस येऊन मागे हटण्याचे स्थली एखादा घासलेटचा डबा जसा एकदम भडका घेतो तसे मनोविकारांच्या भडक्याने पेटून त्या उजेडात तो तमाशा पाहतच राहिले. आणि पाहता पाहताच त्या कारणाचे आणि स्वरूपाचे तात्त्विक पृथक्करणही करीत राहिले. कितीही वैयक्तिक दुःख झालेले असले तरी त्या गोंधळात मन व दुःख विसरून तास दोन तास तो तमाशा पाहिल्याविना दुसरे काही करूच शकणार नाही, इतकी ती लोकांच्या हसण्याची बंडाळी माजलेली होती. मी तीत प्रत्यक्ष भाग घेतला नाही, तथापि “बालिष्टर साहेबको मत सताव” असे म्हणून त्या

चलानाच्या चालकाने त्याची उपेक्षा केली. इतकेच नव्हे तर ११ वाजता रात्री जेव्हा ओरड फारच झाली, तेव्हा शिपायांनी “बालिष्टरांस झोप येत नाही म्हणून तुम्ही आता निजा” म्हणून सांगताच त्या बंदीवानांतील बुहतेक बंदीवानांनी ओरडणे सोडून दिले; आणि मग सुमारे १२ वाजता रात्री माझा डोळ्यास डोळा लागला.

सकाळी कल्पना आली की, माझे वडील बंधू बाबा जेव्हा जन्मठेपीवर गेले तेव्हा अशाच कोण्या चलानाबरोबर गेले असतील आणि तत्पूर्वी येथेच कोठे बंद केलेले असतील म्हणून वॉर्डरास विचारले, पण तो नवीन; त्याला काही माहिती नव्हती. एका जुन्या शिपायाने थोड्या शोधाअंती सांगितले की, मला ज्या खोलीत बंद केले होते त्याच खोलीत ते बंद होते. तो शिपाई गेला. माझे डोळ्यांसमोर माझ्या ज्येष्ठ बंधूंची मूर्ती उभी राहिली. तुरुंगात त्यांचा फार छळ करण्यात आला अशी माहिती मला खटला चालला असता माझ्याबरोबरच्या मंडळींनी दिली होती. ते त्यांचे छळ मला दिसू लागले. त्या छळाच्या वेदनांनी जीव कासावीस होत असताही, एकदा बिथरलेला हत्ती अंकुशाचे तीक्ष्ण आघात गंडस्थलावर कितीही केले तरी हिस्स न करता हटेलपणाने अचल उभा राहतो, तसा छळाचे मानसिक आणि शारीरिक आघात सहन करीत उभा असणारा तो त्यांचा देह मला दिसू लागला. ह्या खोलीत तो वीर पुरुष असाच गजाशी, पिंजऱ्याशी गरूड चडफडत राहतो तसा, राहिला असेल, येथे बसला असेल, का माझी चिंता करीत असेल, का मनात म्हणत असेल, “मी गेलो म्हणून काय झाले? तो तर मागेच आहेना! मग चिंता काय? पाहून घेईल!” असे म्हणत असतील तर आज मीही तसाच आहत झालेला पाहून त्यांस काय वाटेल? केवढा धक्का बसेल? यापेक्षा अंदमानात त्यांची माझी प्रत्यक्ष भेट न होता ते एका जिल्ह्यात तर मी दुसऱ्याच जिल्ह्यात नेऊन सोडलो गेलो तरी बरे होईल.

मला वाटते, मला एकट्यालाच शिक्षा भोगावी लागली असती तर माझ्या मनास भोगाव्या लागलेल्या वेदनांचा पन्नासावा भागही मला भोगावा लागता ना. पण माझ्या वेदना सोशीत असतानाच डोळ्यासमोर देवीप्रमाणे पूज्य असणाऱ्या माझ्या ज्येष्ठ बंधूसही माझ्याहून अधिक छळ सोसताना मला जेव्हा पाहावे लागे, ऐकावे लागे, तेव्हा मात्र सहनशक्ती, वादळात एखादा प्रचंड वड कड-कड-कड करीत कोसळू लागतो, तशी कोसळून जाऊ पाहावी, हृदय फाटू पाहावे.

एका विश्वासार्ह अधिकाऱ्यास विचारले, “येथे काही छळ झाले का?” त्याने सांगितले, “येथे काही झाले नाहीत, येरवड्यास झाले असे मला तुमचे खटलेकरी (खटल्यात जे सहाभियुक्त असतात त्यांस खटलेकरी ‘को-अक्यूज्ड’ म्हणून तुरुंगात म्हणतात.) सांगत असत.” हे त्यांचे आश्वासन ऐकून थोडे बरे वाटले. निदान या खोलीत तरी ते स्वस्थ निजू शकले असतील!

मी त्याच अधिकाऱ्यास श्री. वामनराव जोशी, सोमण, इत्यादी सहाभियुक्तांची ठाण्याची माहिती विचारली...

## चले भय्या कालापाणीको

दोन-चार दिवसांतच अंदमानास जाण्यासाठी सर्व बंदीवानांची ती सेना बाहेर काढण्यात आली. इतरांसह मीही पायात बेडी घालून, अंदमानाचा म्हणून एक पंचा, एक चादर आणि एक बंडी असा वेष असतो तो चढवून, एक तरट आणि कांबळे यांचे अंथरूण, जे त्या तरटाच्या राठ कठिणपणाने वळकुटी करता करू देत नसे ते, कसेबसे काखेत

मारून आणि एका हातात पत्र्याची 'थाळी पाट' ही दोन भांडी घेऊन खोलीपाशी निघावयास सज्ज होऊन उभा राहिलो. पुनः ती टोळी ओळीने बेड्या तालावर खळ्-खळ् करीत चालली. जो तो, कोणी का दिसेना, "राम राम, चले भय्या कालापाणीको" म्हणून राम राम देत-घेत चालला. तुरुंगाच्या दाराशी येताच ती टोळी बाहेर पडली. शिपायांच्या बंदुकी रोखून पहारा सज्ज झाला आणि त्या ओळीस घेऊन पुढे चालला. स्टेशनपर्यंत ते पायी चालले; परंतु मला वगळले. का ते मी चिंतू लागलो, तो एक मोटार आली. दोन धिप्पाड गोरे अधिकारी बाहेर पडले. मी आत बसलो. ते बसले आणि मोटार बंद झाली. मी आज काळ्यापाण्यावर जाणार म्हणून कशी तरी गावात आणि स्टेशनकडे बातमी फुटली होती. बंदीवान ज्या मार्गाने जातात त्या मार्गावर मी दिसेन म्हणून लोक हरएक प्रकारे यत्न करून टपून लपून जमत होते; म्हणून मला दुसरीकडून गुपचूप नेणे अवश्य वाटले हे एक आणि दुसरे की, मी मार्सेलिसला पळालेला आणि ते गुप्त कटाचे दिवस! न जाणो कोठे काय कट होऊन मला सोडविण्याचा यत्न कोण करील ते कोणी सांगावे? सहज पाय टाकता त्या दिवसांत सुरुंग उडत! अशा स्थितीत मार्सेलिसच्या चुकीची पुनरावृत्ती न व्हावी म्हणून मला त्या घोळक्यात स्टेशनावर जनसंमर्दातून पायी न नेता स्वतंत्र मोटार आणून नेण्यात आले.

अशा रीतीने जेव्हा जेव्हा मला स्वतंत्र मोटारीतून विशेष व्यवस्थेने नेण्यात येई तेव्हा त्या बंदीवानांत माझेविषयी मोठी बढाईची कल्पना होई. "तो काय बाबा एक राजा आहे! बघा याला मोटार दिली! तो थोडाच आपल्याबरोबर पायी येतो!" कोणी म्हणावे, "भिते, सरकार त्याला भिते! कशी मोटार आणून दिली?" एकंदरीत मार्सेलिसच्या बोटीतून निसटण्याच्या प्रयत्नाचे काही लाभ झाले त्यांत हाही एक लाभ झाला खरा की, मोटारीत खूप बसावयाला सापडले; आणि त्यायोगे बंदीवानांत मजविषयी जो आदरभाव - सकारण, अकारण पण आदरभाव - उत्पन्न होऊ नये म्हणून सरकारी अधिकारी कसून प्रयत्न करीत तो आदरभाव - वाढत गेला.

स्टेशनावर येताच मला स्वतंत्र डब्यात कोंबण्यात आले. माझ्या हातात जी हातकडी होती तिचा दुसरा हात एका धिप्पाड इंग्रजी अधिकाऱ्याच्या हाताशी जखडून टाकलेला होता. मजकरिता त्या बिचाऱ्यास हातकडी घालावी लागली. पायांत माझ्या बेडी होती. हातांत हातकडी होती. इतकेच नव्हे तर तिने माझा हात दुसऱ्याच्या हातास खिळून टाकलेला. धोतर खोचणे तर त्याच्या हातासह खोचावे लागे, लघवीस जाणे, शौचास जाणे, त्या अधिकाऱ्यास हातास हात खिळलेले असल्याने बरोबरच. निजणेही तसेच. अनेक वेळा प्रवासातून ह्या प्रकारचा ओंगळपणा व कष्ट सोसावे लागले.

मला डब्यात कोंबले; पण म्हणून मला कोणी पाहिले नाही असे नाही. हिंदी लोक जे तेथे उत्सुकतेने आले होते त्यांस दूरदूर हाकलण्यात येई. पण काही युरोपियनही बघण्यास आले होते. ते मात्र डब्याशी येऊन बंद केलेल्या खिडक्या उघडून कोणी दोन सभ्य शब्द बोलून वा कोणी उर्मटपणाने पाहून निघून जात. त्यांस तितका अटकाव करण्यात येत नसे. गाडी सुटल्यानंतर जेथे जेथे ती उभी राही ते ते स्टेशन येण्याच्या आधीच माझ्या डब्याच्या सर्व खिडक्या बंद करण्यात आल्या. इंग्लंड सोडल्यापासून उघड्या खिडक्यांच्या डब्यात असा मला प्रवास घडलाच नाही. परंतु ह्या स्टेशनावर मजबरोबर असलेल्या एका अधिकाऱ्याने तेथील युरोपियन लोकांशी प्रथमच बेत करून ठेवला होता की काय कोण जाणे, माझ्या डब्याच्या खिडक्या उघडण्यात आल्या. दूरवर गोऱ्या लोकांची बरीच

मंडळी उभी होती. त्यांत काहींनी औत्सक्यभरात आपल्या मडमांना खांद्यावर उचलून घेतलेले दिसले. मला खिडकीशी उभे राहा म्हणून एकाने खूण केली. मी उभा राहिलो तो 'There's he; that is Savarkar" असा गलका ऐकू आला. मला पाहण्यास जमलेल्या गोऱ्या लोकांसही माझ्याशी बोलता यावे इतके जवळ येता आले नाही. चारपाचजण गोरे लोक येऊन गेले; पण मी होऊन कोणाचे नाव विचारीत नसे. त्यांच्या बोलण्यात बहुधा आदरभावच, निदान शिष्टाचार तरी आढळून यावा. उर्मट गोरा असा विरळा भेटे. असा जो जो भेटे त्यास माझीही मुद्रा तितकीच निःस्पृह दिसून कोण आला की गेला याची मला गणनाही नाही असेच भासत असे.

## मोगलाईतील मैदाने

माझ्या डब्याच्या खिडक्या बहुधा बंद असत. डब्याच्या दुसऱ्या भागात लोखंडी गजांनी जो भाग माझ्या भागापासून भिन्न केला होता तेथे सगळे काळेपाण्याचे बंदी कोलाहल करीत आहेत! उन्हाळ्याचे दिवस. ऊन मी म्हणत असून उष्मा असह्य झालेला. एखाद्या लग्नाची मंडळी जरी उत्सवास जात असती तरी देखील तो प्रवास नकोसा व्हायचा. त्यात मी तर काळेपाण्यास यावज्जीव बंदीवासास चाललेलो. जितकी डब्याचे बाहेर ती मोगलाईतील मैदाने तापून रखरखीत झालेली तितकीच डब्यातील काहिलीही असह्य झालेली आणि त्या रखरखीत मैदानांची आणि त्या डब्यातील काहिलीची तीव्रता आणि अस्वस्थता जितकी बाहेरून असह्य होत चालली होती तितकीच अंतःकरणातील तो रखरखीत उष्माही आतून जिवाची लाहीलाही करीत असलेला! अशी ती गाडी मोगली मैदानातून मद्रासकडे चालली!

जेव्हा मनास अगदी कसेसेच वाटावे तेव्हा रशियामधून सैबेरियात ज्या राजकीय बंदीवानांच्या टोळ्या धाडण्यात येत त्यांच्या प्रवासातील त्यांचे हाल आठवून मनास म्हणत असावे, अरे, अजून तुम्ही काय भोगिले आहे! ही तोंडाची गोष्ट नाही! जो करील तो भरील! जो भरील तो करील!

गावांमागून गावे, नगरांमागून नगरे मागे टाकीत वने-उपवने, पर्वत, नद्या ओलांडीत ती आगगाडी पिसाळलेल्या वाघिणीसारखी मला तोंडात धरून धावत चालली होती. जितक्या वेगाने ही आगगाडी मला माझ्या मायदेशातून काळेपाण्याकडे ओढून नेत आहे, हाय हाय, तितक्याच वेगाने ती मला काळ्यापाण्यावरून परत आणून माझ्या मायदेशात कधी सोडील? कधी सोडील का? कसली सोडणार? ती आशा धरणे हे मानसिक आश्चर्यच होय! सबेरियात नाही का 'रशिया, रशिया' करीत शेकडो लोक मेले. मीही अंदमानात 'हाय भारत! हाय हिंदुस्थान!' करीत मरेन!!

मद्रास आले व मला गाडीतून उतरताच एका बाजूस इतर सर्व बंद्यांपासून निराळे करून पहाऱ्यात ठेवले. गाडीबरोबर, रेल्वेचाच असावा किंवा पोलिसचा एक युरोपियन अधिकारी बऱ्याच अंतरावरून आलेला होता. तो दर दोन-तीन स्टेशनांनी माझ्यावरच्या अधिका-यांपैकी एकाशी काही बोलून मला पाहून परत जाई. आता तो मला सोडून गाडीने परत जाणार असावा. तो माझ्याजवळ येऊन अगदी कंठ दाटून यावा तसे म्हणाला, "Good bye friend!" "मला वाटते ईश्वराच्या कृपेने ह्या डिसेंबरातील राज्यारोहणाचे वेळी आपण सुटाल." मी म्हटले, "आपले सदिच्छेविषयी आभार आहेत; पण आमचे घाव इतके ताजे आहेत की ते इतक्या लवकर भरून कसे येतील? मी तरी

तशा आशेवर अवलंबून राहणे वेडेपणा होईल." अधिकारी म्हणून मला काही तरी विशेष माहिती आहे अशा आश्वासक स्वराने ते म्हणाले, "माझ्यावर विश्वास ठेवा. आपण सुटाल, बरे येतो आता. आपल्या धीरोदात्त वर्तनाचा (This your dignified courage) माझ्या मनावर झालेला ठसा कधीही पुसट होऊ शकणार नाही." इतर अधिकारीही निरोप घेऊन गेले. मार्सेलिसच्या आडव्या-तिडव्या गप्पा त्यांनी ऐकल्या असल्यामुळे मी त्यांना प्रवासात फार त्रास देईन, इंग्रज पाहिला की माझ्या अंगाचा तिळपापड होतो, मी कोणी एक उर्मट, असभ्य, भयंकर व्यक्ती आहे अशी त्यांची समजूत होती. पण प्रवासात त्यास काहीएक त्रास न पडता मला मद्रासच्या अधिका-यांच्या हाती एकदाचे देता आल्याने त्यांचा जीव खाली पडल्यासारखा झाला आणि मग त्यांना माझ्यात टोपी काढून राम राम करून जावे इतके सद्‌गुण दिसू लागले.

मद्रासला त्याच वेळेस कलेक्टर अशे यांचा वध झालेला असल्याने आणि त्याचा संबंध युरोपमधील अभिनव भारताच्या एका पुढाऱ्याशी लागत आहे अशी अधिका-यांची शंका असल्याने त्याविषयी मला बहुधा काहीना काही तरी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विचारण्यात येईल असे मला वाटत होतेच. इंग्लंडामधून मी धरला जाऊन हिंदुस्थानात परत आणला जात असता आणि माझा खटला संपून अंदमानास नेण्यात येत असता अभिनव भारताचे त्यावेळचे उपाध्यक्ष श्री.अय्यर - ज्यांच्या अकालीन मृत्यूने या वर्षीच उभ्या आर्यावर्तास विव्हळ केले ते - हिंदुस्थानात आले होते हे मला त्या वेळेस खरोखरच माहीत नव्हते. ते युरोपमधून नाना वेषाने आणि मिषाने मार्ग कंठीत, भयंकर आरोपांची वारंटे डोक्यावर लटकत असता, आणि डोळ्यांत तेल घालून हिंदुस्थानचा उभा किनारा सरकारी गुप्तचर निरिक्षित असता अखेर हिंदुस्थानात पांदेचारीस येऊन उतरले होते. तेथून त्यांनी तेथे पूर्वीच असलेल्या अभिनव भारताच्या शाखेस हाती धरून त्यातील सभासदांपैकी एका शाक्त ब्राह्मणाकरवी तुतिकोरीनच्या कलेक्टरवर गोळी घालून त्यास मारविले असा पोलिसांचा आणि अधिका-यांचा तर्क असल्याचे मला अंदमानात सातआठ वर्षे झाल्यावर 'सीक्रेट रिपोर्ट' वाचून कळले. पण त्या वेळेस श्री. अय्यर परत आले हेही मला माहीत नव्हते.

मद्रासच्या त्या कलेक्टरच्या वधाची बातमी मला मिळाली होती आणि बहुधा मद्रासमधल्या अभिनव भारताच्या कोणा सभासदांकरवीच हे घोर कृत्य झाले असावे असा संशय मला आला होता इतकेच खरे. परंतु मला ती बातमीच कळली नसेल आणि म्हणून मी सहजगत्या मद्रासकडच्या शाखेची काही बातमी सांगेन अशा आशेने मद्रास अधिका-यांपैकी एक इंग्रजी वेष परिधान केलेले हिंदी अधिकारी मला भेटले. समुद्रात अंदमानाची 'महाराजा' नावाची आगबोट आलेली. सर्व बंदीवान एका मोठ्या नावेत खेचाखेच करून तिकडे नेलेले. मीच तेवढा मागे उरलेलो; इतक्यात एक लहान बोट घेऊन मला न्यावयास हे आणि इतर एक का दोन अधिकारी आले. मी त्या लहान नावेत बसलो. मी होऊन कोणाशीही बोलत नसे; कारण मी बंदीवान, पटकन कोणी 'चूप बैस' म्हणून म्हणावयाचे. थोड्याच वेळाने ते अधिकारी इकडचे तिकडचे कुशल प्रश्न विचारून इंग्लंडातील क्रांतिकारकांची माझ्यामागे काय स्थिती झाली म्हणून जिज्ञासा करते झाले. मी म्हटले, "हे तुम्ही मला सांगावयाचे. तुरुंगात मला काय माहीत पडणार?" मला जाणून उत्तेजविण्यासाठी ते म्हणाले, "ते खरेच; आणखी कसले ते भिकार कट! चार माणसे देखील त्यात नव्हती." मी हसून उत्तरलो "तर मग तुम्ही काही मिळवावयाची होती!"

“छेः, भलतेच. या मद्रास इलाख्यातील लोक सुज्ञ आणि विचारी आहेत, तुमच्या तिकडच्या तरुणांसारखे इकडे कोणी उच्छृंखल नाहीत. येथे कोणी प्रचारक आला तर त्याला एकही अनुयायी मिळणार नाही.” ते हे बोलत असता पदोपदी बघत होते की त्यांचा प्रतिकार करण्यासाठी काही मद्रासच्या प्रख्यात राज्यक्रांतिकारकांची नावे सांगतो की काय. नंतर आपणच म्हणाले, “तुमचा अनुभव कसा आहे?” मी म्हटले, “मद्रासचा अनुभव मजपेक्षा तुम्हांस अधिक असला पाहिजे.” ते म्हणाले, “माझा अनुभव तर मद्रासकडे सर्वत्र शांतता आहे.” मी हसून विचारले, “होय ना? अगदी शांतता आहे ही तुमची अगदी निश्चिती आहेना?” तो समजला. तो दुसरा अधिकारी हसला आणि म्हणाला, “त्यांना सर्व बातमी ठाऊक असली पाहिजे. केवळ तुम्ही त्यांना पंप करू पाहत आहा आणि ते तुम्हाला पंप करू पाहत आहेत!”

मला वाहून नेणारी ती लहान नौका त्या अंदमानाहून आलेल्या ‘महाराजा’ नावाच्या आगबोटीस लागली. मला हातकडी घातलेलीच होती, तीसह बोटीच्या शिडीवर कडक पहाऱ्यात चढविण्यात आले. मी वर चढत असता बोटीवरील प्रवासी, नौकर, अधिकारी आणि आजूबाजूस लहान नावांतून आलेले अनेक प्रेक्षक तो देखावा बघण्यास दाटून उभे राहिले; आणि मला अंदमानाच्या त्या कठोर आगबोटीवर चढताना पाहू लागले. आपण जसे एखाद्या प्रेतास तिरडीवर चढविताना आणि नीटनेटके बांधताना पाहतो तसे स्तिमित जिज्ञासेने आणि निर्लज्ज गमतीने पाहत राहिले.

होय. त्या ‘महाराजा’ आगबोटीवर जन्मठेप्याचे चढणे म्हणजे प्रेताच्या तिरडीवर जिवंतपणीच बांधले जाणे होते. आजपर्यंत जे शेकडो हजारो जन्मठेपी अपराधी त्या भयंकर बोटीवर चढून काळेपाण्याकडे गेले त्यांतून हजारी दहाही जिवंतपणी देशास परत येऊ शकले नाहीत. अठरावीस वर्षांची चढत्या तारुण्याची पोरे त्या जहाजावर पाय टाकताच अँशी वर्षांच्या म्हाताऱ्यासारखी प्रेतकळा आलेली दिसू लागत. मनुष्य एकदा तिरडीवर बांधला गेला म्हणजे जसे त्याचे आप्तेष्ट तो ह्या जगातून कायमचा जात आहे म्हणून समजतात आणि त्या भावनेने दुःखित, विस्मित वा स्तिमित होऊन त्याच्या त्या प्रेतयात्रेकडे पाहतात, त्याचप्रमाणे काळेपाण्यास जाणाऱ्या त्या बोटीवरील जन्मठेपी चढू लागले म्हणजे लोक ते स्वदेशास मेले असे समजून त्यांच्याकडे शून्यपणे पाहत उभे राहत, तसेच माझ्याकडेही ते पाहत होते. मी या जगतास मेलो अशी भावना त्यांच्या मुद्रेवर स्पष्ट उमटलेली होती आणि ती खरी होती. मी खरोखरीच तिरडीवर चढविला जात होतो. फरक इतकाच की, प्रेताला तिरडीवर चढविताना ज्या भावना प्रेक्षकांच्या मनास स्तंभित करून वा कासावीस करून प्रेतयात्रेच्या वाटेवर खिळून धरतात त्या भावना यात्रा करणाऱ्या प्रेतास कळत नसतात. पण मी तिरडीवर बांधला जात आहे आणि माझी प्रेतयात्रा निघत आहे हे मला कळत होते. हेही कळत होते की, जे शेकडो लोक मजकडे पाहत आहेत यांत बहुतेक निर्ममत्व व उदासीनपणेच पाहणारे आहेत. जसे मार्गावरून चालता चालता आकस्मिक कोणाचे तरी प्रेत जाताना आपण क्षणभर ‘मेला वाटते कोणीतरी’ असे म्हणत पाहत पाहत उभे राहून पुढे चालते होतो! आणि त्या वेळेस मी प्रेत होत आहे या कळण्यापेक्षा हजारो देशबांधव ‘आ’ करून मजकडे नुसते पाहत उभे आहेत या कळण्याचेच मला अधिक दुःख वाटले. त्यांतील एक जरी मनुष्य मला असे सांगता, “जा बंधो, जा! तुझ्या मागे मी आणि आम्ही तुझ्या व्रताचे पारणे फेडून ह्या आपल्या हिंदुस्थानास...” तर माझ्या तिरडीची तेथल्या तेथेच फुलांची सेज झाली असती!

# काळ्यापाण्याचा समुद्र

त्या बोटीवरच्या शिडीवरून चढवून मला जे नेले ते तिच्या तळमजल्यावर. तेथे लोखंडी गज मारलेला एक मोठा गाळा केलेला होता; या बोटीवर तो पिंजरा लांब पण निरुंद सरासरी वीस-तीस माणसे सारखी ठेवता येतील असा, पण ज्यात पन्नास-पन्नास जन्मठेपीचे काळ्यापाण्यावरील बंदीवान पशूसारखे कोंबले जात असा हेतुपूर्वक केलेला होता. त्यात ते ठाण्याहून आलेले बंदी एकास एक दाटून खेचाखेचीने उभे केलेले मला दिसले. मनात येतच होते, काय मला ह्या कोंदट बोटीवरच्या अत्यंत कोंदट तळमजल्यावरील अंधारी पिंजऱ्यात ह्या बंदीवानांसह कोंबतील की काय - तोच त्या पिंजऱ्याचे दार उघडले गेले आणि मला त्यातच कोंबण्यात आले. मला इंग्लंडमध्ये 'ब्रॉंकायटिस' नावाचा रोग झाल्यापासून थोड्याशा कोंदट जागी जाताच श्वासोच्छ्वास जड होऊन, छाती दुखू लागून गुदमरल्यासारखे होत असे; म्हणून मी माझेबरोबरचे गोरे अधिकाऱ्यास सांगितले की, अशा कोंदट जागी मला ठेवणे धोक्याचे होईल. त्याने ते बोटीवरच्या डॉक्टरास कळविले. त्याने सध्या येथे राहा, बिघडले तर पाहू म्हणून सांगितले आणि विशेष सवलत म्हणून त्या पिंजऱ्यातच मध्ये न ठेवता माझे अंथरूण एका कोपऱ्यास एक बारीक बोटीचे भोक होते, त्याच्यासमोर गजापाशी घालावे म्हणून सांगितले. या विशेष सवलतीचा मला काय विशेष उपयोग झाला तो पुढे लवकरच कळेल.

तेवढ्यात आणखी कोणी गृहस्थ आले; त्यांनी मार्सेलिसची गोष्ट काढली. मीही मोकळ्या मनाने थोडी चर्चा केली. नंतर "आपणास भेटण्यासाठी आम्ही हेतुपूर्वक आलो होतो. ईश्वर तुम्हास परत स्वदेशास आणो अशी आमची मनःपूर्वक इच्छा आहे." असे म्हणून ते गोरे गृहस्थ आणि ते सर्व अधिकारी टोप्या काढून रामराम करून निघून गेले. एक गोरा गृहस्थ मात्र ते त्यांचे वर्तन न आवडल्यासारखा आणि या बंदीवान पाप्यास तो काय मान द्यावयाचा असे म्हणणारी तुच्छ चिडलेली दृष्टी त्यांजवर आणि मजवर फेकीत रामराम न करताच निघून गेला.

## बोट सुटली

बोटीच्या शिटीनंतर बंब भों भों वाजला; धक्का बसला. बोट चालू झाली. त्या पिंजऱ्यास उंच दोन-तीन लहान भोके होती ती काचेने बंद होती. त्यांस लोंबकळून त्या दुर्दैवी बंदीवानांपैकी काहीजण तटाकडे पाहू लागले. तट दिसेनासा झाला. "घर छूट गया, भाई घर छूट गया," असे म्हणून त्यांतला एकजण खाली मटकन बसला. ते ऐकताच "आता आमचा देश आम्हांस पुनः कसचा दिसणार!" असे विवळत साताऱ्याच्या बाजूचे दोन शेतकरी धाय धाय रडू लागले. "अभी काळापाणी लग गया! भय्या रो मत! काळापाणीमें रोनेसे कुछ नहीं होता." असे ह्या बंदीवानांत काळ्यापाण्यावर जाऊन आलेले आणि पुनः चाललेले, अट्टल अपराधी तत्वज्ञाप्रमाणे मध्ये उभे राहून सर्वांचे सांत्वन करीत होते. मध्येच एकाने मजकडे बोट दाखवून म्हटले, "देखो भय्या, तुम्हारी हमारी छोडो! वह देखो बालिस्टरसाहब! इंग्रज अधिकारी देखील टोपी काढून रामराम करतात त्यांना. त्यांचे दुःखापुढे आपले काय!" असे म्हणताच ते हळूहळू माझे भवती गोळा झाले. माझी शिक्षा पन्नास वर्षे आहे हे त्यांतील बहुतेकांस माहीत

असूनही जो तो शिक्षा किती म्हणून विचारी. मी माझ्या क्रमाकांचा गळ्यातील पत्राच त्यांच्या हाती दिला. वारंवार पन्नास पन्नास सांगताना कंटाळून गेलो होतो! मला खरोखरच पन्नास वर्षे आहेत हे ऐकून त्यांसच नव्हे तर पुढे अंदमानासही १५ वर्षे शिक्षेने घाबरलेल्या हजारो बंद्यांस किती तरी धीर येत असे! त्या सर्व बंद्यांचे दुःख मला पाहून हलके होई.

## बोटीतील गलिच्छपणा

थोड्या वेळाने संध्याकाळ झाली. उकडे फार. दाटी कोण! त्यातही ते गलिच्छ आयुष्यास निर्ढावलेले, कोणी हिंदू, कोणी मुसलमान, चोर, दरोडेखोर इत्यादी गदळ, पापी, दुष्ट, कोणास इंद्रियाचे भयंकर रोग झालेले, कोणाचे तोंडास वर्षानुवर्षे दात घासणे माहीत नाही अशा त्या चाळीस- पन्नास माणसांच्या अंथरुणावर अंथरुणे चढवून पडलेल्या दाटीत मीही अंथरुण पसरून पडलो. माझ्या पायाशी कोणाची डोकी भिडली होती. माझ्या डोक्याशीच नव्हे तर तोंडाशी इकडे कोणाचे पाय आलेले तर तिकडे वळताच तोंडाशी तोंड भिडलेले. क्षणभर उताणा पडलो. समोरच एक मोठे पीप अर्धे कापून ठेवलेले दिसले! तेथे थोडी मोकळी जागा पडलेली असे. त्या पिंजऱ्यात इतरत्र झालेल्या दाटीपेक्षा माझ्या कोपऱ्यात कमी दाटी होती आणि म्हणूनच मला या कोपऱ्यात अंथरूण घालण्याची सवलत देण्यात आली होती. पण इतक्यात भयंकर घाण सुटली, नाक दाबून धरले. ते पाहून शेजाऱ्याचा एका बंद्याने खुणावले की, ते अंधुक उजेडात असलेले पीप पहा. पाहतो तो ते पीप ह्या सर्व प्राण्यांस रात्रभर शौचकूपाचे स्थली उपयोगास पडणारे आहे हे कळले. मी तिकडे पाहताच संकोच होऊन त्या पिपावर बसलेला बंदीवान बिचारा उठू लागला; पण मी लगेच त्यास हाताने बैस म्हणून खुणवून म्हटले, “अरे हा देहधर्म आहे. यात लाज कसली? थोड्या वेळाने मलाही तेथेच बसावे लागेल. कोणीही काहीएक संकोच करू नका. मला नाक आहे आणि तुम्हाला नाही असे नाही मग तुमच्यापेक्षा मला घाणीचा अधिक त्रास का व्हावा?” त्या बंद्यांतील एक जुना अट्टल अपराधी जवळ आला आणि म्हणाला, “दादा, आम्हांला ही सवय झाली आहे. मी काळ्यापाण्यावरून आलेलो आहे. आपण त्या कोपऱ्यात चला, तिकडे दाटी आहे पण घाण नाही. मी इकडे येतो!” हे त्याचे औदार्य पाहून मला कौतुक वाटले! मी म्हटले, देवा! पतितांच्या अंतःकरणाच्या अंगणातही तुळसीवृंदावन असतेच तर!

मी त्या अट्टल दरोडेखोराचे आभार मानले आणि म्हणालो, “वारा जरा मोकळा यावा यासाठी डॉक्टराने मला ही विशेष सवलत दिली की गजांशी निजावे. त्यांचे ध्यानात ही पिपाची गोष्ट आली नाही. पण मी तीही एक विशेष सवलतच समजतो. तुम्ही चिंता करू नका. तुम्हास या घाणीत टाकून मी तिकडे का जावे? मलाही आता असल्या आयुष्याची सवय झाली पाहिजे.” रात्री एकामागून एक बंदीवान त्या पिपावर जाऊ येऊ लागले. घाणीची आणि किळसवाण्या देखाव्याची पराकाष्ठा झाली. बंदीवानांस संकोच होईल म्हणून मी डोळे मिटून झोपी गेल्यासारखा पडलो. मन म्हणाले, हाय! हाय! हा अक्षरशः जिवंतपणी तुला नरकवास भोगावा लागत आहे.! विवेक म्हणाला, वेड्या, ते खरे, पण तेही मानण्यावर आहे. ही तुला विशेष सवलत म्हणून मिळाली आहेना! मग तिचा विशेष उपयोग का करून घेत नाहीस? जातगोत, वर्ग यांचाच नव्हे तर शील आणि शुद्धता यांचाही अहंकार धुळीत मिळवून विश्वाशी समरस होण्यासाठी मोठे मोठे तपस्वी आणि योगीही जे साधन करण्यास कचरतात ते तुझ्याकडून करवून

तुझाही अहंकार चक्काचूर करण्यासाठीच ही संधी देवाने दिली नसेल कशावरून? ह्या विशेष सवलतीचा विशेष उपयोग कर. त्रैलिंगस्वामींवर कोर्टामध्ये असभ्य वर्तनाविषयी खटला चालला असता त्याच्या साधुत्वाची टर उडविण्याकरिता मॅजिस्ट्रेट म्हणाला, "पण हे अद्वैतवादी खाताना अन्नच कसे खातात? शेण का खात नाहीत?" तेव्हा त्रैलिंगस्वामी हसले आणि तेथेच शौच करून ती विष्ठा हा-हा म्हणता लोक निवारण्यास येतात तो त्यांनी खाऊन टाकली!

## रामकृष्ण परमहंस

रामकृष्ण परमहंसांचीही अशीच आख्यायिका आहे. त्यांची अद्वैतानुभूतीची सर्व साधने संपल्यावर शेवटचे एक कठीण साधन म्हणून ते कलकत्त्याचा मैला टाकतात तेथे गेले आणि हातांनी तेथील विष्ठा उलटीपालटी करीच पाच काड्या भरून तोंडात घातल्या! तू हे बंदीवान विष्ठा करीत असता त्या घाणीने गुदमरून त्या घाणीच्या पिपापासून पळू पाहतोस; पण लोकांच्या विष्ठेच्या पिपापासून तू कितीही दूर पळालास तरी तुझ्या विष्ठेचे पीप तुझ्या पाठीवरच वाहून न्यावे लागत आहे त्याचे काय? तू ते वस्त्राखाली झाकलेस म्हणून काय 'झांकिलें तरी पडेचि उघडें! सोडी दुर्गंधी चहूंकडे'. रामदासांनी स्पष्टच सांगितले आहे की, "घेतांची होये सुग्रास अन्न। अर्धी विष्ठा अर्धे वमन। पीता भागीरथीचं जीवन। मूत्र होय तात्काल।" मग जर "होवो राव अथवा रंक। पोटीं विष्ठा चुकेना" हे खरे तर स्वतःच्या मलमूत्रांचा उपसर्ग जसा अनिवार्य म्हणून राहून तू स्वस्थ पडतोस तसाच त्यांच्याही उपसर्गास का सहन करीत नाहीस? भोजना- इतकेच जगामध्ये देहधारणास रेचनही अत्यंत उपकारक आहे. असे जग आणि असा देह रचून पुनः काही इंद्रियांस जे प्रिय ते इतर इंद्रियांस असह्य का केले? एका देहाच्या इंद्रियांतही हा विषम परस्परद्वेष का उत्पन्न केला, ते प्रकृतीचे प्रकृतीला ठाऊक! किंवा तिचा निरुपाय असेल! किंवा त्यांच्या या परस्पर कलहाची तिला मौज वाटत असेल!

आणि अशा विवेकाच्या सेना बंड करून उठलेल्या इंद्रियांवर सोडीत आणि त्यांच्या त्या परस्पर संग्रामाची झटापट पाहत मलाही मौज वाटू लागली. अन्नाची विष्ठा, विष्ठेचे खत होऊन पुनः अन्न! गम्मत वाटू लागली. घाणीचा उपद्रव त्या गमतीत बाधेनासा झाला. रात्री एकाच्या सुमारास स्वस्थ झोप लागली. जहाजावर असेतो त्या कोपऱ्यात हे माझे अविचल राहणे पाहून बंदीवानांस मोठे आश्चर्य वाटे. एकदोघांस तर मी अगदी गदळ जातीतला कोणी तरी घामट मनुष्य असावा असाही संशय आल्याचे ते मागे बोलले.

## युरोपियनांची वर्तणूक

मला काही तरी साह्य देऊन मजविषयी आपली आदरबुद्धी व्यक्त करावी अशी त्या बोटीतील प्रवाशांची आणि काही हिंदी अधिका-यांची मनापासून इच्छा असे. येता-जाता शक्य तेव्हा ते भेटून जात. युरोपियनांपैकी काही सोल्जरही फार आदराने वागले. काही इंग्रजी पत्रेही मिळाली, मासिकेही मिळाली. बोटीवर खाण्यास केवळ चणे आणि फुटाणे तेवढे मिळत. परंतु मी काही खावयास घ्यावेच असा आग्रह काही अधिका-यांनी धरला. मला काय मागावे हेच समजेना आणि मला एकट्याला काही देणेही कठीण. शेवटी उदार व्यापा-यांनी सर्व बंदीवानांना भात, मासे आणि लोणची इत्यादी पदार्थांचे भोजन कप्तानाची आज्ञा घेऊन करविले. माझ्यानिमित्त कधी न मिळणारे

जेवण दोन दिवसांच्या उपवासानंतर मिळाल्याने सर्व बंदीवानांना मोठा आनंद झाला. माझ्यासह त्यांस तास अर्धा तास त्या कोंदट तळावरील पिंजऱ्यातून वारा खाण्यास वरच्या मजल्यावर जेव्हा नेण्यात येई तेव्हा नेहमीपेक्षा जास्त व्यवस्थेने आणि सोयीने वागविण्यात येई. यायोगे जेव्हा ते बंदीवान सहज मला म्हणत, "बाबूजी, हमारे साथ आप आये यह हमारा भाग्य है! क्या अच्छा हुवा!" तेव्हा मी हसून म्हणे, "तर मग मला शिक्षा झाली हे चांगले झाले नाही का?"

तेथे रात्रंदिवस त्या बंद्यांत माझी चर्चा चाले; आणि माझी चर्चा निघाली की हिंदुस्थान हा आपला स्वदेश आहे. त्यास...इत्यादी मी ज्या कार्यांत अजून पडलो होतो त्या कार्याविषयीही यथेच्छ चर्चा चाले. कोणी कळकळून मला म्हटले की, "काय सांगावे? आपणास पाहून फार दुःख होते." म्हणजे मी हसावे की आताच तुम्ही असे झाले पाहिजे आणि हिंदुस्थानास...इत्यादी चर्चा करीत होताना! मग मी एकटाच काय, अशी जहाजेच्या जहाजे माझ्यासारख्या बंदीवानांनी भरभरून काळ्यापाण्यास जातील हे तुमच्या ध्यानात नाही का आले? जो करील तो भरील. जो भरील तो करील!... बोटीवरच्या अधिका-यांपासून शिपाई सोजिरापर्यंत आणि त्या बंदीवानांपासून तो खलाशांपर्यंत माझ्या निमित्ताने राजकारणाची एकसारखी चर्चा सुरू होती. ज्यांनी कधी ऐकले नाही ते त्यांनी ऐकले. ज्यांना कधी सुचले नाही ते त्यांना सुचले. ज्यांना कधी पटले नाही ते त्यांना पटू लागले.

## बारीबाबाची गोष्ट

दुसरी महत्वाची गोष्ट, जी तेथील परिस्थितीत मनास खेचून आपल्याकडे नेई ती म्हणजे काळापाणी कसे आहे ही बातमी काढणे ही होय. जो येई त्याला ती विचाराविशी वाटे. जो तो विचारी तेच तेच. पण आपणासही विचारावेसे वाटे. त्या बंदीवानांस न्यावयास आलेली अंदमानची शिपायांची टोळी ती या विषयावरचा मुख्य अधिकारी पुराणिक! काळ्यापाण्याचे नाव काढले की, त्यांनी प्रथम जी गोष्ट सांगावी ती 'बारीबाबा' ची होय. हा "बारीबाबा म्हणजेच काळापाणी" अशी त्यांची समजूत झालेली होती. त्या बंदीवानांतील अस्सल निगरगट्ट बंदी जेव्हा विनाकारण ओरड करीत, आपसांत शिव्यागाळी करीत, तेव्हा शिपाई रागावून म्हणत, "अरे थांब तू, तुला मोठी ऐट आली आहे की तूच काय तो बदमाष! पण एकदा 'बारीबाबा'ला पाहिले की धोतरात...होईल धोतरात!" ह्या बारीबाबाची व आपली जिवश्चकंठश्च मैत्री लवकरच व्हावयाची आहे, म्हणून ह्या शिपायांस त्याविषयी जास्त विचारीत बसण्यात काही अर्थ नाही.

अंदमानाची त्यांनी बातमी सांगावी की, "सहा महिन्यांत तुरुंगामधून सुटका. बाबू, तुमच्यासारख्या शिकलेल्या मनुष्यास तर ऑफिसात काम मिळेल. इतकेच नव्हे, तर जिल्ह्याचा जिल्हा तुमच्या हुकुमात राहू लागेल. दहा वर्षांपर्यंत हजारो रुपये जमवू शकाल आणि दहा वर्षांनंतर घरदार करून राहाल!" मनात वाटे, हे काय मला क्रांतिकारक चळवळीत पडल्याविषयी पारितोषिक देण्यासाठी अंदमानास चालविले आहे काय! मग बरे झाले, मार्सेलिसला पकडला गेलो! युरोपमध्ये विवसाचे देशापरीचे विदेशांत दारोदार भटकण्याचे ते दुःखद आयुष्य मी अनुभविले होते. हे सांगतात ते अंदमानामधील आयुष्य काही त्याच्याहून फारसे असह्य नाही!! अर्थात हे सांगतात

तसे असेल तर! असेल तसेही! पण माझ्या तसे ते वाट्यास येईल का? अशक्य! सर्वथा अशक्य! अंदमानास जे राजकीय बंदी प्रथमच गेले होते त्यांची स्थिती काय आहे ? माझी भेट होईल का? आणि माझे ज्येष्ठ बंधू?

कोणास काही नक्की माहिती सांगता येईना. इतके कळले की, मंडळी आहेत! तुरुंगात आहेत. आपणही तेथेच बहुधा जाणार.

आज सगळे म्हणतात, अंदमान लागणार सकाळी सहा वाजून गेले, सर्व बंदीवानांस ओळीने वर नेण्यात आले. वरच्या मजल्यावर लास्कार इत्यादी नोकर बोट धूत आहेत. वाढता वाढता सूर्याचे ऊन प्रखर झाले. आता अंदमान येणार, काळेपाणी येणार, म्हणून बंदीवानांत विषण्णता पसरली आहे. प्रवासाच्या धांदलीत दबून गेलेले असहायतेचे, विरहाचे, शोकाचे, विचार माझ्या चित्तावर, समुद्रातून उसळून जसे तळाचे मासे वर घुसतात तसे घुसून हृदयास विचलित करीत आहेत. मजवरही काळ्यापाण्याची छाया पडली आहे!

समुद्र शांत आहे, एखाद्या सरोवरासारखा शंत आहे आणि त्यावर, हिमावर मुले आनंदाने थंड प्रदेशांत निसरत- घसरत जातात तशी ही आगबोट सलील विहरत चालली आहे. सूर्य पृथ्वीकडे टक लावून निरीक्षण करीत आहे. जणू काय मनुष्यजातीने जडावर मिळविलेला हा अपूर्व विजय पाहून तो थक्क झाला आहे! केवढा समुद्र केवढी ही चिमुकली नाव! पण त्या नावेतल्या एका इवल्याशा खोलीत बसलेला एक मनुष्य त्या समुद्रास माणसाळलेल्या एखाद्या हत्तीप्रमाणे सुकाणूच्या अकुंशाने वाटेल तसा वळवीत कसा अर्ध्या वचनात ठेवीत आहे! मनुष्याचा जडावर हा केवढा विजय! एक दिवस कोणी सांगावे, हा सूर्य मनुष्याने मनावर मिळविलेल्या नव्या विजयाने असाच थक्क होऊन पृथ्वीकडे पाहत राहील! मनुष्याने मनातील राक्षसास जिंकून पीडक आणि पीडित यांचा एकमेकांस छेद देऊन, आणि आपल्या पायांतील दास्यत्वाच्या बेड्या तोडून तो मुक्त झालेला आहे आणि तत्रापिही प्रेमपाशाने परस्परबद्ध झालेला आहे असा धन्य दिवसही, न जाणो एका काली उगवेल आणि हा सूर्य पृथ्वीकडे त्या नूतन विजयाने आनंदीत होऊन पुनः असाच पाहील! मनुष्यजातीचे स्वातंत्र्य हे केवळ मनुष्यमात्राच्या प्रेमाचेच काय ते दास राहील. त्या ह्या धन्य दिवशी तो दिवस आणण्यासाठी आत्मबलिदान करणाऱ्या सर्व भुक्तकष्टांचे आणि हुतात्म्यांचे कष्टभोग आणि हौतात्म्य सफल होईल. मनुष्यजाती त्यास धन्यवाद देईल. त्या विजयाचे ते महान श्रेय ज्यास ज्यास मिळणार त्यांत मीही एक विभागी असेन. केवढा मोठा उज्ज्वल हा भविष्यकाळ!

## प्रस्तुतची स्थिती

पण वर्तमानकाळ? तुझी प्रस्तुतची स्थिती? स्वप्न स्वप्न! मूर्खा भविष्यकाळाचे तुला ते पडत असलेले केवळ स्वप्न होय. अशी स्वप्ने पाहत पाहत आज वेदकाळापासून मनुष्याची युगेच्या युगे गेली. केवळ त्या भविष्याच्या स्वप्नाचा उपयोग वर्तमानाच्या रात्रीच्या घोर मोहांधकरात क्षणभर प्रकाश देणे इतकाच होय. हाच समुद्र पाहा केवढी ही अतर्क्य, अदम्य, राक्षसी शक्ती! त्याच्या अंगावर ही नाव निसरत गम्मत करीत चालली आहे, तो चालू देतो म्हणून. जसा तो एखादा प्रचंड राक्षस एखाद्या घुंगरूटास आपल्या अंगावर चालू देतो, पाहतो ती गम्मत आणि ते त्या घुंगरुटाचे धार्ष्ट्य क्षणभर, आणि पटकन चापटी मारून, करून टाकतो त्यास होते की नव्हतेसे? तसे हे

तुम्हा घुंगरूट मनुष्यांचे धार्ष्ट्य. ही प्रचंड सामुद्रिक शक्ती खवळेल तर एका लाटेच्या एका बिंदूच्या एका तुषारावर ही तुझी नावच नव्हे तर हे खंड उचलून चुरून सुपारीसारखे झटकन गिळून टाकील! तर पत्ता लागू देणार नाही की, इकडे कोणी आशिया खंड होते की नव्हते! किती यःकश्चित हा मनुष्य! आणि त्या यःकश्चित मनुष्यातील मी आज किती यत्किंचित्कर व्यक्ती झालेलो आहे!! आज ह्या जगातील टाकाऊ ठरलेल्या अधमांत आणि दुष्टांत अंग चोरून उघडे बसलेल्या ह्या बंदीवानांच्या ओळीत एका दुर्लक्षित कोपऱ्यात मीही अंग चोरून उकिडवा बसलेलो आहे. हातात हातकडी, पायात बेडी, इतका यःकश्चित, की त्या बोटीच्या झाडूवाल्यांनीही मजकडे सहानुभूतिपूर्वक बोट दाखवून 'बालिस्टरबाबू' म्हणून दया करावी. त्या पाणी ओतून लाकडे धुणाऱ्या नोकरानेही म्हणावे "ए कैदी, उठो इधरसे! बैठ उधर!" आणि मला तसे वागणे भाग पडावे!

समुद्र शांत होता, एखाद्या सामुद्रिक राक्षसाप्रमाणे घोरत पडला होता. आगबोट निसरत निसरत एखाद्या आसन्नमरण नाडीसारखी मंद मंद चालली होती. वरून सूर्य क्रूरपणाने सगळ्यांस ताप देत होता. उकाडा भयंकर झाला. अंदमान अगदी जवळ आले. अधिकारी आणि प्रवासी आता माझ्याशी बोलेनासे झाले. ओळख नाहीतसे दुरून चालले. काळ्यापाण्याची छाया माझ्या तोंडावर स्पष्ट पडू लागली.

प्रकरण सहावे

# अंदमानचे वर्णन

अंदमान, निकोबार आणि त्याच्या लगतचा द्वीपपुंज यांचा हिंदुस्थानच्या इतिहासाशीच नव्हे तर भविष्याशीही निकट संबंध असल्याकारणाने त्यांची थोडीशी माहिती प्रत्येक हिंदवासीयास असणे अवश्य आहे. हिंदुस्थानाबाहेर अर्वाचीन काली हिंदुसंस्कृती ज्या ज्या नवीन भूविभागांवर आपले आधिपत्य पसरीत चाललेली आहे त्यांत अंदमान द्वीपपुंजाची गणना केली पाहिजे.

हे द्वीप कलकत्त्यापासून सुमारे ६०० मैलांवर आहे. मध्ये लहान लहान बेटे, थोडा समुद्र, पुनः बेटे अशी ओळीने पसरलेली ही एक द्वीपमालाच बंगाल समुद्रात विखुरलेली आहे. तिच्यातील अंदमान हे सर्वांत मोठे द्वीप आहे. त्याचे तीन विभाग करण्यात आलेले असून त्यांस उत्तर-अंदमान, मध्य-अंदमान आणि दक्षिण-अंदमान अशी संज्ञा देतात. त्या द्वीपाची मानचित्रात दिलेली आकृती पाहिली असता, त्याचे अंदमान हे नाव का पडले असावे हे स्पष्ट होते. या नावाची हनुमान शब्दापासून व्युत्पत्ती लावली जाताना आम्ही ऐकलेली आहे. परंतु ते अंडाकृती असल्यानेच अंदमान असे नाव पडले असावे हे आम्हांस संभवनीय दिसते. उत्तर-अंदमान ५१ मैल लांब, मध्य-अंदमान ५९ मैल लांब, दक्षिण-अंदमान ४९ मैल आणि रटलंडद्वीप ११ मैल लांब आहे. ह्या पुंजास मोठे अंदमान म्हणतात. त्याविरहित त्याच्या २९ मैल दक्षिणेस लहान अंदमान बेट असून त्याची लांबी ३० मैल व रुंदी १७ मैल आहे. ह्या बेटाची अजूनपर्यंत म्हणण्यासारखी वसाहत झालेली नसल्याने निबिड आणि ज्यातील भूमीस खरोखरच सूर्यकिरणांचा स्पर्श सहसा होत नाही, अशी दाट अरण्ये जिकडेतिकडे लागून गेलेली आहेत. समुद्राच्या तटापासून वर चढत गेलेले पहाड आणि दाट जंगले यांच्याव्यतिरिक्त या प्रदेशात काय आहे याची अजून स्पष्ट कल्पनाही करता आलेली नव्हती. तथापि वनविभागाच्या अधिका-यांनी एकसारखे कष्ट करून जंगलातील स्थळांची, वृक्षांची आणि वस्तुस्थितीची शक्य- तितकी छाननी करून आता त्याचे मानचित्रही (नकाशाही) आखलेले आहे. ह्या बेटातील पहाडांत सर्वांपेक्षा उंच पहाड ‘सॅडलमाउंट’ नावाचे शिखर असून त्याची उंची तीन हजार फूट आहे. मोठ्या नद्या मुळीच नसून ठिकठिकाणी पहाडांवरून वाहणारे लहान ओढे मात्र बरेच आहेत.

## मलेरियाचा प्रादुर्भाव

ह्या प्रदेशात जंगल अतिशय असल्याने पूर्वी एकसारखा पाऊस लागलेलाच असे. ग्रीष्म ऋतूतही पाऊस झिमझिम पडेच. तथापि मधून मधून एकदम कडक उन्हाचा तापही होत असे. परंतु ज्या ज्या भागात जंगल कापण्यात येऊन वसती होत चाललेली आहे आणि भूमी थोडीबहुत नांगरून, कमावली जाऊन शेती आणि नारळादी झाडांची बागाईत केली गेली आहे, त्या त्या बाजूस ऋतुमान जवळजवळ हिंदुस्थानातील उष्ण भागासारखे होत चालले आहे. पावसाळा, उन्हाळा हे दोन ऋतू स्पष्टच भासत असून हिवाळा मात्र उगीच मध्ये डोकावल्यासारखे करून नाहीसा होतो. ह्या बेटाच्या चारही बाजूंसच नव्हे तर प्रत्येक दोन तुकड्यांच्या मधूनही समुद्र घुसलेला असल्याने आणि ही बेटे लांबीरुंदीने लहानच असल्याने जिकडेतिकडे खाड्या आणि दलदल पसरलेली दिसते. त्या

खाड्यांतील पाण्यात जंगलातील पाचोळा थरावर थर पडून सडत राहिलेला असतो; त्यामुळेच मलेरियाचा प्रादुर्भाव आणि प्रभाव इतका त्रासदायक होतो. ह्या मलेरियाचा प्रसार करणाऱ्या माश्याही इकडे इतक्या विपुल आणि विविध प्रकारच्या आहेत की सांगता पुरवत नाही. काही आत सूक्ष्म घुंगरुटासारख्या माश्यांचे थवेच्या थवे तारेने ओवून टाकलेल्या जाळ्याप्रमाणे अतस्तसः एकत्र गुणगुणत उडत असतात. काही मोठमोठ्या माश्या आपल्या लांब लांब पायांवर उभे राहून इतक्या त्वरेने झुलतात की त्या दोलायमान स्थितीत ती एक काळी रेघ आहे की एक माशी आहे हे सांगणे कठीण होते.

## जळवा व सापसुरळ्या

जंगलामध्ये मलेरियाचा प्रसार करणाऱ्या या माशांविरहित जळवाही अतोनात पसरलेल्या असतात. चिखलात, पानांच्या आणि पाचोळ्याच्या खाली पडलेल्या ढिगांतच नव्हे तर वर झाडांवर, फांद्यांवर, पानांवर जळवा चिकटलेल्या असावयाच्या. उन्हात लपून-दडून बसून पावसाची झिमझिम येताच त्या बाहेर पडतात. मनुष्याचा गंध येताच त्यांच्या आनंदास पारावारच नाहीसा होतो. वरतून, झाडांवरून, पानांवरून त्या टपटप उड्या घेतात; खालून पाय पडताच तळव्यास बिलगतात आणि मानवी शरीराचा पोटऱ्या-मांड्या जो भाग सापडेल त्यास चिकटून त्या रक्त सुपसुपकरून पिऊ लागतात. मोठे मोठे बदमाष, पाजी कंटक लोक, कारागृहांतील कठोरातील कठोर शिक्षेस भीक न घालणारे पण जंगल काटण्यास जेव्हा ते जात तेव्हा ह्या जळवांच्या भयाने ते देखील कापू लागत. जंगलातून काम करून संध्याकाळी बंदी लोक परत येताना रक्तात न्हाल्यासारखे दिसत. कारण जेथे तेथे जळवांनी डसून डसून त्यांचे अंगास छिद्रे पडलेली आणि त्यातून रक्ताच्या बारीक धारा सारख्या सुरू असलेल्या असत. बरे त्या जळवा तरी एक का दोन, हातांनी मनुष्य मुठी-मुठी भरून अंगावरून उपटून टाकतोच आहे आणि लहानमोठ्या जळवांच्या झुंडी वरून उड्या घेत वा खालून चढत वा बाजूंनी बिलगतच आहेत.

ह्या जळवांप्रमाणे त्रासदायक नसल्या तरी त्याहून घातक अशा प्रकारच्या सापसुरळ्याही ह्या जंगलातून वसत असतात. एका हाताएवढाल्या लांब आणि इंचाहून जाड्या अशा ह्या सापसुरळ्या ज्यांना तिकडे 'कानखजूरे' म्हणतात त्या इतक्या विषारी असतात की, चावताच मनुष्याला केव्हा केव्हा पक्षघात देखील होतो आणि भयंकर वेदना तर झाल्याविना कधीही राहत नाहीत. सर्प मात्र बहुशः आढळत नाहीत. तथापि 'व्हायपर' नावाचा एक लहान सर्प अत्यंत विषारी असून अजगरही केव्हा केव्हा आढळण्यात येतात. जंगलांत अनेक शतके कोणाही मनुष्याचा रिघाव फारसा झालेला नसल्याने ह्या सर्व प्राण्यांची वाढ भयंकर प्रमाणावर होत असून परस्पर भक्षणाच्या मर्यादेनेच ती काय जी कुंठित होत असेल तेवढी होते. अशा या जंगलात वाघ, सिंह, अस्वले इत्यादी हिंस्त्र श्वापदे मात्र आढळत नाहीत. रानडुकरे आढळतात. पक्ष्यांपैकी भारतीय पक्षी इकडे फारसे नव्हते. इंग्रज सरकारने साळुंक्या, मैना, पोपट, बाज, घार, मोर इत्यादी पक्षी इकडे आणून सोडले इतकेच नव्हे तर कावळ्यासही आणून त्यांची वसाहत करविण्यास कमी केले नाही. पक्ष्यांप्रमाणेच हरीण, कुत्री, कोल्ही इत्यादी पशू आणि बरेच गृहपालित प्राणीही इकडे आणून सोडले गेले. त्यायोगे आता अंदमानमध्ये भारतीय असे बहुतेक उपयुक्त प्राणी आढळण्यात येतात.

समुद्रातील आश्चर्याची तर अवधीच नाही. शंखशिंपा, गारा, किती रंगसुंदर आकृती, किती तरी प्रकार, ते विश्वकर्म्याचेच वैचित्र्य! त्याची काय शोभा वर्णन करावी? अशा रंगांच्या शिंपा आणि शिंपले की त्यांच्यापुढे अंद्रधनुष्याने मान खाली घालावी. त्यांतील एकाचे जरी सौंदर्य एखादा चित्रकार एखाद्या चित्रात ओतू शकला तरी ती कृती मनुष्य प्रदर्शनातून शतकानुशतके मांडून ठेवील. अशा सुंदर वस्तूच नव्हे तर प्राणी निर्माण करून त्यांची रेलचेल उधळपट्टी समुद्रतीरावर चाललेली असते. एखादा हर्षसम्राट मार्गाने गेला म्हणजे सोन्यामोत्यांची फुले त्याच्यावरून उधळून टाकलेली जशी त्या मार्गावर विस्कळलेली पडतात त्याप्रमाणे त्या शंख,शिंपा, गारा सौंदर्याच्या कुंचलीचा एकेक अव्यवस्थित कौशल्याचा फटकारा मारून कोणी तरी उधळ्या चित्रकार त्या समुद्राच्या तटावर प्रत्यही उधळून टाकीत जातो. माशांचे प्रकार, सुसरीचे प्रकार, समुद्रातील कोणा मत्स्याच्या शेपटीला एक तीक्ष्ण टोकाचा चाबूक लावलेला की, ज्याच्या एका फटकाऱ्यासह पायाच्या मांसाच्या चिंधड्या उडून जाव्या; कोणाचे तोंड अगदी घोड्यासारखे, कोणाच्या शेपटात विद्युत, रागावला की, विजेचे धक्के आजूबाजूस बसू लागावेत, कोणी तर अगदी मनुष्यासारख्या तोंडाचे, फार क्वचित पण विश्वसनीय प्रवाशांनी पाहून वर्णन केलेले. असे अनेकविध सामुद्रिक प्राणी ह्या बेटाचे लगत्याने वाळवंटावर आणि लाटांवर विहरत असतात.

## अंदमान व हिंदुस्थान

या द्वीपमालेचा उल्लेख मार्कोपोलो आणि निकोलो इत्यादी युरोपियन आणि काही अरबी प्रवासी यांच्या जुन्या लेखांत आढळतो. परंतु हिंदुस्थानचा संबंध या बेटाशी फारच पूर्वापार असला पाहिजे. मगध देशातून लंकेकडे अनेक समयी जे समुद्रप्रवास झाल्याचे दाखले इतिहासात उपलब्ध आहेत आणि त्याचप्रमाणे आंध्र, तामील इत्यादी दाक्षिणात्य लोकांच्या राजकीय स्वाऱ्या ब्रम्हदेश, सयाम, पेगू, जावा इत्यादी प्रदेशांत झाल्याची जी वर्णने सापडतात, त्यांवरून ह्या बेटाचा भारतीय समुद्रप्रवाशांना चांगलाच परिचय झालेला असला पाहिजे असे उघड दिसते. या बेटाचा स्पष्ट नामनिर्देश अकराव्या शतकात पाण्ड्य राजांनी केलेल्या स्वारीच्या वर्णनात सापडतो. त्या समुद्रविजयी वीराने पेगूवर स्वारी करून ते जिंकले आणि आपले ते विजयी नौसैन्य परत आणताना अंदमान आणि निकोबार या दोन बेटांवर आपला अधिकार प्रस्थापित करून मग तो भारतभूमीस आपले यशस्वी नौसाधनासह - आरमारासह - परत आला अशी त्याची प्रशस्ती तत्कालीन लेखांतून केलेली आहे. या निरनिराळ्या वेळी गेलेल्या प्रवाशांच्या आणि विजेत्यांच्या पुरातन खाणाखुणा मात्र अजूनपर्यंत फारशा सापडल्या नाहीत. आम्ही बंदीवासात असताना एकदा एका अधिकाऱ्याने बातमी सांगितली होती की, काही खाणींची कामे चालली असता जुन्या राजवाड्यांचे काही अवशेष सापडले. परंतु ती बातमी कोठपर्यंत साधार होती आणि तीनंतर काय काय पूर्वावशेष सापडले याचा शोध करण्याचा ठीक योग अजूनपर्यंत आम्हांस लाभला नाही. भारतीयांची वस्ती व सत्ता या बेटांवर मधून मधून असे इतके मात्र सध्या सिद्ध झालेले आहे.

## अंदमानची स्थिती

तथापि या वसतीचा वा सत्तेचा परिणाम अंदमानाच्या मूळ रहिवाश्यांवर फारसा झालेला नसावा. ज्याप्रमाणे त्या वसाहतींनी केलेल्या लागवडीचा वा कृषिवास्तुकर्माचा परिणाम त्या द्वीपाच्या निसर्गनिर्मित स्वरूपावर फार

दिवस टिकू शकला नाही, त्याप्रमाणे त्या भारतीय उपनिवेशाच्या मानसिक वा बौद्धिक वा धार्मिक संस्कृतीचा परिणामही तत्रस्थ मूळ निवासी जनांवर काही टिकलेला दिसत नाही. समुद्राच्या वेढ्यात एक ते लहानसे बेट! त्याच्यावर एकसारखी वस्ती करून त्याचे नैसर्गिक वन्य स्वरूप पालटण्यास हिंदुस्थानचा अव्याहत संबंध राखला जाणे अत्यंत अवश्य होते. सुधारलेल्या जीवनाची सर्व उप्रकरणे हिंदुस्थानातून तिकडे नेली तरच सुधारलेला आयुष्यक्रम तिकडे कंठिता येणार. हिंदुस्थानाचा वा बाह्य संस्कृत जगाचा संबंध सुटताच नवीन गेलेल्या नागरिक मनुष्यासही तत्रस्थ वन्यांच्या स्थितीत जावे लागणारच. जर्मन महायुद्धाचे समयी केव्हा केव्हा चार महिने हिंदुस्थानातून बोटी अंदमानास सामानसुमान नेऊ शकल्या नाहीत तेव्हा त्या महिन्यांत आयुष्याच्या सुधारलेल्या आवश्यकतेस वा क्रमास इतका फाटा द्यावा लागला की, पन्नास वर्षांच्या आत तेथील सर्व वसाहतींस कपड्याविना उल्लिंग, शेतीविना शाकाहारी आणि अन्नाभावी मांसाहारीच बनावे लागले असते, अशा स्थितीत समुद्रगमन निषिद्ध मानू लागलेल्या हिंदुस्थानच्या इतिहासकालात अंदमानातील पूर्वीचे गेलेले भारतीय तत्रस्थ वन्य मूळ निवासीयांस सुधारण्याचे जागी स्वतःच रानटी बनले असावेत आणि पुढे नवीन रक्तसंबंध अशक्य झाल्याने त्या रानटी लोकांत लुप्त तरी झाले असावेत वा नष्ट तरी झाले असावेत; कारण आज जे लोक बेटात मूळ निवासी म्हणून आढळतात त्यांची राहणी बऱ्याच अंशी अगदी पुरातन म्हणून गणल्या गेलेल्या जगातील इतर भागांतील रानटी लोकांच्या राहणीशी आजही जुळत आहे. जावा बेटाच्या आजूबाजूस पसरलेले द्वीपसंघ माकडासारख्या मनुष्यांविषयी प्रसिद्ध आहेत. निकोबारमधून बंदीवान करून आणलेल्या एकदोघा रानटी माणसांस शेपटाचे हाडूक चांगले दोनतीन अंच वर आलेले आणि त्यायोगे त्यास खुर्चीस टेकून बसविले तर बसणे अशक्य झालेले स्वतः आम्हांस तेथील एका डॉक्टरने दाखविले होते. त्यांच्या ह्या शेपटीवर केसांचा अभाव असून खाली झुबक्यांनी आच्छादित होऊन लोंबणारा स्नायू मात्र नव्हता. तोंडाची आणि हनुवटीची रचना अगदी हुबेहूब माकडासारखी होती.

अशा प्रकारची शेपटीची हाडके असणारी मर्कटसदृश मनुष्ये त्या भागात केव्हा केव्हा सापडतात. त्यांस वाचा मात्र बरीच परिणतावस्थेत असते, अंदमानामध्ये जे रानटी लोक आहेत त्यांत जावरा नावाची जात साधारण ४-४।। फूट उंच असते. त्यांचा वर्ण काळाकुट्ट, केस राठ, आखूड आणि बुचक्यांनी वाळून राहिलेले निग्रो लोकांसारखे असतात. दाढी-मिशीचे केश नसतातच. ते अगदी उल्लिंग असतात. कपडे वापरण्याचे पातक ते मुळीच करीत नाहीत. एखाद्या साधूसारखे अंगास लालसर माती तेवढी फासून शरीराची आच्छादनप्रवृत्ती तृप्त करतात. त्यांच्या स्त्रियांत जर एखादी फारच विलासलोलुप निघाली तर एखादे झाडाचे पान कमरेपुढे लटकावते. आयुष्यातील विलासाचा तिटकारा करून साधी राहणी राहावी म्हणून एकसारखा जप करणा-यांच्या स्वप्नसृष्टीस वास्तविक करून दाखविणारे हे जावरा अगदी वन्य स्थितीत आणि नागरिक वा मानुषिक आयुष्याच्या प्रलोभनापासून अजून दूर राहिलेले आहेत. त्यांना आगपेट्या ठाऊक नाहीत; कपडे ठाऊक नाहीत, मग गिरण्यांचे नावच नको. बैलांच्या गाड्यादेखील माहीत नाहीत; तेथे आगगाड्या, विमान आणि प्रचंड तारवे इत्यादी मनुष्याच्या पतितावस्थेतील व्यसनांची गोष्ट बोलणे नको. त्यांस खुर्ची माहीत नाही, जोडा माहीत नाही, बंगला माहीत नाही. शेती माहीत नाही, अन्न खाणे माहीत नाही, यंत्र माहीत नाही, चरखा देखील माहीत नाही. साध्या राहणीचा भक्तसंप्रदाय मनुष्यजातीच्या सर्व संकटांचे एकमेव कारण जी सुधारणा म्हणून म्हणतो ती सुधारणा नावानेच

नव्हे तर इच्छेने देखील त्या जावरांस अपरिचित आहे, अप्रिय आहे. साध्या राहणीच्या आचार्यांस लंगोटी नेसण्याचा मोह तरी पडतोच, पण जावरांस तो देखील नाही.

पण म्हणून त्यांच्यात समाधान नांदत आहे काय? मुळीच नाही. शेती नाही, नांगर नाही, बँकेत नोटा नाहीत, परंतु जी एखादी खवदळीतील जागा किंवा माशाचा तुकडा एका जावऱ्याचा असेल त्याच्यावर दुसऱ्याची दृष्टी पडताच व पडू नये म्हणून त्यास वाहावी लागणारी चिंता, करावी लागणारी तरतूद आणि प्रसंगी लढावी लागणारी झुंज ही तितकीच उत्कट आणि भयंकर असते, जितकी एखाद्या कैसराची वा झारची असेल. तुम्हां आम्हांस शेतीची जितकी चिंता त्याहून वेळी अधिकच चिंता आणि कष्ट त्यांस वन्य फळे शोधावयास वा तदभावी डुकरांची मृगया करावयास वा मासे धरावयास भोगणे पडते.

## तीरांचा मारा

या जावराव्यतिरिक्त आणखी एक रानटी जात तिकडे आढळून येते. पण ती शरीराने उंच आणि या जावरांहून काही गोष्टींत अधिक प्रगतिपर दिसते. क्वचित ही जाती पूर्वीच्या वसाहतींतील अवशिष्ट मनुष्यांशी वन्य जातींचे संबंध होऊन बनलेली असेल. जावरा हे एकपत्नीक असतात. इतर यंत्रे जरी त्यांना माहीत नाहीत तरी एक यंत्र मात्र त्यांच्या पूर्ण परिचयाचे झालेले आहे. ते म्हणजे एक पाच-सहा फूट लांबीचे धनुष्य होय. त्यांचे शरसंधान अगदी अचूक असते. या धनुष्याच्या बळावर त्यांनी आपले स्वातंत्र्य अजून गमावले नाही. अर्थातच आता रायफल आणि विमाने यांच्यापुढे त्याचा टिकाव लागणे अशक्य आहे. परंतु असल्या साधनांनी देखील त्यांना इतके सहज जिंकणे त्यांच्या धनुष्यांनी शक्य केलेले नाही की ते काम इंग्रजांनी सहजासहजी हाती घ्यावे. कित्येक वेळा ते रानांतून गुपचूप पुढे येऊन आणि सरकारी छावण्यांवर वा चौक्यांवर, एकट्या-दुकट्या बंदीवानावर छापा घालून पळून जातील पण तरीही त्यांचा तेवढ्यापुरता कसाबसा पाठलाग करून परत त्यांस जंगलातील गूढतेत हुसकून लावण्यापलीकडे सरकारी अधिकारी त्यांचा अधिक पिच्छा पुरविण्याच्या भानगडीत पडत नाहीत. हिंदुस्थानात एक प्रांत जिंकणे जितके सोपे आहे तितके त्या जंगलांतील भयंकर तीरांचा मारा करणाऱ्या रानटी आणि शूर लोकांस जिंकणे सोपे नाही. सध्या तो प्रश्न निकडीचाही नाही म्हणून अजूनपर्यंत ते लोक जंगलांतील अपरिचित निबिडतेत वसती-वसतीने राहून ज्या मार्गाने दहावीस शतकांपूर्वी त्यांचे पूर्वज जात होते त्याच सनातन मार्गाने वर्तत नागवे, उघडे, डुकरीमागे धावत, कच्चे मांस खात, प्रेते-भुते पूजीत आनंदाने नांदत आहेत. त्यांच्या या रूढीस कोणी असभ्य म्हटले तर त्यांतील सनातन धर्माभिमानी सद्गृहस्थ त्यांस जिवंत फाडून त्या दिवशी त्याच्याच कच्च्या मांसावर उदरनिर्वाह करण्यास सोडणार नाही.

## नरमांसभक्षक

जावरे हे अजूनही नरमांसभक्षक आहेत. काही काही युरोपियन धाडसी प्रवाशांनी या लोकांत, ते नरमांसभक्षक असताही प्रवेश करून त्यांची मैत्री संपादून त्यांच्या रीतिभातीची आणि भाषेची काही मनोरंजक माहिती ग्रंथित केलेली आहे. अंदमानामध्ये बंदीवानही जाव-यांच्या नरमांसलालसेस बळी न पडता त्यांच्या आतिथ्याचे भोजन घेऊ शकलेले आणि नंतर सुटून परत आलेले आम्ही पाहिले आहेत. त्यांच्या वर्णनावरून शरण आलेल्यास जावरा

www.savarkarsmarak.com

सहसा मारीत नाहीत असे दिसते. परंतु इंग्रज सरकारच्या अधिका-यांसच नव्हे तर नागरिक दिसणाऱ्या अन्य मनुष्यास ते आपला नैसर्गिक शत्रू समजतात आणि जंगलातून निघून त्यास एकटादुकटा गाठून ठार मारतात. केव्हा केव्हा त्याचे मास कच्चेच फाडून वा कधी कधी आगीवर टांगून मग खातात. दिवसा उठताच जो तो आपले धनुष्य घेऊन मृगयेस निघतो. बायकाही मासे मारावयास वा इतर लहानसहान सावजे पकडण्यास जातात. त्यांच्या टोळ्या एकत्रच एकाच छपराखाली राहतात. मृगयेत जे मोठे सावज येईल ते सगळ्यांचे. वन्य मध, फळे ज्यांची ते खातात. दिवसभर हिंडून रात्री आग पेटवून त्यावर ते समाइक सावज टांगून ठेवतात. पहिले भाजलेले असेल ते फाडून सगळेजण एकत्र खातात. मग कधी कधी त्यांचा स्त्रीपुरुषमिश्रित एक नाच असतो. तो नाचतात. त्यांचा एक राजा असतो. त्याचा मान मोठा ठेवतात. मग नाचबीच झाल्यावर बायका व पुरुष सर्व जोड्याने वा मिळून त्या आगीभोवती वर्तुळ घालून उल्लिंगावस्थेतच निजतात.

पळून गेलेल्या काही हिंदी बंदीवानांनी त्यांस शेतीची कल्पना देण्यासाठी शाकभाजी करून दाखविली, तेव्हा त्यांस मोठे आश्चर्य वाटले. मनुष्य मेल्यावर ते प्रेत एका झाडास काही दिवस टांगतात. कोणी म्हणतात, मग त्यास दगड मारून खाली पाडतात. त्यांच्या धर्मविषयक कल्पनांची काहीच विश्वसनीय माहिती अजून ग्रंथित नाही. तथापि भुते, प्रेते आणि भय यांपुढे धर्मविषयक विचारांची पायरी फारशी गेलेली दिसत नाही. त्यांच्यातील एक जात बरेच वर्षांपूर्वी इंग्रजांस शरण येऊन त्यांचे आश्रयास राहिल्यामुळे ते वन्य जावरा त्यांचाही आधुनिक मनुष्याप्रमाणे द्वेष करतात; तथापि इतके एकलकोंडेपणाने राहूनही हळूहळू त्यांच्यात ब्रांडी आणि देशी दारू यांचा प्रवेश होत आहे.

## जाव-यांचा धंदा

इंग्रजांशी मिळून राहणारे जे जावरा त्यांचा मुख्य धंदा म्हणजे समुद्रावरून अनेक सुंदर शंख, शिंपले आणि विविधाकृती गारगोट्या वेचून त्या इंग्रजांच्या चौकीवर आणून द्याव्या, काही तरी काचेची खेळणी, साखर वा तंबाखू घेऊन त्या वस्तू विकाव्या, दोनचार दिवस त्यांच्याकरिताच बांधलेल्या जवळच्या चाळीत राहावे आणि पुनः या अभेद्य आरण्यक निबिडतेत घुसून अदृश्य व्हावे. अरण्यातील मधही ते आणून विकतात. ह्या सर्व वस्तू एकत्र करून सरकार त्या परदेशास पाठवते. तेथील शंखांस नीट घासून वर रुप्याची व सोन्याची घडण करून भारी भारी मोलास विकतात. हे माणसाळलेले लोक आता लहानशी लंगोटी नेसू लागले आहेत. त्यांच्या स्त्रिया एखादे पान वा पानांची माळा कमरेभोवती गुंडाळतात. त्यांचा वसाहतीच्या लोकांशी आता बराच संबंध जडल्याने त्यांच्यात एक मिश्र प्रजा उत्पन्न होऊ लागली आहे. सोजीर वा युरोपियन मनुष्याच्या सहवासाने उत्पन्न झालेली जावरा स्त्रियांची गोरी मुले आणि हिंदी पुरुषांच्या संसर्गापासून झालेली निमगोरी मुले मधून मधून बघण्यात येतात. त्यांच्यातील काही तरुण मुले, मुली आणि विशेषतः संमिश्र प्रजेतील माणसे शिकविण्याचा आणि त्यांस सरकारी नोकरी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. एकदोन स्त्रिया शुश्रषेचे काम शिकून दाया झाल्याचेही ऐकिले आहे. अंदमानाच्या चीफ कमिशनरांपैकी एकाच्या स्त्रीची अशीच एक जावरा स्त्री सहचरी नेमलेली होती.

अंदमानाचा अर्वाचीन इतिहास साधारणतः १७७६ पासून सुरू होतो असे म्हणता येईल. यापूर्वी सिंगापूर, पेनांग, मलाक्का, टेनासेरीम इत्यादी बेटांतून आणि स्थलांतून काळ्यापाण्याची शिक्षा झालेल्या लोकांना निर्वासित करण्यात येत असे. इंजिनियर कोलब्रुक आणि कॅप्टन ब्लेअर या दोघा उद्योगी इंग्रजांनी १७७६ च्या संधीस अंदमानात वसाहत करण्याचा प्रयत्न केला. त्यापूर्वी कित्येक वेळा इंग्रजांची तारवे फुटून या बेटास लागली होती. त्यांची भयंकर वर्णने अजूनही वाचावयास मिळतात. कॅप्टन ब्लेअरने जेव्हा वसाहतींचा उद्योग केला तेव्हा अंदमानाचे वायुमान नागरिक लोकांच्या आरोग्यास अगदी मारक होते. पहिल्या बंदिवानांच्या ज्या वसाहती तेथे केल्या गेल्या त्यांतील कोणीही मनुष्य फार दिवस वाचू शकला नाही. या ब्लेअरसाहेबांचे नावानेच अंदमानाचे आजकालचे बंदर पोर्ट ब्लेअर हे ओळखले जाते. पुढे १८५७-५८ च्या स्वातंत्र्ययुद्धात जे हजारो हिंदी सैनिक पाडाव होऊन द्वीपांतराच्या भयंकर शिक्षेस बळी पडले त्यांस या अंदमानास नेऊन सोडण्यात आले. तेव्हापासून या वसाहतीस सुसंगतपणे आरंभ झाला. आम्ही अंदमानात गेलो असता सत्तावनच्या राज्य-क्रांतिकारकांतील जे थोडे लोक जिवंत होते त्यांपैकी एका म्हाताऱ्याने आम्हीही राज्यक्रांतीसाठीच आलो आहोत हे ऐकून आम्हांस एक अभिनंदनात्मक प्रेमाचा संदेश धाडलेला होता! पुढे आम्ही ऐकले की तो वृद्ध बंदीवान एका उत्सवाप्रीत्यर्थ सोडण्यात आला तो जवळजवळ साठ वर्षे बंदीवास भोगल्यानंतर! अठराशेसत्तावनच्या राज्यक्रांतिकारकांच्या निर्वासनाने विवासितांच्या अंदमानी वसाहतीस आरंभ होतो आणि काय योगायोग! पन्नास वर्षांनंतरच्या १९०७-०८ च्या राज्यक्रांतिकारकांतील पुढा-यांच्या निर्वासनाने तिचा अंत होतो!

वासुदेव बळवंताच्या राज्यक्रांतीच्या उद्योगातील साथीदारही अंदमानालाच धाडण्यात आलेले होते. त्यांपैकी एकदोन आम्ही गेल्याच्या आगेमागेच सुटले हे आम्हांस कळलेच होते. मुंबईच्या हिंदु-मुसलमानांच्या दंग्यात शिक्षा झालेले काही हिंदू तिकडेच होते. मणिपूरच्या राज्यक्रांतीतील लोकांस एका मर्यादित भूभागात बऱ्याच स्वतंत्रपणे संसार करून राहू देत असत. अगदी बंदीवानांप्रमाणे त्यांस त्रस्त केलेले नव्हते. अशा रीतीने अंदमानात राजकीय वा सार्वजनिक चळवळीत शिक्षा झालेले शेकडो राजकीय बंदीवान पूर्वीपासून कष्टमय दिवस कंठीत आलेले आहेत. तरीही त्यांच्या कष्टांची वा अंदमानाची कहाणी हिंदुस्थानच्या हृत्पटावर अंकित होण्याचा योगायोग तेव्हा जुळून आला नाही. अर्वाचीन क्रांतिकारकांच्या निर्वासनाने मात्र तो योगायोग जुळून येऊन आपल्या धर्माचे, जातीचे आणि राष्ट्राचे हजारो अंशज आणि वंशज अंदमानास वसवीत असून त्या भारतीय वसाहतीचा आपल्या प्रेमावर, कळकळीवर आणि कर्तव्यावर भारताच्या कोणत्याही एका प्रांताइतकाच अधिकार आहे ही गोष्ट हिंदी मनास अजून अंधुकपणेच पण आता कळू लागली आहे.

## पोर्ट ब्लेअर

पोर्ट ब्लेअर हे या वसाहतीच्या मुख्य बंदराचे आणि द्वीपाचे नाव आहे. अंदमानामध्ये हिंदी आणि ब्रह्मी लोकांतील बंदीवानांची वसाहत झाल्याने या साठ-सत्तर वर्षीच तेथील जनसमूह भारतीयच झालेला आहे. परंतु निकोबारमध्ये मात्र ब्रह्मी आणि मलाया द्वीपपुंजातील वसती वाढून ते द्वीप भारतीय संस्कृतीस आणि समाजास नित्याचेच अंतरले असे दिसते. अंदमानामध्येही बंदीवान धाडणे काही अंशी तरी बंद झाल्याने भारतीय वसाहतीस

उतरती कळा लागेल की काय अशी आम्हांस भीती वाटते; आणि म्हणून विषयासंबंधी पौर्वापर्य दोष पदरी बांधूनही या महत्वाच्या गोष्टीकडे हिंदुस्थानीयांचे लक्ष वेधण्यासाठीच आम्हांस येथेच चार शब्द लिहिणे अवश्य वाटते.

अंदमानास बंदीवानांच्या टोळ्या धाडणे काही अंशी बंद झाल्याबरोबर तिकडील भूभागांची वाटणी करून ते वाटे आणि सरकारी सत्तेत लागवड केलेल्या हजारो नारळाच्या आणि सुपा-यांच्या झाडांची लागवड गिऱ्हाईकांस विकून ती सर्व मत्ता व्यक्तिगत करावी असा अधिका-यांनी निश्चय केला. त्याप्रमाणे शेकडो एकर भूमी आणि झाडे अगदी थोड्या मूल्यास विकण्यासाठी गटांनी काढली गेली. ह्या गटांची आणि विक्रीच्या ह्या बेताची माहिती हिंदुस्थानातील व्यापा-यांस मुळीच नसल्याने आणि अंदमानमध्ये ते गट विकत घेऊ शकतील असे हिंदू व्यापारी फारच थोडे असल्याने तेथील युरोपियन वा अँग्लो-इंडियन लोकांच्या हातीच त्यांतील बहुतेक गट पडत चाललेले आहेत. ज्या थोड्या हिंदी व्यापा-यांनी वा गृहस्थांनी त्यांपैकी काही गट मिळविले त्यांनाही हिंदुस्थानातून योग्य माणसांचा पुरवठा होत नसल्याने पैसा कमविण्याची ही सोन्यासारखी संधी व्यर्थ जात आहे. जंगल कापून वसाहत करण्यासही सरकारने फार सोप्या सवलतीवर भूभाग देण्याचे ठरविले आहे. एक-दोन ख्रिस्ती संस्थांनी ह्या सवलतीचा लाभ घेऊन हिंदुस्थानातील संथाल आदी जातीच्या लोकस ख्रिस्ती करून तिकडे नेऊन तेथील रान तोडून त्यांची ख्रिस्ती वसाहत करण्याची योजना केलेली आहे. परंतु कोणीही हिंदी वा हिंदू व्यापाऱ्याचे लक्ष अजून इकडे वेधलेले नाही.

## वसाहतीस जा

अंदमानामध्ये पूर्वी बंदीवानांची वसाहत असे तेव्हा तिकडे जाण्यास वा व्यापार करण्यास बरीच अडचण पडे. परंतु आता तितकी पडत नाही. म्हणून तिकडे सध्या भूमी आणि लागवड केलेल्या नारळांच्या आयत्या बागा थोड्या मूल्यात मिळविण्याची ही संधी न दवडता हिंदी लोकांनी तिकडे जाऊन ते गट विकत घ्यावेत. येथे त्याविषयी सर्व माहिती देणे अशक्य आहे. पण जर कोणास तशी पाहिजे असेल तर त्याने अंदमानाचे चीफ कमिशनर अशाच पत्त्यावर लिहून ती माहिती मिळवावी. इकडे एक वीतभर तुकड्याकरिता हायकोर्टापर्यंत भांडत बसण्यापेक्षा तिकडे एकरोगणिक भूमी नाममात्र मूल्यासाठी मिळत असताही तिकडे जाऊन ती संपादण्याचा प्रयत्न न करणे हा केवढा कूपमंडूकपणा होय! 'पण काय करावे हो! तो वीतभर तुकडा पूर्वजार्जित आहेना' म्हणून म्हणणाऱ्या घरकोंबड्या अभिमान्याने हे ध्यानात ठेवावे की, ही माझी पूर्वजार्जित मत्ता आहे म्हणून सांगण्याच्या बढाईपेक्षा ही माझी स्वकष्टार्जित मत्ता आहे म्हणून स्वागत करणाऱ्या अव्यर्थ गर्वास पाहून देव आणि देश अधिक प्रसन्न होतात.

अंदमानाच्या बंदीवानांच्या वसाहतीस बंद करीतोपर्यंत हिंदुस्थानी कौन्सिलांनी अंदमानासंबंधी बरीच चर्चा केली. परंतु ती वसाहत मोडताच - काही अंशी मोडताच - कौन्सिलच्या सभासदांस अंदमानाचे नंतर काय झाले याचे जे अगदी विस्मरण पडले आहे ते ठीक नाही. तिकडे आपल्या देशाची, धर्माची, जातीची जवळजवळ दहा हजार माणसे आज राहत आहेत. आपल्या लोकांच्या तीन-चार पिढ्यांच्या आयुष्यांची राख त्या द्वीपपुंजात रुजलेली आहे. त्यांच्या कष्टाने ते द्वीप काही अगदीच यःकश्चित पदार्थ नाही. आर्थिकतःच आम्हांस येथे विचार कर्तव्य

असल्याने केवळ त्या दृष्टीने देखील तिकडे पुष्कळ संपत्ती उत्पन्न होण्यासारखी आहे. तेथे चहाचे मळे, रबराची लागवड, उसाचे, नारळीचे, सुपारीचे मोठमोठे बाग भरभराटीस येत आहेत. तरी त्या भूमीची अजून जोपासना व्हावी तशी झाली नाही. अवघी पन्नास वर्षे एका लहानशा भागास कृषियोग्य करून झाली. जंगलाचेही दोनदा उत्पन्न येण्यासारखे आहे. तेव्हा आर्थिक दृष्टीने देखील त्या बेटाची व्यवस्था बंद्यांची वसाहत बंद झाल्यानंतर कशी ठेवण्यात आली, तिकडे भूमीचे गट आणि लागवडी काय दराने विकावयास काढण्यात आल्या, त्यांची माहिती हिंदुस्थानात प्रथम प्रसिद्ध करून मग त्या विकल्या का काही विवक्षित लोकांच्याच हाती त्या पडत आहेत इत्यादी माहिती कोणा तरी कौन्सिलराने अवश्य विचारावी. त्याप्रमाणे तिकडच्या अगदी एकाकी पडलेल्या आपल्या जातीबंधूंची स्थिती काय आहे हे एकदा प्रत्यक्ष पाहून येण्यासाठीही कोणा कौन्सिलरास कोणातरी कौन्सिलातील लोकनियुक्त पक्षाने धाडणे अत्यवश्य आहे, ते बिचारे मुके आहेत. त्यांना त्यांची स्थिती सुधारण्याचे साधन नाही म्हणून तुम्ही त्यांचे मुख झाले पाहिजे. आर्यसमाजी उपदेशकांतीलही कोणा तरी मुख्य उपदेशकास तिकडे धाडणे अवश्य आहे. तेथे बहुसंख्य लोक हिंदू असून आणि हिंदी भाषा शाळेत शिकविली जावी म्हणून प्रयत्न ते करीत असूनही रोज लिखाणाची भाषा उर्दूच ठेवली जाते. इतकेच नव्हे तर हिंदी वा हिंदू मुलांसही शाळांतून मातृभाषा शिकवली न जाता शैक्षणिक माध्यम अजून उर्दूच ठेवलेले आहे. या आणि इतर अशाच अनेक गोष्टींकडे कोणी संघटक तिकडे जाईल तर तेथील अधिका-यांचे लक्ष वेधून ते योग्य ती व्यवस्था करतील.

अंदमानामधील सर्वच परिस्थितीचे विवरण आणि ती सुधारण्याचे उपाय हे पुढे ओघाने यथास्थली कथन करावयाचे असल्याने सध्या ह्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यापुरताच त्याचा उल्लेख करून पुढे जाणे प्राप्त आहे.

## इंग्रजी नांवाचे हिंदीकरण

अंदमानामधल्या प्रस्तुतच्या भूमीभागाची बहुतेक नावे इंग्रजीत ठेवलेली आहेत. परंतु त्यांची हिंदी वसाहतीच्या लोकांच्या बोलण्यात जी रूपे झालेली आहेत ती हिंदीस इतकी सफाईने जुळतात की, कोण्या विद्वानाने त्यांचे रूपांतर करण्याचे काम अंगावर घेतले असते तर त्यास देखील ते इतके साधले नसते. ‘शोअर पॉईंट’चे हिंदी लोकांच्या बोलण्यात ‘सुवरपेठ’ असे रूपांतर झाले आहे. ‘डंडॉस पॉईंट’चे दंडापेठ. तशीच गोकुलाबन, बाराटांग, कालाटांग इत्यादी नामकरणेही ऐकण्यासारखी आहेत. अज्ञात गोष्टी ज्ञात गोष्टींच्या साम्यानेच ज्ञात होतात, त्याचप्रमाणे अज्ञात शब्दही भाषाशास्त्रात ज्ञात शब्दांच्या साम्याचे आधारानेच उच्चारित होण्याची जी सहज प्रवृत्ती असते तिचे एक मनोरंजक उदाहरण आहे. काही एक सर्वसामान्य संकेत न करता त्या इंग्रजी शब्दांचे रूपांतर आपण होऊनच हिंदी मुखातून हिंदीपण पावते झाले.

ह्या प्रत्येक जिल्ह्यात बंदीवानांच्या चाळी (बराकी) बांधलेल्या असून त्यांत एकेक कारखाना काढला आहे. उदाहरणार्थ, फिनिक्स बे येथे लोखंड, पितळ, शिंपले, कासवांची पृष्ठे इत्यादी पदार्थांचे अनेक सुंदर पदार्थ करण्याचे शिल्पकार्य चालू असून त्यात चारशे-एक शिल्पकी बंदीवान काम करीत असत. नेव्हिबे मध्ये भाजीबागा आहेत. चॅथॅमला जंगली लाकडांच्या फळ्या करण्याचा मोठा करवत कारखाना आहे. कालाटांगला चहाबगीचा असून तेथे

जाण्यास बंदीवान लोक थरथर कापतात इतके सक्त काम करून घेण्यात येते. याविरहित अरण्य तोडण्यास ज्या टोळ्या नेण्यात येतात त्यांच्या तर दुर्दैवास सीमा नसते.

अंदमानास प्रथम प्रथम ज्या बंद्यांच्या टोळ्या नेण्यात आल्या त्यांना जाताच जवळजवळ मोकळे सोडण्यात येई. पुढे त्यांच्याकडून काही वर्षे सरकारी अटकेत काम करून घेण्यात येई. जे स्वतंत्र राहत ते भाताची शेती करीत. त्यांच्या वंशजांची जी वस्ती वाढत गेली त्यांस फेरी म्हणजे ‘फ्री’ म्हणतात. आज त्यांच्यात कित्येक सुशिक्षित आणि सज्जन आहेत. पुढे हिंदुस्थानातून बंदीवान येताच त्यांना काही दिवस तुरुंगात ठेवण्याचा बेत होऊन त्यांसाठी आणि अंदमानातील अपराध्यांसाठी एक नवीन मोठा विस्तीर्ण तुरुंग बांधण्यात आला.

हाच तो सिल्व्हर जेल किंवा (Cellular Jail) होय की जेथे पुढे राजकीय बंदीवानांस वर्षानुवर्षे बंद ठेवण्याचा परिपाठ पडला - की, ज्याच्या एकान्त कोठडीतील कण्हण्याचे प्रतिध्वनी एकदा हिंदुस्थानाचे तटावर ऐकू आले.

प्रकरण सातवे

# अंदमान आले

आगबोट अंदमानाच्या बंदरात येऊन खळखळखळ करीत पाण्यात पडणारा लोखंडी नांगर टाकून उभी राहिली. हळूहळू बंदीवानांस नेणाऱ्या मोठ्या नावा आणि अधिका-यांच्या लाँचेस त्या आगबोटीभोवती जमल्या, उतरण्यासाठी बोटीवर आम्हांस बराच वेळ उभे राहावे लागले. तेवढ्यात आजूबाजूस वळून अंदमान - ज्या भूमीत आता बहुधा आमरण राहावे लागणार - तिचे निरीक्षण केले. बरोबरीचे जुने बंदीवान आणि क्वचित शिपाई काही माहिती सांगत. ते रॉसद्वीप, तेथे अंदमानाचा मुख्याधिकारी चीफ कमिशनर राहतो. समुद्रात ते बेट असे शोभे की, जसा एखाद्या अप्सरेचा सरोवरात बांधलेला बंगला. खरोखरच ते बेट बेटाचे मानाने इतके चिमुकले, आटोपशीर आणि शोभिवंत दिसे की, क्षणभर बेड्या पडलेल्या मनाचेही मनोरंजन व्हावे. दुसरीकडे अंदमानाचे समुद्रतटास लागून लांबवर व्यवस्थेने लावलेल्या नारळांच्या झाडांच्या पंक्ती डुलत होत्या. दूरवर आंब्यांच्या, सुपा-यांच्या, पिपळांच्या वृक्षांचे पुंज दिसत होते. जवळच घाटावर मनुष्यांचे थवेच्या थवे किलबिलाट करीत जमलेले होते. त्यावरच एका चढणीचे टोकावर नारळांच्या झुलणाऱ्या छत्राखाली एक वर्तुळाकृती तटाच्या आत एक भव्य भवन दिसले. ते किती शांत दिसले. त्याच्या भोवती नारळांची, सुपा-यांची आणि केळींची बने चवऱ्या ढाळीत होती, छत्र धरून उभी होती. वाटे हा कोणातरी सुखवस्तू वा शांतिपरायण गृहस्थाचा बंगला असावा वा पाद्र्याचा आश्रम असावा. विचारले, “ते भवन कसले?” शिपाई म्हणाला, “म्हणजे? तोच ‘बारीबाबा’चा सिल्व्हर जेल.” ह्या बारीबाबाचा आणि सिल्व्हर जेलाचा उल्लेख शिपायांनी बोटीवरच बंदीवानांस धमकावण्यासाठी इतक्या वेळेला केलेला होता की, तो सिल्व्हर जेल आहे इतके सांगण्यातच त्याचे अंतर्गत स्वरूपाचा पूर्ण बोध होईल ही त्या शिपायांची निश्चिती काही चुकीची नव्हती. तो आणखी कृपाळू होऊन न विचारता म्हणला, “आता तेथेच जावयाचे आहे. तेथेच बारीबाबाच्या घरी उतरावयाचे आहे तुम्हां सगळ्यांना!”

आम्हां सगळ्या बंदीवानांस डोक्यावर अंथरूण देऊन व हातात थाळीपाट देऊन ओळीने उतरविण्यात आले. घाटावर येताच शिपायांच्या आणि बंदीवानांतील अधिका-यांच्या पहाऱ्यात इतर बंद्यांस वर नेण्यात येऊन मला मात्र युरोपियनांच्या पहाऱ्यात निराळे ठेवण्यात आले. तेथे घाटावर बसलो असता माझ्या मनात विचार आला की, अंदमान समुद्रात अशा स्थळी वसलेले आहे की हिंदुस्थानाच्या सामुद्रिक सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याचे महत्व कधीही कमी होणे शक्य नाही.

पूर्वेकडील हा अंदमान-निकोबार द्वीपपुंज म्हणजे हिंदुस्थानाच्या पूर्वसमुद्राची द्वारेच होत. जर ही द्वीपे हिंदुस्थानच्या अधिकाराखाली नसतील आणि जर त्यांची तटबंदी आणि लढाऊ सामर्थ्य दुर्बल असेल तर पूर्वेकडून येणारा कोणताही सामुद्रिक हल्ला एकदम कलकत्त्याचे दारावरच ठोठावण्यास कमी करणार नाही. परंतु जर अंदमानाचा द्वीपपुंज हिंदुस्थानाचे सत्तेखाली राहील आणि त्यास वैमानिक आणि सामुद्रिक ठाण्याची योग्यता प्राप्त होऊन त्याची उत्तम तटबंदी केली जाऊन तेथे भारतीय नौसैन्याचा एक बलिष्ठ भाग नेहमी पहारा करीत राहील तर पूर्वेकडील विदेशी शत्रूच्या कोणत्याही आक्रमणास पहिला धक्का अंदमानाचे अंगणातच मारता येईल.

अंदमानाची वस्ती आणि सद्यःसंस्कृती सर्वस्वी भारतीयच असल्याने तो द्वीपपुंज भारताचाच एक राजकीय विभाग असणे न्यायप्राप्तही आहेच आहे. पश्चिम समुद्रतटास लखदीव मालदीवसारखी लहान बेटेही हिंदुस्थानी राजसत्तेच्या हातून जेव्हा निघून गेली तेव्हा युरोपीय सामुद्रिक स्वाऱ्या अगदी घराच्या दारावर येऊन मुंबई गोव्यास ठोठावू लागल्या. त्यांस दूरचे दूरच रोखून ठेवण्याचा काहीही उपाय हिंदुस्थानाच्या तत्कालीन देशी सत्तेस करता आला नाही. आता यापुढे तरी ती चूक सुधारून पश्चिमेस लखदीव- मालदीव, दक्षिणेस सिंहलद्वीप आणि पूर्वेस अंदमान-निकोबार द्वीपपुंज ह्या सर्व स्थलांस बलिष्ठ सामुद्रिक सैन्यशिबिरांचे आणि सिंधुदुर्गाचे स्वरूप दिले पाहिजे. आज केवळ राजकीय योगायोगाने सिंगापूर हे भारतीय समुद्राचे नाके आहे. अंदमान हे नैसर्गिक नाके आहे; कारण अंदमान हे सिंहलद्वीपाप्रमाणेच भारताचाच एक नैसर्गिक आणि सांस्कृतिक अंश आहे.

## चलो, उठाव बिस्तरा

भावी भारताचे बलिष्ठ नौसाधन (आरमार) अंदमानचे अंगणात सिंधुदुर्गापुढे पहारा करीत माझ्या कल्पनातरंगांत तरंगू लागते न लागते तोच "चलो, उठाव बिस्तरा" म्हणून एका शिपायाने उद्धटपणाने म्हटले; कारण युरोपियन अधिकारी जवळ उभा होता. इंग्रजासमक्ष हिंदी राजकीय बंदीवानांस जितके अधिक उर्मटपणाने आपण वागवू तितके बढतीस आपण अधिक योग्य ठरू अशी प्रत्येक हिदी पोलीस वा सैनिक शिपायाची अनुभवाने दृढ समजूत झालेली असते. अंदमानास होणाऱ्या अपमानाचे हे उर्मट वाक्य सूतोवाचच होते. उठलो, बिस्तरा डोक्यावर घेतला, हातात थाळीपाट धरले, पायांतली जड बेडी कमरेस नीट बांधली आणि उभा राहिलो. एकदम उंच कड्यावरून कोसळून पडले असता जसे शरीरास लागते तसेच एखाद्या उच्च विचाराच्या शिखरावरून एकदम एखाद्या विवश, प्रतिकूल आणि रूक्ष विचारांच्या गर्तेत ढकलले गेले असता मनासही लागते. तरीही माझ्या कल्पनातरंगांस दिसू लागलेल्या भावी भारताच्या या बलिष्ठ नौसैन्यास भविष्यकाळाच्या स्वाधीन करून भारताच्या कठोर आणि विवश वर्तमानकाळाच्या त्या 'चलो उठाव बिस्तऱ्यास' तोंड देण्यास मी चटकन सज्ज झालो. घाटावरून निघून एका चढणीवर मला चढावयास सांगितले. अनवाणी अन बेड्यांनी जखडलेल्या पायांनी मला चढण्यास उशीर लागू लागला. शिपायी 'चलो, जल्दी चलो' करू लागला. एकदा गोरा अधिकारी शिपायास म्हणाला, 'चालू दे त्याला; घाई कशाला करतोस?' माझ्या मनात ही चढण चढताना एकच विचार घोळत होता. मी समुद्रावरून अंदमानमध्ये शिरणारी ही वाट वर चढून जात आहे. अंदमानमधून भारतास परत जाण्यासाठी समुद्राकडे या मार्गाने या जन्मात पुनः मी कधी ही वाट उतरून खाली येणार आहे का?

थोड्याच वेळात चढण संपून सिल्व्हर जेलचा दरवाजा आला. लोखंडी बिजाग-यांच्या दाढा करकरू लागल्या व त्या तुरुंगाच्या दाराचा जबडा उघडला. मी त्यात घुसलो. तो जबडा बंद झाला, तो पुनः अकरा वर्षांनी परत उघडला!

## बारीसाहेब आता है।

दारात पाय टाकताच दोन गोऱ्या सार्जटांनी मला दोन्ही हातांत धरून उभे केले. इतक्यात आजूबाजूच्या पहारेक-यांत कुजबूज झाली "बारीसाहेब आता है।" बारीसाहेबाहून त्यांनी कोणतीही अधिक निष्ठुर वा कठोर व्यक्ती पाहिली नसल्याने ते माझ्या तोंडावरही ते नाव ऐकताच काय भावना उद्भवतात ते पाहू लागले. पण मी त्या

भीषण भव्य तुरुंगाच्या दोन लोखंडी फाटकांच्या मध्यंतरी असलेल्या भागास भूषविण्यासाठी जे अनुरूप अलंकार धारण केलेले होते ते पाहण्यात गर्क झालेलो होतो. निरनिराळ्या प्रकारच्या हातकड्या एकात एक गुंफून त्याची ही हिडीस फुले भितीवर लावलेली होती. मोठमोठ्या पायबेड्या, दंडबेड्या आणि मनुष्याच्या शरीरास कष्ट देणारी अशीच अन्य आयुधे समोरच्या भागावर ओळीने लोंबकळत होती. त्या उग्रतेची एक शोभाच दिसत होती. त्या बेयॉनेट-बंदूक-बेड्या-हातकड्यांच्या अघोर अलंकारांनी तो भीषण तुरुंग असा शोभू लागे की, जसा एखादा मांग उत्तम कपडे घालून फाशी द्यावयास येताना शोभतो. देशांच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे इतिहास वाचताना आणि तत्रस्थ निर्वासितांची आणि दंडितांची आत्मवृत्ते अवलोकन करताना ज्या दृश्यांची वर्णने अंगावर काटा उभा करीत असत, त्यांतील वर्णन अक्षरशः लागू पडणारे हे दृश्य आहे. दोघा उद्धट सार्जंटांनी धरून मला तेथे उभे केले आहे की त्या दृश्याच्या भीषणतेच्या जबड्यात माझे मनोधैर्य चुरले जावे. ती भीषणता मजकडे टक लावून डोळा वटारून पाहत होती. मीही तिच्याकडे डोळे वटारून पाहत होतो. मी तिच्याकडे डोळ्यास डोळा भिडवून पाहत होतो. दोघांची ओळख झाली. मला एक अद्भुत समाधान वाटू लागले की, तर मग मीही जे वाचले ते स्वतः अनुभूत केले आणि हा येथे त्या दृश्याच्या जबड्यात, न चुरला जाता निष्कंप, निर्भीड उभा राहिलो आहे! ब्रिस्टनच्या लंडन येथील तुरुंगात असताना मी 'दोन मूर्ती' म्हणून एक कविता केलेली होती. तिची चरणे माझे मन म्हणू लागले. आणि जय...! असे उद्‌गार माझ्या हृदयात उठू लागले.

## बारीबाबाचा उपदेश!

मी त्या मनोविकारांच्या वावटळीतून किचित सुटताच बाजूस पाहिले तो, एक लठ्ठ काठी हातात घेतलेला गलेलठ्ठ गोरा अधिकारी मजकडे पाहत उभा राहिलेला मला दिसला. हेच बारीसाहेब होत. आपण येणार ही वार्ता हेतुपूर्वक माझ्या कानावर त्यांनी घालविली होती. आणि आता आपल्या वाटेकडे याचे भयभीत डोळे लागतील अशा नेहमीच्या अपेक्षेने ते आले होते; पण त्याच वेळेस माझे मन वरील विजयी विचारात मग्न झाल्याने मला ते केव्हा आले ते कळलेही नाही. त्या मिनिटात त्यांनाही मजकडे पाहत रहावेसे वाटले असावे. मला ते गुपचुप निरक्षित असता माझी त्यांच्याकडे दृष्टी पडताच त्यांनी पाहिले न पाहिलेसे करून त्या सार्जंटास सांगितले, "Leave him, he is not a tiger." (सोडून द्या त्याला, तो काही कोणी वाघ नाही!) नंतर मजकडे ती जाडी काठी रोखून ते म्हणाले, "Well, are you the man who tried to escape at Marseilles?" (मार्सेलिसला पळून जाण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य तो तूच काय?) त्याच्या या उद्धट स्वरात विचारलेल्या प्रश्नास तितक्याच उद्धट पण संयत स्वरात मी उत्तर केले, "Yes, Why?" (होय, का?) माझ्या उत्तराने बारीसाहेबाचा स्वर थोडा मावळला. केवळ जिज्ञासू ध्वनीने ते म्हणाले, "Why did you do that?" (तसे का केलेत?) 'कारणांसाठी' मी म्हणालो, "त्यांतील एक कारण हे की, त्या सगळ्या त्रासातून सुटका व्हावी." "परंतु त्या त्रासात तुम्ही स्वतःच पडलेत ना?" "होय, ते खरे आहे. कारण त्या त्रासात तसे स्वतः होऊन पडणे हे मला माझे कर्तव्य वाटले. आणि त्या त्रासातून शक्य तर सुटणे हेही कर्तव्यच वाटले." "हे पहा," बारीसाहेब अगदी मनमोकळेपणा दाखवून हसत म्हणाले, "मी काही इंग्रज नाही. मी आयरिश आहे." मी मध्येच म्हणालो, "आणि इंग्रज असतेत तरी तुमच्याविषयी केवळ तेवढ्यासाठी माझे मनात काहीही अपूज्यभाव वा तिरस्कार उत्पन्न झाला नसता. इंग्लंडमध्ये माझ्या ताज्या तारुण्याची काही वर्षे मी घालविली

आहेत. आणि त्या लोकांच्या अनेक सद्‌गुणांचा मी चाहता आहे.” “पण मी आयरिश आहे, हे अशाकरिता सांगतो की, लहानपणी मीही इंग्रजांच्या हातून आयर्लंडला सोडविण्यासाठी चाललेल्या स्वातंत्र्यवीरांच्या झुंजीत भाग घेतला! पण आता माझे मन पालटले आहे. हे पहा, तुम्हास मित्रत्वाच्या नात्याने मी सांगतो की, तुम्ही अजून तरुण आहात आणि मी तुमच्यापेक्षा किती तरी पावसाळ्यांनी वडील आहे.” (You are still young, but I am advanced in age.) मी हसत मध्येच विचारले, “And don’t you think that perhaps that may be the reason of the change that has come over you? Not increasing wisdom but dwindling energy?” गोंधळल्यासारखे होऊन साहेब म्हणाले, “तुम्ही बॅरिस्टर आहात. मी एक अशिक्षित बंदीवान जेलर आहे. पण माझ्या उपदेशास तुम्ही तुच्छ मानू नका. खून ते खून - खून कधी स्वातंत्र्य देणार नाहीत-” (Murders are murders and they will never bring independence). “अर्थात, पण हे तुम्ही आधी आयर्लंडाच्या सिनफीनवाल्यांना का शिकवीत नाही? आणि मी हत्येचा पक्षपाती आहे हे तुम्हास कोणी सांगितले?” विषय पालटीत ते म्हणाले, “आता सुपरिन्टेंडंट येणार आहेत. वास्तविक पाहता मी तुमच्याशी राजकारणात बोलणे नियमाविरुद्ध आहे. पण तुमच्यासारख्या विद्‌वान, तरुण आणि प्रख्यात मनुष्यास अशा बदमाषांच्या टोळीत पाहून अंतःकरण तळमळते, म्हणून इतके सांगितले. आता मागे काय झाले ते झाले. त्याच्याशी मला काही कर्तव्य नाही. केवळ येथे तुम्ही कारागाराचे नियम पाळलेत की माझे काम झाले. नियमाविरुद्ध कधी वागू नका. नाही तर मला शिक्षा करावी लागेल.” राजकारणाविषयी बंदीवानाशी बोलणे हे मी नियमाविरुद्ध वर्तन करीत आहे म्हणून म्हणणाऱ्या या बंदीपालाचे, तुम्ही नियमाविरुद्ध वागू नका, नाही तर मला शिक्षा करावी लागेल, हे सांगणे किती नकळत परिहासाने भरलेले होते हे त्याच्या ध्यानातही आले नाही.

“आणखी एक सावधतेची सूचना तुम्हास करणे मी माझे कर्तव्य समजतो की, तुम्ही येथून पळून जाण्याचा प्रयत्न करण्याच्या भरीस पडला तर भयंकर संकटात पडाल. ह्या तुरुंगाभोवती मोठमोठी गहन अरण्ये असून त्यात महाक्रूर रानटी लोक राहत असतात. ते तुमच्यासारखेच कोवळे पोर पाहतात व त्यास काकडीसारखे खाऊन टाकतात! हसता काय? - काय जमादार, मी म्हणतो ते खरे की खोटे?” जमादार अर्थातच मुजरा करीत म्हणाला, “अक्षरशः खरे साहेब!”

“मलाही ते माहीत आहे.” मी म्हणालो, “मी पकडलो जाताच प्रथमतः जे पुस्तक आणवून वाचले ते अंदमानाचे सरकारी इतिवृत्त हे होय. पोर्ट ब्लेअर हे मार्सेलिस नाही हे मी जाणून आहे.”

“ठीक, तर हे पाहा, आता माझे मताप्रमाणे चला, मी तुमच्या उपयोगी पडेन. हं जमादार, घेऊन जा यांना आत आणि त्या सात क्रमांकाच्या चाळीच्या वरच्या मजल्यातील कोठडीत ठेव बंद करून.”

प्रकरण आठवे

# कोठडीतील पहिला आठवडा

जमादार मला घेऊन सात क्रमांकाच्या (नंबरच्या) चाळीत बंद करण्यासाठी चालला. वाटेत एक हौद लागला. जमादार म्हणाला “यात स्नान करा.” मी चार-पाच दिवसांत स्नान करू शकलो नव्हतो. समुद्रप्रवासाने अंग अगदी मलीन आणि घामोळे झालेले होते; म्हणून स्नान करण्याची परवानगी मिळाल्याने आनंद झाला. पण भिजवायचे काय? जमादार म्हणाला, “ही घ्या लंगोटी! आता काम करताना आणि स्नानाचे वेळी नेहमी ही लंगोटी नेसली पाहिजे!” मन किंचित कचरले. पुनः म्हणाले, ‘हा रे वेड्या! अरे रामदास देखील लंगोटीच नेसत असत. ह्या तुझ्या कपड्यात काय आहे ते सर्वांना माहीत आहेच. मग तू ते कोणापासून लपवितोस? ह्याच विकाराला तर मिल्टनने Honour dishonourable (ऑनर डिसऑनरेबल) म्हणून म्हटले आहे. युरोपात असा एक धर्मपंथ होता की जो कपडे घालणे म्हणजे पाप समजत असे. कारण ॲडॅम आणि ईव्ह दोघेही निष्पाप अवस्थेत उल्लंगच असत. त्या पंथाचे अनुयायीही तसेच राहत. त्यांना ॲडमाईट म्हणत. प्रस्तुतही युरोपात धर्मदृष्टीने नसले तरी शास्त्रदृष्टीने कित्येक ठिकाणी लहान लहान स्त्रीपुरुषांच्या वसाहती अशा प्रदेशात स्थापन केल्या जातात की ज्यात स्त्रीपुरुषांनी कपडा थंडीपुरताच वापरला तर क्षम्य समजला जातो. त्याविना नेहमी उल्लंगच राहून सूर्यप्रकाशात शरीरे अनावृत्त ठेवावी लागतात. कारण कपड्याचा अतिशय मोह, शरीरास सूर्याचे दर्शन जवळजवळ मरेतोपर्यंत किबहुना मेल्यानंतरही युरोपात होऊ देत नसल्याने, आरोग्यदृष्ट्या हानी होत आहे अशी तिकडे काही डॉक्टरांची मते झालेली आहेत. हे विचार एकीकडे डोक्यात येत असतानाच हातांनी झटपट मी कपडे काढून चड्डी (बंदीवानास मिळणारा मांडचोळणा) सोडून टाकून अगदी उघड उघड लंगोटी नेसूनही टाकली होती. जमादारास इतर राजकीय बंदीवानांची प्रथमच लंगोटी नेसताना जी लज्जेने त्रेधा उडे ती गम्मत पाहावयास न मिळाल्याने मी बराच निगरगट्ट मनुष्य आहे अशी समजूत त्याचे मुद्रेवर स्पष्ट दिसत होती. कसाबसा लंगोटी नेसून स्नानास आनंदाने गेलो नि लागलो पाणी कटोरा (बंदीवानास दिलेली थाळी) भरभरून घ्यावयास. तो जमादार ओरडला, “असे नाही करावयाचे, हे काळेपाणी आहे. प्रथम उभे राहावयाचे. मग मी म्हणेन ‘लेव पाणी!’ म्हणजे लवावयाचे आणि पाणी घ्यावयाचे एक कटोरा. मग मी म्हणेन ‘अंग मला’ म्हणजे अंग घासायचे हाताने. आणि पुनः मी म्हटले ‘और लेव पाणी’ की पुनः दोन कटोरे पाणी घ्यावयाचे आणि परत फिरावयाचे. तीन कटो-यांत, तीन थाळी पाण्यात स्नान करावयाचे!”

त्या मुसलमान पठाण जमादाराची ही आज्ञा होताच मी चरकलो. मी क्षेत्राचाच राहणारा असल्याने नाशिक - त्र्यंबकास संकल्पाच्या शिस्तीने स्नाने करण्याची सवय मला होतीच. मनात हसून म्हटले, तसाच हाही एक संकल्पच म्हणावा. तो गोऱ्या-पाण्यावरचा संकल्प असे. हा काळेपाण्यावरचा स्नानसंकल्प म्हणावा, म्हणजे झाले. त्या दाढीदीक्षिताने तो संकल्प सांगण्यास आरंभ केला. मी स्नान करू लागलो. तो डोळे एकदम गच्च मिटून जाऊन काही दिसेनासे झाले आणि आग होऊ लागली. झाले तरी काय? संकल्पात कोठे चूक तर झाली नाही! इतक्यात कोठेशी चूळही भरली गेली! तो तोंड एकंदर थू थू थू करून बंड करून उठले. जीभ अगदी खारट झाली. तेव्हा साहस करून जमादारास विचारले, “हे पाणी खारट कसे झाले?” तो म्हणाला, “म्हणजे समुद्राचे पाणी कधी गोड असते की

काय?” तेव्हा ध्यानात आले की, आम्हाला हे समुद्रस्नान होत होते. पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याने अंदमानास स्नानास, कपडे धुण्यास, वापरण्यास सर्व समुद्राचे पाणी वापरावे लागते. तेही नळाने आणून कोंडीत साठविलेले.

अंग सगळे चिगचिगीत झाले. केस राठ झाले. स्नान केले नसते तरी बरे असे वाटू लागले. पण पुनः वाटले, आता सवय झालीच पाहिजे. लंडन वा पारीसमधले ‘टर्किश बाथ’ उपभोगिलेत - आता थोडी ‘अंदमानीश बाथांची’ ही गंमत नको का अनुभवायाला! राष्ट्रीय पापांचे क्षालन उंची साबण आणि सुगंधी तेले लावून ऊन पाण्याच्या फवाऱ्याखाली केलेल्या स्नानांनी आणि संस्कृत संकल्पांनी होणारे नसून खारट पाण्याच्या ‘लेव पाणी’ म्हणून ओरडणाऱ्या कठोर संकल्पाचे आज्ञेप्रमाणे घेतलेल्या ह्या तीन कटोरी स्नानानेच होणार आहे!

कपडे घालून पुढे चाललो तो एक विटांनी आणि दगडांनी पक्केपणी बांधलेल्या भिंतीत उंच लोखंडी गज एकसारखे मारून खण भिन्न केलेल्या व लाकडाचा स्पर्शही जिला आगीच्या भयाने झाला नाही, आणि जीमध्ये एकसारख्या खोल्या सप्रमाण मांडलेल्या आहेत, अशी त्रितल-तीन मजली-चाळ मला दिसली. त्या रुंद पायऱ्या, तो पांढरा सफेत रंग, ते जिने आणि ती सप्रमाण बांधणी पाहून एखादा वाडाच पाहावा तसा मनास थोडा आल्हादच वाटला. मनात म्हणालो, हीच ती सातव्या क्रमांकाची चाळ. हिच्या या तिसऱ्या मजल्यावर मला राहावयाचे. वा, उत्तम मोकळा वायू येईल. प्रकाश येईल. स्वतःचे घर असे असते तर आपण श्रीमंत ठरलो असतो आणि क्वचित चार चार महिने या विस्तृत भवनात आणि या हिरव्या अंगणात आपण होऊन सुखाने राहिलो असतो. मग ही बंदीशाळा ही भावना तेवढी सोडून दिली तर ह्या वाड्यातही राहणे अगदीच दुस्सह नाही. राहण्यापुरताच विचार केला तर ‘मम’ आणि ‘न मम’ ह्यातच सुखदुःखाची बीजे आहेत असे वेदान्तीही म्हणतात ते काही व्यर्थ नाही. बरे तर शक्यतो तशीच वृत्ती ठेवावयाची. एवढे फक्कड घर आणि बिनभाड्याने मिळाले असता त्यास बंदीशाला म्हणून उगीच का भ्या? काही दिवस येथे गमतीने का न राहा?

“पण काही म्हणजे किती दिवस?” शंकेने विचारले आणि कुजबुजलो की, तेथेच तर गोम आहे! अंदमानाच्या नियमाप्रमाणे सहा महिन्यांनी बंदींना गृहातून बाहेर सोडण्यात येते. इतरांपेक्षा आपणावर राग, तर फार तर एक वर्ष आत ठेवतील. शिपायांनी आम्हांस सांगितले होते की, तीन वर्षांवर कोणीच मनुष्य आजपर्यंत या सिल्व्हर जेलमध्ये एकसारखा आल्यापासून बंद करून ठेवलेला नव्हता. तेव्हा फार फार तर तीन वर्षे मला आत बंद करतील. परंतु कठिणतम तेच गृहीत धरून त्याच्या प्रतिकाराची मानसिक सिद्धता आधीच करून ठेवावयाची, ह्या माझ्या संकटात अत्यंत उपयोगी पडलेल्या नियमास अनुसरून मी म्हणालो, तेही सोडून फार फार तर पाच वर्षे आपणास ह्या खोलीत कोंडून ठेवतील, असे गृहीत धरू या म्हणजे झाले. ठीक तर, या वाईट नसणाऱ्या बंदीगृहास आपला वाडा असे समजून पाच वर्षेपर्यंत येथेच राहावयाचे आणि काव्य रचावयाचे, असा सरकारी आज्ञा म्हणून नव्हे तर आपलाच स्वेच्छा निश्चय म्हणून नियम करू या.

या मानसिक खेळण्यांशी खेळता खेळता मी तिसऱ्या तळावर (मजल्यावर) पोहोचून त्या खोलीच्या दारापाशी येऊन उभाही राहिलेला होतो. मी तेथे येणार म्हणून ती सर्व चाळ, जीत जवळ जवळ १५० माणसे असत, रिकामी

केलेली होती. केवळ सरकारी दृष्टीने उत्तम परंतु बंदीवानांचे दृष्टीने चहाडखोर, पापी, कुकर्मी आणि उलट्या काळजाचे म्हणून ठरलेले असे तीन 'वॉर्डर' तेवढे ठेवले होते. ते तीनही बलुची आणि पठाणी मुसलमान होते. राजकीय बंद्यांवर आणि यांतही विशेषतः मजवर बहुधा पठाणी बलुची मुसलमानाविना इतर कोणासही पहारा करण्याचे काम सांगण्यात येत नसे. ज्यास ते काम सांगण्यास येई त्यास अर्थातच तो मोठा गौरव वाटे. कारण अधिका-यांचा आमच्यावर विश्वास आहे अशी घमेंड त्यास करता येई. त्यांच्या हातून आमच्या गुप्त खटपटीच्या बातम्या लागणाऱ्या असल्याने आणि अधिका-यांची वाटेल ती अन्यायाची वा क्रूरपणाची कामे करण्यात ते निर्ढावलेले असल्याने या बलुची व पठाणी मुसलमानांस तिकडे अधिकारीही ढिलाईने वागवून, त्यांचे अनियमितच नव्हे तर अनीतिमान वर्तनही क्षम्य मानून इतर सर्वांवर आणि विशेषतः हिंदूवर त्यांचा दाब आणि धाक पडेल असे धोरण ठेवीत. आम्ही राजकीय बंदी सर्व हिंदूच असल्याने, त्या बंदीगृहात आम्ही गेल्यापासून वरील कारणांकरिता हिदू लोकांवर संक्रांत आल्यासारखी झाली. आम्ही हिंदू. हिंदू बंदीवानांवर हिंदू जमादार ठेवला तर आम्हांशी सहानुभूती ठेवण्याचा अधिक संभव. त्यांतही आम्ही राजकीय बंदीवान म्हणून आमच्या हालचालींच्या खऱ्या बातम्या फुगवून, आणि नसलेल्या बनवून अधिकाऱ्यास पोचविण्याचे आणि शक्य तितक्या क्रूरपणे आम्हांस वागविण्याचे उलट्या काळजाचे कसब हिंदूंना स्वभावतः मुसलमानांइतके साधणे अशक्य, म्हणून हिंदूंना बढती मिळणे कठिण होऊ लागले.

दुसरे असे की, पठाणांस या दुष्ट कार्यासाठी डोक्यावर चढवून घेणे अधिकाऱ्यास प्राप्त झाल्याने हिंदूंचा छळ केला असता 'सर्वपापं विनश्यति' म्हणून लहानपणापासून ज्यांना धर्मवेडाने पढविलेले असते असे ते कुकर्मी मुसलमान पठाण हिंदूंविरुद्ध खोट्या कागाळ्या उठवून आणि त्यांचा छळ करून त्यांस अधिकच पीडा निर्धास्तपणे देऊ शकले! कारण त्या मुसलमानांविरूद्ध 'बारीबाबा' कोणाचेही ऐकणार नाही ही सर्वांची अनुभवाने निश्चिती पटलेली होती. अशा रीतीने हिंदू बंद्यांतील अधिका-यांस जागा मिळेनाशा झाल्या. जे हिंदू बंदीवान अधिकारी होते त्यांच्यावर किटाळे रचून पठाण बंद्यांनी त्यांस काढून टाकविले आणि नवीन भरती पठाणी बंद्यांची अधिकाराचे जागेवर होत चालली. पठाण अधिकारी नेहमी पठाणांची बाजू घेत. ही त्यांची जूट सत्कृत्यात वर्णनीयच ठरली असती. पण त्या ह्या पापी एकोप्यामुळे पठाणी मुसलमान, सिंधी मुसलमान, बलुची मुसलमान ह्यांच्या गटांचे बंदीवान अधिकारी आपल्या जातीच्या बंद्यांसही शक्य तो हिंदूंचा छळ करण्यास उत्तेजन देऊ लागल्यामुळे आम्हा राजकीय हिंदू बंदीवानांचे त्या कारागारात पाय टाकल्यापासून तेथेच नव्हे तर उभ्या अंदमानात हिंदू बंदीवानांचे आणि बंदी अधिका-यांचे फारच हाल होऊ लागले! याचे परिणाम कसे दूरवर पोचत गेले हे वृत्त हलके हलके पुढे येईलच. ते वृत्त नीटपणे समजण्यात यावे म्हणून येथेच त्याचे हे मूळ कारण थोडेसे दिग्दर्शित करून ठेवले आहे. त्या मुसलमानांत पठाणी, सिंधी व बलुची हे वैयक्तिक अपवाद सोडून, बहुशः अत्यंत क्रूर आणि हिंदुद्वेषाने ओथंबलेले असत. त्यांच्या बरेच खाली पंजाबी मुसलामान. इतर बंगाली, मराठी, तामीळ इत्यादी मुसलमान बंदीवान वैयक्तिक अपवाद सोडून एकंदरीत इतके दुष्टही नसत वा हिंदुद्वेष्टेही नसत. तथापि या त्यांच्या सौजन्यास दुर्गुण म्हणून वरील क्रूर मुसलमान नेहमी हसत राहिल्याने आणि त्यांस तो "आधा काफरही है" - 'हा तर अर्धा काफरच आहे' असे हिणवीत राहिल्याने हे पंजाबेतर मुसलमानही हळूहळू पठाणी अनुकरण करू

लागत. तथापि ते तत्रस्थ सरकारचे विश्वासपात्र नव्हते. अधिका-यांचा ओढा अर्थातच व्युत्क्रमाने अधिक क्रूरांकडे अधिक ओढला जाई.

म्हणूनच मजवर तर मुसलमानांतच नव्हे तर पठाणांतही जो अगदी निर्ढावलेला वॉर्डर, जमादार वा ‘पेटी ऑफिसर’ म्हणजे बंद्यांतील बढती देऊन केलेला बंदीवान अधिकारी असेल तोच नेमण्यात येई. अशाच त्या तिघा वॉर्डरांचे हाती मला सोपवून, खोलीत बंद करून आणि कुलूप लावून तो जमादार निघून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास ते पठाणी वॉर्डर घाईघाईने माझ्या कोठडीसमोर येऊन “साहेब आता है, खडे रहो” म्हणून म्हणाले. मी दारापाशी आलो. दार म्हणजे कोठडीचे गजांचे नेहमी बंद ठेवलेले फाटक. बारीसाहेब आपल्याबरोबर आणखी काही गोऱ्या लोकांना घेऊन आले. मी त्या कारागारात गेल्यापासून बारीसाहेबांना नवीन महत्व प्राप्त झाले होते. तेथील युरोपियन स्त्रीपुरुषांस मला पाहण्याची आणि शक्य तर काही संभाषण करण्याची इच्छा असे; त्यामुळे त्यांस बारीसाहेबांपुढे ऊद जाळण्याविना दुसरा मार्गच उरत नसे. मोठ्या आर्जवानंतर अगदी गुपचूपपणे म्हणून बारीसाहेब त्यांस बंदीगृहात आणीत आणि मला भेटवून वा दुरूनच दाखवून आपण तुमच्यावर फारच मोठा उपकार केला, पण आता यापुढे झाले हे पचेल कसे ह्या विवंचनेत आपण चूर झालो आहोत अशी गंभीर मुद्रा करून “That will do! That will do” असे म्हणत त्या पाहुण्यांस घाईघाईने परत घेऊन जात. ही संधी साधावी म्हणून पंधरा पंधरा दिवस बारीसाहेबांच्या बंगल्यावर त्यांची मनधरणी करीत असलेल्या गोऱ्या सार्जंटाची आणि स्त्रियांची उदाहरणे मला माहीत आहेत.

‘सरकार’ म्हणून वॉर्डर ओरडताच मी तेथील नियमाप्रमाणे सरळ उभा राहिलो. बारीसाहेब कोठडीच्या गजाच्या लहानशा फाटकातून दिसू लागण्यापूर्वी त्यांचे पोट दिसू लागले. कारण त्यांच्या सर्व शरीरास मागे टाकीत आणि उभ्या जगतास तुच्छपणे आव्हान करीत बारीसाहेबांचे, पृथ्वीचा आकार दाखविण्यासाठी शाळेत ठेवलेल्या फुग्यासारखे, ते पोट दोन पावले त्यांच्यापुढे धावत असे. आणि त्यांच्या त्या पोटावर मध्यापर्यंत चढलेल्या तुमानीचा तो कातडी पट्टा भूमध्यरेषेसारखा शोभत असे.

## सत्तावन्न सालच्या बंडाची चर्चा

बारीसाहेबांनी सुरुवात केली - “मी तुमचा बंदीपाल (Jailer) आहे म्हणून लोक तुम्हास सांगत असतील नाही?” मी नुसते स्मित करीत पाहिले. “पण मी तुम्हास सांगतो की मी तुमचा एक मित्र आहे.” बरोबरीचे पाहुणे अगदी गप्प होते; कारण बारीसाहेब प्रत्यक्ष बोलण्याचा अधिकार अगदी तशाच एखाद्या त्यांच्या पित्त्यास देत, इतरांस नाही. “मला तुमच्यासारख्या सुशिक्षित मनुष्याबरोबर संभाषण करण्याची फार हौस असते. म्हणून मी सहजीच केव्हा केव्हा केवळ मोकळेपणी बोलण्याकरिता असा येतो. तुम्ही काय अठराशे सत्तावनच्या त्या दुष्ट बंडाचा इतिहास लिहिला आहात नाही?” ते ही वाक्ये बोलत असता मी नुसते किंचित हसत बघत होतो. मी ओळखले की, ही स्वारी शीत चाचपून पाहण्यास आली आहे, आणि माझी एकंदर प्रवृत्ती बघण्याचा यांचा हेतू दिसतो. मीही ते काय म्हणतात ते ऐकून घेण्यात आपलाही एकलकोंडीत जड झालेला वेळेचा भार थोडा हलका होईल तर पाहावे या बेतात होतो. मी म्हटले, “त्या विषयावर मी बरीच पुस्तके वाचली आहेत हे खरे.” ते म्हणाले, ‘मग अशा दुष्ट

लोकांविषयी तुम्हास किळस नाही आली? काय हो त्यांचे हे पैशाचिक क्रौर्य! माझे वडील स्वतः त्या बंडात सापडलेले होते. ते आम्हांस सांगत, त्या अधम नानासाहेबाने कानपुरास स्वतः इंग्रजी सभ्य स्त्रियांचे हाल हाल करून त्यांचे तोंडात X X X ! असे ते नरराक्षस!" मी विचारले, "तुमच्या वडिलांनी हे कृत्य स्वतः पाहिले?" ते चटकन म्हणाले, "लखनौला हे कृत्य प्रत्यक्ष पाहिलेल्या एका कर्नलने ते त्यांस सांगितले." मी म्हटले, "तर मग ते खोटे असलेच पाहिजे; कारण नाना लखनौला नसून इंग्रजी स्त्रियांना आणि पुरुषांना बंदीत टाकले त्या वेळेस कानपुरास होते." ते न ऐकलेसे करून बारीसाहेब म्हणाले, "अशी शेकडो उदाहरणे घडली असतील! कारण जशी ही सांगोवांगी दंतकथा ठरली तशीच तीही असणार."

आता त्या पाहुण्यांतील अगदी सभ्य दिसणारा एक गृहस्थ म्हणाला, "परंतु एकंदरीत नानासाहेब, तात्या टोपी इत्यादी बंडखोरांसारख्या स्वार्थी लोकांचा तुम्हास तिटकारा नाही वाटत काय?" मी त्यास म्हटले, "या विषयावर बंदीगृहात चर्चा करणे तुम्हांस योग्य वाटत असेल तर मी करतो; परंतु येथे मी एक बंदीवान असून हे बंदीपाल आहेत. चर्चा करावयाची तर तेवढ्यापुरते बरोबरीचे संबंध तुम्हांस गृहीत धरले पाहिजेत. नाही तर माझ्या तोंडास बंदीवान म्हणून कुलूप ठोकून माझ्या राष्ट्राच्या इतिहाससंबंधी एकपक्षीय आणि अपमानकारक उल्लेख करणे हे निंद्य आणि भ्याडपणाचे वर्तन होय हे तुम्हांस मान्य केले पाहिजे." बारीसाहेब म्हणाले, "छे हो, मी तुम्हास मघाच सांगितले की, मी येथे मित्र म्हणून सध्या उभा आहे. काय पाहिजे ती चर्चा करा." "तर मग" - मी उत्तरलो, "मी मोकळेपणे माझे मत सांगतो. मी हे जाणून आहे की, माझी मते तुम्हास जहाल वाटतील आणि तशी ती आहेत की नाहीत हे पाहण्यासाठीच ही चर्चा असेल. परंतु मला ती लपवून ठेवण्याची कधीच आवश्यकता भासली नाही. हा ऐतिहासिक प्रश्न आहे; आणि जरी त्याविषयी मला काही जाचही होणार असला तथापि त्या जाचाचे भयाने मी माझ्या राष्ट्राच्या इतिहासाचा आणि प्रमुख भूमिकांचा उपमर्द गुपचूप ऐकून घेणे हे भ्याडपणाचे समजतो. आपण नानासाहेबांसंबंधी आता ज्या दंतकथा सांगितल्यात त्यांच्या खरेखोटेपणाविषयी निर्णय करण्यासाठी इंग्रजांनीच एक सरकारी कमिशन नेमले होते. आणि त्याचा निर्णय असा ठरला की, ह्या इंग्रजी स्त्रियांवर केलेल्या नैतिक अत्याचारांची वर्णने खोटी आणि अतिरंजित असून त्यांचा उगम इंग्रजी छावणीतील गोऱ्या सोजिरांच्या कुत्सित मेंदूत आहे."

## स्वार्थी नाही कोण?

"तुम्ही नानासाहेबांस आणि तात्या टोपीस स्वार्थी म्हटलेत-" "होय," तो पाहुणा म्हणाला, "कारण नानास राजा व्हावयास पाहिजे होते, आणि तात्यास मोठेपणा पाहिजे होता." मी म्हटले, "ते अगदी खरे, आणि हेही खरेच आहे की, व्हिक्टर इम्यान्युएलला इटालीचा राजा व्हावयास पाहिजे होते, वॉशिंग्टनला प्रेसिडेंट व्हावयास पाहिजे होते आणि गॅरिबाल्डीलाही मोठेपणा पाहिजे होता!! वास्तविक ते त्यांच्या जातीय स्वातंत्र्यासाठी लढले - हे ह्यांच्या." "तर मग म्हणूनच तुम्हीही बंड उभारलेत की काय?" बारीने विचारले. मी उत्तरलो, "तो प्रश्न अगदी स्वतंत्र आहे. सत्तावन्नचे स्वातंत्र्ययुद्ध झाले म्हणूनच केवळ आजही ते करणे किंवा सत्तावन्नमध्ये जे झाले नसते ते आजही करू नये असे म्हणणे ही दोनही मूर्खपणाची लक्षणेच मी समजतो." ते पाहुणे सत्तावनच्या

राष्ट्रीय बंडाच्या इतिहासावरील एकदोन पुस्तके वाचलेले असावेत असे दिसले. ते मध्येच म्हणाले, "तर मग तुमचे म्हणणे असे आहे काय की, इंग्रजी स्त्रियांची कत्तल बंडखोरांनी केली ही गोष्टच मुळी खोटी आहे." मी म्हणालो, "तसे कोण म्हणतो? ती गोष्ट अगदी खरी आहे; आणि ती करुणास्पदही आहे. परंतु त्याचे कारण काय हा महत्वाचा प्रश्न आहे. त्या स्त्रियांस प्रथम युद्धाचे बंदीवानांना वागवितात तसेच वागविण्यात येई; हे त्यांच्यातील उरलेल्या स्त्रियांच्या आणि इतरांच्या साक्षीवरून उघड होत आहे. त्या कमिशनच्यापुढील साक्षी मी प्रसिद्ध केल्या आहेत. परंतु जेव्हा इंग्रजी सेना कानपूर घ्यावयास वर येऊ लागली तेव्हा अलाहाबादच्या आजूबाजूस असलेली खेडीच्या खेडी आग लावून देऊन जिवंत जाळण्यात येऊ लागली आणि त्यांतल्या राष्ट्रीय बंडात लढत असणा-यांच्या शेकडो बायकामुलांची सरसहा होळी करण्यात आली! तेव्हा त्या बातम्यांनी कानपूरच्या क्रांतिकारकांच्या सैन्यात भयंकर क्षोभ उत्पन्न झाला. इतक्यात ज्या इंग्रजी स्त्रिया युद्धबंदीवान म्हणून कारागारात होत्या त्यांची त्या चालून येणाऱ्या इंग्रजी सेनेस गेलेली गुप्त पत्रे आणि त्यांनी क्रांतिकारकांच्या सैन्याच्या धाडलेल्या बातम्या नेणारी माणसे पकडण्यात आल्यामुळे चिडून जाऊन त्या स्त्रियांचा वध करण्यात आला.

## दोघेही सारखेच दोषी किंवा निर्दोषी

"या क्रूर कृत्यास जितका दोष द्यावयाचा तितकाच इंग्रजी सेनेने केलेल्या अत्याचारास, ज्यांची ती आंशिक आणि अल्पप्रमाणाची प्रतिक्रिया होती, त्यांसही दिला पाहिजे नव्हे काय? आयर्लंडातील ड्रॉचेडाच्या कत्तलीने क्रॉमवेल नरपशू ठरून त्याची इंग्लंडास लाज वाटली पाहिजे असे तुम्ही समजता का? असल्या भयंकर आणि राष्ट्रीय क्रांतीचे प्रसंगी असली कृत्ये घडतात, ही कितीही उद्‌वेगजनक गोष्ट असली तरी त्यामुळे त्या त्या क्रांतीच्या मूळ उद्देशाचाच विपर्यास करण्याचे काही कारण नाही. नानांच्या आज्ञेविना त्यांच्या सैन्यातील क्रांतिकारक सैनिकांच्या त्वेषास बळी पडलेल्या प्रत्येक इंग्रजी स्त्रीवधाचे आधीच केवळ बंडवाल्यास सळो की पळो करण्यासाठी हिंदी लोकांच्या दहा दहा स्त्रिया ज्या इंग्रजी सेनानीचे जाळपोळीस बळी पडल्या त्या इंग्रजी सेनानीचे पुतळे इंग्लंडामध्ये उभारलेले आहेत. नील आपल्या आन्हिकात (डायरीत) म्हणतो, "इंग्रज राष्ट्राच्या कल्याणार्थ ही निर्दयता अवलंबिणे माझे कर्तव्य होते." सत्तावन्नचे क्रांतिकारकासही तेच समर्थन उपयोगी पडणार नाही काय? दोषी असू तर आपण दोघेही कमीजास्ती प्रमाणात दोषीच आहोत. नाही तर कोणीच नाही."

ते पाहुणे म्हणाले, "मी असे मानतो की, ते बंड राजकीय स्वातंत्र्यासाठीच होते; आणि ज्या अनेक अश्लील गप्पा त्या शिपायांविषयी पसरलेल्या आहेत त्याही पुष्कळशा निराधार आहेत. परंतु आज त्यापासून काय धडा घ्यावयाचा?"

"तो माझा प्रश्न नाही. केवळ ऐतिहासिक म्हणून मी इतकी चर्चा केली. प्रस्तुतच्या संबंधाविषयी मी मघा जे म्हणालो त्यापलीकडे या स्थली मला काहीएक सांगणे शक्य नाही."

"बरे, आज नाही तर नाही. पुढे आपण केव्हा तरी ते बोलू," असे अगदी सहजपणे बोललेसे बोलून आणि माझ्या प्रकृतीविषयी सहानुभूतीपर विचारपूस करून बारीसाहेब निघून गेले.

## अनुष्टुप् छंद

पुढे दोन दिवस मला काहीच देण्यात आले नव्हते. पुस्तक महिना दो महिना वर्तणूक पाहून मग देण्यात येईल असे सांगण्यात आले. कागद तुकडा मिळणे तर शक्यच नव्हते. बोलावयास चिटपाखरू देखील नाही. तेव्हा या एकलकोंडीत दिवस घालविण्याचे उत्तम साधन म्हणून मी मागे करीत असलेल्या कविता पुढे रचावयास आरंभ करण्याचे ठरविले. मध्यंतरी समुद्रप्रवासादी गडबडीत हे काम अर्थातच बंद पडले होते; कारण तेथे बोलावयास आणि वाचावयास मिळाल्याने विचारांचा लोकांत फैलाव करण्याचे दुसरे काम करणे शक्य झाले होते. कविता रचावयास बसताच मनात आले की, मराठीत अनुष्टुप् छंदाचा प्रचार जवळ जवळ नाहीसाच झालेला आहे, हे काही ठीक नव्हे. रामायण-महाभारतासारखी महाकाव्ये ज्यात गाइली जाऊ शकतात आणि गीतेसारखे तत्वज्ञानही सुव्यक्त होऊ शकते अशा त्या गोड परिचित आणि काही काव्यप्रकारांस अत्यंत अनुकूल अशा अनुष्टुपाची अगदी विचारपूस करणे सुद्धा सोडून देणे ही हानिकारक निर्दयता मराठीस लांछनास्पद आहे. मोरोपंतांची अनुष्टुपे आणि काही रामदासांची; बाकी कोणी त्यास पुसेनासे झाले आहे. तेव्हा त्यातच एक मंजुल, ललित, लहानसे काव्य रचावे असे वाटले. परंतु अनुष्टुपाकडे इतक्या स्नेहयुक्त सलगीने पाहण्याचा मलाही तो नवीनच प्रसंग. तेव्हा त्या वृत्ताचा नियम काय तो आठवू लागलो, तो आठवेना. जवळ वृत्तदर्पण देखील नाही. इतर अनुष्टुपे शक्य तितकी आठवून व म्हणून, आणि त्यातून काय तो नियम मंथन करून काढीत बसलो. सगळा दिवस त्यात गेला. मात्रा मोजाव्यात तो त्या कशात अठरा तर कशात वीस तर कशात पंचवीस. कशास काही मेळ बसेना. गणवृत्त म्हणावे तर गणही बसेनात. यगण पाहिला, भगण पाहिला, गणांत त्याची गणतीच नाही. इतक्यात पटकन लहानपणी पाठ केलेला एक चरण आठवला. ‘अनुष्टुप्छंद ते ज्याला एक नेम नसे गणी!’ एकच चरण आठवला पण त्याने हाहाःकारच करून दिला. कारण त्या वृत्ताचा नियम काय ही जिज्ञासाच त्या वृत्ताला ‘नेमच ना’ अशा शास्त्रवचनाने भारून टाकल्याने केवळ श्रुतिसौख्यावर अवलंबून अनुष्टुपे रचावयाचा आम्ही सपाटा चालविला.

तीनचार दिवसांनी त्या आमच्या बलात्काराने क्षुब्ध होऊनच की काय, पूर्वी निषाधविद्धाण्डजदर्शनाने क्षुब्ध होऊन जसा आदिकवींचा शोक श्लोकत्वरूप धरून त्या प्रथम अनुष्टुपाचा उच्चार करता झाला तसा वृत्तदर्पणातला हा तिसरा चरण रागावून उठून आमच्या स्मृत्यंगणात उच्चारता झाला. ‘अक्षरें चरणीं आठ’ तर मग अनुष्टुपाला ‘एक नेम नसे गणीं’ हे पद प्रथम देऊन मग नियमाचे पद घेतल्याने वृत्तदर्पणकारांनी केवढी फसगत केली! आठ अक्षरे हा नियम आठवताच सर्व ठीक जुळले. पण आम्ही रचून टाकलेल्या अनुष्टुपाकडे जो बघावयास गेलो तो गंमतच गंमत. कोणाच्या चरणात आठ अक्षरे तर कोणाच्या दहा, तर कोणाच्या वीस! कशास काही मेळ नाही.

अर्थात त्या सर्व अनुष्टुपांची दुसरी आवृत्ती काढावी लागली तरी संपले नाही. कारण नुसती आठ अक्षरे मोजून घातली तर ते केव्हा केव्हा अनुष्टुपांच्या चालीने काही केल्या चालेनासे झाले; अगदी मटकन बसून घेई. प्रथम श्रुतिसौख्याने फसविले तर आता शास्त्रनियमाने! उदाहरणार्थ, ‘सलिलांत नदीच्या त्या प्रतिबिंबित जीं पद्ये’ या चरणात आठ आठ अक्षरे असूनही शेवटी अनुष्टुपाच्या चालीने चालावयाचे ती साफ इन्कार करतात. तेव्हा आणखी काही दिवसांनी उपान्त्य ऱ्हस्व पाहिजे असे एकदोन वृत्तदर्पणातून न दिलेले सूक्ष्म नियम स्वतः शोधून काढावे

लागले. तेव्हा मग केलेल्या अनुष्टुपांस पुनः घासूनपुसून तिसरी आवृत्ती काढावी लागली! ही सर्व मेहनत साधनाभावी. एक वृत्तशास्त्राचे पुस्तक असते तर एका तासात निर्णय लागता. कारागारात मला जे वाङ्मय निर्माण करता आले त्यासाठी साधने नसल्याने कसा विलक्षण त्रास पडे - एका तारखेकरिता, एका शब्दाकरिता आठ आठ दिवस खोळंबून राहावे लागे. कल्पना कितीही बरी असली तरी सोडून द्यावी लागे. केवळ स्मृतीत जे होते त्यावर सर्व उदरनिर्वाह कितीतरी वर्षे करावा लागला.

पण एकदाचे अनुष्टुप जमले आणि त्या वृत्तातच त्या कारागारातील सात क्रमांकाच्या त्या एकान्त कोठडीत ‘कमले’चे ‘रानकमल’ फुलू लागले.

## कारागारातील पहिली गुप्त चिठी

आज मला त्या खोलीत बंद होऊन चार-पाच दिवस झाले असतील. अजून त्या उभ्या भागात मजविना कोणीही बंदीवान सोडलेला नव्हता की मला काही एक बातमी मिळू नये. स्नानासही खोली समोरची, जी चाळीची जाण्यायेण्याची वाट होती तेथेच पाणी मिळे. मी तिसऱ्या मजल्यावरच्या चाळीत होतो. भिंतीस एकसारखे गज मारलेले व त्यामागे ती वाट आणि त्यामागे त्या खोल्यांची रांग अशा त्या चाळी असत. जेवून थोडा वेळ झाला. दुपारच्या वेळी मी खोलीत बसलो असता खालून एक लहानसा दगड गजावर येऊन आपटला. तो खाली पडला. पुनः कोणी तो खालून नीट फेकला. तो गजांमधून निघून माझ्या कोठडीच्या दाराशी येऊन पडला. मी उभाच होतो. समोर खाली पाहिले तो एक वॉर्डर तो दगड उचला असे हाताने खुणावून निघून गेला. मी तो दगड उचलला तो त्याला बांधिलेली एक कागदाची चिठी सापडली. मी ती उघडून वाचतो तो खाली आरडाओरड झालेली ऐकली. दचकलो व दाराशी येऊन पाहिले तो खाली अंगणात पेटी ऑफिसरला माझ्या पहाऱ्यावर असलेला वॉर्डर मोठ्याने हाका मारून बोलावीत आहेसे दिसले. मी तेव्हाच ताडले की, चिठी फेकताना त्या वार्डरला ह्या पहाऱ्यावरच्या पठाण वार्डराने पाहिले असावे आणि त्याला धरण्यास वा माझी कोठडी उघडून झडती घेण्यास हा पेटी ऑफिसरला बोलावीत आहे. इतक्यात तो खोलीपुढे येऊन उभाच राहिला. मला ती चिठी फाडून टाकाविशी वाटेना. कारण एवढ्या धाडसाने ज्याने ती मला पोचविली त्याने तीत काही महत्वाचे असेल म्हणूनच पोचवली असावी. पण ती लपविणे कुठेही शक्य दिसेना. मिनिटामिनिटांनी कुलूप उघडतील, चिठी सापडली तर आणणारा वॉर्डर, धाडणारे लोक आणि चिठीत कोणाची नावे असतील तर ते या सर्वांनाच संकटात पडावे लागेल. तेव्हा खोलीचे कोपऱ्यात त्या वॉर्डरचे दृष्टीआड उभे राहून झटकन शरीरावरच ठेवू नये तशाही ठिकाणी ती चिठी लपवून ठेवल्याविना गत्यंतर उरले नाही. ती मी तशी लपविली की तीत जे काय गौप्य असेल त्याचा घात होऊ नये. तोच पेटी ऑफिसर आला. उद्धटपणाने विचारू लागला, चिठी कोठे आहे? खडा कोणी उचलला? मी सांगितले, मला काही माहीत नाही. माझ्या पहाऱ्यावरच तो पठाणी वॉर्डर, अशा कडेकोट बंदोबस्तात येतो कोण अशा निर्धास्त विचाराने गुंगून बसला होता. तेवढ्यात त्या दगडाचा आवाज झाल्याने उठून पाहू लागलो तो काही तरी खुणा त्या खालच्या वॉर्डराने मला केल्याचे त्याने पाहिले. त्या संशयावरून त्याने हाकाहाक केली. त्यातही तो वॉर्डर हिंदू होता. तेव्हा त्याला धरून कमी करविला असता आपल्या आणखी एका पठाणास वॉर्डरकीच्या जागी घेण्यास संधी मिळाली असती. म्हणून

त्याने हाकाहाक केली. माझ्या चाळीवरील तो पेटी ऑफिसरही मुसलमानच. कारण मजजवळ हिंदू फिरकू द्यावयाचा नाही ही सरकारी प्रतिज्ञा. अखेर माझे कोठडीचे दार उघडून त्या पेटी ऑफिसराने माझ्या अंगाची झडती घेतली. चड्डी, बंडीची शिवण देखील चाचपून पाहिली, पण चिठी सापडली नाही. अर्थातच हिंदू वॉर्डराची झडती झाली. त्याजपाशीही काही सापडले नाही. अर्थातच ते प्रकरण तितक्यावरच मिटले.

## सावधगिरीची सूचना

इकडे मी ते सर्व गेल्यावर शरीरातून चिठी काढून वाचली. तुरुंगातील स्थितीचे वर्णन दिलेले होते की त्यायोगे मला तेथे कोणाशी कसे वागावे ते कळावे. तुरुंगात त्या वेळेस राजकीय बंदी, बंगालची माणिकतोळ्यातील मंडळी आणि अलाहाबादच्या स्वराज्य पत्राचे तीन-चार संपादक, इतकेच होते. मला ज्यांनी चिठी धाडविली ते माझ्या पूर्वपरिचित बंगाली मित्रांपैकी एक होते. त्यांनी असा निरोप धाडला होता की, राजकीय बंदीवान म्हणून सर्वांवर सरसहा विश्वास टाकू नये. बंगाली मंडळींत धरपकड झाल्यानंतर काहीजण गुप्त बातम्या सरकारात देऊ लागले आहेत; त्यामुळे तेथे आमच्यात दोन पक्ष झाले असून अमक्या अमक्या मनुष्याचे सध्या इतकेच काम ठरलेले दिसते की अधिका-यांस प्रसन्न करून तेलाच्या घाण्यासारख्या भयंकर जाचाच्या कामातून आपला जीव वाचवावा. त्यासाठी मागील चळवळीतील न धरलेल्यांची नावे तर त्यांनी दिलीच. पण येथेही आम्ही काय बोलतो, करतो ते तो अधिका-यांस कळवितो. तेव्हा अमक्या अमक्यावर विश्वास ठेवू नका.

बंगालच्या गुप्त कटातील मंडळींतील ही फाटाफूट वाचून मला काही विशेष धक्का बसला नाही; कारण त्यांच्यातील प्रमुखांना धरले जाताच काहींचे धैर्य सुटले होते; आणि कलकत्त्याच्या कारागारातच परस्परांचा विश्वासघात करण्याची अहमहमिका चाललेली होती हे मला बाहेर असतानाच कळलेले होते. काहींचे जरी असे अधःपतन झाले होते तरी म्हणून सर्वच विश्वासघातकी झालेले किंवा धैर्यभंग झालेले होते असे मुळीच नाही. इतकेच नव्हे तर त्यांच्यात ज्यांचे असे कष्ट सहन न झाल्याने अधःपतन झाले त्यांचीही मागची सेवा, देशभक्ती आणि स्वार्थत्याग या सद्‌गुणांचा विसर पडू देणे हे मला अन्याय्य वाटे.

येथे पुनः एकदा स्पष्टपणे सांगून ठेवणे प्राप्त आहे की, ह्या वृत्तान्तातील हे किंवा इतर विचार किंवा भावना म्हणून मी सांगत नसून त्या त्या वेळेस मला त्या त्या प्रसंगानुरूपकाय वाटले आणि काय करावे लागले ते झालेले वृत्त सांगत आहे. केवळ इतिहास सांगत आहे. त्याविषयी मला आज काय वाटते किंवा ते जे झाले ते बरे की वाईट ही चर्चा मी मुळीच केलेली नाही. चर्चा करण्याचा प्रस्तुत स्थली हेतूही नाही. तो प्रश्न अगदी स्वतंत्र ठेवून ह्या आठवणी वाचकांनी वाचाव्यात अशी सावधानतेची सूचना पुनः एकदा देणे मी माझे कर्तव्य समजतो.

## हेरांचे काम

बंगाली राज्यक्रांतिकारकांतील काही प्रमुख व्यक्तींस कष्ट सहन न होऊन कसे तरी करून आलेल्या संकटातून निभावून जावे ही बुद्धी उत्पन्न झाली आणि त्यापायी त्यांच्या साथीदारांच्या, अनुयायांच्या, इतकेच नव्हे तर माझ्यासारख्या त्यांच्यात मागाहून केवळ कारावासातच प्रत्यक्ष परिचित झालेल्या व्यक्तींच्याही हालचाली व

बोलणीचालणी काय काय होतात ते गुप्तपणे इंग्रजी अधिका-यांस कळविण्याचे काम करण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. ही गोष्ट जरी खरी असली तरी तिचा विचार करताना हे ध्यानात ठेवले पाहिजे की, त्या मनःस्थितीप्रत त्यांस पोचविण्यास तसेच भयंकर हाल, अवहेलना आणि शारीरिक कष्ट कारण झाले होते. तसले तसले शारीरिक कष्ट आणि अवहेलना सोसूनही ज्यांचे मनोधैर्य ढळले नाही त्यांनाच काय तो त्यांस दोष देण्याचा अधिकार पोचतो. उगीच जन्मभर आराम-खुर्चीवर लोळत पडलेल्या वाटेल त्या गोमागणेशास तो अधिकार पोचत नाही.

हेही माझ्या ध्यानात असे की, क्रांतिकारकांतील प्रमुखांच्या हातून विश्वासघाताची कृत्ये काही बंगाल्यांतच किंवा हिंदुस्थानातच झालेली नसून शारीरिक हालअपेष्टांनी मनोधैर्य खचलेल्या या हिंदी उदाहरणांहूनही अधिक किळसवाण्या विश्वासघाताची उदाहरणे आयर्लंड, रशिया, इटाली इत्यादिक प्रदेशातील राज्यक्रांतीच्या वा धर्मक्रांतीच्या कोणत्याही भयंकर संग्रामात आढळून येतात. त्यामुळे विशेष डगमगून जाणे वा एखाद्या प्रांतास वा जातीस दोष देत सुटणे मूर्खपणाचे होईल.

## काय ते सांगून टाक

गुप्त चिठीतील लिखाण वाचून मला काही विशेष धक्का बसला नाही. उलट मला त्या धैर्यच्युत झालेल्या व्यक्तींची कीवच आली. त्यांतील एक विशिष्ट उदाहरण येथे दिग्दर्शनासाठी सांगणे युक्त आहे. तेथील क्रांतिकारकांतील एक प्रमुख बंगाली गृहस्थ - कारण ते त्या वेळेसही तिशीच्यावर होते - सुशिक्षित असून ग्रंथकार आणि उत्कृष्ट उत्क्षोभक लेखक म्हणून प्रसिद्ध होते. क्रांतिकारकांस ते गीता शिकवीत तेव्हा देह हा काहीच नसून आत्मा हा अमर आहे. ‘नैनं छिन्दन्ति शस्त्राणि,’ असा उपदेश देत आणि त्यामुळे तरुणांस मरणमारणाची तमा उरत नसे. पण जेव्हा कारागाराच्या दगडी तटांचे प्रत्यक्ष दर्शन झाले आणि बैलांनाही रडकुंडीस आणणारी तेलाच्या घाण्यासारखी कठोर कामे करता करता एक दिवस घेरी येऊन पडावे लागले तेव्हा सूड घेण्यासाठीच की काय, देहाने आत्म्यास पायाखाली तुडवून त्यांचे मनोधैर्याचा चक्काचूर करून टाकला. काही केल्याने ते कष्ट सोसले जाईनात. बरे, एक-दोन दिवसांचाही प्रश्न नाही. उभ्या जन्माचा प्रश्न. ते कष्ट कधीच सुटणारे नव्हते. उलट हट्ट धरला तर अधिक भयंकर कष्ट मात्र भोगावे लागणार. अशा निराशेच्या अंधकारात जीव गुदमरून जावा तसे गुदमरून जाऊन आता काय वाटेल ते कर, पण माझे ऐक म्हणून देह प्राणाशी गाठ घालून ओरडू लागला. पण मार्ग काय? विपत्तींच्या कुंद भिंतींना बाहेर जाण्यास वाट कुठून?

एकच अरुंद, घाणीची कोंदट वाट. ती म्हणजे तुझे साथीदार कोण ते सांगणे. ‘काय ते सांगून टाक’ ही अक्षरे छापलेली पाटी त्या वाटेवर नित्याची लावलेली. त्याच्या या भंगलेल्या मनोधैर्याची बातमीही त्यांच्याच तशाच स्थितीतून सुटण्यासाठी त्याच वाटेने जाऊ-येऊ लागलेल्या त्यांच्या एका मित्राने अधिका-यांस दिली. तेव्हा ती बातमी वर, कोणी म्हणतात, कलकत्त्यापर्यंत धाडण्यात आली. मग त्यांस गोड गोड थापा देण्यात आल्या. बुडत्याला भुसाचा देखील आधार घेऊन पाहावासा वाटतो. त्यांनी तसा विश्वास न वाटताही त्या थापांवर विश्वास ठेवला. एक दिवस अधिका-यांनी ते नाटक अभिनीत करण्याचे ठरवून त्या बेटाचा एक मुख्याधिकारी तुरुंगात

आला. तेलाचा घाणा राजकीय बंदी फिरवीतच होते. तो अधिकारी या गृहस्थांच्या खोलीसमोर येताच बंद कोठडीच्या लहान फाटकाशी येऊन ते अर्ज म्हणून ओरडले. तो अधिकारी मोठ्या प्रौढीने What do you want? म्हणून म्हणत थोडा परत फिरून फाटकापुढे उभा राहिला. तो ते गृहस्थ गुडघे टेकून, हात जोडून कसेही करा पण या यातनांतून मला सोडवा म्हणून करुणपणाने विनवीत असलेले दिसले. अधिका-यांनी उत्तर केले. “बंदीपालास (jailor यास) काय ते कळवा.”

## विश्वासघात

अधिकारी गेले. बंदीपालाने पूर्वीच ठरविल्याप्रमाणे कागद-शाई धाडून दिली. ते गृहस्थ कलकत्त्याच्या कटातील असती-नसती माहिती लिहून देऊ लागले. अर्थातच इतर सर्व क्रांतिकारकांना ते कर्म विश्वासघात वाटू लागले. आश्चर्याची गोष्ट ही की, ते कर्म करण्यास प्रवृत्त झालेल्या त्या गृहस्थासही ते कार्य वाईट आहे हे मान्य करण्याइतका प्रामाणिकपणा त्या दुर्बल मनःस्थितीतही उरलेला होता. त्यांनी एक पत्र आपल्या मित्रास धाडले. “मला कष्ट सहन होत नाहीत. तो टाळण्याचा मार्ग म्हणजे आत्महत्या. मी ती करण्याचा प्रयत्न केला; पण तो धीरही मला करवत नाही. तेव्हा एक तर तुम्ही मागे दुसरे विश्वासघातकी मारले तसे मला येऊन मारा. मी तुम्हांस दोष देणार नाही. तर मला विश्वासघात करून शक्य ती माहिती अधिका-यांस देऊन त्यांची मनधरणी करून या असह्य शरीरयंत्रणातून सुटका करून घेणे भाग आहे. माझे मनावर माझा अधिकार नाही!” ही विलक्षण गुप्त चिठी त्यांनी आपल्या अनुयायांस धाडली आणि अधिका-यांस असल्या-नसल्या माहितीचा कागद भरून बरीच नावे गोवून लिहून दिली.

तिसऱ्या दिवशी त्यांस घाण्याच्या कामावरून काढण्यात आले आणि दोर वळण्याचे त्यातले त्यात सोपे काम देण्यात आले. पण कोठडीबंदी सुटली नाही, कारागाराबाहेरही सोडले नाही.

या गृहस्थास आपण करतो ते निंद्य आहे इतके कळण्याचा आणि मानण्याचा प्रामाणिकपणा उरला होता. त्याचे एकदोन जोडीदार तर या प्रामाणिकपणासही पुरते अंतरले होते. या निर्ढावलेल्या व्यक्तींना माझे येणे म्हणजे एक पर्वणीच सापडली. अधिका-यांना माझ्या एकूण एक हालचाली कळण्याची उत्कट भीतीजन्य इच्छा आणि खऱ्याच नव्हे तर खोट्याही बातम्या मजविरुद्ध सांगून ती इच्छा पुरवून कसाबसा आपल्या मागच्या अपराधांचा अधिका-यांस विसर पाडून आपली सुटका करून घेण्याइतकी या राजकीय बंदीवानांतील दोघा-तिघा बंगाली बंदीवानांचे हे सौजन्य! या दोन पेचांच्या कचाट्यात मला शेवटपर्यंत राहावे लागले. मजविरुद्ध जो जो कोणी चुगली करी तो तो अधिका-यांस प्रिय होई - प्रिय आहे असे ते दाखवीत - आणि त्यास काहीना काही बंदीगृहातील सवलती मिळत. त्यायोगे मजविरुद्ध चुगली करणे हा एक प्रतिष्ठितपणाचा लाभकारक धंदाच होऊन बसला. इतर गर्ह्य, पापी, अपराधी तो धंदा करीत होते यात आश्चर्य नाही. पण त्याच वाहत्या गंगेत ह्या दोघा-तिघा राजकीय बंदीवानांनी पण हात धुऊन आपल्या पोळीवर तूप ओढण्यास कमी केले नाही. त्यांना मिळालेल्या प्रत्येक सवलतीमागे बहुधा माझी एक एक यातना वाढत जात असे. पण ते सर्व पुढे सांगावयाचेच आहे.

प्रस्तुत त्या चिठीत वरील आणि इतर लहानसहान उदाहरणे देऊन बंगाली राजकीय बंदीवानांतील एका पक्षाने दुसऱ्या पक्षाविरुद्ध मला जी कळकळीची सूचना दिली होती ती वाचून मी मनाशी इतकेच ठरविले की, तरीही ज्यांच्या हातून मागे इतकी, करारी, साहसी आणि निःस्वार्थ देशसेवा घडली आहे त्यांच्याविषयी आपण प्रत्यक्ष चौकशी करून परिचयोत्पन्न निश्चिती करून घेईतो काहीही विरुद्ध मत करून घेऊ नये; किंवा जरी त्यांचे हे नैतिक अधःपतन खरे आहे असे आपल्या प्रत्ययास आले तरीही त्यावरून त्यांच्या मागच्या देशसेवेवर शिंतोडे उडवू नयेत. केवळ सावधानतेची सूचना डोळ्यापुढे ठेवून जपून पावले टाकावी इतकेच.

## अब बस हुआ! माफ करो !

त्या चिठीचे दुसरे किंवा तिसरे दिवशी माझ्या क्रमांकातील अंगणात म्हणजे सातव्या क्रमांकाचे भागात राजकीय बंदीवान वगळून इतर बंदीवान कामासाठी सोडण्यात आले. त्या क्रमाकांच्या भागात जवळजवळ दोनशे बंदीवान नारळांचे सोडणे, फोडणे, तुकडे करणे इत्यादी कामावर असत. तेव्हा मजकरिता तो भाग नित्याचा रिकामा ठेवणे शक्यच नव्हते. म्हणून केवळ ती तिसऱ्या तळाची चाळ, जीत मी होतो, तेवढी रिकामी सोडून आता रात्री निजावयास दुसऱ्या खालच्या दोन तळांच्या मजल्याच्या चाळी बंदीवानास मोकळ्या करून दिल्या होत्या. त्या दिवशी दुपारी खाली अंगणात अगदी बाजार भरल्यासारखा झाला. शेकडो - हजारो नारळ गाड्यांत भरून आणून त्यांचा ढीग घातला जाई. त्यात बंद्यांची एक तुकडी ते सोलून त्या पत्र्यांच्या पडवीतून नारळामागून नारळ फेकीत राही. पत्र्यांस लागून धाड धाड आवाज सारखा चालत राही. तिकडे नारळ फोडणारी तुकडी खटाखट घाव घालून घावागणिक नारळ तोडून फेकून देई; ते पाणी पिपांनी भरून भरून वाहून नेण्यात आणखी एक तुकडी गुंग होई. बाकी तीस-चाळीस बंदीवान त्या कापलेल्या वाट्यांस खुरपणीने भोकसून खोबरे तुकड्या-तुकड्यांनी कापून भिरभिर नरोट्या भिरकावीत. नारळाचा तुकडा खाणे तर काय पण अगदी वाहून व्यर्थ जाणाऱ्या नारळाच्या पाण्याच्या पाटातील एक थेंब पाणी पिणे हाही नियमाचे भाषेत अपराध होता आणि प्रत्यही दोन-तीन बंदीवानांस त्यासाठी शिक्षा मिळे. तरीही एकदा कामास आरंभ झाला की, ज्याचे त्याचे तोंड नारळाने भरलेले, मान खाली घातलेली आणि डोळे कोपऱ्यातून कोणी आपल्या भरलेल्या तोंडाकडे पाहत तर नाही म्हणून कावरेबावरे होऊन गरगर फिरत असलेले! त्या बाजारची ती गम्मत, ती दाटी, तो गलका, त्या ऑफिसर (बंद्यांतील ज्या लोकांस अधिकारी करण्यात येई) लोकांचा चलो भाई काम करो! ए साला क्या खाता ! ह्या आरोळ्या. या सगळ्या धांदलीत क्षणभर आपण बंदीवान आहोत याची विस्मृतीच पडे. पण ती कोठपर्यंत तर तोंडातल्या तुकड्यास पेटी ऑफीसरने पाहिल्यामुळे कंबरेवर दाणकन येऊन त्याचा सोटा बसला नाही, किंवा त्या ओझ्याखाली दुपारच्या वेळेस अंग कसकसू लागून 'पुरे आता हा जीव' असे झाले नाही तोपर्यंत !

## दहीनारळ

माझ्याबरोबरच कुठेही न जाता माझ्या त्या सातव्या क्रमांकाच्या चाळीच्या तिसऱ्या तळावर बंद झालेल्या आणि त्या एकान्तवासास कंटाळलेल्या आमच्या पठाण वॉर्डरास त्या दिवशी तो बाजार पाहताच खाली जाऊन थोडे नारळाचे पाणी पिऊन काही दोन-तीन नारळ मुखशुद्धी म्हणून तोंडात टाकावेत असे न वाटणे अगदी अस्वाभाविक

होते. बरे, मजवर नेमलेला तो वॉर्डर म्हणजेच अधिकाऱ्याच्या पुङ्ग्यातला. त्यास कोण भिणार नाही? दे नारळ म्हणताच त्यास कोण गुपचूप खोबरे काढून देणार नाही? दुपारी ते राजश्री पेटी ऑफिसरास, तोही पठाणच असल्याने, खुणवून, चाळीचे फाटक उघडून खाली अंगणात गेले. पाण्याची- नारळाच्या पाण्याची - दोन-तीन शहाळी कोवळी कोवळी तोडवून घेऊन गटागट पोटात ओतून दिली. आता मुखशुद्धी तेवढी उरली. नेहमीप्रमाणे नरोट्यातून नारळ 'खुरपून' काढणाऱ्या बंदीवानांची जी लांब ओळ बसली होती तेथे जाऊन एकास "हात चलाव" म्हणून धमकी दिली. वॉर्डरला पाहून घाबरून तो बंदी हात चालवितो, म्हणजे काम लवकर करू लागतो न लागतो तोच वॉर्डर महाराजांनी स्वतःच हात चालविण्यास आरंभ केला; आणि शेजारच्या एका बंदीच्या उगीच तोंडात एक चपराक ठेवून दिली की, "नारळ खाता है नहीं ? देखो मुँह देखो!" नारळ खाण्याकरिता त्या बंदीवानाचे तोंडात देण्याचे संपताच सर्वत्र अनुकूल वातावरण उत्पन्न झालेसे त्यास वाटले; कारण आता आपण कोणासही नारळात उत्तम म्हणून जो दहीनारळ म्हणून तिकडे प्रख्यात आहे तो देण्याविषयी सांगितल्यास भीतीने ना म्हणण्याची त्याची प्राज्ञा होणार नाही. असे नेहमीच्या अनुभवाने त्यास पक्के कळून चुकले. तोच एका मद्राश्याच्या आणि त्यातही नवख्या आलेल्या बंद्याच्या हाताशी लपवून ठेवलेला दहीनारळ उल्लेखित वार्डरसाहेबांच्या दृष्टीस पडला. त्वरित स्वारी तेथे पोचली. "लाव साला नारळ इधर" म्हणून आज्ञा झाली. पण तो मद्रासी जरा ऐटीतच दिसू लागला. तो मद्रास इलाख्यातील एक नावाजलेला दरोडेखोर होता. तामील तुरुंग अनेकवार पाहून निर्ढावून आता प्रथमच काळ्यापाण्यावर आलेला. तोही दहाच वर्षे शिक्षेसाठी; म्हणून फारसा भ्यालेलाही नव्हता. त्यातही त्यास हिंदुस्थानी खरोखरच फार थोडे येत असल्याने "इल्ले इल्ले" म्हणजे "नाही, नाही" म्हणून वेळ मारून नेण्याचा मद्रासी बंदीवानांचा जन्मसिद्ध अधिकार त्यास प्राप्त झालेला. तेव्हा वॉर्डराच्या उर्मट आज्ञेस त्याने जरा ऐटीनेच "इल्ले" म्हणून ठराविक उत्तर दिले. तो दहीनारळ त्याने चांगली एक आण्याची तंबाखू देऊन गुप्तपणे नारळ फोडणा-यांपासून विकत घेतलेला. तो त्याच्यासारखा निर्ढावलेला बंदीवान त्या वॉर्डरास सहज कुठला देणार? पण त्या पठाणी वॉर्डरास असा नाही म्हणणारा हिंदू बंदी सहसा भेटत नसल्याने ते अगदी चढेल झालेले असत. त्या मद्राश्यास त्या वॉर्डराने शिवी देऊन पुनः तो नारळ मागितला. मद्रासी सामोपचारच बरा असे समजून कळवळून "इल्ले स्वामी इल्ले" म्हणून वेड पांघरू लागला. पठाण रागावला. पठाणांच्या आणि मुसलमानांच्या नेहमीच्या प्रवृत्तीप्रमाणे स्वार्थी भांडणही हिंदूंशी होताच ते धार्मिक युद्धातील एक पवित्र कर्तव्य भासू लागले. पठाणाने आणखी शिव्या हासडून "ए काफर है साला इसकी चोटी उखाडना चाहीये" - हा हिंदू आहे साला, याची शेंडीच उपटली पाहिजे- असे गर्जून त्या मद्राश्याच्या शेंडीस हात घातला. त्या मद्राश्याला हिंदुस्थानी खरोखरच समजत नव्हते, त्यामुळे तो क्षणभर गोंधळला. त्यास वाटले, हा मला काही ठीक गोष्ट सांगत असूनही मी मानली नाही काय? पण वॉर्डरने त्यास शेंडीने हिसडून त्या दहीनारळास हात घालताच मद्राश्याने त्याची दाढी धरून ओढाताण चालविली. ओरडले असे कोणीच नाही; कारण दहीनारळाची गुपचूप चोरी करण्याचा डाव दोघांचाही होता.

## बस हुवा, माफ करो !

शेवटी पठाण वॉर्डराने इतर बंदीवान आपणास हसतात असे पाहताच नेहमीच्या सवयीप्रमाणे सोटा काढून त्या मद्राश्यास जोराचा दणका मारला आणि त्याची शेंडी असी हिसकली की ती अर्धी उखडून निघाली. 'काफर' साला

काफर म्हणून रागाने जळफळत पठाण त्यास मारीतच होता. शेवटी एकदम काय झाले की, तो मद्रासी जो उसळला तो एक ना दोन शब्दही न बोलता त्या वॉर्डर-महाशयाच्या दाढीचा हातास पीळ मारून आणि त्यास उचलून धाडकन भूमीवर पाडता झाला; आणि त्याच्या छातीवर गुडघा रोवून ताड ताड तोंडात भडकावीत चालला. पेटी ऑफिसर हा त्याचा मित्र पठाण वॉर्डर तिकडे आला म्हणून लांब आडोशास जाऊन नमाज पढत होता. त्या वॉर्डराच्या पीडेस कंटाळलेले बंदी कुणी आरडाओरड फारशी न करता जागा धरून गंमत पाहत राहिले. मला वरतून गजाशी उभे राहून हे पाहताच हसू कोसळले. वॉर्डर महाशयाची जी उभ्या तुरुंगास भिवविणारी पठाणी टोपी, तो फेटा कुणीकडच्या कोणीकडे गेलेला, आणि ओठातल्या ओठात काही तामील शब्द पुटपुटत तो मद्रासी त्याच्या दाढीस पिळून धरून ठोशामागे ठोसा चढवीत उरावर बसलेला! वॉर्डर महाशय 'काफर' म्हणून म्हणतील तर शपथ ! गुपचूप दहीनारळाचे ठिकाणी मार खात स्वारी पडलेली आणि त्या स्वारीवर मद्रासी स्वार झालेला! अखेर एकदोन मिनिटांनी पठाण वॉर्डराने तोंडात खाताखाताच म्हटले "अब बस हुआ ! माफ करो!" ठेचाळून कासावीस झालेल्या ध्वनीने म्हटलेले ते वाक्य ऐकून मला वाटले आता त्या मद्राश्याने त्यास सोडून देणेच योग्य होय. पण पाहतो तो मद्रासी भयंकरच चवताळून मोठ्याने तामील भाषेत शिव्या हासडीत त्या पठाणाचे डोक्यावर वेगाने बुक्के मारू लागला.

## माफ करोतील 'मा'

कारण हिंदूस्थानी जवळजवळ येतच नसल्याने त्या मद्राश्यास माफ करो ह्यातील 'मा' तेवढी कळली, आणि त्याला वाटले की वॉर्डर मला अजूनही मायबहीणी वरून शिव्या हासडतो आहे. जो जो पठाण म्हणे अब बस ! माफ करो ! माफ करो ! तो 'मा' 'मा' म्हणून दरडावीत तामील भाषेत शिव्या हासडीत तो मद्रासी डोक्यावर ठोसा चढवीत राहिला.

शेवटी जो गोंधळ व्हावयाचा तो होऊन पेटी ऑफिसर व बंदीवान सर्व धावत आले. ती झुंज सुटली. तो संतप्त मद्रासी हाताने आणि तोंडाने मिळून बडबडू लागला की, "साहेब - हम - तुम - मार!" ह्या हिंदुस्थानी शब्दांत हावभाव करीत आणि गळयावर बोट लावून दाखवीत त्याने स्पष्टपणे असे बजावले की, जर ही गोष्ट साहेबाचे कानावर घालून मजवर खटला भरशील तर मी तुला गळा दाबून ठार मारावयास सोडणार नाही.

तसल्या मद्राश्याची ती धमकी, सवाशेर पाहताच पावशेर होऊन जाण्याचा पठाणी शेरांचा उपजत स्वभाव, आणि वरच्या चाळीत बंद असलेला हा वॉर्डर नियमाविरुद्ध खाली अंगणात येऊ दिला का म्हणून भावी खटल्यात पेटी ऑफिसरविरुद्ध उठणारा पहिलाच नैयमिक कायदेशीर प्रश्न या सर्व गुंतागुंतीस भिऊन पेटी ऑफिसर व ते वॉर्डरमहाशय कोणीच साहेबांस ती गोष्ट सांगणे योग्य समजले नाहीत. आणि तीन-चार दहीनारळ खाऊन जी मुखशुद्धी करावी म्हणून वॉर्डरमहाशयास इच्छा उत्पन्न झाली होती ती मुखावर खाल्लेल्या मद्रासी ठोशांच्या मुखशुद्धीवरच तृप्त करून आपले विखुरलेले कपडे सावरीत सावरीत आणि साफा बांधीत बांधीत स्वारी पुनः त्या चाळीच्या तिसऱ्या तळावर येऊन आमच्या पहाऱ्यावर उभी राहिली!

जणू सहजगत्या मी त्यास विचारले की, काय झाले? पठाण वॉर्डर, मी पाहिले नसावे असे समजून ऐटीने म्हणाला, "वो एक चोर साला, दहीनारळ चोरी करना मंगता था ! वो खूप पीटा गया! " मी सस्मित उत्तर केले, "ठीक ! एक चोर साला दहीनारळ चोरी करना मंगता था वो साला खूप पीटा गया नही !"

तो साला चोर जो पीटा गया तो कोण हे त्या पठाणाचे पठाणास माहीत की माझे मला!!

प्रकरण नववे

# तत्रस्थ राजबंदीवानांची पूर्वस्थिती

आता ज्या त्रितल चाळीत मला बंद केलेले होते तिच्यात राजकीय बंदीवानांवाचून इतर बंद्यांस कामासाठी आणि राहण्यासाठी सोडविण्यात आल्याने मला तुरुंगातील बऱ्याच उलाढाली कळू लागल्या. ज्या विषयासंबंधी मला उत्सुकता होती तो विषय म्हणजे अर्थातच राजकीय बंदीवानांची तेथील स्थिती आणि माझे ज्येष्ठ बंधूंची खुशाली हा होता. त्याविषयी गुप्तपणे या ना त्या रीतीने मला बरीच माहिती कळली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी भयंकर कृत्ये करून जे लोक तसल्याच भयंकर शिक्षा पावले त्यांची काय गत झाली, हे जाणण्याची वाचकांस उत्कंठा असेल म्हणून ते वृत्त सविस्तर तर नव्हेच पण संक्षिप्तपणेही जरी येथे देता येत नाही तरी जितके देता येईल तितके देऊन आणि सूचित करून ठेवण्यास हा प्रसंग योग्य आहे. एतदर्थ त्यांची प्रारंभिक काही माहिती देतो.

## बॉंबगोळेवाले

अंदमानामध्ये प्रथमतः जे आधुनिक राज्यक्रांतिकारक गेले त्यांत माणिकतोळा बागेच्या कटातील बंगाली गृहस्थ आणि त्याचे अगदी मागोमाग महाराष्ट्रातील श्री. गणेशपंत सावरकर आणि श्री. वामनराव जोशी हे गृहस्थ होते. त्यांच्या मागेपुढेच बंगाल्यातील एका राजकीय दरोड्याच्या संबंधात पाच-सहा लोक आले होते. या सर्व राजबंदींत यावज्जीवन काळेपाणी झालेले म्हणजे बंगाल्यातील तिघे आणि महाराष्ट्रीय दोघे हते. बाकी बंगाली मंडळी दहा वर्षांपासून तीस वर्षांपर्यंत शिक्षा झालेली होती. मी तेथे गेलो तेव्हा या मंडळींव्यतिरिक्त अलाहाबादेच्या स्वराज्य पत्राचे चार संपादकही सात ते दहा वर्षे शिक्षा लागून आलेले होते; परंतु त्यांच्यावर राज्यक्रांती करण्याचा आरोप नसून राजद्रोहाचा ठेवलेला होता. इतकेच नव्हे तर ते खरोखरच राज्यक्रांतीच्या तत्वाशी अगदी अपरिचित आणि व्यवहाराशी विरुद्धही होते. परंतु केवळ राजद्रोहाच्या अपराधासाठी शिक्षा देऊन त्यांस क्रांतिकारकांत नेऊन ठेवल्याने त्यातील काहीजणांस राज्यक्रांतीची तत्वे देखील परिचित आणि व्यवहारसंमत होऊ लागली इतकाच काय तो त्या शिक्षेचा परिणाम झाला. मला आता कोणत्या खटल्यात कोण कोण होते आणि कोणा व्यक्तीची काय मते होती ते निश्चितपणे आठवत नाही म्हणून सर्वसाधारण निर्देश करूनच समाधान करून घेणे प्राप्त आहे. वर उल्लेख केलेल्या मंडळींव्यतिरिक्त आणखी एक राजबंदी तेथे असावेत असे वाटते. प्रथमतः गेलेल्या लोकांत बंगाली मंडळीच अधिक असल्याने आम्हां सर्वांनाच लोक बंगाली म्हणत. पण पुढे पुढे जेव्हा पंजाबादिक प्रांतातून शेकडो लोक येऊन थडकले तेव्हा आम्हांस असेच दुसरे एक अडाणी नामाभिमान झाले. ते म्हणजे 'बॉंबगोळेवाले.'

## जीभवाले अथवा राजकैदी

राजकीय बंदीवान याचा अर्थ तर काय पण तो शब्दच ज्यांनी जन्मात ऐकला नाही त्या हजारो बंदीवानांस ती कल्पना सुचणार वा समजणार तरी कशी? त्यांत बहुतेकांना बॉंब फेकण्याचा अभ्यास केल्याची कल्पना धारण करता आली आणि त्याच सामान्य लक्षणाने आमच्या वर्गाच्या सामान्य निर्देशाचे काम चालवून घेण्यात आले. बारीसाहेबांना जेव्हा राजकीय बंदीवानांची आवश्यकता पडे तेव्हा तेव्हा "जाव, वो सात नंबरका बॉंबगोलेवाला लाव"

किंवा “सब बाँबगोलेवालेको अभीके अभी बंद करो” म्हणून गर्जना होई आणि सर्वांस ते समजे. मी गेल्यानंतर मी वेळी अवेळी बंदीवानांस समजावी की, अरे, बाँबगोळ्यांनीच लढावे असे सांगण्याचा आमच्यावर आरोप नव्हता. सरकारशी लढावे हे सांगण्याचा-स्वराज्य स्थापावे हे सांगण्याचा आरोप होता. आमच्यात काही पिस्तुलांनी, काही बंदुकांनी आणि काही तर केवळ लेखणींनीच लढत होते. काहींनी तर बाँब पाहिला देखील नव्हता तर मग बाँब चालविण्याची गोष्टच नको. जी काय आम्ही सर्वांनी चालविली ती जीभ होय. मग आम्हास तुम्ही ‘जीभवाले’ म्हणत जा. ‘बाँबवाले’ का म्हणता? ‘म्हणजे’ ते हसून म्हणत, “मग तुम्ही खरे काय नाव ते सांगा. आम्ही ते म्हणू.” मी म्हणावे, “आमच्या वर्गाचे खरे नाव ‘राजकीय बंदी’ बरे, ते नाही सहज उच्चारता येत तुला? तर ‘राजकैदी’ इतकेच म्हणत जा.” हा शब्द मात्र त्यांना झटकन उच्चारता येई. पुढे तो रूढ झाला. तथापि बारीसाहेबांना मात्र तो मुळीच खपत नसे. आम्हांस कोणी ‘बाबू’ (हा शब्द अंदमानात सन्मानदर्शक म्हणून लावतात.) म्हटले तरी बारीसाहेब ओरडावयाचा “कौन बाबू है? साला! वे भी सब कैदी हैं!” मग ज्या बारीसाहेबास इतर बंदीवानांत ज्यांस लिहिणे येई त्यांस बाबू म्हटल्याचा राग येत नसून केवळ आम्हांस मात्र बाबू म्हणून बंदीवानांनी म्हणावे हे मुळीच खपत नसे, ते बारीसाहेब आम्हांस राजबंदी अथवा राजकैदी म्हणून लोकांस थोडेच म्हणू देणार?

## ‘डी’ तिकीट

आम्ही ‘पोलिटिकल प्रिझनर्स’ नाही हे मरेतोपर्यंत बारीसाहेब घोकीत होते. कोणी बंदीवानाने त्यांच्या समक्ष राजकैदी म्हटले की साहेब गरजलेच “कौन राजकैदी? वो तुम्हारे माफक ही एक मामुली कैदी है। बदमाष कैदीओंका ‘डी’ तिकिट देखता नहीं तुम उसके छातीपर?” बदमाषांतील अट्टल बदमाषास खूण म्हणून एक ‘डी’ म्हणजे ‘डेंजरस’ (भयंकर) या अर्थाचे अक्षर खोदून आम्हां सर्वांस कपड्यावर लावावयास बिल्ला दिलेला असे. तरी देखील मला पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत बंदीगृहात ‘बडा बाबू’ म्हणूनच सर्व संबोधीत असत. फार काय स्वतः बारीदेखील चुकून अनेक वेळेला बोलून जाई “ए हवालदार, जाव, वो सात नंबरके बडा बाबूको बुलाव!” त्याचप्रमाणे आमच्या उपदेशाने राजकीय चळवळीचे मर्म जसे जसे बंदीवानांस कळू लागले तसे तसे ते आपण होऊनच आम्हास ‘राजकैदी’ म्हणून संबोधू लागले. त्या शब्दात अंतर्भूत असलेल्या स्वराज्यार्थ झटण्याच्या ज्या विचारासाठी बारीसाहेब त्या नावाचे नाव देखील काढू देत नसत त्याच विचाराचा प्रामुख्याने उल्लेख बंदीवानांच्या चित्तावर ठसावा म्हणून मी त्याच नावाने आम्हांस उल्लेखावे म्हणून सर्वांस शक्य तो शिकवी आणि अखेर तोच शब्द प्रचलित झाला. बारीसाहेबापासून तो अगदी वरच्या अधिका-यांपर्यंत तुम्ही ‘पोलिटिकल प्रिझनर्स’ नाही, साधारण पापी बंदीवान आहा हे जसे शपथेवर शंभर वेळा निक्षून सांगितले असताही आम्ही सर्व अखेर ‘पोलिटिकल प्रिझनर्स’च ठरलो; त्याचप्रमाणे त्यांनी कितीही धाकदपट केली तर बंदीगृहापासून तो अंदमानातील स्वतंत्र वसतीपर्यंत आम्ही ‘राजकैदी’ म्हणूनच संबोधिले जाऊ लागलो.

## क्रूर देवतेला नैवेद्य

मी अंदमानास जाण्याच्या पूर्वी जे राजबंदी तेथे गेले म्हणून वर लिहिले त्यांस प्रथम एकाच चाळीत एकत्र ठेवण्यात आले होते. त्यांच्यावर एक पठाण बंदीवान अधिकारी होता. नारळाची सोलून काढलेली जाड साले - ज्यात नारळाचे फळ सापडते ती, ज्यांस तिकडे 'छिलका' म्हणतात आणि कोकणात 'सोडणे' म्हणतात ती -वाळवून कुटावयाची आणि त्यांच्यातील काथ्या नीट काढून साफ करून द्यावयाचा हे काम त्यांस दिलेले होते. ते कामही कठीणातलेच होते तरी तेलाच्या घाण्याइतके कठीण नव्हते. वास्तविक पाहता ज्या बंदीवानांना पुरती इंग्रजीची स्पेलिंगेही येत नाहीत त्यांना देखील आल्याबरोबर किंवा थोडे आगेमागे लिहावयाचे काम देण्यात येऊन 'बाबू' म्हणून बंदीवानांवर अधिकार देण्यात येतो. पण राजकीय बंदीवानांत मात्र कोणालाही लिहिण्याचे काम न देण्यात येता त्यांच्या जन्मातही जी त्यांनी केली नव्हती ती काबाडकष्टी कामे देण्यात आली. क्वचित त्यांस नुसती स्पेलिंगे येण्याहून किती तरी अधिक इंग्रजी येत होते. या त्यांच्या शिक्षणातील न्यूनतेसाठी ते लिहिण्याचे काम करण्यास अपात्र समजले गेले असतील !

तथापिकाम जरी काबाडकष्टाचेच होते तरी सर्वांना एकत्र राहता येई हाच लाभ त्या समाजप्रिय सुशिक्षित मनुष्यांस सुखद होई. त्यांतील एक-दोघांस काही रोग असल्याने दूध मिळे. ते दूध त्यांच्यावरील पठाण अधिकाऱ्यास नैवेद्यार्थ गुप्तपणे समर्पित केले जात असल्याने ती क्रूर देवताही थोडीबहुत कमी उग्र झालेली असे. या दोन गोष्टींमुळे एकंदरीत त्या वेळेस राजकीय बंद्यांची अवस्था तुरुंगातल्या मानाने अगदीच दुःसह नव्हती. माझे ज्येष्ठ बंधूही त्याच चाळीत असत.

परंतु काही महिने असे जाताच कलकत्त्याहून पाहणीसाठी xxx नावाचे एक पोलीस अधिकारी अंदमानास आले. त्यांनी येऊन जेव्हा राजकीय बंदी 'छिलका' कुटीत आहेत आणि एकत्रच - जरा अंतराअंतरावरच - ठेवलेले आहेत हे पाहिले तेव्हा बंदीगृहातील माणसांस इतक्या तरी माणुसकीने वागविण्यात यावे याचा त्यांना साहजिकच विषाद वाटला. त्यांनी अंदमानाच्या अधिका-यांची कानउघाडणी केली; आणि हे बंदीवान काही खुनी, चोर, दरोडेखोरांसारखी सच्छील आणि दयार्द्र माणसे नसून अट्टल बदमाश राजकीय बंदीवान आहेत आणि त्यांची खोड मोडेल असेच त्यांस इतःपर वागविले जावे असे उच्च राजकीय तत्वाचे मर्म ह्या स्थानिक आडदांड अधिका-यांच्या चित्तावर ठसवून दिले.

## तेलाचा घाणा

तेव्हापासून मनू बदलला. त्या राजबंदीवानांस निरनिराळ्या चाळींत एकएकटे कोंडण्यात आले. त्यांनी आपसात अवाक्षर बोलताच बेड्या, हातकड्या इत्यादी शिक्षा देण्याचा सपाटा चालला. स्नानाचे हौदावर किंवा जेवावयास दूरच्या टोकास बसले असता नुसते 'बरे आहे ना?' म्हणून खुणा करण्यासाठी शिक्षा सात दिवस हातकडी ठोकून उभे राहणे अशा होऊ लागल्या आणि अंती ते छिलका कुटण्याचे काबाडकष्टाचे कामही स्पेलिंगपेक्षा अधिक इंग्रजी येणाऱ्या माणसांस देणे अन्याय्य वाटून बैलाकडून करवून घेण्याच्या योग्यतेचे तेलाचा घाणा ओढण्याचे तुरुंगातील कठीणतम काम त्यांस देण्यात आले. खोड मोडली पाहिजेना ! दोन दोन महिने हे काम

केल्यानंतर एक महिना पुनः छिलका देण्यात येई की पुनः तेलाच्या घाण्यास त्यांना जुंपून देण्यात येई. सकाळी उठताच लंगोटी नेसून खोलीत बंद व्हावयाचे. आत घाण्याची दांडी हातांनी चाक फिरवतात तशी फिरवावयाची. खोबरे त्या उखळीत पडले की ती इतकी जड जाई की कसलेले हमाल देखील तिच्या वीस फेऱ्या फिरविताच रडकुंडीला येत. विशीच्या आत ते काम चोर दरोडेखोरांसही सहसा देत नसत; पण राजकीय बंदीवानांनी मात्र ती दांडी वाटेल त्या वयात फिरविण्यास हरकत नाही असे अंदमानी वैद्यकशास्त्राचे मत असे. त्यामुळे त्या दांडीस हातांनी उचलून अर्धा गरका देऊन वर केल्यास बाकीचा अर्धा गरका देण्यास लागणारा जोर हातांत नसल्याने तिला लोंबकळून तो पुरा करावा लागे. इतका त्या घाण्यातील खोबरे पिसण्यास जोर लागे. इतक्या काबाडकष्टास अगदी अनोळखी आणि कोमल वयाचे ते विशीच्या आतबाहेरील सुशिक्षित राजबंदी असत. सरासरी सकाळी दहा वाजेपर्यंत एकसारखे असे गरके फिरविता फिरविता श्वास जड होई. कोणा कोणास- नव्हे बहुतेकांस - खरोखरच चक्कर येऊन वारंवार खाली बसावे लागे. दहा वाजता नियमाप्रमाणे दोन तास कामे बंद असावयाची. पण 'कोलूचे' म्हणजे या घाण्याचे काम बंद ठेवले जाणारे नसे. जेवण येताच खोली उघडण्यात येई. बंदीवान बाहेर येऊन थाळीत भातवरण पोळी घेऊन आत फिरला की दार पुनः बंद. जरी कोणी हात धुऊन घामाने भरलेले अंग साफ करू लागला तरी देखील तितका उशीर सहन न होऊन जमादार- म्हणजे बंदीवानातील बदमाष जो कोणी अधिकारी केलेला असे तो आईमाईवरून शिव्या हासडू लागलाच म्हणून समजावे. हात धुण्यास पाणीच मुळी कोठून मिळणार? पिण्यास पाणी मिळण्यासाठी जमादाराचे आर्जव करावे लागे. कारण कोलूत काम करताना तहान मनस्वी लागे. पाणीवाला पाणी देत नसे. चोरून कोणास तंबाखूची चिमटी दिली तरच देई. जमादारास सांगावे तर तो ओरडे "कैदीको दो कटोरा पाणी देनेका हुकूम है, तुम तो तीन पी गया; और पानी तुमारे बाफ घरसे लाव!" जमादाराच्या वास्तविक भाषेचे हे अगदी सभ्य शब्दांत आम्ही भाषांतर केले आहे. हात धुण्याच्या आणि पिण्याच्या पाण्याची येथे ही स्थिती तेथे स्नानाचे नाव कशास?

## 'तेल पूरा करना पडेगा!'

स्नानाचेच कशाला जेवणाचीही तीच स्थिती. जेवण वाढून दार बंद करताच जमादाराला ही चिंता नसे की बंदीवान ते जेवतात की नाहीत. त्यास ही चिंता असे की, ते पुनः तो कोलू फिरवू लागले की नाही. तो सारखा त्या चाळीतील कोठड्यांपुढून ओरडत चाले, "बैठो मत, शाममें तेल पूरा करना पडेगा! नहीं, तो पीटे जाओगे और सजा भी होगी वो बात अलग ही!" हे त्यांचे ओरडणे ऐकताच कित्येकांस पुढे घास गिळणेही अशक्य होई. कारण संध्याकाळी तेल कमी भरताच प्रत्यही लाथाबुक्यांखाली आणि सोट्याखाली बंदीवान तुडविले आणि पिटले जाताना प्रत्येकजण पाहत असे. या धाकाने पोटात त्या कष्टांनी भयंकर भूक लागली असातानाही कोलू फिरविताच उभ्या उभ्या घामाच्या धारा ज्यात पडतातच आहेत त्या थाळीतील घास तोंडात भरीत आणि गिळीत आणि कोलू फिरवीत. असेच जेवण आटोपीत असताना कित्येक बंदीवानांस मी अनेक समयी प्रत्यक्ष पाहिले आहे.

असे ते जेवण जेवून पुनः पाच वाजेपर्यंत कोलू फिरवीत राहावा लागे. सवयीनंतर कोणाचा चार वाजता होई. अगदी निर्ढावलेला शंभरात एखाददुसराच मनुष्य सदोदित पुरे काम म्हणजे ३० पौंड तेल काढू शके. बाकीचे आज

ना उद्या इतके काबाडकष्ट करूनही काम पुरे करण्यास असमर्थ होत. त्यांच्यात जे नवशिके, साधे, आणि सापेक्षतः प्रामाणिक असत, हाय हाय ! त्यांच्यावरच जमादार-वॉर्डरांचा मार पडे. पुरे न जेवताही काम केले तरी तेल पुरे न होऊन थपडा, लाथा, काठ्या खात थकलेले ते बंदीवान तेल ओतून रडत परत चाललेले मला अजून दिसत आहेत ! नरम स्वभावी बंदीवानांची ही दशा ! जरा निर्ढावलेला असेल अगर तापट असेल त्यास हातकडी, दंडाबेडी इत्यादी या मारपिटीपेक्षाही सुसह्य अशा शिक्षा. या व्यवस्थेने बंदीगृहात पाय टाकल्यावर असलेला सच्छीलपणा, उरलेला प्रामाणिकपणा आणि अवशिष्ट असलेली लज्जा देखील माणसातून निघून जाते. ज्याची लज्जा निघून जाते तीच माणसे शेवटपर्यंत बंदीगृहात जगतात, निदान जे काही जगतात ते बहुधा त्यांच्यातीलच असतात.

## रात्रीचे कोलूवरील काम

कारण निर्ढावलेल्या, तापट आणि अट्टल बदमाषांसही बारीसाहेब अगदीच ढिले सोडीत असे नाही. सरळ साध्यांना मारपीट प्रथम आणि येता जाता होई; कारण गोगलगायींना तुडविण्याचा पराक्रम करणे वीर पुरुषांस केव्हाही सोपेच जाते. त्यातही त्या साध्या दुबळ्या कोडग्यांस मारपीट चाललेली पाहून ज्या बदमाषांचे तेल पुरे झाले नसे त्यांसही अधिक त्रास दिला तर आपणासही असेच प्रायश्चित्त मिळेल ही भीती साहजिकच पडे आणि त्यांतील काही काम पुरे करण्यास धडपडत. इतक्यावर एखादे दिवशी खोबरे ओले असले आणि कोणाचेच तेल पुरे संध्याकाळपर्यंत झाले नाही तर बारीसाहेबापाशी दुसरी एक तोड होती तिचा उपयोग होई. हे बंदीवान लोक कट करून काम कोणीच पुरे करीत नाहीत असे मोठमोठ्याने गर्जत सुमारे पाच वाजता संध्याकाळी जेव्हा सायंकाळचे भोजन वाढण्यात येई तेव्हा ज्यांचे तेल पुरे ३० पौंड होणार नाही त्यांस ते पुरे होईतो जेवण मिळणार नाही म्हणून आज्ञा सुटे. सकाळी ६ पासून अविश्रांत उभ्या उभ्या जेवत दुपारचे ११ वाजता जेवून संध्याकाळपर्यंत सारखा कोलू फिरवीत जे श्रांत झालेले, त्यांत तेल पुरे केलेले दहापाच बंदीवान जरी असत तरी, बाकी चाळीस-पन्नास कोलूवरील लोक खरोखरच अशक्य म्हणूनच तेल पुरे करू शकलेले नसत. पण बारीसाहेब खुर्ची मागवून घेऊन, त्या चाळीस कुलूप ठोकून, सर्व बंदीगृहातील कामे बरोबर पाचसहा वाजता आटोपून, नियमाप्रमाणे सर्व तुरुंग बंद झाल्याचे प्रतिवृत्त (रिपोर्ट) कळवून, केवळ तेवढ्या चाळीतील काम ठासून चालवीत बसे, त्या नियमास पायाखाली तुडवून चाललेल्या रात्रीतील कामाची बातमी बाहेर फोडण्याची कोणा शिपायाची वा नोकराची काय माय व्याली होती ? बारीसाहेब आठवड्याचे आत त्याच्यावर कोणते कुभांड वा खटला रचून त्यास खड्ड्यात पाडील याचा काही नियम थोडाच होता. तेव्हा सात-आठ-नऊ, रात्री नऊवाजेतो कोलू फिरवीत असत! येता-जाता शिपाई जमादार मारहाण करीतच आहेत, रात्री तासामागे तास वाजत आहेत, सर्व बंदीगृह निजून आहे, तेवढी कोलूची चाळ तर्रर करीत काम करीत आहे, बारी चाळीच्यापुढे खुर्चीवर डुलक्या घेत आणि मधूनच आई-माईवरून शिव्या हासडीत, "अबतक तेल नहीं हुआ तो मारो सालेको बेत, कल मारना तो आज मारो!" असे ओरडत पडलेले असत.

## रोगाचे ढोंग

ज्यांच्या हातास काबाडकष्ट शिवले नाहीत, ज्यांच्यात कॉलेजातील अध्ययन अध्यापन - केलेले लोक होते, अशा राजकीय बंदीवानांस - त्यांच्यातील सतरा वर्षांच्या मुलांसही- याच कोलूचे काम महिनोगणती देण्यात आले.

त्यांच्या कष्टास पारावार उरला नाही. त्यातही काही आजारी पडले तेव्हा तर मरण बरे असे त्यांस वाटू लागले. कारण आजार भयंकर स्वरूपाला पोचेतो ढोंग या कोष्टकात मोडे. त्यातही ताप असला -१०१ चे वर तो ताप समजला जाई- तर राजबंदी रुग्णालयात नव्हे तर कोठडीत कामाविना बंद केला जाई. साधारण चोरी, आगलावी, दरोडे, गळेकापी इत्यादी पोर्ट ब्लेअरच्या नीतिशास्त्रातील क्षमार्ह अपराध करणाऱ्यास मात्र रुग्णालयात आजारी म्हणून एक बाजू निजावयास देऊन ठेवण्यात येई. पण ताप किंवा रेच किंवा उलट्या असे प्रत्यक्ष रोग नसून डोके दुखणे, हृदयविकृती, जीव घाबरणे इत्यादी अप्रत्यक्ष रोगांनी ज्यांस जर्जर केले त्यांची दशा पुसावयास नको. त्यांच्या रोगांचे निदान ढोंग वा कामचुकारीपणा या दोन दुखण्यांनी पछाडलेल्यांतच करण्यात येई. वेळी शिक्षाही देण्यात येई. ही गोष्ट काही खोटी नाही की बंदीवानांतील अट्टल सोद्यांपाशी वाटेल तेव्हा भयंकर ताप वा रेच वा रक्ताच्या उलट्या व्हाव्या अशी औषधे आणि युक्त्या असत. पण हीही गोष्ट खोटी नाही की, असल्या औषधांनी १०३-४ पर्यंत तापाने फणफणत पडलेले पुरवले वा तीव्र पोटदुखी होऊन रक्ताचे दहा दहा रेच झाले तरी बरे, पण ही कोलूची यातना काही दिवस तरी चुको असे 'सळो की पळो' होण्याइतके ज्या कोलूचे कष्ट असह्य होत - बदमाषांसही असह्य होत- त्याच कोलूस बंदीगृहाचे तोंड प्रथमच पाहणाऱ्या राजबंदीसही जुंपण्यात येई, आणि त्यांच्यातही कोणी असल्या अप्रत्यक्ष दुखण्याने आजारी झाला असता तो ढोंगी याच वर्गात मोडून त्या कष्टकर कामावर पुनः परत धाडण्यात येई. अशा कष्टभोगी पुरुषांत माझ्या ज्येष्ठ बंधूंची गणना प्रामुख्याने झालेली असे.

## माणसाळविण्याचा प्रयोग !

कारण त्यांस घरापासून अर्धशिशीची व्यथा असे. त्यात ते बंदीगृहातील कष्ट, मानसिक आणि शारीरिक. त्यात घाण्यास जुंपलेले; आणि सर्वांत मोठा अपराध म्हणजे अशा हालअपेष्टेतही मागे वर्णन केलेल्या काही राजबंदींप्रमाणे ते अजून 'माणसाळलेले' नव्हते. त्यांच्या तोंडातून अवास्तव माहितीचा वा तिरस्करणीय प्रार्थनेचा शब्दही निघाला नव्हता. म्हणून त्यांना 'माणसाळविण्या'चा प्रयोग, त्या राजबंदीवानांस उघड उघड हिंस्त्र श्वापदे आणि स्वतःस त्यांच्या सर्कशीचा चालक म्हणविणारा बारी, अजून करीतच होता. अशा स्थितीतच आणि तिचा परिणाम म्हणून भयंकर अर्धशिशीची व्यथा त्यांस पुनः जडली. सकाळी घाण्यास जुंपून तो सारखा फिरवीत असता जसजसा दिवस वाढे तसतसे डोके ठणकू लागे. तिडका उठत. ऊन्ह सहन होईना, तरी दिवस वाढे तशा वाढणाऱ्या डोक्याच्या त्या तीव्र ठणक्याबरोबरच "कोलू पीसो, और कुछ जानता नहीं, कोलू पीसो!" म्हणून जमादाराची उर्मट गर्जना वाढत जाई. गोरा अधिकारी फिरतीवर येताच अर्ज केला, "माझे डोके अतिशय दुखत आहे." त्यांनी उत्तर द्यावे, "तो माझा प्रश्न नाही. डॉक्टरना दाखव." डॉक्टर कोणी तरी हिंदुस्थानचाच असणार. तो आला की त्याने ताप आहे की नाही पाहून सांगावे, यास काही होत नाही. साहेबाकडे न्या. कारण डोके दुखण्याने तापमापक थर्मामीटर मुळीच तप्त होत नसे. डोके दुखते हे सिद्ध करण्यास दुसरा पुरावा नाही. अर्थात लबाडी असलीच पाहिजे. बंदीवानांची, त्यातही राजबंद्याची -त्यातही गणेशपंत सावरकरांची !

## मी म्हणेन तो आजारी!

आपण करतो ते अन्याय्य आहे हे डॉक्टरला कळे पण बारीची भीती. तो येता जाता त्यास सांगत बसणार, “हे पाहा डॉक्टर, तुम्ही हिंदू, हे राजबंदीवान हिंदू, हे केव्हा तुम्हाला गोड बोलून खड्ड्यात पाडतील नेम नाही. त्यांच्याशी माझ्या सांगण्याविना बोलताना जरी कोणी तुम्हास पाहिले तरी तुमच्याविरुद्ध प्रतिवृत्त अधिका-यांकडे होईल. तेव्हा सांभाळा. नोकरी पाहिजे तर तुम्ही म्हणून त्यांच्याविषयी काही एक म्हणू नका. तुम्ही शिकलेले, पण मी अनुभवी. मला कळते, ह्या ढोंगी लोकांचे खरे आजार कोणते, खोटे कोणते! तेव्हा मी म्हणेन तेव्हा ते आजारी पडतात असे समजावयाचे बरं का?” असे म्हणत स्वतःच स्वतःच्या विनोदाने हसत बारीसाहेब पुढे चालावयाचे. एकदा डॉक्टराने (हॉस्पिटल असिस्टंट) माझ्या बंधूंची अत्यंत केविलवाणी स्थिती पाहिली. डोक्याला तिडका असह्य होऊन ते केव्हा केव्हा भिंतीस डोके तडातड मारून घेत; तसेच उठून कोलू फिरवावयाचा. साहस करून तो डॉक्टर म्हणाला, “चला मी दोन दिवस माझ्या अधिकारात तुम्हास निरीक्षणाखाली (फॉर ऑब्झर्व्हेशन) म्हणून ठेवतो. घ्या अंथरूण आणि द्या ते काम सोडून.” त्याच्या या बोलण्याप्रमाणे माझे बंधू अंथरूण घेऊन जातात न जातात तो बारी सोटा आपटीत आला. “ए बॉंबगोलेवाला किदर जाता है?” म्हणून वसकन त्याने गणेशपंतास घेऊन जाणाऱ्या जमादारास विचारले. तो जमादार थरकापला व म्हणाला, “डॉक्टरबाबूच्या आज्ञेने काम सोडून त्यास निरीक्षणासाठी संशयित आजारी म्हणून ठेवण्यास चालविले आहे.” “मला का विचारले नाही, कोण आहे तो डॉक्टरबाबू ए साला, वो साला!” म्हणून ओरडत त्याने बंदीगृह दणाणून दिले. “ले जाव उसकू वापस, काममें लगा देव. मी डॉक्टरला पाहून घेतो आणि तुलाही -साला तुम- मला विचारल्याविना याला कोठहीबाहेर का काढले? डॉक्टराची आज्ञा की माझी ?” असे एकसारखे गर्जत त्याने त्या जमादाराकडून गणेशपंतास परत त्या कोलूच्या कोठडीत बंद करून कोलस जुंपविले ! डॉक्टरचा अधिकार त्या बारीच्या म्हणजे बंदीपालाच्या अधिकाऱ्याच्या खालचा नसून केवळ सुपरिन्टेंडंटच्या हाताखालचा असे. पण राजकीय बंदीवानांचे संबंधी कोणचेही विरुद्ध गाऱ्हाणे सुपरिन्टेंडंटपर्यंत पोचू नये म्हणून सर्व हिंदू आणि हिंदी अधिका-यांची जिवापाड खटपट असे. एतदर्थ बारीला भिऊन त्या डॉक्टराने स्वतःचा अपमान तर गिळलाच, पण बारीची क्षमा मागून पुनः कधी कोणा राजकीय बंदीवानास सुपरिन्टेंडंटचे सांगण्याविना कोठडीतून रुग्णालयात एक क्षणभरही नेले नाही. बाकी वाटेल तो बंदीवान -दहा दहा वेळ तुरुंग भोगूनच नव्हे तर तुरुंग फोडून पळालेले बंदीवानही- आजारी आहे इतके कळवून प्रत्यही रुग्णालयात जाऊ शकत. पुढे ठेवणे न ठेवणे डॉक्टराकडे असे. त्याच्या कामात बंदीपाल सहसा बोलत नसे. राजबंद्यांना मात्र रुग्णालयात बहुधा मज्जाव!

त्या अर्धशिशीचे दुखणे आणि ठसके सोशीत दिवसभर कोलू फिरवीत माझे ज्येष्ठ बंधू संध्याकाळी तेल मोजून देऊन हुश्श करून जो त्या निजावयाच्या कोठडीतल्या लाकडी ओंड्यावर -फळ्यावर- अंग टाकीत तो सारे अंग ठणकावयास आरंभ होई. कोठे झोप लागली न लागली तो दुसरी सकाळ. की, पुनः अर्धशिशी, तो जमादार, तो जो काळ्या अधिका-यांचा उपमर्द आणि जाच आणि तो कोलू दत्त म्हणून उभा राही. असे आठवडे, महिने कष्टांच्या पराकाष्ठेत काढले, आणि असा जन्म काढावयाचा !

## नको हे जीवन!

ते हाल किती सांगावेत ! पण केवळ शितावरून भाताची परीक्षा व्हावी म्हणून आणखी एकच घटना सांगतो. अंदमानात बंदीवानांस कामाचे, अन्नाचे, वस्त्राचे, मारहाणीचे इत्यादी अनेक प्रकारांविषयी जे त्रास देण्यात येत असत यांत एक दिसण्यात अगदी किरकोळ, सांगण्यास अगदी संकोचास्पद परंतु सहन करण्यास अगदी स्वतःचा स्वतःसच तिटकारा आणून 'नको हे जीवन' असे वाटविणारा त्रास म्हटला म्हणजे बंदीवानांस मलमूत्रांचा अवरोध करण्यास भाग पाडणे हा होय. सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी या वेळांव्यतिरिक्त शौचास जाणे म्हणजे जवळ जवळ अपराध मानला जाई. रात्री बंदीवानांस सहा-साताला जे कोंडून टाकण्यात येई ते सकाळी सहाला उघडण्यात येई. त्या अवधीत लघवीला केवळ एक मडके आत ठेवीत.

अंदमानाच्या बंदीगृहात सगळ्या खोल्या वेगवेगळ्या असून प्रत्येकीत एकच बंदीवान बंद केलेला असे. म्हणूनच त्यास सेल्यूलर जेल म्हणजे कोठड्यांचे कारागृह म्हणत. उभ्या रात्रीच्या या बारा तासांत बंदीवानांस शौचास न लागली पाहिजे असा बारीचा नीतिनियम असे. लघवीलाही पुरे न पडेल इतके ते मडके लहान; कोणास चुकून परसाकडे लागली तर त्याने वॉर्डरास कळवावे. वॉर्डराने ती विशिष्ट गोष्ट खोटी आहे असे जर स्वतःच्या आळसाने किंवा भीतीने ठरविले तर प्रश्न तेथेच मिटला. त्या बंदीवानाने सकाळपर्यंत तसेच मलावरोध करून थांबलेच पाहिजे. बरे, वॉर्डराने जमादारास सांगितले तर जमादार बंदीवानांस भलत्याच वेळी अशी परसाकडे जाण्याची पापी लहर आल्याविषयी दहा शिव्या आणि वॉर्डरास बंदीवानाचे गाऱ्हाणे ऐकल्याविषयी पाच शिव्या हासडून, मनास वाटल्यास आणि झोपेच्या गुंगीत आठवण राहिल्यास ती गोष्ट डॉक्टराला कळवी. डॉक्टराचे परसाकडे लागली असल्याचे प्रमाणपत्र शंभर वेळांतून एखादे वेळेस मिळणार; मग ते बारीकडे पोचवून त्याची लहर लागली तर बंदीवानास परसाकडेसाठी कुलूप उघडून बाहेर काढण्यात येई; आणि सकाळी पुनः बारीसाहेबापुढे चौकशीत ज्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर कसे द्यावे ते कोणासच सुचत नसे असा प्रश्न विचारून शिव्या हासडल्या जात त्या निराळ्याच? "तुम रातमें गिल्ला क्यौं किया-तू रात्री आरडाओरड का केलीस?" "काय करू साहेब, परसाकडे लागली! क्षमा करा!" तेव्हा सोटा आपटून शिव्या देऊन साहेब विचारीत, "पण परसाकडे का लागली! रात्री तुला परसाकडे का लागली?" गोंधळलेला बंदीवान फार तर उत्तरे "लागली म्हणून लागली!" त्या बरोबर जमादार मध्ये येऊन एक थोबाडात देऊन म्हणे, "ए साला, साहेबाची चेष्टा करतोस?"

दयाळू बारीसाहेब इतक्यावर त्या बंदीवानास बहुधा सोडून देत. एखादे वेळी दयेने फारच द्रवून गेलेल्या स्थितीत ते असले तर नुसते सोडून न देता परसाकडे लागल्याच्या अपराधाकरिता "एक दिवस याला कोलूचे काम द्या." म्हणून शिक्षा सांगून निघून जात.

## तंबाखूची चिमटी

अशा त्रस्त स्थितीत काही बंदीवान मलावरोध करणे अशक्य होऊन त्या कोठडीत भुईवरच परसाकडे बसत. रात्रभर त्या आठदहा फुटांच्या खोलीत त्या मळाशीच उसे ठेऊन निजल्यावर सकाळी कुलूप उघडताच भंग्याची मनधरणी करीत की, तुला चोरून तंबाखूची चिमटी देईन, तू गुपचूप तो मळ काढून टाक. त्याने ऐकले तर ठीक;

नाही तर, वा कोणाजवळ तंबाखूच नसली तर, भंगी बोंब मारून जमादारास सांगे. जमादार लाथाबुक्क्यांनी मारण्यासारखा बंदीवान असेल तर तसा मारी, जरा तापट असेल तर बारीसाहेबापुढे नेई व खटला भरला जाई; कसला, तर "खोली गदळ करण्याचा." एक तर आपल्या हाताने तो मळ काढावा म्हणून शिक्षा देऊन ते काम करून घेण्यात येई; तीन-चार दिवस खोड्यामध्ये सर्व दिवस उभे राहण्याची शिक्षा देण्यात येई.

पुनः खोड्यामध्ये उभे राहण्यात तर मलाचाच नव्हे तर चार-चार, पाच-पाच तास मूत्राचाही अवरोध करावा लागे. सकाळी सहा ते दहापर्यंत व दुपारी बारा ते पाचपर्यंत हातकडीत टांगून उभे राहावे लागे. त्या वेळात परसाकडे तर राहोच पण लघवीसही सोडण्यात येत नसे.

ह्या त्रासाचा मार सर्व बंदीवानांवर सारखाच होई. परंतु तो राजबंदींस फारच जाचे; कारण ते बहुधा दिवसाही काम करोत न करोत, कोठडीत वा चाळीत बंद असणार. त्यायोगे रात्रीच नव्हे पण दिवसाही त्यांस मलमूत्रविसर्जनाची बंदी होई. निरुपाय होई तेव्हा कोठडीत वा चाळीत चोरून भुईवर वा भिंतीवर लघवी करावी लागे. इतर निर्ढावलेल्या बंदीवानांस ते काहीच वाटत नसे. ते माणसाच्या समोर देखील तसे हसत करीत; पण सभ्य जनांत वाढलेल्या राजबंदींस तसे करणे भाग पडे तेव्हा तीव्र नैतिक वेदना भोगावयास लागत. देहधर्माची नैसर्गिक आवश्यकताही त्या बंदीगृहात सरकारच्या शिस्तीविरुद्ध एक अपराध समजला जाई. चांगले खाणे, चांगले लेणे हे तर राहोच पण लागताच परसाकडे जाणे वा पोट फुगून अवरोध असह्य होण्याचे आधीच लघवीस बसणे हीही विलासप्रियताच समजली जाऊन त्या कठोर कारागृहात ती दंडनीय समजली जाई.

## अंदमानीय नीतिशास्त्र

अशा शिस्तीने माझे ज्येष्ठ बंधूंस कोठडीबंदी होऊन 'छिलका' - मागे वर्णन केलेले काथ्याकुटीचे काम-देण्यात आलेले असताना एकदा त्यांस आमांशाचा विकार झाला. पोट दुखत असे. जेवताच खळबळून यावे. पण एकदा खोली बंद केली की पुनः संध्याकाळी उघडणार. इतर बंदीवानांसही आमांशादिक आजार झाले म्हणजे त्यांस रुग्णालयात नेण्यात येई आणि त्यामुळे मलमूत्र यथाप्राप्त करण्याचे सौख्य - सौख्य ! त्यांस अनुभवता येई. पण आजारीपणात देखील राजबंदी कोठडीतच बंद असत. त्यांस रुग्णालयात नेण्यात येत नसे. जोवर तो अगदी अंथरुणास खिळून पडला नाही तोपर्यंत, आणि कोठडीतही आजारी असता जे एक मडके मिळे ते देखील 'आजारी' असे. आजारीपणाचे प्रमाणपत्र डॉक्टर जेव्हा दुखणे विकोपाला गेल्यावर देतील तेव्हा. त्यामुळे राजबंदींस देहधर्म यथाप्राप्त न करता आल्याने असह्य त्रास होई. अर्थात माझ्या ज्येष्ठ बंधूंना आमांशाचा विकार झाला आहे ही गोष्ट शिपायाच्या- जमादाराच्या - डॉक्टराच्या कानावर घालूनही ती कानात उतरण्यास दोन-तीन दिवस लागले. पोटात दुखून रेच होऊ लागले. त्यात तो अर्धाकच्चा बंदीगृहीत भात खावयाचा आणि छिलका कुटीत कोठडीत बंद होऊन राहावयाचे. तेव्हा दुपारी मधूनच रेच होताना त्याचा अवरोध असह्य होऊन खोलीतच रेच करावे लागत. पण ती संध्याकाळी उघडताना ती गोष्ट उघडकीस येताच शिव्यागाळी होत. उभ्या बंदीगृहात त्याची चर्चा करवून घेऊन पुनः शिक्षा खाण्याचा किंवा बलात्काराने तो मळ स्वतः साफ करून टाकावा लागण्याचा प्रसंग टाळण्यासाठी त्या कचऱ्याच्या ढिगात रेच करावे आणि बाहेर तो कचरा टाकण्यात जेव्हा सायंकाळी सोडण्यात येई तेव्हा ती घाण

स्वतः काहीएक बोभाटा न करता नेऊन टाकावी. कित्येक वेळा हातकडीत टांगलेले असताना पोटदुखीचा आणि आमांशाचा विकार झाला असूनही त्यांस सात दिवस तसेच टांगण्यात येई. त्या वेळी कित्येकदा उभ्याउभ्याच रेच लागे. दुपारी अवेळी लघवी लागली म्हणजे खोलीतल्या भिंतीवर कित्येकजण लघवी करीत. ही एक दिवसाची वा एका प्रसंगाची गोष्ट नसून वर्षानुवर्षांची होती. अशा घाणीच्या खोलीत आणि तशा गलिच्छ देहस्थितीत राहावे लागे, निजावे लागे.

गाईबैलांसही मलमूत्रोत्सर्ग यथाप्राप्त करण्यास ते कामास जुंपलेले असताही वा रात्री बेरात्रीही अडथळा करणे क्रूरपणाचे समजले जाते. पण राजकारणात वा राज्यक्रांतीत भाग घेणारा मनुष्य त्या पशूंसही मिळणाऱ्या स्वातंत्र्यास अपात्र ठरून यथाप्राप्त मलमूत्रोत्सर्गं दुपारी १२ ते ६ आणि रात्री सर्व रात्रभर करण्याचे सौख्य भोगण्याचे धाडस करील तर शिक्षेस पात्र होय असे अंदमानीय नीतिशास्त्र समजे. अंदमांनाच्या बंदीगृही दंडविज्ञानाचे हे नीतिशास्त्र बदलण्यासाठी कमिशनरपर्यंत अर्ज गेले; पण बारीसाहेब म्हणावयाचे, “हे सर्व खोटे आहे महाराज! या जमादारास विचारा मी कधी अशी पीडा देतो का ते. हे लोक मजविरुद्ध कट करतात आणि असे खोटे आरोप आणतात!” कमिशनर आणि इतर अधिका-यांनी म्हणावे, “पुनः खोटे आरोप कराल तर शिक्षा होईल, तुम्ही राजबंदीच नेहमी ओरड करता. इतर लोक का करीत नाहीत?” इतर लोकांना ती पीडा इतकी भोगावी लागत नसे; भोगावी लागली तरी सह्य वाटे; सह्य वाटली नाही तरी लाथाबुक्क्यांचा मार आणि कोलूच्या धास्तीने बारीसाहेबाविरुद्ध ब्र काढायची सहसा धमक नसे.

## नैसर्गिक विधीचा हक्क !

अखेर परसाकडे आणि लघवी लागणे किंवा लागून तिचा अवरोध करणे अशक्य झाल्यावर तरी ती करू देणे, हा शिस्तीचा भंग वा अपराध नव्हे असे ठरवून घेण्याचा महत्वाचा राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यासाठी हिंदुस्थान सरकारच्या गृहमंत्र्यापर्यंत चळवळ करावी लागली. हे गृहस्थ एकदा अंदमानास प्रत्यक्षच जेव्हा आले - ती कथा पुढे येईलच- तेव्हा राजबंदींतील काही जणांनी त्यांचेपुढे आपले गाऱ्हाणे मांडले. बारी एकदम उलटला. खोटे खोटे म्हणून ओरडला. श्री. नंदगोपाल म्हणून एक पंजाबी राजबंदी जेव्हा स्पष्टच म्हणाले की, “हे पाहा, या बंदीगृहातील खोल्यांत तुम्ही एकदा प्रत्यक्ष हिंडा आणि तेथील भिंतींच्या कोप-यांचा वास घ्या म्हणजे तुम्हांस कळेल की अवेळी लघवी लागल्याने किंवा रात्रीचे मडके भरून गेल्याने बंद्यांना भिंतीवर लघवी करावी लागते की नाही, ते तुमचे नाकच आमचे साक्षीदार !” ह्या फटकळ बोलण्याने नंदगोपालास जरी ‘चुप रहो चुप रहो!’ म्हणून थांबविण्यात आले आणि बारीने ‘माणसाळविलेल्या’ त्या राजबंद्यांतील एकदोघे त्या उत्तरास अश्लील आणि असभ्य म्हणण्याचा हांजीखोरपणा करण्यास जरी कचरले नाहीत, तरी गृहमंत्र्याने बारीचे गुपचूपकान पिळले आणि त्यापुढे हा किळसवाणा त्रास कमी झाला. किळसवाणा इतका की वारंवार देहाचा तिटकारा यावा. “स्वांगजुगुप्सा परैरसंगश्च” म्हणून योगसूत्रांत ग्रंथित केलेले सत्य अनुभवास यावे. स्वतः ह्या नंदगोपालावरही एकदा चाळीत काम करताना मलावरोध अशक्य होऊन सर्वांसमक्ष परसाकडे होण्याचा प्रसंग आलेला होता आणि ते कृत्य जाणून केले म्हणून त्याच्याविरुद्ध कागाळी करून बारीने त्यास अपराधीही ठरविले होते.

## पहिला संप

त्या नाना प्रकारच्या छळांचा परिणाम त्या वेळेस असलेल्या राजकीय बंदीवानांवर निरनिराळा झाला. प्रथमतः सर्वांचाच हेतू शक्य तितक्या यातना सोसूनही येईल ते काम करावे आणि तुरुंगातील नियम पाळावेत असाच होता. परंतु जेव्हा शारीरिक आणि मानसिक कष्ट असह्य होऊ लागले तेव्हा सर्वांच्याच पुढे 'जगावे की मरावे' हा प्रश्न येऊन पडला. जे फारच थोड्या म्हणजे पाच-सात वर्षांच्या शिक्षेसाठीच आलेले होते त्या सर्वांचाच आग्रह होता की त्यांनी धैर्याने सर्व संकटे इतके दिवस-वर्षे-जीवनचे जीवनभर सोसावी लागणार होती की ती सोसता सोसताच कोठे तरी मरणाचे भक्ष्य व्हावे लागणार हे उघड दिसत होते. त्यांनी मग ती संकटे सोशीत मरण्यापेक्षा ती सोसण्याआधीच का मरू नये?

या भयंकर प्रश्नाचा, जो प्रश्न त्या स्थितीत तात्त्विक नसून प्रतिक्षणी प्रत्यक्ष समोर उभा राहत असे; परिणाम राजबंदींच्या दोन टोकांवर दोन विरुद्ध दिशांचा झाला. एका टोकास मागे उदाहरणार्थ वर्णन केल्याप्रमाणे काहीजणांचे मानसिक आणि नैतिक धैर्य सुटून वाटेल त्या प्रकारे अधिका-यांची मनधरणी करून कसे तरी पण त्या कष्टांतून सुटावे अशी प्रवृत्ती झाली. परंतु उलट टोकास असलेल्या इतर तरुणांची, मध्यंतरी यातनांनी काही दिवस दबलेली परंतु यातनांचा आणि अभिभवाचा अतिरेक होताच पुनः एखाद्या खाली केलेल्या प्रज्वलित पोताप्रमाणे वर अधिकच उफाळून उसळलेली तेजस्विता त्यांस "मर पण मानभंग करून घेऊ नकोस. मर, पण शक्यतोवर झुंजत मर" म्हणून चेतवू लागली. मधल्या मनोवृत्तीच्या लोकांस विवेक म्हणाला, "जग, ध्येयाविरुद्ध जोवर तुझे जगणे होत नाही तोवर शक्य तो राजनीतीचा आश्रय करून जग. पण जर ध्येयाविरुद्ध ध्येयाची अंतिम हानी करूनच जगावे लागत असेल तर मात्र त्वरित मर!"

कसा तरी जग अशी ज्यांची प्रवृत्ती झाली त्यांनी कोणत्या वर्तनक्रमाचा आश्रय केला हे मागे दिग्दर्शित केलेच आहे, झुंजतच मर आणि विवेकाने मर वा जग अशा उभय पक्षांचे लोकांनी एकत्र होऊन अखेर त्यांच्या होत असलेल्या छळाचा प्रतिकार नसला तरी प्रतिशोध म्हणून सक्त कष्टाचे काम करावयाचे नाही म्हणून निश्चय केला. तो प्रथमतः घाण्याचे काम नाकारण्याचे संपात व्यक्त झाला. हाच सेल्युलर बंदीगृहातील राजकीय बंदीवानांचा पहिला संप होय. हा फार लहान होता; परंतु बंदीगृहात आणि बारीसाहेबांच्या छातीवर कटाने संप होणे ही गोष्ट इतकी धाडसाची मानली जात असे की त्या थोड्याशा लोकांनी पण जुटीने कामाचा इन्कार करताच शेकडो बंदीवानांत मानसिक खळबळ उडून गेली. त्याच मानाने बारीसाहेबांस आपल्या शक्तीचा आणि अधिकाराचा हा अपूर्व उपमर्द आहे असे वाटून तो बंदीपाल अगदी चवताळून गेला. भोळा बिचारा बारी! हा संप म्हणजे हा उपमर्द म्हणजे काहीच नाही, असले संप आणि उपमर्द त्यास पाहावयाचे होते हे तेव्हा त्यास कसे कळणार?

## पोर्ट ब्लेअरचा परमेश्वर

बारीसाहेब इतर बंद्यांस आणि कधी कधी तर राजकीय बंदीवानांसही आपली ती जाड काठी एखाद्या राजदंडाप्रमाणे आपटीत म्हणत असे, "देखोरे साला लोग! (साला लोग हे बारीसाहेबाच्या भाषेतील बंदीवानांच्या वर्गाचे जातिवाचक नाम असे) दुनियामें एक परमेश्वर बसता है. वो आकाशमें रहता है परंतु पोर्ट ब्लेअरमें दो

परमेश्वर रहते हैं। एक आकाशमें और एक पृथ्वीपर. बस्स. पृथ्वीपर रहनेवाला वो पोर्ट ब्लेअरका परमेश्वर मैं हँ ! ऊपरका परमेश्वर तुम्हें उपर फल देएगा. पर मैं पोर्ट ब्लेअरका परमेश्वर तुम्हें इधरके इधरही फल देअूंगा. ठीक चलना. तुम्ही माझ्यावरच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे- दिल्लीच्या लाटकडे गेलेत तरी मी म्हणेन ती पूर्व दिशा ठरेल हे ध्यानात धरा!" एकदा आम्हास गंमत दाखविण्याकरता आणि सर्व बंदी त्यास कसे थरारत ते दाखवून आम्हांस किंचित दिपविण्याच्या गुप्त इच्छेने त्याने सर्व बंदीवानांच्या जोड्या- जोड्यांनी लांब ओळी बसवून पेटी ऑफिसर्स आणि सैनिक जमादार उभे असताही एकदम आत घुसून विचाराले, "क्यारे पेटी ऑफिसर, इस वक्त रात है या दिन!" त्या नवशिक्या बंदीवानांतीलच नव्याने बढती मिळालेल्या अधिकाऱ्याने -पेटी ऑफिसरने- सांगितले, "दिन है हुजूर." बारीसाहेब एकदम चवताळून म्हणाला, "नहीं रात है." पेटी ऑफिसर म्हणाला, "दिन है." तेव्हा बारीसाहेब रागारागाने त्याच्या त्या जुन्या मुरलेल्या जमादाराकडे वळून गर्जला, "क्या जमादार, अब दिन है या रात? हमको साफ रात मालूम पडती है." जमादार म्हणाला, "जी हुजूर, अब तो सफा रात पडी है!" तेव्हा बारीसाहेब किंचित खोचून म्हणाला "तुम तो ठीक बोले. पण तुम्ही नव्या पेटी ऑफिसरास नीट शिक्षण देत नाही हे तर उघडकीस आले ना? पुनः असे झाले तर बघा!" नवीन कोणीही पेटी ऑफिसर झाला की त्याला 'हां जी-हुजूर" आणि क्रूर पठाण जमादार खरोखरच बारीबाबा म्हणेल त्यास 'हो म्हणत जा' म्हणून सक्त आज्ञा देत असे.

अशा ऐटीने आजपर्यंत बंदीवानांना चळचळ कापीत ज्याने ठेवले तो बारी राजकीय बंदीवानांनी केलेला त्याच्या अधिकाराचा हा लहानसा उपमर्द पाहूनही चिडून गेला ह्यात आश्चर्य नाही. त्या वेळपर्यंत राजबंदीवानांसही पठाणी अधिका-यांकडून तो अश्लील शिव्या देववी आणि काम पुरे न झाले तर किंवा राजकीय बंदीवान एकमेकांशी बोलत असता धरले गेले तरी देखील ते पठाणी वॉर्डर वा पेटी ऑफिसर त्यांच्या ताडकन थोबाडीत उडवून देत. ही गोष्ट त्याच्या कानावर घातली असताही तो उलट हसे. पण तेच राजबंदी आता एकदम इतके उलटले की, शिवीस शिवी आणि एकादोघांनी तर थोबाडीत देण्यास आरंभ केला. काम इन्कार करण्यात ज्यांनी ज्यानी भाग घेतला होता; त्यांमध्ये एकादोघांनी तर बारीची देखील शोभा उडविण्यास आरंभ केला.

उदाहरणार्थ, एकच गमतीची गोष्ट सांगतो. श्रीयुत नंदगोपाल ह्यांना दहा वर्षे काळेपाण्याची शिक्षा होती. हे पंजाबातील एका संभावित घराण्यातील सुशिक्षित आणि अतिशय पापभीरू गृहस्थ असत. ह्यांना प्रथमच जेव्हा घाण्याचे काम देण्यात आले तेव्हा हे सकाळी खोलीत गेले. सरासरी दहा वाजेपर्यंत सावकाश जे होईल ते काम केले. जेवावयाची घंटा होताच स्वारी खाली उतरली. कोलूमधल्या बंद्यांस काम पुरे केल्याविना स्नान, जेवण इत्यादी अवश्य कर्तव्येही कशी नीट किंवा मुळीच करू देत नसत ते पूर्वीच सांगितले आहे. पण श्रीयुतांना त्याचे काय ! ते नीट स्नानाचे हौदावर जात, चांगले अंग चोळून स्नान झाले की जेवण घेऊन जेवावयास बसत. तोवर इतर बंदीवानांस शिवीगाळ व हाणामार करून पेटी ऑफिसरांनी परत कामावर जुंपलेले देखील असे. श्रीयुतांनाही शिवीगाळ भरपूर मिळतच होती; पण ती आपल्याला नसून दुसऱ्याच कोणास आहे अशा निर्ममत्व बुद्धीने ते सावकाश जेवू लागत. वॉर्डर व पेटी ऑफिसर शिवीगाळ करीत मागे लागतच 'चलो, काम कौन तुमारा x x x x करेगा. उठो' इत्यादी इत्यादी. ते थकून हवालदारास आणीत. हवालदार समजावू पाही; पण शांतपणे श्रीयुत त्यास समजावू लागत की, हवालदारजी, प्रत्येक घास चावून गिळला तर नीट पचतो. घाईघाईने खाल्ल्याने पोट बिघडते.

हवालदार निराश होऊन बारीला घेऊन आला. तुरुंगात ‘बारी आता है’ ही बातमी ऐकताच आता कोणावर तरी कुऱ्हाड कोसळते आहे असेच सर्वांस ऐकू येऊन सर्व दचकून राहत. पण बारी आला तरी श्रीयुत जेवतच होते. बारीने वसकन ओरडून विचारले, “सर्व बंदीवान गेले कामावर, तू कोण मोठा बाजीराव आहेस की काय? अजून जेवतो आहेस. काम पुरे कोण करील? तुझी हाडे नरम करीन नरम. खूप समजून ऐस.” श्रीयुत घास चघळीत स्मित वदनाने म्हणाले की, “मी काही उगीच बसलो आहे रिकामा की काय? वैद्यकशास्त्राच्या मते, प्रत्येक घास निदान दहादा तरी चावला जावा. पचनक्रियेस खरे म्हटले असता तोंडातून सुरवात होते.” हे वैद्यकशास्त्रीय मत ऐकून अधिकच चिरडीस गेलेला बारी वेडेवाकडे गर्जत म्हणाला, “थांब, तुझ्या अनैयमिक - बेकायदेशीर - वर्तनविषयी उद्या खटला भरतो.” श्रीयुत म्हणाले, “दहा ते बारा वाजेपर्यंत सरकारने दिलेल्या सुटीत ह्या अज्ञान बंदीवानांस तुम्ही कामावर जुंपविले हेच अनैयमिक नव्हे काय?” बारी मनात चपापला. तो दहा ते बाराच्या सुटीत देखील नियमाविरुद्ध काम तुरुंगात चालू ठेवी. अखेर तुला काय पाहिजे तितके तू घास चघळ पण जर संध्याकाळी काम न केलेस तर मात्र तुझ्या पाठीची साले वेताखाली सोलवीन अशी धमकी देऊन आणि सर्व बंदीवानांसमक्ष आपल्या आज्ञेचा असा अपमान केला तरी इतरांप्रमाणे यांसही आताच्या आता लाथाबुक्क्याखाली झोडपता आले नाही या पाणउताऱ्याने चरफडत बारी परत गेला.

## वैद्यकशास्त्राचे आणखी एक प्रमेय

इकडे श्रीयुतांचे अखेर कसेबसे जेवण संपले. पेटी ऑफिसर, हवालदार, वॉर्डर सर्वजणांना हायसे वाटले. त्यांनी त्यांना आणून खोलीत घाणा फिरविण्यासाठी म्हणून कोंडले. प्रार्थनाही केली की, “आता तरी वैद्यकशास्त्राप्रमाणे जेवण संपल्याने काम कसून करा. कारण बंद्यांचे काम अपुरे राहिले म्हणजे बारी प्रथम पेटी ऑफिसर व वॉर्डर यांचीच खरडपट्टी काढीत असतो हे विसरू नका.” असे चुचकारून ते सर्व पुढच्या बंदीवानांस शिवीगाळ करीत गेले. थोड्या वेळाने परत येऊन श्रीयुत घाणा एकसारखा फिरवीत असतील म्हणून पाहतात तो काय! श्रीयुतांनी एक घोंगडी अंथरून तीवर आपला लंबाचौडा देह यथासुख पसरून आणि दुसरी घोंगडी पांघरून घोरण्यास आरंभ केला आहे! चिडून जाऊन शिव्या देत पेटी ऑफिसर म्हणाला, “ऐ सैतान! अरे तुला झाले तरी काय! का माझा जीव घेतोस! आता बारा वाजून गेले, तुझे जेवण झाले, आता तरी ऊठ!” श्रीयुतांनी डोळे उघडले, हळूच हाताने गलका करू नका म्हणून खुणावले. नंतर तोंडाने सांगितले “जमादार! जेवण झाल्याबरोबर घाणा फिरवू लागलो असता खाल्लेले अन्न पचणार नाही, जेवणानंतर थोडी वामकुक्षी करावी असे वैद्यकशास्त्राचे आणखी एक प्रमेय आहे. माझी आजीदेखील असेच सांगत असे!” सर्व बंदीवान खो-खो हसून उठले. जमादार चिडला. पण खोली उघडून श्रीयुतांस मारण्याइतका धीर न झाल्याने हसणाऱ्या दोघाचौघा बंदीवानांच्या थोबाडात चढवू लागला. संध्याकाळी एवीतेवी अर्धे काम म्हणजे १५ पौंड तेल श्रीयुतांनी पुरे केले. वास्तविक इतरांस दिवसभर खपूनही इतके झाले नसते, पण श्रीयुतांचे शरीर चांगले भक्कम होते. मन कसे होते हे वरील एका चुणुकेवरून वाचकांस समजलेच असेल. अंती त्यास कमी कामाविषयी शिक्षा झाल्या, कमी खाण्यावर ठेवले, शेवटी सुपरिन्टेंडंटने करार केला की, तीन दिवस पुरे काम कराल तर तुम्हास कोलूमधून काढू. त्याचप्रमाणे श्रीयुतांनी वैद्यकशास्त्रीय नियमांस तेवढ्यापुरता निरोप देऊन ते काम तीन दिवस पुरे केले. पण इतके नमते घेतलेले पाहताच बारीने पुनः कुरघोडी

करण्यास आरंभ करून करार तोडून त्यांस घाण्यावर धाडले. तेव्हा त्यांनी साफ सांगितले, “काम करीत नाही जा, बैल नाही आम्ही मनुष्य आहोत!” येथूनच पहिल्या संपास आरंभ झाला, राजबंद्यांची दृष्टी फिरून, ते संपापर्यंत येऊन ठेपल्याने बारीदेखील मनातल्या मनात किंचित दचकला होता.

जे राजबंदी संपात समाविष्ट झाले त्यांजवर शिक्षांचा भडिमार सुरू करण्यात आला. आठ दिवस हातकडी, बेडी, कोठडीबंदी इत्यादी नैयमिक शिक्षा तर देण्यात आल्याच. परंतु नियमाविरुद्ध शिक्षाही ठोठावण्यात येऊन वरील श्रीयुतांसारखे जे अगदी निधड्या छातीने वागत त्यांची गुर्मी जिरवण्यासाठी दहा-दहा, बारा-बारा दिवस कांजीविना दुसरे खाण्यासही देण्यात आले नाही. तुरुंगात दहा दिवस कांजीवर बंदीवानांस ठेवण्याचा नियम नाही. पण त्यांस असे नुसत्या दोनदा-तीनदा दिलेल्या पेजेवर ठेवून त्यांची शक्ती कमी झाली असता ते मनानेही दुर्बळ होतील, अशा आशेने त्यांस छळण्यात येऊ लागले. ही शिक्षा देण्यात येई, पण बंदीवानांच्या शिक्षापत्रकात ती लिहिली जात नसे. पुढे जेव्हा तिकडे हिंदुस्थान सरकारकडून एक मोठे अधिकारी शोध करावयास आले (ते वृत्त पुढे येईलच) तेव्हा राजबंद्यांनी हे अनैयमिक पीडन त्यांचे दृष्टीस आणले असता बारीने हे खोटे आहे हे शिक्षापत्रकावरूनच सिद्ध केले! आणि त्या अधिका-यांनी करवून घेतले! मला या सहबंदीवानांनी शपथेवर असे सांगितले आहे की, एका बाजूला त्यांस पेजेवर ठेवून दुसरीकडे ते विरुद्ध जात असता कोयनेलचे घोटचे घोट त्यांचे घशात ओतले जात. त्यायोगे चक्कर येऊन पोटात आग होऊन त्यांस फारच त्रास होई. पण ह्या सर्व त्रासाने संपवाले हरत नाहीत; इतकेच नव्हे, तर त्यांचा हा एकोपा आणि धैर्य पाहून इतर बंदीवानांवरील बारीचा अमानुष धाक उडत चालला आहे हे ओळखून अखेर आता आम्ही तुम्हांस कोलूवर वारंवार धाडणार नाही. इतकेच नव्हे, पण इतर बंदीवानांप्रमाणे तुम्हांसही तुरुंगाचे बाहेर प्रदेशात काम करण्यास सोडण्यात येईल असेही आश्वासन देण्यात आले. राजकीय बंदीवानांस तुरुंगाबाहेरील बंदीवान जे सांगत त्यावरून बाहेर पुष्कळ स्वतंत्रता असे हे ठाऊक होते. त्याव्यतिरिक्त आपला बाहेर जाण्याचा अधिकार एकदा मान्य करून घेतला म्हणजे मग ओघानेच पाच वर्षांनंतर स्वतंत्र काम करण्याचा आणि दहा वर्षांनतर ‘तिकिट’ घेऊन घर करून राहण्याचा अधिकार मिळण्याचेही सूत-उवाच केल्यासारखे होईल असे जाणून कसेबसे बाहेर पडावे असे राजबंद्यांस साहजिकच वाटे. तेव्हा काही लोकांस तरी एक वर्ष तुरुंगवास भरल्याने नियमाप्रमाणे बाहेर सोडण्यात येणार आहे हे ऐकून संपाचा एक उद्देश सफल झाला असे मंडळी समजली आणि संपातून एक एक करून निघून कामावर जाऊ लागली. थोड्याच दिवसांत काही मंडळी बाहेर काढण्यात आली. खाडीमध्ये छातीमांड्या- एवढ्या चिखलात उतरून चिखल भरून देणे, रस्ते झाडणे, नारळ वाहणे अशी त्यांस कामे देण्यात आली. कित्येकांस गाडीस जुंपण्यात आले.

अंदमानामध्ये गाडीमध्ये सरकारी अधिकारी बसतात आणि ती ओढण्यास बैल घोडे इत्यादी पशूंस लावले असता होणारा खर्च टाळता यावा म्हणून बंदीवानांस लावतात. एकसारखी दौडीने ती गाडी ओढीत नेताना आणि मोठमोठ्या चढणीवरून धापा टाकीत ती गाडी ओढताना आणि ‘चलो साला, कैसा चलता है!” म्हणून वर शिव्या खाताना बंदीवान वारंवार जिकडे तिकडे पाहण्यात येत. ही रीत न आवडून बंदीवानांकडून आपली गाडी खेचून न घेणारे एक दोन इंग्रजी अधिकारीही मला माहीत आहेत. पण ती गाडी खेचण्यास साफ नाकारणारे बंदीवान मात्र कोणास माहीत नव्हते. तथापि बारीच्या कुशाग्र नसल्या तरी लठ्याग्र बुद्धिमत्तेने तेही सर्वांचे दृष्टीचे आणविले.

कारण राजबंदी किती खट्याळ आहेत हे सुपरिन्टेंडंटचे मनावर बिंबविण्यासाठी त्यांच्यातील एकदोघा मानी आणि धीट गृहस्थांसच बाहेर गेल्याबरोबर गाडीस जुंपविण्याचे बारीने हवालदारांदिकांस सांगून ठेवले. अर्थातच गाडी ओढा म्हणताच त्या निर्भीड लोकांनी माणसाची गाडी ओढण्यास आम्ही बैल नाही म्हणून उत्तर दिले. बारी लगेच सुपरिन्टेंडंटास म्हणाले, "पहा हे खट्याळ लोक ! तुरुंगात म्हणत, बाहेर काढा, आम्ही आता कोलू करणार नाही! बाहेर काढले तर म्हणतात, गाडी ओढणार नाही ! आता अशा सभ्य लोकांसाठी मी निर्दोष असे काम तरी कोठून आणू? आणि यांना जर यांच्या गाऱ्हाण्यावरून मी दुसऱ्या सुलभ वा सभ्य कामावर नेले तर इतर बंदीवान नाही का या पक्षपाताविषयी मला दोष देणार?" परंतु हेच-

## पापभीरू बारीसाहेब

मनात आले तर, ज्या बंद्यांना चार अक्षरे येत नसत, मग ते दरोडेखोर असले तरी, त्यांना हे कार्यालयात, आपल्या बंगल्यावर देखील आरामाची कामे देत. इतकेच नव्हे पण ह्या राजकीय बंदीवानांतच त्यांच्या कच्छपी जे लागले होते आणि हांजी हांजी करू शकत त्यांसही नुसते बसवून ठेवण्यास गुपचुप आज्ञा ह्या बारीसाहेबांनी सोडलेल्या असत. तेथे त्यांस ह्या पक्षपाताच्या पापाचे भय मुळीच वाटत नसे. बारीसाहेबांदिकांची पक्षपाताची व्याख्या म्हणजे ज्यायोगे त्यांच्या पक्षाचा पात-पतन होण्याचा संभव दिसतो तो पक्षपात!

मी तुरुंगात ज्या वेळी जाऊन पोहोचलो त्यावेळपर्यंतच्या राजकीय बंदीवानांच्या वृत्तान्ताचा सारांश वर दिला आहे. हा सर्व वृत्तान्त मी आल्याचे महिन्याचे आतबाहेरच मला कळविण्यात आला. राजकीय बंदीवानांत काही लोक संपाच्या धोरणाच्या प्रामाणिकपणे विरुद्ध होते. काही जे बारी म्हणेल तसेच म्हणावयाचे असे व्रत धरलेले. त्यांच्याकडून बारीने राजकीय बंदीवानांत फूट पाडण्यात आणि संप करणे ही आपण मोठी चूक केली, ज्यांनी अधिका-यांच्या शिवीला शिवी आणि उर्मटपणास उर्मटपणाचे वर्तन आरंभले त्यांचे ते करणे अत्यत निंद्य होते, तो असभ्यपणा होय इत्यादी चर्चा करविण्यास प्रारंभ करविला होता. साहजिकपणेच या विषयावर माझे मत काय ते काढण्यास राजबंदींचाच नव्हे तर बारीसाहेबांचाही आटोकाट प्रयत्न चालला. सरासरी आठ-पंधरा दिवस मला वरच बंद ठेवल्यानंतर खालचे चाळीत दिवसा काम करण्यास आणले आणि प्रथम मागे वर्णिलेले छिलका कुटण्याचे काम दिले. वास्तविक छिलका दोन वा दीड पौंड देण्यात येतो. पण मला प्रथमच एक पौंड देण्यात आला. ही मजवर विशेष कृपा होय असे बारीने मला माझ्या योग्यतेवर एक गोडसे व्याख्यान देऊन सांगितले. ते जरी दयाळूपण असले तरी माझ्या हातात ती नारळाची सुकलेली कवची मऊ लागावीत इतके मार्दव काही त्या दयेत असणे शक्यच नव्हते. तेव्हा कुटून कुटून माझे हात सोलून निघाले. स्नायू सुजून दुखू लागले. तळहातास मोठमोठे फोड येऊन आणि तसेच कुटावे लागून रक्त वाहू लागले. मी सुपरिन्टेंडंटास तो हात दाखवून म्हटले, "काम बदलता येणार नाही का? निदान काही दिवस बंद ठेवले जावे काम!" त्यांनी एका वाक्यात "तसे सगळयांचेच होते. तुम्हास एक पौंड छिलका दिला. दोन दिला नाही हीच सरकारी कृपा समजा." असे उत्तर दिले आणि ते चालते झाले. अर्थातच छिलका तसाच कुटावा लागला. मी तसा कुटून काढलेल्या आणि बांधून दिलेल्या काथ्याचे जुड्यांवर कित्येक वेळा

ते रक्ताचे थेंब पडलेले असत. पण तो पौंडभर आहे की नाही हे पाहण्याच्या धांदलीत तो कुटणाऱ्याच्या हाताच्या रक्ताने माखलेला आहे की नाही हे पाहण्यास बारीसाहेबांस वेळ मिळत नसे.

## "साला लोग ! वेत लगावेंगे"

तथापि प्रत्यही संध्याकाळी येऊन बारीसाहेब मजशी इंग्रजीमध्ये दहा-पाच मिनिटे बोलल्याविना जात नसत. त्यांच्या बोलण्यात लवकरच तेथील राजबंदीवानांच्या वर्तनाचा उल्लेख येऊ लागला. एका राजबंद्याची माहिती तर काय पण नुसता नमस्कारही दुसऱ्यास पोचविण्याचा इतरांना सक्त निषेध करण्यात आला होता आणि तसे करताना कोणी धरले गेल्यास त्यास वॉर्डरकीवरून काढून वा आठ दिवस कोलूत धाडून देण्यात येत असे. परंतु त्याच राजबंद्यांची माहिती बारीसाहेब मात्र इतरांस वाटेल तशी पोचवू शकत. पण वाटेल तशी म्हणजे त्यांस त्यांच्यात फाटाफूट पाडण्यास उपयुक्त होईल अशी. बारीसाहेबांस माहीत होते की, त्यांनी काही केले तरी मला राजबंद्यांची मागची माहिती मिळाली होती. तेव्हा आपली बाजू तरी का न मांडा म्हणून बारीसाहेब ती सांगत. त्यात मुख्य पालुपद म्हणजे जे लोक त्यांच्या कच्छपी लागलेले असत त्यांची भरपूर स्तुती आणि जे संपात भाग घेऊन कारागारातही स्वतःचा व्यर्थ अपमान वा शिवीगाळी सहन न करता अधिका-यांशी निर्भयपणे वागत त्यांची मनमुराद निंदा आणि ह्या दोन हेतूंपासून अनुमानित होणारी मुख्य गोष्ट की, माझ्यासारख्या शिक्षित आणि प्रख्यात व्यक्तीने त्या मूर्ख, अशिक्षित आणि असभ्य लोकांचे नादी लागू नये यातच माझे कल्याण आहे हे निक्षून सांगणे. अशा बऱ्याच वेळा झालेल्या संभाषणांत मी शक्य तो मौन धरले. पण केव्हा केव्हा आपल्या बांधवांची निष्कारण वाटेल ती निंदा ऐकून केवळ कोणाची कृपा संपादन करण्याकरिता तोंडदेखलेपणाने होकार भरणे मला असह्य होई आणि बारी तर नुसत्या मौनाने समाधान न होता विचारीत सुटे, "तुम्हाला काय वाटते? सांगा, सांगा." एकच उदाहरण द्यावयाचे म्हणजे मागे ज्या श्रीयुत यांची मी माहिती सांगितली त्यांचे संपातील सडेतोड वर्तन हे असभ्य होते असे म्हणून, "त्याला वेड लागलेले आहे; तो हीन कुलातला मनुष्य आहे." असे बारी मला आग्रहाने सांगू लागले. इतकेच नव्हे तर वर मधाचे बोट लावून मला म्हणाले, "तुमच्यासारख्या सुशिक्षित मनुष्यास याविषयी काय वाटते हे मला ऐकावेसे वाटते. सांगा, वेड लागलेल्या मनुष्याविना असे कोण वर्तन करील?"

## बारीने रचलेले नाटक

तेव्हा न साहून मी स्पष्ट सांगितले, "जरी माझी आणि तुम्ही म्हणता त्या राजबंद्यांपैकी कोणाची ओळख अजून झाली नाही तरी तुम्ही सांगितलेल्या वृत्तान्तावरूनही त्यात मला मतिभ्रष्टता वा असभ्यता याचा लवलेशही दिसत नाही. कष्ट असह्य झाल्यावर किंवा नियमाविरुद्ध अधिका-यांनी पीडा देण्यास आरंभ केल्यावर राजबंदीवानांस काय किंवा इतरांस काय संपकरून त्यांचा प्रतिषेध करण्याव्यतिरिक्त दुसरा कोणता मार्ग सहज सापडणार आहे? तुम्ही काही सांगितले तरी श्रीयुत ...... हे चांगले कुलीन दिसतात. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे लुच्चा अगर खर्डेघाशे (रोग ऑर क्लार्क) ते खास नाहीत." माझे हे उत्तर ऐकून बारीसाहेब लाल झाला. पण कसेबसे त्या दिवशीचे संभाषण संपवून मजवर परिणाम करण्यासाठी त्याने दुसरेच एक नाटक दुसऱ्या दिवशी करविले. ज्या राजकीय बंदीवानांस बाहेर कामास धाडण्यात येत असे ते अकरा वाजण्याचे सुमारास परत जेवावयास बंदीगृहात

आलेले होते. त्यांस मी जेवावयास बसलो होतो तेथेच जेवण घेण्यास बोलाविले गेले. त्यांनी पुरती स्नाने देखील केली नव्हती. त्यांचे कपडे आणि अंग चिखलाच्या पाट्या भरून वाहता वाहता उडालेल्या चिखलाने गदळ आणि घाणेरडे झाले होते. तसेच त्यांस उभे केले; इतक्यात बारीसाहेब आले आणि मजकडे उर्मटपणे पाठ फिरवून मोठ्या रागाने काठी आपटीत त्या टोळीस म्हणाले, “काय रे, आज तुम्ही जमादारांनी सांगितल्या तितक्या चिखलाच्या पाट्या का फेकल्या नाहीत? हे पाहा हड्डी मोड्न टाकीन - टाकीन! देखो जमादार, आज दुपारमें भी ए लोग सब काम नहीं करेंगे तो मेरे सामने लाव. अस साला लोगोंको वेत लगाके उनकी xx फाड डालना पडेगी!”

अशी अश्लील भाषा वापरीत मला जसे काय तेव्हाच पाहिले असे दाखवून वळून तो बंदीपाल मला म्हणाला, “हे पहा, सावरकर, ह्या लोकांच्या तुम्ही नादी लागू नका. ही भिकारडी माणसे होती. तुम्ही शिकलेले आहात. यांचे काय? आठ-दहा वर्षे भरून हे आता घरी जातील. तुमचे तसे नाही. तुम्हास पन्नास वर्षे शिक्षा आहे आणि तुम्ही राजकीय बंदी नाही. तेव्हा यांच्याशी नुसते बोलणे - चालणे ठेवल्यासही तुमची हानी होईल. तुम्ही आपले स्वतःचे तिकिटाकडे (बंदीपत्रक ज्यात मला पन्नास वर्षे शिक्षा दिलेली होती ते) पाहून स्वतःपुरती चिंता वाहा. तुम्ही हे सर्व ऐकले का?”

## तुम्ही राजकीय बंदीवान नाही

परंतु मी त्या प्रश्नास काहीच उत्तर न देता रागावलेलासा दिसत जेवत बसलो आहे हे पाहून जरा ओशाळलेसे झालेले बारीसाहेब, “हे पाहा, ह्यात तुमचेच हित आहे. तुम्ही राजबंदी नसून त्या इतर चोरांपोरांसारखेच एक साधारण पापी आहात.” असे पुनः पुनः बजावीत निघून गेले. मी राजकीय बंदीवान नाही हे त्या दिवशी मला प्रथम कळले. ते मला पटावे म्हणून किती वेळा बारीने, सुपरिन्टेंडंटाने आणि इतर वरिष्ठ अधिका-यांनी घोकले असेल त्याची गणती नाही!

बारीसाहेब गेले. माझ्यासमोर राजबंदीवानांस ती धमकी दिल्याने आपणासही अशा शिव्या आणि धमक्या आणि हाणमार सोसावी लागेल असे वाटून मी दबून जावे म्हणून बारीने हे प्रत्यक्ष वस्तुपाठीय उदाहरण मला दाखविले होते. ते पाहून मला त्या राजबंद्यांची दया आली. आपणासही दुःखे सोसावी लागतील हे कळलेही; पण त्याचा परिणाम दबून जाण्यात न होता त्याचबरोबर हे अपमान सहन करण्याची पाळी आपणावरही यावी म्हणजे यांना उनाड, भिकारडे म्हणून टोमणे मारले जात असता मीही त्या भिकारड्या अशिक्षितांच्याच पंगतीत आहे हे जाणून त्यांचे मानसिक दुःख कमी होईल आणि ते टोमणे आहेत त्याहूनही फोल ठरतील असे वाटले. त्यांच्याशी बोलण्याने मला शिक्षा मिळेल हे माहीत असूनही तेथील राजबंदीवानांतील लोकांस प्रथमच मी तेथे प्रत्यक्ष भेटू शकलो असल्याने मी नीट पुढे झालो आणि त्यांस त्यांची नावे विचारली. त्यांची म्लानवदने पाहून मी म्हटले, “माझ्यासमोर तुम्हांस तो बंदीपाल अश्लील भाषा बोलला म्हणून तुम्ही मनात संकोच करू नका व धीर खचू देऊ नका. आज ते तुम्हांस भिकारडे म्हणत आहेत, उद्या मला म्हणतील. हा अपमान तुमचा नसून तुम्हांस असले दुःशब्द जो बोलतो तो स्वतःचाच तसा अपमान करून घेतो. आज आपण अवश आहो. आज आपला या जगतात

अपमान होईल पण असाही एक दिवस क्वचित येईल की अंदमानच्या याच कारागारात राजबंदीवानांचे पुतळे उभारले जातील आणि येथे हिंदुस्थानाचे राजबंदीवान राहत असत म्हणून हजारो लोक यात्रेस लोटतील!"

माझ्या या भाषणाचा कष्टपीडित संत्रस्तांपैकी कोणासही फारसा अर्थ कळलासा दिसला नाही. निदान मला ते विचार प्रदर्शित करताना स्वतः जे तेज मनात संचरलेसे वाटले आणि निराशा मावळतेशी भासली तसेच त्यांच्या मुद्रेवर काहीच विशेषसे भाव प्रकट झाल्याचे दिसले नाही. केवळ एकजण मात्र जरा चमकल्यासारखा होऊन म्हणाला, "तुम्हाला खरेच का असे वाटते?" मी म्हटले, "क्वचित असे होईलही! निदान झाले पाहिजे."

इतक्यात पेटी ऑफिसर आणि वॉर्डर ओरडत येऊन "ए बाबू! तुमको क्या हुवा! तुम्हांला त्याच्याशी बोलताना बारी पाहील तर आमचा जीव घेईल. चलो! आम्ही तुमची फार मर्यादा ठेवतो. पण असे कराल तर - देखो!" असे म्हणत मला ओढून घेऊन जाऊन कोठडीत बंद करते झाले.

प्रकरण दहावे

# माझ्या ज्येष्ठ बंधूंचे दर्शन

त्या एकाच बंदीगृहात माझे जेष्ठ बंधू व मी दोघेही बंद असूनही अजूनपर्यंत आमची दृष्टादृष्टही झाली नव्हती. माझ्या येण्याने त्यांच्या हृदयास अर्थातच धक्का बसला होता. त्यांच्या कारागारातील यातना ऐकून माझे हृदय पिळवटून निघत असे. परंतु ते दुःख काहीच नाही असे वाटण्याचा एक दिवस प्रसंग गुजरला. सुख इतके दुःखद आयुष्यात क्वचितच भासते.

बंधूंस भेटावे म्हणून साहजिकच उत्कट इच्छा होई. वॉर्डर व पेटी ऑफिसरास विनवून पाहिले की, काही तरी उपायाने नुसती ओझरती दृष्टिभेट का होईना पण माझ्या बंधूंची आणि माझी एकत्र गाठ गुप्तपणे पाडावी. गुप्तपणे, कारण माझ्या बंधूंविषयी बारीसाहेब आणि सुपरिन्टेंडंट यांनाही अनेक वेळा विचारले की, ते म्हणत, “ते येथे या कारागारात आहेत की नाहीत हे देखील आम्हांस तुम्हाला सांगता येत नाही! मग भेटीची गोष्ट कशास?” एकदा बंधू डोकेदुखीने अत्यंत पीडित झाल्याचे ऐकले तेव्हा “ते खरेच का? आणि तसे असेल तर त्यांस रुग्णालयात का नेत नाही? कोठडीतच का बंद ठेविता?” असे सुपरिन्टेंडंटास विचारता, “तुम्ही स्वतःचे काय ते बाला, दुसऱ्या बंदीवानाची उठाठेव तुम्हास करता येत नाही.” असे सांगून उलट माझ्या चाळीच्या जमादारांस उगीचच्या उगीच “ही बातमी या बंदीवानांस कशी कळली? साला! तुम बंदोबस्त नहीं रखता, बतलाव उसकू किसने बात बतलायी?” म्हणून शिव्या हासडावयास आरंभ केला. अशा स्थितीत गुपचूप काही उपायाने माझ्या चिरविरहित वडील भावाचे पुण्य दर्शन घडले तर पाहावे म्हणून प्रयत्न करीत होतो. मला विलायतेस जाताना निरोप द्यावयास जी मंडळी आली होती त्या वेळेस माझे वडील बंधूंस पाहिले होते. त्यानंतर त्या बंदीगृहात त्यांस पाहण्याचा प्रसंग! मनात वाटे, त्यांस अत्यंत खेद होईल म्हणून भेटणे टाळावे; पण तसे ते टाळणे म्हणजे दुःखास तोंड देण्यास कचरणे नव्हे काय? दुःखाचा हत्ती तर हृदय पोखरीत आत शिरला आहे. आता त्याच्या उरलेल्या शेपटीस काय भ्या आणि ज्येष्ठ बंधूंचे पुण्य दर्शन घेण्याचे पवित्र कर्तव्य डोळ्यांतील पाण्याचे चार बिंदू अधिक गळतील म्हणून टाळावयाचे! तो भ्याडपणा होईल. तसल्या परिस्थितीत तसल्या पवित्र अश्रूंत स्नान घडणे जन्मोजन्मींच्या पुण्याईचे फळ असते.

अखेर संध्याकाळी सर्व बंदीवानांची कामे मोजून घेण्याची जी वेळ असते तेथे त्यांची भेट घेण्याचा संभव आहे असे पाहून एका वॉर्डराचे साह्याने ती जुळविण्याचे ठरले. संध्याकाळी देखील सर्व बंदीवान एकत्र सोडावयाचे नसतच, पण केव्हा केव्हा एक क्रमांकाच्या भागातील बंदीवान परत धाडण्याचे आधीच दुसऱ्या भागातील बंदीवान घाईत सोडले जात. त्या घाईचा लाभ घेऊन माझ्या बंधूंच्या काम मोजून देण्यास येण्याचे वेळीच माझ्याकडील भागातील बंदीवान सोडले गेले आणि मी पण त्यात घुसलो तो दुरून परतता परतता माझे बंधूंची माझी दृष्टादृष्ट झाली. विलायतेस जाताना मला त्यांनी तसे पाहिले. माझ्या भावी भाग्योदयाच्या लौकिक आशांची राख अंगास फासून अशा अत्यंत करुणास्पद स्थितीत त्यांनी आज पाहिले. क्षणभर त्यांस दिङ्मूढ झाल्यासारखे झाले. त्यांच्या मूक दुःखाचा निष्कर्ष म्हणून एकच उद्गार बाहेर पडला की “तात्या! तू येथे कसा आलास?”

तो एक उद्गार असह्य वेदनांचे तीक्ष्ण टोक होता. तो माझ्या हृदयात शल्यासारखा घुसला. परंतु बंधूंनी मोठ्याने ते शब्द बोलले असल्याने आता जर हे दोघे भाऊ एकमेकांशी असे मोठ्याने बोलू लागले तर अधिकाऱ्याचे लक्ष इकडे वेधून सर्वांनाच सरसहा शिक्षा होतील म्हणून माझ्या भागाच्या पेटी ऑफिसराने आणि वॉर्डराने मला चटकन मागे खेचले. एका दृष्टादृष्टीत माझ्या बंधूंपासून माझी ताटातूट झाली. पण तो उद्गार मनात तसाच सलत राहिला. दुःखाच्या उमाळ्यांनी चिंब झालेली अशी एक गुप्त चिठी पण माझ्या बंधूंकडून मला धाडण्यात आली. "तू बाहेर कार्य यशस्वी करशील, प्रिय हिंदुस्थानचे...! ही मला कोण आशा. त्या आशेने मला काळेपाणी झाले त्याचे मला काहीच वाटेना. मन त्या संकटास कस्पटाप्रमाणे लेखी. कारण ज्या... कार्यात हे बलिदान मी करीत आहे ते... तू उरलेलाच आहेस. ही कल्पना मला धीर देई, कष्टांचे साफल्य भासवी. पण आता तू पॅरिसला असतानाही ह्यांच्या कसा हाती लागलास आता!... त्याचे आणि... कार्याचे कसे होईल? तुझी योग्यता, कर्तव्य... आता मातीमोल होणार ना! आणि बाळ, ते आपले लहानगे पोर कोणाकडे पाहील? मला प्रत्यक्ष पाहूनही अजून विश्वास पटत नाही - कळत नाही की, हाय! हाय! तू येथे कसा आलास?"

माझ्या मनाच्या तितिक्षेस त्या चिठीचे उत्तर लिहिताना जितका पडला तितका ताण कधीही पडला नव्हता! त्यांच्या प्रत्येक प्रश्नागणिक प्रश्न माझे मला खातच होते. ते स्वतःच्या लौकिक आशांची आणि भाग्योदयाची राख झाल्याचे दुःख गिळून वर बंधूंचे सांत्वन करावयाचे, स्वतःस धीर देऊन दुसऱ्यास द्यावयाचा! तरी विवेकाचे साहाय्याने कर्तव्याच्या विषाचा तोही प्याला प्यालो. मी त्यांस कळविले की, लौकिक व भाग्योदयाच्या आशांची राख अंगास फासून झुंजत राहू शकणे **हेच अलौकिक भाग्य नाही का?**

मग दुःख का? माझी योग्यता, कर्तृत्व मातीस मिळते की, जर परीक्षेचे वेळीच मी हिणकस ठरलो असतो, जर 'सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति! गाण्डीव स्रंसते हस्तात्वक्चैव परिदह्यते।।" अशी स्थिती होऊन जर कर्तव्य- पराङ्मुख झालो असतो, कोणाचा विश्वासघात केला असता! पण तसे काही एक न घडता यथाप्राप्त संकटास तोंड देण्यास आणि स्वार्थास समूळ खणून काढून, लोकांस कर्तव्यक्षेत्रात जी संकटे भोगा म्हणून सांगितले, तीच प्रसंग येताच त्याच क्षेत्रात स्वतः निर्भय चित्ताने भोगावयास सिद्ध होण्यातच खरे कर्तृत्व आणि योग्यता, तुमची, आमची आणि या सर्वांची प्रकट होत आहे. यशापयश योगायोगाच्या गोष्टी आहेत. जन्मभर लढाया लढत, लोदीचे पूल उतरत आणि आस्टर्लिट्झ जिंकीत असताही एखादा नेपोलियन अखेर अंथरुणावर दुखण्याने मरतो, आणि दुसऱ्या तिसऱ्याच लढाईत एखादी राणी लक्ष्मी तरवारीचा घाव लागून मरते- एखादा सैनिक तर पहिल्याच चकमकीत गोळी लागून पाडाव होतो. त्यांचे कर्तृत्व या योगायोगाने बहुधा ठरत नसते. तर त्या पहिल्याच चकमकीत मी मागे दडून जगावे आणि इतरांनी पुढे होऊन मरत ती लढाई जिंकली म्हणजे तिचे यश पाहावयास आणि भोगावयास मी उरावे, ही दुष्ट आणि जनहितविघातक भ्याड इच्छा मनात न धरता, तो सैनिक अवश्य तेव्हा इतरांसह लढाईचे अग्रभागी अचलपणे झुंजत राहिला की नाही? या प्रश्नावर त्याचे खरे कर्तृत्व आणि योग्यता अवलंबून असते. त्या कसोटीस, मला वाटते, आपण सर्व उतरलो आहोत आणि म्हणूनच लौकिक व भाग्योदयाच्या सुवर्णवलयात आपण जितकी धन्यता पावलो नसतो तितकी त्या भाग्योदयाची अलौकिक राख अंगास फासून आज या कारागारात अशा अवश आणि करुणास्पद स्थितीत पडलो असता वास्तविकपणे आपण

चाललो आहोत! ही संकटे सोसणे, आणि असे कारागारात सडत, कोणासही न कळत, ज्यांच्यासाठी हे कष्ट भोगले त्यांचेही शिव्याशाप खात असे मरणे हेच आता आपल्या आयुष्याचे ध्येय, तितकेच महान की जितके बाहेर राहून कीर्तीच्या आणि दुंदुभीच्या तालावर झुंजत राहणे जितके महान समजले जाते. कारण अंतिम विजयास ते ज्ञात झुंजणे आणि ते दुंदुभीचे निनाद जितके अवश्य असतात तितकेच हे भुयारातील अश्रुत कण्हणे आणि अज्ञात प्राणोत्क्रमणे ही अवश्यच असतात.

## आणि कार्याच्याविषयी?

....मी ज्या वेळेस हायकोर्टात शिक्षा लागणार होती त्या दिवशी याविषयी जे पद केले होते तेच आज त्या कठोर शिक्षेच्या जबड्यात भरडलो जात असताही माझ्या हृदयाचा विश्वास आणि भावना मुखरित करीत आहे “सारथी जिचा अभिमानी। कृष्णजी आणि राम सेनानी। अशि कोटि कोटि तव सेना।। ती आम्हांविना थांबेना!!...।।” अशा आशयाचे पत्र मी गुप्त रीतीने बंधूंस धाडले. बंधूंचे सांत्वन तर ते करते झालेच, पण लिहिता लिहिता माझ्याही विवेकाचे डळमळणारे धैर्य पुनः निश्चल करून माझ्यात ताजा उत्साह संचरवू शकले.

प्रकरण अकरावे

# मला घाण्याचे काम देण्यात येते

मी सरासरी एक महिनाभर छिलका कुटण्याचे काम केले.सर्वजण आश्चर्य करू लागले की, मला कोलू कसा दिला नाही. त्यात आशावादी म्हणाले, “छे हो, बॅरिस्टरबाबूंना कोलू कोणत्या तोंडाने देतील?” मी त्यांस म्हणे, “ज्या तोंडाने बॅरिस्टरबाबूंस काळेपाण्यास धाडून लंगोटी नेसवून छिलका कुटावयास लावले त्याच तोंडाने!” अखेर एक दिवस सुपरिन्टेंडंट येऊन मला म्हणाला, “उद्यापासून तुम्हाला कोलूवर जावयाचे आहे. छिलका कुटून हात आता कठीण झाले असतील. आता त्याहून सक्त काम करण्यास हरकत नाही.” बारीसाहेब हसून म्हणाला, “तुमची वरच्या इयत्तेत बढती झाली आहे!” त्या दिवशी संध्याकाळी मला बारीसाहेबाने कार्यालयात बोलाविले. माझ्याशी झालेल्या संभाषणातून त्यांना हे माहीतच झाले होते की, माझी राजबंदीवानांनी केलेल्या संपास सहानुभूती होती आणि जे राजबंदी त्या संपाची आणि निर्भय वर्तनाची उद्दामपणाचे, असभ्यपणाचे आणि मूर्खपणाचे द्योतक म्हणून निंदा करीत त्यांची तोंडे माझ्या त्या धोरणाच्या पुरस्काराने बरीच बंद पडलेली होती. एकंदर बातम्या गुप्त रीतीने ज्या बारीला प्रत्यही पोचत असत त्यापासूनही मी लवकरच त्या “असभ्यातील’ शिरोमणी होणार असाच संभव दिसू लागला. तेव्हाच कोलू करण्यास मी इन्कार करतो की काय याचा पत्ता काढण्यास आणि मला तसे करण्यापासून परावृत्त करण्यास बारीने हे बोलावणे केले होते. बराच वेळ गप्पा मारून अखेर सांगितलेच की, “मी काय करू? वरची आज्ञा मला पाळली पाहिजे. तुम्हास कोलूच द्यावा असे वरतून लिहून आले आहे. तरी मी इतके केले की, तुमच्या योग्यतेविषयी सांगून केवळ १४ दिवसच कोलू तुम्हास सुपरिन्टेंडंटाकडून देवविला. इतरांप्रमाणे वारंवार देवविणार नाही. तुम्ही नाही मात्र म्हणू नका. जा उभे राहा. मी शक्य तर साहाय्यही देईन. पण शिक्षा खाऊ नका.” मी म्हटले, “आधीच आमच्या जन्माची माती झालेली त्यातही आणखी निष्कारण जाच सोसण्याची आम्हांस हौस का आली आहे? मी शक्य तितके काम नेहमी करीत राहीत.” बारी कळवळल्यासारखे होऊन म्हणाला, “पाहा बोवा! तुमच्याकरिता सांगतो. पन्नास वर्षे शिक्षा आहे! हे मला पाहताच धस्स होते. म्हणून म्हणतो, इतरांचे काय वाटेल ते होवो, तुम्ही आपले नामानिराळे राहा.” माझा धैर्यभंग करण्यासाठी बारी जो जो पन्नास वर्षे शिक्षेची वारंवार आठवण देत गेला तो तो त्याच्या धोरणाचा उलट परिणाम होऊन त्या शब्दांचा अर्थ माझ्या इतका परिचयाचा झाला की तोफेचा आवाज जसा तोफखान्यातील सैनिकाच्या! त्याच्या ध्वनीने थर्र असे होणेच बंद झाले. दुसऱ्या दिवशी सकाळीच मला तेलाच्या घाण्यास जुंपले.

त्या घाण्याचे काम मी ज्या सात क्रमाकांच्या भागात राहत असे तेथपासून सहाव्या भागात होते. म्हणून मला सकाळीच नेण्यात आले. मला तो भाग बदलण्याचा एक आनंद झाला. कारण तिकडे राहणारे राजबंदी मला दिसू आणि केव्हा माझ्याशी बोलूही शकले. कामावर जाताच पाहतो तो एक बर्मा देशातील राजकीय बंदीवानही माझ्या कोलूस जुंपलेला होता. मला सांगण्यात आले की तुम्हास साह्य होईल. पण तुम्ही एकसारखे फिरवीत राहिले पाहिजे, बसता कामा नये. इतर राजबंदींच्या मानाने मला ही सवलत मिळाली होती. तरी ती कोलूच्या कामातील सवलत! सवलत वजा जाऊनही जे कष्ट उरले ते कोणाही काबाडकष्टांची सवय नसणाऱ्याची खोड मोडण्यास पुरेसे

होते. लंगोटी नेसून सकाळी दहा वाजेपर्यंत काम करावे. सारखे फिरवीत राहिल्याने चक्कर यावी. अंगाचे ठणठणणे तर इतके झाले की रात्री फळ्यावर अंग टाकताच झोप लागण्याचे स्थळी अंगात कसर भरून तळमळ करीत पडावे लागे की पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी तो घाणा दत्त म्हणून उभा. असे सहा-सात दिवस काढले. काम तोवर पुरे होत नव्हते. एक दिवस बारी आला आणि जरा ऐटीने म्हणाला की, "हा पाहा शेजारच्या खोलीतील बंदीवान तीस पौंड तेल दोन वाजता पुरे मोजून देतो आणि तुम्ही संध्याकाळपर्यंत राबूनही अजून पौंड दोन पौंड कमीच! याची तुम्हास लाज वाटली पाहिजे!" मी म्हटले, "वाटली असती लाजही, जर मलाही लहानपणापासून त्याच्यासारखे हमालीचे धंदे करण्याची सवय असती तर. तुम्ही जर त्याला एका तासाच्या आत एक सुनीत (सॉनेट) रचावयास सांगितले तर ते त्यास रचता येईल का? मी तुम्हास ते आता अर्ध्या तासात रचून देतो. पण म्हणून जर तुम्ही त्या कामकऱ्यास म्हणाल की, "अरे, तुला सॉनेट इतके लौकर रचता आले नाही याची तुला लाज वाटावयास पाहिजे", तर तो काय म्हणेल? "मला लहानपणापासून कविता करावयास कोणी शिकविले नाही!" तुमच्या कार्यालयात तुम्ही अर्धशिक्षित शेतकऱ्यादी चोरदरडेखोरांस लिहावयाचे काम देता, त्यांस जसे आमच्यासारखे त्वरित इंग्रजी बोलता येत नाही म्हणून लाज वाटण्याचे कारण नाही, तसाच आम्हांस त्यांच्यासारखे शारीरिक कष्ट एकदम झेपत नाहीत म्हणून संकोच वाटणे अनावश्यक आहे. त्यालाही सुनीत करता येत नाही म्हणून लाज वाटावयास नको. ज्यांना खरोखरच लाज वाटावयास पाहिजे ती त्यांना होय, की जीत बुद्धिजीवी वर्गास घाण्यास आणि कष्टजीवी अशिक्षितांस कारकुनांच्या जागा देतात आणि दोनही कामे बिघडवून घेतात."

## उदार मित्रांचे साह्य

कोलू फिरविताना मला राजबंदीवानांतील एक-दोघे बंदीवान, जे तेथे गुप्तपणे येऊ शकत ते येऊन कधी कधी साह्य देत; इतकेच काय परंतु शेवटपर्यंत नको नको म्हणत असताही आणि त्यांची दुःखे आणि कष्ट मजहून अधिक होत असताही राजबंद्यांतील कित्येकांनी मला आपले स्वतःचे कपडेसुद्धा धुऊ दिले नाहीत वा थाली-कटोरा घासू दिला नाही. माझे कपडे धुण्याविषयी आणि भांडी घासण्याविषयी त्यांस कित्येकदा पेटी ऑफिसर आणि वॉर्डर लोक धक्काबुक्की करीत शिव्या देत; पण असा त्रास सोसून देखील त्या उदार आणि प्रेमळ मनुष्यांनी माझी कामे करीत असावे. त्यांना निवारण्याचा मी कितीतरी प्रयत्न केला. काही वेळा मी त्यांचे कपडे गुपचुप नेऊन धुऊन टाकले. ते त्यांस कळले तेव्हा त्यांच्या मनाला फार वाईट वाटले इतके की त्यांनी अक्षरशः मला त्या त्या वेळा हात जोडून असे न करण्याविषयी विनंती करावी. जेव्हा मी त्यांचे साहाय्य न घेतले तर त्यांस साहाय्य देताना जे कष्ट पडतात त्यांहून अधिकच मनःक्लेश होतात हे मी अनुभवून पाहिले तेव्हा त्या त्या निरपेक्ष आणि उदार मित्रांस मी कामे करू द्यावी असे ठरविले. साधारणतः बहुतेक राजबंदीवानांची मजविषयी अशीच अकृत्रिम भक्ती आणि गाढ स्नेह मला अनुभवावयास सापडला. कधी कधी तर त्यांच्यात माझे कपडे धुण्याविषयी आणि सेवा करण्याविषयी खरोखरच चढाओढ आणि वैमनस्य उत्पन्न होई. तेव्हा पाळीपाळीने माझे कपडे धुण्यास निरनिराळया मित्रांस देणे मला भाग पडे. त्या त्या व्यक्तींच्या या थोर औदार्याविषयी आणि स्नेहाविषयी मला आजही कृतज्ञता वाटत आहे. त्याचप्रमाणे ह्याच प्रसंगी राजबंदीवान नसलेल्या साधारण बंदीवानांनीही आम्हास जे अयाचित साह्य शेवटपर्यंत

दिले आणि आमच्या शब्दास जो मान देत गेले त्यांच्याविषयीही सार्वजनिक साभार उल्लेख करणे आमचे कर्तव्य आहे. त्या अनेक प्रसंगांची माहिती मनोरंजक असली तरी विस्तारभयास्तव येथे सांगणे शक्य नाही. केवळ एकदा आणि एकत्रच त्या सर्वांविषयी कृतज्ञता प्रदर्शित करणे एवढेच येथे शक्य आहे.

## मनाचे बंड

कोणाशी चर्चा करू नये. कोणास कळवू नये. पण तो कोलू फिरवीत असता घामाने लिडबिडलेल्या अंगावर उडणारी ती भुशी-पिसून पिळून निघालेले पीठ आणि कचरा चिकटलेले ते घाणेरडे उघडे-बागडे शरीर पाहून मनाने वारंवार बंड करून उठावे. "स्वतःचा तिरस्कार वाटू लागावा असले दुःख आता का सोसतोस? ह्या तुझ्या शरीराचा आणि कर्तृत्वाचा राष्ट्रेच्या राष्ट्रे उदयास आणण्यासाठी उपयोग व्हावा, -आता ते मातीमोल ठरले, मग ह्या अंधकारात उगीच कष्टत का पडतोस? याचा कार्याला -तुझ्या मातृभूमीच्या उद्धाराला- आता कवडीचा उपयोग नाही. तिकडे तुझ्या हालअपेष्टांचे अवाक्षर देखील कळत नसेल, मग नैतिक परिणाम तर दूरच! - असा कार्याला उपयोग नाही. तुला स्वतःला उपयोग नाही, इतकेच नव्हे तर केवळ भारभूत आहे; तर मग हे जीवन व्यर्थ का धारण करतोस? बस्स, जो उपयोग त्याचा व्हावयाचा तो होऊन गेला. आता चल दोरीच्या एका हिसक्यासरशी. करून टाक त्या जीवनाचा अंत!

हा समुद्रमंथनासच उपयोगी पडावा म्हणून निर्माण झालेला कर्तृत्वशक्तीचा मेरुदंड ह्या यःकश्चित् कथलीतले ताक घुसळविण्याचे कामाला लावून त्याचा स्वतःचा अनादर का करतोस?" पुनःपुनः मनाने म्हणावे, "आता जगणे व्यर्थ; आता आत्मघातच आत्मसन्मान होणार आहे." नोव्हालिस आदिक कित्येक नीतिविशारदांची आणि ऐतिहासिक उदाहरणांचीही आठवण व्हावी की प्रसंगी आत्मघात हे आत्मकर्तव्य ठरत असते.

एके दिवशी दुपारी भयंकर उकाड्यात कोलू फिरवीत असता धापा टाकीत गिरकी आल्यासारखे वाटून खाली बसलो आणि पोट फार श्रम होताच आतडी ताठरतात तशी ताठरल्याने, हाताने धरून भिंतीशी टेकलो आणि डोळे मिटले तो एक तेथल्या तेथेच गाढ गुंगी लागली इतकी गाढ की, दचकून जो जागा झालो तो दिशा-विदिशा, स्थलकाल हे मला चारपाच मिनिटे काही कळेना. शांत, शून्य, निर्विकार अशा कोणत्या सुखद अवस्थेत काही नाहीसे होऊन राहिलो. थोड्या वेळाने सावध झालो. एकेक वस्तू दिसून तिचा अर्थ कळू लागला. तेव्हा पुनः कामास लागलो पण मन एकसारखे म्हणे, हे शेवटचे काम का होऊ देत नाहीस? मघाची ती शून्यता तेच मरण. आज-आज रात्री शेकडो बंदीवान त्या पोर्ट ब्लेअरमध्ये जिच्या आधाराने मृत्यु तरून गेले त्या दोरीच्या तुकड्याने गळयास फास लाव आणि करून टाक ह्या कष्टांचा अंत!

## आत्महत्येचे आकर्षण

त्या आत्महत्येचे आकर्षण मला एकसारखे ओढीत होते. ती मघाची शून्य स्थिती हेच मरण. ते तर ह्या जीवनाहून निःसंशय गोड आहे! मला ज्या दोन-चार वेळा माझ्या विवासनातील यातना असह्य होऊन आत्महत्या अत्यंत आकर्षक वाटू लागली त्यांपैकी पहिली वेळ म्हणजे मार्सेलिसहून परत धरलो गेल्यानंतर एडनच्या आजूबाजूस भयंकर उष्म्या आणि त्रासात बंद केलेला होतो ती होय. दुसरी ही कोलूतली त्या चक्कर आलेल्या दिवसाची. दोनही

वेळी मनाची आणि बुद्धीची झुंज चालता चालता बुद्धी जवळ जवळ चारी मुंड्या चीत पडण्याचा प्रसंग आलेला होता. आणखी एक-दोन वेळी तो प्रसंग पुनः यावयाचा होता. त्या रात्री खोलीच्या ज्या खिडकीच्या गजास टांगून बहुधा बंदीवान स्वतः फाशी जात त्या खिडकीकडे मी लुब्ध दृष्टीने चारपाच वेळा तरी पाहिले असेल. बुद्धीचा आणि मनाचा तो संवाद मी तिऱ्हाईतपणे जसा काही ऐकत होतो तो पुढे मी एका कवितेत ग्रथिलाही होता. वारंवार मनाच्या वरील कोटीक्रमास विवेकाने उत्तर द्यावे "वेड्या, हा तुझा अहंकार! समज की, तुझे कर्तृत्व कर्तव्य म्हणजे एक राष्ट्रचे राष्ट्र उद्धरता येणारी प्रचंड गती देण्यास क्षम असणारे यंत्र आहे; पण आता त्याचे काय? त्याचा योग्य आणि यथाप्रमाण उपयोग होत नाही! एका अर्थी खरे. पण अशा रीतीने जेथे इतर भक्कम यंत्रे चुरून जातात तेथे गुप्त, अज्ञात यातनांचा मार सहन करण्यात उपयोगी पडावे, ते कार्य त्याचेकडून करून घ्यावे म्हणूनच हे कर्तृत्वशक्तीचे यंत्र केले नसेल कशावरून? राष्ट्रोद्धाराच्या झुंजात अनेक महत्वाची नाकी लढवावी लागतात त्यात बंदीगृहाचा मोर्चा सगळ्यात कठीण आणि तरीही अत्यंत आवश्यक असतो. मग तो लढविण्यास तुमची योजना झाली आहे हा काय त्या कर्तृत्वाचा थोडा गौरव झाला?

"आणि एका अर्थी कसले कर्तृत्व घेऊन बसला आहेस? तुझे, त्यांचे, ह्या सर्व मनुष्यजातीचे तर काय पण ह्या सूर्याचे देखील ह्या प्रचंड विश्वाच्या उलाढालीत खरे पाहिले असता तिळमात्र तरी महत्व आहे काय? एखाद्या साबणी फुग्यासारखा तो आता स्वतःच्या महत्वाभिमानाने फुगत उडालेला दिसतो आहे. पण एका क्षणार्धात विश्वाची मूळ शक्ती दुसरा एखादा खेळकर फुगारा मारताच फुसदिशी नाहीसा होईल, तरी विश्व चालेलच! म्हणून विवेक कर. सापेक्षात जे कर्तृत्व आहे त्याची खरी परीक्षा येथेच आहे. या कारागारात जो देशसेवा करील तो खरा देशसेवक. जे मूल्य दिल्याविना देशोद्धार होणेच नाही ते कारापीडनाचे मूल्य देणे म्हणजे जीवन व्यर्थ जाणे नव्हेच नव्हे. कीर्तीचे, लौकिकाचे मनाचे मधाचे बोट त्यास लागलेले नाही. पण म्हणूनच ते अधिक अव्यर्थ होय. आणि जर मरावयाचेच तर निदान.. -मग असा का मरतोस? तू सोसलेल्या यातनांचा सूक्ष्म परिणाम देशावर होईलच होईल. परंतु ते जर तुला खरे वाटत नसेल आणि ही बातमी देखील देशास कळणार नाही मग त्याचा नैतिक परिणाम कोठला होणार? मग व्यर्थ कष्ट का म्हणून? मरणारच असशील तर असा कुत्र्याचे मोलाने आपल्या हाताने का मरतोस? त्यांना तुला फाशी देऊ नये म्हणून दया आली होती की काय? मग जे त्यांना करता आले नाही ते तू त्यांच्याकरता स्वतःचे हाताने करून आपल्या पक्षाचे हानीत आणि अपजयात आणखी भर का घालतोस? जर मरणे तर ज्या सेनेतील तू एक सैनिक आहेस त्या सेनेचे तसेच एखादे कार्य करून मग तरी मर. फाशी घेऊन नव्हे तर ... आपल्या एका जीवास्तव ...असा मर!"

हे बुद्धीचे शेवटचे कारण मात्र मनाच्या त्या जिवावर उदार झालेल्या अवस्थत पटले. मन स्थिर झाले. हाच निश्चय ठाण्याच्या तुरुंगातही केला होता. त्याची आठवण झाली. त्या दिवसापासून पुनः एकदाच काय तो आत्महत्येच्या अगदी काठावर मी जाऊन राहिलो होतो तो म्हणजे रत्नागिरीच्या तुरुंगात! पण ते पुढे. ती रात्र मात्र मरू तर तसेच मरू अशा कृतनिश्चयाने गेली. इतकेच नव्हे तर वरील कोटिक्रमाचा उपयोग करून आणि कोणीही मरणे तरी... असेच मरणे हे अंगीकृत व्रतार्थ कर्तव्य आहे असा उपदेश करून, मी त्या अंदमानाच्या कारागारातील त्या शेकडो दुर्दैवी राजबंदीतील अनेकांस अनेक वेळा आत्महत्येच्या काठावरून हात धरून परत फिरवलेले आहे!

तेलाच्या घाण्यात काम करीत असता इतके शारीरिक आणि मानसिक श्रम होत असताही त्याची किंचित तरी भरपाई करणारी अशी एक संधी सापडत असे. ती म्हणजे त्या घाण्यात काम करीत असलेल्या काही राजकीय बंदीवानांशी बोलण्या-बसण्याची होय. येता जाता, अधिका-यांचा डोळा चोरून वा कोण्या समजदार किंवा कनवाळू पहारेक-यांच्या वा शिपायांच्या सवलतीने ते राजकीय बंदीवान मजकडे येत. माझ्याशी शक्य तितके बोलत. बहुधा संध्याकाळी पाचचे संधीस जेवण्याखाण्याचे गडबडीत सर्वजण असता त्या क्रमाकांच्या हौदावर आडोशास आमचा अड्डा बसे. एक पहारा देई बाकी बोलत बसू. त्या वेळेस काही घटिका ज्या कार्याचा निदिध्यास लागल्याने मनाने संसाराच्या सर्व सुखांवर लाथ मारली त्या उदात्त कार्याची चर्चा मोकळेपणाने करता आल्याने मन पुनः चैतन्ययुक्त होई. सुप्त तेज पुनः जागे होऊन उठे. सोसले ते अपमान सन्मानच वाटू लागत. भोगलेल्या यातना काहीच नव्हेत. भोगावयाच्या आहेत त्याही कर्तव्यच होत हा निर्धार पुनः सबळ होई. त्या घटिका म्हणजे त्या कोलूच्या कठोर शापातील वरच होत्या. त्या वेळेस मी हे पाहून ठेवले होते की, तेथे आलेल्या राजकीय बंदीवानांत बहुतेक माझ्यासारखेच पंचविशीच्या आत-बाहेर होते. त्यांचे शिक्षण अपुरे राहिले होते. त्यांना राजकारण, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादी अवश्य ज्ञानाचा फार थोडा व्यासंग घडलेला होता. आणि ते साहजिकच होते. तथापि त्यायोगे त्यांच्या उत्कृष्ट स्वदेशप्रीतीस किंवा स्वार्थत्यागास रतिमात्रही उणेपणा आलेला होता असे मला वाटत नसे. इतकेच नव्हे तर त्यांच्या वयात केवळ उपजत परोपकारबुद्धीने आणि उदार भावनांनी त्यांनी प्रेरित होऊन असले कष्ट असल्या हेतून सोसावेत हे पाहून मला त्यांच्याविषयी फार आदर वाटे. न्यून इतकेच की त्या उदार भावनांना आणि उपजत धैर्याने ज्या कार्यास त्यांनी वाहून घेतले होते त्या कार्याला अत्यंत आवश्यक असलेल्या शिक्षणाची, ज्ञानाची आणि विचारांचीही जोड जर मिळेल तर ते महत्कार्य करण्यास ते होते त्याहून अधिक क्षम होतील; म्हणून त्यांनी तसा प्रयत्न करावा एतदर्थ मी त्यांस ती उणीव जाणवून तशी इच्छा त्यांच्यात उत्पन्न करण्यासाठी प्रयत्न करी. त्या प्रयत्नास घाण्याच्या कामास मला जुंपले गेले तेव्हाच आरंभ झाला. तेथे आलेल्या कित्येकांस, आपले आयुष्य व्यर्थ गेले असे वाटू लागले होते त्यांस मी त्या औदासीन्याच्या आणि हताशेच्या तावडीतून सोडविण्यासाठी इतिहासातील उदाहरणे सांगे. ज्यांस कोणता मार्ग श्रेयस्कर याचा पूर्ण बोध झालेला नव्हता, त्यांच्या शंकाचे निरसन करण्याचा प्रयत्न करी. जे केवळ समाजातील राजकीय वावटळीबरोबर तीत सापडले होते त्यांना ते तसेच का केले पाहिजे, ते नीतिदृष्ट्या अकर्तव्य होते वा कर्तव्य होते, हे युक्तिसंगत रीतीने पटवून देऊन त्यांची पूर्वीची क्षणिक उत्तेजनता यावज्जन्म टिकणाऱ्या निश्चित निर्धारात परिणत व्हावी म्हणून झटत असे. दिवसभर अत्यंत त्रासदायक, गदळ, अपमानास्पद असे ते घाण्याचे काम करून थकले-भागलेले ते राजबंदी त्या हौदावर गुप्तपणे घटिकाभर गोळा होऊन असे उदात्त संवाद करीत, राष्ट्रीय सुखस्वप्ने पाहत जेव्हा तन्मय होऊन जात तेव्हा दिवसभर भोगाव्या लागणाऱ्या यातनांचे आघात सोसता सोसता बोथट झालेल्या त्यांच्या मनोधैर्याची धार पुनः तीक्ष्ण व्हावी, त्यांच्या तोंडावर नवे तेज चमकू लागावे, आणि उठताना आनंदाने आणि प्रेमाने एकमेकांचा निरोप घेऊन त्या हिंदी तरुणांनी आपापल्या चाळीत बंद होण्यास निघून जावे!

प्रकरण बारावे

# अंदमानात संघटना आणि प्रचार करण्याचा निश्चय

त्या घाण्यात काम करीत असता मला राजकीय बंदीवानांची स्थिती अजमावता आली असे नसून एकंदर अंदमानाची परिस्थितीही थोडीबहुत आकलन करता आली. हजार आडकाठ्यांस न जुमानता बाहेरच्या लोकांत मजविषयी जो आदरभाव आणि प्रेम होते त्यांनी त्यांस माझ्याशी काहीना काही संबंध जोडण्याचा प्रयत्न केल्याविना स्वस्थ बसू दिले नाही. या सर्व परिस्थितीवरून मला दिसून आले की, प्रयत्न केला असता थोड्या प्रमाणात का होईना पण या कारावासातूनही अंदमानात संघटना आणि कार्याचा प्रसार करविणे शक्य आहे. आणि जर शक्य आहे तर थोडी का होईना पण ती संघटना करणे हे कर्तव्य आहेच आहे. कारावासाच्या यातना भोगणे आणि एकान्त बंदिवासातील कर्मशून्यतेचे असह्य ओझे उचलून निष्क्रिय उभे राहणे हे एक कर्तव्य तर आम्ही करीतच होतो; त्यासहच जर कार्यप्रचाराचे आणि द्वीपांतरी जेथे जेथे निर्वासित होऊ तेथे तेथे देखील जातीय चैतन्य संचरविण्याचे सक्रिय कार्यही थोडेबहुत करता आले तर तेही करून मातृभूमीची दुहेरी सेवा केल्याचे पुण्य का न साधावे! अशा विचाराने प्रेरित होऊन अंदमानाच्या प्रचारकार्याचा आरंभ म्हणून मी प्रथमतः राजकीय बंदीवानाचे शिक्षण हाती घ्यावयाचे ठरविले. त्या पंधरावड्यातच त्या बंदीवानांतील जे काही लोक वावटळीत वरवर सापडून आलेले असल्याने त्या चळवळीला सर्वस्वी अनुकूल नव्हते त्यांनाच प्रथम ती गोष्ट पटवून देऊन त्या चळवळीचे अंतरंग काय ते विशद करून सांगितले आणि त्या मला माणसाळविण्यासाठी म्हणून दिलेल्या घाण्याचे कठोर कष्ट करीत असताच त्या राजबंदींतील दोघांस संघटनेच्या कार्यात समाविष्ट होण्यासाठी शपथबद्ध करून घेण्याची रानटी उठाठेव केली.

अंदमानाच्या संघटनेच्या प्रयत्नांचा हाच आरंभ होय. त्या कार्याचा विकास पुढे कसकसा आणि किती होत गेला हे संपूर्णतः सांगणे प्रस्तुत शक्त नाही. अंशतः जे सांगता येईल ते पुढे क्रमशः सांगूच.

चौदा दिवसांनी मला तेलाच्या घाण्यातून काढण्यात आले; आणि दोरखंड वळण्याचे काम देण्यात आले. हे काम त्या कारागृहातील इतर शारीरिक कामाहून सोपे होते आणि म्हणून ते मिळणे म्हणजे भाग्य समजण्यात येई. काही दिवसांच्या सवयीने दोरखंड वळण्याचे काम करता येऊ लागून शारीरिक यातनांच्या कचाट्यातून थोडीशी सुटका झाल्यासारखे वाटू लागले. याच वेळेस मला ज्या सातव्या क्रमांकात बंद ठेवण्यात आले होते त्यात दोनचार राजकीय बंदी निरुपाय म्हणून राहू देण्यात आले होते. निरुपाय म्हणून - कारण शेवटपर्यंत माझा आणि इतर राजकीय बंदिवानांचा संबंध शक्यतो येऊ द्यावयाचा नाही असे धोरण ठेवण्यात येई. पण सर्व बंदीगृहांत वाटूनही ज्यांना जागा राहात नसे त्यांना सातव्या भागात ठेवावेच लागे. केव्हा केव्हा तर प्रत्यक्ष बारी आणि एकदा-दोनदा सुपरिंटेंडंटही मला स्पष्टच म्हणाले की, तुमच्या भागात जे राजबंदी असतात त्यांना जर मवाळवाल तर तुम्हासही सुशिक्षित राजबंद्यांची संगती लाभेल. नवीन कोणीही राजकीय बंदी आला की, त्यास बहुधा 'माणसाळलेल्या' राजबंदीच्या सहवासात नेऊन ठेवण्यात येई. तथापिकोणत्याही राजबंदीस एकसारखे एकाच भागात आणि संघात ठेवणे धोक्याचे वाटून महिन्याला त्यांच्या राहण्याच्या कोठड्यांची आणि भागांची बदली करण्यात येई. हा बदलीचा

दिवस म्हणजे बंदीगृहातीस एक सणच असे; कारण त्या बदलीच्या निमित्ताने कोठडीतून बाहेर पडून सरासरी अर्धा दिवस तरी गडबडीत झटकन जाई. दुसरे, एकदा तुरुंगात वळसा घ्यावा लागे. ह्या भागातून त्या भागात जाताना, आणि त्यायोगे बहुतेक राजबंदींची दृष्टीनेच का होईना पण भेट होई. वेळ साधल्यास दोन गोष्टीही जाता जाता बोलून जाता येत आणि शेवटचे आनंदाचे कारण म्हणजे नव्या भेटलेल्या राजबंदीवानांची ओळख आणि संमती लाभण्याची ह्या बदलीने संधी मिळे. मला जरी शक्यतो एका सात क्रमांकाच्या भागातच बंद ठेवलेले असे आणि इतर राजबंदी बहुधा मजकडे धाडण्यात येत नसत, तरीही मला देखील हा दिवस सणासारखाच वाटे. कारण त्या दिवशी बदलीसाठी या भागातून त्या भागात जाताना मला दुरून माझ्या ज्येष्ठ बंधूंची दृष्टिभेट घडे, कधी कधी आधीपासून संघाने जुळवीत जुळवीत जर क्वचित यश आलेच तर दोन गोष्टीही गुपचुप बोलून घेता येत.

या महिन्या दोन महिन्यांतील ठाणपालटीचे साधनाने नवीन वा निराळया राजबंदीस जसे बोलावयास मिळे तशाच आपसात बोलण्याच्या आणखी दोन सोयी त्या कारागृहात असत. त्या म्हणजे राहण्याच्या खोलीच्या वरची लहान खिडकी आणि अगदी भुईशी लावलेली जाळी होय. कारागृहाचे ते सात भाग पाकळ्यासारखे एका केंद्रापासून निघून पसरत गेलेले असल्याने प्रत्येक भागाचे अंगण पुढील भागाच्या पाठीस लागलेले असे. तेव्हा प्रत्येक भागाच्या चाळीतून मागच्या भागाशी आणि अंगणातून पुढच्या भागातील खिडक्यात चढलेल्या मनुष्याशी बोलता येई. पण असे, उंच खिडक्यात चढून बोलणे म्हणजे धोक्याचे असे. तरीदेखील खोलीतील निजावयाचा लाकडी फळा उभा करून त्या दोन पुरुष उंचीच्या लहानशा खिडकीच्या गजास लोंबकळून हात ताणाने तुटून येईतो आम्ही खालच्या अंगणात असलेल्या आपल्या अष्टमित्रांशी बोलावयास कमी करीत नव्हतो. कितीदा तरी अर्थशास्त्राच्या वा राजकारणाच्या शंका एकाने विचाराव्या आणि त्यांचे समाधान खिडकीत लोंबकळून राहणाऱ्या अध्यापकाने करीत असावे. इतक्यात जर का कोणी वार्डर वा जमादार खाकरला तर शिष्य आणि आचार्य - दोघांचीही यःपलाय करता करता मारामार उडे. अशा वेळी एकदम खिडकीतून खाली उडी टाकण्याच्या गडबडीत कितीदा तरी राजबंदी धाडकन आपटले असतील; कितीदा तरी त्यांचे अंग ठेचाळले असेल. दुसरी बोलण्याची युक्ती म्हणजे ती खोलीच्या भुईशी लागून भिंतीत खोल बसवलेली जाळी- अशी बसविलेली की, पलीकडे खोलीतून दिसू नये; पण वारा येण्यापुरती फट तर असावी. या जाळीच्या मागचे बाजूस केव्हा केव्हा त्या भागातील बंदी जेवावयास बसविले जात. मग काय? तशी संधी सापडताच आम्ही खोलीतून त्या जाळीच्या भोकास इकडून तोंड लावून आणि तिकडच्या आमच्या सहबंदीने जेवावयास थाळी घेऊन बसून स्वस्थपणे नव्हे तर अस्वस्थपणे पण एकाग्रतेने 'टेलिफोन' सुरू करावा.

ती जाळी म्हणजे कारागृहाच्या परिभाषेतला 'टेलिफोन'. त्या जाळीत म्हणजे त्या 'ध्वनिवाहा'त बोलण्याची संधी आजूबाजूस, कोणी नसल्याने वा विश्वासू मंडळीच असल्याने, आली आहे म्हणून सूचना देण्यासाठी हातातली जेवावयाची थाळी त्या गजांवर खडखड मारणे म्हणजे ध्वनिवाहाची घंटा वाजविणे. या 'टेलिफोनने'ही - ध्वनिवाहानेही - जेव्हा कार्य साधणे दुष्कर झाले तेव्हा एक 'टेलिफोन' ही राजबंदीवानांना शोधून काढावा लागला. पण तो कोणता ते पुढे कळेल.

अशा एक ना दोन अनेक युक्त्या लढवीत आम्ही आपसात आमचे विचारांचे दळणवळण ठेवू लागलो. जो जो आमच्यापासून इतरांस दूर नेण्याचा प्रयत्न करण्यात येई आणि राजबंदीवानांना आपसात बोलण्यास वा खुणा करण्यासही प्रतिबंध करण्यात येई तो तो आमची बोलण्याची आणि विचारविनिमयाची इच्छा अधिकच बळावून आणि आवश्यकता अधिकच वाटून ते बोलणे आणि तो विनिमय अधिकच वेगाने चालू लागत. या सर्व युक्त्यांच्या साहाय्याने, मागे वर्णिल्याप्रमाणे आम्हांस घाण्यातून काढून 'दोरखंड' वळावयास जेव्हा लावले तेव्हा आम्ही आमचे भागात अपरिहार्य म्हणून जे दोघेतिघे राजबंदी ठेवले गेले होते त्यांच्या शिक्षणाचे कार्य हाती घेतले. ते सर्व राजबंदी काही सामान्य अर्थी अशिक्षित नव्हते. नव्हे, ते बहुतेक प्रवेशपरीक्षा आणि कॉलेजमधल्याही एक-दोन अयत्ता झालेले होते. परंतु राजकारणीय अग्रगामित्व करावयास अवश्य असे राजतीनी इत्यादी शासनविज्ञानाचे उच्च शिक्षण त्यांस मिळालेले नसे. ते शिक्षण देण्यास आरंभ करताच पहिली अडचण जी आम्हांस भासू लागली ती म्हणजे पुस्तकांची उणीव ही होय. प्रथमतः माझी स्वतःची जी पुस्तके होती ती ठाण्यावरच माझी मत्ता म्हणून जप्त झालेली होती. अंदमानास राजबंद्यांपाशी जी पुस्तके होती ती अगदी तुटपुंजी आणि थोडी होती. श्री. रामकृष्णांची आणि विवेकानंदांची काही पुस्तके, काही टॉलस्टॉयची 'My Religion' इत्यादी एक- दोन पुस्तके आणि बाकीची अनिबेझंटच्या थिऑसफिकल तत्वज्ञानाची आणि चळवळींची मासिक पुस्तके ही होत. ही पुस्तकेही प्रथम आठवड्यातून एका रविवारीच वाचावयास मिळत. एका चवाळ्यात ती भाजीसारखी भरून एक वार्डर भागाभागातून हिंडे आणि ती राजबंदीवानांस वाटी आणि संध्याकाळी येऊन परत घेऊन जाई. प्रत्यही वाचावयास एक पुस्तक मिळे पण ते ज्याचे असेल त्याला आणि तेही केवळ संध्याकाळी चार वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत! दिवसा काम म्हणून वाचू द्यावयाचे नाही आणि रात्री कोठडीत अंधकार म्हणून!! त्यातही आणखी एक अत्यंत त्रासदायक नियम म्हणजे, एका राजबंदीवानाचे पुस्तक त्याने इच्छिले तरी तो दुसरा राजबंदी त्याच्यापासून आठ-नऊ पावलांवरच काम करीत असला तरी त्या दुसऱ्यास न देऊ देणे हा होय. ज्याचे पुस्तक त्याने वाचावे! ही बारीची सक्त आज्ञा. आठवड्यात एक भिकारडे चोपडेही वाचणे साधारण बंदीस शक्य नसे. म्हणून त्यास ते पुरे. परंतु सुशिक्षित राजबंदीस एक लहान पुस्तक आडवड्यास कसे पुरणार? पण त्याला ते बदलून दुसरे घेऊ द्यावयाचे नाही किंवा शेजारच्या राजकीय बंदीचे हातात असलेले त्याचे आठवड्याचे पुस्तकही तेथल्या तेथे वाचावयास घेता घेणे शक्य नाही. असे तेथल्या तेथे घेतलेले एकाचे पुस्तक दुसऱ्यास दिलेले -वाचावयास दिलेले- दिसले की वार्डर जमादारांची पिकलीच पोळी. राजबंदीवर खटला भरून बारीसाहेबापुढे आपली कार्यक्षमता दाखविण्याची ही सुवर्णसंधी कोण गमावणार! त्यांनी त्या राजबंदीवर झडप घालून, तो एकाचा क्रमांक दुसऱ्याच्या हातातील पुस्तकावर आहे हे पारखून, त्या दोघासही उन्हातान्हात बारीच्या कार्यालयात खेचून नेलेच म्हणून समजावे. 'इसने पुस्तक दिया और इसने लिया हुजूर!'

म्हणून पुन्हा पुन्हा आरडाओरड होऊन खटला भरला जाई आणि पर्यवेक्षक (सुपरिंटेंडंट) सुद्धा त्या अपराधाने संतप्त होऊन चार-चार दिवसांची हातकडीची शिक्षा ठोठावण्यास कमी करीत नसत. एक घटकाभर पुस्तक वाचले म्हणून चार-चार दिवस राजबंदी हातकडीत टांगून अनेक वेळेला दिवसभर उभे राहविले गेले आहेत. रामकृष्णांच्या

www.savarkarsmarak.com

चरित्रात वाचलेली तत्वे मनन करून पारखून घेण्याची त्या राजबंदीस शिस्त लागावी म्हणूनच कदाचित् तसा नियम आणि तशी हातकडी देण्याची व्यवस्था केलेली असेल!

पुस्तके वाचण्याच्या मार्गात अडचणी पसरविण्यात मुख्य भाग म्हणजे बारीसाहेबांचा. त्या पंडितप्रवरांचा असा एक सिद्धात असे की, पुस्तकांच्या वाचनाने हिंदी तरुणास वेड लागते. मागे ज्या 'श्रीयुत....' ह्यास वेड लागले म्हणून बारी माझ्यापाशी म्हणाला होता 'त्यांसही ते थिऑसफिकल 'पुस्तके वाचतात म्हणून त्यांचे डोके फिरले' असे तो मला स्पष्ट म्हणाला होता. बरे, थिऑसफी वा रामकृष्ण इत्यादी वेड लावणाऱ्या भाबड्या नरम पुस्तकांस सोडले तर राजकारणाची दगडासारखी कठोर पुस्तके तरी वाचनीय समजत होता की काय? रामाचे नाव! तो स्वतः काही थोडा थोडका शिकलेला नव्हता. हायस्कूलच्या सबंध पाचव्या इयत्तेपर्यंत त्याचे शिक्षण झालेले! अशा त्या जाड्या विद्वानाचे हाती कारागृहात कोणती पुस्तके यावीत याचे परीक्षकत्व सोपविलेले. पुस्तक उघडताच प्रथम बारीसाहेबास समजेल अशा साध्या इंग्रजी भाषेतले आणि साध्या विषयांचे ते पुस्तक हवे. नाही तर, जर ते एखादे तत्वज्ञानाचे वा समाजशास्त्राचे गूढ पुस्तक असले तर दोन- चार पाने उलटताच 'नॉन्सेन्स, ट्रॅश' भारूड म्हणून ते फेकले जावयाचे. समजण्यासारखे असेल पण जर त्यात 'नेशन' 'कंट्री' म्हणून एखाद्या शब्द असेल, तर राजद्रोह म्हणून एखाद्या प्लेगजतूंसारखे ते त्याज्य-अस्पृश्य-होऊन तिजोरीत बंद व्हावयाचे. बारीसाहेब म्हणतच, "ही कंट्रीबिन्ट्रीची पुस्तके आम्हांस देता येणार नाहीत. कारण याच पुस्तकांनी नृशंस हत्यारी बनविले आहे! आणि योगबिगाची भाबडी थिऑसफीची इत्यादी पुस्तके? तीही वास्तविक देऊ नयेत. पण काय करावे, सुपरिन्टेंडंट ऐकत नाहीत. वास्तविक याच पुस्तकांनी माणसास वेड लागते!'

## पुस्तकांचे वैषम्य

बारीसाहेब स्वतः कमी शिकलेले होते म्हणून मत्सराने असो वा शिक्षित बंदीवान या पोर्ट ब्लेअरच्या परमेश्वरास फारसे भीक घालीत नसत म्हणून असो, वा दोनही कारणांचा मिश्र परिणाम म्हणून असो, पण बारीस आणि एकादोघा सुपरिन्टेंडंटासही पुस्तकाचे- वाचनाचे नाव काढले की अगदी वैषम्य वाटल्यासारखे होई. कोणी बंदी तंबाखू खात असला तर बारी कित्येक वेळा कानाडोळा करून त्यास सोडून देई आणि हे दयाळूपण स्वमुखाने वर्णन करी. पण कोणी बंदीवान जर का एखादा पाटीचा तुकडा हातात घेतलेला वा पुस्तक वाचताना वा नुसते जवळ ठेवताना आढळला की बारी एकदम संतापून जाई, 'किताब मंगता! साला! ये स्कूल नहीं! आपल्या बापाच्या घरी का शिकला नाहीस? धाडा त्याला कोलूमध्ये! किंवा निदान करा त्याचे ते पुस्तक जप्त!'

विशेषतः राजबंदीवानांना पुस्तके वाचावयास दिली असता त्यांतील 'पुस्तकी' भावना आणि 'नाटकी' वर्णने वाचून त्यांची माथी फिरतात आणि कारावासातील यातनांनी 'ताळ्यावर' आलेली त्यांची बुद्धी पुनः पूर्वसंस्काराच्या अशा वाचनाने भडकलेल्या आगीत जळू लागते एतदर्थ जर त्यांस माणसाळवावयाचे असले तर पुस्तके म्हणून त्यांस देता कामा नयेत असे बारीसाहेब अनेक वार ठासून सांगत. जर एखादा राजबंदी वाचनाकडे लक्ष देईनासा होऊन परिस्थितीच्या अधोगामी आकर्षणाने तेथल्या कुटाळक्यातच रंगून जातो आहेसा दिसला तर बारीला तो अधिक विश्वासू आणि सुधारलेला वाटू लागे. त्यास तो कडक पाहऱ्यात वा क्रूर दृष्टिक्षेपात ठेवीनासा

होई. अशा विचारांच्या या बंदीपालाचे हे विचार त्या वेळच्या त्याच्या वरच्या अधिका-यांतही रूढ होते; आणि म्हणून कारागृहात म्लान, हताश, त्रस्त झालेल्या राजबंदीवानांस पुनश्चेतना प्राप्त करून देणारी कोणतीही ऐतिहासिक इत्यादी पुस्तके देणे म्हणजे बंदीवासात टाकण्यात दंडविज्ञानाचा, त्यांना सुधारण्याचा वा दंडित करण्याचा उद्देश विफल करणे होय असे त्याचे ठाम मत झालेले होते. “ऐतिहासिक व काही धार्मिक पुस्तके वाचून निराश आणि निरुत्साही मने पुनः स्वाभिमानी आणि उत्साहयुक्त होतात आणि बंदीगृहातही स्वतःस यःकश्चित पापी समजण्याचे स्थली ते राजकीय बंदिवान म्हणून समजू लागतात!”

## पुस्तकांचा परिणाम

एका अर्थी ह्या परिणामापुरते अंदमानाच्या अधिका-यांचे म्हणणे खरे होते. वनवासात असताना धर्मादिक पांडवांच्या मनाला जेव्हा जेव्हा आत्मनिंदा, आत्मलज्जा आणि हताशता संत्रस्त करी तेव्हा तेव्हा “अरे धर्मा! त्या नलराजावरही असेच संकट आले होते आणि त्या रामचंद्रावरही?” असे सांगून त्यांच्या भग्न उत्साहास पुनः चेतना देण्यासाठी ऋषिजनांनी सांगितलेली आख्याने अशीच उपयोगी पडली. गतकालाची ऐतिहासिक वीरकाव्ये आणि वीरगाथा किंवा गीतेचा कर्मयोग आणि उपनिषदांचा ब्रह्मवाद वाचून कितीदा तरी त्या राजबंदींचे गुप्त चैतन्य उद्दीप्त उठावे, कितीदा तरी आत्मलज्जा मावळून आत्मगौरवाने मन उल्लसित होऊन यातनांचा धिक्कार करीत गर्जू लागावे. आणि ज्या एका अर्थी अधिकाऱ्याचे हे म्हणणे असे की, पुस्तके वाचावयास देऊ नयेत त्याच अर्थसिद्धीसाठी पुस्तके राजकीय बंद्यांस अवश्य वाचावयास दिली पाहिजेत म्हणून आम्हांस वाटे.

प्रथमतः पुस्तकाविनाच जे शिक्षण घेता-देता येईल ते घेण्या-देण्यास आम्ही प्रारंभ केला. मागे सांगितलेल्या अनेक पकारांनी राजकीय बंदीवान काही प्रमाणात तरी एकत्र होऊ शकत, बोलू शकत. त्याचा लाभ घेऊन जे माझे भागात राहावयास आलेले होते त्यांस प्रथमतः मी तोंडीच ऐतिहासिक गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला. कोठे तरी बंदीवानांचे गडबडीत एकत्र होऊन, किंवा दूर वीस पावलांवर बसलो असताही पहारेकऱ्याच्या सहानुभूतिपूर्वक कानाडोळा करण्याने मोठ्याने बोलत आणि चाहूल होताच चुप बसत वा वेळच आली तर “होतो बोलत!” म्हणून चापून सांगून हातकडीची शिक्षा खात, पण कसेही करून आठवड्यातून दोन-चार ऐतिहासिक प्रकरणे तरी मी त्यांस सांगू लागलो. प्रथमतः हिंदुस्थानाचा वेदकालापासूनचा इतिहास, त्याचे विभाग आणि रूपरेषा सांगून नंतर त्यातील मोठमोठ्या कालातील शककर्त्यांची चरित्रे सांगावीत. नंतर युरोपीय अर्वाचीन इतिहास नेपोलियन, मॅझिनी, गॅरीबाल्डी आणि विशेषतः त्या वेळेस डळमळत असलेल्या रशियाच्या प्रचंड चळवळीचा इतिहास शिकवावा. नंतर अर्थशास्त्राची मूलतत्वे आणि तदनंतर शासनविज्ञान आणि राजनीतिशास्त्र यांची चर्चा करीत असावे. पुढे पुढे जसजशी राजकीय बंदीवानांची संख्या वाढत गेली आणि संप, तंटे, बखेडे इत्यादी होता होता अधिका-यांस भीक नको पण कुत्रे आवर असे होऊन “थोडे एकत्र बसा, वाचा, काय वाटेल ते भका पण काम करा, आणि चळवळ करून आम्हांस त्रास देऊ नका”, अशी अधिका-यांची प्रवृत्ती झाली तेव्हा याच त्रोटक संवादाचे रूपांतर होऊ लागले. आठवडाभर साधारण खंडलेली चर्चा तर रविवारच्या बैठकीत चालेच. पण विशेषतः रविवार सकाळी नऊ वाजेपर्यंत जेव्हा खोल्यांतून आम्हांस बाहेर वजन करण्यासाठी वा गवत कापण्यासाठी ठेवण्यात येई तेव्हा जे काही दहा-पाच राजबंदी माझे भागात असत त्यांस घेऊन मी एकीकडे बसे. एकेकाला विषय

दिलेला असे. त्यावर तो बोले. त्यांनतर त्या विषयावर चर्चा होई. शेवटी साधले तर एखादे राष्ट्रगीत गाण्यात येई. ती ‘बैठक’ बहुधा सिंहासनावरचीच वा योगासनाची नसून पळत्या घोड्याच्या पाठीवरचीच असे. कारण केव्हा “बारी आता है” म्हणून पहाऱ्यावरचा मनुष्य धापा टाकीत सांगत पळत येईल का कधी जमादार “ए बांबगोलेवालों! तुम बडे बेशरम लोग हो, फेर एकठ्ठे हुवे! जा गवत कापा, उठता का नाही!” म्हणून दंडा घेऊन शिवीगाळ करीत येईल याचा काहीएक नियम नसे. कोणी येताच वक्त्यांश्रोत्यांतसुद्धा बैठक पळू लागे, आणि तिची छिन्नभिन्न व्यक्तिशकले कोणी गवतात तर कोणी पत्र्याचे आड तर कोणी भांडे निमित्तात दडून बसत. पुनः ती वावटळ उडून गेली की ती बैठक पूर्वीच्या केलेल्या वर्णनाप्रमाणे- "Let the Legions thunder past and plunged in deep thought again" पुनः विचारात निमग्न होई.

अशी धुळधाणी उडल्याने, केव्हा केव्हा कोण्या नवशिक्या मनुष्याची आत्मोपहासाकडे प्रवृत्ती होऊन बैठकीचे तुच्छत्व भासू लागले तर ख्रिस्ती लोकांच्या ‘पळत्या प्रार्थनांची’ मी आठवण करून देई. रोमन लोकांच्या आणि यहुद्यांच्या तावडीत आपले धार्मिक आचार आणि धार्मिक संघ ख्रिस्त्यांस अगदी पहिल्या पहिल्याने जेव्हा पाळावे लागले तेव्हा भुयारात थडग्याभोवती, कारागारात कसेबसे जमून दोघा-चौघे प्रार्थना करण्यात कधी गुडघे टेकतात न टेकतात तो रोमन आल्याची चाहूल येई की, लागलीच पळापळी करावी लागे. पुनः संधी सापडल्यास एकत्र होऊन प्रार्थना पुरी करावी. त्या पळत्या बैठकी अशा पळत्या प्रार्थनाच होत्या! कारागारातील त्या अधोगतीस क्षणभर तरी रोखून त्या बैठकी मनास उच्चाकडे, उदात्ताकडे उन्मुख करीत. त्या अंदमानाच्या बंदीवासात हे रविवारचे ‘भजन’ वर्षानुवर्षे मी असेच चालू ठेवले होते. त्यात किती राजकीय, धार्मिक भाषाशास्त्रविषयक, साहित्य, शास्त्रीय इत्यादी विषयांचा ऊहापोह आणि चर्चा झाली असेल! केव्हा केव्हा मनास समाधान वाटे देखील की, लहानपणी नाशिकला सभेच्या दर आडवड्यास रविवारी बैठकी बसविण्याचा नियम केला. नाशिकनंतर पुण्यास, पुण्यानंतर मुंबईस, मुंबईनंतर इंग्लंडमध्ये आणि इंग्लंडानंतर आता अंदमानाच्या कारागृहातही रविवारी ते राष्ट्रीय भजन आणि राष्ट्रीय ज्ञानसत्र अखंड चालू ठेवता आले. तो नियम पाळता आला. कधी होमाच्या विस्तीर्ण स्थंडिलात तर कधी वैश्वदेवाच्या वितीएवढ्या कुंडात पण अग्नीची आहुती टळली नाही; म्हणूनच तर अग्नी जिवंत राहिला.

पळत्या बैठकीव्यतिरिक्त दुसरे एक महत्वाचे साधन जे आम्ही शिक्षणप्रसारार्थ उपयोगात आणीत होतो ते म्हणजे चुन्याने रंगविलेल्या कोठड्यांतील भिंती आणि लहान खिळे, घायपाताचे काटे हे होत. बंदीगृहात राजकीय बंदीवानांस पेन्सिली व कागद मुळीच ठेवू देत नसत. त्यांच्या अंगाची आणि कोठड्यांची कसून झडती केली जाई. तथापि, बोटभर चिठी लिहिण्याइतका कागदाचा तुकडा आणि स्वतःस धरताही येणे दुर्घट इतका लाकूड फोडून टाकलेला, केवळ शिस्पेन्सिलीमधील शिशाच्या काडीचा लहानसा तुकडा हा बहुधा प्रत्येक राजबंदीवानापाशी असेच. तो कधी तोंडात, तर कधी केसांत, तर कधी या हाताची झडती घेताना त्या हातात तर त्या हाताची घेताना या हातात, नाही तर अगदी - पण ती बंदीगृहातील अगदी विशिष्ट व्यावसायिक गौप्ये आम्ही सर्वच सांगणार नाही. पुनः कधी तसा यात्रेचा प्रसंग आल्यास कागद-पेन्सिल लपविण्यास आमच्या सर्वच युक्त्या सांगत बसलो तर कठीण पडणार नाही का?

परंतु असे लहान बोटाएवढे कागदी तुकडे चिठी लिहिण्यास जरी उपयोगी पडले तरी शिक्षणासाठी निबंध लिहून काढण्यास वा टिपणे आणि टाचण करून ठेवण्यास त्यांचा काही उपयोग होत नसे. आमच्या पहिल्याच वर्षी असा एक अडचणीचा प्रसंग आमच्यावर ओढवला. आम्ही आर.पी.पी. मधल्या प्रसिद्ध झालेल्या भूगर्भशास्त्रावरील एका ग्रंथाचे पारायण करीत होतो. पुस्तक वाचले की, एका वहीत त्यातील महत्वाचा सारांश, आणि उतारे उतरवून ठेवावयाचे हा आम्हांला लहानपणापासून मोठा नाद. त्याचा उपयोगही आम्हांस पुष्कळ झाला. त्यायोगेच काही काही अगदी लहानपणी वाचलेल्या पुस्तकांचा देखील महत्वाचा सारांश, स्मृतीत अजून संचित करून ठेवता आला. त्या सवडीप्रमाणे भौगर्भिक कालाच्या कालमर्यादेचे एक टाचण आम्ही कोठडीत एक लांबसा कागद आणून त्यावर उतरून ठेवले. दुसऱ्या दिवशी ते पुस्तक परत केल्यानंतर संध्याकाळी बंद झाल्यावर सावकाश तो कागद काढून जो मी वाचावयास बसतो तो ताडताड बूट आपटीत अवेळी माझी झडती घेण्यासाठी ओव्हरसीअरसाहेब आले आणि दार उघडून झडती घेऊ लागले. माझ्या तर केव्हा केव्हा दिवसातून तीनदा झडत्या होत! कोणीही 'बड्या बाबू'पाशी काही आहे म्हणून बारीसाहेबांच्या कानात पुटपुटले की वेळी अवेळी झाली आमची झडती. जेव्हा शंभरात दोन वेळाही ह्या बातम्या खऱ्या नसत असे बारीचे प्रत्ययास आले तेव्हा कोठे हे झडतीचे सत्र संपले. पण ही स्थिती यावयास सात- आठ वर्षे लागली. त्या दिवशी आम्ही तो कागद वाचीत असताना मात्र असा हा जेव्हा अचानक छापा पडला तेव्हा तो लांबच लांब कागद लपविणे अशक्य झाले; आणि तो उचलून ओव्हरसीअरने विचारले, "हे काय?" मी म्हणालो, "टाचण (नोट्स्!) " त्यांनी बळपूर्वक बजावले की, तुरुंगात पुस्तकाच्या 'नोट्स् बिट्स, काही घेता येणार नाहीत.' तथापि काही तरी मोठे प्रकरण उपस्थित करता येण्याचे भाग्य पदरात पडेल या आशेने त्यांनी तो कागद नीट उजेडात आणि मग नुकत्याच लागणाऱ्या दिव्यापाशी धरून वाचला, तो काय Pliocene Miocene Neolithic इत्यादी अगडबंब शब्दांची रेलचेल! "What cipher is this? ही कोणती संकेतलिपी?" म्हणून त्याने शंकाकुल मुद्रेने आणि किंचित 'पकडले अखेर!' अशा झोकाने विचारले. मी विनोदाने म्हटले (जिऑलॉजिकल) भौगर्भिक! तेव्हा काही पुटपुटत त्यांनी जमादारास सांगितले की, "इसको कल ले आव आफसमें. खटला भरला पाहिजे याच्यावर!" त्याचप्रमाणे खटला भरला पण तो आमचा पहिलाच कारागृहीय 'अपराध' असल्याने सावधानी देण्यावरच भागले अणि दोन आठवडे पुस्तकवाचन बंद करण्याची शिक्षा देण्यात आली.

तेव्हा आता पुस्तकातील टाचणे कशावर करावी? प्रत्यही आम्ही कविता रचीतच होतो; त्या कशावर उतरवाव्यात? राजबंदीतील कित्येकांस आठवड्याच्या व्याख्यानातील ऐतिहासिक, अर्थशास्त्रीय इत्यादी मुख्य विधेयांची टाचणे देऊन पाठ करून घेणे अवश्य असे ते कसे करावे? एवढे कागद आणावे कोठून? आणले तरी सांभाळावे आणि लपवावे कोठे? लपविले तरी ते भारूड वाचावयास वेळ मिळावा इतकी सगळ्या अधिका-यांचे डोळ्यांस अंधारी कशी येणार? तोच समोरच्या भिंतीवर दृष्टी लावलेली असताना युक्ती सुचली. अरे कागद? हा काय कागद! ही या कोठड्यांची चुन्याने रंगविलेली लांब-उंच भिंतच कागद आणि घायपाताचा काटाच लेखणी!

नाहीतर लहानशी खीळ मागे मुंबईस भायखळ्यास विटेच्या तुकड्याने भिंतीवर लिहीत असे. पण तो प्रयोग तेव्हा अपूर्णावस्थेत होता; आता तो मोठ्या प्रमाणावर करण्याचे योजिले आणि सुटेतोपर्यंत भरपूर चौदा वर्षे तो कामास आला. एक खीळ गुपचूप दाराचे कडीत खोचावयाची आणि कोठडीत दार बंद होऊन कोंडले गेले आणि ते

बहुतेक महिनोगणती असेच- की, भिंतीवर स्तंभ आखून घेऊन लिहावयास सुरवात करावयाची. ह्या सातव्या भागाच्या सर्व भिंती म्हणजे एकेक ग्रंथच असे. उदाहरणार्थ, मी दोरी वळी त्या भिंतीवर स्पेन्सरच्या अज्ञेय मीमांसेचा युक्तिवाद यथाक्रम उतरलेला होता. 'कमला' बहुतेक त्या सातव्या भागांच्या भिंतीवर रचली गेली. आणखी एका खोलीत मिलच्या अर्थशास्त्राच्या ग्रंथांतील सर्व महत्वाच्या व्याख्या खिळीने कोरून उतरलेल्या होत्या. त्या अशासाठी की, दर महिना जेव्हा माझ्या कोठडीची बदली होई तेव्हा काही तरी लटपटीने नवीन दुसऱ्या भागातून येणाऱ्या राजबंदींपैकी ज्यास अर्थशास्त्राचे शिक्षण मिळत असे त्याने तेथे त्या माझ्या सोडलेल्या कोठडीत घुसावे; आणि महिन्याभरात ते पाठ करून टाकावे. जेव्हा माझी निरनिराळ्या भागातून बदली करण्यात येऊ लागली तेव्हा तर प्रत्येक भागात माझी कोरीव टिपणे कोठड्यांतून सोडण्यात येत; आणि ती ती त्या कोठड्यांत येणारे राजबंदी वाचून काढीत.

राजबंदीवानांचे शिक्षण वाढविण्यास अशा रीतीने साप्ताहिक सभा, वेळोवेळी संधी मिळताच तोंडी माहिती सांगणे आणि भिंतीच्यावर टाचणे, व्याख्या, वेचे उतरून ठेवणे अशी तीन मुख्य साधने उपयोगी पडली. या भिंतीच्या ग्रंथाविषयी इतकीच अडचण पडे की त्या भित्तिपत्रांचे आयुष्य एक वर्षाचेच काय ते असे, बाबिलोनमधल्या अष्टिका ग्रंथाप्रमाणे शतकोशतकांचे नसे. कारण दरवर्षी एकदा चुना लावण्याचे काम सुरू झाले की, त्या आमच्या सर्व मौल्यवान ग्रंथांवर सफेती फिरे; त्यामुळे चुनाकाम सुरू होण्याच्या आधीचा महिना म्हणजे माझा अगदी वेदघोषाचा महिना! केलेल्या आणि भिंतीवर कोरलेल्या कविता गुप्तपणे आणि सूक्ष दृष्टीने वाचीत पाठ करून टाकाव्या लागत. पण जरी भित्तिपत्रांचे आयुष्य एका वर्षाचेच असे तरी सफेती फिरल्याने दुसरा एक उलट लाभही होई. जुने कागद नासून जात; पण भिंत चुना देऊन पुनः पांढरी सफेत झाल्याने नवीन कोरे करकरीत कागद जन्मास येत. केव्हा केव्हा हेही प्रकरण उघडकीस येई. पण फार थोडे. कारण त्या भिंतीवर बारीक कोरलेले वाचणे ही एक विशिष्ट कलाच होती. त्यात मराठी भाषा किंवा अर्थशास्त्रीयादिक गूढ विषयांची टिपणे! ती बारीसाहेबास वाचता येणार आणि त्याचा त्यास अर्थ लागणार! त्याची योग्यता असल्या क्षुद्र गोष्टी समजण्यापेक्षा फार मोठी असे! ती इतकी की, जेव्हा केव्हा भिंत खरडण्याचा संशय कोणावर येई तेव्हा ते खरडलेले काय आहे हे कळणे अशक्य होऊन बारीसाहेबाने प्रामाणिकपणे आरोप ठेवावा की, "सरकारी वास्तू जाणूनबुजून केवळ नासधूस कराव्या म्हणून भिंतींचा चुना खरडून त्यांस विद्रूप करणे." एकदा आमच्या ज्येष्ठ बंधूंस मात्र घायपाताचा काटा जवळ ठेवल्याविषयी शिक्षा झाली होती. पण विवेकानंदांच्या पुस्तकावरील वेदान्तविषयक शंका व आक्षेप त्या घायपाताच्या काट्यांनीच त्यांनी लिहिले होते -अर्थातच क्वचित् कोरून ठेवलेले असे बारीसाहेबाने ओळखले होते- असे हे पुस्तक आमच्या बंधूंचेच होते; पण स्वतःच्या पुस्तकावरही वाचता वाचता सुचलेल्या शंका व उत्तरे काट्याने कोरून ठेवणे पेन्सिल मिळणे अशक्य म्हणून- हाही कारागृहीय शिक्षा होण्यासारखा Cognisable crime च होता हे उघडच आहे! बारीसाहेबांच्या भरीव नसल्या तरी ठरीव आणि सभ्य कोटिक्रमात बोलावयाचे म्हणजे "ये जेल है, स्कूल नहीं है! इतना तुम पढनेका शौकिन होता तो बापके घरमें क्यों नहीं सीखा? अंदर आया क्यों? लढो मत, पढो मत, काम करो-बस काम! और हम कुछ नहीं जानता!"

## नुसते शिकून काय होणार?

या बाह्य अडथळ्यांव्यतिरिक्त राजबंदींचे ज्ञान वर्धनास आणखी एक अडचण म्हटली म्हणजे त्यांच्यातील काहींचे औदासीन्य होय. राजबंदींतील बहुतेक लोक राज्यक्रांतिकारक होते. तेव्हा साहजिकपणेच नुसत्या ज्ञानापेक्षा नुसत्या कर्माकडे त्यांचा कल असे. वाचून शिकून काय करावयाचे, कृत्ये केली पाहिजेत; त्याग केला पाहिजे असे त्यांचे साहजिकच म्हणणे पडे. त्यांस असे समजवावे लागे की, तुमच्यात जे बहुतेक लोक पाचसात वर्षांच्याच शिक्षेचे आहेत ते देवाच्या दयेने सुटून जातील तेव्हा त्यांना कार्यक्षेत्रात यथायोग्य ती ती कर्मे करावयाची आहेत. नुसती पुस्तके तेव्हा पाहिजे तर वाचू नका. पण येथे जोवर वाचनाहून अधिक कार्यक्षम असे प्रत्यक्ष काम काही करता येत नाही तोवर तरी तो वेळ ज्ञानार्जनात घालविणे तुमच्या ध्येयाच्या दृष्टीनेही अत्यंत अवश्य आहे. संपादणे हे जितके कठीण तितकेच संभाळणेही कठीण आहे आणि हे तज्ज्ञतेविना शक्य नाही. राजनैतिक, ऐतिहासिक, अर्थशास्त्रीय आणि शासनशास्त्रीय ज्ञानाविना विघातक कार्येही यथायोग्य प्रमाणात करता येणार नाहीत. विधायक तर करता येणार नाहीतच नाहीत. इराणचे उदाहरण पाहा. राज्यक्रांती झाली. पण राज्यसंस्थापन आणि संगोपन करण्यास अवश्य लागणारी तज्ज्ञता क्रांतिकारकांत अवश्य तितकी नसल्याने अमेरिकेतून आयव्यय शास्त्रज्ञ आणावे लागले आणि अत्यंत महत्वाच्या अशा आर्थिक व्यवस्थेत दुसऱ्याचे ओंजळीने पाणी पिता पिता जिकडे तिकडे गोंधळच गोंधळ माजला, केवळ विनाशाची अंधळी प्रवृत्ती आपल्याच पायावर कशी कुऱ्हाड मारून घेते हे फ्रान्सच्या राज्यक्रांतीपासून तरी सर्वांनी शिकून शक्य तो विघातक शक्तीस आळा घातला पाहिजे. चीनमध्येही प्रजासत्ताक (Republic) स्थापित होताच पहिली अडचण शासनशास्त्रीय तज्ज्ञांची पडली. ते परदेशातून आणावे लागले. अर्थातच केवळ चीनचे हिताकडे दृष्टी ठेवणे आणि आपल्याला स्वजातीयांची तदर्थ हानी करणे हे त्याचे हातून घडणे शक्य नसल्याने राज्यव्यवस्थेत घोटाळा उडाला. म्हणून शासनशास्त्रीय ज्ञानास तुच्छ लेखू नका. ह्या कामात ज्यांस नेमस्त म्हटले आहे त्यांचा कित्ता तुम्ही गिरवला पाहिजे. नेमस्तात जसे अर्थशास्त्रज्ञ, राज- व्यवहारकुशल, शासनशास्त्रज्ञ आहेत तसा तुमच्यात एखादा तरी गोखले वा दत्त वा सर माधवराव आहे काय? तेव्हा निदान जोवर प्रत्यक्ष कार्य काहीएक न करता येण्याच्या या असहाय बद्ध स्थितीत तुम्ही आहा तोवर निव्वळ माश्या मारीत किंवा चिंता करीत वेळ घालविण्यापेक्षा आपणापैकी प्रत्येकाने शक्यतोवर ज्ञान वाढवावे; विशेषतः आपल्या अंगीकृत कार्यास अगदी आवश्यक अशा राजकीय इतिहासशास्त्र, राजकीय शासनशास्त्र आणि राजकीय अर्थशास्त्र ह्या तीन शास्त्रांचे काही ना काही तरी अध्ययन प्रत्येकाने केलेच पाहिजे. नुसते ज्ञान लंगडे तर नुसते कर्म अंधळे. धर्मकारणाप्रमाणेच राजकारणातही ज्ञानयुक्त कर्म हेच समाजास हितकारक होणारे आहे. तुम्ही सध्या एक सेवात्यागाची, यातना सहन करण्याची निष्क्रिय सेवा करताच आहा. त्याच्या जोडीस प्रत्येकजण आपापल्यापुढे असे तात्कालिक लक्ष्य ठेवा की ती एकेरी सेवा करता करताच अंगीकृत कार्यास अवश्य असणारी ही विद्वत्ताही शक्यतो उपार्जू आणि अशा रीतीने केवळ वीरदृष्टीने कार्य करण्याची जी एकेरी योग्यता पूर्वी अंगी होती तिला आता ज्ञानदृष्टीचीही जोड देऊन दुहेरी योग्यता अंगी बाणवू.

प्रकरण तेरावे

# हिंदुस्थानशी पत्रव्यवहार आणि बातम्या आणण्याची साधने

हिंदुस्थानातील तुरुंगात न ठेवता राजकीय बंदीवानांना काळेपाण्यावर पाठविले जाण्यात त्यांना जी सर्वांत विशेष पीडा भोगावी लागते ती ही होय की, त्यांचा हिंदुस्थानाशी सर्व संबंध सुटून जाई. हिंदुस्थानातल्या तुरुंगात दर तीन-चार महिन्यांनी तरी आपले संबंधी यांची गाठ पडते. पत्रे मिळतात आणि काही विशिष्ट त्रास होत असला तर बहुधा प्रत्यही जुने बंदी जे बंदीगृहातून सुटतात त्यांच्या हस्ते त्या त्रासाची बातमी प्रसिद्ध करता येते. पुनः वारंवार कारागारीय मंडळ म्हणून काही बाहेरचे लोक काराबंद्यांची स्थिती काय आहे हे पाहण्यास येत असतातच. या सर्व गोष्टींचा हिंदुस्थानातील कारागृहांतूनही त्या काळी जरी व्हावा तितका उपयोग होत नसे तरीही अंदमानापेक्षा हिंदुस्थानात सार्वजनिक दृष्टीची किरणे कारागृहाच्या अंधारात अधिक तीव्र आणि अधिक सुलभपणे घुसू शकत. परंतु यांपैकी एकही लाभ अंदमानास मिळत नसे. तेथील दहा-पाच युरोपियन अधिकारी अगदी पाचच, दहादेखील नव्हते, तेथील सर्वाधिकारी झालेले. त्यांच्यातीलच एक कमिशनर, एक मॅजिस्ट्रेट, एक डॉक्टर, एक सुपरिंटेंडंट आणि त्यांच्या विभागांवर देखरेखीस जाणाऱ्या मंडळींचे तेच आलटून पालटून सभासद. तसेच संध्याकाळच्या क्रीडामंडळातले मित्र, सहभोजनातील पांक्तिक, दिवसाचे परस्परावलंबी राज्यविभागाधिकारी आणि रात्रीच्या गायन- नर्तनातील सवंगडी; त्यामुळे साहजिकच त्यांच्यापैकी कोणाही विरुद्ध काही गाऱ्हाणे दुसऱ्याकडून ऐकले जाण्याची फारशी आशा नसे.

बंदीवानांस पत्र एक वर्षाने एकदा टाकण्याची परवानगी असे. तेही “लहान टाक! लहान टाक!” म्हणून सक्तीच्या धाकधपटशाहीच्या कैचीत लिहिलेले. त्यात पुनः ते उघडे टाकले जाणार. प्रथम तुरुंगातील अधिकारी, मग वसाहतीचे अधिकारी ते परीक्षणार आणि पसंत पडले तर धाडणार. कारागारांविषयी व अधिका-यांविषयी ब्रही काढला जाणार नाही, नाही तर ते पत्र नियमाविरुद्ध म्हणून फेकले जाईल असे स्पष्टपणे सर्वांस सांगण्यात येई. अशा तीक्ष्ण कात्रीने कातरीत उगीच बोटभर उरलेले पत्र वर्षातून एकदा जाणार! त्यात पुनः जर का त्या उभ्या वर्षात एकही शिक्षा - ओळीत न बसणे, रेंगाळणे, भलत्याच वेळी शौचास जाणे, शेजारी बसलेल्या बंदीवानाशी बोलणे अशा यःकश्चित अपराधाकरिताही का असेना - पण कारागृहीय एकादी शिक्षा मिळालेली असेल तर मग ते तसे दोन बोटी पत्रही वर्षाने धाडण्याचा अधिकार काढून घेण्यात येत असे. आता उभ्या वर्षात तसल्या कडक शिस्तीत असल्या यःकश्चित अपराधापासूनही अलिप्त राहून शिक्षेविना वर्ष काढणे किती कठिण ते काय सांगावयास पाहिजे! अशा स्थितीत पत्रातून आपल्या त्रासाची माहिती हिंदुस्थानात पोचविण्याची आशा तर दूरच; पण वर्षान्ती आपल्या घरच्या प्रियकरांच्या केवळ खुशालीचे वृत्तही कळण्याची वा आपण अजून जिवंत आहोत इतके त्यांस कळविण्याचीही मारामार पडे. राजकीय बंदीवान येण्याच्या आधी तर हे नियम अत्यंत कडक रीतीने पाळण्यात येत. राजकीय बंदीवानांच्या आटोकाट प्रयत्नांनी प्रथम त्यांच्यापुरते आणि नंतर अनुषंगाने इतर बंदीवानांपुरतेही हे

नियम पुष्कळ ढिले करण्यात आले. तथापि राजकीय बंदीवानांस कित्येक वेळा दोन-दोन वर्षे घरी पत्र घालता आले नाही - घरचे मिळाले नाही.

## तोंड दाबून बुक्क्या

बरे, हिंदुस्थानात सरकारद्वारे जी पत्रे जात त्यांत बंदीवानांना आपले जाचाचे वृत्त कळविता येत नसे तर नसे; पण हिंदुस्थानातील तुरुंगातील वर वर्णन केलेल्या इतर प्रकारांनी तरी आपले म्हणणे प्रसिद्ध करता येत होते काय? तर तेही नाही. प्रथमतः कारागारात समालोचक मंडळ त्या बाजूस येतच नसे. कधी कधी मॅजिस्ट्रेट येऊन जात; पण ते बारीसाहेबाच्या विरुद्ध फारसे जात नसत. वसाहतीच्या कमिशनरच्या हातूनच सर्व अर्ज हिंदुस्थान सरकारला जाणार. ते गाऱ्हाण्यांचे अर्ज साफ धाडीत नाही म्हणून फेकून देत; मग इतरांस कोण पुसतो? हिंदुस्थानातून समालोचक असा कोणीच नियमितपणे येण्याचा धाक नसे. कधी काही एखाद्या दंग्याबिंग्याचा बोभाटा झाला तरच वरतून कोणी येणार. पण म्हणूनच तसा बोभाटा झाला तरी वरपर्यंत पोचू न देण्याचा साहजिक आटोकाट प्रयत्न होई. अशा स्थितीत त्या अधिकारी पंचायतनाच्या बाहेर अंदमानाची बातमी फुटणे कठीण होऊन गेलेले होते. ते अधिकारी आपापल्या न्यायान्यायाच्या कल्पनांप्रमाणे अर्जांचा, गाऱ्हाण्यांचा आणि प्रतिवादांचा निकाल करीत. परंतु जर कधी त्यांच्या त्या निकालात कोणास अन्याय भासला तर त्याचे वरपर्यंत ती कागाळी नेणे किंवा सार्वजनिकपणे ती उघडकीस आणणे हे अंदमानामध्ये हिंदुस्थानातील कारागारापेक्षा अत्यंत कठीण होऊन बसलेले होते.

आता प्रत्यही सुटणाऱ्या बंदीवानांच्या हाते बाहेर बातमी पाठविण्याचे जे हिंदुस्थानीय कारागारांतले साधन त्याचे तर अंदमानात नावच नको! जो येणार तो वीस वर्षांसाठी वा पंचवीस वर्षांसाठी! अर्थात कमीत कमी म्हणजे दहा वर्षे कोठे गेलीच नाहीत! त्यातही अंदमानाच्या वसाहतीत राहून जगून मग सुटावयाचे? अगदी तुरळक अगदी क्वचित! मग हिंदुस्थानचे वेशीवर गाऱ्हाणे कसे टांगावयाचे?

अशा परिस्थितीत आपल्याला होत असलेली पीडा आपल्या देशबंधूंच्या कानांवर कशी घालवावी हा प्रश्न राजकीय बंदीवानांसमोर येऊन पडला. तेथील अधिका-यांच्या हातून जीव जगवून सुटणे असल्यास एकच उपाय होता आणि तो म्हणजे ज्या असह्य जाचात राहावे लागत होते त्याची काही तरी कुणकुण हिंदुस्थान सरकारचे कानावर घालणे हा होय. कारण तत्रस्थ अधिकारी स्पष्टच सांगत की, आम्ही जो हा कडकपणा तुमच्याविषयी वापरतो तो आमचा दोष नव्हे. आम्हांस वरूनच हिंदुस्थान सरकारची तशी सक्त आज्ञा आहे! हे खरे की खोटे पाहण्यासही हिंदुस्थानात बातमी पोचविणे भाग होते. राजकीय बंदीवान अंदमानमध्ये जाई तो अंदमानाविषयी हिंदुस्थानात एखाद्या होनोलूलूची जी आज माहिती आहे तितकीच आणि तशीच असे. काळेपाणीच ते! राजबंदीच्या निर्वासनानंतर अंदमानाची थोडी नाममात्र ओळख झाली. पण साधारण जनतेस तर काय पण बहुतेक सर्व पत्रकर्त्यांसही अंदमानाविषयी काही तशी स्पष्ट कल्पना नव्हती. तीच स्थिती सरकारची. वर्षानुवर्षे केवळ वार्षिक 'सब ठीक है'च्या पलीकडे कोणतीही त्रासदायक विचारपूस हिंदुस्थानच्या अधिका-यांस अंदमानाविषयी

करावी लागत नसे. आणि राजबंदीही एकदा त्या काळेपाण्यावर नेऊन सोडले की पुनः त्यांच्या किरकिरीची कर्मकटकट ऐकणे नको अशी पुष्कळांस आशाही असेल.

पण त्या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही राजबंदींनी ती कटकट हिंदुस्थानचे कानावर घालण्याचा बेत चालविला. सुटावयाचे, निदान जगावयाचे, तर त्यास तसे केल्याविना गत्यंतरच नव्हते. ते सर्व खरे असले तरीही मांजराचे गळ्यात घाट बांधावी कोणी? राजबंदीवानांत एक श्री. होतीलाल म्हणून गृहस्थ संयुक्त प्रांतातील न्यायालयात राजद्रोहाचे अपराधासाठी १० वर्षे शिक्षा होऊन आलेले होते. त्यांनी त्यांच्या एका मित्राचे संमतीने मी ती घाट बांधतो म्हणून म्हटले. त्या वेळेपर्यंत राजबंदीवानांचे जे संप आणि भांडणे झालेली होती त्यामुळे साधारण बंदीवानांतील काही समजदार लोकांवर थोडासा तात्त्विक परिणाम झालेला होता. त्यांतही काहींस अशीही एक अंधुक, जरी ती बहुतांशी वेडी होती तरी, आशा वाटू लागली होती की, न जाणो हे प्रोफेसर, बारिस्टर, एडिटर असले लोक क्वचित चळवळ करून अधिका-यांस नमवतीलही. आणि आपण जर आज त्यांस ह्या अशा स्थितीत साह्य दिले तर त्या भरभराटीचे काळात हे आपणास सोडवूही शकतील! अशा काही बंदीवानांकडून एक कागद मिळवून 'होतीबाबूंनी' एक पत्र तर लिहून काढले.

## होतीलालांचे पत्र

होतीलालांनी कोलूमधल्या संपात बारीसाहेबांपासून सुपरिंटेंडंटपर्यंत सर्वांस सळो का पळो केले होते. ते उत्तर-हिंदुस्थानी शुद्ध हिंदी बोली बोलत; पण इंग्रजीत, उर्दूत प्रवीण असत. रशिया, चीन, जपान इत्यादी सर्व देश पाहून त्यांनी जगतात अनेक गमती केलेल्या होत्या. त्यांना अगदी 'असुधारणीय' म्हणून एका कोठडीत कडक पहाऱ्यात बंद केलेले असे. त्या खोलीत आणि त्या पहाऱ्यात त्यांनी ओळीओळींनी लिहित लिहित ते तीन स्तंभांचे पत्र लिहून काढले. त्यांच्या एका-दोघा विश्वासू मित्रांविना इतर राजबंदीवानांस त्यांचे अवाक्षर ठाऊक नव्हते. एक दिवस सकाळी कारागारांतल्या राजबंदीवानांच्या त्रासाची आणि बारीसाहेबांदिकांच्या वर्तणुकीची अत्थंभूत बातमी दिलेले ते पत्र होतीबाबूंनी आपली सहीच नव्हे तर त्या कडक पहाऱ्यातील आपल्या कोठडीचा क्रमांकही खाली लिहून एकाच्या हाती बाहेरकामास बंदीवान जात त्यांच्या धांदलीत बाहेर धाडले. पण कारागाराचे बाहेर म्हणजे हिंदुस्थानाच्या कारागारासारखे एकदम बाहेर नव्हे. अंदमान म्हणजे एक आणखी प्रचंड कारागार त्या पत्रास ओलांडावयाचे होते. तेथेही एक... अशा सरकारी विश्वासपात्र प्रवाशाचे पाकिटात लपत छपत ते पत्र कलकत्त्यास उतरले आणि सुरेन्द्रनाथांस पोचले. त्या निर्भीड संपादकाने तशा दिवसांत, की जेव्हा क्रांतिकारकांचे नाव काढावयास मोठमोठे रथी-महारथी थरथरा कापत, तेव्हा ते पत्र आपल्या 'बंगाली' नावाच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध केले.१ इतकेच नव्हे, तर त्यावर आपले संपादकीय स्फुटही लिहिले. ते पत्र बंगालीत प्रसिद्ध होताच इतर वर्तमानपत्रकारांसही बंगालीचे आड दडून थोडेथोडके लिहिता आले. अंती कौन्सिलमध्येही त्याविषयी प्रश्नोत्तररूपांची चर्चा चालली.

अंदमानामधून बाहेर हिंदुस्थानात पत्र टाकणे जितके कठीण तितकेच बाहेरची आणि त्यातही राजकीय प्रकरणाची बातमी हिंदुस्थानातून अंदमानामध्ये आणणे आणि ती आम्हांस कळविणे दुर्घट! तेव्हा इतक्या लटपटींनी धाडलेले

पत्र हिंदुस्थानात पोचले, की ज्याने नेतो म्हणून सांगितले त्याने समुद्रात फेकले, की त्याच्याही पुढे जाऊन ते सरकारचे हातीच देऊन टाकले! अशा चिंतेत ज्या दोघातिघा राजबंद्यांस पत्र धाडल्याचे गौप्य माहीत होते ते सर्व चूर असता हिंदुस्थानातील बातमी आम्हांस अगदी नेमकी येऊन पोचविण्याचे हे टपालखात्याचे काम स्वतः बारीसाहेबच करते झाले!

## बारीसाहेबांचा भडका

कारण की, एक दिवस सकाळी काही एक गडबड नसता बारीसाहेब कारागृहात अंगळासारखे लाल होऊन ओरडत आले! प्रत्येक पेटी ऑफिसरास दहा-पाच, प्रत्येक वॉर्डरला पाच-पन्नास आणि दिसेल त्या बंद्यास अगणित अशा शिव्या हासडीत आणि आपल्या त्या काळ्या लठ्ठ काठीचे रपाटे हाणीत स्वारी भागाभागातून फिरू लागली. झाले तरी काय? बंदीवानांस काही कळेना. बारीसाहेब नुसता ओरडे, "साला लोग! साला लोग! हम बताऍंगे! तुम क्या बंदोबस्त रखता है! हम सबको मट्टीसे मिलाएंगे!" पण काय झाले ते तोही सांगेना. काळेपाण्यावर गोमीच्या जातीचा एक मोठा विषारी प्राणी असतो त्यास 'कानखजूरा' म्हणतात. तेव्हा बारीचे ते अकांडतांडव पाहून भयचकित झालेले बंदीवान आपसात विनोदाने म्हणू लागले 'क्या हुवा उसकू कानखजूरोनें तो नहीं काटा?'

बारीबाबा होतीलाल होते त्या भागाच्या चाळीत गेले आणि विनाकारण खेकसून "खडे रहो. जल्दी क्यों नहीं रहता? तुम बडा झूट बोलनेवाला है" इत्यादी टकळी त्यांनी सुरू केली. तेव्हा इतरांना बारीचे ते होतीलालवर रागावणे जरी विनाकारण वाटले तरी होतीबाबू समजले की बहुधा हे सकारण आहे; आणि ते त्या बारीच्या संतापास सकारण करणारे कारण दुसरे तिसरे नसून बहुधा आपण टाकलेले पत्र प्रसिद्ध झालेले असावे हेच होय. होतीलालास वेडेवाकडे बोलून बारीने सर्व तंडेल इत्यादी बंदीवान अधिका-यांस सक्त आज्ञा दिली की कोणीही राजबंदी एकमेकांच्या दहा पावलांवर जरी उभा राहिलेला आढळला तरी तुम्हांस 'तोडून टाकीन' म्हणजे कामावरून काढून टाकीन. राजबंद्यांस दूर दूर जेवावयाला बसवा व कोणीही मनुष्य त्यांच्या वाऱ्यास फडकला तर सावधान! अशी सक्त ग्वाही फिरवीत बारीसाहेब निघून गेले. ज्यांना पत्राचे गौप्य माहीत होते त्यांना पक्के कळले की, पत्र प्रसिद्ध झाले असलेच पाहिजे. एक-दोन दिवसांतच बातमी फुटली की, बारीसाहेब हाताशी धरलेल्या एकादोघा 'संभावित' राजबंदींपाशी पत्र प्रसिद्ध झाल्याचे बोलला आणि ते पत्र नेले कोणी इत्यादी त्याने चौकशी केली. त्या संभावितांनी राजबंदीवानांस आणखी एक बातमी दिली की, ते पत्र धाडण्यासारखा दुसरा मूर्खपणा कोणताही कोणीही केला नसेल! कारण ते पत्र प्रसिद्ध केल्याने 'बंगाली' पत्रावर खटला होऊन त्याचा छापखानाही जप्त झाला! "एवढी दोन-तीन लाखांची हानी या होतीलालच्या मूर्खपणामुळे की हो झाली! आणि अशी पत्रे धाडल्याने अंदमानाचे अधिकारी आपला छळ आता फारच कडक रीतीने करणार आहेत! खोटी विधाने केल्याबद्दल होतीलालची शिक्षा वाढणार आहे. होतीलालने हे केवढे निंद्य कृत्य केले!" अशा रीतीने कार्यालयात बारी त्याच्याशी जे जे राजबंदीवानांस थरकापविण्यासाठी म्हणून बोले त्या त्या बारीच्या भाषणाचा प्रतिध्वनी हे संभावित राजबंदी स्वतःच्या ध्वनीतून उडवीत असत. तरी बरे की त्या पत्रात सर्वांच्या छळांच्या कथेबरोबरच यांच्याही छळांची कहाणी प्रसिद्ध केली होती; आणि पुढे असा पत्रे टाकण्याचा 'मूर्खपणा' संधी सापडताच स्वतः करण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. पण

होतीलालची निंदा करून बारीचे मन आपणाविषयी जर अनुकूल होत असेल तर इकडे हाही लाभ साधावा आणि तिकडे पत्र प्रसिद्ध झाल्याने बंगाल्यात चळवळ होऊन जर राजबंदीवानांचे आणि त्यांचेबरोबर आपलेही कष्ट थोडे कमी झाले तर ती सवलतही पदरात पाडून घ्यावी अशा पोक्त मार्गाचा अवलंब संभावित मंडळी करीत असता इतरांनी मात्र होतीबाबूचे अभिनंदन आणि समर्थन उघडपणे करण्यास मागे घेतले नाही. त्यांनी वरील आक्षेपास उत्तर दिले की, एवीतेवी जितके कष्ट देणे शक्य तितके तत्रस्थ अधिकारी देतच होते. ते बंद पाडण्याचा प्रयत्न करणे तर पहिला मार्ग सार्वजनिक प्रकाशात ती गोष्ट आणणे हा होय. तो उपाय करताना जर काही काळ त्रास झाला तर एकंदर अंतिम लाभाचे मूल्य म्हणून तो सोसला पाहिजे. पण हा प्रश्न केवळ राजबंदीवानांच्या त्या वेळच्या व्यक्तींचा नसून राजबंदीवान या वर्गाचा तो प्रश्न होता.

कारण त्या पहिल्या तुकडीनंतर हिंदुस्थानाच्या तत्कालीन परिस्थितीत हिंदुस्थानी राजकारणात राजबंदीवान ही संस्था नित्याचीच होऊन बसणार आणि ते दहावीसच नव्हेत तर शेकडो हजारो राजबंदीवान अंदमानास येणार असा संभव उघड उघड दिसत होता. अशा वेळेस पहिल्याच तुकडीने जर दिले जाईल ते जू मान तुटेतो वाहिले तर दुसरीसही ते वाहावे लागेल किंवा ते न वाहण्यासाठी कराव्या लागणाऱ्या झुंजीचा बोजा तरी तिला उचलावा लागेल. मग आपणच त्या झुंजीस आरंभ करून पुढे येणाऱ्या राजबंदीवानांचा मार्ग, शक्यतो कमी कंटकमय का करून ठेऊ नये? राजबंदीवान या वर्गाचीच स्थिती आणि योग्यता शक्य तितक्या उच्च प्रतीची ठरवून का घेऊ नये? याहीपुढे एक पाऊल टाकून मी तर असे म्हणे की, आपल्या कारागारातील अस्तित्वाने जी अनेक कर्तव्ये आपल्या वाट्यास आली आहेत त्यांत एक महत्वाचे कर्तव्य म्हणजे केवळ राजबंदीवान वर्गाचीच नव्हे तर भारतीय कारागारांचीच शक्यती सुधारणा घडवून आणणे हे होय. तेव्हा त्या दृष्टीने कारागारांची अंतर्बाह्य सुधारणा करण्यासाठी आपणास अशी पत्रे पाठवून, संपकरून, मनधरणी करून वा प्रतिकार करून चळवळ केलीच पाहिजे. मग वैयक्तिक त्रास अधिक होवो वा कमी. शक्यतो कमी त्रास होण्यासाठीच प्रयत्न व्हावेत. वेळी प्रसंगी डाव उलटून लाभापेक्षा तात्कालिक त्रासच अधिक झाला तरी कर्तव्य ते केले म्हणून ते सोसण्यास सिद्ध असले पाहिजे. राजबंदीवानांवर या विचारांचा परिणाम होऊन तेही ज्यांनी ते पत्र धाडले होते त्यांच्याच पक्षाचे बहुतेक उघडपणे समर्थन करू लागले. मनातून तर सर्वच करीत होते.

दोन आठवडे त्या पत्राची गडबड चालू होती. पहिल्या रागानंतर पुढे बारीसाहेब पत्र पाठविणा-यांच्या पोटात घुसण्याचा प्रयत्न करू लागले. आम्ही काय करणार? हिंदुस्थान सरकारच्या आज्ञेप्रमाणे सर्व घडते! असे मला म्हणत एकदा म्हणाले, ह्या तुमच्या मित्राने, ह्या वेड्या होतीने 'बंगाली' पत्र ठार मारले. सगळा छापखाना जप्त झाला. मी म्हटले "असे का व्हावे हे मला समजत नसल्याने ही बातमी बहुधा खोटी असावी असे मला वाटते. पण खरी असली तरी सध्या असलेल्या आणि पुढे येणाऱ्या राजबंदीवानांचे कष्ट टाळण्यासाठी आणि कारागारांची सुधारणा करण्यासाठी एकच छापखाना काय पण असे दहा छापखाने जप्त झाले तरी चिंता काय? हे कर्तव्यच आहे. वास्तविक त्या पत्राची चौकशी व्हावयास पाहिजे. ती सर्व गाऱ्हाणी खरी ठरतील तर दूर केली जावीत; नाही खरी ठरली तर होतीलालची सही आहे, त्यांनी ते पत्र लिहिले म्हणून त्यांना शिक्षा करण्यात यावी! तेथे छापखाने जप्त करून काय होणार?"

परंतु हा छापखाना खरोखरीच जप्त झाला की काय? ही बातमी कशी काढावी? आम्ही मागे सांगितलेच आहे की, हिंदुस्थानात बातमी धाडणे जितके कठीण, जवळजवळ तितकेच, तिकडून बातमी आणणेही कठीण असे. राजबंदीवानांना आपल्यामागे आपल्या घरादारांची काय अवस्था झाली असेल आणि आपले प्रियजन काय करीत असतील हे जाणण्याची उत्कंठा तर होतीच मग त्याहूनही तीव्र उत्कंठा त्यांस त्यांच्यापैकी बुहतेकांस ही लागलेली असे की आपल्यामागे आपल्या स्वदेशाची अवस्था कशी आहे?

ज्या चळवळी त्या वेळेस उभ्या हिंदुस्थानास क्षुब्ध करून सोडीत होत्या त्यांचा जोर किती आहे? आपला पक्ष प्रबळ होत आहे की नाही? सत्तेचा क्रूर आघात कोसळत असता त्या ढालीच्या आश्रयाखाली वाढणारे इतर पक्ष काही तरी कार्य करू शकत आहेत की नाहीत? इत्यादी राष्ट्रीय आणि जागतिक वृत्तान्त आपणांस कोणी कळवील काय? तो जाणण्यास काय उपाय करावा? जो राजबंदीवान भेटे तो दुसऱ्यास पहिला प्रश्न करी तो हा की “काही स्वदेशाची नवीन बातमी?” एखादी बातमी मिळाली की कामाचा त्रास, अन्नाची कुरुची, प्रकृतीचे अस्वास्थ्य हे सर्व विसरून जाऊन ते राजबंदीवानांचे तरुण मंडळ दोनदोन वा तीनतीन मिळून वा निरोपा निरोपी सर्व दिवस त्या बातमीच्या चर्चेत गुंग होऊन जाई. स्वदेशाच्या प्रकृतीची आणि प्रगतीची चिंता त्यांच्यातील बहुतेकांस खरोखरच रात्रंदिवस त्या वैयक्तिक हालअपेष्टांतही कासावीस करी. प्रियकर आपल्या एखाद्या प्रियकरणीची वार्ता मिळविण्यास जितका उत्सुक असतो त्याहून अधिक उत्सुकता राजबंदीमंडळास ज्या मातृभूमीचेसाठी त्यांनी सर्वस्व अर्पण केलेले होते, तिच्या वार्तेविषयी कासावीस करीत असे. वर्तमानपत्रे मिळणे अशक्य. घरून येणाऱ्या पत्रात राजकारणाचे अक्षर असल्यास ते पत्र देण्यात येत नसे. तेव्हा सदोदित ही चिंता की हिंदुस्थानाची बातमी काढावी कशी?

पण अशाही परिस्थितीत साधनास साधने जुळविता काहीना काही तरी बातमी मिळविण्यास त्या राजबंद्यांनी कमी केले नाही. प्रथम साधन म्हणजे नवे येणारे चलान. प्रत्येक महिन्यात देशनिर्वासनाची शिक्षा झालेल्या साधारण बंद्यांची पाचपन्नासांची एक ना एक टोळी अंदमानास येई ती आली की त्या कक्षमय (सेल्युलर) कारागारात बंद करण्यात येई. त्यांचे महत्व पहिल्या आठवड्यात इतके वाढे की, जमादारादी सर्वांस त्यांची मनधरणी करावी लागे, कारण त्यांत आपल्या गावाचा वा भाषेचाही कोणी जरी बंदीवान आलेला असला तरी ह्यापासून आपल्या अष्टमित्रांची काही काही बातमी काढता येई. ओळखीच्या वा आपली भाषा बोलणाऱ्या मनुष्यास पाहताच जी एक आपलेपणाची प्रीती मनात उत्पन्न होते तिचा अनुभव एक तर दूर प्रदेशी सासर असणाऱ्या मुलीस माहेरच्या गावाचा कोणीही मनुष्य दिसताना येत असेल किंवा स्वदेशनिर्वासन होऊन द्वीपांतरी वा खंडांतरी भटकून वा अटकून दिवस कंठणाऱ्या बंदीवानांस येत असेल. त्या चलानातील ह्या स्वभाषिक पूर्वपरिचितास हमारा मुलखी! आमच्या देशाचा! म्हणून पदवी मिळे. अंदमानात ही पदवी इतर सर्व पदव्यांहून मनास गोड वाटे. या ‘मुलखी’पणाची व्याख्याही आवश्यकतेने पुष्कळच विस्तृत झालेली होती. आपल्या गावाची ती आपली मंडळी या स्वदेशीयत्वाच्या अडाणी कक्षेबाहेर जाऊन आपल्या प्रांतातला आणि विशेषतः आपली भाषा बोलणारा तो आपला स्वदेशीय, आपला मुलखी म्हणून स्वाभिवकपणेच समजला जाऊ लागे. हिंदुस्थानास भौगोलिक विभागापेक्षा भाषाविभागच कसे सद्यःस्थितीत स्वाभाविक आहेत हे अंदमानास अशिक्षित अशा

एखाद्या महारास देखील मराठी व बंगाली बोलताना पाहून तत्रस्थ ब्राह्मण देखील जेव्हा हा आमचा स्वदेशी, आमचा मुलखी म्हणून प्रेमाने त्याच्याशी बोले आणि त्यास साहाय्य करी तेव्हा कोणाच्याही ध्यानात येई. प्रत्येक 'चलान' आल्यानंतर त्या नवागत बंदीवानापाशी आपापल्या घराच्या वा गणगोताच्या वृत्तान्ताची चौकशी इतर बंदीवान करीत असता राजकीय बंदीवानांचा पहिला प्रयत्न आणि प्रश्न म्हणजे नवीन सार्वजनिक बातमी काय आहे हे कळल्यास पाहण्याचा असे.

चलानांतील लोक अत्यंत अशिक्षित आणि राजकारणाचे नावदेखील माहीत नसलेले असल्याने त्यांचेपाशी सहसा स्वदेशाची सार्वजनिक बातमी मिळत नसे. केवळ एखादा मोठा राजकीय खटला, ते धरले गेले त्याच संधीस आणि त्याच कोर्टात चाललेला असेल तो किंवा ते हिंदुस्थानातील ज्या बंदीगृहात असत त्यात राजकीय बंदीवान असेल तर त्यांची किंवा त्यांनी धाडलेल्या बातमीची त्रोटक माहिती ह्या दोन गोष्टी जे चलानवाले मोडक्यातोडक्या भाषेत वा अस्पष्टपणे सांगत असत, त्यांत सुदैवाने एखादा सुशिक्षित बंदीवान केव्हा केव्हा निघे. मग तर त्याचे महत्वास आणि त्रासासही सीमाच नसे. कारण जेथे जेथे जो जाईल तेथे तेथे राजबंदीवान गुपचुपपणे वा निरोपानिरोपी बातमी! बातमी! म्हणून पुसून त्यास त्रस्त करून सोडीत. त्याची मिनतवारी काय करावी? त्याचे काम देखील राजबंदीवानांनी आपल्या हातात मोगरी घेऊन छिलका कुटून गुपचूप करावे की, त्यायोगे तरी प्रसन्न होऊन तो बातमी सांगण्यास त्रासणार नाही? परंतु सुशिक्षित असला तरी असल्या साधारण बंदीवानास राजकारणातील माहिती ती काय असणार? काय हो, स्वदेशातील अमकी चळवळ कशी काय चालली आहे? या राजबंदीवानाच्या उत्सुक प्रश्नास बहुधा "काही नाही जिकडे तिकडे सामसूम!" हेच ठरीव उत्तर बहुधा मिळावयाचे. आणि त्यायोगे त्या उत्कट देशभक्तांच्या भावनाप्रवण मनास खिन्नता यावयाची. त्या साधारण बंदीवानासही जर कोणती एखादी बातमी आपण होऊन सांगता येत असेल तर ती एखाद्या मोठ्या राजकीय पुढा-यांच्या पकडण्याची वा "बाहशहा आता है", "दिल्लीमें बडा उत्सव हुआ" किंवा "एक बडा साहेब मारा गया" अशा दोनचार प्रकारच्या उत्क्षोभक घटनांची होय. कारण या घटनांची बातमी वणव्याप्रमाणे आपण होऊन पेटत आणि पेटवीत बाजारा बाजारातून पसरत असते. बाकी राष्ट्रीय सभा वा कौन्सिले, वा स्वदेशी प्रचार वा इतर गोष्टींविषयी सर्व शून्य. त्यास ते कळतच नसे. अर्थात ही स्थिती प्रथमच्या चार-पाच वर्षांची आहे. पुढे पुढे काय फरक पडत गेला ते मागाहून ग्रथित होईलच.

बातमी मिळविण्याच्या ह्या चलानाच्या साधनाविषयी एक-दोन युक्त्या उदाहरणार्थ सांगण्यासारख्या आहेत. चलानातील काही लोकांस अंदमानास निघताना हिंदुस्थानातील राजबंदीवान भेटत. ते अंदमानमधील आपल्या काही 'खटलेवाल्यांस' म्हणजे त्यांच्या खटल्यांतच शिक्षा लागून अंदमानास गेलेल्या त्यांच्या सहाभियुक्तांस कधी एकदा महत्वाचा निरोप धाडणे तर किंवा परिचित नसताही अंदमानात जे नावाजलेले राजबंदीवान होते त्यांच्या केवळ भक्तीने प्रेरित होऊन त्यांस प्रमाणपत्र धाडण्यास दुसरे कोणतेही सोईस्कर साधन नसल्याने बंदीवानापाशी असलेल्या एखाद्या अत्यंत यःकश्चित पुस्तकाची बांधणी करवून त्या बांधणीत ते पत्र लपवून धाडीत.

## बिल्ल्यामागे पत्र

केव्हा केव्हा पुस्तकाची ही युक्ती अधिका-यांच्या परिचयाची असल्याने जो लाकडी वा लोखंडी बिल्ला प्रत्येक बंदीवानाचे गळ्यात अडकलेला असे त्याच्या पाठीवर अक्षरे लिहून पत्रे धाडली जात. मला एकदा पंजाबमधल्या एका थोर पुरुषाच्या तरुण पुत्राने क्रांतिकारक कटाविषयी पाच-सात वर्षांची शिक्षा भोगीत असता पंजाबच्या तुरुंगातून असे बिल्ल्यामागे लिहिलेले पत्र धाडले होते. ज्या बंदीवानाच्या गळ्यात तो बिल्ला होता त्याची पंजाबमधून निघून अंदमानामध्ये मला भेटेतो पन्नास वेळा कसून कपडे काढून झडती झाली असेल; पण त्या त्याच्या गळ्यात लटकणाऱ्या बिल्ल्यामागे पत्र लिहिलेले असेल त्याची कोणास शंका देखील आली नाही. त्या बंदीवानाने ते पत्र घासून घासून पुसू नये म्हणून बिल्ला अलगत ठेवीत ठेवीत अंदमान कारागारात येताच ते माझे हाती दिले. मी वाचून पुसून तो बिल्ला त्याला परत केला. अशा उपायांनी चलानामधून शक्य ती सार्वजनिक बातमी काढण्याचा प्रयत्न सारखा चालू असे. पण एक महिन्याने येणाऱ्या या अगदी अशिक्षित अपराध्यांच्या टोळीमधून फारशी महत्वाची बातमी फारच विरळा मिळत असल्याने राजबंदींची स्वदेशाची काय अवस्था आहे हे कळण्याची जिज्ञासा तशीच अतृप्त राही. तिची पूर्ती करण्यासाठी दुसरा उपाय म्हणजे, कारागृहात वर्तमानपत्रे आणविणे हा होय. अर्थात तो तर सगळ्यात धोक्याचा आणि कठीण मार्ग. ज्यावेळची माहिती आम्ही प्रस्तुत सांगत आहो त्या वेळी तर तुरुंगात एक वेळ चोरून हत्ती येऊ शकता आणि धरला जाता हत्ती अनुज्ञेविना आत आणल्याविषयी एक बंदीवानास क्षमा होती. पण वर्तमानपत्राचा आणि हिंदी वर्तमानपत्राचा चिटोरा आत येऊ शकला नसता व त्याविषयी क्षमा झाली नसती. अशा स्थितीत वर्तमानपत्र नाही तर त्याचे बोटाएवढे तुकडे तरी आणविता यावेत म्हणून मागे सांगितलेल्या गाडी ओढण्याच्या कामालाही कित्येकांनी नाही म्हटले नाही. कारागृहातील सर्व कचरा घेऊन ज्या गाड्या बाहेर जात त्यांचेबरोबर बाहेर त्या गाड्या खेचीत जावे. बाहेर गोऱ्या अधिका-यांच्या बंगल्यांवरून रद्दी-गदळ, जुनेपुराणे कसेही असोत जे वर्तमानपत्राचे तुकडे कचऱ्याबरोबर टाकले जातील त्यांतील दोनचार भरभर पाहून गाडीच्या फळ्यांत किंवा सामानांत कोंबावेत आणि गाडी परत आणताना ते आणून कचऱ्याच्या नळ्याबिळ्यात दडपावेत. जाता-जाता बोटा-वितीएवढे ते तुकडे वाचावेत. त्याची कोण गंमत! एखादा तुकडा कोणा एडिंबरोशायरच्या एखाद्या ग्रामीण पत्राचा, एखादा एखाद्या क्रिकेटला आत्मसमर्पण केलेल्या पत्राचा, एखादा अचकटविचकट कादंबरीचा तर एखादा अठराशे-सत्तर सालच्या पत्राचा. कशात बूट बांधलेले, तर कशात अंडी बांधलेली, तर कशात धोब्याचे कपडे. पण ते तुकडे वाचावेत! कोठे हिंदुस्थानाचे नाव वा प्रचलित कालची लंडनची तार व मुंबईचे टाइम्सचा तुकडा दिसला की मोठ्या आशेने पाहावे, काही बातमी आपल्या स्वदेशाची वा सद्यःकालीन राजकारणाची मिळते की काय? ही गाडीतून येणारी ‘परदेशी डाक’ म्हणजे कारागाराच्या बाहेरून विकणाऱ्या गाडीत लपवून आणलेली ही वर्तमानपत्रांची चिटोरी, एखादे वेळी मात्र अगदी अचानक तिच्यातली ताजी बातमी हाती आणून देत. कधी लंडन टाइम्समधील व्हॅलेनटाइनचा क्रांतिकारकांविरुद्ध लेख तर कधी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांचे भाषण. मला आठवत आहे की, तुतिकोरिनच्या खटल्याच्या माहितीचा एक स्तंभ (Column) एक दिवस बाहेरच्या त्या गाडीवाल्यांस जेव्हा सापडला तेव्हा कोण उत्सुकतेने त्यांनी तो आत आणून आमचे हाती दिला! ही एक बातमी आम्हांस देता आली आणि तशी ती आणल्याविषयी राजबंदीवानांची

कृतज्ञता मिळविता आली, या एका विचाराने बिचा-यांना महिना महिना गाडी ओढण्याच्या शिणाचे साफल्य झाल्यासारखे वाटे. 'परदेशी डाकेस' बातमीचा पुरवठा करणारी मुख्य संस्था म्हटली म्हणजे गो-यांचे प्रातर्विधिगृह! तेथे त्यांची रोजची टाइम्स इत्यादी पत्रे वाचता वाचता फेकलेली वा तुकडे करून ठेवलेली असत. या अखंड भांडारावरील एखादा कोठवळा गाठून त्याचेकडून ती पत्रे कचऱ्यात फेकावयाची आणि आम्ही वाचावयाची.

कधी कधी 'परदेशी डाकेच्या' जोडीस 'स्वदेशी' डाकेचेही साहाय्य मिळे. कारागारातील कारखान्यात टेकस, खिळे इत्यादी सामान एखाद्या जुन्या पत्रात गुंडाळून ठेवलेले असे. त्या तुकड्यांनीही काही माहिती मिळे. हिंदुस्थान हा शब्द दिसला की राजबंदींनी तो तुकडा उचललाच म्हणून समजावे. तो केव्हा इतका गदळ असे की त्यास कचऱ्याच्या ढिगातून वा नाळीतून दोन काड्यांच्या आधाराने उचलावा लागे; काडीनेच पसरावा लागे आणि वाचावा लागे. पण तसा देखील वाचल्याविना जीव राहत नसे. एकदा गोखल्यांच्या शिक्षणविषयक ठरावाच्या भाषणातील निराशेविषयी एक सुंदर भाग अशाच गदळ कागदावर एका चिटोऱ्यावर वाचल्याचे मला आठवते आणि हेही आठवते की, गोखल्यांनी तो शिक्षणाचा ठराव आणल्याची बातमीही त्याच तुकड्याने अनुमित करता आल्याने कित्येकांस किती तरी आनंद झाला. वाटले आपल्या देशात ज्ञानामृताच्या पाणपोयांची मुक्तद्वारे तेथे उघडलेली दिसतील! एखादी नवीन गिरणी उघडली, एखादा कर काढून टाकण्यात आला, एखादा खटला चालला, एखादा दंगा झाला, एखादा क्रांतिकारक आघात प्रत्याघाताचा स्फोट दणाणला, एखादे नवीन पुसक लिहिले गेले, एखादा कवी उदयास आला - लहान असो वा मोठा असो जिच्यायोगे आपल्या चिरविरहित मातृभूमीच्या प्रकृतीची वा प्रगतीची काही तरी माहिती मिळेल अशी बातमी ऐकण्यासाठी राजबंदीवानांचा जीव कसा हपापलेला असे! अशा तुटक बातम्या जुळवून जुळवून त्यांची चर्चा करीत बसून त्या कठोर कारागारात हे हिंदुस्थाना! तुझ्यासाठी तुझ्यापासून हिसडून नेले गेलेले तुझे तरुण तुझी चिंता वाहत असत. आपल्या शारीरिक पीडेसही वेळेवर विसरत. ते राजबंदी आपल्या मातृभूमीचा हात हातात धरून तिच्या नाडीचे ठोके परीक्षित आणि त्यावरून तिच्या स्वास्थ्याविषयी चिंतातुर हर्षविषाद अनुभवीत त्या अंदमानात दिवस कंठित असत!

## बातमीत आणखी एक मार्ग

चलान आणि कचराडाक सोडून बातमीचा तिसरा उपाय, बाहेरच्या काही सहानुभूती बाळगणाऱ्या हिंदी गृहस्थांकडे कारागारातील कामे करून बाहेर जाणाऱ्या लहानसहान अधिका-यांस धाडणे हा होय. ते बाहेरचे सहानुभूती बाळगणारे लोक वर्तमानपत्रे वाचणारे क्वचितच असत. ते आमच्यासाठी म्हणून जरी वाचू लागले तरी त्यांनी कळवलेली बातमी तोंडी आणण्याची बुद्धिशक्ती बहुधा त्या बाहेर जाणाऱ्या अशिक्षित मित्रास नसे. बातमी लिहून देण्यास आणि आणण्यास धारिष्ट करणारा हजारात एखादा तसे कोणी केल्याचे उघडकीस येताच बाहेरच्या लोकांस इतका छळ साहजिकपणेच सोसावा लागे की, त्यास तसे करण्याचा आग्रह निदान मी तरी कधीही करीत नसे. परंतु अशा ठिकाणी परिस्थितीतही तसे धाडस करून राजबंदीवानांना महत्वाचा एखादा वर्तमानपत्री तुकडा धाडण्याचे आणि तो घेऊन आत येण्याचे साहस करणारे लोक त्या 'पाण्याच्या वसाहतीत' ही निघत असत. अशा साहसी लोकांस केव्हा केव्हा ते धरले गेल्याने कडक शिक्षा होत, नोकऱ्या जात, पण पुनः कोणी ना कोणी धजेच.

राजबंदीवानांच्या संगतीने आणि उपदेशाने आणि जसजशी देशभक्तीची बीजे साधारण जनतेच्या आणि बंदी जगताच्या अंतःकरणात रुजली गेली तसतशी ही साहसाची सेवा ते कर्तव्य म्हणून करू लागले. पण पहिल्या दोन-तीन वर्षांत मात्र वर्तमानपत्राचा बोटभर तुकडा कोणी बंदीवानाने आणावा म्हणून नाही नाही त्या प्रकारे त्यांची विनवणी करावी लागे. कित्येक वेळा त्यांस दुसरे काही आमिष दाखविण्याचे सामर्थ्य नसल्याने राजबंदीवानांनी आपली भाकर त्यास द्यावी आणि दिवसभर अर्धपोटी देखील राहावे की संध्याकाळी स्वदेशभूमीचा एखादा तरी निरोप ऐकावयास मिळावा.

कधी कारागाराचे भिंतीवरून फेकलेले तर कधी थाळीमध्ये बाहेरून घुसडून ठेवलेले, नाळीत आतून हात घालून काढून घेऊन अशा अनेक युक्त्यांनी तुकडेताकडे जमवून वाचावे. याविना आणखी एक मार्ग म्हणजे कोणा अधिकाऱ्याचे तोंडून चुकून वा सहानुभूतिपूर्वक एखादी बातमी निघून गेली तर तो. या मार्गाने केव्हा केव्हा स्वतः बारीसाहेबही बातमीदाराचे काम करीत असत! पण त्यांचे वरदान सदोदित शापगर्भच असे. हिंदुस्थानाला प्रतिकूल, राजबंदीवानांस आपल्या पक्षाच्या अशक्ततेची व आपल्या आशांच्या वैफल्याची जाणीव होऊन ज्यायोगे त्यांचा निरुत्साह होण्याचा संभव असेल अशा बातम्या बारीसाहेब स्वतः होऊन आणि तेही उपकार म्हणून आम्हांला सांगत असत आणि आम्ही त्यावर काय टीकाटिपणी करतो ते आपल्या दैनंदिनीत (डायरीत) टिपून ठेवीत. परंतु तरीही आम्ही त्या बातम्या सांगितल्याविषयी त्यांचे आभारच मानीत असू. कारण अनुकूल तीच बातमी ऐकणे ही प्रीतीची आवड नैसर्गिक असली तरी आपल्या प्रियकराची प्रतिकूल बातमीही ऐकणे हे वीरांचे कर्तव्यच आहे. अनुकूल बातमीने प्रीती संतुष्ट होते तर प्रतिकूल बातमीने भक्तीचे व धृतीचे बाहू फुरफुरू लागून त्या प्रतिकुलापासून प्रेमाची सुटका करण्यास्तव प्राणाचे होम करण्यास वीरता सज्ज होते. अशा प्रतिकूल बातम्या बारीसाहेब कशी देत आणि देववीत ह्यांची काही उदाहरणे पुढे येतीलच. एकच येथे स्पष्टीकरणार्थ म्हणून सांगणे पुरे आहे. देशभक्त नामदार गोखले जेव्हा वारले तेव्हा ती बातमी मी संध्याकाळी जेवत असता बारीसाहेबांनी कारागारात येऊन मला सांगितली. (Well, you always want news, Mr. Savarkar, here is something for you, Gokhale is dead!) सावरकर, तुम्हाला नेहमी बातमी हवी असते नाही? ही घ्या बातमी. गोखले वारले.

## गोखले वारले!

मला क्षणभर ते खरे वाटेना. इतकी अकल्पित ती बातमी होती. मी दुःखोद्‌गार काढलेले पाहून बारी म्हणाले, “पण ते तुमच्याविरुद्ध होते ना?” मी म्हटले “छे छे! मी त्यांच्याच महाविद्यालयात शिक्षण घेतले आहे. मतभेद असेल, विरोध नव्हे. ते आमच्या हिंदुस्थानातील ह्या पिढीतले एक निस्सीम देशभक्त आणि देशसेवक होऊन गेले.” पण बारी म्हणाले, “तुमच्या खटल्यात त्यांच्या विरुद्ध तुम्ही भयंकर कट केल्याचा पुरावा आलेला होता तो? आणि तुम्हास धरल्याविना हिंदुस्थानात शांतता प्रस्थापित होणार नाही असे ते म्हणाले होते ना?” मी उत्तरलो “त्याविषयी दंतकथांवर विश्वास ठेवण्यात अर्थ नाही. त्यांची माझी प्रत्यक्ष संभाषणे झाली आहेत आणि आम्हां दोघांविषयी परस्पर दोघांसही अत्यंत पूज्यबुद्धी वाटत असे हे त्या भाषणाचे वेळी उपस्थित असलेल्या गृहस्थांस माहीत आहे. त्यांस देशहिताचे दृष्टीने माझा मार्ग क्वचित मान्य नसेल. पण म्हणून त्यांच्या देशभक्तीची थोरवी

लेशमात्र उणी होत नाही आणि कटाविषयी विचाराल तर इंग्लंडमध्ये त्यांच्या एकदोन विरुद्ध भाषणांनी प्रक्षुब्ध होऊन जेव्हा अभिनव भारतातील काही पुढारी त्यांच्यावर आक्रमण करण्याच्या गोष्टी गुप्त बैठकीत बोलले तेव्हा त्या अमंगल विचाराचा तीव्र निषेध करून प्रामाणिक मतभिन्नतेसाठी कोणावरही आक्रमण करणे आणि तेही स्वजनांवर करणे हे घोर पातक आहे, हा खरा खरा अत्याचार होईल हे मी त्यांस समजावून दिले आणि तो ठराव संमत होऊ दिला नाही, ही गोष्ट ते स्वतःच सांगतील. जर प्रत्येक हिंदू गोखल्यांइतका जरी देशभक्त आणि देशसेवक होईल तरीही...!!" आमचे हे संभाषण बारीने यथाक्रम टिपून ठेवले होते. काही काळाने मला एकदा ते टिपण पाहावयास मिळाले. त्यात बारीसाहेबांनी साश्चर्य एक विधान केले होते - आणि हेच विधान ते इतरत्रही करीत की 'वर वर कितीही भिन्न आणि विरोधी दिसले तरी हे महाराष्ट्रीय अंतःकरणातून सर्व एक आहेत!'

ही गोष्ट सांगताना मला एका थोर देशभक्ताच्या असल्याच दुसऱ्या एका उक्तीची आठवण होत आहे. इंग्लंडमध्ये असताना लाला हरदयाळ सांगत की, ते पुण्यास टिळकांस भेटावयास गेले होते. नंतर त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून गोखल्यांस भेटावयास गेले. हिंदुस्थानात ते सर्वत्र निरनिराळ्या प्रतिस्पर्धी पुढा-यांस असेच भेटत आलेले होते. त्या समयी त्यांस एकमेकांविरुद्ध द्वेषपूर्ण निंदा त्या त्या प्रतिस्पर्ध्यांनी केलेली ऐकावी लागे. पण टिळकांनी आणि गोखल्यांनी हरदयाळासारख्या होतकरू आणि तेजस्वी तरुणास आपल्या देशसेवेच्या मार्गास अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न जरी केला तरी त्यांच्यापैकी कोणाच्याही तोंडून दुसऱ्याचे विरुद्ध अन्यायाचे वा द्वेषाचे एक अवाक्षरही निघाले नाही. उलट प्रत्येकाने दुसऱ्याविषयी अत्यंत आदर दाखविला. टिळकांनी म्हटले "गोखल्यांसही एकदा भेटा" आणि गोखल्यांनी म्हटले "आपण टिळकांकडे उतरला ते ठीकच केले. मला माहीत आहे की तरुण पिढी ही त्यांच्याच हाती जाणार आहे!" ही गोष्ट सांगून लाला हरदयाळ म्हणत, "परक्यांसमोर उभे राहताच आम्ही एकशेपाच आहोत ही भावना आम्हां इतर प्रांतीयांपेक्षा महाराष्ट्रात अधिक प्रमाणात वसत आहे आणि आपसातील वैयक्तिक वैमनस्ये राष्ट्रीय कार्यात विसरून जाण्याची कला महाराष्ट्रीय धुरीणांस इतरांहून अधिक साधलेली आहे, असा मला पुष्कळ वेळा अनुभव आला आहे."

वर दिलेल्या अनेक अडचणींस अशा अनेक उपायांनी दूर करीत पहिली दोन-तीन वर्षे राजबंदीवान मोठ्या प्रयासाने हिंदुस्थानाची बातमी आणविण्याची आणि अंदमानाची हिंदुस्थानास पोचविण्याची व्यवस्था करीत असावे. पुढे पुढे त्यांची तेथील स्थिती जशी सुधारत गेली आणि शक्ती वाढत गेली तशी हिंदुस्थानातील पत्रव्यवहार ठेवण्याची ही साधने अधिक परिणामकारक होऊ लागली आणि त्यांच्यात नव्या साधनांचीही भर पडली, तिची त्रोटक माहिती यथाक्रम पुढे येईलच.

या रीतीने थोडेच दिवसांत राजबंद्यांस नक्की माहिती मिळाली की, होतीलालांचे पत्र प्रकाशित केल्यामुळे बंगाली छापखाना जप्त झाला इत्यादी बातम्या बारीने केवळ आपल्या खिशातून काढलेल्या होत्या आणि राजबंद्यांना धाक दाखविण्यासाठी आपल्या हस्तकांचे हस्ते पसरविल्या होत्या. थोडेच दिवसांनी त्या प्रसिद्ध झालेल्या पत्राचा 'बंगाली' पत्रातील तुकडाही आम्हांस कारागारात पाहावयास मिळाला. मला तेलाच्या घाण्यास जुंपले गेले होते ही बातमी प्रथमतः याच वेळी हिंदुस्थानात प्रसिद्ध झाली. ती कोणी नंतर अमेरिकेत कळविली. तेथे अभिनव भारताच्या सभासदांनी ती बातमी मी कोलू ओढीत आहे असे काल्पनिक चित्र काढून आणि त्यावर छापून

त्या हस्तपत्रकाच्या शेकडो प्रती वाटल्या. त्याचा परिणाम तेथल्या हिंदी लोकांवर काय झाला हे पंजाबातील लाहोरच्या कटाची मंडळी अंदमानात जेव्हा आली तेव्हाच्या वृत्तान्तात दिसून येईलच.

# १९११ च्या राज्यारोहणसमारंभाची अंधारकोठडीत पडलेली सावली

मागे सांगितल्याप्रमाणे श्री. होतीलाल यांचे पत्र हिंदुस्थानमध्ये प्रसिद्ध झाल्याने अधिका-यांमध्ये जी खळबळ उडाली तिच्या आगेमागेच राजकीय बंदीवानांच्या आशा एकाएकी अगदी फलोन्मुख होणार म्हणून दाट वदंता उठली! वदंता उठली की, इंग्लंडात राज्याभिषेक झाल्यानंतर राजे जॉर्ज हे हिंदुस्थानात येणार आणि महिन्या दोन महिन्यांत (म्हणजे डिसेंबर १९११ मध्ये) हिंदुस्थानातही राज्याभिषेकसमारंभ केला जाणार आणि आश्चर्याची गोष्ट ही की, त्या संधीस त्या राज्यारोहणसमारंभाप्रीत्यर्थ सर्व राजकीय बंदीवान - मी देखील सुटणार!

## सुटण्याची आशा

दुष्काळामध्ये अत्यंत उपाशी लोकांचे थवे जेथे जेथे भिक्षा मागावयास जमविण्यात येतात तेथे भिक्षा आली म्हणताच त्यांच्या आत्म्याची जी तळमळ उडते आणि मला मिळण्याचे आधीच ती भिक्षा संपून तर जाणार नाहीना म्हणून जिवाची जी असह्य धडपड चालते तीच स्थिती 'ज्युबिली होअेंगी' या शब्दांसरशी सुटका होणार किंवा निदान सूट मिळणार या वदंतेने बंदीवानांच्या वसाहतीची होते. जिकडे तिकडे एकदम ती बातमी पसरून ज्याच्या त्याच्या तोंडावर उल्हास दिसू लागतो. आपला क्रमांक उत्सवाचे वेळी जी नावे जाणार त्यात असणे नसणे हे आपल्या बंदीवासातील वर्तनावर म्हणजेच आपण बंदीवरील अधिका-यांस किती प्रसन्न करू शकलो यावर अवलंबून आहे हे प्रत्येकास माहीत असल्याने जो तो बंदी अधिका-यांची शक्य ती हांजी हांजी करू लागतो. अत्यंत त्रासदायक कामेही बिनहरकत व बिनबोभाट होऊ लागतात. अधिकारी पण कामे वाढवून त्या संधीचा चोपून फायदा घेतात. कोणी बंदीवान कुटकुटला की आमिष पुढे तळपेच "भय्या थोडे दिन बाकी हैं, अभी ज्युबिली आती है, तुम्हारा नाम हम सरकारको उपर भेजनेवाला है!" आशादायी वातावरणात 'ज्युबिली उत्सव आता है' ही खरीखोटी वदंता उठण्याचा अवकाश की बंदीजनांचा तो महिना दीड महिना मोठ्या आनंदात जावयाचा हे ठरलेले. यावज्जन्म काळेपाण्याची शिक्षा झालेल्या आणि काही तरी असंभव घटना घडल्याविना घरी परत जाण्याची, आयुष्यात परत स्वतंत्रतेचे सुख भोगण्याची, काहीही आशा उरली नसलेल्या त्या अंदमानातील बंदीवानांस असंभवनीय घटनेचीच काय ती आशा धरता येणार.

## उत्सव आता है!

तशी कोणतीही असंभवनीय घटनेची वार्ता आली की त्यांची आशा साहजिकच त्या घटनेच्या असंभवनीयतेपेक्षा तिच्या अनुकूलतेकडेच अधिक आकर्षित होई आणि त्यांच्या विश्वासासही आपल्याबरोबर आकर्षून नेई. त्यामुळे बहुधा दरवर्षी निदान दर दोन-तीन वर्षांनी "उत्सव आता है!" सुटका किंवा सूट तरी मिळणार म्हणून हूल उठवायचीच आणि निराशेने आणि दुःखाने वेडावलेले बंदीवान तिच्यावर ती खोटी ठरेतो विश्वास ठेवून

काही दिवस तरी किंचित सुखात घालवायचे असा क्रम अव्याहत चालू असे. आश्चर्य हे की, त्या बातम्या वारंवार खोट्या ठरत असताही त्यांच्यावर त्या उठविल्या जाताच लोकांचा विश्वास पुनः पूर्ववत बसे आणि कोणी जरी त्या निराशेच्या समुद्रात बुडणाऱ्या लोकांस सांगितले की, ह्या उत्सवाची वदंताही, तू जीस लोंबकळू पाहतो आहेस ती केवळ कल्पनेची काडी आहे तर त्यास त्याची आशा अशा रीतीने भंग केल्याविषयी राग येई!

आत्यंतिक संकटात सुटका होणे हे असंभवनीय आहे असे स्वतःला वाटत असताही तीच निराशेची गोष्ट कोणी दुसऱ्याने सांगितली किंवा त्या संकटातून सुटका होण्याची एखादी वदंता स्वतःला अगदी अशक्य आहे, सुटकेची काही एक आशा नाही, असे वाटत असताही ती वदंता आणि ती आशा खोटी आहे असे दुसऱ्या कोणी म्हटले की, त्या दुसऱ्या तसे म्हणणाऱ्या गृहस्थावरच, आपल्या निराशेचा राग काढण्याचा आणि यावरच संतुष्ट होण्याचा हा मानव मनाचा स्वभाव आमच्या देखील काही वेळा अनुभवास आलेला आहे. जेव्हा हायकोर्टात एक जन्मठेप झाल्यानंतर दुसरा हत्येचा खटला आमच्यावर भरला गेला तेव्हा नव्याण्णव अंशी आम्हास आता ह्या खटल्यात फाशीची शिक्षा दिली जाणार असी आमची मनोदेवी आम्हास सांगत असे. आम्ही आमच्या मनाची सज्जता मरणास आलिंगिण्यास करीतही होतो. पण तरी एकदा एक सहानुभूती बाळगणारे अधिकारी डोंगरीच्या तुरुंगात आम्हास भेटून बोलत असता जेव्हा आम्हास म्हणाले, या वेळेस बहुधा फाशीची शिक्षा होणार तुम्हाला, तेव्हा मनास अकस्मात त्या गृहस्थांचा राग आल्यासारखे वाटले. विवेकाने तो राग कसा आवरावा लागला याची आम्हास अजून आठवण येत आहे.

याच पूर्वप्रसंगाच्या आठवणींनी कठोर आणि निराशाप्रवण बनलेल्या आमच्या मनावर या राज्यारोहणानिमित्त होणाऱ्या उत्सवात आमची संपूर्ण सुटका होईल, ह्या बातमीचा काहीच विशेष परिणाम झाला नाही. परंतु इतर राजबंदीवानांच्या उल्हासास पारावर राहिला नाही. जो तो आता आपण परत घरी कधी जाणार, गेल्यावर काय करणार, इतकेच नव्हे आगगाडीच्या कोणत्या फाट्याने कोठे जाणार; इतक्यापर्यंत बेत ठरवून टाकू लागला. त्यातही कित्येकांस यावज्जन्म काळेपाणी तर कित्येकांस १४-१०-७ वर्षे अशा भारी भारी शिक्षा होऊन आणि त्यांस त्या शिक्षा देण्यासाठी सरकारने लाखो रुपये खर्ची करून पुरी दीड-दोन वर्षेही झालेली नव्हती. इतक्या थोड्या अवधीत इतक्या पैशाच्या आणि त्रासाच्या कमाईवर पाणी सोडून त्यांच्यासारख्या भयंकर समजल्या जाणाऱ्या लोकांस कोणी पटकन बंदीगृहाची द्वारे उघडी टाकून वाटेल तिकडे जाऊ देईल हे मला शक्य दिसेना. तथापि, राजकीय इतिहासात अशा प्रकारच्या अशक्य गोष्टीही कधी कधी शक्य होतात, हेही मी आयर्लंड, इटाली, रशिया इत्यादी उदाहरणांवरून दाखवले. अगदी निराश जरी मनुष्याने कधीच होता कामा नये तथापि वेडी आशा धरण्यापेक्षा ती न धरणेच कर्मयोगाच्या मार्गात अधिक श्रेयस्करच नव्हे तर सुखकरही होते. एतदर्थ इतक्या लवकर सुटून जाल ही आशा धरू नका; आपणास येथेच हे कष्ट, निश्चित अवधी सांगणे आज अशक्य आहे अशा काळापर्यंत, काढावे लागणार हेच गृहीत धरून तदनुरूप मनाची सज्जता ठेवा, असे मी माझ्या राजकीय सहतपींना वारंवार सांगत राहिलो. परंतु काही केल्याने त्यांची उत्सुकता आणि आता आम्ही सुटणारच हा विश्वास कमी होईना. वर वर्णन केलेल्या मानवी स्वभावानुरूप त्यांतील कित्येक माझ्यावर माझ्या या दुर्मुखलेल्या भविष्यवादासाठी रागावतही. त्यांतही कित्येकांचा विश्वास अरविंदबाबूंच्या एका भविष्यवाणीवर अवलंबन करीत

होता. अरविंदबाबू सुटले तेव्हा त्यांच्याबरोबर ज्या लोकांस कठोर कारावासाच्या आणि द्वीपांतराच्या यावज्जन्मादिक शिक्षा झाल्या होत्या त्यांच्याकडे वळून ते अभियुक्ताच्या पिजऱ्यामधून बाहेर पडता पडता म्हणाले होते की, "तरुणांनो जा, तुम्ही आज सुटला नाही चिंता नाही. तीन वर्षांचे आत तुम्ही सर्वजण परत याल!"

## अरविंदबाबूंचे कृष्णदर्शन

अरविंदबाबूंस कारागृहात कृष्णदर्शन झालेले होते. त्यांची भविष्यवाणी खरी होणार असा त्या सर्व मंडळींचा दृढविश्वास. बरे, भविष्यवाणीप्रमाणे जर बंगाली 'बाँबगोळेवाले' सुटले तर मग आग्रा-पंजाबकडील नुसते लेखणीवाले सुटणार हे व्यवहारवाणीनेही सिद्धच होत होते. आणि इतकी सगळी सेनाची सेना सुटली असता तिघा महाराष्ट्रीय क्रांतिकारकांनाच तेवढे कोण कोंबून ठेवणार? एतावता सगळे राजबंदीवान सुटणार! हा सगळ्यांचा निर्धार झाला. प्रश्न काय तो एकच उरला की, अरविंदबाबूंच्या भविष्यवाणीतील ती तीनचार वर्षे मोजावी कोठून? अनेकांनी मीमांसकांच्या सूक्ष्म समन्वयपद्धतीचा वारंवार अवलंब करून अखेर अनुकूल तेच सत्य आहे असे ठरविले. त्या डिसेंबरातच ती भविष्यवाणी फलद्रूप होणार आणि तो राज्यारोहणाचा अलौकिक प्रसंगही आलेला; निश्चित आम्ही सगळे सुटणार! कोण ती उत्सुकता! सुटणार!! ज्यांच्या प्रियकर वदनांचे दर्शन जन्माचे अंतरले म्हणून हृदय कासावीस होई, त्यांची ती प्रियकर वदने काळाने त्यांच्यावर एकही नवीन सुरकुती पाडण्याचे आधी, जशीची तशीच, एका दोनतीन वर्षांचे अवधीत, आम्ही परत जाऊन पाहणार! एकमेकांस एकमेकांच्या घरी जाऊन आपल्या या अंदमानातील कठोर छळाच्या दुःखद कथा कौटुंबिक स्नेहाच्या सुखाच्या मांडीवर लोळत सांगणार! झाले. बंगाल्यांस महाराष्ट्रीयांनी आमंत्रणे दिली. पंजाब्यांनी महाराष्ट्रीयांस दिली. आमंत्रणे देखील देऊन टाकली.

मलाही आमंत्रणे अर्थातच मिळाली. त्या राजबंदीवानांतील माझ्या भागात जे ठेवलेले होते ते सर्व मजभोवती गोळा होत आणि अगदी निष्कपट आनंदाने उत्तरी आणि बंगाली उच्चारात 'तात्या!' म्हणून म्हणत आग्रह करीत "तात्या, आप जावोंगे, हमारे तात्या अब देशमें जरूर अवश्य जाअेंगे" म्हणून ते उदार हृदयी तरुण माझ्या सुटकेची निराशा घालविण्याचा मनापासून प्रयत्न करीत. खरोखरच त्या सर्वांस माझी पन्नास वर्षांची शिक्षा ऐकून आणि पाहून इतके वाईट वाटे की, त्या उत्सवाप्रीत्यर्थ होणाऱ्या त्यांच्या सुटकेहून माझ्या सुटकेचा त्यांस अधिक आनंद होत होता!

उत्सव जवळ आला. वदंतांना पारावर राहिला नाही. अंदमानच्या अधिका-यांनी जिकडे तिकडे चकचकाट करण्यास आरंभ केला. जो तो बंदीवान समजू लागला मी तर सुटणारच!

राज्यारोहणाचा दिवस उद्या उजाडणार. तेव्हा जिकडे तिकडे दाट वदंता की, राजकीय बंदीवान सोडण्याची आज्ञा आलीदेखील! सत्ताधिका-यांस देखील खरोखरच वाटे की हे खास सुटणार. मागून आम्हांस कळले की आत खरोखरच काही शिजत होते. राज्यारोहणसमारंभाच्या दिवसाच्या आधीची ही संध्याकाळ. आम्ही सर्व बंदीवान जेवून एका ओळीने बसलो होतो. माझे सहकष्टभोगी राजबंदीही माझ्याजवळच बसले; कारण त्या आनंदाच्या गडबडीत जमादारही चूर होता. तोही उद्या सुटणारच. कोणत्या गाडीने कलकत्त्याहून पुढे जावे हाच विचार काय तो ठरविणे उरलेले. इतक्यात X X X खान धापा टाकीत आला, आणि माझे हात बळाने आपले हातात दाबून

www.savarkarsmarak.com

म्हणाला, “बालिस्टरबाबू, आप छूट गये!” हा X X X खान म्हणजे दुष्टांतला तिसऱ्या प्रतीचा दुष्ट होता. बारीसाहेबांचा आज्ञेचा ओहळ ज्या तीन मोठमोठ्या गटारांतून अप्रतिहत वेगाने- नव्हे वर्धमान वेगाने वाहत कारागारात पोचे, त्यात X X X खानांचा मुख्य पठाणी जमादारांचा पहिला क्रमांक, X X X यांचा दुसरा आणि X X X खान यांचा तिसरा! बारीबाबांच्या क्रोधाच्या हातातील हे पठाणी त्रिशूळ राजबंदीवानांच्या हृदयात सदा भोसकलेले असावयाचे! त्यांतील हा एक शूळ X X X खान, पण तो आज इतका बोथट झाला! जेथे त्यांचा लाभालाभ नसेल तेथे दुष्ट, सुष्टही होतात. आज- उद्या सगळेच सुटणार मग आता माझा द्वेष करून X X X खानास काय मिळणार? क्वचित मी सुटल्यावर बालिस्टर म्हणून त्याच्या एकाद्या नव्या दरवड्याच्या प्रकरणात त्याच्यावरील खटल्यात उपयोगी देखील पडेन! नाही कोणी म्हणावे! नव्हे अशा उघड विनंत्या देखील नेहमी करण्यात येत. तेव्हा माझ्याशी आता स्नेहच लाभकारक असल्याने आणि हानिकारक तरी नसल्याने X X X खान माझे मनःपूर्वक अभिनंदन करू लागला आणि राजबंदीवानांस सांगू लागला!

## बडे बाबू छूट गये!

मी हसत विचारले, “पण तुम्हास कोणी सांगितले?” तो म्हणे, “अहो आता कोणी कशास सांगावयास पाहिजे? स्वतः बारीने आम्हां सर्वांस हुकूम दिला आहे की, उद्या बाहेरच्या सर्व भागांतील जमादारांस येथे बोलावले आहे म्हणून सांगा. कारण राजबंदीवान सुटताच त्यांस अमक्या बेटात नेणे आहे आणि तेथून बोट येताच तीवर चढविणे आहे!” पुनः मी म्हटले, “पण मीही सुटणार हे कशावरून?” तो म्हणाला, “मी बारीस विचारले तेव्हा तो हसला!” त्या एका साधारण बंदीपालाच्या एका धूर्त हसण्यावर आमच्या सुटकेच्या बातमीचा हा डोलारा उभारलेला. ‘तथापि बालिस्टरबाबू तुम्ही सुटलेत!’ हे शब्द ऐकताच माझ्या मनात आनंदाची लहर उसळावयाची राहिली नाही! उद्या सुटका झाल्यावर घरी जाऊन, बाळास जसा सोडला तसा एका वर्षाचे आत जाऊन हृदयाशी घट्ट घेता येणार! आणि सोडलेले सर्व प्रियजन एखाद्या दुष्ट स्वप्नातून जागे होताच पटकन घो घो भोवती गोळा होतात तसे हसत गोळा होणार! ही अत्यंत असंभवनीय रमणीय कल्पना मनात भरारून गेली. ती कल्पनाच आहे हे माहीत असताना देखील आनंद देऊ लागली! दुर्दैवाच्या दारुण दुःखाचे दिवस कंठीत असता खोटी आशा, ती खोटी आहे हे माहीत असताही, कित्येक वेळा त्या दुःखाची धार किंचित बोथट करण्यास उपयोगी पडते यात शंका नाही!

ही बातमी ऐकताच ते सगळे राजबंदी माझ्या गळा पडले आणि म्हणाले, “अभी तो विश्वास हुवा.” आता तर सुटणार ना? मी मानेने नाही म्हणून म्हणताच त्यांतील एका अत्यंत निर्व्याज सहानुभूती बाळगणाऱ्या उत्साही तरुण मित्राने माझ्या गळ्यांत जी बंदीवानांची लोखंडी हासळी, जीत क्रमांकाचा आणि शिक्षेचा लाकडी बिल्ला लटकावलेला असतो, ती धरली आणि म्हणाला, “तुटणार, उद्या हा बिल्ला तुमच्या गळ्यातून तुटणार!” मी म्हणालो, “तुम्ही कोणी सुटाल, मी नाही, तथापि आपणांपैकी एकजण जरी सर्वस्वी सुटला तरी तितका आनंदच होणार आहे. देशाचे तितके कल्याण अधिकच होणारे आहे.” माझ्या या अविश्वासीपणाने किंचित त्रासून त्या उत्साही मित्राने प्रेमळ रागाचे आवेशात माझी लोखंडी साखळी बिल्ला धरून अशी हासडली की तो लाकडी बिल्ला खरोखरच तुटून पडला! माझ्या मानेलाही थोडे खरचटले. परंतु हाही शुभ शकुनच मानून ते आणि ही बातमी इतर

भागांत कळताच इतर राजबंदीवान, आता मात्र बालिस्टरबाबू निश्चयाने उद्या सुटणार म्हणून अधिकच निश्चित झाले. "ह्या तुमच्या शुभ शकुनाचा एक मात्र निश्चित परिणाम होणार तो म्हणजे, आपला बिल्ला तोडून टाकल्याच्या आरोपावरून आम्हास कारागारीय शिक्षा मिळणार" म्हणून मीही एक भविष्य केले. आणि अरविंदबाबूंच्या भविष्यापेक्षा तेच भविष्य अधिक विश्वसनीय ठरले.

कारण अखेर जेव्हा तो अपेक्षित उद्या उजाडला तेव्हा सर्व राजबंदीवानांस इतर शेकडो बंदीवानांसह कारागृहाचे द्वारापाशी बोलावण्यात आले; पण मला आणि एका बंगाली युवकास बोलावण्यात आले नाही. सर्व बंदीवान कारागृहाच्या दाराशी ते उघडते केव्हा किंवा सुटका नसली तरी काही वर्षांची सूट तरी मिळून निदान किलकिले तरी किती होते ह्या अपेक्षेने चंचलित होऊन तिकडे पाहू लागले. पर्यवेक्षकसाहेब (सुपरिंटेंडंट) आले! नवीन कोरा गणवेष (युनिफॉर्म) घालून बारीसाहेबही आले. राजबंदीवानांस एका बाजूस नावे घेऊन बोलावण्यात येऊ लागले. माझ्या नावाचा पत्ता नाही! अखेर ज्यांस बोलावले त्यांत सुदैवाने माझे वडील बंधू होते. त्यांस सांगण्यात आले की, तुम्हास शिक्षेच्या वर्षामागे प्रत्येकी एक महिना सूट मिळाली आहे! या गणिताप्रमाणे मला पन्नास महिने शिक्षेची सूट तरी मिळावयास पाहिजे होती. पण मला सांगण्यात आले, तुम्हाला सुटका नाही; सूटही नाही!

इतर साध्या बंदीवानांसही वर्षामागे एक महिना सूटच मिळाली. आणखी त्या दिवशी उत्सवाप्रीत्यर्थ सर्व बंदीवानांस बटाटेभोजन देण्याची एक विशिष्ट कृपा करण्यात आली. त्या कृपेला मात्र मी सत्पात्र ठरलो. तशा रीतीने सुटका वा सूट न मिळता जॉर्जमहाराजांच्या राज्यारोहणसमारंभाप्रीत्यर्थ आम्हांला अखेर बटाटे-भात काय तो मिळाला, आणि बिल्ला तोडल्याविषयी शिक्षा! क्वचित त्यातही आम्ही आनंदच मानू म्हणूनच की काय संध्याकाळी बारीसाहेब आम्हास जेवत असता येऊन सांगते झाले की, माझ्यासारख्या उभ्या अंदमानात अधिक शिक्षा भोगीत असलेल्या बंदीवानास एक दिवसाची सूट देखील मिळाली नसल्याने त्यास व्यक्तिशः फार वाईट वाटत होते तरी "तुमच्यासारख्या भयंकर क्रांतिकारकास त्याच्या मनातील तेढ जोवर लेशमात्र कमी झाली नाही तोवर काही एक सूट न देणे हे सरकारचे कर्तव्यच होते. इतर क्रांतिकारक राजबंदीवान म्हणून क्वचित समजले जाऊ शकतील पण केवळ हत्यारी म्हणून (कॉमन मर्डरर म्हणून) सरकार तुम्हाला समजत असल्याने तुम्हास त्या राजबंदीवानांच्या सुटीवर अधिकारही सांगता येणार नाही!" मी म्हटले, "हे मला सांगण्यापूर्वीच ठाऊक होते. मी म्हणतच असे की, भयंकर क्रांतिकारक म्हणून हत्यारी इत्यादी अराजनैतिक (नॉनपोलिटिकल) बंदीवानाप्रमाणे मला सूट मिळणार नाही. आणि मी हत्यारी अराजनैतिक बंदीवान म्हणून राजनैतिक बंदीवानाप्रमाणेही सवलतीस पात्र नाही. हा बटाटे-भातही वास्तविक मला माझ्या मनातील तेढ सुटेतो मिळू नये, हाही आपण परत न्यावा."

कोणत्याही राजबंदीवानाची सुटका न होता आणि मला तर एक दिवसाचीही सूट न मिळता १९११ चा राज्यरोहणसमारंभ संपला. त्या दिवशी सकाळी कोठड्यांतून जेव्हा राजबंदीवान बाहेर आले होते तेव्हा त्यांपैकी अनेकांस संध्याकाळीच पुनः त्या कोठड्यांत आपण बंद होण्यास येणार नाही, आज संध्याकाळचे आत आपली उत्सवाप्रीत्यर्थ सुटका होऊन आपण आगबोटीची वाट पाहात बंदीशाळेचे बाहेर कोठे तरी असणार ही निश्चिती वाटली होती; परंतु संध्याकाळी पुनः त्या कोठडीचे तोंड पाहावे लागून त्यांना तिच्या जबड्यात पुरून घेण्यासाठी

पुनः त्यात शिरावे लागले. बंदीगृहात अत्यंत भयाण, उदास आणि सर्वांचे तोंडावर निराशेची काळीकभिन्न छाया पसरलेल्या ज्या काही वेळा मला अजून आठवतात त्यांत ती संध्याकाळची वेळ आणि ती रात्र एक होती!

मला सुटकेची निश्चिती वाटत नसताही परत खोलीत बंद होताना त्या इतरांच्या संसर्गजन्य निराशेच्या बाधेने माझ्याही मनास पछाडण्यास सोडले नाही. त्या दिवशी माझे भविष्य त्या अंधारकोठडीच्या त्या चार भिंतींत चिणलेले होते. त्याच्या बाहेर सर्व निराशा! काळोख!!

वैयक्तिक सुटकांचा प्रश्न मिटला. पण दुसरी उत्सुकता मनास लागली की, त्या समारंभाचे दिवशी निदान काही तरी नवे अधिकार स्वदेशास मिळाले असतील का? क्रांतीची जी झटपट जीव देत-घेत चार-पाच वर्षे चालली होती, तिचीही मी बातमी मिळविण्याचा प्रयत्न चालविला. बंदीगृहाबाहेर जे थोडे राजबंदीवान धाडण्यात आल्याचे मागे सांगितले आहे आणि जे त्या वसाहतीच्या निरनिराळ्या भागांत पूर्ण कामे करीत ठेवलेले होते त्यांस आजार वगैरे झाला तर बाहेरच्या रुग्णालयात ठेवण्यात येत नसे. कारण बाहेरच्या रुग्णालयात बंदीवान पुष्कळ स्वतंत्रतेने एकमेकांस भेटू शकत आणि खाण्यापिण्याचीही व्यवस्था बंदीगृहातील रुग्णालयापेक्षा साहजिकपणेच अधिक बरी असे. ती स्वतंत्रता राजबंदीवानास मिळाली तर रुग्णालयातील आतिथ्याचा ते वारंवार उपभोग घेऊ इच्छितील आणि एकमेकांच्या चापून भेटी घेत राहतील, या साहजिक भीतीने राजबंदीवानांत बाहेर कोणी आजारी झाला तर एकदम बंदीशाळेतील रुग्णालयात आणून कोठडीत बंद करण्यात येई. ह्या शिक्षेची भीती राजबंदीवानांस इतकी वाटे की, शक्यतो ते आजार लपवून कामे करीतच राहत नाही; तर बाहेरची सापेक्ष स्वतंत्रता सुटून आजारी पडण्याच्या अपराधासाठी बंदीशाळेतील कोठडीत बंद होऊन पडण्याचा पुनः प्रसंग येणार! अशा रीतीने जरी आजारीपणात अधिक सवलतीची आणि आरामाची आवश्यकता असता त्याच वेळी कोठडीबंदीची शिक्षा मात्र राजबंदीवानांच्या आजारीपणाच्या दुःखास अधिकच दुःखतर करीत असे. तरीही या अडचणीचाही एक लाभ घेण्यास त्यास सवड सापडे, आणि तो लाभ म्हणजे बाहेर मिळालेली बातमी आत बंदीशाळेत बंद असलेल्या सवंगड्यांस पोचविता येणे हा होय. आजारी पडून कोणी तरी जेव्हा बंदीशाळेतल्या रुग्णालयात बाहेरून धाडण्यात येई तेव्हा तो आपल्या अंथरुणपांघरुणासहच शक्य तितक्या बातम्याही मिळवून आत येई. बाहेर वर्तमानपत्रे अधिक सुलभपणे गुपचूप वाचण्यास मिळत असता बाहेर गेलेल्या राजबंद्यांपैकी ज्यास काही बातमी मिळे त्यास बहुतेक काही आजार लगेच होऊन तो बंदीशाळेतील रुग्णालयात बंद करण्यास धाडला जाई! राज्यारोहणाच्या निमित्त स्वदेशात काय झाले ह्याची बातमी काढण्याचे खटपटीत सारे राजबंदीवान असता बाहेरील एका राजबंदीवानास एकाएकी हा बातमीचा आजार झाला. आजारी बंदीवानांत तोही मिसळला. थोडीशी परीक्षा होऊन बाहेरच्या बंदीवानास बाहेरच्या प्रशस्त आणि सापेक्षतः आरामकारक रुग्णालयात धाडून अधिकाऱ्याने राजबंद्यास कडकपणे वागविण्याच्या नियमानुरूप “ले जाव उसको जेलमें कोठडीमें बंद करो!” म्हणून आज्ञा सोडली. राजबंदी त्या कडक हुकुमासच सवलत समजून बंदीशाळेतील रुग्णालयाचे कोठडीत येऊन कण्हत बंद होऊन पडला.

दुसरे दिवशी नेहमीप्रमाणे दहा वाजण्याचे संधीस मी स्नानास माझे भागाचे हौदावर आलो तो पलीकडल्या भागाच्या चाळीच्या मागच्या खिडकीतून कोणी तरी “सावरकरबाबू! सावरकरबाबू!” म्हणून दबून हाका मारीत

आहे. मी वर पाहतो तो त्या राजबंदीने माझी दृष्टादृष्ट होताच दोन मजल्यावरील चाळीतून खिडकीला लोंबकळत सांगितले की, बंगालची विभागणी रद्द झाली!

मी ऐकल्यावरही त्या बातमीवर एकदम विश्वास ठेवू शकलो नाही. पुनः विचारले, "काय? बंगालची विभागणी That settled fact is unsettled." तो हसला आणि म्हणाला, "होय होय." "मी म्हटले, राजबंदीवानांच्या सुटकेसारखे हे एखादे भविष्य-बिविष्य तर सांगत नाहीस ना?" माझा मित्र म्हणाला, "मुळीच नाही. पक्की बातमी." मी स्नान तसेच सोडून विभागाविभागांतून इतर राजबंदीवानांस बंगालची विभागणी रद्द झाली म्हणून ती बातमी धाडली. लवकरच दिल्लीस राजधानी गेली म्हणून कळले. परंतु त्या बातमीचे काही विशेष महत्व नव्हते. पण बंगालची फाळणी रद्द झाली ह्या बातमीमागे एक त्या विशिष्ट गोष्टीहून अत्यंत महत्वाचा असा धोरणाचा, राजनैतिक प्रयोगाचा प्रश्न असल्याने राजबंदीवानांस अत्यंत समाधान वाटले, आणि त्या दिवसी ते आपली वैयक्तिक निराशा विसरून गेले. स्वदेशाचा प्रश्न जर असा यशस्वी रीतीने सुटत असेल तर आमची सुटका झाली नही तरी चालेल! असे उद्‌गार त्या तरुणसंघातील प्रत्येकाचे तोंडून निघत होते. बंगालची फाळणी ती काय? ती रद्द झाली हे आनुषंगिक समाधान होते; परंतु खरे समाधान हे होते की, जे म्हटले ते करावयास लावले. जे म्हटले ते करावयास कसे लावावे याचा उपाय सापडला. अर्थातच त्यापुढे जे म्हणू ते करावयास लावू अशी धमक उत्पन्न झाली. काहीनी विचारले, "पण बंगालची फाळणी रद्द झाली या यःकश्चित खेळण्याने संतुष्ट होऊन पुनः...! मी म्हटले, "छेः ती भीती फारशी नको. एकदा मलेरियाचा ताप क्विनीनच्या गोळीने जातो हे ज्याच्या अनुभवास आले, तो पुनः ताप भासू लागला की आपण होऊन क्विनीनच घेईल!"

दिल्लीस राजधानी केल्याने मला काहीच वाईट वाटले नाही. कारण भावी हिंदुस्थानची राजधानी कोणती असावी, याविषयी राज्यक्रांतिकारकांत जेव्हा जेव्हा तात्त्विक चर्चा चाले तेव्हा तेव्हा हिंदुस्थानी राजधानी उज्जयिनी व्हावी असे मत मी प्रतिपादन करताना सांगतच असे की, जरी ऐतिहासिक, सांस्कृतिक, औद्‌योगिक, भौगोलिक आणि सामरिक दृष्टीने उज्जयिनी हीच भावी भारताची राजधानी व्हावयास योग्य आहे, तरी राजधानी कोणती व्हावी हा प्रश्न सोडून कोणती बहुधा होईल हा प्रश्न विचारला असता बहुधा हिंदुस्थानची राजधानी दिल्लीच होईल असे सांगणे भाग पडते. ह्या माझ्या तर्कानुरूप ती दिल्लीला गेली यात काही वाईट वाटले नाही. ती राजधानी उज्जयिनीला गेली असती तर मात्र आनंद झाला असता.

प्रकरण पंधरावे

# अंदमानातील बंदीवानांचे अन्न

हिंदुस्थानात ह्या उलाढाली चालल्या असता म्हणजे १९११ इसवीच्या शेवटी आणि १९१२ च्या आरंभी अंदमानच्या बंदीगृहात जवळजवळ एक वर्ष होत आलेले होते. त्या उभ्या वर्षात कठिणातले ते कठीण कष्ट सोसूनही आणि बंदीशाळेतले ते अन्न खाऊनही माझी प्रकृती एकंदरीत बरी राहिली. हे बंदीगृहातील अन्न कसे असे त्याची सर्वसामान्य कल्पना एक वर्षाच्या अनुभवावरून आता थोडीशी देण्यास हरकत नाही.

बंदीवानास जे जेवण देण्यात येई ते पुस्तकात केलेल्या नियमानुरूप पाहिले असता काही सरसहा अपुऱ्या प्रमाणाचे नसे. अंदमानामध्ये सर्व प्रांतांतील भिन्न भिन्न लोक येत असल्याने जेवण कटोराभर भात आणि दोन गव्हाच्या पोळ्या इतके असे आणि मिश्र पद्धतीचे असे ते ठीकच असे. परिमाणतः साधारण मनुष्यास पुरेसे असे. केवळ कोलूमध्ये काम करीत असताना किंवा चक्की पिसताना मात्र अनेक लोकांस अशा विवक्षित श्रमांत ते अधिक वाढविण्याची परवानगी देण्यात आली तर अन्न कमी मिळते असा प्रतिवाद करण्याचे कोणासही कारण उरणार नाही. बंदीवानांत प्रथम ते सर्व अन्न खाऊनही भूक न भागणारे काही लोक असत. पण बहुधा हीच स्थिती त्याच बंदीवानांचे उदाहरणात एकदोन वर्षांनी पालटून जाई. बंदीगृहाच्या भयाण छायेत दोनतीन वर्षे राहूनही ज्यांची भूक मेली नाही असे बंदीवान अगदी विरळा. तेव्हा एकंदरीत अन्नाचे ठरविलेले सरसहा परिमाण अंदमानात बरे आणि पुरेल इतके असे. परंतु त्या परिमाणाप्रमाणे अन्न मिळून बंदीवानांचे तोंडांत ते पडेपर्यंत मध्ये जी विघ्ने येत त्यांना मात्र सीमाच नव्हती. पंजाबी आणि पठाणी मुसलमान हे बहुधा गहू खातात. त्यांना भात नको असतो. ह्याच सद्गृहस्थांतून अंदमानमध्ये राजबंदीवान आल्यापासून नियमाने वॉर्डर आणि त्यातही महत्वाच्या कष्टदायक कामावरील वॉर्डर बहुधा नेमले जाऊ लागल्याने त्यांना लागणाऱ्या निवळ गव्हाच्या पोळ्यांचा पुरवठा इतर बिचाऱ्या बंदीवानांच्या पोळ्यांतून धाकदपटशाने वा लाचलुचपतीने ते करून घेत. बापड्या बंदीवानांनी भातच भात खावा आणि वॉर्डरमहाराजांच्या कटोऱ्यात गुप्तपणे आपल्या पोळ्या टाकाव्यात, नाही तर धमकी मिळालीच - “बतलाऐंगे तेरेको!” मग त्यांस कामातच कष्ट दे, त्याचेवर खोटे खटलेच भर इत्यादी प्रकारे त्या बंदीवानांस ते वॉर्डर छळू लागत. हे छळणारे शेकडा ९९ पठाण, पंजाबी आणि सिंधी मुसलमान असत आणि ते एकमेव स्वतःच्या अन्यायाची दाद वरपर्यंत न जाऊ देण्याची दक्षता घेत. तिकडच्या नीचातल्या नीच मुसलमानांतही हिंदूंचा द्वेष एका धार्मिक कर्तव्याची भावना पावलेला असतो! त्यामुळे जे असे छळले जात त्यात शेकडा ९९ हिंदू बंदीवानच असत.

या वॉर्डरांस तुरुंगातच खावे लागे म्हणून ते ज्याची पोळी घेत त्यास भात तरी केव्हा केव्हा परत देत. परंतु पेटी ऑफिसर आणि जमादार म्हणून बाहेर सोडलेल्या बंद्यांतील जे आत अधिकारी म्हणून आणलेले असत, त्यांना तुरुंगात जेवण्याची आज्ञा नसे. परंतु इच्छा असे. कारण तुरुंगात जेवून टाकल्याने बाहेर स्वयंपाकाची दगदग आणि पैसा वाचे. ह्या अधिकारीवर्गाची भूक शमविण्यासाठी परत भात न घेताच बंदीवानांस त्यांना आपल्या पोळ्या देऊन टाकाव्या लागत! नाही तर त्या दिवशी कोठे तरी पेचात फसून दोन दंडे पाठीत बसायचेच. मिर्झाखान नावाचा जो

पठाण तेथे मुख्य जमादार झालेला आणि "छोटा बारी" म्हणून गाजलेला असे तो तर इतका चढेल झालेला होता की, अनेक वेळा त्याच्यासाठी दहा-बारा पोळ्या गोळा करावयास तो कोण्या पठाण वॉर्डरास डोळ्यांनी खुणवी आणि आपण अन्न वाढीत जाणाऱ्याबरोबर हळूहळू पुढे चाले. पण डोळा त्या पोळ्या गोळा करणारावर असे. त्या वॉर्डराने मागितल्याप्रमाणे एखाद्या हिंदू बंद्याने पोळ्या दिल्या नाहीत, की लागलीच मिर्झाखान परत फिरून ज्या दिसेल त्या निमित्ताने निदान पंक्तीत तिरपा बसतोस, उद्दामपणाने मजकडे पाहतोस म्हणून ओरडून त्यास त्याच्या हातातील सोट्याचे दोन रपाटे पाठीत तेथल्या तेथे हाणी!

अंदमानात बंदीवानास आठवड्यात एकदा वा दोनदा नरोटीभर दही मिळे. त्या दिवशी तर मोठेमोठे पाण्याचे लोटे भरून भरून, बंदीवानांना वेळेवर मारहाण करूनही त्यांच्यापासून दही घेऊन हे पठाण वॉर्डर आणि पेटी ऑफिसर पीत! एकदा एका हिंदू बंदीवानाने ते नरोटीभर दही एका बलुची ऑफिसरास न देता नियमाप्रमाणे पानात पडताच ते भातात मिसळले. ती गोष्ट त्या पेटी ऑफिसरास कळताच त्याने हिंदूंच्या पंक्तीत शिरून त्या हिंदू बंदीवानाचे शेजारी एक फुटकी नरोटी पडली होती ती दाखवून म्हटले, "ए हरामी, ए नरोटी क्यों लिया!" कारण तुरुंगात फुटकी नरोटी जवळ ठेवणेही अपराध आहे! तू नरोटी का ठेवलीस असे म्हणत त्या बलुची मुसलमानाने त्या हिंदू बंद्याची शेंडी धरली आणि त्याच्या पाठीवर लाथा मारीत व हिसडीत जोवर ती शेंडी अर्धी उपटून हाती आली नाही तो "काफर! चोटीवाला काफर!" म्हणून शिव्या देत त्यास मारीत राहिला. बंदीवानाची ओरड ऐकून तो "मोठा जमादार" म्हणजे मिर्झाखान आला. आणि आपल्याच गटातील एका पेटी ऑफिसरला पाहून उलट त्या बंदीवानासच नरोटी बाळगली म्हणून खटला करण्यास नेला. मी हा प्रकार पाहत होतो. मी जाता जाता त्यास खुणेने कळविले की माझी साक्ष दे. त्याप्रमाणे त्याने माझे साक्षीदार म्हणून नाव सांगितल्याने मला बोलावणे झाले. मी जाताच बलुची पेटी ऑफिसर दही मागत होता ते या हिंदू बंदिवानाने दिले नाही म्हणून त्यास ह्याने असे क्रूरपणे मारले म्हणून सांगितले. तेव्हा माझेवरच ओरडून "छोटा बारी" म्हणाला 'हुजुर ए बडा बाबू हरबखत हम मुसलमानोंके ऊपर झूटी ग्वाही देता है!' मी बंदीपालास सांगितले, "ठीक आहे. मी खोटी साक्ष देत आहे ना? तर मग आणखी एक खोटी गोष्ट सांगतो की, आता या वेळेस त्या पत्र्याच्या छपरीत या बलुची पेटी ऑफिसराने चोरून भरून ठेवलेला दह्याचा लोटा आहे! आता चला आणि मी तो दाखवितो." बंदीपालास मजबरोबर येणे भागच पडले. तो मिर्झाखान जमादाराच्या हस्तकांस नेहमीच वाचवू इच्छित असे; पण मी मध्ये पडलेला म्हणून स्वारी उठली! त्या छपरीत नरोटीच्या ढिगाआड भरून ठेवलेला त्या बलुची पेटी ऑफिसराचा लोटा सापडला. साक्ष माझीच. सुपरिन्टेंडंट पुढे मी त्या हिंदू बंदीवानाच्या केलेल्या अकारण आणि क्रूर छळाची आणि काफर! काफर! म्हणून शेंडी उपटण्याची माहिती सांगितली आणि जे मी सांगितले तेच अंगावरच्या वळांनी आणि दह्याच्या लोट्याने पण सांगितले.

पर्यवेक्षक (सुपरिन्टेंडंट) रागाने लाल झाला आणि इतर पेटी ऑफिसरांसही धाक बसावा म्हणून त्या बलुची पेटी ऑफिसरास तोडून टाकून म्हणजे त्याचा पट्टा हिसकावून घेऊन त्यास पुनः कामकरी बंदीवानांत धाडून सक्त कष्टाचे काम करावयास लावले. अशा रीतीने काफराच्या उपटलेल्या शेंडीने मियासाहेबांची दाढीही पण उखडून टाकली!

अशा प्रकारे ‘छोट्या बारी’च्या म्हणजे जमादार मिर्झाखान याच्याविरुद्ध त्याच्या अन्यायापासून हिंदू बंदीवानांचा बचाव करण्याच्या प्रयत्नाविषयी आम्हासही तो कितीदा पेचात धरी आणि त्याविषयी आम्हास किती छळ सोसावा लागे याचे दिग्दर्शन पुढे थोडेबहुत येईलच. त्याच्याविरुद्ध साध्या बंद्यांत कागाळी करण्याची कोणाची छातीच नसे. राजकीय बंदीवानच जे काय साहस करतील ते. त्यांतही दहा-पाचच माणसे इतर हिंदूंविषयी कड घेऊन मिर्झाखानविरुद्ध खटले भरण्यास धजत. ह्यांतील काही ठळक उदाहरणे पुढे सांगू. पण येथे ही एकच गोष्ट एवढ्यासाठी दिलेली आहे की, बंदीवानास जे अन्न मिळावे म्हणून नियम होते ते फारसे आक्षेपाचे नसूनही ते अन्न बंदीवानाच्या तोंडात पडेतो त्यात ज्या चोऱ्या होत त्यामुळे शेवटी जे अन्न बंदीवानांच्या प्रत्यक्ष ताटांत पडे ते परिमाणाचे मानानेही बहुधा कमी असे.

आता परिमाणाची गोष्ट सोडून दिली तर तेथील जेवणात दुसरी न्यूनता म्हणजे रुचीचीच नव्हे तर आरोग्यप्रदत्वाची होती. एक वेळ कमी भात द्या, पोळी पोटभर मिळाली नाही तरी चालेल, पण तो भात कच्चा देऊ नका, ती पोळी अर्धी भाजलेली, अर्धी जळलेली आणि केव्हा केव्हा कणकेचा ओला गोळा असलेली देऊ नका अशी प्रार्थना आम्हांस स्वतः अनेक वेळा करावी लागे. स्वयंपाक सातशे-आठशे माणसांचा. स्वयंपाकी कोण गलिच्छ आणि सरकारी नियमाप्रमाणे काळजी न घेतल्याने केव्हा केव्हा तर भयंकर सांसर्गिक गुप्त रोगाने पछाडलेले! त्यांचे ते घामट कपडे, भर उन्हात वाढताना तो डोक्याचा घाम त्यांच्या अंगावरून टपटप त्या वरणाच्या आणि आमटीच्या मोठमोठ्या डेग्यांत, पातेल्यांत आमच्या डोळ्यांसमोर गळतो आहे, आणि तीच आमटी आम्हांस भुरकून मिटक्या मारीत खाणे भाग पडलेले! त्या स्वयंपाक्यांचा तरी काय दोष, त्या वाढप्यांचा तरी काय दोष? भर उन्हात शेकडो बंदीवानांचा स्वयंपाक करून त्यांस वाढताना त्या चार-पाच स्वयंपाक्यांना जीव नकोसा होई. केवळ गुपचुप स्वयंपाकघरात काही एखाद-दुसरी भाजी चोरून खाता येई म्हणून ते ती कामे करीत आणि ज्यांना तरीही ती असह्य वाटत त्यांनी नको म्हणून ऐकतो कोण? अशा स्थितीत रुचकर जेवण हा शब्दच बंदीगृहात आम्ही विसरून गेलो होतो. त्यातही बंदीगृहात अपराध्यांस जे कोंडावयाचे ते त्यांना राजासारखे पंचपक्वान्ने झोडावयास कोंडावयाचे नसून संसारातील सुखासच आपण आपल्या स्वार्थांध सुखलालसेपायी केलेल्या सामाजिक अपराधासाठी आचवतो ही जाणीव अपराध्यांत उत्पन्न व्हावी इतके त्यांचे आयुष्य बंदीगृहात नीरस केले जावे यासाठी हे तत्व आम्हांस मान्यच होते. म्हणून जेवण रुचकर नाही ही न्यूनता बंदीगृहात जाणवे ते एक प्रकारे ठीकही होते. आणि सुक्याबरोबर ओले जळावे त्यानुसार साध्या अपराध्याप्रमाणे राजकीय बंदीवानांसही त्यांचा स्वतंत्र वर्ग न केल्याने, रुचकर अन्न न मिळण्याची पाळी यावी हेही अपरिहार्य असल्याने ते गाऱ्हाणे ते करीतही नसत. परंतु रुचकर नसले तरी नीट शिजविलेले आणि आरोग्यप्रद अन्न मिळावे इतकीच त्यांची मागणी असे आणि अंदमानाचे अन्न बहुधा अत्यंत दुर्लक्षितपणे, घामटपणे, निष्काळजीपणे शिजवलेले आणि आरोग्यास हानिकारक असे हे राजकीय बंदीवानांचे, सर्व बंदीवानांचे वतीने, मुख्य गाऱ्हाणे असे. त्यांना ही गाऱ्हाणी करण्यासाठी ‘खोटी गाऱ्हाणी’ करता म्हणून कितीकदा शिक्षा झाल्या असतील! परंतु वर्षानुवर्षे ते अर्धेकच्चे, घामट आणि घातक अन्न खातही राजकीय बंदीवान त्या अन्नाविरुद्ध प्रतिवाद करण्यास जिवंत राहिल्याने शेवटी शेवटी अन्न बरेच सुधारले होते. इतर बंदीवानांस राजबंद्यांच्या आड दडून जे अनेक लाभ होत त्यांतील हा लाभ अत्यंत

महत्वाचा होता. वाईट अन्न किती वाईट असे त्याची कल्पना येण्यासाठी काही दोन-चार ठळक उदाहरणे सांगू. केव्हा केव्हा कांजीत घासलेट पडलेले असे. कांजी पहाटे करावी लागे. थोरली डेग म्हणजे एक अजस्र तपेले चुलीवर चढे आणि त्यात कांजी शिजे. ती नीट झाली की नाही ते पहाटे अंधारात नीट दिसावे म्हणून घासलेटच्या पत्री चिमण्या हातात घेऊन कोणी अर्धाच जागा झालेला स्वयंपाकी त्या डेगेत डोकावी. त्या वेळी त्या भिकार हातचिमण्या गळत असल्याने किंवा पाहता पाहता तेल गळू लागेतो त्या वाकड्या केल्याने सगळ्या कांजीत घासलेट सांडे. पण आठशे माणसांची कांजी फेकता थोडीच येते. ही बातमी वर जाणे देखील त्या स्वयंपाक्यांस आणि मिर्झाखानास घातक म्हणून असे जेव्हा जेव्हा घडे तेव्हा तेव्हा ते ती कांजी तशीच बंदीवानांस वाढीत! आम्ही जाण्यापूर्वी अशी घासलेट पडलेली कांजी दर महिन्या दोन महिन्यांतून एकदा मिळे. परंतु राजकीय बंदीवान गेल्यानंतर जसजसा तिचा गाजावाजा होऊ लागला तशी तशी ती तुरळकपणे येऊ लागली. एकदा आम्ही अशी कांजी पिणार नाही म्हणून म्हटले असता बारीपर्यंत ते गाऱ्हाणे जाऊन तो आत आला. आमच्या शेजारच्या बंदीवानास ओरडून त्याने विचारले "क्या कांजीमें सचमुचही मटीका तेल (घासलेट) पडा है?" त्या बंदीवानास बारीने कोणतीही गोष्ट ओरडून विचारली म्हणजे उत्तर कसे द्यावे लागते माहीत होते. त्यांनी साफ सांगितले की, नहीं साहब! बडा बाबू झूट बोलता है!

तेव्हा बारी रागाने फणफणत मला म्हणाला, सगळ्यांना कांजीस घासलेटचा वास येत नाही, आणि तुला येतो काय? थांब खोटी कागाळी केल्याचा खटला भरतो तुझ्यावर! असे ओरडत ओरडत तो निघून गेला. आणि ती घासलेट पडलेली कांजीच सर्व कैद्यांना खावी लागली. कारण एक तर दुसरी भुकेच्या तोंडी मिळणार नाही म्हणून काम तसे उपाशीच करावे लागणार आणि दुसरे त्याहून महत्वाचे कारण की तुरुंगात वाढले तितके खाल्लेच पाहिजे फेकता कामा नये, असा सर्वसाधारण नियम. कोणास कमी होवो अधिक मिळणार नाही; जास्त होवो फेकता येणार नाही. ठराविक ते सरसहा खाल्लेच पाहिजे. अशक्त माणसास आणि सशक्त माणसास जे एक सरासरी माप ठरले असेल त्याप्रमाणे अन्न खाऊन सरासरीने जगलेच पाहिजे. गोष्ट अशी असते की, अशा नियमाची बजावणी नेहमीच सक्तीने होते असे नाही. परंतु ती बजावणी पूर्वी जेव्हा सक्तीने वरचेवर करण्यात येई किंवा आजकाल करण्यात येते तेव्हा तिचा बंदीवानाचे प्रकृतीवर वाइट परिणाम घडल्यावाचून राहत नाही. आपणास प्रामाणिकपणे नको असेलेले अन्न उष्ट्याच्या कुंडीत फेकले असता ते तेथून बळाने त्याच्याकडून उचलवून कोण्या अधिकाऱ्याने त्या बंदीवानाकडून खावविल्याची उदाहरणेही घडत असत! त्या दिवशी ती घासलेटची कांजीही बळाने सगळ्यांस खावी लागली ती याच नियमाचे जोरावर. जर कोणा दहापाच बंद्यांनी ती फेकून दिली असती तर कांजीत खरोखर घासलेट पडले होते असे आम्हांस सिद्ध करता आले असते. आम्ही मात्र ती तशीच फेकून दिली. पण "भीक नको पण कुत्रा आवर" असे समजून खटला भरण्याची धमकी लवकरच विसरून गेल्यासारखे दाखवून बारीही चूप बसला.

राजकीय बंदीवान अशा कागाळ्या वारंवार सुपरिन्टेंडंटपर्यंतही नेत आणि जरी वरील उदाहरणाप्रमाणे त्यांचा बहुधा पाणउतारा करून तिकडे अधिकारी लक्ष देत नसत तरीही खालच्या अधिकाऱ्याची एखादे वेळेस सुपरिन्टेंडंट लहरीत असला की गुपचूप चांगलीच कानउघाडणी करी. अन्नाविषयी अशा कागाळ्या केल्याने बारीला भारी त्रास

पडे. तो आपल्या राजबंदीवानातील हस्तकांकडून अशी तत्वे उपदेशवू लागे की अन्नासाठी पोटभरू लोकच काय ते भांडत बसतात.

त्यास राजबंदीवानांतील झुंजार स्वभावाचे लोक उत्तरे देत की, आम्ही स्वतः त्याहून वाईट अन्न खाऊन राहू. फार काय, अन्नाविणे आठ आठ दिवस उपास करू, पण हजारो जणांस जिवंत राहण्यास अवश्य इतके सुग्रास अन्न मिळावे म्हणून आम्ही झटत आहो. पोट भरावयाचे असते तर घरी काही आम्ही कोण आयर्लंडच्या रस्त्यावरून एक शिलिंग रोजमुऱ्यावर राबत नव्हतो. ह्या प्रकारानंतर सर्व राजबंदीवान त्या मिस्टरास धिक्कारू लागले आणि इतर बंदीवान म्हणू लागले की, तुम्ही स्वतःच पहिल्याने घासलेट आहे म्हणून म्हणत होता, तेव्हा त्या मिस्टरांनी शांतपणे उत्तर केले की, अन्नाविषयी प्रतिकार करणे, पोटभरूपणाचे हलकट कृत्य आहे. परंतु हेच मिस्टर लोक जेव्हा खोबऱ्याचा तुकडा चोरण्यासाठी अर्धा अर्धा तास टपून बसत तेव्हा मात्र तो पोटभरूपणा स्वतःचे पोट भरणारा असल्याने भारी आणि सभ्य कृत्य होई.

## राजबंदीवानांतील पोटभरू

राजबंदीवानांतील जे कोणी बारीसाहेबाचे पोपट होऊन अन्नासाठी पोटभरू लोकच काय ते भांडतात असे इतरांस शिकवून त्यांस बंदीगृहातील अन्न सुधारण्याच्या कामी प्रतिवाद आणि प्रयत्न करू नका म्हणून म्हणत ते स्वतःच्यासाठी बारीसाहेबांच्या टेबलावरील फळे किंवा तुरुंगात कोणी गुपचुप चटणी चोरून आणली, किंवा कांदा लपवून ठेवला तर तो साभार स्वीकारून चोरून चघळीत बसण्यात पोटभरूपणा मानीत नसत.

परंतु अशा तुसड आणि भ्याड उपदेशकांना भीक घालण्याइतके काही राजबंदीवानांतले सर्वच लोक खुळे- लोक नसत. ते वारंवार कच्च्या पोळ्या, कमी भात, घासलेट सांडलेली भाजी इत्यादी वस्तू पकडून त्याचा गाजा-वाजा आणि प्रतिवाद करीतच राहत. त्यायोगे शेकडो बंदीवानांस राजकीय बंदीवानांचे आगमन म्हणजे एक इष्टापत्तीच झाल्यासारखे वाटत असे. जरी त्यांच्यात बारीसाहेबांविरुद्ध साक्ष देण्याची धमक नसे तरी आतून ते राजबंदीवानांस कृतज्ञ भावाने अनेक प्रकारे साह्य देत; किंबहुना त्यांचे मनःपूर्वक साह्य आणि सादर प्रेम यांचा आधार नसता तर राजकीय बंदीवानांच्या छळास पारावारच उरता ना. उघड साक्ष देण्याची त्यांची धमक नसे असे नाही तर राजबंदीवानांतही बारीविरुद्ध साक्ष देण्याचे धाडस सर्वच करीत नसत.

एकदा एका राजबंदीवानाने घासलेट सांडलेली कांजी पकडली. तो ती खाण्याचे नाकारून बसताच इतरही दोन-चार राजबंदीवान जे त्या भागात होते ते कांजी खाईनासे झाले. ते पाहताच साधे बंदीही त्यांस थोडेसे मिळाले. होता होता बारी आला आणि दरडावून त्या उत्तर-हिंदुस्थानीय राजकीय बंद्यास म्हणाला, 'तू खोटे बोलून बंदीवानांची टोळी बिथरवितो आहेस. पाहा तुमच्यातलेच सूज्ञ आणि समंजस गृहस्थ कसे कांजीविरुद्ध चकार शब्द बोलत नाहीत' असे ओरडत तो त्याच्या एका राजकीय बंदीवानांतील 'माणसाळविलेल्या' गृहस्थास म्हणाला, "वेल मिस्टर, कांजीत घासलेट आहे हे खोटे आहे ना?" तेव्हा 'मिस्टर' म्हणाले, "मला काही वास येत नाही!" झाले. ते समंजस ठरले आणि इतर सर्व बंदीवान खोटे ठरले. बारीच्या नाकाला तर घासलेटचा वास कांजीत ते भरडबा पडले असते तरी येताचना!

## भाजीत गोम व साप

अंदमानमध्ये एक भयंकर जातीची गोम आहे हे आम्ही मागे सांगितलेच आहे. त्या गोमीची लांबी दीड फूट असून विष जाज्वल्य असते. सकाळी बंदीवानांची एक टोळी बंदीगृहाकरिता भाजी आणण्यासाठी धाडण्यात येई. रानात आणि मार्गाने ओसाड जागेत त्या देशात अळू यथेच्छ उगवते. त्यातच काही पालेभाज्याही उगवतात. ती टोळी हातात मोठमोठे विळे घेऊन ही बेटेची बेटे सरसहा कापीत जाई व त्या कापलेल्या पाल्याचे ढीगचे ढीग रचून मग ते गाडीत भरून बंदीगृहात धाडण्यात येत. तेच मोठमोठ्या जुड्या करून दोन-चार विळीवर घाव मारून त्या भाजीच्या प्रचंड डेगेत टाकण्यात येत आणि उबाळले जात. बंदीवानांची भाजी शिजविण्याचा बहुधा हा प्रकार असे. अशा चालढकलीत इतका निष्काळजीपणा केला जाई की, केव्हा केव्हा ह्या भाजीच्या पाल्याच्या ढिगात मोठाल्या गोमी आणि सर्पही त्या डेगेत शिजले जात! अर्धी-कच्ची ती भाजी जेव्हा वाढण्यात येई तेव्हा तेही सपासप वाढले जात. खाताना भाजीतले पान म्हणून उचलावे तो गोम हाती येई! परंतु अंदमानातील ही गोमीची आणि सापाची भाजी हा जरी एक आश्चर्यकारक मेवा होताच तरी त्याहूनही आश्चर्यकारक मेवा म्हटला म्हणजे त्या प्रकारच्या भाजीत बारीसाहेबाच्या शब्दाचा आणि समर्थनाचा जो मसाला पडे तो! आम्ही एकट्यानेच नव्हे तर आणखीही बऱ्याच राजबंद्यांनी स्वतः ह्या गोमी भाजीतून काढून दाखविल्या आहेत. परंतु त्या निर्ढावलेल्या अधिकाऱ्याने हसून उत्तरे द्यावी ‘ओ! इट टेस्ट्स् व्हेरी वेल.’ सुपरिन्टेंडंटपर्यंत कागाळ्या केल्या तरी तेही होस हो करून निघून जात! निरुपायाने गोम किंवा सापाचा तुकडा फेकून देऊन बंदीवानांनी ती भाजी तशीच खावी. नाहीतर खावे कशाशी? आणि खाल्ले नाही तरी कामात थोडीच सूट मिळणार! ते काबाडकष्टी काम करावे कशाचे बळावर? हा पेच बारीस माहीत असे आणि म्हणून तो किंवा कोणीही अधिकारी तिकडे फारसे लक्ष देत नसत. केव्हा केव्हा माझ्या आणि माझ्या इतर राजबंद्यांच्या प्रतिवादाचा परिणाम होऊन बारीस थोडाफार ठपका मिळत असे. अशा वेळेपैकीच एका वेळेस ह्या गोमीच्या प्रकारावरूनच बारी मला शांतविण्यासाठी गोंजारीत म्हणाले होते, (Oh Mr. Savarkar, don’t you think much of these scoundrels) “अहो सावरकर! ह्या बदमाष लोकांचा विचार सोडून द्या. तुमची समाजातील उच्च प्रतीची स्थिती मला माहीत आहे. हे पहा मी तुम्हा एकट्याला पाहिजे तर भाजी करवून देतो पण ह्या सर्व बंदीवानांसमक्ष तुम्ही अन्नाबिन्नातील न्यूने उघडकीस आणू नका. ती गुरे आहेत! पाहता पाहता ते माझ्या डोक्यावर चढतील. आजवर अशा शेकडो गोमी ह्या लोकांनी गुपचूप फेकून देऊन भाजी खाल्लेली आहे. पण त्यांतला कोणी मेलेला नाही!”

एकूण अशी विषारी भाजी खाऊन बंदीवान मेले, की मग ती सुधारण्याची योग्य वेळ येईल अशी बारीसाहेबांची समजूत होती!

दरडावण्याने किंवा गोंजारण्याने अन्नाविषयी किंवा इतर गोष्टींविषयी बारीसाहेबांच्या आणि एकंदर व्यवस्थेच्या विरुद्ध आम्ही केलेल्या प्रतिवादाची तोंडे बंद न झाली तर ती बंद करण्याचा आणखी एक उपाय बारीसाहेब आणि मिर्झाखान यांच्यापाशी असे. तो म्हणजे अशा गोष्टीचे, उदाहरणार्थ, प्रस्तुत प्रकरणी अन्न वाईट रीतीने शिजविल्याचे किंवा कमी दिल्याचे उत्तरदायित्व कोणा तरी हिंदू पेटी ऑफिसराचे डोक्यावर बळाने लादणे

हा होय. कांजीत घासलेट पडले किंवा भाजीत तेलच घातले न जाता सगळे तेल चोरीस गेले तर त्याचा आम्ही गाजावाजा करताच मिर्झाखानाने बारीपुढे त्या दोषाचा उत्तरदायी (जबाबदार) म्हणून कोणी तरी हिंदू पेटी ऑफिसर आणून उभा करावा. बारीने ते जाणूनबुजून खरे मानून आम्हांस सांगावे की, पाहा कांजी बिघडविली म्हणून ह्या हिंदू पेटी, ऑफिसरावर आता खटला भरावा लागेल. अशा वेळी एका निरपराधी हिंदू बंदीवानास शिक्षा करवून त्याच्या अधिकारावर कोण्यातरी पीडक मुसलमानाची नेमणूक तरी करवावी किंवा 'खटला भरू नका, आम्ही आपले गाऱ्हाणे परत घेतो' असे म्हणून चूप तरी बसावे असा पेच आम्हांस पडे आणि स्वतः आम्ही तरी अशा प्रसंगी बहुधा चूप बसत असू. पण एका हिंदूस विनाकारण अधिकारावरून काढण्यास कारणीभूत होत नसू.

तथापि, या सर्व उपायांनीही जेव्हा काही केल्या राजकीय बंदीवानांच्या बंदीगृहातील अन्न सुधारण्याचा उद्योग होईना तेव्हा शेवटी आमचे अन्न विशेषतः भाजी आणि पोळ्या सगळ्यांपेक्षा नीट शिजवून भाजून आणल्या जात. पर्यवेक्षक मधून मधून अन्न खाऊन पाही. त्यास दाखविण्यासाठी काही चांगल्या पोळ्या भाजून ठेवण्यात आलेल्याच असत. त्याच राजकीय बंदीवानांस वाटण्यात येत. याप्रमाणे राजकीय बंदीवानांना तरी थोडेसे बरे अन्न मिळू लागले हा या चळवळीचा महत्वाचा लाभ झाला; कारण त्या वर्गातील लोकांवर बंदीगृहाच्या कुग्रास आणि कच्च्या अन्नाचा परिणाम जन्मभर काबाडकष्ट आणि ओलेकोरडे अन्न यांशी परिचित असलेल्या, सर्वसामान्य बंदीवानांपेक्षा अधिक घातक होई हे सांगावयास नकोच. आरोग्यकारक अन्न ही विलासाची गोष्ट नसून जगावयाचेच साधन होते. आणि स्वार्थपरायणतेचा लवलेश स्पर्श न झालेल्या, आणि मार्गाचा प्रश्न सोडला तरी परार्थरत असलेल्या त्या कष्टभोगी लोकांचा संघ जिवंत राहणे हे समाजहितास निःसंशय अधिक लाभकारी होते, अशा विश्वासाने आणि बुद्धीनेच ही चळवळ चालली होती. आश्चर्याची गोष्ट ही की, त्या चळवळीत बारीच्या त्रासास भिऊन जे चळवळीस पोटभरूपणाची चळवळ म्हणून आपल्या त्या भ्याडपणास छपवू पाहात त्यांसच राजकीय बंदीवानांसाठी जेव्हा बारी स्वतंत्र अन्न काही अंशी करू लागला तेव्हा त्या नीट भाजलेल्या पोळ्यांवर राजबंदीवान म्हणून अधिकार सांगण्यास मात्र काहीएक संकोच किंवा पोटभरूपणा वाटला नाही!

राजकीय बंदीवानांस थोडे-फार बरे अन्न मिळाल्याने जरी एक लाभ झाला तरी त्यायोगे ते स्वस्थ बसले नाहीत. तर वेळोवेळी इतर बंदीवानांस पुढे करून किंवा स्वतः त्यांची अन्नाची गाऱ्हाणी लढून त्यांनी बंदीवानांच्या अन्नात पाच-सहा वर्षांत ठळक फरक घडवून आणला. पुढे एक पर्यवेक्षक चांगला आला आणि त्याच्या येण्यास आणि त्याच्या चांगुलपणास जागे ठेवण्यास हिंदुस्थानातील वर्तमानपत्रात आणि कौन्सिलात जी अंदमानविषयक चर्चा चालू झाली तिचाही उपयोग झाला. त्यामुळे अन्न हळूहळू सुधारत साधारण बंदीवानांचे हे कष्ट बरेच कमी झाले.

अन्न वाईट, आरोग्यघातक आणि क्वचित प्रसंगी कमी मिळत असल्याने जितका त्रास होई तितकाच त्रास खाईतो ज्या पद्धतीने बंदीवानांस वागविण्यात येई त्या पद्धतीनेही होत असे; कारण जेवणाच्या वेळेस बंदीवानांच्या पंक्ती भर उन्हात आणि पावसातही बसविण्यात येत असत. कोणीही पंक्तीबाहेर बसू शकत नसे. या त्रासाचा प्रतिकार करण्यासाठी राजबंदीवानांतील मंडळी अन्न थाळीत पडताच उठून सावलीत जाऊन बसत. पेटी ऑफिसर शिवीगाळ

करी. बारीही येऊन पंगत सोडली म्हणून खटले करी. बंदीवानांस चिथवितात म्हणून पर्यवेक्षक शिक्षाही ठोठावी; पण राजबंदीवानांतील झुंझार पक्षाचे लोक उन्हात व पावसात पंगत सोडून छायेत जाऊन बसण्यास सोडीत ना. छायेत जेवण्यापुरते तरी का बसू देत नाही ते विचारता बारी सांगे, मी त्या बंदीवानांस सावलीत बसवू तर मजवरच बंदीवानांशी 'भाऊबंदी' केल्याचा आरोप वरचे अधिकारी करतील आणि बारीचे म्हणणे अगदी खोटे नव्हते. पुष्कळ वेळ जरी तो स्वतः त्रास देई व एकंदरीत जरी बारीचे नाव पुढे येई तरी बंदीवानांस निष्कारण आणि आरोग्यनाशक त्रास देण्याचे उत्तरदायित्व सर्वस्वी बारीसाहेबांवरच नसून ते एकंदर बंदीविभागाच्या धोरणावरच असे, हे ध्यानांत ठेविले पाहिजे.

कारण बंदीगृहातच जेवताना बंदीवानांस उन्हात आणि पावसातही बहुधा बसविले जाई असे नसून बंदीगृहाचे बाहेर देखील ज्या जिल्ह्यात बारीहून दुसरे अधिकारी असत त्या जिल्ह्यातही बहुधा तेच हाल होत. इतकेच नव्हे तर त्याबाहेरील जिल्ह्यांपैकी काही भागात भरपावसात उभे राहूनच बंदीवानांस जेवावे लागे.

कपडे पावसात काम करून ओलेचिंब झालेले, थंडीने अंग सारखे कुडकुडत आहे, अशा स्थितीत एका हातावर पावसात भिजून चिंब झालेल्या पोळ्या आणि भात घेऊन पावसाने भरलेल्या आमटीच्या भांड्यातून आमटी भुरकीत ते अन्न बंद्यांस उभ्यानेच खावे लागे. असे एकदा दोनदाच होत नसून ही जवळजवळ पद्धतच पडलेली होती! केवळ ज्यांना बाहेर गेल्यावर स्वतंत्र स्वयंपाक करण्याचा अधिकार मिळे त्यांस मात्र हे कष्ट पडत नसत. परंतु राजबंदी बाहेर गेले तरी त्यांस हे अधिकार मिळणारे नव्हते. म्हणून त्या बिचा-यांस कोठेही गेले तरी एक तर हे हाल तरी सोसावे लागत; नाही तर जे त्यांच्यात हे हाल सोसून निमूटपणे जगण्यापेक्षा ह्या हालांपासून सर्व बंदीवानांची मुक्तता करण्यासाठी झगडत; अधिक हाल झाले तरी सोसण्यास पुढे होत, त्यांस अधिका-यांच्या रोषास पात्र होऊन अधिकच हाल सोसावे लागत. तरीही त्यांच्यातील कित्येक लोकांनी ते सोसले. आतही सोसले आणि बाहेरही सोसले. ह्या उन्हात व पावसात जेवावयास बसणाऱ्या व उभे राहून जेवणाऱ्या पंक्तीस एक ठराविक वेळ देऊन (आणि ती किती हे आडदांड पेटी ऑफिसर ठरविणार!) ती वेळ होताच पेटी ऑफिसरने ओरडावयाचे उठो, खाना हो गया, चलो! बस्स. पेटी ऑफिसरने म्हटले खाना हो गया की तो झालाच पाहिजे; मग कित्येकांचा तो होवो वा न होवो. ताडकन सगळ्यांनी उभे राहिले पाहिजे. उरले ते अन्न पोट रिकामे असले तरी उष्टे उमजून कुंडीत जावयाचे. जर कोणी उठला नाही तर काही काही निर्दय पेटी ऑफिसर हातातील काठी सपासप फिरवीत त्या पंगतीत घुसून थाळ्या उडवीत, दाणादाण करून सोडीत. कोणी हूं केले की वरतून मार, मागून आज्ञा तोडल्याचा खटला. तरीही ह्या सर्व धाकदपटशाची गाऱ्हाणी वरच्या अधिका-यांस कंटाळा येईतो वर नेऊन व प्रतिवाद करून असल्या आज्ञा मोडून राजबंदीवानांनी वर्षानुवर्षे त्या बंदीवासातही झुंज चालू ठेवली. पाच-एक वर्षांनी हळूहळू फरक होत बंदीवानांस भरपावसात वा उन्हात न बसता छायेत बसता येऊ लागले. अर्धपोटीच पंक्ती उठविण्याचे बंद करण्यात आले. बाहेरही स्थिती सुधारत गेली, आतही बरीच सुधारली आणि शेवटी शेवटी बारीची 'ए बदमाषी! कामके लिये तुम आये हो; खानेके लिये नहीं! ही फुगीर गर्जना पिसपिशीत होत होत मुळीच ऐकू येईनाशी झाली.

बंदीखान्यातील अन्नाच्या आणि ते खाण्याच्या सुधारणेच्या प्रयत्नांचा हा वृत्तान्त पहिल्या पाच-सहा वर्षांचा म्हणजे साधारणतः १९१४-१५ वर्षापर्यंतचा आहे. त्यानंतर राजबंदीवानांच्या आणि त्यांच्या अनुषंगे माझ्याही जेवणाच्या स्थितीत काय फरक झाले ते पुढे पाहण्यात येईलच.

प्रकरण सोळावे

# आत्महत्या, भ्रम, धरपकड आणि दुसरा व तिसरा संप

माझ्या पहिल्या वर्षातील सहा महिने मी अगदी सक्तपणे कोठडीबंदीत ठेवलो गेलो. वास्तविक पाहता इतर बहुतेक बंदीवान सहा महिन्यांनीच तुरुंगातून मोकळे होऊन बाहेर धाडले जात. पण जेव्हा इतर बंदीवान कारागारातून बाहेर काढण्यात येत तेव्हा आम्हास कोठे कोठडीतून बाहेर काढण्यात आले. पण तेही इतरांप्रमाणे मनुष्यांत मिसळून बसण्यासाठी नव्हे तर केवळ कोठडीच्या निर्जनपणातून निघून दारापुढे चाळीतील सोप्यात निर्जनपणात बसण्यासाठी. इतर राजबंदीवानांस सुद्धा त्यांच्या कामाच्या टोळीतील मंडळीत बसू देण्यात येई. परंतु आम्हास मात्र चाळीतल्या सोप्यात एकटे बसविण्यात येई; कोणासही आम्हाशी बोलावयास सापडू नये अशी सक्त व्यवस्था ठेवण्यात येई. दिवसभर त्या कोठडीपुढच्या सोप्यात एकटे बसून दोरखंडे वळावी. संध्याकाळी पुनः त्याच कोठडीत जे एकटे कोंडले जावे ते सकाळपर्यंत तीत बंद पडावे, अशी वर्षामागून वर्षे चालली. केवळ जेवावयास दोन तास बाहेर यावे तेव्हा काय ते माणसांत मिसळता यावे.

या वेळेस माझे वर्तन ठाण्यास ठरविलेल्या कार्यक्रमाचे धोरणाने चाललेले असे. शक्यतो सार्वजनिक हितार्थ झटत असतानाही कारागाराचे नियम पाळून केव्हा तरी बंदीगृहातून बाहेर धाडण्यास अधिका-यांस भाग पाडावे म्हणजे वसाहतीत अधिक परिणामकारक प्रचार करता येऊन स्वतःच्या मुक्ततेचीही काही खटपट करता येईल हे माझ्या धोरणाचे मुख्य मर्म होते. एतदर्थ बंदीवानांच्या आणि बंदीनियमांच्या सुधारणेविषयी झटत असताही उघडपणे मजवर खटला भरण्याची संधी अधिका-यांस मिळू नये म्हणून मी फार जपे. बाहेर न धाडण्यास मुख्य निमित्त जे अधिका-यांस सापडे ते हे की “हा बंदीवान काम करण्यास इनकार करतो; व कामाच्या इनकारीचा अपराध कारागृहात साहजिकपणेच फार मोठा समजला जातो, म्हणून मी कठीण वा सोपे कोणतेही काम सहसा इनकार न करता करीत असावे. कारागारात काम इनकार करून जे सार्वजनिक हित मला साधता आले असते त्याहून कित्येत पटीने अधिक हित मला बंदीगृहातून बाहेर पडण्याची संधी मिळाली असती तर साधता येणारे होते. इतकेच नव्हे तर माझ्या अंतिम सुटकेचीही संधी मला मिळण्याची शक्यता बाहेर जाण्यातच अधिक होती. यासाठी बंदीगृहात जे साध्य ते सार्वजनिक कार्य साधण्याची चळवळ सोडून नव्हे, तर ती अन्य उपायांनी चालू ठेवीतच, मी मजवर खटला भरता येईल इतक्या प्रकटपणे नियमांचे उल्लंघन न करता काम करीतच होतो आणि बाहेर जाण्याची संधी मिळावी म्हणून झटत होतो.

राजबंदीवानांतील ज्या लोकांस प्रथमतः कारागृहाचे बाहेर धाडण्यात आले ते अवधीच्या शिक्षेचे म्हणजे यावज्जीवन काळ्यापाण्यावर न धाडलेले असे पाच, चार, तीन वर्षांच्या बंदीवासाचे लोक होते. त्यांपैकी कित्येकांस बाहेर फार कठीण कामे करावी लागत. तरीही मी त्यांस आग्रह करी की, बाहेरच राहा; तुम्ही बाहेर राहिला, तर मग हळूहळू यावज्जीवन काळ्यापाण्याचे राजबंदीवानही बाहेर सोडण्यात येतील, बाहेर प्रचारकार्यही तुम्ही अधिक करू शकत आहा. म्हणून कष्ट पडले तरी सोसा; पण सोडून इनकार करून तुम्हांस कारागृहात परत आणून कोंबण्याची अधिकाऱ्यास हवीच असलेली संधी शक्यतोवर देऊ नका. या माझ्या आग्रहाप्रमाणे ते असह्य कष्ट सोसूनही

बाहेरच राहिले. इतक्यात राज्यारोहणानंतर पहिल्या संपाचा परिणाम होऊन सरकारी आज्ञाही आली की, यावज्जीवन राजबंदीवानांपैकीही काही निवडक लोक बाहेर सोडावेत. त्याप्रमाणे दोन-चार जणांस निवडून सोडण्यात आले, त्यात मी किंवा माझे बंधू नव्हते, हे सांगणे नकोच. तरीही यावज्जीवन राजबंदीवानांना बाहेर धाडण्यात येऊ शकते इतकी गोष्ट त्यांच्या जाण्याने सिद्ध झाल्याने आज नाही उद्या आपणासही ती सवलत देणे अधिका-यांस भाग पाडता येण्यास एक अधिक साधन मिळाले असे पाहून धीर धरून राहिलो.

जे राजबंदीवान बाहेर गेले त्यांपैकी कित्येक दीड- दोन वर्षे कारागारात कष्ट भोगीत पडलेले होते. त्यांस माझे आधीच अंदमानात यावे लागल्याने कष्टांचा पहिला आघात सोसावा लागला होता. त्यांच्यातील काही लोकांस जेव्हा तेलाच्या घाण्यास जुंपले गेले तेव्हा पठाणी पेटी ऑफिसर येऊन कधी कधी त्यांच्या नाकासमोर आपली वळविलेली मूठ रोखून म्हणत, “हे बघितलेस का? ते जर पुरे केले नाहीस तर ह्या मुठीच्या एका ठोशासरशी ते तुझे नाक होते की नव्हतेसे करीन!” लेखात ज्याचा उच्चारही करता येत नाही अशा अश्लील शिव्याही त्यांतील कित्येकांस दुष्ट आणि नीच पेटी ऑफिसरादिकांकडून दिल्या जात. त्यांतले कित्येक सुशिक्षित होते, बहुतेक सभ्य कुळातील आणि संभावित घराण्यातील होते व सर्वच परार्थासाठी लाथाडून देण्याइतके उदार आणि लोकहितबुद्धीने प्रेरित होऊन अशा संकटासही तोंड देण्याइतके धीट होते. त्यांनी तशाही स्थितीत दिवस कंठले. त्यांच्यातील काहींनी तर नुसते दिवस कंठले इतकेच नव्हे, तर त्या संकटाशी दोन हात करून वारंवार त्यांना छळणा-यांपुढे मान लपविण्याचे साफ नाकारले. अशा प्रकारे कारागृहातील अवधी संपून त्यांस बाहेर वसाहतीत जेव्हा पाठविण्यात आले तेव्हा आता तरी त्यांस काही सवलतीने वागविण्यात येऊन आराम मिळेल अशी आम्हां सर्वांस आशा वाटली. साधारण बंदीवानांत जे शिक्षणात, योग्यतेत व प्रामाणिकपणात या राजबंदीवानांचे जोडे उचलण्याच्याही योग्यतेचे नव्हते ते बाहेर कारकून, लेखक, गणक अशा अधिकारावर नेमले जात आणि त्यांच्या हाताखाली दहा-पाच बंदी त्यांची सेवा करण्यासही मिळत; तेव्हा राजबंदीवानांस अधिकार नसले तरी निदान एखादे बुद्धिजीवी लेखनादी कार्य तरी मिळेल ही त्यांची आकांक्षा अयोग्य होती असे कोणासही म्हणता येणार नाही.

परंतु लवकरच बातम्या येऊ लागल्या की, राजबंदीवानांस बाहेर देखील आतल्यासारखीच कठोर कष्टाची कामे देण्यात आली आहेत. ज्या कामाच्या भयाने निर्ढावलेले बंदीवानही औषधे खाऊन रोग करून घेत.

अशी कित्येक कठीण कामे राजबंदीवानांस करावी लागली. बंदीवानांस रोग उत्पन्न करणाऱ्या औषधी माहिती असत. रोग घालविते ते औषध ही सामान्य जगतातील व्याख्या त्या विपर्यस्त अंदमानी जगतातील जीवनात साहजिकच विपर्यस्तता पावली होती.

तापाचे औषध आहे का? रेचाचे औषध आहे का? म्हणून एका बंदीवानाने दुसऱ्या बंदीवानास दबलेल्या आणि त्रासिक स्वरात विचारले म्हणजे त्या वाक्याचा अर्थ ताप घालविणारे औषध असा होत नव्हता. अंदमानी जगतात रोगाचे औषध म्हणजे रोग उत्पन्न करणारे औषध असा अर्थ होई. पांढऱ्या कण्हेरीच्या मुळ्या उगाळून घेतल्याने भयंकर तापाने मनुष्य फणफणतो, गुंजेच्या बिया उगाळून खाल्ल्याने रक्ताचे रेच सुरू होतात, घावात सुईने शिवून- कशात काय की आम्ही आता विसरलो- भिजवलेला दोरा ओवून ठेवला की घाव सडून सहा महिने

खितपत पडता येते, ही माहिती प्रत्येकाच्या तोंडी असे. ती खरी की खोटी असे विचारता आम्हास बहुतेक लोक ती स्वानुभवाने अनुभवली आहे म्हणून सांगत. आत कोलूच्या आणि बाहेर लाकूडतोड, जंगलकाट, विणकाम इत्यादी कामांच्या भयाने या बाधक मुळ्या आणि औषधे खाऊन, आपल्या पायावर आपणच घाव करून, त्यात तो घाव सडविणारे दोरे घालून, सुईने आपल्या गळ्यास टोचून त्या रक्ताच्या गुळण्याने रक्ताच्या उलट्या वा थुंक्यात छातीतले रक्त येत आहे असे निमित्त करून किंवा आपणास लागलेले म्हणून पांघरलेले वेड खरे आहे असे भासविण्यासाठी विष्ठा आणि मूत्र तोंडास फासून आणि क्वचित खाऊनही एकदाची डॉक्टराची समजूत आपण आजारी वा वेडे आहोत अशी करण्यासाठी धडपडत असलेले बंदीवान आमच्याच काय पण अंदमानात एक आठवडाभर राहिलेल्या प्रवाशाच्या सुद्धा अवलोकनात आल्यावाचून राहत नसत. डॉक्टरला वारंवार या लोकांनी फसवावे. त्यायोगे केव्हा खरा आजारी कोण हेही त्यास कळत नसे! अशा प्रकारे अप्रामाणिकपणाच्या सवयी मोडण्यासाठी असे रोग उत्पन्न करणा-यांवर खटले भरून ते बरे होताच त्यांस उलट वेतही मारण्यात येत. हे सर्व जरी खरे असले तरी विषारी मुळ्या खाऊन जाणूनबुजून १०४/५ पर्यंत ताप भरवून घेऊन तळमळत पडणे किंवा रक्ताचे रेचावर रेच होण्यासारखी औषधे खाऊन पोटातील व्यथेची तडफड सोशीत राहणे हेही ज्या कामाच्या भयाने निर्ढावलेल्या बंदीवानांसही सापेक्षतः आरामदायक वाटावे ती कामे आणि ते कष्ट किती भयंकर व त्रासदायक असले पाहिजेत हे त्यायोगेच उघड होते, हेही पण नाकारता येणार नाही. अशा स्थितीत सर्व जन्म काबाडकष्टात किंवा चोरी-दरोड्यासारख्या व्यवसायात घालविलेल्या अपराध्यासही ज्या कामांचे कष्ट असे भयंकर वाटतात तीच कामे बुद्धिजीवी संभावित वर्गात वाढलेल्या राजबंदीवानांस जेव्हा देण्यात आली तेव्हा त्यांचे काय हाल झाले असतील हे वर्णन करण्याची आवश्यकताच नाही.

रोग देखील भोगच वाटू लागावेत अशी काही कष्टदायक कामे ज्या राजबंदीवानांच्या दैवी बंदीगृहातून बाहेर पडल्यानंतरही आली, त्यांच्या हालांची काही उदाहरणे त्यांच्यात शब्दांत खाली देत आहोत. श्री. उपेंद्रनाथ बॅनर्जी म्हणतात -

"आमच्या आधी १८५७ वर्षीच्या राज्यक्रांतिकारकांपासून जे जे क्रांतिकारक बंदीवान जन्मठेप होऊन काळ्यापाण्यावर आले त्यांतून बहुधा कोणीही जिवंत परत स्वदेशास जाऊ शकला नाही, ही गोष्ट हे असह्य कष्ट सहन करीत असताना जेव्हा माझ्या मनात उभी राही तेव्हा वाटे, एक दोरखंड घेऊन गळ्यास फास लावून घ्यावा आणि या कर्मभोगातून एकदाची सुटका करून घ्यावी! पण माझे हातून ते साहस होईना. चुपचाप शक्यतो राबून तेल पुरे करण्याकरिता घाणा फिरवीत राहिलो. एका दिवसाची गोष्ट आठवते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत घाणा फिरवीत देह लाकडासारखा झाला- हाताला फोड येऊन ते सोलून निघाले- पण तेल वीस पौंड पुरे झाले नाही. घेरी येत होती. मधून मधून पेटी ऑफिसरांच्या अश्लील शिव्यांचे प्रहार चाबकासारखे हृदयावर सपासप उडत होते; अशात संध्याकाळी बंदीपालासमोर मला उभे केले गेले. त्यानेही सुश्राव्य भाषेमध्ये आमचे पितृश्राद्ध करून- मातापितरांचा उद्धार करून - तुला वेत मारले जातील म्हणून दरडावले. तेथून परत येऊन भात लोखंडाचे थाळीत घेऊन खावयास बसलो. दुःख आणि अपमान पोटात भडकून कंठ अवरुद्ध होऊ लागला, घास गिळेना इतक्यातएक हिंदू पेटी ऑफिसर दयेने द्रवून वाढप्यास गुपचुप म्हणाला, "अरे, त्यांना थोडा अधिक भात घाला. बाबूलोक कष्टांत

आहेत.” हे वाक्य ऐकताच एकदम किंकाळी फोडून रडू बाहेर पडू लागले पण आपल्याच हाताने आपलाच गळा दाबून धरून ते आवरू लागलो. अशा वेळी एखादी काठी कोणी पाठीत घातली तर ते सहन केले असते. पण सहानुभूती सहन करवेना!”

## मानहानीत जिवंत राहण्यापेक्षा मेलेले बरे!

श्री. इंदुभूषण राय नावाच्या एका तरुणास माणिकतोळा कटात १० वर्षे शिक्षा झाली होती. बंदीगृहात असता त्यासही घाण्याची आणि इतर कष्टांची रुची चाखावी लागली होती. जे लोक बाहेर गेले त्यांत तोही होता; परंतु बाहेर जाऊन पाहतात तो आतल्या कामापेक्षा काही तरी हलकी कामे आणि काही तरी अधिक सवलती मिळण्याचे दूरच राहून त्यास आतल्यासारखेच कठीण काम देण्यात आले. बाहेर कोणी बंदी आजारी पडला तर त्या निमित्ताने त्याला बाहेरच्या सापेक्षतः बऱ्याच आरामदायक रुग्णालयात धाडण्यात येई. परंतु राजबंदीवान आजारी पडला तर त्यास त्या आजारी होण्याचाही एखाद्या अपराधासारखा दंड द्यावा लागे; कारण त्यास लगेच तापात वा रेच होत असता आपले अंथरूण डोक्यावर घेऊन आपली थाळी हातात घेऊन दोन-चार-पाच मैल चालत परत त्या सेल्युलर तुरुंगाचे भीषण दार पाहावे लागे आणि आत येताच कोठडी बंद होऊन पडावे लागे! त्या त्रासास इंदुभूषण कंटाळून गेले. शेवटी निरुपाय होऊन त्यांनी बंदीवास पत्करला, दंडाबेडी हातकडी पत्करली; पण हे कष्ट नकोत म्हणून काम करण्याचा साफ इनकार केला. शिक्षा झाली. बंदीगृहात परत त्यास कोंबण्यात आले. येताच बारी म्हणाला - “काय तू परत आलास! तुला काय वाटते की बाहेर काम इनकार केले म्हणजे कारागारात कोठडीत बंद होऊन सुखाने पडता येईल? छट्, जाव इसको कोलूमें ले जाव!” झाले. त्यांस तसेच नेऊन घाण्यास जुंपण्यात आले! ते वैतागून गेले. आम्ही पुष्कळ धीर दिला. तुला तर दहा वर्षेच शिक्षा आहे. आम्हांला तर जन्मठेप! तेव्हा आमचेकडे पाहून तरी मनास धीर दे. संध्याकाळी तेल घेऊन जाताना मी त्यांस गुप्तपणे भेटलो. चारच शब्द बोलू शकलो. तो म्हणाला, तो नेहमीच म्हणे - छेः या नीच मानहानीत जिवंत राहण्यापेक्षा मेलेले बरे! मी पुनः वरच्याच कोटिक्रमाने धीर दिला आणि म्हटले, स्वदेशासाठी स्वार्थ, प्राण यांचा त्याग करणे जसे कर्तव्य तसेच, बंधो! मानाचाही त्याग करणे कर्तव्यच आहे! तू अजून पंचविशीचे आतबाहेर माझ्यासारखा आहेस; आणि माझ्याहून तुला सुटण्याची आशा पुष्कळ आहे! तर धीर धर. सध्या कष्ट सोसून जग, की पुढे सुटताच पुनः देशमातेची सेवा करता यावी, असे घाईघाईने चार शब्द बोलणे झाले. दोनचार दिवस काढले. रोज संध्याकाळी घामाने चिंब झालेला, अंगावर पिसलेल्या खोबऱ्याची भुसी केसापासून पायापर्यंत चिकटलेली, पायात बेडी खळखळत आहे, वीस-वीस पौंड तेलाची बादली उचलून आणि खांद्यावर भुसीचे पोते घेऊन वाकत उघडावाघडा चाललेला इंदू मला दुरून दिसत असे. आम्ही सगळेच तसे चालत आलो होतो! तोच एक दिवस सकाळी कोठड्या उघडल्या जाऊन आम्ही जो बाहेर पडतो तो वॉर्डर गुपचुपपणे मला सांगू लागला की, कोणास मी सांगितले म्हणून माझे नाव कळवू नका, पण ‘इंदु काल फाशी खाऊन मेला!’

थक्क होऊन मी उभा राहिलो. आता काल संध्याकाळी धडधाकट शरीराचा जो तरुण कोठडीत बोलत बोलत बंद झाला. सकाळी उठून पाहतात तो आपल्याच कपड्यास फाडून त्याच्या केलेल्या दोरीने स्वतः फाशी खाल्लेला,

मान मोडलेली, जीभ निघालेली, दोनही पाय ढिले लोंबकळते, असा फासाला टांगून वरच्या खिडकीशी मेलेला लोंबत आहे! त्या मानी तरुणास अपमानास्पद जीवनापेक्षा मरण अधिक सुखकर वाटले.

जिकडे तिकडे काळी छाया पसरलीशी दिसू लागली. त्या तुरुंगात असे फाशी खाऊन कोणी ना कोणी तरी सरासरीने दोन महिन्यांतून एकदा मरत असे. पण राजबंदी असा तोच पहिल्याने फास खाऊन मेला. मन म्हणू लागले, तुमचीही एक दिवस अशीच गती होणार. दहा वर्षांस कंटाळून तो मेला - तुला तर पन्नास वर्षे शिक्षा आहे म्हणजे तुला मेल्यावाचून सुटकाच नाही.

परंतु या दुःखद विचारात उदासीनपणे गलितधैर्य होऊन बसण्यासही बारीसाहेबांनी पुरता वेळ दिला नाही. कारण दोन-तीन तासांतच बातमी लागली की, इंदुभूषणाने कष्टांस कंटाळून आत्महत्या केली हे सत्य लपवून बारीने चौकशीत असे विपर्यस्त सिद्ध करण्याचा प्रयत्न चालविला की, इंदूने वेडाच्या भरात किंवा आपसातल्या भांडाभांडीचे त्वेषात आत्महत्या केली. इंदूने मरताना आपल्या गळ्यात एक चिठ्ठी बांधून ठेवली होती. ती चिठ्ठी बारीने छपवून टाकली असे त्या वेळी उपस्थित असलेल्या बहुतेक बंदीवानांचे म्हणणे होते. ती इंदुभूषणाच्या स्वतःच्या कथनाची चिठ्ठी छपवून बारीने त्याच्या हस्तकांकडून बातमी पसरविली की, इंदू तुरुंगाचे कष्टाने मेला हे खोटे आहे. थोड्याच वेळाने रीतसर चौकशीसाठी वरचे अधिकारी आले असताना, त्यापुढे झालेल्या साक्षीत बारीने राजबंदीवानांतील त्याच्या होस हो मिळवून देण्याचे व्रत घेतलेल्या एकदोघा साक्षीदारांसही 'इंदू माथे फिरून मेला; कष्ट असह्य होऊन मेला असे म्हणता येत नाही' असे सांगावयास लावले. पण इकडे निरोपावर निरोप धाडून माझ्या विभागातील राजबंदीवानांनी इंदूच्या फाशीचे कारण आकस्मिक वेड किंवा आपसातले भांडण नसून असह्य कष्ट, त्रास आणि आशाशून्यता हेच होय अशी सर्वांची निश्चिती करविली आणि कसे तरी करून बारीच्या भीतीने गांगरून न जाणाऱ्या एका राजबंदीवानाचे नाव साक्षीदारांत येताच त्याच्याकरवी इंदूच्या कष्टांची माहिती अधिकाऱ्यापुढे सांगितली. अलाहाबादच्या स्वराज्यपत्राच्या संपादकातील जे तीन-चार झुंजार आणि निर्भीड तरुण राजबंदीवानांत आले होते त्यांपैकी एकाने ही साक्ष दिली आणि भयास आणि धाकदपटशास न जुमानता इंदू कष्टास कंटाळून मेला असे स्पष्ट सांगितले. इंदूशी माझे झालेले संभाषण मी सर्वांस सांगत होतो. पण मला बारी साक्ष देण्यास चौकशीत बोलवीनाच. संध्याकाळी मात्र मजकडे बारी आला; आणि मला चुचकारून सांगू लागला की, स्वतः इंदूने चिठ्ठीत मी आपसातील भांडणापायी मेलो म्हणून म्हटले आहे. तेव्हा मी म्हटले, "तर मग ती चिठ्ठी का पुढे केली नाही? चौकशीत तर्कवाद वाढविण्यापेक्षा हा प्रत्यक्ष पुरावा तुमचे म्हणण्याचे समर्थन करणारा असून तुम्ही तो का पुढे केला नाही? अजून तरी मला ती चिठ्ठी दाखवा. स्वतः दोन-तीन दिवसांपूर्वी इंदूचे माझ्याशी प्रत्यक्ष झालेले भाषण आणि "आपण बुवा अशा हालात दहा वर्षे जगू इच्छित नाही" हे त्याचे इतरांच्या संकटात अनेक वेळा निघालेले उद्गार आम्हास माहीत असता तुम्ही म्हणता तो एकाएकी माथे बिघडून मेला. पण समजा, एकाएकी माथे बिघडून मेला तरी हा प्रश्न राहतोच की, असे यःकश्चित निमित्ताने त्याचे माथे भडकावे इतके ते अशक्त आणि क्षीणधैर्य झाले कसे? त्याचे माथे की ज्याने भयंकर कट केले, फाशी, काळेपाणी, विश्वासघात, बंदीशाळा, बंदीवास इत्यादी आघातांस हसत हसत सहन केले, आणि केव्हाही माथेफिरूपणाचे वा चिडखोरपणाचे एकही चिन्ह अनेक समयी सहका-यांशी साहजिकपणेच चालणाऱ्या वादविवादात कधीही व्यक्त केले नाही.

कोणत्याही देशातील राजबंदीवानांत संकटात खितपत पडले असताना साहजिक ज्या उत्पन्न होतात अशा काही मतमतांतरादी चर्चा आम्हां राजबंदीवानांत प्रत्यहीच चालत. ज्या चर्चेचा परिणाम त्या चर्चेत भाग घेणाऱ्या कोणावरही झालेला नाही. हिचाच परिणाम इंदूसारख्या नेहमी विवादाचे धक्केचपेटे सोसलेल्या पक्क्या मनाच्या तरुणावर व्हावा इतके त्याचे मन दुर्बल स्थितीत कोणी आणले? त्यास कारण काय? अर्थात असह्य झालेले कष्ट! तुरुंगात कष्ट. बाहेर गेला तेथेही असह्य कष्ट आणि यातना. पुनः काम इनकार करून आत आला तो कोलू दत्त म्हणून उभा! म्हणून तो 'मी फाशी खाऊन मरेन' म्हणून स्पष्ट म्हणू लागला. आणि म्हणूनच मेला! त्यास माथे फिरले म्हणून नाव दिले तरी ते का फिरले हा प्रश्न सोडविताना पुनः तेच सत्य तुम्हांस मान्य करावे लागेल!" असे माझे बारीसाहेबाशी बोलणे झाले. साहेबांचा माझ्यावर प्रकोप होण्यास जी अनेक कारणे झाली त्यांत हे एक महत्वाचे कारण होते की, मी इंदूच्या फाशीचे उत्तरदायित्व कारावासातल्या राजबंदीवानांस भोगाव्या लागणाऱ्या यातनांवर आहे असे स्पष्टपणे प्रतिपादन करीत राहिलो. बाकी त्या भयंकर परिस्थितीत बारीच्या धाकाने ज्यांनी मूग गिळून स्वस्थ बसण्याचेही धैर्य न दाखविता इंदू कारावासाच्या यातनाने फाशी खाऊन मेला नाही असे सांगितले, तेही ती भीतिप्रद परिस्थिती बदलताच आज प्रसिद्धपणे इंदू कष्टास कंटाळून मेला आणि त्याचे उत्तरदायित्व ज्या यातना राजबंदीवानांस अंदमानात सोसाव्या लागल्या त्या यातना देणाऱ्या पद्धतीवरच आहे, असेच सांगत आहेत. भयप्रद अवस्थेतून पार पडल्यावर तरी सत्य ते त्यांनी सांगितले एवढे तरी बरे केले. नाही तर भय वाटे म्हणून प्रथम सत्य न बोलणारा आणि प्रथम सत्य बोललो नाही तर आता तरी कसा बोलू म्हणून दुराग्रह धरून भय संपल्यावरही पूर्वी सांगितलेल्या असत्यासच सत्य म्हणून प्रतिपादन करणारा अप्रामाणिकपणाही काही तुरळकच असतो असे नाही.

इंदुभूषणपाशी जी पुस्तके सापडली त्यांत एक थिऑसफीचे पुस्तकही होते. एवीतेवी इंदुभूषण कारावासाच्या यातनांनी मेला नाही हे पर्यवेक्षक, चीफ कमिशनर इत्यादी वरच्या अधिका-यांच्या मनावर ठसवून हिंदुस्थान सरकारकडे आपल्या कारागृहाची कागाळी जाऊ नये म्हणून अखेर बारीच्या कोटिक्रमाची येथपर्यंत गती गेली की, त्याने असेही प्रतिपादन करण्यास आरंभ केला की, थिऑसफीची पुस्तकेच इंदूच्या फाशीची उत्तरदायी होत! कारण त्या पुस्तकांनी बुद्धी क्षीण होते. आणि मनुष्य नाकबिक धरावयाच्या व्यसनात फसून वेडगळ होतो! बारीसाहेबांच्या या शेवटच्या उपपत्तीने हिंदुस्थान सरकारची किती समज पडली ते काही सांगता येत नाही. पण इंदूच्या देशातील भावाने चौकशी करा म्हणून हट्ट धरला असताही या प्रकरणाचा वाद त्या वेळेस तरी तेथेच संपल्यासारखाच झाला. झाले. इंदू फाशी गेला त्या धक्क्याने जिवंत राहिले तेही आपापले दिवस कधी भरतात म्हणून मोजू लागले. इंदूच्या फाशीविषयी तुम्ही कितीही गोंगाट केला तरी माझे काय वाकडे झाले म्हणून पोर्टब्लेअरचा तो आडदांड परमेश्वर उघड गप्पा मारू लागला. राजबंदीवानांना काही एक असह्य कष्ट काढावे लागत नसून त्यांची स्थिती अंदमानात शक्य तितकी सुसह्यच आहे अशीही प्रतिवृत्ते (रिपोर्ट्स) जाऊ-येऊ लागली, तोच पुनः एक भयंकर दुर्घटना घडली. दुर्दैवी इंदूला आपला इतिहास जगास सांगता आला नाही. पण ही दुसरी दुर्घटना ज्याविषयी घडली ते दुसरे एक राजबंदीवान उल्लासकर दत्त यांनी सुदैवाने बारा-तेरा वर्षांनी ते सुटून आल्यावर आपले वृत्त आठवेल तितके लिहिले आहे; म्हणून त्यांची माहिती थोडीशी त्यांच्यात शब्दांत ऐकू या. या

माणिकतोळा खटल्यातील तरुणाविषयी अंदमानात त्यांच्यावर कामाचा इनकार केला म्हणून खटला चालविणाऱ्या मॅजिस्ट्रेटने देखील असे उद्गार काढले होते की, “Ullaskar is one of the noblest boys I have ever seen, but he is too idealistic” अशा या ‘उदात्त तरुणा’ ची त्या कठोर कारागारात काय दुर्दशा झाली ते त्यांच्याच शब्दांत ऐकू या -

“मला आपल्या हिंदुस्थान देशात तेलाचा जो घाणा असतो तशा एका घाण्यास जुंपण्यात आले. देशातील घाणा बैल ओढतात. ते बैल दिवसभर घाण्याभोवती फिरून फिरून जास्तीत जास्त १६ पौंड तेल ‘सरसूचे’ काढतात. परंतु अंदमानात बैलाचे स्थली माणसे घाण्यास जुंपली जातात आणि त्यापासून तेच तेल प्रत्यही ८० पौंड पिसून घेण्यात येते. तीन माणसे घाण्यास जुंपलेली असत. जेवणाची काही मिनिटे सोडून सकाळपासून संध्याकाळपर्यंत ती माणसे त्या घाण्यास बैलासारखे सावकाश नव्हे तर, सारखे पळत पळत फिरवीत असत. नाहीतर तेल पुरे होणार नाही ही भीती! जर एखादा रेंगाळला तर सोटा घेऊन जवळच उभा असलेल्या पेटी ऑफिसराच्या दांड्याचा रट्टा पाठीवर धप्पकिनी बसलाच म्हणून समजावे. या रट्ट्यांनीही कोणी पळू शकला नाही तर त्यास शुद्धीवर आणण्याचे दुसरे उत्तेजक औषध म्हणजे त्या रेंगळ्या बंदीस त्या घाण्याच्या दांड्यात हातपाय बांधून बांधावयाचे! आणि इतरांस पळावयास सांगावयाचे. अर्थातच तो मनुष्य भुईवरून फराफर ओढत जाऊन त्याचे अंग रक्तबंबाळ होई, डोके धडाधड आपटे व तोंड फुटे! मी प्रत्यक्ष असे उदाहरण पाहिले आहे... हाय हाय मनुष्याची स्थिती मनुष्याने काय केली आहे! मी असा हा घाणा फिरवीत संध्याकाळी थकून कोठडीत जेव्हा बंद होण्यास जाई तेव्हा मला मी उद्या पुनः उठेन असे काही वाटत नसे. तरी देखील उठे - पुनः जुंपला जाई, पुनः उठे - आम्ही म्हणत असू, आलिया भोगास शक्यतो तोंड देऊ या... परंतु आमच्याबरोबर आलेले साधे बंदीवान सहा महिन्यांनी नियमाप्रमाणे तुरुंगातून बाहेर धाडण्यात आले. आणखी टोळ्याच्या टोळ्या येत. सहासहा महिने बंदीगृहात राहत- बाहेर सुटून जात पण आम्ही मात्र तसेच आत खितपत पडलेलो! वर्षानुवर्षे तसेच! ... अखेर एक दिवस कारागृहातून आम्हांस बाहेर धाडण्याचा हुकूम आला. परंतु ती सुटका केवळ आगीतून निघून फोफाट्यात पडण्यासाठी होती! ... कारण बाहेर गेल्यानंतर मला ज्या जिल्ह्यात धाडण्यात आले त्यात विटांचे काम मला देण्यात आले... अर्थातच मला सकाळपासून दुपारपर्यंत ओल्या विटा नेत आणीत सारखे पळावे लागे. हे काम साधारण बंद्यासही इतके कंटाळवाणे आणि थकव्याचे वाटे की, त्या कामावर त्यांनी राहावे म्हणून थोड्या दुधाची लालूचही त्यास देण्यात येई. परंतु हे दूध बंदीवानाच्या थाळीत पडले की, त्यावर पेटी ऑफिसरचा किंवा तंडेलाचा डोळा आलाच! मलाही दूध मिळू लागले; पण मी इकडे तिकडे न पाहता ते गटकन घशात ओतले. थोडे दिवस लोटताच मी नेवैद्य न दाखविल्याविषयी तंडेलाचा राग अनावर होऊ लागला. इतर बंदींचे दूध त्याला मिळे तेव्हा त्याने मला ज्या कामात दूध मिळत नसे त्या कामावर माझी बदली केली... नंतर माझी नेमणूक एका अत्यंत कष्टदायक कामावर झाली. एका उंच आणि जवळजवळ कड्यासारख्या टेकडीवर दोन डब्यांत पाणी भरून ते डबे काठीस बांधून पाणक्यासारखी ती कावड वर साहेबांच्या बंगल्यावर नेऊन पोचवावयाची. ते मणाचे ओझे, ती टेकडीची चढण! प्रत्येक मिनिटास पाय घसरून खाली पडून मरावयाचे भय. पाणी भरून थकलो तरी बरेच दिवस तसेच रेटले. आता प्रकृतीस ते असह्य झाले. तेव्हा काम इनकार करण्यावाचून गत्यंतर नव्हते. जीव त्रासून गेला आणि एके दिवशी

साफ सांगितले की, मी काम करीत नाही जा. काय वाटेल ते करा!... खटला झाला. मॅजिस्ट्रेट पुष्कळ समजावू लागला. थोडे दिवस हॉस्पिटलमध्ये विसावा घे म्हणाला. पण आजपर्यंतच्या भोगलेल्या सर्व कष्टांनंतर माझी निश्चिती झाली होती की, आम्ही राजबंदीवानांनी कितीही कामे केली तरी आम्हांस बंदीवासातील सवलती काही मिळणाऱ्या नव्हत्या. जितके राबावे तितके अधिकच राबावे लागणार. मग मी काय म्हणून राबावे? ते माझ्या शरीरावर अधिकार गाजवीत. पण माझ्या मनावर - माझ्या आत्म्यावर - मी होऊन काय म्हणून त्यांची सत्ता गाजू द्यावी? मी माझ्या देहास दास करण्याचे काम आपण होऊन तरी करणार नाही! असा निश्चय केला. मला तीन महिने अधिक सक्त कष्टांची शिक्षा आली! मला कारागृहात परत बंद करण्यात आले!... तोच ते कष्टमय कारागृह - दाराशीच बारी उभा. पाहताच ओरडला, "ऐक. हे बाहेरचे मैदान नाही" कारागार आहे. शिस्त मोडलीस, काम केले नाहीस की वेत मारीन. वेत कसे? एकेक फटकाऱ्यासरशी एकेक अंच खोल तुझ्या मांसात रुपतील असे, असे ३० वेत मारीन..." मी उत्तर दिले, "तुम्ही माझे तुकडेतुकडे करा. मी काम करणार नाही. कारण तुमचे काम करणे अनीतिकारक आहे असे मला वाटते!" झाले, बंदीपालाने तात्काळ मला आठ दिवस हातकडीत नेऊन टांगण्यास सांगितले... इतक्यात एका क्षणात माझ्यापुढे एक चमत्कारिक देखावा येऊन गेला. मला भासले की (मी आता भासले असे म्हणतो, पण तेव्हा मला ती अगदी खरोखरच घटना आहे असे वाटले) बंदीपाल बारी मला म्हणाला, तू माझा उपमर्द केलास. चल, मी तुझ्याशी द्वंद्वयुद्ध खेळतो! तुझ्या वतीने कोण प्रतिनिधी असेल ते बोलाव. मला वाटते, तुझ्या वतीने तुझा पक्ष घेऊन सावरकर द्वंद्वयुद्ध करील. असे बोलत त्याने सावरकरांना टेलिफोनने बोलावले, सावरकर नेहमी दिसत त्याहून थोडी कृश अशी एक व्यक्ती पुढे आली. बंदीपालाने त्याला विचारले की, "उल्लासचा पक्ष घेऊन तुम्ही द्वंद्वयुद्ध खेळाल का?" ते म्हणाले, 'होय.' लगेच बंदीपाल बारीने, त्यांनी विचारताच, एक हातमोजा आव्हान देण्यासाठी फेकला आणि एक हत्यार सावरकरांस दिले. या वेळेस मी माझ्या प्रतिनिधीच्या आणि बारीच्या त्या द्वंद्वयुद्धाकडे अत्यंत उत्सुकतेने पाहत राहिलो. आणि जेव्हा बारीचे आणि सावरकरांचे ते सशस्त्र द्वंद्वयुद्ध चालता चालता आमच्या पक्षाचा विजय होऊन बारीच्या तोंडावर सावरकरांनी तो हातमोजा फेकलेला फाडकन बसताच बारीचे तोंड झणझणत उतरून गेले. तेव्हा मला विलक्षण आनंद झाला... इतक्यात मी सावध झालो. तो देखावा वितळून नाहीसा झाला आणि मी हातकडीत जाऊन उभा राहिलो! मला फिरून हातकडीशी उभा करून हातकडीत हात अडकवून तीस कुलूप लावून लोंबकळत ठेवले, तेव्हाच मला ताप येतोसा वाटला. भिंतीशी टेकून मी तसाच उभा राहिलो. समोरून सूर्याचे किरण मला सारखे तापवीत होते. माझा ताप वाढत चालला. मधूनच मला कोणी विषारी औषध बळेच पाजीत आहेत असा देखावा दिसू लागला... या विलक्षण देखाव्यानंतर मला पुनः सामसूम दिसू लागली. तोच डॉक्टर आला. मला भयंकर थंडी भरली होती. ताप १०७ होता. मी हातकडीत गुंगून झुलत होतो. (यापूर्वी त्याला ताप चढल्याची बातमी दोनदा कार्यालयात पोचविण्यात आली होती; परंतु त्याला हातकडीतून सोडण्याची आज्ञा देण्यात आली नव्हती.) नंतर मला हातकडीतून काढण्यात आले. मी जवळजवळ बेशुद्ध होऊन पडलो. आणि मला भयंकर आकड्या येऊ लागल्या."

ती दुपारची वेळ होती. उल्लासकर हातकडीत उभा आहे इतके आम्हां सर्वांस कळले होते. परंतु वर त्यांच्यात कथानकात वर्णिलेल्याप्रमाणे त्यांना विलक्षण भास होण्याइतके त्यांचे ज्ञानतंतू दुर्बळ होऊन त्यांचेवर

तापाची निशा चढत आली होती आणि तरी देखील ते हातकडीतच होते याचा आम्हांस मागमूसही नव्हता. आम्ही कोठडीचे दाराशी सहज उभे राहिलो होतो तो - एकाएकी कर्कश किंकाळ्या आणि धरपकडीचा कोलाहल ऐकू आला. पोटात धस्स झाले. असे कोलाहल आणि किंकाळ्या अंदमानाच्या त्या कारागृहात वारंवार ऐकू येत असल्याने त्यांचा भयप्रद अर्थ साधारणतः सर्वांना अवगत असे. कोणा बंद्यास 'ठीक करावयाचे' बरे त्याच्यावर एकाएकी दहापाच वॉर्डर पेटी ऑफिसरांनी हल्ला करून त्यास खोलीत कोंडून बेदम झोडपावयाचे आणि नंतर सर्वांनी पसार होऊन साक्षीपर्यंत कोणी सापडावयाचे नाही असा त्या प्रकारच्या किंकाळ्यांचा अर्थ असे. तेव्हा पोटात धस्स झाले की, आज एखाद्या राजकीय बंदीवानास तर 'ठीक करण्यात' येत नाही ना?

बारी आणि पेटी ऑफिसर अनेक वेळा उघड म्हणत, एकदा राजबंद्यांतील एकदोघा भांडकुदळांस 'ठीक केले' की, आता यांच्या सर्व चळवळी आणि ऐट होती की नव्हतीशी होईल. वॉर्डरास विचारले, "किंकाळ्या फोडीत आहे. काय गडबड आहे?" तो म्हणाला, "मला माहीत नाही." अंतःकरणास भेदून जातील अशा करुण, पण पिसाळलेल्या किंकाळ्या एकसारख्या ऐकू येऊ लागल्या. पाचव्या क्रमांकाचे भागातून कोणाला तरी ओढीत पाडीत दहा-पाचजण रुग्णालयात उचलून नेत आहेत, तो किंकाळ्या फोडीत आहे, धाडकन पडत आहे, आरडाओरड चालली आहे! इतक्यात एका वॉर्डराने धावत येऊन हळूच सांगितले की उल्लासकर पागल हो गया!

होय! उन्हामध्ये तळपत अंगात ताप भरत १०७ अंशांपर्यंत चढलेला असताही हातकडीत हात बांधून उभा केलेल्या उल्लासकराचे ज्ञानतंतू - जे पूर्वीच्या वर्षानुवर्षांच्या कारावासाच्या कष्टांनी भ्रामक देखावे दिसण्याइतके आधीच क्षीण झालेले होते ते - निर्बुद्ध होऊन त्यास उन्माद झाला! शरीरास भयंकर आकड्या येऊ लागून तो दहाजणास आवरेना. कसाबसा रुग्णालयात डॉक्टराने त्यास आणून टाकला. उल्लासकर स्वभावाने अत्यंत विनोदी असे. त्यास फाशीची शिक्षा झाली तेव्हा देखील तो हसत कोट्या करीत होता. तो त्याचा विनोद उन्मादातही त्यास सोडीना. रात्रभर कर्कश किंकाळ्या फोडीत, असह्य यातना भोगीत तो निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज अगदी जशाचे तसे काढून उन्मत्तपणे हसत होता. अशा त्या रात्री आम्हास झोप कशी ती लागेना!

असा गमती, विनोदी, हसरा उल्लासकर - फाशीची शिक्षा ऐकतानाही हसणारा निर्भीक, विनोदी उल्लासकरही वेडा व्हावा असे कष्ट आपले हे शरीर तरी किती दिवस सोसू शकेल - आपले हे ज्ञानतंतू तरी किती दिवस हा ताप साहू शकतील. अशी शंका प्रत्येक जन्मठेपीच्या राजबंदीस विचलित करू लागून उल्लासकराच्या प्रत्येक किंकाळीसरशी पोटात धस्स होऊ लागे. तथापि अधिकारी येऊन चौकशी करून अजून तरी त्यास नीट व्यवस्थित रीतीने वागविण्यात येईल अशी आशा त्या रात्री तोडीबहुत वाटत होती; पण सकाळी उठून पाहतो तो रुग्णालयातून कधीही ऐकले नाही असे कर्कश क्रंदन ऐकू येऊ लागले. अ मा! अ मा! (अग आई) अशा बंगाली हाका हृदय विव्हळवीत, कानठळ्या बसतील अशा एकसारख्या येऊ लागल्या. झाले तरी काय? कोणी म्हणतो, उल्लासकर खराच वेडा झाला आहे की ढोंग करीत आहे हे पाहण्यासाठी त्यास अधिकारी 'वीज लावीत' आहेत. मला ते कृत्य संभवनीय वाटेना. परंतु ते खरे की खोटे हे स्वतः सांगण्यापेक्षा उल्लासबाबूंच्या प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातील त्यांच्याच भाषेत ऐकू या.

“या अर्धबेशुद्धीत आणि यातनांतही मला आठवते की, मेडिकल सुपरिन्टेंडंटने मला विजेची पेटी लावून वीज दिली ती यातना माझ्याने सोसवेना. धक्क्यावर धक्के बसताच ती वीज माझे अंगात संचरू लागली. तिचा ओघ माझ्या शरीरातील स्नायूनी स्नायू, धमनीनी धमनी, तंतूनी तंतू अत्यंत क्रूरपणे ताडताड ओढीत चालला आहे की काय असे वाटू लागले. माझ्या अंगात भूत शिरते आहे की काय असे मला वाटले आणि जे अश्लील शब्द मी जन्मात उच्चारले नव्हते ते मी यातनांच्या भरात उच्चारीत ओरडत राहिलो. पुढे संपूर्णपणे बेशुद्ध होऊन पडलो. तो तसाच तीन दिवस-रात्री पूर्णपणे बेशुद्ध स्थितीत  पडलेलो होतो असे मला शुद्धीत आल्यावर मित्रांनी सांगितले.”

त्याच्या, आम्हां मित्रांस तो मेला असेच वाटले. त्या त्याच्या भयानक आरोळ्या वीज लावल्या वेळेसच त्याने फोडलेल्या होत्या. ती विजेची पेटी त्यास का लावण्यात आली? त्याच्या तापावर किंवा त्याच्या उन्मादावर वीज देणे हे औषध म्हणून की काय?

त्यानंतर जेव्हा आठ-दहा दिवसांनी पुनः किंचित भानावर आला त्या वेळेस त्याला त्याच्या प्रियकर कौटुंबियांच्या करुण हाका ऐकू येऊ लागल्या. वेडात त्यास वाटले की, जसे काही ते सर्व अतिशय व्याकूळपणे याच्या नावाने हाका मारीत आहेत. त्यास वाटले, त्यांच्या या सर्व दुःखास मीच मूळ कारण! हाय! हाय! मी केवढा पापी अपराधी कुलांगार निपजलो! असा पश्चात्ताप होऊन त्याने बंदीतील स्वतःचे चवाळे फाडून दोरी विणली आणि ज्या खोलीत त्यास कोंडले होते तिच्या त्या मागच्या खिडकीस ज्या खिडकीस टांगून असे शेकडो त्रस्त लोक जीव देत तीस टांगून घेऊन फाशी खाण्यासाठी आपली मान त्या दोरीत अडकवली तोच पहारेकऱ्याने सुदैवाने यास धरले असे भासताच उल्लास खाली उतरला आणि वाचला. ज्याने त्यास ती विजेची पेटी लावली तो सुपरिन्टेंडंटही त्याच वेळेस - का ते कोणास ठाऊक - सुट्टीचा अवधी घेऊन निघून गेला आणि दुसरा एक पर्यवेक्षक आला. त्याचा राजबंदीवानांतच नव्हे तर सर्वत्रच पुष्कळ निःपक्षपाती म्हणून लौकिक होता. त्याने दुसरे दिवशी ते फाडलेले चवाळे पाहून आणि ती फाशी खाण्याची गोष्ट ऐकून उल्लासाला काही फटकारून काही धीर देऊन म्हटले, मी जरी इंग्लिश आहे, सरकारी नोकर आहे, तुमची आमची हिताहिते भिन्ने आहेत आणि म्हणूनच तुम्ही क्रांतिकारकांनी जे केले ते योग्य असे मला म्हणता येत नाही; तरी इतके सांगतो की, तुम्ही तुमच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे केलेत ते तुम्हाला ज्याअर्थी तुमचे कर्तव्य म्हणून प्रामाणिकपणे वाट होते त्याअर्थी त्या कृत्याविषयी तुम्हाला स्वतःस दोष देण्याची वा आत्मनिंदा करण्याची काहीएक आवश्यकता नाही. तुम्ही तरुण आहा. आता एक दिवस आपली जन्मठेपेची शिक्षा भरून परत स्वदेशास जाल, मग फाशी खाण्याचे भ्याड कृत्य का करता? मला तुमच्या अपेष्टांचे कारण माहीत आहे. असह्य कठोर परिश्रम (Excessive hard labour) हेच तुमच्या क्षीणतेचे कारण आहे. परंतु मी एकटा ते दूर करू शकत नाही; कारण की, मी सरकारी नोकर आहे. आणि तुम्ही राजबंदीवानांस सतत सक्त परिश्रमाची कामेच करावयास लावावी अशी सरकारी आज्ञा आहे. मला ती पाळली पाहिजे. तथापि तुम्हास मी तुमची हरकत नसेल तर आणि ती स्थिती तुम्हास या कष्टाहून बरी वाटत असेल तर सवलत म्हणून वेड्यांचे रुग्णालयात धाडतो पाहा काय ते. हे पर्यवेक्षकाचे भाषण ऐकताच उल्लासने ते स्वीकारले आणि त्यास वेड्याचे रुग्णालयात धाडण्यात आले. तेथे ते वारंवार वेडाचे झटके, आकड्या, दातखीळ, विलक्षण देखाव्यांचे भान इत्यादी मानसिक यातना सोशीत; परंतु ते वेड्यांचे रुग्णालयही ज्यांच्या तुलनेत सवलत वाटावी अशा त्या कठोर

हातकामाच्या परिश्रमातून सुटल्याविषयी शुद्धीत असताना आनंद मानीत दहा-बारा वर्षे खितपत होते. ते प्रथम अंदमानात, तेथून मद्रासच्या वेड्यांचे रुग्णालयात होते व तेथूनच ते शेवटी बारा-चौदा वर्षांच्या अटकेनंतर सुटले.

ज्या दिवशी दुपारी एकाएकी कर्कश किंकाळ्या उठून त्या ऐकताच भयभीत झालेल्या राजबंदीवानांस उल्लास वेडा झाला म्हणून कळले त्यांच्या दोनचार दिवसामागूनच बारी माझ्याशी संवाद करावयास आला. मी सहसा होऊन त्याच्याशी वा कोणीही सरकारी अधिकाऱ्याशी बोलत नसे. ते आपण होऊन आले म्हणजे इष्ट ती मते स्पष्टपणे त्यांच्यापुढे मांडण्यास मागेपुढे घेत नसे. ही गोष्ट बारीसाहेबांस माहीत असल्याने ते काहीही विशिष्ट घटना झाली की माझे मत काढण्यास येत असत. त्या दिवशीही स्वारी अगदी हसत हसत आली. बारीला दुष्ट भाषणाची इतकी खोड लागलेली होती की विनोदातही मर्मी लागणारे शब्द तो सहज बोलून जाई. त्याचे सौजन्यही निष्ठूर असे.

मला पाहताच तो मला म्हणाला, "काय तुम्हाला कधी वेड लागणार?" मी जरा क्रोधानेच म्हटले "क्वचित तुम्हाला वेड लागल्यानंतर!" उल्लासाच्या वेडाची गोष्ट त्याने काढताच मी म्हटले, "इंदुभूषणाने फाशी खाल्ली तेव्हा तुम्ही म्हणालात त्याने ती कष्टांस कंटाळून खाल्ली नाही, तर वेड लागून खाल्ली. तेव्हा मी आपणास म्हटले, पण वेड का लागले, हा प्रश्न उरतोच. आता हे उल्लासला वेड लागले त्याचे कारण तरी त्याला झालेले कष्ट आणि राजबंदीवानांना भविष्यकालीही आशा ठेवलेली नाही या वस्तुस्थितीवाचून इतर दुसरे कोणतेही नाही ना? तेव्हा कष्टाने वेड लागते आणि वेडात मनुष्य फाशी खाऊ पाहतो ते उल्लासच्या उदाहरणावरून सिद्ध झालेले असून राजबंदीवानांच्या आयुष्याचा नाश आत्मवधाच्या गळफासात किंवा भ्रमाच्या रुग्णालयात करण्याचे उत्तरदायित्व मुख्यत्वेकरून ज्या पद्धतीने त्यांना वागविण्यात येत आहे त्या पद्धतीचे कठोरपणावरच आहे हे माझे विधान खरे ठरत आहे." हे ऐकून बारी एकदम उलटला आणि म्हणाला, "पण उल्लासला वेड लागले हे तुम्हास कशावरून कळले? तो वेडाचे ढोंग करीत आहे!

मी म्हटले की, "मला किंवा आमच्यातील आणखी कोणास त्यास जाऊन भेटू द्या म्हणजे खरे खोटे आम्हांस कळेल". तो म्हणाला, "छट्, आम्ही खोटे बोलतो की काय? उल्लासला वेड लागलेले नसून तो काम चुकविण्यासाठी इतर पाजी बंदीवानांप्रमाणेच केवळ वेडाचे ढोंग करीत आहे!" मी उत्तरलो की, "जर त्यास वेड लागलेले नसेल तर तुम्हांस तरी वेड लागलेले आहे हे निश्चित. यावर तुम्ही आणि तुमचे वरचे अधिकारी आम्हांस राजबंदीवानांच्याप्रमाणे स्वतंत्र वर्ग समजून सवलतीने वागवा, नाही तर निदान साधारण बंदीवानांप्रमाणे तरी वागवा, पण हा सध्याचा विलक्षण त्रास संपवा. नाही तर संपाविना आम्हांस दुसरा मार्ग मोकळा राहणार नाही. संपाने आम्ही तुमच्या शक्तीशी टक्कर देऊ शकू असे नाही. पण शक्यतोवर अन्यायाचा आणि अपमानाचा प्रतिवाद आणि प्रतिकार केल्याचे समाधान तरी आमच्या मनास लाभेल.

बारी यानंतर सरासरी आठ महिनेपर्यंत म्हणजे त्याच्या वरच्या अधिका-यांनी उल्लासास वेडा ठरवून रुग्णालयात धाडल्यानंतरही बरेच दिवस असेच म्हणत असे की, उल्लासला वेड लागलेलेच नाही. तो ढोंग करीत आहे! असे वेडाचे ढोंग करणारे इतके निगरगट्ट बंदी पाहिले होते की, त्याची खरे-खोटे निवडण्याची शक्तीच बोथट होऊन गेली होती. सहानुभूतीचा झराच आटून गेला होता, तरीही बंदीवानांचे जगत् सोडले की, इतर मनुष्यांशी बारी

असाच निर्दयपणाने वागत होता असे मात्र कोणी समजू नये. कारागृहाच्या बाहेर पाऊल टाकताच पुनः तो मनुष्यासारखा मनुष्य होत असे. त्याच्या स्वभावाचे स्पष्टीकरण पुढे आणखी होणारच आहे.

आतही कष्ट आणि बाहेरही कष्ट! तरी देखील शक्यतो राजबंदीवानांनी बाहेर राहावे असे मी म्हणे. कारण बाहेर प्रचारकार्य संपादन करता येई. या प्रचारकार्यासाठी मी स्वतः तर वाटेल ते कष्ट असले तरी बाहेर जाण्याचा प्रयत्न करणार असा निश्चय केला होता. म्हणून माझे एक वर्ष पुरे होताच मी बाहेर धाडण्याविषयी अर्जावर अर्ज करण्यास आरंभ केला. त्या वर्ष दीड वर्षांत माझ्यावर बारीच्या पेचात पूर्णपणे गवसून शिक्षा खाण्याचा दोनदा प्रसंग आला होता. एकदा बाहेरची बातमी आणि एखाद्या वर्तमानपत्राचे तुकडे आत आणण्यासाठी मी एक निनावी पत्र लिहिलेले ज्या मनुष्याने बाहेर न्यावयाचे मान्य केलेले होते तोच बारीचा हेर असल्याने ते अचानक अधिकाऱ्याचे हातात पडले. मी कोणास पत्र दिले होते ते नाव सांगितले नाही. अमक्या ठिकाणी एक मनुष्य भेटेल त्यास ते पत्र दे इतकेच सांगितले होते म्हणून ते नाव बाहेर फुटले नाही. परंतु मजवर खटला होऊन मला एक महिना पृथक कोठडीबंदीची शिक्षा झाली. त्या शिक्षेतून बाहेर येऊन काही महिने लोटतात तोच संपाविषयी काय धोरण स्वीकारावे याविषयी चर्चा केलेले पत्र लिहून ते गुप्तपणे धाडणार होतो इतक्याच माझी झडती घ्यावयास अधिकारी आले! मी ते पत्र त्वरित फेकून दिले. ते दुसऱ्या कोणास सापडून ते पकडले गेले. ते मोडीत लिहिले होते म्हणून ते कोणाचे ते अधिकाऱ्यास ठरविता येईना. तेव्हा बारीसाहेबाने ते त्याच्या बगलबच्चातील एका बंगाली राजबंदीवानाकडूनच वाचवून घेतले. पण तो राजबंदीवान मजसमोर उघडपणे येऊन साक्ष देण्यास इतर राजबंदीवानांचे भयाने धजेना. तेव्हा हाताखालचे एका बंगाली कारकुनास बारीने ते पत्र मोडीत नसून बंगालीत आहे अशी खोटी साक्ष देण्यास सांगून ते बंगाली भाषेत त्या बंगाली कारकुनाकडून पर्यवेक्षकासमोर वाचूनही दाखविले. परंतु दुसऱ्या एका बंगाली राजबंदीवानाने माझ्या पक्षाने साक्ष दिली आणि ते पत्र बंगालीत नाही. एक अक्षर बंगालीत असेल तरी (डॅम मी) असे निक्षून सांगितले. पर्यवेक्षक घोटाळला. बारी ओरडू लागला, "ओ सर, या सर्व बॉंबगोळेवाल्यांनी खरी साक्ष न देण्याचा कटच केला आहे." अखेरीस त्या कारकुनाचे साक्षीस आधार मानून ते पत्र बंगालीतच आहे असे ठरविण्यात आले आणि आम्हांस आठ दिवस हातकडीची शिक्षा मिळाली.

हातकडीत टांगलेले असतानाच आम्ही चीफ कमिशनरकडे अपील केले की, आम्हास झालेली शिक्षा रद्द न झाली तरी चालेल, पण पत्र बंगालीत आहे की मोडीत आहे याचा निकाल व्हावा. अर्थातच तिकडून लिहून आले, पत्रात बंगालीचे एक अक्षरही नाही; आणि कारकुनाने तर पत्र बंगाली भाषेत खडाखड पर्यवेक्षकासमोर वाचून दाखविलेले आणि त्यात मी सर्वांस अन्न सोडा असा उपदेश केलेला म्हणून सांगितलेले! पर्यवेक्षक मनात संतापला, त्या कारकुनास बोलावून आणले. बारीसाहेबाला बाहेर जाण्यास सांगितले आणि कारकुनास दटावले की, खरे सांग काय ते! तेव्हा लगेच थरकाप होऊन तो म्हणाला, "सरकार, आम्ही बंदीवान, बारीसाहेब म्हणतील तसे करावे लागते. ते पत्र बंगालीत कल्पनेने लिखाण रचून मी वाचले हे खरे. ते पत्र बंगालीत नाही, पण बारीने सांगितले पाठ करून बंगाली आहे असे वाचीत चल, म्हणून मी तसे वाचले." पर्यवेक्षक रागावला. पण बारीवर येऊ नये म्हणून त्या कारकुनास तेथून लिहिण्याचे कामावरून काढून टाकून मला पत्र बंगालीत नाही हे तुमचे म्हणणे खरे आहे असे म्हणाला. त्या दिवशी पर्यवेक्षकाने बारीची बरीच पाद्यपूजा केली आणि पुनः खटल्यात अशा धडधडीत बनावट

साक्षी देववून मलाही चकवावयाचा प्रयत्न झाल्यास संभाळून ऐस म्हणून तंबी दिली. अशी एखादे वेळेस तरी राजबंदीवान बारीवर जेव्हा जेव्हा उलटून देत तेव्हा आठदहा दिवस ती तो त्यांच्यातील झुंजार पक्षाशी अगदी गोगलगाईसारखा राहून आपण आयरिश असल्याची त्यास एकाएकी आठवण होई! अहो, मीही आयरिश आहे, मीही तारुण्यात इंग्लिशांचा द्वेष केलेला आहे, गुप्त कट केले आहेत. मला तुम्ही शत्रू का समजता? आता केवळ सरकारी नोकर म्हणून वरचे हुकूम मला बजावावे लागतात इतकेच. तुम्हांस त्रास होत असेल तर सरकारास दोष द्या. मी निरपराधी आहे इत्यादी लघळपणा करून वर एखादी बातमी पण सांगत असे. अगदी प्रसन्न झाला तर एखादे इंग्रजी पक्षाचे वर्तमानपत्र पण वाचावयास देई. आम्ही पण त्याच्या त्या तेवढ्या सवलतीचे तेवढ्यापुरतेच प्रामाणिक पण प्रमाणशीर आभार मानीत असू.

या दोन खटल्यांविरहित आमच्यावर पहिल्या दीड वर्षांत खटला झालेला नसल्याने आणि जे राजबंदीवान बाहेर गेले होते त्यांत अशा चिठ्ठया पाठविण्यासाठी अनेक वेळा खटले झालेलेच नव्हे तर संप केलेलेही लोक असल्याने मला बाहेर त्यांचेप्रमाणेच सोडा म्हणून मी अर्जांचा भडिमार चालू केला. माझ्या बंधूंना तर अडीच वर्षे होऊन गेली होती. मला केव्हा उत्तर येई, "तुम्ही त्या राजद्रोही वर्गातील बंदीवान नाही. तुम्ही केवळ साधारण बंदीवान आहा." मी लगेच उत्तर पाठवी की "साधारण बंदीवानांत तर मोठमोठे तुरुंग फोडून पळालेले, अनेक वेळा शिक्षा झालेले आणि पोर्ट ब्लेअरला आल्यावरही पळून गेलेले बंदीवान पुनः येताच फार तर एक वर्षाने तुरुंगातून बाहेर काढले जातात. पेटी ऑफिसरही होतात. मी जर साधारण बंदीवान असेन तर मला पूर्वीच सोडावयास पाहिजे होते, पेटी ऑफिसरही करावयास पाहिजे होते; कारण माझ्याविरुद्ध त्यांच्या मानाने काहीच कारागारीय अपराध नोंदलेले नाहीत." अशी उत्तरे-प्रत्युत्तरे होता होता निरुपाय होऊन अखेर चीफ कमिशनरला स्पष्ट कळवावे लागले की, "तुम्हास कारागृहातून बाहेर काढता येत नाही; कारण 'तुमची कारागारीय वर्तणूक' बाहेर गेलेल्या बंदीवानाहून जरी पुष्कळ चांगली आहे तरी - तरी तुमचा मागचा इतिहास भयंकर आहे!" मागचा इतिहास जर ध्यानात घ्यावयाचा तर मग सध्या 'वर्तणूक अनाक्षेपार्ह' असून उपयोग काय? अर्थात आम्ही चांगले वागलो तर कारागार, वाईट वागलो तरी कारागार!

माझ्या बाहेर जाण्याच्या प्रयत्नांचा असा परिणाम होत असता बाहेर गेलेल्या राजबंदीवानांचे कष्ट अधिकच वाढू लागले. वर दिलेल्या इंदुभूषणाच्या आयुष्यनाशाविषयीही काही तरी प्रतिवाद, काही प्रतिकार करणे हे सर्वांस आपले कर्तव्य वाटू लागले. शेवटी चर्चा होऊन एक सार्वत्रिक संप करावा असे ठरले. आम्हां सर्वांस राजबंदीवान म्हणून, त्रास देण्यापुरते जसे समजण्यात येते तसे सवलती देतानाही समजण्यात यावे, बाहेर किंवा आत अत्यंत कष्टादायक श्रम देण्यात न येता लेखनकार्यावर किंवा देणेच नसेल तर कोणत्या तरी सावलीतल्या सुसह्य हस्तश्रमाच्या कामावर आमची योजना व्हावी आणि आमच्यातील जे अवधीच्या शिक्षेचे म्हणजे यावज्जीवन काळेपाणी झालेले नव्हते असे राजबंदीवान असतील त्यांस देशातल्या तुरुंगाप्रमाणे सूट देण्यात यावी. या मुख्य मागण्या टाचून सर्वांचे वतीने एकादोघाजणांनी त्या अधिका-यांस लेखी कळविल्या. मी लिहिलेल्या अर्जात देशाचे कारागारात पत्रे, भेटी, सूट इत्यादी जे लाभ बंदीवानांस मिळतात ते आम्हास काळेपाणी झाले म्हणून मिळत नाहीत आणि काळेपाण्यावर लेखनकार्य, बाहेर मोकळेपणाने वावरता येणे, पेटी ऑफिसर होणे इत्यादी ज्या

सवलती बंदीवानास मिळतात त्याही आम्ही साधारण बंदीवान नसून विशिष्ट प्रकारचे बंदीवान म्हणून देण्यात येत नाहीत. बरे, विशिष्ट बंदीवान म्हणून विशिष्ट सवलती मागाव्यात तर सांगण्यात येते की, तुम्हांसाठी साधारण बंदीवानशी पक्षपात करून तशा विशिष्ट सवलती देता येत नाहीत! एवंच देशी तुरुंगातील सवलती, काळेपाण्याच्या सवलती, विशिष्ट वर्गाच्या सवलती, अशा सवलतींपैकी एकही लाभकारक सवलत न मिळता त्या तीनही प्रकारच्या वर्गातील हानिकारक निर्बंध मात्र भोगण्यासाठीच काय तो आमचा हा विशिष्ट वर्ग उत्पन्न करण्यात आला आहे! तरी यापुढे असे आम्ही निमूटपणे चालू देणार नाही. त्रासच सोसावयाचा, कोणतीही सवलत मिळावयाचीच नाही तर मग कामही आम्ही करणार नाही. आता त्रास तर त्रासच सोसू, मग जे होईल ते होवो, अशा अर्थाचे लिखाण धाडले होते. या माझ्या आणि इतरांच्या अशास अर्जास अर्थातच फेटाळून लावण्यात आले. संप निश्चित झाला, आणि बाहेरून काम नाकारून एकेक दोघे-दोघे करून मंडळी तुरुंगात पुनः शिक्षा खाऊन येऊ लागली. त्यात कारागारातील मंडळीही एका ठराविक दिवशी एकसहा काम नाकारून समाविष्ट झाली आणि याप्रमाणे दुसऱ्या संपास आरंभ झाला.

माझे बंधू संपात पहिल्याच दिवशी मिळाले होते. शिक्षांचा भडिमार चालला. टोळ्यांच्या टोळ्या पर्यवेक्षकासमोर उभ्या करण्यात येऊन हातकडी, दंडाबेडी, पायबेडी, कोठडीबंदी असे मोठमोठ्याने ओरडून शिक्षा ऐकविण्यात येऊन लागल्या. ज्या त्या भागात राजबंदी हातकडीत टांगलेले दिसू लागले. कोणी हातकडीत बसण्याचा प्रयत्न करू लागले. कोणी पायबेड्या घालण्याचे नाकारू लागले. कोणी आपसात न बोलण्याचे नियम भंगून मोठमोठ्याने एकमेकांशी दुरून उघड बोलू लागले. कोणी बारी वगैरे अधिकारी तुरुंगात येताच बंद्यास जे उभे राहावे लागे ते मुळीच उभे राहिनासे झाले. काम तर बहुतेकांनी नाकारले होतेच. बारी येताच 'सरकार' म्हणून पेटी ऑफिसर ओरडे; सर्व बंदीवान नियमाप्रमाणे नव्हे तर रूढीप्रमाणे उभे राहात, पण राजबंदी बसून राहात. एकेकास धरून उभे करण्यासाठी तीन-तीन माणसे लागत. असे बळे बळे उभे करून आपला सन्मान करवून घेऊन बारी किती दिवस समाधान मानणार? राजबंदीवानांनी काम सोडल्यामुळे त्यांचे अन्न तोडले गेले.

कोणास थोडे अन्न देण्यात येई तर कोणास आठ-आठ दिवस नुसती कांजी मिठाविरहित देण्यात आली. तुरळक मारहाणही होऊ लागली. अशी एकच दंगल उडाली. तुरळक मारहाणीच्या आणि माराच्या बातम्या माझ्या कानावर येताच मी बारीसाहेबांस स्पष्टपणे बजावले की, राजबंदी अजून नुसत्या अप्रत्यक्षपणानेच नियमभंग करीत आहेत. ते तुमचे विनयभंग करतात. तुम्ही त्यांस नैयमिक शिक्षा देता. त्याविषयी आम्ही तुम्हांस विशेष दोष देत नाही. पण जर का अनैयमिक रीतीने तुमचेच नियमाविरुद्ध वागून तुम्ही मारहाणीस आरंभ कराल तर ध्यानात ठेवा की, हे पिसाळलेले तरुण चिडून जाऊन ठोशास ठोसा देण्यास कमी करणार नाहीत. तुम्ही त्यांस तेव्हाच चिरडाल हे ते जाणून आहेत; पण जिवावर उदार झालेल्या सापासारखे ते कुठेतरी आणि केव्हातरी डसून मग चिरडले जातील हे ध्यानात ठेवा. अशा प्रसंगाचे सर्व उत्तरदायित्व या अनियमित रीतीने एकाला तिघांनी धरून मार देणाऱ्या तुमच्या हाताखालच्या निर्दय पेटी ऑफिसरादिकांच्या भ्याड आततायीपणावरच राहील. तीच स्थिती शिव्यांची! वेड्यावाकड्या शिव्या राजबंदीस खालचे, मुख्यत्वे पठाण-सिंधी इत्यादी मुसलमान पेटी ऑफिसर देताना त्यांस उलट तितक्याच बीभत्स शिव्या देण्याइतके शिवराळ ज्ञान जरी सर्व बंदीवानांस नाही तरी पण

त्यांतील काहींनी त्या शास्त्राचे बरेच अध्ययन केले आहे; आणि एकेका हलकट शिवीस ते उलट असल्या वेचक शिव्या हासडू शकतात की बदमाष पठाणांनाही तोंडात बोट घालून उभे राहावे लागेल. शिव्यांवरून मारहाणीवर प्रश्न सहजच येतो. आणि मारहाणीचा परिणाम काय होईल हे मी आपणास स्पष्टपणे सांगितले आहे!

माझ्या अशा सावधानीचा परिणाम बारीवर झाल्याशिवाय राहत नसे. परंतु या सरळ भाषणाचा विपर्यास करून तो वरिष्ठ अधिका-यांस सावरकर मारहाणीस उत्तेजन देतात असे करविण्यास कमी करीत नसे. मी अजून काम सोडले नव्हते. काम सोडले म्हणजे त्या वर्षाचे पत्र जप्त होत असे, बहुतेकांना शक्यतोवर पत्र आल्यानंतर संपात जावे असा मी अनुरोध करीत असे. त्यांतही माझ्या घरच्या पत्रात हिंदुस्थानची बरीच बातमी येत असल्याने ते पत्र म्हणजे आम्हां सर्वांस एक आठवड्याच्या बातम्यांचा पुरवठाच असे. ते पत्र कारागारात कित्येक जण नेऊन पुनः पुनः वाचीत. यासाठी माझी पत्राची अवधी पुरी होत असल्याने पत्र मिळाल्यानंतर संपात समाविष्ट होईन म्हणून मी ठरविले होते. माझे बंधू संपात प्रथमच गेलेले होते.

जसा जसा संप लांबत चालला तसा तसा बारीला कधीही न अनुभवावा लागणारा अपमान अनुभवावा लागून इतर बंदीवानांची दृष्टी फिरल्यासारखी झाली. साधारण बंदीवानावर आपला आयुष्यभर बसत आलेला वचक स्थित राखण्यासाठी झटत असता बारीची कोण तिरपीट उडे! केव्हा केव्हा मोठी गंमत उडे. राजबंदीवानांत काही लोक इंग्रजी फारसे शिकलेले नव्हते; पण बारीशी इतर सर्व राजबंदीवान इंग्लिशमध्ये बोलत, तसे तेही इंग्लिंशमध्ये बोलत असत. परंतु इंग्लिशमध्ये हे लोक माझ्याशी बोलतात म्हणूनच साधारण बंदीवानावर यांचे वजन पडते, अशी विचित्र कल्पना एक दिवस बारीसाहेबांचे बुद्धिमान डोक्यात आली आणि त्याने त्या राजबंदीवानांस म्हटले की, तुम्हांस इंग्रजी बोलण्याचा अधिकार नाही. तुम्ही फार शिकलेले नाही. साधारण बंदीवानांप्रमाणे

तुम्ही इंग्रजीत न बोलता हिंदीतच बोला. झाले. पडल्या फळाची आज्ञा. पहिलेच हिंदी वाक्य त्यांनी उच्चारले ते हे की, इंग्रजी थोडीच देवाची भाषा आहे! तुम्हीच इंग्रजीत विचारता म्हणून इंग्रजीत उत्तर द्यावे लागते. आम्हांस इंग्रजी फारसे बोलता येत नाही ही काही इतकी लज्जास्पद गोष्ट नव्हे! अगदी लज्जास्पद गोष्ट तर ही की, तुम्ही आयरिशांचे पोटी जन्म घेतला असून तुम्हांस आयरिश भाषेचे अक्षरही बोलता येऊ नये! आपली मातृभाषा देखील विसरून जावी इतके फक्कड इंग्लिश आम्हांला बोलता येत नाही हे आम्हांस भूषणास्पदच आहे. तुम्हांला मात्र जन्मभाषेचा गंधही उरू नये इतके उत्तम इंग्लिश बोलता येते याची लाज वाटली पाहिजे! हिंदी भाषेतली ही पहिली सरबत्ती झडताच बारीसाहेबांकडे साधारण सर्व बंदीवान टकमक पाहू लागले. कारण राजबंदीवान इंग्रजीत बोलत तेव्हा ते काय बोलत हे बंदीवानांस इतके स्पष्ट कळत नसे आणि इंग्रजीत राजबंद्यांची जशात तशी उत्तरे सहन करीत बारी ज्या पूर्वीच्याच ऐटीने उभा राही त्या ऐटीवरून त्याची किती नापत होत होती ती बंदीवानांस यथातथ्य समजत नसे. पण आता हिंदीमध्ये रोखठोक जबाबांचा भडिमार उडू लागला पाहता पाहता बहुतेक राजबंदीवान हिंदीत उत्तरे देऊ लागले. त्यातही उत्तर हिंदुस्थानातील दोघांची ती सभ्य भाषेस सभ्य भाषा पण शिवीगाळीस अस्सल बावन कशी शिवीगाळी! शुद्ध हिंदीत ऐकता ऐकता ‘भीक नको पण कुत्रा आवर’ अशी त्रेधा उडाली. एक दिवस बारीच्या नेहमीच्या तोंडाळ सवयीप्रमाणे तो अशाच एका राजबंदीवानास हिंदीत म्हणाला, “तुम हिंदुस्थानी लोक हमारे गुलाम है!” इतर बंदीवानांस आपल्या वाक्याने

आपण राजबंदीवानांस कसे तुच्छ लेखतो हे कळले असावे असे समजून साहेब जो गदगद हसू लागले तो हिंदीतच उत्तर मिळाले, "आम्ही हिंदुस्थानी लोक इंग्रजांचे गुलाम आहो; परंतु तुमचे नाही. तुम्ही तर स्वतःच इंग्रजांच्या बटकीची पोरे! आयर्लंड इंग्लंडची बटिक आहे! तिची तुम्ही मुले. आम्ही इंग्रजांचे गुलाम आहोत तर त्या गुलामगिरीचा नायनाट करण्यास जिवावर उदार होऊन झटतही आहो. पण तुम्ही मात्र जो दोन तुकडे फेकतो त्याच्या घरास आपलेच घर समजून धन्याप्रमाणे वागू इच्छिणाऱ्या कुत्र्यासारखे आयर्लंडला गुलाम करणाऱ्या साम्राज्यालाच आपले साम्राज्य मानून तसे न मानणाऱ्यावर देशोदेशी भुंकत फिरत आहा!" अशा अर्थाचे हिंदी भाषेतील उत्तर ऐकताच सर्व बंदीवान अगदी ऐकू जाईल इतक्या खिदीखिदी हसले. बारीसाहेब रागाने लाल झाला. पण करतो काय? राजकीय विषय त्यानेच होऊन काढलेला. तेव्हा केवळ इतकेच ओरडत राहिला की हिंदीत नाही इंग्रजीत बोला! इंग्रजीत! इंग्रजीत!

पण तो राजबंदी काही केल्या इंग्रजीत बोलेना! "नाही! तुम्हीच म्हणालातना हिंदीत बोलत जा म्हणून! आता इंग्रजीत आम्ही कधीही बोलणार नाही. हिंदीतच बोलणार" असे हिंदीतच मोठमोठ्याने म्हणत वरील आयर्लंडविषयक सर्व वाक्ये त्याने हिंदीत उच्चारली. त्या दिवसापासून पुनः "हिंदीत बोला" म्हणून तो कोणासही म्हणाला नाही! कानास खडा लावून राजबंदीवानांनी पुन्हा पूर्ववत इंग्रजीतच त्यांच्यासी बोलावे म्हणून स्पष्टपणे तो इच्छा प्रदर्शित करू लागला.

अनेक लहानमोठ्या प्रसंगांनी तुरुंगातील शिस्त आणि सरकारी दरारा बिघडलेल्या राजबंदीवानांच्या चळवळीने डळमळूनच गेला. एक वेत मारणे सोडून बाकी बहुतेक सर्व शिक्षा दोनदोनदा घेऊन अधिकारी थकले; पण कोणी काम करीना. वेत मारण्याच्या धमक्या रोज देण्यात येत होत्याच, पण कोणी ऐकेना. अखेर हलक्या कामावर आम्ही तुम्हांस नेऊ, काम नाकारण्याच्या आणि त्यात समाविष्ट होण्याच्या अपराधाकडे दुर्लक्ष करून तुम्हांस लगेच बाहेर सोडू आणि तुम्ही राजबंदीवान आहात की नाहीत हे ठरवून घेण्यासाठी वर हिंदुस्थान सरकारास लिहू असे बारीकडून आणि सुपरिन्टेंडंटकडून बोलणे चीफ कमिशनरने लावले. त्याचप्रमाणे एकदा कामे सुरू करतानाच बाहेरही धाडण्यात आले. त्यांस हलके काम मिळाल्याची बातमी येताच सध्या इतके तरी पदरात पाडून घ्यावे असे बरेच जणांचे मत पडले. मला कसेही करून प्रचारार्थ आणि सुटकेच्या दृष्टीनेही राजबंदीवानांनी बाहेर जावे हे अत्यंत इष्ट दिसत असल्याने संप संपवून कामे करावी. जर कराराप्रमाणे बाहेर सर्वांना न धाडले तर पुनः संपकरावा असे मी सांगू लागलो. थोड्याच दिवसांत माझ्या बंधूसह सर्वजण कामे करू लागले.

अधिका-यांनीही कराराप्रमाणे बऱ्याच राजबंदीवानांस पुनः बाहेर धाडले. कामेही एकंदरीत पहिल्यापेक्षा बरीच हलकी - नारळावर पहारे देणे, झाडू मारणे इत्यादी प्रकारची - मिळाली. वास्तविक पाहता त्यांनी जर सर्वांस असेच बाहेर धाडले असते तर हा संप तेथेच मिटला असता. परंतु मंडळींनी कामे करण्यास आरंभ करताच अधिका-यांनी संपात ज्यांच्यावर पुढारी म्हणून त्यांचा विशेष राग झाला होता, त्यांना बाहेर काढण्याचे नाकारले. माझे बंधू, श्री. वामनराव जोशी, होतीलाल, श्री. नानी गोपाळ आणि आणखी दोघेतिघे यांस बाहेर काढीनात. माझे तर नावच नको. मी संपात काम सोडले नव्हते. तरी देखील संपाचे खापर मुख्यत्वे मजवर फोडले गेले. तरीही संपात ज्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला, ज्यांच्यावर मजहून अनेक वेळा कारागारीय खटले झाले, ते एकदा बाहेर धाडले असताही तेथे

काम न करून पुनः परत आले तसल्या राजबंदीवानांनाही पुनः बाहेर धाडले ते योग्यच झाले. कारण निरुपाय म्हणूनच संपात त्यांस भाग घ्यावा लागला; परंतु जी योग्य गोष्ट त्यांच्या उदाहरणात केली गेली तीच माझ्याही प्रकरणी का केली जात नाही हे मी विचारले असता अधिका-यांस काहीही उत्तरे देता येणे शक्य होईना. “तुमचा हिंदुस्थानातील पूर्वेतिहास आम्हांस तुम्हास बाहेर काढू देत नाही” असे चीफ कमिशनरने लिहिले होते त्याचे उत्तरही मी दिले की, माझ्याप्रमाणेच जे बाहेर गेले तेही त्याच कलमाखाली तसल्याच चळवळीत भाग घेतला म्हणून जन्मठेपीची शिक्षा घेऊन आलेले होते, मग मागचा इतिहास त्यांच्या प्रकरणी का आड येत नाही? माझ्याच का? इतकेच काय परंतु अंदमानाच्या वसाहतीचे धोरणच मुळी असे होते की, मागची सात जन्मांची टाचणे उलगडीत न बसता तो वसाहतीत कसा वागतो यावरून बंदीवानांचे वर्तन मुख्यत्वे ठरवावयाचे. इतकेच नव्हे तर तेथेही जे दोन-तीनदा तुरुंग फोडून पळाले त्यांसही काय एकदोन वर्षे काराबंधाची शिक्षा होईल ती त्यांनी भोगताच पुनः बाहेर सोडण्यात येई. या माझ्या उत्तरास लेखी उत्तर आले की, हिंदुस्थान सरकारचा तुम्हास सोडू नये म्हणून हुकूम आहे! बरे, किती वर्षेपर्यंत मला सोडू नये म्हणून हुकूम आहे तेही निश्चित कळवीनात. तेव्हा हिंदुस्थान सरकारास अर्ज करावा म्हणून आम्ही ठरविले; पण हिंदुस्थान सरकारास अर्ज धाडू देईनात. असा कोंडमारा होऊ लागला. माझे बंधू तर माझ्याहूनही पूर्वी आलेले होते. परंतु त्यांसही बाहेर काढतो म्हणत पण काढीनात. एकदा पर्यवेक्षक माझ्याशी असाच युक्तिवाद करता करता म्हणाले की, तुमच्या प्रश्नास उत्तरे नाहीत ही गोष्ट खरी आहे. परंतु तुम्ही संपास उत्तेजन देता!

मी म्हटले, पण संपात जे प्रत्यक्ष भाग घेतात ते तर बाहेर गेले आहेत, आणि ते योग्यच झाले. मग नुसते तुम्ही संप केला हे बरोबर केले असे म्हणणाऱ्याचा अपराध प्रत्यक्ष संपकरण्यापेक्षा अधिक म्हणावयाचा की काय? हे दंडविज्ञानाच्या तत्वाच्या सर्वस्वी उलट नाही काय? आणखी असे पाहा की, मी संपास आजवर उत्तेजन का दिले नाही? किंवा दिले असले तर ते माझे मित्र का मानीत नव्हते? आजच संपका झाला? इंदूस फाशी खाण्यास मीच उत्तेजन दिले का? उल्लासकरास वेडे होण्यासही मी शिकविले का?

राजबंद्यांस ज्या खाण्यापिण्याच्या, कष्टदायक कामाच्या, मानसिक चिंतेच्या, भावी निराशेच्या आणि पदोपदी अपमानाच्या तीव्र यातना सहन कराव्या लागल्या आणि लागत आहेत त्या कारागारीय पद्धतीच्या यातनाच संपास उत्तेजन देतात, मी नव्हे. तुम्ही राजबंदीवानांप्रमाणे त्यांस सवलतीने वागवा, निदान साधारण चोर-दरोडेखोरांप्रमाणे तरी त्यांस लेखन इत्यादिकांवर नेमा म्हणजे कोण कशास संप करणार? आधीच कष्टमय असलेल्या कारावासात संपकरून कमी अन्नावर किंवा कांजीवर खोलीत तडफडत पडून कष्टतर दुर्दशेत पडण्याची आम्हांस हौस का आहे? मी तर अजून देखील काम सोडले नाही; मग संपाचा दोष आमचेवरच तुम्ही कसा ढकलता? वारंवार माझ्या या कोटिक्रमाचे यथार्थत्व तेथील स्थानिक अधिकारी - प्रसंगी बारीदेखील - स्पष्टपणे मान्य करीत. पण इतकेच म्हणत, “हे आमच्या हाती नाही. हिंदुस्थान सरकारचे हाती आहे. त्याचे आज्ञेने तुम्हास कारागृहातच ठेवणे भाग आहे.”

माझ्या प्रकरणाची अशी घासाघीस चालली असता आणखी एक प्रकरण अगदी विकोपास आले. अंदमानात राजबंदींमध्ये धैर्याने कष्टास तुच्छ लेखून जे काही लोक शेवटपर्यंत हटातटाने राहिले, त्यांत बंगाल्यातील एक

सोळा-सतरा वर्षांचा ब्राह्मणाच्या संभावित कुळातील नवयुवक नानी गोपाळ हा होता. बंगामध्ये एका मोठ्या युरोपियन पोलीस अधिकाऱ्याच्या धावत्या मोटारीवर बॉंब फेकल्याच्या अपराधासाठी त्यास चौदा वर्षे शिक्षा झाली होती. तुरुंगात सोळा वर्षांच्या मुलास घाण्याचे कठीण काम देण्यात येत नसे तरीही त्यास घाण्यास जुंपण्यात आले! त्याविषयी अर्थातच वाद वाढून त्याने काम नाकारले. गेल्या संपात सर्वांमध्ये ज्यांस अधिक त्रास सोसावा लागला त्या चौघा-पाचांत तो एक होता. मोठ्या राजबंदीवानांत राहून तो बिघडतो असे वाटून त्यास एकीकडे ठेवण्यात आले; पण त्याची चिकाटी सुटेना. तो नमेना. हातकडीत बहुधा तो उभाच असे. जो जो जास्त जास्त शिक्षा होत तो तो तो अधिकच चिडे. काम सोडले म्हणून शिक्षा झाल्या. त्याने कपडे धुणेही सोडले. कपडे धुवीना म्हणून गोणपाटाचे पोत्याचे फाडून केलेले खरखरीत कपडे शिक्षेस्तव दिले, तर त्याने कपडे घालणेच सोडून दिले. ते गोणपाटी कपडे त्याच्या अंगात बळाने दोघाचौघांनी त्याला पाडून घातले आणि जवळ जवळ शिवून पक्के केले तर त्याने रात्री फाडून टाकले. म्हणून हातांस रात्रीदेखील हातकड्या घालून कुलपे ठोकली तर त्याने रात्रभर गुपचूप खटपट करीत हातकड्या तोडून टाकल्या. का तोडल्यास म्हणून शिव्यागाळी केल्या तर त्याने उत्तर देणेच सोडून दिले. अधिका-यांच्या प्रश्नास उत्तर न देणे या उद्दामपणाबद्दल शिक्षा दिली तर त्याने अधिकारी येताच उभे राहणेच सोडून दिले. याची शिक्षा म्हणून कोठडीबंदी वाढविली तर तो कोठडीतून कशाही कार्यास बाहेरच येईनासा झाला. स्नान देखील करण्यास बाहेर येईना. तेव्हा बळेबळे उचलून आणून नागवाचा नागवा हौदावर पाडून भंग्याकडून स्नान घालवीत आणि नारळाच्या छिलक्याच्या तुकड्याने अंग घासवीत की ह्याची पाठ अर्धरक्ताळल्यासारखी लाल होऊन आग आग व्हावी. पण तो हटेना. त्यास दुष्ट पठाण एकांतात बीभत्स शिव्या देत. दिवसा तो नागवा राही म्हणून रात्री त्याचे एक कांबळे काढून घेतले तर त्याने दुसरेही फेकून दिले. दिवसारात्री तसाच नागडा उघडा थंडीत कुडकुडत नुसत्या भुईवर तो महिनोगणती पडलेला होता! त्याचे मुख्य मागणे हे होते की, आम्हास राजबंदीवान म्हणून लेखले जावे.

तो म्हणे, अन्न वाईट की चांगले हा प्रश्न दुय्यम आहे; मानाचा प्रश्न पहिला आहे. आम्ही राजबंदीवान आहोत, साधारण चोर-डाकू नाही हे सिद्ध झाले पाहिजे. चीफ कमिशनरांनी त्यास तुझी मागणी कधीही मान्य करता येणार नाही म्हणून कळविले. पण तो ऐकेना. अखेर कमिशनरने त्यास स्वतः येऊन सांगितले, “तुला वाटते तू तसा हालात राहिलास की, आम्ही द्रवू वा भिऊ पण ते काही नाही. तू तेथे तसा मेलास तरी आम्हांस काय चिंता?” परंतु चिंता नसली तरी अधिकाराचा जो उपमर्द तो ते सतरा वर्षांचे पोर एकसारखे करीत होते तो मात्र अधिकाऱ्यास स्वस्थ बसू देईना. बारीचे नेहमीच म्हणणे असे की, एकदा या राजबंदीवानांतील दोघा-तिघांस वेत मारले की आताच्या आता हे बाबू लोक शुद्धीवर येतील. साधारण बंदीवानांचा त्यास तसा अनुभव असे. उलटपक्षी आमच्यातल्या दोघातिघा तरुण वर्तमानपत्रांच्या संपादकांनी सांगावे की, राजकीय बंदीवानांस वेत मारू नयेत अशी मोर्लेची आज्ञा झालेली आपण स्वतः वाचली आहे. या बातमीने वेत मारण्याच्या धमक्याच आहेत असे आम्ही बहुतेक समजत असू. तथापि संपात मी नेहमी सांगे की, आज्ञा तशी ती बदलविणेही त्यांच्याच हातात असल्याने आपण वेतही वेळेवर मारले जातील असे गृहीत धरूनच संपात समाविष्ट झाले पाहिजे. यःकश्चित पोर व दरोडेखोर अशी वीस वर्षांची बर्मा पोरे तीस-तीस वेत हू का चू न करताना खातात याचे कारण लहानपणापासूनच्या सवयीने

ती निर्ढावलेली असतात. आपणही निश्चयाने निर्ढावू. वेत मारले तर वेत खाऊ. अशा प्रकारे निर्धार केल्याने चीफ कमिशनरनेही वेत खावे लागतील म्हणून बजावले तरी नानी गोपाळ ऐकेना. कोलू तर राहोच पण कोणतेही काम करीना. अखेर त्रासून अधिका-यांचा बारीचे युक्तीकडे कल होऊ लागला आणि शेवटी त्यांनी नानी गोपाळास वेत मारण्याचे ठरविले !

ती बातमी अगदी गुप्त म्हणून बारीने मला आधी कळविली. मी म्हटले, आपण जरी एकांतात व्यक्तिशः म्हणून ही बातमी सांगत आहा तरी आपण अधिकारी म्हणूनच ती सांगत आहा आणि माझे उद्‍गार आपण वरील अधिका-यांस कळविण्यासाठीच सांगत आहा हे मी जाणून आहे, तरी आपणास स्पष्टपणे असे सांगणे हे मी माझे कर्तव्य समजतो की, जर त्या मुलास तुम्ही वेत माराल तर आजपर्यंत कधीही बिथरले नाहीत असे राजबंदी बिथरून जातील. या लोकांचे मागचे धाडस आणि भयंकर कृत्ये तुम्ही आठवा, तुम्ही समर्थ आहा, तुमच्या पासंगासही त्यांची येथील शक्ती पुरणार नाही. पण त्या शक्तीने जे काय होईल ते करावयास ते चुकणार नाहीत. अजून साधारण प्रतिवाद आणि प्रतिकार ते करीत आहेत. पण जर असाधारण शिक्षा दिल्या गेल्या आणि रक्त सांडले तर रक्त सांडण्यास ते कमी करणार नाहीत. हे मी काय व्हावे ते सांगत नाही तर काय होणे संभवनीय आहे ते सांगत आहे.”

बारी हसला. गेला पण मनात दचकल्याविना राहिला नाही. तिकडे वेत मारण्याची शिक्षा सांगण्यात आली, वेताची तिरडीही उभारली. आम्हास खोल्याखोल्यांतून बंद करण्यात आले की दंगाधोपा होऊ नये. आता वेत सडकताच उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांडीसरशी नानी गोपाळाची किंकाळी ऐकू येते की काय म्हणून आम्ही सगळे दचकून कान लावून बसलो तोच एक वॉर्डर साहस करून मजकडे तशाही बंदोबस्तात आला आणि नानी गोपाळास तुरुंगाबाहेर धाडून दिले म्हणून सांगून निघून गेला. थोडक्याच वेळात ओव्हरसीअर जाणून- बुजून मजकडे आला आणि विनोदाच्या पांघरुणात म्हणाला, काय, “नानीची X X X फाटून दुभंग झाली आहे.” त्याच्या या अश्लील भाषेकडे लक्ष न देता मी हसत म्हणालो, “नानीचे तर काही एक दुभंग झाले नाही; आणखी कोणाचे असेल तर; नानीला वेत न मारताच तुरुंगाबाहेर धाडण्यात आलेले आहे ही नवी बातमी मी तुम्हास सांगतो!” तो चकित झाला, परतला. “माझ्यावरच्या पेटी ऑफिसरास मात्र ही बातमी इतक्यात कशी कळली, तू काय पाहतोस, कोणी सांगितली ती, पकडून आण त्याला” म्हणून रागावत निघून गेला.

ती बातमी खरी होती कारण शिक्षा दिल्यावरही अधिका-यांस तिचे उत्तरदायित्व घेववेना. चीफ कमिशनरला दूरध्वनी (टेलिफोन) केला तोही चाचरला आणि शेवटी तो वेताची शिक्षा रद्द करून नानीस त्या तुरुंगातून काढून बाहेर एका जिल्ह्यातील जुन्या तुरुंगात काही दिवस ठेवावा म्हणून दूरध्वनीनेच आज्ञा देण्याची त्यांस सुबुद्धी झाली. एवीतेवी हे संकट टळले. परंतु जरी नानी गोपाळास वेत मारण्याचे नाकारले हे आम्हांस बरे वाटले तरी त्याचा फारच हिरमोड झाला! त्याला वेत खाऊनही मी चिकाटी धरून दाखवीन म्हणून जी एक तरारी वाटत होती ती उतरली. त्याच्या या धैर्याची वाहवा शत्रूंनाही केल्यावाचून राहवले नाही. त्यास आम्हापासून दूर नेले की तो तेथे आमच्या उत्तेजनाच्या कक्षेबाहेर पडल्याने नरम होईल अशी अधिका-यांची अटकळ होती. पण लवकरच ही

उत्तेजनाची आपत्ती किती चुकीची होती हे त्यांस समजून आले. कारण आम्हापासून दूर होताच त्याने त्या बाहेरील बंदीवासात अन्नत्याग केला.

तो आत होता तोवर अन्नत्यागापासून आम्ही त्यास एकसारखे परावृत्त करीत होतो. त्याच्या अन्नत्यागानंतर तीन-चार दिवस त्याच्याकडे कोणी लक्ष दिले नाही. तो कोणाशी काही बोलला नाही. अन्नपाण्यावाचून नुसता पडला होता. हे नवीन प्रकरण पाहून अधिका-यांनी त्यास उचलून पुनः आमच्या सेल्युलर तुरुंगात आणून बंद केले तरी तो अन्न घेईना. पुढे पाचसहा दिवसानी त्यास नियमानुरूप बळाने नाकातून नळी ढोसून दूध पाजण्यात येऊ लागले.

आत नानी गोपाळची ही स्थिती झाली असता बाहेर एक नवीनच प्रकरण उपस्थित झाले. बाहेर गेलेल्या राजबंदीवानांत बहुतेक एकमेकांस भेटण्यासाठी हजार नियम केले तरी ते मोडून या जिल्ह्यातून त्या जिल्ह्यात गुपचुप जात असत. हे ध्यानात ठेवले पाहिजे की, इतर बंदीही असेच चोरूनमारून भटकत. परंतु कोणतीही गोष्ट राजबंदीवानांनी केली की, तिने अधिकारी लगेच दचकत. स्वदेशाची बातमी आणणे आणि इतर बंदीवानांमध्ये स्वदेशी व्रताचा प्रसार करून बंदीवानांत देशभक्ती उत्पन्न करणे हे आपले कारागारातील एक कर्तव्यच आहे असे मानणाऱ्या मंडळींनी आठवड्यात ज्या काही लपूनछपून बातम्या मिळविलेल्या असत त्या एका कागदावर उतरून, त्याचेबरोबरच एखादी नवी देशभक्तीची कविता लिहून त्या कागदाच्या दहावीस हस्तलिखित प्रती जिल्ह्यातून वाटाव्या. त्यात पुढे पुढे एक संपादकीय लेखही लिहिला जाऊ लागला! अर्थातच तो कागद वर्तमानपत्राचे पिलू शोभू लागला. बंदीवानातून पुढे चालता चालता काही तत्रस्थ 'स्वतंत्र' लोकांचीही ओळख होऊन राजबंदीवानांचे वजन वाढू लागले. हे 'स्वतंत्र' म्हणजे पूर्वीच्या बंदीवानांच्या सुटकेनंतर तेथेच वसलेल्या कुटुंबाची संतती होती. राजबंदीवानांच्या ह्या चळवळीची माहिती अतिशयोक्तीने फुगत फुगत एका मोठ्या कटाचे रूप घेऊन अधिका-यांच्या कानावर जात चालली. इतक्यात अंदमानातील राजबंद्यांच्या स्थितीची, इंदुभूषणाच्या फाशीची, उल्लासाच्या वेडाची अशी काही गुप्तपणे धाडलेली पत्रे हिंदुस्थानात पोचली आणि ती रोमांचकारी यातनांची कहाणी हिंदुस्थानी पत्रांतून छापली जाताच अंदमानातील अधिका-यांत एकच खळबळ उडाली. हिंदुस्थानातल्या पत्रांतील एखादा लेख इकडे कितीही भिकारडा वाटो, पण तिकडे अंदमानात आम्हांस त्यायोगे एक दिवस तरी सुखाचा जाई. कौन्सिलातून अंदमानाच्या राजंबद्यांविषयी विचारलेला एखादा प्रश्न - मग त्यास इकडे कितीही तुच्छतादर्शक उत्तर मिळो - आम्हांस एक महिनाभर तरी जीवन किंचित सुसह्य रीतीने घालविण्याची शक्ती देई. कारण आम्ही वाटेल तसे तुडविले गेलो तरी आम्हांस कोण विचारतो, असे वाटून जी एक प्रकारची तीव्र निराशा मनास भग्नोत्साह करी ती लवमात्र दूर होई. लवमात्र हे समाधान वाटे की, आपण भोगीत असलेल्या यातना अगदीच निरुपयोगी न राहता त्यांच्या प्रसिद्धीकरणाने तिकडे त्या महान आगीत तेलाचा एक थेंब तरी अधिकच ओतू शकतात हा विचार मनास पुनः सुदृढ आणि तितिक्षू करी. दुसऱ्या पक्षी आज नाही उद्या पण राजबंद्यांस आपण कसे वागवितो याची चौकशी झाल्यावाचून राहणार नाही. इतकेच नव्हे तर प्रसंगी आपणास त्याविषयी उत्तरही द्यावे लागेल, अशी भीती तत्रस्थ अधिका-यांच्या मनात उद्भवून ते पुष्कळ विचार करून वागू लागत आणि ज्या त्या कामात हिंदुस्थान सरकारची संमती विचारून मग काय ते करीत, हा परिणाम आणि ही भीती अगदी

प्रथमच अनुभवास येत नसे. प्रथम प्रथम तर उलट अधिकच कडक आपत्तीशी आम्हांस सामना करावा लागे. परंतु शेवटी त्यायोगेच त्यांस राजबंदीवानांच्या बोलण्याकडे लक्ष देणे भाग पडे.

ह्याही वेळेस तेच झाले. हिंदुस्थानातील पत्रांत ही बातमी कोणी धाडली, कोणी लिखिते नेली इत्यादी गोष्टींचा बरोबर पत्ता न लागल्याने अधिकारी चिडून गेले. थोडे दिवस तसेच गेले. बाहेर धाडण्याविषयी माझ्या अर्जाची सुनावणी होऊन मला त्यापूर्वी पाच-सहा दिवसच उत्तर मिळाले होते की, तुम्हास सोमवारी बाहेर धाडण्यात येईल. मलाही आश्चर्य वाटले! वाटले मी गेलो की बंधूही बाहेर जातीलच! घाईघाईने कविता ज्या भिंतीवर त्या चाळभर लपून कोरलेल्या होत्या त्या पाठ करून टाकल्या आणि सोमवारची वाट पाहत राहिलो. पण विश्वास मुळीच नव्हता की ते मला बाहेर धाडतील म्हणून. सोमवार आला. इतर कित्येक बंदीवान बाहेर धाडण्यात आले; पण मी आपला कोठडीतल्या कोठडीत बंद! तिसरे दिवशी पर्यवेक्षक आला. मी विचारले हे काय? तो जरा वचनाचा प्रामाणिक असे. त्यानेच मला सोमवार म्हणून सांगितले होते. म्हणून त्यासही जरा ओशाळल्यासारखे झाले. त्याने सांगितले की, चीफ कमिशनर रंगूनला गेला आहे. येताच काय ते कळेल. तेव्हाच शंका आली. एकदाचा कमिशनर रंगूनहून लेफ्टनंट गव्हर्नरला भेटून आला. तेथे काय ठरले कोण जाणे. पण मला बाहेर धाडण्याचे ठिकाणी एक दिवस सकाळी जे जे बाहेर गेले होते त्या राजबंद्यांची उभ्या अंदमानात एकदम धरपकड सुरू झाली!

कोणाला हातकड्या घातल्या. कोणास तसेच धरून ठेवले. कोणाच्या खोल्यांचे झाडे घेतले गेले. वाढता वाढता राजबंद्यांवरून ती आपत्ती इतरांवरही कोसळली. काही स्वतंत्र घरांची, काही जमादारांची, काही तांडेलांची पाहावे तेथे झडती, धरपकड! गोऱ्या अधिकाऱ्याची उग्र आरडाओरड! सर्वजण भयचकित झालेले. कारण राजबंदीवानांनी बॉंबगोळे करून अंदमानमधून जाण्याचा एक मोठा कट रचला आहे अशी अधिका-यांस बित्तंबातमी कळली होती. परंतु इतक्या झडत्याबिडत्यातून एखादा बॉंबगोळा तर काय परंतु लवंगी फटाका देखील सापडला नाही. तो बित्तंबातमी देणारा लालमोहन नावाचा बंगाली पुढे आणखी अशाच एका प्रकरणात खोटी बातमी दिल्याच्या अपराधावरून अधिका-यांचेच क्रोधास पात्र झाला होता. त्यावरून त्याची ही बातमी किती खरी होती हे दिसतच आहे आणि आश्चर्याची गोष्ट की, ह्याच वॉर्डरने पूर्वी होतीलालाच्या पत्रास इष्ट स्थळी आपल्या हाताने पोचवल्याची शंका अधिका-यांस आलेली होती. क्वचित त्या शंकेमुळे झालेला अधिका-यांचा राग शमविण्यासाठीच वॉर्डरमहाशयांनी राजबंद्यांविरुद्ध ही चुगली केली असावी.

ते काय असेल ते असो. पण राजबंद्यांच्या दुर्दशेला पारावार उरला नाही. कोणी म्हणे, कोणत्या ओहोळात बॉंब सापडला, तर कोणी म्हणे अमक्या राजबंदीवानाने बोटी आणविण्याची धाडलेली पत्रे धरली गेली आहेत. कारण काय होईल हे कोणासच कळेना. राजबंद्यांस या दंगलीचा लाभ घेऊन धर-धरून तुरुंगात कोंबण्यात आले. एवढ्यासाठी तर चीफ कमिशनर रंगूनला गेला होता! बारीच्या महत्वास तर सीमाच उरली नाही. तो कमिशनरला सांगे, तुम्हास वाटे मीच वाईट! पण हे भयंकर लोक, तुम्हास देखील त्यांस सभ्यपणाने वागविता आले नाही. त्यांस उठता लाथ बसता बुक्कीच ठीक.

आधीच बम्महादेवाच्या प्रसादाने एकेक जन्मठेप मिळालेल्या आम्हां राजबंदीवानांना पुनः त्याच बम्महादेवाची ही दुसरी कृपा काय प्रसाद देते ही चिंता रात्रंदिवस लागून राहिली. त्या चिंतेत आमच्या बाहेर

जाण्याचा प्रश्न जो एकदा बुडाला तो पुनः काही वर आला नाही. बाँबगोळ्याच्या आणि अंदमान उडवून पळून जाण्याच्या कटाची बातमी ऐकल्याने किंवा ऐकल्यासारखे केल्याने अधिकारी अगदी उर्मटपणे सांगू लागले की बाहेर जाण्याचे आता नाव काढू नका. हिंदुस्थान सरकारचा शेवटचा हुकूम आला आहे. शिक्षा संपल्यावर किंवा मेल्यावर काय ते तुरुंगाचे बाहेर पडाल !

एक जन्मठेप कंठित असलेले निःसहाय, अवश, एकेक करून कोठड्यातून कोंडलेले त्यात हा नवा भयंकर आरोप तरी नक्की काय आहे हे न कळलेले, अशा स्थितीत मानसिक चिंतेने त्या राजबंदीवानांची अशी उत्तरे ऐकून काय स्थिती होई त्याचे काय वर्णन करावे? थोडे दिवस अशा असंघटित आणि कर्तव्यमूढ अवस्थेत गेले.

परंतु थोडेच दिवस. कारण एक- दोन आठवड्यांतच पुढील कार्यक्रमाची साधारण रूपरेषा आखली गेली. प्रथमतः उगीच न घाबरता दोघा-तिघांनी असा अर्ज करावा असे ठरले की, काय आरोप तो नक्की कळवा. कट, राज्यक्रांती, राजद्रोह, बाँब करणे, पळून जाण्याचा बेत, काय जो अपराध तुम्हांस वाटत असेल तो उघड आरोपित करून आमच्यावर खटला भरा. जे बाहेरून आले त्यांच्यातील ज्यांनी ज्यांनी ह्याप्रमाणे सांगितले त्यांना त्यांना बरीच हो ना करता करता अखेर उत्तरे देण्यात आली की तुमच्यावर खटला भरावा इतका आमच्यापाशी पुरावा नाही! परंतु पुरावा नसेल तर बाहेर सोडा म्हटले तर ते मात्र नाव काढू नका म्हणून धमकी मिळे. अंदमानामध्ये जेथे बंद्यांवरील खटल्यांत वकीलही देता येत नाही आणि पंचही - ज्यूरीही - नाहीत अशा न्यायकोर्टात बारीसारखे पुरावा उत्पन्न करणारे कर्तबगार लोक असताही उघड चौकशी करण्याइतका पुरावा जर मिळू शकला नाही तर तो आरोपच किती काल्पनिक किंवा अतिरंजित असला पाहिजे हे काही सांगावयास नको. पण तो आरोप सबळ नसला तरी सोयीस्कर होता. त्यायोगे हिंदुस्थान सरकारकडे भयंकर चित्रे रंगवून धाडता येऊन ही राजबंदीवानांची ब्याद त्या कारागृहातच डांबून टाकणे बरे असे त्याचे मत करविण्यास आणि एतावता मला कारागृहातून बाहेर सोडण्याची आपत्तीही सहज टाळण्यास अधिका-यांस एक परिणामकारक साधन मिळाले.

## मी अन्नत्याग केला.

मी जेवण नाकारिले म्हणून कळताच अधिकारीवर्गात एकच खळबळ उडाली. चीफ कमिशनरने हे प्रकरण कसेतरी मिटवा म्हणून पर्यवेक्षकास कळविले. अन्न सोडविण्यासाठी मजवर खटला भरला होता; पण खटल्याचे वेळी शिक्षा न देता मला जेवण स्वीकारावे म्हणून आग्रह करण्यात आला. मी माझा हेतू कळविताच ‘नानी गोपाळास’ मला भेटू देण्याविषयी परवानगी देण्यात आली. मी तीन दिवसपर्यंत अन्नग्रहण करीत नाही हे नक्की कळताच नानीसहि फार वाईट वाटले. बारीसाहेबासह मला त्याची भेट घेण्यास धाडण्यात आले.

## अन्नत्यागाच्या संपाचा अंत

अन्न त्यागून उपाशी स्वतःच मरत पडण्याच्या स्वपक्षघातक युद्धपद्धतीचा मी तीव्र विरोध करीतच होतो. त्याचा परिणाम होऊन अन्नत्यागाची कल्पना मंडळीनी सोडून दिली. सगळ्यांमध्ये ‘नानी गोपाळास’ अन्नग्रहण करण्यास सिद्ध करणे अत्यंत कठीण गेले. सर्व उपाय थकले. तो अगदी मरणाच्या दाराशी बसला. तेव्हा असा

धीरोदत्त मनुष्य व्यर्थ मातीच्या मोलाने जाऊ नये म्हणून निर्वाणीचा उपाय योजून पाहावा असे मी ठरविले आणि जर तू अन्नग्रहण करणार नाहीस तर मलाही अन्नत्याग करावा लागेल, असा धाक घातला. लगेच दुसऱ्या दिवशी तेव्हा माझ्या म्हणण्यास त्याने मानिले आणि अन्नग्रहण करण्याचे ठरविले. मी त्यास स्पष्ट सांगितले की, "मरावयाचे तर असे बायकी हट्टाने व्यर्थ मरू नकोस. काही तरी......मग मर !" शेवटी त्यानेही अन्नग्रहण केले, मीही उपास सोडला.

आता दोन वेळ मिळेल ते अन्न - कारण कामे सोडल्याने सरकारी शिक्षा म्हणून कमी अन्न देण्यात येई - खालून वर नारळाचा सप्पा राजबंदीवान उडवू लागले पण काम तेवढे करीनात. उपाशी का मरता, हिसकून हिसकून अन्न घ्या, लठ्ठ व्हा आणि काम मात्र करू नका! हा माझा मंत्र सगळ्यांनी उचलला, तेव्हा जे राजबंदी अवधीच्या शिक्षांचे होते त्यांवर काम सोडण्याच्या अपराधासाठी तुरुंगातील सर्व शिक्षा संपल्याने मॅजिस्ट्रेटपुढे खटले करण्यात आले. कोणास दोन महिने शिक्षा वाढली, कोणास चार महिने, नानी गोपाळास एक वर्ष शिक्षा वाढली.

मागे लिहिलेच आहे की हिंदुस्थानात अंदमानच्या माहितीची पत्रे छापिली गेल्याने बरीच खळबळ उडाली होती. त्यात या कटाच्या प्रकरणाची भर पडल्याने हिंदुस्थान सरकारलाही एकदा अंदमानातील परिस्थिती प्रत्यक्ष पाहून येण्यासाठी कोणास तरी धाडणे अवश्य आहे असे वाटले. तेव्हा स्वतः गृहमंत्री (Home Member) सर रेजिनाल्ड क्रॅडॉक - जे पुढे ब्रम्हदेशचे गव्हर्नर झाले ते - अंदमानास आले. अंदमानामध्ये आधीच कोणी वरचा अधिकारी कधी फारसा येत नसे आणि त्यातही जर एखादा कोणी आलाच तर त्याचे येणे हे इतके गुप्त ठेवण्यात येई की बंदीवानांस हा कोणी एखादा प्रेक्षक फिरून जात आहे की कोणी अधिकारी आलेला आहे हे कळणे अशक्य होई. त्यायोगे कित्येकांस आपली गाऱ्हाणी त्याच्या कानावर घालण्यास संधी मिळत नसे. कोणी काही आरडाओरड केली नाही म्हणजे ते अधिकारी परत जात आणि प्रतिवेदित (Reported) की सब ठीक है! तसे याही वेळेस घडू नये म्हणून राजबंदीवानांना गुप्तपणे गृहमंत्री येणार ही बातमी कळताच त्यांनी आम्हांस त्यांची भेट घ्यावयाची आहे म्हणून मागणी करण्यास आरंभ केला.

'तुम्हास कोणी सांगितले' म्हणून ओरडणाऱ्या दरडावणीना भीक न घालता असाही निश्चय ठरला की यापुढे वरचा अधिकारी आला आणि त्याची भेट होऊ दिली नाही तर खोल्यांतून मोठमोठ्या हाका मारावयाच्या, मग नियम-भंगाची शिक्षा झाली तर झाली. पुढे हा निश्चय अनेक वेळा व्यवहृतही करावा लागून राजबंदीवानांना शिक्षाही भोगाव्या लागल्या. अखेर जेव्हा सन १९१३ वर्षी गृहमंत्री सर रेजिनॉल्ड क्रॅडॉक आले तेव्हा निवडक राजबंदीवानांस त्यापुढे बोलावण्यात आले. कोणाच्या गाऱ्हाण्यास उत्तर मिळाले "तुम्ही सरकारचे शत्रू आहात, तुम्हांस मृत्युदंड योग्य होता." कोणास सांगण्यात आले "बाहेर जाण्याचे नाव काढू नका! तुम्ही राजद्रोही कारस्थाने रचिता! पुरावा? आम्हांस सिद्ध करता येत नाही. पण आम्हांस माहीत आहे!" माझ्या संभाषणात आरंभ जरा कारस्थानी सौम्य स्वरूपाचा झाला. सर साहेब म्हणाले "सावरकर! काय ही तुमची दुर्दशा तुम्ही आपल्या हाताने करून घेतलीत! मी तुमची सगळी पुस्तके वाचिली आहेत. तुमचे ज्ञान आणि शक्ती जर योग्य मार्गाने व्यय केली जाती तर तुम्हांस सरकारी हातात असलेली कोणतीही श्रेष्ठ प्रकारची नोकरी मिळू शकती ! पण या दुर्दशेत पडणे तुम्हास पसंत पडले!" मी म्हटले, "आपल्या सहानुभूतीविषयी मी आभारी आहे. ही दुर्दशा टाळणे तुमचे हाती आहे.

हिंदुस्थानात आता गोखले यांचा शिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव विधिमंडळासमोरच (कायदे कौन्सिल) आला आहे. जर तो संमत होऊन अशा प्रकारचीच विधायक प्रगती करण्यास माझ्या राष्ट्रास मनःपूर्वक संधी देण्यात येईल तर मग मीच काय पण माझे पूर्वी सहकारी असलेले क्रांतिकारक मित्रही शांततेच्या मार्गाने जाण्यास एका पायावर सिद्ध होतील. मला वाटते ते देखील असेच म्हणत असतील."

सर क्रॅडाक : हे तुम्हास कसे माहीत पडले? ते कुठे आहेत तुम्हांस माहीत आहे काय?

मी : ते कसे शक्य आहे? तुमच्या कोठडीत तुमच्या पहाऱ्यात मी रात्रंदिवस बंद नाही का? पण आमची एकमेकांची मनोवृत्ती आम्हांस माहीत आहे, त्यावरून मी तर्क करितो. शांततेने प्रगती शक्य होताच क्रांतिकारक मार्ग स्वीकारणे मी अधर्म्य समजतो. तेही समजत होते, असावेतही.

सर : छट्. तुम्ही चुकता. ते अजूनपर्यंत तीच रणगर्जना करीत आहेत आणि तुमचे नाव घेत आहेत. हिंदुस्थानात म्हणा वा अमेरिकेत म्हणा, पण तुमची मंडळी अजूनही त्या अपराधी चळवळीत दंग आहेत.

मी : ही बातमी आता तुम्ही सांगता म्हणून मला कळते! माझे नाव कोणी घेणे न घेणे हे मला कसे थांबविता येणार? मला त्यांनी पुढारी म्हणून म्हटले तरी मी येथून त्यांच्याशी संबंध ठेवू शकतो अशी तुम्हांस कल्पना तरी करिता येते का? (या वेळी सन १९१२-१३ अमेरिकेत गदर नावाचे क्रांतिकारक पत्र आणि इतर चळवळी अभिनव भारतातील युरोपमधून अमेरिकेत गेलेली लाला हरदयाळजी इत्यादी मंडळी चालवीत होती हे वाचकांनी ध्यानात ठेवावे.)

सर : (आणखी थोडेसे भाषण होऊन मध्येच) मग मघा तुम्ही म्हणाला तशा प्रकारचे मत त्यांस कळविण्यास तुम्ही सिद्ध असाल तर पत्र टाकण्याच्या परवानगीचा विचार करू.

मी : पत्र मी मोठ्या आनंदाने टाकीन; परंतु ते मजकडून त्यांस स्वतंत्रपणे गेले तर त्याचा उपयोग.

सर : आमच्या हातून ते पत्र गेले पाहिजे.

मी : त्यायोगे त्यांस मी ते पत्र सरकारी दाबाने टाकिले असे नाही का वाटणार? मी स्वतंत्र पत्र टाकावे हे उत्तम.

सर : तसे आम्हांस करता येणार नाही.

मी : मग सरकारी हातातून पत्र टाकण्यात काही अर्थ आहे असे मला वाटत नाही.

सर : (मजकडे आपण दोघे एकमेकांस ओळखून आहोत अशा खोचीने सस्मित पाहत) बरं, काय, तुमची गाऱ्हाणी काय आहेत?

त्यानंतर मी कारागृहीन दुःखाचा पाढा वाचू लागलो. राजबंदीवानांच्या कष्टाचे वर्णन करता करता सरसाहेबासह आलेले आमचे चीफ कमिशनर म्हणाले, "पण तुम्ही राजबंदीवानांनी अत्याचारी आणि खुनी कट केलेले होते! जर आज रशियन लोकांचे हिंदुस्थानावर राज्य असते तर तुम्हांसारख्या बंडखोरांस त्यांनी सायबेरियात धाडले असते

किंवा गोळ्या घालून ठार केले असते. तेव्हा आम्ही इंग्लिश लोक तुम्हांस इतक्या कमी क्रूरतेने वागवितो हे तुम्ही आपले भाग्य समजावे!”

मी : पण रशियन लोक राज्य करीत असते तर त्यांनी हिंदुस्थानास निःशस्त्र केले नसते. आज रशियन सायबेरिया इत्यादी प्रांतात त्रयस्थ लोकांतील अधिकारी सैनिक सेनापत्यही करू शकतात, तसे आमचे लोकही करू शकते आणि मोगलांविरुद्ध जसे झाले तशी आम्हांस उघडउघड बंडे करून स्वातंत्र्यही लवकर मिळविता आले असते!

सर : तुमचे हिंदु राजे असते तर आणखीच क्रूरता घडती. बंडखोरांस ते हत्तीच्या पायाशी बांधून मारीत असत!

मी : होय असत! आणि इंग्लंडमध्येही नुसत्या चोरीकरता सर्व रस्त्यांतून फरफटवीत नेत अपराध्यास फाशी देत असत. पण ‘असत’ म्हणून आज कोणी चोरास अशी फाशी देते आहे काय? खरी गोष्ट अशी आहे, मनुष्य-जातीच्या सार्वत्रिक सुधारणांचे लाभ दोन्ही पक्षांस सारखेच मिळत आहेत. पूर्वी बंडखोरांस हत्तीच्या पायी बांधून मारीत तर बंडखोर यशस्वी झाले तर तेही चार्ल्स सारख्या राजाला फाशी लटकावीत! आज दोन्ही पक्ष अधिक सभ्य आणि सौम्य व्यवहार करणे हे आपण आपल्या सुधारणेचे चिन्ह समजत आहोत आणि ते तसे जोवर आपण समजता म्हणून म्हणत आहात तोवरच आम्हीही तुमच्याच नियमाप्रमाणे वागविले जावे म्हणून म्हणत आहोत. आपण निर्नियम वाटेल तसे छळ करू म्हणून उघडपणे सांगावे म्हणजे आम्ही त्या परिस्थितीसही कसे तरी तोंड देऊच!

अशा अर्थाच्या संभाषणानंतर गोष्ट पुनः मूळ पदास आली. अंदमानातील बंदीसंस्थेविषयीही काही प्रश्नोत्तरे होऊन आम्हांस सांगण्यात आले की, हिंदुस्थान सरकार काय ते उत्तर धाडील.

क्रॅडॉक धमकावून गेले, उत्तरही येईना. अंदमानाचेच अधिकारी सांगू लागले, आता आपले आहे त्यात समाधान माना. परंतु काहीना काही तर चळवळ केल्यावाचून राहावयाचे नाही अशा निश्चय करून सर्व राजबंदीवानांनी तिसरा संप पुकारला.

एक दोघे सोडून सर्वजणांनी कामे सोडून दिली. सहा सहा महिने बेड्याच्या शिक्षा झाल्या. नानी गोपाळने अन्न सोडून दीड महिना झाला होता. बळे बळे त्यास नाकाने नळीतून थोडे दूध पाजण्यात येई. तो अगदी अस्थिपंजर झाला. तरी त्या दीड महिना अन्नत्याग केलेल्या मुलास आठ दिवस हातकडीत दिवसभर उभे राहण्याची शिक्षा ठोठावली गेली! तो डगमगला नाही. परंतु त्याच्या दुःखाने उद्वेगून इतर सहासात जणांनी अन्नत्याग केला. त्यांसही पोटात लेशमात्र अन्न नसता आठ दिवस हातकडीत उभे करण्यात आले. माझे पत्र यावयाचे होते ते आले परंतु तुमच्या पत्रात आक्षेपार्ह लिखाण आहे म्हणून तुम्हास ते देता येत नाही म्हणून सांगण्यात आले. मी पत्र येताच संपात सामील झालो. त्यातच दोन आठवड्यांची आढाबेडीची शिक्षा झाली. नंतर हातकडी, नंतर साखळबेडी अशा शिक्षा चालल्या. पत्रात आक्षेपार्ह असे काय आहे ते लवकरच आम्हास आमच्या साहाय्यकानी गुप्तपणे कळविले. ते आक्षेपार्ह विधान म्हणजे त्या वर्षी पार्लमेंटात केरहार्डी यांनी मजविषयी केलेली चर्चा हे होते. आयर्लंडमध्ये लोक उघड उघड बंडाच्या धमक्या देत, सैन्ये उभारीत फिरत तरी सरकार काही करीना; परंतु सावरकरांसारख्या हिंदी क्रांतिकारकास पिस्तुले एकत्र करण्यासाठी पन्नास वर्षे काळेपाणी दिले असा टोमणा

मारणारी काही चर्चा पार्लमेंटात झाली होती. ती बातमी लिहिलेले ते पत्र मला दिसले असते तर पार्लमेंटपर्यंत आमच्याकडे लोकांचे लक्ष वेधलेले असते असे आम्ही राजबंदी लोक समजून चढून जाऊ आणि संप अधिकच जोरावेल अशा भयाने आम्हास ते घरचे पत्र दिले गेले नाही. आम्ही सर्वांनी संपात मुख्य दोन-तीन मागण्या केल्या होत्या. (१)आम्हांस राजबंदीवान समजून त्या वर्गाचे पहिल्या प्रतीचे अधिकार देण्यात यावे (२) नाहीतर केवळ साधे सामान्य बंदीवान समजून अंदमानातील इतर बंदीवानांप्रमाणे बाहेर सोडावे, लिहिण्याची कामे द्यावीत. शेवटी यथासमय कुटुंबातील लोक आणू द्यावे. (३) जर तेही करणे नसेल तर हिंदुस्थानातील तुरुंगांतच आम्हांस धाडून द्यावे. म्हणजे तिकडच्या तरी सवलती आम्हांस मिळतील. सूट-शिक्षेच्या दिवसांची कारागृहीय सूटही मिळत राहील. या मागण्यांसाठी संप चालला असता सरकारी नियम राजबंदीवान उघड उघड धाब्यावर बसवीत चालले. कडक पहाऱ्यात निरनिराळ्या कोठड्यांतून रात्रंदिवस बंद असल्याने एकमेकांचे बेत आणि बातम्या कळविणे कठीण जाऊ लागले. मागे वर्णिलेला, 'टेलिफोन' दूरध्वनी बंद झाला. कारण अंगणातल्या दुसऱ्या कोठडीच्या भोकापाशी जाता येईना. जो तो बंद. तेव्हा टेलिफोन तुटला तर टेलिग्राफचा शोध लागला!

आणि तोही वायरलेसचा! दूरध्वनी तुटल्यानंतर हे बिनतारी तारायंत्र बरेच दिवस ऐटीत काम करीत होते. पायांत बेड्या होत्या. त्यांना वाळे होते. त्या वाळ्यांवर नाहीतर त्या बेड्या दारांच्या गजावर आपटून - एका ठरलेल्या ध्वनिलिपीत कट्ट कडक, कट्टट्ट, सुरू झाले. केवळ चार-दोन खोल्या, वरच्या खोल्यांशीच नव्हे तर चाळी एकमेकांस ज्या कोनास लटकलेल्या होत्या, त्यांतील पहिल्या पहिल्या खोल्यांतून आवाज या चाळीतील त्या चाळीत जात असल्याने बातम्या सढळपणे चहूकडे जाऊ-येऊ लागल्या. पुनः मध्ये जे वॉर्डराच्या विश्वासघाताचे भय तेही उरले नाही. ही ध्वनिलिपी प्रथम इंग्रजीत बसविली होती. तिला आमच्या बंधूंनी नागरीत बसविली! तेव्हा शुद्ध स्वदेशी बिनतारी तारायंत्र चालू लागले. तुमच्याकडे बिनतारीचा शोध मार्कोनीने लाविला असेल. आमच्या अंदमानी जगतात मार्कोनीचे बिनतारी येण्यापूर्वीच आमची स्वदेशी बिनतारी सुरू होती.

## आणि - हो! हो! - आता जुळले !

हे लिहिता लिहिता ध्यानात आले की 'कॅपिटल' पत्राने आमचे बंधू बिनतारी तारायंत्रावर नेमलेले होते म्हणून जे लिहिले ते मग अगदीच खोटे होते असे काही म्हणता येत नाही. उगीच त्या बिचाऱ्याकडून आम्ही खटल्याची भीती घालून क्षमा मागविली. होते खरे बुवा, आमचे बंधू बिनतारी तारायंत्रावर नेमलेले होते, खरे! त्या पत्राचे सांगण्यात थोडासा क्षम्य फरक जो झाला तो इतकाच की, ही गोष्ट लढाईच्या वेळेस झाली असे ते पत्र म्हणाले आणि या बिनतारीचा आवाज शेजारच्या वा पाठीमागच्या एक-दोन खोल्यांपर्यंतच जात असता 'क्यापिटल' म्हणाले तो जर्मनीपर्यंत पोचे म्हणून! एवढ्या अंतराचा फरक काहीच नाही. Space and time, दिक आणि काल या वस्तू आहेत की केवळ भास आहेत हा तत्वज्ञान्यांना देखील अजून प्रश्नच आहे!

या तारायंत्राने आमचे बेत एकमेकांस कळत आणि जे करणे ते सर्वजण सारखे करीत. बारी वार्डरांच्या गळचुंडी बसे, हे सामुदायिक बेत ठरतात कसे, कोण बातमी सांगतो. ते अडाणी पठाण, त्यांच्या ध्यानात बेड्या खटखट का वाजतात ते येईना. कोणी ओरडला तर आम्ही सांगू भजन करीत आहोत मनातल्या मनात! शेवटी एका कल्पक

वार्डरास बेड्यांची प्रश्नोत्तरी खटखट का होते ही शंका आली. एकाची झाली की दुसऱ्याच्या बेडीची खटखट! त्याने बारीस सांगितले. बारीसाहेब एका रात्री गुपचुप चहूकडे तुरुंगात हिंडले. त्यांनी ताडले हे बिनतारी तारायंत्र आहे. निरुपाय! बेडी वाजवू देऊ नको या कुकर्म्यांना! इतके सांगून निघून गेले.

पण ऐकतो कोण? नियम म्हटला की बसविला धाब्यावर असा धिंगाणा चालला. जेवण वाढताना एक तास उघडून राजबंदी अंगणात आणण्यात येत. ते एकमेकांशी बोलतील म्हणून स्वतः बारीसाहेब गर्जत मध्ये उभे राहत. एक-दोन दिवस ठीक गेले. पण पाचव्या का कोणच्याशा दिवशी सर्व राजबंदी पंगत धरून पण अंतरावर थाळीत जेवण घेत असता सुश्राव्य इंग्लिश भाषेत सहसाच व्याख्यान ऐकू येऊ लागले!

“Brothers! We are all born free!” चमकून सर्वजण वर पाहतात तो ‘नानी गोपाळने’ एकदम उभे राहून ‘बोलू नका’ या बारीच्या नियमाचा पुरता सूड घेण्यासाठी सार्वजनिक व्याख्यानास आरंभ केला आहे! “बंधूंनो, आपण जन्मतःच स्वतंत्र आहोत. परस्परांशी प्रेमाने बोलणे, हा मनुष्याचा निसर्गसिद्ध अधिकारही जर शत्रू काढून घेऊ लागला तर त्याचे ऐकतो कोण! हा मी बोलत आहे आणि बोलणार!” अशी काही वाक्ये त्याचे तोंडातून अगदी वक्तृत्वपूर्ण थाटाने निघतात न निघतात तोच चवताळून बारी, मिर्झाखान, पठाण वॉर्डर त्याच्याकडे धावून गेले. पण आमच्या वक्त्याचे व्याख्यान अस्खलित चालूच होते. त्याला उचलून नेऊन खोलीत बंद करितो त्याचा व्याख्येय विषयाचा समारोपकाही संपला नव्हता! राजबंदीवानांस हसू आवरेना. बारीस संताप आवरेना.

## पठाणी की हिंदू

माझ्या कोठडीकडे येऊन एकांतात अगदी राहवेना म्हणून मिर्झाखान अर्थात छोटा बारी म्हणाला, “बडे बाबू, ए लडका नानी गोपाळ तुम्हारा सच्चा शिष्य है. हा तुमचा खरा शिष्य. त्याचे धाडस हिंदूस शोभत नाही; एखाद्या पठाणाच्या मुलासारखा तो आहे”. मी म्हटले, “बडे जमादार, तुम्ही चुकता, तुमचे वडील पठाण होते. मग तुमच्यासारखा जर तो पठाणाचा मुलगा असता तर आज स्वदेशासाठी येथे खितपत पडून बारीस कस्पटासमान न लेखता तो तुमच्यासारखा बारीचे पाय चाटीत फिरत असता. दिवसाला बारीने रात्र म्हटले की आपणही रात्र म्हणता! तो हिंदू आहे म्हणूनच तो असा शूर आहे. जमादार, पठाण जातीतील बुद्धिमत्ता आणि शौर्य मीही वाखाणतो. पण सगळेच पठाण शूर असते आणि सगळेच हिंदू शूर नसते तर तुमचे पठाणी वा मुसलमानी राज्य हिंदू कसे उलथून टाकू शकते?”

संप चालला, तेव्हा अखेर हिंदुस्थान सरकारकडून आज्ञा आली की राजबंदीवानांची नवीन व्यवस्था करण्यात यावी.

ती आज्ञा मोठ्या डामडौलाने सर्वांस एकत्र करून वाचून दाखविण्यात आली. त्यात मुख्य गोष्टी या होत्या-

(१) राजबंदीवानांतील जे अवधीचे बंदीवान आहेत त्यांस हिंदुस्थानातील तुरुंगात धाडून देण्यात येऊन तिकडे रीतसर शिक्षेची सूट मिळत राहील.

(२) जे जन्मठेपीचे आहेत त्यांस चौदा वर्षेपर्यंत तुरुंगात ठेवण्यात येईल. नंतर जर त्यांची वर्तणूक ठीक राहिली तर बाहेर हस्तश्रमाव्यतिरिक्त मोकळे सोडण्यात येईल.

(३) तुरुंगात चौदा वर्षेपर्यंत असताना त्यांना अन्न आणि कपडे वरच्या प्रतीचे देण्यात येऊन पाच वर्षे पुरी होताच स्वतः स्वयंपाक करून खाण्याची परवानगी देण्यात येईल. व्ययासाठी महिन्याला काही रुपया बारा आणेपर्यंत पैसेही देण्यात येतील.

## तिसऱ्या संपाचा शेवट

वरील अटींवरून दिसून येईलच की, संपातील काही मागण्या मान्य झालेल्या होत्या. “ही अगदी न फिरणारी व्यवस्था” म्हणून दिल्लीहून लिहून आले होते. तथापि अशा किती तरी न फिरणाऱ्या व्यवस्था चळवळ करून राजबंदीवानांनी फिरवून घेतल्या होत्या! तेव्हा आपल्या शक्तीत असलेल्या सामर्थ्यानुरूप हे मिळाले ते पदरात टाकून पुढे दुसरी संधी मिळेतो प्रकरण मिटवावे असे ठरले आणि सर्वांनी संप संपवून कामे सुरू केली.

लवकरच अवधीचे शिक्षेकरी (Term-convicts) हिंदुस्थानातील तुरुंगात धाडण्यात येऊ लागले. जाताना त्यांस आम्हांकडून बजावून सांगण्यात आले की, देशात अंदमानातील अपेष्टांची प्रसिद्धी सारखी करीत राहा आणि देशातून जेव्हा जेव्हा अंदमानास बंद्यांची चलाने येतील तेव्हा तेव्हा स्वराष्ट्राच्या बातम्या धाडीत चला. ते राजबंदी हिंदुस्थानातील एकाच प्रांतात न पाठविता सर्व प्रांतांत सरकारने विखरून ठेविल्यामुळे ही दोनही कामे करण्यास त्यांस अधिकच सोयीस्कर झाले. आणि त्यांनी ही कामे शक्यतितकी उत्तम रीतीने बजावली.

अवधीचे शिक्षेकरी जाताच जन्मठेपीचे असे आम्ही थोडेचजण उरलो. एखाद दुसरा अवधीचा बंदीवान मागे राहिला होता. त्यांत बहुतेकांस आपले अन्न टोळ्याटोळ्यांनी आपणच शिजवून खाण्याची सोय करून देण्यात आल्याने निर्मळ अन्न मिळू लागले. काही एकास छापखान्यांचे, ग्रंथालयाचे, (त्याचे वृत्त पुढे येईलच) नकाशे काढण्याचे अशी कामे देण्यात येऊन महिना दहा-पाच रुपये पण वेतन मिळू लागले. पैशाची दुर्मिळता तर काय पण दुर्दश्यता ज्या कारागारात असे त्यात पाच रुपये ज्याच्याजवळ असत तो लक्षाधीशाप्रमाणे समजला जाऊन अनेकजण त्याच्या सेवेत तत्पर होत यात काय आश्चर्य! अशा रीतीने मागे उरलेल्या जन्मठेप्यांपैकी बऱ्याच जणांची कारागाराच्या मानाने सुलभ श्रम आणि बरे अन्न मिळाल्याने बरी व्यवस्था लागली. परंतु हे सर्व जुळले तरी या यःकश्चित लाभातही आमची काही फारशी वर्णी लागली नाही. आम्हास कोणतेही लेखी काम देण्यात आले नाही. आम्हास कोणत्याही कारखान्याचे देखरेखीवर नेमण्यात आले नाही. आम्हास मिळालेले मुख्य समाधान म्हणजे इतकेच की आमच्या सहभोगी देशभक्तांस काहीतरी सवलत मिळाली. आमच्या बंधूंस आणि आम्हास तेच दोरखंड वळण्याचे हस्ताश्रमी काम करावे लागले! पुढे नाशिकच्या कटाच्या खटल्यातील श्रीयुत वामनराव जोशी आणि माझे बंधू यांना इतर राजबंदीवानांप्रमाणे एकत्र स्वयंपाक करण्यास परवानगी मिळाली. पण मला पूर्वीप्रमाणे एका चाळीत अलगपणे बंद ठेवण्यात आले. अंदमानी राज्यकारभाराचे हे सूत्रच ठरले होते - जे बारी अनेक वेळ बोलून दाखवी की अशांतीचे प्रमुख कारण म्हणजे सावरकर आहे आणि त्यावर सक्त दृष्टी ठेविली पाहिजे! सवलत अशी शक्यतो मिळू न दिली पाहिजे!

हे वर्ष १९१४ होते. राजबंदीवानांच्या अंदमानातील चळवळींचा आणि वृत्तान्ताचा पूर्वाध येथे संपतो. पुढे मोठमोठी स्थित्यंतरे हिंदुस्थानातील आणि जगातील राजकारणात घडत गेली. त्यांच्या परिणामाचे धक्के अंदमानातील या छोट्याशा वसाहतीसही बसत गेल्याने तिकडील वृत्तान्ताचेही स्वरूप बदलून गेले. पूर्वार्धात ही मुख्यतः स्वतःच जगण्यास अत्यंत अवश्य अशी भूमिका उत्पन्न करून घेण्याकडे राजबंदीवानांची शक्ती व्यय केली. परंतु उत्तरार्धात अंदमानाच्या सार्वजनिक जीवनातही नवीन जोम उत्पन्न करण्याकडे त्यांचे लक्ष वेधलेले राहिले. या ठळक परिवर्तनामुळे आमच्या या कारागारीय वृत्तान्ताचेही दोन भाग पडतात म्हणून त्याचा पूर्वार्ध येथेच संपवून पुढचा अधिक व्यापक स्वरूपाचा वृत्तान्त उत्तरार्धाकरीता राखून ठेवू.

www.savarkarsmarak.com

# माझी जन्मठेप

## उत्तरार्ध

प्रकरण पहिले

### अंदमानात संघटना आणि प्रचार

पूर्वार्धात केवळ माझ्याच नव्हे तर स्थूलमानाने राजबंदीवान वर्गाच्याच अंदमानातील कारावासाचा वृत्तान्त इ. स. १९१४ वर्षांपर्यंत सांगितला. त्या पाचसहा वर्षांत राजबंदींच्या सहवासाने, त्यांच्या प्रयत्नांनी बंदीवानांस वागविण्याच्या रीतीत जी अधिक माणुसकी दाखविण्यात येऊ लागली त्यामुळे, आणि विशेषतः राजबंदींची अधिकाऱ्यांशी जी मानी आणि प्रतिकारी वागणूक होत गेली त्यामुळे सर्वसाधारण बंदीवानांत बरेच स्थित्यंतर घडून आले होते. राजबंदींची जूट पाहून, धैर्य पाहून आणि एकास कष्ट झाले की सर्वजण त्याची सुटका करण्यासाठी कसे झटून पडत ते पाहून इतर बंदीवानांच्या मनातही सामाजिक जीवनाची तत्वे रुजू लागली. त्यांस स्वदेश, स्वधर्म, जनसेवा इत्यादी शब्द परिचित होऊन त्यांची सामाजिक नीतिमत्ता वाढू लागली. त्यातही या गुणांचा प्रादुर्भाव हिंदू बंदीवानांत अधिक झपाट्याने होऊ लागला. त्यांच्या शिक्षणाविरुद्ध अधिकाऱ्यांचे धोरण कसे कडक असे हे मागे सांगितलेच आहे; परंतु राजबंदींच्या खटपटीने ते आता बरेच ढिले झाले होते. मुसलमान वार्डरांपाशीच काय पण बंद्यांपाशीही कुराण वा इतर पुस्तक धार्मिक म्हणून ठेवलेले असे. आणि ती पुस्तके केव्हा केव्हा तर केवळ काम टाळण्यासाठी म्हणून ते वाचीत बसत. पण हिंदूंना आपली धर्मपुस्तके बाळगण्याची आणि वाचण्याची बहुतेक चोरी असे. एक तर वरिष्ठ अधिकारी त्यांस दडपीत आणि जो काही वेळ वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांस पुस्तक वाचण्यास मिळे तो मुसलमान जमादार त्यांस मिळू देत नसत. तुलसीदासांचे रामायण दहापाच हिंदू लोक एकत्र बसून अगदी सुट्टीच्या दिवशी जरी वाचीत बसले तरी मुसलमान तंडेल वा मिर्झाखान त्यावर अकस्मात गरम होऊन दोन दंडे लगावून केव्हा बंद करील याचा नियम नसे. असे प्रसंग आम्ही अनेक वेळा पाहिले. धार्मिक पुस्तकातील चित्रे पाहून अशी 'बुदपरस्त' पुस्तके हिंदूंस न वाचू देणे हे आपले धार्मिक कर्तव्य समजणारे पठाणी तंडेल आणि पंजाबी मुसलमानी वॉर्डर तिथे सगळ्यांस ठाऊक होते. अशा वेळी राजबंदीवानांतील आम्हांसारख्या कित्येकांस तो प्रकार सहन न होऊन आम्ही तो तंटा वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत पोचवावा. असे करता करता धार्मिक एखाद-दुसरे पुस्तक ठेवण्यास हिंदू बंदीवानांस उघड वा आडून प्रतिकार होईनासा झाला. आणि काम संपल्यावर एखाद्यास शिकण्यासाठी एखादा पाटीचा तुकडा वा पाटीही उघडपणे ठेवता येऊ लागली.

हिंदू लोकांस सुट्ट्या मिळण्यातही असाच पक्षपात होई. मुसलमानी सुट्टी असली की, मुसलमानी बंद्यांस काम न करता गप्पा छाटीत सुखेनैव रेंगाळत हिंडता येई; पण हिंदूंस कित्येक सुट्ट्या देण्यातच येत नसत. ज्या येत त्या दिवशी खालचे अधिकारी त्यांस धाक घालीत ''काम करता का दिवसभर खोलीत बंद होऊन पडता?'' अर्थात डोळे वटारलेल्या जमादाराच्या तोंडून कोठडीबंदीचे नाव ऐकताच बिचारे हिंदू बंदी गुपचुपकाम करीत. अशा प्रकारच्या

अन्यायास आळा घालून हिंदूंच्या सुट्ट्या त्यांस मिळू देण्याकरिता एकदा त्यांस इनकार करण्यास प्रवृत्त करून आम्हीही काम सोडून बसलो. पर्यवेक्षक आल्यानंतर प्रकरण विकोपास गेलेले पाहून आम्हांस म्हणाला, ''हिंदूंच्या सुट्ट्या देण्यात येतील पण तुम्ही पुन्हा असा बभ्रा कराल तर तुम्हास शिक्षा देण्यात येईल. तुम्हास साधारण बंदीवानांप्रमाणे शिक्षा देणे माझ्या जिवावर येते म्हणून मी या वेळेस सोडून देतो!''

हिंदू बंदीवानांवरचा अन्याय दूर करण्यासाठी झटत असताना राजबंदी आपल्या मुसलमान बंदीवानांच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासही कमी करीत नसत. त्यांच्या प्रयत्नाने जेवण, काम, शिक्षा इत्यादींविषयी जी जी सुधारणा आणि सवलत बंदीवानांस मिळत गेली तिचा लाभ मुसलमानांसही मिळतच होता. त्यामुळे तेही राजबंद्यांस सन्मानीत; इतकेच नव्हे तर त्यांची कुलंगडी चव्हाट्यावर आणून, त्यांस राजबंद्यांनी शिक्षा देववू नये म्हणून काही काळ ते त्यांची हांजी हांजी देखील करू लागले. राजबंदीवानांच्या उपदेशाने मुसलमानांतही राष्ट्रीय वृत्तीचे काही लोक निघाले. ते उपयोगीही पडले. परंतु पुढे शुद्धी इत्यादी चळवळ करणे जसे जसे राजबंद्यांस भाग पडू लागले तसे तसे मुसलमानांच्या उपजत धर्मवेडाची बाधा त्यांसही व्हावयाची राहिली नाही.

बंदीवानांच्या शिक्षणासाठी पाठ्यपुस्तके ठेवण्यास त्यांस किंचित सवलती मिळाल्या तेव्हा मुख्य प्रश्न त्यांस पुस्तके कशी मिळणार हा उभा राहिला. त्यांच्या बहुतेकांच्या घरी अज्ञानाचे राज्य. त्यांनी मागितले तर उंची जोड्यांची पार्सले घरून येत; पण दोन आण्यांचे पुस्तक मागितले की येत नसे. त्यांना पुस्तके सरकारने द्यावी ही प्रार्थना व्यर्थ होती. एखाददुसरे पुस्तक ठेवू दिले हेच उपकार! म्हणून आम्ही स्वतःच्या पार्सलात पुस्तके क्रमिक आणि सोपी इतिहास-भूगोलादिकांची मागवू लागलो. त्यावर काही दिवस लोटले.

परंतु नित्याची व्यवस्था करण्यासाठी म्हणून लवकरच एक केंद्रित संस्था स्थापन केली.

मागे लिहिलेच आहे की, ज्या राजबंद्यांना राजकारणाचे ध्येय वा मार्गाचे तारतम्य आणि रहस्य कळलेले नव्हते आणि जे कोणत्याही देशसेवक संस्थेत शपथबद्ध झालेले नव्हते अशांना स्वदेशसेवेची दीक्षा शपथपूर्वक आणि ते तारतम्य आणि रहस्य समजावून ज्ञानपूर्वक देण्याचा उपक्रम सुरू केलेलाच होता. त्याच संस्थेत पुढे पुढे राजबंद्यांच्या परिचयाने देशभक्तीचे बीज ज्यांच्या हृदयात चांगलेच अंकुरित झाले होते त्या साधारण बंदीवानांसही घेण्यात येऊ लागले. ते बंदीवान जेव्हा सहा महिन्यांनी वा वर्षाने बाहेर जात तेव्हा त्याच पद्धतीने आपली स्वतंत्र मंडळे करीत. याच संस्थेत पुढे शिक्षणप्रसारासाठी प्राप्तीमागे प्रत्येकाने रुपयास एक आणा, पाच रुपयांस आठ आणे अशी चढती वर्गणी ठेवली. काही काही कर्त्या बंदीवानांस बाहेर असे अधिकार मिळत की त्यांस तीस चाळीस रुपये महिना सहज पडे. त्यानंतर राजबंदी जेव्हा बाहेर सोडलेले होते त्या चारपाच महिन्यांत बाहेरच्या बंदीअधिकाऱ्यांत नव्हे तर सर्वसाधारण व्यापारी इत्यादी 'स्वतंत्र' वर्गातही कित्येक देशकारणात लक्ष घालण्यात शिकले होते. त्याच प्रकारे आतून केलेल्या शपथांचा बंदीवानांनीही प्रचार करीत राहून लोकांत राजकारणाची आवड आणि स्वदेशासाठी आपणास काही कर्तव्य आहे ही जाणीव थोड्याफार प्रमाणात उत्पन्न केली होती. त्याचप्रमाणे त्या वसाहतीत अभियांत्रिक, डॉक्टर, न्यायविभागातील अधिकारी आणि इतर सत्ताविभागातील अधिकारी जे हिंदुस्थानातील सुशिक्षित वर्गातून नोकरीपुरते आलेले असत त्यांच्यातील बरेचजण येता जाता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आमच्याही परिचित झालेले असल्याने त्यांनीही पूर्वी कधीही न घेतलेले नियमबद्ध स्वदेशसेवाव्रत

www.savarkarsmarak.com

घेतले होते. त्यात त्यांच्या वर्गासही शंभर रुपये प्राप्तीमागे पाच रुपये अंदमानात प्रचार करण्याच्या कार्यासाठी संस्थेस द्यावे हा एक नियम असे. त्याप्रमाणे काही जण नियमितपणे देत. त्यांच्यात जे हिंदी शिकलेले नसत ते हिंदी लिहिण्यावाचण्यास शिकत. राजकीय अतहास, अर्थशास्त्र आणि शासनशास्त्र या प्रत्येक देशभक्तास अवश्य असणाऱ्या विषयांवरील निवडलेल्या पुस्तकांची आम्ही जी एक सामान्य टिपणी केलेली असे त्यातील पुस्तके विकत घेत आणि वाचीत. संस्थेचा जमलेला निधी आणि संस्थेचे हे सर्व व्यवहार अर्थातच बिनलेखी आणि शक्यतोवर विरुद्ध अधिकाऱ्यांच्या वक्रदृष्टीस सुगावा लागू न देता चालवावे लागत.

संस्थेच्या निधीतून बंदीवानांस पाट्या, क्रमिक पुस्तके आणि उच्च विषयांची पुस्तके विकत घेवविता आली तरी दुसरी अडचण वाटण्याची पडे. कारण तुरुंगातील बंदीवानांपाशी पुस्तक दिसताच हे कोणी दिले म्हणून पहिला प्रश्न काराधिपाचा असणार. वाचण्याकरिता आणि पुस्तक जवळ ठेवण्याकरिता कित्येकांना शिक्षा खाव्या लागल्या असतील त्याची गणनाच नाही! बरे पुस्तक कोणी दिले म्हणून सांगताना आमचे नाव सांगणे म्हणजे आपली वार्डरकी गमावणे वा घाण्यास जुंपले जाणेच होते! राजबंद्यांशी बोलण्याची चोरी तर त्याचे पुस्तक स्वीकारणे या अपराधाविषयी काय विचारावे! म्हणून सुट्टीच्या दिवशी कोणी वार्डर बाहेर गेला की, अमक्याच्या भाईबंदाने बाहेरून अमक्यास पुस्तक दिले अशा बहाण्याने ती क्रमिक पुस्तके पोचवावी लागत.

या पुस्तकांच्या मार्गातील सरकारी अडचणी इतकीच दुसरी अडचण म्हणजे स्वतः त्या अडाणी बंदीवानांचीच होती. शिकण्याचे नाव काढले की त्यांचा पहिला प्रश्न शिकून काय लाभ? बौद्धिक वा राष्ट्रीय लाभ सांगावे तर चांगले समजत ना! त्यात बारीसाहेबाचा शिक्षणाची रुची असलेल्यावर डोळा, ती भीती! तरीही बळेबळे, धरधरून, जो कोणी संगतीत येई त्यास शिकविण्याची खटपट करावी, कोणास सांगावे तुला थोडे मराठी येताच इंग्रजी शिकवू. मग तू लहानशा लेखकाचे काम करू लागशील आणि मुनशी होशील. बंदिवानात 'मुनशी'चा मोठा मान. मी मुनशी होणार या महत्वाकांक्षेने कित्येक बंदीवान शिकत असत. थोडे असेही निघत की ते केवळ ती आपली विद्या आहे, किंवा आपणास धर्मग्रंथ वाचता येतील, किंवा हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे अशा उदात्त बुद्धीने प्रौढवयीदेखील अ आ पासून शिकणे आरंभ करीत.

परंतु हे काम किती कटकटीचे त्याचे वर्णन कशास हवे ! अ आ, क ख, वाचण्यास देत किंवा धर, कर इत्यादी शब्द सांगत त्या निर्बुद्धच नव्हे तर बहुधा निरिच्छ अडाणी बंदीवानास लपूनछपून शिकवायचे. त्याची उलट मनधरणी करावयाची. केव्हा केव्हा त्यांस फुकट दिलेल्या पाट्या पुस्तके ते ठेवण्यास देखील मान्य करीत नसत. त्या शिकण्याच्या भीतीसाठी बोलणेच सोडून देत. अशांची मने वळविण्यास शिष्यवृत्त्या द्याव्या लागत. त्या अर्थातच अंदमानी चलनात. अंदमानाच्या तुरुंगात रुपयाचे चलन दुय्यम, मुख्य कार्यकारक चलन, म्हणजे 'सुक्क्याचे'! या पारिभाषिक शब्दाचा अर्थ तंबाखू. तंबाखूच्या दोन चिमट्या शिष्यास दिल्या की तो गुरूवर एक पंधरा-वीस मिनिटे शिकण्याचा उपकार करणार! अशा दगदगीने त्रासून जाऊन या कार्यात प्रथम प्रथम आमचे राजबंदीतील सहकारी कंटाळून बदीवानांस शिकविण्याचे काम करण्यास साफ नाकारीत. हा शक्तीचा दुरुपयोग असे म्हणत. कारण बी. ए. , एम्. ए. झालेले आम्ही अडाणी, अपराधी, चोर दरोडेखोर याची उलट दादा बाबा करून त्यास अ आ च्या वाचण्या देत आणि शब्द जोडण्याचा त्रासदायक माथेकूट करीत बसावे हे खरोखरच उद्वेगजनक

असे. परंतु तसे आम्हांस वा आमच्या सहकाऱ्यांस वाटू लागताच आम्ही आमचे स्वतःचे मनास आणि त्यांचे मनास पुन्हा उत्तेजित करण्यास सांगितले ''हा शक्तीचा दुर्व्यय आहे ना? बरं तर देशसेवेसाठी या परिस्थितीत आणखी अधिक महत्वाचे एखादे कृत्य तुम्ही करू शकता आहा काय? जो हो म्हणेल त्याने हे काम न करता ते अधिक महत्वाचे कार्य करावे. पण हाच वेळ केवळ रिकामी चिंता आणि तळमळ करीत वा आपसात निरर्थक वादविवाद करीत घालविण्यापेक्षा तर या तुच्छ पतितांना शिक्षण देण्यात, त्यांची मनःप्रवृत्ती परोपकारी करण्यात तो वेळ जावा हे अधिक देशकल्याणकारक नव्हे काय? आणखी असे पहा की आपण गावागावातून प्राथमिक शाळा काढण्याचे ठराव आणतो. ते शिक्षण देण्यास कोणी तरी पुढे आले पाहिजेना? प्राथमिक शाळांत असा शिकवीत जन्म घालविण्याचे व्रत कोणीतरी घेतलेच पाहिजे ना? मग ते त्रासदायक काम आम्हीच का करू नये? आम्ही तेवढे अध्यापकांच्या लठ्ठ पगाराच्या आणि मानाच्या खुर्च्या अडवाव्या आणि खेड्यातून बाराखड्या घोकीत शिक्षण देण्याचे त्रासदायक काम इतरांनी करावे ही इच्छा अन्याय्य नाही का? पतितांनाच उद्धारण्याचे कार्य राष्ट्रीय हितास अवश्य आहे. मोठमोठे पंडित मिशनरी युरोपीय तुरुंगात केवळ या कार्यास आपले आयुष्य वाहून घेतात. रशियामधील शेकडो राज्यक्रांतिकारक विद्वान खेड्यातून घुसून गुपचुप शिक्षणप्रसारार्थ जन्मभर खपत आहेत. मग आपण या ठिकाणी त्याच दृष्टीने तेच कार्य का करू नये? आपण यांस केवळ शाब्दिक बाराखड्या शिकवीत नाही तर त्यांच्या आत्म्यास आर्थिक बाराखड्याही त्या शाब्दिक शिक्षणाच्या आडोशास उभे राहून शिकवीत आहोत. आपल्या संगतीत ते येताच स्वराष्ट्र, स्वदेश, स्वजाती यांच्या कल्पना त्यांच्या मनात उभ्या राहतात. आपण त्यांस इतिहास सांगतो तेव्हा त्यांच्याही तोंडावर तेज चमकू लागते, ते पतित आहेत? आणि आपण कोण आहोत? उपजत मुक्त थोडेच आहोत! सुधारले तर तेही सुधारतील. म्हणून जोवर दुसरे अधिक महत्वाचे देशकार्य करता येत नाही तोवर हे अत्यंत त्रासदायक पण म्हणूनच जे करण्यात खरी देशसेवा आहे ते, आपल्या या हीन दीन पतित बंधूंस आपल्यास देण्याची योग्यता आहे तितके तरी शाब्दिक, बौद्धिक, राष्ट्रीय आणि आत्मीय शिक्षण देण्याचे कार्य आपण करीत राहिले पाहिजे. ''

या रीतीने प्रयत्न करता करता त्याच हीन दीन पतितांत कित्येकजण असे उदारमनस्क निघाले की त्यांच्या निःस्वार्थ परोपकारबुद्धीचा सच्छील वर्तनाचा आणि देशहितरततेचा प्रभाव पाहून आम्हां राजबंदीवानांस देखील आत्मश्लाघा करण्याची लाज वाटावी.

राजबंदींव्यतिरिक्त बंदीवानांच्या पुस्तकादिक शिक्षणसामग्रीची इतकी जुळवाजुळव करीत असता राजबंदींसाठीही वाचनीय असे एक ग्रंथालय काढण्याची खटपट चाललेलीच होती. प्रथम आम्हांस एकमेकांची पुस्तके वाचता येत नव्हती. हे मागे एका प्रकरणात सांगितलेच आहे. त्यानंतर आम्ही दहा-पाचजणांनी तशी ती वाचावयास मिळावी म्हणून कमिशनरपर्यंत विनंती केली. पण बारीने म्हणावे एकमेकांची पुस्तके घेण्यास यांस अनुज्ञा दिली की ते पुस्तके दुसऱ्याने फाडली म्हणून भांडत बसतील आणि पुस्तकावर पेन्सिलीने चिठ्ठ्या लिहून एकमेकांशी पत्रव्यवहार करतील! जणू काय एकमेकांशी पत्रव्यवहार या साधनाच्या अभावी थांबलेलाच होता! पुष्कळ खटपटीनंतर एका संपाचे फळ म्हणून पर्यवेक्षकाने अनुज्ञा दिली की, पाहिजे तर पुस्तके आपसात अधिकाऱ्यांच्या संमतने देवघेव करून वाचावी. त्यानंतर सर्वांची पुस्तके एकत्र ठेवावी. म्हणून आम्ही आवेदने

(अर्ज) करताच बारीला वाटले की, आता ग्रंथालय करण्यास हे लोक सोडणार नाहीत. म्हणून त्याने कसून विरोध केला. त्याने पर्यवेक्षकास कळविले की, राजबंदीवानांतील बहुतेक लोक आपली बहुमोल पुस्तके दुसऱ्यांच्या हाती द्यावयास संमत नाहीत. उदाहरणार्थ म्हणून त्याने त्यांची ठरलेली दोन प्यादी पुढे टाकली. त्या दोघांनी आपण पुस्तके एकत्र करण्याच्या विरुद्ध आहोत असे पर्यवेक्षकास कळविले. तेव्हा पर्यवेक्षक आम्हांस म्हणाला, तुमच्या दोघा-तिघांविना सर्वजण विरुद्ध असता पुस्तके एकत्र कशी करावी! आम्ही त्यांस म्हटले, तुम्ही स्वतः सर्वांस विचारा म्हणजे तुम्हास खरी स्थिती कळेल. हे ऐकताच बारीने सर्वांस धाक घातला की जर पुस्तके एकत्र करू म्हणून म्हणाल तर त्या पुस्तकात कोणाचेही पेन्सिलीचे लिखाण दुसऱ्याने जरी लिहिले असले तरी धन्यास उत्तरदायी समजून तुमची ती ती पुस्तके जाळून टाकू!

असा धाक दाखविला काय, गरजला काय, पण दुसरे दिवशी पर्यवेक्षकाने स्वतः सर्वांस विचारता सर्वांनी - अर्थातच बारीचे ते दोन-तीन 'समंजस' माणसाळलेले सोडून - पुस्तके एकत्र ठेवू असे सांगितले. जाळण्याचे नाव काढताच आम्ही म्हटले, ''आहेत त्या पुस्तकांत माझी पुस्तके मूल्यवान् आहेत, ती दोनशे-तीनशे रुपयांची पुस्तके एकदम जाळलीत तरी प्रत्यवाय नाही; पण पुस्तके एकत्र झालीच पाहिजेत. प्रत्येक कारागृहास वास्तविक सरकारी व्ययानेच एकेक ग्रंथालय ठेवलेले असते. येथे सरकार एक पुस्तक देखील देत नाही. परंतु आम्ही आपले व्ययाने तुमच्याच अनुज्ञेने, जी पुस्तके आत आणतो ती देखील एकत्र ठेवून ग्रंथालय करण्यात तुम्हांस जड जाते! पर्यवेक्षक बराच प्रगतिप्रिय मनुष्य असे. त्याने ते मान्य केले आणि आमच्या म्हणण्याप्रमाणे जे पुस्तके एकत्र नको म्हणाले त्यांची पुस्तके वगळून, आमची सर्वांची पुस्तके एकत्र ठेवून, क्रमांक लावून एक ग्रंथालय केले. प्रतिरविवारी तेथे सर्व राजबंदीवानांनी पाळीपाळीने जाऊन पुस्तके बदलून घ्यावीत असा क्रम सुरू झाला.

ग्रंथालयाचे व्यवस्थेने एकेकास विविध पुस्तके वाचावयास मिळू लागली आणि ज्या राजबंदीवानांना घरून पुस्तके धाडण्या इतकाही कोणाचा आधार नव्हता त्यांना पुस्तके उघडपणे वाचता येऊ लागली. तेव्हा साहजिकच आम्ही आपापसात पार्सले मागविण्याच्या वेळा अशा ठरवून घेतल्या की जरी प्रत्येकास वर्षातून एकच पार्सल मिळे तरी ती निरनिराळ्या वेळी मागविल्याने दर महिन्यात कोणाचे ना कोणाचे तरी पार्सल येतच राहावे. त्यातही एकजण जी पुस्तके मागवी ती टाळून दुसऱ्याने दुसरी मागवावी अशा पद्धतीने मराठी, बंगाली, पंजाबी, संस्कृत आणि हिंदी पुस्तके कोणाही एकावर बोजा न पडता सर्वांस वाचनास मिळू लागली. दर महिन्यामागे बहुधा एखादे नवे पार्सल येत गेल्याने नवीन पुस्तके आणि साहित्यिक वा धार्मिक मासिक पुस्तके वरचेवर मिळून देशातील बरीच माहितीही मिळू लागली. मासिक पुस्तकाविषयी मात्र घासाघीस करावी लागे. कोणाचे पुस्तक तुरुंगात द्यावयाचे याविषयी बारीची अडाणी कसोटी कशी असे हे मागे सांगितलेच आहे; परंतु मध्यंतरी जो एक विचारी पर्यवेक्षक आला त्याने पुस्तकपरीक्षणाच्या कामी पुष्कळ उदारता ठेवली. पण मासिक पुस्तकांविषयी त्यासही बारीस दचकावे लागे. कारण ही स्वारी वेळेवर कमिशनरला देखील कळवावयाची की पर्यवेक्षक राजद्रोही लेखांची मासिक पुस्तके राजबंद्यांस देतो! म्हणून मॉडर्न रिव्ह्यू, इंडियन रिव्ह्यू इत्यादी पुस्तके आपसात आम्ही मागवू तेव्हा कमिशनरपर्यंत भांडावे लागे. मी सांगे की, वास्तविक हिंदुस्थान सरकार जी मासिक पुस्तके वा पुस्तके जप्त करीत नाही ती राजबंद्यांसारख्या शिक्षित आणि स्वतंत्र विचारी वर्गास देण्यास आडकाठी नसावी. कारण

हिंदुस्थान सरकारच्या वाङ्मयप्रबंधक विभागाच्या (सेन्सार ऑफिसच्या) सहस्त्राक्षांतूनही जे पुस्तक सुटले ते राजद्रोही वा अवाचनीय असणे शक्यच नाही. बारीसारख्या अनभिज्ञ मनुष्याने त्यासही आक्षेपार्ह समजणे म्हणजे त्या तज्ज्ञ वाङ्मयप्रबंधकाच्या सहस्त्रचक्षूंसही आंधळे ठरविणे होय. आम्ही हा कोटिक्रम कमिशनरांस स्पष्टपणे सांगत असू. तेव्हा ती मासिकेही मिळू लागली. तरीदेखील तो पर्यवेक्षक बदलताच बारीने पुनः पुन्हा ढवळाढवळ करावीच. कधी मासिकातील पानेच फाडून घ्यावी आणि कधी कधी त्यांच्यातील आक्षेपार्ह पानावर छापखान्यातील काळ्या शाईचा वरवंटा फिरवून पदरात पडेल ते स्वीकारून पुढच्यासाठी भांडत बसण्याचा क्रम आमचा चाललाच होता. एकदा-दोनदा तर आमची पार्सले वर्षानंतर आली असता ती बारीने आली नाहीत म्हणून सांगितले. पण आम्हास पक्का पत्ता लागे. आम्ही पर्यवेक्षकांस एकदा सांगितले. शोध करता महिन्यापूर्वी ती आली म्हणून ठरले. तेव्हा बारीस पर्यवेक्षकापुढे नाक घासता घासता पुरेसे झाले! एकदा-दोनदा मासिक पुस्तक मिळण्यासाठी आणि पार्सल मिळण्यासाठी काम सोडावे लागले तेव्हा कुठे दाद लागली. बारीचे न ऐकता ग्रंथालय करविले त्याचा राग अशा प्रकारे तो आमच्यावर काढू पाहत होता.

इतक्या अडचणी असताही ते ग्रंथालय होता होता एक उत्तम प्रकारचा पुस्तकसंग्रह बनला. जवळजवळ दीड-दोन हजार पुस्तके, त्यात निरनिराळ्या भाषांची आणि उत्कृष्ट प्रकारची जमली. ज्या तिघांनी बारीस संतुष्ट ठेवण्याकरिता प्रथम ग्रंथालयात पुस्तके ठेवण्याचे नाकारले त्यांनीही लवकरच आपली पुस्तके त्यात दिली आणि इतरांची वाचावयाचा अधिकार मिळविला. पुढे पर्यवेक्षकासही त्या संस्थेचा अभिमान वाटू लागून तिला कपाटे देऊन एक स्वतंत्र जागा दिली, आणि फाटकी पुस्तके पुन्हा शिवण्यासाठी आणि पुस्तके नेहमी सांभाळण्यासाठी दोघा-तिघा राजबंद्यांस तिथे नेमले. ते बांधकाम इतके उत्तम करू लागले की, सरकारी कार्यालयातील मोठमोठी पुस्तकेही तिथेच बांधण्यास येऊ लागली. त्याविरहित राजबंदीवानांत चित्रकार असलेल्या एक-दोघांस युरोपियन अधिकाऱ्यांपैकी पुष्कळांचे प्रकाशलेख मोठे करण्याचे कामही करण्याची अनुज्ञा मिळून तेही तिथेच होऊ लागले. राजबंदीवानांतील दोघाचौघांस एक बौद्धिक कार्य करण्याची आणि हस्तकष्टातून मुक्तता मिळविण्याची ही उत्तम सोय सापडली. ही सापेक्षतः विसाव्याची आणि वांच्छनीय जागा अर्थातच ग्रंथालय काढण्यासाठी ज्यांनी भांडणे केली त्यांपैकी कोणासच मिळाली नाही हे अपेक्षेनुरूपच होते. ज्यांनी ग्रंथालयास विरोध केला त्यांनाच त्या जागेचा लाभ प्रथमतः देऊन बारी त्यांचे ऋणातून मुक्त झाला हेही साहजिकच होते.

त्या ग्रंथालयात बंगाली भाषेतील राजा राममोहन, विद्यासागर इत्यादी पुरुषांची चरित्रे, नवीनसेन राय, रवींद्रनाथ इत्यादिकांचे बहुतेक ग्रंथ, जोगेशचंद्रादिकांच्या ग्रंथावळ्या, उभे महाभारत, उभे रामायण, योगवासिष्ठ इत्यादी उत्तमोत्तम शेकडो ग्रंथ होते. मासिके आणि विवेकानंदांची व रामकृष्णांची चरित्रे आणि ग्रंथ यांच्या तर किती प्रती होत्या ते पुसूच नये. बंगाली वाङ्मयाचा अभ्यास आम्ही तेथे यथेच्छ केला. लंडनमध्ये १८५७च्या क्रांतियुद्धाचा इतिहास लिहिताना आम्हांस बंगाली पुस्तकांचे प्रथम दर्शन झाले. रंजनीकांतबाबूंचा 'शिपाई युद्धेर इतिहास' हा ग्रंथ त्यात काही नवीन सापडते का म्हणून आम्ही तिथे एका बंगाली मित्राकडून वाचवून घेतला होता. आम्हास बंगाली वाचण्यास आणि बोलण्यास येऊ लागले तरीही अक्षरे लिहिता येत नसत! याचे आम्हांसही नवल वाटे. मग ती शिकलो. अजूनही बंगाली वाचता येते. दृष्टीला अक्षरे अवगत आहेत पण लिहिताना विस्मृती होते.

हातांना अक्षरओळख फारशी नाही. रामकृष्णांची लीलामृत-कथामृत इत्यादी अनेक खंडांनी पूर्ण केलेली चरित्रे, रवींद्रनाथांची जीवनस्मृती, चित्रा इत्यादी पुस्तके वाचून वाचून थकल्यावर जुन्या बंगालीतील आपल्या रामविजयाप्रमाणे असलेले तिकडच्या 'पायरी' वृत्तातील रामायण महाभारतादी ग्रंथही वाचले. या पायरी वृत्तासच पुढे मधुसूदन दत्ताने अमित्राक्षरछंदात रूपांतरित केले. मेघनाद वध, कुरुक्षेत्र इत्यादी मधुसूदनाचे ग्रंथ वाचूनच इंग्रजीतील निर्मयमक Blank Verse प्रमाणे जसे त्याने बंगाली अमित्राक्षर वृत्त केले तसेच मराठी वृत्ताच्या अधिक शास्त्रशुद्ध वृत्तीस जुळेल असे मराठीत एक वृत्त असावे अशी आम्हांस इच्छा झाली. तोच प्रयत्न गोमंतकातील 'वैनायक वृत्ता'त परिणामित झाला आहे.

मराठी पुस्तके आणण्याची आवश्यकता राज- बंदीवानांत आम्हां महाराष्ट्रीय दोघांतिघासच काय ती होती. परंतु जुनी पुस्तके बहुधा परिचयाचीच असल्यामुळे केवळ चित्रमयजगतादी काही नवीन मासिके आणि नवीन प्रकाशित होणारी पुस्तके आम्ही आमच्यासाठी आणवावी. परंतु साधारण बंदीवानांत जे मराठी बंदीवान असत त्यांच्यासाठी, आणि आमचे कष्टभागी श्री. वामनराव जोशी आणि जे मराठी शिकत त्या राजबंदीवानांसाठी इतिहास, ज्ञानेश्वरीपासून मोरोपंतांपर्यंत प्रमुख कवींचे काव्यसंग्रह, क्रमिक पुस्तके, शास्त्रीय पुस्तके, समग्र महाभारत भाषांतर, बडोद्यास प्रकाशित झालेले द्वैताद्वैत भाष्यांसह समग्र ब्रह्मसूत्रांचे भाषांतर इत्यादी दीडशे-दोनशे ग्रंथ आम्ही हळूहळू मागवून संग्रहित केले होते.

प्रथमतः हिंदी पुस्तके मागविण्याचा व्ययही आम्हांसच करावा लागला. कारण हिंदी ही राष्ट्रीय भाषा म्हणून प्रत्येकाने शिकावी अशी आमची खटपट चालली असता तिची पुस्तके मागविणारा कोणीच नव्हता. म्हणून काही मासिके, काही ग्रंथ, काही क्रमिक पुस्तके आम्ही आणवून ग्रंथालयात ठेवली. परंतु पुढे हिंदी आणि पंजाबी भाषीय राजबंदी पुष्कळ आले आणि त्या दोन भागांतील पुस्तकेही पुष्कळ येऊ लागली.

इंग्रजी पुस्तकांचा भरणा तर मुख्य भागच होता. स्पेन्सरच्या दोन्ही मीमांसा, समाजशास्त्राचे त्याचे सर्व भाग, जवळजवळ सारा हर्बट स्पेन्सर, मिल, डार्विन हक्स्ले, हेगेल, अमर्सन यांची बुहतेक पुस्तके तेथे होती. कार्लाईल, मेकॉले, गिबन यांचे इतिहास; शेक्सपियर, मिल्टन, पोप यांचे समग्र ग्रंथ; अबाटचा नेपोलियन, बिस्मार्क, ग्यारीबाल्डी,मॅझिनी इत्यादिकांची चरित्रे; इटली, इंग्लंड, अमेरिका, हिंदुस्थान यांच्या इतिहासांवरील प्रख्यात ग्रंथ; डिकन्स, टॉलस्टॉय, क्रोपाट्कीन यांचे बहुतेक ग्रंथ; विवेकानंदांच्या आणि रामतीर्थांच्या सर्व ग्रंथांच्या तीन तीन प्रती; ट्रीस्क आणि निट्से यांचे राजनीतीवरील निबंध, प्लेटोचे 'रिपब्लिक', 'स्टेट', 'कॉन्ट्रॅक्ट' इत्यादी शासनशास्त्रीय प्राचीन आणि अगदी नव्यातील नवीन ग्रंथ, अशी कितीतरी उत्तमोत्तम पुस्तके तिथे राजबंदीवानांनी संग्रहित केली होती. थिऑसफीच्या ग्रंथांचीही वाण नव्हती. प्रथम वरील ग्रंथांतील राजकीय संबं-धाच्या प्रत्येक ग्रंथागणिक आम्हांस भांडणे करावी लागली तेव्हा ते मिळू शकले. एका प्रगतिप्रिय पर्यवेक्षकास वग-ळले तर सर्व अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत ते ग्रंथालय सलत असे. हिंदुस्थानातून कोणी बडा अधिकारी आला म्हणजे बारी ती राजकीय पुस्तके लपविण्याची व्यवस्था करी; नाही तर तो रागे भरायचा! परंतु पुढे पुढे ते सर्व पचले. इतकेच नव्हे तर ग्रंथालयात युरोपियन अधिकारी आपली पुस्तके ठेवू लागले आणि त्यांतील आपण वाचावयास

नेऊ लागले. अशाच एका अधिकाऱ्याने ॲनि बेझंटच्या आत्मवृत्तापासून तो कृष्ण-मूर्तीच्या 'माझ्या गुरुदेवा' पर्यंत थिऑसफीची अनेक पुस्तके दिली होती.

या सगळ्या ग्रंथांचे आम्ही अध्यवसायपूर्वक अध्ययन केले. तेथील ग्रंथ असा वाचल्यावाचून ठेवला नाही. कित्येक अनेकदा वाचले आणि राजबंदींतील अनेकांकडून इतिहास, अर्थशास्त्र आणि शासनशास्त्र यांवरील पुस्तकांचे अध्ययन करविले. राजबंदीवानांचे विचार प्रगल्भ व्हावे म्हणून निबंध लिहवून घ्यावेत. मागे वर्णिलेल्या रविवारच्या सभांतून त्यांची व्याख्याने करवावी, 'स्टेट' सारखी कठिण पुस्तके अगदी महाविद्यालयातील वर्गासारखी दहा-पाच जणांस एकत्र करून शिकवावी.

संस्कृत ग्रंथांपैकी आम्ही जी पुस्तके, काव्ये मागविली तेवढीच तेथे होती. बाकी एखाददुसरे पुस्तक कोणा दुसऱ्याचे असेल नसेल. परंतु भाषांतराच्या पुस्तकांतच अनेक संस्कृत ग्रंथ मूळसुद्धा छापलेले होते. सर्व उपनिषदे, ऋग्वेद, रामायण, महाभारत, ब्रह्मसूत्रे, सांख्यसूत्रे, इश्वरचंद्रांच्या कारिका, योगसूत्रे इत्यादी संस्कृत ग्रंथांचे परिशीलन तेथे करता येई.

बंगाली वा मराठी वा संस्कृत वा इंग्रजी वा हिंदी वा पंजाबी- नवीन पुस्तक प्रसिद्ध झालेले कळले की ते महत्वाचे दिसल्यास तिकडे मागविले गेलेच म्हणून समजावे. अशा रीतीने जरी स्वदेशापासून आणि एका अर्थी जगापासून आम्ही दूर जाऊन बंद केलेले होतो तरी स्वदेशाच्या नाडीतली आंदोलने एकसारखी आमच्या हृदयात प्रतिध्वनित होत होती. जगातील प्रत्येक नवीन विचारांची लहर आम्हा जगद्‌बहिष्कृत निर्वासितांच्या मज्जापिठांच्या तटास स्पर्शल्याविना राहत नव्हती.

राजबंदीवानांच्या उच्च विचारांस सारखी चालना देण्यासाठी हे ग्रंथालय इतक्या मोठ्या स्वरूपात आले नव्हते तेव्हा आम्ही नाना युक्त्या योजीत असू. उदाहरणार्थ, एकदा हाच प्रश्न सर्वांस टाकला की पेशवाई बुडाल्यापासून हिंदुस्थानात नाव काढण्यासारखे राष्ट्रीय पुरुष असे कोण उत्पन्न झाले त्यांची नावे प्रत्येकाने सांगावी. त्यात ज्यांस सर्वांत अधिक मते मिळतील असे शेवटी बारा निवडले जातील. एक आठवडाभर तीच चर्चा चालून शेवटी नामावल्या आल्या; पण त्यात सत्तावनच्या क्रांतिवीरांतील एकाचेही नाव कोणास सुचले नाही. राष्ट्रीय पुरुषांत सत्तावनच्या क्रांतीतील एक नाव एकाने काय ते सुचविले आणि ते त्या स्त्रीचे - लक्ष्मीबाईचे! बाकीच्यांना तेही सुचले नाही. तेव्हा मग त्या इतिहासावर आम्ही अनेक वेळा बैठकीतून व्याख्याने, संवाद, व्यक्तिशः चर्चा केल्या. बंगालीत प्रसिद्ध झालेले रजनीकांताचे 'शिपाईयुद्ध' हे पुस्तक आणविले. त्या पुस्तकाचे नाव कसे चुकीचे आहे - ते क्रांतियुद्ध शिपायांचे युद्ध कसे नव्हतेच हे विशद करण्याचा प्रयत्न केला. पुढे प्रत्येकाचे तोंडी तात्या टोपे, नानाराव पेशवे, कुंवरसिग, लक्ष्मीबाई इत्यादी नावे रुळलेली असत. थॉमस एकेम्पिसचे 'अमिटेशन्स्' हे आमचे फार आवडते पुस्तक असे. कुराण इंग्रजी भाषांतरात प्रथम वाचले. नंतर बंगाली भाषांतर चाळले. हिंदुस्थानच्या तटास पोचल्यावर मराठी भाषांतर चाळले; त्याव्यतिरिक्त अगदी मूळ वाचले म्हणजे त्याचा खरा स्वाद मिळेल असा माझ्या मुसलमान मित्रांचा अभिप्राय पाहून त्यांच्याकडून प्रत्येक पान त्यांच्यासारखेच शुचिर्भूत मने एकाग्र बसून वाचून आणि हिंदी भाषांतर करवून ऐकले. महंमद अल्ली (इंग्लंड) यांनी कुराणास नवीन पाश्चिमात्य उपनेत्रांतून पाहून केलेले अगदी आधुनिक भाषांतरही वाचले. बायबल समग्र मागे दोनदा वाचल्याचे लिहिलेच आहे. उपनिषदे,

एकदा मुख्य दशोपनिषदातील एकेक घेऊन एकेक महिना त्यावर रात्रीरात्री विचार करीत वर्षभर अभ्यासिली. योगवासिष्ठही एकदा वाचावे म्हणून सहज घेतले, तो त्याची गोडी इतकी लागली की वेदान्तावर झालेल्या आमच्या अवलोकनात आलेल्या ग्रंथांत असा सुंदर ग्रंथ विरळा असे वाटू लागले. काय ते निरपवाद सिद्धान्त - आणि काय ती सुंदर कविता की, जिच्या मोहक मुखातील मधुर सुस्वरात ते सिद्धान्त श्रवणास आणि मनास तल्लीन करीत आत्म्यास परिसावयास मिळतात. तत्व आणि कविता यांची सांगड संस्कृत कवीच घालू जाणत. भगवद्‌गीतेचा विश्वदर्शनाचा अध्याय पहा, किवा कालिदासाच्या काव्यातील विष्णुवर्णनाचे श्लोक किवा कुमारसंभवातील ‘स्वयंविधाता तपसः फलानाम् केनापिकायेन तपश्चचार!’ अशी आकाशासारख्या अनाकलनीय व्यापक अर्थाला एखाद्या सुंदर सरोवरासारख्या श्लोकात चटकन प्रतिबिबित करणारी सरस वचने पहा!

आणि खरोखरच कवितेचा आणि तत्वाचा विरोध असणेच अशक्य आहे. कविता सौंदर्यास भुललेली आणि सौंदर्य तेच की जे निरपवाद परिपूर्ण आनंद देते. तेच सत्य! इंद्रियमनबुद्धी यांच्या विरोधास लवलेश वाव न उरू देता जे शंकाकुल आत्म्यास एकाएकी निःसंशय आणि संपूर्ण समाधानातच डोलविते ते सत्य. तेच समाधान - समाधीचे सौंदर्य! - आणि म्हणूनच कविता तेथेच, ‘कंठे स्वयंग्राहनिषिक्तवाहुः’ होऊन आपल्या कामाची परम तृप्ती पावते.

हे वेदान्तविषयक ग्रंथ वाचताना एक मात्र अनुभव आम्हांला वारंवार यावा की, तात्काळ शिरा-शिरा आणि तंतु-तंतु ढिला, समरस, तल्लीन होऊन पुनः कर्माच्या निरर्थक उठाठेवींत पडण्यास अगदी इनकार करीत! कर्मोत्साह पार मावळून जाई. ‘नैष्कर्म्यसिद्धीं परमां’ हे शब्द सारखे गुणगुणत. स्वदेशसेवा, परोपकार, मूकदया इत्यादी अत्युदार भाषाही क्षणिक आणि पोरखेळ वाटू लागत. हीच स्थिती भूगर्भशास्त्रातील किवा ज्योतिषशास्त्रातील पुस्तके वाचताना पण निराळ्या कारणामुळे होई. या शास्त्रांतील कालाचे आणि सृष्टीचे त्रासदायक भव्यत्व पाहून आणि पृथ्वी आणि व्यक्तिजीवन तुच्छसे होऊन निराशापूर्ण कर्मवैय्यर्थ वाटावे आणि दुःखी व्हावे परंतु वेदांताच्या सुंदर सिद्धांतांचे आनंदात कर्माचे वैय्यर्थ दुःखदायी होत नसे. बाहुलीचे खेळणे आहे हे कळून होणारा हुरूपमोड त्या खेळण्याच्या आनंदाहून अनंत पटीने आनंद देणारी ती प्रत्यक्ष सखीच मिळाल्याने नाहीसा होऊन तो कर्माच्या भुसाच्या बाहुलीचा त्याग सुखकारक होई. भौतिक शास्त्रांनी कर्मवियोग होऊन त्रास वाटे. वेदान्ताने कर्मत्याग करावासाच वाटून तो सुखकर होई. कित्येक वेळा योगवासिष्ठादिक ग्रंथांचे श्लोक म्हणता म्हणता हातातले दोरखंड हातातच राहून मन इतके कर्मपराङ्मुख व्हावे की, तास तास अवयव देहास आहेत की नाहीत याचे भानही उरू नये. पाऊल पुढे पडू नये. वाटे सर्व सोडून द्यावे. प्रचारकार्यदेखील केवळ पोरखेळ भासावा. शेवटी प्रकृतीने प्रवृत्तीस बळेबळे स्फुरवून कार्यास जुंपवावे. उलटपक्षी इतिहास आणि भौतिक शास्त्रे वाचीत गेल्यास स्वाभाविक कार्यलालसा केव्हा केव्हा इतकी प्रदीप्त व्हावी, महायुद्धाच्या, हिंदुस्थानातील तत्कालीन क्रांतिकारक आघातप्रत्याघातांच्या, रशियातील झारासारख्यांची सिंहासने चक्काचूर झाल्याच्या बातम्या ऐकताच कर्मशक्ती इतकी अनावर होऊन उठावी की, वाटे बुक्कीसरशी या तुरुंगांच्या भिती धुळीस मिळवून आणि तो पूर्वोक्त हिंदुस्थानचा ध्वज उभारून मरणमारणाच्या क्षेत्रात आता उडी टाकावी!

कर्माच्या आणि नैष्कर्म्याच्या अशा परस्परविरुद्ध झुंजी रिकाम्या मनाच्या मोकळ्या मैदानावर अशा सारख्या चालत असत त्या पाहून कधी कधी स्वतःचे स्वतःलाच हसू यावे! तथापि-

त्यांच्या समन्वयाचा विचार करण्याचे हे स्थल नव्हे. म्हणून तो 'तथापि' तेथे तसाच थोपवून धरून पुढील वृतान्तकथनास आरंभ करणेच युक्त.

## कारागृहाबाहेरील फिरते ग्रंथालय

बंदीशाळेतील ग्रंथालयाचा प्रथमतः राजकीय बंदीवानांसच उपयोग होत असे; परंतु साधारण बंदीवानांतही कित्येक सुशिक्षित बंदीवान आलेले असत. त्याविरहित राजबंद्यांच्या सहवासाने प्राथमिक शिक्षण त्यांच्यापाशीच संपादिलेल्या लोकांतही कित्येक असे बुद्धिमान लोक निघाले की त्यांच्यात इतिहासादिक वरिष्ठ प्रतीची पुस्तके वाचण्याची योग्यता आणि आतुरता उत्पन्न झाली होती. त्यांच्यासाठी हिंदी, मराठी इत्यादी देशी भाषांत एक चांगले ग्रंथालय उघडणे अवश्य झाले. पण ते उघडावे कुठे, कसे आणि काय मार्गाने? अंदमानच्या अधिकाऱ्यांच्या वाचनाविरुद्ध आणि ज्ञानार्जनाविरुद्ध असलेल्या विलक्षण प्रवृत्तीमुळे बंदीवानांस वाचण्याची चोरी झालेली. एक वेळ तंबाखू खाणे, चहाड्या करणे आणि इतर व्यसने उपभोगिणे उघडपणे करता येईल पण दहाजणांनी एकत्र चालविलेली ज्ञानार्जनाची संस्था उघडपणे स्थापित करणे अगदी अशक्य झालेले. तेव्हा मागे ज्या संस्थेचा उल्लेख केलेला आहे, त्या अप्रकट संस्थेच्या निधीतून मोठमोठ्या देशांचे इतिहास, अर्थशास्त्राची पुस्तके, उत्तम ऐतिहासिक कादंबऱ्या, बंदीशाळेबाहेरच्या हिंदी अबंदीवान अधिकाऱ्यांच्या पत्त्यावर मागविण्याचा क्रम चालविला. ही पुस्तके एकत्र न ठेवता काही याचेजवळ तर काही त्याचेजवळ अशी विखरून ठेवावी. परंतु चालकाने ती पाळीपाळीने बंदीवानांकडून घ्यावी. पुढे पुढे बाहेर गेलेल्या बंदीवानांकडून तेथील 'स्वतंत्र' लोकांत जसा प्रचार वाढला तसा त्यांचे नावावर हिंदी मराठीतील बहुतेक प्रमुख वर्तमानपत्रेही आणविली गेली. स्वदेशात असताना ज्यांस वर्तमानपत्र कशाशी खावे हे माहीत नव्हते अशा बंदीवानांस प्रथम नियम म्हणून वर्तमानपत्रे वाचावयास लावावीत. अखेर इतकी रुची उत्पन्न करता आली की वर्तमानपत्र येताच ते वाट्यास येईनासे झाले. एकाने संधी पाहून लपून ते वाचावे आणि दहा दहाजणांनी ऐकावे. पत्र आधी मला की तुला म्हणून भांडणे होताना पाहून आम्हांस आनंद वाटे. भारतमित्र, प्रताप, केसरी, केव्हा केव्हा संदेश, चित्रमयजगत्, सरस्वती, आर्यगेझेट, बंगाली, प्रभात अशी कितीतरी पत्रे बंदीवान वाचू लागले. त्यापायी कित्येकांनी शिक्षा खाल्ल्या, किती वार्डर 'तुटून' गेले, किती बंदी-लेखक काढून टाकण्यात आले, पण, वृत्तपत्र बंदीवानांत प्रसार पावतच होती आणि त्यांतील बहुतेक आम्हां राजबंदीवानांस थेट बंदीशालेतील कुलुपे ठोकलेल्या खोल्यांतून वाचावयास मिळून अदृश्य होत होती. त्याव्यतिरिक्त बाहेर जे हिंदी मोठमोठे अधिकारी होते त्यांच्यासाठी जी आम्ही एक राजनैतिक ग्रंथांची टिपणी करून ठेवली होती त्याप्रमाणे ते इंग्रजी वा देशी पुस्तके आणून वाचीत असत. प्रत्येक शेपन्नास रुपये पगार मिळविणाऱ्या अधिकाऱ्यापाशी एक घरचे टुमदार ग्रंथालय असावे असा आमचा आग्रह असे आणि कित्येकांनी तो पुरविलाही. इटलीचा इतिहास, फ्रान्सचा इतिहास, मिलचे अर्थशास्त्र, विवेकानंदांचे ग्रंथ, आणि हिंदुस्थानी इतिहासावरील दत्त, रायडेव्हिडचे बुद्धकालीन हिंदुस्थान, अशोकादी चरित्रे अशी पंचवीस एक पुस्तके त्या अधिकाऱ्यांकडून हरप्रयत्नाने वाचून घेण्यात येत. या बंदीशालेबाहेरील ग्रंथालयाचा एक विशिष्ट उपयोग असा होऊ लागला की, बंदीशालेतील आमच्या ग्रंथालयात जी पुस्तके अवाचनीय वा भयंकर म्हणून येऊ दिली जाईनात ती आम्ही त्या बाहेरील ग्रंथालयातून मागवावी. रशियन राज्यक्रांती झाल्याबरोबर तिचा इतिहास, सत्तावनचे क्रांतीची

हिंदी पुस्तके, टिळकांची व्याख्याने, लाला लजपतरायांचे ग्यारीबाल्डी अशी कितीतरी पुस्तके आणि विशेषतः जी बंदीशालेत येणे अगदी दुर्मिळ ती वृत्तपत्रे या बाहेरील फिरत्या ग्रंथालयातच आणली जात. आणि नंतर हस्ते परहस्ते ती बंदीशाळेत अप्रकटपणे आणून इंग्लिश न जाणणाऱ्या आणि अवश्य तेव्हा जाणणाऱ्या राजबंदीवानांस वाचावयास देण्यात येत.

बंदीवानास शिकविण्याचा दुसरा उपयोग झाला तो हा की, त्यास साधारण वाचणे, लिहिणे, अंकगणित येताच आणि इंग्रजी दोन-तीन पुस्तके होताच त्यांस 'मुनशी' होता येई. त्यायोगे आमच्या शिक्षणात प्रवीण झालेले देशहितैषी हिंदू बंदीवान बंदीशाळेत, कार्यालयात आणि बाहेरील जिल्ह्याजिल्ह्यांत 'लेखकां'च्या आणि इतर बंदी अधिकाऱ्यांच्या जागेवर नेमले गेले. त्यायोगे त्यांचे हस्तकष्ट तर दूर झालेच, त्यांच्या गाठीस चार रुपयेही बांधले गेलेच, पण प्रचाराच्या दृष्टीने महत्वाचा लाभ झाला तो हा की, जसजशा वर्चस्वाच्या जागा या सार्वजनिक कळकळीचा काही तरी गंध असलेल्या लोकांच्या हातांत पडू लागल्या तसतसा स्वदेशीव्रताचा आणि स्वदेशीपक्षाचा प्रचार बंदीवानांत आणि स्वतंत्र वसाहतवाल्यांत वाढण्यास फार उपयोग होऊ लागला. आणि त्यामुळे सरकारी कामात अयोग्य व्यत्यय तर आलाच नाही; परंतु उलटपक्षी बंदीवानांत देशाभिमानादिक उदात्त भावनांचा काहीतरी उदय होऊन त्यांची मानसिक आणि नैतिक सुधारणा होत गेल्याने व्यसनासक्तता, दुष्टपणा, घातपात इत्यादी दुर्गुणांपासून होणारी भांडणे कमी होऊ लागली. वसाहत वसविण्याचे जे मुख्य ध्येय बंदीवानांची सुधारणा हे असावयास पाहिजे होते तेही थोडेबहुत साध्य होऊ लागले. यासाठी वास्तविक या प्रयत्नांस सरकारने उत्तेजन देण्यास पाहिजे होते, वास्तविक सर्वांसच त्यायोगे समाधान वाटावयास पाहिजे होते परंतु- 'बंदीवानांची सुधारणा' हे ध्येयच ज्यास माहीत नव्हते आणि चोपून काम करून घेणे हेच बंदीविभागाचे अतिकर्तव्य अशीच ज्यांची समजूत होती, असेच अधिकारी बहुशः तिकडे असल्याने हे सर्व जवळजवळ दंडनीयच समजले जाण्याची भीती असे; म्हणूनच ते शक्यतो अप्रकटपणेच करावे लागे.

प्रकरण दुसरे

# अंदमानात शुद्धी

आम्ही सन १९११ या वर्षी अंदमानात पाय ठेवला. त्यानंतर थोडक्याच महिन्यांत आम्हास असे आढळू लागले की, काही हिंदू बंदीवान अंदमानात आल्यानंतर मुसलमान झाले असून आपली नावेही त्यांनी बदलली आहेत. आम्ही हे कसे घडते म्हणून शोध करू लागलो तो तेथील हिंदूंपैकी कोणासही त्याविषयी काहीच महत्व वाटत नसून ती एक इतकी परिचयाचीच घटना आहे की, तिच्यात चौकशी ती काय करावयाची असे त्यांचे मत असल्याचे माझ्या प्रत्ययास आले. अंदमानात वास्तविकपणे पाहता इंग्रजी अधिकाऱ्यांची कर्तुमकर्तुम् समर्थ अशी सत्ता असल्याने तेथे त्यांच्या हातात निराधार आणि अनाथ होऊन पडलेल्या हिंदू बंदीवानांस ख्रिस्ती करविले जाण्याचा अधिक संभव होता. १८५७ पर्यंत कार्यालयांतूनच नव्हे तर सेनानिवेशांतूनही ख्रिस्ती धर्म फैलावण्यास अधिकाऱ्यांकडून अनेक सवलती देण्यात येत. परंतु सत्तावनच्या त्या क्रांतियुद्धाची प्रचंड ठोकर लागल्यापासून एकंदरीत सरकारी अधिकारी धर्मप्रसाराच्या भानगडीत फारसे पडेनासे झाले. यद्यपि अजूनही अपराध्यांच्या जाती म्हणून ज्यावर ठसा मारण्यात आला आहे अशा काही जातींच्या ज्या वसाहती केलेल्या असतात, त्यांवर मिशनऱ्यांचे बरेच वर्चस्व प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे गाजत असते. तथापि माझ्या स्वतःच्या अनुभवावरून मी असे निश्चयाने म्हणू शकतो की, कारासंस्थेचा उपयोग हिंदूंना बाटविण्याच्या कामाकडे करून घेतला जात नाही. कोठे कोठे ख्रिस्ती प्रचारक प्रार्थनेस येतो; पण त्याचे प्रार्थनेस जाण्यास कोणावरही म्हणण्यासारखी सक्ती कधीही करण्यात येत नाही. तुरळक अपवाद सोडून, अंदमानात हिंदूंना ख्रिस्ती करण्यासाठी गुप्त वा प्रकट, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशी कोणतीही खटपट सरकारी रीतीने तर नाहीच; पण सरकारी अधिकाऱ्यांच्या व्यक्तिशः वजनाचा दुरुपयोग करूनही होत नसे. या तुरळक उपकाराचे एक उदाहरण आम्हास स्वतः सोडवावे लागले. त्याचा निर्देश पुढे येईलच. परंतु अंदमानाच्या हिंदू बंदीवानांस धाकाने, लाचलुचपतीने वा एकसारखा उपदेशाचा ससेमिरा मागे लावून ख्रिस्ती केल्याची उदाहरणे आमच्या चौदा वर्षांचे अनुभवात चार देखील घडलेली आठवत नाहीत.

ज्या ख्रिस्ती सत्तेच्या हातात ते अंदमानातील हिंदू बंदीवान पडलेले होते त्या सत्तेने त्यांच्यावर आपला धर्म लादण्याचा कोणताही अन्याय्य प्रयत्न केला नसतानाही हे केवढे आश्चर्य होते की, त्या हिंदू बंदीवानांप्रमाणेच त्याच बंदीद्वीपात अवश आणि हताश अशा बंदीवान होऊन पडलेल्या मुसलमान बंद्यांनी मात्र आपल्या हिंदू सहबंद्यांस बाटवून मुसलमान करण्यासाठी त्यांच्यावर बलात्कार करावा, त्यांचा छळ करावा, त्यांस फूस लावावी आणि स्वधर्मप्रसारार्थ स्वतः पीडा न देणाऱ्या ख्रिस्ती सत्तेने परधर्मीय मुसलमानांकडून चाललेले हे हिंदूंचे छळ मात्र उपेक्षेने चालू द्यावेत! मोठ्या बंदीवानांची गोष्ट एक वेळ सोडून दिली तरी जी लहान कोवळ्या वयाची मुले काळ्यापाण्यावर किवा कारागारात धाडली जातात त्यांच्या शरीराची, आरोग्याची अजाण म्हणून जशी सरकार विशेष काळजी घेते तशीच त्यांच्या आत्म्याची व धर्माची काळजी घेणे आणि निदान ती समंजस वयात येईतो तरी त्यांच्या धर्माचे संगोपन करणे हे अज्ञानाच्या संपत्तीचे रक्षण करण्याइतके तरी महत्वाचे सार्वजनिक कर्तव्य आहेच आहे. पण ते कारासंस्थेत मुळीच केले जात नाही. अंदमानाची तर गोष्टच सोडा, पण हिंदुस्थानातल्या

बहुतेक कारागारांतून हिंदू बंदीवानांस मुसलमान करण्याचा सपाटा गुपचूपपणे मुसलमान बंदीवानांकरवी आणि मुसलमानी जमादार, हेड ऑफिसर, वॉर्डर इत्यादी बंदी अधिकाऱ्यांकडून चाललेला असतो. चौदा वर्षांच्या अनुभवानंतर आणि वरील प्रकारास आळा घालण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असता त्या विषयाची खडान्-खडा माहिती झाल्यानंतर आम्ही स्पष्टपणे असे विधान करतो की, दिल्लीची किवा मुंबईची जुम्मा मशीद ही जितक्या हिंदूंस प्रतिवर्षी बाटवीत नसेल तितक्या हिंदूंस ही कारासंस्थेची मशीद बाटवीत असते.

हिंदूंस संघटित प्रयत्नाने फशी पाडणाऱ्या हसन निजामीच्या ज्ञात जाळ्याहून सहज हजारो हिंदूंस आजपर्यंत बाटवून टाकणारे हे या कारासंस्थेच्या अदृश्य मशिदीतील अज्ञात जाळे फारसे कमी भयंकर नाही.

भ्रष्टीकरणाचा प्रथम विधी मुंबई इत्यादी नगरांतील चोरांच्या मुसलमानी अड्ड्यांत होतो.

कारासंस्थेतील या मुसलमानी भ्रष्टीकरणाची कोणतीही संघटित योजना नाही. तिचे कोणीही अधिकृत चालक वा प्रेरक नाहीत. प्रत्येक मुसलमानास लहानपणापासून हे शिक्षण मिळते की, एक -अर्धा जो जसा गवसेल तसा काफर मुसलमान करीत राहिलास की या लोकी तुझी मान्यता वाढून परलोकी तुझ्या मोठमोठ्या पापांची क्षमा होईल आणि तुला स्वर्गीय अप्सरादी भोग मिळतील! असल्या शिक्षणाने या कारासंस्थेतील मुसलमानी भ्रष्टीकरणाला मूळ प्रेरणा मिळते. तिला पहिले व्यक्त स्वरूप मुंबई, कलकत्ता, दिल्ली, लाहोर, मद्रास इत्यादी मोठमोठ्या नगरांत ज्या मुसलमानी चोर-दरोडेखोरांच्या टोळ्या वावरतात, त्यांच्या त्यांच्या अड्ड्यांतून मिळते. कारण चोरी, दरोडे इत्यादी पापे करणाऱ्या आणि शिक्षा खाल्लेल्या मुसलमानी बंदीवानांत राहून त्यांच्या मनोवृत्तीचा ज्यांना पत्ता लागला आहे ते ही गोष्ट तात्काळ मान्य करतील की, हिंदूंच्या घरी केलेली चोरी किवा हिंदू गावांवर वा व्यापाऱ्यांवर घातलेला दरोडा हे त्या मुसलमानी अड्ड्यांत क्षम्य मानले जाते; इतकेच नव्हे तर भूषणभूतही गणले जाते. आम्ही असे मौलवी पाहिले आहेत की, जे अशा मुसलमानी अपराध्यास निरपराधी समजत. अशा मनोवृत्तीचे या धंद्यात पडलेले ते आततायी लोक आपल्या धर्माच्या मद्यपाननिषेध, प्रार्थना, दान इत्यादी बहुतेक आज्ञा पायाखाली तुडवीत असतातच. हिंदूंची चोरी केली म्हणजे ते मुसलमानांची करीत नाहीत असेही नाही; त्यांच्या आपसातील वैमनस्यात हजारो हत्या घडतच असतात. पण या सर्व पापांचे प्रायश्चित्तार्थ वर दिलेला जो एक सोपा धर्मविधी त्यास लहानपणापासून पढविलेला असतो की, तू काफरास मुसलमान करीत जा, तो त्यास अशा स्थितीत फार सोईस्कर रीतीने करता येतो. नव्हे तो विधी करणे त्यांच्या या चोरी, दरोडे, ठगी इत्यादी लौकिक धंद्यासच अगदी अवश्य असतो. कारण मुंबईसारख्या नगरातील चोरांच्या अड्ड्यातील माहिती असलेल्यांना ठाऊक आहे की, त्यांचेही एकेक महंत असतात. ते अत्यंत सभ्य आणि माननीय असा धंदा करीत पातीने दुकान चालवीत असतात. त्यांच्या हाताखाली नवशिकी पोरे नेहमी राबत असतात. ही पोरे त्यांच्या शिकवणीनुरूप खिसे कातरण्याच्या पहिल्या इयत्तेतून खिडकी फोडण्याच्या दुसऱ्या इयत्तेत, तिजोरी फोडण्याच्या तिसऱ्या इयत्तेत, सुरा दाखवून उघड वाट मारण्याच्या चौथ्या इयत्तेत आणि शेवटी दरोड्यांच्या टोळीत समाविष्ट होण्याच्या पाचव्या इयत्तेत बढती पावत जातात. तुरुंगात गेली तर ही पोरे जातात. महंत सहसा हलत नाहीत, फसत नाहीत. अशा या विद्यापीठात नवीन मुलांचा भरणा एकसहा होत राहिला पाहिजे हे उघड आहे.

हे चोरांचे अड्डे हिंदूंचे असले तर त्यात अनाथ भणंग हिंदू पोरें जशी सापडतात, तशी मुसलमान पोरेही थोडीशी सापडतात. परंतु हिंदूंचा धर्मच सांगतो की, तू मुसलमानाबरोबर जेवू नकोस, खाऊ नकोस आणि मुसलमानाचे हिंदू करणे ही तर कल्पनाही त्यांस ग्रहण करवत नाही. म्हणून हिंदू महंताचे अड्ड्यात मुसलमानी मुले गवसली तर ती चोर होतील, पाजी होतील, तुरुगात जातील; पण मुसलमानी धर्मापासून च्युत होण्याचे काही भय नसते. उलट त्यांचेबरोबर एखादे वेळेस खाणेपिणे, निरुपाय म्हणून का होईना, पण घडल्यास हिंदू महंतच मुसलमान म्हणून हिंदूतून पतित व्हावयाचे! पण मुसलमानी महंताचे अड्ड्यात जी अनाथ, भणंग, उनाड अशी हिंदू मुले सापडतात त्यांची स्थिती मात्र वरील प्रकारच्या अगदी उलट होते. त्यांना चोऱ्या शिकाव्या लागतातच, पापे करावी लागतातच, कारागृहात पडावे लागतेच, पण वर आपल्या हिंदू धर्मापासून च्युतही व्हावे लागते. कारण चोऱ्यामाऱ्या करताना प्रसंग पडेल त्याच्याशी खाणे, वेळी शेंडी कापणे, वेळी दाढी राखणे इत्यादी सर्व प्रकार करावे लागणारच. परंतु अशा रीतीने त्या हिंदू मुलांस एकदा-दोनदा अभक्ष्य भक्षण करवून किवा त्याच्या भाकरीच्या तुकड्यास शिवून किवा मुसलमानी नाव देऊन, पोलिसास नीट फसविण्यासाठी चटकन शेंडी कापून आणि सुंता करून टाकावी लागली की, त्या प्रत्येक कृतीने तो हिंदू मुलगा आपण होऊनच आता आपण मुसलमान झालो असे समजू लागतो! त्याच्या घरात त्याला शिक्षणच असे मिळालेले असते की, ''विटाळलेल्या भाकरीच्या तुकड्यात किवा मुसलमानाच्या जेवताना लागलेल्या बोटाच्या स्पर्शात तुझा सारा हिंदुधर्म राखण्याचे सामर्थ्य आहे. ' अशा प्रकारे शेकडो हिंदू मुले आणि तरुण कोणासही न कळता मुंबईसारख्या मोठमोठ्या नगरांतील चोरदरोडेखोरांच्या अड्ड्यातून गुप्तपणे मुसलमान होत आहेत! त्यांच्या त्या मुसलमानांशी खाल्ल्या-प्याल्याची बातमी लागताच त्यांच्या जाती त्यास घेईनाशा होतात आणि मौलवी महंत त्यास '' अरे तू मुसलमान झालेला आहेसच, आता केवळ नमाज पढ, सुंता कर की तुला ती फलाणी मुसलमानाची पोर देऊन टाकून तुझे लग्न ठोठावून टाकू!'' म्हणून सांगतात. त्या महंताच्या अड्ड्यावर जशी उचली मुले तशा उचल्या बाजारी मुलीही नोंदलेल्या आणि सवकलेल्या असतात. अशा पायऱ्यापायऱ्यांनी हिंदूंची मुले मुसलमानी चोरांच्या अड्ड्यात पाऊल टाकताच आपल्या हिंदुधर्मासच हरवून बसतात ही गोष्ट त्या मुसलमानी अड्ड्यातील महंतासही नव्हे तर मुले जाळ्यात पकडण्यासाठी त्यांनी नेमलेल्या जुन्या सोद्या मुसलमान मुलांनाही पक्की माहीत असते; आणि ते या हिंदू मुलांस या प्रकारे बाटविण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न झटून करतात. कारण वर सांगितल्याप्रमाणे त्यांच्या पापकर्मास या हिंदू मुलांकडून साहाय्यचे साहाय्य पोचून उलट त्या पापासाठी मिळणाऱ्या पारलौकिक शिक्षेपासून सुटका मिळते. इतकेच नव्हे, तर एक काफर मुसलमान केल्याच्या पुण्यासाठी काहीतरी पारितोषिकही मिळेल म्हणून त्यांची निष्ठा असते!

नगरातील चोरांच्या अड्ड्यांतून जे वाचतात ते बंदीगृहात मुसलमानी भ्रष्टीकरणास बळी पडतात. कारागृहातून आढळणाऱ्या बाटलेल्या हिंदूत वर वर्णिलेल्या प्रकाराने बाटलेले काही लोक असतात. परंतु काही बंदीगृहात येण्यापूर्वीच बाटलेले असतात. लहान गावांतून चोऱ्या केलेले, उत्क्षोभात हत्या करण्याच्या अपराधाने शिक्षा झालेले, किवा जे मुसलमान चोरांच्या अड्ड्यात न सापडता हिंदूंच्या चोर- अड्ड्यात सापडले होते अथवा इतर अपराधासाठी शेती-बितीच्या मारामाऱ्यात दंडिले गेले असे कित्येक हिंदू बंदीगृहात बाटविले जातात. त्यातही

पंचवीस वर्षांचे आतील तरुण आणि किशोरवयस्क मुलेच अधिक बाटत. मुंबईच्या अड्ड्यातील मागे निर्देशिलेल्या महंतांपैकी जे काही मुसलमान महंत अखेर दंडविधानाच्या (क्रिमिनल लॉच्या) कातरीत गवसून तुरुंगात आलेले असतात, ते अशा नवीन हिंदू मुलांवर बंदीगृहातही डोळा ठेवतात. कारण तेथेच त्यांना चोरीचे पहिले वा पुढचे धडे देऊन मुसलमान करून टाकले की, बंदीगृहातून ती मुले त्यांच्या दुष्ट व्यवसायास उपयोगी पडून त्यांच्या मुंबई इत्यादी नगरांतील अड्ड्यांत समाविष्ट केली जात. मुसलमान करण्याच्या या प्रयत्नास बंदीगृहात चाकरीवर असलेले मुसलमान शिपाईही केव्हा केव्हा हस्ते परहस्ते साहाय्य देताना आढळतात. परंतु मुसलमान बंदीवानांतून जे वॉर्डर, पेटी ऑफिसर इत्यादी बंदीवान-अधिकारी नेमले जातात ते मात्र शेकडा नव्वद प्रमाणाने हिंदूंस धाकदपटशा इत्यादी साधेल त्या उपायांनी बाटविण्यात काहीही कसूर करीत नाहीत.

हिंदुस्थानातील बहुतेक कारागारांत जर ही स्थिती आढळून येते तर अंदमानाची गोष्टच विचारावयास नको. तेथे प्रथमपासून धर्मांध आणि पापपरायण पठाण, बलुची इत्यादी मुसलमानी बंदीवानांतीलच वॉर्डर वगैरे अधिकारी नेमलेले असत. त्यातही राजकीय बंदीवान हिंदूच असल्याने जमादारादिक जागांवर मुसलमानांनाच नेमण्याचा अगदी कट्टर परिपाठ पडलेला. हे लोक हिंदूंना सक्त कामात घालून, कठोर दंडाचा धाक दाखवून खोटे-खरे खटले एकसारखे उभारून कसे सतावून सोडीत आणि त्या ससेमिऱ्यातून सुटावयाचे तर मुसलमान हो असे स्पष्टपणे सांगून अल्पवयी आणि बापुड्या हिंदूंस मुसलमान होणे कसे भाग पाडीत हे पूर्वार्धात थोडेबहुत दिग्दर्शित केलेलेच आहे. हा प्रकार येता जाता जसजसा आमच्या दृष्टीस पडू लागला तसतसा याचा काही तरी प्रतिकार केलाच पाहिजे असे आम्हांस वाटू लागले. दर महिन्या-पंधरा दिवसांत एखादा तरी हिंदू गुपचुप हिंदूंच्या पंगतीतून उठून मुसलमानांच्या पंगतीत जेवावयास बसण्यास गेलेला दिसे! आम्हांस ही स्थिती दुःसह होई. परंतु आम्ही पडलो कोठीबंद! काय करावे हे सुचेना!

इतर हिंदू बंदीवानांच्या मनात त्वेष उत्पन्न करण्याचा प्रयत्न करू लागलो तो आढळून आले की, त्यांना या गोष्टीचे काहीच सोयर-सुतक वाटेना. जो तो म्हणे ‘मला काय त्याचे!’

## मुसलमानांस विरोध

अज्ञ हिंदूंची गोष्ट राहो, पण राजकीय बंदीवानांतही या मुसलमानीकरणास अडथळा करण्याचे धाडस कित्येकांस होईना आणि ते एका अर्थी क्षम्य होते; कारण त्यांच्या तितिक्षेने ताण तरी किती सोसावा! देशात अश्रांत श्रम करून ते भयंकर दंड भोगीत कारागारात खितपत पडलेले, त्यात आता कारागारातही सर्वांशी झुंज खेळत आणखी कष्टमय स्थितीत पडण्याइतकी दैहिक शक्ती तरी मनुष्यास हवीना! त्यांचा भार ते सहन करीत होते. दुसरी कामे खरोखर पाहता दुसऱ्यांनी करावयास पाहिजे होती तेव्हा राजबंदीवानांत जे म्हणत- राहू द्या आता ती भानगड! त्या क्रूर पठाणी जमादार-हवालदारांशी न भांडताच जगणे कठीण, त्यात त्यांच्या धार्मिक वेडास प्रतिरोध करून कोण त्यांचा रोष करून घेतो? असे जे म्हणत - त्यांचे ते म्हणणे एका दृष्टीने साहजिक होते. परंतु जे दोनचार लोक आपणास आता अधिक कष्ट सोसण्याची शक्ती नाही ही गोष्ट प्रांजलपणे मान्य करण्यास अहंकाराने सिद्ध न होता उलट ती मुसलमानांच्या भ्रष्टीकरणाचा प्रतिकार करण्याची खटपटच मूर्खपणाची आहे म्हणून म्हणत त्या

निमित्ताखाली आपला भ्याडपणा झाकू पाहात त्यांचे वर्तन मात्र निषेधार्ह आणि निद्य होते यात काही शंका नाही. त्यांच्यापैकी काहींनी तर मुसलमानी जमादारास प्रसन्न करण्यासाठी आपणही मुसलमानी धर्मच स्वीकारण्याच्या बेतात आहोत असे नित्य भासवून दिवस काढावेत - मग इतर हिंदूंस त्यांच्या डोळ्यांदेखत भ्रष्ट केले जात असता त्याचा प्रतिकार करण्याची गोष्ट कशाला?

या मुसलमानी अधिकाऱ्यांस प्रसन्न करण्याच्या आणि आपले हे भीरुत्वच शहाणपण आहे म्हणून म्हणण्याच्या पुढची पायरी अर्थातच ही होती की, पुढे जेव्हा मुसलमानी पंजातून हिंदू लोकांस सोडविण्यासाठी भांडणे जुंपत तेव्हा या वृत्तीच्या लोकांनी ती भांडणे भांडणाऱ्या हिंदू लोकांस वेडे म्हणून मुसलमान जमादारास प्रसन्न करावे आणि हिंदू लोकांस सांगावे की ''अरे कसली भ्रष्टता नि शुद्धता? असले हे पतित, अपराधी, नीच लोक हिंदू समाजात राहिले काय आणि गेले काय सारखेच! जे भयाने वा पैशाने मुसलमान होतात, ते हिंदू असून तरी काय लाभ? हा हिंदू करून घेण्याचा निव्वळ पोरखेळ आहे'' असेच सुपरिन्टेंडंट, बारी, कमिशनर इत्यादी इंग्रजी अधिकारी आम्हांस म्हणत. असेच मानभावी मुसलमानही आम्हांस शिकवू पाहत. शुद्धीकरणावरील हे आक्षेप अजूनही परधर्मीय दांभिकांकडूनच नव्हेत तर स्वधर्मीय प्रामाणिक पण भोळ्या माणसांकडूनही आणण्यात येतात. म्हणून त्यातील हेत्वाभास थोडा विशद केल्यावाचून अंदमानात त्या वेळेस काय भावना आणि विचार आम्हांस हे शुद्धीकरणाचे कार्य हाती घ्यावयास प्रवृत्त करते झाले हे वाचकाच्या नीट लक्षात येणार नाही.

## शुद्धीकरण हा केवळ पोरखेळ आहे काय?

पतितांस, लुच्च्यांस, अपराध्यांस ते हिंदू समाजात जन्मास आले असतानाही विधर्मात जाऊ न देण्यासाठी प्रयत्न करणे हा जर पोरखेळ आहे तर आज मुसलमान लोक हजारो वर्षे वेळेवर युद्धे करून देखील हिंदू पतितांस, लुच्च्यांस, अपराध्यांस मुसलमान करून घेण्याचा पोरखेळ का खेळत आहेत? मुसलमान धर्मवेडे आहेत! ठीक. पण हे सुज्ञ, स्वतंत्र विचारी युरोपियन आणि हे अमेरिकन लाखो रुपये जमवून आणि खर्चून हिंदुस्थानातील यःकश्चित खेड्यांत तर काय पण अरण्यांतही, पतितच तर काय पण अगदी पशुसमान रानटी हिंदूंनाही ख्रिस्ती करण्यासाठी छलबललोभादिक साधनांनी जे झटत आले तेही काय पोरखेळ म्हणूनच! असले लोभी दुष्ट लोक हिंदू समाजात असून तरी काय लाभ? तर आम्ही म्हणतो हे मुसलमान समाजात वा ख्रिस्ती समाजात तरी जाऊन काय उपयोग? परधर्मीयांस आम्ही विचारतो तुमचा त्यांना बाटविण्यासाठी तरी एवढा अट्टाहास कां? जे पतित, दुष्ट आहेत ते आम्हांस चालतील. तुमच्या महंमदीय आणि इसायी पवित्र कुळात त्यांस ओढून नेऊन आपले पावित्र्य कशास विटाळून घेता? पोरखेळासाठी लाखो रुपये उधळून तुम्ही आरंभच नका करू म्हणजे हिंदूंनांही शुद्धीकरणाचा डाव खेळून त्या पोरखेळात भाग घ्यावयाचा मोह पडणार नाही.

परंतु जर हा पोरखेळ नसेल, जर हजारो मोठमोठे सम्राट, साधू, धर्मप्रवर्तक आणि भिक्षू करोडो रुपयांचा चुराडा करीत आपआपली संस्कृती आणि धर्म यांचा पगडा जगावर बसविण्यासाठी युरोपातून आणि अरेबियातून आज शतकानुशतके झटत आले असे म्हणत असाल तर मग ज्या ज्या हिंदूंस आपली संस्कृती आणि धर्म हा जगावर

प्रसृत झाला असता जगाचे अंतिम कल्याण अधिक सुलभपणे आणि निश्चितीने साधेल असा विश्वास वाटत आहे त्यांचे शुद्धीकरणाचे प्रयत्नही तुम्हांस तुमच्या प्रयत्नांइतके न्याय्य आणि गंभीर वाटले पाहिजेत.

पतित, मद्यपि, कलही, नीच अशा लोकांत तुम्ही तुमच्या धर्माचा प्रचार करता तो का? त्यांच्या आत्म्याचे तारण व्हावे म्हणून? तर मग आम्हीही अशा दुष्ट, नीच आणि मद्यपि लोकांस आमच्या धर्मातच ठेवण्याचा आणि शुद्ध करून घेण्याचा जो प्रयत्न करतो तो 'स्वधर्मे निधनं श्रेयः' या उक्तीप्रमाणे त्यांच्या आत्म्याचे तारण हिंदू धर्माने आणि संस्कृतीनेच होते म्हणूनच होय.

## जे पतित त्यांच्याच तर तारणाची विशेष आवश्यकता

जर तुम्ही हिंदूंस, मग तो कितीही पतित आणि नीच का असेना, परंतु लोभाचे, कामाचे, व्यसनाचे देखील आमिष दाखवून आणि आमचे मौलवीसाहेब तर सुरी दाखवूनही जे बाटवता, ते तुमचा समाज आणि संख्याबळ वाढविण्याकरिता तुमच्या ऐहिक लाभासाठी बाटवीत असाल तर त्याचप्रमाणे आम्ही हिंदूही आमचा समाज आणि संख्याबळ वाढविण्यासाठी आणि आमची संस्कृती क्षीणतर होऊन अन्य जातींपुढे आपल्या जातीय जीवनाचा बळी दिला जाऊ नये म्हणून त्याच कारणासाठी आम्ही बाटविलेल्या हिंदूंस शुद्ध करून घेतो; मग तो नीच, पतित का असेना.

कारण ती व्यक्ती, जी भ्रष्टविण्याकरिता तुम्ही झटता ती, दुष्ट वा मद्यपि वा पतित असेल; परंतु तुम्ही सूक्ष्म विचारांती हे सामाजिक सत्य ओळखून ध्यानात ठेवलेले आहे की, ती व्यक्ती तुम्ही नावाने, बळाने, कशी-तरी मुसलमानी वा ख्रिस्ती धर्मात कोंबून ठेवलीत की तिची संतती लहानपणापासून तुमच्या संस्कृतीतच वाढल्याने मनाने पक्की ख्रिस्ती वा मुसलमानी होऊन तुमच्यातील सुज्ञ, बलिष्ठ आणि उपयुक्त नागरिकांची संख्या वाढवील. कारण दुष्टाची, मद्यप्याची वा लबाडाची संतती लबाडच निपजते असा नियम नाही. कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया या द्वीपांत अशीच टाकाऊ माणसे इंग्लंडने धाडली. आज त्याच इंग्लंडतील हत्यारी, चोर, दरोडेखोर अपराध्यांच्या त्या द्वीपांतरित पतितांच्या वंशजांनी कॅनडात आणि ऑस्ट्रेलियात स्वतंत्र राष्ट्रे आणि राज्ये स्थापित करून चालविली आहेत. हिंदू समाजातील घाण आणि गाळही तुम्ही पावड्याने - सोन्याच्या पावड्याने - जे एकसारखे ओढीत आहा ते एवढ्याचसाठी की, सुज्ञ शेतकऱ्याप्रमाणे तुम्हांस त्या घाणीच्या आणि गाळाच्या उपयोगाची माहिती आहे - की जर त्याचे खत शास्त्रीय रीतीने उपयोजिले तर जीवनद धान्याच्या सोनेरी कणसांनी तुमची शेती पुढील वर्षांच्या धान्यातून डवडवून डोलू लागेल.

आणि हेच सामाजिक तत्व ध्यानात ठेवून नीच असो, चोर असो, लुच्चा असो, अज्ञ असो, पण हिंदू म्हटला की तो परधर्मात जाऊ द्यावयाचा नाही आणि गेला असला तर तो परत शुद्ध करून हिंदू समाजात समाविष्ट करून घ्यावयाचा म्हणून शुद्धीकरणाची आमची सेना झटत आहे. कारण चोर जरी असला तरी हिंदू चोर हा मुसलमान चोराहून हिंदू संस्कृतीस कमी हानिकारक आहे. हिंदू चोर नुसती चोरीच करील, पण केवळ देऊळ म्हणून फोडणार नाही, मूर्ती तोडणार नाही किवा वेद जाळणार नाही. मुसलमान चोर चोरी तर करीलच, पण जाता जाता देवमूर्तींचा उच्छेद करून आणि शक्य तर एखाद्या तरी 'काफराच्या' डोक्यात तो काफर म्हणूनच सोटा घालून स्वर्गात त्या

चोरीचे पापक्षालन होण्यापुरते रक्त सांडण्यास कमी करणार नाही! हा फरक सदोदित संभवनीय म्हणून ध्यानात ठेवला पाहिजे. एवढ्यासाठी देखील चोरी सुटत नसेल, मद्य सुटत नसेल, लोभ सुटत नसेल तरी चिंता नाही. पण तरीही हिंदुत्व सोडू नकोस. तू हिंदूचा हिंदू राहा म्हणून पतिताचे मन वळविणे हिंदू संस्कृतीच्या जातीय जीवनाच्या दृष्टीने अवश्य आहे हे सिद्ध होते.

परंतु शुद्धीकरणाची चळवळ चोरापोरातही का चालू ठेवली पाहिजे यास दुसऱ्या वरील कारणाहूनही अत्यंत महत्वाचे, आणखी एक समर्पक कारण आहे.

चोरी सोडलीस तर उत्तमच! पण ती सुटत नसेल तर निदान हिंदू चोर होऊन तरी राहा. कारण चोरी न सोडणे हे पाप असले तरी हिंदू न राहणे हे त्या पापाहून शतपट घोर असे राष्ट्रीय आणि सामाजिक पाप आहे - नैतिक तर आहेच आहे. ते तरी निदान करू नकोस! असे प्रत्येक मनुष्याला, मग तो कितीही टाकाऊ का असेना, आपण हिंदूंनी सांगितले पाहिजे. त्यासाठी झटले पाहिजे; कारण असेच 'टाकाऊ' बांधव आपल्या पूर्वजांनी आपल्या स्वतःच्या पावित्र्याच्या घमेंडीत परधर्मात प्रतिपिढीस जाऊ दिले - मला काय त्याचे? ज्याचा धर्म त्याच्यापाशी! - तो कवडीमोलच आहे? जाईना का, अशा अतिशहाण्या आत्मघातकी समजुतीने जाऊ दिले. आणि परिणाम काय झाला पाहा! त्या एकेका टाकाऊ मनुष्यास परधर्मात टाकल्याने आज शंभर वर्षांनंतर त्याच्या बीजापासून हिंदू धर्माचे, संस्कृतीचे आणि समाजाचे शेकडो कट्टे शत्रू उत्पन्न झाले! औरंगजेब एका रजपूत बाईच्याच अशा पतित टाकाऊ कुशीत उत्पन्न झाला होता! मलबारचे हे मोपले अर्धे-अधिक रक्तमांसबीजाने मूळच्या हिंदूंचे वंशज! पण त्यांना आता आपली आई कोण त्याची ओळख उरली आहे काय? हा भयंकर फरक केवळ त्या मूळ हिंदूंची शेंडी बळाने कापून दाढी ठेवणाऱ्या मुसलमानी मौलवींच्या त्या 'पोरखेळाचा'च परिणाम होय.

## थोरांचे पोरखेळ

एतदर्थ नावाने का होईना परंतु कितीही नीच किवा निरुपयोगी जरी झाला तरी त्याला हिंदुत्वाच्या कक्षेत ठेवण्यासाठी किवा आणण्यासाठी झटलेच पाहिजे. जो पोरखेळ न खेळल्याने आज हिंदू संस्कृतीवर मारक आघात करणारे मलबारचे दंगे ठिकठिकाणी उत्पन्न होऊ शकले तो पोरखेळ तो दाढी मुंडून शेंडी ठेवण्याचा, मुसलमान व ख्रिश्चन नाव बदलून हिंदू नाव ठेवण्याचा, किवा नुसते तुळशीपत्र देऊन तू हिंदू झालास ना म्हणून त्याची स्वीकृती द्यावयाचा तो पोरखेळ, आता थोरांनी देखील खेळलाच पाहिजे! नीचांस, दंडितांस, पाप्यांस त्यांच्यासाठी नसले तरी त्यांची संतती हिंदुत्वास मुकू नये म्हणून तरी हिंदू समाजात समाविष्ट करून घेण्यासाठी झटलेच पाहिजे. केवळ सामाजिक दृष्टीनेही झटले पाहिजे. पारलौकिक दृष्टीने तर पाहिजेच पाहिजे! आणि कोणी सांगावे त्या तुमच्या अहंमन्य आढ्यतेस पापी आणि नृशंस वाटणाऱ्या हत्यारी चोरापोरांतूनच पुढे एखादा वाल्मिकीही कशाव-रून निपजणार नसेल? हिंदूंस आणि जगास रामायण अशाच एका टाकाऊ हत्यारी चोरानेच उपायन म्हणून दिलेले आहे! म्हणून त्यांना उलटेसुलटे पण रामनाम जपू द्या! जपावयास लावा! झाले तर हितच होईल!

अशा दूरवर विचाराने प्रेरित होऊन त्या कठोर कारागारात आणि वसाहतीतही चोर, दरोडेखोर आणि हत्यारी अशा त्या पतितांसही मुसलमानी धर्माच्या तावडीतून सोडविण्या साठी आपण उद्युक्त झाले पाहिजे असे आम्ही तेथील हिंदूस आणि राजबंदीवानांस सांगू लागलो. वरील वाक्ये सहासात वर्षे आमच्या ओठावर सारखी खेळत होती. सन १९१३ व्या वर्षी म्हणजे आम्ही अंदमानात गेल्यानंतर सरासरी दीड - दोन वर्षांनी आम्ही, हिंदूस बाटविण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुसलमानांवर पहिला खटला भरला. पहिला प्रतिकार केला. राजबंदीवानांतील ज्या लोकांनी आम्हांस साह्य करण्यास तत्परता दर्शविली आणि ज्या हिंदू बंदीवानांनी या चळवळीत हळूहळू उत्साहाने भाग घेण्यास आरंभ केला त्यांच्या सहकार्याने ही शुद्धीकरणाची चळवळ आम्ही सरासरी इ. स. १९२०-२१ वर्षापर्यंत म्हणजे आम्ही अंदमानातून हिंदुस्थानातील तुरुंगात धाडले जाइतो सारखी चालविली होती. हिंदुस्थानात आल्या-वर येथील बंदीगृहातही ती सोडली नाही. त्यायोगे आमच्यावर कित्येक वेळा मुसलमानी गुंडांनी शारीरिक आघात करण्याचे, आम्हांस ठार मारण्याचे कट केले, प्रयत्न केले, बंदीगृहात दंगे झाले, एकदा आमच्या बंधूंवर मुसलमानी गुंड तुटून पडून त्यांनी त्यांस घायाळही केले. पण ती चळवळ थांबली नाही. या चळवळीने अंदमानात नवीन हिंदू बाटविणे तर जवळ जवळ अशक्यच झाले; पण पूर्वी बाटलेले हिंदू देखील वसाहतीत शुद्ध केले गेले.

## अंदमानात शुद्धी

अंदमानात हिंदूस बाटविण्याचा क्रम साधारणतः असा असे की, प्रथमतः चलान येताच किवा त्यानंतर जेव्हा संधी सापडेल तेव्हा हिंदूतील जी कोवळी मुले वा घाबऱ्या स्वभावाची माणसे आढळत त्यांस मिर्झाखान जमादार सक्त कामात धाडी, तेथील मुसलमानी वॉर्डर वा पेटी ऑफिसर त्यास एका बाजूस मारहाण, धाकदपटशा व शिवीगाळ करीत; दुसऱ्या बाजून पूर्वी हिंदू असून बाटलेल्या मनुष्यास चोरून आणलेली मिठाई, तंबाखू इत्यादी वस्तू देऊन प्रेमाने वागवीत. ती नवीन सावजे अगदी त्रस्त होऊन रडकुंडीस आली की त्यांस सांगण्यात येई की, तू का मरतोस? या आमच्या अमक्या तमक्या प्रमाणे तूही मुसलमान हो म्हणजे तुझीही पण सर्व कष्टापासून सुटका होईल, हळू-हळू जी सावजे त्या पाशात येत त्यांस त्याच तंबाखू इत्यादी वस्तू देऊन शेवटी एक दिवस जेवतेवेळी उघडपणे हिंदूंची पंगत सोडून मुसलमानी पंगतीत नेऊन बसविण्यात येई आणि मुसलमानांचे स्वयंपाकातून वाढण्यात येई. अंदमानात कारागारात हिंदूंचा आणि मुसलमानांचा 'भंडारा' म्हणजे स्वयंपाक त्या त्या जातींकडून निरनिराळा करण्यात येत असे. एकदा ते हिंदू मुसलमानी पंगतीत जेवताना दिसले की पुन्हा हिंदूच त्यांस परत आपले पंगतीत घेणार नाहीत हे मुसलमानांस माहीत असल्याने ते त्या बाटविलेल्या हिंदूविषयी अगदी निश्चित होत. केवळ एकदा त्याचे नाव बदलून मुसलमानी तेवढे ठेवीत. कुणी हिंदू त्यास चुकून जरी त्याच्या हिंदू नावाने हाका मारू लागला तरी मिर्झाखान आणि इतर मुसलमानी हस्तक त्या हिंदूस दटावून म्हणत ''खबरदार! तो मुसलमान झाला आहे. त्याच्या मुसलमानी नावाने त्यास हाक मारा!'' मुसलमानी धर्माची दीक्षा म्हणजे इतकीच. कुराण, सुंता, नमाज इत्यादी कशाही गोष्टींची आवश्यकता नसे. तंबाखू म्हणजेच सुंता, सक्त काम हेच कुराण, मुसलमानांत जेवण हाच नमाज.

सर्वसाधारणपणे लोक असे बाटविले जात. त्यांतून काही काहींची पुढे सुंताही करण्यात येई. कारागारातून सुटते वेळी ते लोक आपले मुसलमानी नाव नोंदीत लावून घेत. त्या वेळी त्यास कोणीही अधिकारी असे विचारीत नसे की, तू हे हिंदू नाव बदलून मुसलमान नाव का धारण केलेस? तू मुसलमानी धर्माचा अभ्यास करून मुसलमान झालास की धाकदपटशा आणि लालूच यांना बळी पडून? पुढे तो मनुष्य बाहेर वसाहतीत गेला म्हणजे तिथेही मुसलमान अधिकारी असतच. तिथेही अशाच प्रकाराने हिंदूंस ते भ्रष्टवीत असतच. आणि दुर्दैवाची गोष्ट ही की, संकटापुरते कोणी असे बेगडी मुसलमानीपण स्वीकारले असले आणि पुढे कोण्या हिंदूच्या हाताखाली किवा स्वतंत्र रीतीने राहण्याचा त्यास प्रसंग येताच त्याने वरकांती मुसलमानीपण टाकावयाचे मनात आणून पुन्हा हिंदूंत मिसळण्याचा प्रयत्न केला तरी हिंदूच आरडाओरड करून त्यास ''बाटला! बाटला! हा तर मुसलमानांचे पंगतीस बसत असे!'' असे म्हणून त्यास आपल्यातून हुसकून देत! एकदा बाटलेला मनुष्य गुपचुप पुन्हा हिंदू नाव धारण करून हिंदूंचे पंगतीत बसू लागताच मुसलमानांहून कडव्या रीतीने त्यास पिटाळून मुसलमानांतच बसावयास लावण्यासाठी हिंदू बंदीवानांची टोळी आरडाओरड करताना आम्ही अनेक वेळा पाहिली आहे! यामुळे मिर्झाखानादिक मुसलमानी प्रचारकाचे काम अगदी सोपे होई. एकदा कुठे तरी पेचात धरून हिंदू बंद्यास मुसलमानांच्या पंगतीत जेवण घातले की मग त्यावर पहारा ठेवणे नको, त्यास पुन्हा तंबाखू देणे नको, नमाज पढविणे नको, काही नको. तो मुसलमानांच्या पंजातून सुटू नये म्हणून बाकीची सर्व व्यवस्था हिंदू स्वतःच होऊन करीत! हिंदूस एक दिवस मुसलमान करण्याची तसदी मुसलमानांनी घेतली की त्यास जन्मभर नव्हे पिढ्यानपिढ्या मुसलमानांतच राहणे भाग पाडण्याची तसदी हिंदू स्वयमेव घेणार! ही दुर्दैवी स्थिती जशी स्वदेशात तशीच त्या स्वदेशाचीच छाया ज्यात पडलेली त्या काळ्यापाण्यात!!

अशा रीतीने दर महिन्या दोन महिन्यामागे तीन-चार- जण तरी हिंदू मुसलमान होत. मग ते परत स्वदेशी आले किवा अंदमानातच लग्ने करून राहिले तरी त्यांची संतती मुसलमानच होई. आणि एक-दोन पिढ्यांनी तर आपले पूर्वज हिंदू होते हे मान्य करण्यासही अपमानकारक असे कट्टर हिंदुद्वेषी मुसलमानीपण त्या संततीत आजन्म शिक्षणाने प्रविष्ट होई.

केव्हा केव्हा एखाद्या हिंदू स्त्रीने मुसलमान नवरा केला की ती मुसलमानीण होई. परंतु जर एखाद्या मुसलमान स्त्रीने उलट हिंदू नवरा केला तर? ती हिंदू होई का? छट्! तिला होऊ देतो कोण! हिंदू लोकच त्या स्त्रीस हिंदू झाली म्हणून समजण्याचे ठिकाणी त्या हिंदू नवऱ्यासच तो मुसलमान झाला म्हणून बहिष्कृत करीत!

या सर्वस्वी आत्मघातक प्रवृत्तीस आळा आलण्याचा प्रयत्न करण्याचा आम्ही निश्चय केला. आणि १९१३ व्या वर्षी एका ब्राह्मणाचे मुलास मुसलमानांनी घेरले असता त्यास बचावण्यासाठी उघड खटपट केली. तीच गोष्ट अशा प्रकारच्या पुढे ज्या अनेक झटापटी झाल्या त्याचे उदाहरण म्हणून थोडक्यात सांगू म्हणजे झाले.

## हिंदू मुलाचा खटला

हा उत्तर हिंदुस्थानातील ब्राह्मण मुलगा वीस एक वर्षांचा असेल. चोरीकरता पूर्वी तुरुंगात जाऊन आलेला म्हणजे दुष्ट संगतीत मुरलेला होता. परंतु अजून ब्राह्मणपणाचा अभिमान धरी. काळेपाणी पाहताच तो घाबरला. त्यात कोलू! पाहता पाहता पठाण वार्डरांनी त्यास घेरले. त्या चांडाळ चौकडीचे निर्लज्जपणे घोषित केलेले ब्रीदच असे असे की, ''हिंदुओंके लडकेको पहिले तंग करके (त्रस्त करून) बिघाडना चाहिये। फिर वो तुरंत मुसलमान बन जाता है।'' या त्यांच्या घृणास्पद धर्मदीक्षेच्या प्रथम संस्कारास तो मुलगा बळी पडून आधीच 'बिघडला' होता, आता केवळ उघड उघड त्याला मुसलमानी पंगतीत बसविणे बाकी उरले होते. इतक्यात आम्ही त्यास एका मनुष्याकडून निरोप धाडून हिंदुत्व सोडू नकोस म्हणून विनंती केली, तो म्हणाला, ''सोडू नको तर काय करू? मिर्झाखान मला पुन्हा कोलूत धाडील!'' धर्माकरिता त्रास सोसला पाहिजे हे सांगून त्या पतितावर काय परिणाम होणार! त्यास साह्य देणे, मिर्झाखानविरुद्ध साह्य देणे अशा स्थितीत आम्हीच स्वतःच कोठडीबंद त्या स्थितीत केवळ दुर्घट! शेवटी एका संध्याकाळी बारीकडे ती सर्व कागाळी अंतस्थ भेद घेऊन कळविली. याचे पूर्वी असे प्रकार होतात हे बारीस माहीत नव्हते असे थोडेच होते! त्याचेवर काही परिणाम झाला नाही. तो आम्हांसच ''त्या भागात काय चालते हे तुम्हाला खोलीत कोणी सांगितले!- जाऊ द्या हो ही बिघडलेली पोरे! तुम्ही या पोरखेळात कशास पडता?'' इत्यादी आडव्यातिडव्या प्रश्नास विचारीत राहिला. तेव्हा दुसरे दिवशी सुपरिन्टेंडंटला आम्ही तो सर्व प्रकार सांगितला. बारीने त्यांचे कान आधीच भरून ठेवलेले असल्याने त्यांनी आम्हांस तेच ठराविक प्रश्न ''अशी दुष्ट माणसे हिंदूत राहिली काय किवा मुसलमान झाली काय?'' इत्यादी विचारले. आम्हीही या प्रकरणाच्या आरंभी दिलेल्या कोटिक्रमांनी त्यांस उत्तरे दिली. शेवटी सुपरिन्टेंडंट म्हणाला, ''कोणी जर आपण होऊन मुसलमान होत असेल तर त्यास आम्ही कसे रोखणार?'' आम्ही म्हणालो, ''आपण होऊन जात असेल तर आमचीही हरकत नाही. पण मुसलमान बंदीवान हिंदूस त्रास देऊन सक्त काम देऊन आणि लोभ दाखवून त्यास मुसलमान होण्यास भाग पाडतात यास आपण विरोध केला पाहिजे. '' तेव्हा पर्यवेक्षक म्हणाला ''तुम्हास कोणी मुसलमान हिंदू मुलांना त्रास देताना वा तंबाखू इत्यादी नियमाविरुद्ध वाटताना आढळला तर कळवा. म्हणजे मी त्यास अवश्य प्रतिरोध करीन. दंड ठोठावीन. ''

## कर्तव्य समजून अपमान गिळला

पर्यवेक्षक गेला. पण बारीला आणि मिर्झाखानला आमचा राग आला. कारण भाषणात त्यांची कित्येक गौप्ये फोडावी लागली होती; आणि विशेषतः आम्हांस मुसलमानांस त्रास देताना धरा म्हणून पर्यवेक्षकांनी दिलेली अनुज्ञा बारीस त्याच्या स्वतःचा अधिकार भंग करणारी वाटली. मुसलमानांत तर जो तो दात खाऊ लागला. कारण हिंदू म्हणजे त्यांच्या परसातला भाजीपाला. त्यांस मुसलमान करण्याच्या त्यांच्या पैतृक अधिकाराविरुद्ध कागाळी! त्यांनी जन्मात कधी असला प्रकार ऐकला नाही! बारीने आमची खोड मोडायचा निश्चय करून मिर्झाखानास आणि या खवळलेल्या मुसलमान वार्डरास आतून त्याच मुलास मी स्वेच्छेने मुसलमान होतो; असे म्हणावयास शिकवा म्हणून सांगितले. दुसरे दिवशी तो दुसऱ्या भागात राहत असतानाही जाणूनबुजून आमच्या भागात त्यास आणले

आणि आमच्या- समोर त्यास मुसलमानांचे पंगतीत मिर्झाखानने बसवून मुसलमानी अन्न दिले. आणि आम्हांस नाव न घेता बीभत्स शिव्या हासडून मिर्झा चालू लागला. त्या बंदीवानास त्या दिवसभर मुसलमानी नावाने ते लोक हाका मारीत होते. ज्यायोगे आम्हांस आपल्या अवशतेची लाज वाटावी, आम्ही तो सर्व अपमान कर्तव्य समजून अर्थातच गिळीत होतो.

## तुम्ही इतरांना हिंदू का करीत नाही?

दुसरे दिवशी सकाळी एक मुसलमान वॉर्डर दोन- तीन आण्याची तंबाखू त्या बाटग्याचे हाती देत आहे तोच आमची चाळीतून तिकडे दृष्टी गेली. आम्ही ताबडतोब उठून वॉर्डरास सांगितले. पण वॉर्डर पडला हिंदू! गयावया करून म्हणाला, ''मी धरले तर मिर्झाखान मला मातीस मिळवील!'' तेव्हा स्वतः आरडाओरड करून आम्ही पेटी ऑफिसरास बोलावून त्या मुलाची झडती घ्यावयास सांगितले. ''नाही तर पर्यवेक्षकाला सांगेन!'' म्हणताच झडती घेतली गेली आणि सर्व तंबाखू त्याचे कमरेस सापडली. इतक्यात ही गडबड ऐकून धापा टाकीत मिर्झाखान आला. त्याने तंबाखू तुला कोणी दिली विचारताच त्या मुलाने त्या मुसलमानी वॉर्डरचे नाव सांगितले. मिर्झाखान आम्हांस चाळीत तसे बंद ठेवून त्या मुलास खटला भरण्याकरिता म्हणून बारीकडे घेऊन गेला. परंतु पुढे पाहतो तो त्या गोष्टीचा काहीच पत्ता नाही. बारीला संध्याकाळी विचारले तर त्यांनी अर्थातच खेकसून उत्तर दिले की, तुरुंगाचा खटले धरणारा अधिकारी मी आहे. तुम्ही एक बंदी आहात. बंदीप्रमाणे स्वतःविषयी काय ते बोला, नाही तर शिक्षा खाल! पर्यवेक्षक दोन दिवसांनी पुन्हा फिरतीवर आला त्याला बारीने काय सांगितले होते ते तरी काढून घ्यावे म्हणून आम्ही पुन्हा 'अर्ज' म्हणून चाळीतून हाक दिली. त्या पर्यवेक्षकांस आठवड्याचा ठरलेला दिवस सोडून कोणी बेशिस्त अर्ज केला तर चीड येत असे. तेव्हा काही त्यामुळे आणि काही बारीने जे काही त्यास सांगितले होते त्यामुळे चिडून तो खसकन अंगावर येऊन म्हणाला ''दुसऱ्या बंदीवानांविषयी बोलण्याचे तुम्हाला काही कर्तव्य नाही. काम करा''.

मीही साफ सांगितले ''मी माझे आवेदन (अर्ज) करणार. तुम्हास पाहिजे तर ऐका नाहीतर ऐकू नका. राजबंदी-वान एकमेकांशी नुसते बोलले तरी त्यांच्या कागाळ्या करण्याचा जर इतर बंदीवानांना अधिकार आहे, आमच्या चिठ्या जर हव्या त्यास धरता येतात, तर आम्हांसही धर्मासारख्या कार्यी इतरांविषयी बोलण्याचा अधिकार आहे. '' माझे जरा संतापाचे निश्चयी उत्तर ऐकून आणि आवेदन ऐकणे हे त्याचे कर्तव्यच असल्याने पर्यवेक्षक जवळ आला आणि म्हणाला बोला काय ते. तेव्हा मी म्हणालो, ''तंबाखू मुसलमान वॉर्डराने देताना मी धरिले असता त्या मुसलमान वॉर्डरावर खटला भरला गेला नाही!'' पर्यवेक्षक गोंधळला. बारीला त्रासून म्हणाला, ''हे काय आहे? कुठे आहे तो मुसलमान वॉर्डर?'' इतक्यात बारीने डोळ्याने खुणावताच मिर्झाखान पुढे होऊन म्हणाला, ''हुजूर, ए बाबूने (आम्ही) तंबाखू खुद्द वो लडकेके कपडेमें रखी थी! स्वतः तंबाखू त्या मुलाचे कपड्यात लपटून, मुसलमान वॉर्डरावर हा असा खोटा खटला करीत आहे''. त्या पोरांस विचारता त्याने एवढा प्रामाणिकपणा केला की बाबूने तंबाखू दिली हे खरे नाही असे सांगितले. पर्यवेक्षक मनात चरकला. मिर्झाखान पुन्हा बोलू लागताच ''चुप रहो'' म्हणून त्यास धमकावून आम्हास म्हणाला, ''या धर्मांतराचे बाबतीत तुमचे म्हणणे तरी काय आहे?'' मी म्हणालो, ''थोडक्यात

माझे मागणे, असे आहे की वसाहतीत कोणाही मनुष्याने कुराणाचे किवा बायबलचे अध्ययन करून प्रामाणिकपणे जर हिंदुधर्म सोडण्याचे ठरविले तर त्याने प्रथम अधिकाऱ्यांस तसे कळवावे; आणि अधिकाऱ्याने त्यावर कोणीही कपटाने वा बळाने सक्ती केली आहे की नाही याविषयी चौकशी करून नंतरच त्यास तसे करण्यास परवानगी द्यावी. आणि वयात येण्याचे आधी कोणाही हिंदू मुलास परधर्म स्वीकारण्याची मूलतःच बंदी असावी. ही झाली एकंदर वसाहतीची गोष्ट. परंतु अंदमानच्या बंदीगृहात तर अल्पवयी असो वा प्रौढ असो कोणाही हिंदूस परधर्मात जाण्याची केव्हाही अनुज्ञा देण्यात येऊ नये''. यावर पर्यवेक्षक म्हणाले, ''वसाहतीचा प्रश्न मी कमिशनरपुढे मांडीन. कारागारापुरते माझे म्हणणे असे आहे की, स्वेच्छेने जर कोणी धर्मांतर करू लागला तर त्यास आम्ही काय म्हणून रोखावे? सक्ती किवा लालूच दाखवून मात्र मी यापुढे कोणाही हिंदूस परधर्मात जाऊ देणार नाही''. मध्येच रागाने जळफळत बारी म्हणाला, ''तसे देखील करणे आम्हास जडच जाईल. कारण सरकारने सर्वांस धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. '' मी म्हणालो ''धार्मिक स्वातंत्र्यासाठीच मी म्हणतो कारागारात कोणाही हिंदूस परधर्मात जाऊ देऊ नये. कारण दोन्ही धर्मांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर मग जर कोणी परधर्म स्वीकारील तर ते धार्मिक स्वातंत्र्याचे तत्वानुरूप झाले असे म्हणता येईल. परंतु या कारागारात मुसलमान अधिकारीच प्रबळ असल्याने त्यांस त्यांची बाजू मांडता येते. परंतु आम्हा हिंदूंची बाजू मांडण्यास हिंदुस काहीच स्वातंत्र्य नाही. उदाहरणार्थ, मला जर कोणी बंदीवानाशी नुसते बोलताना पाहिले तर त्यास आणि मला शिक्षा होते. तेव्हा असल्या निर्बंधांचा अर्थ इतकाच होणार की, मुसलमानास मात्र त्यांच्या धर्माची बाजू अधिकाराचे बळावरही मांडण्यास स्वातंत्र्य असणार, पण हिंदूंस मात्र ते स्वातंत्र्य नाही. '' तेव्हा बारी म्हणाला, ''हिंदू पेटी ऑफिसर आणि तंडेल काहीतरी आहेतच. ते का हिदुंस हिंदूधर्माची बाजू सांगत नाहीत?'' मी स्पष्टपणे सांगितले की, हिंदू तंडेलादिकांवर तुमची विशेष वक्र दृष्टी आहे! दुसरे असे की, हिंदू तंडेल हिंदू धर्मावर आणि मुसलमानी तंडेल मुसलमानी धर्मावर व्याख्याने आणि वादविवाद करू लागले तर हे कारागृह धर्मप्रचाराचा एक अड्डाच होईल! परंतु तुमच्या नियमाप्रमाणे तंडेलादिक बंदी - अधिकाऱ्यांस सुद्धा बंदीवानांशी कारागृहीय कामावाचून अवाक्षर बोलण्याची परवानगी नाही! मग कारागृहाची शिस्त ठेवावयाची तर त्यास धर्मप्रसाराचा असा अड्डा तुम्ही कसे करू शकाल? पर्यवेक्षक मध्येच म्हणाले, ''पण तुम्ही हिंदू लोक मुसलमानांचे हिंदू का करून घेत नाही? नेहमी दुसऱ्याचे नावाने का ओरड करता?''

## तीव्र नि खरा आक्षेप

हा त्यांचा आक्षेप किती तीव्र आणि खरा होता! तो अर्थातच मला बोचला. मी म्हणालो, ''वास्तविकपणे पाहता कोणासही आपल्या धर्मात वा समाजात बळाने वा खटपटाने न ओढण्याचा हा हिंदूंचा नियम धर्मस्वातंत्र्याच्या उदात्त तत्वावरच अधिष्ठित होता. धर्म म्हणजे तेरड्याच्या रंगासारखी दिवसातून तीनदा बदलणारी प्रवृत्ती नव्हे हे त्यांचे तत्व कोणासही मान्यच होईल. परंतु तलवारीच्या आणि लोभाच्या धारेनेही धर्मप्रसार योग्य, निदान क्षम्य आहे, असे मानणाऱ्या भयंकर पंथाशी तोंड देण्याचा प्रसंग आल्याने आता मात्र त्या उदात्त तत्वांस चिकटवणे म्हणजे त्यांच्या हेतूंचा विपर्यास करणे होय हे आम्हांस समजू लागले आहे. ऐतिहासिक शुद्धीकरणांची उदाहरणे सोडली तरी आर्यसमाजी शुद्धी करून हिंदू करतात. ते आपणास माहीत नसेल पण निदान विवेकानंदांनी अमेरिकेतून येताना मिस नोबलला निवेदिता करून हिंदू दीक्षा दिली हे आपण ऐकले असावे. इथे तिची पुस्तके

आमच्या ग्रंथालयात आहेत. आपण पहावे खरे की खोटे ते. हिंदू लोकांस आपला धर्म दुर्बल आहे अशी भीती वाटते म्हणून ते अन्य धर्मीयांस तो उपदेशीय नाहीत असे नसून कोणत्याही धर्मात का असेना पण मनुष्य खरी साधना करील तर मोक्ष मिळवीलच - धर्म असा जगतात एकच आहे, अशी त्याची उदात्त भावना असते. ते धर्माकडे समाज बळाचे एक साधन या दृष्टीने पाहतच नाहीत ही ऐहिक दृष्टीने, सामाजिक जीवनाच्या दृष्टीने चूक आहे असे मलाही वाटते, पण मूळ तत्व काय ते सांगितले. आणि ते निरपेक्षतः पाहता अत्यंत उदार आहे हे कोणास नाकारता येणार नाही!''

## पापासक्त मिर्झाचा थरकाप

तो पर्यवेक्षक सदभिरुचीचा आणि शक्यतो निष्पक्षपातपणे वागू इच्छिणारा गृहस्थ होता. त्याचा उल्लेख मागे आलेलाच आहे. पुढेही येईल. आमचे वरील अर्थाचे बोलणे तो शांतपणे ऐकून घेत होता. त्याच्या मनावर गंभीर परिणाम झाल्यासारखी त्याची मुद्रा झाली. त्याने अधिक काही न बोलता म्हटले, ''मी तुमच्या म्हणण्याचा विचार करीन. सध्या मी इतकीच आज्ञा देतो की, या ब्राह्मण मुलास हिंदूंचे पंगतीतच जेवले पाहिजे. जर याला कोणी मुसलमानाचे अन्न दिले किवा त्रास दिला तर ध्यानात ठेवा! समजा!'' मिर्झाखानाकडे वळून तो हे शेवटचे शब्द दरडावून बोलताच जवळ जवळ गुडघ्यापर्यंत डोके आणि हात वाकवून त्या पापासक्त मिर्झाने थरकापत सलाम केला आणि पर्यवेक्षक गेला.

परंतु मुसलमानास ही तंबी मिळाल्याने जरी बरेच काम झाले तरी खरी अडचण ती पुढेच होती. कारण त्या मुलास मुसलमान होउ द्यावयाचे नाही म्हणून पर्यवेक्षक जरी म्हणाला ''त्यास हिंदूंचे पंगतीतच बसवा'', तरी हिंदूंची पंगत त्याला बसू कशी देणार त्यांच्यात! त्याने एक-दोन दिवस मुसलमानी पंगतीत जेवण घेतलेले होते ना! इतकी भांडाभांडी करून मुसलमानांचा दुष्ट हेतू विफल केला; पण आता हिंदूंच्यापुढे काय करणार? ही अडचण बारीने तेव्हाच ताडली, पण पहिल्या दिवशी चूप राहिला. कारण पर्यवेक्षकाने त्यासही थोडा दाबला होता. इकडे आम्ही निरोप धाडून थकलो. हिंदूंत कुजबुज सुरूच की आपण नाही बोवा त्याच्या पंगतीस बसणार! अंदमानात हिंदूंत पुन्हा निरनिराळे भेद मानले जात नसत. सर्व हिंदू हाताहाताचे अंतराने एकाच ओळीत बसत, आणि मुसलमान दुसऱ्या. तेव्हा कित्येक हिंदूंच्या मिनतवाऱ्या केल्या. सांगितले, अरे हा मिर्झा आपल्या मुलांस प्रथम त्याच्या पापी भोगलालसेस बळी देऊन नंतर त्यांचा धर्म बळाने छिनाऊन घेतो. आज प्रथमच तो थरकापत आहे. आता त्यास धाक बसला आहे. तोच तुम्ही त्या मुलास हिंदू पंगतीत नको म्हणून म्हणाल तर बारी आता प्रतिवृत्त-रिपोर्ट धाडून पर्यवेक्षकाची देखील आपल्या बाजूचा निकाल दिला म्हणून फटफजिती उडवील. हा मिर्झाखान आज कसा नांगी टाकल्यासारखा झाला आहे तो उद्या पुन्हा तुमच्या हिंदूंच्या उरावर नाचू लागेल! असे नानाप्रकारे समजावले. पण ते अडाणी हिंदू 'ठीक है' म्हणून स्पष्टपणे म्हणेनात. आमच्या म्हणण्याने समाधान जरी न झाले तरी शेवटी एक-दोघांस आम्ही अक्षरशः हात जोडल्याने आमच्याविषयी त्यांस वाटत असलेल्या पूज्यतेमुळे ते ओशाळले आणि पंगतीच्या टोकास एक हातावर आम्ही बसावे आणि आमच्या शेजारी त्या मुलाने बसावे इतके त्यांनी मान्य केले. हे सर्व लपून छपून, मिर्झाखान-बारीचा डोळा चुकवून करावयाचे! कोण तो त्रास!

पण शेवटी तो पोरगा हळूहळू जे काही हिंदू आम्हांस मिळाले त्यांच्या शेजारी हिंदू पंगतीस लागून बसू लागला. बारीचा हा डाव तर फसला; परंतु पर्यवेक्षकाने शेवटचा सामान्य निर्णय असा काहीच न दिल्याने मुसलमानांचे प्रयत्न आतून चालूच होते. फरक इतका - आणि तो महत्वाचा होता - झाला की ते आता अगदी धांगडधिंगा घालीत-नासे झाले. भीत भीत राहत. पण त्यांचा आमच्याविषयी द्वेष मात्र तीव्रतेला गेला; आणि त्यांच्या धर्मांतरास पूर्वी विरोध तेवढा न करणारा बारीसाहेब आता गुप्तपणे उत्तेजन देऊ लागला.

## शुद्धिकार्याला प्रकट प्रारंभ

बंदीगृहात मुसलमानांस भ्रष्टीकरणाच्या खटपटी करताना मी रोकले ही गोष्ट वसाहतीत सर्वतोमुखी झाली. काही बंदीवान उत्तर हिंदुस्थानातले आर्य समाजीयांची व्याख्याने ऐकलेले होते. त्यांतील दोघातिघांनी प्रत्यक्ष साथ देण्यासही आरंभ केला. अंदमानला आम्ही गेलो त्यापूर्वीच काही उत्साही मंडळींनी तेथे एक लहानसा आर्य समा-जाचा केंद्र स्थापिलेला होता. पण त्यात प्रचारकार्य वा कोणतीही चळवळ संघटितपणे अंगावर घेण्याची मुळीच शक्ती नव्हती. आणखी शुद्धीविषयी तर अंदमानात काही करणे शक्य आहे याची जाणीव देखील साहजिकपणेच नव्हती. तथापि त्यांतील मंडळीस आमचे शुद्धीचे प्रयत्न ऐकून समाधान वाटले आणि हळूहळू त्यांचे सहकार्यही मिळू लागले हीही काही थोडीथोडकी गोष्ट नव्हे. पुढे तर त्यांच्यातील एक दोघा मंडळींनी अंदमानात आम्ही आरंभ-लेल्या चळवळींचा प्रसार करण्याचे कामी वर्णनीय पुढाकार घेतला आणि उत्साहाने कार्य चालविले. त्यात काही ‘स्वतंत्र’ अधिकारीही होते.

देशातून आर्य समाजाची तत्वे ऐकून आलेल्या अशाच बंदीवानांपैकी एक हिंदू बंदीवान यावेळीच वसाहतीत शिक्षा खाऊन तुरुंगात पुन्हा बंद करण्यात आलेला होता. बदमाष धिटाईत हा कोणाही मुसलमान गुंडास हार जाणारा नव्हता. देशातील जन्मठेपीची शिक्षा खाल्ल्यानंतर अंदमानातही या स्वारीने इतकी दांडगाई, बंदीतून पलायने, मारामाऱ्या, अफू विक्री इत्यादी ढंग केले होते की मुसलमान गुंड त्यास वचकत असत. त्याच्याशी मैत्री असलेल्या हिंदू मुलाकडे ते कधीही नीच दृष्टीने पाहावयास धजत नसत. कारण त्याच्या परिचित किवा स्नेहांकित मनुष्यास कोणी त्रास दिला की तो सर्व निर्बंध गुंडाळून ठेवून त्यास चोपून काढीत असे किवा त्याचे काही बिंग फोडून ‘सत्यानाश’ करीत असे. या हिंदू बंदीवानाच्या या धीट बदमाषीस सुदैवाने मुसलमानी बदमाषांप्रमाणेच स्वधर्माभिमानाची आणि स्वजातीच्या अभिमानाची थोडीबहुत धार मिळालेली होती. आमच्या शुद्धीप्रयत्नाने मुस-लमानांची झालेली मानहानी पाहून त्यास बरे वाटले आणि त्याने आम्हांस साह्य देण्याचे वचन दिले. आम्ही आता असा निश्चयच केला होता की, ज्या नीच बदमाषांत आम्हास दिवस कंठावे लागत आणि ही जातीय कार्ये पार पाडावी लागत त्यांच्या त्यांच्यात शिवीगाळी, चोरीमारी, मारकाट इत्यादी बीभत्स आणि नीच शस्त्राने झुंज देण्या-साठी ‘‘धटासि आणावा धट। उद्धटी सोडावा उद्धट।’’ याच नीतीचा अवलंब करून मुसलमान गुंडांची खोड मोडण्यास हिंदू गुंडास हाती धरावयाचे. त्याप्रमाणे या बंदीवानास आम्ही पहिले काम असे सांगितले की पूर्वी मुसलमान झालेला एक पंचवीस वर्षांचा हिंदू तरुण जो पुन्हा हिंदू होऊ इच्छित आहे म्हणून आम्हास म्हणत असे त्याचे प्रक-रण हाती घेऊन तडीस लाव.

आम्हास पर्यवेक्षक एकदा म्हणाला होता ना की, ''हिंदूस मुसलमान बाटवितात म्हणून नुसते ओरडता का? तुम्ही हिंदू का मुसलमानास हिंदू करू शकत नाही?'' या त्यांच्या आव्हानास आम्हास एकदा उत्तर द्यावयाचेच होते. वरील जात्याभिमानी हिंदू बंदीवान हाताशी येताच आम्ही अंदमानाच्या तुरुंगातच शुद्धिसंस्कार करून चार-पाच वर्षे मुसलमान होऊन राहिलेल्या वरील तरुणास हिंदू धर्माची पुनर्दिक्षा देण्याचे ठरविले. त्या बंदीवानाने इतक्या उत्साहाने हे कार्य मनावर घेतले की त्याच्याशी स्नेह असणाऱ्या आणखी एका बाटलेल्या हिंदू मुलाचेही मन त्याने पुन्हा हिंदू होण्यास वळविले. आणि कोणाच्याही धाकदपटशास न जुमानता ते कार्य उघडपणे करण्यास तो सिद्ध झाला. तो जरी अनेक शिक्षा खाल्लेला 'बदमाष' बंदीवान होता तरी राजबंदी नसल्याने एका कारखान्यात दहा-वीस बंद्यांवर 'मुकादम' म्हणून नेमला गेला होता. आम्ही कोठडीबंद किवा चाळीत बंद होतो. म्हणून त्याचे कारखान्यातच ते अंदमानातील प्रथम शुद्धिकार्य करण्याचे त्यास सांगितले.

## दोघांना परत हिंदू करून घेतले .

एका रविवारी सर्व बंदीवान कपडे धुण्याचे धांदलीत असता आणि मिर्झाखानादिक मुसलमानी अधिकारी त्यांचे व्यवस्थेत गुंगून गेले असता इकडे वरील हिंदू 'मुकादमाने' त्या दोन तरुणांस एकीकडे नेले. स्नान करून नवे कपडे घालून ते दोघे तीन हिंदूंसमक्ष आम्ही हिंदू धर्मात परत येऊ इच्छितो, आम्हांस स्वीकारा म्हणून प्रार्थना करते झाले. त्यांस तुळशीपत्र खावयास देऊन, गीतेचे श्लोक आणि तुळशीदासाच्या रामायणाचा अध्याय वाचून दाखवून, शुद्धिसमारंभानिमित्त हेतुपूर्वक गुप्तपणे करून ठेवलेला शिरा (सत्यनारायणाचा प्रसाद) सर्व हिंदू बंदीवानांत वाटण्यात आला. हा प्रकार काय चाललेला आहे हे मिर्झाखानास समजण्यापूर्वीच जो तो आपल्या खोल्यांत जाऊन बसलेलाही होता. त्या दिवसापासून त्या दोघा मुलांनी नमाज पढण्याचे सोडले. आम्ही सर्व त्यांस हिंदू नावांनी हाका मारू लागलो. मुसलमान त्यांस मुसलमानी नावाने हाका मारीत तर ते त्यांस ओ देईनात. ते तुळसी रामायण पुन्हा वाचू लागले आणि हिंदूंच्या पंगतीत जेवू लागले.

या झटपट शुद्धिसमारंभाची ही टूम पाहून अंदमानमधील बंदीवानांत मोठीच खळबळ उडाली. काही दिवस मुसलमान अधिकारी आणि बारीदेखील अगदी चूप राहिले. कारण त्यांस धाक होता की जर त्यांनी पर्यवेक्षकास ही कागाळी कळविली तर ते आम्हांस मागचे सर्व भांडण उकरून काढण्यास आयतेच निमित्त होईल. त्यातही मुसलमानांस अजून आशा होती की, माझे प्रयत्नास, दोन- चार जण सोडून, हिंदू लोकच आज नाही उद्या प्रतिकार केल्यावाचून राहणार नाहीत.

## हिंदूंचाच हिंदुकरणास विरोध!

आणि शेवटी तेच खरे झाले. कारण तेथे असलेल्या एका हिंदू तंडेलाने हिंदू बंदीवानांत आमच्या या शुद्धिकृत हिंदूस पुन्हा हिंदूंचे पंगतीत नेऊन बसविण्याच्या खटाटोपीने पसरत चाललेल्या गुपचिप असंतोषास वाचा फोडली आणि आम्हांस पाण्यास शिवण्याची बंदी केली. राजबंदीवानांचा धाक असल्याने ते कोणी अधिकाऱ्याकडे उघड प्रतिवाद करण्यास वा खटला करण्यास गेले नाहीत तरी आम्हांस हिंदू लोकांतील या तंडेलाचे अनुयायांनी गुप-

www.savarkarsmarak.com

चिप चिमटे घेण्याची पराकाष्ठा केली. आम्हास आमच्या तोंडावर 'भंगीबाबू' म्हणून पदवीदान करण्यासही या ठाकूर रावांनी कमी केले नाही!

येथेच हेही सांगून टाकणे इष्ट आहे की, इतके झाले तरी दिवसेंदिवस या 'भंगीबाबू'चाच पक्ष - भंगीबाबू म्हणजे मुसलमान झालेल्या मनुष्याबरोबरही त्यास हिंदू करून जो जेवतो तो! इतका जोराने वाढत चालला की शेवटी त्याचा प्रमुखपणे अभिमान धरणाऱ्यांत वरील 'ठाकूर' तंडेलाची स्वारीच स्वतः समाविष्ट झाली. कारण दोन-तीन वर्षांचे आत वरील 'ठाकूर' बंदीवान हिंदुत्वाचा पक्का प्रचारक झाला आणि शक्य ते साहाय्य आम्हास देऊ लागला.

या शुद्धीची बातमी आम्ही आपण होऊन पर्यवेक्षकांचे कानावर घातली नाही; कारण जर बारी आम्हांस मुसलमानांप्रमाणेच हिंदुत्वाचा प्रचार करण्यास अडथळा न करता वाव देऊ लागला तर आम्ही होऊन नुसते भांडण तरी का उपस्थित करा! बारीला वास्तविकपणे हिंदू धर्म मेला काय किवा मुसलमानी धर्म मेला काय सारखेच होते. त्यास मुसलमानांचा पक्ष आवडे तो यासाठीच की ते त्याच्या निर्बंधाविरुद्ध लहरीप्रमाणे वाटेल ती मारपीट करीत आणि राजबंदीवान हिंदू असल्यामुळे मुसलमानांस त्यांचेवर ठेवणे अधिक बिनधोक्याचे असे. आमच्या शुद्धीविरुद्ध उघडपणे आम्हांस प्रतिबंध केल्यास पर्यवेक्षकापर्यंत हे प्रकरण जाईल आणि पर्यवेक्षकाने मागे आमच्या म्हणण्याप्रमाणे थोडेबहुत ऐकले असल्यामुळे तो बारीच्याच विरुद्ध जाणार नाही असेही नक्की नव्हते. अशा अनेक अडचणींनी आमच्या पहिल्या दोन-चार शुद्धीच्या विरुद्ध पर्यवेक्षकापर्यंत उघड कागाळी फारशी झाली नाही.

## सिलोनी ख्रिश्चन शुद्ध झाला.

तोवर आम्ही शुद्धीचा उद्योग एकसारखा चालूच ठेवला. एकदा सिलोनमधील तिघे-चौघे सुशिक्षित काही मारामारी आणि हत्यादिक अपराधास्तव दंडित होऊन अंदमानास जन्मठेपीवर आले. त्यांचा आमच्या राजबंदीवानांशी परिचय होऊन त्यांतील दोघातिघांस तर आम्ही अंदमानाच्या मागे वर्णिलेल्या संस्थेचे शपथबद्ध सभासदही करून घेतले. यात एकजण सिलोनमध्ये असतानाच ख्रिस्ती झाला होता. त्यासही येता-जाता उपदेश करून हिंदू होण्यास विनंती करण्यात आली. त्यांच्यात जे दोघे कर्ते होते त्यांस तुरुंगातून सुटताच चांगली लेखकाची जागा वसाहतीत मिळालेली होती. तशी जागा आम्ही हर प्रयत्नाने तुलाही देऊ, तू चिंता करू नकोस, इत्यादी व्यावहारिक दिशेची चर्चा करता तो शेवटी हिंदू होण्यास तयार झाला. आणि शेवटी आमच्या झटपट शुद्धिसंस्कारपद्धतीने त्यासही शुद्ध करून घेण्यात आले. अंदमानच्या तुरुंगात ख्रिश्चनपंथीय लोकांसाठी एक पाद्री केव्हा प्रार्थनेस येई. तो जेव्हा पुन्हा आला तेव्हा या शुद्धिकृत सिलोनीने त्यास आपण हिंदू झाल्याचे सांगितले. पाद्री चकित झाला. त्याने ती गोष्ट पर्यवेक्षकाचे कानावर घातली. पर्यवेक्षकाने चौकशी चालविली. तेव्हा पुन्हा एकदा शुद्धिप्रकरणाची उलाढाल अगदी वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत जाऊन पोचली, हे मात्र ध्यानात ठेवण्यासारखे आहे की तेथील इंग्रजी अधिकाऱ्यांनी एका ख्रिस्त्यास परत हिंदू केले म्हणून कोणत्याही चिडखोरपणाचे प्रदर्शन केले नाही. केवळ योग्य तीच चौकशी चालविली.

## बंगाली मुलाला वाचविले.

याच्याच आगेमागे एका बंगाली हिंदू मुलास बाटविण्याचा कट मुसलमानांनी केल्याचे माझे कानावर आले. या मुलावर गांजा पिण्याचे व्यसनापायी किवा अशाच कसल्या अविचारापायी एकास सुरी भोसकल्याने सहसा हत्या केल्याचा आरोप होता. तो अठरा वर्षांवर असेल नसेल. तो तुरुंगात येताच मिर्झाखानी पापवासनेस बळी पडून त्यास मुसलमानांच्या हाताखालीच ठेवण्याची व्यवस्था केली गेली होती. नंतर तो त्यांच्यात मुरलासा वाटल्याने त्यास रीतीप्रमाणे मुसलमान करून टाकण्याचा बेत झाला. ही बातमी लागताच मी काळेपाण्यावर अशाच अल्पवयात येऊन जवळजवळ दहा वर्षे झालेल्या हिंदू तरुण बंदीवानास, त्या मुलास त्यांचे हातून फोडण्यास सांगितले. हा तरुण बंदीवानही अंदमानच्या गुंडातील एकपटीचा गुंड होता. त्याच्याजवळ पैसेही खूप असत. त्याने आपल्या मानेत केलेल्या 'खोपडीत'च दहा- बारा गिन्या सहज बाळगून असावे. तो चारदा धाडस करून वसाहतीतून पळून चारचार महिने निबिड अरण्यात दडून बसला होता. आपत्तीने किवा अज्ञानाने त्या दुष्टांच्या वसाहतीत जिवंत राहण्यासाठी त्याला जरी आपद्धर्मीय पापे करावी लागत तरी त्याच्या मनावर दुष्टतेची छाया तितकीशी पडली नव्हती. त्याचे मन सत्कर्मपरायण आणि श्रद्धायुक्त असून ज्यावर त्याची श्रद्धा बसे त्याचेसाठी संकट सोसण्याची प्रामाणिक प्रवृत्ती त्याचे ठायी असे. ज्या भागात तो बंगाली मुलगा मुसलमानांनी ठेवला होता त्याच भागात त्या हिंदू तरुणाने जाउन राहावे आणि ते सगळे बिंग फोडावे असे ठरले. राजबंदीवानांना जरी या भागातून त्या भागात जाता येत नसे - ते काम बारी स्वतः करी - तरी इतर बंदीवानांचा भाग बदलण्याचे काम साधारणतः एका मुनशीचे हाती असे. त्या मुनशीस वरील हिंदू तरुणाने दोन रुपये देताच त्याने सहज एके दिवशी बंदीवानांची आलटापालट करता त्या तरुणास त्या बंगाली मुलाचे भागात त्याचे खोली शेजारच्या खोलीतच राहावयास धाडून दिले. तेथे आठ-एक दिवसांतच त्या बंगाली मुलाचा लोभ त्या हिंदू तरुणावर बसला. त्यास थोडासा उच्च प्रतीचा धर्म, देश, जाती इत्यादी गंभीर प्रकृती जागृत करणारा उपदेश करताच त्याने त्यास बाटविण्याचे कसकसे बेत चालले आहेत ते कळविले. आणि आपण जरी मनातून मिर्झाखानादिक मुसलमानांचा द्‌वेष करतो तरी त्यांच्या छळाच्या आणि पीडेच्या धाकाने मी त्यांस उघड प्रतिकार करू शकणार नाही. तुम्हीच त्यांस प्रतिबंध करा असे त्या मुलाने सांगितले. हे निश्चित होताच त्या हिंदू तरुणाने माझे विचाराने, ज्या दिवशी मुसलमान त्यास यथासंस्कार बाटविणार म्हणून कळले होते त्या दिवसापर्यंत, चूप राहून त्या सर्वांस आयत्या वेळी पकडून द्‌यावयाचे ठरविले. एका रविवारी त्या भागाचा मुसलमानी तंडेल स्वतः त्या मुलाच्या भ्रष्टीकरणासाठी चोरून पुढाकार घेऊन त्या मुलाला इतर बंदीवानांसह खोलीत बंद न होता बाहेरच रहा म्हणून म्हणाला. नंतर ते दहा-पाच मुसलमान हौदावर एका आडोशाशी बसून त्या मुलास बहकविण्यासाठी बाहेरून तुरुंगात आणलेला जिलबीचा पुडा सोडून बसले. आणि त्यास आपले हातचे पाणी आणि ते खाणे खावविण्याची आणि नंतर स्वतःही जिलबीवर हात मारण्याची सगळी सिद्धता झाल्यावर त्यांपैकी एकजण तो भोजनसमारंभ सुरू करण्याचे निमित्त त्या मुलास समजावून सांगत त्यास मुसलमानी 'कलमा' ही पढवू लागला. जर तू मुसलमान झाला नाहीस तर तुला आम्ही आजपर्यंत दिलेल्या 'आरामाचा' काही उपयोग न केल्याने तू कृतघ्न झालास असे आम्ही समजू आणि तुला कष्टकारक कामे करावयास लावू, असा धाकही त्यास मधून मधून दाखविण्यात येत होता. हा धाक दाखवीत कलमा पढण्याचा समारंभ आडोशास चालला

आहे तोच एकाएकी तुरुंगातील एक गोरा अधिकारी घेऊन तो हिंदू तरुण अकस्मात त्या चांडाळचौकडीच्या पुढे दत्त म्हणून उभा राहिला!

कारण सकाळी मुसलमान तंडेल तिकडे व्यग्र झाला आहे असे पाहून तो गुपचुप त्या भागातून बाहेर गेला होता, त्याच्या पैशाचे वॉर्डर इत्यादी सर्व लोक मिधे असल्याने त्यास कोणी फारसे अटकावीतही नसे. त्याने भागातून बाहेर पडताच नीट कारागृहाच्या कार्यालयात जाऊन तिथे उपस्थित असलेल्या एका गोऱ्या दुय्यम अधिकाऱ्यास ''आपण एक चोरी पकडून देणार आहोत,'' अशी बातमी दिली. तो गोरा अधिकारी अर्थातच त्याचेबरोबर त्या अस्पष्ट बातमीची चौकशी करण्यास निघाला. मुसलमानांची भ्रष्टीकरणाची वेळ आधीच कळली असल्याने तो हिंदू तरुण त्या गोऱ्या अधिकाऱ्यासमक्ष त्या मुसलमानांस, त्या मुलासह, त्या जिलबीसह, त्या निमाजासह, अचानक येऊन असा पकडता झाला.

तो मुसलमान तंडेल एकदम मेल्याहून मेल्यासारखा झाला. त्या मुलाला खोलीत बंद न करता आपल्यापाशी घेऊन बसणे, जिलबी कारागृहातून चोरून आणणे. इतर बंदीवानांस निर्बंधाविरुद्ध एकत्र करणे हे कारागारीय अपराधच त्याची खोड मोडण्यास पुरेसे होते. त्यात आता हा नवीन बळाने हिंदूस मुसलमान करण्याचा अपराध भरीस पडलेला! त्या हिंदू तरुणाने मागची सर्व कथा अधिकाऱ्यांस समजावून सांगितली, खटला भरला गेला. बारीही त्या तंडेलास बचाविण्यास धजला नाही. त्या बंगाली मुलाने आपल्या कथनात सर्व वस्तुस्थिती पर्यवेक्षकासमोर खटला चालताना सांगितली. पर्यवेक्षकावर त्याचा अर्थातच परिणाम होऊन आम्ही आजपर्यंत मुसलमानी नीच धर्मवेडाचा हिंदू बंदीवानांस भयंकर त्रास होतो म्हणून जे प्रतिवाद करीत आलो ते किती खरे होते हे त्याच्या ध्यानात आले. या खटल्यात मुसलमानांनी आमचे नाव गुंतवून आम्ही मुसलमानांस हिंदू करतो म्हणून कथन केले. तेव्हा अनायासेच आम्हास बोलावणे झाले. आम्ही ती गोष्ट अर्थातच मान्य केली आणि पर्यवेक्षकांस मागे माझ्याशी झालेल्या संभाषणाची आठवण देऊन म्हटले की ''आपणच आव्हान केले होतेत की हिंदू लोक का मुसलमानांस बाटवीत नाहीत?''

## मुसलमानांवर रडण्याची पाळी

त्या आव्हानात असलेला आपला गर्भितार्थ असा असावा की, मुसलमान धर्मभ्रष्ट होण्याइतका दुर्बल नसतो आणि हिंदू धर्मात आपल्या अनुयांयांना संभाळण्याची देखील शक्ती नाही मग आक्रमणाची गोष्टच दूर! पण ही समजूत चुकीची आहे आणि मनात आणतील तर हिंदूही परधर्मीयांस आत्मसात करू शकतील हे आता मुसलमानांच्या आणि आपल्या ध्यानात आलेच असेल! प्रथम हिंदू प्रतिवाद करीत की मुसलमान आम्हांस बाटवितात. आता मुसलमानांची पाळी आली आहे तेच रडगाणे गाण्याची की हिंदू त्यांस बाटवितात! तुरुंगात हा गोंधळ बंद करणे असेल तर त्यास एकच उपाय की, सरकारी रीतीने तरी कोणाही बंदीवानास धर्मांतर करण्याची परवानगी देण्यात येणार नाही आणि तसे धर्मांतर नावे बदलून किवा विधर्मी पंगतीत जेवण जेऊन सरकार मानणार नाही. '

पर्यवेक्षकाने कमिशनरच्या संमतीने यानंतर थोडेच दिवसांत वरील आशयाची आज्ञा बंदीपाल बारी यास सोडली. आणि कारागारात कोणास कोणाही हिंदूस उघडपणे बाटवून मुसलमान म्हणून मुसलमानांचे पंगतीत बस-विण्याची किवा धर्मांतर कर अशी चर्चादेखील करण्याची मनाई आली! ही आज्ञा झाल्याने मुसलमानांचा कारागृहा-तील धंदाच बुडाला. हिंदूंनी तो धंदा कधी काढलाच नव्हता. कारागृहापुरती तरी मुसलमानी धर्मवेडाची नाडी ढिली पडली.

ही व्यवस्था लागताच दोनच गोष्टींसंबंधी सावधानता ठेवणे अवश्य होते. एक की या निर्बंधाप्रमाणे मुसल-मान चालत आहेत की नाही हे सारखे टपून बघत राहणे आणि शक्यतो त्यांस हिंदू तरुणांशी आणि अल्पवयी मुलाशी लघळपणा करण्याची संधी न देणे, आणि दुसरी ही की तुरुंगात प्रत्यक्षपणे कोणास मुसलमान करणे जरी निर्बंधाविरुद्ध ठरले होते तरी गुप्तपणे कोणास हिंदूस त्रास देऊन किवा लोभ दाखवून कारागारातून सुटताच वसाह-तीत मुसलमानी धर्म प्रत्यक्षपणे स्वीकारण्यास संमत करणे हे केव्हाही शक्य असल्याने मुसलमानांच्या या गुप्त प्रयत्नास कारागारात आणि वसाहतीत हिंदूंच्या तत्वाचा गुप्त प्रचाराचा शह देणे. या दोनही गोष्टींत आम्हास हिंदू बंदीवानातील धीट आणि निर्ढावलेल्या बंदीवानांचे उत्कृष्ट साह्य मिळाले. मुसलमानी गुंडांची गुंडगिरीतही हे पुरती खोड मोडीत! यांच्यातील वर उदाहरणार्थ उल्लेखिलेल्या दोन व्यक्तींप्रमाणे अनेक व्यक्ती आमच्या भजनी लागू लागल्या.

आणखी एक आश्चर्याकारक अनुभव आम्हास आला की, हिंदुत्वाच्या सामाजिक आणि राष्ट्रीय अभिमानास या गुंड म्हणून गाजलेल्या हिंदूंच्या हृदयात आम्हास लवकर जागृत करता येई. इतर साध्या शिक्षित व भाबड्या हिंदूत जरी हा अभिमान जागृत केला जाई तरी प्रत्यक्ष धक्काधक्कीत त्या अभिमानाने स्वतः झीज सोसून कार्य करण्याची धमक फार थोडी येई. पण या आपत्तीत निर्ढावलेल्या गुंड हिंदूत तो स्वधर्माभिमान जेव्हा जागृत होई, तेव्हा त्यासाठी झुंजण्याची धिटाई त्यांच्यात चटकन आपोआपच दिसून येई. याचे कारणही उघडच होते. गुंडात साहस आणि बाणेदारपणा स्वाभाविकच असे. किबहुना त्या सद्गुणांचे विकृत स्वरूप म्हणजे गुंडगिरी होय. फरक इतकाच पडे की, ते सद्गुण दुष्ट कृत्यात निस्तेजित केले जात होते ते आता हिंदुधर्माच्या आणि संस्कृतीच्या अभिमानाने स्वजातीयांचे रक्षणाच्या उदात्त कार्यी नियुक्त केले गेले. यायोगे प्रथमतः जरी काही गुंड आमच्या वैयक्तिक वजनाने किवा आम्ही त्यांस दिलेल्या आर्थिक साहाय्याने या राष्ट्रीय कार्यी झटण्यास सिद्ध झाले तरी हळूहळू अंगीकृत कार्याचा अभिमान धरण्याची अशी साहसी लोकांची जी उपजत प्रवृत्ती असते तिच्या योगे ते मागून त्या कार्यार्थ बऱ्याच निरपेक्ष रीतीने स्वतःच्याच अभिमानाने आणि प्रेमाने झटू लागले. इतकेच नव्हे तर त्यांच्यात कित्येक तुळशी रामायण नियमाने वाचू लागले, शिक्षण घेऊ लागले, धर्मकार्यार्थ कवडीचुंबक म्हणून नावाजलेले लोकही सोन्याच्या गिन्या मोजून देऊ लागले. त्यांच्या हाती हिंदू मुलगा येताच आम्ही सोपवून द्यावा. त्या हिंदू मुलाच्या प्रेमाच्या लालसेच्या हौशीच्या बऱ्यावाईट सर्व उणिवा हे हिंदू गुंड भरून काढू लागल्याने मुसल-मानांच्या हाती ती मुले फारशी पडेनाशी झाली.

## मुसलमानांचा भयानक जाच कसा मोडला ?

जो जो हिंदू बंदीवानांत हिंदुत्वाचा अभिमान संचारू लागला तो तो मुसलमान आम्हांवर जळफळू लागले. बारीच्या चिथावणीने आम्हांस केव्हा केव्हा फार कष्ट सोसावे लागत, शारीरिकच नव्हते, ते तर आम्ही सोशीतच होतो, पण मानसिक कष्टही सोसावे लागले, ते कुठवर सांगावे? काही दिवस तर बारीच्या फुशीने मिर्झाखानने एक-दोघां मुसलमान वॉर्डरांस केवळ आम्हास बीभत्स शिव्या देत कारागारभर हिडण्याच्याच कामावर नियुक्त केलेले होते. हे स्वतः नीचांतील नीच दंडित मुसलमान बंदीवान कारागारात पाहिजे तेव्हा पाहिजे तेथे जाऊ येऊ शकत. त्यांस आडकाठी नसे. आमच्या खोलीसमोर वा चाळीसमोर उभे राहून आम्हांस अगदी असह्य अशा बीभत्स शिव्या देत त्यांनी तासनतास उभे राहावे. आणि मुसलमान अधिकाऱ्यांनी ती गंमत पाहत खो खो हसत जावे, त्यांच्याशी त्या बीभत्सतेच्या साधनाने लढणे आम्हांस अशक्य होते. आम्ही त्यांस बाष्फळ शिव्या दिल्याही असत्या तरी त्यांस कोणचीही मानसिक दुखापत होतीना. त्यांचा तो प्रत्यहीचा सरावच होता. पण आम्हांस मात्र त्यांच्या शिवी-गणिक दुखापत होई तरी ती निमूटपणे सोशीत बसावे. शेवटी त्यांच्याचप्रमाणे बीभत्सपणात आणि हलकट उप-द्व्यापात निर्ढावलेल्या काही हिंदू गुंडांनी जेव्हा त्यांस पेचात आणले तेव्हा त्यांची तोंडे बंद झाली. बारीचा त्यांस पाठिंबा होता म्हणून बारीकडे प्रतिवाद न करता एका हिंदू वॉर्डराने त्या मुसलमानी वॉर्डरास नकळत त्याच्या अंथरु-णात सुऱ्या, तंबाखू, पैसे इत्यादी कारागारीय निर्बंधाविरुद्ध असलेल्या वस्तू छपून लपविल्या आणि पर्यवेक्षक ‘पाह-णीस’ ज्या दिवशी आला त्या दिवशी एकदम त्याचे समोरच ते त्या वॉर्डराचे अंथरूण पकडवून दिले! अर्थातच निर्बं-धाविरुद्ध वस्तू बाळगण्याच्या अपराधासाठी त्या मुसलमानी वॉर्डरास शिक्षा देऊन, कामावरून काढून टाकून, कारा-गाराचे बाहेर वसाहतीत एका कठिण कामावर धाडण्यात आले. तेथे हिंदू लोकांशी घासाघीस होऊन, काम नाकार-ण्याच्या अपराधासाठी त्यास वेत मारण्यात आले. याप्रमाणेच आणखी दोन-चार मुसलमानी तंडेल आणि पेटी ऑफिसरही कारागारातील आमच्या राजबंदीवान आणि इतर साथीदारांच्या साह्याने पेचात ‘तोडून’ टाकण्यात आले. तेव्हा कुठे शुद्धिप्रकरणामुळे भडकलेला हा मुसलमानी आडदांडपणा शुद्धीवर आला.

कारागारातील मागे वर्णिलेल्या आमच्या संस्थेतील शिक्षणात पटाईत झालेले लोक बाहेर वसाहतीत जसे-जसे अधिक अधिक फैलावत जाऊ लागले तसतशी तिथेही शुद्धीची चळवळ बळावत चालली. हिंदू लोकांत हिंदु-त्वाची जाणीव जशी दृढ होत चालली तशी कोणीही हिंदू परधर्मीयांच्या छळाने त्रस्त होतोसा दिसल्यास त्याचे दुःख स्वतःच्या दुःखाप्रमाणे प्रतीत होऊ लागण्यास आरंभ झाला आणि त्यायोगे हिंदुहिंदूतील पूर्वीचे प्रांतविशिष्ट वा जातिविशिष्ट आकुंचित भाव थोडेफार मावळत जाऊन बरीच जूट उत्पन्न झाली. कुठेही हिंदू बाटलेला आहे असे कळले की त्यास परत घेण्याकडे वसाहतींच्या पुढारी हिंदू बंदीवानांचे लक्ष आपण होऊन वेधले जाऊ लागे. अशा रीतीने आम्ही अंदमानात जाण्यापूर्वी आठ-आठ दहा-दहा वर्षे मुसलमान झालेल्या लोकांसही शुद्ध करून घेण्यात आले. त्यांस आपल्या पंगतीत हिंदू लोक घेण्यास कांकूं करीतनासे झाले. एक उदाहरण सांगायचे तर तुळशी नावाच्या एका पन्नाशीजवळ आलेल्या मनुष्याचे सांगतो. ही स्वारी जुगार, चोरी इत्यादी सर्व कार्यांत पटाईत होती. अंदमानात मुसलमानांचा जोर पाहून, आणि हिंदूंच्या खाण्यापिण्याच्या त्रासदायक रूढीस कंटाळून, तो मुसलमान

झाला होता. पण जेव्हा केवळ खाण्यापिण्याने हिंदुधर्म बुडतो ही मूर्ख समजूत आमच्या मंडळींच्या सतत उपदेशाने हिंदू लोक सोडू लागले तेव्हा तुळशी पण परत हिंदुधर्मात येण्याची इच्छा दर्शवू लागला. त्याचे मुसलमानी नाव इतके परिचयाचे झाले होते की त्यास त्याचे पूर्वीचे हिंदू नाव आठवण करून सांगावे लागले. कागदोपत्री तर तो मुसलमान म्हणूनच गणला गेला होता; पण हिंदुत्वाचा जिकडे तिकडे बोलबाला ऐकून त्याचाही अंतर्गत जातीय अभिमान जागृत झाला आणि जवळ जवळ पंधरा वर्षांनी त्याने पुन्हा हिंदू समाजास आपले म्हटले. तुळशी हे नाव अंगीकारले. प्रत्यही रामायण वाचू लागला. कपाळावर न विसरता तिलक लावू लागला. हिदुंनीही त्याला परत आपले पंगतीत बिनबोभाट घेतले.

## खाण्याने हिंदू बाटत नाही

ही पंगतीची अडचण जसजशी दूर होत गेली तसतशी जुने बाटलेले हिंदू संभाळण्याचीच नव्हे तर नवे बाटविण्याचीही मुसलमानास मोठीच पंचाईत पडू लागली. आजवर नुसते कोण्या हिंदूस थोडेसे मुसलमानाच्या हातचे पाणी दिले किवा खाणे दिले की तो हिंदू. हिंदू लोकच मुसलमान झाला म्हणून बहिष्कृत करीत. आज या वेळेस आपल्या या हिंदुस्थानात ही दुष्ट आणि गावंढळ समज शास्त्रीमंडळातही प्रबळ आहे ते कोणास सांगावयास पाहिजे आहे असे नाही. एका या समजेपायी भ्रष्ट झालेल्या हिंदूंतील शेकडा पन्नास लोक भूतकाली आणि वर्तमानकाली परधर्मात समाविष्ट केले गेले आहेत! हिंदुस्थानातील आजची जर ही स्थिती तर त्या अडाणी पतितांच्या आणि पाप्यांच्या निर्बुद्ध वसाहतीतील, अंदमानातील दहा वर्षांपूर्वीची स्थिती काय असेल तिची कल्पना करणे कठिण नाही! एतदर्थ आम्ही उघडपणे अंदमानात या रूढीस तोडण्यासाठी ‘खाण्याने मनुष्य बाटतो’ ही पोरकट समजूत मारण्यासाठी सारखे प्रयत्न चालविले होते. नाना प्रकारांनी तिचे हास्यास्पदत्व हिंदू बंदीवानांचे मनावर बिबवीत होतो.

जर हिंदूंचे खाऊन मुसलमान हिंदू होत नाही, ते हिंदूंचे अन्न पचवून पुन्हा मुसलमानाचा मुसलमान राहतो किवा ख्रिस्तीचा ख्रिस्ती राहतो तर मुसलमानाचे अन्न खाताच तुम्हांस धर्माचाच रेच व्हावा? तुमचे हिंदुपणाची पचनशक्ती क्षीण कशी झाली? मुसलमानांचे अन्न खाऊन, ख्रिस्त्यांचे पाणी पिऊन ते पचवून पुन्हा हिंदूंचे हिंदू राहण्याइतकी तुमची पचनशक्ती आता वाढली पाहिजे. सगळ्या जगाने तुमचे अन्न खाऊन टाकले, तुम्ही उपाशीचे उपाशी. आता बंधूंनो, आपण सगळ्या जगाचे अन्न खाऊनपिऊन पचवून टाकून पुन्हा हिंदूंचे हिंदू राहिलो पाहिजे! तरच तरणोपाय आहे. अशा अनेक प्रकारे आम्ही हिंदूंस समजावून देत चाललो. प्रत्येक प्रसंगी हे तात्पर्य त्यांचे मनात ठसवू लागलो. एकच गोष्ट उदाहरण म्हणून खाली देतो -

## हिंदू बंदीवानांना घडलेला उपवास!

अंदमानात मधून मधून कोळशांची तारवे येतात. तेथे कोळशांचे ठाणे केलेले आहे. येत्या जात्या गलबतांना आणि आगबोटींना अगदी अडल्या प्रसंगी कोळसा घेता यावा इतका साठा तिथे ठेवण्यात येतो. एकदा कोळशांचे असेच एक जहाज भरून आले असता ते रिकामे करण्यासाठी नेहमीप्रमाणे शेकडो बंदीवान त्या कोळसा उतर-

ण्याच्या कामावर पहाटे धाडण्यात आले. त्या कामाची घाई असल्याने दुपारी बंद्यांस जेवण न देता केवळ दोन चार मुठी फुटाणे वाटण्याचा क्रम असे. सकाळपासून तीन वाजेपर्यंत असे सारखे काम करून ती बंदीवानांची सेना जेवा-वयास परत वसाहतीत येई. या फुटाण्यांची पोती - काही हिंदूंची आणि काही मुसलमानांची अशी साधारणतः नेण्यात येत. पहिल्या दिवशी बारा वाजेपर्यंत कोळशाच्या भारी भारी पाट्या उपसीत, भरीत, वाहीत थकून आणि अंगे कोळशांनी काळीकुट्ट होऊन गेलेल्या त्या शेकडो हिंदू बंदीवानांच्या टोळ्या मूठभर चणे खाऊन पाणी पिण्यास जो परत येतात तो त्यांच्या दृष्टीस पडले की मुसलमानी बंदीवानांतील काही अतिरेकी गुंडांनी हिंदूंच्या फुटाण्यांचे पोते उपसून त्यातून मुठी भरून खाण्यास सुरवात केली आहे! ते उत्तर हिंदुस्थानातील ठाकूर हिंदू! फुटाण्यास मुस-लमान शिवला म्हणून ते विटाळलेले फुटाणे कोणी खाईना. वरील मुख्य अधिकारी एक मुसलमान जमादार, तो हसू लागला. पण दाद घेईना. मुसलमानांचे चांगलेच फावले. त्यांनी आपली फुटाण्यांची पोती तर गिळंकृत केलीच पण हिंदूंची फुटाण्यांची पोतीही पण ते खात नाहीत म्हणून आपणच खाल्ली! बिचारे हिंदू बंदीवान सगळा दिवस मूठभर फुटाणेही न मिळता राबून परत आले. दुसऱ्या दिवशी जवळ जवळ तोच प्रकार. हिंदूंच्या वाट्याची एक-दोन पोती मुसलमानांतील कोणीतरी शिवून बाटविली आणि ती पोती कोणी खात नाहीत म्हणून मुसलमानांस अधिक भाग मिळून मुसलमानी अधिकाऱ्यांनी वाटून टाकली. गोरे अधिकारीही हास्यास्पद परंतु ज्यायोगे बिचाऱ्या हिंदू बंद्यांचे जिवास अत्यंत कष्ट पोचत अशा प्रकाराकडे साहजिकच त्रासून दुर्लक्ष करीत.

## ते फुटाणे हिंदू का होऊ नयेत!

पहिल्या दिवशी मला हा प्रकार कळताच मी त्या बंदीवानांत जे कारागारातील लोक जात असत त्यांच्या-तील कित्येक मंडळचे या त्यांच्या आत्मघातक वेडगळ रूढीबद्दल बोलून पुष्कळ कान उपटले. सांगितले की अरे ''आज तुम्ही ठाकुरांनी जिलबी केली, कोणी मुसलमान आला त्याने तिला हात लावला. ती बाटली. ती फेकून दिलीत. त्याने ती खाऊन टाकली. दुसरे दिवशी तू पेढे केलेस, कोणी ख्रिश्चन आला. त्याने हात लावला. पेढे बाटले. तू ते फेकून दिलेस. त्याने ते खाऊन टाकले. तू पुन्हा उपाशीचा उपाशी? हिंदूंच्या या 'विटाळाचे' पायी हिंदू भिकेस लागले! परदेशात जाऊन बाहेरचा पैसा देशात आणणे अशक्य झाले. कारण मुख्यतः या खाण्यापिण्याचा विटाळ! देशातील धन, अन्न परके लुटून नेतात तो विटाळ नाही; आपले अन्न जगाने हिसकवून न्यावे आणि त्यावर लाल व्हावे - तो विटाळ नाही; पण दुसऱ्याचे अन्न आपण पराक्रमाने मिळवून खाणे, हा विटाळ! दुसऱ्याचे हरण नका करू, पण निदान स्वतःचे नुसत्या त्यांच्या स्पर्शाने त्यांनी हरण करावे हा गाढवपणा तरी घडू देऊ नका. मुसलमा-नांनी तुमच्या फुटाण्याचे पोत्यात हात घातला तर ते फुटाणे जर मुसलमानी होतात तर तुम्ही हिंदूंनी मुसलमा-नांच्या फुटाण्यांस शिवताच ते फुटाणे हिंदू का होऊ नयेत! तर वेड्यांनो जा, उद्या तुम्ही काहीजण काम बंद होताच सत्वर पुढे घुसा आणि मुसलमानांच्या पोत्यात हात खुपसून फुटाणे खाऊ लागा. ते ओरडले की सांगा आम्ही हिंदू या फुटाण्यांस प्रथम शिवलो म्हणून हे फुटाणे हिंदू झाले. आपले हिंदू फुटाणे त्यांच्या स्पर्शाने बाटत नाहीत तर आपल्या हिंदूंच्या स्पर्शाने मुसलमानी फुटाणे हिंदू होतात. जा या आक्रमण शास्त्रावर विश्वास ठेवा. पाप माझ्या डोक्यावर! आपण होऊन उपाशी का मरता!''

अशा उत्क्षोभक प्रकाराने त्यांस समजावता समजावता त्यातील काय ते शेदीडशे लोक त्याप्रमाणे वागण्यास सिद्ध झाले. तिसऱ्या दिवशी या लोकांनी इतर हिंदूंची वाट न पाहता कामावरून सुटताच नीट मुसलमानी पोत्यांकडे रोख वळवून त्यांवर हात मारावयास सुरुवात केली. मुसलमान अर्थातच पिसाळले. हिंदूंनी मागची आठवण देऊन साफ सांगितले तुम्ही प्रथम शिवलात म्हणजे फुटाणे मुसलमानी होतात तसे आता आम्ही प्रथम शिवलो म्हणून फुटाणे हिंदू होणार! ती गडबड त्या सर्व कामावरील गोरा अधिकारी जो होता त्याने ऐकताच त्यासही हसू आले आणि त्याने त्या हिंदूंस काहीएक शिक्षा न करता उलट त्यांच्या वेडगळ समजुतींनी त्यांची दोन दिवस झालेली दुर्दशा आज त्यांनी होऊ दिली नाही याविषयी अभिनंदनच केले. त्या पुढाकार घेतलेल्या हिंदूंची चंगळ चाललेली पाहून इतर सर्व हिंदूंही मुकाट्याने ते फुटाणे खाऊ लागले. दुसरे दिवसापासून मुसलमानांनी पुन्हा पोत्यांना शिवण्याची आगळीक करणेही सोडून दिले. कारण तिचा आता त्यांना काहीएक उपयोग होणारा नव्हता.

## विटाळाची खोड मोडून टाकली.

याप्रमाणे प्रत्येक लहानमोठ्या प्रसंगांचा उपयोग करून घेऊन खाणे, पिणे, निजणे, बसणे अशा व्यवहाराच्या प्रत्येक लहानसहान गोष्टीत विटाळ विटाळ म्हणून चित्कारण्याची हिंदूंची वेडी खोड त्या बंदीवानांतून आम्ही बरीच नामशेष करू शकलो. त्यायोगे मुसलमानी किवा ख्रिश्चन धर्माप्रमाणेच हिंदू धर्म आणि हिंदू रूढी ही त्या आपत्तीच्या जगात व्यवहारास सुखकर आणि आपत्तीस तोंड देण्यास समर्थ होत गेल्या. परिणामतः त्या रूढींच्या त्रासाने कंटाळून निरुपायाने हिंदू समाजास अंतरलेले अनेक लोक शुद्ध होऊन परत हिंदू होत चालले आणि पहिल्याप्रमाणे जे हिंदू असलेले बाटत ते बाटत नाहीसे झाले. ख्रिश्चनातूनही एखादा-दुसरा मधूनमधून परत घेतला जाई. उदाहरणार्थ एका तेलंगी वॉर्डराची गोष्ट घेऊ. हा चाळिसीच्या वरचा मनुष्य होता. तेलंगी होता. पण एका पिढीपूर्वीचा ख्रिश्चन. अंदमानात येताच त्यास तेलंगी रामायण वाचताना पाहून आम्ही त्याचेवर डोळा ठेवला. तो इंग्रजीही थोडाबहुत शिकला होता. आम्ही बंदीवानांस फार सुलभपणे इंग्रजी शिकवून 'मुनशीची' जागा देववितो ही गोष्ट प्रत्यक्ष पाहून तो इंग्रजी शिकण्यासाठी चोरूनमारून आमचेकडे येऊ-जाऊ लागला. लवकरच पुरता भजनी लागला. आणि राष्ट्रभक्तीच्या आणि हिंदू इतिहासाच्या कथा ऐकत ऐकत आपण परत हिंदू समाजात प्रकटपणे येण्याचे मान्य करिता झाला. तो फार धीट होता. आम्ही नको म्हणून पाहिले तरी शुद्धिसंस्कार होताच त्याने आपले ख्रिश्चन नाव बदलून हिंदू नाव सरकारी लिखाणात दाखल व्हावे म्हणून आवेदन (अर्ज) केले. पाद्री येई तरी प्रार्थनेस जाईनासा झाला. बारी रागावला आणि त्यास वॉर्डरीवरून काढून टाकीन म्हणून धमकी दिली. पण पर्यवेक्षकाने तिकडे लक्ष दिले नाही. तो हिंदू झाल्यावर दिवाळीदसऱ्यास हिंदू देवळात, कारागाराबाहेर सुट्टी घेऊन जाई. तिलक लावी; आणि विवेकानंदादी पुस्तके आणि हिंदू इतिहासातील वीरकथा फार भक्तीने वाची. आमच्या संस्थेस तो आपल्या तुटपुंज्या बारा आणे महिना पगारातून चार आणे नियमाने देत असे.

वसाहतीत शुद्धिकार्याला बंदीवान जगत् जसे अनुकूल होत चालले तसे तसे तेथील 'स्वतंत्र' हिंदू जगत् म्हणजे हिंदुस्थानातून गेलेले व्यापारी, अधिकारी, शिपाई आणि बंदीवानांची त्या अंदमानातच जन्मून बसलेली प्रजा हेही अनुकूल होत चालले. तिकडे या लोकांनी बांधलेली हिंदूंची देवळे आहेत, त्यांत प्रथमतः शुद्धीकृत हिंदूंस

येण्याची अडचण पडे. पण पुढे ती सर्वस्वी दूर झाली. आणि दसरा दिवाळी आदिक हिंदूंच्या समारंभांत शुद्धीकृत हिंदू अगदी निर्बंधरहित रीतीने इतर हिंदूंसह रामायणपाठात, दर्शनात, पंगतीत रंगून गेलेले दिसू लागले.

## बाबारावांवर हल्ला

इतके झाले तरी मधून मधून शुद्धीच्या कार्यात मुसलमानांशी अगदी दंग्याधोप्यापर्यंत प्रसंग आम्हांवर येतच होते; अगदी १९२० च्या आगे मागे एका गुजराथी मुसलमानांतील एका अत्यंत निर्लज्ज पण अत्यंत उद्धट गुंडाने आपला 'छोकरा' म्हणून पाळला होता. आणि ठराविक पद्धतीप्रमाणे या पाळण्याचे पर्यवसान शेवटी हिंदुत्वाचे स्मशानात जाऊन त्या मुलास मुसलमान करण्यात होणार होते. ही बातमी लागताच त्या भागात बंद असलेल्या आमच्या बंधूंनी हर प्रयत्न करून त्या मुलास त्या गुंडाचे हातून काढविले. एका हिंदू मुनशीने त्या मुलास कोठडी नेमून दिली. त्यामुळे क्रुद्ध होऊन त्या मुसलमानी गुंडाने आमच्या बंधूंवर ते स्नान करून तोंड पुशीत असता एकाएकी आक्रमण केले; आणि नाकावर जोराचा ठोसा दिला. त्या अचानक आघाताने आमचे बंधूस घेरी आली. रक्त भळभळ वाहू लागले. इतक्यात आजूबाजूचे राजकीय बंदीवान आणि इतर बंदी येऊन तो गुंड धरला गेला. पण ती बातमी ऐकताच बारीने काय केले? अगदी सर्वांसमक्ष सस्मित बोलत त्या गुंडास जवळजवळ भलाई दिली! आणि एका- दोघांपाशी असे स्वच्छ उद्गार काढले की ''या सावरकरांची खोड अशी परस्पर जिरेल तर किती चांगले होईल!''

पण जी खोड फाशीच्या छायेतही जिरली नाही ती अशा बोटे मोडण्याने कशी जिरणार! सावरकरांची सार्वजनिक चळवळ तर नाहीच जिरली; पण त्या गुंडाची मस्ती मात्र लवकर जिरली. त्यास इतर अपराधासाठी पुढे दोनदा वेत खावे लागून तो आमच्या खोलीच्या शेजारी जेव्हा बंद झाला तेव्हा गोगलगायीसारखा मऊ येऊन आम्हास ''बाबा!'' म्हणे आणि स्पष्ट सांगे ''गणेशबाबूवर आघात करण्यास मला बारीने चिथावले. नाही तर माझ्या बापाची छाती न होती. '' मग हे त्याचे कथन कितपत सत्य होते हे एक त्याला किवा त्या त्याच्या बारीमहाराजासच ठाऊक!

स्वतः अशा अनेक पीडा सहन कराव्या लागत. चळवळ तर सोडवेना. अशा आधीच अवश, कष्टकारक आणि असहाय स्थितीत दिवस काढावे लागत असतानाही जेव्हा या सार्वजनिक खटपटीमुळे ती स्थिती अत्यंतच असह्य होऊन जाई तेव्हा केव्हा केव्हा वाटे देखील की पुरे आता ही उलाढाल! एक स्वतःचे कष्ट सोशीत आहोत तेवढे आपल्या वाट्याचे सार्वजनिक कर्तव्य आपण करीत आहोत तेवढे पुरे! आता इतर लहानसहान कर्तव्यांचा भार इतरांनी उचलावा! पण ही वृत्ती थोडा वेळ टिकते न टिकते तोच एखादा हिंदू मुसलमानांच्या घेऱ्यात गुंतला आहे, किवा एखाद्या बंदीवानावर, मग तो कोणी का असेना, अधिकाऱ्यांनी अन्यायाने मारहाण चालविली असे कळताच प्रतिक्रिया शक्ती एकदम अंगात उसळून यावी. तो अन्याय वा अपमान स्वतःचाच वाटून अगदी स्वस्थ बसून राहताच येऊ नये. मनाने वारंवार म्हणावे -

**न जानपदिकं दुःख एकः सोहितुमर्हति।**

**अशोचन् प्रतिकुर्वीत यदि पश्येदुपक्रमम्।।**

या वचनाने मनाची उदंड प्रवृत्ती सारखी रोखीत असावे. मला वाटते जेव्हा मनास आपल्या जातीच्या, राष्ट्राच्या किवा धर्माच्या अपमानाने असह्य वेदना होतात; परंतु उपाय चालत नसल्याने ते पंजरबद्ध वाघासारखे नुसते चरफडत राहते तेव्हा, केव्हा तरी अशा कोणा प्रसंगी श्रीसमर्थांच्या तोंडून उद्गार बाहेर पडले असावेत की-

**''स्वार्थ गेला ताटातुटी, जडती परार्थ उपाधी**

**आता सावधान जीवा, त्याग केलाची करावा!''**

त्यांच्या मनास अशा अस्वस्थेच्या विवंचनेतून मुक्त करून काहीतरी शांत करण्यासाठी उद्गारल्या गेलेल्या या वचनाचा मी वारंवार जप करून माझे मनही शांत करण्याचा यत्न करावा. कारण पदोपदी राष्ट्रीय आणि धार्मिक अपमानांच्या आघातांस सहन करता करता ते आग लागल्यासारखे पेटू पाहावे!

## नावे देत नाही, कारण

या स्वभावामुळे अनेक मानसिक, शारीरिक आणि लौकिक छळ आणि त्रास होत असताही हिंदू लोकांत हिंदुत्वाचा अभिमान संचरून त्यांस एक सबळ राष्ट्र करण्यासाठी त्यांच्यातील घातक अशा मूर्ख रूढींचा नायनाट करण्याचे हे कार्य अधिकाऱ्यांच्या, मुसलमानांच्या आणि स्वतः स्वजनीय स्वधर्मीय हिंदू लोकांच्या विरोधाशी टक्कर देत शक्यतो रेटण्यावाचून आम्हास स्वस्थच बसवत नसे. शीघ्रच आम्हास इतक्याच कळकळीने साह्य करणारे अनेक राजबंदी आणि साधारण बंदी मिळत गेले. त्यांतील प्रमुखांची नावे येथे देण्याचे वारंवार मनात येते; परंतु त्यांच्या सध्याच्या परिस्थितीत तशी नावे देणे त्यांना रुचेल की नाही हे आम्हास त्यांच्याकडून अद्याप कळणे शक्य न झाल्याने ती नावे येथे देता येत नाहीत. पुढील आवृत्तीचा योग कधी आल्यास ती अवश्य देऊन कृतज्ञतेच्या ऋणातून आम्ही स्वतःस आणि आमच्या वाचकांस अंशतः तरी मुक्त करू. विशेषतः पंजाबमधील लाहोरच्या खटल्याचे जे राजकीय बंदीवान आले त्यांच्यात या हिंदुत्वाला वाहून घेऊन नीचातला नीच किवा क्षुद्रा-तला क्षुद्र हिंदू असला तरीही त्याचे शिक्षणार्थ, स्वधर्मप्रसारार्थ आणि परधर्माचे पंजातून त्यांस सोडविण्यासाठी व्यक्तिशः सतत झटत राहणारे बरेच कृतनिश्चयी देशभक्त पुढे पुढे निघाले. परंतु त्यांतील बहुतेकांस देखील या शुद्धी हिंदुसंघटनांचे महत्व समजावून देऊन या कार्यास प्रवृत्त करणे शक्य होईतो याचा सर्व भार आम्हास आमच्या 'साध्या' बंदीवानांतील थोड्या साहाय्यकांसहच सोसावा लागला.

इतरत्र वर्णन केल्याप्रमाणे जेव्हा हळूहळू सर्वत्र हिंदुत्वाचे अभिमानी असलेले अधिकारी - वॉर्डरापासून मुनशी, पेटी ऑफिसर, तांडेल, जमादार इतकेच काय, पण 'स्वतंत्र' लोकांतील अधिकाऱ्यांपर्यंत नाना प्रकारे खटपट करून, वशिले लावून नेमले गेले आणि धर्मवेडाने ज्यांच्या नीच प्रवृत्ती अधिकच उदंड झालेल्या होत्या असे पठाणी पंजाबी आदीकरून मुसलमानी अधिकारी पेचात पकडून पकडून 'तोडून' टाकविण्यात आले तेव्हा अर्थातच हिंदूंव-रचा छळ व अन्याय कमी होऊन बाटविण्याची मुसलमानी प्रतिक्रियाही बंद झाली. चार माणसे सोडून निदान

जिल्ह्याजिल्ह्यांतील आमच्या माहितीत असलेले जेवढे पूर्वी कधी भ्रष्ट झालेले हिंदू होते तेवढे परत स्वधर्मात घेण्यात आले.

या कामी कारागारातील ज्या काही भांडणांचे त्रोटक वर्णन वर दिलेले आहे, त्याचप्रमाणे हिंदू मुसलमानांची भांडणे धर्मांतर आणि शुद्धीवरून जिल्ह्याजिल्ह्यांतून वसाहतीभर झुंजावी लागली. उर्दू नावाच्या जिल्ह्यात एकदा वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत भांडण उभय पक्षांकडून नेण्यात आल्याने कारागाराप्रमाणेच आज्ञा झाली की, सरकारी-रीत्या कोणत्याही हिंदूंचे वा मुसलमानांचे धर्मांतर मान्य करण्यात येणार नाही. त्याचा अर्थ अर्थातच असा झाला की बंदी, अंदमानात येताना जो त्याचा धर्म असेल तोच शेवटपर्यंत सरकारी रीतीने मान्य केला जाईल. या आज्ञेने त्या वसाहतीत जे हिंदू मुसलमान झाले आणि नावे बदलून घेते झाले, त्यांच्या या भ्रष्टीकरणाचाच सरकारी आधार आपोआपच सुटला आणि त्यामुळे त्यांना परत हिंदू म्हणवून घेण्यात मुसलमानांनी हक्क सांगितल्यामुळे खटला होण्याची किवा अधिकाऱ्यांच्या रोषाची भीती वाटेनाशी झाली.

या परिस्थितीतील फेरफारामुळे जे मुसलमान म्हणविले जात त्यांची मूळची जात कोणची ती पाहणे अवश्य झाले. त्याविरहित कित्येक वेळा हिंदू मुलांच्या नावापुढे सरकारी लिखाणांतून आम्हास त्यांच्या स्वतःच्या ‘बंदीपत्रका’ वरही चापून मुसलमानी धर्माचे अनुयायी म्हणून जे लिहिलेले असे त्याचेही परीक्षण करणे होतेच. मुसलमान मुनशी असा प्रकार करताना आम्ही पाहिलेले आहे.

आता ज्या वेळेस आम्ही लिहीत आहो त्या वेळेस येथे रत्नागिरीस एका हिंदू भंग्याच्या मुलाचे नाव मुसल-मानी प्रत्ययान्त करून ‘मुसलमान’ म्हणून लाविले गेले ही गोष्ट उघडकीस आली आहे. या हिंदू भंग्याने दोन आवेदने केली तरी त्याचा अज्ञान मुलगा अजून मुसलमान म्हणूनच गणिला जात आहे. ही कारवाई चार वर्षांपूर्वी तो मिशनरी शाळेत असता झाली. नेहमी तू मुसलमान म्हणून लोक म्हणत असलेले ऐकता ऐकता ते अज्ञान मूल स्वतःही मुसलमान म्हणूनच स्वतःस म्हणवू लागले. आता ती गोष्ट उघडकीस आली आहे म्हणून निभावले. लव-करच सरकारी लिखाणांतून त्याची हिंदू जाती मान्य होईल.

तेव्हा मूळ कागदावरून एकदा सर्व चौकशी करून हिंदूंच्या सर्व माणसांची गणती व्हावी, जे पतित हिंदू शुद्धीकृत झालेले होते त्यांची मध्यंतरी बदललेली मुसलमान नावे आणि धर्म खोडून टाकून लिखाणात हिंदू नावे आणि धर्म लिहिला जावा आणि बळे बळे ज्यांची नावे परधर्मीय म्हणून गणली जात त्यांची हिंदू लोकांच्या टिप-णात बरोबर नोंद व्हावी म्हणून ते मूळचे हिंदुस्थानातून प्रत्येक बंदीवानाबरोबर आलेले कागदपत्र पाहणे अवश्य होते. पण हे वास्तविक वर्षामागचे कागदपत्र पाहवयास मिळणार कसे आणि मिळाले तरी हे काम सरकार करू देणार कसे?

सुदैवाने हा प्रश्न सोडविण्याची अचानक संधी आली. गेल्या शिरगणतीच्या वेळी ती गणती (Census) अंद-मानमध्येही सुरू होताच त्या कामावर आमचे अत्यंत विश्वासू असे लोक नेमले गेले. या वेळेस आमच्या मागचा सरकारी संशयाचा ससेमिरा बराच ढिला पडून आम्हास लेख्यालयात (दप्तर) लिहावयाचे काम करण्यास केव्हा

केव्हा जाऊ देण्यात येऊ लागले होते. कसे व केव्हा हे वृत्त पुढे येईलच; पण शुद्धीच्या वृत्तान्ताच्या अनुसंधानाकरिता ती घटना येथे गृहीत धरली आहे.

## शिरगणतीची संधी साधली

या गेल्या शिरगणनेच्या कामास अंदमानात आरंभ होताच दुर्दैवाने हिंदुस्थानातील हिंदुहिंदूंमधील सांप्रदायिक भांडणाचा प्रतिध्वनी तेथेही उमटू लागला. माझ्या मनातून ती नूतन शिरगणतीची संधी साधून मागच्या सर्व त्रुटी (चुका) आणि भ्रष्टीकरणाच्या हेतुपुरःसर केलेल्या खोडाखोडी सुधारून घेऊन हिंदूंची अखंड आणि सुधारलेली शिरगणती होऊन त्यांची संख्या निश्चितपणे सरकारी टिपणीत नोंदवून घ्यावी असे होते. याविषयी माझ्या सहकाऱ्यांशी संगनमत करून शक्य त्या त्या लेख्यालयांतून अंदमानच्या सर्व जिल्ह्यांत निरोप धाडले. सुदैवाने शिरगणतीचे महत्वाचे काम कारागारातील लेख्यालयात आलेले होते. ठिकठिकाणचे शिरगणतीचे कागदपत्र आवेक्षून नाव, गाव, धर्म, जात बंदीवानांनी बरोबर सांगितली की नाही हे मूळ वारंटाच्या प्रतीवरून ठरविण्यासाठी ती वारंट बहुतेक कारागारातील टिपणांतूनच नीट नोंदलेली असल्याने ते काम इकडे देण्यात आले. तेव्हा त्या कामास हातभार लावण्यास आमच्यातील बरीच मंडळी पुढे आली आणि त्यांना परवानगीही देण्यात आली.

परंतु मध्यंतरी आमच्या काही आर्यसमाजी बंधूंनी जुन्या काळी ‘हिंदू’ शब्दासंबंधी त्या समाजातील लोकांचा जो भ्रामक समज झाला होता त्याचीच पुनरावृत्ती करून शिरगणनेत आपली नावे ‘हिंदू’ म्हणून न नोंदता ‘आर्य’ म्हणून नोंदवावी असा बेत केला. आर्यसमाजीयांचे हे विचार ऐकताच त्या वेळेस कारागारात आलेल्या शीख राजबंदीपैकी काही पुढाऱ्यांनी, अंदमानातील शीख बंदीवानांनी आणि शिपायांनीही आपणास ‘हिंदू’ म्हणून न म्हणविता ‘शीख’ म्हणून स्वतंत्र नोंद करावी असा हट्ट धरला.

हा ‘हिंदू’ शब्दाच्या वास्तविक अर्थाविषयक हिंदूंतील अनेक संप्रदायांचा असलेला तिरस्कार भाषाशास्त्रीय अगदी ऐतिहासिक अज्ञानाचा परिणाम आहे ही गोष्ट आम्ही आमच्या ‘हिंदुत्व’ नावाच्या पुस्तकात सविस्तरपणे सिद्ध केलेली आहे. यास्तव, आणि आता लजपतराय, श्रद्धानंद, परमानंद इत्यादी आर्यसमाजाच्या विख्यात पुढाऱ्यांनीही ‘हिंदू’ शब्दाविषयी यथार्थ ममत्व दाखविले असल्याने आणि हिंदू संघटनांच्या व्यापक चळवळीत हे आकुंचितत्व लुप्त होऊन सनातनी आणि आर्य दोघेही ‘हिंदुत्वा’चे अभिमानाने प्रेरित होऊन आपसातील शाब्दिक शुष्क भेद पुष्कळ अंशी विसरून गेल्याने आम्ही हिंदू शब्दाचा खरा अर्थ आणि खरी व्याख्या काय याची चर्चा येथे करीत बसत नाही. इतके सांगणे पुरे आहे की, इंग्लंडमध्ये असतानाच हिंदूंच्या सांप्रदायिक कलहाने हिंदुत्वाचे खंड खंड पडून आपल्या अखिल जातीस एका सूत्रात, एका ध्वजाखाली आणण्याचे सामर्थ्य सद्यःपरिस्थितीत ज्या एकाच शब्दात उरलेले आहे तो ‘हिंदू’ शब्द भ्रामक विद्वेषाच्या घावाने पंगू होईल ही भीती आम्हास जेव्हा चिंता उत्पन्न करू लागली तेव्हा आम्ही त्या संकटास तोंड देण्यासाठी हिंदू शब्दाची जी सत्य, ऐतिहासिक आणि सार्वत्रिक व्याख्या आपल्या मनाशी ठरविली होती तिचा उपदेश आम्ही रात्रंदिवस सुशिक्षित वा अशिक्षित हा विचार न करता

अंदमानातील बंदीवानांना आणि स्वतंत्रांना सारखा करीत चाललो. ज्याची ज्याची पितृभूमी आणि पुण्यभूमी (धर्म-भूमी) हिंदुस्थान आहे तो हिंदू. या व्याख्येची चर्चा, तिचा खल त्या दिवसांत जो जो आर्यसमाजी, शीख, जैन भेटे त्याच्याशी आम्ही सतत चालविला होता. आज आता 'हिंदुत्व' पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. ती हिंदुत्वाची व्याख्या

**''आसिंधु सिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका।**

**पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः।।''**

हिंदुस्थानातील मोठमोठ्या विचारवंतांपासून तो बहुतेक हिंदुसभेच्या शाखोपशाखांतून मान्य होत आहे. अंद-मानातील त्या दिवसांत ती व्याख्या नवीनच पुढे आल्याने तिची सत्यता आणि उपयुक्तता पटविण्यास व्यक्तिमा-त्रागणिक चर्चा करावी लागल्याने केवढी आटापिटी करावी लागली!

## शीख हे हिंदूच आहेत.

परंतु फलतः माझ्या आर्यसमाजी मित्रांना हिंदू शब्दाविषयीची तिरस्कारबुद्धी त्यायोगे पुष्कळ कमी होऊन त्यांनी आपणास 'हिंदू' म्हणवून नोंदवून घेण्याचे मान्य केले. केवळ हिंदू शब्दापुढे कंसात 'आर्यसमाजी' म्हणून अधिक उल्लेख केला जावा इतकेच ठरले. हीच न्याय्य तडजोड शीख मित्रांनाही सुचविली. परंतु त्यांच्यातील काही-जण अगदी अतिरेक करण्यासाठी सिद्ध झालेले असल्याने त्यांची समजूत घालण्यास पुष्कळ त्रास पडला. जर आम्हांस 'हिंदू' म्हणून शिरगणतीत नोंदले गेले तर आम्ही शीखांस अन्नत्याग करण्यास सांगून या उपासाच्या संपाने आम्हास केवळ शीख म्हणून संबोधण्यास सर्वांस भाग पाडू असे म्हणण्यापर्यंत काहींनी कमी केले नाही. परंतु शेवटी त्या सर्वांस कळकळीने विनंती केली की, 'बंधूंनो! मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी आपल्या जातीचे लचके तोडू पाहणाऱ्या विधर्मीयांशी तोंड द्यावयाचे आहे! तेव्हा अशा वेळी तरी आपण हा जातिघातक दुरभिमान सोडावा. निदान हे प्रकरण इतक्या विकोपास तरी नेऊ नये. हिंदुहिंदूंत शक्यतो फूट पाडून आपल्या अखंड समाजाचे तुकडे पाडू इच्छिणारे परके, 'शीख हिंदू; नाहीत त्यांची शिरगणती निराळी करावी' असे म्हणणारच! त्यांचा डाव हाणून पाडावयाचा का सांप्रदायिक हट्टाने त्या हितशत्रूस साहाय्य द्यावयाचे! हा प्रश्न एका शब्दाचा नाही. त्या शब्दाप्रमाणे आपल्या या पुरातन जातीस एका सूत्रात एका नावाखाली - आणणारा दुसरा कोणतातरी शब्द या परिस्थितीत अस्तित्वात आहे का? जातिसामान्य शब्द असला म्हणजे त्या शब्दामागोमाग जातिसामान्य प्रेम, अभिमान आणि ममत्व उत्पन्न होते हे साधे तत्व देखील आम्हास कळू नये ही केवढी दुर्भाग्याची गोष्ट आहे. बरे हिंदू म्हण-वून घेतले म्हणजे शीख म्हणवून घ्यावयाचे नाही असे थोडेच आहे! तर आपण प्रथमतः हिंदू म्हणून आपली नोंद करू आणि कंसात शीख, वा आर्य, वा ब्रह्मो वा सनातनी असे घालू. हा उत्तम मार्ग!'' हे आमचे म्हणणे कंटाळा येईतो चर्चा झाल्यावर शीखांतील समंजस मित्रांना आणि सहकाऱ्यांना पटले. त्यांनी अन्नत्यागादी अतिरेकी उपा-यांचा अवलंब करणाऱ्यांचा बेत हाणून पाडला.

त्यांतही एक अतिरेकी असताही जात्यैक्याचा सर्वनाश सांप्रदायिक दुरभिमान कसा करतो हे स्पष्ट करणारी घटना, अनायासेच घडून आली. शिखांतच अकाली, सहजधारी, केशधारी, इत्यादी जे पंथ होते त्यांच्यात वाद सुरू

होऊन कोणी आपण ‘केशधारी शीख’ म्हणूनच नोंदवू, नुसते शीख म्हणून नाही असा हट्ट धरू लागले. एकदा संप्रदायांची आकुंचित दृष्टी धरली म्हणजे जात्यैक्याच्या खपल्या खपल्या कशा उडत चालतात याचे हे उदाहरण मी सर्वांस दाखविले, त्याचाही चांगला परिणाम झाला. अंती माझ्या शीख मित्रांच्या साह्याने सर्वांची काही तरी तडजोड शक्य झाली. शीखांनी आपले म्हणणे मांडणारे एक आवेदन (अर्ज) वरिष्ठ अधिकाऱ्यांस धाडावे; परंतु त्याहून अधिक काहीही विरोध न करता शिरगणनेत ‘हिंदू’ या पंगतीत आपली नावे नोंदवू देऊन कंसात (शीख) म्हणून लिहावे असे ठरले.

ही तडजोड अगदी न्याय्य होती; कारण शीखांच्या मूळ वारंटावरच त्यांचे नाव, नंतर पंथ शीख असे असून पुढे पुन्हा जाती ‘जाट’ वा ‘महजबी’ इत्यादी उल्लेख असत. ही बंदीपत्रके (Prisoner's Sheets) प्रत्येक शीखापाशी आपआपली ठेवलेली असत. परंतु मी ‘जाट’ नसून शीखच आहे असे कोणीही म्हणत नसे. मग त्या जाट, सोधी इत्यादी जाती हिंदूंच्याच असल्याने त्यांच्याप्रमाणेच ‘हिंदू’ या पंगतीत आपली नावे नोंदण्यास त्यास काहीच हरकत नव्हती.

या निमित्ताने ‘हिंदू’ शब्दाची खरी व्याख्या काय याचे ज्ञान मात्र हिंदू लोकांत प्रसृत होण्यास चांगलेच साहाय्य झाले. सरकारी मोठ्या अधिकारांवर असलेल्या हिंदू ‘स्वतंत्र’ अधिकाऱ्यांपर्यंतही चर्चा चालली होती.

शेवटी एकदाची सर्वांची एकवाक्यता होऊन शिरगणतीचे कागद जेव्हा अन्वेक्षून, शुद्ध करून शेवटची प्रत करण्यास आले तेव्हा आमच्या देशाभिमानी आणि उत्साही साहाय्यकांसह आम्ही संप्रदायनिर्विशेष हिंदुमात्रास एका ‘हिंदू’ या उल्लेखातच समाविष्ट करू शकलो- जुनी वारंटे पाहता पाहता दिवसचे दिवस सारखे बसून घालावे लागले. ती बाडे चाळताना कित्येक गमती उघडकीस येत. एका मूळच्या भंग्याने आपली जात बदलता बदलता ताज्या सरकारी लिखाणातून ब्राह्मण म्हणून लाविली होती. आणि शिरगणतीतही तसेच सांगितले होते. कारण, ब्राह्मण म्हणविले म्हणजे स्वयंपाकाच्या एखाद्या ‘खाऊ’ जागेवर नेमणूक होण्याची संधी लाभायची. भंग्याने ब्राह्मण म्हणविले यात मला केवळ कौतुक काय ते वाटले. परंतु मूळचे हिंदू म्हणून असलेल्या किती लोकांस छळाने, बळाने, कपटाने मुसलमान करून टाकलेले होते ते पाहून आश्चर्य आणि खेद वाटू लागे. ते सर्व माझ्या मित्रांस दाखवून आपली वर्ष दोन वर्षे चालविलेली शुद्धीची चळवळ किती अवश्य होती याचे सबळ प्रत्यंतर मात्र त्यायोगे देता आले. ही शिरगणतीची प्रत करताना या सर्व मागाहून मुसलमान म्हणून गणल्या गेलेल्या लोकांस आम्ही परत ‘हिंदू’ या लेखात नोंदले, हे सांगावयास नकोच. त्यातील बहुतेक शुद्ध केलेलेच होते. या प्रतीवरून आम्हा सर्वांस इतके समाधान सप्रमाण रीतीने मानता आले की गेल्या दहा वर्षांतील हिंदुत्वास मुकलेल्या हिंदूंना तरी आम्ही शुद्धीकरणाने बहुतांशी पुनरपि स्वजातीत समाविष्ट करू शकलो. आणि त्याहून महत्वाची गोष्ट की मुसल-

मानी धर्मप्रसाराच्या अतिरेकी खुमखुमीची कंबरच मोडल्याने नवीन हिंदूस बाटविणे जवळजवळ अशक्य करून टाकले गेले.

या शिरगणतीचे श्रमाने आम्हास किती हिंदू मुसलमान झाले होते हे साधारणतः नक्की समजून घेता आले. आणि त्यातून किती परत हिंदू करण्यात आले ते निश्चित करता येऊन कोण राहिले तर उमगून त्यांसही परत घेण्याची व्यवस्था करणे शक्य झाले.

## गांवढळ प्रश्न करणारे धर्ममार्तंड

अंदमानातील शुद्धीच्या चळवळीने हे इतके कार्य न करता केवळ इतके जरी कार्य केले असते की मुसलमानही हिंदू होऊ शकतो ही गोष्ट लोकांच्या मनात ठसविली तरीही ती चळवळ सफल झाली असे म्हणता येते. ''हिंदू मुसलमान होतो; पण मुसलमान कसा हिंदू होणार!' अगदी अक्षरशः अशाच शब्दात शेकडो हिंदू जो प्रश्न करीत होते तो आता अंदमानात विचारणारा कोणी उरला नाही. मुसलमानालाही हिंदू करता येते. केवळ दोन घास मुसलमानी अन्न खाल्ल्याने रेच होऊन जीव जावा इतका काही हिंदू धर्माचा कोठा अशक्त नाही ही गोष्ट आता अंदमानातील त्या हिंदूंच्या रूढ समजुतीतील एक दृढ समजूत झालेली आहे. शुद्धिचळवळीचा हाही काही लहानसहान लाभ झाला नाही. कारण या हिंदुस्थानातील 'सुजाण' आणि 'स्वतंत्र' लोकांतही असे एकेक धर्ममार्तंड अजून आढळतात की जे हाच मूर्खपणाचा गांवढळ प्रश्न गंभीरपणे विचारतात!

ही जागृती आम्हां एकादोघांवर अवलंबून न राहता पुढे पुढे तेथील जनसमाजात किती बद्धमूल झाली होती हे दिग्दर्शित करण्यासाठी आम्ही अंदमान सोडल्यानंतर घडलेल्या एकदोन घटना येथे उदाहरणार्थ सांगतो.

अंदमानात पूर्वी कोणाही हिंदू स्त्रीने मुसलमानाशी विवाह करताच अर्थात ती मुसलमान होई; परंतु ती हिंदू राहून मुसलमानासच तू हिंदू होशील तर मी लग्न करीन असे ती म्हणू शकत नसे. हिंदू लोकांच्या विवाहविषयक समजुती फारच कोमल असल्यामुळे हिंदूतील कोणी बंदीवान अंदमानमधील स्त्रियांस हीन लेखून त्यांच्याशी सहसा लग्न लावीत नसे. परंतु लग्नास तर काय पण संबंधासही सिद्ध असता कोणाही हिंदू स्त्रीस मुसलमान नाकारीत नसे - कारण त्यायोगे एक काफराणी मुसलमान करण्याचे आणि संतती वाढविण्याचे काम, स्त्री कशीही असली तरी पवित्र आहे हे त्यास बाळकडू पाजलेले असते. ही वस्तुस्थिती अंदमानातील हिंदुत्वाच्या अभिमानी लोकांस जशी जशी पटू लागली तशी तशी हिंदू स्त्रीस मुसलमानांचे हाती पडू न देण्यासाठी ते सारखे दक्ष राहू लागले. उदाहरणार्थ, एक ठाकुराणी एका मुसलमानाचे संगतीने खाण्यापिण्याच्या संबंधात मुसलमान झाली. पुढे तिने लग्न करण्याचा निश्चय केला. जर हिंदू आपणास शुद्धिपूर्वक स्वसमाजात घेऊन कोणा हिंदूशी विवाह लावून देणार नाहीत

तर आपण आपल्या मुसलमान स्नेह्याशी विवाह लावू म्हणून तिने स्पष्टपणे कळविले. मुसलमान तर एका पाया-वर तयार होतेच. हे संकट पाहून एका जात्याभिमानी हिंदू गृहस्थाने तिच्याशी लग्न करण्याचे ठरविले. केवळ तिला मुसलमानाच्या पंजातून सोडवून तिची भावी संतती आपल्या रामकृष्णांच्या अभिमानी हिंदुकुलात राहावी म्हणून. दुर्दैवाची गोष्ट की अशी अगदी न्याय्य गोष्टही काही मुसलमानांचे ऐकण्यात येऊन त्यांनी ती स्त्री मुसलमान झालेली असल्याने तिला हिंदूशी लग्नच करता येत नाही असा प्रतिवाद करून सरकारी अधिकाऱ्यांस आवेदन पाठ-विण्यापर्यंत पाळी आणली. हिंदू स्त्रीस बाटून मुसलमानी नवरा करता येतो; पण हिंदू स्त्रीस शुद्ध होऊनही हिंदू नवरा करता येत नाही! असल्या अतिरेकी मागण्या करण्याचे निर्लज्ज धाडस करण्यास मुसलमानांस आमच्या हिंदूंच्या घातकी, भाबड्या आणि असमयज्ञ रूढीनीच उत्तेजित केलेले आहे हे आपण विसरता कामा नये. वरील आवेदनाविरुद्ध सर्व हिंदूंनी एकजुटीने प्रतिवाद केल्याने अधिकाऱ्यांनी निर्णय दिला की, ''ती स्त्री मूळची हिंदू अस-ल्याने आणि आम्ही शुष्काशुष्की धर्मांतर करण्याची बंदी केली असल्याने तिला इच्छा असेल तर हिंदू नवरा कर-ण्यास पूर्ण स्वातंत्र्य आहे. '' या निर्णयानंतर मुसलमानांस चूप बसणे भाग पडून त्या स्वधर्माभिमानी हिंदू गृह-स्थाने त्या ठाकुराणीशी हिंदू धर्माप्रमाणे लग्न लावले.

## काम चुकविण्यासाठी नमाज!

दुष्ट मुसलमानांच्या निष्कारण शत्रुत्वाची आणि चढेलपणाची खोड हिंदू बंदीवानांनी जुटीने वागून आम्ही परत आल्यानंतरही मोडल्याची जी काही उदाहरणे आम्हांस कळली त्यांपैकी आणखी एकाचा उल्लेख करू. वास्त-विक पाहता मुसलमान बंदीवानांत शेकडो लोक असे असतात की ते नमाज प्रत्येक दिवशी एकदा देखील पढत नस-तात. परंतु हिंदूंस केवळ चिडविण्याकरिता काही तरी निमित्त जेव्हा त्यांना पाहिजे असते तेव्हा याच विधिशून्य धंदेवाईक चोर दरोडेखोरास एकाएकी उभे मुसलमानी धर्मशास्त्र आठवू लागते. एखाद्या कठिण परिश्रमाचे काम करण्यास बंदीवानांची टोळी धाडली गेली की त्या दिवशी त्या टोळीतील प्रत्येक मुसलमान बंदीवान पैगंबराइतका धर्मभीरू होऊन दिवसातून पाच वेळा सोडून सात वेळा नमाज पढण्यास लागलाच म्हणून समजावे. कारण सरकारी अधिकारी नमाज कोणी पढू लागला तर त्या वेळेपुरती मुसलमान बंदीवानास सुट्टी देतात आणि त्यावेळी बिचारे हिंदू लोक काम करीत असल्यामुळे त्या मुसलमानी लुच्च्यांस काम पुष्कळ कमी पडते. अशा वेळी मुसलमानांतील पाजीतल्या पाजी बंदीवानांचीही इश्वरचिंतनात जी तंद्री लागलेली असते ती पाहण्यासारखी असते. नमाज पढण्या-पूर्वी ते हातपाय धुणे, ते दाढीवर शांतपणे पुनः पुन्हा हाताने थोपटीत तीस कुरवाळणे - नमाज संपल्यावरही डोळे मिटून तसेच राहणे आणि ती इश्वरचिंतनाची शांती! अशा वेळेस असे वाटते समाधीच्या साधनाचे जे प्राणायाम, अष्टप्रतीक, कर्म, जप इत्यादी अनेक प्रकार योगसूत्रात सांगितले आहेत त्यांत हे दोन प्रकार गाळले की काय! एक

दूध पुढे असणे किवा मासा तळपण्याचा संभव असणे आणि दुसरे साधन म्हणजे बंदीशाळेत कठिण परिश्रम करण्यास लावणे. कारण पहिल्या दोन्ही प्रसंगी मांजरांची आणि बगळ्यांची आणि कठिण परिश्रमाचे दर्शनासरशी अशा मुसलमानी चोर दरोडेखोरांची होणारी शांत मुद्रा समाधीतल्या तन्मयतेच्याहून फारशी निराळ्या प्रकारची दिसत तरी नाही.

## तुमची बांग तर आमचा शंख

मुसलमानांतील लुच्च्या लोकांची या कामटाळू निमाजाच्या व्यतिरिक्त आणखी एक युक्ती जी केवळ हिंदू लोकांस चिडविण्यासाठी किवा सरकारी निर्बंधाचा अन्याय उल्लंघ करून गुंडेशाही गाजविण्यासाठी अवलंबिली जाताना आम्ही पाहिली आहे, ती म्हणजे पहाटे 'बांग' देण्याची होय. बांग म्हणजे पहाटे उठून निमाजाच्या आगेमागे सर्वांस उठून इश्वरचिंतनास तत्पर राहण्यासाठी मारली जाणारी उंच आरोळी होय. बंदीशाळेत पहाटे सर्व बंदीवान निजले असता अशा प्रकारच्या आरोळ्या निष्कारण मारण्याचे अर्थातच सामाजिक त्रास बंद करण्याच्या सरकारी कर्तव्यानुरूप निषिद्ध असते. जो मनुष्य वर्षानुवर्षे सकाळी शिपाई दार उघडून शिव्या हासडितो तेव्हा बहुधा घोरत पडलेला असतो असा एखादा गुंड जेव्हा एकाएकी पहाटे उठून मोठमोठ्याने 'बांग' देत हाका मारतो आणि समाजाची शांतता भंग करतो तेव्हा त्या त्याच्या बांगेचा हेतू दुष्टपणाहून दुसरा कोणताही असत नाही. नमाज प्रत्येक मुसलमानाचे जसे आद्य कर्तव्य आहे तसे हे सर्व बंदीशाला गर्जून टाकण्याइतके मोठ्याने भुंकार करीत राहणे धर्मदृष्ट्याही मुळीच आवश्यक नाही. पण शेजारच्या चाळीतल्या हिंदू काफराची झोप मोडून पुन्हा धर्मविधीच्या ढालीखाली शिक्षेपासून दडून राहता यावे अशा भ्याडपणास ही 'बांगे'ची भांग पिण्याची हुक्की कशी आवरणार!

अंदमानच्या कारागारातही आम्ही तेथून इकडच्या कारागृहात धाडले गेल्यानंतर लागोपाठच मुसलमान बंदीवानांस अशी हुक्की आली. त्यांनी पहाटे खोल्याखोल्यांतून बांग देण्यास आरंभ केला. झोपमोडीने सर्व हिंदू आणि ब्रह्मदेशीय बंदीवान त्रस्त झाले. अधिकाऱ्यांनी दटाविले तर मुसलमान म्हणत हा आमचा धार्मिक विधी आहे! ब्रह्मदेशाचे बंदीवान हिंदुसंघटनांचे कामी अर्थातच हिंदूंशी मिळून-मिसळून वागत हेही येथेच सांगून टाकतो.

त्याविरहित हीही गोष्ट ध्यानात धरण्यासारखी आहे की, अंदमानात ब्रह्मी लोकांना बाटविणे मुसलमानांस मुळीच साध्य नाही. कारण त्यांच्यात कोणाबरोबर खाल्ले की धर्म बुडाला आणि मनुष्य अन्नाच्या एका घासासरशी जन्माचा नव्हे, त्याच्या संततीसह साता जन्मांचा बाटून गेला अशी खुळी कल्पना मुळीच नाही. ते बुद्धसंप्रदायी म्हणजे हिंदूधर्मांचेच अंतर्गत. पण ते मुसलमान, ख्रिश्चन, ज्यू सर्व जगाचे खाऊन पुन्हा आपले बुद्धच बुद्ध. म्हणून सनातनी हिंदूंस बाटविणे जसे सहज शक्य झाले तसे बर्मा लोकांना बाटविणे मुसलमानांस शक्य होईना. बाटवि-

ण्याची मुसलमानांची उरलेली दोन साधने - तलवार, ती तुटलेली; आणि बुद्धिवाद किवा तत्ववाद त्याचे आणि साधारण मुसलमानी समाजाचे साधारणतः विळ्याभोपळ्याएवढे वाकडे. म्हणून या दोन साधनांनी अंदमानातील हजारो हिंदूंस व त्यांच्या उपशाखेतील बर्मा लोकांस ते मुळीच बाटवू शकले नाहीत. गुंडगिरी आणि जेवणखाण यांनीच जे हिंदू बाटविता आले ते बाटविले गेले; पण या दोहोतही बर्मा लोक मुसलमानांच्याही पुढे काकणभर अधिक असत. मुसलमान जे खाणे हराम समजतात ते डुकराच्या मांसासुद्धा उंदराच्या पिल्लाच्या लोणच्यापर्यंत सर्व अन्न ब्राह्मी लोकांस वैध! त्यांच्याबरोबर जेवताना मुसलमानांसच कित्येक वेळी अंगास घाम सुटे! ब्रह्मी लोकांच्या बुद्ध धर्माचा आम्ही हेतुपूर्वक आणि भक्तीपूर्वक वारंवार उल्लेख करीत होतो आणि त्यांच्या तोंडून हिंदूप्र-माणेच त्यांच्यातही पूज्य मानल्या गेलेल्या रामायणभारतादी कथा जाणूनबुजून ऐकत असू, ऐकवीत असू. हिंदूंचे सण आणि त्यांचे सण आम्ही परस्परांस संमीलित करून पाळू. त्यायोगे ब्रह्मी लोकांची हिंदुसंघटनास सहजच सहानुभूती असे. त्यातही त्यांच्यातील स्मश्रूविहीन कोमल वयाच्या मुलांवर, तरुणांवर; आणि त्यांच्या एकंदर सालस जातीवर पठाणादिक मुसलमानांतील उद्दंड आणि क्रूर लोक जो अत्याचार करीत त्यापासून त्या क्रूर मुसल-मानी वर्चस्वाची खोड हिंदुसंघटनेने चांगलीच मोडल्याने त्या ब्रह्मी लोकांचीही बरीच सुटका झाली होती म्हणून त्यांस आमच्याविषयी आणि हिंदूंविषयी अधिकच भक्ती आणि ममत्व वाटत असे.

वरील 'बांग' च्या प्रकरणी तर ब्रह्मी लोकांसही हिंदूंप्रमाणेच त्रास होत होता. बांगच्या त्रासापेक्षाही केवळ आपल्यापुढेही स्वतःचा धर्मध्वजीपणा दाखवून आपला उपमर्द करण्यासाठीच मुसलमानी गुंड ही नवी रीत पाडीत आहेत अशा जाणिवेने हिंदू लोक चिडून गेले. अधिकारी मुसलमानांस दाबीत नाहीत असे पाहून हिंदूंनीही पहाटे उठून मोठ्याने प्रार्थना करण्यास प्रारंभ केला. आम्ही अंदमानात असताना एकदा एका मुसलमानाची 'निमाजी' खोड अशीच एका हिंदूस 'भक्त' बनवून मोडली होती. आणि पुढे रत्नागिरीच्या बंदीशाळेत आम्हास तोच तोडगा योजावा लागला. या वेळेस अंदमानात एक-दोन मुसलमानी व्यक्तींचा प्रश्न नसून ते सर्वच त्या कटात होते. हिंदू मोठ्याने प्रार्थना करू लागताच, जे अधिकारी मुसलमानांस बांग करण्यास रोधू शकले नाहीत तेच हिंदूंवर पहाटे मोठ्याने प्रार्थना केल्या म्हणून खटले भरून शिक्षा देऊ लागले. कारण की पहाटे मोठ्याने प्रार्थना करणे हे हिंदूंच्या पूजेचे महत्वाचे अंग नव्हते. यावर हिंदूंचे उत्तरही तितकेच गमतीचे होते. मोठ्याने प्रार्थना करणे पूजेचे अंग असो वा नसो पण निदान शंख फुंकणे हे तरी पूजेचे अंग होतेच होते. म्हणून हिंदूंच्या पुढारीपणाचा भार त्या कार्यी ज्या आमच्या एका उत्साही सहकाऱ्याने आणि प्रमुख सभासदाने घेतला होता त्यांनी कारागृहातील आपल्या कोठडीत एक शंख छपवून आणला आणि दुसरे दिवशी उत्तर रात्री मुसलमानांनी बांगेवर बांग देण्यास आरंभ करताच यांनी खोलीतून जोराने तो शंख फुंकण्यास सुरवात केली. त्या काफर शंखाच्या आवाजातल्या नगाऱ्यात बांगेची टिमकी अगदी फिकी पडली. बांग बाटली! ते मुसलमानी धर्मगुंड रागावून शिव्या हासडू लागले. त्या हिंदू पुढाऱ्यावर खटला

होऊन शंख फुंकल्याविषयी शिक्षा झाली. पण त्यायोगे ब्रह्मी आणि सनातनी लोकांतून आणखी कित्येकजण पहाटे उठून शंख फुंकू लागले! अंती या शंखापुढे बांगेची नांगी ढिली झाली. अधिकाऱ्यांनी प्रतिकार करणाऱ्या मुसलमानांस साफ सांगितले की, शंख हे पूजेचे अंग आहे. तुम्ही आमचे ऐका. तुम्ही बांग बंद करा म्हणजे आम्ही त्यांस शंख बंद करण्यास भाग पाडतो. तेव्हा निरुपायाने बांग बंद झाली! बुद्धिवादाने जे गुंड वठणीस आले नाहीत ते या शंखनादाने आणिले. बुद्धिवानास साध्य न होणारे कार्यही एखादा शंख असा केव्हा केव्हा करून जातो!

या शुद्धिप्रकरणात आणि अंदमानच्या बंदीगृहातील एकंदर वृत्तांतात तेथील दुर्वृत्त मुसलमानांचा आम्हास दुर्दैवाने वारंवार उल्लेख करावा लागला आहे. कारण तेथील दुराचारी बंदीवानांच्या वसतीत दुराचारी धर्मवेडाने पछाडलेले लोक असे बहुतेक मुसलमानच होते. परंतु त्यांची गोष्ट सोडून दिली तर जे त्या स्थलीही सद्‌वृत्त मुसलमान सापडत त्यांच्याशी आम्ही किती सद्‌व्यवहार करीत असू हे तेथील अनेकांस माहीतच आहे. आम्हांविषयीही सद्‌वृत्त मुसलमानांतच नव्हे तर त्या दुर्वृत्त धर्मांधातही पुष्कळच आदरभाव वसत असे. कारण आम्ही धर्मांतराचा किवा अत्याचाराचा प्रश्न सोडून बाकी प्रत्येक कामात जशी हिंदूंची तशी मुसलमानांची बाजूही घेऊन त्यांना न्याय्य ते साहाय्य अवश्य देत होतो. आम्हां राजबंदीवानांनी अंदमानच्या बंदी वसाहतीचे रानटी स्वरूप घालवून तिला जे थोडेफार मानवी स्वरूप आणविले आणि त्या झुंजीत सरकारी अधिकाऱ्यांच्या क्रोधाचा जो तीव्र ताप सोसला त्याचा उपयोग हिंदू बंदीवानांप्रमाणेच मुसलमान बंदीवानांसही झालेला असल्याने, त्यांस आम्हाविषयी वाटत असे तितकी कृतज्ञता वाटली नसती तरच आश्चर्य होते. आणखी एक गोष्ट आमच्या निष्पपक्षपाती प्रयत्न करण्याच्या प्रामाणिक इच्छेची साक्ष पटवील की, आम्ही धर्मांतराचे उत्तरदायित्वही मुसलमानांइतकेच हिंदूंवरही टाकीत असू.

## धर्मप्रचार अत्याचाराने करू नका!

आपल्याला जो धर्म सत्य वाटतो त्याचा प्रसार बुद्धिवादाने करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. मुसलमानांतील प्रचारकांचा दोष म्हणजे हा की, ते हा प्रचार गुंडगिरी, घातपात, नीचता, कत्तली, बलात्कार अशा राक्षसी साधनांनीही करावयास कधी कधी कचरत नाहीत. पूर्वी ख्रिस्ती प्रचारही केव्हा केव्हा असाच होई. परंतु आजकाल सहसा तशी गोष्ट त्यांचे हातून घडत नाही. परंतु मुसलमानी धर्मवेड अजूनही अनेक समयी ते अत्याचार करते. हा जरी त्यांचा अक्षम्य दोष असला तरी त्यांस असे अत्याचार आणि घातपात करण्यास उत्तेजन आणि संधी ज्या आपल्या रूढी देतात त्या रूढी एखाद्या मतिमंदाप्रमाणे कवटाळून धरणाऱ्या हिंदूंच्या आत्मघातकी, आकुंचित आणि मूर्ख स्वभावावरही धर्मांतराच्या संकटाचा दोष येतोच येतो. आमची तर अशी भावना आहे की, जर हिंदू लोकांतील दोन घातक समजुतींस ते सोडून देतील आणि शुद्ध आणि आरोग्यदायक अन्न वा जल कोणाच्याही हातचे घेतले तरी त्यात दोष नाही. इतकेच नव्हे तर अशुद्ध अन्न वा जलही बलात्काराने घ्यावे लागले तरी त्यात तत्कालीन दोषाहून

निरंतरची अशी कोणतीही भ्रष्टता अंगास आणि आत्म्यास चिकटत नाही. थोडक्यात म्हणजे, या पदोपदी टुणटुण उड्या मारीत नाचणाऱ्या विटाळाच्या वेडगळ कल्पनेच्या तंगड्या आपणास तोडून टाकल्याच पाहिजे असा ते निर्धार करतील आणि या कल्पनेपाई जे हजारो लोक आजपर्यंत स्वधर्मास मुकले त्यांस परत स्वधर्मात येऊ देऊन स्वसमाजात त्यांस व्यवहार्य समजतील तर मुसलमानांचा धर्मांतराचा अर्धाअधिक धंदा बुडालाच म्हणून समजावे. 'विटाळ' या एका शब्दात आपल्या सामाजिक आणि राष्ट्रीय अवनतीस कारणीभूत झालेल्या बहुतेक रूढींची बीजे अंतर्भूत झालेली आहेत. शुद्धीदेखील या 'विटाळा'च्या रोगानेच अवश्य झाली.

## बहिष्कर्त्यांचीच शुद्धी हवी

खरे म्हटले तर गोमांतकासारख्या प्रांतात ज्यांना केवळ या 'विटाळा'च्या भोळसट समजुतीपायी आम्ही आमच्यातून हाकलून दिले त्यांच्यासारख्या स्वजनांस परत पितृगेही घेताना त्यास शुद्ध करण्याची इतकी आवश्य-कता नाही की, जितकी ज्या आम्ही त्यास बळे बळे पितृगेहाबाहेर बहिष्कृत करून आत येऊ दिले नाही त्या आम्हांस आमच्या या ज्ञातिविघातक अरेरावी क्रौर्यासाठी प्रायश्चित्त घेण्याची आहे! शुद्धी बहिष्कृतांची नाही, तर अशा निरपराधी स्वजनांस बहिष्कृत करणाऱ्या आम्हा बहिष्कर्त्यांचीच केली पाहिजे!

एतदर्थच आमची अशी निश्चिती आहे की अन्नपेयांच्या स्पर्शास्पर्शतेच्या बाष्फळ अतिरेकाचा त्याग आणि धर्मबहिष्कृतांस शुद्ध करून घेण्याची रूढी या दोन सुधारणा हिंदूंनी आपल्या समाजात जर केल्या तर त्यायोगे मुसलमानांस हिंदूंतील आपद्ग्रस्तास बाटविणे पुष्कळच दुर्घट होईल, बाटविलेल्यांस संभाळणे त्याहूनही दुर्घट होईल. त्यामुळे त्यांस बुद्धिवादाने जे काय हिंदू बाटविता वा संभाळता येतील तितकेच हिंदू मुसलमान झाल्याने आणि त्याच न्यायरीतीने मुसलमानांसही हिंदू करून घेण्यास हिंदूंस हरकत न उरल्याने एका बाजूस मुस-लमानांची अत्याचारी वृत्ती संधी न साधल्याने आणि निष्फळ ठरल्याने कमी होईल आणि दुसरे बाजूस हिंदूंना आपले धर्मबांधव हिसडून नेले जाताना पाहून जो मुसलमानांविषयी साहजिकच त्वेष येतो तो कमी होईल. तलवार तर दोघांचीही तुटलीच आहे. तत्वाने धर्मप्रचार करण्यास दोघांसही अधिकारच आहे. विटाळाचा विटाळ तेवढा आपल्या बुद्धीस हिंदूंनी होऊ देऊ नये. म्हणजे मुसलमानी धर्मांतराच्या विटाळ, तलवार आणि तत्व या त्यांस अनु-कूल झालेल्या तीन साधनांपैकी तत्व हेच काय ते न्याय्य साधून त्यांस उरून धर्मांतराचा वाद मिटेल. म्हणजेच हिंदु-मुसलमानांच्या तीव्र चुरशीस कारण होणारे एक मोठे निमित्त दूर होईल.

एतदर्थ आम्ही नेहमी म्हणत असू की, हिंदू संघटन आणि शुद्धी ही हिंदू मुसलमानांच्या शाश्वत विरोधाची नव्हेत तर शाश्वत एकीची महत्वाची साधने होत.

याच दृष्टीने आम्ही अंदमानात त्यांचा अंगीकार केला होता. १९१३ व्या वर्षी आम्ही शुद्धिकार्यार्थ पहिले भांडण हाती घेतले, तेव्हापासून १९२०-२१ वर्षांपर्यंत अंदमानात, नंतर हिंदुस्थानच्या तुरुंगात आणि १९२४ वर्षी सुटकेनंतर आजपर्यंत संघटनाच्या आणि शुद्धीच्या कार्यात याच न्याय्य आकांक्षेने आम्ही झटत आहो. मुसलमानबंधूंचा, ख्रिश्चन बंधूंचा, किवा मनुष्यजातीतील कोणत्याही रानटीतल्या रानटी जातीचा देखील आम्ही द्वेष तर काय पण तिरस्कार देखील करीत नाही. त्यांतील ज्या व्यक्तींची व्यक्तिसंघाची अत्याचारी प्रवृत्ती दृष्टीस पडते तिच्या त्या प्रवृत्तीपुरता त्यांचा प्रतिरोध करतो. कारण की आमची अशी आशा आहे - निश्चिती आहे की, या शुद्धीच्या रूढीनेच हिंदु-मुसलमानांच्या शाश्वत आणि लाभकारक ऐक्यास भरभक्कम साहाय्य मिळणारे आहे.

प्रकरण तिसरे

# युरोपीय जर्मन महायुद्धाची बातमी आणि अंदमानवर पडणाऱ्या जर्मन छाप्याचा बेत

उत्तरार्धाच्या पहिल्या प्रकरणावरून वाचकांस कळून आलेच असेल की, राजबंदीवानांस पहिल्या पहिल्याने स्वदेशीय राजकारणाच्या बातम्या मिळणे हे जितके अवघड जात होते तितके ते पुढे पुढे जाईनासे झाले. प्रथमतः बंदीवानांसच काय पण तेथील उच्च हिंदी अधिकाऱ्यांसही राजकारणात अगदीच रुची नसल्याने त्यांच्या मनात राजबंद्यांस साहाय्य करण्याचे आले तरीही ते पैसे, खाद्ये, मेवे इत्यादी वस्तू देऊ पाहत; पण बातमी द्या म्हटले की ती सेवा कशी करावी हे त्यास समजतच नसे. भूगोल, इतिहास वा प्रस्तुत राजकारणातील नावे अवगत नसल्याने बंदीवानांस बातमी ऐकली तरी ती ध्यानात ठेवता येत नसे. सुशिक्षित हिंदी अधिकाऱ्यांत कित्येक असे आढळले की, केवळ आमच्या आग्रहाकरिता आणि आम्हास बातम्या पोचविण्यासाठी ज्यांनी वर्तमानपत्रे लक्षपूर्वक वाचावयास आरंभ केला. तथापि राजबंद्यांच्या उपदेशाने आणि चळवळीने तेथील मंडळीचे राजकारणीय मानसिक वातावरण जसे जसे विस्तृत होऊ लागले तसे तसे आम्हांस बातम्या वरचेवर मिळू लागल्या. कुठे ते कचरागाडीतून गदळ कागदांचे फाटके तुकडे वेचीत स्वदेशाची एखादी बातमी मिळविण्याचे दिवस आणि कुठे मागच्या प्रकरणात दिग्दर्शित केलेली निरनिराळी स्वदेशी पत्रे आमूलाग्र वाचावयास मिळणारे १९१४ च्या संधीचे दिवस! अधिकाऱ्यांचा रोष कमी झाल्याने हे दिवस आले नाहीत. कारण या वर्षाचे सुमारासच 'ब्रह्मगिरी' नावाचा उत्तर हिंदुस्थानी हिंदू वॉर्डर दुरून आम्हास रामराम करताच एका मुसलमानी दौलतखान पठाण नामक तंडेलाने पाहिल्याने त्यास धरून, वॉर्डरपणावरून काढून टाकून, सक्त कामावर धाडिला गेला! लवकरच या दौलतखान तंडेलाची दौलतही आम्ही त्यास चोरून बंदीवानांचे अन्न खाताना पकडल्याने धुळीस मिळाली म्हणा! परंतु या उदाहरणावरून राजबंद्यांशी आणि विशेषतः आमच्याशी कोणाही बंदीवानास संपर्क ठेवता येऊ नये याविषयी अधिकाऱ्यांचा अजूनही केवढा कटाक्ष होता हे स्पष्ट होईल. हा कटाक्ष कमी झाल्याने नव्हे तर बंदीवानांत प्रचारकार्याने राजकारणाचे ज्ञान आणि रुची वाढत गेल्याने आम्हास बातमी पहिल्यापेक्षा आता पुष्कळ मिळू लागली. आणि त्यायोगे बारीसारखे अधिकारी पूर्वी केवळ आम्हास मानसिक यातना देण्यासाठीच ज्या खोट्या कंड्या पिकवीत त्यांचा धंदा बराच बसत चालला. इतका की, त्यांस काही हिंदी पक्षाच्या सरशीच्या बातम्या आम्ही होऊन सांगाव्या! अशा प्रकारच्या गमतींची एक-दोन उदाहरणे दिग्दर्शनार्थ सांगतो.

## जेव्हा गव्हर्नर जनरलवर बॉंब फेकला गेला !

दिल्लीस १९१२ वर्षी मोठा राजसमारंभ होता आणि त्यात आपल्या चतुरंग दळासह हत्तीवरील राजवैभवाच्या अंबारीत बसलेले त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग यांचेवर बॉंब फेकण्यात आल्यामुळे त्या समारंभाचा भयंकर अंत झाला. ही बातमी तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांस - चीफ कमिशनरांस - कळून ते ती इतर अधिकाऱ्यांस अगदी अंतःस्थ (confidential) म्हणून कळवितात तोच आम्हास बंदीशाळेतील कोठडीत येऊन मिळाली. तोंडी बातमी

कळे पण त्यात आणणाऱ्या अजाण माणसांकडून केव्हा काही चुका होत म्हणून सकाळी एक गोरा अधिकारी कामे पाहण्यास नेहमीप्रमाणे येऊन आमच्याशी बोलत उभा राहिला असता आम्ही द्वयर्थी विचारून ती बातमी तोही सांगतो की काय ते पाहण्यासाठी सहज विचारले की ''काय दिल्लीला सर्व समारंभ निर्विघ्न पार पडला ना?'' त्यास तो वेळ ती बातमी मिळाली नसल्याने त्याने नेहमीच्या अधिकारी अतिशयोक्तीने उत्तर दिले, ''अर्थातच! आमच्या साम्राज्याच्या शक्तीचे ते भीषण प्रदर्शन पाहूनच तुमच्या मूठभर क्रांतिकारकांची बोबडी वळली असेल!'' ते वाक्य ऐकून आम्हांला हसू आले, पण ते त्याला लागले. तो परत कार्यालयात जाऊन पाहतो तो बारीने दिल्लीची तार खिशातून काढून त्यास दिली. त्यासरशी त्याने एक शिवी हासडून म्हटले, ''या राजबंद्यांना ही बातमी कळली आहे यात शंका नाही!'' बारी चमकला. गुपचूप शोध सुरू झाला. पाहतो तो राजबंद्यांच्याच नव्हे तर बंदीशाळेतील बंदीवानांच्या तोंडीही ती बातमी! कार्यालयात बारी थैमान करू लागला. तेथे आमच्याशी तो बंदीत आला तेव्हापासून स्नेह असलेला एक सुशिक्षित तरुण बंदी लेखक असे. त्यावर बारीचा संशय गेला. त्यास दोन दिवस सारखा सतावूनही जेव्हा तो बातमी कोणी मला पोचविली हे सांगेना तेव्हा ''तुला वेत मारतो'' म्हणून गर्जू लागला. तोही पाणीदार पोरगा होता. ''आत्ता मारा!'' म्हणून लेखणी ठेवून उठून उभा राहिला. त्यास पर्यवेक्षकाकडे नेण्यात आले. परंतु त्याच्याविरुद्ध काहीच पुरावा नसल्याने आणि सरकारी काम करण्यात त्याने नित्य दाखविलेल्या तत्परतेमुळे आणि ठाकठिकीमुळे तो पर्यवेक्षकाच्या आवडीचा असल्याने ''पुन्हा तुझ्यावर शंका येण्याइतका जरी तुझा सावरकरांशी संबंध आढळला तरी तुला वेत मारू. आज इतकी चेतावणी (ताकीद) देऊन तुला सोडतो!'' असे सांगून त्यास सोडून देण्यात आले.

या गृहस्थाने माझ्याशी असलेला संबंध, या चेतावणीनंतर, सुटेतो एकसारखा वृद्धिगतच ठेवला होता. शेवटी तर त्याला आणि मला एकत्र सहकारी म्हणूनही अधिकाऱ्यांनीच नेमले, इतकेच जाता जाता सांगणे पुरे.

राजबंदीवानांस साहाय्य करणे आपले कर्तव्यच आहे मग शिक्षा झाली तर झाली! असे समजणारे वरील गृहस्थासारखे देशसेवक बंदीवानांत जे निघाले ते सोडूनही इतर बंदीवानसुद्धा आता आम्हास साहाय्य करण्यास फारसे भीतनासे झालेले होते. कारण कधी कधी अधिकारी-रोषास ते बळी पडून त्यांची वॉर्डरकी जाई किंवा बाहेर सक्त कष्ट करण्यास त्यांस धाडण्यात येई तरी बाहेरही हळूहळू देशसेवक अधिकाऱ्यांचा आणि बंद्यांचा जमाव बनत जात चालल्याने राजबंद्यांकरिता किंवा राजकारणाकरिता कोणी 'तुटून' वा शिक्षा होऊन येताच त्यास आरामाचे काम अंतस्थपणे आमची मंडळी देऊन टाकीत. पैशाची पण थोडीबहुत वाण दूर करीत. या साहाय्य मिळण्याच्या आधाराने बंदीवान देशसेवेचे आपले कर्तव्य बऱ्याच निर्भयपणे करीत.

आम्ही दिल्लीच्या बॉंबची बातमी आम्हास मिळाली आहे हे जाणूनबुजून बारीस जे दर्शविले ते अशा हेतूसाठी होते की, असे दोन प्रसंग येऊन एकदा त्यास त्याच्या आम्हास बातमी मिळू न देण्याचा प्रयत्नांचे वैय्यर्थ कळले की तो बंदीवानांस निष्कारण बारीक सारीक गोष्टींत याविषयी छळण्याचे सोडील, परिणामही तसाच झाला. आम्हास काही केले तरी बहुधा बातम्या मिळतात असे पाहून तो थकून गेला. केव्हा केव्हा स्पष्टपणे आम्हाजवळ म्हणे आणि सुपरिन्टेंडंटजवळ सांगे की, ''राजबंदीवानांना आपसात बोलणे बंद करणे आणि त्यांस बाहेरच्या बातम्या मिळू न देणे हे मला काय पण Even if the devil be sent here as a Jailor instead of me त्या सैतानाला देखील ते

शक्य होणार नाही!'' हे वाक्य पुढे पुढे तो अनेक वार म्हणे आणि अगदी ढिला पडून समोर येईल तेवढ्याच पुरती बातमी सांगण्या-ऐकण्याच्या अपराधाची धरपकड करी, इतकेच नव्हे तर आम्हास बातम्या कळतात हे आम्ही वारंवार त्यास भासवीत गेल्याने त्याला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना एका अगदी उलट उपायाचा अवलंब करावा लागला. आम्हास बातमी मिळे ती केव्हा केव्हा बऱ्याच फुगीर स्वरूपात मिळे. कारण आणणारे अज्ञानी असत. उदाहरणार्थ, दिल्लीच्या बॉंबमध्ये ''चार बडे बडे लॉर्ड मारे गये'' असे बाजारात लोक बोलू लागले! अशा वेळी बातमी थांबविण्याचा वा छपवून ठेवण्याचा त्रास निष्कारण आणि निष्फळ सोशीत बसण्यास कंटाळून अधिकारी साहजिकच शुद्धीवर येत आणि म्हणत, ''बातमी छपवून ठेवून होणाऱ्या या अज्ञ अतिशयोक्तीच्या हानीपेक्षा खरी बातमी आपण होऊन सांगण्याने होणारी हानीच अधिक श्रेयस्कर आहे'', आणि वस्तुतः हे त्यास प्रथमच समजावयास पाहिजे होते. तेव्हा मग ते आम्हास वृत्तपत्रे देखील देऊ लागले; आणि वृत्तपत्रे प्रत्यक्ष बारीकडून जेव्हा मधून मधून मिळू लागली तेव्हा विकृत आणि अपक्व बातम्या कुठून तरी आणण्याचा राजबंदीवानांचा अप्रकट खटाटोपही साहजिकच कमी होऊ लागला.

दिल्लीच्या बॉंबची बातमी आम्ही मिळविली त्याविषयी आमचा सूड घेण्यासाठी बारीने एक दिवस तुरुंगात बातमी उठवून दिली की सावरकरांचा धाकटा भाऊ याच बॉंब प्रकरणात धरला गेला!

हे काही मोठे असंभवनीय नव्हतेच; कारण त्या प्रकरणात त्यास खरोखरच बराच त्रास सोसावा लागला. पण तेव्हा हे काहीच ठाऊक नसल्याने हे खरे की खोटे हे कळण्यासाठी आम्ही साहजिकच उत्सुक झालो. दुपारी पर्यवेक्षकही सहज आम्हास म्हणाला, ''काय, तुमचा धाकटा भाऊ तेवढा बाहेर आहे ना?'' आम्ही उत्तर देण्यापूर्वीच बारी हसून म्हणाला, ''तोही येईलच आता इथे!'' असा निर्दय निर्लज्ज विनोद करण्याची त्यास खोडच असे. किंचित त्रासाने आम्ही म्हटले, ''तोच काय पण हिंदुस्थानातील कोणीही मनुष्य इथे येऊ शकेल! हिंदुस्थानच एक प्रचंड बंदीशाला आहे. आणि आयर्लंड पण!'' बारी आयरिश असल्याने तोही किंचित ओशाळला तेव्हा पर्यवेक्षक म्हणाला, ''छे, इथे येईल की नाही ते काही मला ठाउक नाही. पण तो जरा भित्रा आहे असे दिसते. '' मी बातमी काढण्याकरिता विचारले, ''ते कशावरून?'' तेव्हा सुपरिन्टेंडंट म्हणाला, ''त्याने दिल्लीची बातमी ऐकताच आपण होऊन घाबऱ्या घाबऱ्या पोलिसांचे मुख्यास तार दिली की, ''मी कलकत्त्यास हा इथेच आहे. पुढेमागे मजवर आळ घ्याल. म्हणून सांगून ठेवतो. '' मी म्हणालो, ''तर मग सगळ्या कलकत्त्यात तोच एक चाणाक्ष मनुष्य आहे! त्याने बॉंब फेकला नाही हे उघडच आहे. पण जरी त्याने तो फेकला असता तरी देखील त्याने अशीच तार त्वरित पोलिसास करून चकवावयास पाहिजे होते. तो भित्रा नव्हे- जो दुष्ट शत्रूवर आघात करून पुन्हा निसटून जाण्याचेही साधतो तोच खरा शूर!''

आमचे हे मानसिक त्रासाने बेभान झालेले उत्तर ऐकून पर्यवेक्षकही एकदम चमकला आणि अधिक काही न बोलता निघून गेला.

त्या दोन-तीन दिवस भाऊ खरोखरच संकटात पडला असेल की काय या चितेने आम्ही अस्वस्थ होतो. पुनः पुन्हा-

**''कीं घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेनें**

**लब्धप्रकाश इतिहास - निसर्ग-मानें।**

**जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचे**

**'बुध्याचि' वाण धरिलें करिं हें सतीचें।।**

हा श्लोक मनास म्हणून दाखवून आता जे होईल ते होईल! म्हणून आश्वासित स्वस्थ करीत होतो. पुढे खरी बातमी कळून ती चिंता अर्थातच मावळली.

अशा निष्कारण मानसिक यातना देण्याच्या बारीच्या प्रयत्नाचे आणखी एक उदाहरण आता आठवले आहे. एक दिवस तो आला आणि म्हणाला, लाला हरदयाळ कोण आहे?

मी अर्थातच सांगितले की, गृहमंत्री मागे आले होते त्यांनी अमेरिकेत जे असल्याची बातमी मला तुमच्यास-मोर सांगितली, ते क्रांतिकारक पक्षाचे एक पुढारी लाला हरदयाळ तुम्हास चांगले माहीत आहेत. काही विशेष असेल त्याविषयी तर बोला. बारीने अगदी गुपचूप म्हणून बातमी कळविली की, लाला हरदयाळजींना हत्येचे आरोपावरून धरून मुंबईस आणले आहे! आमच्या मनात चर्र झाले. आमच्या सहकाऱ्यांतील प्रमुख सहकारी आणि त्या काळच्या क्रांतिकारकांचा पुढारी पकडला जाऊन त्याच्या आयुष्याचे आता आमच्याचसारखे धिडवडे निघावे ना! दुर्दैव या देशाचे! आम्हास आमच्या परदेशातून असेच धरून आणण्याच्या दिवसाची आठवण झाली. ही बातमी कितपत खरी ते विचारण्यासाठी बाहेर वॉर्डर गुप्तपणे धाडले. त्यास ते नावच ध्यानाच राहीना. पाठ करून घेतले. मनात वैताग आला की, काय ही या आपल्या देशाची दुर्दशा! जे लोक शिर हातावर घेऊन त्याच्या स्वातंत्र्यार्थ देशो-देशी प्राण पणास लावणारी झुंज घेत आहेत त्यांचे नाव देखील या कृतघ्न देशास माहीत नसावे ना! या विचारांनी आमचे डोके तापून गेले. सोबतच्या राजबंदीवानांनी पाण्याची धार धरून थोडे शांत केले. त्यातच पर्यवेक्षक प्रत्य-हीच्या पाहणीस येऊन मला विचारता झाला, ''काय, लाला हरदयाळ तुमचा मित्र होता हे खरे काय?'' मी स्पष्टपणे सांगितले ''होय. त्यांच्या मैत्रीचा मान मला मिळालेला होता. '' ''त्यांच्यावर हत्येचा अपराधाचा आरोप ठेवून त्यांस पकडण्यात आले आहे. दिल्लीच्या बॉंबमध्ये त्यांचे अंग होते. '' मी म्हटले, ''असेल, असले तरी त्यामुळे त्यांच्याविषयींचा माझा स्नेह वा सन्मान कमी होणार नाही. '' माझ्या या उत्तराने आणि मुद्रेवरून पर्यवेक्षक सह-जच टरकला की आज याची वृत्ती नेहमीप्रमाणे हसती आणि विनोदप्रवण नसून क्षुब्ध आहे. तो विषय पालटून गेला. राजबंदी मी असली धिटाईची उत्तरे दिल्याविषयी चिंता करू लागले. मी म्हटले, मला ते सगळे कळते; पण हरदयाळना धरले जावे आणि त्याच दिवशी आपण त्यांचा उघड गौरव करण्याचे तर बाजूसच राहो, पण नुसता त्यांचा स्नेहसंबंधही स्वीकारण्यास अनमान करावे हा भ्याडपणा माझ्याने करवेच ना. होता. हरदयाळ माझा मित्र होता. मला आणखी काय शिक्षा करतील?. . . हे आपण आता शिकले पाहिजे. हरदयाळचे उतराई होण्यास हाच मार्ग!

हळूहळू मन शांत होऊन खरी बातमी काढण्याच्या मार्गास लागलो. दोन-एक दिवसांत कळले की, ते अमेरिकेत धरले गेले. पण प्रतिभूत्वावर (जामीनकीवर) मोकळे केले गेले आहेत. बारीस येता जाता, आम्ही राजबंदी जाणूनच

विचारू लागलो की, ''हरदयाळ मुंबईस आहेत का दिल्लीस आणले गेले?'' त्यास वाटे हे खरेच अज्ञानात आहेत. म्हणून तो सांगे ''दिल्लीस!'' एक दिवस तर स्वारी इतकी वाहवली की ''हरदयाळास शिक्षा झाली. पोर्टब्लेअरला लवकरच चलान होईल!'' आम्ही हसू दाबून म्हटले ''हे पाहा ते आले तर ही माझ्याजवळची कोठडी त्यांना द्या बरं का. बोलून तरी घेऊ एकदा. '' तरी देखील मर्म न समजता तो बंदीपाल नेहमीप्रमाणे गंभीर मुद्रा करून म्हणाला, ''त्याचा विचार करीन!''. या वाक्यासरशी पंगतीत बसलेले दहा-पाच राजबंदी हसू न आवरून खो खो करून हसू लागले. तेव्हा त्या अडाणी शहाण्यास कळून चुकले की, यांस माझ्या गप्पांतील फोलपणा पूर्वीच माहीत असावा आणि हेच मला आजवर 'बनवीत' असले पाहिजेत!

काही दिवसांनी आम्हांस नक्की बातमी आली की हरदयाळ हे अमेरिकन सरकारचे हातावर तुरी देऊन निसटून गेले. इतकेच नव्हे तर अमेरिकन सरकारने आपल्या हातावर बळे तुरी ठेवून घेतली अशीही बातमी आहे! कसेही असले तरी ही हरदयाळच्या निर्विघ्न सुटकेची वार्ता ऐकताच आमच्या जिवावरची एक धोंड उतरल्यासारखी झाली!

हिंदुस्थानातील प्रख्यात पुढाऱ्यांविषयी अशाच प्रकारचे तुच्छ विनोदाने उद्‌गार अधिकाऱ्यांनी काढल्याचे आणखी एक उदाहरण कालक्रम सुटत असताही अनुसंधानास्तव इथेच सांगू. आमची प्रकृती पुढे पुढे जेव्हा फारच बिघडून आम्ही रुग्णशय्येस अगदी खिळून पडलो, तेव्हा एकदा अंदमानचे चीफ कमिशनर आम्हास पाहावयास आले होते. त्यांचे मजशी नेहमीच सभ्यपणाचे वर्तन असे. बोलता बोलता त्यांनी सांगितले की, ''मी युरोपमधून हिंदुस्थानला थोड्या दिवसांपूर्वी येत असता मला सुरेंद्रनाथ बॅनर्जी आगबोटीवर भेटले होते. त्यांनी माझी ओळख होताच ''सावरकरांची प्रकृती कशी काय'' म्हणून विचारपूस केली. आणि असेही विचारले की, 'मी जर त्यांच्या समाचारास आणि राजबंद्यांच्या एकंदर स्थितीस प्रत्यक्ष पाहाण्यास अंदमानास आलो तर परवानगी मिळेल काय?'' हे ऐकून मी चीफ कमिशनरांस म्हटले, ''मग आपण काय म्हणालात?'' ते उत्तरले, ''मी म्हटले, या परंतु नक्की काय ते मागाहून कळवीन. पण सावरकर, तुमचे सुरेंद्रनाथ आलेच तर त्यांना उतरायला ही तुम्ही बंद आहा त्याच्या शेजारच्याच बंदी-कोठडीहून अधिक सोयीस्कर जागा अंदमानात आमच्यापाशी नाही. '' मी तसेच हसून म्हणालो, ''का? चीफ कमिशनरचा बंगला आहे! दोन दिवस चीफ कमिशनरनी या बंदीकोठडीत राहावे आणि त्या पाहुण्याच्या योग्यतेइतकी अनुरूप नसली तरी जी आहे ती त्या बंगल्याची जागा त्यांच्या स्वाधीन करावी!!''

येथेच हेही सांगून टाकणे आमचे कर्तव्य आहे की, राजबंद्यांच्या विषयी आणि आमच्याविषयी बंगालच्या त्या वृद्ध झुंजाराने - त्या सुरेंद्रनाथाने - जी कळकळ प्रथमपासून शेवटपर्यंत दाखविली आणि 'बंगाली' पासून तो 'विधि-मंडळा' (कायदे कौन्सिला) पर्यंत जे साहय दिले तितके हिंदुस्थानातील कोणत्याही अन्य पुढाऱ्याने क्वचितच दिले असेल. हे आमचे आभारप्रदर्शन ऐकण्यास आज तो वृद्ध देशभक्त उरला नाही याचा आम्हास राहून राहून खेद वाटतो!

पूर्वार्धात आम्ही साधारणतः १९१४ चे मध्यापर्यंत आमची कारावासाची कथा आणून पोचविली होती. संपाचे परिणामाने राजबंद्यांच्या काही तरी मागण्या मान्य होऊन आम्ही काम सुरू केले. ही बातमी कळताच चीफ कमि-शनरलाही एक कटकट मिटली असे वाटून त्यांनी पूर्वी कोणासही न धाडले असे एक पत्र माझ्यासाठी धाडून माझे वैयक्तिक अभिनंदन केले. आणि आम्ही कारागारात त्याच त्या कोठड्यात चौदा वर्षे आता कशी काढावी या चिंतेत

चूर होऊन कालक्रमणा करू लागलो. कारागारात पाय ठेवला तेव्हा अधिकात अधिक पाच वर्षे या कोठडीत काढावी लागतील म्हणून आम्ही कंबर कसली होती; पण आता चौदा वर्षांचा हा लांबचा लांब काळाकुट्ट बोगदा आमच्या जीवनरथास न टाळता येण्यासारखा 'आ' पसरून आडवा आला!

द्वीपांतरवासाची शिक्षा होताच अंदमानच्या नियमांचे पुस्तक वाचून आम्ही आमच्या तरुण पत्नीस आश्वासनार्थ एक कविताबद्ध पत्र लिहून कळविले होते की, फार फार तर पाच वर्षे धीर धरावा. त्यानंतर अंदमानात का होईना पण पुन्हा प्रेमाच्या झोपडीत एकत्र भेटू आणि आपल्या स्वतःच्या हाताने लावलेल्या आणि आपल्या झोपडीच्या पुढच्या मांडवीवर फुलांनी डबडबत पसरलेल्या मोगरामालती, जाईजुई यांच्या लतावेलीशीच आपले इष्ट संबंध जुळवून नांदू लागू, जनसहवास नाही तर नाही.

पण आता तीही आशा निष्फळ झाली. आज कठिणात कठिण म्हणून जे संकट स्वीकारावे तेच उद्या येणाऱ्या संकटापुढे अगदी क्षुल्लक वाटू लागावे, असा एकसारखा कष्टांचा भडिमार चालला. जे येई ते मागच्यास बरे म्हणवी. अशा मानसिक उत्तापात त्या कल्पनासृष्टीतल्या जाईजुईदेखील सुकून गेल्या; कल्पनासृष्टीतला ओलावा देखील जीवास मिळेनासा झाला!

त्यातही आमच्या कष्टांत भागीदार झालेले आणि संकटातही आम्हावर अत्यंत भक्तिपूर्वक प्रेम करणारे आमचे राजबंदीवानांतील सहतपी आम्हीच केलेल्या मागणीप्रमाणे हिंदुस्थानात धाडले गेल्याने त्यांस तिकडच्या बंदीशाळेच्या नियमानुरूप शिक्षेची आंशिक सूट मिळेल म्हणून आनंद होत असताही, त्या सर्वांचा एकाएकी वियोग होऊन आम्ही पाच-सहा जणच मागे उरल्याने मन फार उदास झाले. एकांतवास केव्हा केव्हा अगदी असह्य होऊ पाही. कोणीतरी प्रेमाची हाक मारावी, कोणाला तरी स्नेहाने ये बैस म्हणावे अशी उत्कट इच्छा होई; पण ममतेचा मनुष्य त्या निष्ठुर कारागृहात कोण मिळणार! मनाने मनासच खात राहावे. रिकाम्या लांबचलांब रात्री सरता सरता नाहीशा व्हाव्या. नवीन स्नेह, नवीन घटना, नवीन आशांचे खाद्य न मिळाल्याने मनाने स्मृतीच्या कपाटातील जुन्याच आठवणी, जुन्याच घटना, जुनीच स्नेहस्मरणे काढकाढून त्यांच्याशी खेळत बसावे. पण चित्रातील भाताने भूक कशी थांबणार? केव्हा केव्हा हे भुकेने व्याकूळ झालेले विकार आणि विचार एखाद्या दुष्काळात ग्रस्त होऊन दंगा करून उठलेल्या चोरांच्या भयंकर टोळीसारखे बंड करून उठत! काही केल्याने ते शमतनासे होत. भूक! भूक! म्हणून चित्तास सळो का पळो करून सोडीत. असे महिन्यांमागून महिने चालले. वियोगाने उदास झालेले, एकांतास सतावलेले, स्नेहासाठी, प्रेमासाठी, कासावीस झालेले आणि तरीही कर्तव्य केले पाहिजे म्हणून जाणीव जिवंत असलेले त्या दिवसांतील ते आमचे जीवन किती दुःसह झालेले होते हे आमच्या बरोबर तेच कष्ट सोसलेल्या त्या आमच्या एका बंधुवर्गासच माहीत असू शकेल! कर्तव्य करीत राहिले तरी सुटण्याची आशा नव्हती. तिसरा एक मार्ग होता तो म्हणजे, बंदीशाळेबाहेर सुटका झाल्यास कर्तव्य करीत करीतही सुटण्याची संधी साधण्याचा संभव. त्याचसाठी शक्य तो नियमभंगाच्या पेचात न गवसता आज नाही उद्या बाहेर जाणे शक्य होईल म्हणून वाट पाहिली. परंतु चौदा वर्षे कारागृहात राहणेच भाग आहे ही निश्चित आज्ञा अंती झाल्यामुळे तो बाहेर जाऊन सुटका करून घेण्याचा संभवही बहुतेक मावळला! अशा निराश परिस्थितीतले ते दुर्धर दिवस कसे कंठले गेले ते आमचे आम्हासच समजत नाही.

## इंग्रजांचे जावयाशी युद्ध!

असे काही महिने लोटले. तो एक दिवस आम्हास बाहेरून बातमी आली की, इंग्रजांचे कोण्या एका राजाशी मोठे युद्ध जुंपले आहे!

प्रथम या बाजार गप्पेवर फारसा विश्वास बसेना; कारण बंदीवानांस आपल्या निराश स्थितीत असल्या काही तरी काल्पनिक आशेचा आधार घेण्याची सहजच सवय जडलेली असे. दर चार-पाच महिन्यांत एखाद्या 'ज्युबिली'ची उत्सवाची आणि तदर्थक होणाऱ्या बंदीमुक्ततेची बातमी कोणी तरी उठवी. बुडत्यांना त्या काल्पनिक काडीचाही आधार घ्यावासा वाटे. काही दिवस तरी त्या आशेवर कंठिले जात. पुढे ती खोटी ठरे. तो दुसरी एखादी गप्पेची काडी कल्पनेवर तरंगत त्यांचेपुढे येई. त्यातही युद्ध सुरू झाले पण ते कोणाशी हे नक्की कोणास सांगता येईना. कारण अज्ञान! हिंदी बंदीवानांस उभ्या जगतात दोनच राज्यांची जाणीव असे. इंग्रज आणि अमीर! मुसलमानांस फार तर तुर्कीच्या अस्तित्वाची जाणीव असे. त्यायोगे युद्ध सुरू झाले ते कोणी म्हणे अमीराशी, कोणी म्हणे तुर्कीशी! दोघांपैकी कोणाशीही असले तरी इंग्रजांचा केसही वाकडा होणारा नव्हता. म्हणून दोन-तीन दिवस आम्ही तिकडे फारसे लक्ष दिले नाही. पण पुढे बातमी आली की, इंग्रजांच्या जावयाशी युद्ध जुंपले आहे! हा जावई कोण? तोंडी जर्मनीचे नाव आमचे बाहेरचे बातमीदार धाडीत, पण बातमी आत आणणारे अज्ञ बंदीवान ते नाव विसरून इंग्रजांची मुलगी कोणास दिली आहे ना? त्यांच्याशी युद्ध सुरू झाले म्हणून म्हणत! त्यांची राजांच्या मुली देण्याघेण्याची जुनी कल्पना त्यांना समजे. पण इंग्रजांची मुलगी म्हणजे काय हे आम्हांस कळेना. हो ना करता एक चिठ्ठी लिहून आणविली. त्यावरून स्पष्ट बोध झाला की, जर्मनीचे इंग्रजांशी युद्ध जुंपण्याचा संभव आहे. फ्रान्सशी तर जुंपलेच!

जर्मनीशी इंग्रजांचे युद्ध? अनेक वर्षे प्रतीक्षित केली जाणारी ही सुवर्णसंधी अंती आली तर!- पण ती अशा अगतिक अवस्थेत. . . . . ! हा केवळ इतिहास!

मागे अनेक वेळा सांगितले असतानाही भ्रामक अनुमाने टाळण्यासाठी येथे पुन्हा एकदा हे स्पष्टपणे सांगतो की, आम्ही या सर्व कथनात जे विचार किवा भावना वर्णित आलो आहोत किवा वर्णिणार आहोत ते विचार आणि त्या भावना ह्या त्या त्या वेळेस उत्पन्न झालेल्या होत्या. त्या त्या वेळी उत्पन्न झाल्या म्हणून आजही त्या आमच्या मनास पटतच असतील असे अनुमान कोणीही करू नये. हा केवळ इतिहास आहे. त्याचे समर्थन नव्हे.

जर्मनीचे लक्ष हिंदुस्थानी राजकारणाकडे वेधण्यास प्रथमतः अभिनव भारताचे प्रयत्नच प्रामुख्याने कारणीभूत झालेले होते. आम्ही युरोपात गेलो तेव्हा जर्मन, फ्रेंच, आयरिश, तुर्क (तरुण तुर्क), मिश्र इत्यादी परराष्ट्रीयांशी संवाद करताना आम्हांस असे स्पष्टपणे आढळून येई की, युरोपमध्ये हिंदुस्थानी म्हणजे कोणी जिवंत लोक आहेत अशी कल्पनाच नसे. राष्ट्र या दृष्टीने हिंदुस्थानचे अस्तित्व कोणीच मानीत नसत. ती एक मेलेली संस्कृती असून आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या डावात त्या पत्त्याचा दुय्यम म्हणून का होईना पण उपयोग करणे अशक्य आहे असे त्यांस वाटे. परंतु अभिनव भारताच्या इंग्लंडमधील उठाठेवींना इंग्लंडमधील पत्रांतून आणि जनतेतून जशी हिंदुस्थानविषयक खळबळ सुरू झाली तसे तसे युरोपच्या धूर्त पुढाऱ्यांचे लक्ष हिंदुस्थानकडे आकर्षू लागले. विशेषतः

फ्रान्स आणि जर्मनीत हिंदुस्थानच्या आकांक्षांची घोषणा करण्यासाठी अभिनव भारताच्या प्रमुख व्यक्तींची खटपट चालू असे. मॅडम कामा यांच्या जर्मनीतल्या एका व्याख्यानाचा उल्लेख आमच्या खटल्यात केलेलाच आहे. त्यानंतर तत्रस्थ पत्रात क्रांतिकारकांचे लेखही केव्हा केव्हा प्रसिद्ध होत. पुढे मदनलाल डिंगराने केलेल्या सर कर्झन वायलीच्या भयंकर वधामुळे, त्याच्या निर्भीक फाशी जाण्यामुळे व अभिनव भारताच्या इतर पुढाऱ्यांवर आणि त्यांच्या चळवळीवर जर्मनीत आणि फ्रान्सात असलेल्या इंग्लिशांच्या गुप्त पोलिसांच्या ससेमिऱ्यामुळे युरोपात हिंदी राष्ट्राच्या राजकारणीय शक्तीवरचा विश्वास वाढत चालला. डिंगराने आपल्या चौकशीच्या वेळेस केलेल्या जाज्वल्य कथनात Statement मध्ये - जर्मनांचा उल्लेख केला होता. त्यानंतर आम्ही प्रसिद्ध केलेल्या सत्तावनच्या क्रांतियुद्धाच्या इतिहासाचे छपाई काम कुठे चालले आहे ते शोधण्यासाठी जर्मनीमध्ये इंग्रजी पोलिसांचे निरीक्षण सुरू झाले. त्या वेळी त्यांच्यातील काही जर्मन अधिकाऱ्यांचे आम्हास निरोपही आले होते. अशाच एका प्रसंगी ''आपण लवकरच धरले जाल, तर निरोप पावताच इंग्लंड सोडा'' म्हणून एका जर्मनीत राहणाऱ्या हिंदी क्रांतिकारकाचे हस्ते आम्हास जर्मन पोलिसांतील एका हस्तकाने तातडीचा संदेश धाडला होता. ''तरवार'' नावाचे अभिनव भारताचे मुखपत्र जेव्हा सुरू झाले, तेव्हा त्यातील पहिल्याच अंकात जर्मनीशी इंग्लंडचे युद्ध पाच-सहा वर्षांत जुंपणार असून त्या वेळी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सुटण्याची सोन्याची संधी येणार आहे, असे 'कील' कालव्याच्या भानगडीचे सविस्तर विवरण करून दिग्दर्शन केलेले होते. पुढे मार्सेलिसमधील आमच्या सुटकेसाठी आम्ही केलेल्या धाडसामुळे युरोपभर हिंदी क्रांतिकारकांच्या प्रयत्नांची आणि आकांक्षांची आणि तत्प्रीत्यर्थ ते करीत असलेल्या साहसी प्राणत्यागांची चर्चा सुरू झाली. हिंदुस्थानात घडणाऱ्या उलाढालींपेक्षा त्यांच्या दाराशीच घडलेल्या या अनेक भयंकर आणि उत्क्षोभक कृत्यांनी युरोपमध्ये हिंदुस्थान हे राष्ट्र अजून अगदी मेलेले नसून इंग्रजांना चांगलेच जाचक होईल असे ते आपल्या हातचे एक भावी साधन आहे अशी भावना उत्पन्न झाली. जर्मनीच्या इंग्लंडशी असलेल्या तीव्र चुरशीमुळे जर्मनीत तर ती भावना अधिकच बळावून आम्ही धरले गेल्यानंतर हिंदी क्रांतिकारकांशी गुप्त संबंध पद्धतशीरपणे जोडण्याचा जर्मनीतील पुढाऱ्यांचा प्रयत्न सुरू झाला. अभिनव भारतातील एक दोन कर्ते आणि कुशाग्र बुद्धीचे पुढारी त्या प्रयत्नांचा लाभ घेण्यासाठी जर्मनीतच जाऊन राहिले; आणि अमेरिकेत गेलेल्या पुढाऱ्यांनी प्रस्थापित केलेल्या 'गदर' पत्रात जर्मन महायुद्ध शीघ्रच सुरू होण्याचा संभव असून त्या संधीस स्वदेशाच्या मुक्ततेचा निर्वाणीचा प्रयत्न करण्यास उद्युक्त व्हा म्हणून उत्क्षोभक लेख प्रकटपणेच येऊ लागले. या बातम्या आम्हास अंदमानातही थोड्या थोड्या कळल्या होत्या.

ही पूर्वपीठिका संक्षिप्त रूपाने येथे देण्याचा मुख्य हेतू हा आहे की, त्यायोगे जर्मन महायुद्ध सुरू होण्याची बातमी आम्हास मिळताच आमच्या अभिनव भारतीय कार्यक्रमाप्रमाणे ती बातमी अनपेक्षित नसताही ती चिराकांक्षित घटना घडताच तिचा पुरापुरा लाभ आपणास घेता येऊ नये अशा अगतिक अवस्थेत आम्ही पडावे याची आम्हास किती चुटपुट लागली असेल याची वाचकांस कल्पना करता यावी. आमच्या तत्कालीन भावना आणि योजना काय असतील हे आता सविस्तर सांगण्याची आवश्यकता नाही.

अगतिक अवस्थेत पडलो असता स्वराष्ट्राच्या संभवनीय मुक्ततेची ही शतकातून एकदोनदाच साधणारी सुवर्णसंधी यावी याची किती जरी चुटपुट लागली; तरी शीघ्रच त्या अगतिक अवस्थेतही त्या सुवर्णसंधीचे पर्व आपल्या

मातृभूमीच्या हातून निसटून जाऊ नये म्हणून जी काही त्या परिस्थितीत पेचापेची करणे शक्य होते ती करण्याचा आम्ही निश्चय केला.

इतक्यात स्वतः पर्यवेक्षकानेच पाहणीच्या दिवशी आम्हास सांगितले की, ''युरोपमध्ये एक मोठे बहुराष्ट्रीय युद्ध सुरू झालेले असून तुर्की जर्मनीच्या पक्षास मिळाला आहे! त्या युद्धासाठी पोर्टब्लेअरमध्ये वर्गणी उभारण्याचे ठरले असून एक पोर्टब्लेअरच्याच लेखकांचे मासिकपत्र काढण्याचे घाटत आहे, तरी त्यात आपणही एक कविता वा लेख द्यावा. ''

पर्यवेक्षकाच्या या विनंतीप्रमाणे मी एक बरीच लांब कविता इंग्रजीत लिहून दिली होती. माझ्या इंग्रजी कविता तेथील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या थोड्याबहुत परिचयाच्या असतच. परंतु त्या कवितेतील स्वतंत्र विचार त्यांच्या कितपत चित्तास येतील याची मला शंकाच होती. शेवटी त्या मासिकाचाच जन्माचे आधीच अंत झाल्याने ती गोष्ट तशीच राहिली.

तथापि पर्यवेक्षकाने तुर्की राष्ट्र जर्मनीस मिळाल्याचे जे वर्तमान सांगितले त्यामुळे माझ्या मनात मी ठरवून ठेवलेल्या तत्रस्थ कार्यक्रमाचे रूप बरेच पालटले. तुर्की राष्ट्र लढाईत इंग्लंडविरुद्ध गेल्याचे ऐकताच मुसलमानांच्या पॅनइस्लामी गुप्त महत्वाकांक्षांशी चिरपरिचित असलेल्या माझ्या मनासमोर हिंदुस्थानावर येऊ पाहणाऱ्या एका नवीन संकटाची भीती दत्त म्हणून उभी राहिली. तुर्कीच्या युद्धप्रवेशाने जर्मनीचा हात हिंदुस्थानास पोचून इंग्रजी सत्तेस हिंदुस्थानातच महत्वाचा पेच पाडण्याचा संभव शक्य होता. ही माझ्या तत्कालीन कार्यक्रमास इष्टापत्तीच होती; कारण त्या पेचामुळे हिंदुस्थानच्या न्याय्य मागण्या एकतर आपण होऊन पुरविणे इंग्लंडास भाग पडते; नाहीतर त्या अँग्लो-जर्मन हत्तींच्या परस्पर झुंजीत उभयतांचीही मस्तके शीर्ण आणि चूर्ण होऊन हिंदुस्थानास आपल्या त्या आकांक्षा स्वतःच पुरवून घेण्याची संधी सापडती. परंतु या झटापटीत रशियातील मुसलमानी टोळधाडीस हिंदुस्थानावर स्वारी करण्यास चिथावून हिंदुस्थानात अस्तंगत झालेली मुसलमानी सत्ता पुनरपि स्थापन करू पाहणाऱ्या हिंदुस्थानी मुसलमानांची राक्षसी खटपटही क्वचित फलद्रूप होण्यासारखी होती.

या सर्व पेचापेचीचा पूर्ण विचार करून माझ्या अगतिक स्थितीत मला त्या संधीस काय जे करता येण्यासारखे होते त्याची रूपरेषा मी मनात योजून तिचे सूत उवाच म्हणून हिंदुस्थान सरकारास एक आवेदन धाडण्याचे ठरविले. माझ्या योजनेची रूपरेषा जरी येथे देता येत नाही तरी त्या आवेदनपत्राची रूपरेषा येथे सांगणे शक्य आहे.

## निरुपाय म्हणून सशस्त्र प्रतिकार

पर्यवेक्षकाने हिंदुस्थान सरकारकडे आवेदनपत्र धाडण्याची परवानगी देताच मी हिंदुस्थान सरकारास लिहिले की, या महायुद्धात हिंदुस्थानची राजकीय स्थिती सरकारास चिंता उत्पन्न करीत असणे साहजिकच असल्याने आणि विशेषतः हिंदुस्थानी क्रांतिकारक या युद्धात कोणते धोरण स्वीकारतात हे समजण्यासाठी त्यास उत्सुकता लागणे संभवनीय असल्याने, क्रांतिकारक चळवळीशी संनिकट परिचय असलेल्या माझ्यासारख्या बंदीवानांचे विचार त्यास कळविणे मला आपले कर्तव्य वाटत आहे. हिंदुस्थानास स्वतंत्र राष्ट्राच्या पदवीस पोचविणे हे आमचे ध्येय होते आणि आहेही. तथापि त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी रक्तपाताचा सशस्त्र प्रतिकारी मार्गच काय तो अवलं-

बन करावयाचा अशी काही आम्ही शपथ घेतलेली नाही इतकेच नव्हे तर इतर कोणताही उपाय जर सफल होण्याचा संभव असता तर आम्ही सशस्त्र प्रतिकाराचा अवलंब केलाच नसता.

जी गोष्ट साधनाची तीच साध्याची. राजकारणाच्या व्यवहाराचे आणि शासनशास्त्राचे उच्चतम ध्येय सर्व मनुष्यजातीस समसमान अधिकार असणाऱ्या एका प्रातिनिधीक शासन संस्थेचे नागरिक बनविणे हे होय. एक देव, एक भाषा, एक जाती, एक जीवन - अशा एका न्यायप्रवण आणि प्रातिनिधिक शांती साम्राज्याची आध्रुवध्रुव करून आणि त्या मानव साम्राज्यात हे कुळवंश जाति-देश भाषाभिन्नत्वाचे क्षुद्र अभिमान आणि अहंकार विलीन करून उभ्या मनुज जातीचे राजकीय सात्त्विक एकीकरण हेच ज्यांचे अंतिम ध्येय आहे त्या आम्हांस या ध्येयाचे सिद्धीसाठी तदनुकूल असलेल्या सर्व संस्था त्या ध्येयाकडे जाणाऱ्या मार्गावरील टप्पे म्हणून ग्राह्यच वाटतात. अनेक उपजातीत आणि राष्ट्रांस एका शासनसूत्रात गोवणारे एखादे साम्राज्य त्या ध्येयास व्यवहृत करण्यास उपयुक्तच होणारे असल्याने, ज्यांच्या छत्राखाली ती विभिन्न राष्ट्रे आपआपल्या प्रगतीस पोषक असे स्वातंत्र्य उपभोगू शकतात अशा साम्राज्याचा विरोध आम्ही मुळीच करू इच्छित नाही.

एतदर्थच आज ज्यास ब्रिटिश साम्राज्य म्हटले जात आहे त्यात अंतर्भूत असणाऱ्या हिंदुस्थानातील देशास जर स्वप्रकृतीप्रमाणे आणि तत्परिस्थितीप्रमाणे स्वातंत्र्य उपभोगू देण्यात येईल तर आम्ही त्या साम्राज्याशी एकनिष्ठ राहणे हेच आमचे कर्तव्य समजू. अशा रीतीने आयर्लंडपासून हिंदुस्थानापर्यंत सर्व देशांत एकसूत्रीपणात गोवण्याचे कार्य करणारे ते साम्राज्य ‘ब्रिटिश साम्राज्य’ हे नाव देखील त्याज्यच मानील. इतर नाव प्राप्त होईतो त्यास ‘आर्य साम्राज्य’ असे पाहिजे तर म्हणावे.

या साम्राज्याच्या प्रस्तुत चालकांच्या अंगात तर तसे सात्त्विक साहस करणारे धैर्य असेल तर तदंतर्गत असलेल्या या हिंदुस्थानच्या विस्तृत आणि प्रमुख राष्ट्रास तरी त्यांनी त्वरित ते स्वातंत्र्य उपभोगिता येईल असे अधिकार त्वरित देऊन टाकले पाहिजेत. युद्धाचे धांदलीत इतर काही करता न आले तरी औपनिवेशिक स्वायत्तता Colonial-self Government जर हिंदुस्थानास देण्यात येईल आणि या अधिकारदानाचे सूत उवाच म्हणून वरिष्ठ विधिमंडळात हिंदी प्रतिनिधीचे निरपवाद बहुमत स्थापित करण्यात येईल, तर हिंदुस्थान देशाच्या कल्याणा साठीच आम्ही आणि आमच्या मताचे क्रांतिकारक आपला पूर्वीचा सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग स्थगित करून या युद्धात इंग्लंडचा पक्ष मनःपूर्वक एकनिष्ठेने अवलंबितील.

आमचे हे विधान मनःपूर्वक आहे की नाही हे सिद्ध करून दाखविण्याची संधी आम्हास देण्यासाठी आणि इंग्लंड खरोखरीच हिंदुस्थानच्या दास्यशृंखला तोडण्यास इच्छित आहे याविषयी हिंदी लोकांचे मनात विश्वास उत्पन्न करण्यासाठी सरकारने प्रथमतः आम्हां राजबंदीवानांसही त्वरित मुक्त केले पाहिजे. आम्ही असे वचन देतो की, जर आम्हांस या वेळी मुक्त करण्यात येईल तर आम्ही हिंदुस्थानवर स्वारी करून येण्याची शक्य ती खटपट करणाऱ्या अफगाण तुर्कादिक आशियातील विदेशी मुसलमानी टोळधाडींपासून स्वदेशाचे संरक्षण करण्यासाठी, सैन्यात भरती होऊन हिंदुस्थानच्या सीमासमरावर किवा इतर तदनुषंगिक अशा कोणत्याही रणक्षेत्रात जाण्यास कचरणार नाही. अशा रीतीने स्वयंसैनिक होण्याच्या अटीवर आम्हां राजबंदीवानांची सुटका करून आणि हिंदुस्थानास औपनिवेशिक स्वायत्तता देण्याचा तात्काल आरंभ म्हणून वरिष्ठ विधिमंडळात (Councils) हिंदी प्रतिनिधींचे

बहुमत स्थापित करण्याचा अधिकार दिल्याची घोषणा करून सरकारने हिंदुस्थानची प्रीती, साहाय्य आणि निष्ठा उपार्जन करण्याची ही संधी अवश्य साधावी.

## निदान इतरांना तरी सोडा!

आम्ही हे आवेदनपत्र केवळ बंदीगृहातून सुटका होण्यासाठी लिहिलेले आहे अशी किवा इतर राजबंदीवान सोडले असता आम्हासही सोडण्याची पाळी येणार आणि आमच्या सुटकेनंतर आम्ही हिंदुस्थानच्या शांततेचा भंग करू की नाही हे नक्की सांगता येणे तर कठिण तेव्हा राजबंदीवानवर्गासच न सोडणे बरे, अशी शंका जर सरकारास येत असेल तर मी असे आनंदाने आपण होऊन सुचवितो की, सरकारने मला न सोडता अंदमानातल्या, हिंदुस्थानातल्या आणि बाहेर देशोदेशी निर्वासित होऊन अटकून पडलेल्या राजबंदीवानांस तात्काळ मुक्त करावे. त्यांच्या मुक्ततेत मला जवळजवळ माझ्या मुक्ततेइतकाच आनंद वाटेल.

अशा आशयाचे आवेदन मी धाडले. त्या वेळेस युरोपात बहुतेक राष्ट्रे आपआपले अंतर्गत राजबंदी सोडून देत होती. आयरिश 'राजद्रोही' बंदीही सुटले होते. ती उदाहरणेही मी दिली होती. या आवेदनपत्राने म्हणजे राजबंदीवानांस सरसहा कोणी सोडणार होते अशी निश्चिती बाळगण्याइतका कोणी वेडा नव्हता. तथापि अशी आवेदनपत्रे जरी केवळ प्रत्येकी त्यांच्या त्यांच्या बळावरच मुक्तता घडवू शकली नाहीत तरी इतर चळवळींसह संयुक्त झाली असता त्यांचाही एकत्रित परिणाम केव्हा केव्हा होतोही.

या माझ्या १९१४ च्या सप्टेंबरात केलेल्या आवेदनास त्या वर्षाच्या डिसेंबरात उत्तर आले की, गव्हर्नर जनरलाने माझे आवेदनपत्र वाचले असून, त्यावर अधिकृत उत्तर जरी तत्काल देता येत नाही, तरी सद्यःपरिस्थितीत त्या आवेदनातील सूचना ग्राह्य करणे सरकारास सांप्रत अशक्य वाटत आहे. इतके सावरकर यांस कळविण्यात यावे.

या उत्तरावरूनही देशामध्ये काही चाणाक्ष राजकीय पुढाऱ्यांनी युद्धाचे संधीस काही तरी सुधारणा घडवून आणण्याचा जो उद्योग आरंभला होता त्यास क्रांतिकारकांचे विचारांचा आणि वचनाचा पाठिबा देऊन सरकारवर शक्यतो दाब टाकण्याचा माझा त्या वेळचा हेतू सफल झाला असे मला वाटले. अधिकार देत चला आणि साहाय्य घेत चला, अधिकार नाहीत तर साहाय्यही स्वेच्छेने तरी मिळणार नाही; हे धोरण या परिस्थितीत युक्त होते असे मी सांगत असे. आणि याच धोरणाचे मत माझ्या सहभोगी राजबंदीवानांस पटवून देऊन युद्धाचा शेवट होईतो या आवेदनाचे आणि त्यानंतर केलेल्या आवेदनाचे समर्थन करून स्वयंसैनिक होऊन युद्धात भाग घेण्याच्या अटीवर सोडल्यास परिस्थित्यनुसार शक्यतो ते वचन आपण पूर्ण करावे असे पुष्कळांचे मत मी बनवू शकलो.

युद्ध सुरू झाल्यानंतर आणि हे आवेदन पाठविल्यानंतर एक महिना दीडमहिना आमचे आणि अधिकाऱ्यांचे बरेच सूत जमले होते. परंतु लवकरच खटका उडण्याचा प्रसंग आला. कारण की, जसजशा लढाईच्या बातम्या येऊ लागल्या तसतशा त्या आम्ही आम्हास सत्य वाटताच बंदीवानांस सांगत चाललो. पहिल्या धडाक्यात जर्मनीच्या सरशीच्या बातम्या एकामागून एक येत चालल्या. अधिकारी त्या चोरून ठेवू पाहत. बारीतर विक्षिप्तच. तो उलट इंग्रजांच्या आज येथे जय झाला, तर उद्या तेथे म्हणून अवाच्या सवा गप्पा मारीत चालला! त्याचे हे करणे

इंग्रजांविषयी लोकांत होत चाललेली अप्रतिष्ठा आणि उडत चाललेले त्याच्या शक्तीविषयीचे भय अशा प्रवृत्तीची वाढ होऊ नये आणि इंग्रजांच्या राज्याची स्थिरता डळमळते असे पाहताच अज्ञ आणि जहाल लोकांत दंगेधोपे करण्याची प्रवृत्ती भडकून उठू नये यासाठी होते. हे माहीत असताही राजबंदीवानांतील त्याचे दोनचार ठराविक हस्तक त्या विक्षिप्त गप्पांची री ओढून जर्मनी म्हणजे अतिदुर्बळ, नीच, महादुष्ट आणि इंग्लिश पक्ष म्हणजे सात्त्विक क्रोधाचा केवळ अवतार असे बंदीवानांस सांगू लागले. कारण त्यांच्या इंग्लिश सरकारची बढाई गाणाऱ्या या पुण्यकृत्याचे फळ त्यास या लोकी, प्रत्यक्ष त्याक्षणी अंदमानातच मिळत होते. पोर्टब्लेअरचा परमेश्वर बारी त्यांस कठिण हस्तपरिश्रमाच्या कामावरून काढून सर्व बंदीवानांत मिळूमिसळू देई आणि 'मुकादमाची' जागा पण देई. आम्ही दोघे-चौघे नष्ट लोक या मानास अयोग्य ठरलो. कारण आम्ही लढाईचा सारा दोष जर्मनीच्या डोक्यावर मारून इंग्लंड, बेल्जमसारख्या लहान लहान दयनीय कोकरास त्या क्रूर जर्मन व्याघ्राच्या तोंडातून सोडविण्याच्या अत्यंत सात्त्विक क्रोधानेच काय ते या युद्धात पडले असे बंदीवानांस उपदेशीत नव्हतो. आम्ही जर्मनीच्या स्वार्थी महत्वाकांक्षा जशा विशद करून सांगत चाललो, तशाच इंग्लंडच्याही अपहारक लालसा आणि जर्मनीच्या शक्तीचा मत्सर यांचा गवगवा करू लागलो. जर्मनीचा जय झाला असता आम्ही सुतक पाळीत नव्हतो. निष्पक्षपातीपणे जी जी बातमी येई ती जशीच्या तशी सांगून तिचा आणि युद्धाचा हिंदुस्थानातील राजकारणावर काय परिणाम होण्या-सारखा आहे हे आम्ही बंदीवानांस स्पष्टपणे समजावून देत चाललो. बंदीवान जगातील त्या हजारो लोकांस जिवंत राजकारणाचे ज्ञान येऊन त्यांचा त्या कार्यी प्रत्यक्ष उपयोग करून घेण्यास त्या महायुद्धाची अपूर्व संधी आली होती असे आम्हास वाटे.

## बंदीवानांची लढाईची कल्पना

कारण युद्ध होताच हिंदुस्थानाप्रमाणेच अंदमानातही साधारण लोकांपासून विचारी लोकांपर्यंत एकच खळबळ उडून गेली. त्यातही या खळबळीचा उगम त्या निराधार, निराश आणि पतित बंदीवान जगात राजकारणाच्या किवा स्वदेशाच्या कोणत्याही सार्वजनिक भावनेत झालेला नसून मुख्यत्वेकरून तो त्यांच्या मुक्ततेच्या आशेच्या स्वार्थी भावनेत झालेला होता. म्हणून त्यास युद्धाचे भवितव्य हा अगदी जिव्हाळ्याचा प्रश्न होऊन बसला. त्यांच्यातील अज्ञ लोकांसही पूर्वीच्या बादशहांच्या आणि महाराजांच्या राज्याच्या कशा उलटापालटी चुटकीसरशी होत हे दंत-कथा आणि बाजारगप्पा यातून लहानपणापासून माहीत होते. त्यापूर्वीच्या राजकारणाच्या दंतकथी भाषेतच ते या नवीन विषयांचे भाषांतर करून त्याच्या कल्पना बनवीत. पूर्वी अमुक राजा मारला आणि त्याचे राज्य अमुक राजाने घेतले. त्याचप्रमाणे ते बंदीवान समजत की कोण्या एका लढाईत इंग्रजांचा राजा मारला गेला किवा जर्म-नीचा राजा धरला गेला की संपली लढाई; उलटले इंग्रजी राज्य की सुटले सगळे बंदीवान. या अडाणी कल्पनांचे सुखद तरंगांवर त्या बंदीवानांच्या आशेचे तारू किती दिवस तरी हेलकावे खात होते.

कंदील हलवीत पहारा करीत असता वॉर्डर लोकांस कोठडीबंद बंदी प्रश्न करीत आणि स्वयंमन्य विद्वत्तेने ते त्या बंदीवानांस अधिकारी वाणीने लढाईचे इंगित सांगत. त्या दिवशीच्या बाजारी बातम्यांचा विचार करीत, कल्पना लढवीत की आता इंग्रजांचा राजा मुकुट चढवून तलवार कटीस लटकावून जर्मनच्या राजाच्या सैन्यास

टेकडीवर चढून टेहळीत असेल! जर एखादा तीर त्या जर्मनच्या राजाने अचानक मारला तर! पण तो जर्मनचा राजा त्या इंग्लंडच्या राजाचा जावई पडला, त्याची राणी त्या जर्मनला आपल्या बापावर तीर मारताना मध्ये पडून निवारणार तर नाही! अशा कित्येक प्रकारच्या हास्यकारक चर्चा करताना आम्ही त्या बंदीवानांस जेव्हा पाहू आणि ऐकू तेव्हा मोठी गंमत वाटे. पण त्या चर्चा त्या कोठडीबंद बंदीवानांशी करता करता त्या वॉर्डराचा तीन तासांचा पहारा केव्हा निघून जाई याचा त्यास पत्ता देखील लागत नसे. कोलूचे काम देखील बंदीवानांस तितके त्रासदायक वाटेनासे झाले. कारण त्यांच्यातील विनोदी लोक कोलूच्या दांड्यास फिरविताना अत्यंत कठिण जाऊ लागले म्हणजे मोठ्याने ओरडत ''अरे मित्रा, कोलू, फिर! थोडे दिवस उरले आहेत आता! मग तुला चालवावयास कोणी येणार नाही. मग स्वस्थ गंजत पड!'' ही एकाची आरोळी ऐकताच सर्व घाणेवाले रांगेने ती विनोदी गर्जना करीत ''अरे फिर!मित्रा फिर! थोडे दिवस उरले!'' आणि त्या आवेशात, ते थोडे दिवस उरले या कल्पनेत, कोलूचे दांडे आणि चक्रे झपाझप फिरत. एका अर्ध्या तासात एक तासाचे काम होऊन जाई. हस्तश्रम करणाऱ्या बंदीवानांचीच ही गोष्ट नसे, तर त्यांच्यावर नेमलेल्या बंदीवानांतील अधिकाऱ्यांचीही तीच स्थिती. तेही वीस वीस पंचवीस पंचवीस वर्षांच्या बंदीची शिक्षा लागलेले. तंडेल, पेटीऑफिसर कसे तरी आपले तीनचार तास देखरेखीचे काम करीत कंटाळून रडत - कढत असावयाचे. पण आता ते बंदीगृहात येताच कुठली तरी लढाईची नवी बातमी आणून तिची बंदीवानांतील दुढ्ढाचार्यांशी चर्चा करीत आणि आपल्या इंग्रजांचे राज्य उलथताच होणाऱ्या सुटकेस अनुकूल असा अर्थ त्यातून तिला सारखा पिसून काढण्यासाठी कल्पनेचा हलका कोलू फिरवीत उभे राहत. इतक्यात यास सोडविणारा दुसरा तंडेल व पेटी ऑफिसर यावा! त्यास पाहताच त्या पहिल्या राजश्रींनी चमकून म्हणावे, ''काय तीन तास होऊन गेले? अमुक वाजले! काय बुवा वेळ कसा निघून गेला कळले देखील नाही!'' अशा मनःस्थितीत पूर्वी बंदीवानांस छळण्यातच जी त्यास करमणूक करून घ्यावी लागे ती बरीच ढिली पडून या नव्या करमणुकीत ते तंडेल लोक गढल्याने कामकरू बंदीवानांचे कष्टही बरेच सुसह्य होत चालले. दृष्टादृष्ट होताच भांडणतंटे आणि कुत्र्यासारखे गुरगुरणे व शिव्यागाळीस सुरवात होण्याचे स्थली परस्परांस पाहताच बंदीवानांस जिज्ञासा काय, बातमी काय? आणि काहीही बातमी असली तरी तिचा निष्कर्ष म्हणून एकच काढून 'चला, थोडे दिवस उरले' म्हणून हासत परस्परांचा निरोप घेत.

अशा रीतीने बंदीवानांत युद्धाच्या बातम्या ऐकण्याची जी ही जिज्ञासा त्या युद्ध वृत्तान्ताच्या स्वाभाविक आकर्षकत्वाने आणि त्यातही त्यांच्या स्वार्थाचा प्रश्न युद्धाच्या परिणामाशी संलग्न झाल्याने जागृत झाली होती आणि एकंदरीत त्यांच्या मनात जी एक अपूर्व खळबळ उडाली होती तिचा लाभ घेऊन हिंदुस्थानविषयक राजकारणाची रुची आणि कळकळ त्यांच्यात उत्पन्न करण्याचा आम्ही निश्चय केला. जो तो आमच्यापाशी बातमी मागण्यास येई. शुद्धीकरणामुळे असंतुष्ट होत चाललेले मुसलमान देखील आता आम्हास अगदी भक्तिभावाने पाहू लागले. कारण त्यास लढाईची बातमी इतर राजबंदीवान बारीच्या मनाप्रमाणे उलटीसुलटी सांगत; पण आम्ही आणि आमच्या वळणातील लोक जशी असेल तशी सांगण्यास कचरत नसू ही त्यांची निश्चिती झाली होती. अशा वेळी आम्हास कोणी बातमी विचारण्यास आले की, आम्ही त्यास अट घालावी की, तू वाचावयास शिकशील तर

तुला प्रत्यही मिळेल ती बातमी सांगू. या आमिषाने पूर्वी काही केले तरी न शिकणारे कित्येक लोक वाचावयास शिकले.

लढाईपूर्वी हिंदुस्थानातील अज्ञ लोकांच्या कोटी कोटी जनसंख्येत जगत् दोन-तीन राज्यांतच काय ते वाटलेले असे. हिंदू असला तर एक विलायत किवा फार तर काबूलचा अमीर यापलीकडे त्याचे भौगोलिक किवा राजकीय ज्ञान मुळीच गेलेले नसे. पृथ्वीवर विलायत किवा काबूल सोडून इतर मोठमोठी राज्ये आहेत हे सांगितले तर त्याला आश्चर्य वाटे. त्यांची नावे तर त्याला मुळीच येत नसत. एक इंग्रज आणि दुसरा अमीर. मुसलमान असला तर तो तिसरा एक राजा सांगे, तो म्हणजे तुर्की सुलतान! यामुळे लढाई सुरू होताच किती तरी दिवस बंदीवानांत ती इंग्रज आणि सुलतान यांमध्येच आहे असे वाटे. कारण तिसऱ्या कोणा राष्ट्राची त्यास कल्पनाच नाही. परंतु इंग्रज आणि मुसलमान त्यांच्या परिचयाचे होते. अशा स्थितीत आम्ही त्यांच्या युद्धविषयक जिज्ञासेचा लाभ घेऊन त्यास बातमी सांगण्याचे आधी पृथ्वीवरील देशांची नावे पाठ करा आणि ही मानचित्रे (नकाशे) समजून घ्या म्हणून अट घालावी. विटेच्या तुकड्याने, भिंतीवरच्या चुन्यावर किंवा शक्य तर पाटीवर यूरोप, आशिया इत्यादिक मानचित्रे काढून आम्ही आणि आमच्या सहकाऱ्यांनी ती बंदीवानांस समजून द्यावीत. जीव गेला तरी जे भूगोल शिकते ना ते त्या बातम्यांसाठी तो शिकू लागले. जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रीया, रशिया, मिसर, बेलजियम, सर्व्हिया इत्यादी राष्ट्रांची नावे आम्ही बंदीवानांकडून पाठ करवून घेत असू. नंतर मानचित्रावर त्यांची अवस्थिती कुठे आहे ते दाखवून युद्धघटना समजून देऊ. त्यांच्यात जे चाणाक्ष होते त्यांस पुढे त्या त्या भिन्न राष्ट्रांची राज्यघटना कशी असते हे शिकवीत गेलो. त्यांस राजा तेवढा माहिती. म्हणून फ्रान्सचा राजा हटला, अमेरिकेचा राजा रागावला असे ते म्हणत. आणि जेव्हा प्रथम कोणी सांगावे की, अरे तिथे राजाच नाही तर विचारीत, तर मग लढाई कोण करतो? त्याविरहित त्यांची राजाराजांच्या लढण्यांची कल्पनाही भारतादिक कथांवरून उचललेली असल्याने द्वंद्वयुद्ध खेळतात असे त्यांस नेहमी वाटे. रशियाचा राजा अगदी अशक्त आहे- म्हणजे रशियाच्या राजाचे हात किरचिव आणि शरीर किरकोळ असा ते करीत आणि जर्मनीचा बादशहा धष्टपुष्ट असल्याने तो रशियाचे राजास सुपारीसारखा खाऊन टाकील ही त्यांची आशा असे! त्यामुळे कोण कोणास जिंकणार ही गोष्ट ठरविताना ते प्रथम विचारीत बेल्जमचा वा दुसरा कोणी राजा कसा लढतो? घोड्यावर बसण्यात पुष्कळ पटाईत असेल नाही? कैसरच्या शरीराविषयीची वर्णने तर ऐकण्यासारखी होती! तो धष्टपुष्ट होता अगदी भीमसेनाइतका लठ्ठ झाला होता. तो किल्ल्याची दारे हाताच्या ठोशासरशी चूर्ण करी. फ्रान्सच्या राजास तर त्याने एकदा मानगुटी धरून एका धक्क्यासरशी खाली बसविले होते! जर्मन बादशहा अधिक उंच आहे की रशियाचा? म्हणून आम्हास एकाने विचारलेला प्रश्न आम्हास अजून स्पष्टपणे आठवत आहे; आणि रशियन राजाच नव्हे तर लोकही जर्मन लोकांपेक्षा साधारणतः उंच आणि धिप्पाड असतात असे आम्ही सांगताच त्यांची झालेली संशयी मुद्रा आणि तर मग जर्मन राजाचे या रशियाचे राजाशी जुंपल्या जाणाऱ्या युद्धात कसे होईल अशी चिंतित आकृती आम्हास दिसत आहे! या त्या बंदीवानांतील 'राजा' विषयींच्या आणि राज्याविषयींच्या अज्ञानास घालवून 'राजक' म्हणजे काय, राजकाप्रमाणे प्राजक (Republic) नावाची नवीन राज्यघटना कशी असते, तिकडची राज्ये, लढाया, संधी इत्यादी कारभार राजाची व्यक्ती न करता पंचसभा कशा करतात, राजा आणि अध्यक्ष यात फरक काय, अमेरिका व फ्रान्स

येथे अध्यक्ष कसे असतात इत्यादी शासनशास्त्रातील व्यावहारिक आणि तात्त्विक चर्चा करून करून आणि ती नीट ध्यानात ठेवून उत्तरे बरोबर दिली तरच बातमी सांगू अशा अटी घालून घालून त्या युद्धाच्या पहिल्या वर्षाच्याआतच त्या बंदी जगतात भौगोलिक ज्ञानाचा आणि राजकारणाच्या आंतरराष्ट्रीय संबंधाचा आणि स्वरूपाच्या माहितीचा आश्चर्यकारक फैलाव करू शकलो. पुढे पुढे युद्धाच्या कथा ऐकण्याचा छंदच बंदीवानांस लागत चालला. या बातम्यांचे मर्म भूगोल, मानचित्रे आणि राज्यघटनांचे ज्ञान असले म्हणजे उत्तम प्रकारे समजून कितीतरी अधिक समाधान होते हे जसजसे त्यांच्या अनुभवास येऊ लागले तसतसे कित्येक बंदीवान आपण होऊन आम्हास ती मानचित्रे समजावून द्या, हे सांगा, ते सांगा, इत्यादी ज्ञान आग्रहाने विचारून शिकू लागले. बातमीच्या आमिषामुळे अनेकांस वर्तमानपत्रे बाहेर जाऊन स्वतः वाचावयास नादही आम्ही लावू शकलो.

## हिंदुस्थानचा लाभ पहा.

बंदीवानांच्या सृष्टीचे भौगोलिक आकुंचितपण घालवून तीस विस्तृत करविण्याची खटपट करीत असता आम्ही अर्थात हिंदुस्थानच्या भूगोलाचा, मानचित्राचा, आणि राजकीय परिस्थितीचा अभ्यास त्यांच्याकडून विशेषतः करून घेववीत चाललो. बंदीवानांस प्रथम ‘जर्मन’ सहजच आवडला. कारण ‘इंग्रज’ काही कधी कोणा बंदीवानांस सुखासुखी सोडीत नसतो आणि इंग्रजांचे राज्य जर्मनने घेतल्यास तो त्यांस सोडून देईल अशी त्यांची भावना होती. म्हणून जर्मन वाईट आहे असे म्हणणे त्यांस बिलकुल खपत नसे. त्यायोगे जेव्हा आम्ही प्रथमतः हिंदुस्थान देशावर लढाईचे काय परिणाम होतील आणि हिंदुस्थानने आपले कार्य साधण्यासाठी काय डाव खेळले पाहिजेत हे आमच्या संस्थेतील सभासदांस आणि त्यांच्याकरवी इतर बंदीवानांस सांगत आलो, तेव्हा जर्मनी जर हिंदुस्थानावर स्वारी करू शकला तरी तो हिंदुस्थानास छळील. केवळ जर्मनीच्या विजयात तरी तुम्हांस काय लाभ? असे आमचे सांगणे त्यांतील पुष्कळांस किती तरी अप्रिय वाटे! आम्ही नेहमी गाढवाची गोष्ट सांगावी, ‘‘एक कुंभार पडला, तर त्यावर दुसरा जर्मनी कुंभार चढला. तुम्ही आपले गाढव ते गाढवच! तेव्हा जर्मनचा विजय झाला तर हिंदुस्थानने जिंकले, ही कल्पना खुळी आहे. ’’ असे समजावून सांगितल्यावर पुष्कळ लोकांस ते पटे. तेव्हा मग आपल्या हिंदुस्थानच्या पदरात या महायुद्धाच्या धांदलीत जर काही लाभ पडावयाचा असेल तर तो कसा पडेल आणि त्यासाठी सर्वांनी काय केले पाहिजे हे त्या बंदीवानांस विशदपणे सांगता येई.

जर्मन आला तरी काय हिंदुस्थानावर तोही कुरघोडीच करू पाहील ही गोष्ट समंजस हिंदू बंदीवानांना पटे; पण तुर्क किवा अमीर आला तरी हिंदुस्थानास काय लाभ! असे सांगू गेले तर मुसलमानांस मात्र ते मुळीच पटत नसे. सुलतान हा त्यास देवासारखा. त्यांच्या कथापुराणातून आणि धर्मातून त्या शब्दाभोवती कोण आश्यर्चकारक रचना गुंफलेल्या. लहानपणापासून सुलतान म्हणताच गौरव आणि आशा त्यांच्या हृदयात उत्पन्न व्हाव्या असे शिक्षण त्यांस पाळण्याच्या गाण्यापासून दिलेले. तो सुलतान हिंदुस्थानावर स्वारी करणार - आणि तुम्ही म्हणता हिंदुस्थानास काय लाभ! काय म्हणजे इंग्रजांस हाकून मुसलमानी राज्य स्थापिले जाणे हा! परंतु सुलतानचे राज्य हेही परकी राज्य आहे!- ही वाक्यरचनाच त्यांस समजत नसे. एखादा इतिहास जाणणारा मौलवी वा सुशिक्षित बंदी असला अणि त्यास तुर्कांनी अरबांवर, अरबांनी अराण्यांवर, अराण्यांनी पठाणांवर अणि पठाणांनी, अराण्यांनी,

मोंगलांनी - सगळ्या विदेशी मुसलमानांनी हिंदी मुसलमानांवर कसे अणि किती अत्याचार केले हे जरी इतिहासाच्या आधारे दाखवून दिले तरी तो म्हणावयाचाच की, हिंदुस्थानावर सुलतानाने स्वारी करून त्याचे मुस्लीम राज्य हिंदुस्थानभर स्थापन व्हावे यातच हिंदुस्थानचा लाभ आहे. या त्यांच्या राष्ट्राभिमानशून्य धार्मिक उन्मादात त्यांच्या जगाविषयीच्या गाढ अज्ञानाची भर पडलेली. मग त्यांच्या कल्पनांची काय गंमत विचारावी! इंग्रज बादशाह त्यांच्या परिचयाचाच होता. पण हा कैसर त्यांना नवीन भेटला. त्याचे बळ, त्याच्या पराक्रमाच्या अद्भुत कथा ते रात्रंदिवस ऐकत आणि स्वतः ऐटीने सांगत. पण शेवटी त्या कैसरला एवढे बळ आणि यश येते कसे हे विशद करण्याच्या हेतूने ते आपसात आणि विशेषतः हिंदू बंदीवानांस सांगत की, ते बळ कैसरला जे येते ते सुलतानाचे कृपेने!

## मुसलमानांची तुर्की बढाई

शुद्धी चळवळ सुरू झाल्यानंतर लढाई सुरू झाली. त्यात तुर्कीने भाग घेताच आमच्या शुद्धी चळवळीने हतप्रभ होत चाललेल्या मुसलमानांस हिंदूंस बाटविण्याचा प्रयत्न करण्यास हे सुलतानाचे नाव एक नवीन साधन मिळाले आणि आता इंग्रजी राज्य बुडताच या हिंदुस्थानावर जर्मनीच्या कैसरची स्थापना सुलतान स्वतः येऊन करणार असल्यामुळे, मुसलमानांची सत्ता पुन्हा प्रस्थापित होऊन त्यांस मोठमोठे अधिकार मिळणार आणि जे मुसलमान होणार नाहीत त्यांस शासनही मिळणार म्हणून ते वेडे पीर हिंदू बंदीवानांस उघड उघड सांगू लागले. त्यांस हटकून विचारले की, हे तुला कोणी सांगितले? की म्हणत बाजारात एका उर्दू पत्रात छापले आहे! कित्येक वेळा अज्ञान हिंदू बंदीवान आम्हास आंबट तोंड करून विचारावयास यावेत की, ''बडे बाबू, खरोखरीच का सुलतानचे राज्य हिंदुस्थानवर होणार असून मुसलमान बंदी तेवढे तो सोडून देणार आहे?'' अशा प्रकारच्या बातम्या मुसलमान वेडे पीर हिंदू बंदीवानांस सांगून त्यांस म्हणत, म्हणून तू आपला मुसलमान हो! या बातम्यांच्या रोगापासून हिंदूंचा बचाव करण्यासाठी आम्ही त्यांच्या या भाकडकथांची फटफजिती करण्याची संधी केव्हावी दवडीत नसू. हलके हलके बहुतेक हिंदूंस तुर्कांच्या बलाबलाचे ज्ञान पुष्कळच झाले. अणि नंतर आमची वाक्येची वाक्ये ऐकून त्यांस पाठ झाल्याने ते त्या वाक्यांचा भडिमार करून अशा गप्पाष्टकी मौलवींची तोंडे उघडताच बंद करीत. ''तुमचा हा सुलतान म्हणजे भूस भरलेला वाघ आहे. त्यास वीतीएवढ्या बल्गेरियाने मारले, सर्व्हियाने झोडले, ग्रीसने तुडविले; गेल्या दहा वर्षांत दहा ठिकाणी त्याची हबेलंडी उडाली. आणि तो हिंदुस्थानावर म्हणे स्वारी करणार! इंग्रजांचा एक फटकारा त्यास निवारण्यास पुरे आहे. जर्मनीच्या कुंकू लावण्याने त्यास काय ते महत्व; नाहीतर आजपर्यंत नाही ते त्यांनी कुठे इंग्रजांचे नाव काढले! आणि सुलतान म्हणे कैसरला बळ देतो अणि यश देतो! कुठे कैसर अणि कुठे सुलतान? कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे ही ऐटमिय्यांची तट्टाणी!'' अशी ठरीव वाक्ये उच्चारून हिंदू बंदीवान त्या वेड्या पीरांचा भ्रम उतरून टाकीत.

जे शिक्षित झालेले होते अशा हिंदूंस मी जर्मनीची सेना, विमाने, रणनौका (लढाऊ जहाजे) इत्यादी बळ आणि तुर्कीचे बळ यांची कोष्टके समजून देई. मुसलमानांसही अशा व्यर्थ बढायांनी तुम्ही स्वतःचीच कशी फसवणूक करता ते सांगे. जे काही यश तुर्कीस मिळे ते देखील प्रमुखतः जर्मन दारूगोळा, शस्त्रास्त्र आणि शिक्षणाचे फळ होते

आणि स्वतः जर्मन सेनानायक त्या तुर्की सैन्याचे संचालन करीत होते या गोष्टी मी वारंवार येणाऱ्या त्या त्या बातम्या विशेषतः फैलावून स्पष्ट करी. मागे वर्णन केलेल्या आमच्या संस्थेच्या साप्ताहिक पळत्या किंवा बैठ्या सभांतून तरुण तुर्कांच्या इतिहासावर व्याख्याने देऊन मी अनवर बेगादिक त्यांच्या पुढाऱ्यांचा यथोचित गौरव करून तुर्क लढाईत मिळाल्याने जर्मनीचा हात हिंदुस्थानास पोचण्यास कसे साहाय्य झाले आहे आणि त्याचा फायदा हिंदुस्थानास करून घेता येईल तर!. . . कसा महत्वाचा उपयोग होणारा आहे हेही माझ्या त्या वेळच्या राजकीय दृष्टिकोनाप्रमाणे निरीक्षून विशदपणे सांगे. आणि तुर्कांशी तेवढ्यापुरती योग्य ती सहानुभूती दर्शवून योग्य स्तुतीही करी. पण त्यांची ही अतिरेकी घमेंड मी चालू देत नसे. म्हणून मुसलमान मजवर सारखे दात-ओठ खात असत.

## कैसर मुलसमान झाला नि आर्यही झाला

त्यांच्या या घमेंडखोर आणि दुष्ट हेतूने प्रेरित झालेल्या बढायांची फजिती अनेक वेळा मोठ्या गमतीने करावी लागे. एकदा एक आठ-दहा दिवस पोर्ट ब्लेअरभर आणि विशेषतः कारागृहात मुसलमानांनी दाट बातमी उठवून दिली की, ''कैसर मुसलमान झाला! सुलतानाने त्यास साफ कळविले की, जर तू मुसलमान होशील तर मी रणात राहतो. नाहीतर आता आपल्या 'राजधानीस' परत जातो. तेव्हा कैसर घाबरला आणि मुसलमान झाला!'' ही बातमी ते हिंदू बंदीवानांसमोर जाणूनबुजून आढ्यतेने सांगत फिरत; तेव्हा हिंदू बंदीवानांतील स्वाभिमानी लोक मनातल्या मनात पाणउतारा झाल्यासारखे वाटून 'खरेच का हे' असे विचारीत फिरत. शेवटी एका आमच्या प्रचारकांतील उत्साही वॉर्डर बंदीवानाने -जो स्वतः आर्यसमाजी होत- आम्हास म्हटले, ''महाराज, ही यांची बातमी खोटी आहे हे सिद्ध केले पाहिजे. '' आम्ही म्हटले. ''अरे ते असिद्ध वा सिद्ध का कोणी करीत बसते! त्यांची तोंडे बंद करण्यास मी तुला एक युक्ती सांगतो. उद्या बाहेरून कारागृहात आलास की मोठ्या उत्साहाने बातमी सांगत फिर की कैसर 'आर्या' झाला. (तिकडे मुसलमान आर्यसमाजी या लांब नावाचा संक्षेपकरून आर्या म्हणतात. ) जिथे तुम्ही मुसलमान वॉर्डर गप्पा छाटीत बसलेले पहाल, तिथे तुम्ही हिंदू वॉर्डर पण कैसर आर्य झाला म्हणून गप्पा ठोकीत बसा. कुणी विचारले की, याला काय पुरावा? तर म्हणावे, बाजारातील हिंदी पत्रात वाचले!''

झाले, दुसरे दिवशी संध्याकाळी कारागारात कैसर 'आर्या' झाला म्हणून बातमी उठली. मुलसमानही दबून हे काय थोतांड आहे म्हणून आपसात विचारू लागले. शोध करता करता त्यांना ही बातमी अमक्या हिंदू वॉर्डरने आणल्याचे कळले. दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी ते आणि तो एकाच ठिकाणी रात्री नेमले जाताच त्यांनी विचारण्याच्या आधीच त्या हिंदूने कैसर आर्य झाल्याची म्हणजे आर्यसमाजी झाल्याची गोष्ट हिंदू वॉर्डरास सांगण्यास आरंभ केला. मुसलमान जळफळत मध्येच विचारू लागले, हे खोटे आहे, यास पुरावा काय! हिंदूने विचारले, कैसर मुसलमान झाला यास पुरावा काय? ते म्हणाले, उर्दू पत्रात आम्ही वाचले. तो म्हणाला कैसर आर्य झाला हे हिंदी पत्रात मी वाचले. मुसलमानी वॉर्डर म्हणाले, कुठे आहे ते हिंदी पत्र? याने विचारले कुठे आहे ते उर्दू पत्र? मुसलमान म्हणाले, आर्य काफरोंका धर्म है. हिंदू म्हणाला, इस्लाम म्लेंच्छोंका धर्म है. असे होता होता गोष्ट वर्दळीवर गेली. त्या हिंदू वॉर्डराने विचारले की, ''कैसरच्या ताटाखालचे मांजर तुर्क मुसलमानी धर्माची पत जर देवाचे घरी एवढी

असती तर सर्व्हिया, बल्गेरिया, ग्रीस हे सर्व ईसाई धर्मीय, अणि इस्लाम धर्मीय तुर्कास समरांगणात चीत करते झाले तसे झाले नसते. मग तेव्हा जर देवाने मुस्लिमांसाठी कोणी जेब्रियन धाडला नाही, पण ईसायांसच विजय दिला तर इस्लामी धर्मावरच त्याची सध्या अवकृपा आहे असे नाही का सिद्ध होत? मग कैसर यशस्वी ईसाई धर्म सोडून हा अपयशी मुसलमान धर्म स्वीकारील तरी कसा? इतक्यावरही जर तो मुसलमान होणे संभवनीय आहे म्हणाल, तर मग तो मुसलमानाचा पुन्हा आर्य झाला ही बातमी संभवनीय आहे! कारण काही मुसलमान आर्य होतात!''

या वादाची बातमी दुसरे दिवशी जमादारापर्यंत पोचली. तोही कैसर मुसलमान झाला म्हणून म्हणणारा मुसलमानच. पण करतो काय, त्यापुढे कोणीही मुसलमानांनी कैसर मुसलमान झाल्याची गोष्ट काढली की, हिंदूंनी तो हिंदू झाल्याची - आर्य झाल्याची गोष्ट काढलीच म्हणून समजावे. असे होऊन मुसलमानांनी अखेर ही बातमी पसरविण्याचा नादच सोडून दिला.

तुर्क युद्धात पडल्याने मुसलमानांच्या हिंदुस्थानात इस्लामी राज्य स्थापण्याच्या उपजत आकांक्षा त्यांच्यातील चोरापोरांपर्यंत अशा उद्दीपित झाल्या, तर जेव्हा मधून मधून अफगाणिस्थानचा अमीर देखील लढाईत समाविष्ट होऊन ब्रिटिशांशी युद्ध पुकारीत आहे म्हणून बातमी उठे तेव्हा तेव्हा तर त्यांच्या उद्दीपनास किती भरती येत असेल ते सांगावयास नको. विशेषतः पठाण तर नुकत्याच पडलेल्या पावसाळ्याच्या पहिल्या सरीसरशी भरलेल्या डबक्यातील बेडकासारखे सारखी 'ट्राव ट्राव' करून उड्या मारीत हिंडू लागले. या पठाणाने वीतभर बातमी उठवली की त्याने हातभार उठवावी. केवळ तुर्क आणि अनवर बेगच जोवर लढाई करीत होता तेव्हा तो फार फार तर इंग्रजांच्या सेनाच्या सेना भस्म करी किंवा बस्रा घेई. पण अमीराची गोष्टच निराळी. तो अनवरप्रमाणे नुसत्या बसऱ्यास थोडाच थांबणार! अमीर केवळ सिंधुनदी उतरून देखील थांबत नसे तर ती उतरण्याचे आधीच आज लाहोरच्या दारावर ठोठावी, तर उद्या सरहिंदवर भडिमार चालवी! कारागाराबाहेरून येणारे जाणारे पठाण वॉर्डर आणि पेटी ऑफिसर आत पाय टाकताच उतावळ्या जिभेने आणि बावरलेल्या घाईने अशी काही बातमी सांगत की, बंदीवानांत एकच खळबळ उडून जावी! एकाने सांगावे अमीराने लाहोर घेतले, तर दुसऱ्याने म्हणावे कैसरने लंडन घेतले! बातमीला आधार? त्या नाही तर त्या टापूचा 'मुनशी'! आणि 'उर्दू अखबार'!

## मूर्खपणातील सुसंगती

परंतु पठाणांच्या या हास्यास्पद मूर्खपणाच्या बुडाशी जो एक लक्षात ठेवण्यासारखा जात्याभिमान असे तो मात्र मी त्यांस साहजिकच हसणाऱ्या हिंदूंच्या ध्यानात आणून दिल्यावाचून राहत नसे. 'मुसलमानांतील चोर पोर अडाण्यापर्यंत हिंदुस्थानावर कोणी मुसलमान राजा चढून येत आहे हे ऐकताच त्याविषयी केवढी सहानुभूती उत्पन्न होते ती ध्यानात ठेवा. आणि या सहानुभूतीचे कृत्यातही रूपांतर होण्याचा संभव संधी मिळताच थोडा थोडका असणार नाही. या मुसलमानी प्रवृत्तीचा त्यांस जरी अभिमान वाटत असला तरी हिंदूंच्या हितास ती किती घातक आहे आणि तिच्यावर हिंदूंना सदोदित किती कडक पहारा ठेवला पाहिजे ते लक्षात आणा. तसेच लहानपणापासून इस्लामी राज्याची ही आकांक्षा त्यांच्या घरोघर धर्म म्हणून कशी शिकविली जात आहे पहा -

आणि तुम्हां हिंदूंतील किती लोकांस हिंदुस्थान, हिंदुसत्ता, हिंदुराज्य इत्यादी शब्दांचा अर्थ तरी कळत आहे हेही पहा! दहा हजारांत एकासही अर्थ देखील कळत नसेल, मग सहानुभूतीचे नाव कशाला! पठाणांचे एक स्वतंत्र राज्य उरलेले आहे - काबूलचे. त्याचा त्यांच्या खाण्यात, उठण्याबसण्यात उच्चार चाललेला असतो. तुमचे हिंदूंचेही एक तितकेच लहानमोठे स्वतंत्र राज्य आजही जिवंत आहे - पण तुम्हांस त्याचे नाव तरी माहीत आहे का? नेपाळचे. ते राज्य हिंदू आहे की मुसलमान ही गोष्ट देखील तुम्हांतील अशिक्षित कोटी कोटी जनांस माहीत नाही, आणि तुमच्यातले सुशिक्षित? - ते कित्येक माझ्याशी नेपाळ हिंदुस्थान देशाचा भागच नाही. तो एक निराळाच देश आणि ती एक निराळीच जाती असल्यामुळे ती आम्हांस चीन, इराण, अफगाणिस्थान व सर्व्हियासारखी परदेशी आहे म्हणून वाद घालतात!

आणि खरोखरच अंदमानमध्ये नेपाळच्या भवितव्यासंबंधी आणि हिंदू संघटनाचा तो एक महत्वाचा आधारस्तंभ कसा होऊ शकेल याविषयी जेव्हा मी संवाद करी तेव्हा बहुतेक राजबंदीवानांस नेपाळशी आपला काय संबंध, ते एक कुठलेसे भूतानप्रमाणे कोण्या परकी रानटी लोकांचे यःकश्चित् परदेशी संस्थान आहे म्हणून शंका येई आणि तिचे अनेक वेळा गंभीर कोटिक्रम रचून समाधान करावे लागे.

युद्धाचे दिवसांत बातम्या ऐकून ऐकून आणि असे निरनिराळे विस्तृत राजकारणाचे विचार रात्रंदिवस कानावर आदळत जाऊन जाऊन अंदमानमधील हजारो बंदीवानांचे राजकीय विचारक्षेत्र आणि राष्ट्रीय भावनोत्कट्य पुष्कळच विकास आणि विस्तार पावत गेले. अंदमानात जी संघटना आणि प्रचारकार्य आम्ही करू इच्छित होतो त्यास युद्धाच्या घटनेने असे महत्वाचे साहाय्य दिले आणि त्या संधीचा उपयोग करून घेण्यास आमची सर्व मंडळी हेतूपूर्वक सारखी झटत राहिली.

## पुन्हा कामास लावले.

लढाईच्या वेळोवेळी येणाऱ्या बातम्या जशाच्या तशाच सांगण्याच्या आमच्या परिपाठामुळे तुर्की विरुद्ध बातम्या सांगतात म्हणून मुसलमान जसे रागावत तसेच इंग्रजांच्या वतीने खोट्यानाट्या बढाया आम्ही मारीत नसू म्हणून बारीही रागावे. या वेळचे पर्यवेक्षकही आकुंचित राष्ट्रीयत्वाने भरलेले एक गृहस्थ होते. त्यांनाही माझे करणे दुष्टपणाचे वाटून मजवर ते शत्रूसारखी कडक दृष्टी ठेवू लागले. त्यातच लढाईचा पहिला धक्का अंदमानला बसून, समुद्रात कोणी जर्मन रणनौका फिरत आहे म्हणून बातमी आली आणि त्या संकटापासून पोर्ट ब्लेअरला सुरक्षिततेस्तव मागविल्या गेलेल्या ब्रिटिश सैन्याचे तुकडीसाठी तरटे इत्यादी सामान करण्याविषयी कारागृहात बंदीवानांवर कामाची एकच सक्ती सुरू झाली. तेव्हा तर आमच्यावर अधिकाऱ्यांची उघडच अवकृपा झाली. कारण त्या सेनेसाठी तरटे करण्याच्या धांदलीत सर्व बंदीवानांस छिलका कुटण्याचे काम देण्यात येऊन त्या कामाचे परिमाण पाच पाच सहा पट सरसहा वाढविण्यात आले! दोन पौंड छिलका दिवसास कुटून द्यावा लागे तिथे दहा दहा पौंड छिलका कुटून घेण्याचा तडाका चालला. मारहाण चालली. राजबंदी असे आम्ही थोडेच - जन्मठेपीचेच बहुतेक उरलेलो होतो. कारण संपाचे फळ म्हणून बाकीचे हिंदुस्थानात धाडून दिल्याचे मागेच सांगितले आहे. त्यांचा विरोध होऊ नये म्हणून बारीने त्यांच्यातील माणसासच त्या कामावर आणि बंदीवानांपासून ती वाढलेली

मेहनत करून घेण्यावर देखरेख नेमण्याचा मान दिला! अशा कामी उपयोगी पडत गेले तर पुढे स्वतःला हस्तश्रमांची सूट मिळून वॉर्डरकीही मिळण्याचा संभव असतो हेही उघड होते. तेव्हा राजबंदीवानांची ब्याद, ''तुम्ही काही करू नका, केवळ या चोरापोरांकडून काम करवून घ्या'' असा मोठेपणा देऊन बारीने दूर सारण्याचा प्रयत्न केला तो बराच यशस्वी झाला. हे साहजिकच होते. परंतु दुर्दैवेकरून आमच्या देखरेखीखाली आलेल्या भागात छिलका माणशी दोन नाहीतर तीन पौंडाहून अधिक कुटला जाणार नाही असे लवकरच दिसू लागले. बंदीवान साफ म्हणत, ''लढाई यांची! आम्ही काय म्हणून दिवसभर मरावे! निर्बंधानुरूप दोन पौंड काम घ्या. दोन दिवसांची सूट मागितली तर शिक्षेतून ते कमी करवत नाहीत आणि लढाई जुंपली म्हणून म्हणे दहा दहापट अधिक काम करा. आम्ही साफ करीत नाही! होईल तेवढे करू!'' या त्यांच्या प्रतिवादास आम्ही काय उत्तर देणार? आम्हा स्वतःसच त्यांचे म्हणणे योग्य वाटत होते. आम्ही ज्या भागात असू त्या भागात मारपीट करण्याची तंडेल जमादारांची सहसा छाती होत नसे, हा बंदीवानांत अगदी विश्वास असे. तेव्हा ते पुरे काम करून मग जे होईल तेच थोडेबहुत अधिकही करून स्वस्थ बसले. संध्याकाळी आमच्या भागात सर्वांपेक्षा काम कमी भरले - पण निर्बंधाने स्थिर केलेल्या प्रमाणाहून अधिकच भरले, तेव्हा अर्थातच बारीची गर्जना सुरू झाली. तंडेलाचा पट्टा हिसकला. मुसलमान आमच्या पक्का विरुद्ध. त्याने बारीस रातोरात भेटून आम्ही बंदीवानांस चिथावले, आम्ही त्यांस राजद्रोह शिकवितो इत्यादी खऱ्या खोट्या वाटेल त्या थापा मारून सर्व दोष आमच्यावर लादला. दुसरे दिवशी पर्यवेक्षकही रागाने आम्हास 'देखरेखी'च्या सिंहासनावरून पदच्युत करून आणि दोरीचे सोपे आणि नित्याचे कामही न देता शिक्षा म्हणून ते छिलका कुटण्याचे काम देऊन निघून गेला. त्या बंदीवानांतच लंगोटी नेसून आमचा छिलका कुटीत घामाघूम होऊन बसलो. परंतु संध्याकाळी आमचा छिलका एक पौंड काय तो भरला! आम्ही आपल्या ठरलेल्या परिमाणाबाहेर छिलका कुटीत नाही किंवा इतर बंदीवान कुटून गुपचिप भक्तिभावाने साहाय्य म्हणून देत असताना घेतही नाही, हे पाहून माझ्या बरोबरीचे इतर बंदीवानही अर्थातच मरे मरेतो काम करीतनासे झाले. तेव्हा बंदीवानांत उघडपणे मिसळून काम करण्याची आणि बसण्या उठण्याची आम्हांस अलीकडेच मिळालेली सवलतही काढून घेण्यात येऊन आम्हास त्या सात क्रमांकाच्या एकान्त चाळीत पुन्हा बंद करण्यात येऊन ते छिलक्याचे कठिण काम तसेच नेमून देण्यात आले.

ज्या तंडेलने आम्ही 'सरकारके विरुद्ध' बंदीवानांस शिकवितो म्हणून बारीस कागाळी केली होती त्याने आणि अशा अनेक चुगलखोरांनी त्याच सरकारच्या विरुद्ध आमच्यापाशी आणि आमच्या समक्ष देवाच्या प्रार्थना देखील केलेल्या होत्या. पण त्यांची असली कागाळी सांगण्याचा चुगलखोरपणा आम्ही करणार नाही ही त्यांची निश्चिती असल्याने त्यांना माझ्यावर वाटेल ती बालंटे निर्भयपणे रचता येऊन आपली पोळी पिकविता येई.

याच संधीस मागे शुद्धी प्रकरणात सांगितल्याप्रमाणे बंदीवान जगतात आमची वाढत चाललेली प्रतिष्ठा हाणून पाडण्यासाठी आणि आम्हास मानसिक यातना देण्यासाठी दुय्यम अधिकाऱ्यांच्या फुसीने काही मुसलमान वॉर्डरांस आम्हास बीभत्स शिव्या हासडीत तासनतास आमचेसमोर उभे राहण्यास किंवा तुरुंगभर भटकत फिरण्यास मोकळीक झालेली! असा सारखा ससेमिरा आमच्यामागे लावण्यात आला.

पण याच वेळी त्रासात आणि अवशतेतही आम्ही आपले कार्य करण्यास उत्साहित करणाऱ्या घटना एकामागून एक घडत चालल्या.

## एम्डेनचे आगमन - रशियाचा अधिकारी भेटला

आमच्याकडील लक्ष काढून टाकून पोर्ट ब्लेअरच्या अधिकाऱ्यांची सारी शक्ती तीव्रतेने आपल्याकडे आकर्षून घेतल्यामुळे आम्हास थोडा विसावा मिळू देणारी पहिली गोष्ट म्हणजे अंदमानच्या समुद्राच्या आसमंतात 'एम्डेनचे' आगमन ही होय. हिची बातमी उडत उडत पसरल्यामुळे प्रत्यक्ष सरकारी हालचाल होण्यापूर्वीच बंदीवानांत हालचाल उडाली होती. इतक्यात मद्रासवर भडिमार झाल्याचे वृत्त आले. सरकारने ते गुप्त ठेवण्याचा प्रयत्न करताच नेहमीप्रमाणे ते गुप्त तर राहिलेच नाही; पण अतिशयोक्त रूपाने वसाहतीभर पसरले. इतक्यात त्या वसाहतीत उभ्या इतिहासात कधीच न घडून आलेली अधिकाऱ्यांची तारांबळ आणि सैनिक सिद्धतेची धांदल उडाली. तुरुंगाच्या शेजारीच दारूचे कोठार आणि शस्त्रागार स्थापण्यात आले. तुरुंगाभोवती चर खोदण्यात येऊन तुरुंगात इंग्रजी सोजिरांचा पहारा ठेवण्यात आला. कलकत्त्याहून घाईघाईने गोरी पलटण मागविण्यात आली. इंग्रज अधिकारी रात्रभर समुद्रावर पहारे ठेवून निजू लागले. थोडेच दिवसांत लढाऊ रणनौकाही येऊ-जाऊ लागल्या. कधी फ्रेंच रणनौका तर कधी रशियन विध्वंसिका (ड्रेडनॉट) पोर्ट ब्लेअरला थांबून एक-दोन दिवस पहारा देऊन जात. यांपैकी रशियन आणि इतर रणनौकांचे नौकाध्यक्ष आम्हास पाहण्यासाठी कारागृहात केव्हा केव्हा येत असत. रशियन रणनौकांचा अधिकारी आम्हाशी बराच वेळ संवादही करून गेला. युरोपात त्या मंडळीस आम्ही अंदमानात बंदीत आहोत या गोष्टीचा विसर पडलेला नाही असे तो म्हणालेला ऐकून आणि ती ये-जा पाहून आम्हास समाधान वाटल्यावाचून राहिले नाही.

या सरकारी हालचालींवरून असे स्पष्ट होत होते की, युरोपीय महायुद्धाच्या रणक्षेत्रात अंदमानचा धागा प्रत्यक्ष रूपाने कुठेतरी गुंतलेला आहे. आम्हांस माहीत असलेल्या अभिनव भारतीय आणि इतर हिंदी क्रांतिकारक संस्थांच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांच्या पूर्वपीठिकेवरून युद्ध सुरू होताच अंदमानचा क्षेत्रबिंदू हा त्या महायुद्धाच्या विस्तृत कक्षेतील एक रणक्षेत्रबिंदू झाल्यावाचून बहुधा राहणार नाही असे वाटतच होते. बारीसुद्धा इतर युरोपिअन अधिकाऱ्यांनी सैनिक हालचालींचा नक्की सुगावा लागू न देण्याची किती जरी धडपड केली तरी हेही आम्हास कळून चुकले होते की, एम्डेन अंदमानवर छापा घालण्यासाठीच आसमंतात भटकत आहे. पुढे ही जर्मन रणनौका एकदा-दोनदा अंदमानवर छापे घालण्यासाठी आल्या-गेल्याची भूमिका उठून तिकडे बंदीवानांची आणि सरकारची बरीच धांदल उडाली. या जर्मन रणतरीचे अंदमानभोवती घुटमळण्याचे साहसी कार्य ते बंदर इतक्या मोठ्या महत्वाचे होते असे केवळ नसून, त्यांचा एक प्रमुख उद्देश तेथे असलेल्या आम्हा हिंदुस्थानी बंदीवानांची मुक्तता करणे हा होता हे आम्ही जाणून होतो. तेथील साधारण बंदीवान तर आशेच्या अत्युच्च लाटेवर यथेच्छ विहार करीत होते. पूर्वीचे 'थोडे दिवस राहिले!' हे वाक्य जाऊन, ज्याचे त्याचे तोंडी 'चले भैय्या आज या कल!' असे वाक्य गुंजू लागले. कोणी धापा टाकीत येत आणि सांगत की, जर्मनीची रणतरी आली! ते पहा सर्व साहेब लोक बंगले सोडून दुर्बिणी लावून तिकडे धावत आहेत! आणि साहेब लोक धावतही असत खरेच. एम्डेनचा आणि एकंदर जर्मन नौसाधनाचा

(navy) प्रताप ऐकून त्या मूठभर इंग्रजी दळाच्या मनात एकदा दोनदा तरी खरोखरच भयंकर चिंता उत्पन्न झालेली होती. बंदीवान तितका वेळेवर त्यांच्यावर उलटल्यावाचून राहणार नाही ही त्यांची शंका अगदीच अस्थानी नव्हती. त्यातही त्यांच्यापाशी लढाऊ साहित्य अगदी थोडे. समुद्रात पडलेले ते एक पृथ्वीचे ढिगूळ! मूठभर इंग्रज तेही सैनिक व्यवहारात अनभ्यस्त. जर एखादे प्रबल जर्मन विध्वंसक किंवा रणतरी येती तर त्यांची काय कथा होती? पण एका साम्राज्याच्या पूर्वापार परंपरेत मुरलेले ते इंग्रज लोक - ही सगळी भीती गिळून अंदमान लढविण्याचा निश्चय करून होते. एकदा जर्मन रणतरी आली म्हणून त्यांच्या बायकापोरांपर्यंत धांदल उडाली त्यात काहीच आश्चर्य नव्हते. आश्चर्य हे होते की, त्या हजारो बंदीवानांच्या आणि परक्या आणि शत्रुवत बिघडलेल्या बंदीवानांच्या छातीवर ते मूठभर लोक जसेचे तसे राज्य करीत अंदमानास चार वर्षे रक्षून राहिले. नारळाचे एक झाड कोणास उपटून दिले नाही, की बंदीवानांचा ठरलेला २ पौंड छीलका वा ३ पौंड दोरी एका रत्तलाने सूट दिली नाही. जसेचे तसे ते काम, ते निर्बंध ते शासनचक्र चालविलेले होते!

## इंग्रजाची चिकाटी! आमचा भाबडेपणा

'साहेबांचा' हा शूर स्वभाव आणि ही हट्टी जातीय चिकाटी हिंदुस्थानी लोकांस पेशवाईअखेर जशी ओळखता आली नाही तशीच आजही येऊ नसे याचे राहून राहून आश्चर्य वाटते. या लढाईच्या दिवसांत वारंवार बंदीवानांनी भूमका उठवाव्या, आज लंडन पडले. अगदी नक्की! किंवा जर्मन विध्वंसिका अगदी आज रात्री अंदमानावर भडिमार करणार; अगदी नक्की! कशावरून पण? कोणी सांगितले हे? ''कोणी म्हणजे, बबर्जीने, कमिशनर साहेबांच्या बबर्जीने, त्याने स्वतः कमिशनरसाहेबास लखोटा फोडताना पाहिले!'' पण लखोट्यात हीच बातमी होती म्हणून कशावरून? ''कमिशनर साहेब तो लखोटा वाचताच एकदम खाली बसले आणि डोक्यावरची टोपी खाडकन टेबलावर आपटली!'' किंवा बारीसाहेबाच्या डोळ्यांतून पाणी आले. किंवा मिसीबाबा गुडघ्यात डोके घालून बसली!

अशा बातम्या जेव्हा जेव्हा ते बंदीवान आणीत आणि त्यांच्या सत्यत्वास वरील आधार देत, तेव्हा मला अगदी तशाच बातम्या अगदी निश्चित म्हणून धाडणाऱ्या पेशवाईतील रावबाजींच्या वेळच्या पत्रव्यवहारात यशवंतराव होळकरांनी इंग्रजांचा मोठा पराभव केल्याची एक बातमी गारपिरावरच्या वार्ताहराने मराठ्यांस कळविल्याचा उल्लेख आहे आणि त्यात त्या बातमीचा आधार म्हणून मुख्यतः हेच लिहिले आहे की, ''रेसिडेंटसाहेबांनी लखोटा वाचताच डोक्याची टोपी ताडकन भूमीवर आपटली!'' तोच आधार आणि तेच अनुमान दीडशे वर्षांजवळ काळ लोटला तरी हिंदुस्थानी वेडगळपणा करीत आहे; आणि तरीही इंग्रजी टोपी अजून ज्यांच्या डोक्यावरची डोक्यावर स्थिर आहे.

खरोखर गेल्या दीडशे वर्षांत इंग्रजांच्या राजकर्तृत्वाच्या चिकाटीत आणि सैनिक धैर्यात जसा फारसा फेर झाला नाही, तसाच त्यांचा त्या गुणांची पारख करून त्या मानाने त्या विपक्षाशी लढा देण्याची सिद्धता कशी करावी हे न समजणाऱ्या आमच्या वेडगळ भाबडेपणातही काही फारसा फरक झाला नाही! इंग्रज दीडशे वर्षांत फारसे विसरले नाहीत; आम्ही फारसे अधिक शिकलो नाही! टोपी आपटण्याच्या अगदी अक्षराने अक्षर समान असणाऱ्या वरील उद्गारावरून मला अंदमानात वारंवार असे वाटावे, आणि मी हिंदी बंदीवानांस म्हणावे, वेड्यांनो एका

लखोट्याने टोपी आपटणारा तो कोणी हिंदुस्थानी आहे की काय? तो इंग्रज आहे. हजारात एखादाच भ्याड निघेल. बाकी जेथे ते आहेत तेथे झूंजून घेतील. पहा तुमच्या हजारो बंदीवानांत दहा-पाच सिंह जसे शेळ्यांत निर्भय राहतात तसे राहत आहेत! टोपी आपटली! असे उकडले असेल! आपटली असेल! मिसिबाबाला खेळून डुलकी आली असेल म्हणून गुडघ्यावर मान ठेविली असावी! रणतरीच्या भयाने कशावरून?

## विपक्षाची कल्पना नीट असावी

विपक्षाशी तोंड द्यावयाचे तर त्यांच्या दोषांप्रमाणेच, किंबहुना दोषांपेक्षा त्यांचे गुणच अधिक परिचित करून पारखून ठेवले पाहिजेत. आणि म्हणूनच अंदमानात जाण्यापूर्वी मी ब्रिटिशांच्या शक्तीविषयी यथातथ्य कल्पना हिंदुस्थानी बांधवांस देण्यासाठी जसा प्रयत्न करी, तसाच अंदमानात त्या युद्धकालीही करीत राहिलो. विपक्षाची पोकळ बढाई करून आपल्या पक्षाचा अन्याय्य तेजोभंग करणे जसे घातक तसेच विपक्ष म्हणजे कःपदार्थ आहे असे सांगून स्वपक्षास खोट्या आशेच्या खड्ड्यात पाडणेही घातकच. त्या दिवसांत आपल्या हिंदुस्थानी साधारण जनसमूहातील जुन्या काळचा आफीमबाजी भोळेपणा जशाचा तसाच स्थिर आहे हे पाहून मला फार वाईट वाटे. आणि मी त्यांचा त्या भाबडेविषयी सारखा तीव्र उपहास करीत असे. जेव्हा त्या जर्मन रणतरी अंदमानाभोवती फिरत असल्याच्या बातम्या उठत होत्या तेव्हा कोणीतरी - विशेषतः मुसलमान बंदी- धावत धावत येऊन बाजारात सांगत, अहो त्या शेजारच्या अरण्यास काल जर्मन रणतरी लागली! आणि तिचा सेनानी चार तुर्कांसह त्या टेकडीवरून टेहळणी करून गेला! अहो चौकीदाराने प्रत्यक्ष पाहिले! काय त्या तुर्कांची दीप्ती! चार चांद अगदी छातीवर तळपत होते. चौकीदारास वाटले, चार तारे तळपत आहेत. त्या चार तुर्कांनी त्या जर्मनास काही समजावून दिले. जर्मन सेनानीने मर्यादेने प्रणाम करून ''जी हुजूर!'' म्हणून म्हटले आणि ते सर्व दिसता दिसता अदृश्य झाले!! अशी बातमी उठण्याचा अवकास की पोर्ट ब्लेअरभर तिच्या रंगीत सोनेरी आवृत्त्यावर आवृत्त्या निघू लागाव्यात. वर दिलेल्या बातम्या अगदी अशाच उठत. त्या आपणास कितीही विकृत वाटल्या तरी अरेबियन नाईटसारख्या पुस्तकातूनच ज्यांच्या सुलतान आणि खलिफाविषयी कल्पना झालेल्या होत्या त्या बंदीवानांत प्रथम तरी त्या अगदी विश्वसनीय वाटत. प्रथम आमच्याकडे त्या बातम्या खऱ्या की खोट्या विचारावयास ते हिंदु-मुसलमान दोघेही येत. कारण काही झाले तरी इंग्रजांची किंवा जर्मनीची अवास्तव बढाई न करता बारीच्या किंवा बंदीवानांच्या असंतुष्टतेस न जुमानून खरी दिसेल तीच बातमी जर कुठे मिळत असेल तर ती 'बडे बाबू' पाशीच होय अशी मुसलमानी बंदीवानांनाही निश्चिती वाटे. म्हणून ते येताच आम्ही त्यांच्यातील हा भाबडेपणा काढून टाकण्यासाठी उपहासाने आणि समजूत घालून या दंतकथा कशा खोट्या - दर्शनीच खोट्या दिसून येतात, ते सांगू. अनुभवही तसाच येत गेला. तेव्हा मागून मागून अशा अद्भुत आणि अतिशयोक्त वार्ता कोणी फारशा पसरवीतनासे आणि विश्वासितनासे झाले. राजकीय परिस्थितीचे जसे ज्ञान वाढले तसा कादंबरीय अद्भुत कथांचा काळ मावळत चालला.

बंदीवानांच्या या अचरट कथांनी हुरळून जाऊन ''चले भाई! आज चले, कल चले!'' असे म्हणणे हे जरी वेडेपण होते तथापि तसल्या राजकीय भूकंपाच्या धक्क्यात राज्येची राज्ये उलथीपालथी होत असता, हिंदुस्थानच्या

दैवासही उलटपालट करणारा एखादा धक्का बसणारच नाही असे गृहीत धरणे हेही वेडेपणच होते. त्यातही आम्हास क्रांतिकारकांच्या हालचालींची थोडीबहुत माहिती येत होती. तेव्हा अंदमानाच्या आजूबाजूला प्रबल जर्मन रणतरी फिरकू लागून इंग्रजांनीही अंदमानाच्या बचावाची सैनिकी सिद्वता आमच्या डोळ्यासमोर जेव्हा चालविली तेव्हा त्या सर्व प्रकारासा विचारात न घेता 'काही होणार नाही' म्हणून रडत आणि सडत पडण्याचा पंगूपणा करणे हे आम्हास अगदी मूर्खपणाचे आणि निकम्मीपणाचे वाटू लागले. हिंदी राज्यक्रांतिकारकांच्या योजनेप्रमाणे जर्मन रणतरी अंदमानावर आक्रमण करून आमची मुक्तता करण्याचा प्रयत्न करण्यास शक्यतो झटतील हे आम्हास संभवनीय वाटत होते. एकदोन वेळा तर ही गोष्ट अगदी झाल्यासारखीच होती. कारण जर्मनीच्या भटकणाऱ्या रणतरीने एकदा अंदमानास जवळ जवळ असहाय स्थितीत घेरून टाकले होते. कलकत्त्यास बिनतारी संदेश आर्थिक साहाय्याचे कमिशनरने धाडले ते वाटेत वाचून ह्या रणतरीने पुढे धाडले. आणि त्या संदेशानुरूप कलकत्त्याहून साहाय्य घेऊन साधारण गलबत येताच ते धरून ती थोरली रक्कम परस्पर मार्गातच गडप केली. अन्नाचा तुटवडाही अंदमानात एकदा-दोनदा तीव्रपणे भासला. कारण रंगून, कलकत्ता वा मद्रास येथील गलबते येणे-जाणे दोन महिने अगदी बंद झाल्यासारखे झाले होते. अशा घेरात अंदमान, निःसहाय होऊन कधी शत्रूच्या हाती पडेल हे सांगणे सोपे नव्हते. जर अशी वेळ आलीच तर?

तर ती संधी येण्यापूर्वीच त्या अपूर्व घटनेच्या प्रसंगी कसे वागावयाचे हे पूर्वीच न ठरविणे म्हणजे अजागळपणाची पराकाष्ठा झाली असती. ती संधी व्यर्थ गमविण्याचे पातक त्या अजागळपणावर येणारे होते, असे आम्हास वाटून आम्ही, जर क्वचित असा एकाएकी अद्भुत प्रलय झाला, अंदमान जर्मन रणतरीने भडिमार करून घेऊन त्यावर आपला अधिकार बसविला आणि तेथील सर्व बंदीवानांस मुक्त करून. . .

## निरपेक्ष सुज्ञपणाने बेत आखा.

जर्मन रणतरीचे हे बेत हिंदी क्रांतिकारकांच्या योजनेच्या परिचयाने आम्हास स्पष्ट दिसत होते. आमच्या वळणातील राजबंदी आणि साधारण बंदीवान यांमधील विश्वासू पुढाऱ्यांस आम्ही ते समग्र समजावून दिले. आणि असा प्रसंग येताच आपले कर्तव्य काय होईल त्याची एक सुसंगत योजना निवडक लोकांस सांगून ठेवली. त्या योजनेनुरूप बंदीवानांची मते बनविण्याचे काम वसाहतीत चालू होते. भाबडेपणाने इंग्रजांची सत्ता उलथेल असे समजू नका. परंतु अंदमानपुरते तरी ते अचानक छापा घालून इंग्रजांचे हातून हिसडून घेणे व काही काळापुरते तरी त्यास आपले केंद्र बनवून आजूबाजूस राज्यक्रांतीच्या ठिणग्या पसरून देणे हे जर्मन रणतरीस साधले तर चटकन साधून जाणारे आहे हेही विसरू नका. तर तशा प्रसंगी आपल्या हाती काय करणे शक्य आहे याचा विचार करून प्रथमपासूनच संघटितपणे स्वसंरक्षण आणि स्वकर्तव्य कसे करावयाचे ते ठरवा - आशाळू भाबडपणाने नव्हे तर निरपेक्ष सुज्ञपणाने ठरवा असे आम्ही सर्व बंदीवानांस सावधान करीत राहण्याचा यत्न करू लागलो.

जर्मन बेताची आणि हिंदी क्रांतिकारकांच्या आम्हां सर्वांस अंदमानहून सोडवून नेण्याच्या खटपटीची ही आमची धारणा बरीच साधार होती हे आता रौलट रिपोर्ट आणि इतर प्रसिद्ध वृत्तान्तावरून सिद्ध झालेलेच आहे.

पहिल्या वर्षामध्ये तरी हे त्यांचे बेत सफल होणे मुळीच असंभवनीय नसून एकदा-दोनदा तर ते सफळ होत आले होते हेही त्या वृत्तान्तावरून आणि युरोपियन अधिकाऱ्यांनी मागाहून स्वतःच सांगितलेल्या वृत्तावरून उघड आहे.

'एम्डेन' धरली जाताच सरकारास हे बेत नक्की कळून राजबंदीवानांच्या कारागारांभोवती एखाद्या लढाऊ किल्ल्यासारखी सज्जता कशी केली गेली हे मागे सांगितलेच आहे. त्यात एका देशभक्ताने बारीसाहेबास अशीही एक कंडी जाऊन सांगितली की, सावरकरास कारागारातून अचानक उचलून नेण्यासाठी जर्मनीचे वतीने एक विमानही येण्याची बोलणी चालली आहेत! त्या विमानाच्या काल्पनिक अवतरणास रोखण्यासाठीच की काय, त्या वेळेपासून नुसत्या तुरुंगातच असणाऱ्या गोऱ्या सैनिकांच्या पहाऱ्याचे जोडीस सशस्त्र, बंदुका भरून, पट्टे चढवून सिद्ध असलेल्या शिपायांची तुकडी त्या कारागारांच्या मध्यभागी असलेल्या एक उंच 'गुंटीचे' माथ्यावर दिवसभर सक्त पहारा देत बसविली गेली. युद्ध बंद झाल्यावरही कित्येक महिने ही व्यवस्था तशीच चालू होती. आमच्या हालचालींवर आणि बोलण्या-चालण्यावर जर्मन रणतरीच्या आक्रमणापासून अर्थातच अत्यंत कडक दृष्टी ठेवण्यात आली होती; आणि त्यामुळे व्यवसायी चुगलखोर वाटेल त्या खऱ्या-खोट्या कंड्या आमचे विरुद्ध पिकवून अधिकाऱ्यांची प्रसन्नता संपादन करण्यात चूर झाले होते.

त्यातही त्या वसाहतीत जेव्हा गोरी सैनिक पलटण येऊन उतरली तेव्हा तर अधिकच भर पडली. त्या गोऱ्या सैनिकांस त्या रुक्ष आणि एकान्त बेटात करमणुकीची इतर साधने नसल्यामुळे आमच्याविषयी, आमच्या क्रांतिकारक कृत्यांविषयी, जर्मनीशी असलेल्या आमच्या 'गुप्त संबंधा'विषयी मनसोक्त गप्पा मारण्याची तेवढीच एक वेळ घालविण्याची करमणूक उरली होती. त्यांच्या मंडळ्यांतून, टोळ्यांतून आणि चांगल्या शहाण्यासुरत्या अधिकाऱ्यांच्या चर्चेतून आमच्याविषयी आणि आम्हास सोडवू पाहणाऱ्या जर्मन रणतरीविषयी कोणत्या काल्पनिक आणि अद्भुत दंतकथा प्रचलित होत्या हे अनायासेच प्रकट करणारा कलकत्त्याच्या 'डिचरचा' 'कॅपिटल' मधील लेख प्रसिद्धच आहे! आणि त्याचा उल्लेखही क्वचित पुढे येईलच

## आमच्यामुळे जगास अंदमान कळले.

आम्हां हिंदी राजबंद्यांस संभाळणे तर मग इतके सुलभ नव्हते! जिवंत जगतास पारखे होऊन ते मेल्यासारखे समजून त्यांचा सर्वांस विसर पडावा म्हणून आम्हां सर्वांस अंदमानच्या ''काळ्यापाण्यावर'' नेऊन बंदीत टाकण्यात स्मशानातील पुरलेल्या प्रेताहून आता यांची अधिक चिंता करणे नलगे म्हणून बहुतेकांस हायसे वाटले. परंतु अंदमानामुळे आमचा विसर जगास पडला नाही; तर आम्हामुळे अंदमानाची आठवण जगास झाली. आणि कारागारास लढाऊ किल्ले करून आणि व्यापारी बंदरास विध्वंसिकांच्या आणि रणतरींच्या तोफांचा पहारा ठेवून आमचे रक्षण करावे लागले! या घटनांस पाहून आम्हास आमची जिवंतपणी मेल्यावरही अशी आठवण ठेवणाऱ्या आमच्या पूर्वकाळातील सहकाऱ्यांविषयी कृतज्ञता वाटल्यावाचून राहिली नाही आणि त्या कारागारात त्या अत्यंत भयंकर परिस्थितीतही एक प्रकारचे उत्तेजन आणि आधार मिळाल्यासारखे भासले. हे या ऐतिहासिक वृत्तांत न सांगता लपवून ठेवण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. केव्हा कोणाच्या चुगलीने आम्हावर राजकोपाचा कोणता आघात होईल हे त्या दिवसांत सांगणे शक्य नव्हते. ती चिंताही वाटत नव्हती असे नाही. तथापि त्या चिंतेतही

www.savarkarsmarak.com

हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नास महायुद्धात इतके आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त झाले हे पाहून राजबंदीवानांस थोडेबहुत समाधान न वाटणे अशक्य होते. आपल्या राजकीय महत्वाकांक्षाही या जागतिक भूकंपात सफल होतील, का मरुभूमीचे फळाफुलांनी डबडबलेल्या उद्यानात रूपांतर होईल, का केवळ फुलाफळांनी डबडबलेल्या उद्यानांचे जाळून पोळून रेताड मरुभूमी बनविण्यात या प्रचंड सामरिक भूकंपाचा शेवट होणार आहे?

ह्या चिंतेच्या, ह्या आशेच्या, ह्या भयाच्या खांद्यावर चढचढून ते राजबंदीवान अंदमानाच्या बंदीशाळेतील अंधाऱ्या कोठड्यांच्या निराश तमातून वर्तमानाच्या भिंतीपलीकडे भविष्याच्या प्रकाशास पाहण्यासाठी सारखे उत्कंठ होऊन राहिलेले होते!

प्रकरण चौथे

## अंदमानात शेकडो राजबंदीवानांचा लोट पुन्हा लोटतो !

जर्मन रणतरींच्या अंदमानावर छापा घालण्यासाठी या झटापटी चालल्या असता एक दिवस वर्तमानपत्राचा तुकडा आमच्या एका 'लेखक' सहकाऱ्याने हाती दिला. चाळीतील कोपऱ्यात तो उघडून छपून वाचू लागलो तो मथळ्यातच लिहिलेले आढळले - `Mutiny at Meerat. '

मेच्या संधीस मीरतला ठेवलेल्या सेनानिवेशामध्ये बंड करून उठण्याचा कट केलेला उघडकीस आला. कित्येक लोक धरले गेले. कित्येक पुढे फाशी गेले. ती सैनिक उठावणीची तार वाचताच अंगात थर्र झाले!

अठराशे सत्तावन वर्षी याच मीरतला याच मे महिन्याच्या संधीस सैनिक विद्रोहास प्रारंभ झाला. तीही एका क्रांतीच्या देशव्यापी कटाची नुसती ठिणगी होती. ही आजची मीरतची घटना खरीच का एखाद्या विस्तृत देशव्यापी क्रांतीच्या कटाची अकाली उडालेली ठिणगी आहे?

नसती तर तिला सरकार इतके प्रसिद्ध करण्याइतके महत्व देते ना?-- नसली तरी देखील या दहा वर्षांत केवढा फरक झाला! असंतोष, आवेदने, अभ्यर्थना, निषेध, कट, दंगेधोपे, आघात, प्रत्याघात, पिस्तुले, शस्त्रे, चकमकी आणि आता सैनिक उठावणी आणि बंडे यांच्या भुमका! कुठून गाडे कुठे आले!

सत्तावनच्या क्रांतियुद्धापासून 'बंड' हा शब्द या देशाच्या कोषात सहसा झळकला नव्हता! ती कल्पनाच उरली नव्हती. महायुद्धाचे आगीतून आज ती पुन्हा भडकली. देशाचे धाडस तापमापनाच्या या अंशापर्यंत चढले.

त्या दिवशी आणि त्या आठवड्यात राजबंदीवानांत आणि त्यांच्या संसर्गाने साध्या बंदीवानांत ही चर्चा आम्हीं वर दिलेल्या तुटक रूपरेखेत सारखी चालली होती.

तोच लाहोरची आणि पंजाबातील कटांची आणि क्रांतिकारक उठावणीची बातमी आली. बोलता बोलता लढाईवर जाण्यास नाकारल्यामुळे शिक्षा झालेले शिपाई आणि नंतर पलटणीच्या तुकड्यांच्या तुकड्या त्या कारागारात आल्या. देशात गडबड उडाली तिचा प्रत्यक्ष पुरावा मिळत चालला.

मागचा संप १९१४ च्या आरंभी संपला तेव्हा आम्हां जन्मठेपीच्या राजबंदीवानांस अंदमानास ठेवून, अवधीच्या बहुतेक राजबंदींस स्वदेशी कारागारात धाडण्याचे निश्चित होऊन त्याप्रमाणे ते धाडले गेले होते हे मागे लिहिलेच आहे. परंतु आता महायुद्धाच्या दंगलीमध्ये त्या अवस्थेस कोण पाळतो! मागचे परत धाडलेले नसले तरी महायुद्धाच्या समयी स्वदेशात जी क्रांतीची लाट उसळू पाहत होती त्यात सापडलेले राजबंदीवान बंगाल, संयुक्त प्रदेश आणि पंजाब येथून धरून आणून अंदमानात पुन्हा कोंबण्यात येऊ लागले. त्यामुळे ठिकठिकाणांच्या राजकीय बातम्या आणि युद्धाची बरीच विश्वसनीय माहिती आम्हांस मिळत गेली.

ज्या वेळेस जर्मन रणतरींनी अंदमानच्या समुद्रात एक दोन व्यापारी गलबते धरून आणि काही अडवून तो समुद्र रोधिला होता तेव्हापासून बरेच दिवस हिंदुस्थानातून बंदीवान अंदमानला धाडण्याचे बंद केलेले होते. तो

www.savarkarsmarak.com

समुद्र त्या जर्मन रणतरींचा जपानी, रशियन आणि इंग्लिश रणतरींनी नाश करताच जेव्हा निर्वैर भासू लागला, तेव्हा पुन्हा ते 'चलान' सुरू झाले.

आणि एके दिवशी लाहोरच्या क्रांतिकारकांची पहिली टोळी अंदमानच्या त्या कारागारात जन्मठेपीची शिक्षा होऊन आली. ते बहुतेक 'गदर' खटल्यातील शीख होते.

त्यांस पाहताच त्यांच्या त्या दुःखद स्थितीचा क्षणभर विसर पडून आमच्या तोंडून अपरिहार्य उद्गार निघाले- ''हे आले पहा शीख शेवटी! बोललो तसेच झाले!''

आम्ही विलायतेत क्रांतिकारक चळवळीत ज्या वेळेस पुढाकार घेत होतो तेव्हा एक दिवस एका शीख सहकाऱ्याशी शीख लोकांत राष्ट्रीय जागृती कशी उत्पन्न करावी याविषयी चर्चा चालली होती. पंजाबचे अनेक तरुण इंग्लंडमध्ये असत. त्या सर्वांस, पंजाब सैनिक भरतीचे केंद्र असल्याने तेथे झोपडी-झोपडीपर्यंत राष्ट्रीय जागृती करण्यास काय भिन्न प्रकारचे उपाय आणि युक्त्या केल्या पाहिजेत, याची एक योजना आम्ही सांगत असू. ती योजना आम्ही सांगत असता आम्हां हिंदूंतील एक प्रमुख भाग जो शीख पंथ त्यात जागृती करणे किती महत्वाचे आहे हे सांगू लागलो, तेव्हा ते शीख गृहस्थ किंचित निराशेने म्हणाले, ''शिखांस धार्मिक कूपमंडूकतेचा झालेला रोग बरा करून अखिल भारतीय ममत्व उत्पन्न करणे आणि त्यांच्या धार्मिक उत्साहास राष्ट्रीय वळण देणे सध्या तरी फार कठिण आहे. '' तेव्हा आम्ही म्हणालो, 'मित्रा, तूही शीख नाहीस का? मग तुझ्यासारख्या एखाद्या सरकारी मवाळ कुटुंबात जन्म आणि शिक्षण झालेल्या शीखातील उच्च वंशज तरुणास राष्ट्रीय धर्माची दीक्षा आणि त्यागाची शक्ती जर इतक्या थोड्या कालात देता आली तर काय इतर शीखांस ती देता येणार नाही? मी शीख इतिहास लक्षपूर्वक अभ्यासला आहे. मी सांगतो ही योजना पुढे ठेवून जर तुम्ही प्रयत्न कराल, स्वदेशात, परदेशात शीख भेटेल तिथे प्रयत्न कराल, तर पाच वर्षांच्या आत आपले ते शीख वीर तुमच्या खांद्याशी खांदा भिडवून लढताना तुम्हांस आढळतील!'' ही गोष्ट १९०८-९ च्या संधीस घडली होती.

त्या गोष्टीची आठवण आम्हास त्या कारागारात त्या वेळेस झाली. आणि आमच्या सहकाऱ्यांस म्हणालो, ''ते शीख पाहा आले की नाहीत? आता ते आपले नेपाळी बंधू तेवढे उरले. एकदा तो वीर गुरखा तेवढा हिंदुसंघटनाच्या शिबिरात आला की अखिल हिंदू एक झाला. ''

आमच्या त्या कालच्या मतमतांतरानुरूप हे भाव आणि भावना आमच्या मनात वारंवार उदय पावत. या शीखांच्या पहिल्या टोळीचे मागोमाग पंजाबातील ठिकठिकाणांच्या क्रांतिकारक प्रयत्नांतील शिक्षा लागलेल्या अनेक राजबंदीवानांच्या टोळ्या येऊ लागल्या. रंगूनकडे, सिंगापूरकडे, बस्रा इत्यादी स्थली लढाई करण्यास नाकारण्याच्या अपराधासाठी किवा बंड करून राज्यक्रांतिकारकांच्या पक्षास जाऊन मिळण्याच्या प्रत्यक्ष केलेल्या सशस्त्र विद्रोहासाठी शेकडो शिपाई लोकही मोठमोठ्या शिक्षा खाऊन अंदमानात आले. त्यांच्या येण्याने त्या वसाहतीतील लोकांत राजकीय मतमतांतराचा फैलाव फारच जोराने होऊ लागला. सिंगापूरला बंड करून उठलेले, तेथून सयाममधून रंगूनला जाऊन तेथे बंड करण्यासाठी सैनिकांत कट करणारे, काशीच्या कटातील शिक्षा झालेले, बंगाल्यातील सशस्त्र राजकीय दरोड्यासाठी शिक्षा झालेले - असे जवळजवळ शेदीडशे राजकीय बंदीवान त्या

कारागारात एकत्र होत चालले. या सर्वांची माहिती, त्यांची अद्भुत साहसे, त्यांच्या कटांच्या योजना इत्यादींचा उल्लेख तर राहोच; पण त्यांची केवळ नावे देखील देण्याची या स्थली शक्यता नाही. पुढील आवृत्तीत जमेल तर तसे करण्याचा योग येईल.

या राजबंदीवानांत ज्यांचा माझ्याशी पूर्वीचा प्रत्यक्ष परिचय होता असे म्हटले म्हणजे प्रो. परमानंद हेच काय ते होते. यांच्याविषयी आणि इतरांविषयीही शक्य ती माहिती आम्ही बंदीवानांस पूर्वीच सांगत असू. त्यायोगे आणि ते सर्व बंदीवान येताच त्यांच्या तोंडून त्यांच्या ध्येयाची, त्यागाची, त्यांच्यातील, ज्या शेकडो जणांनी फासावर किवा उघड सशस्त्र चकमकीत प्राणत्याग केला त्यांच्या अद्भुत चरित्राची, त्यांच्या कटांच्या योजनांची, लढाई प्रत्यक्ष पाहिलेल्यांच्या तोंडून फ्रान्स आदिक रणस्थानातील युद्धांची माहिती ऐकत त्यामुळे त्या वसाहतीतील राजकीय जीवनात फारच मोठा फरक झाला. त्या हजारो बंदीवानांस जगतातील उच्च वातावरणात झालेल्या घडामोडींचा विचार करण्याची बुद्धिशक्ती आणि क्षमता यावी आणि हिंदुस्थानच्या विस्तृत राष्ट्रीय जीवनात त्यांनी भाग घ्यावा असे शिक्षण देण्याचा जो आमचा प्रयत्न चाललेला होता त्यास या शेकडो राजबंदीवानांच्या आगमनाने महत्वाचे साह्य झाले.

त्यांच्यात माझ्या प्रत्यक्ष परिचयाचे असे प्रो. परमानंद हे जरी एकच गृहस्थ होते तरी त्यांच्यातील बहुतेकांस माझी माहिती होतीच. इतकेच नव्हे तर त्यांच्यातील बहुतेकांनी माझ्या लेखांचा आणि पुस्तकांचा अभ्यास केला होता. त्यांच्या मनात मजविषयी असलेल्या या पूज्य भावनेमुळे ते आत पाय ठेवताच माझ्या भेटीसाठी साहजिकच आतुर होत. अधिकाऱ्यांनी मला त्यांच्यापासून दूर ठेवण्याचा प्रथम पुष्कळ प्रयत्न जरी केला तरी शेवटी केवळ तितक्या मोठ्या संख्येस त्या कारागारात संभाळणे अशक्य झाल्यामुळेच त्यांच्याशी माझे दळणवळण सर्रास सुरू झाले. अमेरिकेतील 'गदर' पत्रात सत्तावनच्या क्रांतियुद्धाचे भाषांतर हिंदी, उर्दू आणि क्वचित पंजाबी भाषेत होत असे हे त्यांनी मला सांगितले. त्यांच्यातील एका गदर पक्षाच्या उच्च शिक्षित प्रमुख पुढाऱ्याने, ज्याने लाहोरच्या खटल्यात मरणाची शिक्षा होत असताही आपला बचाव करण्याचे साफ नाकारून क्रांतिकारक यत्न मी केलेच होते, मग बचाव तो काय करावयाचा म्हणून शेवटपर्यंत आपला निश्चय सोडला नाही, त्याने मला सांगितले की, ''मी एक हौशी मनुष्य होतो. राजकारणात काही भाग घेत नसे. पण एकदा एका स्नेह्याच्या आग्रहाने आपले सत्तावनचे क्रांतियुद्ध हे इंग्लिश पुस्तक वाचावयास घेतले. तो दिवस आणि संबंध रात्र ते वाचीत होतो. संपवून दूर ठेवले आणि तेव्हापासून माझे जुने जीवनही दूर झाले. मी राष्ट्राच्या विमोचनाची शपथ घेतली आणि येथपर्यंत आलो!'' आम्ही विनोदाने 'येथपर्यंत' या शब्दावर कोटी करून म्हटले तर मग ते पुस्तक म्हणजे अंदमानचे तिकीटच झाले आहे म्हणावयाचे!

पूर्वी सैन्यात चाकरी केलेल्या आणि नंतर स्वकष्टाने परदेशात जे हजारो रुपये त्याने मिळविले होते ते गदर पत्रात क्रांतिकारक लेख वाचताच त्या कार्यी निनावी दान देऊन टाकणाऱ्या एका वृद्ध शीख राजबंद्याने सांगितले की, चीनमध्ये केव्हा केव्हा तेथील प्रागतिक लोक हिंदुस्थानची चर्चा करता विचारीत की, ''तुमचे ते सावरकर कोठे आहेत? सध्या कोणत्या कारागृहात आहेत?'' यावर त्यांस आमच्या अंदमानातील घाणा फिरविणे इत्यादी कष्टांची माहिती या शीखांनी सांगताच ते कळवळून उत्कट दुःख प्रदर्शित करीत. आम्ही विलायतेत असता त्यावेळेस

सन्यत्सेनच्या पुढारीपणाखाली असलेल्या चीनच्या क्रांतिकारक केंद्रात आणि वर्तमानपत्रात हिंदुस्थानची माहिती प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असू. त्यापैकी काही चिन्यांस तरी आमची आठवण त्या १९१५-१६ व्या वर्षापर्यंत होत होती हे पाहून आम्हास ते विलायतेतील प्रयत्न अगदी विफल झाले नाहीत असे वाटू लागले.

## त्या तेलाने असंतोषाचा अग्नी भडकविला!

या घाण्याच्या गोष्टीवरून, आम्हास घाणा फिरवावा लागला ही बातमी अमेरिकेतच प्रथम कशी प्रसिद्ध झाली ती गोष्ट आठवली. या आमच्या शीख बंदीवानांपैकी काही शूर आणि ध्येयनिष्ठ शीखांना कर्तव्योन्मुख करण्यास ती गोष्ट उत्कटपणे कारणीभूत झालेली होती. ते सांगत, 'तुम्हास तेलाच्या घाण्यास जुंपलेले आहे असे चित्र क्रांतिपक्षाने छापलेले होते. ते अमेरिकेत विकीत चाललेल्या मुलांपाशी आम्ही पाहिले तेव्हा आम्हास अत्यंत खेद होऊन डोळ्यात आसवे उभी राहिली आणि वाटले ''अरेरे! आपल्या राष्ट्राच्या उद्धाराकरिता हे असले थोर पुरुष हे हाल सोशीत असता आपण दारूचे पेले उडवीत आणि पैसे मोजीत रममाण व्हावे ही केवढी लज्जेची गोष्ट आहे!'' या प्रकारच्या तीव्र पश्चात्तापाने राष्ट्रकार्यार्थ आपणही काही करावे अशी उत्कट इच्छा त्यांच्यात उत्पन्न होऊन त्यांनी तिकडे कमविलेल्या हजारो रुपयांच्या मत्तेस शेवटी लाथ मारून ते शीख, जे लोक हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी अमेरिकेहून हिंदुस्थानास शीर हातावर घेऊन निघाले त्यांच्याबरोबर निघते झाले.

या अशा आम्हाविषयींच्या त्यांच्या अनुभवाच्या प्रत्येकी ते किती तरी गोष्टी सांगत, त्यांतील एक-दोनच आठवणी वर दिल्या आहेत. शेवटच्या आठवणीचे आम्हास विशेषच आश्चर्य वाटते. कारण जेव्हा त्या काळ्यापाण्यावर एकांत कोठडीत आम्ही तो घाणा घेरी येईतो फिरवीत होतो, तेव्हा अनेक विचारात हा विचारही त्रस्त करी की, ''हेही कष्ट सोसले असते पण जर यांची वार्ता देशास पोचून तिकडच्या असंतोषाच्या अग्नीस अधिक चेतविण्यासाठी ती तेल होऊन त्यात पडती तर! पण ही बातमी, या अंधेऱ्या कोठडीतील हे कष्ट देशास कसचे दिसणार! ही बातमी देखील त्यांना कुठची समजणार?'' त्या विचारांचा विवेकाचे बळे तेव्हा कसा उपशम केला ते मागे दिलेच आहे. परंतु ही आठवण त्या माझ्या शीख मित्रांनी सांगताच मला अर्थातच वाटले की ''घे! ज्यांची बातमी देखील कोणास कळत नाही अशा यातनाही सोसल्याच पाहिजेत- त्या निष्फळ दिसणाऱ्या यातना सहन करणे हा राष्ट्राच्या एकंदर यातना सफळ करण्याचे कार्यक्रमात एक अपरिहार्य भाग असतो. म्हणून त्या कोणास न कळल्या तरी विशेष चिंता नको होती. पण योगायोगाने त्या यातनांची बातमी स्वदेशास पोचून त्यांचा प्रत्यक्ष उपयोगही झाला पाहा! त्या घाण्याने पडणारा तेलाचा थेंब थेंब त्या बादलीत गळत नव्हता, तर देशोदेशी प्रज्वलित झालेल्या असंतोषाच्या अग्निकुंडातच जाऊन गळत होता! हे घे त्याचे प्रत्यंतर!''

या शीखांपैकीच एकाने मला सांगितले की, त्याच्यापाशी असलेली माझ्या जप्त झालेल्या 'सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराची' प्रत त्याने ब्राझिलमधल्या एका मित्रास धाडली होती. पुस्तक भारतीय तरुणास इतके हवेसे झाले होते की, ती प्रत मित्रापासून हातोहात जात जात एकाने १५० रुपये देऊन विकत नेली.

अशा अनेक वैयक्तिक बातम्यांबरोबरच आम्हास त्या त्या कर्मक्षेत्रात ज्यांनी प्रत्यक्ष भाग घेतलेला होता अशा पुढाऱ्यांकडून आणि अनुयायांकडून सयाम, कॅनडा, सिंगापूर, ब्रह्मदेश, अमेरिका, युरोप, बंगाल, पंजाब इत्यादी

www.savarkarsmarak.com

अनेक ठिकाणी झालेल्या क्रांतिकारक कटांचा कोमागाटामारूपासून तो महायुद्धकालीन पंजाबातील उठावणीपर्यंतच्या अनेक सशस्त्र चकमकींचा आणि विदेशातील हिंदुस्थानी राजकीय परिस्थितीचा बहुतेक इत्यंभूत अगदी गुप्त आणि अगदी प्रकाश्य झालेला असा इतिहास पुष्कळ अंशी कळून चुकला. त्या वेळेस या एकंदर चळवळीस सुसंगत सूत्रात गोवून हिंदुस्थानातील १९०९ च्या आरंभापासून तो महायुद्ध संपेपर्यंतच्या कालातील क्रांतिकारक रत्नांचा एक संकलित इतिहास लिहिण्याची इच्छा आम्हास वारंवार होत असे. परंतु तेव्हा कारागारात ते लिहिणे अशक्य होते. पुढे कधी तो इतिहास लिहिण्याइतके स्वातंत्र्य लाभण्याची, आमची सुटका होण्याची संधी मिळेल हेही त्या काळी तितकेच अशक्य दिसत होते. तेव्हा असा इतिहास तुम्ही लिहिलाच पाहिजे म्हणून आमचे शीख आदीक सहकारी मित्र जेव्हा आग्रह धरीत, तेव्हा आम्ही गंभीर विनोदाने म्हणावे ''मित्रांनो! इतिहास करणे हे आपल्या पिढीचे मुख्य काम आहे. इतिहास लिहिणे हे दुय्यम. ते पुढील पिढी क्वचित करील!''

पंजाबातील लाहोरच्या 'गदर' खटल्यातील पहिली टोळी आल्याबरोबर कारागारात त्यांची व्यवस्था कडकपणे ठेवण्याची अधिकाऱ्यांनी शक्यती सक्ती केली. तथापि मागील अनुभवावरून सावध होऊन त्यांच्यातील सर्वांस सरसहा घाण्याचे काम न देता सशक्त आणि श्रमजीवी अशा काहीजणांस दिले; परंतु चंचुप्रवेश होऊ द्याल तर लवकरच तुमच्यातील प्रत्येकाकडून ते घाण्यास जुंपून तेल काढवितील. तेव्हा तुम्ही पहिले जे गेला आहात तेच मुळी घाण्याचे काम करण्यास नाकारा असा पूर्वीच्या सर्व मित्रांनी त्यांस अनुरोध केला. त्याप्रमाणे त्यांनी हे बैलाने करावयाचे काम आम्ही करणार नाही म्हणून साफ कळविले. पूर्वी राजबंदीवान मूठभर होते तरी त्यांचेकडून या घाण्यापायी कोण संप, दांडगाई आणि विरोध झाला ते न विसरलेले अधिकारी आता या चाळीस-पन्नास राजबंदीवानांच्या पंजाबी टोळ्यांशी भलताच आकस धरून बसणार नाहीत हे आम्ही जाणूनच होतो. याप्रमाणे एक आठवडाभर होईल ते तेल करा, आम्ही पुढे पुन्हा कोलू कोणास देणार नाही असे अधिकाऱ्यांनी बोलणे लावले. ही तडजोड मान्य करावी असा आम्ही अनुरोध देऊन ते प्रकरण मिटविले, आणि कोलूपायी मागच्या राजबंदीवानांनी ज्या चळवळी केल्या होत्या त्यांचा उपयोग या नव्या राजबंदीवानांस होऊन कोलूच्या ससेमिऱ्यातून ते सुटले.

पण तोच छिलका कुटण्यात एक भांडण झाले. त्या टोळीतील अनेक तिखट स्वभावी तरुण कारागारास पहिल्याच दिवशी साष्टांग दंडवत घालून शरण येणे शक्य नव्हते हे उघड दिसत असताही बारीच्या हाताखालील काही उर्मट पठाणादिक तंडेलांनी काम मोजून देता घेता या राजबंदीवानांतील काही जणांचा इतर बंदीवानांचा करावा तसा उपमर्द केला. त्याचा प्रतिकार त्या पाणीदार राजबंदीवानांनी तिथेच करण्यास कमी केले नाही. याचा प्रतिवाद बंदीपालापर्यंत जाऊन त्या राजबंद्यांपैकी जो झांशीकडचा एक अगदी निर्भय आणि निधडा परमानंद नावाचा तरुण होता त्यास बंदीपालाने कार्यालयात चौकशी करण्यास बोलाविले.

## परमानंदांनी बारीस मारले.

हा तरुण परमानंद प्रो. परमानंदाहून निराळा होता. पुढे कारागृहातील त्या 'नालंदाविहारात' यथेच्छ विद्याव्यासंग करून जे खरेखरेच स्नातक आणि अध्यापक झाले ह्यात या त्या वेळी तरुण असलेल्या परमानंदाचीही गणना होती. तेही विद्वता, त्याग इत्यादी गुणांनी त्या कारावासातच प्रोफेसराहून कोणत्याही

प्रकाराने कमी नसणारी योग्यता संपादन करते झाले. बारीची जन्माची सवय काही सुटणारी नव्हती. त्याने बोलाचालीत, सहज कोणी उभे राहते त्याप्रमाणे उभा असलेल्या तरुण परमानंदास हात सोडून 'नीट' उभे राहण्यास सांगितले. तो तरीही तसाच उभा पाहून संतापाने एक-दोन अश्लील शिव्या हासडल्या. अशा शिव्या बारीच्या गणतीतही नसत. परंतु त्या तेजस्वी तरुणास ती सवय नव्हती. बारीच्या तोंडून शिव्या निघताच हा त्याच्या सभोवती असणाऱ्या दोघां वॉर्डर जमादारांचे हातून सट्दिशी सुटला आणि भर कार्यालयात बारीच्या ताडकन श्रीमुखात भडकावता झाला. तो वाघासारखा तुटून येताना पाहताच बारी ओरडून उठू लागला तो तो आघात त्याचे टोपीवर पडून बारीची टोपी पडली, खुर्ची लवंडली आणि बारी ''पकडो मारो'' करीत कार्यालयातून बाहेर पडला. परमानंदास अर्थातच लोकांनी धरून ओठ फुटेतो, रक्त वाहितो तोंडावर आणि पाठीवर गुद्यांनी आणि दंडुक्यांनी मारले. बारीने घाबऱ्या घाबऱ्या पर्यवेक्षकास दूरध्वनी देऊन त्वरित बोलावले. तुरुंगात दंगा झाला, तशी धावपळ झाली. बंदीपालको, बारीको, बमगोलेवालोंने मारा! अशी ओरड झाली. पर्यवेक्षकाने येऊन परमानंदासच वेत मारण्याची आज्ञा दिली, आणि त्यास तिकटीशी बांधून कठोरपणाने वीस का तीस वेत मारण्यात आले. प्रत्येक वेतासरशी रक्ताचे फवारे उडाले. त्याचे अंग रक्तबंबाळ होऊन मांसाचे तुकडे वेताच्या सपासप घावाने फुटून निघाले. पण त्याचे तोंडून ब्र ऐकू आला नाही. वेताच्या पहिल्या आघातासरशी मोठमोठे बदमाष पण चित्कार करून गुरासारखे त्या कारागारात ओरडत असत. पण हा तरुण चूप! बारी म्हणाला, कसून मारो. वेतन कसकसून मारले; पण परमानंद उस्स करीना.

सर्व वेत मारुन संपताच त्यास मलमपटटी करून रुग्णालयात न नेता पुन्हा खोलीतच कोंडण्यात आले. अंदमानात राजबदींवानांना वेत मारण्याचा हा पहिला प्रसंग.

## शिव्या देण्याची बारीवर बंदी

या वेताचे परमानंदास जसे दुःख नव्हते तसेच राजबंदीवानांसही नव्हते. कारण परमानंदांनी आधीच बारीवर आक्रमण करून त्यास मारले होते, बारीची झालेली अप्रतिष्ठा, त्या परमानंदाच्या तिखटपणामुळे वसाहतीभर राजबंदीवानांचा बसलेला दबदबा-- या लाभासाठी वेत खाण्याचे मूल्य देणे त्यास फारसे महाग वाटले नाही. आमच्या मनुष्याने बंदीपालास मारले, तुम्ही त्यास वेत मारिलेत. कारागाराच्या निर्बंधानुरूप आम्ही ते विसरतो. परंतु बारीने शिव्या दिल्या त्याविषयी निषेध दाखविण्यापुरताच राजबंदीवानांतील कित्येकांनी संप केला, पर्यवेक्षक आणि बारी सर्वांस समजावीत फिरू लागले. पर्यवेक्षकाने स्पष्ट अभिसूचन दिले की, ''बारीस कोणाही राजबंदीवानास शिवीगाळ न करण्याविषयी सक्त आज्ञा मी सोडली आहे. पुन्हा असे होणार नाही. तुम्ही कामास आरंभ करा. जे होईल ते आणि तितके करा, पण करा. '' या आश्वासनानंतर ज्यांनी संप केला होता त्यांनी पुन्हा काम सुरू केले.

या पहिल्याच टोळीच्या प्रतिकाराने पुढे ज्या शीखांच्या आणि इतर राजबंदीवानांच्या टोळ्या आल्या त्यांना कामाविषयी फारसा त्रास पडला नाही. तरीदेखील मधून मधून कोणातरी लहानसहान राजबंदीवर बळ करून बारी कामाचा दर वाढविण्याचा प्रयत्न करी. कधी हे राजबंदीवान तीन पौंड दोरखंडे तेव्हाच संपवितात म्हणून चारपाच

पौंड केली पाहिजेत म्हणून आज्ञा सोडी. कधी छिलका वाढवी. कधी हळूच कोणास तरी कोलूवर धाडण्याचा बूट काढी. परंतु राजबंदीवानांतील कामाचा दर वाढविला की ते त्याचा प्रतिवाद करून, त्यास काम करीत नाही असे सांगत आणि बारीने त्याचे शेवटचे शस्त्र 'वेत मारीन' काढले की सर्वच काम सोडू म्हणून धाक घालीत. राजबंदीवानांतील झुंझारपक्षाने बारीची डाळ शेवटपर्यंत शिजू दिली नाही. या नित्य घासाघिशीमुळे राजबंदीवानांत कोणी ना कोणीतरी नेहमी इनकारीवर असे. बारीचे काम अधिक तर नाहीच परंतु पुरे असे देखील सर्व राजबंद्यांकडून कधी झाले नाही. तुरुंगाच्या दारावर ''एकंदर बंदीवानांपैकी काम करतात किती आणि करीत नाहीत किती'' म्हणून एक गणन प्रत्यही प्रसिद्ध करावे लागे. राजबंदीवान आल्यापासून त्या गणनात काम न करणाऱ्यांची संख्या शून्य अशी कधीच झाली नाही. असा एकसारखा कोणी ना कोणी प्रतिकार करीत ठेवला म्हणून बारीस आणि इतर अधिकाऱ्यांस अधिक अधिक दडपीत जावयाची संधी किंवा साहस करवले नाही.

## तंट्याचे मूळ सावरकर!

कारागारात युद्ध सुरू झाल्यापासून आमच्यावर अधिकाऱ्यांचा किती कडक पहारा होता हे मागच्या प्रकरणात सांगितलेच आहे. त्यातही जेव्हा हे शेकडो राजबंदीवान कारागृहात आले तेव्हा त्यांचे मनात मजविषयी असणारा आदर, विश्वास आणि पूज्यभाव पाहून मला त्यांच्यापासून शक्य तितके दूर ठेवण्याची बारी पराकाष्ठा करू लागला. पण ते अशक्य झाल्याने ज्यायोगे माझ्यावरील त्यांचा विश्वास उडावा असे नाना प्रकारचे प्रयत्न स्वतः करून आणि त्याच्या माणसाळलेल्या पाळीव हस्तकांकडून करवून त्यांचा बुद्धिभेद करण्याची सारखी खटपट तो शेवटपर्यंत करीत होता; आणि शेवटपर्यंत ती त्याच्या मनासारखी सफल होऊ शकली नाही म्हणून जळफळत होता. राजबंदीवान आणि साधे बंदीवान यांस सांगे, ''अहो या सावरकराचे नादी लागू नका; तो निष्कारण अधिकाऱ्यांचे रोषास बळी पाडील. तो अंगचुकार लबाड आहे. तुम्ही माझे माताप्रमाणे चाला. मी तुमचे कल्याण करवीन किंवा माझ्यावर तुमचा विश्वास नसेल तर ते पहा . . . अमुक अमुक गृहस्थ तेही तुमचे राजबंदीवानच आहेत. पण किती सभ्य आणि विनीत. त्यायोगे त्यांना पाहा आम्ही अधिकाऱ्याच्या जागा देखील दिल्या, नाहीतर तो आमचा सावरकर पाहा अजून छिलका कुटीत पडला आहे कोठडीत '' राजबंदीवानांस इकडे असे सांगत तिकडे अधिकाऱ्यास बारी सारखा आमचे विरुद्ध लिहीत राहिला की, ''हा मनुष्य सर्व तंट्याचे मूळ आहे. हा बंदीवानांस जर्मनीची बढाई सांगतो. इंग्रजांच्या पराभवाच्या बातम्या देतो. कट करवितो. उघडपणे पुढाकार घेण्यास शिक्षेच्या भयाने कचरत नाही. शीखांमध्ये याच्याविषयी असलेला पूर्वीचाच पूज्यभाव पाहून हा त्यांस भडकविण्याचा प्रयत्न करील. राजबंदीवानांवरील याचे वजन कितीही भांडणे झाली किंवा मी करविली तरी काही केल्या कमी होत नाही. हा महासाहसी आहे. '' मला अशा रीतीने एक असुधारणीय भांडखोर म्हणून अधिकाऱ्यांस वारंवार परिचित करून देण्यात बारीचा आणखी एक हेतू साध्य होत होता. तो म्हणजे हा की, त्यायोगे कारागृहात काहीही गडबड झाली तरी त्याचे उत्तरदायित्व आपल्या डोक्यावरून काढून चटकन माझेकडे बारीस त्यायोगे फेकता येई. ''ही सावरकरांची चिथावणी'' हे त्याचे पालुपद असे.

बारी स्वतःस जितका लुच्चा आणि पटाईत समजे तितका तो एका अर्थी भाबडा आणि मूर्ख असे. साधारण बंदीवानास ठकविण्यास जे त्याचे कौशल्य उपयोगी पडले ते जेव्हा तो राजबंदीवानांस ठकविण्यास उपयोजी तेव्हा मला तर हसू येई. एकदा त्याचे मनात आले की, आपण जर सावरकराविरुद्ध जे जे प्रतिवेदन केले आहे त्यातील थोडा भाग त्यास दाखविला तर मात्र तो भ्याल्यावाचून राहणार नाही. आणि मग राजबंदीवानांच्या संघटनेचे नेतृत्व सोडून देऊन त्यांचे काही होवो, आपण आपले हित पाहावे म्हणून पुढाकार घेणे सोडून देईल. असा काही विचार करून स्वारीने आम्हास कार्यालयात बोलावले. तेथे प्रमथतः आमच्या बुद्धीविषयी, विद्‌वत्तेविषयी व सार्वजनिक कामात निर्भय साहसाने झटण्याविषयी त्याने यथेच्छ स्तुती केली. (आणि राजबंदीवानांस हीच स्वारी सांगत फिरे, सावरकर अंगचुकार आहे) आणि नंतर आमच्या या गुणांचा आम्ही दुर्व्यय करीत असल्याने स्वतःस कसे धोक्यात पाडून घेत आहो याविषयी आमची कानउघाडणी करण्यास आरंभ केला. तुम्हाविषयी सहानुभूती वाटत असूनही मला तुमच्याविरुद्ध काय भयंकर प्रतिवेदने (रिपोर्टस्) लिहावी लागतात ही जर तुम्ही पहाल तर क्वचित आपण सावध व्हाल म्हणून मला तसे करणे अधिकारी या नात्याने सक्तपणे निषिद्ध असताही तुमच्यावरील लोभामुळे तुम्हास वाचून दाखवितो. असे म्हणुन स्वारीने आपली दैनिकी (डायरी) काढली आणि आमच्याविरुध्द त्याने वेळोवेळी काय लिहिले होते ते थोडे थोडे वाचून दाखविले. त्यांतीलच जी काही वाक्ये आम्हास आठवली ती वर दिली आहेत. आमच्या हिंदुस्थान सरकारकडे झालेल्या प्रत्येक आवेदनाविषयी (अर्जाविषयी) बारी दैनिकात लिही ''ही केवळ थाप आहे. सावरकर कशाही सवलतीने नमणारा व धाकाने काही दबणारा मनुष्य नाही. तो असुधारणीय आहे!'' हा उल्लेखही मला दाखविला आणि मी हे गौप्य फोडू नये म्हणून बजावले.

## राष्ट्रहितास विरोधी नसलेले वचन पाळले

येथेच आम्ही हेही सांगून टाकतो की, बारीने आमच्या विरुद्ध किंवा आमच्या सहानुभूतीचे जे काय 'गौप्य' म्हणून वेळोवेळी आम्हास सांगितले होते आणि आम्ही ते विश्वास देऊन ऐकले होते ते आम्ही केव्हाही त्याची हानी होईल अशा रीतीने कोणास सांगितले नाही. दिलेला विश्वास आणि वचन आम्ही राष्ट्रीय हितास विरुध्द नसेल तेथे तेथे शेवटपर्यंत पाळावे. आता बारीसाहेब दिवंगत होऊन अनेक वर्षे लोटली असल्याने त्या अनेक संवादांपैकी राष्ट्रीय हितार्थ या कारावासकथेत सांगणे जितके अवश्य तितकेच सांगत आहोत.

या अंदमानच्या वृत्तान्तात बारीसाहेबांच्या स्वभावातील कठोरपणाचेच उल्लेख आम्हास इतका वेळ वारंवार करावे लागले. परंतु बारीसाहेबांच्या स्वभावाची दुसरीही एक बाजू होती. तिचा उल्लेख कुठे तरी करणे हे आमचे कर्तव्य आहे. कोणाही मनुष्यास प्रमाणाबाहेर दोष देणे हा आम्ही अन्याय समजतो. बारी कठोर होता यात संशय नाही; परंतु बंदीपाल या नात्याने कठोरपणा धरणे हे त्यास बहुधा अवश्य झाले होते हेही ध्यान्यात ठेवले पाहिजे. हिंदुस्थानातील अत्यंत निदर्य,दुष्ट, पापी आणि एक पैशासाठी दुसऱ्याचा प्राण हसत हसत घेणाऱ्या अनेक अपराध्यांच्या भयंकर समुदायास शिस्तीत ठेवणे हे काम त्याचेवर बंदीपाल या नात्याने पडले होते. अशा उभ्या हिंदुस्थानात दांडग्यांतील दांडग्या आणि उलट्या काळजाच्या दंडित अपराध्यांतील निर्ढावलेल्या बदमाषांस शिस्तीत ठेवण्यास जनहितार्थाच कोणासही कठोरपणा स्वीकारावा लागेल. तसा तो बारीने स्वीकारला हा त्याचा

अपराध नव्हता हे आम्ही त्यास वारंवार सांगत असू. परंतु अशा लोकांत जन्म घालविण्याने त्याचा स्वभावच निदान बंदीगृहापुरतातरी कठोर, अनिरुद्ध, आणि निर्दय झाला होता. त्यामुळे त्यास चांगला आणि वाईट याची निवड करता येत नसे, हा त्याचा दोष असे. त्यास खरोखरीच वाटे तो पोर्ट ब्लेअरचा परमेश्वर आहे. त्याच्या असत्य असो, निर्बंधाविरुद्ध अन्याय्य असो, लहरीप्रमाणे जो वागेल, जो त्याची दासासारखी हाजीहाजी करील, तो चांगला, इतर वाईट ही त्याची मनुष्य ओळखण्याची व्याख्या होती. हा त्याचा दोष. निदर्यपणा ही त्याची एक करमणूकच झाली होती. तो अशिक्षित असल्याने बुद्धीच्या विकासामुळे ज्ञान, विज्ञान, कला इत्यादी शक्तींचा आणि रुचींचा त्याच्यात फारच थोडा विकास झाला होता. म्हणून त्या करमणुकी त्यास पारख्या होत्या. त्यामुळेच बंदीगृहातील उठाठेवी हेच त्याचे त्या एकांत वसाहतीतील सारे जीवन आणि सारी करमणूक झाली होती. तरी देखील तो बंदीगृहाबाहेर त्याच्या कुटुंब, इष्टमित्र इत्यादिकांच्या मंडलात इतका निदर्य नसे. इतकेच नव्हे तर कोणी चढविले म्हणून चढविलाही जात असे. विद्वत्ता नाही ही जाणीव त्यास असल्याने त्यास विद्वान म्हणावे म्हणून तो त्यास पाठ असलेल्या पाच-सहा इंग्लिश कविता थोडेसे चुचकारून घेतले की अगदी ऐटीत एखाद्या नटासारखा म्हणून दाखवी. आपल्या विद्वत्तेचा आमच्यावर पगडा पाडावा अशीही त्यास केव्हा केव्हा लहर येई, तेव्हा एका दमात सर्व म्हणून टाकी. आमच्याविषयी कारावासातील विरोध सोडला तर तो मनातल्या मनात खरोखर आदर बाळगी. त्या अंदमानास कारणपरत्वे जे जे व्यापारी, संपादक किंवा सैनिक वर्गातील यूरोपियन येत ते आम्हास पहाण्यास अवश्य येत. युद्धाचे दिवसांत रणतरीवरून येणारे यूरोपिअन नौकाध्यक्षादिक अधिकारीही आमची वास्तपुस्त करून भेटून आम्हाशी बरोबरीने संवाद करून जात हे तो पाही. तेव्हा त्याच्या मनात आदर उत्पन्न होई हेही साहजिकच होते. त्याच्या कुटुंबातील मंडळीत त्याची पत्नी फार देवलसी असे, आणि त्याची एकुलती एक सतरा अठरा वर्षाची मुलगी रंगूनला मॅट्रिकपर्यंत शिकून शिक्षक होत आली होती. बारीचा निदर्यपणा वारंवार मर्यादित करण्यास या दोन्ही महिलांचा बराच उपयोग होई. बंदीवान म्हणत, त्यास फार कठोरपणा करताना पाहून त्याची देवलसी पत्नी वारंवार रोधीत असे. त्या दोघींसही आमच्याविषयी व्यक्तिविषयक सहानुभूती वाटे. कुमारी बारी लहानपणापासून बारी मरणपावेतो जेव्हा जेव्हा रंगूनहून सुट्टीसाठी अंदमानात येई तेव्हा तेव्हा आमच्या भेटीस कारागृहातही येई आणि सहानुभूतीपूर्वक अर्धा अर्धा तास निरनिराळया विषयांवर संवाद करी. वैयक्तिक संबंधाने बारीच्या कुटुंबाशी आणि त्या त्या वेळी बारीशीही आम्ही तितक्याच घरोब्याने आणि लोभाने वागू. केव्हा केव्हा बारी बंगल्यावरून काहीना काही तरी फळफळावळही आम्हास धाडी. परंतु त्यात त्याचा एक गर्भित हेतू असे की, त्यामुळे तरी आम्ही सहजच सौजन्य म्हणून त्यास कृतज्ञ राहू. आम्ही सौजन्य म्हणून त्यांचा स्वीकारही- अगदी आग्रह होई म्हणून- करू आणि कृतज्ञेने त्यांचा येथे हा सार्वजनिक उल्लेखही करीत आहो. परंतु त्यामुळे राजबंदीवानांचा पक्ष सोडून देऊन, किंवा वसाहतीतील हजारो स्वदेशबंधूंच्या दुःखमोचनार्थ आणि उन्नत्यर्थ आम्ही चालविलेल्या शुद्धी, ज्ञानवितरण इत्यादी चळवळीतून अंग काढून घेऊन आपले तेवढे हिताहित पहात स्वस्थ पडून राहू ही जी बारीसाहेबांची एक आशा असे ती जेव्हा विफल होई आणि त्यांच्या अन्याय वर्तनाचा आम्ही पुन्हा प्रथमप्रमाणे विरोध करू तेव्हा मात्र त्याच्या त्या सौजन्याचा त्याला पश्चाताप झाल्यासारखा वाटे. आणि काही दिवस तो अगदी निष्ठुरपणाने वागू लागे. त्याच्या त्या वैयक्तिक सौजन्यास स्वीकारून त्याचे म्हणण्याप्रमाणे जे वागत आणि केवळ आपले दिवस कसे बऱ्या रीतीने निघतील याचीच चिंता वहावयाची हेच ज्यांनी आपले धोरण

निश्चित केले होते अशा आमच्यातील एका दोघा राजबंदीवानांस तो कार्यालयात केव्हा केव्हा बोलावी. त्याच वेळी आम्हाला पण बोलावी. परंतु जाणुनबुजून त्यांस खुर्ची देऊन काही लिहावयाचे काम देई- आणि आम्हास साध्या बंदीवानाप्रमाणे तिरस्कार्य अंतरावर वॉर्डरचे पहाऱ्यात उभे करी. हेतू हा की, त्यायोगे इतर सर्व बंदीवानांत आमची अप्रतिष्ठा व्हावी! आणि आम्हास बारीच्या सौजन्याने वश होऊन सार्वजनिक काम आपण का सोडले नाही असा पश्चात्ताप व्हावा !

## दोन्ही शंका त्याज्य

परंतु बारीने आमची अप्रतिष्ठा केली तर बंदीवानांत आमची प्रतिष्ठा उलट वाढत जाई हे तो विसरे. किंबहुना जेव्हा जेव्हा तो आमच्याविषयी त्याचे मनात वाटणारा आदर व्यक्त करण्यासाठी आम्हास काही भेट धाडी किंवा सौजन्य दाखवी तेव्हाच आमच्या सहकाऱ्यांपैकी दुसऱ्या अतिरेकास जाण्याचा ज्यांचा स्वभाव होता त्यांस आमच्याविषयी थोडेसे वावडे वाटे. आम्ही बारीची फळफळावळ का स्वीकारतो हा त्यांचा आक्षेप आहे. आम्ही यास दोन्ही शंकास त्याज्य समजून त्यांची समज पाडीत असू की, आपले त्या व्यक्तीशी काय शत्रुत्व आहे. तो किंवा त्याची कुटुंबीय माणसे जेव्हा स्नेहाने आणि आदराने वागू इच्छितात तेव्हा तेव्हा आपण व्यक्तिविषयक सौजन्य दाखविणे आपले सभ्यपणाच्या दृष्टीने कर्तव्य आहे. त्या त्यांच्या वर्तनाच्या आत जर विषारी हेतू असलाच तर ते विष आपण पचवीतच आहोत. तो हेतू आपण विफल करीतच आहोत. बारीस केव्हा आम्ही स्पष्टपणे सांगावे ‘आपल्या आग्रहाविषयी मी आभारी आहे परंतु ज्या परिस्थितीत आपण आणि मी सापडलो आहोत त्या परिस्थितीत आपणास सार्वजनिक कार्यात विरोध करणे हे मला प्राप्त आहे. तेव्हा ते स्वातंत्र्य राखून जर मला आपले आदरातिथ्य स्वीकारता येत असेल तरच आपण हा त्रास घ्यावा’ इतके स्पष्ट सांगून देखील तो आणि त्याची मंडळी कधी अत्याग्रहाने मला बोलावीत, बोलत, आणि सन्मानीत. तेव्हा व्यक्तिदृष्टीने मीही- त्यांचा हेतू तेवढ्यापुरता ते व्यक्त करीत त्याप्रमाणे निरपेक्ष आदरच आहे असे गृहीत धरुन, त्यांच्याशी कृतज्ञपणे वागे आणि तो सन्मान स्वीकारी.

खरी गोष्ट ही होती की, बारीचा स्वभावच दुरंगी होता. त्यास आदर वाटे, दयाही त्याचे ह्रदयात अगदी नव्हतीच असे नसे- पण जन्म कठोर व्यवसायात आणि लुच्च्यांशी अंशतःअपरिहार्य लुच्चेपणाने वागण्यात गेल्याने त्याच्या त्या उदार भावनेतही अनुदार वृत्तींचा थोडास बिंदू चुकूनमाकून पडल्यावाचून रहात नसे. त्याच्या कटुंबातील आणि इष्ट मित्रांतील मंडळी आमच्या इंग्रजी कविता वाचीत, आमचे पूर्वचरित्र औत्सुक्य आणि प्रशंसेने ऐकत आणि एकंदरीत आमच्याकडे आदराने पाहत. त्यांच्या विनंतीवरून आम्ही त्यांस काही इंग्रजी कविता लिहून दिल्या होत्या.

## एक दिवसाचा निरपेक्ष दयाभाव

एक दिवस मात्र, वर्षातून एक दिवस मात्र बारी स्वतः होऊन अगदी निरपेक्ष दयाभाव धारण करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करी. तो दिवस म्हणजे ख्रिसमसचा. त्या दिवशी मात्र- आयर्लंडातील रोमन कॅथलिक संप्रदायाचे पिढ्यान्पिढ्या झालेले संस्कार त्या पोर्ट ब्लेअरच्या पोटाळ परमेश्वरास देखील दमन करणे अशक्य होऊन बारीची

मुद्रा शांत आणि दयार्द्र दिसे. त्याचे कट्टर विरोधी राजबंदीवान देखील आपल्या दर्शनाबरोबर तिरस्काराने त्याच्या भुंवया वाकड्या करू शकत नसत. त्यांस देखील तो सन्मानाने कार्यालयात आमंत्रण देई आणि दहाबारा रुपये खर्च करून त्यांस मिठाई दूध, चहा देत असे.

अशा वेळी आम्ही बहुधा त्या मिठाईच्या मानास नाकारून त्याचे स्थली एक-दोन ताजी वृत्तपत्रे मागावी. बारीने हो ना करता करता ती द्यावी आणि पुन्हा मिठाई पण धाडावी ती धाडावीच. आम्ही गेलो नाही तर तो कोठडीत धाडून देई. त्या दिवशी सहसा कोणाही बंदीवानास तो कठोरपणाने वागवीत नसे. खटलेही शक्य तितके करीत नसे.

बारीसारख्या व्यावसायिक क्रूरतेने निर्ढावलेल्या मनुष्यासही एक दिवस तरी वर्षातून इतका सौम्य आणि सहृदय ज्या उपदेशाने किंवा रूढीने केले त्या प्रेषित येसूचा उपदेश किंवा ती कॅथलिक रूढी अगदीच विफळ झाली असे म्हणता यावयाचे नाही. आम्हां हिंदुस्थानी राजबंदीवानांसही येशू ख्रिस्ताच्या उपदेशाचा काही लाभ झालाच तर ! असा विनोदी विचार त्या दिवशी माझ्या मनात हटकून येई.

बारीच्या सौजन्याप्रमाणेच त्याचे स्वभावातील चाणाक्षपणही निर्भेळ नव्हते. जसे त्याचे सौजन्यही किंचित वक्र असे तसे त्याचे चाणाक्षपणही मूर्ख असे. कारण मूर्खपणाचे मूळ लक्षण जे स्वतःच्या शहाणपणाची मर्यादा न ओळखणे ते त्याच्यात स्पष्टपणे व्यक्त होत असे. म्हणूनच साधारण अशिक्षित बंदीवानास फसविण्यात किंवा नमविण्यात त्यास जो चाणाक्षपणा उपयोगी पडे त्याचाच उपयोग सर्वत्र होईल असे तो समजे. म्हणूनच मोठा फक्कड पेच म्हणून त्याने त्या दिवशी आम्हास कार्यालयात बोलावून ती त्याची दैनिकी आम्हास वाचून दाखविली! तिच्यामुळे आमच्याविरुद्ध खरोखरीच बारी काय लिहीत आला आणि वरिष्ठाकडे प्रतिवृत्ते धाडीत आला ते आम्हास स्वतः वाचावयास मिळाले. त्या वेळी - जरी बारी ती पाने झाकीत गेला तरी- त्याच्या राजबंदीतींल हस्तकांविषयीही त्याने केलेले अनुकूल उल्लेख - केवळ आम्हास भयंकर ठरविण्यापुरते का होईना - पण त्यांच्या तोंडची विश्वसनीय म्हणून दिलेली वाक्ये अंशतः पाहावयास सापडली. हे आमचे अनायासेच काम झाले. त्यास पाहिजे ते दाखविल्यास बारी अगदी महत्वाच्या मुद्रेने म्हणाला, पाहिलीत ना ही माझी 'डायरी'.

आमच्या विरुद्ध लिहिलेल्या त्या लिखाणाचा तिरस्कारपूर्व उपहास करीत आम्ही म्हणालो, ते काय विचारावे! मागे त्या रोमच्या सीझरने ठेवली होती ती दैनिकी नि या गांवढळ सीझरची ही! डायऱ्या दैनिक्या अशा जगात या दोनच. दोन्हीही पाहण्याचे भाग्य मला लाभले खरे.

जरा चिडून पण विनोदावारी नेत बारी म्हणाला, ''पण याचे तात्पर्य ध्यान्यात धराल तर तुमचे कल्याण आहे. तुमच्याविरुद्ध सरकारपाशी इतकी भयंकर प्रतिवृत्ते साचली आहेत. अजून तरी सावध व्हा. मित्र म्हणून मी सुचवितो; आणि आता या नव्या आलेल्या पंजाबी बंदीवानांच्या प्रकरणाशी तरी अगदी संबंध ठेवू नका. ते बहुतेक अशिक्षित, उनाड, भणंग, आणि मोलकरी होते. आले झालं राजकारणाच्या वावटळीत पैशाच्या लोभाने. त्यांनी डाके (दरोडे) मारले ते का? तुम्ही त्यांच्याशी बोलणे देखील तुमच्या थोरवीस शोभत नाही!''

मी शांतपणे पण निश्चयाने जे उत्तर दिले त्याचे तात्पर्य असे की- तो खरा शिक्षित की जो लोकांच्या दुःखाने कळवळून त्यांचे सुखासाठी स्वतःच्या यातनांस कःपदार्थ मानतो. हे पंजाबी, हे शीख, इंग्रजी जाणीत नसतील; पण इंग्रजी म्हणजे शिक्षण नव्हे. त्यांच्या राष्ट्रासाठी सुशिक्षितांच्या सहस्त्रांत दहांनीही, केला नसेल असा स्वार्थत्याग आणि प्राणत्याग करणारे हे निर्भय आणि सरळ शेतकरी आणि मोलकरी लोक हे मला प्रतिष्ठेत कोणत्याही राजबंदीवानाहून त्या नात्याने कमी वाटत नाहीत; म्हणून मी संबंध ठेवणार.

बारी कोणाची निंदा करू लागला म्हणजे तिचा निषेध करणे बारीस अगदी आवडत नसे. त्याचे तोंडापुरते जरी त्या निंदेस कोणी होस हो मिळवून दिले तरी तो प्रसन्न होई. पण हे माहीत असूनही आम्हास त्या पंजाबी शूर आणि प्रामाणिक स्वबांधवाची निंदा ऐकणे केवळ पापास्पद वाटून आम्हास त्याचे समर्थन केल्यावाचून राहवलेच नाही. त्यामुळे बारी चिडला. आम्हास तो फारच पाण्यात पाहू लागला. पण प्रत्यक्ष कोणाच्याही भयंकर खटल्यात धरण्यास त्यास आम्ही संधीच देत नसू. म्हणून तो नुसती चडफड करीत बरेच दिवस राहिला. नंतर दोन-चारदा आमच्यावर अशा कोण्या कटात पकडण्यासाठी काही बदमाषांस त्याने अगदी नेमून टाकले.

ही फूस मिळताच या बदमाषांचे आम्हावर किटाळ रचण्याचे प्रयत्न वारंवार होत राहिले. एक-दोनच उदाहरणे देऊ. एकदा तेथील एका ख्रिश्चन बदमाषाने आमच्या चाळीतील मोरीत एक सुरी लपवून ठेवली; आणि आम्ही ती कोण्यातरी अधिकाऱ्यास मारण्यासाठी आणविली अशी साक्ष देण्यास दुसऱ्या एका अशाच उलाढालीत पटाईत असणाऱ्या हिंदू बदमाषास सांगू लागला. सुदैवाने आमचे नाव त्या हिंदू बंदीवानास हिंदुसंघटणाचे आमचे प्रयत्न आवडून प्रिय झालेले होते. त्याने होस हो मिळवून आम्हास ती बातमी सांगितली. आम्ही तो कट बारीस कळविला आणि जर त्याची चौकशी न केली तर वरिष्ठ अधिका-यांस सांगू म्हणून दोघां राजबंदीवानांसमोर सांगितले. अर्थातच स्वारी नरमली आणि ते प्रकरण अंगाशी न येताच आम्ही बचावलो.

## बारीचे प्रयत्न कसे फसले

दुसऱ्या एका अगदी पट्टीच्या मुसलमान बदमाषास वेत मारले जाऊन तो लोखंडी 'पिंजऱ्यात' आमच्या शेजारी बंद करण्यात आला होता. त्यास स्वतःचे अपराधाची क्षमा मिळावी म्हणून त्याने आमच्या समोरचे दोन लोखंडी गज चाळीस बंद करण्यासाठी मारलेले होते, त्यांतून एक मुसलमान वॉर्डराकडून रातोरात लहान करवतीने कच्चे कापून ठेवले. त्याच्या कटात एक बर्माही होता. त्यांचा हेतू की साधले तर रातोरात त्या पिंजऱ्यातून आणि चाळीतून पळून जावयाचे. फसले तर ते गज आम्ही कापले होते, आणि आम्हीच पळून जाणार होतो म्हणून आम्हाविरुद्ध साक्ष देऊन आपण क्षमा मिळवावयाची. ज्या रात्री ते पळणार त्याच संध्याकाळी तंडेलास ते गज किंचित वाकलेले दिसून शंका आली. तो कट उघडकीस आला. तेव्हा त्या मुसलमान बदमाषाने आम्ही ते गज कापले आणि आमच्या समोरचेच ते असल्यामुळे आम्ही त्या रात्री पळून जाणार होतो म्हणून कळविले. पण चौकशी चालली तेव्हा त्या ब्रह्म साक्षीदाराने ती चुगली केली असा संशय येऊन त्याचेही नाव त्या मुसलमानाने दिले. पण धरला जाताच तो ब्रह्म साक्षीदार सत्याला जागला आणि त्याने रागावून त्या मुसलमान बदमाषाचाच खरा बेत उघडकीस आणून त्या मुसलमान बदमाष वॉर्डरासही धरून दिले. तेव्हा अर्थातच आमच्यावरील हे किटाळही टळले. याविषयी आम्ही

प्रत्यक्ष पर्यवेक्षकासही अशा प्रकारची किटाळे मजवर कशी रचली जातात आणि यास कारण बारीची बदमाषांस ''सावरकरांवर डोळा ठेवा'' ही असलेली चिथावणी होय असे स्पष्ट बजावले होते.

या घटनांहून निराळ्या प्रकारच्या आणखी एका घटनेत बारीने आम्हास गोवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता.

पंजाबी शीख राजबंदीवानांत चतरसिंह नावाचे एक राजबंदी होते. शीख शाळेत हे शिक्षक होते. त्यांनी एकदा शाळा निरीक्षणास आलेल्या एका मोठ्या इंग्रजी अधिकाऱ्यावर क्रांतिकारकांच्या गडबडीत सशस्त्र आक्रमण करून त्याचा वध करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांना जन्मठेप झाली. त्यांचा स्वभाव अत्यंत तापट असे. कारागृहात शीख बंदीवानांस साबण, तेल इत्यादी साधे पदार्थही केस धुण्यास न देण्याच्या, कामाच्या, शिवीगाळींच्या अशा अनेक प्रकारच्या सोसाव्या लागणाऱ्या अडचणींना वैतागून एक दिवस बंदीवानांचे वजन चालले असता त्यांनी इंग्रज पर्यवेक्षकावर चाल केली. त्या मारामारीत पर्यवेक्षक खुर्चीवरून पडल्यामुळे त्यास फारसे लागले नाही. परंतु एकाएकी कारागृहात पर्यवेक्षकास मारले म्हणून आरोळी उठून सर्व तंडेल, वॉर्डर, इत्यादिकांनी चतरसिंगास धरून बेदम मारले. त्या पर्यवेक्षकाने स्वतःच येऊन चतरसिंगास सोडविले म्हणून बरे. परंतु ही बातमी ऐकताच बारीने मीच चतरसिंगास चिथाविले म्हणून प्रतिवेदिले. (रिपोर्ट केला. ) त्याचे एकच दिवस आधी पर्यवेक्षक कधी कधी आमच्याशी राजकारणी बोलत, तसे बोलता बोलता आम्ही त्यांस प्रश्न केला होता की, तुम्ही हिंदुस्थानास देशीय स्वराज्य (Home Rule) देण्याच्या पक्षाचे आहात की नाही ? त्या प्रश्नाचा लाभ घेऊन बारीने म्हटले की, या प्रश्नावरूनच सावरकरांचे अंग दुसऱ्याच दिवशी झालेल्या त्या आक्रमणात होते असे सिद्ध होते. दुसरी गोष्ट अशी की, त्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी दोन-चार राजबंदीवानांनी पर्यवेक्षकापाशी जाऊन चतरसिंगाचा तीव्र निषेध केला होता; पण आम्ही तसे काही एक केले नाही. तुम्ही असे का केले नाही म्हणून बारीने विचारताच आम्ही सांगितले की, ''एका बंदीवानाने दुसऱ्याच्या कृत्यात तोंड घालू नये ही तुमचीच आज्ञा आहे ना ? माझ्या स्वतःच्या भावास जेव्हा आजार झाला आणि त्यास रुग्णालयात नेण्यात आले नाही; तेव्हा मी आपणांस आणि पर्यवेक्षकास तिकडे लक्ष देण्यास विनविले, तेव्हा तुम्ही स्वतःच्या सख्ख्या भावाचे संबंधात देखील ''तुम्ही बंदीवान, भाऊ असो वा नसो, तुम्हास दुसऱ्या बंदीवानाचेविषयी बोलण्याचे प्रयोजन नाही'' म्हणून धमकावले होतेत. मग आता चतरसिंगही अन्य बंदीवान. त्यांचे कृत्यामध्ये मी का तोंड घालू?'' म्हणून बारीस उत्तर दिले होते. तिसरी गोष्ट की, चतरसिंगास वेत मारणार म्हणून ठरत होते तेव्हा इतर राजबंदीवानांसह आम्हीही म्हणत होतो की, चतरसिंगने निर्बंधाविरुध्द आक्रमण केले तर निर्बंधविरुध्द रीतीने सरकारी हस्तकांनी त्यास गुरासारखे बडविलेही होते. ती शिक्षा झालीच आहे. पर्यवेक्षकास काही दुखापतही झाली नव्हती. तेव्हा आता वेत मारण्याचे कारण नाही. या आमच्या दोन तीन गोष्टी एकत्र जुळवून त्या कृत्याचे बुडाशी सावरकरबंधूच होते हे सिद्ध करण्याचा बारीसाहेबांनी प्रयत्न चालविला. चतरसिंगास त्यानंतर लोखंडी पिंजऱ्यात वर्षोनुवर्षे बंद ठेवण्यात आले होते. या प्रकरणी प्रो. परमानंदाच्या हाती सहज पडलेल्या एका चिठीवरून त्यांचा तर्क त्यांनी असा प्रसिद्ध केला आहे की ''ही सारी कारवाई बारीची असे. पर्यवेक्षकास सर्वच राजबंदीवानांविरुद्ध भडकविण्याची ही संधी आलेली पाहून बारीस आनंदच झाला होता. आणि म्हणूनच सावरकर बंधूंवर याचा सर्व दोष मढवून कारागृहातील सर्व अशांतीचे मूळ

कारण, सावरकरबंधूच असतात, त्यांस अशा अशांतीने आनंद होतो असा डांगोरा पिटण्यास त्याने आणि इतर अधिकाऱ्यांनी कमी केले नाही'' (प्रो. परमानंद कृत आपबीती)

लढाईचे दिवसांत आमच्याविरुद्ध वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत असे अनेक संशय उत्पन्न केले जात असल्याने आम्हास कोणत्या पेचात केव्हा गोवण्यात येईल याचा आम्हास आणि आमच्या इष्टमित्रांस केव्हाच थांग लागत नसे. या चिंताजनक परिस्थितीत आम्ही स्वसंरक्षणासाठी अर्थातच शक्यतो कारागृहाच्या निर्बंधाविरुद्ध स्वतः कधीही पाऊल टाकू नये म्हणून जपत होतो. परंतु स्वतः निर्बंधभंगाच्या कैचीत न गवसण्यासाठी जपत असताही आमच्या सहकष्टभोगी राजबंदीवानांच्या किंवा बंदीवानांच्या सुखदुःखार्थ केवळ उदासीन राहून आमच्या सार्वजनिक हितार्थ चालविलेल्या न्याय्य चळवळी सर्वस्वी सोडून देणे म्हणजे भ्याडपणा होय असे आमचे मन आम्हास सांगत असल्याने आम्ही अवश्य तेव्हा राजबंदीवानांच्या पक्षाचे उघडपणे समर्थन करून त्यांचेवरील अन्याय दूर करण्याचे कामी साधने योजण्यास कमी करीत नसू.

## शरीरस्वास्थ्य बिघडते

या १९१५ ते १९१६ इसवीचे मध्यंतरीच आमची प्रकृतीही ढासळावयास आरंभ झाला. १९१० व्या वर्षी विलायतेत प्रथम पकडला गेलो तेव्हापासून 'विलायती बंदीशाळा, हिंदुस्थानातील अनेक कारागृहे आणि अंदमानचे काळेपाणी या भिन्न भिन्न प्रकारच्या बंदीगृहांतून जे अनेक शारीरिक कष्ट सोसावे लागले, कौटुंबिक चिंता वहाव्या लागल्या, राजकीय चळवळींच्या उत्क्षोभक आणि चिंताजनक खटपटी कराव्या लागल्या, कदन्न, आरोग्यविघातक राहणी आणि कठोर परिश्रम यास तोंड द्यावे लागले त्या सर्व आपत्तींचा सतत ताण पडला असतानाही आमच्या शरीराने १९१५ व्या वर्षापर्यंत उत्तम प्रकारे टिकाव धरला. परंतु एकसारख्या अपक्व आणि निःसत्व अन्नाने प्रथम पचनक्रियेस त्या वर्षापासून बाधा होत चालली. आम्ही ती गोष्ट पर्यवेक्षकादी अधिकाऱ्यांच्या कानावर घालून पाहिली. परंतु त्याची वेळीच कोणी विचारपूस केली नाही. नंतर एक-दोन वेळा सडकून ताप आला; परंतु तापातही आम्हास इतर बंदीवानांप्रमाणे रुग्णालयात नेण्यात येत नसे. किंवा ताप उतरल्यानंतरही काही दिवस रुग्णालयात बरेसे जेवण देण्यात येत नसे. जरा ताप उतरला न उतरला की, पुन्हा कामावर धाडण्यात येई आणि ते ठराविक अन्न कच्चेपक्के जसे मिळेल तसे खावे लागे. त्यामुळे आवेचा विकार जडला. परंतु साधारण बंदीवानांना नुसते काम चांगले केले तरीही दूध देण्यात येत असताही आम्हास घोटभर दूध मिळेना. त्यामुळे भात त्या कारागारी 'डाळी'शी खावा लागे. पोळी बहुधा कच्ची असल्याने आम्ही ती सोडूनच दिली. पण त्यायोगे वजन उतरत चालले. पुढे डाळही पचेना. तेव्हा भात घ्यावा आणि त्यात नुसते निर्भेळ पाणी ओतून तो काला खावा असा क्रम काही दिवस ठेवला की, आवेचा उपद्रव कसा तरी टळावा. आवेने पोट मुरडून येई. भलत्याच वेळी पोट मुरडून आले की, अवेळी परसाकडे जाण्याची त्या कारागृहात जवळजवळ चोरीच झालेली असल्याने मोठा त्रास होई. ताप अंगात मुरत चालला. त्यानेही आव वाढे. शेवटी तो भातही पचेनासा झाला. कारण तो दोनचार दिवसांनी अर्धा कच्चा येई. आव अधिक झाली -इतकी अधिक झाली की- तिची डॉक्टरास निश्चिती होई इतका स्त्राव झाला पाहिजे- म्हणजे तो बघण्यास येणार. अशा वेळेस अगदी देवास नवस करण्यासारखी मनाची व्याकूळ स्थिती व्हावी, की देवा डॉक्टरच्या

समोरच जेव्हा शौचास बसवावयाचे तेव्हा ती आव एकदाची पडोच पडो ! कारण काही कारणाने तेव्हा आव पडली नाही किंवा पडून नुसता रक्ताचा बिंदू पडला की 'केवळ खोटे' म्हणून डॉक्टर निघून जावयाचे. आम्हा स्वतःस हा अनुभव अनेक वेळा आला आहे की पोट दुखे, रात्री बेरात्री रक्त पडे, आव पडे; पण योगायोगाने डॉक्टरच्या देखत ती न पडली की ते सर्व ''केवळ शंका!'' या वर्गात जावयाचे-जर ''अगदी खोटे'' या वर्गात गेले नाही तर ! अशा वेळी जेव्हा डॉक्टर यावयास आणि ताप यावयास किंवा आंव पडावयास एकच गाठ पडे तेव्हा त्या तापाचा आणि आवेचा एखाद्या वेळीच प्रसन्न झालेल्या देवतेसारखा, उपकार वाटे! अशी अपूर्व पर्वणी साधून आम्ही आजारी ठरलो तर एक दोन दिवसांच्या बऱ्या जेवणाने आणि आजारी वर्गास मिळणाऱ्या दुधाने पुन्हा ती आव बंद होई - की चाललेच पुन्हा कामावर ! पुन्हा ते अन्न, पुन्हा तो रोग !

याच सुमारास आमचे बंधूस, १९१४ व्या वर्षी यावज्जीवन काळेपाणी झालेल्या राजबंद्यास संपाचे शेवटी जो स्वतः स्वैंपाक करण्याचा अधिकार मिळाला होता त्याप्रमाणे, स्वैंपाक करण्याची अनुज्ञा मिळाली, आमच्या बंधूंनी शिधा घ्यावा आणि दहा वाजता कामाची सुटटी झाली म्हणजे तो आपण स्वतः एका स्वतंत्र नेमून दिलेल्या कोपऱ्यात शिजवावा. पुढे पुढे त्यांच्याबरोबर एकत्र स्वैंपाक करण्याची अनुज्ञा श्री. वामनराव जोशी यांनाही मिळाली. त्या दोघांस एकत्र जेवणखाण करता येऊ लागल्याने किती तरी सुख वाटू लागले. माणिकतोळ्याच्या बंगाली राजबंद्यांसही एकत्र ठेवले गेले. आमच्या बंधूंस अशी अनुज्ञा मिळाल्यावर त्यांनी काही भाजी, काही पोळी, असे एक-दोन प्रकार आम्हास छपवून धाडावे. कारण आम्हास स्वैंपाकाची अनुज्ञा तोवर मिळाली नव्हती. पुढे जेव्हा मिळाली तेव्हा जोडीदार घेण्याची परवानगी मिळेना; आणि स्वतःची प्रकृती आधीच बिघडल्याने स्वैंपाक करण्याचे कष्ट होईनात. लगेच ताप येई. म्हणून बंधू काय जे कधी कधी नरोटयातून लपून छपून धाडीत त्यावर दिवस कंठावे. त्यांच्या त्या नरोटीभर आमटीचा - आमचे बंधू पाकक्रियेत बरेच निष्णातही आहेत; निदान आमच्यापेक्षा तरी आहेतच ! स्वाद अगदी अमृतासारखा लागे. याचे कारण आमच्या बंधूंचे पाकनिष्णातत्व नसून हेही क्वचित असू शकेल की ज्या दिवशी आमटी नसेल त्या दिवशी केवळ निर्भेळ पाण्याशी भात खाण्याचा प्रसंग पडावयाचा. कारण ती कारागारीय डाळीची आमटी पचेनाशी झालेली आणि दुधाचे तर दर्शन दुर्लभ.

अशा स्थितीत प्रकृती दिवसेंदिवस क्षीण होत चालली, आणि सार्वजनिक कामाचा व्याप व कारागारीय त्रास तर वाढत चालला. हळूहळू अंगात प्रत्यही रात्री बेरात्री ताप चढतोसा वाटू लागला. पण तो अधिकाऱ्यांच्या स्थूल दृष्टीस प्रत्यक्षीभूत होण्यासारखा नसल्यामुळे तसेच विनाऔषध, विनाविश्रांती दिवस रेटावे लागले. तिकडे आमच्या बंधूंचीही अर्धशिशी वारंवार भडकून आणि त्या कुग्रास अन्नाच्या सातत्याचा परिणाम होऊन त्यांचीही प्रकृती खालावत चालली. शेवटी आम्हास आणि त्यांना दूध प्रत्यही किंचित मिळू लागले. पण ते इतक्या विकोपास प्रकृती गेल्यावर की त्या दुधास पचविण्याचे सामर्थ्य पोटास उरू नये.

याच संधीस राजबंदीवानांस क्षुब्ध करून सोडणारी आणखी एक दुर्घटना घडली. अशी तर एक-दोन राजबंद्यांची भांडणे आणि कामाच्या तुरळक आणि व्यक्तिशः इनकारी नेहमीच चाललेल्या असत. आणि अधिकाऱ्यांची अगदी मऊ पाहिले की पुन्हा कोपराने खणावयाची सवय आम्हास माहीत असल्याने आम्ही अशा प्रत्येक तुरळक वा आंशिक अन्यायाचाही प्रतिकार करण्यास उत्तेजन देणे आपले कर्तव्यच समजत होतो,

उदाहरणार्थ,छिलका सर्व राजबंदीनांकडून दीड पौंड घेण्याचा प्रघात पडत असता एक दोघां अल्पवयी बंगाली राजबंदीवानांस निवडून त्यांचेपासून मात्र दोन पौंड घेण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांनी करताच आणि त्याने त्याप्रमाणे काम न केल्याने शिक्षा देत देत अंती वेत मारू म्हणून धाक घालताच राजबंदीवानांच्या सार्वत्रिक संपाची भीती अधिकाऱ्यांस घालण्यात आली. तेव्हा शेवटी त्यास नावापुरते दोन पौंड लिहून, तो करू शकेल तितकाच छिलका त्याचेपासून करून घेण्याचे अधिकाऱ्यास मान्य करावे लागले. अशी भांडणे चालली म्हणजे त्या त्या व्यक्तींना मजपासून काढून शक्यतो दुसऱ्या भागात दूर ठेवण्यात येई की, त्यायोगे त्यांस प्रतिकार करण्याचे कामात पाठिंबा मिळू नये. या दीड पौंड छिलक्याचे भांडणातच एका बंगाली युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. चा अभ्यास करणाऱ्या प्रामाणिक आणि बुद्धिमान राजबंद्यासही काम इनकार करावे लागले. त्यांना ते काम दोन पौंड करणे फार त्रासदायक होई. आणि अधिकाऱ्यांचा हट्ट ते केलेच पाहिजे. शेवटी त्यांनी अनेक शिक्षा खाल्ल्या व अंती त्यांस वेत मारण्यात आले. राजबंद्यास वेत मारण्याची क्रूर शिक्षा - केवळ त्यांस कठिण परिश्रमाची कामे इतर जन्माभ्यासी श्रमजीवी कामकऱ्यांप्रमाणे करता येत नव्हती म्हणून देण्यास कमी न करण्यात अधिकाऱ्यांचा जितका तिरस्कार्य हट्ट दिसून आला तितकाच त्या एम्. ए. पर्यंत शिकलेल्या उच्चकुलीन बंगाली तरुणाचा ते वेत शांतपणे एकही चित्कार मुखातून निघू न देता सहन करण्यात एक अनुकरणीय सात्विक निश्चय आणि धैयशाली तितिक्षाही दिसून आली. या सदा चाललेल्या अशा घासाघिशीने एका व्यक्तीस जरी वेळेवर त्रास पडला तरी त्यायोगे एकंदर राजबंदीवानांवर कामाचा बोजा टाकणे अधिकाऱ्यांस फार जड जाई. छिलकाच दोन पौंड जेथे पुरा मिळेना तिथे कोलूचे नाव कोण काढू देणार ! पंजाबचे राजबंदीवान आल्यापासून तर पोर्टब्लेअरच्या कारागारातील खालच्या अधिकाऱ्याचे शिवराळ शौर्यही राजबंदीवानांपुढे फिक्के पडले. कारण त्या राजबंदीवानांत शेतकरी, हस्ताश्रमी, सुतारादीक व्यवसायी असे गावागावातील लोक असल्याने त्या शिवराळ तंडेलादिकांच्या पितामहांनी ऐकल्या नसतील अशा वेचक शिव्या त्यांस पुष्कळ येत होत्या. आणि आमच्याप्रमाणे त्या वेळेवरही न उच्चारण्याइतकी त्यांची जीभ असमयज्ञही नव्हती. म्हणून त्यांस कोणी तंडेल अरे म्हणताच त्यास त्याच भाषेत ते का रे म्हणून ठणकावून देत. आईस आईच नव्हे तर आजी आणि बापास त्याचा आजा. अशा प्रमाणाने त्या शिवराळ तंडेलादिकांच्या पूर्वजांचा उद्धार राजबंदीवानांकडून होऊ लागला. त्यामुळे आम्हास ज्या विद्येचा उपयोग स्वभावपरत्वे स्वतः करता येत नसे तिचा प्रयोग आमचे सहकष्टभोगी करण्यास कचरत नाहीत हे पाहून आम्हास बरेच वाटे. कारण त्यामुळे जी बोथट करता आली नाहीत ती त्या नीच आणि भाडोत्री गुंडांची शिवराळ शस्त्रे त्याच शिवराळ हलकटपणावर घासून बोथट झाली. हे सांगणे नलगेच की, स्वदेशाकरिता कोणाही तथाकथित सुशिक्षिताहून ज्यांचा स्वार्थत्याग कमी नव्हता आणि प्रामाणिक सच्छीलतेत जे कोणाही तथाकथित नागरिकाहून हीन नव्हते अशा त्या आमच्या अशिक्षित गावकरी राजबंदीवानांकडून कोणाही बंदीवानास निष्कारण शिवीगाळ वा पीडा होण्याची भीती फारच थोडी असे. उलट त्या बंदीवानांसाठी त्या राजबंदीवानांनी प्रत्यही काहीना काही झुंज करीतच असावे.

अशा तुरळक आणि वैयक्तिक झुंजी जरी चालत आणि त्यांचा राजबंदीवानांचे प्रतिकारसामर्थ्य जिवंत ठेवण्यास आणि अधिक त्रास देण्याची अधिकाऱ्यांची प्रवृत्ती मारण्यास उपयोग होतो असे जरी आम्हास वाटे तरी

एकंदरीत आम्ही तेव्हा कोणत्याही कारणाने शक्यतो सार्वत्रिक संपापर्यंत गोष्ट जावी अशी इच्छा करीत नव्हतो. कारण मागे अंदमानातील 'प्रचार' या प्रकरणात आम्ही वर्णिलेल्या आमच्या योजनेनुरूप आमचे ते नवागत राजबंदीवान बंधू निरनिराळ्या प्रकारचे बौद्धिक शिक्षण घेत होते आणि संपादिलेल्या ज्ञानाचा अमेरिकेसारख्या दूर खंडात प्रत्यक्ष निवसून उपार्जिलेल्या व्यवहारचतुरतेचा आणि देशभक्ती, लोकसेवा इत्यादी उदात्त भावनांचा त्या बंदीवानांच्या वसाहतीत सारखा प्रचार करीत होते, त्यांच्या प्रगल्भ शिक्षणाचे आणि त्यांच्याकरवी चाललेल्या बंदीवानांतील शेकडो लोकांमधील प्रचाराचे महत्व मला, अनावश्यक आणि केवळ घासाघासी पुरत्याच केलेल्या संपांहून पुष्कळ अधिक आणि चिरस्थायी वाटे. परंतु अशी माझी इच्छा असताही वर उल्लेखिलेल्या दुर्घटनेमुळे आणि पुढे निर्देशिलेल्या हिंदुस्थानातील राजकीय परिस्थितीमुळे असा एखादा मोठा संप्रकरण हे राजबंदीवानांचे कर्तव्य आहे असे मला वाटू लागले आणि माझ्या मताच्या मंडळींसह आम्ही तो घडवून आणण्यासाठी निर्धाराने झटू लागलो.

प्रकरण पाचवे

# चौथा संप आणि शरीरस्वास्थ्याचा बिघाड

ती दुर्घटना अशी की, भानसिंग नावाच्या एका शीख राजबंदीची तंडेल आणि पेटी ऑफिसरशी बोलाचाली होऊन त्यांनी भानसिंगास खोलीत बंद केले आणि बारीस बोलावून आणले. बारीने भानसिंगास खोलीत शिरून शिव्या देताच त्यानेही बारीसाहेबास उलट शिव्या दिल्या. त्यामुळे संतापून बारीने त्याच्या पट्टेवाल्या सेनेस ''इसको ठीक करो'' म्हणून खूण केली. या 'ठीक करो'चा अर्थ आम्ही मागे सांगितलेलाच आहे. ती खूण होताच दहा-पाच तंडेल, पेटी ऑफिसर इत्यादी मंडळी दंडे घेऊन खोलीत घुसली आणि त्यांनी भानसिंगास बेदम पिटण्यास आरंभ केला. तो एकटा शक्यतोवर त्यांच्याशी उलट मारहाण करीत राहिला. शेवटी त्या उतार वयातील शिखास त्या मंडळीने खाली पाडून दंडुक्यांनी ठेचून काढला. त्याचे ते त्या वेळचे आक्रोशणे सर्व कारागारात ऐकू आले. ''अरे मारा ! भाइऔं मेरेको मारा !'' अशा त्याच्या आरोळया ऐकताच त्याच चाळीत खाली बंद असलेल्या पाच-सहा राजबंदीवानांचा राग अनावर होऊन ते एकदम उसळून बाहेर आले आणि हातात सापडेल ते घेऊन वर चढले. बारी भानसिंगाचे वरचे मजल्याचे दार लावून उभा होता. राजबंदीवान, बारी बाहेर येताच त्यास मारण्यासाठी वर घुसत आहेत हे पाहताच भानसिंगास ठेचणे सोडून तो झटकन त्या वरच्या मजल्यास असलेल्या गुंटीचे दार उघडून त्या जिन्याने बाहेर पडला. भानसिग्ंच्या या मारपिटीची ही माहिती तेथे प्रत्यक्ष उपस्थित असलेलया राजबंदीवानांच्या आणि इतर बहुतेक राजबंदीवानांच्या तोंडून जशी ऐकली तशीच वर्णिली आहे. इतकेच नव्हे तर पुढे आम्ही सांगणारच आहो त्याप्रमाणे दोघां प्रमुख राजबंद्यांनी ती लेखी कथनात अधिका-यांस अशाच प्रकारे कळविली होती.

मारा ! भाअऔं मेरेको मारा ! या आरोळ्या आणि मारहाणीची धांदल शेजारच्या चाळीत ऐकताच आम्हास कळून चुकले की, आज कोणास तरी ''ठीक करण्यात'' येत आहे. भानसिंगाचे नाव ऐकताच फार वाईट वाटले. मारहाणीच्या वेळी बारीचा केवळ हुकूम म्हणून आत घुसलेल्या, पण भानसिंगास न मारता इतरांसह नुसते मारण्याचे ढोंग करणाऱ्या एका पेटी ऑफिसरनेही ही माहिती खरी आहे असे सांगितले. ती जेवण्याची वेळ होती. आमच्या चाळीतील दोघां प्रमुख राजबंदीवानांसह आम्ही या आततायीपणाचा त्रीव निषेध करण्याचे नक्की केले आणि चाळीचाळीत पत्र पाठविण्यास सुरुवात झाली. राजबंदीवान या मारहाणीने भिऊन न जाता संतापून गेले आणि सार्वजनिक संपाची भाषा सुरू झाली. एक दोघंनी तर. . . हीही भाषा उच्चारली पण. . .

ही गडबड बारीस कळताच, प्रबळ प्रतिक्रिया पाहताच घाबरण्याच्या त्याच्या स्वभावानुरुप तो दचकला. संध्याकाळी मला भेटायला आला तेव्हा मी त्यास स्पष्ट सांगितले की, तुम्ही विचारता म्हणून सांगतो की, तुमच्या आततायीपणाचा कळस होत चालला आहे, याचा परिणाम आम्हाला आणि मला तर भोगावा लागेलच; पण परिणामी तुम्हालाही भोगावा लागेल. त्याने सर्व दोष भानसिंगावर टाकून तो मला डसला इत्यादी निमित्ते सांगितली. मी म्हटले ते सत्य होते असे गृहीत धरले तरी देखील तुम्ही त्यास निर्बंधाप्रमाणे खटला करून वेत

मारावयाचे होते; पण हा छळ का केलात? भानसिंगास रक्त ओकेतो मारलेत ही गोष्ट तेथील राजबंदीवान आणि बंदीवान एकमुखाने सांगतात ती गोष्ट खोटी नाही.

पर्यवेक्षकाकडे दुसऱ्या पाहणीचे दिवशी ठरल्याप्रमाणे राजबंदीवानांतील निवडक लोकांनी या प्रकरणाची चौकशी करून बारीस शिक्षा करण्यात यावी म्हणून मागणी केली. परंतु उलट ज्या राजबंदीवानांनी बारीस घेरण्याचा आणि भानसिंगास सोडविण्याचा प्रयत्न केला होता त्यांसच धाक- दपटशा देण्यात आला. तेव्हा संपकरणे निश्चित झाले.

याच वेळेस हिंदुस्थानातून बातमी आली की, राज्यघटनेत कित्येक नवीन अधिकार देण्यासाठी जी चर्चा चालली होती तिच्याविषयी चौकशी करण्यासाठी जे प्रयत्न आम्ही करीत होतो त्यात विशेष लक्ष अर्थातच या गोष्टीकडे असे- हिंदुस्थानातील राजकीय जगाच्या दृष्टीपुढे राजबंदीवानांचा प्रश्न हा सदोदित प्रामुख्याने तळपला पाहिजे. जे त्या प्रश्नास शिवण्यासही भीत त्यांना देखील तो टाळता येणे अशक्य व्हावे, इतक्या तीव्रतेने राजबंदीवानांच्या यातनांची कहाणी हिंदुस्थानच्या हृदयात शल्याप्रमाणे सतत बोचत ठेवली पाहिजे. हिंदुस्थानास संतुष्ट करण्यासाठी ज्या काही गोष्टी करणे अपरिहार्य आहे त्यांत राजबंदीवानांची सुटका ही एक गोष्ट आहे हे अधिकाऱ्यांचे मनावर ठसविण्यासाठी अंदमानात चळवळ जिवंत ठेवणे हे जसे अवश्य होते तसेच ती माहिती हिंदुस्थानात निरंतर पोचवून लोकांची मने हादरून जातील अशा त्रीवतेने ती त्यांचेपुढे धरणे हेही अवश्यच होते. या सर्व प्रकरणासाठी माँटेग्यूसाहेब येण्याचे संधीसच पोर्टब्लेअरच्या राजपीडितांविषयी काहीतरी उत्क्षोभक परंतु सत्य घटना प्रसिद्ध करावयाची असेल, तर ती प्रथम पोर्टब्लेअरमध्ये घडविली पाहिजे. भानसिंगाच्या या क्रूर छळाचा प्रतिकार करण्यासाठी शेकडो राजबंदीवानांनी केलेला संप ही तशी घटना होणार होती आणि म्हणूनच या उद्देशानेही संपाची उभारणी नेटाने करणेचे आम्हास इष्ट वाटले.

संपाचा प्रत्यक्ष पुढाकार जुन्या राजबंदीवानांनीच घ्यावा आणि सर्वांचे वतीने त्यांनीच मागण्या सांगाव्या असे काही बांधवांचे म्हणणे पडले. परंतु त्यायोगे संपाच्या मुख्य हेतूचीच नव्हे तर प्रसंगविशेषी राष्ट्रीय कार्याचीही हानी होण्याचा कसा संभव आहे हे मी माझ्या सहकाऱ्यांस समजावून दिले. प्रत्यक्षच पुढे झाल्यामुळे बारीस आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांस जी हवी ती संधी मिळून, मला आणि जुन्या राजबंदीवानांना अलीकडेच ज्या थोड्याबहुत स्वतंत्र फिरण्याच्या सवलती देणे केवळ निर्बंधरीत्या (According to Jail Rules) निरुपाय म्हणून अधिकाऱ्यांस भाग पडले होते त्या सर्व सवलती काढून घेऊन मला खोलीत रात्रंदिवस पुन्हा कोंडून ठेवण्यात येईल. त्यामुळे संपाची बातमी हिंदुस्थानात पोचविण्यासाठी माणसे धाडणे, पत्र धाडणे, युद्धाच्या बातम्या बाहेरून नियमाने आणून देणाऱ्या साहाय्यकांपासून वर्तमानपत्रे घेणे, ती लपून छपून वाचणे, संपामुळे बंद झालेल्या राजबंदीवानांच्या बातम्या परस्पर पोचवून त्यांना एका दावणीत धोरणाने वागता यावे असे बेत करणे आणि कळविणे ही सर्व संपाचे दृष्टीने अत्यंत महत्वाची कामे करणे खोलीत आम्हीच बंद होऊन पडल्याने फार कठीण होणार. दुसरे की, गेल्या चार-पाच वर्षांत कारागाराच्या अत्यंत क्रूर अशा पहिल्या प्रबळ टकरीस आम्हास तोंड द्यावे लागल्याने आम्हा सर्वच जुन्या राजबंदीवानांच्या प्रकृतीवर हानिकारक परिणाम होऊन त्या खंगून गेल्या होत्या. आम्हास आणखी हातकड्या, कोठडीबंद्या, कुग्रास अन्न आणि प्रसंगी वेत खाण्याचाही उपचार करावयास

भाग पाडणे म्हणजे आमच्या जिवासच धोक्यात घालणे होते आणि तेही संपासारख्या तात्कालिक आणि स्थानिक फुटकळ कार्यासाठी ! अशा कार्यी जीव देण्यास निघणे म्हणजे केवळ राष्ट्रीय हिताचीच हत्या करणे होते. एकदा पुढे पाय टाकल्यावर तो मागे घेणे अधिकच हानीचे होते. त्यापेक्षा आता ही संप, प्रतिवाद, अनकाऱ्या इत्यादी स्थानिक चळवळ नवीन आलेल्या ताज्या दमाच्या शे सव्वाशे मंडळींतील लोकांनीच काही दिवस पाळीपाळीने अंगावर घेऊन चालवावी हेच अधिक युक्त होते. तिसरे महत्वाचे कारण जे विशेषतः मीच काम सोडून पडणे अनिष्ट ठरविणारे होते ते हे की, त्यायोगे माझा हिंदुस्थानात पत्रही टाकण्याचा अधिकार त्यामुळे छिनला जाता. वर्षभर ज्याला कारागारीय कोणतीही शिक्षा नाही त्यास वर्षातून एक वेळ पत्र टाकता येणार. मी बंद होतो तर पत्रही बंद होते. पण माझे पत्र बंद होणे म्हणजे संप तर राहोच परंतु राजकीय बंदीवानांच्या सुटकेच्या प्रश्नाचीच महत्वाची हानी करणे होते.

कारण की, राजबंदीवानांत ज्या एका-दोघांच्या पत्रांस हिंदुस्थानातील पुढाऱ्यांच्या वृत्तपत्रांच्या आणि जनतेच्या कानापर्यंत पोचता आले असते त्यांनी तशी सर्व राजबंदीवानांची चर्चा करणारी किंवा कोणत्याही रीतीने अधिका-यांस झोंबणारी पत्रे टाकण्याचे ‘वेडेपण’ करण्याचे शहाणे साहस कधीही केलेले नव्हते. बारी रागावताना! बरे, जे लोक पत्रांतून आपल्या सहीने सत्य ती ती माहिती लिहिण्यास आणि सर्व राजबंदीवानांच्या हिताची चर्चा करण्यास धजणारे राजबंदी होते त्यांच्या पत्रांची हिंदुस्थानातील जनतेवर परिणाम करण्यासाठी प्रसिद्धी होण्याचे किंवा त्याची तशी चर्चा होण्याचे परिस्थितीमुळे अशक्य होते. अशा स्थितीत माझ्या एकट्याच्याच पत्रास ते काम करणे अपरिहार्य झालेले होते. माझे धाकटे बंधू माझ्या एकट्याच्याच नव्हे तर त्या नावाखाली आणि त्या निमित्ताने सर्व राजकीय बंदीवानांच्या सुटकेचा प्रश्न हिंदुस्थानात सारखा प्रचलित ठेवण्यास झटत असत हे जनतेस ठाऊकच होते. त्यांस माझ्या वार्षिक पत्राचा प्रबळ आधार मिळत असे. माझे वार्षिक पत्र येताच त्याच्या भराभर प्रती केल्या जात. आणि त्या हिंदुस्थानातील अनेक पुढाऱ्यांच्या हाती पडत. त्यांपैकी कित्येकांकडून ते पत्र वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केले जाई. कित्येक उत्कट देशभक्त आपण होऊन त्या पत्राची प्रत करण्यास येत आणि ती एक पवित्र आठवण म्हणून संग्रही ठेवीत. पॅरीसपर्यंत त्या वार्षिक पत्रांच्या प्रती कशा जात आणि तेथे हिंदी लोक त्या किती उत्सुकतने आणि भक्तीने वाचून त्याच्या प्रती प्रती करून कशा संभाळून ठेवीत ते बॅरिस्टर असफअल्ली यांनीही ‘फार्वर्ड’ मध्ये प्रसिद्ध केलेच होते. त्या पत्रांतून मी केवळ पोर्टब्लेअरच्या कारागारीय कागाळ्या तेवढ्या गाळी. बाकी राजबंदीवानांच्या सुटकेसाठी काय काय चळवळी केल्या पाहिजेत, त्या प्रश्नास हात घालण्यास पुढारी कसे भितात, सरकार क्रांतिकारकांना आणि त्यातही मला राजबंदीवान म्हणून म्हणण्यासही कसे कचरते, ते त्यांचे करणे किती विपरीत आहे म्हणून लोकांनी ते कसे खोडून काढले पाहिजे इत्यादी चर्चाच करीत होतो असे नसून त्यात शक्य तेव्हा या ना त्या निमित्ताखाली देशास हितावह असणारी राजकीय, सामाजिक आणि धार्मिक मतेही प्रदर्शित करीत होतो. विशेषतः लढाईत जो पर्यवेक्षक त्या पोर्टब्लेअरच्या कारागारावर होता तो एकंदरीत बऱ्याच उदार स्वभावाचा असे आणि मी वर्षभर प्रत्यक्ष निर्बंध भंग न करता राहिलो म्हणून प्रसन्न होऊन मला बऱ्याच निरंकुशपणे पत्र लिहू देई. केवळ कारागारीय उल्लेख त्यात नसले म्हणजे मग तो सहसा पत्रात खोडाखोडी, बारी जळफळला तरी, करीत नसे. या सवलतीचा मी शक्य तेवढा लाभ घेण्यास चुकत नसे. कारागारीय माहिती इतर

प्रकारांनी धाडावी लागे आणि ती तशी धाडली जाऊन केव्हातरी काहीतरी वर्तमानपत्रातून येतच असे; परंतु तशा गुप्तपणे धाडलेल्या आणि माझ्या सहीने, प्रत्यक्ष सरकारी अधिकाऱ्यांचेच द्वारे धाडलेल्या माझ्या वार्षिक पत्रात अर्थातच फरक असे. माझ्या या पत्राचा कौन्सिलपासून तो झोपडीपर्यंत अधिक परिणाम होई. आणि गुप्त पत्रे दहा टाकावी तर एक पोचणार आणि त्यातून झाले तर अर्धेच प्रसिद्ध होणार. पण माझे पत्र तर निश्चितपणे अधिकाऱ्यांचे मुद्रेसह हिंदुस्थानभर प्रसृत होणार. एतदर्थ या पत्रास धाडण्याची आणि त्यायोगे स्वदेशी माझ्या मतांची आणि राजबंदीवानांच्या सुटकेच्या प्रश्नाची चर्चा सारखी प्रज्वलित ठेवण्याची ही संधी मी सहसा कर्तव्य म्हणूनच गमावीत नसे.

या आणि इतर कारणांसाठी मी संपाची योजना अशी ठरविली की जुन्या राजबंदीवानांना (म्हणजे मला, माझे बंधूंना आणि श्रीयुत जोशी यांना कारण बाकीच्या जुन्या राजबंद्यांतील कित्येक तर भानसिंगास मारले हे त्यांस माहीत असूनही ते आपणास काहीएक माहीत नाही, इतरांशी आमचा काहीच संबंध नाही असे स्पष्टपणे सांगून संपास कोण उत्तेजन देतो, कोण नाही इत्यादी बातम्याही देण्यास मागे घेत नसत. तेव्हा संपात त्यांनी येण्याचा प्रश्न नव्हता. ) सोडून नव्यांपैकी ज्यांच्या प्रकृतीस परिणामकारक असा अपाय होण्याचा संभव नाही त्यांनी संपात प्रत्यक्ष काम सोडून भाग घ्यावा ! प्रथमतः राजबंदीवानांना कोणते हक्क पाहिजे आहेत आणि भानसिंगाची मारहाण हे संपाचे केवळ तात्काळ निमित्त असून मुख्य कारण आणि मागणी म्हणजे राजबंदीवानांस राजबंदीवानांप्रमाणेच वागविण्यात यावे हे कसे आहे हे लेखी कथनात दोघां पुढाऱ्यांनी लिहून द्यावे, ते लिहून न घेतले तर काहींनी अन्नत्यागाच्या संपाची धमकी द्यावी; आणि कोणींही प्रकृती विकोपास जाईतो कोठडीत सडत पडण्याचा हट्ट धरू नये किंवा अन्नत्यागाने प्राण देऊ नयेत असा बेत ठरला. संपाच्या समर्थनार्थ आणि देशात खळबळ माजविण्यासाठी शक्य ती खटपट करणे हे आम्ही अंगावर घेतले. त्याविरहित माझ्या बाहेर राहण्याने पोर्टब्लेअरच्या वसाहतीतील शिक्षणादि जे सार्वजनिक प्रचारकार्य आम्ही हाती घेतलेले हेते तेही अव्याहत चालू शकले.

ठरलेल्या दिवशी चाळीचाळीतून राजबंदीवानांच्या टोळया कामे फेकून उठून उभ्या राहिल्या. जवळजवळ शंभर लोक त्या संपात समाविष्ट झालेले असावेत. मागे जे संप झाले तेव्हाहून आता राजबंदीवानांची संख्या पुष्कळच वाढल्यामुळे आणि अधिकाऱ्यांची शक्ती आणि सक्ती त्या पहिल्या संपामुळेच बरीच ढिली झाल्यामुळे या संपाचा परिणाम पुष्कळच झाला. राजबंदीवानांच्या नव्हे तर त्या वसाहतीच्या इतिहासातही असा मोठा आणि इतका संघटित टिकाव धरून राहिलेला संप दुसरा झालेला कोणास आठवत नाही. राजबंदीवानांविषयी दर सहा महिन्यास एक प्रतिवेदन अधिकाऱ्यांस हिंदुस्थान सरकारकडे धाडावे लागे. वसाहतीत आम्ही येईतो ''सब ठीक है'' म्हणूनच सर्व प्रतिवृत्ते येत असल्याने असल्या क्रूर अपराद्ध गुंडांच्या वसाहतीस दमन करून चूप बसविण्याच्या अधिकाऱ्यांच्या कौशल्याची हिंदुस्थान सरकार अर्थातच प्रशंसा करी.

परंतु राजबंदीवान आल्यापासून वसाहतीच्या वार्षिक प्रतिवेदनात किंवा राजबंदीवानांच्या स्वतंत्र प्रतिवृत्तांत अधिकाऱ्यांस ''सब ठीक है'' असे कधीच प्रतिवेदिता (रिपोर्ट करता) आले नाही. एतदर्थ या संपादिक चळवळी दबविण्यास ते आपल्या लौकिकासाठी फार धडपडत. तथापि त्यांसही संपामागून संप आणि भांडणामागून भांडणे

www.savarkarsmarak.com

पाहता पाहता आता पहिल्या संपासारखी चीड येण्याचे किंचित कमी झाले होते. तरी त्यांची धडपड सारखी चालू होती. संप होताच बारीने आमच्याविरुद्ध राजबंदीवानांच्या मनात विकल्प भरविण्यास जो आरंभ केला तो शेवटपर्यंत! राजबंदीवानांच्या खोल्यांशी अर्धा अर्धा तास उभे राहून सांगत फिरे ''अरे हा सावरकर तुम्हास झुलवितो आहे, फसवितो आहे. स्वतः मागे राहिला. पहा तो शिक्षेस भितो. तुम्ही वेडे आहा. तो दुसरा 'अमका' पहा-तसे वागा. तुमचे हित होईल. ''

## मग सावरकरांना एवढे घाबरता का ?

पण राजबंदीवानांतील ते लोक बारीच्या बारशास जेवलेले होते. त्यांस तो 'अमका' जसे आचरतो तसे बारीची हांजीहांजी करण्यासाठी त्यांस बातम्या देण्यापर्यंत लांगूलचालन करावयाचे असते तर त्यांचा सावरकराने काही हात धरला नव्हता हे ठाऊक होते. सावरकराने एकंदर वीस-बावीस वेळा त्याच कारागारात आडव्या बेड्या, उभ्या बेड्या, साखळदंडी बेड्या, हातकड्या, कोठडीबंद्या, अन्नत्याग इत्यादी सर्व प्रकारच्या शिक्षा खाल्लेल्या होत्या हे त्यांस सरकारी टिपणातच बघावयास मिळत होते. ते राजबंदीवानांचे कर्तव्य म्हणून संपात समाविष्ट झालेले होते आणि त्यांतील कित्येक तर इतके संतप्त होते की सावरकरांना पुरे वाटलेल्या प्रतिकाराहून आणि प्रतिवादाहून अधिक उग्रतर प्रतिवाद करण्यास आग्रह करीत होते - केवळ सावरकरांनीच प्रमुखत्वे त्यांना रोखून ठेवले होते ! तेही राहो; केवळ बारी सावरकरांविरुद्ध इतका उपदेश देतो हेच एक कारण सावरकरांचे धोरण आणि वर्तन हे राजबंदीवानांच्या आणि त्यांच्या राष्ट्रास हितप्रदच आहे हे सिद्ध करण्यास त्यांतील बहुतेकांस पुरेसे वाटे. त्यांतील कित्येक तर हसून त्यास म्हणत देखील की ''क्योंजी साहेब! सावरकरबाबू आप कहतें वैसेहि जो डरपोक है तो आप उनसे रातदिन इतने घबराते क्यों रहते?''

बारीचे आणि त्याच्या हस्तकांचे आम्हां राजबंदीवानांतील झुंजारपक्षात फाटाफूट पाडण्याचे सर्व प्रयत्न विफल झाले. संप जोरात चालला, तिकडे बिचारा भानसिंग मात्र त्या मारानंतर पुन्हा सुधारला नाही. त्यास पुढे रक्त ओकण्याचा विकार होऊन एका आठवड्याचे आत रुग्णालयात नेण्यात आले. तेथे आमची प्रकृती बिघडल्याने आम्हासही काही दिवस नेण्यात आल्यामुळे आमची त्याची गाठ पडली. त्याने त्याच्या पाठीवरचे वळ आम्हास दाखविले. तेथेच त्यास क्षयाची भावना इतक्या वेगाने झाली किंवा पूर्वीची प्रकृती इतकी विकोपाला गेली की तो दीडएक महिन्यात हा लोक सोडून चालता झाला! भानसिंग हा अशिक्षित शेतकरी - परंतु सुशिक्षितांतही असा प्रामाणिक देशभक्त नेहमीच सापडेल असे आम्हास वाटत नाही. बिचारा जन्मठेप घेऊन ज्या देशाचे मंगलार्थ तिथे आला तेथेच एका वर्षादीड वर्षाचे आत त्याच देशाचे मंगलार्थ झुंजत असता मेला. अशीच तेथील राजबंदीवानांतील प्रत्येक प्रामाणिक मनुष्याची भावना झाली.

भानसिंगवरील अत्याचार आणि संपवाल्यांच्या मागण्या रीतसर अधिकाऱ्यांच्या कानावर घालण्याकरता जे दोन पुढारी नेमलेले होते त्यांचे लेखी कथन अधिकारी घेईनात. तेव्हा ठरल्याप्रमाणे त्या दोघांनी अन्नत्याग केला. दहा-बारा दिवसपर्यंत ते दोघे त्यांतील एक सन्माननीय साठ वर्षांचे शीख गृहस्थ होते आणि दुसरे एक तेजस्वी पंजाबी रजपूत तरुण अन्नावाचून आपल्या कोठडीत बंद पडलेले होते. शेवटी त्यांचे लेखी कथन लिहून घेण्यात

www.savarkarsmarak.com

आले आणि संपवाल्यांच्या ''आम्हास जगतात आणि विशेषतः इंग्लंडात राजबंदीवानांस वागविले जाते तसे वागविले जावे या मुख्य मागणीपासून तो शीखांस केस धुण्यास थोडे पाणी आणि थोडा साबण देण्यात यावा. '' या स्फुट मागणीपर्यंत सर्व मागण्या गोवण्यात आल्या. याप्रमाणे अन्नत्यागाचे मूळ कारण सफल झाले म्हणून त्या वृद्ध आणि सन्मान्य शीख गृहस्थाने पूर्वी ठरल्याप्रमाणे अन्नग्रहण केले; परंतु हा समंजसपणा संतापाचे आवेशात करण्याचे सोडून रजपूत तरुणाने आपला अन्नत्यागाचा निश्चय तसाच चालू ठेवला. दोन आठवड्यांनी त्याचे नाकात दूध नळीने त्यास धरून घालण्यास आरंभ झाला, त्या अन्नत्यागाने त्या तरुणाचा देह कृश होत चालला. पण त्याचे ते मानी रजपूत रक्त त्यायोगे थंड न पडता अधिकच वाढू लागले. त्याने कपडे घालणे सोडले. पांघरूण घेणे सोडले. उपाशी उघडानागवा, थंडीत वाऱ्यात त्या सिमेंटच्या मिश्र फरशीवर कोठडीत तो पडलेला असे, कोणाशी चकार शब्द बोलेना. ज्यांस ऐकावयाचे नाही त्या अधिकाऱ्यांशी बोलायचे तरी का ? मला सांगणे ते मी लेखी कथनात सांगितले आहे. बस इतके एकदा बोलून त्याने जी जीभ आवरली ती पुन्हा काही उचलली नाही. कमिशनर येऊन गेला पण एक नाही, दोन नाही. असे एक दिवस नाही दोन दिवस नाही, पुरे सहा महिने तो निरन्न स्थितीत, दिगंबर होऊन त्या कोठडीत पडला होता. त्याचा सुदृढ आणि प्रशस्त देह अस्थिपंजर झाला. त्याच्यासारखा तेजस्वी, प्रामाणिक आणि अमोलिक देशभक्त असा मातीच्या मोलावर मरू नये म्हणून आम्ही शक्य ती खटपट केली. अंती एका युक्तीने त्याची प्रत्यक्ष भेट घेतली. त्याची थोडी निंदा केली. प्रतापही वेळी भलत्याच ठिकाणी ठाण मांडून झुंजण्याचा मूर्खपणा करण्यापेक्षा रणातून दोन कोस मागे हटणे हाच शूरपण कसा समजत होता ते हळदीघाटाचे आणि इतर उदाहरणांवरून सांगितले. आपण शंभर रुपयांचा प्राण राष्ट्रासाठी म्हणून देताना शंभरीशंभर प्रतिमोल घेऊन मग द्या; नाहीतर राष्ट्राचे नावाने अशी आत्महत्या करताना राष्ट्राची काही अंशी हानीच कराल असे निक्षून सांगितले. तेव्हा कुठे स्वारीचा निश्चय ढळला. मी मरेतो देह दंडिणार नाही असे त्याने गुप्तपणे वचन दिले. आणि आम्ही थोडे निश्चिंत झालो.

पण इतर इष्ट मित्रांस हे वचन सांगता येईना. ते म्हणत तुम्हीच त्यास अन्न त्यागापासून परावृत्त होऊ देत नाही. तुमचा शब्द तो मोडणार नाही! हा त्यांचा खोटा आरोपही काही काळ सहन करावा लागला कारण ''तू अन्न अंती खाशील हे दिलेले गुप्त वचन मी कोणास सांगणार नाही'' असे प्रतिवचन आम्हास त्या तरुणास द्यावे लागले होते. आम्ही डॉक्टरास प्रत्यही त्याची प्रकृती अतिरेकाला गेली की नाही हे आम्हास गुप्तपणे कळविण्यास सांगून ठेवले होते.

केव्हा केव्हा त्यास त्रस्त करण्याकरिता पठाण वॉर्डरातील अधिकाऱ्यांचे हस्तक आईमाईवरून शिव्या देत; कारण या निमित्ताने तरी तो उलट बोलेल. उलट शिवी मौनव्रतामुळे तर देता येईना. अंगात ताप, आणि त्या अभद्र बीभत्सपणाच्या शब्दंचा मारा तर सोसवेना. अशा स्थितीत एके दिवशी धावून जाऊन त्या तरुणाने रात्री आपल्या कोठडीच्या भिंतीवर आणि भूमीवर ताड ताड डोके आपटण्यास आरंभ केला. धावपळ झाली. पर्यवेक्षकांनी त्याचे खोलीतच दोन वॉर्डरास पहाऱ्यास रात्रभर ठेवण्यास आरंभ केला. नाहीतर न जाणो तो आत्महत्या करील.

अंती मला एक दिवस डॉक्टराने कळविले की, आता मात्र एक तर तो मरेल किंवा वेडा होईल. हे ऐकताच सर्व राजबंदीवानांचेकडून एक समाईक पत्र त्याने अन्न ग्रहण करावे अशा विनंतीचे धाडले आणि आता तुला तू हटलास

म्हणून कोणासही म्हणता यावयाचे नाही; तर सगळ्यांची आज्ञा म्हणून अन्नग्रहण कर; कारण प्रकृतीचा रबर तुटणार तोच तुटण्याचे आधी तू ताणणे बंद करशील असे तू वचन दिले आहेस. ती वेळ आली आहे असे निक्षून कळविले. तेव्हा त्या मानी गृहस्थाने एकदाचे अन्न ग्रहण केले !

आमचे सारखे सांगणे असे की, संपासारख्या तात्कालिक उपयुक्त चळवळीसाठी इतर कष्ट जरी सोसणे युक्त असले तरी कोणाही देशभक्ताने त्या राजबंदीवान म्हणवून घेण्यासारख्या मागणीसाठी स्वप्राणाचेही बलिदान आणि तेही असे अन्नत्यागादी उपायांनी आपण होऊन करणे म्हणजे मूर्खपणा करणे होय. त्या मानधन राजबंदीवानांनी दोन वेळा सार्वत्रिक अन्नत्यागाचा संप करण्याचा घाट घातला. मधून मधून दहा-पाच जणांनी आरंभही करावा. पण आम्ही तो उचलून न धरता हाणून पाडावा. त्यांच्या त्या तेजस्वीपणाचा यथोचित गौरव करीतच हाणून पाडावा. आज त्या वेळी अन्न सोडून बळाने मरू पहाणाऱ्यांपैकी आम्ही ज्यांस खेचून परत ओढले त्यांपैकी काही सुटून स्वराष्ट्राची सेवा पुन्हा करीत आहेत. ज्या मानधन तरुणाविषयी वर उल्लेख केला आहे त्याची आणखी काही माहिती शक्य झाले तर पुढील आवृत्तीत देण्याचा प्रयत्न करु.

हा संप ज्या दिवशी झाला त्याच दिवशी मॉंटेग्यूसाहेबांस एक आवेदन धाडण्याची जी परवानगी आम्ही मागितली होती त्याविषयी चर्चा करताना बारी आम्हास म्हणाला "Well, you have accorded a fine reception to Mr. Montegue!"

मॉंटेग्यूच्या आगमनास पोर्टब्लेअरची प्रतिवंदना- सलामी- म्हणूनच संप इतका संगीत करण्यात आला होता हे जरी खरे होते तरी त्यात मी प्रत्यक्ष काम न सोडण्याचा जो विचार केला त्यामुळे मला आवेदनपत्रांची परवानगी नाकारणे अधिकाऱ्यांस जड गेले.

हिंदुस्थानात ज्या सुधारणा करावयाच्या त्यायोगे राज्यक्रांतिकारकांची समजूत काही तरी पटेल की नाही हा प्रश्न मॉंटेग्यू आदिक झाडून साऱ्या अधिकाऱ्यांपुढे होता याविषयी आमच्याशी तत्रस्थ वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपण होऊन येऊन केलेल्या एतद्विषयक चर्चेने आणि वर्तमानपत्रातील लेखांनी आम्हास शंका उरली नव्हती. त्यामागे मोर्लेसाहेबांच्या सुधारणांच्या हप्त्यांचे वेळी तर आम्ही इंग्लंडमध्येच होतो. आणि क्रांतिकारकांस शमविणे- निदान इतरांस क्रांतिकारकांच्या आगगिळ्या जाज्वल्य पंथात शिरण्याइतके असंतुष्ट होण्यापासून बचावणे- हा त्या सुधारणा देण्यात इंग्लिश सत्तेचा मुख्य हेतू होता हे आम्हास त्या वेळी अनेक प्रख्यात इंग्लिश गृहस्थांशी झालेल्या वादविवादामुळे आणि गोखले इत्यादी पुढाऱ्यांच्या तत्रस्थ भाषणामुळे आणि प्रत्यक्ष संवादामुळे ठाऊकच होते. तेव्हा हिंदस्थानात सुधारणांचा हप्ता मागण्यासाठी एकमुखी मागणी करण्याचे प्रयत्न जे लोकमान्यप्रमुख सर्व देशभक्त करीत होते त्यांत क्रांतिकारकांतील प्रमुखांपैकी कोणी तरी थोडासा हात देणे भाग होते. तेव्हा अशा वेळेस महत्वाच्या नियंत्रणात्मक सुधारणा जर खरोखरच करण्यात आल्या तर क्रांतिकारकांतीलही अनेक लोक शांतिप्रधान मार्गाचा अवलंब करू इच्छितील हे सरकारच्या दृष्टीस आणणे आम्ही आपले कर्तव्य समजलो. मॉंटेग्यूने सर्व पक्षांच्या भेटी घेतल्या, त्यात क्रांतिकारकांचा पक्ष उघड सापडणे दुर्घटच होते. तेव्हा अशा अपरोक्ष रीतीने त्यातील काही जणांकडून त्यांची मते कळणे त्यास इष्टच होते. म्हणूनच आमच्यातील अनेक लोकांशी आडून पाडून ही चर्चा अधिकारी करीत. परंतु काही भिऊन अगदीच शेळपटपणा स्वीकारून ''नको रे बोवा ते

राजकारण. स्वातंत्र्य मिळाले तरी आज ते नको; निदान आपण तरी हरीहरी म्हणत बसलो आहोत आणि आम्हास सुटकेपलीकडे काही पाहावयाचे नाही'' असे म्हणत. तर काही इंग्लिशांना हाकून द्यावयाच्या जळत्या शपथा जशा पूर्वी घेतल्या तशाच अधिकाऱ्यांस पाठ म्हणून दाखवीत. अशा स्थितीत क्रांतिपक्षाच्या ध्येयाची आणि राजकारणाची तात्त्विक चर्चा केलेले सुसंगत, युक्तियुक्त, आणि निर्भीड लेखी कथन आम्ही धाडू इच्छितो हे ऐकताच अधिकाऱ्यांस एक प्रकारे ती इष्टापत्तीच वाटली. ते मी न करता त्यांच्या आवडीच्या कोणी इतराने केले असते तर त्यांस हवे होते. पण ते जमेना. माझे नावाने गेलेले आवेदन वरिष्ठांस अधिक उपयुक्त वाटेल हेही त्यांस माहीत होते. आणि मी संपात काम सोडून न मिळाल्यामुळे, कारागारीय नियमाची पण काही आडकाठी नव्हती. तेव्हा मला माँटेग्यूसाहेबांस गव्हर्नर जनरलचे द्वारा आवेदनपत्र धाडण्याची परवानगी मिळाली आणि त्याप्रमाणे मी ते धाडिले.

माँटेग्यूसाहेबांस वरील आवेदनपत्र धाडताच त्याचा इष्ट तो परिणाम होण्यासाठी त्यातील विधेयांची माहिती हिंदुस्थानात प्रसिद्ध होणेही परमावश्यक होते. कारण त्यायोगे हिंदुस्थानातील जे पुढारी सुधारणांसाठी झटपटत होते त्यांना हेही एक सबळ कारण सांगता येते की, जर समाधानकारक सुधारणा मिळाल्या तर हे पहा राज्यक्रांतिकारकांतील काही प्रमुख लोक देखील शांततेच्या मार्गाचा अवलंब करण्यास सिद्ध आहेत! आमच्या अवश परिस्थितीतही जो काय पाठिंबा आम्हास आमच्या पुढाऱ्यांस देता येण्यासारखा होता तो द्यावा म्हणून आम्ही आमच्या त्या वर्षीच्या पत्रात या आवेदनाचा उल्लेख केला. ते पत्र आमच्या प्रकृतीची त्या वेळची अवस्थाही प्रदर्शित करीत असल्याने त्याचे मूळच अंशतः भाषांतरित करून खाली देत आहो. त्यायोगे राजकीय बंदीवानांच्या मुक्ततेविषयी आपल्या स्वदेशबंधूंस सतत उत्तेजित करण्याचे कामी आमच्या वार्षिक पत्राद्वारे आम्ही कोणत्या धोरणाने आणि किती झटत होतो हेही तत्कालीन लिखाणावरून दृग्गोचर होईल.

''. . . महाराष्ट्र प्रांतिक परिषदेने सर्व राजकीय बंदीवानांच्या मुक्ततेविषयी ठराव संमत केला हे वाचून फार आनंद झाला. (गेल्या पाळीस-नाशिकासही असाच महत्वाचा ठराव महाराष्ट्राने केला होता. ) एकंदरीत मुंबई प्रांतिक परिषद ही इतर कोणत्याही प्रांतिक परिषदेहून अधिक चिकाटीने आणि निर्भयतेने हिंदुस्थानातील सर्वच राजबंदीवानांना मुक्त करण्यासाठी झटत आहे हे खरे आहे. गेल्या वर्षी माझ्या माहितीप्रमाणे युक्त प्रदेश आणि आंध्र प्रदेश या दोघां संस्थांनीच हा ठराव केला होता. त्यातही आंध्र परिषदेचा ठराव संग्राहक आणि कळकळीचा होता. त्यावरून हे स्पष्ट होत होते की, आपल्या मातृभूमीच्या मोचनार्थ बरोबर असो वा नसो परंतु त्यांस तसे करणे आपले कर्तव्य वाटताच ज्यांनी प्रामाणिकपणाची आणि निर्विवाद स्वार्थत्यागाची पराकाष्ठा करून कारागृहातून आपले जीवन झिजवीत झिजवीत त्या महान मोचनास आपले आयुष्य अर्पण करण्यास मागे घेतले नाही, त्यांच्याविषयी आंध्र बंधूंची अंतःकरणे समवेदनेने भरलेली आहेत. तू लिहिलेस की पत्रांतून आणि मासिकांतून वारंवार राजकीय बंदीवानांच्या सुटकेविषयी लेख येतात. पण मग मला हे समजत नाही की, राष्ट्रीय सभेलाच तेवढी त्याविषयी नाव काढण्याची एवढी लाज का वाटते ? ज्या लोकांची प्रतिनिधी म्हणून ती सभा म्हणविते त्यांच्या मनात वसत असलेल्या राजबंदीवानांच्या विषयींच्या नुसत्या मानुष्यिक सहानुभूतीचा देखील उल्लेख करण्यास ती सभा इतकी का भिते? त्या राष्ट्रीय सभेने गेल्या वर्षी एक ठराव संमत केला - पण तो केवळ स्थलबद्ध राजबंदीचाच

www.savarkarsmarak.com

(Interned) काय तो! त्या सभेला या गोष्टीचा विसर पडला की, स्थलबद्ध लोक युद्धानंतर आपोआप सुटणारे आहेत. परंतु त्या आमच्या स्थलबद्ध बंदीवानांच्या दुःखाने त्या शोभिवंत आणि मुक्तवासू मंडपात सुखासीन झालेल्या ज्या देशभक्तांच्या डोळ्यास टिपे आणली त्यांच्या हे मात्र ध्यानात आले नाही की, त्या दुःखाच्या अनेक पटींनी तीव्रतर दुःखास निरवधी काल सहन करीत एक नाही दोन नाही, पण शतावधी लोक इतरत्र झिजत झुरत पडलेले आहेत! त्यांची मुक्तता आपोआप होणारी नाही म्हणूनच या प्रतिष्ठित आणि उत्तरदायी नेत्यांनी त्यांच्याविषयीच अधिक प्रयत्न केला पाहिजे होता. प्रतिष्ठित आणि उत्तरदायी! तेथेच गोम आहे. ते केवळ स्थलबद्धांविषयी बोलतात. कारण त्यांना ठाऊक आहे की, ते इतके धोक्याचे नाही. परंतु ते इतर राजबंद्यांविषयी चकार शब्द काढीत नाहीत. कारण त्यायोगे त्यांच्या साहेबांच्या घरी त्यांच्या प्रतिष्ठितपणास बट्टा लागण्याचा संभव आहे. राष्ट्रीय सभेचे मुख्य कर्तव्य म्हणजे तिच्यात पुढे पुढे करणाऱ्या मूठभर लोकांची मते प्रदर्शित करणे नसून देशातील बहुमत प्रदर्शित करणे हे होय. मग इतकी वृत्तपत्रे आणि प्रांतिक सभा राजबंदीवानांची मुक्तता करा म्हणून मागणी करीत असता या राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांतीलच काही पुढाऱ्यांवर जेव्हा कारागृहात सडत पडण्याचा प्रसंग आला तेव्हा राष्ट्रसभने आणि ज्या लोकांसाठी ते झटले आणि पाशात पडले त्यांनी त्यांच्या दुःखाचा नामनिर्देश करणे हे त्यांचे कर्तव्य होय अशी स्वतःच अपेक्षा केली असता आणि विशेषतः आयरिश, बोअर, ऑस्ट्रियन इत्यादी लोकांनी आपआपल्या देशातील राजबंदीवानांच्या मुक्ततेची उघड चळवळ करुन ती मुक्तता करविली असता, 'राष्ट्रीय' म्हणविणाऱ्या सभेने मात्र आपल्या हिंदी राजबंद्यांविषयी चकार शब्द काढण्यास भ्यावे हे अत्यंत अनुचित होय. राष्ट्रसभेला तसे करणे आता भागच पाडिले पाहिजे. जर काही म्हाताऱ्याकोताऱ्यांच्या अंगास कापरे भरत असेल तर त्यांनी हवे तर ठरावाच्या बैठकीस उपस्थित राहू नये. या थोड्या प्रतिष्ठितांस धीर नाही म्हणून सर्व राष्ट्राने या अपराधी मुग्धतेचे पाप डोक्यावर काय म्हणून घ्यावे?

अशा प्रकारचे ठराव करताना देखील एक - दोन गोष्टींविषयी फार सावधता ठेवली पाहिजे. पुष्कळ पत्रे ''राजबंदीवानां''विषयी लिहिताना त्या सोयिस्कर शब्दाचा उपयोग अशा संदिग्धपणे करतात की त्यात नक्की कोणाचा अंतर्भाव केलेला आहे हे सरकारास तर काय पण लोकांसही समजू नये. कधी त्याचा अर्थ स्थलबद्ध बंदी तर कधी स्थानांतरित तर कधी निर्वासित पण अगदी स्पष्टपणे उल्लेख करून राजकीय कार्यात दंडित झालेल्या सर्व बंदीवानांचा अंतर्भाव त्या शब्दात क्वचितच केलेला असतो. गेल्या पाळीला मी तुला लिहिलेच होते की, बानरलॉनी देखील आयरिश राजबंदी सोडताना ''जे व्यक्तिविषयक अपराधासाठी दंडित नाहीत त्या राजबंदीवानांना सोडले'' म्हणून त्यांचे भिन्नत्व दाखविण्याचा धूर्तपणा केला होता. आता त्या सद्‌गृहस्थास माहीत होते की, मताभिलाषी स्त्रिया (suffragists) अशा वैयक्तिक अपराधासाठीच दंडित झालेल्या होत्या. परंतु त्यांस लढाई सुरू होताच सोडण्यात आले! मग बानरलॉच्या हातात तो वैयक्तिक अपराध हा शब्द आताच त्यांच्या खऱ्या हेतूस झाकणारी ढाल का व्हावी आणि त्या दंडित शब्दास हिंदी पुढाऱ्यांनीच एवढे का भ्यावे? बोथा मुख्य प्रधान आहेत; आणि रेडमंड पार्लमेंटातील एका (constitutional) पक्षाचे अध्वर्यू आहेत. तरी सरकारविरूध्द सशस्त्र बंड करणाऱ्या आणि त्याच्या विपक्षीय असलेल्या राजबंदीवानांसही त्यांनी सोडले. परंतु राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांस मात्र आपण प्रतिष्ठित अशा बंडखोरांची नावे देखील कशी उच्चारावी म्हणून धाक पडला आहे ! नगरच्या वेशीशी भीक

मागणाऱ्या भिकाऱ्यास नगराच्या अध्यक्षपणाच्या आणि नगरशेटांच्या पेक्षाही आपल्या प्रतिष्ठितपणाची आणि उत्तरदायित्वाची अधिक जाणीव आहे! तेव्हा यापुढे ठरावातून आणि लेखातून राजकीय बंदीवान या शब्दाची अशी व्याख्या असावी की, त्यात क्रांतिकारकांतसुद्धा सर्व राजबंदीवानांचा समावेश व्हावा. ''जे जे कोणी - मग ते दंडित असोत वा विचाराधीन (under trial) असोत वा स्थलबद्ध असोत ते वैयक्तिक आक्रमणासाठी किंवा सार्वत्रिक बंडासाठी (वास्तविक मला या भिन्नत्वशून्य प्रभेदाचा अर्थच कळत नाही) अपराधी ठरलेले असोत - पण जे जे शुद्ध आणि निर्भेळ अशा राजकीयच हेतून प्रेरित होऊन झुंजत होते, ते ते राजकीय बंदीवान होत'' हीच त्या शब्दाची खरी व्याख्या आहे. वैयक्तिक शब्दात आणि राजकीय या शब्दात मुख्य प्रभेद हा त्या कृत्यावरून पडत नसून त्या कृत्यामागे असलेल्या हेतूवरून पडत असतो. हेतू ही मुख्य कसोटी होय. कोणतेही कृत्य स्वयमेव राजकीय ठरत नाही. कारण सशस्त्र बंड देखील- जर ते केवळ कोण्या व्यक्तीच्या पोटापाण्याकरिताच असेल तर- राजकीय आणि सार्वजनिक ठरणार नाही. आणि त्यास कोणाही सुज्ञ गृहस्थाची सहानुभूती मिळणार नाही. तो केवळ एक थोरला दरोडाच होईल-अर्थात त्या व्यक्तीच्या पोटाचा प्रश्न हा कोण्या एका सार्वजनिक अधिकाराचे रक्षणासाठी चाललेल्या लढ्यात निमित्तमात्र पुढे केलेला असेल तर ती गोष्ट निराळी. ठगातील ज्या टोळ्या नुसत्या स्वार्थी लूटमार करीत फिरत त्यांनी लढाया दिल्या म्हणूनच केवळ त्या राजकीय वा सार्वजनिक स्वरूपाच्या ठरत नाहीत. परंतु मतवाल्या स्त्रियांपैकी मुख्य प्रधानाला एकाएकी चाबुकाने झोडपणारी आणि प्रत्यक्ष आग लावीत फिरणारी स्त्री देखील सरकारने 'राजकीय' म्हणूनच मानली. कारण त्यांची कृत्ये जरी व्यक्तिविशेषांवर आघात करणारी असून सार्वत्रिक किंवा उघड लढाईची नव्हती तरी त्यांच्या त्या वैयक्तिक झुंजीचा हेतू स्वतःचा सूड उगविणे किंवा स्वार्थ साधणे हा नसून कोणत्या तरी सार्वजनिक कल्याणासाठी, कार्यासाठी झटणे हा होता. साधन दुष्ट किंबहुना दंडनीय आणि पापीही असू शकेल वा नसेल. परंतु कृत्याचे नैतिकत्व त्या कृत्यास प्रेरक होणाऱ्या हेतूत असते. तो हेतू राष्ट्रीय असेल तर ते कृत्य राजकीयच ठरले पाहिजे.

हे सर्व विवरण मी इतक्या प्रमुखपणे यासाठी केले आहे की, जर क्वचित राजक्षमा देण्यात आली ज्यद्यपि राजबंदीवानास अशी राजक्षमा देण्यात येण्याविषयी मला फारशी आशा नाही- तर राजबंदीवान कोणास म्हणावे याची स्पष्ट व्याख्या न झाल्यामुळे सरकारास कोणाची तरी अन्याय्य प्रभेद करून राजबंदीवानांतील अनेकांस ते राजबंदी नव्हतेच असे म्हणण्याची आणि म्हणून राजक्षमेत त्यांचा अंतर्भाव न करण्याची संधी मिळण्याचा संभव आहे. एतदर्थ तू सर्व प्रमुख लेखकांच्या ही गोष्ट दृष्टीस एव्हापासून आणावी आणि सर्वांनी सर्व राजबंदीवानांस सोडण्याची चळवळ हाती घ्यावी.

याविषयी राष्ट्रीय सभेच्या विषयनिर्वाचक मंडळात तरी काही चर्चा होते की नाही आणि कोणते प्रस्ताव इतर सभांतून संमत होतात त्यांत सर्व राजबंदीवानांना सोडण्याची मागणी असते का आपली काही स्थलबद्धांविषयीच असते ते स्पष्टपणे कळवीत जा.

(अ) दुसरी गोष्ट एक सार्वजनिक बृहत् आवेदनपत्र सरकारास धाडण्याच्या बेताविषयी. (अशा प्रकारचे आवेदन हजारो सहयांसह सरकारास कसे धाडावे आणि राजबंद्यांच्या सुटकेची चळवळ कोणत्या धोरणाने आणि उपायांनी करावी ते मी सुटून गेलेल्या माझ्या राजबंदीवान स्नेहयंपैकी काहींचे हस्ते बंधूंस आधीच कळवलेले होते. ) तो बेत

कार्यात रूपांतरित झालाच पाहिजे. युद्धानंतर तसे आवेदन धाडणे अधिक परिणामकारक आहे म्हणून क्वचित आपण तो बेत सध्या स्थगित केला असेल. (आ) तिसरी गोष्ट म्हणजे ठिकठिकाणी राजबंदीवानांस सोडविण्यासाठी सभा एकामागून एक भरविण्याची योजना ही होय. एका वर्षीच नव्हे तर या सभांचे चक्र सारखे वर्षोमागून वर्षे चालूच ठेवले पाहिजे. (ई) एकंदरीत राष्ट्रीय सभा, प्रांतिक परिषदा, सरकारास सार्वजनिक थोरली आवेदने, त्या त्या राजबंदीच्या कुटुंबांकडून वैयक्तिक आवेदने, वृत्तपत्रांतील सतत लेख, व्हाईसरीगल विधिसभा आणि प्रांतिक विधिसभा (Councils) पासून तो थेट पार्लमेंटपर्यंत प्रश्नोत्तरांची धुमश्चक्री अशा विविध रीतीने राजबंदीवानांच्या प्रश्नाची एकसारखी चळवळ अशा नेटाने चालवा की, तो प्रश्न देशीय राजकारणाचे एक प्रमुख अंग होऊन बसेल आणि प्रत्येक वेळी ''राजबंदीवान'' म्हणजे क्रांतिकारक दंडितासुद्धा राजकीय हेतूने आक्षेपभूत कृत्यास प्रेरित झालेला प्रत्येक बंदीवान होय ही गोष्ट स्पष्टपणे विशद केली जावी.

या सर्व चर्चेत मी प्रत्यक्ष परिणामापेक्षा या सर्व प्रयत्नांच्या आनुषंगिक नैतिक परिणामंकडेच अधिक लक्ष दिलेले आहे हे मी मोकळेपणाने सांगतो. मी सरकारला स्पष्टपणे कळविले आहे की, राजबंदीवानांच्या सुटकेचा हा प्रश्न अपरिहार्यपणे 'हिंदुस्थानास प्रगतिशील' आणि वास्तविकच नियंत्रित अशा शासनसंस्थेचे अधिकार मिळणाऱ्या प्रश्नांशी निगडित झालेला आहे. म्हणून अशा प्रकारच्या राजक्षमेने होणाऱ्या सर्वसाधारण सुटकेचा संभव सध्या तरी अपेक्षित नाही हे उघड आहे. याप्रमाणे प्रत्येक सुटका जरी संभवनीय नाही तरी पण मी वर दिल्याप्रमाणे सुटकेविषयी जे प्रयत्न करावयाचे त्यांचे एक फळ तरी पदरात पडल्यावाचून राहणार नाही आणि ते म्हणजे आपल्या राष्ट्रावर होणारा त्या प्रयत्नांचा नैतिक परिणाम, जे हुतात्मे, सैनिक आणि वीर आपल्या राष्ट्रीय युद्धात झुंजार राहिले त्यांची स्मृती राष्ट्रास पुन्हा उत्कटत्वाने येऊन, त्यांच्या कष्टांविषयी आणि हेतूविषयी सहानुभूती आणि कळकळ व्यक्त करणाऱ्या या प्रयत्नांनी ते युद्ध अंतिम विजयापर्यंत झुंजत राहण्याचा उत्साह राष्ट्रात संचरेल. रणात कामास आलेल्या सैनिकाची कृतज्ञपणे आठवण काढणे हे नवीन सैनिकाची भरती करण्याचे अत्यंत परिणामकारक साधन असते. "

## तशा परिस्थितीत सुटून तरी काय उपयोग?

वर उल्लेखिल्याप्रमाणे मी शासनसंस्थेच्या सुधारणेविषयी माझे विचार कळविण्यासाठी मॉंटेग्यूंना आणि गर्व्हनर जनरल यांना अलीकडेच जे आवेदनपत्र टाकले आहे त्यातील मुख्य विधेये अशी होती की, जर ते म्हणतात त्याप्रमाणे हिंदुस्थानात खरोखरच एखादी उत्तरदायी शासनसंस्था स्थापन करण्याचा त्यांचा विचार असेल तर मग आम्हां राजबंदीवानांना बंदीशाळेत कोंडून ठेवण्याचे मुळीच कारण नाही. दुसरे असे की, जर उत्तरदायी सत्ता देणाऱ्या सुधारणा शासनसंस्थेत होणार असतील आणि राजबंदीवानांची सुटका मात्र करण्यात येणार नसेल तर लोकांचा पूर्वीचा उडालेला विश्वास केवळ त्या सुधारणांच्या योगे किंवा सरकारी मनःशुद्धतेच्या भाषणांनीच काय तो सरकारवर पुनः बसेल हे दुर्घट आहे. कारण नुसत्या दैशिक स्वराज्याने लोकांच्या घरादारातून त्यांच्या आप्तेष्टांच्या वियोगाने पसरलेला असंतोष समूळ निर्मूलन कसा होईल? ज्या देशात भावापासून भाऊ हिसडून नेलेले आहेत, शतावधी, सहस्त्रावधी देशभक्त कारागृहातील कोठड्यातूनच लोखंडी पिंजऱ्यातून सडत आहेत किंवा

देशपार होऊन विवासनात भटकत आहेत, आणि दर दुसऱ्या कुटुंबातून कोणी मुलगा व भाऊ वा मित्र वा प्रियकर वा पिता हिसडून नेला जाऊन वियोगाच्या ''सहाऱ्यातून'' (मरुभूमीतून) व्याकुळ होऊन जळत पडला आहे, त्या देशात शांतता आणि संतोष हे नांदावेत तरी कसे? परंतु उलटपक्षी हेही ध्यानात ठेविले पाहिजे की, राजबंदीवानांची नुसती मुक्तता करून त्याबरोबरच जर काही तरी महत्वाच्या शासन-सुधारणा न केल्या आणि दायित्वपूर्ण सत्ता राष्ट्रास न दिली गेली तर ती राजक्षमा आणि ती राजबंदींची मुक्तता तशीच विफळ होईल. मी माझ्या स्वतःच्या मुक्ततेच्या मार्गात हे सत्य आड येत असताही प्रामाणिकपणे हे सांगून टाकले. कारण त्या देशात सुटून गेलो तरी आम्हास जीव सह्य तरी कसे होणार की जिथे प्रगतीचा प्रत्येक पथ ''अतिक्रमण करणाऱ्यावर खटला भरला जाईल'' अशा सूचनेने कुंठित झालेला आहे; जेथे प्रत्येक पुढचे पाऊल सुलतानाचा उपमर्द करते आणि मागे पाऊल टाकल्यास स्वतःच्या स्वाभिमानाचा आणि सुलतानाहून कमी कडक नसणाऱ्या स्वतःच्या धर्मबुद्धीचा उपमर्द होतो? तेथे धोक्यात पाऊल न पडता चालणे शक्य तरी होणार कसे? एतदर्थ दैशिक स्वराज्य आणि राजबंदीवानांची मुक्तता ही विभक्त होऊ शकत नाहीत. एकास सफळ व्हावयाचे तर दुसऱ्यासहच त्याची योजना झाली पाहिजे. मी हेही स्पष्टपणे सांगितले होते की, हे आवेदन धाडण्यात माझा मुख्य उद्देश राजबंदीवान वर्गाची मुक्तता हाच असल्याने मला स्वतःला न सोडले तरी मी असंतुष्ट राहणार नाही; उलट मला सोडावे लागेल म्हणूनच जर क्वचित राजबंदीवानांस सर्वसाधारण क्षमा करण्यात येत नसेल, तर मला न सोडता ज्या शेकडो लोकांस सोडणे शक्य आहे त्यांस जरी सरकार सोडील तरी त्यात मला खरोखर आनंदच होईल. जर मी म्हणतो अशा रीतीने सरकार खरोखरीच दायित्वपूर्ण शासनाधिकार म्हणजे कमीत कमी वरिष्ठ विधिमंडळात परिणामकारक बहुमत ज्यावर अर्थातच तो एखादा राज्य-समिती (Council of State) चा दगडोबा प्रत्येक वरात शाप मिसळविण्यासाठी स्थापिलेला नाही, असे लोकपक्षीय प्रतिनिधींचे बहुमत देणार असेल आणि या अधिकारदानासहच अशेष राजबंदीवानांस, युरोप आणि अमेरिका इत्यादी ठिकाणी अडकून पडलेल्या आमच्या निर्वासितांसह सर्व राजदंडितांस मुक्त करण्याचे औदार्य दाखवीत असेल तर निदान मी तरी -आणि मजप्रमाणेच इतर कित्येक- अशी राज्यघटना प्रामाणिकपणे स्वीकारीन आणि जर आमच्या लोकांना आपले प्रतिनिधी म्हणून आम्हास निवडणे योग्य वाटले तर त्याच विधिमंडळांच्या सभांगणात आमच्या आयुष्याच्या परमध्येयासाठी आम्ही झटू की ज्या विधिमंडळांनी आजपर्यंत आमच्याविषयी केवळ द्वेषच काय तो धारण केला आणि त्यांच्या कार्याविषयी आणि धोरणाविषयी आमच्या मनात तिरस्कार उत्पन्न करुन ठेवला. मी हे विधान सरकारच्या मनात येणाऱ्या शंकेस उद्देशून सहेतुकपणे केलेले होते. कारण माँटेग्यूसाहेबांच्या लिखाणात जवळजवळ स्पष्टपणेच असा सूचक प्रश्न केलेला आहे की, या सुधारणा दिल्या तर क्रांतिकारक त्या स्वीकारतील का? त्यांच्या ध्येयास आणि महत्वाकांक्षेच्या पूर्ततेस या सुधारणा अनुकूल आहेत असे पाहून ते क्रांतिकारक आपले पूर्वीचे भयंकर मार्ग सोडून शांततेच्या आणि उपयुक्ततेच्या मार्गावर येतील अशी आशा प्रदर्शित केलेल्या त्या माँटेग्यू साहेबांच्या वाक्यास उत्तर म्हणूनच आम्ही स्पष्ट सांगतो की, केवळ करमणुकीसाठी का कोणी आगीच्या डोंबात आणि संकटाच्या जबडयात घुसत असतो? हे क्वचित घडते आणि हे तर त्याहूनही क्वचित घडते की, जो खरा देशभक्त आणि भूतदयेने प्रेरित झाला आहे तो रक्तपात, आघात, आणि प्रत्याघात यांनी अपरिहार्यपणे क्रूर झालेल्या राज्यक्रांतीत रंगून गेलेला आहे की जेव्हा त्यास अधिक लाभकारक, अधिक चिर परिणामी, अधिक सुलभ, अधिक संघर्षशून्य असा प्रगतीचा एखादा वैध (Counstitutional) मार्ग उघडा

आहे आणि तो आक्रमिणे शक्य आहे! अर्थात जेव्हा राज्यघटनाच नसते, विधीच नसतो, तेव्हा वैध प्रयत्नांच्या गोष्टी बोलणे म्हणजे केवळ थटटा आहे! परंतु जेव्हा इंग्लंडात किंवा अमेरिकेत रूढ असलेल्या कोणा शासनसंस्थेप्रमाणे विधिनियंत्रित अशी एखादी प्रगतीपर राज्यघटना अस्तित्वात असते तेव्हा राज्यक्रांती हा जणू काही गुलाबपाणी शिंपडलेला एक शीतल मार्गच आहे अशा प्रकारे त्यासंबंधी बोलणे, ही तर त्याहूनही निर्दय थट्टा आहे. एवढेच नव्हे तर तो अपराध आहे.

अशा अर्थाचे आणि विधेयांचे आणि अशाच भाषेत लिहिलेले आवेदन मी माँटेग्यूसाहेबांस धाडले आहे.

## केवळ नावापुरता दुसरा वर्ग!

तू तुझ्या गेल्या पत्रात विचारलेस की, मी ''दुसऱ्या वर्गात'' बढती पावलो तर काय काय सवलती मिळाल्या? तुरुंगातून बाहेर जाण्याची ? नाही! लेखन-साहित्य ठेवण्याची? नाही. बंधूसह राहण्याची अथवा नुसते बोलण्याची तरी ? नाही. अपरिहार्य आणि सक्त श्रमापासून मुक्ततेची ? नाही. वॉर्डर होण्याची किंवा कोठडीतून बंद न ठेवण्याची? नाही. अधिक चांगली किंवा आदरयुक्त वागविले जाण्याची? नाही. अधिक पत्रे धाडण्याची? नाही. घरून भेट येऊ देण्याची? नाही. इतरांना हे पाच वर्षांनी उपभोगिता येते. पण मी आज कारावासाच्या आठव्या वर्षात आहे पण ही कोणतीही सवलत मला अद्याप मिळाली नाही तर मग तू म्हणशील ''तुम्हास दुसऱ्या वर्गात बढती मिळाल्याचा लाभ काय'' तर हाच महत्वाचा थोर लाभ की ''दुसऱ्या वर्गात बढती'' झाली!! कळले,डॉक्टर?

हे झाले कारागृहातील बाह्य सवलतीविषयी. परंतु हे सर्व देखील जोपर्यंत माझे शारीरिक आरोग्य ठीक राहिले होते तोपर्यंत सह्य होते. परंतु या वर्षी माझ्या वाट्यास तीही दुःसह अडचण आली आहे. कारण माझे शारीरिक आरोग्य अगदी नष्ट होत चालले आहे. मी सहसा असे लिहावयाचा नाही हे तुला माहीत आहे. परंतु आता तसे लिहिणे मला माझ कर्तव्य आहेसे वाटते. मला ही निश्चिती आहे की, दुदैवाच्या कोणत्याही घाल्याने गीतेचा अभ्यासी आणि माझा भाऊ सहसा डगमगावयाचा नाही. बाळ, प्रत्येक वर्षी एक दिवस तरी या कारागारातही निर्भेळ आनंदाचा वाटे. तो दिवस म्हणजे घरी तुम्हाला वार्षिक पत्र टाकण्याचा. परंतु यद्यपि आज तुला पत्र लिहीत असता पूर्वीप्रमाणेच त्या सर्व प्रिय दृश्यांची आणि स्नेहमय मूर्तींची कृतज्ञ स्मृती जागृत होऊन मनाला आनंद होत आहे, तरी तो आनंद शरीराच्या वर असले पत्र लिहिताना पडणारा सुखद ताणही झेपण्याची शक्ती न उरल्याने, पूर्णपणे उपभोगिता येत नाही. गेल्या मार्चमध्ये मी ११९ पौंड भरलो. या वर्षी माझे वजन ९८ पौंड झाले आहे. आमांशाचा विकार वेळीच वैद्यकीय उपचार आणि व्यवस्था न केली गेल्यामुळे विकोपाला गेला आहे. आता देह अस्थिपंजर झाला आहे. आठ वर्षे हे बंदीवासाचे ओझे मी सहन केले. अनेक आणि तुम्हास अज्ञात अशा आपत्तींनी मला जंग जंग पछाडले आणि या भयाच्या, धाकाच्या, वक्रतेच्या, अपशब्दांच्या अश्रूंच्या आणि उसाशांच्या दुष्ट आणि दुःखी वातावरणात उदात्त जीवनाचा कोंडमारा होतो की काय असे झाले. परंतु ईश्वराने त्यातही अढळ उभे राहण्याची शक्ती आजवर मला दिली. आणि मी त्या परिस्थितीशी झुंजत राहू शकलो. परंतु आता देहाने सोसलेले घाव विकोपास जाऊ पाहात आहेत आणि दिवसेंदिवस तो खंगत चालला आहे. अलीकडे मात्र आरोग्यपर्यवेक्षक (Medical Superintedent) अधिकारी माझ्या प्रकृतीकडे काहीसे लक्ष देऊ लागले आहेत आणि यद्यपि मला

अजूनही 'कर्तव्य' म्हणजे कारागारातील काम करावेच लागत आहे; तरी सध्यापुरते मला रुग्णालयात जेवण म्हणजे नीट शिजविलेला भात आणि दूध मिळू लागले आहे. मला जी शंका येते ती, ही की, - ही सारखी वाढत चाललेली अशक्तता अंती अंदमानी कारागारातील त्या परिचित सहचाऱ्याच्या, त्या क्षयरोगाच्या हाती मला सोपवून देते की काय! एकाच गोष्टीने या शंकेचा निरास होणारा आहे आणि ती गोष्ट म्हणजे परिवर्तन, फेर, पालट; अर्थातच कारागारीय परिभाषेतील पालट नव्हे. कारण त्या परिभाषेत परिवर्तन म्हणजे आहे त्याहून कष्टतर परिस्थिती असा अर्थ होतो! -परंतु पालट म्हणजे सुखतर परिवर्तन- कोणत्या तरी हिंदुस्थानी बंदीशाळेत किंचित आरोग्यप्रद वायुमानाचे स्थानी धाडले जाणे. कारण हा एकसारखेपणा अगदी कंटाळवाणा होत आहे. तरी देखील तू काही एकदम चिंतामग्न होऊ नकोस. ही परिस्थिती त्रासदायक आहे; परंतु निर्णायक नाही. कारण बंदीशाला म्हटली की तिची चिकाटी विलक्षण असते. ती आपल्या भक्ष्याचे लचके तोडते पण मारीत नाही. व्यथा देते- पण वधीत नाही. निःसत्व करते पण नष्ट करीत नाही. राख करते पण राखून ठेवते. आणि जीवनाचा अत्यल्प संभव असताही ऐंशी ऐंशी वर्षापर्यंत रखडत पडणाऱ्या बंदींची उदाहरणे दुर्मिळ नाहीत. म्हणून शरीर कितीही अशक्त झाले असले, तरी सहसा जीवासच काही अपाय होईल अशी भीती -जर मध्यंतरी एखादे अनपेक्षित संकट उद्भवले नाही तर- तुम्हास आजच पडावयास नको आहे.

आणि पुन्हा हे सर्व शरीरापुरतेच काय ते. कारण यद्यपि पेटलेल्या चितेशी बांधून टाकले असता बडेजावाने अग्नीची चेष्टा करण्याचा वाचिवीरतेचा प्रयत्न उपहासास्पद होणारा आहे, तरी मी इतके सांगू शकतो की, आत्मा अजूनही या कंपित आणि विचलित देहास आपले हातात ठेवण्यास समर्थ आणि संमत आहे. याहून कष्टतर आणि दीर्घकालीन कष्टास तोंड देण्यास सिद्ध आहे. केवळ निमूटपणेच नव्हे तर निश्चलपणे, निडरपणे हे सर्व सहन करण्यास सिद्ध आहे. आपल्या वरिष्ठ बंधूची प्रकृतीही मजपेक्षा जरी बरी आहे, तरी अर्धशिशीने त्याचेही वजन १०६ पौंडावर आले आहे. ''

## अंदमानातील पत्राचा सर्वदूर प्रचार

या माझ्या १९१८ च्या ऑगस्टमध्ये टाकलेल्या अणि सरकारी संमतीनेच धाडल्या गेलेल्या कारागृहीय पत्रातील काही उताऱ्यांवरून मी सर्व राजबंदीवानवर्गाच्या मुक्ततेविषयी कशा प्रकारे झटत होतो आणि माझे तत्कालीन भाव आणि परिस्थिती काय होती हे बरेच प्रदर्शित होणारे आहे. या पत्राच्या शेकडो प्रती करून माझ्या कनिष्ठ बंधूंनी त्या वर्षी जमलेल्या राष्ट्रीय सभेच्या सर्व प्रतिनिधींत वाटल्या. त्याचे उतारे अमृत बझार पत्रिका, बंगाली आणि इतर इंग्लिश दैनिकांतून आणि अनेक देशी भाषांतील वृत्तपत्रांतून आणि मासिकांतून पकाशित झाले. माझ्या प्रकृतीविषयी चिंताग्रस्त होऊन लोकांत जोराची सहानुभूती उत्पन्न झाली आणि त्यामुळे राजबंदीवानवर्गाच्या कष्टांकडे सार्वजनिक लक्ष तीव्रपणे वेधिले गेले. माझ्या बंधूंनी, मी, या आणि इतर सरकारी आणि अंतःस्थ पत्रांतून आखून दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे एकसारखी चळवळ सुरू ठेवली. आणि लोकांच्या मनात गुप्तपणे वसत असलेली राजबंदीवानवर्गावरील भक्ती आणि प्रीती हळूहळू धीटपणे व प्रकटपणे व्यक्त होण्यास शिकली. दोन-चार मित्रांच्या आग्रहास बळी पडून मी जर संपात काम सोडले असते तर अशा संधीस हे पत्र सरकारीरीत्या मला

टाकण्यास सापडले नसते. परवानगीच मिळाली नसती. परंतु या पत्रातील वस्तुस्थिती सरकारी अधिकाऱ्यांच्याच परवानगीने माझ्या भावास कळविता आल्याने, ती खरी असे मानण्यास आणि तिच्या आधारावर राजबंदीवानांच्या छळाविषयी तीव्र आलोचना करण्यास, निनावी किंवा अंतःस्थ पत्रांच्या माहितीवर विसंबण्यास भिणाऱ्या पत्रांनाही आणि पुढाऱ्यांनाही शक्य झाले. कित्येक प्रमुख पुढा-यांच्या डोळ्यांतून या पत्राची प्रत वाचताच टिपे गळली हे आम्हास नंतर कळले. अमृतबझारपत्रिकेत "Outrageous treatment of a political prisoner" या मथळ्याखाली या पत्रावर आलेला लेख आम्हास कारागारात बघण्यासाठी आमच्या प्रच्छन्न स्नेह्यांनी गुप्तपणे धाडला होता.

सरकारद्वारा हे पत्र गेल्याने त्यातील विधेयांस जरी विशिष्ट महत्व आले होते तरी त्या पत्रात सरकारी निर्बंधनानुरूप कारागारीय संपाची आणि इतर फुटकळ गोष्टींची माहिती देता आली नाही. ती उणीव भरून काढण्यास अंतस्थ पत्रे हिंदुस्थानात धाडणे नेहमीप्रमाणे प्राप्तच होते. म्हणून प्रथमतः एक पत्र लिहून त्याच्या टाईपरायटरने अनेक प्रती काढून त्या श्री. मदन मोहन मालवीय, डॉ. बेझंट इत्यादी बहुतेक पुढाऱ्यांस आणि विधिमंडळातील सभासदांस दर आगबोटीतून दोन-दोन चार-चार धाडण्यात आल्या त्या काही पोचत, काही गहाळ होत. नंतर एक सद्‌गृहस्थ, ज्याचा नामनिर्देश ते दुर्दैवाने लवकरच वारल्यामुळे येथे करावयास हरकत नाही, ते डॉ. दामोदर, हिंदुस्थानात येताना सर्व माहिती जी त्यांनी डोळ्यांनी पाहिली होती ती टिपून अंदमानहून स्वदेशी घेऊन आले. न्यू इंडियात आणि इतर एक-दोन मासिकांत त्यांचे अंदमानच्या राजबंदीविषयींचे लेख आधीच निनावी प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे त्यांचेवर आधीच सर्व अधिकाऱ्यांचा अंदमानमध्ये फार डोळा होता. त्यांचा स्वभावही फार स्वतंत्र बाण्याचा होता. मागे उल्लेखिलेल्या आमच्या संस्थेचे ते सभासद असून राजबंदीवानांना निरपेक्ष रीतीने ज्या काही प्रमुख लोकांनी वर्षोनुवर्षे अंदमानात साहय दिले त्यांत ते एक होते. आश्चर्याची म्हणून जी गोष्ट अनेकांस वाटेल ती ही की, ते मद्रासकडील अस्पृश्यांतील एक अस्पृश्य होते. देखणा, प्रतिष्ठित, स्वाभिमानी, धाडसी आणि स्वतंत्र बाण्याचा तो पुरुष पाहताच अशा कित्येक कर्त्या पुरुषांचे कर्तव्य आम्ही आमच्या या अस्पृश्यतेच्या शापाने आणि छापाने खुंटवून नामशेष करीत आमच्या राष्ट्राचे बळ क्षीणतर केलेले आहे ही गोष्ट तत्काळ मनात डाचू लागे? संधी मिळताच त्यांची उन्नती आणि विकास स्पृश्यवर्णाने तोंडात बोट घालून पाहत राहावे असा होईल हे डॉ. दामोदर सारख्या कर्त्या देशभक्तास पाहताच तत्काळ ध्यानात येई. त्यास त्याचे वरिष्ठ गोरे अधिकारी देखील दचकून असत. तो मार्गाने भलत्यासलत्या गोऱ्यास रामराम करीत नसे म्हणून कागाळ्या होत. दुर्दैवाने हे गृहस्थ अगदी भर वयात इंफ्लूएंझास हिंदुस्थानात येताच बळी पडले! तरीही त्यांनी आम्ही सांगितलेली कामगिरी प्रथमच पुरी केली होती; आमच्या एका राजबंदीवान स्नेहयांतील आणि प्रमुख सहकाऱ्यंतील गृहस्थाने भानसिंगाच्या मारहाणीसुद्धा संपातील सर्व घासाघाशीपर्यंत राजबंदीवानांच्या छळाची स्फुट माहिती लिहून एक पत्र सिद्ध केले होते ते आम्हास दाखविल्यावर आम्ही आमच्याविषयीच्या यातनांचा उल्लेख तेवढा त्यातून सहेतुक गाळून नंतर आमच्या संस्थेतील शपथबद्ध झालेला एक अत्यंत विश्वासू बंदीवान आपली दहा-बारा वर्षांची शिक्षा भरून सुटून जाणार होता त्याचे हाती हिंदुस्थानात धाडले. त्याने मोठ्या कौशल्याने सर्व झाडाझडती झाली तरी त्यातून ते संभाळून हिंदुस्थानात ठरलेल्या पत्त्यावर टाकले. हे पत्र पोचले तरी वृत्तपत्रे त्या आधारावर प्रसिध्द करण्यास जरा कचरु लागली. परंतु डॉ. दामोदर हिंदुस्थानात येऊन पोचताच त्यांनी पुढाऱ्यांच्या गाठी घेऊन त्या पत्रातील दिसण्यात भयंकर दिसणाऱ्यां घटनाही कशा सत्य आहेत हे त्यांस वैयक्तिक दायित्वावर

पटवून दिले. ते पत्र बंगालीत आणि मला वाटते न्यू इंडियातही साग्र प्रसिद्ध झाले. तेव्हा स्वदेशात राजबंदीवानांच्या छळाविषयी एकच ओरड होऊन अंदमानचा प्रश्न सर्व देशप्रेमी लोकांचे मनात सारखा सलू लागला. हे पत्र प्रसिद्ध होताच आणि स्वदेशात ही जागृती होताच हिंदुस्थान सरकार कडूनही विचारपूस झाली आणि यथापूर्व अंदमानातील अधिकाऱ्यांत मोठी खळबळ उडून गेली.

इकडे संप चिकाटीने चाललाच होता. संपातील लोकांस - ज्यांत थोराड शरीराचे असे लोक होते की, त्यांस प्रत्यहीचे भरपूर जेवणही अपुरे पडे. त्यांस त्या प्रत्यहींच्या अन्नाहूनही कमी असे शिक्षेचे अन्न मिळू लागले. त्याचा वचपा काढण्यास त्या कारागारातील नारळांच्या थोरल्या कारखान्यातून लागलेल्या खोबऱ्याच्या ढिगातील थाळया भरभरून खोबरे अंतस्थ रितीने आमच्या सहायक बंदीवानांनी, वॉर्डरांनी आणि पेटी ऑफिसरांनीही त्या संपवाल्यांच्या कोठडीत नेऊन पोचवावे. दर दोन-तीन दिवसाआड एखाद दुसरे दैनिक वा साप्ताहिक पत्र आम्हास अंतःस्थ रीतीने मिळे. ती मोठी गंमत असे. प्रथम ते कारागाराच्या फाटकाचे आत कोण्यातरी मोरीच्या नाळीतून, नाहीतर कोणाच्या तरी कोटात शिवले जाऊन, नाहीतर कचरागाडीतल्या एखाद्या फळीच्या खाली दबून, नाहीतर कोणा साहसी गृहस्थाच्या खिशात उघड उघड घुसून प्रवेश करी. नंतर ते संधी साधताच आमच्या चाळीत येई. जो आणणारा तो इकडे तिकडे कामात अगदी दंग होऊन फेऱ्या घालीत सुटावयाचाच. सरकारचे काम इतक्या प्रामाणिकपणे पायतोड करून कोणी करतो आहे असे दिसताच आमची मंडळी समजावयाची की, बहुधा डाक आली. मग त्याच्या मार्गावर त्या चाळीच्या गजाशी जाऊन गुपचूप उभे राहावे. आम्ही संपात नसल्यामुळे कोठडीत बंद नव्हतो - पण म्हणजे मोकळे होतो असे नव्हे, तर चाळीच्या कोठडीपुढल्या लांब ओरीत बंद होतो. त्या गजाशी सहजसे उभे राहता खूण पटली की, एका सोयीस्कर जागी गजातून ती जोराने खेपा घालीत खोबरे वहाण्याच्या पाट्या घेऊन हिंडणारा बंदीवान किंवा चलो काम करो बैठे है साले! म्हणून बंदीवानांस धाक घालीत कामात दंग दिसणारा अधिकारी चटकन गजातून ते पत्र आत टाकी. ते येताच आम्ही दोघे तिघे असलो तर त्याचे तीन लहान तुकडे होत. कारण कोणी आल्यास सर्व लांबलचक पत्र लपविणे कठीण. मग ते तुकडे दिव्यामागे, भोकात, भिंतीत जिथे साधेल तेथे लपवून गुरु जसे वेळ सापडताच अर्धा कच्चा गिळलेला कडबा उगळून पुन्हा सावकाश रवंथ करीत बसते तसे तो तुकडा एकेक काढून वाचून टाकावयाचा. एकजण वाचू लागला की दुसऱ्याचा पहारा. नंतर चार ओळी वाचल्या की लगेच तितकाच तुकडा फाडून चोळून मोळून त्या वृत्तवाचनकार्याचा जो शेवटचा विभाग (खाते) पत्रनाश त्या विभागाच्या अधिकाऱ्याकडे तो चोळामोळा फेकला जाई. तो अधिकारी त्वरित ते सर्व लटांबर पाण्यात कोळून पुन्हा त्याचा लगदा करून फेकून देई. कारण नुसते फेकले आणि त्या पत्राच्या नावाचाच तुकडा कोणास सापडला तर ते पत्र घेणाऱ्या धन्याचा पत्ता एका तासात लागावयाचा. कारण पोर्टब्लेअरमध्ये पत्रे घेणारे अगदी मोजके आणि नोंदलेले लोक. म्हणजे सगळाच हाहाःकार! अशा रीतीने ते पत्र वाचून त्यातील माहिती संक्षिप्त लिहून एक कारागारीय चिठ्ठीचे वृत्तपत्र सिद्ध होई. मग त्या दिवशी संध्याकाळपर्यंत चाळीचाळीतून फिरत राही. कोठडीत कोणी पत्र दिले तर वॉर्डराने पहाऱ्याचे हेलपाटे घालताना त्या प्रकाशात साधेल तसे वाचावयाचे. एकदा दोनदा त्याच वेळी अधिकारी येण्याची पाळी आल्याने तो कुलुपे उघडून चाळीत येईतो ते दोन-तीन स्तंभ कागद चावून गिळून टाकावे लागले. कोठडीबंद लोक या कारागारीय चिठ्ठीच्या वर्तमानपत्राची प्रतीक्षा करीत अगदी उभे

असावयाचे. त्यात ते लढाईचे दिवस. जो तो बातमी मागे. सुशिक्षित असत ते तर बातमीवर संतुष्ट न राहता पत्राच्या चार ओळी का होईना पण छापलेला तुकडा मागत. पण असे महत्वाचे तुकडे लहान वेटोळी करून नारळाच्या कचऱ्यात खुपसून चाळीचाळीतून धाडावे लागत. अशा रीतीने लढाईच्या बातम्या, संप चालू होता आणि म्हणून अधिकाऱ्यांनी शक्य तितका कडक बंदोबस्त ठेवला होता तरीही- काळ्या लोकांवर विश्वास कमी झाला म्हणून गोरे सैनिक चाळीचाळीतून पहाऱ्यावर ठेवले तरीही- प्रत्यही सर्वांस पोचवीत राहण्याची व्यवस्था चालूच होती. हे गोरे सैनिक देखील ओळख होता होता काही इतके मनमिळाऊ आणि सहानुभूतिप्रवण निघाले की, त्यांनी देखील बातम्या दिल्याच नाहीत किंवा वर्तमानपत्रेही दाखविलीच नाहीत असे शपथेवर सांगण्यास आम्ही धजत नाही. त्यांच्याही मग बदल्या होत. तरी तेच. कारण मनुष्यस्वभाव!

## काकुळत्या करण्यातही निष्णात!

एवढया या गडबडीत केव्हा केव्हा चटकन पत्र आणणारा वा वाचणारा धरला जाई. तेव्हा मग तोंड अगदी बघण्यासारखे करावे लागे. दादा, बाबा, जमादार, जमादारसाहेब अशा अगदी बारीपर्यंत प्रथम विनवण्या करून त्या आणणाऱ्या बंदीवानास सोडविण्याचा प्रयत्न करावा लागे. दोन-चार वेळा बारीला द्रव येऊन त्याने पत्र सोडून दिली होती ही गोष्ट बारीविषयी तितकी कृतज्ञता प्रदर्शित करण्यासाठी जशी सांगणे प्राप्त आहे, तशीच आम्ही केविलवाण्या काकुळत्या करण्याच्या समयज्ञ कलेतही किती निष्णात झालो होतो हे सिद्ध करण्यासाठीही सांगणे प्राप्त आहे. बरे इतक्यावर खटला झालाच तर ''चलता है!'' एकदा असेच एक पत्र धरले जाऊन आम्हास हातकडीत सात दिवस लोंबकळत उभे राहावे लागले असता बारी आला आणि वक्र विनोदाने हातकड्या दाखवून म्हणाला :- ''हे काय रे'' आम्ही म्हटले ''हे पोस्टेज!' तो म्हणाला, ''जरा महाग पडले नाही?'' आम्ही म्हटले, ''छे? किती तरी स्वस्त. तुम्हास वर्तमानपत्रे घ्यावयाची तर वर्गणी भरावी लागते आणि त्यावाचून पोस्टेज. आम्हास कारागारात वर्गणीवाचून वृत्तपत्रे मिळतात. केव्हा केव्हा असे आठ दिवस हातकडीचे पोस्टेज-टपालव्यय दिला की झाले. पुन्हा सहा महिने फुकट पत्र!''

हातकड्या बेड्यांच्या माराखाली त्या सहा सहा महिने कोठडीबंद झालेल्या राजबंदीवानांत कित्येकांच्या प्रकृती अगदी विकोपास गेल्या. एक-दोघांस क्षयाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली. अंदमानात क्षयालाच बहुतेक लोक बळी पडत. त्या सुदृढ दीर्घकाय शेतकरी आणि श्रमजीवी शीखांतही लोक क्षयाला बळी पडण्याचा संभव दिसू लागला. एक-दोघांस कोठडीबंदी असह्य होऊन डोके बिघडते की काय अशी चिन्हे दिसू लागल्याचे त्यांनी कळविले. परंतु तरीही पहिल्या सहा महिन्यांनंतरही पुढे संप चालवावा ही त्यांची चिकाटी स्थिरच होती. परंतु आमच्या नेहमीच्या धोरणाप्रमाणे संपासारख्या तात्कालिक चळवळीत अशा उत्कृष्ट देशभक्तांचा बळी देणे नाही असा आम्ही आपला निश्चय कळविला. संप चालवावयाचाच तर पहिल्या संपातून जे वगळले गेले त्या नव्या बंदीवानांनी कामे सोडून कोठड्यांत जावे आणि जे थकले भागले होते आणि ज्यांच्या प्रकृतीस धोका होण्याचा संभव स्पष्ट दिसू लागला होता त्यांनी कोठड्यांतून बाहेर येऊन हलकी कामे, जी अधिकारी- वर्ग देण्यास मान्य झाला होता ती करीत जरा विश्रांती आणि पालट घ्यावा असे आम्ही सांगितले. पुष्कळ चर्चेनंतर आणि विरोधानंतर अंती ते दृढप्रतिज्ञ लोक

संप सोडण्यास मान्य झाले आणि त्याप्रमाणे सर्वांनी पुन्हा कामे आरंभ केली. सहा महिन्यांनी त्या रजपूत तरुणानेही तेव्हाच अन्नग्रहण केले हे मागे सांगितलेच आहे.

संप संपताच अधिकाऱ्यांना पुन्हा एकदा हायसे वाटले. या नेहमी चालू असलेल्या संपांनी अधिकाऱ्यांचा दरारा असा पहिल्यासारखा कारागृहात काही उरला नाही. पर्यवेक्षक किंवा बारी आला म्हणजे चाळीचाळींतून हे राजबंदी बसूनच रहात, हातकडया लावून उभे करविले तरी तो बळाने करून घेतलेला सन्मान अधिकाऱ्यांसच अपमानाहून त्रासदायक वाटे. त्याविरहित असल्या आणि विशेषतः या शेवटच्या संपाने कारागृहीय व्यवस्थेस आर्थिक चट्टा काही थोडा बसत नसे. त्यावाचून देशात माजलेली खळबळ आणि जिच्यामुळे हिंदुस्थान सरकारकडून होणाऱ्या प्रश्नप्रतिप्रश्नास उत्तरे देत बसण्याचा त्रास, आणि प्रसंगी भीती, या सर्व गोष्टींमुळे संपास अधिकारी मनापासून कंटाळले होते. राजबंदीवानांस राजबंदीवानांप्रमाणे लेखले जाऊन त्या वर्गास इंग्लंड इत्यादी देशांत वागविले जाते तसे वागविले जावे ही एक मागणी सोडून हिंदुस्थान सरकारकडून त्या संपाचे आधी केलेल्या बहुतेक लहान- सहान पण महत्वाच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. लांब पत्रे धाडू देणे, शीखांस केसासाठी स्नानास गोडे पाणी, साबण आणि तेल मिळणे, अन्नाची सुधारणा, कामाची अतिशय सक्ती नसणे इत्यादी सवलती मिळाल्या. संपाचा मुख्य हेतू जो हिंदुस्थानात परिणाम होईल इतका अंदमानच्या पीडेचा प्रतिवाद आणि प्रतिकार करणे तो साध्य झालाच होता. आणि यद्यपि संपाच्या मागणीप्रमाणे भानसिंगाच्या मारहाणीसाठी बारीची उघडपणे चौकशी होऊन तो दंडित झाला नाही, तरी एक तर त्याला त्या आक्षेपातून सुटण्याकरिता पुष्कळ धडपड करावी लागावी इतकी विचारपूस वरिष्ठांकडून झाली होती. त्यास सहसा पुन्हा तसे करण्यास धजण्याचे साहस उरले नव्हते आणि दुसरे की, एका अधिकाऱ्याची उघड चौकशी करणे सरकारास भाग पाडणे हे काम हिंदुस्थानातील विधिमंडळे आणि मुद्रक यांचे होते. त्या कारागारात बांधून टाकलेल्या राजबंदींना त्याविषयी जो प्रतिकार करता आला तो त्यांनी केला होता.

त्या संपानंतर अधिकाऱ्यांच्या वर्तनात पुष्कळच ढिलाई झाली. पूर्वी धर राजबंदी की दडप घाण्यात असे प्रकार होऊन सतरा वर्षाची मुले देखील त्यास अपवाद नसत. पण मागच्या संपांनी आणि प्रतिकाराने नरम होत युद्धकाली आलेल्या त्या शेकडो राजबंदींतील अगदी धिप्पाड आणि सशक्त मनुष्यासही कोणी घाण्यात फारसे धाडले नाही. छिलका पुरा करून घेण्याचीच जिथे अधिकाऱ्यांस मारामार पडे तिथे घाण्याचे नाव व्यर्थच होते. अशा घासाघिशीने जे कराल ते करा पण काहीतरी काम करा- अगदी नाही म्हणू नका असे अगदी स्पष्टपणे सांगून अधिकारी दिवस ढकलू लागले. जर छिलक्याशीच घासाघीस केली नसती तर ते पुन्हा घाणा देत. घाणा तर काय पण बरेच दिवस एखादा संप किंवा भांडण न केले तर बारी पूर्वी पूर्वी दोरीचे काम देखील वाढवू लागे! एकदा अशीच स्वस्थता पाहून त्याने तीन पौंड दोरीचे काम प्रत्येक चार पौंडावर चढविण्याचा प्रयत्न केला होता. कारण ''तीन पौंड दोरी हे राजबंदी झटकन वळतात आणि मग सगळा दिवस वाचन करीत बसतात!'' अशा या अधिकाऱ्यांस नेहमी घासाघीसच ठीक वळणावर ठेवी.

## शेवटी बारी थकून गेला

परंतु या संपानंतर बारी अगदीच थकून गेला. हिंदुस्थानपर्यंत त्याचा दुर्लौलिक झालेला. सरकारही शेवटी त्यास संशयित दृष्टीनेच पाहू लागलेले, आणि राजबंदीवानांना लहानमोठ्या सवलती मिळत मिळत तो वर्ग इतका डोईजड झालेला की, त्यामुळे कारागारात त्यापूर्वीच्या पोर्टब्लेअरच्या परमेश्वराची एका फत्तराहून अधिक प्रतिष्ठा किंवा भीती साधारण बंदीवानही मानीत नाहीसे झालेले. अशा स्थितीत तो अगदी उदासीनपणे राहू लागला. मरो तो सरकारी दरारा, माझे राहिलेले दिवस कसेबसे भरले की सुटलो म्हणून तो स्पष्टपणे सांगे. पूर्वी आम्हास प्रत्येक संपात त्याच त्या मागण्या करताना पाहून तो म्हणे ''काय सावरकर! त्याच त्या मागण्या मागता! पण तुमचा हा प्रयत्न दगडी भिंतीस डोक्याने टक्कर देण्यासारखा व्यर्थ आहे!'' आता त्या मागण्यातील कित्येक मागण्या पचनी पाडीत पाडीत स्थिती इतकी झाल्यावर आम्ही बारीस म्हणावे, ''त्याच त्या मागण्या मागणारी चिकाटी बघू शेवटी आपले डोके फोडून घेते की दुसऱ्याचे! अजूनपर्यंत तर ती अगदीच व्यर्थ गेली नाही असे राजबंदीवानांचे अलीकडे वर्षोनुवर्षे दर्शन न झालेला तो तेलाचा घाणाच सांगेल!''

युद्धानंतर आलेल्या राजबंदीस आता पुष्कळ स्वातंत्र्य आणि काहीकांस इतर राजबंदीवानांवर देखरेख करण्यासाठी किंवा मोकळेपणाने हिंडताफिरता यावे अशी कामे देण्यात आली. विशेषतः जे संपास अनुकूल नसत किंवा आपआपले काम करून स्वस्थ बसत त्यांच्या साधेपणाकडे सरकारचे लक्ष वेधून त्यांस पुस्तके बांधणे, कारखान्यात, छापखान्यात सोईस्कर कामे आणि अधिकार उत्तेजनार्थ म्हणून मिळत. संपांचा अणि घासाघिशीचा हा एक महत्वाचा उपयोग असे. कारण त्यामुळे प्रत्यक्ष भांडण करणाऱ्यांचा जरी लाभ झाला नाही तरी भंडणात न पडणाऱ्या राजबंदीवानांच्या 'सरळ' वर्तणुकीचे तर काही फळ होई आणि त्यायोगे काही राजबंदी तरी सापेक्षतः बऱ्या स्थितीत राहू शकत. सरकारास ते 'सुशील' वाटावे म्हणून तरी कोणाकोणास 'चंडशील' होणे अवश्य होते. नाहीतर त्या सुशीलांसही तीन पौंड दोरीचे नावे चार पौंड दोरखंड वळावे लागते.

या संधीस युद्धाचे पहिले स्वरूप बदलेले होते. आता जर्मनीचा पहिला भर उतरत चालला होता आणि त्या मानाने बंदीवानांच्या आशेच्या पहिल्या उतू जाऊ पहाणाऱ्या उकळीसही उतार पडत चालला होता. मागून जे राजबंदी आले त्यांच्यातही साधारण बंदीवानांप्रमाणे अगदी उद्या चाललो म्हणून पक्का विश्वास बाळगणारे लोक होते. संपाची आधी शिक्षा होताना ''सहा महिने बेडी'' म्हणून पर्यवेक्षक शिक्षा देई, तेव्हा त्यास तिथेच कित्येक भोळ्या राजबंदीवानांनी सांगावे की ''जाव! सहा महिने तुझे राज्य तरी टिकणार आहे कुठे!'' अशा माझ्या सहतप्यांस मी पुष्कळ विनवी की ''बाबांनो, अशा भलत्याच आशा धरू नका! नाही तर क्वचित निराशेची प्रतिक्रिया सहन होणार नाही! आलीच वेळ तर निघून जाऊच. पण त्यावर अवलंबून राहू नका. तिची निश्चिती न बाळगता इथेच झुंजत मरण्याची मनाची सिद्धता ठेवा. '' इंग्रजांचे राज्य एक-दोन आठवड्यात नामशेष होणार अशा या आशेने वणव्यासारख्या पेटलेल्या त्या बंदीवान जगतात एक म्हातारा मात्र मला असा खंबीर भेटला होता की तो सांगे, ''अरे जाव! इंग्रजांचे राज्य कधीही जाणार नाही!'' हा हत्यारी होता मोठा धाडसी. तीनदा अंदमानातून पळून जाण्याचा प्रयत्न त्याने केला. पूर्वी एकदा १० वर्षे शिक्षा भरून हा सुटून गेला. पुन्हा सुटताच त्याच्या त्या

पहिल्या शिक्षेस कारणीभूत झालेल्या त्याच्या शत्रूस ठार मारून जन्मठेप घेऊन अंदमानास आला. आणि तिसऱ्या प्रयत्नात सफलता येऊन अंदमानाहून निसटला. नावेत बसून एकटा महिनाभर समुद्रात भटकत भटकत फिरत होता! शेवटी अगदी मद्रासच्या तटास लागता लागता पकडला गेला. अशा अनेक निराशा झाल्याने त्यास, इतर बंदीवानांस जसे आशेचे वेड लागले होते तसे, यास निराशेचे वेड लागले होते. कोणीही इंग्रजांचे राज्य जाईल असे म्हटले की तो कातावे आणि संतापून म्हणे, ''अशा तीन लढाया झालेल्या मी पाहिल्या आहेत. आणि इंग्रजांचे राज्य जाणार म्हणून पन्नासदा ऐकले आहे. पण ते सगळे खोटे. लुच्चेपणा केवळ. इंग्रजांचे राज्य कधीही जाणार नाही. जो ते कधी जाईल म्हणेल तो . . . . आहे!'' म्हणून शिवी देई ! पण या माणसाचे मनात त्या इंग्रजांचेविषयी किंवा राज्याविषयी लवलेशही प्रीती होती असे कोणी समजेल तर ती चूक होती. तो एकदा इंग्रजांचा सूड घेण्यासाठी एक भयंकर कृत्य करण्यासाठीही सिद्ध झालेला होता. . . !

## अन्नसत्याग्रही रामरक्षा याचा मृत्यू!

या संपाचे गडबडीतच रामरक्षा नावाच्या एका पंजाबी ब्राह्मणाच्या मृत्यूची दुर्घटना घडली होती. हे गृहस्थ चीन, जपान इत्यादी स्थळी प्रवास करीत असता राज्यक्रांतिकारकांच्या पक्षात समाविष्ट होऊन सयाम आणि रंगून येथील बंड करण्याच्या आणि सैनिकांस बिघडविण्याच्या कटात दंडित झाले होते. तिकडेही त्यांस अतिशय पीडा सहन करावी लागली होती. अंदमानातील कारागारात पाय ठेवताच त्यांनी पाहिले की, ब्राह्मणांच्या गळ्यातले यज्ञोपवीत काढून घेण्यात येत आहे. ते स्वतः परदेशी मुरलेले आणि बाह्य संस्कार धर्म समजण्याच्या आकुचिंतपणाहून फार प्रगल्भ विचारांचे होते. परंतु कोणासही त्यांचे इच्छेविरुद्ध त्यांचे धर्मचिन्ह काढून घेण्यास भाग पाडावे हे त्यांस न रुचून त्यांनी आपले यज्ञोपवीत देण्याचे साफ नाकारले. अधिकाऱ्यांनी असल्या गोष्टीतही मूर्खपणाचा हेका चालवून ते तोडून टाकले. त्या धार्मिक अपमानाचा प्रतिवाद करण्यासाठी यज्ञोपवीत नाही तोवर मी अन्न घेणार नाही म्हणून रामरक्षा यांनी शपथ खाल्ली; अन्न तर काय पण पाणी देखील ते घेईनात. निर्जल आणि निरन्न असे कडक व्रत करीत तो वीर त्या कोठडीत कित्येक दिवस पडून राहिला. शेवटी काही पंधरा दिवसांनी त्यास नाकाने नळी घालून बळाने अन्न देण्यात येऊ लागले. त्यासही महिना उलटून गेला. यज्ञोपवीताकरता झुंजत, मरणाचा पण करून तो ब्राह्मण तसाच झगडत राहिला. त्याच्या पूर्वीच्या झालेल्या छळाने आणि या निरशनाने खंगून त्याच्या छातीत भयंकर दुःख होऊ लागले. डॉक्टराने त्यास क्षयाची भावना झाल्याचे कळविले. सर्वजण म्हणत तू आता अन्न घे; पण तो ऐकेना. मरणाचे दारी बसला. आम्ही स्वतःच्या हातची चिठ्ठी धाडली. शेवटी मोठ्या प्रयासाने अन्नग्रहणास त्याचे मन वळविले. परंतु दुर्दैवाने विकोपास गेलेला विकार बरा न होऊन तो ब्राह्मण-वीर एक दोन महिन्यातच मृत्यू पावला.

परंतु त्याचे हे प्रकरण तिथेच दबू न देता त्याची बातमी वरिष्ठ अधिकारी, हिंदुस्थानी मुद्रालय आणि शेवटी कारागृहाचे चौकशीसाठी नेमलेल्या मंडलकमिशन यांपर्यंत पोचविली गेल्याने शेवटी ब्राह्मणांस कारागारात यज्ञोपवीत ठेवण्याचा अधिकार मिळाला. या यःकश्चित अधिकारासाठी देखील एका ब्राह्मणाचा बळी द्यावा

लागला. ब्राह्मण बंदीवानांसच नव्हे तर सर्व पंथांच्या बंदीवानांस त्यांचे अत्यावश्यक धर्मचिन्ह बाळगण्याची परवानगी सर्व कारागारांतून सध्या मिळालेली आहे.

युद्धाचा शेवट जसाजसा येऊ लागला तसतसा जर्मनीचा पराभव स्पष्ट दिसू लागला. तेव्हा पूर्वी जर्मनीच्या भरभराटीविरुद्ध इंग्रजांच्या खोट्या विजयांच्या बातम्या सांगण्याचा जसा इंग्रजांस प्रसंग आला तसाच जर्मनीच्या खोट्या विजयांच्या काल्पनिक बातम्या उठवून त्यावर आपल्या तीव्र निराशेची धार बोथट करण्याकडे बंदीवानांची प्रवृत्ती वाढत गेली. इंग्रजांच्या पराभवाच्या इतक्या अवाच्या सवा बातम्या बंदीवान उठवीत की युध्दानंतर एक-दोन वर्षांत इंग्रजांस बंदीवानांस पत्रे वाचू देणेच अधिक इष्ट दिसले. कारण वृत्तपत्रांतून निदान अगदी लंडन घेतले, लाहोरला अमीर आला, इत्यादी अद्भुत घटना तरी कोणी छापणार नव्हता. याच वेळेस आम्हा राजबंदीवानांस अंशतः वरील कारणासाठीच आणि अंशतः आम्हांस वृत्तपत्र देऊन काही तरी मनोरंजन करता यावे म्हणून त्या वेळचा सुज्ञ पर्यवेक्षक लंडन टाईम्सची साप्ताहिक आवृत्ती कारागारात उघडपणे देत असे. शेवटी तुर्कीचा पराजय होत गेला हे ऐकून मी आनंदच मानी. ते मुलमानांस तर राहोच पण कित्येक राजकारणाशी अपरिचित असणाऱ्या राजबंदीवानांसही प्रथम रुचले नाही. मागून त्यांच्या ते ध्यानात आले. जर्मनीच्या पराभवाच्या बातम्या मी यथातथ्यपणे सांगे पण त्यांना त्या अप्रिय बातम्या ऐकून त्या सांगणाऱ्याचाच राग येई. बरे बातमी विचारल्यावाचून तर त्यांस राहवत नसे. मी कधी म्हटले, ''बातमी सांगत नाही, तुमच्या समाधानासाठी खोट्या बातम्या सांगणे हे मी निंद्य समजतो. '' म्हणजे अगदी गयावया करू लागत. अशा वेळेस त्या बंदीवानांना जर्मनी पराजयाचा आणि तुर्कीच्या पराजयाचा खरा अर्थ मी समजून देण्यासाठी आठवड्याच्या बैठकीत तोच विषय एकदोनदा घेतला होता. अनुकूल असेल तेव्हाच बातमी ऐकणे हा मूर्खांचा स्वभाव असतो. शूर आणि कर्तबगार पुरुष प्रतिकूल बातमी प्रथम ऐकू इच्छितो. कारण प्रतिकुलाशी टक्कर ताबडतोब देता यावी. नेपोलियन बोनापार्ट रात्री देखील आज्ञा देऊन ठेवी की कोठलीही प्रतिकूल बातमी आली की त्यास ताबडतोब उठविले जावे. अनुकूल असेल तर उठल्यावर कळवली जावी! त्यातही अनुकूल बातमी ऐकण्यासारखी तपश्चर्या हिंदुस्थानने अजून केलेली नाही. अजून कितीतरी प्रतिकूल बातम्या ऐकावयाच्या आहेत! सत्य आहेना? मग ते प्रतिकूल असले तरी त्यास तोंड दिले पाहिजे. मागे राजेलोक कोणी पुत्रजन्माची कहाणी ऐकविण्यास आले म्हणजे सोन्याची कडी देत; पण कोण्या पराजयाची बातमी अशा लोकांस घरात घुसून, छातीवर बसून शत्रूच जेव्हा देईल तेव्हाच काय ती कळणार! असे भ्याड बनून कसे चालेल?'' असे समजावून सर्व बंदीवानांना पराभवाच्याही बातमीमुळे होणाऱ्या प्रतिक्रियेपासून शक्यतो सांभाळण्याचा प्रयत्न आम्ही करू. हळूहळू लढाईच्या उत्तररंगाच्या बातम्या देखील ऐकून घेऊन त्यांची चर्चा शांतपणे करण्याची सवय बंदीवानांतील बहुतेक समंजस माणसांस लागली. तुर्कस्थानच्या पराभवामुळे हिंदुस्थानातील मुसलमानांच्या महत्वाकांक्षेस लागलेले भलतेच देशविघातक वळण वेळीच उतरण्यास साहाय्यच होईल हेही हळूहळू सर्वत्रांस समजू लागले.

तरीही इतर बंदीवानांवर तर काय पण राजबंदीवानांवरही लढाईच्या परिणामाची थोडीबहुत प्रतिक्रिया होतच गेली. काही त्यामुळे, काही कारागारांस कोठडीत बंद पडून पडून प्रकृतीवर अपरिहार्य परिणाम होऊन आणि काही त्या अंदमानातील आरोग्यघातक वायुमानाचे योगेकरून त्यामागून आलेल्या राजबंदीवानांतील धडधाकट आणि

शारीरिक परिश्रमास अपरिचित नसलेल्या आमच्या बांधवांतही कित्येकांची प्रकृती अगदी ढासळून गेली. तीनचार वर्षाचे आत कोणास आमांशाने जर्जर केले, कोणी आत्महत्येचे नाव काढू लागले, तीनचार शीख बंधू क्षय होऊन आमच्या डोळ्यासमोर वारले. तेव्हा आम्हीही त्याच विकाराचे शंकेने त्याच रुग्णालयात ठेवले गेलो होतो. ते देशभक्त उदार आणि शूर लोक असे पटापट मरताना पाहून फार वाईट वाटे. आपणही आज उद्या असेच या वाटेनेच जाणार! हेच आश्चर्य की जेथे तीन-चार वर्षांत त्या असल्या सुदृढ आणि धडधाकट लोकांची शरीरप्रकृती खचून गेली तिथे आपली आज आठ-नऊ वर्षे टिकाव धरू शकली!

## पुनर्जन्म घेऊन परत येईन - जोतीशचंद्र पाल.

जोतीशचंद्र नावाचा एक बंगाली तरुण लढाईचे दिवसांत बारिसाल येथे जर्मनीच्या शस्त्रास्त्रांसह येणाऱ्या रणतरीची मार्गप्रतीक्षा करीत बसलेल्या बंगाली राज्यक्रांतिकारकांची पोलिसांशी जी उघड चकमक झाली त्यात गोळी लागून आहत झालेला आणि मग जन्मठेप द्वीपांतराची शिक्षा लागलेला होता. संपाचे दिवसात कोठडीबंदी झाल्यामुळे एक दिवस संध्याकाळी त्यास अन्न, वाढून शिपाई बंद करू लागला. जोतीशचंद्र म्हणाले, कोठडीत शौच केलेला गमला (मडके)तसेच आहे. ते काढा म्हणजे अन्न आत नेतो. कोठडीतच मडक्यात बंदीस परसाकडे बसावे लागे हे पूर्वी सांगितलेच आहे. शिपायी म्हणाला आता आत जा. त्या बोलाचालीत त्यास बळेच अन्नासह त्या कोठडीत कोंडून शिपायी आणि जमादार निघून गेले. बारीने पण दाद घेतली नाही. रात्रभर त्या दुपारच्या शौचाच्या मडक्यास उशाशी तसेच सहन करीत जोतीशला त्या लहान सड्या कोठडीत राहावे लागले. अशा प्रकारचा राजबंदीवानास हा काही पहिलाच प्रसंग नव्हता. पण जोतीशबाबूंच्या सहनशक्तीच्या तुटत आलेल्या दोरीस तो हिसका असह्य झाला. त्यांनी ते अन्न फेकून दिले आणि अन्नत्याग केला. थोडेच दिवसांत त्यास रक्ताची भयंकर हगवण लागली. ते रुग्णालयात आले. त्यांस अन्नग्रहणाचा आम्ही सर्व आग्रह करीतच होतो. अंती प्रत्यक्ष भेटीत अगदी गळ घालून त्यांचेकरवी अन्नग्रहण करविले; पण त्यामुळे तुटलेली दोरी पुन्हा हाती गवसली नाही, सांधता आली नाही. त्यांचे त्या रात्री भडकलेले डोके बिघडत बिघडत एका महिन्यात त्यांस वेड लागले. पुढे ते वेड्यांचे रुग्णालयात वर्षभर होते. पुढे गेल्या वर्षापर्यंत बंगाल्यात एका तुरुंगात होते. अंती परवा एका पत्रात एका अगदी यःकश्चित कोपऱ्यात एक चार ओळींची बातमी वाचली की ''जोतीशचंद्र पाल यांचा अंत बऱ्हामपूर येथील वेड्यांच्या रुग्णालयात झाला. '' अलीकडे त्यांचे वेड नाहीसे झाले होते असे म्हणतात. मरणानंतर त्यांनी आपल्या आप्तांना पुढील आशयाचा संदेश पाठवला होता - ''मरणानंतर माझा आत्मा स्वर्गामध्ये स्वस्थ घोरत पडेल असे मनातसुद्धा आणू नका! माझी मातृभूमीवरील भक्ती जर अकृत्रिम असेल तर तिच्या सेवेकरता मी पुनर्जन्म घेऊन ताबडतोब परत येईन अशी निश्चिती असू द्या!''   - 'लोकमान्य'  जनवरी  १९२४

वेडा जोतीश! अलीकडे त्यांचे वेड बरे झाले होते असे म्हणतात म्हणून वर लिहिले आहे. परंतु या मरणाचे वेळी धाडलेल्या चिठ्ठीवरून जे वेड त्यांस आजन्म लागलेले होते ते बरे झाले होते असे काही दिसत नाही!

आणखी एक उत्तमातील उत्तम, उदार, हिंदुसंघटनांचा पक्का अभिमानी असा पंजाबी राजबंदी असाच अगदी वेडाच्या, क्षयाच्या किंवा मरणाच्या तावडीत त्या काळी सापडत आलेला होता. ज्ञानतंतूंच्या क्षीणतेमुळे काही

राजबंदीवान अनिद्रेच्या आणि मस्तिक व्यथेच्या रोगास बळी पडलेले होते. त्यांत हेही गृहस्थ सापडले. रुग्णालयातून एक दिवस मला चिठ्ठी आली त्यात सर्व परिस्थिती लिहून हा जीवनभार आता असह्य होत आहे, आत्महत्या हाच एक उपाय उरला आहे म्हणून वर लिहिले होते. तत्काल शक्यतितक्या युक्तीप्रयुक्तींनी त्याचे मनात उत्साह भरवून आणि राष्ट्रसेवेसाठीच असे निष्फळ मरण शक्यतो टाळणे हे आपले राष्ट्रधर्मीय कर्तव्य कसे आहे हे वारंवार संगून त्यांस त्या संकटातून सोडविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्या आमच्या उदार मित्राच्या जीवनास तरी त्या वेळी आम्हास पारखे व्हावे लागले नाही. एकदोन वर्षांनी त्यांस जरा मोकळेपणी हिंडता येण्यासारखे काम मिळून त्यांची प्रकृती सुधारतही गेली.

## निराश झालेले लाला हरदयाळ

याच संधीस राज्यक्रांतिकारकांच्या कचरत्या धैर्यावर आणखी एक टोला मारण्यासाठी अगदी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून लाला हरदयाळांचे एक पत्रही वाचावयास देण्यात आले. पूर्वी एक बोटभर छापलेल्या तुकड्यास जवळ ठेवण्यासाठी आठ-आठ दिवस हातकडी देणारे अधिकारीच त्यांस अवश्य वाटे तेव्हा बोलाबोलावून अशी वर्तमानपत्रे वाचावयास देत. महायुद्धानंतर लाला हरदयाळजींनी एक पत्र प्रसिद्ध केले होते राज्य-क्रांतिकारकांशी सर्व संबंध सोडून आता इंग्लंडच्या छत्राखालीच हिंदुस्थानने स्थानिक स्वराज्य मिळवावे आणि ते शांततेच्या मार्गाने वैध चळवळ करूनच मिळेल अशा मताचे पुरस्कर्ते झालो आहोत. बारीने मला आणि माझ्या बंधूंना एकत्र बोलावून ते कात्रण वाचावयास दिले. नंतर माझे मत विचारले. मी इतकेच बोललो, की ''लाला हरदयाळ प्रामाणिक मनुष्य आहेत. ते जे लिहितात तशीच त्यांची आज समजूत असेल हे मी जाणून आहे!''. याहून अधिक चर्चा मला करता येत नाही इतकेच सांगून आम्ही परत आलो. हरदयाळच्या पत्राचाच विषय पुढच्या बैठकीत आम्ही घेतला होता. त्यांचा इतिहास, एखाद्या प्रतिकूल धक्क्यासरशी त्यापुरती तरी निराश होणारी त्यांची वृत्ती आणि आजपर्यंत अनेक एकांतिक मतांस धरीत सोडीत आलेली त्यांची प्रवृत्ती ही मला माहीत होती. त्या वेळेपुरते ते जे बोलतील ते त्यांचे प्रामाणिक मतच असे. पण ती निराशेची आणि आशेची एकांतिक प्रतिक्रिया फार वेळ टिकत नसे, तसेच ते पत्रही! असाच निष्कर्ष बहुतेकांनी काढला. काही म्हणाले, हे पत्र केवळ आपले मत पाहण्यासाठी बनावट छापलेले आहे. मी तसे नसून पत्र बहुधा खरे आहे असे सांगितले. त्यातील तुर्कस्थानच्या आणि तदनुषंगाने अमीर आणि हिंदुस्थानातील काही मुसलमान यांच्या राष्ट्रविघातक, महत्वाकांक्षेची केलेली मीमांसा मात्र सर्वांस मान्य झाली. मी ते रात्रंदिवस सांगतच होतो. त्या पत्रामुळे कोणाच्याही मनावर अधिक परिणाम झालेला आम्हास मुळीच आढळला नाही.

युद्धाचे वेळी ''आज चले, कल चले,'' म्हणून अगदी प्रतिज्ञेवर सांगणारी आशा अशी निष्फळ ठरली. जर का तो अडाणी भविष्यवाद खरा झाला असता तर ते लोक इतर भविष्यवाद्यांप्रमाणे सहजासहजीच ज्योतिर्विद म्हणून पदवी पावू शकले असते; पण आता योगायोगाने ती संधी गेली. सर्वांसच एक प्रकारची तीव्र उदासीनता भासू लागली. पण बुडत्यास काडीचा आधार. युद्धात सर्वसहा सुटका होणार ती राहिली पण युद्धात इंग्रजांचा विजय झाल्याने निदान त्याप्रीत्यर्थ तरी काही सुटका किंवा सूट मिळणारच की नाही? आता तीच चर्चा चहूकडे चालू झाली.

त्याच संधीस हिंदुस्थानातही अंदमानाच्या आरोग्यघातक वायुमानाविषयी बरीच चर्चा चालू झाली होती. माझ्या मागच्या उतारा दिलेल्या पत्राने त्या विषयाकडे देशाचे लक्ष तीव्रतेने वेधले होते. त्याप्रमाणे मला स्वदेशात परत कोणत्या तरी तुरुंगात आणून ठेवावे म्हणजे बरे अशीही चर्चा सुरू झाली. शेवटी अंदमानात दाट वदंता उठली की राजबंदीवानांतील जुने लोक हिंदुस्थानी कारागारात परत जाणार. आणि मी? सिंगापूरला! पाहता पाहता एक दिवस आमचे श्रीयुत जोशीबुवा आणखी एक-दोन राजबंदी खरोखरच हिंदुस्थानात जाण्यास निघाले! त्यांच्या जाण्याची बातमी लागण्याच्या आधीच माझ्या जाण्याची धूमच उठली होती. म्हणून ते रुग्णालयात आम्हास युक्तिप्रयुक्तीने एकदा भेटावयासही येऊन गेले होते. एकत्र सुखदुःखाचे आणि विशेषतः दुःखाचे भागीदार झालेल्या आमच्या त्या निष्कपट सहतप्याने आमचा निरोप घेतला -पण पाहतो तो आम्हास त्याच कारागारातच ठेवून तेच आता हिंदुस्थानास गेले. आमच्या आणि आमच्या बंधूंच्या वारे पालट आणि थारे पालटीचा संभव कधी येईल- कधी तरी त्या कारागारातून आमची त्याहून कमी असह्य स्थळी बोळवण होईल ही आम्ही कधीच फारशी आशा ठेवली नव्हती. त्यामुळेच या वेळोवेळी होणाऱ्या निराशेचे धक्के सोसता आले.

राहता राहिली युध्दातील विजयोत्सवाप्रीत्यर्थ मिळणारी सुटका किंवा सूट. एक दिवस ती भरवशाची म्हैस व्याली आणि सर्व बंदीवानांस वर्षामागे एक महिना सूट मिळाली! काही म्हातारेकोतारे सोडले. राजबंदीवानांनाही सूट मिळाली.

पण आम्हास ? यथापूर्वमकल्पयत्! आम्हास एक दिवसाची देखील सूट नाही - सुटकेचे नावच नको.

# मरणोन्मुख शय्येवर

युद्धाच्या उत्तरार्धातील या सार्वजनिक उलाढाली चालल्या असताच मागे उतारा दिलेल्या पत्रात उल्लखिल्याप्रमाणे आमची प्रकृती दिवसेंदिवस खंगत चालली. जेव्हा आमांशाचा विकार अगदीच विकोपास गेला आणि प्रत्यही शंभरपर्यंत ताप अंगात राहू लागला तेव्हा कुठे एकदाचे आम्हास जरा नीट व्यवस्थेने रुग्णालयात नेण्यात येऊन उपचार सुरू झाले. कोणत्याही बंदीवानास रुग्णालयातील थोडाबहुत आराम आजारीपणात कारागारात येताच मिळू शके. आमचा आजार इतका विकोपास गेल्यावर आजारीपणात रुग्णालयात शुश्रूषा केली जाण्याची ती सवलत आम्हास आठव्या वर्षी देण्यात आली. नाही तर आजारी झालो तरी कोठडीबंदी काही सुटली नव्हती.

एकदा रुग्णालयात नेले गेल्यावर मग पर्यवेक्षकाने कारागारात शक्य तितकी आमची व्यवस्था केली. अन्न वारंवार पालटून पचेल तसे देवविले. या परिवर्तनास मूळ कारण आमच्या पत्रांनी हिंदुस्थानामध्ये विधिमंडळात आणि वृत्तपत्रांत चालू झालेली चर्चा होती. परंतु ही बरी व्यवस्था इतक्या विलंबाने झाली की प्रकृती सुधारेना; अंगात ताप भरे तो उतरण्यास क्वीनीन एकसारखे देण्यात येई. त्यामुळे आमांश आणि रक्ताची आव वारंवार त्रास देऊ लागली. केव्हा केव्हा भात वा दूध जसेचे तसे रेचात निघून जावे इतकी पचनशक्ती क्षीण झाली. पोर्टब्लेअर म्हणजे अंदमान - मध्ये क्षय आणि आमांश आणि मलेरिया हे बहुधा हातात हात घालून चालत. आम्हास आमांश नि मलेरिया लागला होताच. सहा-सात महिन्यांनी क्षयाची शंका आम्हासच नव्हे तर डॉक्टरनाही येऊ लागली हे साहजिकच होते. त्या रुग्णालयात आमच्या आजूबाजूस चांगले दृढकाय असलेले धष्टपुष्ट राजबदी आणि बंदी क्षयास, आमांशास आणि मलेरियास बळी पडत होते. तेथे आमच्या आठ-आठ वर्षे तुरुंगाच्या विषारी छायेखाली खुरटून गेलेल्या प्रकृतीचा काय पाड? आमांशामुळे अन्न वर्ज्य. अन्नाभावामुळे अशक्तता वाढली. मज्जातंतू अगदी क्षीण झाले. कारागारात मन रंजविण्यासच नव्हे तर आत्म्यासही समाधान देण्यास एकच काय जे साधन असे ते म्हणजे वाचन! पण त्या तांतविक क्षीणतेने (Nervous debility) ते वाचन वा बौद्धिक संवादही झेपेनासे झाले. जरा वाचले वा बौद्धिक संवाद केला की ताप झटकन एक-दोन अंशांनी वर चढे, म्हणून वाचन सोडले. पुस्तके जवळ देखील ठेविनासा झालो. खाटेवर पडून असावे. त्यामुळे कारागारात आधीच दुर्धर भासणरी वेळाची लांबी अशी कंटाळवाणी दीर्घता पावावी की बोलून सोय नाही, आणि तो लांबलचक वेळ आमांशाच्या वेदना किवा तापाच्या भणभणीत काडावयाचा. तरी त्याही स्थितीत मागच्या प्रकरणांतून वर्णिलेल्या सार्वजनिक खटपटी तसाच शक्यतो करीत राहिलो.

## राजवाड्यांतही रोग असतातच!

एखाद वेळे वाटे की, कारागारात आपण आजारी पडलो म्हणून आपल्यास कारागाराचा विशिष्ट त्रास येतो आणि बाहेर असतो तर बरे असे वाटते. पण कारागारावरच सर्व दोष लादणे अन्याय्य आहे. बाहेत तरी काय! जे बाहेर आहेत ते काय या रोगांनी आजारी पडत नाहीत की काय! मलेरिया, आमांश आणि क्षय यांना राजवाड्यांतूनही

मज्जाव नसतो. प्लेगच्या साथी, अन्फलुएन्झाचा भडिमार सुरू होतो तेव्हा मुंबईसारख्या नाटकगृहांनी आणि विलासांनी आणि विद्युद्दीपांनी झगमगलेल्या नगरांतूनही घरोघर मरणाचे कण्हणे ऐकू येत नाही का? एकेका घरात चार-चार मरणाची अंथरुणे पसरलेली नसतात काय? मग आपण कारागारात आहोत या भावनेने जी एक दुःखाला तीव्रता प्राप्त होते ती बहुतांशी निरर्थक आहे. कारण बाहेरही ही दुःखे भोगावीच लागतात. अशा शेकडो झोपड्या आहेत- अशी शेकडो गावे आहेत की जेथे हजारो दीन दरिद्री याच आजारांनी तळमळत पडले असता तुला कारागारात जो डॉक्टर, जी शुश्रूषा आणि जी औषधे मिळत आहेत त्यांचा लवलेशही लाभ त्यांना मिळत नाही! तुझ्या कारागारातील या परतंत्र दुर्दशेहूनही त्यांची ती स्वतंत्रतेची दुर्दशा अधिक असह्य आहे. मग आजाराचे दुःख तेवढे सोस. कारागारात आहे म्हणून मी आजारी पडलो असे कुथत त्या आजाराचे दुःख कारागाराच्या कल्पनेने अधिक दुस्सह करू नकोस. कारागारात नसतो तर किती चांगले झाले असते! ही तुझी हुरहूर इतर दृष्टींनी खरी असली तरी आजारीपणाच्या विषयात ती तितकी खरी नाही. कारण आजार आणि त्यांचा सेनापती मृत्यू हा कारागारात वरचेवर भेटतो हे जरी खरे असले तरी बाहेर अगदी भेटतच नसतो असे नाही. कारागारीय जीवन बाहेरच्या जीवनाहून फारसे अधिक निरर्थकही नाही, कंटाळवाणेही नाही, शिळेही नाही, एकसारखे नाही, हे तत्वतः झाले.

व्यवहारतः पाहिले तर जर बाहेरच्या स्वातंत्र्यादिक राष्ट्रीय चळवळी किंवा वैयक्तिक जीवनातील भातुकली सार्थ आणि गंभीर असतील तर हे कारागारीय जीवनही अगदी तसे नाहीच असे नाही. त्या राष्ट्रस्वातंत्र्याच्या महान ध्येयासाठीच हे कारागार, हा बंदीवास, ही तपस्या तू आणि तुझे हे सहतपी आचरीत आहेत. त्या ध्येयाच्या गांभीर्याचे तेज परावर्तित होत असल्याने तुझ्या कारगारीय जीवनातील लहानसहान गोष्टीही बाहेरील मोठमोठ्या जीवन-घटनाप्रमाणेच तेजस्वी आणि आदरणीय आणि महत्वाच्या भासणाऱ्या आहेत. रशियाच्या झारच्या किंवा एखाद्या रासपुतीनच्या विलासी व राज्यव्यापीउलाढाली लोक जितक्या उत्सुकतेने वाचतात त्याहून अधिक उत्सुकतेने आणि पूज्यबुद्धीने रशियातील एखाद्या अलेक्झांडरला मारून सैबेरियात सडत पडलेल्या क्रांतिकारकांच्या वैयक्तिक आणि लहानसहान हालचाली केव्हा केव्हा वाचल्या जातात. राजवाड्यावर केंद्रित झालेले नसते इतके एकाग्रतेने सार्वजनिक लक्ष केव्हा केव्हा निर्वासितांच्या झोपडीवर किंवा दंडितांच्या कारागारीय अंधारकोठडीवर विद्ध झालेले असते. आणि नसते तेव्हा देखील राष्ट्रीय उषःकाल यावयास त्या अंधारकोठड्यांतील अंधाराच्या घटिका मोजीत बसणे अत्यंत अवश्यच असते आणि म्हणूनच अत्यंत महत्वाचे असते, मग कारागारातील जीवन केवळ कारागारीय म्हणूनच बाह्य आणि स्वतंत्र जीवनाहून हीनतर किंवा व्यर्थतर का वाटावे?

स्वतंत्र जीवन? वेड्या मना, या कारागाराच्या भिंतीबाहेर का स्वातंत्र्य आहे? या दगडी भिंतींपलीकडे सृष्टिनियमांच्या भिंती आहेत! मनाला ‘इच्छेच्या, क्षितिजाच्या भिंती’, आहेत! या कारागाराच्या भिंतींनी तू जितका बद्ध झाला आहेस तितकेच ते बाहेरचे तुला स्वतंत्र वाटणारे लोकही बद्ध झाले आहेत. थोडक्यात म्हणजे जे कारागारात तेच बाहेर, हे प्रमाण अधिकउणे असेल- पण प्रकार एकच.

आणि करमणूक? ही काय करमणूक, या पहा या पुस्तकाच्या दोन पृष्ठात मुंग्यांनी आपली राजधानी बांधली आहे.

आजाराची जी गोष्ट तीच कंटाळ्याची. कारागारात जीवन एकसारखे आणि निरर्थक वाटते. पण तत्वतः पाहता बाहेर तरी काय आहे? तू बंदी आहेस. पण हा बंदीपाल आणि हा पर्यवेक्षक तरी बंदी नाही ना? पण काय फरक आहे! तेही प्रत्यही उठतात, कार्यालयात बसतात, तेच ते लिहितात. खातात, निजतात! पुन्हा उठतात- पुन्हा निजतात. त्यांचेही जीवन कोणाचे मोठे सार्थकत्व पावते आहे. लग्ने झाली, मुले झाली, पेन्शन मिळाले, हे सार्थक? लहान मुलेही भातुकलीत हे सर्व प्रकार खेळतातच. त्या पोरखेळाहून या संसाराचा काही तर अधिक अर्थ तुझ्या कारगारीय अन्वयाने, दृष्टीने, लागतो का? तत्वतः दोन्हीही खटाटोप व्यर्थ आहेत. कारण आईबापांच्या कडेवर वाढावे, मग त्यांस स्मशानात पोचवून मुलाबाळांस कडेवर वाढवावे, आणि मग आपण स्मशानास पोचावे - कशासाठी? काय मिळते या सर्व खटाटोपात? हे चक्रही एकसारखे आणि कंटाळवाणेच नाही का? आचार्यांनी विचारलेला प्रश्न ''ततः किम्'' हा तुझ्या कारागारीय परवश चळवळीस जितका लागू आहे, तितकाच तो बाहेरच्या महायुद्धांच्या चळवळीसही लागू नाही का? या फ्रान्स आणि जर्मनीने कितीदा हेच युद्धाचे पोरखेळ केलेले आहेत? फ्रेंच लोकांची गॉलवर स्वारी झाली तेव्हापासून आजपर्यंत- आज फ्रान्सने विजय मानावा की उद्या जर्मनीपुढे नाक घासून काळासुतकी वेष धारण करावा. आज नेपोलियन पहिला की उद्या नेपोलियन तिसरा; बाजीराव पहिला की उद्या बाजीराव दुसरा! यात या एकसारखेपणात, या चूळबोळक्यांच्या मांडामांडीत आणि मोडामोडीत हा उभा संसार कोणता अर्थ साधीत आहे? जिकडे तिकडे ते एकसारखे. पण कंटाळा, निरर्थकता, तत्वतः कारागृहाचे कोठडीच्या दारावर नव्हे तर संसारातील प्रत्येक राजवाडयावर, ताजमहालावर, पर्वतावर आणि समुद्रावर हीच पाटी टांगलेली असते की ''तत्ः किम्!'' मग कारागारात आहेस म्हणून विशेष वाईट का वाटून घेतोस! जे कारागारात तेच- हिंदुस्थान स्वतंत्र झाले तरी.

बातमी! बातमी! या बातमीच्या लालसेची तीच स्थिती. कारागारात बातमी मिळत नाही आणि बाहेर मिळते म्हणून कारागार असह्य वाटते? हे पहा कोणत्याही बातमीने अंतिम समाधान होणारे आहे का? अगदी हिंदुस्थान स्वतंत्र झाले; तरी मना! चिरकालिक अशी काहीतरी शाश्वती मानता येईल का? हिंदुस्थान आज स्वंतत्र झाले; पुन्हा वैभवाने शिथिल झाले; पुन्हा परतंत्र झाले; तो इतिहास पहा. या पिढीने स्वातंत्र्यार्थ लढावे, पुढील पिढीने ते भोगावे; तिसरीने ते गमवावे, पुन्हा सहावे, लढावे, मरावे, भोगावे, गमवावे- प्रत्येक राष्ट्राचा, प्रत्येक राजकुलाचा, प्रत्येक समाजाचा उभा इतिहास, सर्व बातम्या, या तीन-चार वाक्यांत भरलेल्या आहेत. एवढया एकदा ऐकल्या की पुन्हा बातमी म्हणून उरत नाही. छे! राष्ट्रांची नव्हे तर उभ्या विश्वाची देखील नवी बातमी म्हणून येणे नाही. कारण सर्व उलाढालीतील अगदी निर्णायक अगदी शेवटची, प्रलय! ही प्रभव विश्वाची पहिली बातमी. ती आता शिळी झाली आहे. आता जी अगदी ताजी बातमी म्हणून ऐकू येणार तो प्रलय! बस प्रभव ते प्रलय, यात सर्व बातम्या आल्या. आणि त्या दोन्ही तुला कळल्या आहेत. मग कारागारामध्ये बातमी नाही म्हणून विशिष्ट दुःख का मानतोस, नुसत्या पोरखेळाच्या बातम्या, भातुकलीच्या बातम्यांहून तत्वज्ञांस अधिक रंजनार्ह कशा वाटणार! या क्षणिक आणि उत्पती, लय, अभाव, प्रलय, जन्म, मृत्यू या लंबकामध्ये कुठेतरी हेलकावा खाणाऱ्या बातम्या आलेल्याच

आहेत. त्या इतक्या क्षणिक आहेत की त्यांतील कोणतीही बातमी शेवटची म्हणून म्हणता न आल्याने ही बातम्यांची तृष्णा कधीही शमणार नाही- मग तू कारागारात बस किंवा जगात अगदी वाऱ्यासारखा मोकळा सूट! गेल्या महिन्याच्या बातमीसाठी कारागारात चुटपुट लागते तर गेल्या तासाच्या बातमीविषयी अमेरिकेत चुटपुट लागते! कारण तिकडे प्रतिप्रहरी नवे पत्र निघते म्हणून गेल्या प्रहराची बातमी शिळी वाटून ताज्या प्रहराची बातमी मिळण्यासाठी मन लोलूप आणि व्यवसायातील बाजारभावामुळे चिंतातुर होते. उद्या पृथ्वीवरील सर्व बातम्या क्षणोक्षणी कळू लागल्या तर मनुष्य मंगळावरील बातमी ऐकण्यासाठी असाच चुटपुट करीत बसेल की तू जसा या कारागारात हिंदुस्थानातील बातमी ऐकण्यासाठी बसला आहेस.

तेव्हा तत्वतः पाहिले तर कारागारातील तुझे जीवन बाहेर जे स्वतंत्रपणे फिरत आहेत त्यांच्या जीवनाहून अगदीच व्यर्थ नाही. ती पहा मुंग्यांची नगरी लोकसंख्येने अगदी पाटीलपुत्रात नव्हती इतकी ती गजबजली आहे. ती अंडी, ती त्यांची राणी, ती त्यांची राजकन्या, त्या त्यांच्या लढाऊ मुंग्या म्हणजे खडे क्षत्रिय सैन्य पहा. मुंग्यांतही चातुर्वर्ण्य सुप्रतिष्ठित आहे. श्रमविभाग आहे. ते पलीकडे आकाशात तुझ्या डोळ्यांपुढे तरंगत फिरणारे तिळाहून दसपट सूक्ष्मतर असणाऱ्या घुंगुरुटांचे राष्ट्र पहा. थवाचा थवा ज्यू लोकांच्या फिरत्या अवस्थेतील राष्ट्राप्रमाणे एकत्रित उडत प्रवास करीत चालला आहे पहा. आणि त्या घुंगुरुटास यःकश्चित लेखू नकोस. एवढा तू मनुष्य पण तुला पंख नाहीत. पण त्या तिळाच्या दहाव्या तुकड्या एवढ्या त्या घुंगुरुटास बघ ते पंख. त्यातील स्नायू किती सूक्ष्म असतील पण किती कार्यक्षम! ते ईश्वरी कौशल्य निरीक्षण कर. ही काय करमणूक नाही? मोठमोठे शास्त्रज्ञ केवळ कृमिकीटकांचे वा पशुपक्ष्यांचे जीवनक्रमांचा अभ्यास करण्यासाठी आयुष्याचे आयुष्य एखाद्या वारुळापुढे वा मधाचे पोळ्यापुढे बसून काढतात. ते जर निरर्थक तुच्छ नसेल तर तुझे तरी आयुष्य या कारागारात निरर्थक जाते आहे म्हणून का म्हणावे?

## मांजराचे भांडण आणि रामायण

किंवा ही करमणूक पहा. ती मांजरे प्रत्यही उत्तररात्री आपली प्रीति गीते गात फिरतात. इतक्यात एकादा प्रतिस्पर्धी येऊन त्या रतिगीतांचे पर्यवसान रणगीतात होऊन भयंकर रण माजते. का? उपहासास्पद वाटते हे सारे? पण मग रामायण तरी काय आहे? या दोन मांजरांसारखीच दोन मनुष्ये कामातुरतेत प्रतिस्पर्धी झाली आणि त्यांचे भांडण जुंपले. ही मांजरे नखांनी ओरबाडतात आणि तोंडांनी भयानक गर्जना करतात. ते भाला, तलवार, त्रिशूळ घेऊन बोचकरीत होते आणि दुंदुभीच्या तोंडांनी गर्जना करीत होते! बाकी मनोविकारांचे तीव्रत्व, गंभीरत्व आणि व्याकुलत्व उभयपक्षी समान होते. मांजरांस या बोक्याची लढाई आम्हास रामरावणांची वाटली तितकीच महत्वाची वाटत असणार हे उघड आहे. विकासवादाच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे हे मार्जारायणच विकास घेत घेत रामायणात परिणमित झाले आहे.

विकासवादाची गोष्टच निघाली म्हणून तेही पहा. जीवनकलह हे विकासाचे जसे विघटक साधन आहे तसे अपत्यसंगोपन हे संघटक साधन म्हणून विकासशास्त्रज्ञ म्हणतात. जीवनकलहाचे तत्वानुरूप त्या मार्जारायणाचाच रामायण हे विकास आहे तसेच या अपत्यसंगोपनाचे तत्वानुरूप 'मेरी'चे किंवा 'यशोदे'चे मातृप्रेम

हा त्या गृहपालित मादीच्या प्रेमाचा विकास आहे. ते पहा कारागारीय डॉक्टरचे अंगण आणि त्यात आपल्या दहा-बारा पिलांस मागे पुढे घेऊन खेळवीत आणि मधूनच त्यांस कुकूचीकूचे मंजुळ पाळणे म्हणत चाललेली ती कोंबडी. पहा त्या घारीच्या झेपपासून कसे आपले पिलू वाचविले. पूतनेच्या झेपेसरशी यशोदा कळवळली नसेल तसा त्या घारीची झेप आपल्या पिलांवर पडताच तिचा जीव कासावीस झाला. पहा ते सृष्टीचे कौतुक, लहान मुलांचे खेळ किंवा शाळेतील चढाओढी पाहण्यास दर्शिके (तिकिटे) काढून लोक जातात. हा या लहान पिलांचा थवा. त्या त्यांच्या उड्या, ती कुलकुलकुल किलकिल, ती दाणे टिपण्यात चढाओढ आणि त्या आट्यापाट्या, तशाच मनोरंजक नव्हेत काय? त्यांच्या मनात तेच खेळाडू भाव आणि तोच आनंद उचंबळत आहे. जीवन हे जीवोजीवी समसंवेदन झालेले असते. केवळ सहानुभूतीने ते जगून पहा.

## पंधरा दिवस तरी सुख मिळते तर!

रुग्णालयात आणि जिथे जवळ जवळ एक वर्ष काढल्यानंतर पुन्हा जेव्हा पाच क्रमाकांच्या चाळीच्या तिसऱ्या तळावर (मजल्यावर) अगदी एकांतात आम्हास ठेवण्यात आले तेव्हा त्या ओसाड वेळात अशा 'प्रतिप्रसव' विचारांनी कारागारात वाटणाऱ्या मनाच्या उद्वेगाशी आणि देहाच्या क्षीणतेशी भांडत बसावे. केव्हा केव्हा प्रत्यही एकनाएक दुखणे मागे लागल्याने वाटावे की, आता हे देहवस्त्र अगदी पांघरता न येण्याइतके जीर्ण झाले यात शंका नाही. पण क्वचित प्रकृती पुढे सुधारेलही, पण वाट तरी किती पहावयाची. सहा महिने वर्ष-दीड वर्ष गेले. आज आमांश, उद्या रक्तामांश, परवा ताप, तेरवा आणखी काही. असे सोशीत राहिलो. शेवटी निश्चय केला की हे कारागार काही आम्हास सुटण्याचा संभव दिसत नाही; आणि हे कारागार सुटत नाही तोवर प्रकृती सुधारत नाही. मग पुढे उपयोगी पडेल म्हणून कसेबसे तोलून धरलेले हे शरीर - द्याना फेकून एकदाचे. सुखासाठी सर्व खटाटोप. दुःखात रडत कुठवर बसा असे म्हणून महिन्यातून किती दिवस देहधारण सुसह्य असते आणि किती दिवस त्रासदायक होते ते ठरविण्याकरिता भिंतीवर गणती ठेवली. प्रत्यही आजार वा त्रास झाला किंवा दिवस बरा गेला ते भिंतीवर टिपावे असे दोन महिने गेले. नंतर घेतली बेरीज. पाहतो तो साठ दिवसांत पंधरा-एक दिवस प्रकृती जिवंत राहावेसे वाटावे इतकी बरी होती असे दिसले. तर मग अजून सर्वच दुःखमय नाही. पंधरा दिवस तरी हा देह सुखमय होतो. पाहावे तर मग जगून आणखी थोडे!

पण अशा नुसत्या मनाच्या मनोऱ्यावर कोणास थोडेच सदोदित राहता येते. वस्तुस्थितीचा गुरुत्वमध्य खेचून त्यास खाली ओढण्यास थोडाच सोडतो. असेच एकदा ओढले जाऊन आम्ही अगदी मरणाच्या गर्तेच्या टोकावर लोंबकळत पडलो. रुग्णालयात शरीर अत्यंत क्षीण, ९५ पौंडावर वजन आलेले, पोटात अन्न म्हणून जात नाही, क्षयाची चिन्हे, ताप नेहमी अंगात कणकणत असलेला, आपले असे जवळ कोणी नाही, शत्रूप्रमाणे लेखलेल्या आणि लेखणाऱ्यांच्या बंदीत, अपमानात, निराशेत, कोणाशी प्रेमाचे शब्द बोलावयाची चोरी, थोडे खालीवर बसण्याउठण्याची चोरी अशा स्थितीत दोन-तीन महिने प्रकृती इतकी विकोपास गेली की केव्हा मृत्यूचा हिसडा बसेल आणि जीवनाचा धागा तुटेल याचा मुळीच कोणास भरवसा वाटेना. जगावयाचे म्हटले तरी जगणे अशक्य होणार असे दिसू लागले.

तेव्हा वाटावे त्या रुग्णालयात आता मरण येणार! पुढे काय? प्रत्यही बौद्धांच्या शून्यवाद, ज्ञानवाद, विज्ञानवादापासून तो हेनकेल हर्बर्टच्या 'सब्स्टन्स' आणि विकासवादापर्यंत मरणानंतरच्या सर्व उपपत्ती मनात विंवचून पाहत बसावे. मीमांसेपासून मीलच्या उपयुक्ततावादापर्यंत 'धर्माच्या' म्हणजे कर्तव्यकर्माच्या स्वरूपाचा उहापोह विवरणून पहावा. अशाच अगदी क्षीणतेच्या एका दिवशी जीवनाच्या शेवटचा निरोप म्हणून ती ''मरणोन्मुख शय्येवर'' ही कविता केली. ती करताना ती वाचावयास आम्ही जगू अशी खरोखरीच काही आशा नव्हती.

धरलो गेलो तेव्हा इंग्लंडात फाशीच्या छायेत 'माझे मृत्यूपत्र' म्हणून आणि फाशीची शिक्षा ज्या दिवशी देण्यात येण्याचा भरपूर संभव होता त्या दिवशी 'पहिला हप्ता' या कविता रचल्या होत्या. त्यानंतर मरणाच्या अगदी उंबरठ्यावर उभे राहून त्याच्याशी दोन शब्द बोलावयाचा प्रसंग या तिसऱ्या 'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेत आलेला होता. या तीनही कविता 'Echo from the Andaman' या पुस्तकात प्रसिद्ध झालेल्या आहेत.

## तिन्ही बंधूंची भेट

या वर्षात मला आणि माझ्या बंधूंना घरच्या मंडळींच्या भेटीची परवानगी एकदाची मिळाली. इतरांना अंदमानात पाच वर्षांनी घरची मंडळी आणून एक-दोन दिवस आणि कधी आठवडेही त्यांच्याबरोबर राहावयास मिळे. आम्हांस ती सवलत आठ वर्षांनी देण्यात आली. तीही किती उलाढाली कराव्या लागल्या तेव्हा! एकदा तर माझे कनिष्ठ बंधू परवानगी मिळून आमच्या कुटुंबासह कलकत्यास येण्यास निघाले देखील तोच ती परवानगी पुन्हा रद्द झाल्याची तार आली. अशी निर्दय थट्टा सारखी चालली होती. मुंबई सरकारास विचारावे तर त्यांनी लिहावे पोर्टब्लेअरला विचारा. पोर्टब्लेअरचे कमिशनरला लिहावे तर त्यांनी लिहावे हिंदुस्थान सरकारास विचारा. हिंदुस्थान सरकारास लिहिले तर त्यांनी म्हणावे हा मुंबई सरकारच्या अनुरोधावर (शिफारशीवर) अवलंबून राहणारा प्रश्न आहे. असे चालता चालता १९१८-१९ च्या मध्यंतरी एकदाची भेट झाली. पण ती कारागारात- इतरांप्रमाणे एकत्र राहणे दूरच पण एकत्र बसणे ते पर्यवेक्षकासमोर. त्यातही न जाणो एखादा क्रांतिकारक कट होतो की काय या भयाने एका पडद्यामागे एक मराठी जाणणारा वॉर्डर आम्ही काय बोलतो ते ऐकावयास छपवून ठेवलेला. अशा परिस्थितीत आठ वर्षांनी माझ्या कनिष्ठ बंधूंस, माझ्या धाकट्या भावजयीस आणि माझ्या पत्नीस आम्ही भेटलो. कनिष्ठ बंधूंची प्रकृती सुदृढ असलेली पाहून समाधान वाटले. त्या भेटीचा आनंद शक्यतो उपभोगण्यासाठी इतर भूतकालच्या, वर्तमानाच्या आणि भविष्याच्या सर्व चिंता आणि दुःखद स्मृती बळपूर्वक हृदयाने तळाशी दाबून धरून अगदी एखाद्या लग्नमंडपात निर्विघ्न पार पडलेल्या लग्नाच्या गोष्टी सलील बोलत बसावे तसे हासत खेळत तो तास दीड तास बोलत बसलो. पण वहिनी - माझ्या ज्येष्ठ बंधूंच्या पत्नी - त्या का आल्या नाहीत? जिच्यावर आमच्या कुटुंबांच्या दुःखांच्या ओझ्याचा अधिकातील अधिक भार राजकीय संकटात पडला आणि जिने तो अधिकात अधिक धैर्याने आणि एकनिष्ठेने तो सोसला ती माझी लहानपणाची मैत्रीण, ममतेची आई, राजकारणातील अत्यंत विश्वस्त सहकारिणी, माझ्या आणि तिच्या निर्वासित पतीच्या भेटीसाठी सारखी सात वर्षे झुरत वाटत पाहत असता आता आयत्या वेळेस ती वहिनी भेटीस का आली नाही? कारण की वर्षो न् वर्ष त्या

भेटीच्या वाटेकडे आपल्या पणतीतील तेलवात सारीत सारीत टक लावून बसलेले ते तिचे वत्सल, विरहव्याकुल डोळे त्यांच्या पणतीतील ते आशेचे तेल आणि ती जीवनाची ज्योत संपून गेल्यामुळे आयत्या वेळी मिटून गेले! आपल्या राष्ट्राच्या मंगलाप्रीत्यर्थ पेटविलेल्या वियोगाच्या अग्निकुंडात झुरत जळत आज ती अंती भस्म झाली आणि उद्या अंदमानास आपल्या पतीस भेटावयास जावयाची परवानगी आहे म्हणून अधिकाऱ्यांची दयाळू तार आली!

ती वार्ता बंधूने सांगितली, ती हलाहल गिळावे तशी गुपचिप गिळून टाकली. उलट म्हटले, हे जग परिवर्तनशीलच आहे. कधीतरी संयुक्तांचा वियोग होणारच. आजपर्यंत देवाने एकत्र राहू दिले हेच उपकार, त्यातही आता आपल्या आयुष्याच्या नाटकाचा उत्तररंगच लागणारा आहे. आता एकेक पात्रे कथानकातून अशीच गळावयाची, या दृश्य रंगभूवरून अशीच तिरोहित व्हावयाची. आणि अदृश्याचे रंगभूवर? हे पहा बाबांची पुनर्जन्मावर निष्ठा आहे. तेव्हा त्यांच्या निष्ठेप्रमाणे वहिनींचा आत्मा क्वचित, नव्हे बहुधा निश्चयाने, या वेळी सुक्ष्मरूपाने आपल्या या कौटुंबिक संमेलनात समाविष्ट झालेलाच असेल, सगळे हे ऐकत असेल. बरे आमच्यासरख्या कोणाची तितकी निःशंक निष्ठा नसली तर ग्रंथच आटोपला. राष्ट्राच्या हितार्थ रणात वीर झुंजत असता जी वीरांगना उत्तेजन देत देत संकटांच्या धारेने छाटली जाते ती धारातीर्थीच पडते. आणि पडते म्हणजे अवघ्या दुःखातून सुटते, जशी अग्नीची ज्योत दिसत दिसत नाहीशी होते, विझते, मुक्त होते, सुखदुःखातील होते. म्हणून एवीतेवी तिच्यासाठी दुःख अकारण आहे. आपल्यास ती उरली नाही इतकेच दुःख सोसणेच कर्तव्य असे सांगून तो विषय सोडून दिला. आणि राष्ट्रीय आणि धार्मिक आणि कौटुंबिक आणि विनोदिक संभाषण त्या समयाच्या कक्षेत जितके अधिक भरता येईल तितके भरुन घेतले. एका तासात इतके बोलून टाकण्याची शक्ती माझ्यासारख्या बोलघेवडयासही क्वचितच आलेली असेल. आम्हा त्रिवर्ग बंधूंची एकत्र झालेली अशी ही भेट बारा वर्षांनी झाली! मुंबईहून विलायतेस गेलो तेव्हा नौयानांचे अड्ड्यावर तिघे उभे होतो १९०६ व्या वर्षी - ते आज अंदमानचे कारागारात पुन्हा भेटलो १९१९ व्या वर्षी आणि केवळ एक तास काय ते भेटता येईल या अटीवर!

मला माझ्या पत्नीची भेटही एक अर्धा तास एकान्तात घेण्याची परवानगी मिळाली होती. लगेच माझ्या बंधूंना आणि कटुंबीयांना पोर्टब्लेअरमधून नौयानावर चढविण्यात आले. आठवडाभर देखील या बेटावर बेट पाहाण्यासही राहू दिले नाही. न जाणो टेहळणी करून आमच्या सुटकेसाठी एखादी नाव नाहीतर विमान धाडून देण्याचा कट व्हायचा ! माझ्या बंधूंच्या येण्याने वसाहतभर सर्व लोकांची त्यांस पाहण्याची उत्सुकता वाढलेली होती; पण कोणासही भेटण्याची बंदी होती. तरी देखील त्या भाविक बंदीवानांमधील कित्येकजण तीस भीक न घालता त्यांस भेटून गेले आणि प्रेमाने त्यांस फळफळावळीच्या भेटी देण्यास कचरले नाहीत.

## विकार नि विवेकाचे द्वंद्व

मंडळी गेली. एखाद्या तापाच्या रात्रीत मध्येच एक क्षणभर डोळा लागावा, एखादे गोड स्वप्न पडावे आणि क्षणात पुन्हा जाग येऊन आजारी अंथरुणावर आपण तळमळत पडावे तसे त्या पाच क्रमांकाच्या त्रितल चाळीतील तिसऱ्या तक्तावर पुन्हा बंद होऊन पडलो. आता रुग्णालयातून आम्हास इथे बंद केलेले होते. अगदी एकान्त पण

समोर समुद्र आणि आकाश आणि त्या समुद्रातील ते रास नावाचे बेट स्पष्ट दिसत असे. अशी मुक्त वायूची आणि मुक्त दृश्याची कोठडी आम्हास आजपर्यंत मिळाली नव्हती. त्यातही चाळीच्या त्या सोप्यात फिरावयास मिळे. तेव्हा त्या रासची शोभा पाहत बसावे. डोक्यात विचारांचे चक्र चाले. त्रास होई. केव्हा केव्हा मनात विकारांचे बंड माजे. अगदी अनावर होऊन विवेकास सिंहासनावरून उचलून फेकून देणारे बंड होई तेव्हा क्षणभर त्यांना शरण गेल्यावाचून ते मोडण्याचा दुसरा मार्ग शक्य दिसू नये. मग ते अराजकपणात आपसात झुंजून अन्योन्यास बळी पडू लागलेसे पाहिले की पुन्हा आम्ही आमच्या हाती राज्यकारभार घेऊ लागावे आणि एकेकास बद्ध करून विवेकाचे स्थानावर त्याची पुनर्स्थापना करावी. त्यांच्या हाती मन सापडू नये म्हणून जाणूनबुजून अगदी यःकश्चित गोष्टी, चरणाऱ्या त्या काम्पौंडच्या गायी, उडणारे आणि खोबरे पळवून न्यावयास कूट युद्धाचे कावे करणारे कावळे, किवा 'रास'कडे जाणाऱ्या नाव पाहत त्यात मन घालीत बसावे. कारागारात एकान्ताच्या अतिरेकाने मन इतके अंतर्मुख होते की त्यास बळाने बाहेर ढकलावे तरी बहिर्मुख होत नाही. बाहेरच्या गोष्टींत गुंगण्याची सवय सुटून जाते. तेच ते जुने विचार घोळीत बसण्याची भंगड सवय त्यास लागते.

त्यातही वाचन अशक्ततेमुळे अशक्य झालेले; तिथे गंभीर विचारांचे आणि ध्यानधारणादिक अभ्यासाचे नावच नको. त्या समोरच्या समुद्राकडे बघता बघता आणि त्याच्या त्या लाटांप्रमाणे चित्तवृत्तींच्या लाटांस एकीतएक विलीन करता करता केव्हा झपकन मन त्या समुद्राच्याच खोलीप्रमाणे कोण्या गंभीर खोलीत नाहीसे होऊन चित्त एकाएकी ध्यानस्थ व्हावे. कधी त्या समुद्रात, कोंदणात हिरकणीसारख्या शोभणाऱ्या त्या लहान 'रास' बेटाच्या मध्ये उंच उभारलेले ते चर्च आणि आकाशाकडे एखाद्या अंगुलीप्रमाणे संबोधन करीत राहिलेले शिखर पाहत मन एकाएकी तसेच एकाग्र होऊन आकाशातील त्या परम पित्याच्या स्मृतस्पर्शाने मुग्ध व्हावे; पण ती गंभीर एकाग्रता वा त्या विशाल मुग्धतेचा तो एकांतिक उमाळा त्या अशक्त आणि तांतविक दुर्बलतेने पंगू झालेल्या चित्तास आणि मज्जास सहन होऊ नये. अशा ध्यानानंतर वा विचारांचा ओघ ओसरताच डोके दुखू लागावे, मज्जास आणि ज्ञानतंतूस ताण पडल्यासारखे वाटून दुर्बळता विशेषच वाटू लागावी; म्हणून तो आनंदही पारखा झाला. अशा वेळी भगवान बुद्धाची आठवण व्हावी. त्या उपासानंतर आलेल्या मूर्च्छेनेतून उठताच ध्यानशक्ती, शारीरिक शक्ती त्यास प्रथम संपादन करावी लागली. खडीसाखर, लोण्याचा गोळा, खीर, जे मार्गाने मिळत गेले ते तोंडात टाकून प्रथम उपासाने क्षीण झालेला देह स्थूल करावा लागला! मग इतरांची काय कथा! अशा स्थितीत वाचन वर्ज्य, विचार वर्ज्य, ध्यान वर्ज्य, धारण वर्ज्य, आणि गंभीरता अशक्ततेने वर्ज्य, तर सलीलता कारागारीय क्रूरतेने वर्ज्य, संगत नाही, सोबत नाही, फिरणे नाही, खेळणे नाही, केवळ त्या समोरच्या डॉक्टरच्या कोंबड्या, ती घुंगरुटे आणि ते पक्षी.

## ती त्या मंडनमिश्राची कोठडी

हो! पक्ष्यांचे नाव निघताच एका सुखाची मात्र आठवण न काढणे केवळ कृतघ्नपणा होईल. ते सुख म्हणजे त्या बुलबुलांच्या करमणुकीचे काय ते. अंदमानी बुलबुल सुरेख असतात. चिमुकले, रेखीव, चपळ! आणि ते त्यांचे

सुंदर स्वर! खेळकर तरी किती. त्यांचे थवेचे थवे त्या खोबऱ्यावर तुटून पडावयाचे आणि माझ्या चाळीसमोर किलबिल किलबिल करीत असावयाचे. गंभीर विचार झेपेनात म्हणून जेव्हा मनास बळे बळे लहानसहान गोष्टींत मी रंजवू लागे तेव्हा या बुलबुलांनी माझे मनोरंजन करावे. त्यांची आणि मैनांची भाषा देखील मला कळू लागली. मैनांच्या भाषेतले निरनिराळे दहा-पंधरा स्वर म्हणजे शब्द तरी मी अगदी बरोबर ओळखी. कोठडीत तो शब्द ऐकताच नक्की ओळखी. त्यांचा बाहेर हा अमका विचार चाललेला आहे. त्यांची साधी बोलावणी, लपंडावांच्या आरंभाची भाषा, निकडीची बोलावणी, भयसूचना, सुखगीती, रतिभीती, शिशुगीती, पिलांस बोलावणे, प्रियकरांस बोलावणे, युद्धापूर्वीची अंतिमोत्तरे (Ultimatums) आव्हाने, रणगर्जना इत्यादी प्रसंगांचे निरनिराळे स्वर आणि शब्द अगदी भाषेसारखे ठराविक असत. आणि त्या भाषेच्या व्याकरणात मी अगदी व्युत्पन्न झालो होतो. माझी भाषा त्यांना मला शिकवणे शक्य नव्हते; कारण पक्षी पाळणे हा कारागारीय अपराध असे. नाहीतर ते माझ्या खोलीत सहज पाळले जाते. जर मला तसे करता येते तर मी त्यांस राष्ट्रप्रीतीची गाणी शिकविली असती. आणि मग शंकराचार्य मंडनमिश्राचे घर कोणते म्हणून विचारीत गेलो तेव्हा जसे लोकांनी अभिमानाने सांगितले की ज्याच्या दारापुढें पोपट आणि मैना वेदान्ताचा वाद करीत असतात,'जानीहि तन्मंडनमिश्रगेहं'. त्याचप्रमाणे माझ्या कोठडीविषयीही चौकशी करीत एखादा नवीन बुलबुल आला असता जुन्या बुलबुलांनी सांगितले असते की जिच्या गजाशी मैना आणि बुलबुल हिंदुस्थानची स्वातंत्र्यगीते गात असतात ''जानीहि तन्बंडनमिश्रकक्षं''. - ती त्या बंडनमिश्राची, बंडखोराची, कोठडी होय!

कावळ्यांचीही माझ्याशी बरीच घसट झाली होती. तिथे एकदा माझ्या संमतीने एका मुसलमान बंदीने गुप्तपणे कावळा पाळला. पण दोन-चार दिवसांनी मी पाहिले की तो कावळा ब्रह्मी लोकांच्या भाजीस उपयोगी पडण्याचा योग येत आहे! कारण त्या कारागारात इतर कोणचेही मांस खाण्यास वर्षोनुवर्षे न मिळाल्यामुळे मांसाशनी ब्रह्मी लोक आणि काही मुसलमान कावळे धरून मारून ते मांस कारखान्यातील आगीवर शिजवीत आणि खात. इतकेच नव्हे तर त्या शिजवलेल्या मांसाच्या एकच रोटीस एक आणा किंवा चार पाने तंबाखू या दराने आपसात विक्रीही करीत. त्या मुसलमान बंदीनेही यासाठीच तो कावळा पाळला होता- आणि ही मला शंका येण्याचे दुसरेच दिवशी त्याने खालच्या ब्रह्मी लोकांस तो देऊन त्याची भाजीही करून टाकली!

## काव्यरचना बंद झाली!

कारागारात मी प्रथम आलो तेव्हा अशाच कडक एकान्तात बंद होतो. पण तेव्हा काव्य करण्यात माझा वेळ जाई. आठ वर्षांनी - म्हणजे माझ्या बरोबरीचे बंदीवान बाहेर स्वतंत्रपणे हिंडत फिरत दहा लोकांवर सत्ता चालवीत सापेक्षतः पुष्कळ मनसोक्तपणे राहू लागले तरी - मी तशाच कडक एकान्तात बंद झालो होतो. पण आता वेळ घालविण्यास, ते काव्य रचावयाचीही शक्ती उरली नव्हती. प्रथमतः शिक्षा लागता केलेल्या काव्यरचनेच्या निश्चयास अंदमानात संघटना आणि प्रचार करण्याचे कार्य हाती घेणे शक्य आहे हे पाहताच मी आधी काही दिवसांपुरते स्थगित केले होते आणि नंतर तांतविक अशक्ततेमुळे ते काम जवळ जवळ सोडूनच द्यावे लागले. जी काय हजार दीड हजार कविता झाली होती ती पाठ ठेवण्यातच कठिणाई पडू लागली, मग नवीन रचणे दूरच. दर

आठवड्यास काही तरी वेळ जुन्या पाठांतरावर आवृत्ती करावी. मी एकदा असे गणन केले होते की जर मी एकसारखा त्या बंदीशाळेत केलेल्या कविता म्हणू लागलो तर सकाळी आरंभ केला असता तो सर्व दिवस आणि ती सर्व रात्र काही जेवणाचा वेळ सोडून सारखा म्हणत राहू शकेन इतक्या कविता झाल्या होत्या. त्या सर्व पाठही येत होत्या. पण या अशक्ततेमुळे त्या आजाराच्या वर्षा दोन वर्षांत स्मृतीच्या चाळणीतून पठनाभावी किती तरी कविता गळून गेल्या.

अशी ही एकान्त बंदी जरी इतकी त्रासदायक आणि कडक होती, तरी त्यामुळे माझ्या कारागारीय सार्वजनिक चळवळी काही बंद पडल्या नव्हत्या. या ना त्यामार्गे शुध्दी, संघटन, शिक्षण आणि राजकीय जागृती इत्यादी उपांगांच्या चळवळी वसाहतभर विस्तार पावतच होत्या.

या एकान्त चाळीतही, त्या तिसऱ्या तळावर येऊन कारागारीय अधिकाऱ्यांचा रोष पत्करून आणि वेळी हातकडीत उभे करणारी संकटेही सोसून ज्या बंदीवानांनी -राजकीय आणि साध्या- माझी भेट घेणे सोडले नाही; माझी सेवा करणे सोडले नाही. त्यांचे आभार इथे व्यक्त केल्यावाचून मात्र राहवत नाही.

त्या पाचव्या क्रमांकाच्या चाळीतील त्या तिसऱ्या तळावर मला ठेवण्यात एक हेतू तेथील समोरच असलेल्या समुद्राचा मुक्त आणि शुद्ध वायू उपभोगिता यावा हा होता हे मागे सांगितलेच आहे. त्यामुळे आणि विशेषतः त्या दोन वर्षात माझी प्रकृती अशी मरणोन्मुख शय्येस खिळली असता हळूहळू जे आरोग्यदायक अन्न देण्यात येऊ लागले आणि वैद्यकीय काळजी घेण्यात येऊ लागली त्यामुळे शेवटी माझी प्रकृती सुधारू लागली अन्न थोडेफार पचू लागले आणि क्षयाची पूर्वचिन्हे ताप, वजन उतरणे ती मावळू लागली. जवळ जवळ दीड-दोन वर्षांनी मी ती मरणोन्मुख शय्या गुंडाळून ठेवू शकलो.

## बाबांचे ते दुःखद दर्शन-!

पण माझी ही मरणोन्मुख शय्या मी जो गुंडाळून ठेवली न ठेवली तोच ती पुन्हा पसरावी लागली. ती माझ्या ज्येष्ठ बंधूंसाठी! कारण त्यांची प्रकृतीही ढासळत ढासळत मी सुधारण्याच्या संधीस अगदीच बिघडून गेली. त्यातही दुःखाची गोष्ट ही की, त्यांची व्यवस्था शेवटपर्यंत म्हणण्यासारखी चांगली ठेवण्यात आली नाही. काळ्या चवाळ्याचा कोट घालून, पित्ताशय बिघडून ठणका लागल्यामुळे वाकून चालत ते रुग्णालयात जात आहेत. तिथे एक उद्धट आणि मेणघुणा हिंदी मद्रासी मेडिकल असिस्टंट डोळे वटारून, बूट आपटून त्यांस किंचित ओढाताण करुन म्हणत आहे 'कुठे दुखते आहे? इथे तर काही नाही! लबाडी आहे सगळी!' आणि या अपमानाने खिन्न होऊन त्याचा प्रतिवाद करण्यासाठी पुन्हा रुग्णालयात जायचेच नाही, काय होईल ते होवो म्हणून निश्चय करीत तो कष्टभोगी देशभक्त त्या चवाळ्याचा काळा कोट घालून, जो क्षयाचा असावा असे सर्वांस वाटे अशा खोकल्याने एकसारखी ढास लागलेल्या स्थितीत कण्हत आपल्या कोठडीकडे परत नेला जात आहे- तो दुःखद देखावा मला अजून दिसत आहे. त्या मद्रासीच्या या वर्तनाविषयी पुढे कानउघाडणी झाली; पर्यवेक्षकही क्षयाच्या शंकेने बंधूंच्या थुंकीची परीक्षा करता झाला आणि अंती 'लबाडी' म्हणून विकोपास घालविलेले ते दुखणे एका निर्भीड वरिष्ठ डॉक्टराने - जो हिंदुस्थानातून हेतूपूर्वक तिकडे सुधारणा करण्यासाठी धाडण्यात आला होता - त्याने क्षयाचा डाग

त्यांच्या कटीच्या मणक्यात शोधून काढल्यामुळे क्षयाची भावना म्हणून ठरले! तरीही अंदमानमध्ये असेतो त्यांच्या दुखण्याची हेळसांडच चाललेली होती. खोकला इतका व्हावा की ते एका चाळीत खोकू लागले की बाजूच्या दोन्ही चाळींत ती ढास ऐकणाऱ्यास घाबरे करी. जीव कासावीस होऊन आता त्यांचा श्वास कोंडतो की काय असे दिसे तरी ती ढास काही थांबत नसे. असा खोकला, प्रत्यही १०० ते १०२ अंशांपर्यंत ताप, पित्ताशय नीट ताठ उभे राहू देईना इतका दुखत असलेला आणि आमांशाचा तो किळसवाणा त्रास अशा स्थितीत त्या कर्मवीराने अंदमानात शेवटचे दीड वर्ष घालविले.

त्या दीड वर्षात जन्मठेप घेऊन आलेले शंभर दीडशे राजकीय बंदीवान आणि चार-पाचशे चोर-डाकू, हत्यारी इत्यादी साधे बंदीवान - कोणीकोणी तरी एक वर्ष शिक्षा भोगली नव्हती तरी- विजयोत्सवाच्या आणि आम्ही पुढील प्रकरणी उल्लेखिणार आहोत त्या राजक्षमेच्या योगे सोडले गेले- पण दहा वर्षे अशा छळात बंदीत रखडीत पडलेल्या आणि शेवटी क्षयाच्या चोचीने ज्याच्या जीवनाचे लचके सारखे तोडले जात होते त्या या जर्जर झालेल्या राष्ट्रीय बंदीवानास मात्र सोडले गेले नाही.

आणि निर्बंधाच्या (कायद्याच्या) भाषेत बोलावयाचे म्हणजे त्यांच्यावर एवढा भयंकर कोप होण्यासारखा महान अपराध जो सिद्ध झालेला होता तो हा की त्यांनी एक दहा पानांची चोपडी प्रसिद्ध केली होती! म्हणून जन्मठेप. आणि दुसरा एक अपराध की ते माझे बंधू लागत होते. म्हणून क्षय झाला तरी सुटका नाही.

पण तरीही त्या कष्टभोगी कर्मवीराचा आत्मविश्वास, तत्वनिष्ठा वा धीर यत्किंचितही न्यून झाला नाही. मरणाचे मार्गण खिळू लागले असताही मांडलेल्या ठाणापासून तिळभरही तो ढळला नाही.

तरी हे अंदमानचे वृत्त. तेथून हिंदुस्थानातील कारागारात परत आणल्यानंतर त्यांच्या दैवी जे कष्ट पुढे लिहिले होते त्यासमोर हे अंदमानातील शरीरकष्ट आणि मानसिक जाच काहीच नव्हते! त्यांस अजून पुढे तोंड द्यावयाचे होते!

प्रकरण सातवे

# पंजाब आणि गुजराथ येथील दंगे

## सैनिक दंडकाखाली दंडित झालेल्या राजबंदीचे आगमन

## आणि कारामंडळ (जेल कमिशन) पुढील साक्ष

महायुद्ध संपून त्याची प्रतिक्रिया संपते न संपते तोच पंजाबमधील आणि अहमदाबाद, दिल्ली, वीरमगाव, इत्यादी ठिकाणांतील १९१९ या वर्षी उडालेल्या दंगलीची बातमी अंदमानमध्ये येऊन थडकली. आम्हां सर्वांस मोठे कौतुक वाटले. महायुद्धाच्या धांदलीत ती जागतिक महान क्रांतीची वरात निघून गेल्यानंतर तेव्हा माश्या उडवीत पडलेले हे निबद्ध हिंदी तट्टू आता धडपड करीत उठू पाहत आहे. मागोमाग पंजाबमधील आणि गुजराथेतील सैनिक दंडकाने दंडित केलेले (Martial law convicts) राजबंदीही येऊन पोचले. अंदमानात राजकारणासाठी शिक्षा झालेले

मुसलमान राजबंदीवान अजून बहुतेक आलेले नव्हते. या सैनिक दंडकाच्या बंदीवानांत मुसलमान राजबंदीवानही थोडेबहुत होते. त्यांच्या सर्वांच्या शिक्षा जन्मठेपीपासून तो दोन वर्षे सक्त श्रमापर्यंत होत्या.

१९११ या वर्षी ज्या नौयानावर बसवून मला अंदमानात आणण्यात आले, त्यावरच्या साध्या बंदीवानांशी बोलता बोलता मी म्हटले होते की, ''मी एकटा राजबंदीवान जन्मठेपीवर जातो म्हणून तुम्ही हळहळता ते ठीकच आहे; पण घरादाराचा स्वदेशार्थ होम करून जेव्हा हे नौयानचे नौयान केवळ राजबंदी जन्मठेप्यांनीच भरभरून अंदमानात जा ये करील तेव्हा कुठे स्वदेशास जे पाहिजे ते मिळण्याची योग्यता आली असे सिद्ध होऊ लागेल. राजबंदी जन्मठेप्यांची संख्या हे हिंदुस्थानच्या जिवंतपणाची उष्णता मोजणारे औष्ण्यमापन (Thermometer) आहे. '' ते शब्द मला तेव्हा आठवले; कारण ती दोन नौयाने जवळ जवळ राजबंदीवानांनीच भरून आलेली होती. आता त्या कारागारात दोनशेपर्यंत तरी राजबंदीवान एकत्र झाले होते. बहुतेक दहा वर्षे वा जन्मठेपीसारख्या भयंकर शिक्षेने दंडित, तरी बहुतेक ती शिक्षा कर्तव्य म्हणून उन्नत मस्तकाने आणि धैर्याने सहन करीत असणारेच होते. औष्ण्यमापनाचा पारा त्या माझ्या येण्यापासूनच्या दहा वर्षांत कितीतरी वर चढला! एक वर्ष दीड वर्ष बंदी कोणास झाली तर ज्या हिंदुस्थानात तो देशभक्त हुतात्म्यासारखा समजला जाई त्याच हिंदुस्थानात शेकडो लोक जन्मठेपीवर जाण्यासही कचरत नाहीत आणि ती गोष्ट इतकी प्रत्यहीची होते की त्यांची नावे देखील लोकांच्या ध्यान्यात राहत नाहीत, आणि एक किंवा दीड वर्षांची शिक्षा! - तिची गणना सुटकेतच होऊ लागली. ''सुटला म्हणतात अमका, केवळ दोन वर्षे बंदी!''

इतके झाले तरी साध्य प्राप्त व्हावयास हवे तर अजून कितीतरी आणखी व्हावयास पाहिजे. कितीतरीअधिक कष्टांचे मूल्य अजून मोजून दिले पाहिजे; तेव्हा भरपाई होईल.

## देशभक्तीला बौद्धिक बळ हवे

असे विचार आठवड्यांच्या बैठकीतून आणि वैयक्तिक चर्चेत मी सारखे सांगत होतो; त्यामुळे कष्ट सोसण्याची शक्ती आणि धृती अधिक उत्पन्न होई. आलेला थकवा किंवा झालेली निराशा दूर होई. या नवागत राजबंदीवानांत बहुतेक खेडेगावांतील लोक होते. बहुतेक अगदी अशिक्षित होते. परंतु बहुतेक देशभक्तीला पारखे नव्हते. मला मोठे घबाडच हाती लागलेसे वाटले. मी त्यांच्यातील प्रत्येकास विनवीत चाललो की, स्वाभाविक देशभक्तीने आपण युक्त होता; पण त्या देशभक्तीमागे बौद्धिक बळ नव्हते ते आता उपार्जन करण्याची संधी गमवू नका. हा नालंदा विहार आहे. ज्ञान आणि तप यांची साधना आरंभ करा. अ, आ पासून मी आणि माझे सवंगडी यांनी या राजबंदीवान होऊन आलेल्या दुकानदार, शेतकरी, खेड्यातील पाड्यातील बांधवांस शिकविण्यास सुरवात केली. त्यात गुजराथी होते त्यांस गुजराथी शिकविण्यास मी ती पुस्तके विकत आणविली. पंजाब्यांस गुरुमुखी धडे, गुजराथ्यांस गुजराथी धडे, हिंदुस्थानी त्यांस हिंदी धडे, देत मी जो थोडा वेळ त्यांच्यात सकाळ दुपार मिसळू शके त्या वेळात देऊ लागलो. प्रत्येक क्रमांकाच्या चाळीतून आमच्या संस्थेच्या तत्वाप्रमाणे आमच्या सभासदांनी तोच क्रम चालविला. त्या बंदीवानांत माझे नाव ऐकलेले पुष्कळच लोक होते. त्यांचेवर माझ्या शब्दांचा सहजच परिणाम होई.

त्यांतीलच एकाने मला सांगितले - मागे माझ्या पंजाबी बंधूंतील एक-दोघांनीही तसेच सांगितले होते - की तुम्ही अंदमानास आल्यावर अमेरिकेकडून येणाऱ्या जलयानांवरील हिंदी लोक जर क्वचित सिंगापूरहून पुढे सरकताना त्यावर असले तर त्यांतील कोणीकोणी अंदमानाकडे तोंड करून त्यास नमस्कार करीत; कारण तेथे त्यांच्या देशार्थ झुंजलेले बंदीवान वीर कोंडलेले होते! या गोष्टी ऐकल्या म्हणजे आम्ही पूर्वार्धात ग्रथित केलेल्या आमच्या अंदमानमधील पहिल्या दुसऱ्या आठवड्यातच उच्चारलेल्या वाक्यांची आम्हास आठवण येई की, ‘‘अपमानांनी आणि लांछनांनीही तेजोभंग होऊ देऊ नका. असाही एक दिवस क्वचित येईल, याच कारागारात तुम्हां राजलांच्छितांचेच पुतळे उभारले जातील!’’ निराशेच्या मूर्च्छेवर दिलेल्या कल्पनेच्या त्या उत्तेजक मात्रेची - त्या शब्दांची- इतकी तरी चरितार्थता झाली तर! अंदमानातील निर्वासितांस सर्वच भरतखंड काही अगदीच विसरले नाही तर!

त्या राजबंदीवानांस नुसती अक्षरओळखच नव्हे तर भूगोल, इतिहास, अंकगणित इत्यादी शिक्षणही देण्याचा धूमधडाका चालला होता. त्याविरहित संध्याकाळी जेवण झाल्यानंतर सर्व बंदीवानांस सापडणाऱ्या तासा अर्ध्यातासात आणि रविवारी वीस वीस पंचवीस-पंचवीस बंदीवानांस बसून हिंदुस्थानातील राजकारणाची स्थिती, सुधारणांचा अर्थ, परदेशीय इतिहास, अर्थशास्त्राची मूलतत्वे इत्यादी विषयांवर मी संवाद करावे आणि त्यांस आणि इतर बंदीवानांस बौद्धिक शिक्षण देत असावे. त्या दिवसांत त्या कारागारात राष्ट्रीय शिक्षणाचा एकच धडाका उडाला होता. पंजाबी राजबंदीवानांतील जुने बंदी त्यांची ‘गदर’ पत्रातील क्रांतिकारक हिंदी आणि पंजाबी गाणी गात म्हणत तेव्हा तंडेल पेटी ऑफिसरांसुद्धा सर्व बंदीवानांची चाळच चाळ ती ऐकत उभी राही. इतकेच नव्हे तर आमच्या चाळीत कारखान्यासाठी उभारलेल्या पत्र्याच्या छपराचे आड असलेल्या हरताळीवर संध्याकाळी कुस्तीचे शिक्षणही राजबंदीवान घेऊ लागले. कारण नवीन आलेल्या राजबंदीवानांत एक-दोन नामांकित पहिलवानही आलेले होते.

## बन गये बाबूजी जंटलमन

त्या वेळेस त्यांना शिक्षण देत असता केव्हा केव्हा मोठा त्रास व्हावा. केव्हा केव्हा मोठी गंमत वाटावी. गुजराथी राजबंदींत एका मुसलमानास गुजराथी शिकविण्यासाठी तंबाखू देऊन वश करावे लागले. पंजाबातील एक ब्राह्मण- अगदी खेड्यातला पण पक्का लबाड असे. पंजाबातील दंग्यात धरला गेला होता. त्यास शिकविण्याकरिता नुसती तंबाखूच द्यावी लागत नसे तर आम्हास मिळणाऱ्या रुग्णालयीन जेवणातील दुधाचा नैवेद्यही कधी कधी अर्पण करावा लागे! आणि तरी देखील स्वारी आम्ही आल्याची चाहूल लागली म्हणजे काय ती अक्षरे मोठ्याने घोकायची. वयाची ५० वर्षे उलटली होती पण लहान मुलासारखा खोड्याळ असे. आम्ही एके दिवशी तंबाखू वेळेवर न दिली की पाटी लपवून ठेवून ती हरवली म्हणून सांगे. आणि आम्ही नाही असे पाहून आमच्यावर एक गमतीचे गाणे करून ‘‘बन गये बाबूजी जंटलमन, बन गये बाबूजी!’’ म्हणे. ते ऐकून आम्हास अशी गंमत वाटे की त्यास ते गाणे आमच्यासमोर म्हणण्यासाठी आणखी एक चिमूट तंबाखू द्यावी लागे! त्यास इतर राजबंदी आमच्याशी असे बरोबरीने न करण्याविषयी दटाऊ लागले. आम्ही मध्ये पडून त्याची सुटका करावी. त्याचे ते ‘‘बन गये बाबूजी जंटलमन, बन गये बाबूजी’’ हे गाणे अजून आम्ही कधी कधी हौसेने गुणगुणतो!

पाटी, पेन्सिल आणि अंकलिप्या घेऊन त्या राजबंदींच्या मागे मागे आम्हास कितीदा फिरावे लागे त्याची गणनाच नाही. काही तर आमच्याशी बोलण्याचे देखील त्या त्रासाकरिता टाळीत. एका ‘जीवा’ नावाच्या चाळीस वर्षाच्या गुजराथी शेतकऱ्यास क ख ग चा पाढा आम्ही मोजून चाळीस वेळा दिला होता. ती गंमत पाहून राजबंदी खो खो हसत. पण अखेर त्याला तो पाढा आला ही गोष्ट त्याहूनही गमतीची झाली! असे ते अशिक्षित होते; पण हृदय पवित्र, भक्तियुक्त, शुद्ध, केवढी त्यांची भक्ती आणि काय लीनता! त्यांच्यात कित्येकांस दंग्यातून झालेल्या गोळीबारात गोळ्या लागलेल्या होत्या. आम्ही नेहमी अभिमानाने त्या घावांच्या डागावरून हात फिरवावा आणि म्हणावे, हे पहा आमचे सैनिक, ही पहा त्यांची सन्मानदर्शक पदके! भाडोत्री सोन्याच्या पदकांहून ही मांसावर अंकित केलेली पदके माननीय आहेत. ही पदके किती किती प्रामाणिक आहेत!

## बारीची बोळवण

आणि कारागारात राजबंदी या सर्व उलाढाली करीत असता बारीसाहेब कुठे होते? पूर्वी राजबंदीवानाने वर पाहिले की खाली पहा आणि तो खाली पाहत असला तर वर पहा म्हणून काही तरी निमित्ताने त्यांचा उपमर्द करीत गर्जत जाणारा तो पोर्टब्लेअरचा मर्त्य परमेश्वर कुठे होता? कुठे नाही. त्या कारागारातच होता; पण अगदी त्या पोर्टब्लेअरच्या एखाद्या दगडासारखा. टक्कर कोणी घेतलीच तर लागणारा; पण आपण होऊन कोणाशी टक्कर घेण्यास न जाणारा एक निरुपद्रवी धोंडा होऊन पडला होता. दहा वर्षांच्या सतत घासाघिशीने कंटाळून, ते संप, ती वृत्तपत्रांतील हाकाहाक, तो त्याचा बोज गेल्याचे दुःख यांनी तो त्रासून गेला होता, आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही डोईजड झालेल्या आणि संख्येने व संघटनेने सारखे वाढत जाणाऱ्या त्या राजबंद्यांविषयी ‘भीक नको पण कुत्रा आवर’ असे धोरण त्याने स्वीकारले होते. आमची ही उलाढाल जिथे दोघेजण बोलायची चोरी तिथे पंचवीस जणांच्या सभा हे सर्व तो ऐके; पण साफ पेटी ऑफिसर इत्यादिकांस सांगे की, ‘‘माझ्या कानावर काही कागाळी येऊ देऊ नका. माझ्या आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समोर काही त्यांस असे एकत्र बसू देऊ नका, काम थोडे थोडे करुन घ्या, आणि बोभाटा होईल असे काही भयंकर कृत्य होऊ देऊ नका म्हणजे झाले. मग त्या सैतानांस काय वाटेल ते करू द्या. तुमचे तुम्ही संभाळा. जा!’’

त्यातही आमच्या वर्षा न् वर्षाच्या शिक्षणाने जमादार पेटी ऑफिसरांपर्यंत बंदीवानांतील अधिकारीही बहुशः आमच्याच वळणाचे झालेले होते. आपण होऊन चुगली करणारे फार थोडे उरलेले असत. त्यामुळे बहुतेक गोष्टी तर बारीच्या कानावर न जाताच घडत असत. या अधिकाऱ्यांत संघटनाच्या आणि राष्ट्रीय विचारांच्या प्रेरणेचे लोक कसे असत याचे एक उदाहरण म्हणून संगू. एक गुजराथी बंदीवान जो शेतीच्यासाठी हत्या केल्याच्या अपराधासाठी दंडित झालेला होता तो आम्ही आलो तेव्हापासून आमच्या विचारांनी प्रेरित झालेला आणि आमचा कट्टा अभिमानी असे. राष्ट्रीय रुची त्याला इतकी लागली की, संपासारख्या अगदी कडक बंदोबस्ताच्या दिवसांतही तो स्वतः काम करी. बंदी होता तेव्हा नारळाच्या फळाच्या सोललेल्या सालीत लपवून राजबंदींच्या चिठ्ठया नेत-आणीत असे. पुढे वॉर्डर झाल्यावर कचरा भरणाऱ्या टोळीवर तो मुख्य असे तेव्हा त्या टोकऱ्यांतून वर्तमानपत्रे आम्ही भागाभागांतून धाडावीत ती त्यानेच न्यावी. त्याच्या या साहसाने त्यास आमच्या मंडळीत ‘डाकवाला’ म्हणून उपपद मिळालेले

होते. अगदी जेव्हा बारीचा सत्ताकाल कडकपणे गाजत होता तेव्हा पेन्सिल किंवा कागदाचा बोटभर तुकडा अशक्य म्हणून पाणी पिता पिता कटोऱ्यावर विटकरीने आम्ही बातम्या वा निरोप लिहावे आणि ते कटोरे या राजश्रींनी सहज फिरवीत इकडचे तिकडे पोचवावे. झाडाची पाने कचऱ्यात फेकण्यात यावी; याने खूण केली की ती आम्ही उलगडून पहावी तो त्यांवर बाहेरून आणलेल्या एखाद्या बातमीचे दोन शब्द काट्याने कोरलेले! कोणासही शंका येणार नाही अशा रीतीने! ते झाड पुढे तुरुंगात तोडण्यातच आले. अशा या निर्लोभपणे राष्ट्रीय स्वयंसेवकाचे काम करून राजबंद्यांसाठी आणि शुद्धी इत्यादी सार्वजनिक चळवळीसाठी झटणाऱ्या बंदींची वाढत वाढत जमादाराचे जागी त्या वेळेस बढती झाली होती. तो पूर्वी स्वतः आमचेपाशीच अ आ पासून गुजराथी शिकला होता. तो आता जमादार झाला तरी आम्ही सांगू त्यास इकडे तिकडे पाहत स्वतः वाचण्यास देई आणि शिकवी. इकडे तिकडे पाहत - कारण अशा सार्वजनिक परोपकारी राष्ट्रीय प्रवृत्तीस उत्तेजन देण्याचे ठिकाणी ते कारागारीय विधानाच्या दुष्ट धोरणानुसार दंडनीय ठरलेले होते. तो बंदीवानाचे काम आणि इतर आवश्यक शिस्त किती पाळी आणि किती प्रामाणिक व निर्व्यसनी असे ही गोष्ट त्याची राजबंद्यांशी सहानुभूती असल्यामुळे तो शंकास्पद मनुष्य म्हणून ठरलेला असताही बारीच्या हाताखालीच, पण बारीच्या कृपेने नव्हे, जमादार झाला होता. यावरून बव्हंशी सिद्ध होईल.

## क्रांतिकारक कावळे चिमण्या मारणार नाहीत.

आमच्याच शिक्षणात वाढलेले लोक जिकडे तिकडे वसाहतीत आणि कारागारात पसरत गेल्याने, आणि राजबंद्यांस कसेबसे शांत ठेवा हे धोरण वरिष्ठ अधिकाऱ्यांसच कंटाळून स्वीकारणे भाग पडल्याने आमचे बारीसाहेब एखाद्या मृत ज्वालामुखीप्रमाणे बंदीशाळेच्या लेख्यालयात बसलेले आहेत. अष्टौप्रहर तोंडात धरलेल्या काठीएवढ्या चिरुटाचा धूर जो काय तो त्यांच्या तोंडाचा ज्वालामुखी सोडीत असेल तेवढाच काय तो! सर्व बाकी थंड. त्यातही आताशा त्यांना विकार जडलेला होता. ते लॅमबॅगोच्या आजाराने अगदी कंटाळत आले होते. अखेर एकदाची त्यांना अवधीची सुट्टी मिळाली. आणि लवकरच ते पोर्टब्लेअर सोडण्याची सिध्दता करू लागले.

ते त्यांची पोर्टब्लेअरची वीस तीस वर्षांची मत्ता बांधून- बिंधून घेत आहेत तोवर त्यांच्या सुट्टीची गोष्ट निघाल्यामुळे आठवलेली मागच्या सुटटीची एक गंमत सांगून टाकू. चार-एक वर्षापूर्वी म्हणजे १९१५ वा १६ व्या वर्षी त्यांनी आयर्लंडास जाण्याचे ठरविले आणि त्यांना अवधीची सुटटीही मिळाली. आयर्लंडमधून हे महाशय दोन-चार पैसे घेऊन पूर्वी पळून आलेले होते. तो पूर्वीचा भिकारी मनुष्य आज दहा-पाच हजार गाठीशी मारून परत आयर्लंडला जाणार होता. ते म्हणतच, ''मी माझी वीस वर्षांची अंदमानची जन्मठेप पुरी केली बरं का सावरकर? कारण मीही एक इथे बद्ध झालेला मनुष्यच नव्हतो का?'' आयर्लंडास आता परत जावयाचे पण राजबंद्यांची जी त्यांनी दयाळू व्यवस्था आजवर ठेवली होती ती त्यांच्या पोटात डाचू लागली आणि ते दिवस म्हणजे लोकांत पीडक म्हणून बभ्रा झालेल्या सरकारी अधिकाऱ्यांपैकी एका-दोघांस कोणा तरी उद्दंड क्रांतिकाराच्या हातून झटपट राम म्हणण्याची पाळी आल्याची प्रत्यही बातमी आणणारे! बारीच्या कार्यालयात एक दिवस त्याची गोरी मित्रमंडळी बसली असता ही चर्चा निघाली; आणि कलकत्याकडून प्रवास करण्यात बारीसाहेबांच्या जिवास त्यांच्या कीर्तीने

लुब्ध होऊन त्यांस प्रसाद द्यावयास टपलेल्या एखाद्या दुष्ट क्रांतिकारकाची घातक भेटगाठ पडण्याचा संभव असल्यामुळे प्रवास हिंदुस्थानातून न करता परस्पर सिलोनमार्गे करावा अशी बोलणी सहज झाली. आगेमागे असलेल्या आमच्या 'मुनशी' (बंदीलेखक) मंडळींनी ती ऐकून आम्हास कळविली. त्या काळी गोऱ्या अधिकाऱ्यांच्या मनात अशी भीती उद्भवणे हे केवळ भ्याडपणाचेच लक्षण नसून काही अंशी शहाणपणाचेही असे, असे आम्हास वाटे. या संवादाने बारीसाहेबांस स्वतःचे फारच महत्व वाटले आणि त्या दिवशी संध्याकाळी सगर्व स्वतः बारीसाहेबच त्यांच्या दंडम विनोदाने विचारते झाले की, काय सावरकर, तुमचे मित्र म्हणे आम्हावर बॉंब फेकणार आहेत हिंदुस्थानात पाउल टाकताच? आम्हीही त्यांच्या दंडम विनोदाचेच अनुकरण करून उत्तर दिले, ''मला नाही वाटत. जर कोणापाशी खरोखरच बॉंब असतील तर अशा कावळे - चिमण्याच्या पारधीत आपली दारू उधळण्यापेक्षा एखाद्या वाघाची मृगयाच करणे अधिक शहाणपणाचे हे न समजण्याइतका मला नाही वाटत कोणी क्रांतिकारक वेडा असेल!'' बारीसाहेबांचा गर्व तर ढेकळासारखा पाण्यात विरला. भीतीचे काय झाले ते त्यांचे त्यांस माहीत!

## बारीचा मृत्यू !

ही झाली मागच्या सुटीची गोष्ट. या सुटीची गोष्ट अगदी निराळी होती. आता ते बहुधा नित्याचेच चालले होते. अंदमान तर सुटणारच; पण हे जगही फार दिवस त्यांस दिसेल की नाही याचीही शंका यावी अशी त्यांची प्रकृती खंगली. शेवटी शेकडो बंदीवानांच्या शिव्याशापांचे उपहार स्वीकारीत कंबर बसून गेलेल्या बारीसाहेबास दोघांजणांना धरून जलयानावर चढवावे लागले. अर्ध मुमुर्षू स्थितीत ते हिंदुस्थानास पोचले. तेथे लवकरच त्यांचे अगदी हालाहाल होऊन प्राणोत्क्रमण झाले. त्यांची स्मृतीही त्यांनी पीडिलेल्या राजबंदीवानांनीच जिवंत ठेवली म्हणून राहिली आणि हा ग्रंथ असेतो राहीलही. नाही तर तीही तेव्हा मृत झाली असती. आणि वास्तविक तसेच व्हावयास पाहिजे होते. कारण राजबंद्यांचे हाल जे झाले त्यास ते मूळ कारण नसून केवळ निमित्तभूत होते. पण त्यामुळे त्यांस अगदी प्रमाणाबाहेर महत्व आले. तथापि अमूर्त संस्थेच्या दुष्टपणाची वा सुष्टपणाची माहिती देताना कोणा तरी मूर्त व्यक्तीचा नामोल्लेख अपरिहार्य होतो त्यामुळे तशा यःकश्चित बंदीपालाचे नाव लोकांच्या दृष्टीसमोर आले. नाही तर बारीच्या दोषांची किंवा गुणांची कशाचीच तितकी प्रख्याती वा कुख्याती होण्याची पात्रता नाही.

तरीही जे काही सुखाचे शब्द आम्हास त्या अत्यंत विवश अवस्थेतही तो बोलला आणि आम्हाविषयी त्याने आणि त्याच्या कुटुंबीयांनी जी काही कधीबधी सहानुभूती प्रदर्शित केली त्याविषयी त्या बंदीपालाचे, त्याच्या सदय कन्येचे आणि त्याच्या देवलसी पत्नीचे आभार मानल्यावाचून आम्ही पुढे जाणार नाही. परस्पर विरुद्ध परिस्थितीहून अन्य परिस्थितीत भेटलो असतो तर तो क्वचित आमचा एक चहाताच झाला असता असे आम्हास वाटते, आणि या समजुतीस आधार त्याचेच आमच्यामागे आमच्याविषी त्याने काढलेले अनेक उद्गार आहेत.

## शाप आणि क्षमा!

बारीचा उल्लेख संपविता संपविता 'छोटया बारी'ची त्या 'पठाणीराज्य' पोर्टब्लेअरमध्ये गाजविणाऱ्या मिर्झाखानाचीही बोळवण करून टाकू. बारीची ज्वालाच जेथे विझत आली होती तेथे तिच्या उष्णतेस थंडी होऊन ती

लुप्तप्राय होत आली होती हे सांगणे नकोच. जिकडे तिकडे राजबंदीवानांचा जोर पाहून, त्याचे दुष्ट पठाणी-सिंधी हस्तक एकेक करून 'तोडून' टाकविण्यात आलेले पाहून, जेथे तेथे सरकारी काम आणि कारागारीय योग्य शिस्त त्यांच्याहूनही नीट पार पाडणारे पण सापेक्षतः सौम्य, सद्‌वर्तनी आणि राष्ट्रीय विचारांचे हिंदू बंदीवान आणि 'स्वतंत्र' लोक वसाहतीत आणि कारागारात बहुतेक लहानमोठया जागावर नेमले गेल्यामुळे निरुपाय होऊन ही मिर्झाखानाची दाढीबाज स्वारी अगदी ढिली झालेली होती. राजबंदीवानांपुढेच लांगूलचालन करून दिवस कंठू लागली होती. मुसलमानी धर्मवेड - जे पूर्वी त्यास निष्कारण उन्मत करीत होते तेच आता त्याची भीतीही निष्कारण वाढविण्यास कारणीभूत होई. त्यास वाटे आपण जसे काफरास छळले तसेच ते आता आपणास छळतील! एक गमतीची गोष्ट त्याच्या या प्रवृत्तीचे दिग्दर्शन करील. या उत्तरकाली त्यास एकदा हातास काही व्यथा झाली. काही केल्या तो ठणका राहीना. बारीचे सगळे अंग जसे लुळे होत आले होते तसाच त्याच्या या हस्तकाचा हात अगदी लुळा झाला. तेव्हा त्या धर्मवेड्या मिर्झाखानाच्या मनाने पक्के घेतले की, होयना होय त्या सात क्रमांकाच्या आरशीवाल्या बड्या बाबूनेच आम्हां दोघांवर काही जादू मारली असावी. बारी असा इतका भोळसट नसे; पण मिर्झाखानाने धास्ती खाल्ली. आम्हास अत्यंत गौरवून त्याने आजारीपणात निरोप धाडला की, माझे शंभर अपराध आहेत. सावरकर बाबूंस म्हणावे क्षमा करावी आणि माझा हात मला परत द्यावा. ही त्याची विनंती ऐकून मी त्याची समज घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला की, मी जादू केली नाही; इतकेच नव्हे तर जादूटोण्यावर माझा विश्वास देखील नाही. पण तो काही मानेना. तेव्हा केवळ त्यास निश्‌चित करावे म्हणून म्हटले, बरे तर तुम्ही म्हणता की मी बरे होईल असे म्हटले तर तुमचा हात बरा होईल. तशीच तुमची भावना असेल तर मी ईश्वरसाक्ष तुमचे बरे इच्छितो. पुढे त्याचा हात बरा झाला. तो अर्थात औषधानेच. त्याला कशाने वाटला त्याचे त्यालाच माहीत. पुढे सहाएक महिने तो तिथे होता. पण दात पडलेल्या सापासारखा. नंतर विजयोत्सवाचे वेळी जे तीनशे-चारशे बंदीवान सुटले त्यांत अर्थातच आपल्या भूतकाळच्या पीडक सेवेचे फळ या स्वारीच्या हाती पडले आणि तो दहा वर्षे हिंदूंचा छळक म्हणून गाजलेला पण पुढे हिंदूंपुढे गोगलगाय झालेला मिर्झाखान सुटून गेला. त्याचे मागे तर पठाण-सिंधी-पंजाबी- मुसलमानांची गुरमी सुटली. अरेरावी पार चिरडून टाकली गेली. जे एक-दोघे उरले ते चुपचाप दिवस काढू लागले. जिकडे तिकडे वॉर्डर, हवालदार, जमादार, स्वतंत्र अधिकाऱ्यांतील लेखक, डॉक्टर, कम्पौंडर, कारागारात आणि वसाहतीत बव्हंशी हिंदूच झालेले असून त्यांच्या सापेक्षतः सरळ आणि प्रामाणिक स्वभावामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांसही तेच मानवत चाललेले पाहून पठाण म्हणू लागले, ''अब क्या बोलना अब तो हिंदूराज हो गया है!''

वरिष्ठ अधिकाऱ्यांपाशी काही जुन्या पठाणांनी चुगल्या देखील कराव्या की, ''साब, अब तो पोर्टब्लेअरमें हिंदुराज है. साब, हमको बडा डर है, हमारे उपर कुछ मुकादमा (खटला) न बनाया जाय!'' ज्या वेळेस यांचे 'पठाणराज' होते तेव्हा हिंदूंना असे खोटे खटले करून निष्कारण छळण्याची ज्यांना खोड होती त्यांच्यापैकी या अवशिष्ट शिष्टांना आता हिंदूही तेच करतील अशी भीती वाटणे हे त्यांच्याच दुष्टतेचे प्रतिबिंब होते, हिंदूंच्या नव्हे. कारण हिंदूंनी निष्कारण कोणास मुसलमान म्हणून छळले नाही; इतकेच नव्हे तर समंजस आणि धर्मवेडापासून अलिप्त असलेल्या मुसलमान बंधूंस आम्ही शेवटपर्यंत पाठिंबाच देत असून, शिकवीत असून आणि आमच्या

वशिल्याने होईल तितके कल्याणच करवीत असू. त्यांतील कित्येकांचे अर्ज लिहिले असतील; कित्येकांच्या कामात साह्य देवविले असेल. पुढे जेव्हा आमच्या हातीही या यःकश्चित नरोटीतल्या ‘हिंदू राज्या’चा काही अधिकार आला तेव्हा मुसलमानी जमादारादिकांस आम्ही किती सचोटीने आणि न्यायाने वागविले हे पुढे त्यांच्याच शब्दांत सांगण्यात येईलच.

बारीची बोळवण झाल्यानंतर तेथे दोन-तीन तत्रस्थ आणि हिंदुस्थानातून आणविलेल्या अस्थायी (Permanent or temporary) बंदीपालांची ये-जा चालली. यांपैकी एकास बारीच्या पहिल्या दराऱ्याची माहिती ऐकून परंतु उत्तरार्धातील त्याच्या हताशेची आठवण न राहून आपण सरकारास आपला पराक्रम राजबंदीवानांस सतावून गाजवावा असे वाटूनच की काय नवीन आलेल्या गुजराथी राजबंदींपैकी त्यास जे सौम्यस्वभावी लोक दिसले अशास कोलू करण्याची त्याने आणि त्याच वेळेस तशाच उथळ स्वभावाच्या आलेल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने आज्ञा केली. राजबंदीवानांनी झुंजून झुंजून या कोलूची कंबर मोडली होती. त्यांस तो देणे बरेच झाले होते. बरे देणे तर नवीन आलेल्यांत जे धष्टपुष्ट किंवा झुंजार होते त्यांस ते कठीण काम देण्यात यावयास पाहिजे होते; पण अशक्त, सौम्य आणि अगदी गायीसारखी खेडवळ माणसे निवडून त्यांसच घाण्याचे कष्टकारक काम दिले- हेतू हा की, ते भिऊन ते काम करतील. पण पहिल्याच दिवशी ते सर्व इनकार करून बसले. त्यांस मागचा इतिहास सांगितलेला होता. त्यांच्यातील दोघे आमच्याच चाळीत होते. त्यांचेपाशी सर्व धोरणे ठरवून ठेवले. त्यांचा इनकार होताच त्या बंदीपालाने अगदी बारीचा आव आणूनआरडाओरड करून त्या आमच्या चाळीत असलेल्या एक दोघांस - जे त्याने इतरांचे पुढारी म्हणून ठरविले होते - लाकडी घाण्यास अगदी बैल जुंपतात तसे बांधून इतरांकडून तो घाणा ओढावा म्हणून आज्ञा दिली. अर्थातच इतर बंदीवान तो घाणा घेऊन पळत सुटताच बांधले गेल्यामुळे त्या गुजराथी राजबंदीस एक तर घाणा फिरवीत पळावे - म्हणजे घाणा फिरवावा, नाही तर अंग टाकून भुईवर खरचटत ओढले जावे, हे दोनच मार्ग उरले. त्यांतील एकाने हा मार्ग स्वीकारला. तो भुईवर पडला. बांधला गेल्यामुळे इतर बंदी ओढीत त्यासरशी घाण्यामागे भुईवर आपटत, फराफरा ओढला जाऊ लागला. थोड्याच वेळात ही त्या घाण्याच्या चाळीतील बातमी सर्व क्रमांकांत फैलावली. आमच्याही क्रमांकात आली. इतर राजबंदीस - निरोप धाडून काय ते ठरविता जेवणाची वेळ आली. तेव्हा गुजराथी राजबंद्यांच्यावर होत असलेल्या या अत्याचाराच्या बातम्या खऱ्या का खोट्या ते आम्हास बंदीपालास विचारणे आहे म्हणून प्रत्येक चाळीतून निरोप गेले. ही गडबड ऐकून बंदीपाल कारागृहात आला. तो पाहतो तो काय! झुंजात पटाईत झालेल्या जुन्या राजबंद्यांतील एकाहून एक निश्चयी आणि करारी पुरुष हातात थाळ्या घेऊन आणि या कार्याची व्यवस्था लागल्यावाचून अन्न घेणार नाही म्हणून चाळीच्या दारादारांत आडवे येऊन बिथरलेले उभे आहेत. बंदीपालाने हा पहिलाच प्रसंग पाहिलेला, राजबंदीवानांशी गाठ आहे हे स्वारीने ओळखले. प्रथम म्हणाला, गुजराथ्यास घाण्यास बांधविले ही गोष्टच खोटी आहे. तेव्हा एक धिप्पाड आणि संपात नेहमी पुढे असलेला पंजाबी राजबंदी चिडून म्हणाला की, काय आमचा तो गुजराथी भाई खोटे बोलतो? हे पहा- आणि त्याने तो लोखंडी थाला गदेसारखा उगारला - ‘‘हे पहा, वेळ पडली तर या थालीपाटाने डोके फोडून टाकू! आमच्यावर अत्याचार करणाऱ्याने नीट विचार करून तो करावा!’’ बंदीपाल चकार शब्द न बोलता मागे गेला. त्या दोन गुजराथ्यांस घाण्यातून काढून खोलीत बंद करण्यात आले; आणि

राजबंदीवानांस निरोप आला की तुम्ही जेवा. तुमच्या माणसास काही त्रास होणार नाही. काही दिवसांनी त्या गुजराथी राजबंदीस इतरांप्रमाणे छिलका देण्यात आला आणि सार्वत्रिक संपाचे हे नवे आणि शेवटचे कारण त्या संपाच्या नुसत्या धाकानेच दूर झाले.

## ठीक करणारेच ठीक झाले

याच बंदीपालाच्या हातून आम्हास आठवते त्याप्रमाणे अंदमानात निर्बंधाविरुद्ध अशी शेवटची मारहाण करण्यात आली. राजबंदीवानांना नेहमी साहाय्य करून आमच्या सार्वजनिक चळवळी मनःपूर्वक भाग घेणाऱ्या साध्या बंदीवानांतील एका धाडसी हिंदू तरुणावर - ज्याचा उल्लेख आम्ही मागे शुद्धीप्रकरणीही केला आहे - अधिकाऱ्यांचा नेहमीच डोळा असे. त्याला ज्ञानार्जनाची गोडी फार असे. त्याच्या हाती एकदा कामाचे वेळी पुस्तक असलेले पाहून का अशाच कोणत्या तरी कारणाने त्यावर चिडून त्यास कार्यालयात बोलावून या राजश्रींनी ग्राम्य शिवी दिली. ग्राम्य शिवी म्हणजे बंदीगृहात इंग्लिश भाषेत नावाच्या मागे उपपद जसे नियमाने येणारे उपपद असे. परंतु अंदमानच्या कारागारात लोकांचे स्वभाव आठ वर्षांपूर्वीचे राहिले नव्हते हे त्या बंदीपालास काय ठाऊक! त्याने शिवी हासडताच ''तुमारा बाप- '' म्हणून या बंदीपाल राजश्रींच्या जनकासच त्या शिवीचा उपहार त्या हिंदू तरुणाने दिला! तेव्हा संतापाने फणफणून तो बंदीपाल उठला आणि त्याने त्या बंदीवानास वॉर्डराकडून धरवून आपल्या हाताने तोंडावर आणि छातीवर ठोशामागून ठोशे मारण्यास आरंभ केला. तोंड सुजून, रक्त वाहू लागले तेव्हा त्यास सोडले. त्यातही त्या बंदीवानास गंडमाळेचा रोग होता हे ध्यान्यात ठेवले पाहिजे. बंदीपालास वाटले त्याची खोड मोडली. इतर भित्रे किंवा लुच्चे लोक त्यास म्हणाले, ''अरे बाबा, इंग्रजांशी ते राजबंदीच भांडू जाणत! आपण कोणच्या झाडाचा पाला? आता झाले ते झाले. तू तोंड सुजले आणि रक्त वाहिले ते पडलो म्हणन झाले असे डॉक्टरास सांग. नाही तर उलट शिक्षा खाशील'' पण तो धीराचा माणूस. त्याचा डोळा आणि ओठाचा सर्व भाग पार सुजला होता. तो बंदीपालाने मारले म्हणून सुजला असे डॉक्टरास त्याने प्रतिवेदिले. पण डॉक्टर बंदीपालाचे भयाने तिकडे कानाडोळा करू लागला. पर्यवेक्षकास बंदीपालाने त्याची भेटच घेऊ दिली नाही. तेव्हा आमच्यातील एका राजबंदीने ती गोष्ट उघडकीस आणण्याचे ठरविले. त्या आठवड्यातच योगायोगाने चीफ कमिशनरही येणार होते हे पाहून बंदीपाल घाबरला; विनवण्या करू लागला. पण चीफ कमिशनरपुढे तो अत्याचार मांडण्यास तो हिंदू तरुण भ्याला नाही. बंदीपालाचे कान चांगलचे उपटले गेले. अशा पूर्वीच्या प्रतिवादाने तुरुंगात मारपीट हटत आलीच होती. या नव्या राजश्रींनी तिला चालना देण्याचा प्रयत्न करताच त्यांसही ही थप्पड बसल्यामुळे त्यांनीही पुन्हा असे दुष्ट कृत्य करण्याचे साहस केले नाही. त्यापुढे जे वर्ष दीड वर्ष आम्ही तिथे घालविले त्यात बंदीवानास अशी निष्कारण आणि क्रूर मारपीट पुन्हा झाल्याचे आम्हास आठवत नाही. आठ वर्षांपूर्वीचे त्या वसाहतीतील ते ''ठीक करो'' स्वतःच असे ठीक केले गेले. मारपिटीचे हे आमच्या आठवणीतले शेवटचे उदाहरण म्हणून हेतूपूर्वक येथे सांगितले. हेही सांगणे अवश्य आहे की, या रक्त ओकेतो मारण्यानेही न भीता त्या तरुण हिंदू बंदीवानाने सार्वजनिक चळवळी करण्याचे सोडले नव्हते. त्याची बंदीची चौदा वर्षे आधीच भरली होती; पण मी येईतो तो सुटला नव्हता. आमच्या मागे त्या बिचाऱ्याचे काय झाले ईश्वरास ठाऊक!

## हिंदू संस्कृतीचा अभिमान धरणारे बंदीपाल

यापुढे बदल्या होता होता बारीसाहेबांचा मेहुणा आणि त्या वसाहतीत पूर्वीपासून अनेक अधिकारांच्या जागांवर काम केलेला एक गृहस्थ बंदीपाल झाला. त्या गृहस्थाचे नाव डिगिन्स असे होते. कोणत्याही चांगल्या मनुष्यासही त्या अंदमानी निर्बंधाच्या धोरणात चांगले राहता येत नसे. तरी तशा दुष्ट धोरणातही आपला अधिकार ज्याने शक्यतो न्यायाने गाजविला आणि त्यामुळे ज्याचे नाव सर्व बंदीवान बारीसाहेबांचे जितक्या त्रासिक तिरस्काराने घेत तितक्याच कृतज्ञ आदराने घेत असत ते हे डिगिन्ससाहेब त्या कारागारावर येताच सर्वांस आनंद झाला. हिंदुसंस्कृतीचा त्यांस अभिमान असे. ते आयरिश होते आणि विशेष की, ते थिऑसफिस्ट असत. बारीच्या तोंडचे एक मुक्ताफळ मागे इंदुभूषणाच्या आत्महत्येच्या प्रकरणात आम्ही दिलेच आहे की, या थिऑसफिस्टच्या पुस्तकाने मनुष्यास वेड लागते. परंतु त्या बारीच्या या मेहुण्यास थिऑसफिस्टची पुस्तके रात्रंदिवस वाचूनही वेड लागल्याचे कुठे आढळून आलेले नव्हते! सरकारास देखील आढळून आलेले नव्हते. हे गृहस्थ ज्ञानलिप्सू आणि सुसंस्कृत असत. सरकारी काम चोख रीतीने करून घेऊन आणि शिस्त योग्य तितकी कडक राखूनही बंदीवानांस माणसांप्रमाणे वागविता येते इतकेच नव्हे तर कारागारीय संस्थेचे मुख्य ध्येय दंडितांची आत्मिक, मानसिक, आणि नैतिक सुधारणा हेच असावयास पाहिजे या तत्वानुरूप दंडितांच्या वसाहती चालविता येतात हे त्यांच्या वर्तनाने ते शक्यतो त्यांच्या कक्षेत सिद्ध करून दाखवीत. यापायी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा असमंजस कोपही त्यांस काही वेळा सहन करावा लागला.

## कारागारीय अन्वेक्षक मंडळ

या बदल्या इकडे चालल्या असता तिकडे हिंदुस्थानात एक ''कारागारीय अन्वेक्षक मंडळ''- जेल कमिशन नेमले गेल्याची बातमी आली. या अन्वेक्षक मंडळापुढे जे प्रश्न होते त्यांत अंदमानाच्या वसाहतीचे पुढे काय? हा प्रश्न होता. या कारागारीय मंडळाची नेमणूक करण्यास आणि विशेषतः अंदमानच्या वसाहतीच्या स्थितीची चौकशी करून तिच्या भवितव्याचा विचार करण्याचा प्रश्न प्रामुख्याने त्यापुढे ठेवण्यास आमच्या अंदमानीय चळवळी आणि सतत आठ-नऊ वर्षे तिकडील दुर्दशेची कहाणी हिंदुस्थानात आणि जगात एकसारखी उजेडात आणण्याची सुरू ठेवलेली खटपट ही विशेषतः कारणीभूत झालेली होती याविषयी आम्हास मुळीच शंका वाटली नव्हती. हेही आम्हास आणि अंदमानातील सर्व सुजाण बंदीवानांस उघड दिसत होते की, जर या वेळी आपल्या कष्टांची माहिती सविस्तरपणे आपण होऊन या अन्वेक्षक मंडळाचे कानावर घालण्याचे धैर्य केले नाही, तर ही वसाहत म्हणजे एक देवाने जगतास दिलेली देणगीच असून तीत सध्या सुधारण्यासारखे काही फारसे वाईट नाही या मताचे अधिकारी आपल्या मताची छापच त्या मंडळावर पाडण्यास सोडणार नाहीत. अधिकाऱ्यांतही एक-दोन प्रमुख अधिकारी अंदमानचा जलवायूच आरोग्यनाशक असून तेथील बंदीवानांच्या वसाहतीचे धोरणही पुष्कळ अंशी घातक आहे असे स्पष्ट मत देणारे होते. पण अधिकारी वर्ग असा अशा खटपटीत निमग्न झाला की, ते कारामंडळ येताच त्यास मागच्या अत्याचारांची शक्य तितकी कमी माहिती मिळावी; जी मिळेल ती खोटी ठरविण्यात यावी; आणि एकंदरीत सब ठीक है असे त्यास भासवून त्याची परत बोळवण करण्यात यावी. त्यांनी

जिकडे तिकडे रंगरंगोटी आणि टापटीप करण्यास आरंभ केला. तोंडपुजे बंदीवान शोधून शोधून त्यांस अधिकाऱ्यांविरुद्ध अन्वेक्षक मंडळापुढे काहीही प्रतिवाद किंवा कागाळ्या होऊ नयेत अशी बंदीवानांत व्यवस्था करण्यास नेमले. उलटपक्षी राजबंदीवानांच्या धुरीणत्वाखाली बंदीवानांनीच नव्हे तर, लोकांनीही आपआपल्या दुर्दशेचा पाढा शक्य तितक्या निर्भीडपणे त्या अन्वेक्षक मंडळापुढे मांडावयाची व्यवस्था चालविली. जिल्ह्याजिल्ह्यातून एकमताने एकाच प्रकारच्या एकमुखी मागण्या आणि प्रतिवाद केले जावे म्हणून निरोपंची आणि लेखी शिकवणुकीची डाक सुरू झाली. अन्वेक्षक मंडळासमोर बंदीवानांची सर्व बाजू मांडण्याचे काम निरनिराळया जिल्ह्यातून निरनिराळ्या माणसांकडे जरी देण्यात आले होते तथापि त्या सर्वांचे प्रमुखपणे प्रतिनिधित्व करण्याचे कार्य आम्ही अंगावर घ्यावे म्हणून वसाहतीतल्या बंदीवानांचा नव्हे तर तेथील स्वतंत्र लोकांचाही आम्हास सारखा आग्रह सुरू झाला. त्यांच्या मागण्या आम्ही ज्या भाषेत, ज्या कोटिक्रमात आणि ज्या निर्भीडपणे कारामंडळापुढे मांडू त्याप्रमाणे इतर कोणी करू शकणार नाही असा त्यांचा भाविक विश्वास होता. त्याविरहित कारामंडळाचे मनावर आम्ही सांगितल्याने जो परिणाम होईल आणि त्या माहितीस जे महत्व येईल ते महत्व येणे आणि तो परिणाम होणे, तीच माहिती त्याहूनही स्पष्टपणे किंवा तीव्रतर भाषेत जरी इतर कोणी सांगितली असती तरी शक्य झाले नसते, हे त्या बंदीवानांच्या आग्रहातील विधेय वस्तुस्थितीस धरूनच होते. म्हणून तो एकसारखा आग्रह पाहून आपण ते काम अंगावर घ्यावे असे मलाही वाटू लागले.

परंतु दुसरे पक्षी एक महत्वाची अडचण आमच्यापुढे होती. अंदमानात बंदीवानाने स्वतःसंबंधी काय वाटेल ते प्रतिपादन किंवा गाऱ्हाणे केले तर ते एक वेळ क्षम्य समजण्यात येई; पण त्याने इतर बंदीवानांविषयी काहीही बोलणे किंवा कोण्या बंदीवानाचा पक्ष घेऊन त्याची वकिली करणे हा एक अपराधच समजण्यात येत असे. त्यास तसे करताच एकदम चूपकरण्यात येई की, दुसऱ्याशी तुला काय करावयाचे? तू स्वतःसंबंधी काय ते बोल. त्यातही त्या वेळेस हिंदुस्थानात राजबंदीवानांस विजयोत्सवातील क्षमेप्रीत्यर्थ सोडावे म्हणून पुष्कळ चळवळ चालली होती. कौन्सिलमध्ये प्रश्नोत्तरे होत होती. सरकारने हिंदुस्थानात आणि तत्रस्थ अधिकाऱ्यांनी अंदमानात असे स्पष्टपणे कळविले की, ही सुटका करण्यात त्या त्या राजबंदीचे प्रस्तुत राजकीय आणि सार्वजनिक वर्तन आणि मन प्रमुखत्वे विचारात घेण्यात येईल. म्हणजे आमच्या आणि आमच्या बंधूंच्या सुटकेचा प्रश्न प्रामुख्याने अंदमानातील अधिकाऱ्यांच्या मतावरूनच निर्णित होणार. कारण आमचे मत आम्ही गर्व्हनर जनरलास जरी स्पष्टपणे आवेदनद्वारे कळविले होते तरी ते स्पष्ट आहे की नाही आणि खरे आहे की नाही हे सरकार अंदमानी अधिकाऱ्यांच्या गुप्त उपनेत्रातून ठरविणार! यातही आमच्या आजपर्यंत सार्वजनिक चळवळींनी अंदमानाच्या यच्चयावत् अधिकाऱ्यांचे आम्ही किती प्रेमभाजन झालो होतो ते प्रसिद्धच होते. अशा स्थितीत या वरून येणाऱ्या कारामंडळाचे पुढे वसाहतीच्या सर्व काळ्याबेऱ्या कृत्यांची झडती घेणे आणि बंदीवानांचे आणि स्वतंत्रांचे वतीने अधिकाऱ्यांचा पक्ष हाणून पाडण्याचे काम प्रमुखत्वे स्वीकारणे म्हणजे त्या वसाहती अधिकाऱ्यांच्या वर्तनमापाप्रमाणे आम्ही अत्यंत दुर्वर्तनी आणि मुक्ततेस अगदी अयोग्य असे ठरणेच होते.

## स्पष्ट बोलणे म्हणजे बंदीवास वाढविणे

त्यातही ही बातमीही आम्हास कळली होती की, ते कारामंडळ एका विशिष्ट हेतूने राजबदींची पाहणीही करणार होते. ती गोष्ट म्हणजे, अंदमानच्या अधिकाऱ्यांचे तद्‌विषयक प्रतिवृत्त (रिपोर्ट) वाचून आणि आपण स्वतः प्रमुख राजबंद्यांची चाचणी करून कोण सुटकेस योग्य आणि कोण अयोग्य ते हिंदुस्थान सरकारास प्रतिवेदिणे ही होय. जर आम्ही गाळीव अधिकाऱ्यांनी भरलेल्या त्या कारामंडळासमोर अंदमानी अधिकाऱ्यांच्या आणि अर्थातच त्यांस पाठिंबा देणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या तत्कालीन बंदीशालाविभागातील दुष्ट धोरणावर आणि पीडक व्यवहारावर टीका केली तर ते धाष्टर्य त्या संभावित लोकांस असहनीयच होणार हे उघड होते. म्हणजे, एका अर्थी असा पुढाकार घेणे म्हणजे आमच्या सुटकेच्या मार्गातली आणखी एक संधी गमावणे होते; आणि उलटपक्षी जर हा राजबंदीवानांचा - उभ्या वसाहतीचा अत्याग्रह अवमानिला तर आजपर्यंत राजबंदीवानांस त्यांतील शेकडो जणांनी जे साह्य दिले आणि आदर दाखविला त्यांचे ऋण न फेडता त्यांचे छळ टाळण्याची हाती चालून आलेली एक महत्वाची संधी गमावणे होते. ते दहा-बारा हजार बंदीवान आणि त्यांचे न्याय्य गाऱ्हाणे! इतक्या लोकांचे दुःख खऱ्याखऱ्या छळांचे नुसते उल्लेख करून अशा चौकशीचे वेळी वेशीवर टांगण्यास जर आपण कचरलो तर ती चौकशी करणे सरकारास भाग पाडावे म्हणून केलेले स्वतःचे सार्वजनिक परिश्रमच व्यर्थ जाऊ देणे नव्हते काय? कारण ही चौकशी आमच्या सर्वांच्या सतत प्रयत्नांनी, सोसलेल्या छळांनी आणि केलेल्या प्रतिकार प्रतिवादांनीच आलेली होती. दुसरे कोणीही ते कथन केले असते तरी इतके परिणामकारक होणारे नव्हते हे आम्हास प्रामाणिकणे इतर हजारो बंदीवानांप्रमाणेच वाटत असल्यामुळे कारामंडळापुढे साक्ष देणे आम्हास कर्तव्य वाटू लागले.

## तशी मुक्तता अधिक अहितकारक

अंदमानात आम्ही आमच्या वर्तनाचा बिंदू सदोदित या दोन टोकांच्या मध्यंतरी ठेवीत असू. अंदमानात जे काय राष्ट्रहित साधता येईल ते इतके महत्वाचे कधीही नसणार की जितके मुक्तता झाल्यास हिंदुस्थानात येऊन साधता येईल; परंतु म्हणून मुक्ततेसाठी वाटेल ते विश्वासघातक, निंद्य, नीच आणि देशाच्या किंवा जातीच्या स्वाभिमानास कलंक लागेल, असे लाळघोटी वर्तन त्यामुळे समर्थनीय ठरणार नाही. कारण त्यायोगे होणारी मुक्तता ही राष्ट्रास अधिक हितकारक होण्यापेक्षा स्वतःचे उदाहरणाने अधिक अनीतिमान आणि राष्ट्रघातकी मात्र होणारी होती. तेव्हा असे वर्तन टाळून जर मुक्तता मिळण्याची निश्चित संधी मिळत असेल तर ती साधावयाची. ती निश्चित संधी मिळेतो त्या परिस्थितीतच जे काय राष्ट्रहित साधता येईल ते साधण्याचा प्रयत्न करीत राहून दिवस कंठावयाचे. त्यातही शक्यतो ज्यांच्यावर सरकारचा इतका उग्र दोष वा तीव्र दृष्टी नाही तोवर त्यांचेकडून ती कृत्ये करवावयाची. जेव्हा आपणावाचून ती त्या परिस्थितीत शक्य असलेली सार्वजनिक चळवळ करण्यास दुसरे कोणी इतके इच्छुक वा समर्थ नसेल तेव्हा ती प्रकरणे स्वतः करावयाची. मुक्ततेचा संभव दिसत असता दाटून दवडावयाचा नाही. पण तो निश्चित संभव नसता केवळ आशाळभूत भ्याडपणाने ''नाही तर सोडणार नाहीत'' असे म्हणत अंदमानात स्वकीयांचे चाललेले छळ निमूटपणे पाहतही बसावयाचे नाही. कारण अंती आमची सुटका

अंदमानातील आमच्या वर्तनावर जितकी अवलंबून असे त्यापेक्षा ती हिंदुस्थानातील राजकीय वातावरणातील उष्णतेवरच अनंत पटींनी अवलंबून असणार हे आम्हास पक्के ठाऊक होते. ते हिंदुस्थानातील वातावरण जोवर राजकीय बंदीवानांस सोडण्यासाठी चाललेल्या चळवळीने आणि लोकमतास काहीतरी राजकीय महत्व प्राप्त होण्याइतके तप्त झाले नव्हते तोपर्यंत अगदी ''बारीवाक्यं प्रमाणं'' म्हणून बसलेले आणि कोणत्याही सार्वजनिक कार्यात न पडणारे असे जे राजबंदी होते तेही माझ्यासारखे तिथे सडत पडले होते. त्यांस जे सरकार ''समंजस'' समजू लागले आणि थोड्याफार सवलती इतरांहून अधिक देऊ लागले तेही जेव्हा इतरांच्या चळवळी अधिकाऱ्यांच्या कठोर वर्तनाचा निषेध करू लागल्या तेव्हाच. इतर धृष्टशील झाले नसते तर हे समंजसही 'सशील' म्हणून सरकारास वाटले नसते. राजबंदीवानवर्गाची सुटका कारागारात त्यांनी कितीही गायपण स्वीकारले तरी तेवढ्याने करण्याइतके सरकार भोळे नव्हते. ती-झाली तर मुख्यत्वेकरून हिंदुस्थानातील राजकारणी डावपेचात तो एक पेच अनुकूल होईल असे वाटण्याइतके लोकमत प्रबळ होईल तेव्हाच! हेही आम्हास कारागारीयच नव्हे तर ऐतिहासिक अनुभवानेही निश्चितपणे माहीत होते.

या आमच्या नेहमीच्या धोरणाप्रमाणे आम्ही मध्यम मार्ग स्वीकारला. हजारो बंदीवानांचे छळ आपणाइतके परिणामकारकपणे कोणासही कळविता येणार नाहीत; म्हणून आम्ही कारामंडळासमोर साक्ष देण्याचे ठरविले. परंतु आपण होऊन पुढे न जाता ते कारामंडळ जर आपणाकडे वस्तुस्थिती विचारण्यास चालून आले तर ते सांगावे; आणि त्यातही ज्या गोष्टी अगदी आपणास सत्य म्हणून सिद्ध करता येतील तितक्याच सांगाव्या असे आम्ही ठरविले. त्यांनी विचारले असता सत्य ते सांगण्यासाठीही जर सरकार आम्हास 'धृष्टशील' समजून सोडणार नसेल तर त्यांचे मनात काहीतरी निमित्ताने सोडावयाचेच नव्हते - हे नाहीतर दुसरे निमित्त सांगतील - असेच अपरिहार्य होते. मग एवीतेवी सुटका नसेल तर हजारो बंदीवानांच्या आणि विशेष राजबंदीवानांच्या वर्गाचे शक्य ते हित न करणे म्हणजे कर्तव्यास चुकणे होय असे आम्हास वाटले.

शेवटी जेव्हा कारामंडळ अंदमानास आले तेव्हा ते अपेक्षेप्रमाणे नीट आम्हास विचारीत आमचे कोठडीतच आले. त्यात मुंबईच्या कारागार विभागात जन्मभर अधिकार गाजविलेले जॅक्सनसाहेबही होते. पानगलचे राजे आणि इतर उच्चपदस्थ लोक होते. त्यांनी अंदमानच्या वसाहतीची, कारागारातील व्यवस्थेची, राजबंदीवानवर्गाची चर्चा आपण होऊन प्रश्नोत्तरांच्या ओघात काढली. तेव्हा आम्ही त्या विषयाची यथास्थित माहिती त्यांचेपुढे मांडली. त्यांतील एक-दोन चुटके संभाषणाचे धोरण ध्यान्यात येण्यासाठी खाली देतो.

## सडेतोड नि तर्कशुद्ध उत्तरे

राजबंदीवानांवर झालेल्या अनेक अत्याचारांची कर्मकथा जी या पुस्तकात येथवर वर्णिलीच आहे ती - वर्णीत असता भानसिंगाच्या मारहाणीची माहिती आम्ही सांगितली. तेव्हा त्या संभाषणात अधिकाऱ्यांचा पक्ष गोऱ्या सभासदांहूनही उद्धटपणे आणि रागारागाने समर्थन करणारा एक हिंदी सभासद म्हणाला, 'पण भानसिंगाच्या अंगावरचे घाव मारहाणीनेच पडले हे तुम्हास कशावरून वाटले?''

मी : ते आपोआप पडले हे गृहीत धरता येईना म्हणून.

कारामंडळातील अन्य सभासद : तो जिना उतरत असता भोवळ येऊन पडला होता. त्याने ते घाव पडले होते. तुम्ही मारहाणीच्या वेळी समक्ष नव्हता ना? मग ऐकीव माहिती कुचकामाची.

मी : पण भानसिंग आपण म्हणता तसा जिन्यावरून पडला तेव्हा आपण स्वतः इथे होतेत का? नाही! तर मग आपणासही ही ऐकीव माहितीच कोणी तरी कळविली, मग तीही कुचकामाचीच. केवळ माझ्या माहितीपेक्षा ती अधिक अविश्वसनीय. कारण ती घटना घडताना आपण एका समुद्राआड हिंदुस्थानात होता आणि मी हा एका भिंतीआड इथे होतो. मी ते ओरडणे, मारो-मारा, इत्यादी आवाजांची आणि धावपळीची गडबड प्रत्यक्ष ऐकिली आणि पाहिली आणि अगदी तेथे असणाऱ्या अनेक मनुष्यांनी एका पाच मिनिटांचे आत मला ती घटना सांगितली.

सभासद : आम्हास अधिका-यांनी माहिती दिली.

मी : आणि मला त्या प्रसंगी उपस्थित असलेल्या राजबंदींनी दिली. ते राजबंदी अधिकाऱ्यांहून कमी विश्वसनीय आहेत असे मला वाटत नाही. येथील कारागारांचे खालचे अधिकारीच आगळीक करणारे असल्याने ते घटना विकृत करून सांगणे अधिक संभवनीय आहे; आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी स्वतः नव्हते. त्याव्यतिरिक्त मी भानसिंगाचे अंगावर छडीचा वळ रुग्णालयात स्वतः पाहिला होता.

नंतर माझ्या मतासंबंधी आडूनपाडून चर्चा करीत एकजण म्हणाला - पण तुम्हाला कारागाराबाहेर सोडले तर तुम्ही काय करणार?

दुसरा सभासद मी उत्तर देण्यापूर्वीच उपरोधिक हसून म्हणाला,‘‘राजद्रोह फैलावण्याचे काम पुन्हा सुरू करणार’’! मी म्हटले- ‘‘तुम्ही स्वतःला अंतरज्ञ समजता आहासे दिसते. नाहीतर माझे मनात काय ते तुम्हीच सांगण्यासाठी पुढे झाला नसता. बरे समजा तुम्ही म्हणता तसे राजद्रोह फैलावण्याचे काम मी पुन्हा सुरू केले तर मला तुम्ही पुन्हा धरू शकाल. पुढे कोणी चोरी करील म्हणून आज त्याने तसे काहीएक केले नसताही या कारागारात कोणास त्याचे इतर साथीदारांहून आणि तुमच्याच नियमाविरुद्ध त्यास डांबून टाकाल की काय? तुमच्या नियमांच्या आधारेच मला कारागाराबाहेर सोडणे न्याय्य आहे. माझ्यावर गेल्या पाच वर्षांत एकही खटला झाला नाही. माझ्याहून तुरुंग तोडून पळून जाण्यासारखे अपराध ज्यांनी केले ते देखील तुम्ही कारागारात एक वर्षाहून अधिक काळ डांबून ठेवीत नाही. कारागाराचीच काय गोष्ट पण हिंदस्थानातही मला जर मुक्तपणे सोडण्यात आले तर तिथेही मी ठरलेल्या अटी प्रामाणिकपणे पाळीन. राजकारण करू देत नसाल तर इतर दिशेने देशाची आणि मानवजातीची सेवा करीन, हित करण्यास झटेन. बरे मी ते वचन मोडले तर आपणास मला पुन्हा जन्मठेपीवर धाडता येईल. आपला निर्बंध (कायदा) आणि शक्ती इतकी सूक्ष्म, प्रबळ आणि सर्वसाक्षी आहेच.

सभासद : तसे म्हणता येईलच असे नाही. कारण तुम्ही निर्बंधाच्या कक्षेत न आलेत म्हणजे निर्बंध मोडीत नव्हतेच असे नाही सिद्ध होत. राजद्रोहाचे खटल्यात सापडले गेला नाहीत तरी तुम्ही राजद्रोह केला नसेल असेच नाही म्हणता येणार.

मी : आणि केलाच असेही नाही म्हणता येणार. जोपर्यंत कोणास चोरी करताना धरले नाही किंवा नैर्बंधिक (Legal) संशय आलेला नाही तोवर कोणासच चोर म्हणून म्हणण्याचा आपणास अधिकार नाही. तीच स्थिती

राजद्रोहाची. मी माझी मते गव्हर्नर जनरलपर्यंत अनेक वेळा कळविली आहेत. वैध (Constitutional) उपायांनी या मिळणाऱ्या सुधारणांत थोडेबहुत सार्वजनिक राजकीय हित साध्य होईल. ते मी साधते का हा प्रयत्न त्याच वैध मार्गाने करू इच्छितो. जर सुधारणांचा तसा उपयोग होत गेला आणि त्याने पुढील सुधारणांचा मार्ग मोकळा झाला तर कोणताही राजक्रांतिकारक हा वैध आणि शांतीच्या मार्गानेच देशहित साधण्यास झटू इच्छील. जाणूनबुजून रक्तपातास आणि प्राणघातास मनुष्य प्रवृत्त होण्याइतका स्वतःचे जिवास कंटाळलेला नसतो. आम्हास निरुपाय वाटला, तेव्हा तो भयंकर मार्ग चोखाळला. हौस होती म्हणून नव्हे. बरे राजकारणात मी वैध मार्गानेच जाईन असा आपणास माझ्या वचनावरून विश्वास वाटत नसेल तर मी राजकारणात मुळीच - एका ठराविक अवधीपर्यंत पडणार नाही असेही मी लेखी वचन देण्यास सिद्ध आहे. मीच काय, माझे इतर स्नेहीही देतील. तेव्हा अशा अटींवर तरी या आम्हां राजबंदीवानांची मुक्तता व्हावी. राजकारणव्यतिरिक्त मार्गेही आम्ही पुष्कळ लोकसेवा आणि साहित्यसेवा करू शकू. तीही का बंद करता? हे इतके प्रामाणिक शूर आणि स्वार्थत्यागी आत्मे आणि शक्ती या दगडी भिंतीआड व्यर्थ का राहू देता? आयर्लंडच्या बंडखोरांस दहादा सोडलेत. त्यानी दहादा अटी मोडल्या तरी पुन्हा त्यांनी वचन देताच अकरावी संधी तुम्ही दिलीत - मग आमच्यावर एकदा तरी विश्वास टाकून का पाहू नये - एक संधी तरी आम्हास का देऊ नये!

या सुरात तास दीड तास संभाषण झाले. अंदमानातील कारासंस्थेचे सर्व भयंकर स्वरूप आणि जंगलकाम, रबरकाम इत्यादी कामांत बंदीचे होणारे असह्य पीडन यांची कहाणी सांगितली. ती या ग्रंथात दिलेलीच आहे म्हणून द्विरुक्ती नको.

त्याचप्रमाणे एकंदर दंडविज्ञान आणि शिक्षाविज्ञान (Criminal Law & Penollogy) याचे मूळ ध्येय आणि व्यवहार कसा असावा आणि आहे, तसेच कारासंस्थेचे अग्लिंडातील बोर्स्टल संस्थेपासून तो अमेरिका इत्यादी ठिकाणच्या नव्या नव्या प्रयोगाविषयीही आमच्याशी कारामंडळाने चर्चा केली. नंतर त्याचा सुसंगत सारांश एका आवेदनपत्रात (अर्जात) लेखी धाडावयास संगून ते मंडळ गेले.

आमच्याप्रमाणेच राजबंदीवानांतील आणखी दोनचार अर्ज त्यांनी मागविले होते. बाहेरही जिल्ह्याजिल्ह्यांतून आमच्या ठराविक पद्धतीच्या भाषेने निरनिराळया पुढारी बंदींनी आवेदनपत्रे धाडली. अर्थातच त्यास त्यांच्यापुरतीच चर्चा करता आली. राजबंदीवानांतील एक-दोन आवेदनपत्रे अगदी निर्भीड होती. सर्वांची मागणी एकमुखीच होती. अंदमानाची वसाहत आहे तशी न चालविता तत्काळ बंद करावी असा जिकडून तिकडून आवाज उठला. बहुतेक तर अंदमानाची बंदीवान वसाहत आमूलातच बंद करावी अशी मागणी करू लागले. हिंदुस्थानच्या पत्रांतून अर्थातच अंदमानाचा छळ बंद करण्यास ती वसाहतच बंद केली पाहिजे असा गवगवा झाला. बंगालीत प्रमुख लेख असेच आले. कारण वसाहतच बंद करणे आणि वसाहतीचे ते स्वरूप बदलणे यांतील फरक तिकडची बारीक माहिती किंवा ययार्थ स्वरूप हिंदुस्थानात कोणासच माहीत नव्हते आणि ते सूक्ष्म फरक तिकडील बंदीवानांस तत्काळ ग्रहण करता येणारे नव्हते. म्हणून अंदमानच्या वसाहतीस तोडा, या भाषणाचा बरोबर अर्थ त्या गडबडीत व्यक्त झाला नाही. तरीही आमच्या आवेदनपत्रात आम्ही त्या प्रश्नाचे दिग्दर्शन केले होते. त्या भेदामुळे पुढे बंदीवानांच्या साधारण प्रवृत्तीस आम्हास तीव्र विरोध कसा करावा लागला हे पुढे स्पष्ट होईलच.

आमच्या आवेदनपत्रात कारासंस्था आणि शिक्षाविज्ञानाच्या ध्येय आणि व्यवहाराविषयी जी चर्चा केली होती तिची रूपरेखा खाली दिली आहे.

## कारावासांची व्यवस्था कशी असावी?

''शिक्षाविज्ञानाचे ध्येय दंडितांची आत्मिक, मानसिक आणि शारीरिक सुधारणा हे असावे. प्रतिशोध (सूड उगविणे) हे नव्हे. त्या नैतिक सुधारणेस शक्य करणारे आणि नैतिक अवनतीस रोखणारे एक परिणामकारक साधन म्हणूनच काय तो यथाप्रमाण आणि अत्यावश्यक तितका प्रतिशोध आणि शासन यांचा अवलंब केला जावा. ''

अजूनपर्यंत मनुष्यस्वभावातील क्रूर प्रवृत्तीचा समूळ नायनाट झाला नसल्याने आणि दंडाच्या भयाने नीतिभयापेक्षा अनेक मनुष्ये एकंदरीत अधिक संयमयुक्त राहून सामाजिक बंधने पाळतात हा अनुभव वरचेवर येत असल्याने, अपराध्यास अपराधाच्या अपेक्षित सुखापेक्ष अपराध केल्याने अधिक दुःखच होते अशी प्रत्यक्ष भीती वाटावी इतका दंड देणे अवश्य आहे. पण तो व्यक्तिविशेषाच्या आणि अपराधाच्या परिस्थित्यनुरूप न्यूनाधिकत्वे कठोर असावा. सरसहा वेतांची किंवा फाशीची शिक्षा जरी आज निषिद्ध मानता आली नाही तरी ती ज्या व्यक्तीस कोणच्याही इतर उपायाने सुधारणे अशक्य वाटत आहे त्या व्यक्तीसच देण्यात यावी.

जे दंडित होतात त्यात अल्प वय, सुधारणीय स्वभाव, अपराधांचा पश्चाताप, अपराधाची वा दंडित होण्याची संख्या इत्यादी काही ठळक मापाने वर्गीकरणे करावे आणि त्यांची सुधारणीय किंवा दुस्सुधारणीय, दंडनीय किंवा दयनीय, (to be pitied) अशी भिन्न विभागांत वाटणी व्हावी. त्यांच्यात शक्य ते संमेलन घडू देऊ नये. सुधारणीय किंवा दंडनीय वर्गास अवरोध एकाच प्रतीचा असला तरी सौम्य शासनाखाली ठेवावे आणि विरुद्ध वर्गास सापेक्षतः कठोर आणि कडक शासनात ठेवावे. सुधारणेप्रमाणे या वर्गातील त्या वर्गात किंवा त्या वर्गातील या वर्गात घालण्यात यावे.

दंडितांकडून काम करवून कारागारसंस्थेची आर्थिक स्थिती सुधारावी किंवा अर्थप्राप्ती व्हावी हा मुख्य उद्देश केव्हाही असू नये. तर त्यांस होते त्याहून चांगले नागरिक करून स्वतंत्र जगात पुन्हा त्यांस सोडता यावे असे शिक्षण त्यांस सक्तीने देण्यात यावे, अंदमानासारख्या ठिकाणी शिक्षण न घेण्याची अप्रत्यक्ष सक्ती जी असे ती तर केवळ सैतानी वृत्तीचेच द्योतक होती. कामाच्या सक्तीपेक्षा शिक्षणाची सक्ती बंदीवानांवर केली जावी. शिक्षण विशेषतः सामाजिक, सद्गुण आणि मानसिक नीतिमत्ता वाढविणारे असावे.

विशेषतः वीस-बावीस वर्षांपर्यंतचे दंडित हे कधीही असुधारणीय म्हणून समजले जाऊ नयेत. मग त्यांचा नैर्बंधिक (Legal) अपराध कोणचा का असेना. भावी नागरिक त्यांस करता येईल अशा निर्धाराने व्यक्तिस्वभावाप्रमाणे कडक व सौम्य शिस्त त्यांस लावून शिक्षण देण्यात यावे. समाजाला उपयोगी आणि त्यांच्या चरितार्थाला पोषक असे धंदे त्यांस शिकविण्यात यावेत. राष्ट्रीय आणि मानवी गुण त्यांच्यात विकास पावण्यास साहाय्यक होणाऱ्या मनोरंजनाची - संगीत, चित्रपट (सिनेमा) इत्यादींची परवानगीही मधूनमधून त्यांस देण्यात यावी.

अर्थातच त्यांची स्थिती नेहमीच इतकी कष्टप्रद असलीच पाहिजे की त्यायोगे त्यांस कारागार हे बाहेरच्या जगताहून त्रासदायक आणि दुःसह वाटावे. पण ती दुःसहता आपणच आपणावर ओढवून घेतली आहे आणि नियमानुकूल वागून सामाजिक सद्‌गुण शिकू तर ते जितके लवकर शिकू तितके लवकर आपणांस पुन्हा त्या समाजात स्वतंत्रपणाचे सुख अनुभवास मिळेल अशी निश्चिती आणि जाणीव त्यांच्यात उत्पन्न केली जावी. आणि अनुभवाअंती ती यथार्थ आहे असे त्यांस प्रत्यंतर घेता यावे.

काही काही वंशांतच पापप्रवणता जन्मसिध्द असते हे तत्व अगदी उत्कटपणे आढळून येईल, त्याच विशिष्ट उदाहरणापुरते अवलंबिले जावे. साधारणतः ते सिद्ध होण्यास जितका पुरावा पाहिजे त्याच्या शतांशसुध्दा अजून मिळालेला नाही. उलट पुरावा वाटेल तितका सापडतो.

वरील रूपरेखा अत्यंक त्रोटकपणे दिली असल्याने त्यातील काही विधाने शंकास्पद वाटतील; परंतु आम्ही तोंडी चर्चेत ती विशद करून सांगितली होती. अंदमानसंबंधी आमचे धोरण आम्ही असे दर्शविले कीः-

जलवायूच्या दृष्टीने अंदमान हे सध्या जरी आरोग्यघातक आहे तरी ते प्रयत्नांनी आरोग्यप्रद होऊ शकेल. राहणी आणि व्यवस्था उत्तम असेल तर आजही अंदमानात दीर्घायुषी आणि आरोग्यवान जनता नांदू शकेल. उदाहरणार्थ इंग्रजादिक सुखवस्तू अधिकारी तिकडे चांगले धष्टपुष्ट राहू शकतात.

ज्या लोकांच्या स्वभावात अपवादस्वरूप क्रौर्यप्रवणत्व दिसून येते किंवा सामाजिक नियम ज्यांनी वारंवार भंग केल्याने सभ्य समाजात ज्यांना नांदता येत नाही अशा लोकांस हिंदुस्थानात कारागारातून व्यर्थ कुजवीत मारण्यापेक्षा त्यांस अंदमानसारख्या बेटात वसाहत करावयास भाग पाडणे आणि कडक शिस्तीखाली सामाजिक कामे करावयास लावणे हे राष्ट्रीयदृष्ट्या अवश्य आहे. त्यायोगे त्यांच्या आयुष्यास काही तरी सामाजिक फळ येईल. त्यांचे व्यक्तिजीवनही त्यांस अधिक सुखकर आणि सुधारणीय वाटू लागेल. कारण सभ्य जगातील सौम्य निर्बधांत जरी त्यांना समाज करून राहता आले नाही तरी त्यांच्या उद्दंड प्रवृत्तीस वशीभूत करील अशा कडक शिस्तीत त्यांस समाज करून राहता येते. अगदी क्रूर म्हणून गाजलेले स्वार्थांध लोकही कारागारीय कडक शिस्तीत मेणाहून मऊ झालेले आणि सामाजिक नियम पाळणारे झालेले आढळतात. अशा लोकांस वसाहतीत लग्ने करून, धंदे करून नांदू दिल्यास त्याची शक्तीही समाजाचे दृष्टीने सफळ होईल, त्यांचा बोजा समाजावर पडणार नाही, आणि त्यांची संतती उत्तम नागरिक होण्याचा संभवही हातचा जाणार नाही. हिंदी कारागारात त्यांस चौदा चौदा वर्षे गाडून टाकण्यात इतक्या लोकांस संततिविहीन केल्याने राष्ट्राचे संख्याबळ घटते. तेच वसाहतीत त्या स्त्रीपुरुषांना कडक शिस्तीत संसार करू दिल्यास वाढेल. कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया इत्यादी वसाहती अशाच उदंड अपराध्यांच्या संततीने आज अंशतः भरभराटीस आणविल्या आहेत. त्याविरहित सभ्य आणि सुपीक देशात जे लोक उद्दंड भासतात त्यांची तीच उद्दंड क्रूरता आणि कठीण स्वभाव जंगली आणि उग्र रानटी लोकांनी आक्रमिलेल्या उजाड भूभागास उपजाऊ आणि सुपीक करण्यास आवश्यक असते, उपयोगी पडते. एतदर्थ अंदमानसारख्या बेटास वसविण्याचे कामी या बंदीवानांचा उपयोग करून घेतला असता एक नवीन वसाहत हिंदुस्थान देशास मिळवून दिल्याचे महत्कार्य त्यांनी आणि आपण केल्यासारखे होईल.

त्या कारणासाठी आम्ही अंदमानची बंदीवान वसाहत बंद करावी या मताचे नसून केवळ त्या वसाहतीचे सध्याचे रानटी आणि क्रूर धोरण आणि निर्बंध तेवढे बदलावे असे आमचे मत आहे. अंदमानात ''काम चोपून घ्या'' हे ध्येय नसावे. हे ध्येच बदलावे, पण अंदमानात आलेल्या बंदीवानांस व्यक्तिपरत्वे आणि वर्गपरत्वे असे वागवा की, ते आणि निदान त्यांची संतती उत्तम नागरिक व्हावेत आणि हिंदुस्थान देशाच्या संस्कृतीस आणि समाजास ही वसाहत त्यांनी एक नवा उपहार म्हणून अर्पण करावा.

आम्ही म्हणतो तसे केल्यास अंदमानचे महत्व किंवा त्यास वसविण्याप्रीत्यर्थ आजपर्यंत झालेला कोट्यवधी रुपयांचा व्यव व्यर्थ जाईल म्हणून जी अधिकाऱ्यांस धास्ती वाटत आहे ती वाटण्याचे काही एक कारण उरणार नाही, इतकेच नव्हे तर अंदमानाचे महत्व कल्पनेबाहेर उलट वाढविण्यासच ही व्यवस्था कल्पनेबाहेर कारणीभूत होईल.

ज्या दिवशी आम्ही अंदमानात पाय टाकला त्या दिवसापासून आम्हास असे वाटत आहे की, हिंदुस्थानचा अंदमान हा एक जलदुर्ग आहे. आज नाही उद्या इथे वैमानिक आणि सामुद्रिक ठाणे स्थापन केले जाईल आणि पूर्वेच्या राजकीय महत्वाकांक्षेचा अन्याय्य आक्रमण जर कधी हिंदुस्थानावर झाला तर त्याच्या सामुद्रिक रणनौकांस आणि विमानांस पहिला शह अंदमानचा दुर्ग देईल, मग हिंदुस्थानचा तट.

अशी आणि इतर विधेये ग्रंथित केलेले आवेदन- पत्र आम्ही कारामंडळास धाडले. आमच्या तोंडी चर्चेत आणि आवेदनपत्रात आम्ही अंदमानची जलदुर्ग दृष्टीने वर्णिलेली योग्यता आणि भविष्य ऐकून कारामंडळात कित्येक नवीनच काही ऐकावे तसे चमकले. काहीजण काही विक्षिप्त ऐकावे तसे हसले; पण तिची स्मृती राहावी इतकी त्या सूचनेची छाप त्यांच्यावर पडल्यावाचून राहिली नाही. कारण त्यानंतर कित्येक महिनेपर्यंत आमचे पर्यवेक्षक त्या पाच क्रमांकात पाहणीवर येताना लहरीत असले तर समुद्राकडे बोट दाखवून विनोदाने मला म्हणत ''ते पहा सावरकर, या अंदमानाच्या तुमच्या भावी जलदुर्गातील रणतरी अतस्ततः पहारा देत आहेत पहा!'' मी हसून म्हणावे, त्या तुम्हाला आणि मला क्वचित पाहता येणार नाहीत; पण आपल्या मुलांना बहुधा पाहता येतील.

ही गोष्ट १९१९-२० च्या संधीस घडली. त्या वेळेस आपल्या मुलांस दिसेल म्हणून जिची मी आशा दर्शविली होती ती घटना बहुधा आमच्या पर्यवेक्षकांना आणि आम्हाला स्वतःच दिसेल असा संभव आज म्हणजे १९२६ लाच वाटू लागला आहे. कारण परवा नोव्हेंबरच्या एका पत्रात वाचले की,

''अंदमान बेटाचा यापुढे अपराध्याच्या वसाहतीदाखल उपयोग न करता त्यांना स्वपोषणसमर्थ अशी वसाहत बनविण्यासाठी आणि नौसाधन विभागाच्या -आरमार विभागाच्या आणि बिनतारी यंत्राच्या कामाच्या दृष्टीने या बेटाची जी अपयुक्तता आहे त्या उपयुक्ततेचा लाभ करून घेण्यासाठी वर्षास ४।। लाख रुपये व्यय करण्याचे हिंदुस्थान सरकारने ठरविले आहे. ''

याविषयी इथे इतकेच सांगणे पुरे आहे की, आम्ही १९१० व्या वर्षी अंदमानात पाय टाकताच आमच्या माहितीप्रमाणे पूर्वी कोणासही प्रामुख्याने न पटलेली जी योजना आमच्या ध्यानात आली आणि जिचा आम्ही तोंडी आणि लेखी पुरस्कार आजवर करीत आलो ती अंती फलोन्मुख होत आहे. ही बातमी जर खरी असेल तर त्यात

आम्हास आनंदच आहे. परंतु अंदमानास सामुद्रिक आणि वैमानिक ठाणे करण्याच्या योग्य निश्चयासाठी तेथील अपराध्यांची वसाहत बंद करण्याचे मात्र काही कारण होते असे आम्हास वाटत नाही. उलट ती वसाहत तशीच परंतु अर्थातच राष्ट्रीय आणि सुधारणेच्या धोरणाने चालविणे हे अंदमानच्या भरभराटीस आणि सैनिक शक्तीस सर्वथा अनुकूलच होणारे आहे असे आमचे मत आहे.

# राजक्षमा आणि राजबंदीवानातील

# शेकडो बंदींची मुक्तता

कारामंडळ गेले. आमच्याशी झालेल्या चर्चेचा आणि आमच्या आवेदनाचा त्या सभासदांवर पुष्कळ परिणाम झाला यात शंका नाही. यातही शंका नाही की, त्या सर्व चर्चेत ''जर सुधारणा यशस्वी होत गेल्या तर क्रांतिकारक शांतिमय मार्गाचा अवलंब करतील'' असा जो आमचा रोख दिसला त्यातील आमच्या जर-तर-चा राग आणि संशय येऊन आमची सुटका करण्याचा अनुरोध कारामंडळाने हिंदुस्थान सरकारास केला नाही.

तथापि, हजारो बंदीवानांच्या कल्याणासाठी आपल्या हातून शक्य ते आपण केले आणि तेही सरकारास आम्हास न सोडण्यास कोणतेही न्याय्य वा समंजस कारण न देता या जाणिवेने आम्हास आत्मप्रसन्नतेचे सुख अनुभविता आले.

तिकडे कारामंडळ येण्याच्या आणि जाण्याच्या या गडबडीचेच आगेमागे हिंदुस्थानात राजबंदींच्या प्रश्नास एकदम राष्ट्रीय स्वरूप देणारी एक घटना घडली होती आणि ती म्हणजे राजबंदींची मुक्तता करण्यासाठी

## मुंबईच्या '' राष्ट्रीय संघाने '' - नॅशनल युनियनने

## धाडलेले सत्तर हजारांवर सह्यांचे आवेदन!

हे होय. असे एक थोरले आवेदन सरकारास धाडून या विषयासंबंधी लोकमत किती तीव्र संवेदना अनुभवीत आहे हे सरकारचे निदर्शनास आणावे म्हणून आम्ही किती वर्षे इच्छित होतो हे मागील प्रकरणावरून आणि उद्धृत पत्रावरून वाचकांच्या लक्षात आलेच असेल. मुंबईतील आणि महाराष्ट्रातील आमच्या देशबंधूंच्या सतत खटपटीने ती आमची इच्छा एकदाची फलद्रूप झाली. सरकार नेहमी म्हणत असे, क्रांतिकारकांविषयी सर्वसामान्य लोक अत्यंत उदासीन असून त्यांस समाजाची सहानुभती नाही. इतकेच नव्हे तर त्यांस सामान्य जनता दुष्ट आणि स्वार्थी अशा पापी अपराध्यांहून वेगळे समजत नाही. या आक्षेपास उत्तर देण्यासाठी, आणि राष्ट्रीय हितार्थ झटणाऱ्या आणि झुंजलेल्या देशभक्तांच्या, त्यांचे मार्ग चुकचे वाटत असले किंवा नसले तरी- त्यांच्या राष्ट्रीय वीरोचित बाण्याची आणि देशसेवेची कृतज्ञ स्मृती आपण बाळगतो हे उघड प्रकट करण्याचे धैर्य दाखविल्याने, राष्ट्रीय मनावर जो एक उच्च नैतिक परिणाम होतो तो करविण्यासाठी, अशा राष्ट्रीय आवेदनाची फार आवश्यकता होती असे आम्हास वाटत असे. आमच्या बंधूंच्या भेटीचे वेळीही आम्ही त्यांस हे कळविले होते. त्यांच्या आणि मुंबईच्या ''राष्ट्रीय संघा''च्या अव्याहत चळवळीने त्या आवेदनपत्रावर सह्या करण्यासाठी लोकांनी जो उत्साह दाखविला, स्टेशनवर, मार्गावर, नाटकगृहात, खेड्यापाड्यातून अनेक स्वयंसेवकांनी स्वयंस्फूर्तीने जी मेहनत केली, मुंबईसारख्या मोठ्या नगरापासून तो भगूरसारख्या गावापर्यंत कुलीन स्त्रियंनी देखील प्रसिद्धके वाटून आणि

सह्या घेत हिंडून आमच्याविषयी जी भावना प्रकट केली आणि महाराष्ट्राप्रमाणेच वेळ होता तितक्यात शक्य तितकी सहानुभूती इतर प्रांतांतूनही ज्या प्रमाणाने प्रदर्शविली गेली त्यामुळे हे एका पंधरा दिवसांचे आत साठ-सत्तर हजार सह्या केलेले आवेदनपत्र म्हणजे हिंदुस्थानच्या राजबंदींच्या इतिहासातील एक स्मरणीय घटना झाली होती. इतकेच नव्हे तर ते हिंदुस्थानातील राष्ट्रीय भाव आणि ते व्यक्त करणारे धाडस ही कशी वृद्धिंगत होत चालली आहेत याचेही सबळ निदर्शक होते. कारण एका वेळी क्रांतिकारकांचे नाव काढण्यास लोक चळचळ कापत आणि मोठमोठी राष्ट्रीय माणसे आणि वर्तमानपत्रे त्यांच्या नावाचा 'राजश्री' बिजश्री इत्यादी उपपदासह उल्लेख न करता नुसत्या एखाद्या अधम पतिताचे नावाप्रमाणे एकेरी उल्लेख करीत.

या आवेदनपत्रात हिंदुस्थानातील सर्व राजबंदीवानांची आणि आमच्यावर सरकारचा विशेष रोष दिसून आल्यामुळे विशेषतः आणि त्यासहच आम्हा उभयतां बंधूंची मुक्तता त्वरित करावी म्हणून मागणी केली होती. वेळ फार थोडा होता म्हणून सह्या मुख्यतः महाराष्ट्रातूनच घेतल्या गेल्या. पर्याप्त समय असता तर सर्व प्रांतांनीही तशाच हजारो सह्या धाडल्या असत्या. थोडा वेळ होता तरीही प्रत्येक प्रांतातील ठळक प्रमाणात सह्या आलेल्याच होत्या.

या आवेदनपत्रातील वर निर्दिष्ट केलेला आमचा हेतू पूर्ण झाल्याने आम्हां राजबंदींस अंदमानात काय वाटले हे १९२० च्या आम्ही अंदमानमधून धाडलेल्या तत्कालीन पत्रातील खालील उताऱ्यावरून व्यक्त होईल.

''आभार आहेत! ज्या आमच्या पुढाऱ्यांनी आणि देशबंधूंनी आणि विशेषतः ज्या राष्ट्रीय संघाने (Bombay National Union) हिंदी राजकीय बंदीवानांच्या मुक्ततेसाठी हे आवेदनपत्र धाडण्याचे काम अंगावर घेऊन, सह्या करून आणि हे पार्लमेंटपर्यंत धाडून देण्यात परिश्रम केलेल्या सर्वांचे आभार आहेत! हे इतक्या थोड्या अवधीत ७५००० वर सह्या झालेले आवेदनपत्र सरकारवर महत्वाचा- मग तो अप्रदर्शित का असेना पण परिणाम केल्यावाचून राहणार नाही. न्यूनतः इतके तरी झालेच की त्यायोगे राजबंदींची नैतिक प्रतिष्ठा समाजात वाढली, आणि राजबंदींसहच आणि त्यायोगे ज्या कार्याकरिता ते झुंजले आणि पडले त्या कार्याचीही! आता मात्र आमची मुक्तता- जर ती झालीच तर - स्वीकारण्यासारखी झाली खरी. कारण आता लोकांनी आम्हास परत बोलावण्याची आपली उत्कंठा व्यक्त केली. या आमच्या देशबंधूंच्या सहानुभूतीविषयी आम्हास किती आनंद आणि कृतज्ञता वाटते ते पूर्णपणे व्यक्त करता येत नाही. आमची आम्हास योग्य वाटते त्याहून त्यांनी आमची अधिक संभावना केली यात शंका नाही. ''

थोडेच दिवसांत सरकारने राजबंदींस राजक्षमेनुसार सोडण्याचा संकल्प प्रसिद्ध केला. राजबंदींच्या या सुटकेचे श्रेय ज्याप्रमाणे पूर्वीपासून चालत आलेल्या चळवळीस होते त्याचप्रमाणे वरील भव्य सार्वजनिक आवेदनासही होते यात शंका नाही.

एक दिवस कारागारातील काम आटोपून बंद होण्याचे आधी आम्ही इतर बंदीवानांच्यासह जो उभे आहोत तो राजबंदींतील एक शीख मित्र धावत धावत आमच्याकडे आला आणि मोठ्याने टाळी वाजवून म्हणाला, ''बाबूजी, मुक्तता! राजबंदींस सोडण्याची आज्ञा आली आहे. तुम्ही सुटलेत! बाबूजी सुटलेत!''

मुक्तता! त्या शब्दाचा संभव ऐकताच जो कोण आनंद होतो तो जन्मठेपीवरच्या किंवा फाशीचे कोठडीतील बंदीच्या अंतःकरणासच विचारावा! त्या चाळीतील सर्व राजबंदी चमकून एकत्र झाले! आणि सुटका सुटका म्हणूनएकमेकांस सांगू लागले!

परंतु मुक्तता हा शब्द आम्ही इतके वेळा ऐकला होता आणि इतके वेळा फसलो होतो की आमच्या निष्ठुर मनास त्यांच्या आनंदास फार वेळ पाहवले नाही. १९११ व्या वर्षीच एक राजबंदी असाच धावत येऊन राज्यारोहणोत्सवार्थ आम्हास सोडले म्हणून सांगत होता नाही का? आणि मंडळींनी अंथरुणे देखील बांधून जाण्याची सिद्धता केली होती! त्यास आज आठ-नऊ वर्षे लोटली. आम्ही अजून त्याच कारागारात होतो. इतर राजबंदी कित्येक आले आणि कित्येक गेले!

एतदर्थ आम्ही आमच्या मित्रास खोचूनखोचून विचारले, बातमीचा आधार दाखीव व भाषा काय, उगम कुठून, तार आली की काय, त्या दिवसात आम्हास बाहेरून बातम्या मिळण्याची व्यवस्था इतकी फक्कड लागत आलेली होती की प्रत्यहीच्या तारा जशा अधिकाऱ्यांच्या हातात अंदमानाच्या छापखान्यात छापून पडत तशीच त्यांची एक प्रत सात समुद्र-पहारे-भिंती-कुलपे-चुगल्या-हातकड्या निर्बंध ओलांडून आम्हा राजबंदींचे हाती पडे. तशीच त्या दिवशीच्या तारेची प्रत आम्हास धाडण्यात आलेली आमच्या मित्राचे हाती आम्हास देण्यासाठी कोणा वॉर्डराने गुपचूप दिलेली होती. ती त्याने आम्ही खोचून खोचून विचारताच हसत हसत आमचे हाती टाकली, आणि ''अभी तो हुवा? आता तर विश्वास पटला?'' म्हणून विजयानंदाने आम्हास हलवू लागला.

आम्ही तार वाचली. राजबंदी सुटणार नाही. पण आम्ही ते वाक्य आमच्या मित्रास दाखवून म्हटले - हे पहा- "So far as it is compatible with public safety!" अर्थात सार्वजनिक शांततेला अनुकूल वाटेल तितकाच त्या राजक्षमेचा (amnesty) उपयोग करणे- म्हणजे बहुधा आम्हां उभयतां बंधूस आणि इतर पुष्कळ तिखट स्वभावी देशभक्तांस न सोडणे! ही शंका आम्ही प्रदर्शित केली तरी ते आनंदात विरस सहन न होण्याच्या मानवी प्रवृतीमुळे तीस खरी मानीनात! सर्वजण मुक्ततेची सकाळ संध्याकाळ वाट पाहत उभे! आम्ही नेहमीप्रमाणे बजावून वारंवार सांगत राहिलो, पुष्कळ राजबंदी सुटतील हे नक्की; आणि ती आनंदाचीच आणि आपल्या आंशिक विजयाचीच गोष्ट आहे. पण सर्व सुटणार नाहीत असा संभव अधिक म्हणून अवलंबन करू नका. नाही तर निराशेची तीव्रता अधिक दुःसह होईल. या इथे अंदमानात, आपण सहज, झुंजत, झुरत पण शक्य ते राष्ट्रकार्य करीत मरणे आहे हे ध्यानांत धरा - एवढीच निश्चिती. बाकी सर्व - संभव - शक्यता - मात्र.

तसेच झाले. त्या वेळी आमच्याबरोबर असलेल्या त्या राजक्षमेने आम्ही तर सुटलो नाहीच; पण त्या बऱ्याच वर्षांनी आमच्या मागाहून आलेल्या राजबंदींतही अनेक देशभक्त सुटले नाहीत.

कित्येक तर अजूनही हिंदुस्थानातील निरनिराळ्या कारागारांतून बंद आहेत. ईश्वर त्यांची मुक्तता कधी करील ती खरी!

जे सुदैवाने तात्काळ सुटले त्यांत प्रथमतः पंजाब आणि गुजराथ येथील सैनिक शासनान्वये दंडित झालेल्या लोकांतील पुष्कळ लोक होते. त्यांतील कित्येकांस पंधरा वीस-पंचवीस वर्षांपर्यंत शिक्षा होत्या. परंतु कारागारात

पाऊल टाकल्यापासून दीड-दोन वर्षांतच त्यांची सुटका झाली. अगदी दंगे वगैरे खटल्यात दंडित न होता निर्भेळ राज्यक्रांतीचे कटासाठी दंडित झालेल्यांत राजक्षमेच्या प्रसिद्धिचा पहिला लाभ माणिक तोळ्यातील राजबंदींस आणि पंजाबच्या आणि काशीच्या खटल्यातील कित्येक क्रांतिकारक जन्मठेपींस मिळून तेही सुटले. त्यांची सुटका झाली तो दिवस किती आनंदाचा होता! परंतु त्या आनंदातही निगूढ असलेली दुःखाची पृष्ठभूमी मी पाहत होतो आणि माझ्या विश्वासू स्नेहयांना आणि सहकष्टभोग्यांना दाखवीत होतो की जोवर ते महान ध्येय की ज्याचे प्राप्त्यर्थ हे एक उपयुद्ध लढले गेले, ते जोवर साध्य झाले नाही तोवर ही आजची सुटका आनंदाची असताही क्षणिक आहे. आज सुटले म्हणून आनंद पण पुन्हा ''शतवीर शतसमरी'' झुंजत पडायचे आहेतच!

दुसरी एक तत्रस्थ महत्वाची गोष्टही मी विशेष उल्लेखाने दाखवी ती ही की, या सुटकेत जरी काही सरकारच्याच तंत्राने कारागारात चालत आलेले लोक होते तरी काही सर्व संपातून पुढाकार घेतलेले आणि 'आगखाऊ' म्हणून गाजलेले कडवे राजबंदींही होते. त्यातील एकाने उभी चाळ दणदणून देत 'गदर' पत्रातील गाणी उघड उघड बंदीवानांच्या थव्यास जी म्हणून दाखवावीत त्यांतील ''आखां खोलो हिंदी लोगों राष्ट्र गरकता जाता है!'' या ध्रुवपदाचा ध्वनी आम्हास अजून ऐकू येत आहे! त्यांची सुटकाही झाली यावरून माझे जे सांगणे असे की, राजबंदींच्या सुटकेचा प्रश्न हा मुख्यत्वेकरून अंदमानातील त्यांच्या कारागारीय वर्तनापेक्षा हिंदुस्थानातील राजकीय क्षेत्रात त्यांचे असलेले स्थान आणि संभाव्य वाटणारे धोरण आणि वर्तन यावरच अवलंबून असणार. हे मी एवढ्यासाठीच पुनः पुन्हा सांगतो की, नाही तर कारागारात मानापमान गिळीत मेल्यासारखे चूप पडून रहा आणि सार्वजनिक संघटित चळवळ सोडून सरकारच्या होस निदान वरपांगी तरी हो ठोकून द्या असे सांगणाऱ्यांची आणि वागणाऱ्यंची सुटका झाली हीच गोष्ट प्रामुख्याने ध्यानात असती तर झुंजार पक्षातील कित्येक राजबंदींवर आणि पुष्कळ साध्या पण देशहितैषी बंदींवर नैतिकदृष्ट्या घातक परिणाम होऊन आमच्या सार्वजनिक चळवळीतून अंग काढून घेणारी भित्री प्रवृत्ती उत्पन्न होती.

ही कारागारीय तात्कालिक गोष्ट सोडून दिली तर त्या सुटलेल्या लोकांत हिंदी राज्यक्रांतीच्या पहिल्या क्रूर आघातास ज्यांनी आमच्या बंधूंप्रमाणेच आपल्या मस्तकावर झेलून घेतले आणि जे दुःख आणि कष्टांत आमचे जवळ जवळ दहा वर्षे सहकष्टभोगी झाले होते, त्यांस आमच्या बंगाली बांधवांस, त्या कारागाराच्या कठोर दंष्ट्रेतून जिवंत सुटताना पाहून आम्हास अत्यंत आनंद झाला. आणि आम्ही त्यांचे समक्ष भेटून यथोचित अभिनंदन केले. त्यांतील जे जन्मठेपीवर येऊन पाच-चार वर्षांतच सुटून चालले होते, त्यांमध्येही आमचे निकट परिचयाचे, विश्वासाचे आणि जाज्वल्य देशाभिमानाचे अनेक लोक होते. ही आपली शीख इत्यादी राजबंदीवानांची टोळी सुटली न सुटली तो त्यांनी एक स्वराने राष्ट्रीय क्रांतीची गाणी म्हणत समुद्रास जावयाचा मार्ग दणाणून सोडला.

अर्थातच चीफ कमिशनरने यांच्याविषयी प्रतिवृत्तात्मक हे मत प्रदर्शित केले म्हणून सांगतात की ''हे सैतानी लोक – these devils - अंदमानात जन्मठेपीवर पुन्हा परत आल्यावाचून राहणार नाहीत!'' ते संभवनीयच होते.

या राजबंदींकडून करारपत्रावर सही करून घेतली जाई की, ''मी यावर पुन्हा कधीही - किंवा अमुक वर्षे राजकारणात आणि राज्यक्रांतीत भाग घेणार नाही. पुन्हा मजवर राजद्रोहाचा आरोप सिद्ध झाला तर मी ही माझी मागची उरलेली जन्मठेपही भरीन!''

राजक्षमा आल्याची तार- जी मागे उल्लेखिलेली आहे ती- आल्यानंतर राजबंदींत कडाक्याचा वादविवाद चालला होता की, अशी अट आल्यास ती मानावी की नाही. मी तशी अट- फार काय मागच्या गोष्टी संगणाऱ्या राष्ट्रद्रोही विश्वासघातास सोडून - इतर वाटेल ती भविष्यकालीन आणि राष्ट्रीय हितानुकूल अट मानावी म्हणून सगळ्यांस सांगत राहिलो. अशा प्रसंगात तशी अट लिहून देणे हेच राष्ट्रीय हितास एकंदरी अनुकूल होते हे मी शिवाजी-जयसिंग, शिवाजी-अफजुल, चमकोरनंतरच्या पलायनातील श्रीगुरुगोविंद आणि स्वतः श्रीकृष्ण यांच्या आणि अन्यान्य उदाहरणांनी सर्वांच्या मनावर ठसवीत होतो. जे मानधन हट्टी होते त्यांस अर्थातच सकृद्दर्शनी हे पटेना. इतके हाल सोसूनही ज्यांचा बाणा तिळमात्र नरम झाला नव्हता असे ते वीर माझा विरोध करताना पाहून मला आपल्या देशाच्या भविष्यकालाविषयी अधिकच आशा वाटू लागे. परंतु अंती त्यांस तसेच करणे योग्य आहे हे राजनीतीचे धोरण मी पटवू शकलो आणि राजबंदींच्या सुटकेचे वेळी सर्वांनी त्या करारपत्रावर डोळे मिटून सह्या करून कारागाराचे कुलूप एकदाचे तोडले.

त्यांच्यामागून टोळ्याटोळ्यांनी अनेक राजबंदी सुटले. श्रीयुत भाई परमानंदाच्या सुटकेने तर सर्वांसच अत्यंत आनंद झाला. कारण यद्यपि त्यांना कारागारात येऊन पाच वर्षे झाली नव्हती तरी तेथील जीवनाचा आणि त्या मनुष्यपणास पारख्या झालेल्या दुष्ट वातावरणात श्वासोच्छवास करीत राहण्याचा इतका वीट आला होता की त्यांनी आत्मार्पण करण्याचा निश्चय करून एका महिन्यावर अन्नत्याग करून प्रायोपवेशन आरंभिले होते. आम्ही त्यांस अनेक प्रकारे त्या वृत्तीपासून पराङ्मुख करण्यास झटतच होतो. अंती राजक्षमेची बातमी येऊन त्यात त्यांची सुटका होण्याचा संभव दिसू लागला. तेव्हा त्यांनाही पुन्हा आशा वाटू लागली. आणि त्यांनी अन्नग्रहण करण्यास आरंभ केला. अन्नत्यागात त्यांस नाकाने नळीतून बळेबळे दूध पाजण्यात येत असे. त्यांनी अन्नग्रहण केल्यानंतरच थोडेच दिवसांत त्यांच्या सुटकेची आनंदकारक बातमी आली. मोठ्या प्रेमाने आमची भेट घेऊन आणि ''आपली सुटण्याची वास्तविक पाळी! मला जाणे किती संकोचास्पद वाटते!'' असे म्हणत अश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांनी आमचा निरोप घेतला. ''आपणास जाताना पाहून आम्हास आम्ही सुटलो नाही याची आठवणही न होऊ देणारा उत्कृष्ट आनंद होत आहे'' असे म्हणत आम्हीही त्यांची प्रीतिपुरस्सर बिदागी केली.

राजक्षमेत राजबंदीवान सुटणार हा संभव दिसताच त्या दिवसापासून तो त्या सुटकेतील शेवटची टोळी सुटेपर्यंत आठवड्याच्या आणि प्रत्यहीच्या बैठकीतून आणि संकटातून आपल्या देशाच्या स्वातंत्र्यार्थ आता सार्वत्रिक कोणचा कार्यक्रम आखला पाहिजे याची आम्ही आणि आमचे साथीदार सर्वत्र चर्चा करीत होतो. त्या कारागारात येताना ते देशभक्त आणि स्वार्थत्यागी पुरुष होते - परंतु त्या दहा-पाच वर्षांत ते प्रत्येकजण इतके शिकते, इतके सहन करते, इतके विचार करते झाले होते की त्यांतील बहुतेकांस अगदी ययार्थपणे ''नालंदा बिहारातील'' आचार्य किंवा स्नातक ही पदवी शोभावी. ते आता सैनिकच नसून सेनानी व्हावयासही योग्य झाले होते. कारण त्यांची ऊर्मी तात्कालिक उत्तेजनापुरतीच टिकलेली नसून कठोर तपस्येची आणि दंडाची वर्षेची वर्षे तपून आणि खपूनही संयम बळाने तळपत होती. हे पाहून आम्हास फार आनंद वाटे. येथे आपण केलेल्या मेहनतीचे फळ त्यांच्या द्वारे स्वदेशास काही तरी मिळेलच; आपले विचार आणि शक्ती यांच्यातून स्वराष्ट्रात काही तरी प्रसार पावतीलच, उपयोजिल्या जातीलच असे पाहून कितीतरी आत्मप्रसन्नता वाटे. त्यांत कित्येक असे होते की,

त्यांना आत्महत्येच्या गर्तेच्या काठावरून आम्ही आपल्या हाताने धरून मागे खेचलेले होते! त्यांच्या सुटकेने त्यांच्या जीवनाचा राष्ट्रास आता उपयोग झालाच तर शेवटी! असे समाधान आम्हास वारंवार उपभोगिता आले.

राजबंदीवानांच्या टोळ्या मागून टोळ्या सुटतसुटत अखेर अगदी गाळीव असे तीस-एक लोक मागे उरले, त्यांत आम्ही दोघे बंधू उरलो हे सहाजिकच होते. पण इतर जणात काही राजबंदी असे होते की, हिंदुस्थानातील क्रांतिकारक कृत्यांच्या किंवा अंदमानमधील कारावर्तनाच्या कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी त्यांच्याहून अधिक 'धृष्टशील' आणि 'वाईट वर्तनाचे' राजबंदी सुटले असताही ते का सुटू नयेत हे काही ध्यानात येणे शक्य नसे. यावरून सरसकट राजबंदींतील शेकडो लोकांस सोडण्याच्या धांदलीत प्रत्येक व्यक्तीची नीट छाननी न केली गेल्यामुळे आणि बहुधा छाननी करण्यासारखे कोणचेही एक निश्चित माप न धरल्यामुळे पुष्कळ वेळा सुक्याबरोबर ओले जळले गेले.

दहा वर्षे खटपट करता करता अंती राजबंदींच्या सुटकेची जी ही महापर्वणी आली त्यातून आम्ही मात्र कोरडेचे कोरडे बाहेर पडलो. आमच्याबरोबर आलेले जन्मठेपी सुटले. आमच्या मागोमाग आलेले सुटले. आमच्यानंतर सात-आठ वर्षांनी आलेले जन्मठेपी पण एक-दोन वर्षांत ती जन्मठेप भरून सुटले. पण आम्ही जसेचे तसे पडलेलो; एक दिवसाची देखील सूट मिळाली नाही.

अर्थातच या गोष्टीचा हिंदुस्थानातील लोकांवर थोडाबहुत परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. जो जो सरकार आम्हास मागे मागे ढकली तो तो स्मृती, लोकहृदयाच्या दृष्टीच्या प्रमुखपणे पुढे पुढे उभी राही. वरिष्ठ विधिमंडळातून दिल्लीस अनेक प्रश्न लोकप्रतिनिधींनी विचारले. वृत्तपत्रांतून सारखी मागणी चालली. राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत ''सावरकर बंधू आणि पंजाबचे बोगा रतन चौधरी यांना सरकारने सोडावे. '' म्हणून ठराव करण्यात आला.

शेवटी आमचेही भाग्य उघडले आणि आमचीही सुटका झाली. पण ती कुठून? कशातून? इतरांची अंदमानातून सुटका होऊन जेव्हा ते हिंदुस्थानात धाडण्यात आले तेव्हा आम्हास चाळीतून सुटका होऊन कारागाराच्या अंगणात उतरू देण्यात आले. तेथून दहा-पाच आवेदने होता होता मोठ्या भीतीने लेख्यालयाच्या (दप्तर) दाराशी येऊ देण्यात आले. तेथून कागद नेऊन कारागारातील खोलीत ते काय बंदींची नावे - बीवे भरावयास सांगतील ती भरावी आणि पुन्हा त्या लेख्यालयाच्या दाराशी ते आणून द्यावे. दाराच्या आता पाय नाही टाकायचा!

एकदा तर ते दारही बंद झाले! कारण? आम्ही काही केले? नाही. राजबंदींतील एकजण हिंदुस्थानात पत्र लिहिण्याचा प्रयत्न करीत असता ते एका वॉर्डराचे हाती पकडले गेले. त्यात तेथील राजबंदींची इत्यादी माहिती वृत्तपत्रास लिहिलेली होती. झाले; वॉर्डर, लेखक इत्यादींना तर रीतसर शिक्षा झालीच. पण आम्हाला लेख्यालयाचे दार काही दिवस बंद झाले!

हेच आम्हास फार नडे. जेव्हा तेव्हा कारागारात आमचा काही एक संबंध नसताही काहीही विशिष्ट प्रतिकूल घटना घडली की, त्याचा परिणाम आम्हास भोगावयास लागावा!

या अन्यायाचे रडगाणे गाता गाता पुन्हा एकदा लेख्यालयाचे दाराशी आम्ही पोचलो आणि शेवटी लेख्यालयात पाऊल टाकता आले. पण पाऊलच.

या वेळेस आम्हास दहा वर्षे होत आली होती. नऊ झालीच होती, म्हणून आवेदनपत्रे धाडण्याचा धडाका सुरू केला की ज्याअर्थी माझ्या बरोबरीच्या राजबंदींना कारागाराबाहेर फिरून येण्यास आणि एकास तर राहण्यासही सोडण्यात आले होते, (शेवटी ते मागे सांगितल्याप्रमाणेच साफ सुटून गेले त्याचे आधीच) आणि ज्या अर्थी माझ्यामागून अनेक वर्षांनी आलेल्या राजबंदींसही कारखान्याच्या वरिष्ठाची कामे, छापखाना इत्यादी जागा देण्यात येऊन त्यांसही बाहेर जाता येई, त्याअर्थी मला आता तिकिटावर बाहेर जाऊन स्वतंत्रपणे वसण्याची परवानगी देण्यात यावी. शेकडो जन्मठेपींचे राजबंदी आणि साधेबंदी चार-पाच किंवा एक-दोन वर्षांतही जन्मठेप संपवून सुटून हिंदुस्थानात गेले! मला दहा वर्षांनी निदान अंदमानात तरी तिकिटावर सोडावे! पण नाही! उत्तर आले. दहा वर्षाला पुष्कळ दिवस कमी आहेत! नियमाविरुद्ध ते आहे.

मला प्रतिकूल ते निर्बंध अगदी घटिका पळे मोजून पाळण्यात येत. पण अनुकूल तेव्हा मात्र निर्बंधास निर्बंध उरत नसे. भेट पाच वर्षांनी व्हावी हा निर्बंध; पण मला सात-आठ वर्षांतही मिळाली नाही. पण तिकिटाचे वेळी दहा वर्षांचा निर्बंध तंतोतंत पाळला पाहिजे!

पण तो तंतोतंत तरी पाळण्यात आला का? छट्. दहा वर्षे होऊन तिकिटाची वेळ येऊन गेल्यावरही आम्ही आपले कारागारातच!

पण आता कारागारात जरी असलो तरी (Foreman) फोरमॅन च्या अधिकारावर होतो! आणि संबंध एक रुपया महिना पगार मिळू लागला होता! हे देखील आमच्यावर मोठी कृपा म्हणून. त्या सवलती देण्याइतकी आमची वर्णी ज्यंनी लावली त्या अधिकाऱ्यांचे व्यक्तिशः आम्ही आभारीच आहो. काही हरकत नाही, झालो तेव्हा Forrman झालो! इतरांनी जेव्हा आम्हास विनोदाने म्हणावे तुमच्यामागून आलेले अगदी अल्पशिक्षित बंदीवान देखील मोठमोठे 'बाबू' होऊन अधिकार गाजवीत असता तुम्हास नुसते 'तेलगोदामचे' व्यवस्थापक नेमले ना? काय हे!''

तेव्हा आम्ही विनोदाने प्रत्युत्तर द्यावे; अरे पण अधिकार कोणचा आहे? बाबू तर काय, पण प्रत्यक्ष बंदीवान, पर्यवेक्षक, कमिशनर हे देखील नुसते (Man) म्हणजे मनुष्य आहेत. पण आम्ही (Foreman) फोरमन म्हणजे मनुष्यांचा अग्रणी! सरकारने आमचे मूल्य अखेर ओळखले. व्हॉईसरॉयला जो मान नाही तो मान आम्हास दिला. (Foreman)! नराग्रणी! आणखी काय पाहिजे!

'नराग्रणी' पद प्राप्त होताच आम्हास 'तेल कोठारा'च्या कारखान्यावर नेमण्यात आले. त्या कारागारीय राज्यामध्ये सर्वांच्याच मते तो 'तेल कोठाराचा' प्रांत फार महत्वाचा आणि मानाचा समजला जाई. कारण तेथे हजारो पौंड तेल असलेली शेकडो पीपे दर महिन्यास सिद्ध होत. अंदमानातील मुख्य उत्पन्न नारळांचे. ते सर्व नारळ फोडून- बिडून त्या कुख्यात 'कोलूत' जे तेल निघे ते सर्व या तेल कोठारात दोन-तीन मोठमोठ्या टाक्या भरून ठेवण्यात येई. अजस्त्र पीपे त्या तेलाची मागणी येताच भरली जात आणि रंगून, कलकत्ता इत्यादी ठिकाणी हजारो रुपयांचे ते सामान धाडले जाई. हे त्या चिमुकल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मुख्य केंद्र- हा त्या कारागारीय

राज्यातील महत्वाचा प्रमुख प्रांत- आता त्याचे आम्ही अधिप झालेले होतो. इतरांस मत्सर वाटावा असे ठिकाण, असे वैभव,आमच्या ठायी आले होते.

अर्थात तेथील ऐश्वर्याचे आणि सुखाचे वर्णनास एका स्वतंत्र व नवीन प्रकरणाचाच मान दिला पाहिजे.

प्रकरण नववे

# अंदमानात हिंदीचा प्रचार

हिंदीस राष्ट्रीय भाषा म्हणून सन्मानिण्याचा आणि तिचा शक्य त्या उपायांनी प्रचार करण्याचा आमचा प्रयत्न इ. स. १९०६ व्या वर्षापासून सारखा चालू होता. इंग्लंडमध्ये असताना अभिनव भारताचे सभासद प्रत्येक रात्री निजावयास जावयापूर्वी एकत्र आणि एकस्वराने जो आपला राष्ट्रीय संकल्प पुनरावृत्त करीत असत त्यात ''हिंदुस्थानास स्वतंत्र करावयाचे, हिंदुस्थानास एकराष्ट्र करावयाचे, हिंदुस्थानास लोकसत्ताक करावयाचे, या सूत्रांसहच चौथे सूत्र घोषित केले जाई की, हिंदीस राष्ट्रभाषा करावयाची, नागरीस राष्ट्रलिपी करावयाची!''

या धोरणानुरूप अंदमानात संघटना आणि प्रचार करण्याची थोडीबहुत संधी मिळू शकेल असे पाहताच १९११ व्या वर्षी आम्ही त्या संघटनेचा जो कार्यक्रम मनाशी ठरविला त्यात हिंदीचा प्रचार हा एक मुख्य विषय होता.

त्या वेळेस हिंदी राष्ट्रभाषा करावी ही कल्पना इतकी अप्रस्तुत होती की, मोठमोठे पुढारी त्या कल्पनेचा उच्चार करणेही पोरखेळासारखे समजत. सामान्य लोकांस तर ती अपरिचितच होती. लोकमान्यांनी किवा महात्मा गांधींनी तिचा उघड पुरस्कार करावा इतके महत्व त्या चळवळीस फार पुढे आले. त्या वेळेस केवळ नागरी प्रचारणी सभा आणि आर्यसमाजीयातील काही लोक हेच विशेषतः याच चळवळीचे पुरस्कर्ते होते. श्रीमद् दयानंद सरस्वतींना हिंदी राष्ट्रभाषा आहे हे घोषित करण्याचाच नव्हे तर त्यात राष्ट्रीय दृष्टीने ग्रंथ लिहिण्याचाही पहिला मान आहे यात शंका नाही.

अशा स्थितीत जेव्हा आम्ही १९११ पासून सर्व राजबंदीवानांना आणि साऱ्या बंदींना हिंदी शिक्षण घेण्याचा आग्रह करू लागलो तेव्हा हिंदी ही भाषा आहे की नाही या विधेयापासूनच विवाद करावा लागे! महाराष्ट्र आणि इतर दाक्षिणात्यांस हिंदी भाषा हा शब्दही नवीन वाटे. त्या भाषेस ते 'मुसलमानी भाषा' म्हणत! कारण दाक्षिणात्य मुसलमानांची तीच मातृभाषा, निदान समाजभाषा असते. उत्तरेकडचे जे बंदी त्यांस ती हिंदूंचीच भाषा आहे; इतकेच नव्हे तर ती आठ कोटी हिंदुमुसलमान आजच मातृभाषा म्हणून बोलतात हे माहीत असे. परंतु तरीही ती राष्ट्रभाषा होण्यास पात्र नाही असे ते म्हणत. कोणी म्हणे तिला व्याकरण नाही, कोणी म्हणे वाङ्मय नाही! हिंदीस राष्ट्रभाषा न मानण्याचा आग्रह मद्रासी इत्यादी लोकांत दिसणे स्वाभाविक आहे; परंतु तो बंगाली युवकांतच तिथे विशेष दृग्गोचर होई. कारण त्यांस बंगाली राष्ट्रभाषा व्हावी अशी स्वाभाविक महत्वाकांक्षा होती. खरे पाहता हिंदीच्या खालोखाल संख्याबळाने बंगालीलाच राष्ट्रभाषा होण्याचा अधिकार आहे; कारण त्यांची भाषा चार कोटी लोक बोलतात; आणि ती मराठीप्रमाणेच साहित्यातही हिंदुस्थानी भाषांत पुढारलेली आहे. तथापि हिंदीस राष्ट्रभाषा होण्याची अधिक योग्यता आहे ही गोष्ट बंगालचेच एक पुढारी गृहस्थ श्री. मित्र यांनी फार पूर्वी मान्य केली होती. इतकेच नव्हे तर तिचा त्यांनी पुरस्कार करून एक मासिकही चालविले होते.

या सर्व आक्षेपांचे वारंवार निरसन करून साहित्य, व्याकरण, प्रौढता, भवितव्यता आणि क्षमता या गुणांनी संख्याबलाप्रमाणेच हिंदी ही राष्ट्रीय भाषा होण्यास योग्य आहे, नव्हे अपरिहार्यपणे तीच राष्ट्रभाषा पूर्वीच झालेली

आहे हे मी नाना कोटिक्रमाने सर्वांस पटवी. तेवढ्यासाठी हिंदीचे जुने उत्तम ग्रंथ आणविले. नवीन साहित्य हिंदीत नाही खरे पण ते आता इतक्या गतीने उत्पन्न होत आहे की आपण सर्व प्रयत्न करू तर ते एका पाच वर्षांत जगात देखील महत्व पावेल इतके उत्तम होईल. हिंदी राष्ट्रभाषा करावयाची नाही, ती राष्ट्रभाषा होतीच मुळी. रामेश्वरचा बैरागी आणि व्यापारी हरिद्वारला हीच भाषा बोलत पृथ्वीराजाच्या साम्राज्याच्या आधीपासून जात-येत आला आहे. अशा अनेक युक्तिवादांनी आम्ही राजबंदींस हिंदी शिकण्यास प्रवृत्त करावे. त्याचप्रमाणे इतर बंदींसही.

आमचा शिक्षणक्रमच असा असे. प्रत्येक राजबंदीने इतर प्रांतांच्या भाषा शक्य तितक्या शिकाव्या. अंदमानात हे ज्ञान संपादन करण्याची उत्तम संधी होती. त्याप्रमाणे आम्ही स्वतः बंगाल्यांस हिंदी व मराठी, मराठ्यांस हिंदी आणि बंगाली, पंजाब्यांस त्यांच्या आणि त्यांस पंजाबकडच्या गुरुमुखी इत्यादी भाषा शिकवीत असावे. शेवटपर्यंत हा उद्योग सारखा चालला होता. गुजराथी राजबंदी अगदी शेवटी आले; परंतु त्यांसही हिंदी लिपी आणि भाषा शिकवून हिंदी पुस्तके वाचता यावी इतके शिक्षण त्या अवधीत दिले गेले. इतर बंदीवानांस तर प्रथम हिंदी भाषा शिकविली जावी आणि नंतर इतर. असे दहा वर्षे आमचे आणि आमच्या साथीदारांचे परिश्रम अव्याहत चालले होते.

यासाठीच एक उत्तम हिंदी ग्रंथालय - एकत्र ठेवता येईना म्हणून फिरते - कसे ठेवले होते ते मागे सांगितलेच आहे. या ग्रंथालयार्थ द्रव्य निरनिराळ्या रूपाने मिळवीत होतो. आम्हास साहाय्य म्हणून बाहेरचे कित्येक स्वतंत्र अधिकारी केव्हा केव्हा द्रव्य देऊ इच्छित. आम्ही ते परस्पर हिंदी पुस्तके मागवून द्या म्हणून सांगून ग्रंथालयास द्यावे. अंदमानात पुस्तके मागविण्याचीही चोरी होती. म्हणून द्रव्यसाहाय्य जसे अवश्य तसे पत्ता देणे आणि आपल्या पत्त्यावर नुसती पुस्तके मागवू देणे हेही एक साहाय्यच समजले जाई - नाही धाडसही. कारण सरकारास कळले तर बंदीवानांशी संबंध ठेवला म्हणून स्वतंत्र अधिकाऱ्यासही पदच्युत करण्यात येते. तरीही त्यांनी पत्ते द्यावे. इतकेच नव्हे तर आमच्या संस्थेच्या कक्षेत या स्वतंत्र हिंदुस्थानातून आलेल्या स्वतंत्र अधिकाऱ्यांतही प्रचार करण्याचे कार्य येत असल्याने त्यांस स्वतःसही हिंदी शिकण्याची आमची निकड लागलेली असे. कित्येक मद्रासी सद्गृहस्थ अधिकाऱ्यांना हिंदी शिकविण्याकरिता आमचे साहाय्यक बंदीवान अंतःस्थपणे जात असत. एका राष्ट्राभिमानी डॉक्टरने तर आपल्या मुलास हिंदी ही अक्षरशः मातृभाषा व्हावी म्हणून घरात आपल्या पत्नीस देखील हिंदी शिकवून मुलासमोर तीतच बोलण्याची सवय लावली. या गृहस्थाने हिंदी प्रचारार्थ दहा-पाच रुपये मधून मधून दानही द्यावे. या स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या साह्याव्यतिरिक्त आणखी अनेक प्रसंग आम्ही साधावे. त्याचे दिग्दर्शनार्थ एक-दोन उदाहरणे सांगू.

एक दिवाण नावाचा आर्यसमाजाशी पूर्वी परिचित असलेला अल्पशिक्षित साधारण शेतकरी जन्मठेप घेऊन काही दरोड्याच्या भानगडीत आलेला होता. आमच्यावर हार्दिक भक्ती करी. त्याने आमच्या संस्थेत पुष्कळ काम केले. लोकांवर वजनही त्याचे बसे. तो दुर्दैवाने अगदी तारुण्यात त्या अंदमानच्या वायुमानास आणि कष्टकारक बंदीवासास बळी पडला. त्याच्या इष्टमित्रांनी त्याचे नावे काही जेवणावळ (दिवस) करावयाची ठरविले. आम्ही त्यांचे मन वळवून ते पैसे त्याचे नावे हिंदी ग्रंथ आणि क्रमिक पुस्तके घेऊन ते ग्रंथालयास आणि दरिद्री बंदीवानांस दान देण्याचे ठरविले. बिहारी नावाच्या एका मनुष्यास फाशीची शिक्षा झाली. त्याने काही द्रव्यदान देण्याचा नवस केला. ती शिक्षा योगायोगाने रद्द झाल्यामुळे त्याने ते दान कसे द्यावे ते विचारले. माझ्या उपदेशाने जेवणावळी

जवळ जवळ बंदच असत. ग्रंथाच्या आणि ज्ञानाच्या प्रसारास दान देण्याचे ठरविले तरी शीख, उर्दू, इंग्रजी - जो तो वर्ग ते दान, आपल्या भाषेतील पुस्तकांस दिले जावे म्हणून म्हणे. आणि आम्ही विरोध केला की म्हणत यांना राष्ट्रीय भाषेच्या गोंडस ढोंगाखाली बंगाली, पंजाबी इत्यादी भाषा मारणे आहे. पण आम्ही सांगावे, मी मराठीस ते दान मागत नाही. तसे असते तर शंका एक वेळ ठीक होती. पण हिंदीस द्या! मी स्वतः गुरुमुखीसुद्धा त्या प्रांतिक भाषा शिकलो होतो. इतरांस बंगाली इत्यादी स्वतः शिकवी देखील. मला मराठीही मारावयाची आहे की काय? पण आपला प्रांतिक अभिमान राष्ट्रीय हितापुढे बळी दिला पाहिजे असे समजावीत अंती आम्ही त्या पैशांतून हिंदी पुस्तके मागविण्यास त्या बंदीचे मन वळविले आणि अला-उदलसारख्या लोकप्रिय पण जुन्या वळणाच्या ग्रंथापासून तो नागरी प्रचारणीच्या नवीनातील नवीन ग्रंथमालेपर्यंत शंभर-एक रुपयांचे ग्रंथ मागविले. आम्हा स्वतःला अला-उदल फार आवडत असे.

ज्या बंगाली स्नेह्यांचे मत हिंदी प्रौढ नाही किवा तिला वाङ्मय नाही असे असे. त्यांना ती कशी गमनशील होत आहे ते दाखविण्याकरिता तिच्यातील, गुरुकुलातील किवा इतर उत्तम ग्रंथ प्रसिद्ध होताच आणून बळे बळे दाखवी. त्यांना ते केव्हा केव्हा आनंदकारक न वाटता अपमानकारक निदान दुष्ट हेतूचे वाटे. पण तो हेतुविपर्यास सहन करूनही ते मी करीतच राहावे. शेवटी शेवटी हिंदी राष्ट्रभाषा आहेच ही बुद्धी इतकी सार्वत्रिक झाली की, ती सिद्ध करीत बसण्याच्या स्थितीतून सिद्धान्ताच्या स्थितीप्रत पोचली. शीखांचे मन हिंदीकडे वळविण्यास निराळा युक्तिवाद उपयुक्त होई. त्यांपैकी पुष्कळांस श्रीगोविद गुरूचे विचित्र नाटक इत्यादी ग्रंथ आणि सूर्यप्रकाशादिक इतिहास शुद्ध व्रज भाषेत म्हणजे जुन्या हिंदीत आहेत हे माहीत नसे. परंतु एकदा त्यांस हिंदी त्यांची धर्मभाषाच कशी आहे आणि गुरुमुखी ही केवळ एक लिपी काय ती आहे हे समजावून देण्यात आले की त्यांस हिंदीचे राष्ट्रीयदृष्ट्या नव्हे तर पंथदृष्ट्याही महत्व वाटू लागे.

गुरुमुखीसंबंधी आमचे मत कारागारातील त्या ग्रंथांच्या अभ्यासाने असे झाले की, ती लिपी गुरूंनी शोधून काढली असे परंपरेचे मत ऐतिहासिक नसून त्याचा अर्थ इतकाच आहे की त्या वेळी पंजाबात प्रचलित असलेल्या लुंडी मुंडी (मोडी) इत्यादी व्यापारिक आणि प्राकृत जनांतील लिपींपैकीच गुरूने ती निवडलेली एक जुनीच लिपी होती. शीख धर्मग्रंथ 'शास्त्रीत' (नागरीत) न लिहिता त्या सामान्य लोकांत प्रचलित असलेल्या लिपीत लिहविले, जसे बुद्धाने पालीत, म्हणून काय ते तिला गुरुमुखी हे नामाभिधान मिळाले. हा विषय स्वतंत्र आहे. ओघाने विषय निघालाच म्हणून उल्लेख करून ठेवला आहे. ही उपपत्ती आजवर कोणाही विद्वानांनी पुरस्कार केलेली नव्हती हे आम्हास तेव्हाही माहीत होते. तिचे यथार्थत्वाचे वा अयथार्थत्वाचे दायित्व सर्वस्वी आमच्यावर - आम्हास माहीत आहे तोपर्यंत तरी अनन्यपणे आहे. याविषयी अनेक 'ग्रंथां'शी आणि शीखेतिहासज्ञांशी आम्ही अनेक वेळा चर्चा करावी.

मी प्रथमतः मराठी देखील कोणास शिकवू देत नसे. प्रथम मातृभाषा मग लगेच हिंदी आणि नंतर अन्यप्रांतीय हिंदुभाषा असा क्रम ठेवी. तिथे प्रत्येकास शक्यतो अन्यप्रांतीय भाषा शिकविण्याचा मी आग्रह करी; परंतु तमीळ संघाच्या (मल्याळी, आंध्र, कानडी आणि तामीळ) द्राविड भाषा शिकविण्याची सोय, तिथे तिकडच्या ग्रंथांचा संग्रह आणि प्रचार करणारा कोणी योग्य मनुष्य नसल्याने आणि मला त्या येत नसल्याने मला करता आली नाही

याविषयी मला नेहमी वैगुण्य वाटत असे. ते वैगुण्य अजूनही मला घालविता आले नाही. बाकी मराठी, पंजाबी नि बंगाली भाषा बहुतेक राजबंदी आणि शिक्षित बंदी उत्तम प्रकारे शिकले होते. मराठीतील महत्वाचे विशिष्ट ग्रंथही ते वाचीत. तरीही मी द्राविड भाषेत कोणकोणते नवीन ग्रंथ होते याची बारीक माहिती नेहमी मिळवी आणि पर्यवेक्षकांकडून शेवटी शेवटी त्या भाषेची प्राथमिक पुस्तके आणि इतर नवीन ग्रंथ आणण्यासाठी परवानगी आणि पैसे घेऊन, एक टाचण करून, त्यांची मागणीही केली होती. त्याचे पुढे काय झाले ते माझ्या अकस्मात परत येण्याने मला काहीच कळले नाही.

अंदमानामध्ये निरनिराळ्या प्रांतांचे लोक एकत्र झाल्याने त्यांच्यात बोलाचालीची भाषा आपण होऊनच हिंदी असते. तेथे बंदीवानांची जी संतती आहे त्यांच्यातही लग्ने परस्पर प्रांतांतील लोकांत होत आल्याने अंदमानात जन्मलेल्या मुलांची मातृभाषाही सहजच हिंदी असते. या ‘स्वतंत्र’ लोकांत बहुतांशी हिंदू लोकच असल्याने वास्तविक पाहता शिक्षणही शाळांतून मुख्यत्वे करून हिंदीतूनच दिले जावयास पाहिजे होते. परंतु पूर्वीपासून हिंदुस्थानातील जे ‘मुनशी’ म्हणून तिकडे गेले ते सर्व पंजाब, दिल्ली इत्यादी उर्दू शिक्षितांतील असल्याने अंदमानच्या मूळच्या प्राथमिक शाळेत उर्दू शिकविण्याची वहिवाट पडली. त्यास दुसरे एक कारण हेही होतेच की, त्या उर्दू नोकरांचाच दुय्यम लेख्यालयातून (offices) भरणा असल्याने तेथील लिखाणाची (दप्तराची) दुय्यम भाषा उर्दूच झालेली होती. पहिल्या शाळेतील उर्दू शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांच्या उदाहरणाने शिक्षित म्हणजे उर्दू शिक्षित अशी त्या नवीन वसाहतीत चमत्कारिक समज होऊन हिंदी शिक्षण घेण्याची इच्छा तर काय पण कल्पनाही लोकांत उरली नाही. शाळा जशा वाढल्या तशी त्यात उर्दू शिक्षणाचीच परिपाठी पडत गेली. वास्तविक पाहता हिंदी आणि ज्यास उर्दू म्हणतात त्यात मूलतः काही भेद नाही. हिंदी भाषा पर्शियन लिपीत लिहिली की झाली उर्दू. तेव्हा मूळ प्रश्न वास्तविक लिपीचा होता. अंदमानात बंदीवानांच्या आणि वसलेल्यांच्या संख्येत हिंदूंचाच मूळचा आणि सततचा फार मोठा भरणा असल्याने आणि शिक्षण घेण्यास तेच अधिकांशी पुढे येत असल्याने त्या सर्वांस राष्ट्रैक्याने आणि धर्मैक्याने सामान्य आणि प्रिय असलेली हिंदी म्हणजे नागरी लिपीच शाळांतून प्रथमपासून शिकावयास हवी होती. पण आश्चर्याची गोष्ट की, हिंदूंच्या करावर मुख्यतः चाललेल्या या शाळांत अजूनही हिंदी आवश्यकपणे शिकविली जात नाही. हिंदू मुलास अ,आ येत नाही, तुलशीचे रामायण किवा भगवद्गीतेचे श्लोक वाचता येत नाहीत; त्यास पर्शियन कवींचे चुटके येतात पण कालिदासाचे तर राहोच पण सूरदासाची किवा प्रेमसागरातील एक ओळही परिचित नसते. हिंदी पहिले पुस्तक त्यास लॅटिनसारखे भासते; पण उर्दू वर्तमानपत्रे तो भराभर वाचतो. त्याच्या डोक्यात उपमा पर्शिया आणि अरेबियातील नद्यांच्या भरलेल्या असतात. तिकडचे वीर पुरुष त्यास माहीत असतात. पांडवांची कथा, भारत, रामायण वा भागवत याचे त्यास एक अक्षरही माहीत नसते; वाचता येत नाही. आम्ही अंदमानातील शिक्षित मंडळींपैकी सर्वसाधारण माणसांची ही स्थिती अवलोकन केली तेव्हा अंदमानामध्ये हिंदुसंस्कृती जिवंत ठेवायची असेल तर हिंदी भाषा आणि नागरी लिपी यांचे शिक्षण प्रत्येक हिंदू मुलास अगदी अपरिहार्य म्हणून दिले जावयासाठी एकसारखी चळवळ करणे अत्यंत अवश्य आहे असे आमचे मत झाले.

प्रत्येक शाळेत हिंदी भाषा आणि नागरी लिपी शिक्षणाचे अनिवार्य माध्यम असावे आणि त्या मुसलमानी मुलास किवा इतरांस उर्दू लिपी आणि भाषा (म्हणजे अरबी पर्शियन शब्द बहुतेक हिंदी) शिकणे त्यांना ती भाषा म्हणून विशिष्ट विषयाचे रूपाने शिकविली जावी.

अंदमानाच्या शाळांत ही व्यवस्था करण्यासाठी प्रथम लोकांत ही इच्छा उत्पन्न करणे भाग होते; कारण तेथील हिंदू लोकांत सार्वजनिक आणि राष्ट्रीय ऐक्याची भावना अगदीच अल्प होती आणि हिंदुत्वाचा अभिमान केवळ मूर्खपणाच्या रूढीतून काय तो जिवंत राहिला होता. त्यांस हिंदी ही आपली हिंदूंची भाषा आहे आणि आपले धर्मग्रंथ, निदान प्राकृत तरी, ज्या नागरीत असतात ती लिपी आणि ती भाषा शिकणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे याची मुळीच जाणीव नसे. दोन-तीन पिढ्या उर्दूच्या सहवासाने जिचे वर्चस्वच नव्हे तर आत्मनाशक अभिमानही त्यांच्यात संचरलेले होते; म्हणून आम्ही आमच्या विचाराची जी मंडळी बाहेर होती त्यांच्याकडून स्वतंत्र लोकांच्या घरोघर या विषयाची चर्चा करण्यास आणि जागृती करण्यास नेटाने आरंभ केला.

ज्या प्रकरणात अंदमानातील संघटन, शिक्षण, शुद्धी इत्यादी चळवळींचा इतिहास आम्ही पूर्वी दिलेला आहे, त्यावरून बंदीवानांतून आणि वसलेल्यांतून वृत्तपत्रे, बातम्या, राष्ट्रीय गाणी, राष्ट्रीय चर्चा, अंतःस्थ सभा आणि व्याख्याने इत्यादी साधनांच्या द्वारा आमच्या संस्थेतील प्रचारकांनी किती जागृती केली होती हे वाचकांच्या ध्यानात आलेच असेल. त्या चळवळींत प्रथमपासूनच 'स्वतंत्र' लोकांत हिंदीचा प्रचार करणे हे एक कर्तव्य ग्रथित असे. त्यायोगे त्या पाच-सहा वर्षांत स्वतंत्र लोकांत हिंदीसंबंधी पुष्कळ जागृती झाली. कित्येक कुटुंबांत हिंदी शिक्षक आम्ही धाडवून मुलांमुलींस नागरी आणि हिंदी शिकवावे. जेव्हा तेल-कोठाराचे व्यवस्थापकत्व आमचेकडे आले तेव्हा व्यापारासाठी स्वतंत्र लोक जे कारागारात येत त्यांशी आमचा परिचय होऊ लागला. आम्हास केवळ पाहण्यासाठी किवा भेटण्यासाठीही कित्येक स्वतंत्र तेलाची व भूशीची खरेदी करीत की त्या निमित्ते तरी कारागारात प्रवेश होऊन त्या कोठारात आमची भेट व्हावी. अशा सर्वांस आम्ही इतर उपदेशांसह हाही उपदेश द्यावा की ''तुम्ही हिंदू, हिंदी ही तुमची राष्ट्रभाषा नव्हे तर अंदमानात तरी धर्मभाषा झालेली. तुम्ही आपल्या मुलांमुलींस तरी हिंदी आणि नागरी लिपी अवश्य शिकविली पाहिजे. सरकारास तुम्ही सर्व मिळून एक आवेदनपत्र धाडाल तर हिंदी नागरी शाळेतून अवश्य सुरू होईल. पण ते जोपर्यंत झाले नाही तोपर्यंत व्यक्तिशः घरोघर हिंदी शिकवा. '' आमचे स्वयंसेवक कुणी हो म्हटले की त्याचे घरी उघड वा अंतःस्थ रीतीने जाऊन हिंदी शिकवीत. कारण अंदमानात बंदीवानास स्वतंत्रपणे कोणाच्या घरी त्याची इच्छा असली तरी परवानगीवाचून सहसा जाता येत नसे. 'स्वतंत्रास'देखील बंदीशी बोलण्याचे वा व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य नसे. आम्हास जो कोणी भेटेल त्यास 'हिंदी शीक' ही विनंती करावी. मुनशी आला हिंदी शीक, लेखक आला हिंदी शीक, डॉक्टर आला हिंदी शीक, असा आम्ही सारखा जप चालविला.

स्वतंत्र लोकांत हिंदी शिक्षणाचा असा थोडाबहुत प्रचार होताच त्यांच्या मुलांमुलींसाठी हिंदी महाभारत, क्रमिक पुस्तके, शिवाजी इत्यादी थोर पुरुषांची चरित्रे विनामूल्य वाटली जात. हिंदी पत्रे त्यांचे घरी पोचवून वाचून घेतली जात. जे शिपाई, व्यापारी आदी लोक आम्हास शेवटी शेवटी प्रत्यक्ष भेटू शकत त्यांस आम्ही स्वतः हिंदी शिकवावे. अशा रीतीने प्रयत्न करता करता हिंदी भाषा आणि लिपी ही प्रत्येक हिंदूने शिकणे हे अंदमानात तरी धार्मिक

कर्तव्य आहे ही भावना स्वतंत्र लोकांत बरीच बळावली आणि तिच्या बळावर तेथील शाळांतून निदान हिंदू मुलांस तरी हिंदी शिकविले जावे म्हणून सरकारास आवेदन करण्याची खटपटही सुरू झाली.

परंतु जोवर सरकारी लिखाण उर्दूत आहे तोवर मुलांचा ओढा साधारणतः उर्दू शिकण्याकडे अधिक असणारच हे पाहून ते लिखाणच शक्य तिथे तिथे हिंदीत ठेवण्याचा आम्ही प्रयत्न चालविला. वास्तविक पहाता इंग्लिश भाषेतच बहुतेक सरकारी लिखाण असे. उर्दू भाषेत जे असे ते काही तसा निर्बंध होता म्हणून नव्हे तर प्रथम प्रथमचे 'मुनशी' उत्तर हिंदुस्थानी येत गेल्याने आणि बंदीवानांमध्येही उत्तरेतील उर्दूलिखित चालणाऱ्या प्रातांतील लोकांचाच मुख्य भरणा असल्याने ती एक रूढी पडलेली होती. त्या उर्दू लिखाणात मुख्य भाग दर नौयानातून जाणाऱ्या बंदीवानांच्या पत्रांचा असे. ही पत्रे ''मुनशी'' कडून लिहिविली जात म्हणून ती बहुधा उर्दूतच असत. म्हणून प्रथमतः पत्रे इतर देशी भाषेतही धाडली जावीत अशी परवानगी मिळविण्याचा प्रयत्न केला. किती दिवस तरी 'मराठी', 'गुरुमुखी' इत्यादी भाषेत पत्रव्यवहार करण्यास परवानगी मिळावी म्हणून खटपटीत गेले. कारण मुनशींना इंग्लिश किंवा उर्दू येई, आणि मुनशींनी पत्र संमत केल्यावाचून ते 'अनाक्षेपार्ह' म्हणून गणले जात नसे. जेव्हा एकदाची परवानगी मिळाली की बंदीने आपल्या प्रांतीय भाषेत पत्र लिहिण्यास हरकत नाही. तेव्हा मग पंजाब, लखनौ इत्यादी ज्या प्रांतांतून उर्दू प्रचलित होते त्या प्रांतांतील हिंदू बंदींचे मत पत्र नेहमी हिंदीतच धाडावे यासाठी वळविण्यात आले. मराठी, बंगाली इत्यादी हिंदू बंद्यांस आपआपल्या भाषेत पत्रे टाका नाहीतर हिंदीत पण उर्दूत टाकू नका असे अंतःस्थपणे सांगण्याचा धडाका चालला. तेव्हा वरच्या कार्यालयातून सरकारास आपोआप ती पत्रे नियमानुकूल लिखाण लिहिलेली आहेत की नाही हे पहाण्यासाठी हिंदी आणि इतर देशी भाषा जाणणारे मुनशी ठेवावे लागले. जुने उर्दू जाणणारे अधिकारीही आपण होऊन हिंदी नागरीचे ज्ञान संपादन करू लागले. हिंदी पत्रे लिहिण्यास मुनशी मिळाला नाही तर आमची मंडळी ते काम स्वतः करीत. पूर्वी आमच्या कारागारात शेकडा नव्वद पत्रे उर्दूत जात. पण हा खटाटोप चालता चालता शेवटी शेकडा नव्वद पत्रे देशी भाषांत आणि विशेषतः हिंदी नागरीत जाऊ लागली. पुढे मुनशी इत्यादी नेमण्याचा अधिकार असलेल्या लोकांतही हिंदुसंघटनांचे अभिमानी हिंदू लोकच नेमले जात चालले तसे 'मुनशी' पण हिंदी जाणणारेच नेमण्यात येऊ लागले. हिंदूने पत्र हिंदीतच लिहिले पाहिजे- फारतर आपल्या प्रांतीय हिंदुभाषांतून हा आमच्या संस्थेतील मंडळींच्या प्रयत्नाने अगदी अलिखित असा स्वयं-संमत निर्बंधच झाला. मुसलमानी बंदींनी पाहिजे तर उर्दूत पत्रे टाकावी, त्यांचेवर काही बळ करण्यात आले नाही. पण पूर्वी बंद्यास महाराष्ट्रात किवा बंगाल्यातही जे बहुधा उर्दूतच पत्र टाकावे लागे तो बलात्कार तोडून टाकला. जेव्हा लेख्यालयात आम्ही जाऊ लागलो तेव्हा आम्ही स्वतः लिहून आलेल्या सर्व बंदींच्या पत्रांची झडती घेऊन पहावे की कोणी हिंदू निष्कारण उर्दूत पत्र लिहितात. लगेच जाऊन त्यांचे मत वळवावे. असे करता करता ठिकठिकाणी हिंदी जाणणारे हिंदू मुनशी नेमण्यात येऊन जाणारा पत्रव्यवहार बहुशः हिंदीत चालू झाला.

तीच गोष्ट येणाऱ्या पत्रांची. कारण प्रत्येक हिंदू बंदीने उत्तर हिंदीतच धाडा म्हणून आपल्या नातलगास लिहावे असा प्रयत्न चालू होता. त्यामुळे येणारी हिंदी किवा हिंदुप्रांतीय भाषेची पत्रे वाढत चालली. ती सरकारीदृष्ट्या अनाक्षेपार्ह आहेत की नाहीत हे पाहण्यासही हिंदी मुनशींची आवश्यकता वाढली. आणि उर्दूचे महत्व आणि प्रचार कमी होत चालला.

केवळ राजकीय बंदीवानांस मात्र इंग्लिशमध्येच पत्रे टाकणे जवळजवळ भाग पडत असे. कारण स्वतः इंग्रजी अधिकारी अन्वेक्षित असत. पुढे जेव्हा शेकडो राजकीय बंदी लोटले तेव्हा अर्थातच पुष्कळांस इंग्लिश येत नसल्याने पत्रे स्वभाषेत टाकण्याची परवानगी - तीही पुष्कळ खटाटोपाने मिळाली. आम्हास मात्र शेवटपर्यंत इंग्लिश पत्रेच टाकणे प्राप्त झाले.

जी स्थिती पत्रव्यवहाराची तीच नावाच्या टिपणी, सरकारी कार्यालयातील आणि लेख्यालयातील खालील अधिकाऱ्यांच्या हाती असलेली कामे, प्रत्यहीचा किरकोळ सरकारी पत्रव्यवहार आणि लिखाण यांचीही झाली. प्रथम हे सर्व उर्दूत होते. पण हिंदू 'मुनशी' आणि अधिकारी जसजसे उर्दू न लिहिण्याचे व्रत घेऊ लागले तसतसे हे कामही हिंदीत होऊ लागले. हळूहळू हिंदी ही उर्दू काढून टाकून एकमेव लिपी जरी झाली नाही तरी तिच्याबरोबर मानाची सरकारी लिखिताची भाषा आणि लिपी होईल असा स्पष्ट रंग दिसू लागला.

स्वतंत्र लोकांत लग्नकार्याच्या पत्रिका देखील हिंदू लोक उर्दूत छापीत! पण नंतर कित्येकजण त्या हिंदीत छापू लागले. त्या वाचणे देखील कठीण. कारण शिक्षित हिंदू तेवढा उर्दू शिक्षित! पण तरी देखील दडपीत चाललो. फार तर पत्रिका हिंदी आणि उर्दू अशा दुहेरी कागदावर छापाव्या. निदान उर्दूच छापणे तर वर ॐ आणि खाली काही तरी हिंदी वाक्ये नागरीत छापली व लिहिली जावी असा परिपाठ पाडला.

इतकी खटपट चालली असता तीस विरोध हा होतच होता हे काही नवल नाही. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, तो विरोध केवळ मुसलमानी अधिकाऱ्यांकडून होत नसून इंग्रजी अधिकारीही हिंदीच्या विषयी शंकित दिसत. तेही उर्दू जाणीत आणि हिंदी जाणीत नसत हे एक कारण आणि दुसरे म्हणजे ही हिंदीची चळवळ आम्ही पुरस्कृत केलेली! त्यामुळे ते नेहमी साशंक दिसत. हिंदी पुस्तके मागविण्यास आम्ही एका बंदीचे मन वळविले असता ''तू उर्दू पुस्तके मागविणार होतास ती हिंदी का मागवितोस'' म्हणून त्यास प्रश्न विचारून उर्दू मागविण्यास त्याने मन वळविण्याचा प्रयत्न करण्यासही एक इंग्लिश अधिकारी निघाले होते. त्यातही जेव्हा शाळेत हिंदी शिकवा म्हणून स्वतंत्रांत चळवळसुद्धा झाली तेव्हा ही चळवळ आम्ही काढली आणि ती यशस्वी झाल्यास स्वतंत्रांत आमचे वर्चस्व फार वाढेल अशी प्रतिवृत्ते गुप्त पोलिस आणि मुसलमानी अधिकारी स्पष्टपणे वरिष्ठांस कळवू लागले. हिंदीची चळवळ करणारे मुख्यतः तेच लोक होते की जे आर्यसमाज, शुद्धी, राजकारणप्रचार, शिक्षण, अन्यायांचा प्रतिरोध इत्यादी कार्यांत वारंवार पुढाकार घेतल्याने सरकारी लिखाणात ''चळवळे, भयंकर किवा संशयास्पद वर्तनी!'' अशा एखाद्या उपपदाने गौरविलेले बंदीवान होते. अशा रीतीने हिंदीकडे सरकार निष्कारण साशंकपणे पाहू लागल्याने स्वतंत्र लोकांनी मागणी केली असताही शाळेत, हिंदी, हिंदू मुलांस तरी अनिवार्य भाषा करण्यात आली नाही. आम्ही आल्यानंतरही करण्यात आली नाही. पण जर तेथील स्वतंत्र लोक सारखी खटपट करतील तर सरकारास आपला संशय किती वेडेपणाचा आहे हे कळून येऊन अंदमानच्या शाळांतून हिंदूस तरी हिंदी आणि नागरी अनिवार्य भाषा व लिपी म्हणून शिकविण्यास ते परवानगी देईल असा आमचा विश्वास आहे असे आम्ही एकसारखे लोकांचे मनावर बिबवीत होतो.

## मुलींना हिंदी - नागरी शिक्षण

मुलांच्या शाळेत हिंदी नागरी अनिवार्य करता आली नाही तरी त्यास संधीस निघालेल्या मुलींच्या शाळेत त्या चळवळीस यश आले. या हिंदू मुलींना देखील उर्दूत शिक्षण दिले जाणार होते! हिंदीची काही एक व्यवस्था होणार नव्हती. पण वेळीच स्वतंत्र लोकांस सारखे लाजवून खिजवून मुलींस तरी अलिफ, बे, पे इत्यादी उर्दू मूळाक्षरे शिकविण्यासाठी मुसलमानी शिक्षकांचे हाती देण्याच्या घातक प्रवृत्तीपासून परावृत्त केले गेले आणि प्रथमपासूनच मुलींच्या शाळेत हिंदू मुलींना हिंदी-नागरी शिकविण्याची व्यवस्था करण्यात आली.

राजकीय बंदीवानांतही पंजाब इत्यादी प्रांतांतील लोकांनी उर्दू पत्रे न टाकता आपल्या हिंदी भाषेतून टाकण्यास आरंभ केला हे सांगणे नको. राजकीय बंदींतल्या पंजाबी इत्यादी लोकांत उर्दूत उत्कृष्ट कविता करणारे आणि नामांकित लेखकही होते. त्यांतील कित्येकांनी प्रथम सहजच आमच्या उर्दूविरुद्ध चळवळीचा प्रतिकार केला. पण पुढे राष्ट्रभाषेच्या दृष्टीने उर्दू कसा वरपगडा करू पहात आहे इत्यादी कोटिक्रम पटून त्यांतील काहींनी आमच्या समोर ''आजपासून ही उर्दू लेखणी तोडली'' म्हणून प्रतिज्ञा करून हिंदीत लिहिण्यास आरंभ केला. त्यांस प्रथम आकाश, व्यायाम इत्यादी साधे शब्दही शिकवावे लागले! इतके त्यांचे मन उर्दूने अहिंदू करून टाकले होते. पण ते कष्ट त्यांनी सोसले आणि उच्च हिंदी नागरी शिकत गेले.

माझी ही चळवळ उर्दूच्या द्वेषाची नव्हती; कारण मी स्वतः उर्दू शिकत आणि वाचीत असे. अजूनही साधारण ट फ पुरती उर्दू मला वाचता येते, समजते बहुतेक. ती एक लिपी आणि क्वचित उपभाषा म्हणून हिंदी मुसलमानांत सुखेनैव जिवंत राहो. ती आमच्या मुसलमानी देशबंधूंतील काहींची भाषा म्हणून आम्हीही आंशिक ममतेने संभाळू. परंतु हिंदूंच्या श्रमाने आणि उत्तेजनाने तिने इतके चढेल व्हावे की हिंदूंसच त्यांची ''हिंदी भाषा लाथाळून टाक आणि मला आपली राष्ट्रभाषा कर'' म्हणून तिने धमकावू लागावे हे मात्र आम्ही सहन करू शकणार नाही. इतक्यापुरताच तिचा प्रतिरोध आम्ही करू. हिंदूंना त्यांचे व्ययाने चाललेल्या शाळांतून त्यांची राष्ट्रभाषा हिंदी अनिवार्यपणे शिकविली जावी आणि ही मागणी अगदी न्याय्य वाटल्याने आणि उर्दू बळाने शिकविली जात होती हे अन्याय्य आणि हिंदुसंस्कृतीस परिणामी घातक वाटल्याने आम्ही उर्दूचे उच्चाटन शक्यतो करीत राहिलो. भाषा वा लिपी या दृष्टीने ती कोणाही हिंदूने शिकावी. आपण फ्रेंच शिकतो, जर्मन शिकतो तशी उर्दू शिकावी. पण राष्ट्रभाषा म्हणून किवा स्वभाषा म्हणून आपल्या संस्कृति-उत्पन्न आणि पूर्वजव्यवहृत हिंदुभाषा सोडून तिला त्यांच्या डोक्यावर नाचू द्यावी हे आम्हास अनिष्ट वाटे.

अंदमानात हिंदी पुस्तकांचा भरणा करून फिरती अंतःस्थ ग्रंथालये कशी ठेवली होती त्यांचे त्रोटक वर्णन मागे ग्रंथालयाचे प्रकरणी आलेच आहे. या फिरत्या ग्रंथालयास हिंदीतील अर्थशास्त्र, राजनीती, राजकीय चळवळी इत्यादी अगदी नवीनातील नवीन पुस्तके सारखी येत राहिल्याने सामान्यबंदींस प्रचलित नव्हे तर प्रौढ विषयाचेही ज्ञान होण्यास फार सुलभ गेले. सत्यार्थप्रकाश या ग्रंथाच्या वाचनाकडे तर आम्ही विशेषच लक्ष पुरवीत असू. राजबंदींसही तो वारंवार वाचावयास लावू. दयानंदांचा तो ग्रंथ, काही तात्कालिक संग्रामाची धूळ आणि धूर उडालेले भाग सोडून, हिंदुसंस्कृतीची उच्च तत्वे मनात बिबविणारा आणि हिंदुधर्माचे राष्ट्रीय स्वरूप व्यक्त करणारा एक

अदम्य आणि निधड्या छातीचा प्रचारकच आहे यात शंका नाही. हिंदी शिकण्यास मन वळविण्यासाठी केव्हा केव्हा शिष्यवृत्त्या देखील तेथील बंदींस आणि उर्दू शिकलेल्या स्वतंत्र तरुणांस आम्ही द्याव्या. परंतु प्रथम जरी 'पैसे घ्या पण शिका' अशी चळवळ करावी लागली तरी पुढे हिंदीची रुची इतकी वाढली की, पुस्तके पुरेनात. पुस्तक पडून आहे म्हणून गाऱ्हाणे येईना; तर पुस्तक मंडळीत हातोहाती जाता जाता वाईट होते ही कागाळी यावी! मी म्हणे पुस्तक पडून आहे यापेक्षा ते वाचून वाचून फाटून जाते ही कागाळी मला फार आवडते. ज्या अंदमानात उर्दू इतकी घरोघर हिंदुलोकांची मने पोखरून राहिली होती की हिंदू मुली देखील "तुमारी शादी है?" म्हणून आपसात विचारीत; पण लग्न, विवाह इत्यादी शब्दांचा अर्थही त्यांस कळत नसे. त्याच अंदमानात हिंदी ही भाषा आणि नागरी ही लिपी आपली धर्मभाषा आणि धर्मलिपी आहे ही भावना हिंदू जनतेत मुलांमुलींपर्यंत बळावली आणि हिंदी वाचनाची इतकी रुची वाढली हे ज्या परिस्थितीत ती चळवळ करावी त्या परिस्थितीचे मानाने, ज्यांनी ती चालविण्यात प्रमुख भाग घेतला त्या कारागारातील आणि वसाहतीतील उत्साही बंदीवान प्रचारकांस भूषणास्पद होते यात काही शंका नाही.

परंतु त्या चळवळीचे पूर्ण फळ हातात पडावयास तेथील शिक्षणातूनच हिंदी नागरीचा प्रचार व्हावयास पाहिजे होता. त्याचे सूतोवाच आम्ही करविले होते. पण पुढे काय झाले ते पुढे पाहू.

प्रकरण दहावे

# सव्वाटीचभर ''हिंदुराज्य''

अंदमानात आम्ही गेलो तेव्हा गाजत असलेले ते टीचभर 'पठाणी राज्य' उलथून पडून त्याचे स्थानी सव्वा टीचभर ''हिंदूराज्य'' जेव्हा स्थापन झाले तेव्हा त्या राज्याची अगदी राजधानी जे तेल-कोठार तेच आमच्या आधिपत्याखाली आले आणि तेथील त्या एकहात मोडक्या लाकडी खुर्चीच्या सिंहासनावर आम्ही विराजू लागलो इथपर्यंत कथा मागे सांगितलीच आहे.

तेल-कोठार म्हणजे त्या कारागारातील उत्पन्नाचे अंतिम केंद्र असल्याने आणि बारी महाराजांच्या विश्वासाला - विशेषतः राजबंदी आल्यानंतर - पठाणी मुसलमानाविरहित इतर कोणीही पात्र झालेले नसल्याने त्या तेल-कोठारात मुसलमान, बहुतेक पठाण अधिकारी असत. त्याचे हाती सगळ्या बंदींचे तेल तोलून घेणे असल्याने तो सगळ्या बंदींस चळचळ कापवू शके. त्यांनी 'तेल पूरा नहीं' म्हटले की जमादार, पेटीऑफिसर, बंदी लटलट कापू लागत. बंदीवानांस मारण्याचा त्याचा अधिकार त्या गोदामवाल्यास आसनपरंपरा प्राप्त झालेला होता. बारी कार्यालयात जर कोणाचे डोळे मिटून ऐकत असेल तर या अधिकाऱ्याचे. त्यामुळे राजबंदीविरुद्ध चुगल्या करण्यातही हाच अधिकारी पुढारी असे. या अधिकारावर तुरुंगात अगदी लबाड, धूर्त, सोदा आणि स्वार्थी असेल तोच नेमला जाई. तसे बरेच सुयोग्य अधिकारी त्या स्थानास आमच्या सात- आठ वर्षांच्या कारावासात पवित्र करून गेले होते; आणि आता आमच्या नवव्या वर्षी आमची त्याच अधिकारावर नेमणूक झाली!

आम्ही तिथे येताच कारागारातील उरल्यासुरल्या मुसलमान तंडेल, पेटीऑफिसर, बंदीवान वॉर्डर इत्यादी मंडळींत एकसहा भीती संचरली. त्या तेल-कोठारात असणाऱ्या देवतेला बंदी आणि बंदी-अधिकारी यांना तेलाच्या घाण्यात आपला जीव पिळून निघू नये असे वाटत असेल तर बराच सोन्याचांदीचा नैवेद्य दाखवावा लागे. आजपर्यंत तेथे असलेल्या मुसलमानी अधिकाऱ्यांचे जोरावर हिंदूंना त्या तेलाच्या घाण्यात नैवेद्य नाही दिला तर त्यासाठी किवा दिला तरी काफर म्हणून, या लोकांनी छळून सोडले होते. आता ती जागा हिंदूंच्या हाती आली आणि ती त्या शुद्धीकरण काढलेल्या नष्ट, दुष्ट, खाष्ट 'आयना'वाल्याच्या! उपनेत्रवाल्याच्या! एकेक मुसलमान तंडेल, पूर्वी राजबंद्यांच्या छळांत सगळ्यांच्यापुढे होण्यात चढाओढ करणारे ते मुसलमान पेटीऑफिसर येऊन, अगदी नम्रपणे हात जोडून, सलामच नाही तर हात जोडून, माझी विनवणी करीत की ''बडे बाबू, अब जान बचाना!''

## सलाम नव्हे रामराम!

आम्ही वर हात जोडणे लिहिले आहे त्यात एक गोम आहे. आम्ही अंदमानाला गेलो तेव्हा पाहू लागलो की, हिंदू लोक मुसलमानांना सरसहा सलाम करीत, इतकेच नव्हे तर आपसातही पंजाबी इत्यादी हिंदू मंडळी सलाम करताना आढळत. परंतु मुसलमान काही केल्या राम राम म्हणत नसे. एक दिवस एका मराठी वॉर्डराने मला सांगितले की त्याने मिर्झाखान जमादारास (त्या 'छोट्या बारीस') सहज राम राम केला तर त्याने त्या वॉर्डरास शिव्या हासडून तंबी दिली की, ''ए काफर, हमारे सामने राम राम का नाम मत निकालो. तुमको सलाम बोलना

होगा!'' ही गोष्ट ऐकल्यानंतर आम्ही स्वतः निश्चय केला की कोणाही मुसलमानाला सलाम म्हणायचे नाही. जोवर तो राम राम नमस्कार म्हणत नाही. जर कधी एखादा मुसलमान असा राम राम म्हणणारा असला - आपले महाराष्ट्रीय मुसलमान त्या वेळेपर्यंत तरी पुष्कळ सरळ असत आणि राम रामही म्हणत - तर मी एकदा सोडून दहादा सलाम म्हणे; पण जे धर्मांध मुसलमान हटकून राम राम म्हणत नसत; पण हिंदूंना मात्र सलाम म्हणण्यास भाग पाडीत. त्यांस आपणही सलाम म्हणावयाचे नाही म्हणून मी निर्धार करून इतर हिंदू बंदीवानांत ती रूढी पाडली. त्यामुळे कित्येकदा लहान भांडणे होत; पण हिंदू बंदीवानांतील अनेक निश्चयी लोकांनी मुसलमानालाही त्याने सलाम म्हटला तरी आपण राम राम किवा नमस्कार म्हणण्याचा निर्धार सोडला नाही. यामुळे मुसलमानांना माहीत असे की मी हिंदू राम राम, हात जोडून नमस्कार, वंदेमातरम् इत्यादी शिष्टाचारांचा अभिमानी असे आणि म्हणून ते भ्यालेले मुसलमान बंदी अधिकारी मला प्रसन्न केल्यावाचून गत्यंतर नाही असे पाहून 'हात जोडून' नमस्कार करीत होते. पण सलाम करू नका, असा आग्रह त्यांना मी कधीच करीत नसे. त्यांनी सलाम करावा पण मग हिंदूंनी राम रामच करावा. ते जर राम रामही सरळपणे म्हणतील तर आपणही वाटल्यास सलाम म्हणावा!

मला 'जान बचविण्याचा' पुरस्कार म्हणून पूर्वपद्धतीप्रमाणे मुसलमान बंदीवानांकडून आणि तंडेलादिकांकडून नैवेद्यही अंतःस्थपणे स्वीकारण्याचा आग्रह होत चालला. तेव्हा मी घाण्याचे कारखान्यात जाऊन आणि इतरत्र त्या सर्वांस भेटून सांगितले, ''की तुम्ही मुसलमान म्हणून कोणाला माझ्यापासून त्रास होईल ही भीती सोडून द्या. तुम्ही कोण्या हिंदू बंदीस त्रास देऊ नका म्हणजे झाले. कोणाची कवडीही मला नको. केवळ शक्य तितके करून आपले काम नीट करीत जा. मग थोडे तरी मी बघून घेईन. परंतु जर तुम्ही मी हिंदू म्हणून कोणी कटाने काम कमी कराल किवा पूर्वीप्रमाणे हिंदू लोकांस पीडा द्याल किवा पैसे उकळू पहाल तर मात्र ध्यानात धरा!''

## सर्वांस धाक बसविला

मी असेतो मी याच धोरणाने त्यांना वागविले. एक- दोघां जुन्या काळी चढेल झालेल्या मुलसमान वॉर्डरांनी तेल चोरून मजवर खोटा खटला करण्याचा बेत चालविला होताः पण तात्काळ त्यांनाच धरून, कामावरून काढून टाकण्यात येताच सर्वांस धाक बसला; आणि पुढे ते सर्व अगदी दीनपणे राहू लागले. मी त्या वॉर्डरांचे कामावर हिंदू वॉर्डर नेमले. ज्या कोलूस 'फाशीचा गुरू' म्हणून म्हणत - कारण फाशी जाण्यास कोणाचे मन वळविणे असेल तर त्यास कोलूस धाडला की पुरे होई - त्या कोलूस तो माझेकडे होता तोवर कोणासही बेडीची शिक्षा किवा एक चापटीचीही मारपीट किंवा एक कवडीचीही लाच द्यावी लागली नाही; भोगावी लागली नाही आणि तरीही ते तेलाचे काम काही कमी झाले किवा उत्पन्न त्यामुळे ऱ्हास पावले असे मुळीच झाले नाही. त्याच वेळेस त्या कार्यालयावर बंदीपाल बारीचे मेहुणे झालेले होते. त्यांच्या सुशिक्षित, दयाळू आणि उदारत्वाचे स्वभावाने कारागारात सरकारी काम उत्तम चालूनही बंदीवानांची अन्याय्य छळणूक होत नसे. त्यांचेही मला या घाण्याच्या कामातील पीडा आणि अत्याचार बंद करण्यास पुष्कळ साहाय्य मिळाले. हिंदू बंदीवानांना तर माझे उपकार मानता मानता पुरेसे होई. त्यांची ती भोळी भक्ती पाहून आणि केवळ मी वाईट नव्हतो एवढ्याचसाठी माझ्या चांगुलपणाचे मनःपूर्वक उपकार मानण्यात त्यांच्या अल्पसंतुष्ट याचनेने द्रवून जाऊन केव्हा केव्हा माझ्या डोळ्यांत पाणी यावे.

## पीडा आणि अत्याचार बंद

त्या तेल-कोठारात असताना मला जे मुख्य समाधान अनुभवांती आले ते हे होते, की माझ्या आणि एकंदरीत राजबंदींच्या अत्यंत दुर्दशेच्या दिवसांत जे लोक आम्हांस उपयोगी पडले होते त्यांचे पुष्कळ हित मला साधता येऊन स्वतंत्र लोकांतील सत्पात्र मनुष्यांस आणि कुटुंबांसही पुष्कळ सहाय्य देता आल्याने कृतज्ञबुद्धीस प्रसन्नता देता आली. आता पूर्वीप्रमाणे कोणतीही पीडा होणे बंद झाले. बंदींस एकाच वेळी शौचास सोडून, संडासात आठ-आठ ओळीने धाडून जमादारास वाटले पुरे की एकदम 'उठो' म्हणून आज्ञा सोडली जाताच कोणास शौचास पुरेसे होवो वा न होवो सर्वांनी एकदम उठले पाहिजे; नाहीतर त्यास नागवाच ओढून बाहेर ओढला जावे लागे - कित्येकदा पाणी लावून अंग धुण्याचे आधीही बाहेर ओढले जाई - असे अगदी पाशवी अत्याचार जे त्या कामात भोगावे लागत ते आता अगदी नामशेष झाले होते. मुसलमान वॉर्डर हिंदू कोणी हौदातील पाणी घेताना पाहिला की दोन्ही पाय हौदात धूत आणि त्या हिंदूने निरुपाय म्हणून ते पाणी तसेच वापरले की त्याची टर उडवून आपण मोठे सत्कृत्य केले म्हणून जी बढाई मारीत - असे ज्या चाळीत ते चढेल झालेले होते त्याच चाळीत शुद्ध पाणी मिळू लागले आणि तसे चढेलपण करण्याची कोणाची छाती होईनाशी झाली. पाण्याची गोष्ट निघाली म्हणून आणखी एक आठवण झाली की, आम्हास पहिल्या चार-पाच वर्षांत केव्हा केव्हा नाक धरून पाणी प्यावे लागे! कारण बारीसाहेब लांबून पिण्याचे पाणी आणविण्यास जेव्हा आळसत तेव्हा अगदी घाण आणि टाकाऊ म्हणून व्यक्त केलेल्या एका विहिरीचे पाणी बंदीवानांस पिण्यास देत. ते इतके कुजलेले आणि ओंगळ असे की नाक दाबून धरल्यावाचून घाणीच्या भपकाऱ्यामुळे ते पिणे केवळ अशक्य होई. ही गोष्ट बारी पर्यवेक्षकास अर्थातच कळवीत नसे. कोणीही ती कळविण्यास धजत नसे. आम्ही एकदा ते पाणी लपवून ठेवले. दुसरे दिवशी पर्यवेक्षक येताच आम्ही प्रथम शेजारच्या कचराविहिरीचे पाणी पिण्यास वाटले गेल्याची कागाळी केली. बारी नेहमीप्रमाणे शपथेवर ती गोष्ट नाकारू लागला. कोणी जमादार वा बंदी आमचे वतीने बोलेना. आम्ही खोटे पडू लागलो. तेव्हा ते भांडे आम्ही कोपऱ्यातून काढून पुढे केले! पर्यवेक्षकांनी बारीची थोडी पाद्यपूजा तेथेच करून बाकीची कार्यालयात गेल्यावर केली. त्यापुढे तसे पाणी देण्याचे अगदी बंद झाले. अशा स्थितीत ज्या बंदीवानांनी मागे दिवस काढले होते त्यांस ते श्रीयुत डिगनसाहेबांच्या बंदीपालत्वाचे दिवस कारागाराच्या मानाने किती कमी दुर्धर जात होते हे समजण्यास उत्तम साधन हेच होते की, ज्या कामगारांत महिन्यादोन महिन्यांत एखादा तरी बंदी फाशी खाईच त्याच त्या कामगारांत आणि वसाहतीत देखील फाशी खाल्ल्याचे एखादे उदाहरणही घडेनासे झाले. यास कारण त्या वेळची आठदहा वर्षांच्या खटपटीने घडवून आणलेली वसाहतीच्या अधिकाऱ्यांच्या वर्तनातील सुधारणा हे एक होतेच; आणि हेही होते की, युद्धापासून या ना त्या निमित्ताने सुटकेची आशा बंदीवानांच्या हृदयात सारखी उत्पन्न होत गेली. आत्महत्येच्या संख्येत झालेला हा तुरळकपणा आम्ही कारामंडळाचेही ध्यानात आणून दिला होता.

## भंग्याला पंक्तीस घेतले

त्या तेल-कोठाराच्या अधिकाराचा उपयोग आमच्या शिक्षण-शुद्धीकरणसंघटन इत्यादी अंदमानास सुधारण्यासाठी चालविलेल्या प्रचारकार्यास अर्थातच फार होऊ लागला. काही उदाहरणे सांगू. एकदा एक हिंदू भंगी

जो फार दिवसांपूर्वी मुसलमान झाला होता त्याला आम्ही हिंदुधर्मात पुन्हा घेतला. पण त्याची नवीन शेंडी पाहताच मुसलमान त्यास पंक्तीतून उठवून देऊ लागले. आणि हिंदू, तो भंगी म्हणून, आपल्या पंक्तीस त्यास घेईनात. तेव्हा आम्ही त्यास तेल-कोठारात कामाचे निमित्ताने त्याचे भंगीकाम आटोपल्यावर बोलवावे, आमचेसमोर साबणाने शुद्ध स्नान घालवून नवीन कपडे धारण करवावे आणि आमच्या शेजारी जेवावयास बसवावे. आमचे आणि आमच्या मित्रांचे उदाहरण पाहून तो भंगी हिंदू लोकांच्या पंक्तीस हळूहळू बसू लागला असता हिंदुबंदी त्यास अडथळा करीतनासे झाले आणि अशा रीतीने तो पुन्हा मुसलमानांचे पंजात फसण्यापासून वाचला. तो प्रत्यही तुलसीदासाचे भजन करी. पूर्वी याच कोलूत छळाने त्रासून जीव वाचविण्यासाठी कित्येक 'उच्चवर्णीय' हिंदूही आणि ब्रह्मी तर विचारूच नका, भंगीकाम मागून घेत! भंगी बनविण्याची शाळा म्हणून या कोलूची प्रख्याती होती. पण ते काम आता जरा सह्य होताच तेच उच्चवर्णी हिंदू त्या बिचाऱ्या जातीच्या भंग्यास आपल्या शेजारी बसू देईनात.

## लोकमान्यांच्या मृत्यूनिमित्त उपवास

त्या संधीच्या आगेमागेच लोकमान्य वारल्याची बातमी आली. प्रथम उडत उडत रात्री कळली. सकाळी निश्चिती झाली. त्या वेळी लोकमान्यांच्या मृत्यूविषयी आत्मा तळमळू लागला. ती तळमळ व्यक्त तरी कशी करणार! अंती आठ वाजण्याचे संधीस निश्चय ठरला की, त्या सर्व अंदमानभर सर्वांनी उपवास पाळावा आणि दुसरे दिवशी दुःखप्रदर्शनार्थ अंतःस्थपणे सभा भरवावी. तत्काळ आमच्या संस्थेतील सहकारी मंडळींना ते कळविले. त्यांनी पुढच्यास, त्यांनी त्या पुढच्यास असे करता करता एखाद्या तारेच्या गतीने ती वार्ता गावोगाव पसरली आणि जेवणाचे वेळेस पाहतात तो कारागारापासून तो दूर रासबेटापर्यंत आणि इतर भागांतून शेकडो लोकांनी आपआपली जेवणे घेण्याचे नाकारले. अधिकाऱ्यास घोटाळा पडला हे काय! पण कोणी कारण सांगेना कारण बंदीवानास राजकारण नाही - जसा गाईस आत्मा नाही! आणि बंदीवानास राजकारण नाही म्हणजे राष्ट्रीय कारण नाही - बाकी सरकारी राजकारण त्यांनी केले तर चाले; इतकेच नव्हे पण त्यांस ते करणे मनाविरुद्ध भाग पडे. उदाहरणार्थ, लढाईचे दिवसांत त्या महायुद्धार्थ इंग्लिश साम्राज्याच्या सुवर्ण मेरूचे दिवाळे निघू नये म्हणून अंदमानातील त्या बंदीवानांपासून देखील पैसाअडका वर्गणी म्हणून अधिकाऱ्यांनी गोळा करण्यास कमी केले नव्हते आणि युद्धबंदीनंतर त्या शांतिदिनार्थ त्यांस बळाने तास अर्धातास चूप बसावे लागे; पण लोकमान्यांचे मृत्यूसाठी दुःख वाटण्याचा बंदीवानास अधिकार नव्हता. त्यासाठी जेवण सोडले म्हणून म्हटले तर त्वरित राजद्रोह्यांशी संबंध ठेवल्याचा खटला आणि बेडी! म्हणून बंदीवानांनी कारण बोलू नये. हळूहळू आपण होऊन अधिकाऱ्यांस कळले की लोकमान्यांसाठी हे हजारो बंदीवान आज उपवास आचरीत आहेत. एक-दोन तासांत ही बातमी चहूकडे पसरून संघटित उपवास हजारो बंदीवानांनी केला कसा याचे अधिकाऱ्यांस सक्रोध आश्चर्य वाटले आणि ते आश्चर्य होतेही. नऊ वर्षांपूर्वी टिळकांचे नाव माहीत असणारा शेकडा एक असता नसता; आणि राष्ट्रीय दुःखासाठी एक दिवस उपवास करून रिकाम्या पोटी दिवसभर राबत ते कठोर परिश्रम करण्याइतका राष्ट्रीय वळणाचा मनुष्य तर हजारात एकच मिळता. त्याच अंदमानात आठ-नऊ वर्षांच्या प्रचाराने इतकी संघटना झाली

आणि राजकीय कळकळ उत्पन्न झाली की ठिकठिकाणच्या पुढारी देशसेवक बंदीवानांना कारागृहातून दोन तासांत निरोप पोचू शके आणि हजारो बंदीवान एकमताने राष्ट्रीय दुःख पाळू शकत.

## सभाही गुपचूप भरू लागल्या!

तीच गोष्ट सभांचीही असे. बाहेर वसाहतीत आमच्या संस्थेतील प्रमुख मंडळी सभा भरवून वेळोवेळी लोकांत जागृती करीत, राजकारणादिक विषयावर त्यांस व्याख्याने देऊन शिक्षित करीत. अशा सभा अर्थातच धोक्याच्या असत. कारण बंदीवानांस एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात जाणे निषिद्ध असे; आणि या सभांतून तर शंभर शंभर बंदीवानही पुढे पुढे एकत्र होत आणि ते सर्व ठिकाणांहून येत. ही शक्यता अर्थातच त्या वसाहतीत राष्ट्रीय चळवळीस अंतःस्थपणे अनुकूल असलेल्या बंदीवान आणि स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या सहाय्यानेच घडून येई. पण एखादे वेळेस ऑफस होऊन ते शेलकेचे शेलके पकडले जाण्याचाही पुष्कळ संभव असे. अशा प्रसंगी त्या आम्हां देशभक्त वीरांची जी धांदल उडे ती अगदी चिरस्मरणीय असे. पीनसबेग नावाच्या एका जिल्ह्याचेच उदाहरण घेऊ. येथे एकदा सभा भरवायचे ठरले. लांबून लांबून मंडळी कोणी काही निमित्ताने कोणी काही अशी आली. अंतःस्थ जागी दूरवर पहारे ठेवून सभा भरली. आता राष्ट्रीय आवेश सर्वांत भरू लागतो तोच दूर एक परिचित पोलीसच्या मुख्य अधिकाऱ्यांपैकी गृहस्थ दिसला. मग काय गडबड विचारता? ते वक्ते, ते श्रोते, तो भरू पाहणारा राष्ट्रीय आवेश, जो तो गवतातून, दगडाआडून, चाळीमागून, कुंपणावरून लपत उड्या टाकून पार. जे एक दोघे उड्या टाकताना पडले तेच काय ते पाडाव झाले. पोलीस अधिकारीही परिचितच होता. वर कोणी अशा अंतःस्थ सभा भरत असतात म्हणून चुगली केली होती म्हणून त्यास वरिष्ठांची आज्ञा झाली होती म्हणून तो आला. नाहीतर त्याच्या अंगणातील सभेकडे देखील झुकता ना. त्याने उड्या टाकताना पडले ते अर्थातच पाडाव करून त्यांस धाकदपटशा दिला; पण ते त्या जिल्ह्यातील असल्याने आणि नुसते एकत्र बसण्यास रविवारी फारसा प्रत्यवाय बाहेर नसल्याने इतरांची नावे न विचारता पोलीस महाशयांनी सभाबिभा काही नव्हती असे कळविले. परंतु तेथील एक मराठी बंदीवान, जो पुढारी असे त्यास, पुढे हळूच लिहिण्याच्या कामावरून कष्टाचे कामावर धाडण्यात आले. दोन आठवडेही लोटले नसतील आमच्या मंडळीने वशिला लावून पुन्हा त्यास लिहिण्याचे कामावर नेमून टाकविले.

अंदमानात आपल्या देशातील रीतीप्रमाणेच दसरा, दिवाळी आणि होळी हे सण मोठ्या थाटाने पाळले जातात. तिकडे एक अखिल हिंदूंचे, एक शिखांचे आणि एक आर्यसमाजाचे तात्पुरते स्थान अशी तीन हिंदू देवळे आहेत. त्या सणांच्या दिवशी सर्व हिंदू बंदीवानांस सुट्टी देण्यात येते आणि बाजारातून संध्याकाळपर्यंत मोकळे फिरता येते. कारागारातील बंदींना मात्र बाहेर जाता येत नाही. या सणांच्या यात्रांचा उपयोग आम्ही आपल्या प्रचारकार्यास शक्य तितका करून घेण्याचे धोरण धरले होते. आमच्या बाहेरच्या मंडळींनी त्या दिवशी लहानमोठ्या संघांनी जमून सार्वजनिक ज्ञान आणि राष्ट्रीय भावना उत्पन्न करणारी भाषणे वा संवाद करावे. देवळातून पुराणिक आणि पुजारी यांसही ते वळण लावण्यासाठी झटावे. जातिनिर्विशेष हिंदूंची सहभोजने घडवून आणावी. अशा वेळी भोजनाचे आधी सर्वांनी राष्ट्रीय प्रार्थना म्हणाव्यात. गीतेवर पुराणे आणि आर्यसमाजी भजने बंदींकडून म्हणवून घेण्यात यावीत. शेकडो साधारण अशिक्षित हिंदू बंदींत या सणाचे दिवशी राष्ट्रीय विचारांची आणि राजकारणाच्या जिज्ञासेची आणि

रुचीची बीजे अशा रीतीने पेरण्यात येत. या बाहेरील चळवळीत पुढाकार घेणारे जे आमचे सहकारी असत - जे पूर्वी शिक्षा लागून आले तेव्हा प्रथमतः कारागारात आमच्याबरोबर होते आणि तेथून संस्थेच्या प्रचारकत्वाची योजना आणि व्रत घेऊन बाहेर चांगल्या लेखक - कारखानदार गणक - अशा वर्चस्वाच्या जागी नेमलेले असत - त्यांची नावे येथे देणे किती वेळा तरी अगदी कर्तव्य म्हणून वाटते. पण या आवृत्तीपुरता तरी तो मोह त्यांच्याचसाठी आवरावा लागत आहे. त्यांच्यामध्ये कित्येक धारवाड, अकोला, बिहार इत्यादी बाजूचे सुशिक्षित गृहस्थ असून त्यांना जरी सामान्य अपराध्यांत गणले गेले होते तरी त्यांच्यावरील खटले निःसंशयपणे राजकीय स्वरूपाचेच असल्याने ते राजबंदीच होते. आणखी काही अगदी अशिक्षित आणि चोरी, डाके, हत्या इत्यादी जघन्य अपराध पूर्वी केलेले असताही आता इतके निवळलेले होते की ते अपराध त्यांच्या आत्म्यासच अधोगामी करू शकले नाहीत हे पाहून कोणासही आनंद वाटावा. या वर उल्लेखिलेल्या बंदीवानांपैकी वर वर्णन केलेल्या प्रकारच्या सभा आणि चळवळी करताना काही प्रसंगी धरले जाण्याचीही पाळी आली, त्यांस चळवळे म्हणून अंदमानातील झटपट निर्बंधान्वये सहा महिने, वर्ष वर्ष. कारागाराच्या शिक्षाही होत आणि वसाहतीतले सुख आणि अधिकार त्यापुरते छिनले जात. पण त्यांनी ती संकटे सोसावी, त्यांची देशभक्ती कारागारात राजबंदी म्हणून गणलेल्या बंदीवानांसही आदरणीय व्हावी अशा प्रामाणिक आणि उत्कट स्वरूपाची होती.

## राजबंद्यांचा सन्मान होऊ लागला.

यांच्या साहसाविषयी एकच आणखी उदाहरण सांगू. राजबंदींशी बोलण्याची देखील अंदमानात कोण चोरी होती हे आम्ही मागे सांगितलेच आहे. कित्येकांस त्यासाठी पदच्युत व्हावे लागे. कित्येकांस लेखनकामावरून दूर होऊन तेलाच्या घाण्यात राबावे लागे. पण तरीही जेव्हा हिंदुस्थानातून सैनिकी शिक्षा झालेल्या राजबंदींच्या टोळ्या येऊ लागल्या तेव्हा पोलिसांच्या सर्व व्यवस्थेस विफळ करून या आमच्या सहकारी मंडळींनी त्यांस नौयानावरून कारागार येईतो भेटून अंतःस्थ समारंभ करून सन्मानाने फळफळावळ द्यावी. त्याचप्रमाणे जेव्हा राजबंदीवानांची राजक्षमेनुरूप सुटका होऊ लागली तेव्हा त्या परतणाऱ्या देशभक्तांचा सन्मान करून त्यांस प्रवासातील फराळाचे द्यावे, ज्यास बंदीचेच कपडे होते त्यांस नवीन कपडे द्यावे, वाटल्यास थोडेबहुत पैसेही द्यावे. आणि सर्व अंतःस्थपणे? कारण याची प्रसिद्धी झाली तर सरकारी शासन होऊन ते ते लोक ''मट्टीमें मिल जाते''. हा सगळा व्यय ते आपल्या तुटपुंज्या खिशातून आनंदाने वर्गणी जमवून करीत.

कारामंडळासमोर आम्ही ज्या गोष्टी अवश्य सुधारणीय म्हणून आग्रहाने मांडलेल्या होत्या त्यांत अंदमानात बंदीवानांस शिक्षण घेण्यास ज्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष आडकाठ्या आणण्यात येत त्यांचा प्रमुखपणे उच्चार केलेला होता. ते कारामंडळ जाताना त्यांनी अगदी त्वर्य (urgent) म्हणून ज्या सुधारणा तिथे करून टाकल्या त्यांत वैद्यकीय व्यवस्था ही पहिली सुधारणा. रबरकाम, जंगलकाम इत्यादी अत्यंत सक्त कामातील सक्तीची ढिलाई ही दुसरी सुधारणा आणि तिसरी सुधारणा आम्ही मागितलेली शैक्षणिक स्वतंत्रता बंदीवानांस पूर्वीपेक्षा पुष्कळ अंशाने देण्यात आली. आता शिक्षण हा अपराध राहिला नव्हता ना कोणी बंदीवान बारीसारखा पाटी पाहिली की तडातड फोडीत कामगारांत धिगाणा घालीत जाई. त्यातही त्या वेळचे बंदीपाल आणि पर्यवेक्षक दोघेही शिक्षणप्रसारास

अनुकूल असत. अशी संधी साधून आम्ही तेल-कोठाराच्या आमच्या सापेक्ष स्वतंत्रतेचा आणि जागेचा या दिशेने शक्य तितका उपयोग करून घ्यावयाचे ठरविले. आम्ही प्रथमपासून शिक्षणप्रसारासाठी किती धडपडत होतो हे त्या बंदीपालाने पूर्वी पाहिलेले आणि ऐकलेले होते. पण पूर्वी जी सहानुभूती त्यांना दाखविता आली नाही ती आता अधिकार हाती येताच ते दाखवू शकले. मी त्यांच्याशी - चर्चा करून मुलांच्या टोळीत एक शिक्षक नियुक्त करून मुलांकडून कामाप्रमाणेच प्राथमिक शिक्षणही करवून घ्यावे असे ठरविले. त्याप्रमाणे एका राजबंदीचीच त्या कामावर योजना झाली. अल्पवयी अपराध्यांतून शिक्षणाने पुष्कळ तरुण उत्तम नागरिक निघू शकतात हा कारागार संस्थेचा जगभर अनुभव आहे. त्या मुलांवर नेमलेल्या राजबंदी गुरुजींनी आपले काम चोख रीतीने बजाविले. त्यांस नुसते अक्षरी शिक्षण देत नसून त्यांस ते आमच्या तत्रस्थ शिक्षणक्रमाप्रमाणे मुख्यतः राष्ट्रीय आणि आत्मिक शिक्षण देत असत. गीतेतील एखादा श्लोक, धार्मिक ग्रंथातील, उत्तम तत्वे प्रत्यहीच्या राजकारणी बातम्या यांचाही त्यांस नित्य परिचय करून दिला जाई. हिंदी भाषा आणि नागरी शिकविली जाई. मी अंदमानातील लोकांकरिता काही राष्ट्रीय गाणी हिंदीत केली होती. ती आणि इतर हिंदी राष्ट्रीय गाणी अंदमानातील स्वतंत्र लोकही उतारे करून नेत आणि मुलांस शिकवीत.

## मोठ्यांसाठीही शिक्षणाची सोय

कारागारीय मुलांच्या टोळीत शिक्षणाची व्यवस्था होताच मी मोठ्या बंदीवानांसाठी तेल-कोठारातच व्यवस्था उघड करविली. आजपर्यंत हे काम लपूनछपून करावे लागे; पण आता ते प्रकटपणे होऊ लागले. माझ्या देखरेखीखाली नारळ कामातील शंभर-दीडशे बंदीवान असत. मी त्यांस दोन तास शिकण्यासाठी सुट्टी देई. नंतर ते टोळ्याटोळ्यांनी शिकत. रविवारी बंदीवानांस एकत्र बसून वाचण्यास आता पूर्वीप्रमाणे आडकाठी नव्हती. त्यामुळे आमच्या आठवड्याच्या ‘पळत्या बैठकी’ आता चांगली मांडी घालून बसू लागल्या आणि व्याख्याने झडू लागली. या दिलेल्या स्वातंत्र्यामुळे बंदीवान उद्दाम झाले? का काम कमी करू लागले? का शिस्त बिघडली? मुळीच नाही. उलट पहिल्याने शिस्त बळानेच पाळावी लागे ती आता कर्तव्य म्हणून पाळली जाऊ लागली. दहा-पाच मंडळींत एखादा बेशिस्त वागू लागताच किवा मारहाणीवर येताच त्यांच्यातीलच कोणी तरी म्हणे ‘‘ए हरामी! अब बिचारा डिगनसाहेब और बाबूजी हम लोगोंको इच्छा रखते हैं तो तुम सैतानी करता है आं? बारी के दिन भूल गये!’’

परवानगीने जितके करता येईल तितके राष्ट्रीय कार्य करून जे तसे करता येईना ते पूर्वीप्रमाणेच अंतःस्थपणे केले जावे. उदाहरणार्थ, श्रीगोविदसिंहाची जयंती. शीख हिंदूत प्रेमरज्जूंचे आणि एक संस्कृतीच्या अभिमानाचे बंधन दृढ व्हावे म्हणून आम्ही ही जयंती मोठ्या प्रमाणावर करावयाचे ठरविले. तो दिवस रविवारचा होता. त्यामुळे सकाळी नवीन नियमाप्रमाणेच बंदीवान चाळीच्या चाळीतून एकत्र बसू शकले. परंतु या चाळीतील बंदीवान त्या चाळीत जाणे निषिद्ध असल्याने आणि सगळ्यांस माझे शब्द ऐकण्याची उत्सुकता असल्याने मी या नाही त्या कामाचे निमित्त काढून दोन-तीन चाळींतील सभांत भाषण केले. प्रत्येक चाळीत शीख राजबंदींबरोबरच अगदी प्रेमाने अशीख हिंदुबंदीही भजन करण्यात, गुरुगोविदाची कृत्ये ऐकण्यात आणि हिंदुसंघटनांचे महत्व श्रवण्यात अगदी दंग होते. त्या दिवशी आमचे कारखान्यात व आणखी एका ठिकाणी प्रसाद करविला होता. हा ‘कडाप्रसाद’

(सत्यनारायणाच्या प्रसादासारखा) सर्व बंदीवानांस वाटण्यात आला. नंतर रविवारच्या निर्बंधाप्रमाणे सर्व बंदी खोलीत बंद व्हावयाचे पण आम्ही युक्तिप्रयुक्तीने बहुतेक शीख राजबंदी आणि प्रमुख इतर बंदी यांस खोल्यांतून उघडे ठेवविले आणि ज्या वेळेस सर्व वरिष्ठ अधिकारी बाहेर जातात त्या वेळेस खालचे सर्व अधिकारी आमच्याच मताचे असल्याने त्यांच्या सहाय्याने गुंटीवर सभा भरविली. त्यात चाळीचाळींतील निवडक माणसे होती. आजूबाजूस वरिष्ठ अधिकारी येतो की काय ते पाहण्यासाठी शंभर मंडळी जवळ जवळ एकत्र होऊन पहारे ठेवून त्या कारागारातच राष्ट्रीय गाणी गाअली गेली आणि त्यानंतर माझे व्याख्यान उत्साहभराने ऐकले गेले - त्याच कारागारात की ज्यात पाच बंदी विचार करीत एकत्र बसणे अपराध असे. - मग राष्ट्राचे नाव घेणाऱ्याची गोष्ट तर बोलावयास नको; आणि कोणी ते घेणारा भेटला तरी राष्ट्राचे नाव समजणार किवा भावाने ऐकणारा शंभरी एकादाही आढळत नसे!

## वाचनालयाची वाढ

बंदीवानाच्या या बुद्धिविकासास उत्तेजन देण्यासाठी आम्ही जो कोणी शिक्षण तत्परतेने घेई आणि सभांस उपस्थित राही त्या बंदीवानास आरामाचे कामात काढीत असू. प्रथम पुस्तके आणि पाट्या आम्हास आमच्या संस्थेच्या व्ययाने पुरवाव्या लागत; पण आता शिक्षणप्रिय अधिकारी असल्याने सरकारी रीतीने पुस्तके व पाट्या बंदीस मिळाव्या म्हणून आम्ही आग्रह धरला. आवेदने आणि लिखापढी होता होता तसा हुकूम आला आणि पाट्या आणि क्रमिक पुस्तके सरकारी व्ययाने मिळू लागली. ती लोक किती उत्सुकतेने उपयोगात आणीत आहेत हे मी अधिकाऱ्यांच्या वारंवार निदर्शनास आणून द्यावे. ग्रंथालयात राजबंदींचीच पुस्तके पाहिजे त्या बंदीवानांस वाचावयास मिळण्याचीही सोय करण्यात येऊन त्यास परवानगी मिळविली. नंतर ग्रंथालयात सरकारी व्ययाने काही पुस्तके ठेवावी अशी सूचना केली. त्यांचे टाचण करण्याचे काम आमच्याकडेच आल्याने त्यात शक्य तितकी आम्ही राष्ट्रीय पुस्तके घालून मुख्य भरणा हिंदीचा मागविला. त्यांतील काही नावे वरील अधिकारी 'अनिष्ट म्हणून खुडीत तर ती आम्ही संस्थेकडून अंतःस्थपणे आणून टाकावीत. एवीतेवी शक्यतो सरकारद्वारा नाही तिथे अंतस्थपणे संस्थेद्वारा - पण राष्ट्रीय चळवळ त्या परिस्थितीत चालविता आली तोवर चालविली होती. या सरकारी पुस्तकात तमीळ, आंध्र, मल्याळी आणि कानडी या द्राविडसंघाच्या आपल्या हिंदुभाषांचीही पुस्तके बोलाविली होती.

## अधिकारी आश्चर्यचकित झाले!

या सर्व शिक्षणीय चळवळीचे फळ काही होते काय याविषयी एक दिवस येथील एका युरोपियन अधिकाऱ्यांशी बोलणे झाल्यावर ते फळ होते हे सिद्ध करण्यासाठी आम्ही तुरुंगातील हिंदूबंदींची संख्या घेऊन त्यांत साधारण लिहिणे आणि वाचणें शिकलेले किती आणि त्यांत साधारण शिक्षितात त्या कारागारात आल्यानंतर शिकलेले किती याचे आकडे गोळा केले. त्यावरून असे दृष्टोत्पत्तीस आले की हिंदू बंदीवानांत शेकडा ८० वर लिहिता-वाचता येणारे असून त्यांत अंदमानात आल्यावर शिकलेले शेकडा नव्वद होते. याचा पडताळा पाहण्याचा विचार करून एका रविवारी तो अधिकारी एकाएकी अवेळी खोल्याखोल्यांतून हिडला तेव्हा नाना विषयांवर पुस्तके वाचण्यात वा

राष्ट्रीय गाणी म्हणण्यात बंदीवानांतील अनेक लोक गुंग झालेले पाहून त्या पुरातन अधिकाऱ्यांस आश्चर्य वाटले. कारण त्याने दहा वर्षांपूर्वीचे दिवसांत रविवारी बहुतेक बंदीवान फासे खेळण्यात, जुगार खेळण्यात, शिव्यागाळीत आणि अनेक कुकर्मात कसे गढलेले असत हे पाहिलेले असे. त्याने हा फरक पाहून विस्मय प्रदर्शित केला.

## शिक्षणाची व्याख्या

आम्ही वर साधारण लिहिता वाचता येणाऱ्यांचीच संख्या दिली आहे. पण आम्ही तिथे शिक्षणाची व्याख्या म्हणजे अशी ठरविलेली असे की, ज्यास आपल्या देशाची आणि प्रचलित राजकारणाची इतकी माहिती आहे आणि ज्याचे सर्वसाधारण ज्ञान इतके विकसित झालेले आहे की तो भावी विधिमंडळात किवा पंचसभेत प्रतिनिधी निवडून देण्यासाठी स्वतःचे मत त्यातील अर्थ समजून देऊ शकावा. या मापानेही या हिंदू बंदींत शेकडा चाळीस तरी लोक 'शिक्षित' म्हणवून घेण्यास योग्य झालेले होते. युरोपातही Voter किवा मतदार सामान्यतः इतकाच शिक्षित असला म्हणजे चालतो.

त्या तेलगोदामात आम्हास फार दिवसांनी व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे काय ते थोडे तरी उपभोगावयास मिळाले होते. सकाळी नव्हे पहाटेदेखील केव्हा केव्हा खोली बाहेर सोडण्यात येई. त्या वेळी आम्हाला लख्ख चांदण्यात उभे राहण्याचा आनंद दहा वर्षांनी पुन्हा अनुभवण्यास मिळाला! फार गंमत वाटे. तरीही त्या चांदण्या रात्रीची छाया असेच - की हे कारावासातील चांदणे! जसे स्मशानातील!

## बाबांची ती कष्टभोगी धैर्यशाली मूर्ती!

थोडे दिवसांत या स्मशानातील चांदण्यात माझेसह माझ्या ज्येष्ठ बंधूंनाही भागीदार होण्याची सवलत मिळाली. मला त्यांचेसह दोन-चार तास एकत्र बसता येऊ लागले पण ते केवळ त्यांचे दुःख पाहून हळहळण्यापुरतेच. कारण त्यांची प्रकृती क्षयावर जात खोकला इतका वाढलेला असे की एकदा ढास लागली की अर्धा-अर्धा तास श्वासाची फुरसत नसे! तसा खोकत खाकरत वेताच्या फाटक्या खुर्चीवर धापा टाकीत पण तोंडावरील धैर्याचे हसू मावळू न देत बसलेला तो कष्टभोगी देशभक्त - माझा ज्येष्ठ बंधू - त्याची ती चवाळ्याच्या रकट्याचा एक पायघोळ कोट घातलेली बंदीवान करुण मूर्ती मला अजून जशीची तशीच दिसत आहे!!

या स्मशानाच्या चांदण्यात, या किंचितमात्र लाभलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यात शक्यतो अधिक प्रचारकार्य करण्याचे नादात शक्य तितके कमी झुरत राहण्याचे व्रत मनाकडून अंगीकारवून दिवस कंठीत असता एके दिवशी सकाळी माझे सहकष्टभोगी राजबंदी श्रीयुत - यांनी लगबगीने येऊन एका वर्तमानपत्राचा तुकडा माझे टेबलावर आणून टाकला. अप्रकटपणेच तो वाचावयाचा होता. नाहीतर कोणी पाहील! मी तो वाचला. पाहतो तो त्यात बातमी होती की सरकारने अंदमानची वसाहत बंद करण्याचा ठराव प्रसिद्ध केला असून नवीन बंदीवान येणे बंद होणार; इतकेच नव्हे तर आहेत त्या बंदीवानांनाही जर ते काही अटींवर अंदमानात राहणार नसतील तर परत स्वदेशातील कारागारात धाडण्यात येणार!

ही बातमी वाचताच आम्हास अर्थातच बरीच कृतार्थता वाटली. कारागारीय मंडळापुढे आम्ही अंदमानच्या बंदीवानांची जी दुःखे मांडली होती त्यांतील निर्भीड विधानांसाठीच आम्हास राजक्षमेचा लाभ मिळू दिला गेला नाही ही आमची निश्चिती होती, तेव्हा आपली सुटका न झाली तरी आपण या हजारो बंदीवानांचे हितार्थ जे काही करता येणे शक्य होते ते करून त्या कामी यश मिळण्यास आंशिकतः तरी कारणीभूत झालो ही आत्मप्रसन्नता आम्हास वाटू लागली.

बंदीवानांतील शेकडो जणांनी आमच्यावर कृतज्ञ आभारांचा पाऊस पाडला. त्यांच्यात ही गोष्ट सर्वजण जाणून होते की, आमच्या येण्याने आणि आम्ही आमच्या राजबंदींतील आणि इतर बंदींतील साथिदारांसह दहा वर्षे संघांची, वर्तमानपत्रांची, आवेदनांची, भांडणांची, विधिमंडळातील प्रश्नांची, प्रतिवादांची, पत्रांची जी चळवळ चालवीत आणली तिच्यामुळेच अंदमानकडे हिंदुस्थानचे आणि म्हणूनच हिंदुस्थान सरकारचे लक्ष प्रामुख्याने वेधले गेले आणि कारामंडळास (Jail Commission ला) अंदमानचा विषय निकराने हाती घ्यावाच लागला. माझे अभिनंदन करणाऱ्यांस मी म्हटले. ''अंदमान अखेर उठले! - ही घटना कोणच्याही एकाच गोष्टीचा परिणाम नाही तर दहा वर्षांच्या अव्याहत आणि सर्वांगीण चळवळीचा तो परिणाम आहे. त्यासाठी तुम्ही सर्वांनीच विशेषतः राजबंदींनी कष्ट सहन केले आहेत त्यांचे आंशिक साफल्य झाल्याचे श्रेयही तुम्हा सर्वांचे आहे. '' असे मी सर्वांस सांगून त्यांचे प्रत्यभिनंदन केले.

## डोके बरेच फुटले पण दगडी भिंत पडली

'आज बारीबाबा पाहिजे होते,' मी विनोदाने माझ्या मित्रास म्हटले. मला बारी नेहमी म्हणे ''सावरकर, दगडी भितीवर निष्कारण का डोके आपटीत बसला आहात! त्याने दगडी भित का पडते! केवळ डोके मात्र फुटेल!'' आज त्यांस सांगता आले असते की ''मि. बारी, अंदमानच्या कारागाराच्या दगडी भितीवर डोके आपटीत राहिल्याने डोकेही बरेच फुटले खरेच पण तुझी दगडी भिंतही काही पडल्यावाचून राहिली नाही!''

त्या रात्री मी त्या बातमीचा विचार करून त्यांच्यापुढे हिंदू हिताच्या दृष्टीने त्या सरकारी धोरणास कुठवर पाठबळ दिले पाहिजे आणि कुठे विरोध केला पाहिजे हे मनाशी ठरविले. हेही माझ्या ध्यानात आले की या माझ्या नवीन धोरणामुळे मला लोकप्रियतेचा प्रथम प्रथम तरी बळी द्यावा लागेल! लोकहितासाठीच लोकांच्या दोषास काही काळ पात्र व्हावे लागेल. जसे शुद्धीच्या चळवळीने त्याच वसाहतीत आरंभी झाले!

कारण अंदमानची वसाहत सर्वांशी 'तोडून' टाकण्याचे धोरण मला प्रथमपासूनच मान्य नव्हते. मला अंदमानात जे काही तोडून घ्यावयाचे होते ते ती वसाहत नसून ज्या दुष्ट, अप्रगतिशील आणि अहितकारक निर्बंधाखाली तिचे शासन चालले होते ते निर्बंध होत. बंदीवसाहत मला पाहिजे होती; पण ती अशा धोरणाने भरभराटविण्यात यावी असे मला वाटे की ज्या धोरणाने इंग्लंडच्या जन्मठेपीवर धाडलेल्या अपराध्यांची कॅनडा इत्यादी देशांतील वसाहत वाढविली गेली. इंग्लंडमध्ये चोरीमारीपासून तो हत्येपर्यंत ज्या ज्या अपराध्यांस भयंकरातील भयंकर म्हणून समजण्यात येई त्यास दंडित करून कॅनडात धाडण्यात येई. इंग्लंडच्या सभ्य समाजास घातकारक वाटणारे ते त्या दंडितांचे भयंकरत्वच त्यांना कॅनडातील हिस्त्र पशूंनी आणि हिस्त्र

परिस्थितीने व्यापिलेल्या भूभागास वसविण्यासाठी उपयोगी पडले. सभ्य समाजातील सौम्य निर्बंधाहून किंचित् कठोर आणि बरेच कडकपणे पाळविले जाणारे निर्बंध घालून त्या शासनांचे देखरेखीखाली हळूहळू माणसाळविले असता क्रूरातील क्रूर अपराध्यांचे भयंकरत्वही बंदीवानांची एखादी वसाहत लागवड करून घेण्यास उपयोगी पडते. केवळ त्या वसाहतीचे धोरण त्या बंदीवानांचा नाश करण्याचा किवा प्रतिशोधाचा (सूडाचा) नसून त्यांचा समाजास उपयोग करून घेण्याकडे व्यय करण्याचा असला पाहिजे. कॅनडा देशात अंशतः अमेरिकेत, बहुशः आफ्रिकेत जे इंग्रजी अपराधी दंडित होऊन गेले त्यांस कडक निर्बंधाखाली शक्यतो स्वातंत्र्य देत देत त्यांच्या उग्रतेचा आणि धाडसाचा उपयोग करून घेण्यात आला. त्या ओसाड आणि हिंस्त्र प्रदेशात वसाहती बसविण्यात आल्या. जे मनुष्यबळ इंग्लंडात नुसते कारागारात कुजत पडे तेच तिकडे कॅनडादिक प्रांतांत पेरून त्याच्या संततीची वाढ होऊ दिल्याने ते कसे शतपट वृद्धीस पाऊ दिले- आणि म्हणून आज त्यांच्या संततीची स्वतंत्र राष्ट्रे निर्माण होऊ शकली. इंग्लंडचे मनुष्यबळ आणि राष्ट्रबळ वाढू शकले. हेच धोरण अंदमानमधील हिंदी बंदीवानांच्या वसाहतीचे मुळाशी असावे हे आम्हास राष्ट्रहिताचे दृष्टीने अवश्य वाटे.

## दुर्गंधी खताप्रमाणे अपराध्यांचा उपयोग करा

अंदमानची बंदीवानांची वसाहत मूलतःच तोडून टाकणे आणि आजवर त्या दृष्टीने झालेले कष्ट आणि व्यय पाण्यात पडू देणे हे आमच्या चळवळीचे ध्येय नव्हते. केवळ त्या वसाहतीस राष्ट्रीय धोरणाने शासित केले जावे असे आम्हास वाटे. कारण जर जन्मठेपीचे बंदीवान अंदमानात किंवा कोणच्याही इतर द्वीपात नवीन वसाहत करण्यास धाडलेच नाहीत तर त्यांस चौदा वर्षे हिंदुस्थानच्या एखाद्या कारागारात सडत ठेवण्यात येणार. त्यामुळे त्यांचे जीवन अत्यंत दुर्धर होईल हे तर आहेच; पण राष्ट्रीयदृष्ट्या अशा भयंकर धाडसी आणि बहुधा कडव्या गुणांचाही दुर्गंधी खताप्रमाणे किवा स्फोटक द्रव्याप्रमाणे योग्य विनियोग केला असता जो उपयोग करून घेता येतो त्यास समाज अंतरतो. त्याहूनही मोठी हानी ही होते की, हे इतके मनुष्यबळ कारागाराच्या उत्तप्त खडकाच्या आगीत जळून व्यर्थ गेल्याने त्यांच्या संततीच्या वाढीस राष्ट्र नित्याचे मुकते.

आमच्या मते अपराधप्रवणता ही आनुवंशिक असते हे प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या हातून त्या प्रमेयातील सत्यांशाचा फारच अतिरेकी विपर्यास करण्यात येत असतो. प्रत्येक दंडिताची दुष्टता, प्रत्येक पाप्याचे पाप त्याच्या संततीत आनुवंशिक परंपरेने उतरते ही गोष्ट खोटी आहे. अपराधप्रवणता संततीत उतरणे हे आनुवंशिकतेवरच केवळ अवलंबून नसून ती गोष्ट अनेक तदितर कारणांचे फलित असते. शिक्षण, परिस्थिती, संगती अशा अनेक कारणांत, मूळ बीजातून विक्षिप्त झालेली प्रवृत्ती हे, संततीत अपराधप्रवणता संक्रमित होण्याचे एक कारण आहे. दुर्गुण आणि सद्गुण जर निरपेक्षपणे संततीत उतरतेच तर शिवाजीचे पोटी संभाजी, आणि इंग्लिश दंडितांच्या ज्या टोळ्या कॅनडात प्रथम धाडण्यात आल्या अशा चोर दरोडेखोर इत्यादी महान अपराध्यांच्या पोटी एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करणारे आणि ते अव्याहत चालविणारे कॅनेडियन लोक उत्पन्न झाले नसते. कवीचा मुलगा जसा हटकून कवीच निपजतो असे नाही तसे दुष्ट अपराध्याचा मुलगा दुष्ट निपजतोच असेही नाही.

एतदर्थ कारागारात जन्मभर कोंडून आपल्या राष्ट्रातील दंडितांच्या संततीस मुकणे म्हणजे त्या दंडितांच्या अपराधासाठी केवळ त्यांनाच दंड न करता राष्ट्रासही दंड करण्यासारखे आहे. त्यापेक्षा त्या दंडितास एखाद्या अंदमानसारख्या जंगली वसाहतीत धाडून, तो भूभाग लागवड करण्यासाठी त्यांच्याकडून मनुष्योचित वर्तन आणि श्रम करवून घेणाऱ्या सापेक्षतः कडक निर्बंधाखाली त्यांचे शासन करवून, काही काळाने त्यांच्यापैकी ज्यांच्याज्यांच्यात सामाजिक सद्‌गुण विकास पावत आहेत असे वाटेल त्यांस सापेक्ष स्वातंत्र्य देऊन, त्यांना संसार थाटू देऊन, संपत्ती आणि संतती उपार्जन करण्यास परवानगी देणे हेच धोरण सरकारी अपराध विभागाने स्वीकारणे राष्ट्रीयदृष्ट्या इष्ट आहे. अंदमानच्या वसाहतीविषयी हेच धोरण सरकारने स्वीकारावे असे आमचे मत होते. म्हणजे त्यायोगे अंदमानसारख्या एका नवीन द्वीपाची लागवड होऊन आणि तेथे दंडितांच्या संततीची एक हिंदी होतकरू वसाहत निर्माण होऊन हिंदुस्थानाला टाकाऊ ठरलेल्या आपल्या मनुष्यबळापासूनही इतके महत्वाचे उत्पन्न काढता येणारे होते. अंदमानची बंदीवसाहत हानिकारक नव्हती. ती तोडावयाची नव्हती; तर ज्या अनुदार निर्बंधाखाली तिचे शासन होत होते ते निर्बंध तोडावयाचे होते. त्या अंदमानातील दंडितांस सुधारणे आणि त्यांच्या संततीस उपजताच सभ्य जगताचे नागरिक बनवील असे शिक्षण देणे, हे त्या वसाहतीचे निश्चित धोरण असावे आणि या धोरणास अनुकूल अशाच निर्बंधाने तिचे नियमन व्हावे असा आमच्या चळवळीचा मुख्य हेतू होता. आम्ही कारामंडळापुढे दिलेल्या लेखी साक्षीत आणि केलेल्या तोंडी चर्चेत हे स्पष्टपणे बळपूर्वक प्रतिपादन केलेले होते.

परंतु सरकारी ठराव जो प्रसिद्ध झाला त्यात अंदमानात असलेल्या वसाहतीचे दोष आणि तिथे चालू असलेल्या निर्बंधांचे अमानुष कठोरत्व हे जरी पर्यायाने मान्य केलेले होते - आणि त्यापुरती आमची चळवळ जरी यशस्वी झालेली होती - तरी त्या चुका सुधारण्याचा उपाय म्हणून ती वसाहत बंद करून, तिकडे जन्मठेपीचे बंदीवान धाडण्याची पद्धती सोडून टाकून, उलट तिकडे असलेल्या बंदीवानांसही हिंदुस्थानी कारागारात परत धाडण्याचा जो निश्चय प्रसिद्ध झाला होता, तो उपाय नसून अपाय आहे असे आम्हास वाटल्यामुळे आम्ही त्याविरुद्ध देशात आणि त्या वसाहतीत विरोध करण्याचे ठरविले.

## विपक्षांची सहानुभूती! स्वपक्षाचा विरोध!!

या कामी दुर्दैवाने आम्हास पूर्वीच्या विपक्षाची सहानुभूती आणि पूर्वीच्या स्वपक्षाचा विरोध सहन करावा लागणार असे दिसू लागले. कारण अंदमानातील स्थानिक इंग्रज अधिकाऱ्यांस आमच्या मताप्रमाणेच ती वसाहत तुटू नये- निदान तिकडे असलेले हजारो बंदीवान तरी एकाएकी परत स्वदेशात धाडण्यात येऊ नयेत असे वाटे. त्यांस असे वाटण्याचे कारण अर्थातच आमच्याप्रमाणे हिंदी राष्ट्रीय कल्याण हे नव्हते. त्याचे कारण मुख्यतः हे होते की त्या ठिकाणी असलेल्या ओव्हरसीअरपासून कमिशनरपर्यंत इंग्रजी अधिकाऱ्यांचा अधिकारभंग होऊ नये! त्यांची उचलबांगडी होऊन वसलेले लाभकारक बस्तान डळमळू नये!! तेथे शेकडो लोकांवर जवळजवळ अनिर्बंध सत्ता जी त्यांस गाजविता येई ती त्यांची हिंदुस्थानातून कुठे बदली झाली तर थोडीच गाजविता येणार होती, आणि कित्येकांस तर हिंदुस्थानात उलट तितक्याच अधिकाराची आणि सोयीची जागा मिळेल की नाही याचीही शंकाच

होती. म्हणून ते सर्व स्थानिक अधिकारी निदान तिथल्या बंदीवानांस तरी हिंदुस्थानात एकाएकी धाडण्यात येऊ नये म्हणून सरकारावर दाब टाकण्यासाठी आणि सरकारी आज्ञा शक्य ती प्रलोभने बंदीवानांस दाखवून कार्यात परिणमित न व्हावी यास्तव खटपट करू लागले. आम्हीही तेथील बंदीवानांनी हिंदुस्थानात जाऊ नये म्हणूनच खटपट करू लागलो, तेव्हा या कार्यी सरकारी अधिकाऱ्यांचे आणि आमचे चांगलेच सूत्र जमले.

परंतु या अपूर्व देखाव्यानेच तेथील बंदीवानांत विलक्षण बुद्धिभेद उत्पन्न झाला, सरकार म्हणेल त्यात काहीतरी गोम असलीच पाहिजे हा सरकारी वर्तनाविषयीचा सर्वसाधारण अविश्वास आपल्या राष्ट्रांच्या आजपर्यंतच्या अनुभवाने सामान्य लोकांत आमच्यासारख्या प्रचारकांनी उत्पन्न केला होता; परंतु अज्ञानी माणसाच्या एकदा एखाद्याविषयी अविश्वास उत्पन्न झाला की तो मनुष्य एखाद्या वेळी चुकून वा हेतुपूर्वक एखादी गोष्ट त्या अज्ञानी मनुष्यास लाभकारक अशी जरी करू निघाला तरी त्यात ''काही तरी गोम'' असणारच म्हणून ती गोष्टही अज्ञानी मन करण्यास धजत नाही. कच्चा गडी एखाद्या पटाईत मल्लासी नियुद्ध खेळावयास उतरला तर त्या मल्लाचा चुकून पुढे केलेला हातही धरण्यास, क्वचित तो आपल्यास फसविण्यासाठीच पुढे केलेला आहे असे समजून, जसा कचरतो आणि त्यावर उलट पेच मारण्याची संधी गमावतो तशीच साधारण जनसमूहाची राजकारणादिक व्यवहारात पुष्कळ वेळा स्थिती होते. तीच स्थिती अंदमानातील बंदीवानांची झाली. सरकारी अधिकारी जो जो त्यांस अंदमानातच रहा म्हणून सांगू लागले तो तो त्यांस वाटू लागले की हिंदुस्थानात जाण्यास सिद्ध होण्यातच आपले खरे हित असले पाहिजे! आपल्यास नेहमी फसविणारे अधिकारी म्हणतात जाऊ नका तर मग अर्थातच तेवढ्या एका कारणासाठीच जाणे हेच आपल्यास उपकारक आहे. यात जेव्हा मीही ''हिंदुस्थानात जाणे इष्ट नाही, इथेच रहा. नवीन सवलती लाभकारक आहेत'' म्हणून सांगू लागलो तेव्हा ते अगदीच घोटाळून गेले आणि मी सरकारी अधिकाऱ्यांसारखेच कसे सांगतो म्हणून आश्चर्य नि अविश्वासही प्रकट करू लागले. अशा रीतीनी आजवर माझ्या वचनात राहणारे कित्येक कसलेले स्नेही आणि साथीदारही त्या वेळेस माझ्या उपदेशाचा विरोध करण्यास अगदी निरुपाय म्हणूनच का होईना पण सिद्ध झाले.

कारण सरकारी आज्ञेतील ''बंदीवान हिंदुस्थानात परत धाडा'' या वाक्यातील गोम मला जशी झटकन दिसली तशी त्यांस दिसली नाही. त्यांचा असा समज झाली की, हिंदुस्थानात परत धाडणे म्हणजे आपली बंदी तोडून टाकून देशात पाय टाकताच आपणास साफ सोडून देणे! हजारो बंदीवान आपण हिंदुस्थानात जाण्याचे मान्य करताच सरकार आपणास सोडून देणार - जन्मठेपीच्या बंदीची ही मारक शृंखला देशास पाय लागताच गळून पडणार या भुमकेसरशी अगदी वेडावून गेले. आज वाटेल ती सवलत दिली तरी या अंदमानचे तोंड पाहणे नको - आम्ही स्वदेशात भुके मरू पण सुटका करा, हिंदुस्थानात धाडा ही एकच ओरड झाली. आम्ही पुष्कळ सांगितले की, ''अरे जन्मठेपींच्या या तुम्हां हजारो बंदीवानांस एकाएकी हिंदुस्थानच्या तटावर नेऊन साफ मोकळे सोडण्यास सरकार काय वेडे झाले आहे! हे काय कोणा राजा भोजाचे राज्य आहे! तुम्हांस हिंदुस्थानात नेऊन कारागारात आणि कोठड्यांत चौदा चौदा वर्षे मरेतो बंद करण्यात येणार आहे. या ''परत धाडण्याचा'' हा अर्थ आहे! म्हणून तुम्हास मते विचारून तुमच्या इच्छेप्रमाणे अंदमानात किवा देशात धाडण्याचा हा झालेला सरकारी ठराव एक वरदानच आहे असे समजून त्यांनी दिलेल्या नवीन सवलतींचा स्वीकार करून अंदमानात राहा! या सवलतींप्रमाणे

अंदमानातील वास्तव्य हिंदी कारागारातील वास्तव्याहून हजार पटीने तुम्हांस सुखकारक आणि तुमच्या राष्ट्रास हितकारक आहे!''

पण पहिल्या लाटेसरशी जी हुल्लड झाली त्यात साधारण बंदी तर काय पण राजबंदीवान देखील वाहून गेले. आणि छे! आम्ही हिंदुस्थानातच जाणार - आणि जाताच सुटणार म्हणून मनोराज्यात दंग झाले. आमच्या शब्दांस त्या मनोराज्यात इंग्रजी राज्याप्रमाणेच अगदी ''जप्त करण्यात आले! निषिद्ध वाङ्मय म्हणून बंदी करण्यात आले. ''

## लोकहितासाठीच लोकप्रियतेचा बळी

परंतु आमच्या स्वभावाची रचना अशी होती की, जेव्हा जेव्हा एखादी गोष्ट लोकहितकारक आहे म्हणून आम्हास निश्चित वाटून आम्ही ती कार्यात परिणामविण्यासाठी झटू लागताच लोकांच्या लक्षात तिचे ते हितकारकत्व प्रथमदर्शनी न आल्याने आम्हास लोकांच्या अप्रियतेस बळी पडावे लागले, तेव्हा ती गोष्ट घडवून आणण्याचा आमचा उत्साह अधिकच बळावू लागला. लोकांच्या अप्रियतेची लाट जितकी बलवत्तर होई तितकाच आमचा त्या कार्यास यशस्वी करण्याच्या प्रयत्नातील आवेशही अदम्य होत जाई. तो आमचा आम्हासही आवरेनासा होई. केवळ लोकप्रियतेसाठी म्हणून लोकहितकारक वाटत असलेले कार्य सोडणे हे स्वार्थीपणाचे अत्यंत निद्य स्वरूप होय अशी आमच्या मनाने अनेक अनुभवांनी खूणगाठ बांधून ठेवली होती. परंतु म्हणून जोवर लोकांस आमचे म्हणणे हितकारक आहे असे वाटत नाही तोवर त्यांस विरोध करण्यात किवा आमच्यावरची त्यांची बहुधा दिसून आलेली व्यक्तिनिष्ठा चलित होऊ देण्यात लोकांचा काही अपराध असतो असेही आम्हास कधी वाटले नाही. कारण जसे मतस्वातंत्र्य आम्हास आहे तसेच राष्ट्रीय हिताहिताच्या प्रश्नात ते समाजात प्रत्येकास आहे आणि व्यक्तिनिरपेक्ष ते त्यांनी बजाविणे हे आमच्याप्रमाणेच या प्रत्येकाचेही कर्तव्य आहे ही आमची धारणा असे. हळूहळू तडजोडीने आम्ही घेऊ; पण केवळ लोकप्रियतेकरता ते कार्य कधीही सोडण्यास सिद्ध नसू. लोकहितार्थ झटण्यात एक वेळ घर, दार, प्राणही सोडण्यास सिद्ध झालेले लोक लोकप्रियता मात्र सोडण्यास, लोकप्रियतेचा मात्र बळी देण्यास चटकन कचरतात हे आम्ही अनेक उदाहरणांवरून अनुभवलेले होते आणि त्यामुळे लोकहिताचा नाश झालेलाही पाहिला होता. म्हणून शक्यतो त्या मोहापासून स्वतःच्या चित्तास आवरण्याचा प्रयत्न यथाशक्ती आम्ही अनेक वेळा करून लोकहितार्थ स्वार्थाच्या इतर मोहाप्रमाणेच लोकप्रियतेचाही अवश्य तेव्हा बळी दिलेला आहे. तो सुखाने नव्हे तर अत्यंत कष्टानेच दिलेला असतो - केवळ कर्तव्यच म्हणून दिलेला असे हेही काही खोटे नाही.

अंदमानातील वसाहतीचे खरे स्वरूप आणि तिचे महत्व, तिच्या खऱ्या उणिवा आणि त्यांच्या निवारणाचे खरे उपाय यातील मर्म स्वदेशातील पुढाऱ्यांस पुरते अवगत नसल्याने स्वदेशीय विधिमंडळातील सदस्यापासून तो वृत्तपत्रीय लेखकापर्यंत सर्वांनी अंदमान समूळ उखडण्याविषयी आणि तेथील हजारो बंदीवानांस हिंदुस्थानात परत आणण्याचा ठराव केल्याविषयी आनंद प्रदर्शित केला होता. त्यामुळे तेथील बंदीवानांच्या हुल्लडीस अधिकच बळ

आले. आम्ही कारागारात बंद. तेथून जो प्रकटअप्रकट विरोध करू शकलो त्याचा परिणाम त्या प्रचंड हुल्लडीस थोपविण्यास तात्पुरता अक्षम होऊ लागला. तरीही आम्ही विरोधास कसून आरंभ केला.

हिंदुस्थान सरकारचा अंदमानची बंदीवसाहत तोडण्याचा सुटलेला हुकूम येताच जे बंदीवान अंदमानात होते त्यांस तरी परत हिंदुस्थानात जाण्याचे कार्य घडू नये म्हणून तत्रस्थ अधिकाऱ्यांनी बंदीवानांची मने अंदमानातच राहण्यास अनुकूल करून घेण्यासाठी आमच्या तेथून हिंदुस्थानात येण्याच्या आगेमागे अनेक सवलती देण्याची आश्वासने भराभर देण्यास आरंभ केला. प्रथम थोड्या सवलती पुढे केल्या; परंतु जेव्हा त्यांनी बंदीवानांचे मन अंदमानात राहण्यास वळेना तेव्हा आणखी सवलती एकामागून एक देण्याची आश्वासने अधिकारीवर्ग देऊ लागला. त्यांच्याशी चर्चा करून बंदीवानांचे मन वळविण्यासाठी बंदीवानांच्या लहानमोठ्या सभा आणि बैठकीही उघडपणे करण्यास मोकळीक देण्यात आली. या सवलतीत प्रथम प्रथम दहा वर्षांत सुटका आणि पाच वर्षांत कुटुंबातसुद्धा रहाण्याची परवानगी या सवलतींत मुख्य होत्या. त्याचे जोडीसच जे अशी स्वोपार्जित पद्धतीनं 'तिकिटे' काढून राहण्यास सुरवात करतील त्या बंदीवानांस पूर्वी मिळे त्यापेक्षा पुष्कळच अधिक परिमाणाने शेती आणि शेती सुरू करण्यापुरते पदार्थाचे भांडवल अगदी नावापुरत्या कराराने देण्यास सिद्ध झाले.

आम्ही या सवलतींचा उपयोग करून घेऊन बंदीवानांनी अंदमानात वसाहत करावी या पक्षाचे आहोत हे कळताच बंदीजगतात एकच खळबळ उडाली हे वर लिहिलेच आहे. त्यामुळे आमचे खरे मत काय आहे हे जाणण्यास बंदीवानांनी निरनिराळ्या पुढाऱ्यांस निरनिराळ्या मिषांनी कारागारात आमच्या भेटीस धाडण्याचा उपक्रम चालू केला. आम्ही त्या सर्वांस खालील आशयाचा उपदेश दिला.

''बंदीवानांपैकी बहुतेक लोक स्वदेशातील अगदी दरिद्री आणि कनिष्ठ थरातून आलेले आहेत. ते जरी हिंदुस्थानात आजच परत धाडण्यात आले आणि तेथील कारागारात सडत न पडता मुक्त करण्यात आले (ही आशा केवळ दुराशा मात्र होती. कारण अंदमानातून हिंदुस्थानात येताच त्यांस सरसहा सोडून देण्याची सरकारची आज्ञा नसून त्यांची चौदा वर्षे पुरती भरेतो त्यांस हिंदुस्थानातील कारागारात बंदच ठेवले जाईल ही आमची निश्चिती होती. ) तरीही काय? पुन्हा त्यांस दारिद्र्याचेच पंजात गवसावे लागणार. कोणी आपल्या भाऊबंदांनी एकदा हातभर शेतीचा वा झोपडीचा तुकडा आपल्या अनुपस्थितीत बळकावला म्हणून खटलेबिटले लढू लागतील; नाहीतर मारहाण करतील. बाकी तेही शक्य नसल्याने भीक मागत मागत थकून पुन्हा चोऱ्या दरोडेच करू लागणार, ही दुर्गती त्यांच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीनेही हितावह नाही. परंतु जर लोक अंदमानात मिळणारी आणि नवीन सवलतीप्रमाणे नीट संघटित प्रयत्न केला तर बऱ्या प्रमाणात मिळणारी शेती इत्यादी उपजीविकेची साधने स्वीकारून इथेच वस्ती करतील तर अंदमानची एक नवीन वसाहत हिंदुस्थानास लाभवून देण्याचे ते श्रेय संपादतील. अंदमानात पूर्वी अत्यंत नडणारी अडचण म्हणजे स्त्रियांची कमतरता आणि त्यामुळे स्वतंत्र घरे करून राहण्याकडे अप्रवृत्ती पण पाच वर्षांचे आत- पुढे जर अधिकाऱ्यांनी तीन वर्षांचे आतही तसे करण्यास परवानगी दिली तर स्वतःची कुटुंबे आणण्याची किवा अंदमानातील स्त्रियांशी लग्न करण्याची जी परवानगी दिली आहे त्यामुळे ती अडचण अंशतः दूर होणारी आहे. पूर्वी तेथील बंदी लोकांस तेथील 'स्वतंत्र' लोकांशी विवाह तर राहोतच पण व्यवहारही करण्याची परवानगी नसे. परंतु तीही या नवीन सवलतीने देण्यात आलेली आहे. तेव्हा तुम्ही देशात

परत जाऊन कारावासात सडत पडण्यापेक्षा किवा दीडबिघ्याच्या शेतीकरिता भाऊबंदांशी मारमारी करीत वाटा मागत बसण्यापेक्षा ही फुकटाची मिळत असणारी नवीन शेती घ्या. ती लागवडीस आणा, नवीन अन्न उपार्जा आणि ते भक्षा. येथील 'स्वतंत्र' लोक म्हणजे हिंदुस्थानातील पूर्वी आलेल्या बंदीवानांची संतती! म्हणजे आपल्याच रक्ताचे आणि बीजाचे देशबांधव, त्यांच्याशी शरीरसंबंध करून संतती वाढवा. आणि सुखाने नांदा. देशी तरी याहून काय करणार! इतकेही संपत्तिसुख आणि संततिसुख तुम्हांस देशात भोगावयास मिळणार नाही. तुम्हास जातीतच घेतले जाण्याची मारामार! फिजी इत्यादी ठिकाणांहून आलेले भारतीय त्रासून परत त्या परदेशास निघून जातात मग तुमची काय कथा- तुम्ही तर बंदीवान! तेव्हा पूर्वी वीस वर्षांनी होणारी सुटका दहा वर्षांत मिळवून, ती दहा वर्षेही कारावासात न काढावी लागता तीन वर्षांतच कुटुंब करून वा तसेच 'स्वतंत्र'पणाचे तिकीट काढून सरकारी शेती घेऊन उदरनिर्वाह करून रहा. जसे काही दैव काढण्यासच परदेशी आलात असे समजा.

आणि व्यक्तिशः बंदीवासाची दुःखे अशी टाळता येतात इतकेच नव्हे तर जर या नवीन परिस्थितीचा संघटित लाभ घ्याल तर कॅनडासारखी, केपकॉलनीसारखी एक लहानशी वसाहत तुम्ही आणि तुमची संतती मिळून उत्पन्न करू शकाल आणि आपल्या प्रिय मातृभूमीला ते एक लहानसे नवे सांस्कृतिक राज्य मिळवून देऊ शकाल! कारण अंदमानात तुम्ही वसाल तर हिंदू संस्कृतीची ध्वजा त्यावर उडत राहील!

तेच निकोबार पहा. तेही असेच भारतीय कक्षेतील एक बेट, पण हिंदुलोक ते वसवीनात तर मलायी आणि ब्रह्मी लोकांनी ते वसविले. हिंदुसंस्कृतीस नित्याचे मुकले. तीच स्थिती अंदमानची. हिंदी बंदीवानांची वसाहत तुटताच तेथे ब्रह्मी लोक वा मलाई लोक येऊन बसतील. तेथे आपल्या बीजाची आणि धर्माची तीन पिढ्या वाढत आलेली संतती नष्ट होईल. तेथे घातलेले तीन पिढ्यांच्या बंदीवानांच्या रक्तबीज- श्रमांचे भांडवल व्यर्थ जाईल! हिंदुसंस्कृतीस ते बेट अंतरल्याने केवळ राजकीय बंधनाने ते जरी भारतास बांधून ठेवले गेले तरी मनाने ते सदोदित चीन-मलायादी मंगोलियन संस्कृतीकडे आकर्षिले जाईल.

## अंदमान जिकण्यासाठी पुरस्सर व्हा!

राजकीय महत्वही तुम्हास विदित आहेच. ही बेटे भावी भारताची वैमानिक आणि सामुद्रिक नाकी होणारी आहेत तिथे हिंदुसंतती वसेल तर ती शरीरानेच नव्हे तर आत्म्यानेही तुम्हांसच चिकटून राहतील. भारतसिंधुद्वारी प्रेमाने पहारा देतील.

इतके महत्वाचे भवितव्य आज तुम्हा घृणित, पतित, दंडित म्हणून टाकाऊ ठरलेल्या लोकांच्या हातात आलेले आहे. तुमच्या आयुष्याचे साफल्य होण्याची अशी सुवर्णसंधी दवडू नका. यासाठी तुमच्यात जे काही दहा-पाच लोक स्वदेशात गेल्यावर मोठ्या मानास किवा संपन्नतेस पोचण्यासारखे आहेत त्यांनी देखील तुम्हां सर्वांचा पुढाकार घेऊन तुमच्याकडून एक नवीन हिंदू वसाहत वसविण्याच्या- मायभूमीस एक छोटेसे नवे सांस्कृतिक राज्य संपादन करून देण्याच्या या कार्यास पार पाडण्यासाठी भारतात परत न जाता सुटकेनंतरही अंदमानातच राहावे. एका आयुष्यास साफल्य प्राप्त करून देण्यास हे ध्येय पुरे आहे. प्रत्येक स्थळी असे कोणा ना कोणी तरी प्रचारक

पुरस्सर आणि पुरोगामी लोक ठाण मांडून बसण्यास आणि तिथेच खपत खपून जाण्यास हवे असतात. हिंदुस्थानासाठी अंदमान जिकण्यापुरते तुम्हीच ते पुरस्सर का होत नाही!''

या अर्थाची आणि हीच वाक्ये वारंवार उच्चारता उच्चारता अंती बंदीवानांतील आमच्या संस्थेत आजवर सहकार्य केलेल्या लोकांची मने पुन्हा आमच्याकडे वळू लागली. हिंदुस्थानात परत जाणे म्हणजे एकदम सुटणे नव्हे- तर कारावासात अंदमानहून अधिक कैचीत बंद राहणे होय हे त्यांच्या ध्यानात येऊ लागले. त्यांच्यातील कित्येकात त्यांच्या राष्ट्रीय कर्तव्याविषयीचे उच्च भावही माझ्या शब्दांच्या चेतनेने उदय पावले.

तथापि सरकारास सवलती शक्यतितक्या अधिक देण्यास भाग पाडले जावे इतक्यापुरते ओढूनताणून चंद्रबळ बंदीवानांनी आणावे आणि अमुक द्याल तर इथे राहू नाहीतर धाडा कसे, म्हणून सांगावे हे मला इष्टच होते. त्याप्रमाणे बंदीवानांच्या सभा भरू लागल्या. सरकार त्या प्रयोगापुरते सभास्वातंत्र्य देऊ लागले. या सरकारी नियंत्रणाच्या ढिलाईचा लाभ घेऊन त्या सभांतून संघटनेच्या आणि राजकीय प्रचाराच्या व्याख्यानांची आणि चर्चेचीही पोळी पिकवून घेण्यास आम्ही आरंभ केला.

त्यावेळी इतरांस उदाहरण म्हणून मी स्वतः सरकारास आवेदनपत्र धाडले की, जर हिंदुस्थानात मला धाडताच मुक्तता करणे नसेल तर माझी शिक्षा संपेतो मी अंदमानमध्येच राहू इच्छितो. मात्र मला दहा वर्षे भरली असल्याने सहकुटुंब किवा ''स्वतंत्र तिकिटावर तरी बेटात राहता यावे. कारागारात ठेवावयाचे तरी अंदमानातच ठेवावे. ''

पूर्वी मी प्रकृति स्वास्थ्य आणि मागील अनेक भागांत वर्णन केलेल्या सवलतींसाठी राजबंद्यांस हिंदुस्थानी कारागारात धाडण्यासाठी आवेदने धाडली होती. परंतु आता नवीन सवलतीप्रमाणे अंदमानात शेकडो बंदीवानांचा व्यक्तिशः लाभ होण्याची आणि राष्ट्रीयदृष्ट्या एक हिंदू वसाहत मोडता मोडता वाचविण्याची संधी आणि आवश्यकता आलेली आहे हे जाणून मी स्वतः बंदीवान आहेतो अंदमानमध्येच राहून तेथील बंदीवसाहतीचे हितसाधन करण्याचे कार्यच आपले एकमेव कार्य ठरविले. माझ्या उदाहरणाने इतरांसही तिथेच राहण्याची स्फूर्ती येत चालली.

अंदमानची वसाहत स्थिर ठेवण्याचा मी कसून प्रयत्न करू लागलो आहे हे पाहून तेथील 'स्वतंत्र' लोकांस माझे उपकार वाटू लागले. ते बिचारे मूठभर. त्यांची शेती नाही तिथे. उपजीविका बंदीवसाहतीवर. जर सगळे बंदीवान परत हिंदुस्थानात धाडले जाऊन ती वसाहत उठून जाती तर त्यांची गती काय होती! त्यांच्या भूमीविषयींच्या, तीवर घेतल्या जाणाऱ्या करांविषयींच्या, त्यात भूमीवरून वाटेल तेव्हा काढून द्यावयाच्या सरकारी पद्धतीच्या ज्या अनेक पीडा होत्या त्या दूर करण्यासाठी त्यांची आवेदनपत्रे जावीत आणि त्यांनीही चळवळ करावी म्हणून प्रयत्न होऊ लागले. बंदीवानांच्या म्हणण्यात नेहमी येई 'स्वतंत्र' होऊन तरी काय! त्यामुळे स्वतंत्र होण्यात लाभ आहे हे सिद्ध करण्यासाठी तरी सरकारास स्वतंत्रांची काही व्यवस्था लावणे भाग होते, त्याचा लाभ पुरेपूर घेण्यासाठी चळवळ अवश्य होती. त्यांच्या काही पुढाऱ्यांच्या आणि माझ्या अप्रकट भेटी होत, त्यांची आवेदनपत्रेही मी निरीक्षून आणि सुधारून देई.

# अहिंसेचा अशुभ झंझावात

त्या वर्षी राजकारणाचा मुख्य विषय म्हणजे खिलाफत आणि असहकारिता हा होता. आमच्या सभांतून, चर्चेतून आम्ही या दोन्हीही गोष्टींचा निषेध करीत असू. ''हिंदुस्थानात लोकमान्य टिळक वारताच खिलाफत आणि असहयोग या चळवळी जोरावल्या- कोणी असामान्य पुरुष निवर्तला असता तो धक्का निसर्गाला देखील सहन न झालासा होऊन मोठमोठाले अशुभ झंझावात, आणि रोगांच्या साथी जगतावर सुरू होतात, असा एक पुरातन समज आहे. लोकमान्यांसारखा धुरंधर नाहीसा होताच हा खिलाफतच्या अत्यंत आत्मघातक चळवळीचा आणि या एका वर्षांत चरखा फिरवून आणि अहिसेच्या आणि सत्याच्या अत्यंत विपर्यस्त व्याख्येवर उभारलेल्या तेजोहीन नि तेजोनाशक असहकारितेने स्वराज्य मिळवू इच्छिणाऱ्या आत्मवंचक उन्मादाचा हा तसाच एक अशुभ झंझावात सुटला आहे! हा बुद्धिविभ्रमाचा एक रोग, एक साथ सुरू झाली आहे!. . ''

प्रथमपासूनच आम्ही खिलाफतीच्या चळवळीस ती ज्या तत्वावर उभारली गेली त्यातील राष्ट्रविघातक गर्भितार्थामुळे अत्यंत विरोध करावा. ''ही खिलाफत नाही ही आफत आहे'' हे वाक्य त्या अंदमानच्या घरादारापर्यंत गर्जत राहिले होते. अहिसेची ती व्याख्या! ती सत्याची व्याख्या! त्या काळी प्रत्यही घडणाऱ्या त्या घटनांची फोड आम्ही, प्रथम प्रथम, शेकडोजणांचा विरोध सहन करीत शेवटी बहुतेकांस त्यांतील पोकळ शब्दच्छल आणि राष्ट्रविघातक अव्यवहार्यता विशद करून पटवून दिली.

त्या वेळच्या आमच्या वर उल्लेखिलेल्या मतांचे सत्यतेविषयी आम्हास कित्येक आश्चर्यकारक दाखले मिळाले. कित्येक अगदी ध्यानात ठेवण्यासारख्या घटना घडल्या. पण येथे त्यातील उदाहरणापुरती एकच देतो.

श्री. . . हे दोघे राजकीय बंदीवान आजन्म काळेपाण्याची शिक्षा होऊन तिथे आले. त्यांच्यावर पंजाबच्या दंग्याचे वेळची वारंटे होती; ते नापत्ता झालेले होते. सरासरी सहा महिने ते देशात कार्य करीतच हिडत होते. परंतु त्यांचा पत्ता कोणास लागेना. ते तसेच बाबा गुरुदत्तसिंहाप्रमाणे वर्षानुवर्षे भूमिगत राहून सरकारी निर्बंधांस निर्माल्यवत करू शकले असते असे ते म्हणत, परंतु इतक्यात ते असहकारितेच्या आणि निर्बंधभंगाच्या (कायदेभंगाच्या) एका अत्यंत प्रमुख पुढाऱ्यास विश्वासाने भेटावयास जाऊन आपली कर्मकहाणी सांगते झाले. तेव्हा ते पुढारी उसळून म्हणाले, ''कोण हा भित्रेपणा. सरकारी वारंटास भिऊन पळत सुटावयाचे! असले असत्य वर्तन मला खपणार नाही. जा आणि मॅजिस्ट्रेटच्या पुढे आताच्या आता उपस्थित व्हा'' त्यांनी सांगितले "तसे निर्बंधानुकूल वर्तणे म्हणजेच सहकारिता नव्हे का? आम्ही सध्या निर्बंधास हतवीर्य करून टाकीत आहो हाच खरा निर्बंधभंग होय- खरी असहकारिता होय, आम्ही कार्य करीतच आहो तेव्हा आम्ही भयाने पळतो हे म्हणणेही निर्मूल आहे. परंतु आपण म्हणता तसे करणे म्हणजे निर्बंधभंग नसून निर्बंधसफलता करणे होय. सरकारी उद्देशाची पूर्ती करणे म्हणजे सहकारिता" असे म्हणून उत्तर देतात न देतात तोच 'छट् छट्' म्हणून म्हणत त्या पुढाऱ्यांनी त्यांस 'मॅजिस्ट्रेटपुढे उपस्थित व्हा' म्हणून आज्ञा सोडली. ते दोघेही स्वतःचे भाडे खर्चून परत उत्तरेस गेले आणि- च्या मॅजिस्ट्रेटसमोर उपस्थित झाले. त्यांस धरण्यात आले आणि क्रांतिकारक उठावणीचे अपराधासाठी आजन्म काळेपाणी त्यांस यथाविधी देण्यात आले.

पुढे जेव्हा ते या त्यांच्या चुकीविषयी पश्चात्ताप होऊन त्या पुढाऱ्यावर चवताळून निंदा करू लागत तेव्हा मी म्हटले, निंदाच करणे तर त्या सांगणाऱ्याची एकट्याचीच करता यावयाची नाही. तुम्ही तरी ते ऐकलेत का? त्यांनी बुद्धिभेद केला पण तुम्ही करू का दिलात?

## प्रतिसहकार

आणखी एक-दोन वाक्ये दिली असता त्या वेळच्या इतर सर्व गोष्टी न देताही माझ्या तत्कालीन विचाराचा आणि प्रचाराचा निष्कर्ष दर्शविता येईल. मी या चर्चेविषयी म्हणावे!-

''आम्ही क्रांतिकारकांनी प्रथमपासूनच हे तत्व ध्यानात ठेवावे की, खरे राजकारण म्हणजे ते सहकारीही नसते आणि असहकारीही नसते; तर ते प्रतिसहकारीच असते. नीतीदृष्ट्याही ते तसेच असले पाहिजे. जर सहकाराने प्रश्न सुटत असेल तर विपक्षाशी अवश्य सहकार करावा. जर सहकार नाही तर असहकार. तो केव्हा निःशस्त्र स्वरूप धारण करतो, केव्हा सशस्त्र आणि तो निःशस्त्रविरोधही तात्पुरताच असला पाहिजे. असहकार हे तत्व नव्हे तो एक तात्कालिक उपाय आहे. सर्व मनुष्यमात्रांनी सहकार करावा हेच खरे ध्येय होय. आणि तो सहकार परस्परांनी परस्पर हितास अनुकूल असा करावा किवा करणे भाग पाडले जावे अशाच स्वरूपाचा राहणारा असल्याने त्यासच प्रतिसहकार किवा प्रतियोग म्हणतात. ''

असहयोगाच्या चळवळीचा सरडा कोणत्या कुंपणापर्यंत धावून जाईल आणि खिलाफतीच्या परिणामाने मुसलमानांचे राष्ट्रविघातक धर्मवेड किती भयंकर पेट घेईल हे भविष्य मी माझ्या सर्व सहकारी आणि सहभागी राज्यबंद्यांमध्ये आणि बंद्यांमध्ये वारंवार वर्तवून ठेवी.

प्रकरण अकरावे

# अंदमानातील शेवटचे दिवस

याच संधीस माझे कनिष्ठ बंधू मला आणखी एकदा भेटावयास आले. माझ्या सुटकेची काही एक म्हणण्यासारखी आशा नव्हती. माझ्या ज्येष्ठ बंधूंची प्रकृती अगदी थकत आली होती. अशा वेळी अशी भेट होताच पहिला विचार जो चित्तात उभा राही तो हा की ही भेट आता बहुधा शेवटचीच होणार! आणखी एका वर्षाने जेव्हा भेटीस पुन्हा परवानगी मिळेल तोपर्यंत- एक वर्ष जायचे. कारागारात त्या झिजून झिजून क्षीण झालेल्या देहास एकेक दिवस काढणे दुष्कर झालेले होते. म्हणून बंधूंस धीर करून स्पष्टच कळविले की, ''बाळ, सत्य कितीही निष्ठुर असले तरी सत्यास तोंड देण्यास भिण्याइतका किवा कचरण्याइतका तुझा धीर दुर्बळ नाही ही माझी निश्चिती असल्याने तुझ्यापासून वस्तुस्थिती लपवून ठेवण्याचे मला कारण दिसत नाही. उलट हळूहळू आणि कळत-कळत चालून येणाऱ्या दुःखाचा धक्का एकाएकी येऊन कोसळणाऱ्या दुःखाच्या संघर्षापेक्षा अधिक सुसह्य असतो. म्हणून सांगतो की आता तू आमच्या दोघांच्या जीवनातील शेवटली बातमी ऐकण्यास सिद्ध होऊन रहा. आता फार दिवस निघतील असे दिसत नाही. तरी देखील असंभवनीय गोष्टीही घडतात हेही विसरू नकोस. क्वचित यातूनही जगू. पण आता तो संभव अगदी अलग! बहुधा ही शेवटची भेट!!!''

शब्दागणिक हृदयात धक्के बसत होते. बाळाची मुद्रा अर्थातच एकाएकी काळवंडली; पण ते निष्ठुर शब्द केवळ सत्याचेच पडसाद आहेत हे त्यासही दिसत असल्याने विवेकाने आम्ही ते बोलून टाकले, त्याने ऐकून घेतले!

आम्हास दहा वर्षे झाली म्हणून आम्हास 'तिकिट' मिळावे म्हणून आम्ही आवेदन केले होते. त्याचे उत्तर आले की तुम्हाला (आणि आमच्या ज्येष्ठ बंधूंना) कारागारातच 'तिकिट' दिले आहे!! तिकिटाचा अर्थच असा होता की त्या मनुष्यास स्वतंत्रपणे धंदा करता यावा आणि वसाहतीत स्वतःचे घर करून आणि बायकामुले देखील निवसता यावे; ते तिकिट इतरांस तीन वर्षांत देऊ म्हणून जेव्हा आज्ञा सुटली होती तेव्हा आम्हांस दहा वर्षांनी मिळाले; कुठे? कारागारात! म्हणजे कारागृहातून आम्हास बाहेर सोडले नाही, स्वतंत्र वसाहत व घराचे नावच नको आणि मिळाले तिकिट! हा केवळ उपहास होता, दुःखावर या केवळ डागण्या होत्या. अंदमानच्या निर्बंधाचे आणि त्यातील बंदीवानांच्यासाठी लाभकारक व्हावे म्हणून घातलेल्या प्रत्येक शब्दाचे आम्ही एक मूर्तिमंत अपवाद होतो.

अशा रीतीने चहूबाजूंनी कोंडमारा झाल्यामुळे केव्हा केव्हा आम्हांस आणि इतर काही राजबंदीवानांस जीवन दुःसह होई. तेव्हा त्यांस आणि स्वतःस निरर्थक आत्मघातापासून बचाविण्यासाठी आम्ही आमच्या राजबंदीवानांतील अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि विश्वासू साथीदारांसह एक निर्वाणीचा म्हणून भयंकर कट करून ठेवलेला होता. त्यात आमच्या राजकीय व्यतिरिक्त साध्या बंदीवानांतीलही काही मंडळी घेतलेली होती, अगदी जेव्हा असे वाटेल की आता राजकीय बंदीवानांपैकी अमुक अमुक जणास सुटण्याची अशी आशा उरली नाही तेव्हा त्या अगदी न सोडण्यासाठी म्हणून निवडून काढलेल्या सर्व बंदीवानांनी एकसहा. . . . .

एक दिवस एकदाचा रखडत गेला आणि संध्याकाळची घंटा झाली की वाटे सुटलो! आता केवळ झोप! गाढ सुख! एक दुःखाचा दिवस संपला, सुटका एक दिवसाने जवळ आली!- पण लगेच वाटावे; होय, सुटका एक दिवसाने जवळ आली आणि मृत्यूही! जो दिवस संपे तो शिक्षेतून जसा उणा होई तसाच जीवनाच्या नियतकालातूनही वजा जाई!

अशीच एका दिवसाची संध्याकाळची घंटा होऊन आम्ही तेलगोदामाला कुलूप लावले, किल्ली मोठ्या जमादाराचे हाती परत देऊन आपल्या खोलीत बंद होण्यास चाललो, कारण आम्हास 'तिकिट' मिळाले तरी जसे कारागृहाच्या भितीच्या आतच आम्हास दिवसा रहावे लागे, तसेच रात्री कोणच्याही बिनतिकिटी बंद्याप्रमाणे खोलीत बंद होऊनच एकांतवासात आणि अंधकारात पडावे लागे. आम्ही किल्ली देऊन परतलो तो एका बाहेरून परत आलेल्या वॉर्डरने हातात गुपचूप चिठ्ठी दिली. आणि मोठ्या आनंदाने हसून ''चांगली बातमी आहे'' असे म्हणत तो चटकन निघून गेला. आम्ही चिठ्ठी उघडून पाहिली. त्यात बातमी दिलेली होती की, आज कमिशनरच्या मुख्य कार्यालयात (Head Office) हिंदुस्थान सरकारची आज्ञा आली आहे की सावरकर बंधूंना हिंदुस्थानात परत धाडा. मुंबई सरकारने त्यांस परत बोलावले आहे!!

मागे अशा बातम्या पन्नासदा उठल्या आणि मिटल्या; पण आम्ही अंदमानातच उरलो. आमचा मुळीच विश्वास अशा बातम्यांवर नसे. हे आमच्या मित्रांस माहीत. म्हणून त्यांनी चिठ्ठीत लिहिले होते ''ही बातमी नक्की : आज्ञा प्रत्यक्ष पाहिली!''

असेल! आता ही बातमी खरीही असेल. कारण जिथे बंदीवानांना तीन वर्षांचे आत बायकामुले आणावयास परवानगी मिळू लागली तिथे आम्हांस दहा वर्षांनंतरही ''कारागृहात तिकिट'' या विलक्षण आणि असंभाव्य निमित्ताने अधिक काळ कोंबण्याचा निर्लज्जपणा केव्हाही फार दिवस टिकणारा नव्हता. एक तर आम्हांस अंदमानच्या वसाहतीत सहकुटुंब राहू द्यावे आणि पुष्कळ स्वतंत्रपणे वावरू द्यावे- नाही तर त्या वेळच्या बंदीवान हिंदुस्थानात परत पाठविण्याच्या नवीन हुलीचा लाभ घेऊन हिंदुस्थानच्या कारागारात पुन्हा सडत ठेवावे हेच दोन अर्थ होते. त्यात अर्थातच आम्हांस अंदमानात मोकळे सोडण्यापेक्षा हिंदुस्थानच्या कारागृहात बंद ठेवण्याचा मार्गच अधिकाऱ्यांस अधिक इष्ट होणारा होता. मागे जी गोष्ट आम्हांस मागून मिळाली नाही ती आता त्यांनी होऊन दिली. कारण त्यामुळे अंदमानच्या नाही तर हिंदुस्थानच्या. . . पण कारागृहाच्या भितीत आम्हांस कोंडून ठेवणे दहा वर्षांनंतरही त्यांस शक्य होणारे होते. आणि तेही दयेच्या नावावर! कारण हिंदुस्थानातील लोकांस आम्हांस परत हिंदुस्थानात आणले ही, या प्रश्नाची दुसरी बाजू माहीत नसल्याने, दयाच वाटणारी होती!

असे विचार रात्रभर मनात येत होते. सकाळी कारागृहातील अधिकाऱ्यांनीही बोलावून ''तुमची पुस्तके वगैरे सामान बांधून ठेवा'' असे सांगितले. तेव्हा आता बहुशः आमची हिंदुस्थानात पाठवणी होणार हे निश्चित दिसू लागले.

परंतु हिंदुस्थानात पाठवणी होणार म्हणजे हिंदुस्थानातील कारागृहात बंद करण्यासाठी होय हे त्यातील रहस्य ध्यानात न आल्याने अंदमानभर ''सावरकर सुटणार'' अशीच बातमी पसरली. जनतेने आपल्या आमच्या

सुटकेविषयीच्या उत्कट आणि कळकळीच्या इच्छेलाच वास्तविक घटना समजून आम्हासच निक्षून सांगण्यास आरंभ केला की ''छे! छे! बाबूजी, आता कारागृहात तुम्हांला कोण कोंडतो! तुम्हांला हिंदुस्थानात जाताच सोडून देण्यात येणार हेच निश्‍चित!'' त्यांच्या इच्छेलाच तिची पूर्ती समजून त्या प्रेमळ लोकांनी आमच्यावर अभिनंदनाचा पाऊस पाडण्यास आरंभ केला.

पण आम्हांस मात्र मनात उद्‌विग्नता वाटू लागली. अंदमानच्या कारागृहात निदान एक तरी सुख होते की आमच्या ज्येष्ठ बंधूंसह एकत्र राहता येई. आता हिंदुस्थानच्या कारागृहात त्यांस बहुधा निराळे करण्यात येऊन भिन्न भिन्न प्रांतात धाडण्यात येईल! दुसरे की, अंदमानात दहा वर्षे ज्यांच्या सान्निध्यात काढली त्या वसाहतीतील लोकांत आमचे अनेक इष्टमित्र झालेले होते. त्यांच्यात 'तिकिट' मिळून स्वतंत्रपणे सहकुटुंब राहता येण्याची संधी जवळ आलेली असताना आता पुन्हा हिंदी बंदीगृहात डांबून पडावयाचे. त्या अंदमानी इष्ट मित्रांस अंतरावयाचे- आणि हिंदी इष्टमित्रांस तर पूर्वीप्रमाणेच जाताना जसे जन्मठेपीचे दुःख मनाला उद्‌विग्न करीत होते तसेच आता अशा स्थितीत अंदमानातून परत हिंदुस्थानात येताना इष्टमित्रांच्या विरहाचे दुःख आम्हांस व्यथित करू लागले. ही जन्मठेपीची दुसरी शिक्षाच होते आहे असे वाटू लागले.

आम्ही पुस्तकांची बांधाबांध केली. त्यांतील बरीच पुस्तके त्या तत्रस्थ ग्रंथालयास दिली. पुष्कळशी तेथल्या बंदीवानांत आणि स्वतंत्रांत वाटून दिली. शेवटच्या दिवशी बाहेरची मंडळी नाही त्या निमित्ताने सारखी भेटावयास येऊन जात होती. क्षणोक्षणी मला भीती वाटे की, या दाटीचा खरा अर्थ समजून अधिकारी एखाददुसऱ्यास जर धरतील तर या बिचाऱ्यांच्या पोटावर आपल्यासाठी पाय पडेल; पण त्या दिवशी जवळ जवळ कोणी कोणास विचारीनासे झाले. त्या दिवसापुरती बंदीवानांनी अधिकाऱ्यांची भीती जवळ जवळ धाब्यावर बसविली. अधिकाऱ्यांनीही अतिप्रसंग केला नाही. आम्ही नको नको म्हणता आणि आम्ही प्रत्यक्ष भेटणे ज्यांस अशक्य होत होते त्यांनी देखील भेट म्हणून फळे, फुले, मिठाई, सोड्याच्या बाटल्या, बिस्कुटांचे डबे इत्यादी वस्तू कारागृहाच्या फाटकात पोचविण्याचा धडाका चालविला. दीन दरिद्री ते बंदीवान आणि स्वतंत्र लोक! काय जे दहा-पाच रुपये महिन्याचे मिळतील त्यात संसार. पण भक्ती केवढी! न पुसता विचारता आणि सरकारी निर्बंधास न जुमानता एखादे केळे, एखादे कलिंगड, एखादे फूल- पण त्या दिवशी कारागृहाचे दाराशी ठेवून जात! दुपारी मी अंतःस्थपणे दारावर गेलो तेव्हा त्या जमलेल्या डब्यांतील, फळांतील आणि इतर पेयादिकांच्या बाटल्यांच्या ढिगातील वस्तू तिथेच वाटून दिल्या. अगदी कोणी ऐकेना तेव्हा काही जवळ घेण्यास ठेवल्या. नंतर जे एक-दोन होतकरू इष्टमित्र शांतपणे भेटावयास आले होते त्यांपैकी एकास तेथील संस्थेची शपथ दिली.

**''एक देव एक देश एक आशा**

**एक जाति एक जीव एक भाषा''**

या तेथे प्रचलित केलेल्या मंत्राचा अर्थ त्यास समजाविला. या ''एक आशे''च्या पूर्ततेसाठी अशा ''एक जीव'' झालेल्या हिंदुमात्राने प्रसंगी प्राणही अर्पण करून काय केले पाहिजे ते सांगितले- आणि त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी

www.savarkarsmarak.com

तसला महान स्वार्थत्याग करण्याची शक्ती येईतो आणि यावी म्हणूनच सद्यःपरिस्थितीत त्या त्या व्यक्तींची अंदमानातील कोणती कर्तव्ये आहेत ती ती रीतीप्रमाणे कथन केली.

इतक्यात पहारेकऱ्याने कळविले, ''साहेब आता है. आपको ले जानेवाली शिपाअओंकी तुकडी भी आती है. ''

आम्ही उठलो, मनास एक प्रकारचे पवित्र समाधान वाटू लागले की दहा वर्षे अंदमानच्या या कारागृहात आशेच्या थडग्यात पुरलेले राहूनही ज्या दिवशी ते कारागृहाचे दार आता दहाबारा वर्षांनी पुन्हा उघडणार तेव्हा त्या शेवटच्या दिवशीचे आमचे शेवटचे कृत्यही तेच होते की जे करण्याचे व्रत वयाच्या अकराव्या वर्षी अंगीकारले होते. हिंदी तरुणांस जी दीक्षा देण्यासाठी त्या कारागृहाचे दारा आत पाय टाकावा लागला त्या कारागृहाचे दाराबाहेर आज दहा वर्षांने पाय पडत असता हिंदी तरुणांस तीच दीक्षा देताना उच्चारले जाणारे

**''एक देव एक देश एक आशा**

**एक जाति एक जीव एक भाषा''**

**तेच ते शब्द आमच्या ओठावर होते!''**

आम्हास आणि आमच्या बंधूंस फाटकात उभे करण्यात आले. बंदीपालाने आम्हांस हिंदुस्थानात नेण्यासाठी शिपायांच्या पहाऱ्यात दिले. ''बेडी घालण्याची आवश्यकता नाही. '' असे त्या उदार बंदीपालाने बजावल्याने आम्हांस तसेच पुढे चालविले गेले आणि एकदाचे ते त्या अंदमानाच्या भयंकर बंदीगृहाचे दार आमच्यासाठी उघडले!

१९०९ व्या सनात ते असे एकदा उघडले आणि आमच्या बंधूंस आत गिळून बंद झाले. १९११ सनी पुन्हा तो विक्राळ जबडा उघडला आणि आम्हास गटकावून बंद झाला! तेव्हा पुन्हा काही जिवंतपणी बाहेर पडण्याची आशा कोणास निश्चितपणे वाटत नव्हती. ते १९११ व्या वर्षी बंद झालेले ते त्या कारागृहाचे दार आज १९२१ व्या वर्षी पुन्हा करकरले. त्या जबड्याचे ते तोंड पुन्हा उघडले - आणि आम्ही दोघेही बंधू जिवंतपणी आतून बाहेर पडलो!

त्या लोखंडी फाटकाचा तो एवढाचा लोखंडी 'उंबरा' ओलांडताना आम्हांस स्पष्ट कल्पना येऊन गेली की आम्ही जिवंतपणी अंदमानहून सुटत आहोत. बाबांस म्हटले, ''बाबा, हा एवढासा उंबरा जीवनमरणाच्या सीमेची रेषा आहे. ओलांडला!'' मरणाच्या सीमेतून जीवनाच्या सीमेत हा वीतीएवढा उंबरा ओलांडून आपण पुन्हा एकदा पाय टाकला!! आता पुढचे पुढे!!!''

## बंदी मोडून घातलेली चाफ्याची माळ

आम्हांस निरोप देण्यासाठी आणि ज्या अनेक दूरवरच्या लोकांनी आम्हांस पाहिले नव्हते ते पाहण्यासाठी येऊन कारागृहाच्या बाहेर दाटी होईल ती होऊ नये म्हणून साहजिकच कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ठिकठिकाणचे बंदीवान आपआपल्या कामावर गुंतविले गेले होतेच. तरीही शक्य त्या त्या निमित्ताने लोक दूरवर दबून दबून बसलेले होते. आम्ही शिपायच्या पहाऱ्यात समुद्राकडे थोडेसे वाट चालू लागतो न लागतो तोच एक बंदीअधिकारी जमादारीचे कामावर असलेला आणि थोडेच दिवसात 'तिकिटा'वर सुटण्याचा अधिकार ज्यास मिळू

शकता तो एकाएकी पुढे झाला आणि आम्हांस पहाऱ्यात घालविताच शिपायादिकांस न जुमानता एका चाफ्याच्या फुलांच्या केलेल्या साध्या फुलमाळेस त्या सर्व बंदीवानांचे वतीने आमच्या गळ्यात घालता झाला. ते पहाऱ्याचे शिपाई आरडाओरडा करतात तो आमच्या पायावर डोके ठेवून तो जयजयकार करीत निघूनही गेला होता. अशा निर्बंधाविरुद्ध कृत्याने त्याची जमादारी जाऊन उलट त्यास शिक्षाही होती. पण त्याने त्याची चिंता केली नाही.

एका बाजूस तो भाविक बंदीवान जमादार सर्व बंद्यांचे वतीने म्हणून ती चाफ्याची साधी माळ गळ्यात घालीत आहे आणि दुसऱ्या बाजूस त्या गडबडीने घाबरलेल्या शिपायांचा अधिकारी आम्हांस ओढाताण करीत हातात हातकडी घालू पाहत आहे - हे आमच्या स्वतःचे त्या वेळचे दृश्य अजून डोळ्यांसमोर दिसत आहे. शक्यतोवर लोकांमध्ये आमची स्मृती देखील उरू नये, आमच्या छायाचित्रास, पुस्तकास, आमच्या आठवणीसही घरात वा जनात बाळगण्यास लोकांनी धजू नये, एतदर्थ तशा कृत्यास अपराधाप्रमाणे दंडनीय करून टाकणाऱ्या सरकारच्या वीस वर्षांच्या अव्याहत प्रयत्नाचा तो हातकडी घालण्यास ओढाताण करणारा सरकारी अधिकारी एक प्रतीक होते आणि तरीही आमच्या आठवणीस भक्तीने न विसरणाऱ्या आमच्या देशबांधवांच्या आम्हास यावज्जीवन लाभलेल्या प्रेमळ आदराचे तो चाफ्याची माळ घालणारा बंदीअधिकारी हा दुसरे प्रतीक होते! ज्या दोन शक्तींच्या परस्परविरुद्ध आघातप्रत्याघातांचे हे आमचे जीवन प्रथमपासूनच एक रणक्षेत्र झालेले आहे त्याचे दृश्य म्हणजे एक लाक्षणिक रेखाचित्रच होते. हा विचार बाबांस बोलून दाखविल्यावाचून आम्हांस राहवेना.

अंदमानात दहाबारा वर्षे आम्ही दोघांनी केलेल्या त्या वसाहतीच्या उन्नत्यर्थ प्रयत्नांचा, ती चाफ्याच्या फुलांची चोरून गुंफलेली साधी माळ, हा खरोखर बहुमूल्य पुरस्कार होता. त्या प्रयत्नांचे श्रम हरण झाल्यासारखे वाटले. रत्नांच्या मालेहून त्या रानचाफ्याच्या फुलांची माळ अधिक प्रिय वाटली. ती गळ्यात पडताच दुरून उठलेल्या दबत्या टाळ्यांचा गजर तिच्यामध्ये किती प्रेमळ कृतज्ञता गुंफलेली होती ते प्रदर्शवीत होता. मजविषयी लोकांत अप्रीती आणि भय उत्पन्न करण्याच्या सरकारी आटोकाट प्रयत्नांस ती चाफ्याच्या फुलांची साधी माळ हे अखंडनीय उत्तर होते!

आम्ही बोटीवर चढविले जाण्याच्या आधी किंचित वेळ आमच्या तेथील काही प्रमुख सहकाऱ्यांशी अंतःस्थपणे बोलण्याची संधी मिळाली. त्यांचे हाती आम्ही सर्व बंदीवानांस ''अंदमानातच रहा; शेती करा. आपसात लग्ने करून संतती वाढवा आणि त्या वसाहतीत हिंदू संस्कृतीचा होत चाललेला फैलाव एकसारखा वृद्धिगत करा. '' हा निरोप धाडला. इतरही कार्यक्रम आखून दिला. ज्या चढणीने दहा वर्षांपूर्वी बंदीशाळेकडे जाताना वाटले की परत जाताना या चढणीवरून उतरण्याचा या जन्मात प्रसंग येईल का? त्यास चढणीची उतरण होऊन आज आम्ही परत हिंदुस्थानास चाललो!

तोच महाराज जहाज आले! जहाज कलकत्त्यास जाणार. आम्ही वर चढलो. पोटात कसेसेच होऊ लागले. अंदमानमध्ये मिळत आलेली थोडीबहुत स्वतंत्रताही छिनाऊन घेऊन आम्हांस पुन्हा अगदी शिक्षेच्या पहिल्या दिवशीच्या कडकपणात ढकलले जाणार हे स्पष्ट दिसू लागले. बोटीवर चढताच बंदीवानांकरिता अगदी खालच्या तळाशी असलेल्या पिंजऱ्यात नेण्यात आले. याच पिजऱ्यात दहा वर्षांपूर्वी येताना मला कोंबलेले होते.

आठवणीसरशी शहारे आले. त्यात बाबा-क्षयाने अगदी जर्जरित आणि खोकल्याने ज्वरित झालेले. बाबांबरोबर पिजऱ्याशी येताच पाहतो तो एक आणखी संकट दत्त म्हणून उभे राहिले!

## वेड्यांच्या पिजऱ्यात कोंडले!

कारण ज्या पिजऱ्यात अगदी दाटीने आम्ही कोंडले गेलो तो वेड्यांनी भरलेला होता. अंदमानातील वेड्यांना हिंदुस्थानात परत धाडण्याचे होते ते सर्व त्याच जलयानाने धाडले होते. त्या पिजऱ्यात त्या वेड्यांच्यामध्ये आम्हांस कोंडले! ते शिव्या देत होते. कोणी रडत होते. कोणी स्वतःचा गळा दाबू पाहत होते. त्यांच्यावर वेडातूनच निभावलेला एक बंदीवान मुख्य अधिकारी केलेला होता. तो एकेकास धरधरून मारीत होता. जागा हलण्यासही नीटशी मिळेना. त्यात ज्वराने पिडलेल्या आणि अशक्त झालेल्या माझ्या श्रेष्ठ बंधूंसह मला कोंबून दिले गेले.

ते वेडे जे पाहत होते, बोलत होते ते त्यांना तात्कालिक सत्यच वाटत होते. कोणास उंदराचा भास होऊन तो मोठमोठ्याने ओरडे उंदीर माझे छातीवर चढत आहेत! कोणी आपणास सगळेच शिव्या देत आहेत असे भासून रात्री उठून एकाएकी शेजाऱ्याच्या उरावर बसून ठोसे लगाऊ लागत आहे! ओकाऱ्या आणि निजल्या जागीच झालेले रेच आणि त्यातच ते लोळत आहेत! आणि त्यांच्यात आम्ही जाऊन बसलो.

मनास क्षणभर वाटले कोण वेडे? आमच्या इंद्रियांस जे भास होतात तेच कशावरून खरे? क्वचित यांच्या इंद्रियांस होणारे भासच खरे असतील! उभय पक्षीही इंद्रियांचीच काय ती साक्ष आणि कोणाचे इंद्रिय शुद्धीवर हे तरी कोणाचे तरी इंद्रियच ठरविणार ना! त्यांच्यासारखी इंद्रिये-त्या स्थितीतील सगळ्यांस असती तर त्यांच्याप्रमाणेच सगळ्यांसच उंदीर दिसू लागतेच! आपणच का खरे? क्वचित तेच खरे असून या रेचात आणि ओकाऱ्यात आपण बसलो आहोत हा आपल्यासच वेडाचा भास होत नसेल कशावरून! आपल्यासच वेड लागले नाही कशावरून!

खरोखरच मनात धस्स झाले. त्या काळोखात, त्या जहाजाच्या घर्र घर्र आवाजात, त्या हगण्यात, ओकात, त्या बीभत्स गलबल्यात आणि अत्यंत कोंदट आणि श्वासोच्छवासात जड झालेल्या वातावरणात जीव घाबरलासा झाला. वारंवार वाटे आपण हे तत्वज्ञानाचे विचार करीत आहोत की वेडाचा हा पहिला झटका आपणास पछाडीत आहे आणि इंद्रियास दिसत असलेल्या वस्तूंविषयी भ्रम उत्पन्न करीत आहे!

मज्जातंतू - दहाबारा वर्षांच्या ताणाने क्षीण झालेले मज्जातंतू जसे तेव्हा क्षीण झालेले वाटले तसे फारच थोड्या वेळी वाटले असतील.

त्या पिजऱ्यातून निदान त्या वेड्यांच्या मंडळींतून काढून आम्हांस थोडे निराळे ठेवावे म्हणून आवेदन आणि प्रतिवाद केला. त्या जलयानावरच काही हिंदी ... हिंदुस्थानास परत जात होते त्यांच्या अणि मुख्य .. प्रयत्नांचा आधार मिळून शेवटी त्या पिजऱ्याच्या समोरच्या अर्धात पण वेड्यांपासून थोडेसे निराळे असे आम्हांस पृथक करण्यात आले.

पण वारा मिळेना. इतर क्षयरोगी, चोर, लुटारू इत्यादी दंडित (Convicts) त्या जलयानाने हिंदुस्थानात परत धाडण्यात येतच होते; पण त्यांस त्या उच्चतम तळावर 'डेक'वर मुक्त वायु सेवन करता यावा म्हणून ठेवले होते.

परंतु बाबांस? त्या नीचतम तळावरील पिंजऱ्यात - जिथे वारा म्हणून येईना. तेही क्षयीच, अंगात ताप; मलाही नेहमीच ‘ब्राँकाअटिसची’ श्वासावरोधाची व्यथा जडलेली.

तेव्हा वाऱ्यासाठी आवेदन करावे लागले. श्वासोच्छवासापुरता तरी वायू मिळावा म्हणून अर्ज करावे लागले!!!

दुसऱ्या दिवसापासून वरून एक मोठी अवजाराची पिशवी लोंबती सोडून तळावरील त्या कोठारात वारा थोडा फार दिवसातून एकदोन वेळ सोडण्यात येई. पुढे अर्धा तास डेकवर नेऊन एका जागी पहाऱ्यात बसू देण्यात येई.

चोरूनमारून जलयानावरील प्रवासी आणि अधिकारीही खाली कोठाराशी येऊन बोलत. त्यात जे हिंदी गृहस्थ होते त्यांची तर सहानुभूती असेच. पण कित्येक युरोपियनही फार आदर दाखवीत. एक सुशिक्षित अँग्लोइंडियन गृहस्थाने तर आमच्या मैत्रीविषयी अभिमान वारंवार प्रदर्शित करून आम्हास आमच्या आवडत्या ग्रंथाची ‘थॉमस एकेमपिस’ची एक सुंदर प्रत आठवण म्हणून दिली. आम्हास उत्तम प्रकारचे अन्नही मंडळींनी अंतःस्थपणे व्यवस्था करून धाडावे; तरी सोडावॉटर, आइसेस, मिठाई मिळाली, यांच्या देणग्या आम्ही वारंवार परत कराव्या. पैसेही कित्येकांनी बळे बळे देऊ पहावे. आम्ही ‘‘कारागृहात आम्ही जाताच बंद होऊ! तेव्हा ते नको’’ म्हणून साभार त्या देणग्या परत कराव्या. आमच्या शेजारच्या वेड्या सहकष्टभोग्यास मिठाई वगैरे आली की देऊन टाकावी.

रात्री बाबांनी आपले इतिवृत्त मला सांगावे, मी बॅरिस्टरची परीक्षा देण्यास १९०६ सनात विलायतेस गेलो तेव्हापासून बाबांची आणि माझी रात्री स्वस्थ नसले तरी अस्वस्थ स्वतंत्रतेत चार गोष्टी एकांतात एकत्र बोलत बसावे अशी गाठ आताच चौदा वर्षांनी पडली होती. तेव्हा माझ्यामागे अभिनव भारताची चळवळ कशी फोफावत गेली, कोण कोण. . . बाबा धरले गेले कसे, कारागृहात त्यांची बातमी काढण्यासाठी अमानुष छळ कसा कुठे झाला, तरीही एक ब्रही त्यांचे तोंडातून कसा निघाला नाही ते शेवटी मूर्च्छित कसे पडले. . . ते रोमांचकारी वृत्त त्यांनी सांगितले, आम्ही ऐकिले.

अंदमानमध्ये आमच्यामागे राहिलेल्या प्रिय मित्रांच्या आठवणी येऊन फार हुरहूर वाटावी. वाटे पुन्हा असेच असे अंदमानात परत जावे आणि त्यांस भेटावे!

चौथ्या का पाचव्या दिवशी अर्धा तास डेकवर मोकळा वायु खाण्यास जेव्हा नेण्यात आले तेव्हा समोर तट दिसू लागला. मला शेजाऱ्याने सांगितले हा हिंदुस्थानचा तट दिसू लागला पहा. मी चमकलो. हिंदुस्थानचा तट! ज्या प्रिय मातृभूमीच्या केवळ स्मृतीने प्रस्फूर्त होऊन आजवर या अनेक यातना भोगल्या तिची ती प्रत्यक्ष मूर्ती! ते चरण पुन्हा दिसले! या आयुष्यात पुन्हा दिसले! मी वळून बाबांस म्हटले, ‘‘बाबा! ते पहा भारत! ते पहा त्याचे ‘नीलसिंधुजल-धौतचरणतल’!’’

आम्ही दोघेही भक्तिभावाने थरथरून उठलो आणि त्या मातृभूमीच्या चरणापुढे हात जोडून उद्गारते झालो ‘‘स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय! वंदेमातरम्!’’

प्रकरण बारावे

# येरे माझ्या मागल्या!

अंदमानच्या जहाजातून उतरून कलकत्त्यास पाय लागताच आम्हास अलिपूरच्या कारागृहात नेऊन खोलीत कोंबण्यात आले. सकाळी अंदमानहून निघताना जी भीती वाटत होती ती खरी ठरली. कारण बाबांस आणि मला निराळे करण्यात आले! आम्ही आपआपली बंदींच्या तरटाची अंथरुणे खाकेत गुंडाळून, हातात 'थालीपाट' घेऊन, चोरट्यासारखे, बरोबरच्या शिपायांच्या नेत्रसंकेतानुरूप दोघेही चाललो होतो. तो बाबांना एका लहानशा फुटणाऱ्या बोळवजा वाटेकडे वळावयास शिपायाने सांगितले आणि आम्हास बरोबर घेऊन दुसरीकडे चालला. बाबा दुरावले.

त्यांच्या तो क्षयी खोकला ते दूर जाईतो मला ऐकू येत होता. तरी ते जड अंथरूण कसेबसे खाकेत घेऊन आणि चवाळ्याचा ओव्हरकोट घालून ते कण्हत चालले होते. मनात वाटले यांचे आता काय होईल! या बोळाने ते मला सोडून वळले नाहीत तर बहुधा आता जीवनाचे वाटेवर मला सोडून हे मरणाचे बोळानेच वळत आहेत. बहुधा यांचे हेच शेवटचे दर्शन!

पुन्हा एकदा मागे पाहून मनात आक्रंदत पण वरून गुपचूप असा मी पुढे गेलो. आणखी एका चाळीतील -जी माझ्यासाठी ओस पाडण्यात आली होती त्या एका कोठडीत बंद केला गेलो. उद्विग्नता फार वाटू लागली.

माझ्यावर पहारा देणाऱ्या शिपायांसह एक वॉर्डरही येई. तो चौदा वर्षे काळे पाण्याची शिक्षा झालेला असताही तीनएक वर्षांतच वॉर्डर होऊन सापेक्षतः किती स्वतंत्रपणे फिरत होता! आणि मी ती चौदा वर्षे जवळजवळ कोठडीत बंद राहून भरली असताही माझ्यावरील कडक पहाऱ्याचे आणि कारागारीय हालअपेष्टांचे आवरण रतिमात्र ढिले न होता अधिकच गळेचेपी करीत चालले आहे!

मन रमविण्यासाठी लोखंडी गजास धरून उभा होतो. संध्याकाळ जाऊन अंधेर पडला. एक शिपाई हळूच काही काही बोलू लागला. त्यावेळेस राजकारणाच्या स्वरूपाविषयीचा मूर्खपणा किती बोकाळला होता त्याचे आंशिक प्रत्यंतर त्याच्या बोलण्यातील एका गोष्टीवरून मला मिळाले. कलकत्त्यातील आणि इतर राजकीय चळवळींविषई त्याच्या अज्ञ भावना व्यक्त करता करता तो म्हणाला.

''आता एक-दोन महिन्यांत स्वराज्य मिळणार; कारण गांधी नावाचा कोणी योगबळी लढू लागला आहे. इंग्रजांचे त्याचेपुढे काही चालत नाही; कारण त्यास गोळीच लागत नाही! आणि कारागृहात कोंबले तर मनात येताच तो जादू करून खोलीतून नाहीसा होतो तो आपला पुन्हा तटाबाहेर उभा राहलेला दिसतो. असे अनेक वेळा झालेले आहे. ''

महात्माजींस अनेक वेळा लहानसहान शिक्षा होऊन बंदीत पडावे लागले; पण त्या भरताच ते अनेक वेळा सुटलेही. या बातमीचे त्याचे डोक्यात - आणि त्याच्या-सारख्या शेकडो अज्ञ लोकांच्या डोक्यात असे विकृत प्रतिबिब पडले! आम्ही हसून म्हटले, ''त्यांच्या मनात येताच ते बंदीशाळेच्या तटाबाहेर पडून उभे राहिलेले दिसतात हे एका अर्थी खरे आहे. पण त्यात ध्यानात ठेवावयाचे इतकेच की खोलीतून नाहीसे होऊन तटाबाहेर उभे

www.savarkarsmarak.com

राहण्याचे त्यांचे मनात त्याच दिवशी येते की ज्या दिवशी त्यांची सरकारी शिक्षा पुरी झाल्याने सुटका होणारीच असते! आणि स्वराज्य योगबळाने मिळविण्याविषयी विचारशील तर. . .

शेजारी कोकेनविक्रीकरिता शिक्षा झालेला एक चिनी तरुण मागाहून आणला गेला. तो दोन दिवसांनी सुटणार म्हणून नाचे, बागडे, गाणे गाई. तसे दोन दिवसांनी सुटावयाचे हे ऐकून गाणे गाण्याचे भाग्य आम्हास. . . ! छे ती आशाच नको.

त्या चिनी मनुष्यास सन्यत्सेनाचे नाव माहीत होते. तो आमच्याही नावाशी परिचित असल्याने बोलता बोलता उघडकीस आले. तोच मी हे कळल्यावरही त्यास खरे वाटेना. इतका थोर म्हणून ज्यास मी मानी तो मनुष्य अशा कोठडीत मावला तरी कसा! थोर पुरुषाची जी अक्राळविक्राळ कल्पना त्याच्यासारख्या माणसाची झालेली असते तिला त्या साध्या मनुष्यासारख्या असणाऱ्या थोर पुरुषांच्या प्रत्यक्ष दर्शनाने नेहमीच असा धक्का बसत असतो. त्याने मला विचारले ''तुम्हास गोळी लागते का?'' मी म्हणालो ''अर्थात लागलीच पाहिजे. '' तेव्हा तर तो फार निराश झाला.

एका शिपायाने विचारले, ''तुम्ही किती दिवस-रात्र पोहत होता समुद्रात?'' अर्थात मार्सेलिसला. आम्ही म्हटले, ''छट् दिवस-रात्र कसली! दहा मिनिटे देखील पोहत नसेन तो तीर गाठले गेले!'' हे अनपेक्षित उत्तर ऐकताच त्याच्या अद्भुतताप्रिय आदरास एकाएकी दिसेल इतका धक्का बसला! आम्ही बढाईने खोटे बोलतो तरी एक वेळ त्याने क्षम्य मानले असते आणि त्यास तितका धक्का बसता ना. तो काही वेळ अगदी रागावल्यासारखा दिसू लागला. आम्हास मार्सेलिसविषयी खरी तीच माहिती सांगण्याच्या खोडीने अशा कित्येक भोळ्या मित्रांच्या आदरास मुकावे लागले आहे!

## वर्तमानपत्र पाहिले

कलकत्त्याहून आठ-एक दिवसांत आमची पाठवणी झाली - कोणत्या कारागृहात ते प्रथम कळले नाही. गाडीत फळफळावळ आणि वर्तमानपत्रे स्टेशना स्टेशनावर लोक येऊन टाकून जात. थवे जमून डोकावण्याचा प्रयत्न करीत. त्यावरून आम्ही कलकत्त्याहून निघालो ही बातमी कोणी तरी तत्काल तारेने पुढे धाडली असावी असा आम्हास विश्वास वाटला. नागपूरच्या पुढे - का कुठेसे येतो तो आम्ही अंदमानहून हिंदुस्थानात परत आणलो गेलो याविषयी आनंद प्रदर्शक मोठमोठ्या अक्षरांत छापलेल्या मथळ्यांनी आणि लेखांनी भरलेली पत्रे दिसली. आमच्याच पाठीशी असलेल्या भागात एक गृहस्थ असे एक पत्र उघडून आम्हास दिसेसे ठेवून वाचीत राहिला. भाषा मराठी, आमच्यासह येणाऱ्या अँग्लोइंडियन अधिकाऱ्यांच्या ध्यान्यात काही काही येईना. त्या पत्रांवरून आम्हास एका आठवड्यात सोडण्यात येईल अशी साधारण समजूत होती असे दिसले. पण खरा प्रकार आमचा आम्ही ओळखून होतो. तो गृहस्थ केवळ सहानुभूतीसाठी त्या गाडीने प्रवास करीत होता आणि अधिकाऱ्यांस टाळून शक्य ते सहाय्य देत होता. बातम्या मोठ्याने वाची की आम्ही ऐकावे.

## बारा वर्षांनंतर आलेले नाशिक!

त्या आमच्या पहारेकरी अधिकाऱ्यांनी आम्हास काही एक त्रास न देता ठीक वागविले आणि आम्ही मुंबईस येऊन पोचलो. वाटेत नाशिकचे स्टेशनवर भर रात्री गाडी येताच ''’नाशिक! नासक! नासक!’ असे ध्वनी उठले. पण आमच्या डब्याच्या खिडक्या पूर्वीच बंद करून या अँग्लोइंडियन अधिकाऱ्यांनी मला मध्ये बसावयास सांगितले होते. शेजारच्या डब्यात समोर काही माणसे येऊन बसली! पण त्या नाशिकच्या स्टेशनावरून आमची गाडी सुटून आज बारा वर्षे लोटत आली होती. एक नवीन पिढी वाढत आली. बारा वर्षांनी पुन्हा त्या स्टेशनावर या जीवनाची गाडी उलटून आलेली, तिथे कोणाची ओळख पटणार! पण तरीही ते ''नासक! नासक!'' असे स्टेशन आल्याचे ध्वनी ऐकून चित्तात काय काय तरंग उठले! त्या स्टेशनावर झालेल्या अनेक पानसुपाऱ्या, कॉलेजप्रवासाचे चिवडे, कलिंगडे, विलायतेस जाताना सभोवती दाटलेल्या मित्रमंडळाची अश्रुपूर्ण मुखमंडले - ते स्वातंत्र्यलक्ष्मीचे जयघोष - ती त्यांची हातकड्यांत आणि फाशीत झालेली रूपांतरे!! अशी चित्रे, चलचित्रे, मनःपटावर अस्वस्थ त्वरेने सारखी येत जात राहिली.

मुंबईहून इकडे वा तिकडे न बघू देता बोटीत चढविले गेले. प्रवास संपताच रात्री दहा-बारा वाजता एका कारागारात नेऊन आम्हास अंती बद करण्यात आले. ते कारागृह म्हणजे

## रत्नागिरीची बंदीशाळा.

आता यापुढील आमच्या कारावाराची माहिती यथाक्रम आणि यथाप्रमाण विस्ताराने देणे परिस्थितीमुळे शक्य नाही. मुख्य कारण हे की, ती याच प्रांतातील कारागृहांविषयी असून अगदीच अलीकडची आहे. तदनुषंगिक इतर कारणे उघडच आहेत. तेव्हा सद्यःपरिस्थितीत शक्य तितकी त्रोटक रूपरेखा काय ती देऊन हे वृत्त समाप्त करू.

रत्नागिरीच्या कारागृहात पहिले दोन तीन आठवडे फारच दुःसह गेले. अंदमानमध्ये जेवणाचे वेळेस दूध आणि सुपक्व अन्न आम्हास मिळू लागल्याने आमची पचनशक्ती अलीकडे थोडी सुधारून आम्ही जिवावरच्या दुखण्यातून कुठे उठत होतो नव्हतो - तो रत्नागिरीस येताच ते दुधाचे चार घोटही बंद झाले! आणि कारागृहातील ती जाडीभरडी भाकर पुन्हा पुढे आली. अंदमानात दोन वर्षे या कदन्नापायी आम्ही कसे मरणासन्न झालो होतो आणि आम्हास दूध आणि विशिष्ट अन्न देण्याची व्यवस्था श्रेष्ठातील श्रेष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांनीच कशी केली ते सर्व सांगितले पण उपयोग झाला नाही.

त्यातही अगदी एका बाजूस एका खोलीत, एकही मनुष्य जवळ न ठेवता आम्हास बंद करण्यात आले. दहा वर्षे शिक्षा भोगल्यानंतर अंदमानमध्ये ज्या थोड्याबहुत सवलती मिळाल्या होत्या - अंगभर कपडे, देहश्रमापासून मुक्तता, लिहिण्याचे काम, ग्रंथ लिहिण्यास कागद पेन्सिल, दहाजणात उठण्याबसण्यास स्वातंत्र्य - ते सर्व जाऊन पुन्हा शिक्षा लागली तेव्हा पहिल्या दिवशी मिळाला तोच कुडता, तोच पन्नास वर्षे बंदीचा '१९६०' सनी सुटका म्हणून लिहिलेला कथिली बिल्ला, तीच निर्जन एकलकोंडी! अगदी शिक्षा पुन्हा प्रथमपासून भोगावयास लागावी तसे दुःसह स्थित्यंतर झाले.

त्यातही बाबांची काहीच बातमी कळेना. त्यांसही अशाच भयंकर स्थित्यंतरात टाकले गेले असेल! अंदमानातील आमच्या इष्टमित्रांच्या स्मृतीनेही मन तळमळू लागले. काम सुताचे देण्यात आले. ते सवय नसल्याने पुरे होईना. पुस्तक देखील वाचावयास मिळेना. वेळ निघेनासा झाला.

## आत्मघाताचा अंतिम झटका!

आश्चर्य वाटेल! पण पळ, पळ, दुःसह वाटू लागले. बारा वर्षे - नव्हे विलायतेत गेलो तेव्हापासून अघटित, असह्य, अद्भुत संकटांचा आणि यातनांचा ताण सहन करीत करीत क्षीण होत आलेले मज्जातंतू या नवीन ताणासरशी आता तुटतात की काय असे वाटू लागले. एक दिवस इतकी उद्विग्नता वाढली की विवेक देखील उदासीन झाला. आता हे आणखी किती दिवस सोसावयाचे. नको हे जीवन! आता अधिक दिवस सडत पडण्यात काही लाभ नाही! - मी उठलो. त्या कोठडीसही अंदमानचे कोठडीप्रमाणेच वर भिंतीस खिडकी होती. तिला हात कसा पोचेल आणि स्वतःच्या जीवनाचा तंतू तिच्या गजास बांधून ताणून कसा तोडून टाकता येईल याची योजना केली! मनात भयाण उदासीनतेचा अंधकार पसरून क्षणोक्षणी अधिकच काळाकुट्ट होत चालला.

या रत्नागिरीच्या कारागृहातच- मी लिहीत आहे तेथून दोन हाकेस असणाऱ्या या रत्नागिरीच्या कारागृहातूनच माझ्या जन्मठेपीच्या उभ्या चौदा वर्षांत जे दोन अत्यंत असहनीय दुःखाचे क्षण गेले त्यांपैकी एक आणि शेवटचा क्षण त्या काळ्याकुट्ट अंधकारात गेला.

पण तेव्हा दिवस होता. म्हणून रात्रीची वाट पहावी लागली. तितक्यात मनःस्थैर्य हळूहळू पुन्हा प्रस्थापित होऊ लागले. ''अंदमानात इंदुभूषणपासून तो प्रो. परमानंदांपर्यंत जे अनेक बंगाली, पंजाबी, शीख इत्यादी देशभक्त यातनांस कंटाळून आत्मघातास कर्तव्य समजू लागले त्यांस ज्या कारणासाठी तू त्या कृत्यापासून परावृत्त केलेस त्याच कारणासाठी तूही परावृत्त हो. मरणेच तर शंभरी शंभर रुपये घेऊन. . . ''

रात्री पुन्हा एकदा आयुष्याच्या अतिकर्तव्याची रूपरेखा सुस्पष्टपणे आखण्यासाठी एकाग्र होऊन बसलो. नेहमीप्रमाणे चित्तवृत्तिनिरोध मन सुप्तसम निश्चल होईतो करीत स्वस्थ बसून मग शनैः शनैः आयुष्याचे त्रिकालाबाधित ध्येय- त्यापासून अनुप्राप्त होणारे कालदेशपात्राने मर्यादित उपध्येय- त्याचे अनुषंगाने ठरणारे मुख्य कर्तव्य- आणि तदनुकूल म्हणून अपरिहार्य झालेला तात्कालिक जीवनक्रम! हे सर्व विवेचून पाहिले.

## याही असह्य दुःखास सहन करणेच करणे

कारण की, नुसते तसे ते असहास सहन करणे हेच या परिस्थितीतील श्रेष्ठतम राष्ट्रकार्य होते! ते करून जे साधेल ते इतरही करीतच राहणे.

पुन्हा निश्चय झाला. दुसरे दिवशीपासून मागे अशाच निर्जन एकान्तात रचित होतो त्या कवितांचे तुटलेले सूत्र पुन्हा हाती घेतले आणि विलायतेत धरलो गेलो तेव्हापासून रत्नागिरीस येईपर्यंतची माझ्या कारावासाची कठोर कथा संकलित रूपाने मनातले मनात रचण्यास आरंभ केला. ग्रंथ कागदावर लिहावा तसा मनात लिहून त्याचे भाग, प्रकरणे आणि मुख्य घटना क्रमवार पाठ करून टाकल्या. त्या सांगावयाच्या कशा ते स्मृतीस चालना

देऊन, फुटकळ गोष्टी शक्यतो एकाग्र चित्ताने आठवून आठवून ते मनास पान पान वाचून दाखविले. पुढे प्रसंग साधून काय करीत बसे : त्याच्या आजूबाजूच्या लाल विटांच्या तुकड्या-ताकड्यांनी मनास समजेल अशी मुख्य विधेयांची टिपणे चिऱ्यांवर आणि. . . कोरून वा रंगवून ठेवली. दोन-तीन महिने हे काम जोरात चालले होते.

त्याच शिलालेखी टिपणांची आणि स्मृती लिखाणांची हा ''जन्म ठेपीचा'' आज प्रसिद्ध होणारा ग्रंथ ही कागदी विस्तृत आवृत्ती आहे.

त्या दोन-तीन महिन्यांत हळूहळू माझी परिस्थिती बदलली. जेवण थोडे बरे मिळू लागले. मध्यंतरी कलकत्त्याच्या कॅपिटल पत्राने माझे एम्डेनच्या जर्मन कटाशी सूत्र जुळलेले होते इत्यादी लिखाण लिहिल्यामुळे त्याचेवर माझे बंधूंनी खटला करण्याची सूचना देताच त्या पत्राने क्षमा मागितली, त्या प्रकरणात काही दिवस गेले. भेटीही घरच्या येऊ लागल्या.

सिंधमधून आणि इतर भागांतूनही कित्येक असहयोगी आणि खिलाफती हिंदु-मुसलमान, राजकीय बंदीवान त्याच कारागारात आमचे मागोमाग आले होते. त्यांच्या खिलाफतीच्या, हिंदुमुसलमानविषयक एकीच्या आणि राजकीय धोरणाच्या कल्पना, त्या काळच्या मला तेव्हा विपर्यस्त वाटणाऱ्या उपदेशाने कलुषित झालेल्या असल्याने त्यांच्याशी त्या त्या विषयावर एकसारखे वाद, संवाद, चर्चा करण्याचे कार्यही जोराने सुरू करावे लागले. थोडेच दिवसांत अंदमानचे पद्धतीप्रमाणे आठवड्याच्या बैठकी आणि व्याख्यानेही आरंभिली. आम्ही सर्वजण सरासरी वर्ष दीड वर्ष एकत्र होतो. मी त्यांस प्रथम पाहिले तेव्हा एक मित्र तर स्पष्टपणे ओरडत असे, ''मलबारमध्ये मुसलमानांनी हे अत्याचार केलेलेच नाहीत!'' दुसरे मित्र तर जोरजोराने म्हणत, ''झाले असले तरी काही चिंता नाही. हिंदूंनी मुसलमान देखील व्हावे- पण स्वराज्य मिळाले पाहिजे. '' अहिंसा आणि सत्य यांच्या व्याख्येचा विपर्यास तर काही विचारावयासच नको! एका सुशिक्षित राजबंदीवान बंधूंची खालील गोष्ट सांगितली असता त्या काळात मला जे अनेक असहकारितेच्या आणि खिलाफतीच्या ठशात ओतलेले माझे देशबांधव भेटले त्यांच्या मनःस्थितीची कल्पन येणारी आहे.

राष्ट्रीय बातम्या मिळविण्याकरिता आम्ही राजबंदी अर्थातच अंदमानप्रमाणेच अनेक युक्त्या प्रयुक्त्या करीत होतो. तेव्हा कधी कधी केर-कचऱ्यातून किवा बाहेर काम करण्यास जाणाऱ्या बंदीवानाच्या चलाखीने वर्तमानपत्राचे चिटोरे हाती पडत. आमच्या या असहकारवादी मित्राने ते चिटोरे आमच्याप्रमाणे घेऊन वाचावेत. दोनतीनदा फारच निष्काळजीपणाने तो मित्र ते चिटोरे घेऊन उघड्या अंगणात वाचीत हिडताना पाहिल्याने दुसऱ्या एका राजबंदीवानाने त्यास ''तसे करू नका. नाहीतर वर्तमानपत्रे वाचण्याची बंदी असल्यामुळे ते चिटोरे आणणाऱ्या साधनाचा बोभाटा होऊन बातम्या मिळणार नाहीत. '' पण या सद्गृहस्थाने उलट उत्तर दिले, ''म्हणजे, मी गुप्तपणे हे वाचू की काय? असहकारी आहे मी. गुप्त ते खोटे मी कधी आचरणार नाही''. त्याच्याशी अधिक न बोलता मंडळीने त्यांस पुढे तसे चिटोरे वाचावयास देणे बंद केले. तेव्हा चिडून त्यांनी सांगितले की ज्या बंदीवानांच्या टोळ्या जशी तंबाखू चोरून आणीत तसाच एखाद-दुसरा कागदही गुप्तपणे आणीत त्यांचे नाव मी उद्या अधिकाऱ्यांस सांगणार! कारण सत्य छपविणे पाप आहे!

## मी असहकारी- सत्य हे आमचे ब्रीद!

मंडळींनी अर्थातच म्हटले, अहो, पण ते चिटोरे तुम्हास मिळत होते तेव्हाही ते गुप्तपणेच मिळत होते हे तुम्हास माहीत होते. मग तेव्हा ते असत्य म्हणून तुम्ही का त्याज्य मानिले नाही? आणि ज्याच्या गुप्त सेवेचा तुम्ही अंगीकार करून स्वतःची तहान भागविलीत त्याचे आता नाव देणे- तो तुम्हास राष्ट्रीयबंदी म्हणून साहाय्य देत असता नाव देणे म्हणजे विश्वासघात करणे नव्हे काय? हे जर सत्य असेल तर मग नरेंद्र गोस्वामी देखील असहकारी म्हणून तुम्हास पूज्यच असला पाहिजे!

तो गृहस्थ अर्थातच दबला. पण येता जाता बातम्या गुप्तपणे आणणे हे पाप आहे. मॅझिनीसारखे गुप्तसंस्थांचे प्रवर्तक सर्व पापी होते. आम्हां असहकारितावाद्याचे मुख्य वाद म्हणजे जी चळवळ करू ती उघड करू. त्यात भ्याडपणा मुळीच नाही असे म्हणून गप्पा मारीत फिरत असे.

एक दिवस गंमत करण्याकरिता म्हणून जेवतेवेळी राजबंदीवानांतील काही मंडळींनी एक युक्ती केली. ते गृहस्थ कारागारातील भाताच्या दिवशी देखील स्वैंपाक्यास आंजारून गोंजारून गव्हाची पोळी अंतःस्थपणे घेऊन खात असत. त्याप्रमाणे त्यांनी ती पोळी चोरून घेऊन खाऊ लागताच एकजण खोटेच म्हणाला, ''अरे तो पहा पर्यवेक्षक (Superintendent) येतो आहे!'' हे म्हणताच त्या गृहस्थानी झटपट ती पोळी जवळच्या तरटाखाली लपवून ठेवून साळसूदपणे भात खात बसण्यास आरंभ केला! तेव्हा एकच हशा पिकला. सगळे विचारू लागले, ''अहो- आता पोळी लपविणे हा भ्याडपणा नाही का? पोळी 'चोरून' (जे निर्बंधाविरुद्ध करणे ती चोरी या व्याख्येनुरूप) खाणे चालते का?'' तेव्हा एकाने उपरोधिक उत्तर दिले, ''अर्थात, आमच्या टीचभर पोटासाठी पोळीच्या तुकड्याची चोरी करणे काही असहकारी सत्यवानास निषिद्ध नाही. केवळ आपल्या राष्ट्राच्या स्थितीची कल्पना असावी या सार्वजनिक हितबुद्धीने एखादा वर्तमानपत्राचा तुकडा लपून वाचणे हे निषिद्ध आहे. पोटासाठी- तुकड्यासाठी- असत्य बोलणे हा थोडाच भ्याडपणा आहे? राष्ट्रासाठी असत्य बोलणे हा भ्याडपणा आहे!''

ही गोष्ट एकाच गृहस्थाची असती तर ती आम्ही दिलीही नसती. परंतु अशा प्रकारची मनोवृत्ती त्या काळच्या कित्येक खिलाफती- असहकाऱ्यांत आढळून आली. याचे एक गमतीचे पण अर्थपूर्ण उदाहरण म्हणून ही गोष्ट दिली.

मलबारवर तिकडची परिस्थिती कळण्यास दोन-तीन ऐतिहासिक व्याख्याने दिली. आमच्या त्या सर्व मित्रांस संघटनांविरुद्ध असणाऱ्या त्यांच्या एकजात विरोधातील हेत्वाभास पटवून दिला. राजकारणी चर्चा तर सारख्या चाललेल्याच असत.

## रत्नागिरीच्या बंदीगृहात शुद्धी

लवकरच तिथेही सिंधी किवा पठाणी मुसलमान बंदी जे मुंबईहून धाडण्यात येत त्यांच्या हिंदू मुलांस बाटविण्याच्या खटपटी आमच्या आढळण्यात येऊ लागल्या! तेथील अधिकाऱ्यांपर्यंत या गोष्टीचा सुगावा किवा कल्पनाही नव्हती. पण मुसलमानी बंदीवानांचा नित्याचाच आणि सर्वत्र चाललेला क्रम आम्हास माहीत होता तेव्हा

www.savarkarsmarak.com

आमच्या ते तत्काल लक्षात आले. आम्हीही अंदमानाप्रमाणेच तिथे शुद्धीची चळवळ काढली. दोघातिघा पुरभय्या वयस्क हिंदूस आणि काही मुलांस शुद्ध करून घेतले. त्यांस लागेल ते आर्थिक साहाय्यही आम्ही पोचवू. वाद अर्थातच वाढत चालला. पर्यवेक्षकापर्यंत खडाजंगी उडाली. मुसलमानी, सिंधी आणि पठाण तेव्हा रत्नागिरीच्या कारागारात फार बोकाळले होते. ते अधिकाऱ्यांच्या आणि मराठी शिपायांच्याही, नाकी नऊ आणीत. त्यांचा आमचा उभा दावा जुंपला. त्यांत काहीजण तर आमच्या अगदी शेजारीच असल्याने आम्हास माराच्या धमक्या देऊ लागले. त्या त्रासाचे उदाहरण म्हणून एक गोष्ट देतो.

एकदा हिंदूस केवळ त्रास देण्यासाठी म्हणूनच जे कधी नमाजदेखील पढत नसत अशा मुसलमानी चोर, डाकू इत्यादी दंडितांनी पहाटे आणि अर्ध्या रात्री देखील उंच ओरडून 'बांग' देण्यास आरंभ केला. त्या त्यांच्या मोठ्याने ओरडण्यामुळे सर्वांची झोप मोडून मोठा त्रास होऊ लागला. अधिकाऱ्यांनी दटावले पण ते ''हा आमचा धर्म आहे'' म्हणून उलट दटावीत. वरिष्ठ अधिकारीही थकले; तेव्हा आम्ही आमचे नेहमीचे औषध दिले. एक-दोन हिंदू अगदी पटाईत बंदीगृहातील लुटारूंचेही गुरू - असे हाताशी धरले, त्यात एक दात पडलेला- आणि चोऱ्या करीत चारपाच वेळा मोठमोठ्या शिक्षा घेत कारागृहासच आपले घर समजणारा म्हातारा होता. त्यांनी पहाटेस उठून मोठ्याने 'रामनाम' जपण्यास आरंभ केला. मुसलमान 'बांग' देत ओरडू लागला की या हिंदूंनी तुळसीदासाचे दोहे आणि रामनाम उच्चारीत त्यांच्याहीपेक्षा मोठ्याने ओरडू लागावे. शिपायांनी त्या हिंदूंस दटावताच आम्ही मध्ये पडावे आणि म्हणावे, ''हे काय. एकतर सर्वांसच प्रार्थना मोठ्याने करणे बंद करा. नाहीतर मुसलमानां प्रमाणेच यांनाही मनःपूत प्रार्थना करू देणे भाग आहे. '' मुसलमान रात्री नमाज पढताना पाहिला की या हिंदू भक्तांनी भजन करण्यास आरंभ करावा. मुसलमानांच्या रागास पारावार राहिला नाही; पण निरुपाय झाला. हिंदूंच्या झोपा ते मोडीत तसेच त्यांचीही झोप हिंदू मोडू लागले. तेव्हा त्या दोन्ही लुच्चेपणाचा छेद परस्पर जाऊन बाकी पूज्य उरली. आणि अधिकाऱ्यांच्या शिक्षेसही जो मुसलमानी गुंडपणा बंद करता आला नाही तो हिंदू गुंडपणाची तोड मिळताच आपण होऊन बंद पडला! याच औषधाने एका खिलाफती वृत्तसंपादक मुसलमानाचा ''समानत्वाचा'' भ्रमही बराच उतरला. तो पाण्यास ''हिंदूंनीच का शिवावे? मुसलमान काय मनुष्ये नाहीत?'' असे म्हणून बळाने शिवे. मी त्याच्या त्या युक्तिवादास पूर्णपणे अनुमोदन देऊन तिथेच असलेल्या हिंदू मेहेतरास त्याच पाण्याच्या पिपातून पाणी- शुद्ध भांड्याने पण स्वतः- घ्यावयास सांगे. असे होताच तो ''मनुष्ये समान मानणारा'' खिलाफती मुसलमान त्या मेहेतरास (अस्पृश्यास) दटावू लागला आणि ते पाणी निमाजास अशुद्ध झाले म्हणून घेईना. तेव्हा समानतेचे ढोंग असे दोनदा-तीनदा उघडकीस आणल्यावर मुसलमानांनी ठरलेल्या हिंदू पाणीवाल्याकडून पाणी गुपचूप घेण्यास आरंभ केला आणि ते पुन्हा पाण्यास शिवले नाहीत.

## रत्नागिरीचे कारागृहात दंगा

मध्यंतरी त्या उद्दंड पठाणाशी आणि कारागृहात मुरलेल्या सोद्या सिंधी मुसलमानाशी अधिकाऱ्यांच्याच निर्बंधाचे शिस्तीवरून खटका उडून प्रकरण विकोपास गेले. तेव्हा त्या गुंडांनी शेवटचा परिचित उपाय म्हणून दंगा करण्याचे ठरविले. हिंदू वॉर्डर, हिंदू शिपाई आणि आम्ही हिंदुसंघटक राजबंदी या सर्वांस भयंकर मारहाण करण्याचा

कट चालला. शेवटी एके दिवशी जेवणे होताच एकाएकी ते मुसलमानी गुंड उसळून हिंदूंवर तुटून पडले. काही हिंदू शिपायांस आणि हिंदू वॉर्डरांस आम्ही प्रथमपासून सावध करीत आलेलो होतो. त्यामुळे तो घाला अचानकपणे आला तरी हिंदूंनी तोंड दिले; कित्येक हिंदू वॉर्डर रक्तबंबाळ झाले; कित्येक मुसलमान गुंड बेदम चोपले गेले. ते आरडत ओरडत आणि मारहाण करीत आमच्यावर चालून येण्यासाठी बंदीगृहाच्या आतल्या भागात घुसू पाहत होते. आम्हीही सज्ज आणि सावधपणे खोलीबाहेर पडून हिंदूंस संरक्षणार्थ लढण्याचे उत्तेजन देत होतो. इतक्यात भयघंटा वाजू लागली. जिकडे तिकडे मारो! हाणो! म्हणून मारमारी सुरू झाली. सशस्त्र पोलिसांसुद्धा पर्यवेक्षकही आले. गोळी घालावयाचा धाक घातला. तेव्हा मुसलमानी गुंड एकजात घाबरले. धरले गेले. बहुतेक मार खाऊन रक्तात न्हालेले होते. पुढे खटले झाले. आघातक गुंडांस शिक्षा झाल्या. ज्या हिंदू वॉर्डरांनी स्वतःचे आणि इतर हिंदूंचे रक्षण केले आणि निर्बंधाची (कायद्याची) बाजू उचलली त्यांस प्राशंसके देण्यात आली.

या सर्व प्रकाराने जे हिंदू शुद्धिचळवळ सुरू केली म्हणून आम्हासच 'बाटगा' म्हणत ते देखील शुद्धीस अनुकूल झाले. आणि थोडेच दिवसांत एका अगदी मूळच्या मुसलमानास शुद्ध करून घेण्यात आले, तेव्हा मुसलमानांनाच आमचेवर खटला करावा लागला. नेहमीप्रमाणे कोटिक्रम होत होत अंती निर्णय झाला की, यापुढे कारागारात कोणासही धर्मांतर करण्याची बंदी असावी. अशा रीतीने हिंदूंस बाटविण्याचा धंदा बंद पडला. आमच्यावर आक्रमण करण्यासाठी टपून बसलेल्या धर्मवेड्या मुसलमानांवर आम्ही शेवटपर्यंत सावधानपणे दृष्टी राखून होतो. राजबंदी पूर्वी खिलाफत चळवळीत स्वतः पैसे देऊन आणि प्रचार करून झटलेले होते त्यांचेदेखील या सर्व चळवळींनी आणि प्रकारांनी डोळे उघडून ते हिंदुसंघटनांचे कट्टे पुरस्कर्ते झाले आणि संघटनांचे दुर्बिणीतून पाहण्याची सवय लागताच त्यांचे राजकारणही प्रतियोगी धोरणात रूपांतर पावले. ते सुटून गेल्यावर आपआपल्या प्रांतांतून हिंदुसंघटनांचा नेटाचा पुरस्कार करीत होते.

साधारण बंद्यांच्या शिक्षणाची चळवळही अंदमानप्रमाणेच रत्नागिरीच्या कारागारातही जोराने चालविली. स्वतः कित्येकांस शिकविले. पैसे देऊन पदरचे पैसे पारितोषिक म्हणून देऊन पुस्तके वाचण्याची प्रवृत्ती उत्पन्न केली. ग्रंथालयात पुस्तके नव्हती. अर्जावर अर्ज करून मुंबई सरकारपर्यंत लिखाणे धाडून नवीन पुस्तके पाचशे रुपयांपर्यंत आणविली. ती टिपणी स्वतः करून दिली. पर्यवेक्षकाकडून आणि सरकारी मुख्य शिक्षण विभागाकडून संमत होताच ती मागविण्यात आली. बंदीवानांची वाचण्याची रुची इतकी वाढली की आणि त्यामुळे दीड वर्षात कारागृहातील भांडणांची संख्या इतकी दृग्गोचर होईल अशी कमी झाली की कारागृहाचे प्रतिवृत्तांत तिचा अधिकाऱ्यांना उल्लेख करावा लागला; आणि त्याचे कारण शैक्षणिक अभिरुची वाढली हेच होय हे मान्य करावे लागेल.

मुसलमानांच्या ईद इत्यादी सणांत त्यांस सार्वजनिक प्रार्थना करू दिली जाई. मौलवीही येई. ख्रिस्त्यांसही तीच सवलत असे. पण हिंदूंस नसे. म्हणून सर्व राजबंदीवानांनी खटपट करून हिंदूंसाठीही गोकुळअष्टमीस मुंबई सरकारकडून कथेची परवानगी मिळविली. उपासास सामान देण्याचीही रीत पाडली. हरि कथा सार्वजनिकपणे करण्यात आली.

कारागृहात राजबंदीवानांच्या प्रयत्नाने इतर अवस्थेतही फार सुधारणा झाली. उदाहरणार्थ, तेथील शौचकूपांची अत्यंत ओंगळ पद्धत घेऊ. सहासात माणसे एकदम त्या शौचकूपात रांगेने बसावयाची. मध्ये आडपडदा मुळीच नाही. इतकेच नव्हे तर पावसात वा उन्हात वर छप्पर देखील नाही. आणि इतक्या जवळ बसणे की अगदी अंगाला अंग लावून सगळ्यांना बसावे लागे! पाणी बरोबर न्यावयाचे नाही; तर सगळ्यांनी तसेच उठून दूरच्या नळावर जाऊन तिथे अंगाचा मळ धुवायचा! अशा गलिच्छ गैरसोयी राजबंदीवानांतील मंडळींच्या चळवळीने पुष्कळ अंशी दूर झाल्या. अन्न सुधारले. कामाचा जाच कमी झाला. आणि त्यायोगे नैर्बंधिक शिस्त (Order & discipline as laid down by regulation) कमी न होता बंदीवानांची वागणूक उलट अधिक टापटिपीची आणि शिस्तवार झाली.

आणखी एक अपुरे कार्य रत्नागिरी बंदीगृहात असताना आंशिक पूर्णत्व पावत होते. अंदमानात असताना जेव्हा इतर काहीच प्रत्यक्ष राष्ट्रकार्य करणे शक्य दिसेना तेव्हा एक काव्य मनातल्या मनात रचावयाचे म्हणून आम्ही केलेला निश्चय वाचकांच्या लक्षात असेलच. पुढे अनेक प्रत्यक्ष कार्ये करण्याची संधी मिळत गेली तसे तसे ते मागे पडले. रत्नागिरीस बंदीत असताना अंदमानात रचलेल्या त्या खंड कविता- ज्या एका काव्याच्या अनुबंधाने गोवल्या जाणार होत्या त्या- आम्ही पूर्ण केल्या. पूर्वीच पुऱ्या झालेल्या कविता संकलित केल्या. आणि हिंदू संघटणास अत्यंत आवश्यक- त्या कार्याचा केवळ पायाच असलेली जी 'हिंदू' शब्दाची व्याख्या- तिचे निश्चित रूप ठरविण्यासाठी हिंदुत्व हा ग्रंथ लिहिला. अंदमानमधून आमची कित्येक लिखाणे आम्ही घरी धाडलीच होती. वरील सर्व कवितांतून निवडून आमच्या बंधूंनी कमला, सप्तर्षी आणि गोमांतक ही काव्ये प्रसिद्ध केली. ती प्रथमतः प्रच्छन्न नावाखालीच प्रसिद्ध केली गेली. चौथे 'विरहोच्छ्वास' इत्यादी फुटकळ कवितांचे पुस्तक छापलेही होते पण त्यात आमच्या अनुपस्थितीमुळे इतक्या मुद्रणत्रुटी राहून गेल्या की ते अशुद्ध पुस्तक प्रकाशणे बंद करावे लागले. ती सर्व आवृत्ती छापूनही नष्ट केल्यासारखीच टाकून द्यावी लागली. कमला, गोमांतक आणि महासागर ही खंडकाव्ये त्या प्रथम संकल्पित महाकाव्याची उपांगे म्हणून निर्मिलेली होती. ती उपांगे जिवंत राहिली; परंतु जिची ती उपांगे होती त्या मुख्य देहलतेचा अजून जन्मही झाला नाही. असेच आहे - उपाधीचे काम ऐसे । काही साधे काही नासे!

या ग्रंथापाठोपाठच 'हिंदुत्व' हा आमचा इंग्लिश भाषेतील ग्रंथही आमचे मित्र श्री. केळकर (नागपूर) यांनी प्रसिद्ध केला.

रत्नागिरीच्या कारागृहात प्रथम स्वतःचे पुस्तकही मिळेना. पुढे रामदास तेवढा मिळाला. त्या ग्रंथाचा- विशेषतः दासबोध आणि स्फुट अभंग यांचा लहानपणापासून दृढ परिचय होताच. त्यात इतर पुस्तक नाही. तेव्हा त्याची वारंवार अनेक पारायणे केली. पुढे मग पुस्तके मिळू लागली आणि लेखनसाहित्यही मिळाले. तेव्हा वाचन नि लेखन सुरू केले. पृथ्वीराजरासो, भविष्यपुराण, वेदिक इंडिया (दास) इत्यादी अनेक मोठमोठे ग्रंथ आद्यन्त वाचले.

एक दिवस सहज बातमी म्हणून एकास विचारावयास गेलो तो कळले की, बाबा अत्यंत चिंताजनक स्थितीत आहेत!

माझ्यापासून कलकत्त्यास त्या बोळाने दूर नेले गेल्यावर बाबांना विजापूरच्या कारागृहात बंद करण्यात आले. त्यांस भेटण्यास माझे कनिष्ठ बंधू डॉ. सावरकर गेले असता त्यांना आज्ञा झाली की, खादीचा वेष बदलाल तर आत या!

अर्थातच कनिष्ठ बंधूने ती अपमानास्पद अट नाकारली; आणि गव्हर्नरपर्यंत आंदोलन पोचवून ती अट तोडून टाकविली. शेवटी खादीच्याच वेषात त्यांस कारागृहात बाबांस भेटू दिले. बाबांचे विजापुरास फार हाल झाले. कल्पना करवणार नाही अशा एका ओसाड आणि भयाण खोलीत त्यांस एकटे कोंडले. पुढे याच तुरुंगात एका राजबंदीस वेड लागले असे आम्ही ऐकले. त्या कोठडीत निदान बाबांच्या मनावर तरी फार घातक परिणाम होऊ लागला. पुढे त्यांस अहमदाबादेस नेले. तेथे एकान्ताचा क्रूर जाच पुष्कळ कमी झाला; पण त्यांच्या विकोपास जाणाऱ्या क्षयाची काहीच काळजी घेण्यात आली नाही. अंती त्यांच्या त्या अत्यंत श्रमसहिष्णू देहाच्या सहनशक्तीसही हार खावी लागली. ते अत्यवस्थ स्थितीत बंदीगृहातील रुग्णालयात पडले. एका राजबंद्याच्या साहसाने ती बातमी बाहेर फुटली. आमचे कनिष्ठ बंधू गेले तो बाबा जवळ जवळ आसन्नमरण स्थितीत! पण धैर्य? मेरूसारखे अचल!

ही बातमी मला कळताच वाटले बाबा आता हातचे जातात. सर्वच आपण जाणारे प्रवासी आहोत! आयुष्य ही दोन दिवसांपुरते उतरण्याची धर्मशाळा आहे. पण बाबा जन्मभर दुसऱ्यासाठी हाल सोशीत झिजत असता जवळ मायेचे कोणी तोंडात पाण्याचा थेंब घालण्यासही उरले नसताना जातात! शेवटी कारागृहाने त्यांस जे गिळिले ते गिळिलेच!

हाय! हाय! बाबांस. . . शेवटी ठार मारले! ठार मारण्याहून शतपट क्रूरपणाने छळून छळून ठार मारले! यांनी. . . ! राग अंगात मावेना. दुःखाने श्वास घेणे क्षणभर जड जाऊ लागले.

तेव्हा अशा अत्यंत अस्वस्थप्रसंगी आमचा परिपाठ असे त्याप्रमाणे स्थिरासन घालून स्वस्थ बसलो. चित्त शक्यतो समाहित केले. आणि मग स्वतःस विचारले, जळफळून काय उपयोग. बाबा कष्टांनी ठार केले. बहुतेक त्यांचा बळी घेतला! पुढे काय?. . . पुढे केवळ शोक नाही तर प्रतिशोध!

वाटेल त्या रीतीने. . . आणि सुटका होताच. . . बस्स. बाबांच्या मरणाचा. . . ! नंतर त्यांचे श्राद्ध करीन!!! म्हणजे इतर देशभक्तांची श्राद्धेही लोक अशी करू लागतील. हा निश्चय स्थिर केला. निष्कारण तळमळ शांत झाली.

थोडेच दिवसांत बातमी आली- बाबा सुटले! आनंद झाला. सुटले पण इतक्या दुर्धर स्थितीत की घरी बेशुद्ध अवस्थेत आणावे लागले? तरी चिंता नाही. स्मशानाचा व्यय वाचविण्यापुरतेच जरी त्यांस सोडले असले, तरी सोडले आहे, त्यांच्या स्मशानाचा व्यय करता येण्याचे समाधान तरी कुठे आपल्या कुटुंबाचे पदरी पडणार होते! ती देखील शंकाच होती. त्याहून हे बरे, ही सुटका म्हणजे सुटका नव्हती, एका मरणातून तो बाबांचा पुनर्जन्म झाला होता! ईश्वराचे कृपेने आणि देशाच्या सुदैवाने त्या देशभक्ताची प्रकृतीही हळूहळू थोडीबहुत सुधारत चालली. देशभर आनंद झाला.

त्याच संधीस- का आगेमागे आठवत नाही- कोकोनाडाच्या राष्ट्रीय सभेने प्रत्यक्ष अध्यक्षांकडून माझ्या सुटकेचा ठराव मांडविला आणि एकमताने संमत केला. माझ्या आणि त्या उदाहरणाचे परिणामामुळेच इतर सर्व क्रांतिकारक राजबंदींच्या मुक्ततेविषयी राष्ट्रानेच चळवळ केली असता त्यांचीच नव्हे तर त्यांच्या कार्याचीही

प्रतिष्ठा राष्ट्रीय स्वरूप धारण करते अशा हेतूने मी अंदमानपासून जी राजबंदीविषयक सार्वजनिक चळवळ चालविली होती तिचा हा राष्ट्रीय सभेचा ठराव कळस होता. माझ्या बंधूंच्या आणि राजबंदीवानांशी सहानुभूती बाळगणाऱ्या सर्व राष्ट्रभक्तांच्या प्रयत्नांचे या ठरावाने नैतिक साफल्य तर झालेच!

आम्ही अंदमानातून १९२१ व्या वर्षी रत्नागिरीस आलो आणि १९२३ व्या वर्षी रत्नागिरीहून येरवड्याच्या कारागृहात आम्हास धाडण्यात आले असे आम्हास वाटते. सन पडताळून पाहण्यास वेळ नाही. या सर्व जन्मठेपीच्या वृत्तांताविषयीच हे सांगून ठेवणे अवश्य आहे की, कालक्रम स्मरणात नक्की नसल्याने थोडाबहुत चुकलेला असण्याचा संभव आहे. पण फारशी चूक नाही.

## अंदमानातील सहकष्टभोगी मित्रांची भेट

येरवड्यास आमची ही दुसरी भेट! पहिली १९१० व्या वर्षी आणि आता १९२३ व्या वर्षी! त्या वेळेस येरवड्यामध्ये मुळशी सत्याग्रहाचे राजबंदी येत. जात असत. त्यांतील कित्येकांस फटके मारण्यात आलेले होते. त्यांचे तेथे फार हाल झाले म्हणून आम्हास त्यांच्यातील जे थोडे लोक मागे उरले होते ते सांगत. त्याचप्रमाणे तेथे सिंध, धारवाड इत्यादी प्रांतांतील असहयोगी खिलाफती हिंदू आणि मुसलमान राजबंदीवानही असत. त्याहूनही आम्हास आश्चर्य वाटणारी घटना म्हटली म्हणजे ही होती की, तिथेच अंदमानातून हिंदुस्थानात सरकारने परत आणलेले आमच्या सहकष्टभोगी मित्रांतील लाहोरच्या खटल्याचे अनेक शीख आणि इतर राज्यक्रांतिकारक जन्मठेपीचे राजबंदीही होते! त्यांची आमची भेट- जरी आम्हास एका-बाजूस प्रथम बंद केले होते तरी- अंतःस्थपणे झाली. तेव्हा आपल्या जिवलग नातलगांस भेटावे तसा आनंद झाला! परस्परांच्या नेत्रांत अश्रू उभे राहिले. अंदमानात आम्ही एकत्र दुःखे भोगलेली होती. त्यांच्या किवा आमच्या मनात पापाचा संचार होता तर गुप्तकटांची माहिती देऊन आणि इतरांच्या गळ्यास फासात गुंतवून आम्हातील कोणासही आपली मुक्तता एक दिवसात करून घेता येती. पण ईश्वराने तशी कुबुद्धी कोणासही दिली नाही! यातनांचे तीक्ष्ण अंकुश हृदयात रुतत होते पण ते सहन करीत एखाद्या हटेल हत्तींच्या पंक्तीप्रमाणे आम्ही क्रांतिकारक पुढे पाऊल टाकवत नाही, मागे पाऊल टाकणे नाही, अशा पेचात ठिकच्याठिकाणी ठाण मांडून उभे होतो. भोवती छळाचा बाणवर्षाव सारखा चालला होता.

त्या क्रांतिकारकांविषयी त्या नवागत असहयोगी राजबंद्यांची फार विकृत समज झालेली होती; ते असहयोगी त्या जुनाट झुंजार राजबंद्यांस गुप्त कट करणारे कोणी पापी समजत! दोन वर्षे किवा अडीच वर्षे शिक्षा घेऊन आलेल्या त्या राजबंद्यांत कित्येक असे अननुभवी आणि अर्ध्या हळकुंडात पिवळे होणारे होते की त्या दहा दहा वर्षे काळेपाण्याचे कष्ट सोसलेल्या आणि सशस्त्र झुंज घेतलेल्या शीखादिक क्रांतिकारक राजबंदीवानांपुढे आपल्या दीडदमडीच्या दीड वर्ष शिक्षा भोगणाऱ्या सत्याग्रहाचा डौल सांगू पाहत! आणि त्यांस तुच्छ लेखू इच्छित!

मी या सर्व अज्ञ लोकांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालण्यास आरंभ केला. त्यांस हिंदुसंघटनाचे नाव देखील राष्ट्रघातक वाटे. प्रामाणिक परंतु अत्यंत विपर्यस्त अशा या त्यांच्या समजुतीचा मी तीव्र निषेध करू लागलो. आम्ही एका झाडावर चढावे- या राजबंदीवानांनी एकेक पहाऱ्यावर ठेवून इतरांनी पलीकडच्या पटांगणात जमावे आणि चर्चा सुरू व्हावी! अर्धा अर्धा तास राजकीय आणि संघटनविषयक चर्चा अशा स्थितीत त्या झाडावरून आम्ही करावी. पुढे आम्हास त्या राजबंद्यांच्याच पटांगणात ठेवण्यात आले. तेव्हा तर आम्ही त्या आमच्या

नवागत देशबंधूंस राजकारणाच्या आम्हास त्या वेळी विकृत वाटणाऱ्या कल्पनेच्या तावडीतून सोडविण्यासाठी दर दिवसा दोन दिवसाआड चर्चेच्या आणि व्याख्यानाच्या बैठकी तिथेही अंदमानाप्रमाणेच सुरू केल्या. हळूहळू त्यात ते सर्वजण भाग घेऊ लागले. आम्हास या वेळी विपर्यस्त वाटत अशा त्या नवागत राजबंद्यांच्या सर्व समजुती आम्ही कोटिक्रमाच्या आणि इतिहासाच्या आधाराने पार उधळून दिल्या. आणि त्यांच्यातील अनेक विपथगामी, अननुभवी, राजकारणात अज्ञ परंतु प्रामाणिक देशभक्त तरुणांनी अंती त्या अंदमानातील राष्ट्रीय सेनेच्या तत्वांचा आणि कार्यक्रमाचा स्वीकार केला. ते आता त्याच शीखादिक राजबंदीवानांच्या अतुल धैर्याचा आणि राष्ट्रीय स्वार्थत्यागाचा गौरव करून त्यांस योग्य तो सन्मान देऊ लागले.

त्या नवागत देशबंधूंत हिंदुसंघटनाविषयीही अत्यंत विपर्यस्त कल्पना प्रचलित असून ते त्या चळवळीचा मनापासून विरोध करीत. याविषयी त्यांच्याशी चर्चा करून त्यांच्यातील बहुतेक राजबंदींस संघटनाची तत्वे समजून देऊन त्या कार्याचे पुरते अभिमानी करण्यात आले.

मी येरवड्यास आणला जाताच हेतुपूर्वक असो वा नसो पण आमच्यावर पूर्वी अंदमानात असता जो पर्यवेक्षक असे आणि जो त्यानंतर कारापर्यवेक्षकाचे जागेपासून चढत चढत आता पंजाबच्या काराविभागाचा प्रांतीय पर्यवेक्षक झाला होता तो अधिकारी पंजाबमधून आणून येरवड्याच्या कारापर्यवेक्षकाचे जागेवर नेमण्यात आला. लोकवार्ता अशी होती की, या गृहस्थास माझा अंदमानचा वृत्तांत माहीत असल्याने मला सोडण्याचे प्रश्नाविषयी त्यांचे काय मत पडते ते पाहण्यासाठी त्यांस मी होतो त्याच कारागारावर नेमण्यात आले. कसेही असले तरी त्याच्या येरवडण्यास येण्याने अंदमानातून परत आलेल्या आम्हां राजबंद्यांस एक प्रकारचा आनंदच झाला. कारण त्या गृहस्थांचा स्वभाव एक प्रकारे मोकळ्या मनाचा आणि मनुष्यास जाणणारा होता. त्यातही त्यांच्या सत्ताकालातच आम्हांस अनेक वेळा अंदमानात संप, प्रचार, कट इत्यादी चळवळी कराव्या लागलेल्या असल्याने त्यांस आम्हा सर्वांच्या संघशक्तीची आणि स्वभावाची पारख झालेली होती. तेव्हा तुटेल तोवर आमच्या प्रकरणी ताणीत न बसता शक्यतो आमच्या न्याय्य मागण्या विकोपास जाण्यापूर्वीच पटकन मान्य करण्याचे धोरण त्यांना पटलेले होते.

हे अधिकारी पर्यवेक्षक होऊन येताच त्यांनी मला कोठडीतून काढून क्विनीनच्या विक्रीचा जो एक कारखाना आहे त्या कारखान्यावर मुख्य नेमले. तिथे असलेल्या सर्व मुलांस आणि इतर कामकऱ्यांस शिक्षण देण्याची परवानगी पण मला देण्यात आली. रत्नागिरीप्रमाणेच येरवड्याचे ग्रंथालय सुधारण्याची खटपट मी हाती घेतली आणि नवीन पुस्तके- विशेषतः त्या दरिद्री मराठी पुस्तकांच्या ज्या एक-दोन किडलेल्या पेट्यांस ग्रंथालय हे नाव होते त्यात- कोणची हवीत त्यांचे टिपणही झाले होते. हिंदी, मराठी इत्यादी उत्तम पुस्तके आम्ही त्यात टिपून ती सरकारी रीतीने मागविण्याची परवानगीही मिळविली. त्यानंतर ती पुस्तके तशी आली की नाही हे पाहण्यास आम्ही तिथे राहिलो नाही.

## येरवड्यातही शुद्धी

येरवड्यास इतर चळवळींबरोबरच आम्ही शुद्धिप्रकरणही हाती घेतले. त्या सर्व वृत्तान्ताचे निदर्शक म्हणून एक महत्वाची शुद्धी तेवढी त्रोटक आणि त्रुटितपणे इथे कथन करतो. तेथील एक प्रमुख अधिकारी मद्रासकडचे

असत. त्यांस पहिल्याने पाहिले तेव्हा ते नखशिखांत युरोपियन वेषात मढलेले आणि स्वतःस ख्रिस्ती म्हणून सांगण्यात एक प्रकारचा आत्मगौरव समजणारे होते. परंतु. . . त्यांच्या मनात धर्मविषयक भावना बळावून पुन्हा हिंदू व्हावे असे वाटू लागले. पण त्यांचे एक लग्नही ख्रिश्चन समाजात झालेले होते. ते लहानपणी एकदोघां ख्रिस्ती मित्रांकडे जेवले म्हणून त्यांस हिंदुब्राह्मणांनी बहिष्कृत केलेले होते! त्या सर्व प्रकाराविषयी यथास्थित चर्चा होता होता. . . त्यांचा हिंदू होण्याचा निश्चय ठरला. परंतु हिंदुधर्मात परत येताच जे नवे गृह बांधावयाचे त्याच्या गृहिणीपदाचा अधिकार घ्यावयास कोण शोधावे? त्यांची ती ख्रिश्चन प्रथम पत्नी तर त्यांच्यापासून जवळजवळ विभक्त झालेलीच होती. तेव्हा. . . ते नीट मुंबईस माझ्या कनिष्ठ बंधूकडे गेले आणि हिंदू मिशनरी संस्थेत त्यांचे शुद्धीकरण करावयाचे ठरले. मुंबईतच त्यांच्या ओळखीची एक ख्रिश्चन शुश्रू होती, तीही त्यांच्याबरोबरच हिंदू होण्यास सिद्ध झाली. ती अविवाहितच होती. तेव्हा त्या बाईंच्या नव्या गृहास गृहपती पाहिजे होते- यांना गृहिणी पाहिजे होत्या. अर्थातच परस्पर मागणीच्या आणि पुरवठ्याच्या उलाढाली होऊन त्या दोघाजणांची शुद्धी आणि लग्न एकाच दिवशी उरकण्यात आले! हे अधिकारी महाशय आपल्या हिंदू स्त्रीसह ज्या दिवशी येरवड्यास परत आले त्या दिवशी ती विलायती टोपी जाऊन देशी वेषात एखादा पुणेरी ब्राह्मण दिसावा तसे अवतीर्ण झाले होते. त्यांच्या दारापुढे रांगोळी घातली जाऊ लागली. घरात श्रीरामाची आणि कृष्णाची चित्रे शोभू लागली. गृहिणीचे कपाळी कुंकुम आणि गृहस्पतीचे भालावर तिलक चमकू लागला.

''काय, हो. . . ! आम्ही आता आपल्या हिंदू आचरणाप्रमाणे आणखी कोणचा संस्कार करावयास हवा'' ते अधिकारी म्हणाले.

''आणखी काही नको''. . . ने हसत उत्तर दिले ''आता एक सत्यनारायण तेवढा ठोका की झाले''.

त्याप्रमाणे त्यांनी सत्यनारायण केला. त्या वेळी प्रसादास जाऊन येण्याविषयी सर्व कारकून, शिपाई, ग्रामस्थ यांची मने प्रथमपासून प्रवृत्त करून ठेवलेली होती. सत्यनारायणास सर्वजण आलेले पाहून हिंदुसमाजाने आपणास खरोखरच परत स्वीकारले याविषयी त्या पंचवीस वर्षे दुरावलेल्या सद्गृहस्थास विश्वास पटला. त्याच्या मद्रासकडील कुटुंबासही पत्रे गेली. त्या हिंदुकृत जोडप्याचा संसार हिंदुधर्माप्रमाणे आनंदाने चालत असल्याचे आम्हास पुढे कित्येक वर्षेपर्यंत वारंवार कळत असे.

## प्रथम राजकारण, नाही तर समाजकारण!

मागे आम्ही उल्लेख केलेले, अंदमानमधून पूर्वी पर्यवेक्षक असलेले, आणि पंजाबमधून येरवड्यास आम्ही तिथे येण्याच्या संधीसच आणण्यात आलेले येरवड्याचे पर्यवेक्षक आम्हास वारंवार विचारीत तुम्ही सुटल्यावर काय कराल? आम्हीही त्याचे ठरलेले उत्तर देत असू की, ज्या परिस्थितीत आम्ही सुटू त्या स्थितीवर आमचे पुढचे उद्योग अवलंबून असणार. या उत्तराची अधिक चर्चा चाले तेव्हा आम्ही सांगू की, जर बिनाअट सुटलो तर राजकारणात पुरेपूर भाग घेऊ 'पण राजकारण कशा प्रकारचे?' तेही अर्थातच परिस्थितीवर अवलंबून राहणार. जर सध्या दिलेल्या अधिकारांच्या फळातून पुढील अधिकारांची बीजे उत्पन्न होत गेली, ती रुजली आणि या परंपरेने सुधारणांचा विकास - उत्क्रांती - होत चालली तर अर्थातच आम्ही आमच्या प्रतियोगी तत्वानुरूप शांत आणि वैध मार्गानेच राजकारण चालवू. जर राजकारणात पडण्यास काही दिवस बंदी झाली तर बिनराजकारणी उद्योगातच

अटींची ती अवधी व्यतीत करू. कारागृहात राहून जी करता येत आहे त्याहून काही तरी अधिक प्रत्यक्ष सेवा या आमच्या मातृभूमीची करता येईल अशा प्रकारच्या कोणत्याही अटी मान्य करून मुक्तता करून घेणे हे प्रतियोगी धोरणानेच नव्हे तर समाजहिताचे दृष्टीनेही आमचे परम कर्तव्य आहे.

अशा चर्चा वारंवार मागेही अंदमानात होतो तेव्हापासून मोठमोठ्या अधिकाऱ्यांशी झालेल्या होत्या. आम्ही हीच उत्तरे दिलेली होती. परंतु त्यातून काही निष्पन्न झालेले नव्हते. त्यामुळे या चर्चेतूनही काही निष्पन्न होईल अशी मी आशा धरली नव्हती. एका बाजूस सुटण्याचा शक्यतो प्रयत्न करीत होतो. दुसऱ्या बाजूस सुटणे अशक्य असे गृहीत धरून कारागृहामध्ये सहन करीत राहूनच जी काही इतर देशसेवा करता येईल ती करीत होतो.

परंतु एकदा मी आजारी पडून नेहमीच्या पोटदुखीच्या आणि अपचनाच्या विकाराने रुग्णालयात गेलो असता मला एका विश्वासू अधिकाऱ्याकडून कळविण्यात आले की तुम्हास एक-दोन दिवसांतच मुंबईचे गव्हर्नर दोघां-तिघा मोठ्या अधिकाऱ्यांसह भेटावयास येणार आहेत. मागे अंदमानात हिंदुस्थान सरकारचे गृहमंत्री (होममेंबर) इत्यादी अधिकारी येऊन जात असत आणि माझ्याशी त्यांची राजकारणाचीही चर्चा होत असे. परंतु सुटकेचा प्रश्न अशा भेटींनी कधीही समाधानकारक रीतीने सुटला नव्हता. तीच गत याही भेटीची होईल असे मी गृहीत धरून चाललो होतो. परंतु ज्या प्रकारची सुटका व्हावी म्हणून मागेही सरकारला अनेक वेळा कळविले होते त्याच प्रकारच्या काय त्या अटी मान्य करण्याची माझी सिद्धता आहे असे मी सांगितले असताही, या वेळी मागच्या अनेक प्रसंगी या मान्यतेविषयी दाखविल्या गेलेल्या असमाधानाप्रमाणे असमाधान व्यक्त न होता गव्हर्नरमहाशयांनी एकंदरीत समाधानच व्यक्त केले. नंतर राजकारणविषयक चर्चाही झाली. त्यात मी पूर्वी अनेक वेळी लेखी आणि तोंडी कळविलेल्या मताचीच पुनरुक्ती करून सांगितले की, ''जेव्हा कोणत्याही प्रकारे शांत किंवा वैध मार्गांनी आमच्या राष्ट्राच्या राजकीय आकांक्षा पूर्ण होण्याचा संभव उरलेला आढळेना तेव्हा क्रांतिकारक मार्गाच्या आड आणि भीषण रानातून वाट काढीत जाणे आम्हास भाग पडले. परंतु जर सध्या दिलेल्या सुधारणांच्या उपयोगातून पुढील सुधारणांची प्राप्ती आणि त्यातून त्या पुढील प्रगतीची शक्यता असा वैध विकास शक्य होत असला तर अर्थातच आम्ही मोठ्या आनंदाने आमच्या क्रांतिकारक चळवळीही, ज्या तत्वावरच उभारलेल्या होत्या त्या प्रतियोगी तत्वाप्रमाणेच शांत आणि वैध मार्गाचेच अवलंबन करू. आणि सुधारणांचा प्रतियोगी पद्धतीने राष्ट्रहितास पोषक असा शक्यतो उपयोग करून घेऊ. ''

परंतु आमच्या या वचनावर कितपत अवलंबून राहता येईल याविषयी सरकार पूर्वीप्रमाणेच जर साशंक असेल तर?

तर काही अवधीपर्यंत राजकारणात - प्रत्यक्ष चालू राजकारणात आपण भाग घेणार नाही. कारागारातही राजकारणात प्रत्यक्ष भाग घेता येतच नाही. परंतु बाहेर राजकारणव्यतिरिक्त शैक्षणिक, धार्मिक, वाङ्मयात्मक अशा अनेक प्रकारांनी तरी राष्ट्राची सेवा करता येईल. लढाईत पकडलेले सेनापती, युद्ध चालू आहेतो प्रत्यक्ष रणात उतरू नये, 'धरीना मी शस्त्रा कदनसमयीं या निजकरी' अशी यदुकुलवीराप्रमाणे प्रतिज्ञा करवून घेतल्यावर त्या अभिवचनावर (on parole), सोडण्यात येतच असतात. आणि त्या यदुकुलवीराप्रमाणेच ते राजनीतिज्ञ सेनानी प्रत्यक्ष शस्त्रसंन्यास तेवढा करावा लागला तरी राष्ट्रकार्यात त्याचे सारथ्य तरी करता यावे म्हणून अशी अट मान्य करण्यात काही एक कमीपणा मानीत नाहीत तर उलट तसे करणे हेच तत्कालीन कर्तव्य समजतात.

असा विचार करून आम्ही अंदमानात पूर्वी जेव्हा राजक्षमेने शेकडो क्रांतिकारक सुटावयाची वेळ आली तेव्हा त्यांस वरील अटींस लेखी मान्यता द्या म्हणून अभिप्राय दिला, आणि या अटींवर सही करूनच ते शेकडो राज्यक्रांतिकारक सुटलेले होते.

तेव्हा या अटींविषयी काही महत्वाची अडचण नव्हती. याच अटींवर पूर्वी आम्हास सोडण्यात आले नाही, याचे कारण त्या अटींबरोबरच भूतकाली आमच्या क्रांतिकारक चळवळी कशा झाल्या, त्यात कोण होते, किती सिद्धता असे इत्यादी माहितीही दिली जावी असा संकेत करण्यात येई. परंतु भूतकालाविषयी ब्रही विचारला जाऊ नये, सांगितला जाऊ नये. भूतकालच्या घटना ज्या एकदा मोहरबंद झाल्या त्या झाल्या! पुढचे काय ते बोला? हे आमचे निर्वाणीचे वचन आम्ही निक्षून उद्‌गारल्यानंतरही या वेळी गव्हर्नरमहाशयांनी सुटकेची चर्चा बंद केली नाही. शेवटी केवळ प्रस्तुत राजकारण काही निश्चित अवधीपर्यंत आम्हास निषिद्ध असावे या आणि स्थलबद्धतेच्या अटीवर आपली सुटका करण्याचा मी शक्य तितका प्रयत्न करीन आणि नवीन येणाऱ्या गव्हर्नरापुढे - सर लेस्ली विल्सन यापुढे तो विषय मांडीन असे आश्वासन देऊन गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड आणि त्यांचे मंत्रिमंडळातील इतर अधिकारी निघून गेले. त्यांनी आम्हाविषयी अत्यंत आदरयुक्त उद्‌गार संभाषणात मधून मधून काढले होते. आमच्या कारागारीय पर्यवेक्षकांनीही आम्हास सोडण्याविषयी त्यांस सबळ अनुरोध केला होता.

ही चर्चा झाल्यानंतर पुन्हा पुष्कळ दिवस लोटले. आम्हास वाटले की मागच्या अनेक बोलाचालीप्रमाणे ही चर्चाही पोकळ वायूत विलीन झाली.

आम्ही आपल्या नेहमीच्या निश्चयाप्रमाणे आपली कारागारीय कर्तव्ये यथावत चालवू लागलो. मागे सांगितलेच आहे की, तेथील राजबंदीवानांत जे अनेक नवागत - राजकारणात असहयोगाच्या चळवळीच्या धांदलीत अलीकडेच प्रवेशलेले - बंदीवान होते त्यांस ऐतिहासिक राज्यक्रांतीच्या आणि राजकीय उलाढाल्यांच्या मर्माची मुळीच माहिती नव्हती. पण त्यांत कित्येक अत्यंत प्रामाणिक आणि देशभक्तीनेच उस्त्फूर्त झालेले तरुण असत. त्यांस मागील राज्यक्रांतीचा इतिहास कळावा म्हणून आम्ही एक व्याख्यानमाला सुरू केली होती. एकदा सर्व हिंदू मुसलमान राजबंदी एकत्र करून 'एकीची' खरी व्याख्या आणि स्वतंत्र हिंदुस्थानची घटना यांची चर्चा करविली होती. त्या मुसलमानांत काही नावाजलेले पुढारी होते. आणि त्याच समयी गांधीजीही शेजारच्याच भिंतीआड राहत असल्याने त्यांची मते त्यांच्याकडे जाणारे लोक इकडे कळवीत. आम्ही त्यांच्या त्या असहयोगी मताचा आणि खिलाफतीच्या घातक अंतरंगाचा सारखा निषेध चालविला होता.

याच व्याख्यानमालेतील त्या दिवशीचे माझे व्याख्यान मदनलाल डिंगराच्या चरित्रावर होते. अभिनव भारतीय बहुतेक फाशी गेलेल्या आणि मेलेल्या तरुणांची चरित्रे तिथे सांगितली गेली होती. नवागत राजबंदीवानांचा त्यांच्या विषयींचा आदर दिवसेंदिवस परमावधीला पोचत चालला होता. मदनलालच्या प्रकरणाची माहिती ऐकण्यास जवळजवळ पन्नास-पंचावन्न बंदीवान त्या खोलीत आणि ओट्यावर एकत्र बसले होते. बाजूला अधिकारी येतात की काय ते पाहण्यास नेहमीप्रमाणेच पहारे होते. मदनलालच्या साहसाच्या वर्णनाच्या अक्षरोअक्षरी त्या राजबंदीवानांच्या अंगावर रोमांच उभे राहत होते. . .

इतक्यात पहाऱ्यावरच्या मित्रांनी धावत धावत येऊन ''फाटक वाजले, कोणी तरी येत आहे.'' म्हणून कळविले. दिसता दिसता मंडळी होती की नव्हतीशी फाकून गेली. आपआपल्या चाळीशी आणि कोठड्यांत जाऊन

ते बसतात न बसतात तोच एका सार्जंटने मला बोलावले. मुख्या कार्यालयात नेले. पर्यवेक्षकाबरोबर सुटकेची पुन्हा चर्चा चालली. आम्ही विचारले अशा नुसत्या चर्चा करून मी थकलो. काही सुटकेची वरची आज्ञा आली असेल तर याचा उपयोग!

ते म्हणाले होय! तुमच्या सुटकेविषयी सरकारने या चर्चेत तुम्ही सांगितलेल्या अटी घालण्याचे ठरविले आहे.

आम्ही म्हटले पण याच अटी आम्ही आज सात- आठ वर्षे आम्हास मान्य आहेत म्हणून सांगत आहोत मग हा घोळ का?

## सुटकेच्या अटींचा खर्डा

त्यांनी लगेच कागद काढून अटींचा लेखी खर्डा केला आणि सोबत सरकारकडून लिहून आलेले एक कथन (statement) आमच्यापुढे केले. आम्ही वाचले. 'लेटर्स फ्रॉम अंदमान' या पुस्तकात प्रसिद्ध झालेले सन १९२० चे आमचे पत्र आहे, त्या पत्राचा उल्लेख करून आम्ही सांगितले की, त्याप्रमाणे कथन करावयास आम्ही सिद्ध आहो. परंतु यावरून लिहून आलेल्या कथनात त्या आमच्या कथनाशी जुळण्यासारखा फेरफार केला पाहिजे. आम्हास ''तुम्ही कसे ते लिहा'' म्हणून सांगण्यात आले. परंतु अगदी अवश्य तितकेच चारदोन शब्द घालावेत की ज्यायोगे इतका अशक्य वाटणारा योगायोग असा जमत आला असताही तो हातातून झटकन निसटू नये! अशी पर्यवेक्षकाने सहानुभूतिपूर्वक इच्छा दर्शविली.

आम्ही कथन लिहिले. त्यात योजिलेले मुख्य शब्द काय अर्थी योजिले ते स्पष्ट करण्यासाठी एक-दोन उपवाक्येही घातली होती. पर्यवेक्षकांनी ते कथन फार लांब होते म्हणून पुन्हा काटछाट केली. आम्ही कथनात जे शब्द योजले त्यांचा अर्थ वर उल्लेखिलेल्या अंदमानातून पाठविलेल्या १९२० च्या पत्रात केलेला आहे तसाच मानला जाईल हे अभिवचन पर्यवेक्षकांनी दिल्यावरून आम्ही ती उपवाक्ये गाळली आणि ते कथन वर धाडण्यात आले. आम्ही परत कोठडीत येऊन पोचलो.

आता मात्र बहुधा सुटका होणार म्हणून रंग दिसू लागला. राजबंदीवान आणि इतर सर्व आनंदात मग्न झाले. पण मी पुनः पुन्हा स्वतःला आणि त्यांना बजावी 'बहुधा!' सुटका होणार. अगदी निश्चितपणे त्यावर अवलंबू नका. माझ्या आयुष्यात इतक्या फसगती झाल्या आहेत!

प्रकरण तेरावे

# जन्मठेपीची शेवटची रात्र

ती माझी जन्मठेपीच्या शिक्षेची कारागृहातील शेवटची रात्र होती. परंतु ती शेवटची होती हे आता निश्चित करता येत आहे. त्या रात्री - ती शेवटचीच आहे असे निश्चित करता येत नव्हते. जर ही रात्र कारागृहातील माझी शेवटचीच - निदान जन्मठेपीच्या या शिक्षेची शेवटचीच - रात्र असेल तर! अहाहा - उद्या या वेळेस ज्या झोपेवर वॉर्डरचा पहारा नाही अशी स्वच्छंद झोप मला, खिडक्या मोकळ्या टाकलेल्या अशा कोणत्यातरी चांदणे - अंथरलेल्या खोलीत, लागलेली असणार!

पण ही शेवटची रात्र नसेल तर? नसो! निदान या जीवनाची जी शेवटची रात्र होणारी आहे ती तरी या बंदीशाळेची शेवटची रात्र होणारी आहेच ना!

त्या रात्री भयंकर थंडी पडली होती. जानेवारी महिना असूनही पावसाची जोराची सर आली होती. आमची पांघरुणे आम्हास पुरत नसत. दोन चवाळी, येरवड्याच्या थंडीस पुरेनात. दोन चड्ड्या, दोन कुडते, ते एकावर एक घातले तरी थंडी लागे, पण कपडा असा अधिक उरलेलाच नाही. इतक्यात ती पावसाची सर! मागच्या भिंतीच्या खिडकीतून सारखे फवारे आत उडताउडता खोलीत निजणे अशक्य झाले. कपडे भिजले, तेव्हा एका कोपऱ्यात अंग शक्य तितके आकुंचन करून आणि ती अर्धी ओली वस्त्रे लपेटून दबून बसलो. तशाच थंडीत काही गुंगी घेत घेत सकाळ झाली.

बंदीगृहात अशा कोपऱ्यात बसून निजणाऱ्या रात्री कित्येक काढलेल्या होत्या. ही शेवटची रात्र ठरली म्हणून तिची स्पष्ट आठवण राहिली.

सकाळी नेहमीप्रमाणे कार्यक्रम चालला. मागे मदनलाल डिंगराच्या चरित्राचे जे व्याख्यान अर्धेच सोडले होते ते पुरे करण्यासाठी नुसत्या उभ्या उभ्याच दहा-पाच राजबंदीवानांस तो उत्तरार्ध सांगत होतो. कारण त्या दिवशी सर्वांची सभा भरवून बसून व्याख्यान देण्यास संधी सापडली नाही.

तोच कार्यालयातून पर्यवेक्षकाचे बोलावणे आले. त्याबरोबरच तेथील कोण्या विश्वासू अधिकाऱ्यांचा संदेशही आला की, ''तुम्ही सुटलात!''

माझ्या सहकारी, सहकष्टभोगी, आणि सहचर असणाऱ्या त्या मित्रांच्या - ज्यांच्या संगतीत अंदमानातील कष्टतम अशी वर्षोपुवर्षे काढली त्यांच्या - डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. पण आमच्या? - आमच्या नेत्रात आणि मनात त्या मित्रांस बंदीगृहातच सोडून आपण सुटतो की काय याची भीती थरथरू लागली! त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. ते गळ्यात पडले. साठ-साठ वर्षांचे ते शीख बंधू ''बाबूजी! आइये! बाबूजी हमको भुलना नहीं!'' म्हणून प्रेमळ आदराने म्हणत आम्हास मिठ्या मारू लागले. ''आपण आमच्या आधी सात सात वर्षे काळेपाणी सोशीत होता मग आधी सुटलात तर काय झाले? आपली सुटका तीच आमची. तुमच्या सुटकेत आमच्या सुटकेचा मार्ग तरी काही अंशी मोकळा झाला आहेच आहे!'' निदान आपल्या प्रियतम मातृभूमीच्या सुटकेचा मार्ग तरी कांही अंशी मोकळा झाला आहे.

आम्ही म्हटले, ''पुढे ईश्वर काय शक्ती देईत ते खरे. पण बंधूंनो, एका गोष्टीची साक्ष मात्र आपण द्यालच की, या बंदीगृहातील यातनांच्या जबड्यात भरडत राहून मी जी बारा वर्षे काढली त्यांतील या शेवटच्या क्षणीही मी तुमच्यापाशी त्याच ध्येयाच्या समर्थनार्थ त्याच ध्येयाच्या प्राप्तीसाठी झुंजत पडलेल्या. . . . . . . . . . . !'' माझ्या ओठावर ही भयंकर शिक्षा लागली तेव्हा जो जयघोष नाचत होता तोच जयघोष ती शिक्षा आपल्या सर्व भयांस आणि यातनांस माझा बळी देत देत आज थकून स्वतःच निश्चेष्ट पडत असताही माझ्या आणि तुमच्या ओठावर निनादत आहे! बोला! स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय!''

आम्ही सगळ्यांनी स्वातंत्र्यलक्ष्मीचे जयजयकार केले आणि एकमेकांचा निरोप घेतला.

कार्यालयात येताच पर्यवेक्षकाने सुटकेची आज्ञा वाचून दाखविली. पाच वर्षेपर्यंत प्रचलित राजकारणात भाग घेऊ नये आणि रत्नागिरी जिल्ह्यात स्थलबद्धतेत राहावे या दोन मुख्य अटी ठरलेल्या होत्या. त्यात निवडानिवडीचा प्रश्नच उरलेला नव्हता. आजच्या आज कुठेही न थांबता रत्नागिरीस आपण निघाले पाहिजे म्हणून सांगण्यात आले - आणि बंदीवानाचा वेष उतरून आम्हाला घरचे कपडे घालण्यास आज्ञा दिली. जन्मठेपेच्या बंदीगृहातील ही शेवटची 'आज्ञा' होती.

मुंबईस डोंगरीच्या बंदीगृहात १९११ व्या वर्षी हे घरचे कपडे उतरून ठेवले होते. आज १९२४ व्या वर्षी ते पुन्हा अंगावर घातले.

मनास एक प्रकारचा विषण्ण विराम, कोणचासा उदास आनंद वाटू लागला. त्या पर्यवेक्षकांनी उदार आणि सरळ मनाने माझे अभिनंदन केले. आता मात्र जपा बरं का! म्हणून अगदी निष्कपट भावाने बजावले.

त्या ''आता मात्र जपा अं'' या शब्दातच माझ्या मनाच्या आनंदाच्या उदास मनाचे कारण निगूढ झालेले होते.

कार्यालयातील माझे सर्व देशबंधू-बंदीवान आणि लहानापासून थोर अधिकाऱ्यांपर्यंत-माझेभोवती गोळा झाले. आणि म्हणाले, ''रामाप्रमाणेच चौदा वर्षे वनवास भोगलात. धन्य आहे! आज आपल्या राष्ट्राचा आनंद गगनात मावणार नाही''

त्या प्रेमळ स्वागतास स्वीकारीत असताही आम्हास इतके बोलल्यावाचून राहवेनाच की ''एकत्र, पण अत्यंत महत्वाची उणीव या तुलनेने आपणा सर्वांच्या मनास झोंबली पाहिजे, की रामाने. . . केले! आपण वनवास भोगला खरा पण. . . ! ते कार्य झाले म्हणजे खरा वनवास संपेल! आणि ईश्वराची दया असेल, तर तेही कार्य एक दिवस या आनुषंगिक कार्यासारखेच यशस्वी होईल!''

मला नेण्यास माझे आप्तेष्ट आले होते. कारागृहाचे दार उघडले. मी बाहेर पडलो. कोण युक्त्याप्रयुक्त्यांनी बाहेर पडलो! बंदीशाळेच्या कुलुपाच्या किल्लीच्या भोकातून बाहेर पडलो!

माझी सुटका झाली तर! क्षणभर आजूबाजूस पाहिले. मनात म्हटले या जन्मठेपीतून सुटलो - पण कोणी सांगावे. .! बंदीगृहास नित्याचा रामराम ठोकण्याची वेळ अजून आली नाही. त्याची अगदीच ओळख सोडून सध्याच चालावयाचे नाही. मार्सेलिसलाही असाच एकदा सुटलो- निसटलो होतो! तसेच हे सुटणेही होणार नाही कशावरून?

असे मित्रांशी बोलत आणि हसत मोटारमध्ये बसलो. तिची चाके हालली आणि जन्मठेपीच्या सीमेस उल्लंघून जीवनाच्या सीमेत आम्हास तिने पुन्हा आणून सोडले.

त्या जीवनाच्या सीमेत पुन्हा पाऊल टाकताच माझे राष्ट्रचे राष्ट्र कृतज्ञ स्वागताच्या प्रेमळ आलिंगनात क्षणभर मला माझाच विसर पाडते झाले. पहिल्याच दिवशी मी माझ्या मायभूमीच्या घरी अगदी घरच्यासारखा वागू लागलो. तिने ''भले वीर'' म्हणून पाठ थोपटताच या जन्मठेपीचे खोल खोल गेलेले यातनांचे सर्व घाव भरून आले, तिच्याविषयी शेष जे काही उरले ते केवळ या तिच्या ''अंदमानच्या आठवणी''!

यास्तव फाशीची विषारी छाया अंगावर पडताच तिचा तो हलाहलमय दंश सहन करण्याची शक्ती अंगी यावी म्हणून देवीची जी ''मूर्ति दुजी ती'' या ग्रंथारंभी आम्ही आवाहन केली होती. तिचे आता आम्ही कृतज्ञ आभारात सध्यापुरते तरी विसर्जन करतो!

प्रकरण चौदावे

# प्रिय वाचक!

ही जन्मठेप संपली. एक का? दोन जन्मठेपी संपल्या, त्यांच्या आठवणी या ''जन्मठेप'' ग्रंथात त्रोटक आणि त्रुटितपणे संग्रहित केल्या आहेत.

या जगतात जनन होताच काळाच्या काळेपाण्यावर आम्हास धाडले जाताना जी मोठी जन्मठेप झाली तिच्या आठवणींतील ही ''जन्मठेप'' हे नुसते एक प्रकरण आहे. एक केवळ विभाग आहे. ज्या महान व्रताच्या अनुष्ठानात ही ''जन्मठेप'' संपली त्यातच तीही ''जन्मठेप'' संपो!

सुटका झाली - पायांतील लोखंडी बेडी तुटली. पण मनाभोवती जखडलेली इच्छेची बेडी तुटली नाही! बंदीगृहाच्या दगडी तटाबाहेर येऊन मी उभा राहिलो. पण तृष्णेच्या क्षितिजाचा दुर्लंघ्य तट अजून आत्म्यास कोंडून धरून उभा आहेच!

प्रिय वाचक! ही कंटाळवाणी कर्मकथा लिहिताना मला जितका त्रास आणि तेच ते वर्णण्याचा वीट आला तितकाच तुलाही ते ऐकण्याचा कंटाळा आणि पुनरुक्त वीट आला आहेना? असेल तरच या ग्रंथाचे साफल्य! कारण त्यायोगेच जिची एका दिवसात वाचून टाकता येईल इतकी त्रोटक कथाही तुला इतकी कंटाळवाणी आणि असह आणि बेचव वाटते ती जन्मठेप, क्षण क्षण मोजून तिची चौदा वर्षे प्रत्यक्षपणे कंठीत असता ती तुझ्या भारतीय राजबंदींना किती कंटाळवाणी, निस्सार आणि असह्य झाली असेल याची तुला काही तरी कल्पना आली असे म्हणता येईल.

प्रिय वाचक! येतो आता. जाता जाता एवढी विनंती या तुटलेल्या लेखणीसही केल्यावाचून राहवत नाही की या कंटाळ्याचाही कंटाळा न करता त्यांस कर्तव्य म्हणून ज्यांनी शेवटपर्यंत कवटाळून धरले, जे या भयंकर दिव्यात जळून गेले आणि जे त्यातून जळले जाता जाताच जळता न आल्याने बाहेर पडले - त्यांची ही आठवण तू विसरू नको. पुढे मागे ती तुलाच उपयोगी पडेल!